# सूफीवाद
# आणि
# तुलनात्मक धर्मशास्त्र

## खण्ड २

डॉ. मुहम्मद आज़म



महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

# सूफ़ीवाद
# आणि
# तुलनात्मक धर्मशास्त्र
## (त्रिखण्डात्मक)

## खण्ड – दोन

**डॉ. मुहम्मद आज़म**

एम.ए. (हिन्दी–फ़ारसी); एम.एड. (तौलनिक शिक्षणशास्त्र);
पीएच.डी. (हिन्दी); एम.ए. (समग्र उर्दू); पीएच.डी. (उर्दू)
माजी हिन्दी, उर्दू आणि फ़ारसी विभाग प्रमुख,
अहमदनगर महाविद्यालय, अहमदनगर – ४१४००१ (महाराष्ट्र)
दूरध्वनी : (०२४१) २३४३७५८
भ्रमणध्वनी : ८३०८३३०६३४

*महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई*

- **सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र (त्रिखण्डात्मक) खंड दोन**

  डॉ. मुहम्मद आजम

- **पहिली आवृत्ती :** २०१९

- **प्रकाशक :**

  सचिव,
  महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
  रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
  पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
  सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.

- **अक्षरजुळणी :**

  सौ. अनिता विनायक भालेराव,
  क्रिएशन, 'जयश्री', एन-१, सिडको,
  औरंगाबाद - ४३१ ००३
  दूरध्वनी : ०२४०-२४८६९१०

- **मांडणी व रचना :**

  श्री. विनायक अंबादास भालेराव
  औरंगाबाद - ४३१ ००३
  भ्रमणध्वनी : ९४२३३९६८८१

- **मुद्रक :**

  व्यवस्थापक,
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  कोल्हापूर-४१६ ००३.

- **मुखपृष्ठ :**

  श्री. भ. मा. परसवाळे, हिंगोली
  भ्रमणध्वनी : ९४०३२२४१३०

- **एकत्रित मूल्य : ७५६**

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून, या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

# अध्यक्षांचे मनोगत

आज आपण एकवीसाव्या शतकात शिक्षण, विज्ञान अन् तंत्रज्ञानाच्या माध्यमातून प्रगतीचा एक एक टप्पा गाठत असताना जगभरात अवर्षणाचं, अतिवृष्टीचं आणि पर्यावरण असंतुलनाचं संकट आपल्या डोक्यावर घोंगावत असताना जाती-धर्माच्या नावानं दहशतवादाचं भूत भेडसावत आहे. यातून जगभर अशांती अन् भीतीच्या काळ्याकुट्ट ढगांनी आसमंत भरून व्यापला आहे.

खरे तर सुखद जगण्यासाठी धर्म पाळणे, हा निसर्गाचा जगमान्य नियमच आहे. निसर्गात प्रत्येक गोष्ट निसर्ग नियमाप्रमाणेच घडत असते. नियम मोडले की निसर्ग शिक्षा करतो. आपणही जगताना, वागताना, खाताना नियम मोडला की शिक्षा होणारच; पण बरेचदा ती दृश्य स्वरूपात नसते. आपले खाणं-पिणं अन् वागण्यातून आपल्या शरीर-मनाची जडण-घडण होत जाते. शरीर हे स्वयंचलित यंत्र आहे. चुकीचे केले की बिघाड ठरलेला. मग त्याची सर्व्हिसिंग स्वत: अथवा डॉक्टरांकडे जाऊन करावी लागते.

समाजात प्रत्येक माणूस या समाजाचा घटक असतो. समाज धर्म भावनेने बांधलेला असतो. प्रत्येक धर्मात स्वातंत्र्य, बंधूभाव आणि समतेचा संदेश हा मूळ गाभा असतो. मात्र प्रत्येक धर्मातील काही माणसे स्वार्थ, मोह, हेवा याचे गुलाम बनून हिंसकवृत्तीचे बळी बनतात. अन् त्यातून अतिरेकी दहशतवाद डोकं वर काढतो.

डॉ. मुहम्मद आज़म यांनी 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' या बृहद ग्रंथात या मानवी प्रवृत्तींचा शोध घेतांना यावर मानवता धर्माचा मार्ग प्रतिपादिला आहे. ते म्हणतात, सूफ़ी हे इस्लाम धर्माचे पाईक, शांतीचे खंदे पुरस्कर्ते आहेत. सूफ़ी धर्म तत्त्वज्ञान शांती मार्ग आहे. जगभरातील अशांततेचं मूळ प्रत्येकाच्या स्वार्थात आहे. प्रत्येक चांगल्या अन् वाईट गोष्टींची सुरुवात आपल्यापासूनच होत असते. त्याकरिता सदाचार हा परमार्थाचा पायाच आहे. शांतीचे अन् विश्वबंधुत्वाचे साम्राज्य जगभर नांदावे हे इस्लाम धर्माचे उदात्त ध्येय व उद्दिष्टयच आहे आणि या करिता सूफ़ी संत झटत आले आहेत.

जगभरातील माणसं ही एकाच परमेश्वराची लेकरे आहेत, त्यामुळे सर्वांनी परस्पर प्रेम अन् गुण्या-गोविंदाने जगावे, असे सर्व धर्मातील संत-महात्म्यांनी सांगून ठेवले आहे. जगभरातील लढाया, दंगेधोपे बंड-उठावाच्या मुळाशी मानवी मनाचा स्वार्थच आहे.

त्यामुळेच सर्व संतांनी मन आवरा हा संदेश देऊन, प्रसंगी स्वार्थी माणसं जागोजागी दहशतवाद अन् हिंसा सुरू ठेवत आहेत. यास वेसण घालण्याचं काम सूफ़ी व अन्य सर्व संत वर्षानुवर्षे शिकवण देत आले आहेत. सद्‌विचार व सदाचार हे सूफ़ी संतांचे गुणकारी औषधच आहे.

या निसर्ग सृष्टीमध्ये प्रत्येक गोष्टीत विविधता आणि वैचित्र्य आढळून सर्व एका निसर्ग नियमाने ती बांधलेली आहेत. प्रत्येकाने नियम पाळणे हा इथला कायदा. जो नियम मोडेल, त्याला शिक्षा ठरलेली; परंतु काही माणसेमनाविरुद्ध स्वार्थाच्या आहारी जाऊन हिंसेचे पाईक बनतात. अन् तिथचं दहशतवादाचा उदय ठरलेला. यावरचा उपाय डॉ. आज़म यांनी या ग्रंथात सांगितला आहे. ते म्हणतात, संपूर्ण जगास विश्वबंधुत्व आणि विश्वशांतीची तहान भूक आहेच. त्याकरिता सर्व धर्मांचा तौलनिक अभ्यास करण्याची आवश्यकता आहे. हेच काम डॉ. आज़म यांनी या ग्रंथात समर्थपणे केले आहे. या बृहत ग्रंथात त्यांनी भारतीय तत्त्वज्ञान, पाश्चात्य तत्त्वज्ञान, इस्लामी तत्त्वज्ञान, आणि सूफ़ी तत्त्वज्ञान यांची सुलभपणे ओळख करून दिली आहे.

आपापल्या मनाची शांती ढळू न देता, सर्व धर्म तत्त्वांचा आदर करत मानवी मूल्य जपण्यासाठी मनाची प्रसन्नता टिकवावी लागेल. संत तुकोबांनी मनाच्या अशा प्रसन्नतेत सिद्धीची बीजे पाहिली आहेत. तेच कार्य 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशस्त्र' या डॉ. मुहम्मद आज़म यांच्या ग्रंथांच्या माध्यमातून होत आहे. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास या ग्रंथ प्रकाशनाची संधी त्यांनी दिली, त्याबद्दल त्यांचे आभार.

दिनांक : १४/१/२०१८

**बाबा भांड**
अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य साहित्य
आणि संस्कृती मंडळ,
मुंबई.

# अभिप्राय : डॉ. भालचंद्र नेमाडे

रा. मुहम्मद आजम यांचा प्रस्तुत 'सूफीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' हा ग्रंथ महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत महत्त्वाचे कार्य केलेल्या सूफी दर्शनावरचा एक पायाभूत ग्रंथ ठरेल, याची मला खात्री आहे. अनेक वर्षांच्या परिश्रमाचे हे फळ असून मराठी साहित्य, संस्कृतीआणि धर्मविचार या क्षेत्रांतील अभ्यासक्रमांना अपरिहार्य ठरेल अशी सांगोपांग माहिती ह्या त्रिखंडात्मक बृह्दग्रंथात मिळते. सूफी विचारावर एकत्रित असा व्यासंगपूर्ण तपशील मराठीत कुठल्याही अन्य ग्रंथात सापडणार नाही. मी अनेक वर्ष तौलानिक भारतीय साहित्य अनेक विद्यापीठांमध्ये शिकवत असतांना संपूर्ण जगात प्रभावशाली ठरलेल्या ह्या तत्त्वज्ञानासंबंधी मला परक्या भाषांमधील पुस्तकांचाच आधार घ्यावा लागे, कारण मराठीत ह्या विषयावर सविस्तर चर्चा करणारी सामग्री फारशी नव्हती. आता रा. मुहम्मद आजम ह्या मराठी विद्वानाने लिहिलेल्या ग्रंथांनी ही उणीव बऱ्याच अंशी भरून येत आहे.

मराठीत तसेच इतर भारतीय भाषांमध्येही सूफी तत्त्वज्ञानाच्या प्रभावाचे कार्य फार मोठे ठरले आहे. विनोबा भावे, साने गुरुजी, रा. चिं. ढेरे, सेतु माधवराव पगडी आदि लेखकांनी ह्याबद्दल मौलिक ग्रंथरचना करून ठेवली आहे. अस्सल भारतीय बहुविधता आणि सहिष्णुता जोपासणारे आणि इथल्या देशी परंपरा, लोककला, लोकाचार जपणारे सूफी तत्त्वज्ञान सिंधी, पंजाबी, काश्मिरी, हिंदी आदि उत्तरेतील भाषांमध्ये क्रांतिकारक बदल करणारे ठरले आहेत. गुरू नानक, कबीर, शाह लतीफ, बंगाली बाऊल फकीर असे मोठमोठे भारतीय साहित्यकार सूफी प्रभावाची जिवंत ओळख करून देतात. महाराष्ट्रात शिवाजी महाराजांच्या घराण्यात, एकनाथाच्या गुरूपरंपरेतील सय्यद चांदसाहेब कादरी उर्फ चांद बोधला, तुकारामाच्या चिस्ती सूफी गुरू परंपरेच्या सय्यद बंदानवाज गेसूदराज आणि महादजी शिंदे यांच्यापर्यंत सूफी संतांना मध्यवर्ती स्थान होते. मराठी संस्कृती किती समावेशक आहे, याचे हे ठळक उदाहरण आहे. देवगिरीजवळ खुल्दाबाद येथे तर मोठे सूफी विद्यापीठ भरभराटले होते. गावोगाव पीर, समाध्या, जत्रा आजही आढळतात. सूफी विचारांद्वारे आपण अरबस्तान, इराण, तुर्कस्तान आणि उझबेक वगैरे मध्य आशियातील संस्कृतींशी बंधुभावाच्या नात्याने जोडले गेलो होतो. देशाबाहेरील ग्रीक, इराणी, झरतुष्ट्र, खिस्ती ह्या तत्त्वज्ञानांशी तसेच देशी जैन, बौद्ध आणि इतर भारतीय दर्शनांशी स्वतःला सेंद्रियपणे जोडूण घेणारा भारतीय सूफी वाद आपल्या सर्व भाषांमध्ये अत्यंत सर्जनशील ठरला आहे. मराठीत एकनाथ, तुकाराम ही देदिप्यमान उदाहरणे सूफी प्रभावाची आहेतच. महाराष्ट्रातला पहिला सूफी कवी शहा मुंतोजी ब्राह्मणी (बहामनी) याच्या दखनी भाषेतील पंचीकरण ग्रंथात लिहिल्याप्रमाणे :

।। हिंदू - मुसलमान येक कर दिये ।।

हे सूफी स्वप्न आपल्याला अजूनही पुरे करता येऊ नये, याची खंत वाटते. मराठी भक्तीकाव्यात ईश्वराला प्रेयसी मानून भक्तीरस अविष्कार करण्याची उन्मनावस्था म्हणजे मधुराभक्तीचे मूळ ही सूफी-मराठी संयोगात सापडते.

कुराणात इस्लामचे त्याज्य ठरवलेल्या संगीतनृत्यादि कला सुफीनी बंडखोरी करून प्रत्यक्ष आचरणात आणल्या आणि हा सनातनी दुराग्रह टाकून देऊन उत्तुंग सर्जनशीलता जोपासली. साहित्यात तर वैश्विक मानदंड ठरतील असे मीर, गालिब, मोमिन हे कवी प्रभावशाली होते. उर्दू ह्या महाराष्ट्रात जन्मलेल्या आर्यभाषेत उत्तमोत्तम काव्यप्रकार, अलंकार, शैलीरूपे आणि मुशायरादि जगात कुठे नसतील असे लोकाभिमुख वाङ्मयव्यवहार रुढ केले. भारतीय संगीताला सूफी तत्त्वज्ञानाने दिलेले गौरवशाली रूप तर अमीर खुस्रोपासून आजपर्यंत बहरत आले आहे.

रा. मुहम्मद आजम यांनी आपल्या व्यासंगी शैलीत अनेक तपशील मार्मिक पद्धतीने दिले आहेत आणि जागतिक सूफी वाङ्मयाच्या नकाशावर भारतीय सूफी संप्रदायांचे अमूल्य योगदान सिद्ध केले आहे. मोठा आवाका असूनही हा ग्रंथ त्यांच्या अस्सल मराठी भाषेच्या वापरामुळे वाचनीय झाला आहे. सूफी तत्त्वज्ञानासंबंधी एकत्रितपणे सुसंगत मांडणी करण्याचे रा. आजम यांचे कौशल्य वाखाणण्या सारखे आहे. त्यांनी वापरलेली परिभाषा आणि शैली अहमदनगरच्या अस्सल मराठमोळ्या धाटणीमुळे सुलभ अर्थवाही झाली आहे. मराठी मातृभाषा असलेल्या मुसलमान विद्वानांमध्ये त्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले पाहिजे. उदा. "अध्यात्माच्या प्रक्रियेत कठीण चढण चढून गेल्यावर जे घाटमाथे लागतात", त्या अवस्थांचे त्यांनी केलेले विश्लेषण पाहावे. मराठीतल्या नव्या पिढीतल्या मुसलमान लेखकांनी ही परंपरा जोपासली पाहिजे, कारण ही महाराष्ट्राची वैभवशाली भक्तीपरंपरा आहे.

रा. मुहम्मद आजम यांनी हा बहुमोल ग्रंथ रचून मराठीची अतुलनीय सेवा केली आहे. प्रचंड मोठा जागतिक विचारांचा आवाका असूनही त्यांनी संपूर्ण विवेचन संतुलित आणि सुबोध केले आहे. मराठीच्या विद्यार्थ्यांना तसेच आंतरविद्याशास्त्रीय तौलनिक साहित्याच्या अभ्यासकांना हा संदर्भग्रंथ अत्यंत उपयुक्त ठरेल, याची मला खात्री आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष रा. बाबा भांड यांनी ह्या बहुमोल प्रकाशनाची जबाबदारी लक्षपूर्वक पार पाडली, हे स्तुत्य आहे.

**डॉ. भालचंद्र नेमाडे**

गोहाती,
२६ जानेवारी २०१८

# ग्रंथकर्त्याचे मनोगत

**चालना व संकल्प :**

५ मे २००९ रोजी माझे प्रथम ग्रंथ ''सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन''ची हस्तलिखित प्रत प्रकाशक श्री. अरुण जाखडे यांच्या स्वाधीन केल्यानंतर मी त्या ग्रंथलेखनाचा शीण घालविण्यासाठी जवळ-जवळ तीन वर्षे लेखनकार्यास विराम दिला होता. मात्र दरम्यान माझे जिवलग मित्र सोलापूरचे **प्रा. फ़ख़्रुद्दीन बेन्नूर** हे आपल्या खाजगी कामानिमित्त अहमदनगरला आले असता वेळ काढून माझ्या घरी येऊन भेटले. कुशल-मंगल झाल्यानंतर त्यांनी सहज विचारले, 'सध्या काय चालले आहे?,' 'काही नाही, आराम आहे,' मी उत्तरलो. माझे हे उत्तर ऐकून ते संतापून गरजले, 'असे काय करता? वृद्धापकाळ आहे. तब्येतीचे काही खरे नसते. अद्याप तुमचे आरोग्य उत्तम आहे. उरलेल्या वेळेचा सदुपयोग करा. तुमचा पुढचा मनोनीत प्रकल्प तत्काळ हाती घ्या.'

माझे डोळे उघडले. सल्ला पटला. मी ताबडतोब दुसऱ्या दिवसापासून माझे मनोनीत प्रकल्प म्हणजेच **'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र'**च्या लेखनास सुरुवात केली. हा प्रकल्प दि. १० एप्रिल २०१२ रोजी हाती घेतला व तो दि. १० मार्च २०१४ रोजी तडीस नेला. मित्रवर्य प्रा. बेन्नूर यांच्या प्रेमळ कानउघाडणीसाठी मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्यांची कानउघाडणी माझ्या सदरहू ग्रंथलेखनासाठी ऊर्जस्वी व ओजस्वी प्रेरणाच ठरली! तिने पुढील लेखनकार्यास शेवटपर्यंत हुरूप देऊ केले.

**प्रयास :**

ग्रंथलेखनाचा आराखडा निश्चित करण्यामध्ये आणि प्रकरणांची मांडणी व विभागणी करण्यामध्ये प्रो. देविदास दत्तात्रेय वाडेकरद्वारा संपादित ''मराठी तत्त्वज्ञान - महाकोश'' (त्रिखंडात्मक)च्या तिन्ही खंडांचा बहुमोल उपयोग झाला. इतकेच नव्हे तर माझ्यासारख्या वाङ्मयाच्या एक साधारण अभ्यासकास तत्त्वज्ञानाची बैठक भक्कम करण्यामध्ये या महाकोशाचा हातभार आहे, हे नाकारता येत नाही. याच्या अभ्यासामुळे तत्त्वज्ञानाच्या गूढ आणि रुक्ष संकल्पना सुस्पष्ट होत गेल्या. भारतीय व पाश्चात्य तत्त्वज्ञानाची चांगली ओळख झाली. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास योग्य दिशा मिळाली आणि लेखनाचा मार्ग सुकर झाला. ग्रंथलेखन तीन पदरी असल्याचे वाचकांना आढळून येईल. पहिले पदर भारतीय तत्त्वज्ञानाचे, दुसरे इस्लामी तत्त्वज्ञानाचे; तर

तिसरे सूफ़ी तत्त्वज्ञानाचे. काही ठिकाणी स्वतंत्रपणे पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचे विवेचन आढळून येईल. या मांडणीमुळे वाचकांच्या मनात परोक्ष तुलना सहजपणे प्रस्थापित होऊ शकेल.

उपरोक्त तीन्ही खंड माझ्या अभ्यासासाठी अहमदनगरचे प्रसिद्धीपराङ्मुख आणि अत्यंत विनम्र असे **सूफ़ी फैयाज़ अहमद पटेल,** माजी अतिरिक्त आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पुरविले. हे ग्रंथ माझ्या प्रथम प्रकल्पापासून म्हणजे जवळजवळ आठ-नऊ वर्षे त्यांनी मजजवळ अभ्यासार्थ ठेवण्याची कृपा केली आणि दरम्यानच्या काळात या ग्रंथांविषयी त्यांनी ब्रसुद्धा काढला नाही. मीच ओशाळून त्यांना ते परत घेण्याची विनवणी केली असता ते अत्यंत नम्रपणे म्हणत, ''ग्रंथ हे वाचण्यासाठी, अभ्यासासाठीच असतात. तुमच्यासारख्याकडून त्यांचा सदुपयोग होत आहे, हे मी माझे भाग्य समजतो. ते परत करण्याची मुळीच घाई करू नका. तुमच्या लेखनात त्यांचा भरपूर उपयोग करून घ्या.'' सहकार्याची व सदिच्छेची केवढी ही पराकाष्ठा! त्यांच्या ऋणातून उतराई होणे महाकठीणचनसून जवळजवळ अशक्यच आहे. इतकेच नव्हे तर माझ्या सदरहू ग्रंथाचे जवळजवळ १४०० पानांचे हस्तलेखन अत्यंत सूक्ष्मपणे वाचून 'व्यक्ती-नाम-सूची'चे क्लिष्ट काम पण त्यांनी मोठ्या आनंदाने स्विकारून ते पूर्ण केले. तेच माझ्या या ग्रंथाचे प्रकाशनपूर्व प्रथम वाचक आहेत. त्यांच्या या उत्स्फूर्त सहकार्यासाठी त्यांचे आभार-प्रदर्शनासाठी माझ्याजवळ शब्द नाहीत.

आकाशात उंच उडत असताना सुद्धा घारीचे चित्त तिच्या पिलापाशी असते. तद्वत अहमदनगरपासून लांब पुण्यामध्ये असूनसुद्धा माझे परमस्नेही डॉ. मूसा बागवान व ज्येष्ठ मित्र कै. प्राचार्य रामदास डांगे यांच्या पर्यवेक्षणाची सूक्ष्म दृष्टी मजवर सदोदित राहिली आहे. माझ्या लिखाणाच्या प्रगतीविषयी इत्थंभूत माहिती ते वेळोवेळी घेत असत. त्यांची ही कृपादृष्टीपण माझ्यासाठी प्रेरक ठरली आहे. त्या दोघांना 'उपकार' शब्द रूचणार नाही. म्हणून मी याबाबतीत मौन धारण करणेच श्रेयस्कर ठरेल.

**मनोकामनापूर्तीचे पाच एकसमान आश्चर्यकारक प्रसंग**

**पहिला प्रसंग :** दि. १९ जानेवारी, २०१३ चा जळगाव येथील एक प्रसंग. अध्ययनासाठी इंग्रजी भाषेतील आधारग्रंथांपैकी फक्त ए. जे. आर्बेरी यांचे 'सूफ़ीझम' हे पुस्तक हाती लागणे बाकी होते. अखिल भारतीय मराठी मुस्लिम साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदावरून मी जळगाव येथे दि. १८ जानेवारी २०१३ रोजी माझे अध्यक्षीय भाषण संपवून मध्यंतरामध्ये विश्रांतीसाठी हॉलमधून बाहेर पडलो. इतक्यात **फ़हीम अहमद** नावाचा एक अनोळखी तरुण लगबगीने माझ्याजवळ येऊन बोलताना म्हणाला, 'माझ्याजवळ सूफ़ी तत्त्वज्ञानावर इंग्रजीमध्ये एक पुस्तक आहे. ते आपणास उद्या दाखवितो. वायद्याप्रमाणे तो मला दुसऱ्या दिवशी त्या पुस्तकासह भेटला. काय आश्चर्य! त्याने माझे बहुप्रतीक्षित पुस्तकच मला दाखविले! चिंच पाहिल्याबरोबर जसे तोंडास पाणी सुटते तद्वत माझ्या मनात ए. जे. आर्बेरीच्या त्या 'सूफ़ीझम' या पुस्तकाविषयी उत्कट लालसा निर्माण झाली. मनातील लालसा जिव्हेवर तत्काळ पोहोचली आणि ती उच्चारण्याअगोदरच काय चमत्कार! त्या उदार तरुणानेच स्वेच्छेने ते पुस्तक मला सहर्ष सप्रेम भेट दिल्याचे घोषित केले. ही ईश्वरी कृपेची लीला नव्हे तर काय आहे! सदरहू पुस्तकाचा मला 'रक़्स' (सूफ़ींचे नृत्य), नामस्मरण विधी आणि सूफ़ीशास्त्र व सरावाची संरचना या विषयावरील लेखनासाठी बहुमोल उपयोग झाला.

**दुसरा प्रसंग :** दि. ४ एप्रिल २०१३ रोजी बार्शी (जि.सोलापूर) येथे **सूफ़ी गुलाम हुसैन मुस्तफ़ा बेग** यांच्याकडून 'दि मॉडर्न पार्शियन डिक्शनरी' (पर्शियन-उर्दू-इंग्लिश) हा प्रोफेसर एफ़्. डी. रज़ी यांचा हा मनोवांछित शब्दकोश अयाचितपणे स्वयंस्फूर्त रीतीने सप्रेम भेटस्वरूप प्राप्त झाला. तत्कालीन चाललेल्या माझ्या लेखनासाठी उपरोक्त शब्दकोशाची मला खरोखर नितांत आवश्यकता होती. परमेश्वरानेच न मागता माझी ही गरज आपोआप पूर्ण केली.

**तिसरा प्रसंग :** 'भक्तीचा राजमार्ग : ईश्वराचे नामस्मरण' या विषयाचे लेखन करण्यासाठी माझ्या डोक्यात त्याची रुपरेषा निर्माण होत असताना तत्संबंधी भारतीय संतांची संकल्पना मांडणे जरूर होते. याची निकड दि. १ जुलै, २०१३ रोजी **सूफ़ी फैयाज़ अहमद पटेल** यांनी त्याच सुमारास उत्स्फूर्तपणे दिलेल्या रामचंद्र कृष्ण कामत यांच्या 'नामचिंतामणी' या पुस्तकाने भागविली. हा निव्वळ योगायोग नसून, ती ईश्वरी कृपाच आहे!

**चौथा प्रसंग :** ''सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन'' माझ्या या ग्रंथाने प्रभावित होऊन अहमदनगर येथील एक **सुप्रसिद्ध गायक पवन नाईक** याने स्वेच्छा माझे शिष्यत्व ग्रहण केले. 'समाअ'विषयी इस्लामी (धार्मिक) दृष्टिकोन समजून घेण्यासाठी दि.२० सप्टेंबर, २०१३ रोजी सच्छिष्य पवन नाईक यांनी दिलेले सूफ़ी फ़क़ीर सय्यद महबूब अली शाह निज़ामी यांचे 'समाअ' (क़व्वाली) हे इंग्रजी पुस्तक फार उपयोगी पडले. पूर्ण ब्रह्मस्वरूप 'ॐकार'च्या लेखनासाठी त्यांनी दिलेले श्री. राधागोविंद पातर यांचे 'मानव और धर्म' हे पुस्तक पण अत्यंत उपयोगी सिद्ध झाले. 'समाअ'चे विवेचन प्रस्तुत करण्यासाठी भारतीय संगीताची पृष्ठभूमी जाणून घेणे परम आवश्यक होते. याची परिपूर्तता 'संगीत विशारद' लेखक वसंत (संपादक - डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग) या ग्रंथामुळे झाली; आणि त्यामुळे लिखाणास थोडीफार खोली प्राप्त झाली. उपरोक्त तीन्ही ग्रंथ मी न मागता सच्छिष्य पवन नाईक यांनी स्वत: होऊन माझ्या अभ्यासासाठी घरपोच केले. ही पण अयाचित ईश्वरी कृपा नव्हे काय? सच्छिष्यास अयाचित बहुमोल मदतीसाठी शुभ आशीर्वादाव्यतिरिक्त सर्वोत्तम उपहार कोणता बरे असू शकेल! तर जळगावचा तो अनोळखी तरुण **फ़हीम अहमद** याचे आभार प्रदर्शन करणे अगत्याचे आहे. **सूफ़ी गुलाम हुसैन मुस्तफ़ा बेग** आणि **सूफ़ी फ़ैयाज़ अहमद पटेल** या सूफ़ीद्वयांच्या ऋणात ऋणांकित राहणेच ग्रंथकर्त्यास आवडेल.

**पाचवा प्रसंग :** पाचवा शेवटचा चमत्कार हा रविवार दिनांक २७ ऑगस्ट २०१७ रोजी स्वप्नातही नसताना अकस्मात घडला. तो असा - मुक्काम बोल्डा, ता. कळमनुरी येथील **श्री. शफ़ी गोल्डेकर** हे माझे 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' या ग्रंथाचे चाहते आणि उत्कट प्रेमी आहेत. त्यांचा उपरोक्त तारखेस अकस्मात फोन आला. सूफ़ी संदर्भातील आपले एक ग्रंथ प्रकाशनाची सुवार्ता कळविली. या प्रकाशन समारंभाचे प्रमुख वक्ते म्हणून हिंगोलीचे प्रसिद्ध चित्रकार **श्री. भ. मा. परसवाळे** हे होते. माझ्या प्रस्तुत ग्रंथासाठी फक्त मुखपृष्ठ निश्चित करण्याचे नियोजन बाकी होते. उपरोक्त दिवशी श्री. शफ़ी यांनी

श्री. परसवाळे यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळवून दिली. संयोगाने श्री. परसवाळे सुद्धा सूफ़ी तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक असल्यामुळे त्यांनी माझ्या नवलेखनाविषयी सहज चौकशी केली आणि माझ्या या प्रस्तुत 'सूफ़ीवाद आणि तुलनात्मक धर्मशास्त्र' या ग्रंथाची रूपरेषा जाणून घेतली व तत्काळ उत्स्फूर्तपणे त्यांनी आपले मनोगत व्यक्त करून सदरहू ग्रंथासाठी सुंदर कलात्मक व समर्पक असे मुखपृष्ठ तयार करून देण्याचे अभिवचन दिले व ते त्यांनी पाळले. या शेवटच्या मनोकामनेपूर्तीसाठी पण माझ्यासाठी प्रभूकृपा धावून आली असेच म्हणावे लागेल. श्री. भ.मा. परसवाळे यांच्या या स्वयंस्फूर्त सहयोगासाठी त्यांच्या प्रती मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त करणे मी माझे कर्तव्यच समजतो. त्यास्तव मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

अशा प्रकारे ज्या ज्या वेळेस ज्या ज्या ग्रंथांची गरज होती त्या त्या वेळेस परमेश्वर आपल्या कृपेने ते ते ग्रंथ उपरोक्त पाच व्यक्तींमार्फत अनायास पुरवीत गेला. केवढे हे त्याचे अनंत उपकार! त्या उपकारास स्मरून परमेश्वराचे आभारप्रदर्शनासाठी 'पवित्र कुराण'मधील पुढील श्लोक अनायास ओठावर येतो –

''फ़ज़्कुरुनी अज़्कुर्-कुम वश्कुरुली व ला तक्फुरुनि'' – २:१५२

म्हणजेच ''तर तुम्ही माझे स्मरण करा; म्हणजे मीही तुमचे स्मरण ठेवीन आणि माझे आभार मानीत राहा व माझ्याशी कृतघ्न होऊ नका.'' – २:१५२

**ग्रंथरचनेची षट्सूत्रे**

सारांश, प्रेरणा, प्रोत्साहन, पाठबळ, प्रयत्न, प्रसाद आणि प्रभू-कृपा ही या ग्रंथरचनेची षट्सूत्रे आहेत.

**(१) प्रेरणा :** सोलापूरचे मित्रवर्य **प्रा. फ़ख़ुद्दीन बेन्नूर** यांची.

**(२) प्रोत्साहन :** परमप्रिय **डॉ. मूसा बागवान** आणि ज्येष्ठ मित्र **कै. प्राचार्य रामदास डांगे** यांचे प्रोत्साहन; तसेच **डॉ. रहीमशामियाँ चांदमियाँ शेख** या ज्येष्ठ स्नेह्यांचे वेळोवेळी दिलेले सल्ले शक्तिवर्धक सिद्ध झाले आहेत.

**(३) पाठबळ :** बार्शीचे **सूफ़ी गुलाम हुसेन शाह मुस्तफ़ा बेग** आणि अहमदनगरचे **सूफ़ी फ़ैयाज़ अहमद पटेल,** माजी अतिरिक्त आयुक्त, सहकार, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आत्मिक व आध्यात्मिक पाठबळ.

**(४) प्रयत्न :** या बृहत् ग्रंथाच्या प्रकाशनाच्या विवंचनेत असताना माझे परममित्र **कॉ. विलास सोनवणे** हे माझ्या मदतीला धावून आले. त्यांनी या कामी पुणे येथील हर्मिसचे प्रकाशक **श्री. सुशील धसकटे** यांना हे मोठे व अवघड काम हाती घेण्याचे धाडस निर्माण करण्याविषयी प्रेरित केले व **श्री. धसकटे** यांनी पण कंबर कसली. त्यांनी नेटाने अक्षर जुळणीचे संगणकीय कार्य तडीस नेले. खरे तर या दोघांच्या प्रयत्नामुळेच हा ग्रंथ दृश्य स्वरूपात येऊ शकला.

या ग्रंथ प्रकाशनास चालना देणाऱ्या **कॉ. सोनवणे** व **श्री. धसकटे** यांचे आभार कसे मानावेत, हेच कळेनासे झाले आहे.

शेवटी ग्रंथाचा आकार, रचना व मांडणी तसेच इतर सर्व संगणकीय सोपस्कार कमीत कमी वेळेत कलात्मक, दर्जेदार व उच्च गुणवत्तेचे करून दिल्याबद्दल औरंगाबादचे **श्री. विनायक भालेराव** व **सौ. अनिता विनायक भालेराव** या दंपतीद्वयांचे आणि त्यांचे कुशल सहकारी **श्री. अनंत भालेराव** व अरबी वर्णाक्षरांसाठी **श्री. बिलाल** यांनी सहकार्य केले. या सर्वांचे आभार प्रदर्शन करणे अटळ असून अगत्याचे पण आहे. म्हणून या सर्वांचे मन:पूर्वक आभार!

**(५) प्रसाद :** संत-महात्मे आणि विद्वज्जनांचे कृपा-प्रसाद आणि सर्वांत शेवटी वाचकांची सदिच्छा ग्रंथकर्त्यासाठी 'पसायदान'च!

**(६) प्रभू-कृपा :** गरजेची पुस्तके यथायोग्य वेळेस विनासायास व अनायास पुरविण्यासंबंधी उपरोक्त पाच एकसमान आश्चर्यकारक प्रसंग घडवून आणणारी ईश्वरी कृपा म्हणजे प्रभू-कृपाच होय.

**एक लक्षवेधी सूचना**

प्रकरण २५ - ''मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या''मधील 'जादू किंवा यातुविद्या : इस्लामी व सूफ़ी दृष्टिकोन' या विवेचनांतर्गत वशीकरण आणि ताईतच्या संदर्भातील काही लिखाणावरून अंधश्रद्धेला प्रोत्साहन देण्याचा ग्रंथकाराचा हेतू आहे की काय असा संशय बळावण्याची दाट शक्यता आहे. मात्र इस्लामी लोकव्यवहार व लोकनीतिची कल्पना वाचकांना यावी, एवढ्याच मर्यादित हेतूने त्याने सदरहू भाग समाविष्ट केले आहे. हा मुद्दा वाचकांनी जरूर लक्षात घ्यावा. किंबहुना सूफ़ींकडून यांचा वापर क्वचितच आणि केवळ लोककल्याणाच्या गरजेपोटी विनामोबदला होत असल्याचे आढळून येते.

काही काही ठिकाणी वाचकास पुनरावृत्तीचा दोष आढळून येईल. आवश्यकतेच्या अनिवार्यतेमुळे असे घडले आहे. अटळ असल्यामुळे नाइलाजास्तव पुनरावृत्तीचा दोष दृष्टिपथात येतो. म्हणून वाचकांच्या उदारतेची अपेक्षा आहे.

इस्लाम धर्म किंवा तत्त्वज्ञानसंदर्भात, तसेच सूफ़ी तत्त्वज्ञान संदर्भातील विवेचनामध्ये संपूर्ण ग्रंथभर अनेक अवतरणे वाचकांना दिसतील. अवतरण संपल्यानंतर एका पाठोपाठ एक अशा दोन संख्या आणि मध्ये **:** (विसर्ग चिन्ह) दिसेल. पैकी प्रथम संख्या ही पवित्र कुरआनमधील सूरा **:** अर्थात् अध्याय क्रमांक निदर्शक आहे, तर दुसरी संख्या त्या अध्यायामधील आयत (आयात) अर्थात् महाश्लोक क्रमांक दर्शविते.

**सहायक व संदर्भ ग्रंथांविषयी थोडेसे...**

हे ग्रंथ तीन प्रकारात मोडतात- (१) संदर्भ ग्रंथ, (२) स्रोत ग्रंथ आणि (३) परामर्शित ग्रंथ. साधारणत: उद्धरण जर दोन पृष्ठांइतका असेल तर त्याची गणना संदर्भ ग्रंथ स्वरूपात करण्यात आली आहे. हा संदर्भ मजकूर संपताच त्याखाली कंसात देण्यात आला आहे. जर अवतरण त्यापेक्षा मोठे असेल तर त्याची गणना स्रोत ग्रंथ स्वरूपात करण्यात आली आहे. स्रोत ग्रंथांची सूची ग्रंथाच्या शेवटी ससंदर्भ देण्यात आली आहे. गरजेपुरते अवलोकन करण्यात आलेल्या ग्रंथांना परामर्शित ग्रंथ म्हणून संबोधण्यात आले आहे. याची यादी पण शेवटी दिलेली आहे. ग्रंथकर्ता हा उपरोक्त सर्व प्रकारच्या ग्रंथ-लेखकांचा ऋणी आहे. त्यांच्या आधाराविना ग्रंथरचनाच करता आली नसती.

**अर्पण पत्रिकेविषयी**

शेवटी ईश्वरी कृपेशिवाय ग्रंथरचना पूर्णत्वास नेणे अशक्यप्राय असल्यामुळे **अल्लाहच्या** उपकाराप्रीत्यर्थ सर्वप्रथम ''अर्पण पत्रिका'' नमूद केल्याशिवाय राहवत नाही. म्हणून या ग्रंथाचा आरंभ 'अर्पणपत्रिके'ने होतो.

**कृतज्ञता ज्ञापन**

या ग्रंथाचे 'सूफ़ी तत्त्वज्ञान : सखोल विश्लेषण' या स्वरूपातील हा ग्रंथ जवळजवळ दोन हजार (२,०००) पृष्ठे इतका बृहत असल्याकारणाने छपाईसाठी थोड्या फार प्रमाणात आर्थिक भार हलका व्हावा या हेतूने ग्रंथकर्त्याने महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडे आपला अर्ज पाठवला होता. मात्र मराठी भाषा विभागाच्या तज्ज्ञ समितीला या ग्रंथाचे सविस्तर प्रारूप पाहिल्यानंतर तो इतका आवडला की तिने तो प्रस्ताव बृहद् प्रकल्प स्वरूपात स्विकारण्याची शिफारस मंडळास केली व मंडळाने तो भरघोस आर्थिक अनुदानासह स्विकारण्यात येत असल्याचे कळविले. यामुळे प्रकाशनाची चिंता मिटली आणि मानसिक समाधानच नव्हे तर अत्यानंद पण झाला. म्हणून ग्रंथकर्ता महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ आणि विशेषत: या मंडळाचे अध्यक्ष **श्री. बाबा भांड** यांचा या प्रकल्पामध्ये व्यक्तिश: रस घेतल्याबद्दल सदैव ऋणी आहे.

शेवटी मराठीचे प्रख्यात कादंबरीकार, समीक्षक व विचारवंत, माझे मित्रवर्य, **ज्ञानपीठ पुरस्कार विजेते पद्मश्री डॉ. भालचंद्र नेमाडे** यांनी आपल्या निरंतर व्यस्ततेतून, वेळात वेळ काढून या ग्रंथासाठी आपला अभिप्राय पाठविण्याची जी कृपा केली त्याबद्दल ग्रंथकर्ता त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

सूज्ञ वाचकांकडून माझ्या प्रथम ग्रंथासारखेच भरघोस प्रतिसाद मिळेल अशी अपेक्षा.

दिनांक – १४ जानेवारी २०१८

अहमदनगर.

**– डॉ. मुहम्मद आज़म, ग्रंथकर्ता**

दूरध्वनी : (०२४१) २३४३७५८
भ्रमणध्वनी : ८३०८३३०६३४

**संपर्क :– डॉ. मुहम्मद आज़म**
C/o – डॉ. शहनाज़
सर्वे नं. ३२१/१, बंगला नं. २
बाँबे हॉस्पिटलसमोर, मुकुंदनगर,
अहमदनगर – ४१४ ००२
(महाराष्ट्र)

# अनुक्रम


- अध्यक्षांचे मनोगत – बाबा भांड ..... तीन
- अभिप्राय – डॉ. भालचंद्र नेमाडे ..... पाच
- ग्रंथकर्त्यांचे मनोगत ..... सात

**खण्ड – एक**

**विभाग – १ : तत्त्वज्ञान**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १ | तत्त्वज्ञान : सर्वसामान्य, ग्रीक व भारतीय | ..... | ३ |
| प्रकरण २ | इस्लामी तत्त्वज्ञान | ..... | १६ |
| प्रकरण ३ | इस्लामी चिंतनाचे दार्शनिक संप्रदाय | ..... | ६२ |
| प्रकरण ४ | सूफ़ीवाद आणि सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या संकल्पना | ..... | ७१ |

**विभाग – २ : अल्लाह (परात्पर परब्रह्म)**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण ५ | अल्लाहचे अस्तित्व (वजूद) | ..... | १०३ |
| प्रकरण ६ | अल्लाहचे स्वरूप | ..... | १६२ |
| प्रकरण ७ | ईश्वरवाद अथवा ईश्वरासंबंधी संकल्पना | ..... | २६६ |

**विभाग – ३ : ब्रह्मांड**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण ८ | उपनिषदेंप्रणीत विश्वोत्पत्ती – विचार | ..... | ३०१ |
| प्रकरण ९ | सृष्टी – प्रपंच : तौलनिक विवेचन (इस्लामी व भारतीय दृष्टिकोन) | ..... | ३०७ |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १० | विश्वोत्पत्तीविषयक वैज्ञानिक सिद्धान्त व तदविषयक इस्लामी दृष्टिकोनाची वैज्ञानिकता | ..... | ३२४ |
| प्रकरण ११ | विश्वरचना – विचार : दार्शनिक दृष्टिकोन (भारतीय व पाश्चात्य) | ..... | ३५४ |
| प्रकरण १२ | ब्रह्मांड – निर्मिती : सूफ़ी दार्शनिक दृष्टिकोन | ..... | ३६७ |
| प्रकरण १३ | परलोक (आख़िरत) : तौलनिक विवेचन | ..... | ४२८ |
| प्रकरण १४ | सूफ़ींच्या कल्पनेतील सृष्टीची विलक्षणता व अद्‌भुतता किंवा ईश्वराची अगाध लीला : सृष्टीमधील चमत्कारांचा खेळ | ..... | ४४५ |


## विभाग – ४ : मानव

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १५ | मानव : निर्मिती – प्रयोजन व विशेषता | ..... | ४७९ |
| प्रकरण १६ | विश्व, मानव आणि ईश्वर | ..... | ४९० |
| प्रकरण १७ | मानव – देह – विज्ञान : दार्शनिक दृष्टिकोन | ..... | ५०९ |


## खण्ड – दोन

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण १८ | आत्मा ('रूह') : दार्शनिक विवेचन | ..... | ५५९ |
| प्रकरण १९ | पुरुषोत्तम (नरोत्तम) | ..... | ६६२ |
| प्रकरण २० | आध्यात्मिक जीवन व आध्यात्मिक अनुभूती | ..... | ६८९ |
| प्रकरण २१ | भक्तिशास्त्र | ..... | ७६६ |
| प्रकरण २२ | सूफ़ी – प्रेमपंढरीचे वारकरी | ..... | ८४९ |
| प्रकरण २३ | जपविज्ञान | ..... | ९२७ |
| प्रकरण २४ | 'समाअ' (संकीर्तन श्रवण, सूफ़ी संगीत श्रवण) | ..... | १०६३ |


## खण्ड – तीन

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण २५ | मंत्र : शास्त्र, सिद्धी, तंत्र आणि विद्या | ..... | ११६३ |
| प्रकरण २६ | वर्णाक्षरांचे अध्यात्मशास्त्र | ..... | १२६६ |


## विभाग – ५ : परिशिष्टे

| | | | |
|---|---|---|---|
| क) | परिशिष्टे – १ ते ६९ | ..... | १३३७ |
| ख) | दार्शनिक चिंतनिका | ..... | १६११ |
| ग) | व्यक्ती – नाम – सूची | ..... | १६२३ |

# विस्तारित अनुक्रमणिका

# खण्ड दोन

**प्रकरण १८ आत्मा ('रूह') : दार्शनिक विवेचन** ..... ५५९

(१) भारतीय तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे विवेचन [५५९] - क) हिंदु धर्मातील आत्म्याची कल्पना [५५९], ख) उपनिषदेंप्रणीत आत्म्याचे स्वरूप [५६०], शरीर व आत्मा यांच्यासंबंधी रथ-रूपक [५६३] - १) कठ उपनिषद् प्रणीत, 'आत्मन' (आत्म्या)चे स्वरूप, रथ-रूपक, २) छागलेय उपनिषद्प्रणीत, शरीर व आत्मा यांच्यासंबंधी रथ-रूपक, आत्मासंबंधी पंचकोश-सिद्धांत [५६४], पंचकोश व आनंदमीमांसा [५६५], मूल्यांच्या साक्षात्काराचे गमक आनंद [५६५], मूल्यांच्या दृष्टिकोनातून आत्म्याचे पंचकोश [५६६], ग) भगवद्गीताप्रणीत आत्म्याचे स्वरूप [५६६], तात्पर्य, घ) स्वतंत्र, समाधानी आणि प्रसन्न आत्मा [५७२], आत्म्याच्या अस्तित्वाची लक्षणे, परमात्मा एक, परंतु..., जैसे ज्याचे कर्म, तैसे फल [५७३], च) आत्म्याचे स्वरूप [५७४], (२) पाश्चात्य तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे विवेचन [५७५] - आत्मवाद, आत्मा ही संकल्पना, मन व आत्मा, आत्मानुभव, आत्म-विज्ञान, आत्म्याचे स्वयंप्रकाशत्व, चिद्विलासवाद, बर्क्लेचा चिद्वाद, सेंट ऑगस्टीन याचे आत्माविषयक विचार, ऑटो रूडॉल्फ याचे आत्म्यासंबंधी मत, डायोनिशियस याचे आत्म्यासंबंधी मत, डिमॉक्रिटसचे आत्म्यासंबंधी मत, प्लेटोप्रणीत आत्म्याचे अमरत्व, हेनरिश रिकर्टचे आत्म्यासंबंधी मत, सेंट हिक्टरचा रिचर्ड याचे आत्म्यासंबंधी मत, रूसो जे.जे. याचे आत्म्यासंबंधी विचार, (३) आत्मा - भारतीय व पाश्चात्य दृष्टिकोन (संमिश्र विवेचन) [५८३] - जीवात्मन् (जीव), आत्म्याचे स्वरूप, आत्म्याची निर्मिती, 'स्व' किंवा जीवात्मा, (४) इस्लामी तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे स्वरूप [५८५] - १) अल-फ़राबी (मृ.इ.स.९५०) - १. संभाव्य किंवा सुप्त प्रज्ञा, २. क्रियाशील प्रज्ञा, ३. कारक प्रज्ञा, ४. उपार्जित प्रज्ञा, २) इब्न सीना

(इ.स.९८०-१०३७), ३) इब खल्दून (इ.स. १३३२-१४०६), ४) डॉ. मुहम्मद इक़बाल (इ.स. १८७३-१९३८), ५) हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद साहब क़ादियानी६४ (इ.स.१८३४-१९०७), पहिले बीज, वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करणारे मन [५८८], दुसरे बीज, अलिप्त राहणारे किंवा तुच्छता दर्शविणारे मन [५८८], तिसरे बीज, संतुष्ट आत्मा [५८९], आत्म्याची निर्मिती [५९२], आत्म्याचा दुसरा जन्म [५९२], आत्म्याच्या अनुषंगाने मानवाचा क्रमशः विकास [५९३], आत्मिक अवस्था [५९४], (५) आत्म्याचे चतुष् अंगी स्वरूप [५९६] - १) आत्म्याच्या चार अवस्था, २) आत्म्याच्या चार शक्ती, ३) आत्म्याची चार कार्ये (कार्यशक्ती), ४) आत्म्याच्या चार श्रेणी (रांगा), (६) सूफ़ी तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे विवेचन [५९७], (७) सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून आत्म्याचे स्वरूप व त्याचे प्रकार [६०२], सूक्ष्म शरीर - स्पष्टीकरण, वासनेची ओळख - **क) नफ़्सचे प्रकार** [६०३] **- १) नफ़्से अम्मारा** अर्थात् भ्रष्ट आत्म्याची ओळख [६०३], भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा) चा जन्म, भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा) चा स्वभाव, भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा)चे वास्तव, भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा) चे षड्यंत्र, **२) नफ़्से लव्वामा** (दूषित करणारा वा प्रदूषणकारी आत्मा) [६०५], मन वा चित्त, मनाचे स्वरूप व वैशिष्ट्य, आत्म्याच्या जगाची सहल (विहार), १) स्वप्न व सुसमाचार व त्यांचे वास्तव, स्वप्नाचे प्रकार, 'इस्तिख़ार' म्हणजेच दैवी सहायतेची इच्छा आणि शुभाशुभ बोध, २) आत्म्यासंबंधी दिव्यदृष्टीज्ञान ('कश्फ़ुलकुलूब'), दिव्य दृष्टीचे स्वरूप, ३) वह्इ (प्रेषितांसाठी दैवी आदेश-आज्ञा), इलहाम (देववाणी) आणि इल्क़ा (दैवी प्रेरणा) यांची वस्तुस्थिती, ४) मनना ('मुराक़बा')चे वास्तव, ५) चमत्कार (करामत) - १. करामत, २. अरहास, ३. मोजिज़ा, ४. मऊनत, ५. मक्र व इस्तदराज, ६. जादू आणि दृष्ट लागणेचे वास्तव, **३) नफ़्से मुल्हिमा** अर्थात् ईशप्रेरित वा अनुप्रणित आत्मा [६१४], **४) नफ़्से मुतमइन्ना** अर्थात् शांतात्मन् किंवा प्रशांत आत्मा [६१५], **५) नफ़्से रहमानिया** अर्थात् दिव्य आत्मा [६१५], **ख) देह-संसृष्ट आत्म्याचे प्रकार** [६१६], - प्रस्तावना, १) वाजिबुल वजूद - स्थूल देह, २) मुमकिनुल वजूद - लिंग देह, ३) मुमतनुलवजूद : कारण देह, ४) आरिफ़ुल वजूद - महाकारण देह, चेतावणी - ताकीद, ५) वाहदल वजूद - सूक्ष्म देह, **ग) आत्म्याचे स्वरूप** - सूफ़ी तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोन [६२३], आत्म्याचे स्वरूप, मानवी देहामध्ये कोणता आत्मा केव्हा दाखल होतो, **घ) आत्म्याचे**

**प्रकार :** सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून [६२७], प्रस्तावना, नूर-ए-मुहम्मदी अर्थात् मुहम्मदी प्रकाशाचा उदय (जन्म), विशुद्ध पंचदेह (पंजतन पाक), आत्म्याचे प्रकार १) रूह-ए-जारी - निरंतर प्रवासी आत्मा, २) रूह-ए-सिफ़ली : निम्न आत्मा किंवा अधोमुखी आत्मा, ३) रूह-ए-मलिकी : देवदूती आत्मा, ४) रूह-ए-कुद्सी : पवित्र आत्मा (पवित्रात्मा), ५) रूह-ए-उल्वी : ऊर्ध्व आत्मा किंवा उच्चगामी आत्मा, बृहत् अंतराय : पंच पवित्र देहधारी, **च) सूफ़ी साधनामार्गामध्ये आत्म्याची भूमिका (महत्त्व)** [६३३] - अ) मक़ामन्नफ़्स : वासनास्थळ, आ) मक़ाम-अल्-क़ल्ब : चित्तस्थान, मनोभूमी, इ) मक़ामर्रूहः विशुद्ध आत्म्याचे स्थळ, ई) मक़ाम-अस्-सिर्र : मर्मस्थळ, अंतःकरण, उ) मक़ाम-अल्-कुर्ब : सान्निध्यस्थळ, ऊ) मक़ाम-अल्-वस्ल : मिलनभूमी वा ईश्वराशी तादात्म्य, **छ) चित्तनियंत्रण आणि चित्ताग्रता - आत्म्यासाठी पूरक भूमिका** [६३७], ८) सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्यांचा आत्माविषयक दृष्टिकोन [६३८] - १) अली बिन उस्मान जल्लाबी हुजवीरी : 'कश्फुल महजूब' ग्रंथावरून, आत्मे दहा स्थानांवर स्थायिक आहेत : आत्म्याच्या आधारे मानवाच्या दहा श्रेणी (प्रकार), कालानुक्रमाच्या दृष्टीने आत्म्याच्या निर्मितीचे स्थान, २) शेख़ अबू नसर सराज : 'किताबु लुमा' ग्रंथावरून, आत्म्याविषयी चुकीची मते, आत्म्याविषयी भक्तांचा दृष्टिकोन [६४४], ३) अबू हामिद इमाम अल्ग़ज़ाली : 'हक़ीक़त-ए-रूह-ए-इन्सानी'च्या आधारे (स्वैर अनुवाद) [६४५], ''आमुच्या सम आम्ही घडविले आणि आम्ही त्यामध्ये आपला प्राण फुंकला.'', श्वास, पवित्र कुराणामध्ये अभिव्यक्त आहे, वात आणि ज्वाला, महान परोपकार, आत्मा काय आहे?, आत्मा कसा अस्तित्वात असतो, आत्म्याची दिशा, निषिद्ध विवेचन, गुह्ये ही सर्वसाधारण लोकांसाठी का बरे नसतात, गुण ईश्वरास समाईक आणि असमाईक कसे आहेत, माझ्या आत्म्याची फुंकर मारली, आत्मा ईश्वराची आज्ञा, काय आत्मा निर्मित आहे, विभक्तपणानंतर, ईश्वराची प्रतिमा, माणसाच्या कर्मांचे स्रोत (उगम), कोष्टक, प्रेषित मुहम्मद यांची प्रतिक्रिया, मानवी अस्तित्वाचे काय प्रयोजन (हेतू) आहे?, ४) शेख़ अबुल हसन नूरी : 'रिसाला मक़ामातल कुलूब' या ग्रंथाच्या आधारे [६५३] - १) प्रस्तावना, २) श्रद्धावंताच्या मन-मंदिराची गुण-वैशिष्ट्ये, ३) नामस्मरणामध्ये श्रद्धावंतांच्या मनाशी ईश्वराविषयी प्रितीची ओळख, ४) ईश्वरास नाकारणाऱ्या श्रद्धाहीन मनाची स्थिती, ५) मनाच्या तीन श्रेणी, ६) ब्रह्मज्ञानी लोकांच्या मनाचे वैशिष्ट्य, ७)

निर्मळ अंत:करणाचे गुणविशेष, ८) भक्तांच्या मनांचे लक्षण (गुण), ९) श्रद्धावंतांच्या मनाची तटबंदी, १०) श्रद्धावंतांच्या मनामधील अग्नी, ११) ब्रह्मज्ञानी श्रद्धावंताचे मनोद्यान, १२) ब्रह्मज्ञानीच्या अंत:करणाचा प्रकाश, १३) ब्रह्मज्ञानीच्या मनात प्रथम निर्माण होणारी गोष्ट (वस्तू), १४) ब्रह्मज्ञानीच्या मना (अंत:करणा)चे निर्झर (समुद्र), १५) ब्रह्मज्ञानीच्या मनामध्ये ब्रह्मज्ञानाचा वृक्ष, १६) ब्रह्मज्ञानाच्या मनाची जिव्हा आणि तिच्या संवादाचे लक्षण, १७) श्रद्धावंतांच्या मनाचे दृष्टांत, १८) श्रद्धावंताच्या मनामधील ब्रह्मज्ञानाच्या वृक्षाचे दृष्टांत, १९) लोभ व लालसेच्या वृक्षाचे दृष्टांत, २०) ब्रह्मज्ञानीच्या मनोद्यानाची वैशिष्ट्ये, २१) भक्त किंवा अभक्तांच्या मनावर होणारा (कृपेचा/अवकृपेचा) वर्षाव

**प्रकरण १९ पुरुषोत्तम (नरोत्तम)** ..... **६६२**

मानवाचा महिमान : मानवाची थोरवी [६६२], मानवतत्त्व [६६३], १) नरोत्तमाचे आत्मिक पैलू, २) नरोत्तमाचे दैहिक पैलू, ३) नरोत्तमाचे प्रतीकात्मक पैलू, **क) सय्यद मुहम्मद अल-हुसैनी गेसूदराज उपाख्य बंदा नवाजप्रणीत नरोत्तम** (इन्सान-ए-कामिल) [६६७], नरोत्तम आणि साधनेचा गूढ प्रवास [६७२], ज्ञानक्षेत्रामधील मूलभूत तत्त्वांचे स्तर : पाच टप्प्यांशी निगडित पाच स्तर, पुरुषोत्तम (नरोत्तम) : संपूर्ण ब्रह्मांड घटकधारी, पुरुषोत्तम वा नरोत्तम ('इन्सान-ए-कामिल')ची तुलना 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' शी, नरोत्तमा (पुरुषोत्तमा) चे प्रकार [६७७], **(ख) सय्यद अब्दुल करीम जीलीप्रणीत नरोत्तम** (इन्सान-ए-कामिल) [६८१], पूर्ण पुरुष : पुरुषोत्तम : नरोत्तम [६८१]

**प्रकरण २० आध्यात्मिक जीवन व आध्यात्मिक अनुभूती** ..... **६८९**

(१) आध्यात्मिक जीवन [६८९], क) अध्यात्म : जीवनविषयीचा दृष्टिकोन [६८९], ख) स्वत:चे शुद्धीकरण : आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी [६८९], ग) भूतलावरील दिव्य जीवन व अध्यात्मज्ञान्यांचा नवसमाज [६९०], घ) आध्यात्मिकता व मानवी जीवनाचे सारसर्वस्व [६९०], च) मानवी स्वभावातील आध्यात्मिकता [६९१], छ) अध्यात्मवाद : आनंददायक [६९१], (२) आध्यात्मिक अनुभूती [६९२], १) आध्यात्मिक अनुभूती - सामान्य परिचय, २) आध्यात्मिकतेची मानसशास्त्रीय बैठक [६९४], मानवाचे प्रारब्ध : कुरानचा दृष्टिकोन (कुरआनची शिकवण)

[७०३], १) दार्शनिक तर्क, २) नैतिक तर्क, ३) मनोवैज्ञानिक तर्क, ४) धार्मिक तर्क, व्यक्तित्वपूर्ण अमरता [७०५], ३) सान्तता, ससीमता, परिमितता हे काही एखादे दुर्भाग्य नव्हे (३) प्रतीकवाद [७१३], प्रतीकवाद - १) प्रतीकवादामधील बहिरंग आणि अंतरंग : प्रतिरूप आणि अप्रतिरूप, २) दोन जग (विश्वे) : त्यांची रूपे आणि प्रति-रूपे, ३) प्रतीकवादाचे एक उदाहरण : 'कुरआन' मधील प्रेषित इब्राहीम यांच्या दृष्टांता (कथे)वरून, ४) प्रतीकवादाचे मूलभूत दृष्टांत : मुख्यत: पवित्र कुराणातील प्रेषित मूसा यांच्या कथेवरून, ४) फ़ना (संभूती, निर्वाण) आणि बक़ा (असंभूती) [७२३], १) 'फ़ना' व 'बक़ा' - सूफ़ी साधकांच्या दृष्टिकोनातून, शाश्वत जीवनाकडे वाटचाल [७३०], २) 'फ़ना' व 'बक़ा' - दार्शनिक दृष्टिकोन [७३१], १) पहिला टप्पा : सफ़र-उल्लाह, २) दुसरा टप्पा : सफ़र-इल'ल्लाह, ३) तिसरा टप्पा : सफ़र-फ़िल्लाह, ४) चौथा टप्पा : सङ्गर-बिल्लाह, १. सैर इल'ल्लाह, २. सैर फ़िल्लाह, ३. सैर अनि'ल्लाह, ३) 'फ़ना' - सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ सूङ्गी इमाम अल्-ग़ज़ालीचा दृष्टिकोन [७४१], ५) रूपक [७४३], १) शम्स तबरीज़ यांच्या 'दीवान' (समग्र काव्य संग्रहा) मधून : (गद्य रूपांतर) [७४७], प्रतीक निरुपण, २) मौलाना जलालुद्दीन रूमी यांच्या 'मसनवी' (कथा-काव्या) मधून [७४८], निरूपण, ६) आध्यात्मिक अनुभूती : व्यक्तित्वाची भूमिका [७४९], ७) सूफ़ींचे अध्यात्म-विश्व : रूपरेषा [७५३], सुफ़िंच्या अध्यात्म-विश्वाची व्यवच्छेदक लक्षणे [७५६], १) अध्यात्माचे बहिरंग, २) अध्यात्माचे अंतरंग, अध्यात्म मार्गाचे सप्त सोपान, सूफ़ींच्या श्रद्धेचे यथार्थ स्वरूप : एक नमुना [७५९], १) ''अल्लाहु ला इलाह इल्ला हुव'', २) ''अल्हय्युल्क़य्यूमु'', ३) ''ला तअ्ख़ुज़ुह् सिनतुंव्व ला नौमुन्'', ४) ''लह मा फ़िस्सामावाति् व मा फ़िल्अर्ज़ि'', ५) ''मन् ज़ल्लज़ी यश्फ़उ इन्दह् इल्ला बिइज़्निह'', ६) ''यऽलमु मा बैन ऐदीहिम् व मा ख़ल्ङ्गहुम'', ७) ''व ला युहीतून बिशैइम्मिन् इल्मिह इल्ला बिमा शाअ'', ८) ''वसिअ कुर्सिय्युहुस्समावाति वल्अर्ज़'', ९) ''व ला यऊदुह हिफ़्ज़ुहुमा'', १०) ''व हुवल् अलियुल् - अज़ीमु''

**प्रकरण २१ भक्तिशास्त्र** ..... **७६६**

**(१) भक्ती : भारतीय दार्शनिक दृष्टिकोन** [७६६] - १) साधना - व्याख्या व स्वरूप, २) साधना-भेद आणि साधनेचे उद्दिष्ट, ३) परमपद प्राप्तीचे तीन मार्ग - १) ज्ञान-मार्ग, २) योग-मार्ग, ३) भक्ति-मार्ग, **(२)**

**भक्ती : पूर्ववर्ती परंपरा आणि प्रवृत्ती** [७७०] – १) 'भक्ती' शब्दाची व्याख्या, २) भक्तीचे स्वरूप (सामान्य), ३) उपासना व भक्ती यांतील तारतम्य!, ४) भक्तीचा स्वाद, ५) भगवद्‌भक्तीचे निर्मळ स्वरूप, ६) भक्तीचा उद्‌भव आणि विकास, ७) पुराणांची ओळख, ८) भागवत भक्तीचे स्वरूप – क) भागवताचे साध्य पक्ष, ख) भागवताचे साधन पक्ष, ९) भक्तीची शास्त्रीय व्याख्या : शांडिल्यभक्तिसूत्र व नारदभक्तिसूत्र, क) शांडिल्य-सूत्र, ख) नारदभक्ति सूत्र, १०) साररूपात भक्तीचे स्वरूप, **(३) सूफ़ींची उपासना (इबादत)** [७७९] – १) एकेश्वरवादी निष्ठा आणि श्रद्धा (तौहीद), २) उपासना-भक्ती (नमाज़), ३) उपवास व्रत (रोज़ा), ४) धर्मदान (ज़कात), ५) महातीर्थ यात्रा (हज), **(४) सूफ़ींच्या उपासना – विधी : दार्शनिक विवेचन** [७९०] – १) 'तौहीद' : एकेश्वरवादी श्रद्धा आणि निष्ठा, २) 'सलात' : नमाज़ : भक्ती उपासना [७९४], १. भक्ती-महिमा : प्रार्थना महती, भक्ती, प्रार्थना, २. इस्लामी प्रार्थने (नमाज़) विषयी थोडेसे [७९७], प्रार्थनेसाठी इस्लाम पुरस्कृत अनिवार्य बाबी पुढीलप्रमाणे, इस्लामपुरस्कृत प्रार्थनेच्या प्रमुख अटी (शर्ती) [७९८]- १. विनय, २. मन:पूर्वकता, ३. नम्रता व शालीनता, ४. ईशस्तवन आणि प्रभू-नामस्मरण, ५. 'आमीन/तथास्तु', ३) 'नमाज़' अनिवार्य कशासाठी?, ४) 'नमाज़'च्या पूर्वअटी, ५) 'नमाज़'चे स्वरूप, नमाज़ चे तीन स्तर [८०२] – १. नमाज़ची आकृती : बहिरंग [८०३], २. नमाज़ची प्रकृती : अंतरंग [८०७] – १) 'सुबहानक ल्लाहुम्म व बिहम्दिक', २) 'व तबारकस्मुक', ३) 'व तआला जद्दुक', ४) 'व ला इलाहा ग़ैरूक', ३. नमाज़चे रहस्य : गूढशोधन [८१०] – १) सलात, २) नमाज़, ४. कुराणोक्त भक्ती-रहस्य, **(५) नमाज़च्या घटकांचे गूढशोधन** [८११], **(६) सृष्टिकृत प्रार्थना** [८१५], **(७) समस्त सृष्टीची प्रार्थना 'नमाज़'मध्ये एकवटलेली आहे** [८१६] – १) 'नमाज़'मध्ये (इस्लामी उपासना) साधनेचे पैलू, २) नमाज़ (उपासना) – समस्त ब्रह्मांडासाठी (ब्राह्मी) नित्यकर्म – १. वृक्ष, २. चतुष्पाद प्राणी, ३. सरीसृप, ४. डोंगर-पर्वत, ५. पक्षी, ६. ग्रह-आकाश, ७. पृथ्वी, ८. व ९. स्वर्ग (जन्नत) व नरक (दोज़ख़), १०. देवदूत, ३) इस्लामी नमाज़मध्ये सर्व विश्वाची नमाज़ समाविष्ट आहे, ४) नमाज़च्या आकृतीमध्ये तर्कसुसंगत क्रम, (८) **दैनंदिन पाच वेळची नमाज़ (उपासना) अनिवार्य होण्याची कारणमीमांसा** [८२१], पंचकालिक प्रत्येक 'नमाज़' (उपासना) सर्वप्रथम संपन्न करणारे प्रेषित व तिचे गुह्य [८२२] – १) 'फ़जर'ची (प्रात:काळ)

नमाज़ (उपासना), २) 'ज़ुहर'ची (मध्यान्ह-दुपार) नमाज़ (उपासना), ३) 'असर'ची (सायंकालीन) नमाज़ (उपासना), ४) 'मग़रिब'ची (सूर्यास्त) नमाज़ (उपासना), ५) 'इशाअ'ची (रात्र) नमाज़ (उपासना), **(९) दैनंदिन पाच अनिवार्य नमाज़ांच्या कर्मश्रेणी** [८२४], नमन संख्या आणि वेळ यांचा तक्ता, **(१०) नमाज़ का चुकवू नये (टाळू नये)?** [८२६] - अभिप्राय-मथितार्थ, **(११) नमाज़- सूफ़ींचा दृष्टिकोन** [८२७], (१२) नमाज़ (इस्लामी उपासना) : सूफ़ी तात्त्विक निरूपण [८३१] , सूफ़ींची सर्वोत्कृष्ट व इतर जनांसाठी एक आदर्श नमाज़-पद्धती [८३९], ३) 'ज़कात' (धर्मदान, धर्मकर), ४) रोजा (उपवास व्रत), भुकेविषयी, ५) हज (महातीर्थयात्रा)

**प्रकरण २२ सूफ़ी - प्रेमपंढरीचे वारकरी** ..... ८४९

**(१) प्रेम - दार्शनिक विवेचन** [८४९] - क) प्रेम : दार्शनिक पैलू, ख) प्रेम : शारीरिक पाया आणि आध्यात्मिक विकास - दार्शनिक निर्वचन [८५२] - १) आपण प्रेम का बरे करतो? २) जैविक अभिगमन (Approach) किंवा प्रस्तावन [८५३] - कृमी-कीटकांच्या चित्र-विचित्र प्रेम-लीला, क्षण एक पुरे प्रेमाचा, ३) शारीरिक पाया, ४) मानसिक व आध्यात्मिक विकास, ग) प्रेम : अध्यात्म - दर्शनाच्या दृष्टिकोनातून [८६६], 'कुन फ़यकून' सिद्धान्त अर्थात 'भव' सिद्धान्ताचे मानसशास्त्रीय अष्टपद, प्रेम म्हणजे भक्तीच !, प्रेमाची रूपे आणि त्यांची दिव्य प्रेमाकडे वाटचाल [८७०], प्रेमाचे सार्वभौमिक स्वरूप [८७२], पित्याचे प्रेम बुद्धिप्रवण असते, मातेचे प्रेम भावप्रवण आणि निर्हेतुक असते, पती-पत्नीचे दांपत्य प्रेम, स्वामी आणि सेवकादरम्यानचे प्रेम, मित्रता-मानव प्रेमाचे सर्वात भव्य संबंध, गुरू-शिष्याची निर्मळ दिव्य मैत्री [८७५], आत्मा आणि परमात्मा यांच्यामधील पूर्ण प्रेम, घ) प्रेमाचे सूफ़ीप्रणीत तत्त्वज्ञान [८७६], **(२) प्रेम - सूफ़ींचा दृष्टिकोन** [८७८] - १) प्रेम, २) ज्ञान, ३) कुराणोक्त प्रेम-महिमा (प्रेम-विषय), ४) सूफ़ी साधना-प्रकार : दार्शनिक आधार (परिप्रेक्ष), प्रास्ताविक, १) सूफ़ींची ज्ञानसाधना, क) सूफ़ी साधनेमध्ये गुरुप्रदत्त ज्ञानाचे महत्त्व [८९४], निष्कर्ष, ख) सूफ़ी साधनेमध्ये अनुभवजन्य ज्ञानाचे महत्त्व, निष्कर्ष [८९७], २) सूफ़ींची प्रेम-साधना, सूफ़ी प्रेम-साधनेमधील मानसिक विकासाच्या अवस्था [८९८] - १) जागृतावस्था, २) परिष्करणाची अवस्था, ३) प्रकाशाच्या अनुभूतीची अवस्था, ४) पूर्ण ऐक्याची अवस्था,

निष्कर्ष, **(३) सूफींची योग-साधना** [९००] - १) शरिअत (कर्मकांड), २) तरीक़त (भक्तीकांड), ३) मरिफ़त (ज्ञानकांड), **(४) हक़ीक़त** (सिद्धावस्था), निष्कर्ष, **(५) सूफ़ी - प्रेमपंढरीचे वारकरी** [९०१], - १) सूफी आणि प्रेम, भौतिक प्रेम, २) इश्क भावनेची प्रमुखता, ३) सूफ़ींचे चरम उद्दिष्ट, ४) 'फ़ना' आणि 'बक़ा' (संभूती आणि असंभूती) : फ़ना, ५) सच्चे प्रेमाचे स्वरूप, ६) भक्तीमध्ये प्रेम, ७) प्रेम आणि भक्ती तुलना, ८) प्रेमाची अनुभूती आणि सीमा, ९) सूफ़ींची प्रेम-पद्धती, १०) प्रेम-सम्राटाची चार सिंहासने, **(६) सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य, तत्त्वज्ञ कवी आणि सूफ़ी साधक यांचे प्रेमाविषयी दृष्टिकोन** [९१४] - १) प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरी यांचा प्रेमाविषयी दृष्टिकोन, २) प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ कवी जलालुद्दीन रूमी प्रणीत प्रेममहिमा, क) रूमी प्रणीत प्रेम-महिमा, ख) रूमी प्रणीत काही प्रेमछटा, ३) प्रख्यात सूफ़ी साधक शेख शर्फुद्दीन अहमद यहिया मनेरी यांचे प्रेमाविषयी मत.

**प्रकरण २३ जपविज्ञान** ..... ९२७

(१) जप : भारतीय दार्शनिक दृष्टिकोन [९२७], जप विवेचन [९३१], (२) भक्तीचा राजमार्ग : ईश्वराचे नामस्मरण - वैशिष्ट्य, स्वरूप आणि महत्त्व [९३६] - क) भारतीय संतप्रणीत विवेचन, १) नाम, नामजप आणि नामाचा अनुभव, २) नामस्मरण : पायऱ्या आणि साधना, (३) नामस्मरणाची संक्षिप्त पद्धत [९४६], (४) नामस्मरणाचे प्रकार [९४७] - १) वाचिक जप, २) उपांशु जप, ३) मानस जप, ४) ध्यान जप, ५) अनन्य जप, ६) अजपाजप, (५) नामस्मरणाचे अनुभव [९५०] - ख) ज़िक्र (नामस्मरण) : इस्लामी दृष्टिकोन (धारणा), १) हदीसप्रणीत विवेचन, २) कुरआनप्रणीत विवेचन, ३) नामस्मरणाचे महत्त्व व वैशिष्ट्य, ४) नामस्मरणाचे प्रकार, १. ज़िक्र लिसानी (वाचिक नामस्मरण), २) ज़िक्र जिस्मानी (शारीरिक नामस्मरण), ३) ज़िक्र क़ल्बी (मानसिक नामस्मरण), ग) नामस्मरण : सूफ़ींच्या दृष्टिक्षेपात [९५८], १) 'ज़िक्र'चा अर्थ, १. तस्बीह (स्तोम), २. तहलील (उपाधि-हान) ३. तह्मीद (ईशस्तवन), ४. तक्बीर (ईशप्रशस्ती), २) 'ज़िक्र'चे मुख्य प्रकार : नामस्मरणाचे मुख्य प्रकार, १) ज़िक्र जली (सस्वर नामस्मरण), २) ज़िक्र ख़फ़ी (मौन नामस्मरण) किंवा (अजपा-जाप), ३) 'ज़िक्र' - नामस्मरणाचे काही गौण प्रकार [९६४] - १) ज़िक्र नफ़ी व अस्बात : विधी-निषेध नामस्मरण, २. ज़िक्र इस्मे-ज़ात : महानाम मंत्रजप,

३. 'दो ज़र्बी' ज़िक्र : द्वि-कंठी वा द्वि-आघाती नामस्मरण, ४. ज़िक्र अब्दाल : बदल घडवणारे ईश्वरनिष्ठ भक्तांचे नामस्मरण, ५. ज़िक्र कश्फ़े अर्वाह : आत्म्याच्या विमोचनाचे नामस्मरण, ६. ज़िक्र कश्फ़े कूबूर : परलोकवासियांचे नामस्मरण, ७. ज़िक्र 'आयतलकुर्सी' : महाश्लोकासन नामस्मरण, ८. ज़िक्र कडका हैदरी : वाचिक नामस्मरण, ९. ज़िक्र पासे अन्फ़ास : सूफ़ी - योगाभ्सास, ४) नामस्मरणाचे व्यावहारिक रूप- नामस्मरणाच्या सराव पद्धती, ज़िक्र क़ल्बी (हृदयस्थ जप) आणि त्याची सराव पद्धती, 'जिक्र कल्बी' (हृदयस्थ जप) ची सराव पद्धती, 'ज़िक्र जली' (सस्वर नाम-स्मरण)ची सराव पद्धत, ३) ज़िक्र (नामस्मरण) : सूफ़ीप्रणीत तत्त्वज्ञान, ज़िक्र (नामस्मरणा)चे पंच प्रकार [९७६], परमेश्वर आपल्या भक्तांची आठवण ठेवतो (भक्तांस स्मरतो)-मात्र सशर्त-विनिमय-सिद्धान्त स्वरूपात [९८३], ४) 'ज़िक्र'चे आनुषांगिक घटक : 'मुराक़बा' (ध्यान, मनन, चिंतन) व 'विर्द'-'अवराद' (नामोच्चारण वा जप), क) भारतीय विचारधारा, १) ध्यान [९८६], १. निर्गुणध्यान, २. सगुणध्यान, ३. नामनामी अभेद चिंतन, ४. नामध्वनीचे अनुसंधान, २) वैखरीची नामानुष्ठान पद्धत [९९०], ३) श्वासांत नामस्मरण व श्वासातील नामजपाचे प्रकार [९९१], क) श्वासात नामस्मरण, ख) श्वासातील नामजपाचे प्रकार, ४) नामोच्चारण व नामस्मरण [९९३], नामोच्चारणाचे प्रकार १. वाचिक जप, २.उपांशु जप, ३. मानस जप, ५) जप [९९४], ६) योगसाधना [९९५], १. योग शब्दाची व्याख्या, २. योगचे विभिन्न अर्थ, ३. योगची आवश्यकता, ४. योगची विशेषता, ५. योगमत : तत्त्वज्ञान, त्रिगुणांच्या चार अवस्था [९९७], योगशास्त्रातील परिणामवादानुसार सृष्टीक्रम, ६) पातंजलयोग सूत्र [९९८], ७) पातंजलप्रणीत योगशास्त्र : अष्टांगयोग [९९९], १. यम, २. नियम, ३. आसन, ४. प्राणायाम, ५. प्रत्याहार, ६. धारणा, ७. ध्यान, ८. समाधी, ८) योगवैशिष्ट्य [१००१], ९) घेरंड - संहिता - षट्कर्म [१००१], १) षट्कर्म - १. धौती, २. बस्ती, ३. नैती, ४. लौलिकी, ५. त्राटक - ६. कपालभाती, २) आसन, ३) मुद्रा - क) खेचरी मुद्रा, ख) शांभवी मुद्रा, ४) प्रत्याहार, ५) प्राणायाम, प्राणायामाचे प्रयोजन, ख) केवली कुंभक विधी, ६) ध्यानयोग, ७) समाधीयोग, (१०) शिव - संहिता : षट्चक्र-भेदन क्रिया १) मूलाधार चक्र, २) स्वाधीष्ठान चक्र, ३) मणिपूर चक्र, ४) अनाहत चक्र, ५) विशुद्ध चक्र, ६) आज्ञाचक्र (ज्ञान चक्र), वरील सहा चक्रांची जागृती सुषुम्ना नळींतून कुंडलिनी वर जात असताना होते, ११) नाथ-पंथी योगसाधना

[१००६], क) नाथ पंथामध्ये काया-साधना, ख) नाथ पंथाची त्रिविध साधना, १) बिंदूसाधना (इंद्रिय निग्रह), २) प्राणसाधना, ३) मन-साधना, १२) नाथ-पंथी योगप्रणित शरीरशास्त्र [१००८], १. प्राण, २. अपान, ३. समान, ४. उदान, ५. व्यान, ६. नाग, ७. कूर्म, ८. क्रकरा, ९. देवदत्त, १०. धनंजय, १) मूलाधारचक्र २) स्वाधिष्ठानचक्र ३) मणिपूरचक्र ४) अनाहतचक्र ५) विशुद्धचक्र ६) आज्ञाचक्र ७) सहस्रारचक्र, १३) योगसाधना : कुंडलिनीचा प्रवास [१०११], – १) मूलाधारचक्र, २) स्वाधिष्ठान चक्र, ३) मणिपूर चक्र, ४) अनाहत चक्र, ५) विशुद्ध चक्र, अजना – उड्डियान, ६) निर्वाणचक्र (आज्ञाचक्र), कुंडलिनीची ओळख [१०१४], १४) हठयोग [१०१५], १५) योगाचे चार प्रकार [१०१६], १. हठयोग, २. मंत्रयोग, ३. लययोग, ४. राजयोग, १६) सिद्धी वा सिद्धी-क्रिया [१०१९], सिद्धी प्राप्तीचे लक्षण, ख) सूफ़ि विचारधारा, १) 'मुराक़बा' (ध्यान, मनन, चिंतन) अ) 'मुराक़बा' – व्युत्पत्तीमूलक आणि पारिभाषिक अर्थ, आ) 'मुराक़बा'चे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान, इ) 'मुराक़बा'चा मूळ हेतू, ई) 'मुराक़बा'चे टप्पे, ड) 'मुराक़बा' अर्थात चिंतन – मननाचे स्वरूप, ऊ) 'मुराक़बा' (मनन-चिंतना) विषयी सूफ़ी तत्त्वज्ञ आणि आचार्यांची मते, १) इमाम ग़ज़ाली, २) अब्दुल वाहिद बिन जैद, ३) इब्न अता सिकंदरी, ४) सहल बिन तुस्तरी, ५) सुलेमान बिन अली, ६) अली बिन उस्मान हुजवीरी 'दाता गंजबख्श', ए) 'मुराक़बा' वैशिष्ट्य विवेचन, काही 'मुराक़बात' अर्थात मनने, ऐ) 'मुराक़बा' : मननाचे वास्तव, ओ) 'मुराक़बा'चे प्रकार, १) उपासना विधींविषयी चिंतन-मनन, २) अंतेवासी आणि सत्यनिष्ठांचे चिंतन-मनन ('मुराक़बा'), ३) ''उजव्या हाताकडे असलेले लोकां'' ('असहाबुल यमीन') चे चिंतन-मनन, ४) ईश्वर – उपस्थिती ('हुज़ूरियत') चे चिंतन-मनन, ५) आत्मिक वा आत्म्यासंबंधी चिंतन, ६) सामिप्याचे चिंतन : 'मुराकबा कुर्बत', ७) सोबत असल्याचे चिंतन : 'मुराक़बा मायत', ८) अस्तित्व-चिंतन : 'मुराक़बा वजूद', ९) सद्‌गुरू चिंतन : 'मुराक़बा पीर', १०) हातम असम यांचे चिंतन-मनन : 'मुराक़बा हातम असम', ११) अंतराळ किंवा शून्य चिंतन-मनन : 'मुराक़बा खला', औ) पवित्र कुराण प्रणीत मानवास चिंतनासाठी आव्हान (प्रवृत्त) करणारे काही श्लोक, २) 'लतायफ़ सित्ता' (षट्‌चक्र सिद्धान्त वा कुंडलिनी चक्र सिद्धान्त) [१०३८], क) सामान्य परिचय, लतायफ़ सित्ता : सूफ़ी सिद्धान्तप्रणीत षट्‌चक्रे, भारतीय तत्त्वज्ञानप्रणीत षट्‌चक्र, षट्‌चक्र भेदन प्रक्रिया – पद्धत [१०४१], आसन व आसनाचे प्रमुख प्रकार : संक्षिप्त परिचय, १. 'बद्ध' २. 'मुमुक्षू' ३.

'साधक' ४. 'सिद्ध', १) पद्मासन, २) शवासन किंवा योगनिद्रा, योगनिद्रेचे अवयवध्यान क्रम, ख) लतायफ़ सित्ता : कार्य प्रणाली, १) लतीफ़ कल्ब : हृदय चक्र, अभिप्राय, मथितार्थ, २) लतीफ़ रूह : आत्माचक्र, अभिप्राय मथितार्थ, ३) लतीफ़ सिर्र : मर्म चक्र, अभिप्राय, मथितार्थ, ४) लतीफ़ा खफ़ी, गुह्य वा अंतर्मन चक्र, अभिप्राय, मथितार्थ, ५) लतीफ़ा अख्फ़ा : ब्रह्मंड चक्र, अभिप्राय, मथितार्थ, ६) लतीफ़ा नफ्स (नफ्सी) : प्राणचक्र वा वासनाचक्र, अभिप्राय, मथितार्थ, ग) लतायफ़ सित्ता : आध्यात्मिक पैलू (तात्त्विक ओळख), १) 'मक़ाम अन्नफ़्स' : वासने (प्राणा) चे सोपान, २) 'मक़ाम-अल-क़ल्ब' : चित्तस्थान, मनोभूमी, ३) 'मक़ाम अर्रूह' : विशुद्ध आत्म्याचे स्थळ, ४) 'मक़ाम अस्सिर्र' : मर्मस्थळ वा अंत:करणाचा टप्पा, ५) 'मक़ाम-अल्-कुर्ब' : सान्निध्यस्थळ, ६) 'मक़ाम-अल-वस्ल' : मीलनभूमी वा तादात्म्य स्थळ, घ) दायर-ए-इमकान : कुंडल-वृत्त, ङ) शुग़ल किंवा अशग़ाल : सिद्धीक्रिया किंवा योगक्रिया अथवा ध्यास : प्रकार [१०५१], १) शुग़ल-ए-अनहद (सीमातीत नाद-क्रिया), सरमदी (अनश्वरता) व सुलतानुल अज़्कार (राज जप), २) शुग़ल-ए-इस्म-ए-ज़ात (मूल सत्ता नाम योगक्रिया), ३) हब्स-ए-बसर (दृष्टी अवरोध), ४) हब्स-ए-दम (प्राणायाम) ५) शुग़ल-ए-मक़ामन् मेहमूदा व सुल्तानन् नसीरा : (प्रतिष्ठित स्थळ व वर्चस्व शक्ती योगक्रिया) त्रिकुटी ध्यान, अनहद, ध्यास, ६) संत कबीर प्रणीत शुग़ल (योगक्रिया) वा (ध्यास), ७) शुग़ल-ए-नसीरन् महमूदा : त्रिकुटी योगक्रिया, ८) शुग़ल-ए-सिफ़ात सबअ: : दैवी सप्तगुण चिंतनाविषयी योगक्रिया वा ध्यास, ९) शुग़ल-ए-आलम ख़फ़ी : आंतरिक जगाच्या चिंतनाविषयी योगक्रिया वा ध्यास १०) शुग़ल-ए-मब्दा व मआद : सृजन-संहार (जन्म-मृत्यू) च्या चिंतनाविषयी योगक्रिया (ध्यास), ११) शुग़ल (ध्यास) : उगम व आद्य स्वरूप, च) शुग़ल अर्थात सूफ़ी योगक्रियाची पद्धती : एक उदाहरण, छ) हफ़्त शुग़ल बहफ़्त हुरूफ़: सप्ताक्षरी सप्त योग कर्म वा ध्यास, ज) अध्यात्ममार्गाचे सप्त प्रचरण : सप्तचक्र (सात लतीफ़े), झ) विर्द (अवराद) : नित्याराधन, जाप वा नामोच्चार चक्रे वा नामपाठ वा नामजप, १) प्रात:काळ (फ़जर) च्या नमाजनंतरचा विर्द (नामपाठ), २) दुपार (जुहर) च्या नमाज नंतरचा विर्द (नामपाठ), ३) सायंकाळ (असर) च्या नमाजनंतरचा विर्द (नामपाठ), ४) सूर्यास्तानंतर (मग्रिब) च्या नमाजनंतरचा विर्द (नामपाठ) ५) रात्री (इशा) च्या नमाजनंतरच्या विर्द (नामपाठ)

(क) १) संगीत – उदभव, वैशिष्ट्य आणि महत्त्व – भारतीय दृष्टिकोन [१०६३], २) संगीताचा दार्शनिक महिमा [१०६६], ३) मिस्त्र (इजिप्त), अरब आणि इराण या मुस्लिम राष्ट्रांमधील संगीत [१०६६], क) मिस्त्र (इजिप्त) चे संगीत, ख) अरबांचे संगीत, अरबी संगीताचा विकास, अरब संगीत–शास्त्री, अरबी वाद्ययंत्रे, ग) इराणचे संगीत, ४) संगीताचा प्रभाव आणि त्याची महती [१०६९], वैदिक संगीत, लोकसंगीत, शास्त्रीय संगीत, भक्ति संगीत, संगीताचा प्रभाव, ध्वनी श्रवणाचे महत्त्व, संगीताची महती, (ख) १) 'समाअ' (संकीर्तन श्रवण, सूफ़ी संगीत श्रवण) – काही सैद्धांतिक बाबी [१०७१], १. गवई (गायक), २. गीत, ३. श्रोता, ४. संगीत वाद्ये, २) 'समाअ' – इस्लामी (धार्मिक) दृष्टिकोन क) 'ग़िना' (संगीताचे राग) आणि 'समाअ' (संगीत–श्रवण), अर्थ, आशय, ख) 'समाअ'चे वास्तव, ग) प्रेषित मुहम्मद स. त्यांचे उप–प्रभारी आणि सहचर यांची 'समाअ'विषयी मते, घ) इस्लामी नेते आणि विद्वानांची मते, च) चिश्ती सूफ़ी संतांची मते, छ) समापन, ज) 'समाअ'चे प्रकार, १) हलाल – अनुज्ञप्त, वैध, २) हराम – निषिद्ध, वर्जित, ३) मक्रूह – अनिष्ट, अवांछनीय, ४) मुबाह – विधिसम्मत, झ) 'समाअ'चे नियम आणि शिष्टाचार [१०८५], १) 'समाअ'चे नियम, २) वेळ (समय), ३) स्थळ ४) सोबती (श्रोतृ –वर्ग) (३) 'समाअ' – सूफ़ी दृष्टिकोन [१०८६], १) गोड आवाजाचा महिमा, २) सूफ़ींचा 'समाअ', ३) 'समाअ'च्या अटी, १) वेळ (काळ), २) स्थळ, ३) श्रोता वर्ग, ४) सद्गुरूंची अनुमती, ४) 'समाअ'संबंधी मतभेद, पहिला प्रसंग, दुसरा प्रसंग, ५) चिश्तिया सूफ़ी संतांची 'समाअ'मध्ये अभिरूची आणि रसिकता [१०९७], ६) 'समाअ'मध्ये घडणाऱ्या मानसिक घटना (अवस्था) ('वारदात') [११००], ७) 'वज्द' (सहजानंद), 'तवाजिद' (भावमग्नता, आत्म–विस्मरण), 'वजूद' (निर्वेद) [११०१], ८) सहजानंद ('वज्द') आणि संकीर्तन श्रवण ('समाअ')ची मादकता (कैफ़ियत') [११०२], ९) 'कश्फुल महजूब' ग्रंथोक्त 'समाअ'चे विवेचन – सार [११०५], १०) 'सियर–उल–औलिया' ग्रंथोक्त 'समाअ'चे विवेचन–सार [११०७], १. 'समाअ'चे प्रकार, २. 'समाअ'मधील 'हाल' (तंद्रा), ३. 'समाअ'चा प्रभाव, ४. श्रोत्यांच्या चार अवस्था, ५. 'समाअ'च्या अटी व नियम, ६. 'समाअ'चे वास्तविक स्वरूप, ४) 'समाअ' ख़्वाजा बंदा नवाज़प्रणीत दार्शनिक विवेचन [११११], 'समाअ' (भक्ति–संगीत) – सूफ़ी तत्त्वज्ञान, अ) सूफ़ी मतभेद

(वादंग), (१) बाह्य पैलू [१११४], क) सर्वसाधारण आणि नवखे लोकांचा 'समाअ', ख) संगीत वाद्ये, ग) काव्य, (२) गूढ, गोपनीय पैलू [१११६], क) 'समाअ'चे अभिप्राय, ख) 'समाअ'चा हेतू, ग) 'समाअ' आणि दृढ प्रतिज्ञा (मीसाक़), घ) 'समाअ' भाव-समाधि (वज्द) स्वरूपात, भाव-समाधि म्हणजे काय?, च) भाव समाधिचा उगम, छ) भाव-समाधि (वज्द) आणि कृत्रिम भाव-समाधि (तवाजुद), ज) नृत्य ('रक़्स'), झ) वस्त्र फ़ाडून तुकडे करणे, आ) भारतीय सूफ़ींमधील मतभेद (वादंग), इ) गेसूदराज़प्रणीत 'समाअ' : विवेचन, (१) बाह्य पैलू [११२५], क) 'समाअ'ची अनुज्ञेयता - वैधता, ख) नियम आणि अधिनियम, ग) वेळ (ज़मान), स्थळ (मकान) आणि बंधुगण - श्रोतृमंडळी (इख़्वान), घ) 'समाअ'ची वाद्ये, च) काव्य, छ) मार्गदर्शक तत्त्वे, ज) कृत्रिम भावसमाधी (तवाजुद) आणि अनुरूपता (मुवाफ़कत), झ) आत्मसंयम (आत्मनियंत्रण), (२) गूढ, गोपनीय पैलू [११३३], क) 'समाअ'चे अभिप्राय आणि समापन, ख) संगीत, ग) संगीत (तह्मिल)शी निगडित गर्भित अर्थाशी संबंधित प्रक्रिया, घ) विविध प्रकारच्या नृत्यांचे प्रतीकात्मक अर्थ, च) 'समाअ'मध्ये 'एकत्त्वा' (जमा) ची अवस्था, छ) 'समाअ' - एक सूफ़ी साधनामार्ग, १) कुशैरी प्रणीत सारणी, २) गेसूदराज़प्रणीत सारणी, (५) सूफ़ी भक्तिसंगीत [११४५], क) सूफ़ी भक्तिसंगीताचे तत्त्वज्ञान, ख) सूफ़ी भक्तिसंगीत : सामान्य स्वरूप व तिचे योगदान, ग) सूफ़ी भक्तिसंगीत : 'क़व्वाली', प्रेमळ नामस्मरण, सूफ़ी भक्तिसंगीत, प्रेमामध्ये उन्मत्त, (ग) रक़्स (नृत्य) [११५१], १) नृत्याचा उगम : भारतीय मत, २) 'रक़्स' (नृत्य) : सूफ़ी संकल्पना, ३) 'रक़्स' (नृत्य) : दार्शनिक विवेचन, ४) सूफ़ी नृत्याचे स्वरूप : नृत्य पद्धती [११५४], क) मौलविया सूफ़ींची गिरकांडी नृत्य पद्धती, १) मिस्री पद्धती, २) तुर्की पद्धती, सप्तपदी किंवा सप्त सोपान साधना प्रवास [११५५], ख) सादीया : सूफ़ीची नर्तन पद्धती, ५) सूफ़ी काव्यामधील नृत्याविषयी प्रकीर्ण विचार : भावार्थ स्वरूपात [११५७]

- **स्रोत ग्रंथ** ..... **११६०**

# खण्ड - दोन

१८

प्रकरण १८

# आत्मा ('रूह') : दार्शनिक विवेचन

### १) भारतीय तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे विवेचन

### क) हिंदु धर्मातील आत्म्याची कल्पना

मनुष्य हा मूलत: आत्मा किंवा चैतन्य आहे. प्रत्येक सजीव वस्तू हा आत्मा आहे. परंतु आध्यात्मिक उन्नति करण्याचा आणि पूर्णतेच्या श्रेयाकडे मार्गक्रमण करण्याचा विशेषाधिकार एकट्या मनुष्यासच आहे. बाकीच्या सजीव प्राण्यांना या प्रवासाला लागावयाचे तर मानवयोनीत जन्म घेतला पाहिजे. आत्मा हा अमर आहे या तत्त्वावर हिंदु धर्मातील सर्व पंथांची एकवाक्यता आहे. ईश्वरसुद्धा आत्मा निर्माण करीत नाही. आत्मा हा निजरूपात अविनाशी व स्वतंत्र होय, तरी व्यावहारिक जगात तो देहाच्या आणि मनाच्या कोशात गुंतलेला आढळतो. ही उपाधि आत्म्याला संसारात गुंतवून टाकते. आत्म्याला ही उपाधि कधीपासून लागली ते आपणास माहीत नाही, पण तिचा निरास करणे शक्य आहे असे तत्त्वज्ञानाचे आणि धर्माचे आश्वासन आहे. आत्म्याच्या उपाधीचे मूळ कारण म्हणजे त्याचे आपल्या सत्यस्वरूपाविषयीचे अज्ञान. स्वत:चे चिन्मय स्वरूप विसरून तो आपल्याला जीवोपाधीशी एकरूप मानतो आणि जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडतो. जन्म व मरण यांचे हे चक्र म्हणजे संसार होय. मृत्यू म्हणजे पार्थिव देहाचा त्याग आणि नवीन देहाचे ग्रहण म्हणजे जन्म. मन आणि त्याचे संस्कार मात्र आत्म्याची बंधांतून मुक्तता होईपर्यंत त्याच्याबरोबर राहतात. आत्म्याला एका पार्थिव देहाकडून दुसऱ्या पार्थिव देहाकडे नेणाऱ्या वाहकाचे काम मन करते. आत्म्याला स्वत:च्या सत्य स्वरूपाचे विस्मरण झाल्यामुळे मनाचा प्रमुख गुण जो अहंकार त्याचा आरोप भ्रमामुळे तो स्वत:वर करतो आणि सुखदु:ख भोगण्यासाठी कर्म करतो व कर्मामुळे सुखदु:ख भोगतो.

आत्मा जे कर्म करतो, किंवा करीत असल्याची त्याची मिथ्या भावना असते, त्याचे परिणाम घडून येतात आणि पुढील जन्माचे ते स्वरूपही ठरवितात. क्रिया आणि प्रतिक्रिया यांच्या नियमांनुसार नैतिक क्षेत्रातील कार्यकारणभाव म्हणजेच कर्म–नियम. हा म्हणजे ऋत या विश्वांतील नैतिक सुव्यवस्थेच्या सिद्धांताचा विशिष्ट स्वरूप आहे. कधीकधी या कर्माला 'दैव' असे चुकीने समजले जाते. कर्माचा खरा अर्थ इतकाच की, मनुष्य जसे पेरतो तसे वेचतो. सारांश, माणसाचे जीवन नियंत्रित करणारी दैव म्हणून काही बाह्यशक्ती नाही.

हिंदुधर्मातील सर्व पंथांच्या मते माणसाचे अंतिम श्रेय मोक्ष आहे. संसारी जीवन आत्म्याला बद्ध करते आणि तो आपल्या मुक्त निजस्वरूपाची ओळख विसरतो. यातच पापाचा आणि दु:खाचा उगम आहे. या

ठिकाणी 'पाप' आणि 'दुःख' या संज्ञांना त्यांचे नेहमीचे अर्थ नाहीत. जे आत्म्याचे सत्यस्वरूप झाकून टाकते व जे त्याला भ्रामक भूमिका वटवण्यास भाग पाडते ते 'पाप'. या दृष्टीने पुनर्जन्म आणि त्याचे कारण असलेले अज्ञान ही पापे आहेत तीच दुःखाची कारणे आहेत. त्यांच्यामुळेच अनंत आणि अविनाशी आत्म्याला आपण एक सान्त कालवश जीवन आहोत असा भ्रम बाधू शकतो. या ठिकाणी 'दुःख' या शब्दाचा अर्थ देशकालपरिच्छिन्नत्व आणि आशश्वतता असा आहे.

जेव्हा अज्ञानाचा नाश होऊन ज्ञानाचा उदय होतो तेव्हा भेदांचा पूर्ण निरास होतो. शरीरात वास्तव्य करीत असतानासुद्धा आत्म्याला ही स्थिती प्राप्त होणे शक्य आहे. हिलाच 'जीवन्मुक्ति' म्हणतात. आत्मा हा सदैव परिपूर्णच आहे आणि तो परमात्म्यापासून अभिन्न आहे. केवळ अज्ञानामुळे ही गोष्ट झाकून राहिलेली असते. जेव्हा हा पडदा दूर होतो तेव्हा सदैव परिपूर्ण असलेले आत्म्याचे स्वरूप प्रगट होते. मात्र हे अनावरण केवळ तात्त्विक ज्ञानाने घडून येत नसून त्यासाठी संपूर्ण सत्याचा साक्षात स्वानुभव पाहिजे. या बाबतीत हिंदू ईश्वरवाद आणि केवलवाद यांचे मतैक्य आहे. हा अनुभव मिळवण्यासाठी आचारमूलक यमनियम पाळावे लागतात. भारतात हे सर्वसंमत तत्त्व आहे की, पंथापेक्षा आचार ही महत्त्वाची गोष्ट आहे. योग्य साधना केली की, आध्यात्मिक ज्ञानदृष्टि प्राप्त होते. ईश्वरवादी प्रणालीचा भक्त हा आपल्या ईश्वराच्या भक्तीचा मार्ग स्वीकारतो आणि केवलवादी ज्ञानमार्ग पत्करतो.

**ख) उपनिषदेंप्रणीत आत्म्याचे स्वरूप**[५८]

आत्मप्राप्ति हे जीवनाचे अंतिम ध्येय आहे म्हणून आत्म्याची उपासना करावी - 'आत्मानमेव लोकमुपासीत' असा उपनिषत्कार ऋषींनी उपदेश केला आहे. परंतु ज्याची आत्मा म्हणून उपासना करावयाची तो कसा, काय, कोण आहे व तो कोठे असतो हे समजल्याशिवाय त्याची उपासना कशी करता येईल? 'मनुष्य ज्याच्या योगाने पाहतो तो आत्मा की ज्याच्या योगाने तो ऐकतो तो आत्मा?' (ऐतरेय उपनिषद् - ५.१) ज्या आत्म्याची माणसाने उपासना करावयाची तो त्याच्या शरीरात म्हणजे पिंडात आहे की त्याच्या शरीराच्या बाहेर म्हणजे ब्रह्मांडात आहे? तो कोठे मिळेल? अंतःसृष्टीतील सर्व तत्त्वांचे निरीक्षण करून आत्मतत्त्वाचा लागलेला शोध असे सांगतो की अंतःसृष्टीतील सर्व तत्त्वांच्या बुडाशी त्यांच्याहून श्रेष्ठ, त्या सर्वांचे अंतर्यामी व त्यांचा आधार असे एक नित्यतत्त्व आहे. तोच आत्मा होय. म्हणजेच देह, मन, बुद्धी इत्यादी तत्त्वांनी बाधित वा मर्यादित न होणारे व त्यांच्यापलीकडे असणारे सत्य व शुद्ध तत्त्व म्हणजे आत्मा होय.

आत्मा हे एक असे तत्त्व आहे, की जे शरीराच्या बदलणाऱ्या निरनिराळ्या अवस्थेत कधीही बदलत नाही. जागृति, स्वप्न, सुषुप्ति, जन्म-मृत्यू व अंतिम मुक्ति या सर्व अवस्थांत आत्मा एकसारखा एकच असतो. कोणीही आत्म्याचा केव्हाही नाश करू शकणार नाही. मृत्यू त्याला स्पर्श करू शकत नाही आणि पाप त्याला विकृत करू शकत नाही. तो स्वयंपूर्ण आहे. त्याच्याबाहेर जगात अन्य असे काहीही नाही. कारण हे जगच खुद्द त्याच्यात स्थित किंवा मर्यादित झाले आहे. मनुष्याचा आत्मा हा स्वतःच ज्ञाता किंवा द्रष्टा आहे. तो अन्य कोणाच्याही ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही. तो सर्वांना पाहतो, पण त्याला पाहणारा कोणीही नाही. ज्याला आपण मी किंवा माझा देह असे म्हणतो ते अनेक तत्त्वांचे गाठोडे म्हणजे आत्मा नव्हे. आत्मा या सर्वांचा साक्षी असून सर्वांहून पर म्हणजे श्रेष्ठ आहे. आपण ज्या तत्त्वांना सर्वसाधारणपणे अज्ञानाने आत्मा असे म्हणतो अथवा

समजतो, ती सर्व ज्ञानाचा विषय होऊ शकतात, आणि जे जे म्हणून ज्ञानाचा विषय होते म्हणजे ज्ञेय या संज्ञेत पडते, ते सर्व अनात्म होय.

सर्व विषय आत्म्याच्या ज्ञानासाठी आहेत, मात्र आत्मा स्वत: ज्ञेय विषयांपैकी एक नाही. वस्तुत: पाहता सर्व स्थित्यंतरे, सर्व अनुभव आत्म्यालाच येतात. सुषुप्तीमध्ये जागृतीतील व स्वप्नातील अनुभव नसले तरी सुध्दा आत्मा असतोच. अनुभवाचे सातत्य अथवा अखंडत्व लक्षात घेता येणारे सर्व अनुभव ज्याच्यात सामावतात तो एक शाश्वत आत्मा असतो, असे कबूल करणे भागच पडते. बाह्य सृष्टीच्या जाणिवेवाचून जो निद्रेत स्वस्वरूपाने व स्वसामर्थ्याने असतो तोच आत्मा. आरशात कोणतेही प्रतिबिंब पडलेले नसते तेव्हा तो फुटलेला असतो असे नाही. ज्ञाता हा विषयाहून पर म्हणजे त्याच्याहून श्रेष्ठ आहे. आत्मा स्वयंप्रकाशित आहे. जेव्हा सर्व विषय अंतर्धान पावतात तेव्हा आत्मा स्वयंप्रकाशाने प्रकाशत असतो. त्याचा प्रकाश नष्ट होत नाही. 'आत्मैवास्य ज्योतिर्भवति ।' बृहदारण्यक उपनिषद ४.३.६ झोपेत मन हे इंद्रियच अस्तित्वात नसते. या स्थितीत कालाची जाणीव नाही की कल्पनेचे चक्र फिरत नाही. जाणिवरहित आत्मा ही कल्पनाच प्रतिषिद्ध, असंबद्ध, मूर्खपणाची आहे. जेथे मनन किंवा स्पंदन नाही तेथे आत्मा नाही. बदलत्या अनुभवांबरोबर आत्मा बदलत नाही. सर्व विज्ञेये आत्म्यात असूनही विज्ञेये म्हणचे आत्मा नव्हे, तो त्यांच्या पलीकडचा आहे.

सर्व दृश्यादृश्य जगाचा आत्मा हाच एकमेव आधार आहे असे मानले पाहिजे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीनही अवस्थांना व त्यांच्या व्यवहारांना आत्म्याचा आधार आहे ही गोष्ट खरी, तथापि तो स्वत: त्या अवस्थांनी किंवा व्यवहारांनी लिप्त होत नाही. आत्मतत्त्वाखेरीज बाकी सर्व वस्तूंना सापेक्ष सत्यता आहे. परंतु आत्मा हा स्वयंभू व अलिप्त असल्यामुळे त्याचा सत्यपणा मात्र निरपेक्ष आहे, या अभिप्रायाने नामरूपात्मक सृष्टि किंवा प्राणइंद्रिये सत्य असून आत्मा हे त्या सत्याचेही सत्य होय असे बृहदारण्यकांत (२.१.२०) म्हटले आहे. मर्त्य शरीर मृत्यूने ग्रासलेले आहे. परंतु हे मर्त्य शरीर अविनाशी व अशरीरी आत्म्याचे अधिष्ठान आहे. तो शरीरयुक्त असेपर्यंत प्रिय व अप्रिय यांनी युक्त असतो. जोपर्यंत तो शरीरात असतो तोपर्यंत त्याला प्रियाप्रिय सुटत नाहीत. परंतु ज्याचा शरीराशी संबंध असत नाही त्याला प्रिय व अप्रिय यांचा स्पर्श होत नाही. (छांदोग्य उपनिषद् ८.१२.१) सुषुप्तावस्थेत जीवात्मा मूळ स्वरूपात जातो तेव्हा आत्म्याचा शरीराशी संबंध तेवढ्या अवस्थेपुरता सुटतो. म्हणून शरीरधर्मांचे त्याला ज्ञान होत नाही. पण कार्याच्या अभावावरून कारणाचा अभाव ठरविणे तर्कशास्त्रदृष्ट्या चुकीचे आहे. सुषुप्तावस्थेत प्रियाप्रिय ज्ञात होत नाही एवढ्याने त्यावेळी आत्म्याचे अस्तित्वच नाही हे म्हणणे बरोबर नाही. या स्थितीत आत्मा असतो, पण तो आपल्या मूळच्या स्वरूपात असल्याने शरीरसंबंधरहित असतो. आत्मा म्हणजे केवळ एक निर्गुण वस्तू मानलेली नाही. तर तो क्रियाशील असे विश्वचैतन्य आहे असे मानले आहे. आत्मा ज्ञाता आहे व ज्ञेयही आहे. आत्मा अनंत आहे, पण सर्व सान्त विश्वाचा आधार किंवा अधिष्ठान आहे. तो विश्वात्मा आहे व सर्व विश्व व्यापून राहिला आहे. तथापि तो या विश्वाने मर्यादित नाही. तो विश्वाच्या बाहेरही आहे. सर्व विश्व त्या आत्म्याच्या सत्तेत वागणारे आहे 'एष सर्वभूतान्तरात्मा ।'' (मुंडक उपनिषद् २.१.४) हा आत्मा सर्व प्राणिमात्राच्या अंत:करणात ज्योतिरूपाने प्रकाशत असतो. ज्या विश्वकोशातून सर्व सृष्टि उत्पन्न होते तो प्राणही हा आत्माच आहे. आत्म्याच्या भयानेच सर्व सृष्टि त्याच्यात आपला व्यापार करते. आपल्या शरीरांतील या अनंत आत्म्यात नाही असे या विश्वात

काहीही नाही. या आत्म्याच्या प्रकाशातच आपला सर्व ज्ञानव्यवहार चालतो. हा दीप मालवा की सर्वत्र अंध:कार होईल. जाणणारा आत्मा नसेल तर दिक्कालाने मर्यादित असणारी बाह्य सृष्टीही नष्ट होईल. स्मृति आणि अंतर्मुखता, ज्ञान आणि नीति या सर्वांना आत्म्यामुळेच अस्तित्व आहे. त्याच्याबाहेर काहीही नाही. शरीरात असलेला हा आत्मा सर्व विश्वाची प्रतिष्ठा आहे, असे ज्याचे सर्वव्यापी स्वरूप आहे तो आत्मा जागृति, स्वप्न, निद्रा, मृत्यू, बंध आणि मोक्ष या सर्वावस्थेत एकच आहे. तो सर्वगत व सर्वसाक्षी आहे. हे सर्व आत्माच आहे. 'अहमेव वर्सोस्मि।'

या विश्वात्म्याचे स्वरूप असे आहे, की त्याला कोणीही पाहू शकत नाही. हा द्रष्टा सर्व ज्ञान प्रकाशित करतो, पण त्याने प्रकाशित केलेले ज्ञान त्याला प्रकाशित करू शकत नाही. (मुंडकोपनिषद् २.२.१०) ज्याला सर्व ज्ञान होते तो स्वत: दुसऱ्या कोणाच्याही ज्ञानाचा विषय होऊ शकत नाही. ज्ञान म्हटले की द्वैत आले. म्हणून आत्म्याची व्याख्या होऊ शकत नाही. सर्व अंतिम तत्त्वाप्रमाणे तो स्वयंसिद्धच मानावा लागतो. म्हणून विषय व वासनासृष्टी जो व्यापून राहिला आहे परंतु ही सृष्टी बाधित झाली असताही जो स्वत: स्वस्वरूपाने असतो, अशा एका आत्म्याचे सत्यत्व मान्य करणे आपल्याला भाग आहे. (बृहद् आरण्यक उपनिषद ३.७.३)

मांडूक्य उपनिषदातही आत्म्याच्या निरनिराळ्या अवस्थांचे व अंशांचे पृथक्करण करून शुद्ध आत्मस्वरूपाचा हाच सिद्धांत प्रस्थापित केला आहे. आत्म्याची पहिली अवस्था म्हणजे जागृतावस्था. या अवस्थेत आत्मा बहि:प्रज्ञ (म्हणजे बाह्य विषयांचे ज्ञान असणारा स्थूलभुक्) अर्थात् स्थूल विषयांचा उपभोग घेणारा असतो. या अवस्थेतील आत्म्यांशाला **वैश्वानर** ही संज्ञा आहे. दुसरी स्वप्नस्थिती. या ठिकाणी आत्मा अंत:प्रज्ञ म्हणजे सूक्ष्म विषयांचा उपभोग घेणारा असतो. (मांडूक्य उपनिषद् ३,४) 'या स्थितीत रथ, रथाला जोडण्याचे घोडे, बैल व त्यांच्यासाठी योग्य असे रस्ते नसतात. जीवात्माच ते सर्व विषय उत्पन्न करतो.' (बृहद् आरण्यक उपनिषद् ४.३.१०) स्वप्नस्थितीतील आत्म्याला **तैजस** ही संज्ञा असते. यानंतरची तिसरी अवस्था म्हणजे सुषुप्ती. या अवस्थेत झोपी गेलेला मनुष्य कोणत्याही विषयाची इच्छा करीत नाही. त्याला कोणतेही स्वप्न दिसत नाही. या अवस्थेत आत्मा एकीभूत, प्रज्ञानघन आनंदमय असून आनंदाचा उपभोग घेणारा असतो. या अवस्थेत त्याला **प्राज्ञ** असे म्हणतात. (मांडूक्य उपनिषद् ५) जीवात्मा या अवस्थेत तात्पुरता परब्रह्मामध्ये विलीन होतो. मनाच्या स्पंदनाने किंवा कल्पनेने उत्पन्न होणारे द्वैत जागृति व स्वप्न या दोन अवस्थात असते. ते सुषुप्ति अवस्थेत लोप पावते. 'जेव्हा मनुष्य झोपी जातो तेव्हा तो मूळ सत्तत्त्वाच्या स्वरूपाशी संयुक्त होतो. म्हणजेच स्वत:च्या मूळ स्वरूपाला प्राप्त होतो. म्हणून त्याला **स्वपिति** असे म्हणतात. (छांदोग्य उपनिषद ६.८.१) 'अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे सर्व किरण ज्याप्रमाणे त्याच तेजोमंडलात एकरूप होतात व पुन्हा पुन्हा उदय पावणाऱ्या सूर्याचे ते किरण पसरतात, त्याचप्रमाणे हे सर्व इंद्रियसमूह श्रेष्ठ अशा मनोदेवाच्या ठिकाणी एकरूप होतात. त्यामुळेच ह्या पुरुषाला या स्थितीत ऐकू येत नाही. दिसत नाही. थोडक्यात, त्याच्या सर्व इंद्रियांचे सर्व व्यापार बंद असतात.' (प्रश्न उपनिषद् ४.२) 'या स्थितीत पक्षी ज्याप्रमाणे आपल्या राहण्याच्या झाडावर स्थिर होतात, त्याप्रमाणे जीवात्मा इंद्रियग्रामासह श्रेष्ठ आत्मतत्त्वात स्थिर होतो.' (प्रश्न उपनिषद् ४.७) निद्रेत सर्व प्रवृत्ती विराम पावतात. तथापि ही अवस्था म्हणजे मूर्च्छा नव्हे. म्हणून मांडूक्यामध्ये सुषुप्तीच्या पलीकडची व तिच्याहूनही श्रेष्ठ अशी आत्म्याची चौथी अवस्था सांगितली आहे. या अवस्थेतील आत्म्याला

तुरीय हे नाव आहे. निद्रावस्थेतील आत्म्याची जी अभावरूप स्थिती सांगितली त्याहून ही अगदी निराळी स्थिती आहे. 'या स्थितीत आत्मा अंत:सृष्टीला जाणत नाही, बाह्य सृष्टीला जाणत नाही, दोनही सृष्टींना जाणत नाही. तो ज्ञानघन नाही, प्रज्ञ नाही, अप्रज्ञ नाही, तो अदृश्य, अव्यवहार्य, अग्राह्य, अलक्षण, अचिंत्य आहे. तो दाखविता येण्यासारखा नाही. अद्वितीय आत्मानुभावाचे सार, प्रपंचाचा शेवट, शांत, शिव, अद्वैत, ज्याला ब्रह्माचा चौथा पाद मानतात तोच आत्मा होय. आणि तोच जाणला पाहिजे.' (मांडूक्य उपनिषद् ७)

**शरीर व आत्मा यांच्यासंबंधी रथ-रूपक**[५१]

**१) कठ उपनिषद् प्रणीत -**

**'आत्मन' (आत्म्या)चे स्वरूप** - आत्मा हा अमर, अविनाशी, अज आहे. आत्मा हा कशापासूनही निर्माण झालेला नाही, व त्यापासूनही काही निर्माण होत नाही. 'न प्रकृति: न विकृति:' असेच त्याचे वर्णन करावयास हवे. केवळ इहलोक व भौतिकांवर श्रद्धा ठेवणाऱ्यांना पुन्हा पुन्हा मरावे लागते, म्हणजेच पुन्हा पुन्हा जन्मावे लागते व आपापल्या कर्म व ज्ञानानुसार भोगाकरिता उचित शरीर धारण करावे लागते.

आत्म्याचे स्वप्नामधील स्वरूप स्पष्ट करताना म्हटले गेले आहे की, स्वप्न हे 'मृत्युसम'च आहे. फरक इतकाच की, पहिल्यात अनुभूतीची स्मृति असते, दुसऱ्यात नसते, तथापि स्वप्न, निद्रा, मृत्यू या सर्व अवस्थांमध्ये अविक्रिय असा आत्मा असतोच. आत्मा नाही असे कधीही होत नाही. तो क्रियाविषय नाही, त्याचप्रमाणे क्रियाकर्ताही नाही. याच संदर्भात येथे सुप्रसिद्ध 'नायं हन्ति न हन्यते' हे वचन आलेले आहे.

**रथ-रूपक** - आत्म्याच्या स्वरूपाचा व शरीरातील अवस्थितीचा विचार करताना या उपनिषदामध्ये सुप्रसिद्ध 'रथ-रूपक' आलेले आहे. आत्मा हा रथी असून बुद्धी ही त्याची शरीररूपी रथाची सारथी आहे व या शरीररूपी रथास 'इंद्रिये' ही जोडलेले 'अश्व' होत. अश्व 'सदश्व' असल्यास रथी सुखरूप अंतिम विश्रांतिस्थानापर्यंत, परमेश्वरापर्यंत जाईल. अश्व हे 'दुष्टाश्व' असल्यास या रथाचे भवितव्य निश्चितच धोक्यात आहे. नेमकी हीच कल्पना याच तपशिलासह प्लेटोच्या 'फ्रेड्रस' या कथेमध्ये आलेली आहे. कठोपनिषद् हे प्लेटोच्या आधीचे आहे यात शंका नाही, तथापि या रूपकाचे हे परिभ्रमण विस्मयजनक आहे यात शंका नाही. दोहोंतही मन व इंद्रियजय आणि पर्यायाने नैतिक प्रतिष्ठेचे महत्त्व सांगावयाचे आहे हे स्पष्ट आहे. सद्गुणाशिवाय आत्मज्ञान, परमेश्वरज्ञान, मुक्ति यांपैकी कशाचाही लाभ होणे शक्य नाही हेच येथे प्रतिपाद्य आहे.

**२) छागलेय उपनिषद्प्रणीत -**

**शरीर व आत्मा यांच्यासंबंधी रथ-रूपक** - छागलेय उपनिषदाच्या शेवटी उपसंहार म्हणून भगवान् छागले यांचे श्लोक दिलेले आहेत व त्या श्लोकात जे शरीर व आत्मा यांच्यासंबंधी 'रथ-रूपक' आलेले आहे त्यावरच सर्व उपनिषदांची उभारणी झालेली आहे, म्हणूनच याला 'छागलेय' उपनिषद असे नाव पडले असावे. वस्तुत: कथा कवष ऐलूष, सरस्वतीच्या तीरावर सत्र करणारे ब्राह्मण व कुरूक्षेत्रात वास करणारे चिंतनशील ऋषि बालिश यांच्यामधील आहे. बालिशांनी या सत्रनिष्ठ ब्राह्मणांना तत्त्वज्ञान शिकविले ते या उपनिषदात आले आहे. हे तत्त्वज्ञान छागले यांच्या श्लोकांवर आधिष्ठित आहे.

सरस्वतीच्या तीरावर सत्र करणाऱ्या ब्राह्मणांनी कवष ऐलूषला हलक्या जातीचा, वेदज्ञानशून्य अब्राह्मण म्हणून हाकलून दिले. त्यावर कवष ऐलूषाने 'ब्राह्मण्य' कशावर अवलंबून असते', असे सांगितले. यावर कवषाने जवळच पडलेल्या अच्छावद आत्रेयाच्या प्रेताकडे त्यांचे लक्ष वेधून त्यांना विचारले, ''या आत्रेयाच्या ठिकाणी हे सारे ब्राह्मण्य होते, ते कोठे गेले?'' ते सर्व निरूत्तर झाले व त्यांना कवषाने उपस्थित केलेल्या प्रश्नाचे गांभीर्य समजले व कवषाच्या चिंतनात्मक ज्ञानाचीही त्यांना जाणीव झाली, परंतु कवषाने त्यांना स्वतः ज्ञान न देता कुरूक्षेत्रातील बालिश ऋषींच्याकडे पाठविले व त्यांनी या कर्मनिष्ठ ब्राह्मणांना एक वर्ष विद्यार्थी म्हणून राहिल्यावर 'आत्मज्ञान' सांगितले. बालिशांनी या ब्राह्मणांना एक वैभवशाली रथ दाखविला. अश्व जोडलेला व सारथ्याने चालविलेला हा रथ नानाविध गतींनी मोठ्या आकर्षक रीतीने जात होता. सरतेशेवटी सारथी निघून गेल्यावर रथ 'विश्रांत' झाला. याप्रमाणेच शरीररूपी रथाचा आत्मा हा सारथी आहे. शरीराचे भिन्नभिन्न अवयव म्हणजे रथाचे अवयव होत. हा सारथी निघून गेला म्हणजे रथ 'विश्रांत' होतो. नातलग व बंधु यांच्या दारूण शोकाचा वा विलापाचा या रथास काहीही उपयोग होत नाही.

आत्म्याचे शरीरातील अस्तित्व, त्याचे प्रेरकत्व व महत्त्व स्पष्ट करण्याकरिता 'रथ-रूपक' वारंवार योजलेले आढळते. छागलेय ऋषींच्या श्लोकात हीच कल्पना विस्ताराने व तपशिलाने मांडलेली आहे. 'रथकल्पनेचा विस्तार' असे या उपनिषदातील विवेचनाचे सूत्ररूपाने सार सांगता येईल.

**आत्मासंबंधी पंचकोश-सिद्धांत**[५१]

आत्मा अविकारी, अद्वितीय, निर्गुण व द्रष्टस्वरूप असून तोच 'ब्रह्म' होय, असा अद्वैत वेदान्ताचा परम सिद्धांत आहे, पण आपला जीव, सविकारी, सद्वितीय, सगुण व ज्ञानविषय म्हणून प्रत्ययास येतो. हा विरोध दूर करण्यासाठी मायेच्या उपाधीमुळे आत्मा जीवरूपाने भासतो अशी सर्वसामान्य उपपत्ति दिली जाते. हीच उपपत्ति विशेष रूपाने देण्यासाठी पंचकोश-सिद्धांताची योजना केलेली आहे.

तैत्तिरीय उपनिषदांतील ब्रह्मवल्ली नावाच्या दुसऱ्या अध्यायात (अनुवाक २ ते ५) आत्मस्वरूपाचे जे व्याख्यान आहे त्यात या सिद्धांताचे मूळ आहे. मात्र 'कोश' हा शब्द तेथे आलेला नाही. शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात तो घातला. **अन्नरसमय** आत्म्याच्या आत **प्राणमय** आत्मा, त्याच्या आत **मनोमय,** त्याच्या आत **विज्ञानमय** व त्याच्याही आत **आनंदमय** आत्मा राहतो, असे त्या उपनिषदात म्हटले आहे. या उपनिषदाच्या संहितेप्रमाणे आनंदमय आत्मा हा सर्वांच्या आत असून त्याच्यावर **चार आवरणे** आहेत असे होईल. शंकराचार्यांनी मात्र आपल्या भाष्यात हा आनंदमय आत्मा कार्यरूप असून निर्विकार चैतन्याचा म्हणजे अंतरात्म्याचा तो **पाचवा कोश** आहे असे म्हटले आहे.

विद्यारण्यांच्या 'पंचदशी' या ग्रंथातील तिसऱ्या प्रकरणात **पंचकोश-सिद्धांताची** मांडणी अत्यंत प्रसन्न शैलीत केली आहे. सर्वदा साक्षिरूप असलेल्या अंतरात्म्यावर (अथवा ब्रह्मावर) एकावर एक अशी अविद्यानिर्मित **पाच आवरणे अथवा कोश** आहेत. त्या आवरणांच्या अपेक्षेने ब्रह्मास जीवत्व येते. हे कोश फाडून टाकले म्हणजे विशुद्ध आत्मतत्त्व उरते.

**पाच आवरणे** – पित्याने खाल्लेल्या अन्नाचा परिणाम असलेल्या रेतापासून निर्माण झालेला आपला **स्थूल देह** हा **अन्नमय कोश** होय. शरीराचे स्पंदनादी व्यवहार होऊन ज्यांनी इंद्रिये कार्यक्षम राहतात, त्या

वायुरूप प्राणांनी बनलेला कोश हा **प्राणमय** होय. त्यानंतरचा म्हणजे तिसरा कोश **मनोमय** होय. जे सुखदुःखांनी अस्वस्थ होते, देह, गृह, पुत्र इत्यादीसंबंधी ज्यास अहंता आणि ममता असते ते **मन** होय. त्यानंतर कर्तृत्वाचे आणि निश्चयाचे भान असलेल्या बुद्धीचा प्रांत येतो. आत्म चैतन्याच्या प्रतिबिंबाने अथवा आभासाने युक्त असलेली **बुद्धी** हा **विज्ञानमय कोश** होय. (प्राणमय, मनोमन व विज्ञानमय कोश मिळून **लिंगदेह** होतो व अन्नमय कोश हा **स्थूल देह** होय.) गाढ निद्रेत ज्याचा अनुभव येतो, त्या अज्ञानावर उमटलेले आत्म्याच्या स्वरूपानंदाचे प्रतिबिंब म्हणजेच विज्ञानमय कोशाच्याही आत असलेला **आनंदमय कोश** होय. हा आनंदवृत्तिरूप असतो. सच्चिदानंदस्वरूप आत्म्याचे हे सर्वात अतीत आवरण होय. पाचही कोश ज्याचा अनुभवविषय होतात तो आत्मा स्वत: विषयरूपाने प्रतीत होत नसला, तरी तो नाही असे होत नाही. कारण तो नसेल, तर त्या पाचही कोशांचे विषयत्वच नाहीसे होईल. शिवाय तो स्वयंप्रकाश असल्याने त्याचे अस्तित्व नाकारताच येत नाही.

**पंचकोश व आनंदमीमांसा**[५९]

मानवाच्या आत्म्याच्या शोधाच्या बाबतीत उपरोक्त पाच कोशांची कल्पना मांडण्यात आलेली आहे. अन्नमय कोश, प्राणमय कोश, मनोमय कोश, विज्ञानमय कोश व आनंदमय कोश असे हे पांच कोश असून ते याच क्रमाने एकाच्या आत दुसरा याप्रमाणे आहेत, म्हणजे सर्वांत अंतर्यामी असणारा आनंदमय कोश होय. ही भिन्न भिन्न शरीरे आहेत किंवा कसे याबद्दल अभ्यासकांचे एकमत नाही, तथापि शंकराचार्यांनी लावलेलाच अर्थ सर्वात सयुक्तिक वाटतो. हे कोश काल्पनिक असून सत्याकडे अर्थात् आत्म्याकडे जायचे असेल तर 'आनंदमय' कोशापर्यंत जाऊन पोचावयास हवे. इतर स्थूल व त्या मानाने भौतिक अशा कोशांचा निरास करून त्यापलीकडे जावयास हवे, तरच आनंदप्राप्तीचा संभव हेच अंतिम सत्य उपनिषदाला सांगावयाचे आहे, यात शंका वाटत नाही. कारण भृगुवल्लीमध्ये आनंद हेच ब्रह्म असे स्पष्ट प्रतिपादन आलेले आहे. याच 'आनंदा'ची अधिक मीमांसा करून ब्रह्माचा आनंद हाच सर्वश्रेष्ठ आनंद होय असेही येथे स्पष्टपणे सांगितलेले आहे. आनंदामधूनच सर्व विश्व निर्माण झालेले असून त्यामुळेच ते गतिमान आहे व त्यामध्येच त्याची विश्रांतिपण आहे व म्हणूनच या आनंदाची प्राप्ती हेच मानवी जीविताचे ध्येय होय.

**मूल्याच्या साक्षात्काराचे गमक आनंद**[५९]

मूल्यांच्या अनुभूतीचे रहस्य आत्म्याच्या स्वरूपात आहे. मूल्याच्या साक्षात्काराचे गमक आनंद होण्यात आहे. आत्मा हा रसरूप, आनंदरूप, आहे. 'रसो वै सः' (तैत्तिरीय उपनिषद), 'रसं ह्येवायं लब्ध्वा आनंदी भवति' (तैत्तिरीय उपनिषद). प्रत्येक मूल्यानुभूतीमध्ये याप्रमाणे आत्माविष्कारच अभिप्रेत असतो. यावरून भारतीयांची मूल्याची कल्पना आदर्शवादी किंवा अध्यात्मवादी असल्याचे प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीस येते.

आत्मा किंवा ब्रह्म हा सच्चिदानंदरूप आहे, असे उपनिषदांमध्ये अभिव्यक्त आहे. मूल्यशास्त्राप्रमाणे आनंद हे वस्तूचे रूप आहे, कारण आनंद इष्ट आहे, दुःख नाही. याप्रमाणे अंतिमसत्तेचा अथवा वस्तूचा निकष मूल्यात्मक आहे.

दुसरे असे की, सत् हेच चित् तेच आनंदरूप आहे, म्हणजे अंतिम सत्ता ही आनंदरूप आहे. याचा अर्थच ती मूल्यरूप आहे. उपनिषदांमध्ये व विविध वेदांत-दर्शनात अंतिम सत्तेच्या किंवा ब्रह्माच्या मूल्यतत्त्वावर भर दिला आहे.

**मूल्यांच्या दृष्टिकोनातून आत्म्याचे पंचकोश**[५९]

उपनिषदांमध्ये मूल्यांचे पुढील प्रकार कल्पिले आहेत. ते मुख्यत: आत्म्याच्या पंचकोशांवर आधारलेले आहेत.

१) अन्नमय कोश – भौतिक मूल्ये, अन्नवस्त्रादी उपकरणे

२) प्राणमय कोश – प्राणिशास्त्रीय मूल्ये, आरोग्य, बल, आयुष्य इत्यादी.

३) मनोमय कोश – मानसिक मूल्ये, भावना, मनोविनोदन इत्यादी.

४) विज्ञानमय कोश – बौद्धिक मूल्ये, विज्ञान, तत्त्वज्ञान इत्यादी.

५) आनंदमय कोश – नीति, कला, सर्जनशील प्रतिभा इत्यादी

आत्मा हा पंचकोशांपलीकडील असून आध्यात्मिक धार्मिक मूल्ये, श्रद्धा, योग, भक्ती, साक्षात्कार, मोक्ष, शांती इत्यादींचा आधार आहे.

वरील कोष्टकात साधन–साध्य–विवेकावर आधारलेली मूल्यांची एक प्रकारची श्रेणी आहे. अन्नमय कोशाची मूल्ये, प्राणमयकोशाच्या मूल्यांना साधनभूत होतात. याप्रमाणे अनुक्रमाने प्रथम येणारी मूल्ये मागाहून येणाऱ्या मूल्यांना साधारणपणे साधनरूप होतात व पुढील मूल्ये साध्यरूप होतात. साधनमूल्ये गौण, साध्यमूल्ये मुख्य हे सर्व मूल्यांतील स्वाभाविक तारतम्य आहे, तथापि साधनमूल्ये पुढील मुल्यांना आधारभूत असल्याने त्यांचे गौणत्व नाममात्रच आहे. साधनापेक्षा साध्याचे महत्त्व अधिक असले तरी साधन हे डावलून टाकण्याजोगे उपेक्षणीय मूल्य नाही. 'शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ।' या उक्तीमध्ये शारीरिक आणि धार्मिक मूल्यांचा, अनुक्रमे साधन आणि साध्य, असा विवेक करूनही आद्य साधन म्हणून शारीरिक मूल्यांच्या महत्त्वावरच भार दिला आहे. साधनासंबंधी विवेक करताना त्याच्या साध्यानुकूलत्वावर भर दिला पाहिजे. साध्यनिरपेक्ष साधनाला तसे महत्त्व नाही.

**ग) भगवद्‌गीताप्रणीत आत्म्याचे स्वरूप**[६०]

ज्या प्रमाणे देहधारी आत्मा अविरतपणे या देहात बालपणापासून तारुण्यात आणि तारुण्यातून म्हातारपणात जात असतो, त्याचप्रमाणे मृत्यूनंतर जीवात्मा दुसऱ्या देहामध्ये प्रवेश करतो. अशा स्थित्यंतरांमुळे धीट मनुष्य गोंधळून जात नाही.

**तात्पर्य –** प्रत्येक जीव हा स्वतंत्र देहधारी आत्मा असल्यामुळे तो प्रत्येकक्षणी आपले शरीर बदलत असतो. या बदलामुळे तो कधी बालकाप्रमाणे कधी तरुणाप्रमाणे तर कधी म्हाताऱ्याप्रमाणे दिसून येतो. असे असले तरी तोच जीवात्मा तेथे असतो आणि त्याच्यामध्ये कोणताही बदल घडून येत नाही. अंतत: हा जीवात्मा मृत्यूनंतर शरीर बदलतो आणि दुसऱ्या शरीरात स्थानांतरीत होतो. जीवात्म्याला पुढच्या जन्मामध्ये आध्यात्मिक किंवा भौतिक शरीर मिळणार हे निश्चित आहे. 'धीट' किंवा ज्ञानी मनुष्य शरीराच्या स्थित्यंतरामुळे कधीच गोंधळून जात नाही.

जे असत् (भौतिक शरीर) आहे ते चिरकाल टिकू शकत नाही आणि जे सत् (जीवात्मा) आहे ते कधीच बदलत नाही.

**तात्पर्य –** परिवर्तनशील शरीर स्थायी नसते. आधुनिक विज्ञानाने मान्य केले आहे की, विविध प्रकारच्या पेशींच्या क्रिया व प्रतिक्रिया यामुळे क्षणोक्षणी शरीर बदलत असते आणि याप्रमाणे शरीरामध्ये वाढ होते आणि वृद्धत्व येते. पण शरीर आणि मनामध्ये जरी सर्व प्रकारचे बदल झाले तरी जीवात्मा नित्य स्थायी राहतो. पदार्थ आणि आत्मा यांमध्ये हाच भेद आहे. स्वभावतः शरीर नेहमी बदलत असते आणि आत्मा शाश्वत असतो. निर्विशेषवादी आणि सविशेषवादी या दोन्ही तत्त्वदर्शी पुरुषांनी हा निर्णय प्रस्थापित केला आहे.

जे संपूर्ण शरीराला व्यापून आहे ते अविनाशी आहे. त्या अविनाशी आत्म्याचा कोणीही नाश करू शकत नाही.

**तात्पर्य –** संपूर्ण शरीरात चैतन्य पसरलेले आहे हे कोणीही जाणू शकतो. शरीराला अंश किंवा पूर्णरूपाने होणाऱ्या सुखदुःखांची जाणीव प्रत्येकाला असते. हा चैतन्याचा प्रभाव प्रत्येकाच्या स्वतःच्या शरीरापुरताच मर्यादित असतो. एका शरीराच्या सुखदुःखाची जाणीव दुसऱ्या शरीराला होत नाही. म्हणून प्रत्येक शरीर हे एका व्यक्तिगत जीवाचे आच्छादन असते आणि जीवात्म्याच्या शरीरातील उपस्थितीचे लक्षण हे व्यक्तिगत चेतनेद्वारे कळून येते. या जीवाचे परिणाम केसाच्या वरच्या अग्राच्या एक दशसहस्त्रांशाइतके आहे असे सांगण्यात येते. याची पुष्टी श्वेताश्वतरोपनिषदात ५.९ करण्यात आली आहे.

ती अशी – ''केसाच्या वरच्या अग्राचे शंभर भागांमध्ये विभाजन केले आणि अशा प्रत्येक भागाचे पुन्हा शंभर भाग केले तर असा प्रत्येक भाग हा जीवाच्या आकाराचा परिणाम होईल.'' याच प्रकारचे प्रतिपादन पुढील श्लोकातही आढळते. ''आध्यात्मिक चित्कण संख्यातीत आहेत व त्यांचे परिमाण (आकार) हे केसाच्या अग्रभागाच्या एक दशसंहस्रांशाइतके आहे.''

म्हणून व्यक्तिगत आत्मारूपी चित्कण हा भौतिक अणुपेक्षाही सूक्ष्म आहे आणि असे असंख्य चित्कण आहेत. हे अतिसूक्ष्म आध्यात्मिक स्फुलिंग म्हणून भौतिक शरीराचे आधारभूत तत्त्व आहे आणि ज्याप्रमाणे एखाद्या औषधातील कार्यकारी तत्त्वाचा प्रभाव पूर्ण शरीरभर पसरतो. त्याचप्रमाणे या आध्यात्मिक स्फुलिंगाचा प्रभाव संपूर्ण शरीरभर पसरतो. जीवात्म्याचा हा ओघ संपूर्ण शरीरभर चेतनारूपाने अनुभवास येतो आणि हा अनुभव म्हणजेच जीवात्म्याच्या अस्तित्वाचा पुरावा आहे. चेतनाविरहित भौतिक शरीर म्हणजेच मृत शरीर हे कोणतीही सामान्य व्यक्ती समजू शकते आणि कोणत्याही भौतिक प्रक्रियेद्वारे या चेतनेचे शरीरामध्ये पुनरूत्थान करता येत नाही. म्हणून चेतना ही कोणत्याही भौतिक गोष्टीच्या संमिश्रणामुळे नसून आत्म्यामुळे असते. मुंडकोपनिषदामध्ये ३.१.९ आण्विक जीवात्म्याच्या परिणामासंबंधी अधिक विश्लेषण करण्यात आले आहे. ते असे – ''आत्म्याचा आकार परमाणुरूप आहे. आणि त्याला पूर्ण बुद्धीद्वारेच जाणता येते. हा परमाणुरूप, पाच प्रकारच्या प्राणांत (प्राण, अपान, व्यान, समान आणि उदान) तरंगणारा आत्मा हृदयात स्थित असतो आणि देहधारी जीवांच्या संपूर्ण शरीरावर त्याचा प्रभाव पसरलेला असतो. आत्मा पाच प्रकारच्या भौतिक प्राणांपासून पवित्र होतो तेव्हा त्याच्या आध्यात्मिक प्रभाव दृग्गोचर होतो.''

परमाणुरूप जीवात्म्याचा प्रभाव संपूर्ण शरीरभर पसरू शकतो. मुंडकोपनिषदाप्रमाणे हा अणुरूप आत्मा प्रत्येक जीवाच्या हृदयामध्ये स्थित आहे. या अणुरूप आत्म्याचे मोजमाप करणे हे भौतिक वैज्ञानिकांच्या ग्रहणशक्तीच्या पलीकडे आहे आणि यामुळेच ते मूर्खपणाने प्रतिपादन करतात की, आत्मा अस्तित्वातच नाही.

व्यक्तिगत अणुरूप आत्मा हा परमात्म्यासहित निश्चितपणे हृदयामध्ये आहे आणि म्हणूनच शारीरिक हालचालीसाठी लागणारी संपूर्ण शक्ती शरीराच्या या भागातूनच उत्सर्जित होते. फुफ्फुसातून प्राणवायू वाहून नेणाऱ्या पेशी आत्म्याकडून शक्ती प्राप्त करतात. जेव्हा जीवात्मा या ठिकाणाहून निघून जातो तेव्हा शरीरातील रक्तोत्पादनाचे कार्य थांबते. वैद्यकीय विज्ञान तांबड्या पेशींचे महत्त्व मान्य करते, पण शक्तीचे उगमस्थान हे आत्मा हे याबद्दल निश्चितपणे सांगू शकत नाहीत. तरीसुद्धा वैद्यकशास्त्र मान्य करते की, हृदय हे शरीरास आवश्यक शक्तीचे उगमस्थान आहे.

परमात्म्याचा अशा अणुरूप अंशाची तुलना सूर्यप्रकाशातील अणूंशी केली आहे. सूर्यप्रकाशामध्ये असंख्य तेजोमय अणू असतात. तसेच भगवंतांची अंशरूपे म्हणजे भगवंतांच्या किरणातील आण्विक स्फुल्लींग आहेत. यांना 'प्रभा' किंवा पराशक्ती म्हटले जाते. म्हणून कोणी वैदिक ज्ञानाचा पुरस्कर्ता असो अथवा आधुनिक विज्ञानाचा पुरस्कर्ता असो, तो शरीरातील आत्म्याचे अस्तित्व अमान्य करू शकत नाही.

अविनाशी, अमर्याद आणि शाश्वत जीवात्म्याच्या शरीराचा निश्चितपणे अंत होतो.

**तात्पर्य –** स्वभावत:च भौतिक शरीर नश्वर आहे. त्याचा नाश तात्काळ किंवा कालांतराने होतो. हा तर काळाचा प्रश्न आहे. या शरीराचे अनंतकाळासाठी पालन करण्याची शक्यताच नाही, परंतु जीवात्मा हा इतका सूक्ष्म आहे की तो शत्रूला दिसूही शकत नाही, मारला जाण्याचे तर दूरच. तो इतका सूक्ष्म आहे, की त्याच्या आकाराचे मोजमाप कसे करावे याबद्दल कोणालाही कल्पना नाही. परमात्म्याचा हा सूक्ष्म अंश जीवात्मा त्याच्या कर्मानुसार भौतिक शरीर प्राप्त करतो आणि म्हणून धार्मिक तत्त्वांचे पालन करणे आवश्यक आहे. वेदान्त सूत्रामध्ये जीवाला तेजोगुणी म्हटले आहे कारण तो परमश्रेष्ठ प्रकाशाचाच अंश आहे. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाश संपूर्ण सृष्टीचे पालनपोषण करतो त्याप्रमाणे जीवात्म्याचा प्रकाश या भौतिक शरीराचे पालनपोषण करतो. जीवात्म्याने भौतिक शरीराचा त्याग केल्यावर तात्काळ शरीर सडण्यास प्रारंभ होते. यावरून कळून येते की, जीवात्मा हाच या शरीराचे पालन करतो. केवळ शरीर हे महत्त्वपूर्ण नाही.

ज्याला वाटते की, जीवात्मा हा मारणारा आहे किंवा तो मारला जातो, तो अज्ञानात आहे कारण जीवात्मा मारीत नाही किंवा मारलाही जात नाही.

**तात्पर्य –** जेव्हा एखाद्या शरीरधारी जीवाला प्राणघातक शस्त्रांनी दुखापत केली जाते तेव्हा त्या शरीरातील आत्मा मारला जात नाही हे समजून घेतले पाहिजे. जीवात्मा हा अत्यंत सूक्ष्म असल्याने कोणत्याही भौतिक शस्त्राने त्याची हत्या करणे शक्य नाही, आणि त्याच्या आध्यात्मिक स्वरूपामुळे तो मारलाही जाऊ शकत नाही. ज्याची हत्या होते किंवा ज्याची हत्या झाली असे समजले जाते ते केवळ शरीरच असते. कोणाच्याही शरीराची अधिकाराविना हत्या करणे हे निंदनीय आहे तसेच ते राष्ट्राच्या आणि भगवंतांच्या दंडसंहितेनुसार निश्चितच दंडनीय आहे.

कोणत्याही काळी आत्म्यासाठी जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. त्याचा जन्म झाला होता असेही नाही, त्याचा जन्म होतो असेही नाही आणि त्याचा जन्म होणार आहे असेही नाही. तो अजन्मा, सनातन, नित्य अस्तित्वात असणारा आणि पुरातन आहे. शरीराचा नाश झाला तरी त्याचा नाश होत नाही.

**तात्पर्य** – गुणात्मकदृष्ट्या परमात्म्याचा सूक्ष्म अणुरूप अंश आणि परमात्मा एकरूप आहेत. शरीराप्रमाणे त्याच्यामध्ये काही बदल होत नाही. काहीवेळा आत्म्याला कूटस्थ किंवा स्थिर असे म्हटले जाते. शरीरामध्ये सहा प्रकारची स्थित्यंतरे होतात. शरीर मातेच्या गर्भातून जन्म घेते, काही काळासाठी राहते, त्याची वाढ होते, त्यापासून काही परिणाम उत्पन्न होतात, हळूहळू त्याची झीज होते आणि शेवटी लुप्त होते. परंतु आत्मा अशा परिवर्तनातून जात नाही. आत्म्याचा जन्म होत नसतो, परंतु तो एक भौतिक शरीर धारण करीत असल्यामुळे त्या शरीराचा जन्म होतो. त्याठिकाणी आत्मा जन्म घेत नाही आणि मरतही नाही. ज्याला जन्म आहे त्याला मृत्यू हा निश्चितपणे आहे आणि आत्म्याला जन्म नसल्यामुळे त्याला भूत, वर्तमान आणि भविष्यही नाही. आत्मा हा सनातन, नित्य अस्तित्वात असणारा आणि पुरातन अर्थात् ज्याचा जन्म झाला आहे अशी इतिहासातही नोंद नाही. शरीराच्या प्रभावाखाली आपण आत्म्याच्या जन्माचा इतिहास वगैरे शोधत असतो. शरीराप्रमाणे कोणत्याही काळी आत्मा वृद्ध होत नाही म्हणूनच तथाकथित वृद्ध मनुष्याला बालपणातील किंवा तारुण्यातील चैतन्य आपल्यातही आढळून येते. शरीरातील होणाऱ्या बदलांचा आत्म्यावर काहीही परिणाम होत नाही. वृक्ष किंवा इतर कोणतीही भौतिक गोष्ट ज्याप्रमाणे क्षीण होते त्याप्रमाणे आत्मा क्षीण होत नाही. आत्म्यापासून इतर उपफळेही निर्माण होत नाहीत. शरीरापासून उत्पन्न होणारी उपफळे म्हणजे मुलेबाळे आहेत व ती म्हणजे विविध स्वतंत्र जीवात्मेच असतात आणि केवळ शरीराच्या प्रभावामुळेच ती विशिष्ट मनुष्याची आहेत असे वाटतात. आत्म्याच्या उपस्थितीमुळे शरीराची वाढ होते, पण आत्म्याला उपफले नसतात किंवा त्याच्यामध्ये स्थित्यंतरही होत नाही. म्हणून आत्मा हा सहा प्रकारच्या शारीरिक स्थित्यंतरांच्या पलीकडे असतो.

कठोपनिषदाच्या १.२.१८ या श्लोकानुसार आत्मा हा पूर्ण ज्ञानमय आणि नित्य पूर्ण चेतनेने युक्त असतो. म्हणून चेतना हे आत्म्याचे लक्षण आहे. हृदयस्थ आत्म्याला जरी कोणी शोधू शकत नसला तरी तो आत्म्याची उपस्थिती केवळ चेतनेच्या उपस्थितीवरूनही जाणू शकतो. कधीकधी आकाशातील ढगामुळे किंवा इतर काही कारणास्तव आपल्याला सूर्य दिसू शकत नाही. तरीही सूर्याचा प्रकाश त्याठिकाणी नेहमी असतो आणि आपली खात्री होते की, ही दिवसाची वेळ आहे. अगदी पहाटे थोडासा प्रकाश जरी आकाशात दिसला तरी सूर्य आकाशात आहे असे आपण समजू शकतो. त्याप्रमाणे सर्व शरीरामध्ये मग तो मानव असो अथवा पशू असो सर्वांमध्ये चेतना ही असतेच आणि यावरून आपण आत्म्याची उपस्थिती जाणू शकतो. तरीही आत्म्याची ही चेतना परमात्म्याच्या चेतनेहून भिन्न आहे कारण परमात्म्याला भूत, वर्तमान आणि भविष्य या सर्वांचे पूर्ण ज्ञान असते. व्यक्तिगत जीवात्म्याच्या चेतनेचा, विस्मरणशील होण्याकडे कल असतो.

आत्म्याचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे सूक्ष्म अणूरूप आत्मा आणि दुसरा म्हणजे परमात्मा किंवा विभुआत्मा. याची सुद्धा कठोपनिषदात १.२.२० पुष्टी करण्यात आली आहे.

''परमात्मा आणि जीवात्मा दोघेही जीवाच्या एकाच वृक्षरूपी शरीरामधील हृदयामध्ये स्थित आहेत. जो भौतिक इच्छा व शोक यांमधून मुक्त झाला आहे केवळ तोच भगवद्कृपेने आत्म्याचा महिमा जाणू शकतो.''

आत्मा हा अविनाशी, शाश्वत, अजन्मा आणि अव्ययी आहे. ज्याप्रमाणे मनुष्य जुन्या वस्त्रांचा त्याग करून नवीन वस्त्रे धारण करतो त्याप्रमाणे आत्माही जुन्या आणि निरूपयोगी शरीराचा त्याग करून भौतिक शरीर धारण करतो. या आत्म्याचे कोणत्याही शस्त्राद्वारे तुकडे करता येत नाहीत, अग्नीद्वारे त्याला जाळता येत नाही,

पाण्याद्वारे त्याला भिजविता येत नाही तसेच वाऱ्याने त्याला सुकविताही येत नाही. यासंबंधी भगवद्गीतेचे श्लोक बघण्यासारखे आहेत –

**अध्याय : २** *''वासांसि जीर्णानि यथा विहाय*
*नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।*
*तथा शरीराणि विहाय जीर्णान्य –*
*न्यानि संयाति नवानि देही ।।२२।।*
*नैनं छिदन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।*
*न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारूतः ।।२३।।''*

**तात्पर्य –** अणुरूप आत्म्यांकडून होणारे शरीराचे स्थानांतर हे एक स्वीकृत तथ्य आहे. आधुनिक वैज्ञानिकांचा आत्म्याच्या अस्तित्वावर विश्वास नाही तसेच त्यांना हृदयातून उगम होणाऱ्या शक्तीचे स्पष्टीकरणही देता येत नाही. पण अशा वैज्ञानिकांनासुद्धा शरीरात होणारे बदल, जे बाल्यावस्थेतून कौमार्यावस्था आणि कौमार्यावस्थेतून तारुण्यावस्था आणि पुन्हा तारुण्यावस्थेतून वार्धक्यावस्था अशा विविध अवस्थांमधून दिसून येतात ते मान्य करावेच लागतात. वृद्धावस्थेतून जो बदल होतो तो दुसऱ्या शरीरात संक्रमित होतो.

अणुरूप जीवात्म्याचे दुसऱ्या शरीरात होणारे संक्रमण हे परमात्म्याच्या कृपेमुळे शक्य होते. ज्याप्रमाणे एखादा मित्र दुसऱ्या मित्राची इच्छापूर्ती करतो त्याचप्रमाणे परमात्माही अणुरूप आत्म्याची इच्छापूर्ती करतो. मुंडकोपनिषद तसेच श्वेताश्वतरोपनिषद यांसारख्या वैदिक साहित्यात आत्मा आणि परमात्मा यांची तुलना ही एकाच वृक्षावर बसलेल्या दोन मित्र पक्ष्यांबरोबर करण्यात आली आहे. त्यांपैकी एक पक्षी (अणुरूप जीवात्मा) वृक्षाची फळे खात आहे आणि दुसरा पक्षी (परमात्मा) आपल्या मित्राकडे केवळ पाहात आहे. गुणात्मदृष्ट्या एकच असणाऱ्या या दोन पक्ष्यांपैकी एक पक्षी भौतिक वृक्षाच्या फळांनी मोहित होतो तर दुसरा पक्षी आपल्या मित्राच्या हालचालींचा केवळ साक्षी आहे. परमात्मा हा पाहणारा साक्षी पक्षी आहे आणि जीवात्मा हा फळे चाखणारा पक्षी आहे. जरी ते मित्र असले तरी त्यांमधील एकजण स्वामी आहे आणि दुसरा सेवक आहे. आत्म्याचे या संबंधाबद्दल किंवा नात्याबद्दल होणारे विस्मरण हे त्याच्या एका वृक्षावरून दुसऱ्या वृक्षावर किंवा एका शरीरामधून दुसऱ्या शरीरामध्ये होणाऱ्या स्थानांतरास कारणीभूत ठरते. जीवात्मा भौतिक शरीररूपी वृक्षावर अव्यंत संघर्ष करीत असतो. ज्याक्षणी एक पक्षी दुसऱ्या पक्षाचा परमश्रेष्ठ आध्यात्मिक गुरू म्हणून स्वीकार करतो तत्क्षणी तो कनिष्ठ किंवा गौण पक्षी सर्व प्रकारच्या शोकातून मुक्त होतो. मुंडकोपनिषद ३.१.२ आणि श्वेताश्वतोपनिषद ४.७ दोन्हीही या विधानाला पुष्टी देतात.

''जरी दोन पक्षी एकाच वृक्षावर असले तरी झाडाची फळे चाखणारा पक्षी चिंता आणि खिन्नता यांनी पूर्णपणे ग्रस्त झालेला असतो. परंतु कोणत्याही रीतीने त्याच्या मित्राकडे, म्हणजेच भगवंतांकडे तो ज्याक्षणी पाहतो आणि त्याची महानता जाणतो तत्क्षणी तो दुःखग्रस्त झालेला पक्षी सर्व चिंतांतून मुक्त होतो.''

**तात्पर्य –** अग्निशस्त्रे, जलास्त्रे (वरूणास्त्रे) आणि पवनास्त्रे व इतर सर्व प्रकारची अस्त्रे जीवात्म्याला मारण्यात असमर्थ आहेत. आत्म्याचे कापून तुकडे करता येत नाहीत तसेच विविध प्रकारच्या कितीही आधुनिक शस्त्रांद्वारे त्याचा संहारही होऊ शकत नाही. व्यक्तिगत जीवात्म्याचे मूळ परमात्म्यापासून तुकडे करून त्यांना

अलग करणे शक्य नाही, खरे तर व्यक्तिगत जीवात्मे हे परमात्म्यापासून नित्यच वेगळे असलेले अंश आहेत. जीवात्मे हे सनातन अणुरूप अंश असल्यामुळे ते मायाशक्तीने प्रभावित होणे साहजिकच आहे. ज्याप्रमाणे अग्नीच्या ठिणग्या गुणात्मदृष्ट्या अग्नीप्रमाणेच असल्या तरी अग्नीपासून अलग झाल्यावर विझतात तसे जीवात्मेही भगवंतांच्या सान्निध्यातून विभक्त होतात. मायेतून मुक्त झाल्यानंतरही जीवात्म्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व हे टिकून राहते.

हा आत्मा अविद्राव्य व न तुटणारा आहे. त्याला सुकवणे किंवा जाळणेही शक्य नाही. हा नेहमी टिकणारा, सर्वव्यापी, अपरिवर्तनीय, निश्चल आणि नित्य सारखाच राहणारा आहे.

**तात्पर्य –** अणुरूप आत्म्याचे हे सर्व गुणधर्म निश्चितपणे सिद्ध करतात की जीवात्मा हा परमात्म्याचा नित्य अणुरूप अंश असतो आणि त्यात काहीही बदल न होता तो नित्य अणुरूप अंशच राहतो. याबाबतीत अद्वैत सिद्धांत लागू करणे फार कठीण आहे. कारण स्वतंत्र जीवात्मा कधीच एकजिनसी होऊ शकत नाही. भौतिक दोषांपासून मुक्त झाल्यावर अनुरूप आत्मा भगवंतांच्या दिव्य तेजोमय किरणांमध्ये आध्यात्मिक स्फुलिंग म्हणून राहू शकतो. परंतु जे बुद्धिमान जीवात्मे असतात ते भगवंतांच्या सान्निध्यात राहण्यासाठी आध्यात्मिक लोकांमध्ये प्रवेश करतात.

'सर्वव्यापी' हा शब्द महत्त्वपूर्ण आहे. कारण भगवंतांच्या संपूर्ण सृष्टीमध्ये जीवात्मे आहेत. ही गोष्ट नि:संशय आहे. ते भूमीवर, पाण्यामध्ये, हवेमध्ये, पृथ्वीच्या पोटात आणि अग्नीमध्येही राहतात. अग्नीमध्ये जीवात्म्यांचे निर्जिविकरण होते हा सिद्धांत मान्य करता येत नाही. या ठिकाणी स्पष्टपणे सांगण्यात आले आहे की, आत्मा हा अग्नीद्वारे जाळला जात नाही. म्हणून ही गोष्ट नि:संशय आहे की, सूर्यग्रहावरही तेथे राहण्यास योग्य अशी शरीरे असलेले जीवात्मे आहेत. जर सूर्यगोलावर वस्ती नसती तर 'सर्वव्यापी' हा शब्द अर्थहीन झाला असता.

हा आत्मा अदृश्य, कल्पनातीत आणि अपरिवर्तनीय आहे. हे जाणून शरीराबद्दल शोक करू नये.

**तात्पर्य –** भौतिकदृष्टीने जीवात्मा अत्यंत सूक्ष्म असल्यामुळे त्याला अव्यक्त म्हटले जाते. आत्म्याचे अस्तित्व हे अनुभवगम्य सत्य असले तरी आत्म्याचे अस्तित्व जाणण्याचे इतर कोणतेही साधन नाही. अशा अनेक गोष्टी आहेत की ज्या आपल्याला केवळ श्रेष्ठ प्रमाणांच्या आधारावर मान्य कराव्या लागतात. पित्याची ओळख ही मातेच्या प्रमाणाशिवाय अन्य कोणत्याही मार्गाने होऊ शकत नाही हे प्रत्येकाला मान्य करावेच लागेल. आत्म्याला मानवीय प्रायोगिक ज्ञानाद्वारे जाणणे अशक्यप्राय आहे. आत्मा म्हणजेच चेतना आणि चेतना आहे व हे वैदिक विधान असल्यामुळे आपण मान्य केलेच पाहिजे. शरीरामध्ये ज्याप्रमाणे स्थित्यंतरे आढळतात तशी आत्म्यामध्ये आढळून येत नाहीत. आत्मा हा नित्य अपरिवर्तनीय असल्यामुळे तो अमर्यादित परमात्म्याच्या तुलनेत सूक्ष्म अणुरूपच राहतो. परमात्मा हा अमर्यादित अनंत आहे तर आत्मा हा मर्यादित सूक्ष्मरूप आहे.

समस्त जीव प्रारंभी अव्यक्त असतात, मध्यावस्थेत व्यक्त असतात आणि विनाशानंतर पुन्हा अव्यक्त होतात.

**तात्पर्य –** आत्म्याचे स्वतंत्र अस्तित्व सोडले तर भौतिक तत्त्वे ही सृष्टीच्या निर्मितीपूर्वी अप्रकट राहतात.

ज्याप्रमाणे आकाशातून वायू उत्पन्न होतो, वायूपासून अग्नी, अग्नीपासून जल आणि जलापासून पृथ्वी उत्पन्न होते तसे अव्यक्ताच्या या सूक्ष्मावस्थेतून व्यक्त अवस्था उत्पन्न होते. पृथ्वीपासून विविध प्रकारचे प्रकटीकरण होते. उदा. पृथ्वीपासून प्रकट झालेली गगनचुंबी इमारत जेव्हा ती कोसळविली जाते तेव्हा तिची प्रकटावस्था पुन्हा अप्रकट होते आणि सरतेशेवटी तिचे रूपांतर कणांमध्ये होते. शक्तीच्या अविनाशत्वाचा नियम (लॉ ऑफ कॉन्झर्वेशन ऑफ एनर्जी) कायम राहतो, पण कालगतीला अनुसरून पदार्थ प्रकट होतात आणि अप्रकट होतात हा फरक आहे.

कालांतराने हे भौतिक शरीर नष्ट होते, पण आत्मा हा सनातन आहे. शरीर हे एखाद्या वस्त्राप्रमाणे आहे. सनातन आत्म्याच्या अस्तित्वाचा विचार केला तर या भौतिक शरीराला वास्तविक अस्तित्वच नाही. हे एका वस्त्राप्रमाणे आहे. मनुष्याचा विश्वास आत्म्याच्या अस्तित्वावर असो वा नसो, शरीराच्या विनाशाबद्दल शोक करण्याचे काहीच कारण नाही.

कोणी या आत्म्याकडे विस्मयकारक म्हणून पाहतात, कोणी याचे वर्णन अद्‌भुत म्हणून करतात, कोणी याच्याबद्दल आश्चर्यकारक म्हणून ऐकतात. परंतु दुसरे असे आहेत की, जे त्याच्याबद्दल ऐकल्यावरही त्याला मुळीच जाणू शकत नाहीत.

**तात्पर्य –** एका महाकाय जनावराच्या शरीरात, एखाद्या प्रचंड वटवृक्षात आणि एक इंच जागेत असणाऱ्या कोट्यवधी जीवजंतूंमध्येही आत्मा असणे ही गोष्ट निश्चितच आश्चर्यकारक आहे. अल्पज्ञ आणि अतपस्वी लोक अणुरूप आध्यात्मिक स्फुलिंगाचे विस्मयकारक गुण समजू शकत नाहीत. पदार्थाबद्दल स्थूल जडवादी संकल्पनेमुळे या युगातील बहुतेक लोक, हा सूक्ष्म कण एकाच वेळी महान आणि सूक्ष्म कसा असू शकतो हे समजू शकत नाहीत. वास्तविक आत्म्याच्या स्वरूपामुळे किंवा वर्णनामुळे लोक त्याच्याकडे आश्चर्यकारक म्हणून पाहतात. जीवनार्थ संघर्षामध्ये आत्मज्ञानविरहित सर्व कार्ये व्यर्थ ठरतात ही वस्तुस्थिती आहे. भौतिक दुःखांतून सुटण्यासाठी मनुष्याने आत्म्याचा विचार करणे आवश्यक आहे याची कदाचित लोकांना कल्पनाही नाही.

या देहामध्ये जो वास करतो त्याचा कधीच वध होऊ शकत नाही.

**तात्पर्य –** आत्मा हा अमर आहे आणि शरीर हे क्षणिक आहे. भौतिक शरीराहूनही भिन्न असा आत्मा असतो. असे नाही की, आत्मा नावाची गोष्टच अस्तित्वात नाही. आत्मा देहाची धारणा करतो.

### घ) स्वतंत्र, समाधानी आणि प्रसन्न आत्मा

सूक्ष्म शरीरातील सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे 'आत्मा'. जड शरीराला चैतन्य लाभते ते आत्म्यामुळेच. बाकीची सगळी तत्त्वे म्हणजे बुद्धी, मन, अहंकार, इंद्रिये वगैरे आत्म्याच्या पाठोपाठ येत असतात. आत्म्यापाशी कर्म, ज्ञान, आणि प्रेम अशी साधने आहेत, जे त्याला परमात्म्यापर्यंत पोहोचविणारी असतात. आत्म्याचे स्वरूप समजण्यासाठी त्याचे 'परमात्मा' व 'जीवात्मा' असे दोन भाग पाडले आहेत. परमात्मा एक असून सर्व विश्वाला व्यापून राहणारा आहे व तो सर्वज्ञ म्हणजे सर्व सूक्ष्मातील सूक्ष्म गोष्टी ज्ञात असणारा आहे. या परमात्म्याला 'अनादी' म्हटलेले आहे. अनादी म्हणजे याच्या अगोदर काहीही अस्तित्वात नव्हते.

परमात्मा अनादी असून त्याला कारणीभूत कोणीही नाही. तो नित्य म्हणजे सदैव अस्तित्व असणारा आहे. जेव्हा सृष्टीची उत्पत्ती होते, तेव्हा तो 'व्यक्त' म्हणजे प्रकट होतो आणि प्रलय अर्थात् विश्वाच्या नाशानंतर 'अव्यक्त' होतो, मात्र तो कधीही नष्ट पावत नाही. कारण तो नित्य आहे. कोणत्या ना कोणत्या स्थितीत तो अस्तित्वात असतो.

**आत्म्याच्या अस्तित्वाची लक्षणे** – हाच परमात्मा जेव्हा निरनिराळ्या शरीरात व्यक्त होतो, तेव्हा त्याला 'भूतात्मा' किंवा 'जीवात्मा' ही संज्ञा मिळते. आत्म्याच्या अस्तित्वाची म्हणजे जिवंतपणाची शरीरावर दिसणारी लक्षणे पुढीलप्रमाणे दिली आहेत –

प्राण व अपानची गती चालू राहणे, डोळ्यांची उघडझाप वगैरे क्रिया चालू राहणे, मन कार्यरत राहणे, मनाने इंद्रियांना काम करण्याची प्रेरणा देणे, इंद्रियांचे नियमन करणे, सूक्ष्म शरीराने प्रवास करता येणे ही आत्मा शरीरात असण्याची म्हणजे चैतन्याची लक्षणे आहेत. तसेच इच्छा, द्वेष, सुख, दुःख, प्रयत्न, चेतना, धारणाशक्ती, बुद्धी, स्मरणशक्ती, अहंकार या गोष्टी सुद्धा आत्मा आहे, तोपर्यंतच अनुभवता येतात.

परमात्मा हा सुख, दुःख, वेदना वगैरे भावांच्या पलीकडचा असतो. जोपर्यंत तो पंचमहाभूतांनी बांधला जात नाही, तोपर्यंत स्वतंत्र असतो. मात्र शरीरात जीवात्मा म्हणून आला, की तो वेदना–हर्ष, सुख–दुःख वगैरे सर्व भावभावना अनुभवतो.

**परमात्मा एक, परंतु...** – म्हणजेच परमात्मा एकच असला तरी प्रत्येक शरीरानुसार जीवात्मा हा निरनिराळा असतो व आपापल्या कर्मानुसार चांगल्या वाईट योनीत जन्म घेतो. अर्थात मनुष्य म्हणून जन्माला येणे किंवा प्राणी जन्माला येणे, एवढेच नाही, तर रावाच्या घरी जन्म घेणे किंवा रंकाच्या घरी जन्म घेणे या सर्व गोष्टी आत्म्याच्या चांगल्या–वाईट कर्मफलावर अवलंबून असतात. स्वतः आत्माच आपल्या कर्मानुसार सर्व उच्च वा नीच योनीमध्ये प्राणाशी संयुक्त होऊन शरीर धारण करतो. अन्य कोणीही यावर नियंत्रण ठेवू शकत नाही. पूर्वजन्माची फळे म्हणत असताना माता–पिता, आजी–आजोबा व एकंदरच वंशपरंपरागत सर्वांची शरीरप्रकृती, तसेच त्यांचे अनुभव, त्यांची वागणूक, त्यांच्या मनाची जडणघडण याचा गर्भावर पूर्ण परिणाम होत असतो. त्यामळे येणाऱ्या जिवाला अनुकूल असे वातावरण ज्या ठिकाणी असेल, त्या ठिकाणी तो जीव गर्भात प्रवेश करून जन्म घेतो.

### जैसे ज्याचे कर्म, तैसे फल

आत्मा हा कार्य करण्यास स्वतंत्र असतो. अर्थात चांगल्या गोष्टी करायच्या, का वाईट गोष्टी करायच्या हे आत्मा मनाकरवी साध्य करू शकतो. पण शेवटी कोणत्याही कर्मांच्या परिणामांना तोही बांधलेलाच असतो. म्हणजेच चांगल्या गोष्टींच्या चांगल्या परिणामांचे फळ चांगले मिळते, शुभ गोष्टी घडतात, तर वाईट गोष्टींचे वाईट परिणाम होऊन अशुभ फल मिळते. हा नियम कोणीही मोडू शकत नाही.

आत्म्याच्या सर्वात जवळचा संबंध आहे मनाशी. मन एकटे अचेतन आणि यत्किंचितही ज्ञान नसलेले आहे. पण इंद्रियांकरवी, बुद्धी अहंकारादी तत्त्वांच्या सांगण्यावरून काम करण्यास समर्थ आहे. मात्र तेव्हाच, जेव्हा त्याला आत्म्याचा चैतन्यस्पर्श लाभेल, आत्म्याशिवाय मन काहीही करू शकत नाही. त्यामुळेच

मनाकरवी क्रिया घडली तरी तिचा कर्ता आत्माच असतो आणि त्या क्रियेचे बरे-वाईट फळ भोगणाराही आत्माच असतो. म्हणूनच तपस्या, ध्यान-धारणा वगैरे क्रियांनी मन समाधिस्थ झाले, होणारी सर्व बरी-वाईट कामे बंद झाली की ओघानेच आत्म्यालाही त्या कार्याचे परिणाम भोगावे लागत नाहीत. आत्म्याने सर्व इच्छांचा, कर्मांचा त्याग केला की 'मोक्षप्राप्ती' अर्थात जन्म-मरणाच्या चक्रातून सुटका होते व तो 'जीवात्मा' न राहता 'परमात्म्या'त विलीन होतो.

### च) आत्म्याचे स्वरूप

शैवमताच्या छटेनुसार आत्म्याचे स्वरूप संक्षिप्तपणे असे निर्दिष्ट करता येऊ शकते - आत्मा म्हणजे देह नव्हे, मन नव्हे, बुद्धी नव्हे, यमनियम नव्हे, योगसिद्धीही नव्हे, योगसामर्थ्यपण नव्हे. मात्र आत्मा ही माया नाही, मनोभ्रम नाही. त्याला काही लोक शिव म्हणतात. तर काही त्याला शक्ती हे नाव देतात. तो अजय आहे, तो तेजोमय आहे, जसा दिवसाचा सूर्य आणि रात्रीचा चंद्र. तो सत्-चित्-आनंदस्वरूप आहे. तो अणुरेणूत वास करीत असतो. तो मनातील द्वैतभाव नाहीसे करतो. त्याचे कारण तो सत् आहे. तो अभावरूपी वस्तूंना अस्तित्व व चेतना देतो.

वेदांतदेशिक वा वेंकटनाथ यांच्या 'रहस्यत्रयसार' व 'शतदूषणी' या ग्रंथांमध्ये जीवात्म्याच्या स्वरूपाबद्दल चर्चा आहे. तदनुसार आत्म्याचे पुढीलप्रमाणे स्वरूप स्पष्ट होते -

'जीवात्मा आणि ब्रह्म यांचे एकरूपत्व आहे व आत्मा एकच आहे.' या अद्वैती मताचे वेदान्तदेशिक खंडन करतात. आपल्या प्रत्यक्ष अनुभवाच्या विरुद्ध हे अद्वैती सिद्धांत आहेत व त्यांना श्रुतींचा आधार नाही. 'अहम' शब्दाने निर्देशिलेला जीवात्माच होय. प्रत्येक व्यक्तिव्यक्तीत तो वेगवेगळा आहे व तो ब्रह्माशी संबद्ध असला तरी एकरूप नाही, असे वेदांतदेशिक म्हणतात. विशिष्टाद्वैताने मानलेले चित्ततत्त्व म्हणजे आत्मा. तो शरीर, इंद्रिये, मन, प्राण व बुद्धी यांहून वेगळा आहे. त्याचा सारभूत गुण ज्ञान व आनंद आहे. तो नित्य, अणू, इंद्रिये, मन, प्राण व बुद्धी यांहून वेगळा आहे. त्याचा सारभूत गुण ज्ञान व आनंद आहे. तो नित्य, अणू, इंद्रियांना अगोचर, अविभाज्य व निरवयव आहे. तो स्वत: ज्ञानस्वरूप असून ज्ञान हा त्याचा गुणही आहे. त्याला 'धर्मभूतज्ञान' म्हणतात. आत्मा स्वसंवित् असून त्याला सुखदु:खे शरीरसंयोगाने येतात. शरीरसंयोग अनादि-कर्मामुळे येतो. धर्मभूतज्ञानाचा संकोच व विकास होऊ शकत असल्यामुळे, शरीरभर त्याचा विस्तार होऊ शकतो आणि शरीरांतील कोणत्याही भागांतील सुखदु:खाची त्याला जाणीव होते. आपल्याला ज्ञान आहे, अशी आपली जाणीव असते म्हणून आपणच ज्ञात नव्हे. आत्मा हा ज्ञाता, कर्ता व भोक्ता आहे, पण ईश्वराधीन आहे. जीवाचे अस्तित्व ईश्वराच्या स्वरूपावर व संकल्पावर अवलंबून आहे. जीवात्मे अनेक आहेत आणि त्यांचे बद्ध, मुक्त व नित्य असे प्रकार आहेत. बद्ध म्हणजे संसारी आत्मे, मुक्त म्हणजे मुक्ती मिळालेले व नित्य म्हणजे कधीच संसारात न पडलेले. जीवात्म्याबद्दल ईश्वराला अनुकंपा असून तो मोक्षोपाय आहे.

## २) पाश्चात्य तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे विवेचन[६१]

### आत्मवाद

प्राचीन मानवाची अशी श्रद्धा होती की, प्रत्येक मनुष्याच्या जीवनव्यापाराचे नियंत्रण करणारी एक शक्ती त्या त्या मनुष्याच्या ठिकाणी असते. ही शक्ती म्हणजे स्थूल दृष्टीस दिसणाऱ्या त्या व्यक्तीचेच एक सूक्ष्म रूप होय व मृत्युसमयी ती देहाला सोडून जाते अशी कल्पना होती. व्यक्तीच्या अंतर्यामी असणाऱ्या प्रतिव्यक्तीची ही कल्पना म्हणजे मानवेतिहासातील **आत्मा** या संकल्पनेची सुरुवात होय.

### आत्मा ही संकल्पना

या संकल्पनेला काही तार्किक कार्य आहे. व्यक्तीचे अनुभव प्रवाही असतात. निरनिराळ्या इच्छा, आकांक्षा, स्मृती, संवेदना या एकमेकांचा पाठलाग करीत असतात. अशी परिवर्तने घडत असली तरी व्यक्ती ही तीच राहते. व्यक्तीच्या परिवर्तनशील अनुभूतीच्या बुडाशी काही स्थिर तत्त्व असले पाहिजे अशी आपल्या बुद्धीची धारणा असते. त्या नित्य तत्त्वाचा निर्देश **आत्मा** या संकल्पनेने होतो. अनुभवांचे तादात्म्य संपादण्यास आत्मकल्पनेचा जसा उपयोग होतो तसेच व्यक्तीच्या अनुभवाची एकता उत्पन्न करण्याचे कार्यही त्याच्याने होते. अनुभव बहुमुखी असतो. पाहणे आणि ऐकणे, आवडणे आणि आश्चर्य वाटणे अशा तऱ्हेने एकाच क्षणी अनेक अनुभव येतात, पण अनुभव घेणारा एकच असतो. अनेक अनुभवांत अनुस्यूत असणारी ही एकताही **आत्मा** या संकल्पनेने व्यक्त केली आहे.

### मन व आत्मा

जिच्या माध्यमाने मनन, चिंतन इत्यादी क्रिया संपन्न केल्या जातात, त्यास **मन** असे म्हणतात – 'मन्यते अनेन इति मन:।' संकल्प-विकल्पाचे शक्तिशाली साधन असल्या कारणाने मनाची कोणत्याही साधनेमध्ये एक आवश्यक भूमिका राहिली आहे आणि येथपर्यंत म्हटले गेले आहे की मानवाचे बंधन आणि मोक्षाचे एकमात्र कारण मनच आहे. शंकराचार्य त्यालाच विश्व-विजयी मानतात ज्याने आपल्या मनास जिंकले असेल. मनास जिंकणे हे खरोखर अत्यंत कठीण असे कर्म आहे. उपनिषदांमध्ये मनाच्या स्वरूपाविषयी सविस्तर वर्णन आढळून येते. कठोपनिषद १.३.३ मध्ये मनास अश्वरूपी इंद्रियांना नियंत्रित करण्याची वल्गा म्हटले गेले आहे. गीता ६.३४ मध्ये मनात अत्यंत चपळ, शक्तिशाली, दृढ आणि मंथन करणारा असे सांगितले गेले आहे. आणि त्याला वश करणे वायूस वश करण्यासारखे अत्यंत अशक्य कर्म मानले गेले आहे.

मनाच्या वृत्ती दोन प्रकारच्या असतात. प्रथम मलिनवृत्ती आणि दुसरी शुद्ध वृत्ती. मनाच्या मलिन वृत्तीमुळे द्वैत-प्रतीति, विश्वाभास आणि देहादिकाची संज्ञा-स्फूर्ती होते आणि तिचे निराकरण दुसऱ्या वृत्तीच्या आविर्भावामुळे होते. मनाचे स्वरूपाकार बनणेच तिची शुद्ध वृत्ती आहे. मनोलय (मन आणि इंद्रियांना अंतर्मुख करणे) शिवाय तत्त्व-प्राप्ती दुर्लभ असते. याच कारणामुळे प्राय: सर्व संतांनी मनास शांत व निश्चल करण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. त्यांनी मनाच्या दमनासाठी मनोमारण क्रियांद्वारे मानसिक शुद्धीवर भर दिला आहे.

स्वतंत्रचेतन तत्त्व आत्म्याचे अस्तित्व, देहचैतन्यवादी चार्वाकाखेरीज सर्व भारतीय दर्शनांनी स्वीकारले आहे व आत्मा आणि मन या दोहोंत भेद केला आहे. मन नामक काही द्रव्य नसून विज्ञान वेदना संज्ञा व संस्कार यांचा संघात म्हणजेच 'मन' होय असे म्हणणारे बौद्धदर्शन सोडल्यास इतरांनी मनाचे द्रव्यत्व स्वीकारून त्यास

अचेतन द्रव्यात समाविष्ट केले आहे. जैन दर्शन मनाचा समावेश पुद्गलांत करते न्यायवैशेषिकांनी ते जड म्हणून वर्णिले आहे. सांख्यांनी मनास अचेतन प्रकृतीचा विकार अथवा सर्जन मानले आहे. मात्र हे द्रव्य इतर जड द्रव्यापेक्षा आत्म्यास जवळचे व त्याच्याशी संयोग पावू शकणारे आहे, असे न्यायवैशेषिकांनी म्हटले आहे. सांख्ययोगदर्शनाने ही मनाची उत्पत्ती प्रकृतीच्या 'प्रकाशक' अशा सत्त्व गुणाचे अधिक्य असलेल्या उत्क्रांतीमुळे झाली, असे म्हटले आहे. वेदांतमतानुसारही मन (अंत:करण) हे तेजस् - तत्त्वप्रधान आहे न्यायवैशेषिकमतानुसार मन हे विभु न मानता परमाणुरूप मानले पाहिजे, कारण जर हे विभू असते तर आत्म्याचा व मनाचा सतत संयोग राहून जागृतावस्था कायमची राहिली असती, आणि मनाचा सर्व इंद्रियांशी एकसमयावच्छेदेकरून संयोग होऊन, एकाच वेळी अनेक वस्तूंचे ज्ञान झाले असते.

ज्ञान व सुखदु:खादींच्या उपलब्धीचे साधन मन हेच आहे. अवधान हे त्याचे मूलभूत कार्य आहे. तेच मनाचे व्यवच्छेदक लक्षण होय, असे शंकराचार्य सांगतात. आत्म्याचा मनाशी व मनाचा विषयाशी संनिकर्ष पावलेल्या इंद्रियांशी संयोग झाला की इंद्रिय प्रत्यक्ष ज्ञान होते. सुखदु:खात्मक अनुभव येतो, राग, द्वेष व इच्छा मनोव्यापारमूलक होत. मन हे ज्ञानेंद्रिय व कर्मेंद्रियही (उभयात्मक) आहे.

आत्मा स्वयंप्रकाश्य आणि एकरस आहे, परंतु कोणते ना कोणते तरी संकल्प करून इतस्तत: विचरण करणारे तेच मन असते. देह, इंद्रिय, जगत् आणि घट-पटादीमध्ये मनामुळेच कारण भेद-कल्पनेचे उत्थान-पतन होत राहते. वस्तुत: आत्मा तर आकाशाप्रमाणे निर्विकल्प, निश्चल, नित्य, शुद्ध आणि सर्वसाक्षी आहे, परंतु अशा आत्म्यामध्ये द्वैत भावनेची निर्मिती मनच करतो.

**आत्मानुभव**

आत्मा ही निव्वळ तार्किक कल्पना आहे की, त्याचा अनुभवही येतो, असा एक प्रश्न उत्पन्न होतो. बौद्धांचे आणि डेव्हिड ह्यूमचे म्हणणे होते की, आत्मा या पदार्थाचा अनुभव येतच नाही. चित्तात कितीही डोकावून पाहिले तरी केवळ चित्तवृत्तीच दिसतात, 'मी' असा सापडतच नाही. सुख वा दु:ख, हर्ष वा शोक, पीतवर्ण अथवा नीलवर्ण असे प्रत्यय एकसारखे येत राहतात, पण 'मी' असा प्रत्यय काही येत नाही. म्हणून 'मी' अथवा आत्मा हा पदार्थच नाही.

मग माझे प्रत्यय आणि इतरांचे प्रत्यय ही वर्गवारी होते तरी कशी? नदीवर अंघोळीस गेल्यावर माणसे चुकून एकमेकांचे कपडे बदलतील तसे एकमेकांचे प्रत्यय कधी बदलतील काय? अमुक एक अनुभव माझा की दुसऱ्याचा याविषयी कधी संभ्रम निर्माण होईल काय? काल रात्री विजेचा खटका दाबून जो मी झोपलो तोच मी आज सकाळी जांभई देत उठलो असा तादात्म्य प्रत्यय कसा येतो? अशा प्रश्नांना ह्यूमकडून उत्तर येईल की, मागच्या क्षणाचा प्रत्यय हा पुढच्या क्षणाच्या प्रत्ययाचा कारण असतो. तसेच ते दोन प्रत्यय कालिकदृष्ट्या संनिध असून सदृशही असतात. त्यामुळे आपण त्यांचा एक वर्ग करतो आणि भ्रमाने त्या सर्वांच्या बुडाशी 'मी' नावाचा स्थिर पदार्थ आहे अशी कल्पना करतो.

आत्मनिरीक्षण करून जाणिवेच्या प्रवाहाकडे पाहिल्यास ह्यूमने केलेले विश्लेषण प्रत्येकाला पटेलच असे नाही. जेव्हा मला कशाचेही भान होते तेव्हा ते भान माझे आहे असेही भान होते तेव्हा ते नुसत्या दु:खाचे नसते तर माझ्या दु:खाचे असते. 'मी सुखी आहे', 'मी अपमानित आहे' अशा प्रकारच्या ज्ञानात 'अहं' अथवा 'मी'

चा प्रत्यय येतो असे म्हणता येईल.

ज्याचा अनुभव येतो अशा या 'मी' ला आत्मा म्हणण्याऐवजी 'जीव' अथवा 'जीवात्मा' म्हणावे असे आत्मवादी सुचवील. जीव हा दु:खाने व्याकूळ होतो, सुखाने फुलून जातो. 'अहं' या रीतीने त्याचा प्रत्यय येतो. किंबहुना, शरीर, गृह, वित्त, दारा, पुत्र, कीर्ती इत्यादी ज्या ज्या गोष्टींना 'माझे' असे म्हणतो त्या सर्वांचा समावेश या 'मी' मध्ये होतो. हा 'मी' ज्ञानाचा विषय असतो.

**आत्म–विज्ञान**

ज्याला त्याचे ज्ञान होते तो आत्मा. तो ज्ञानविषय नव्हे. तो केवळ ज्ञाता. 'मी कपटी आहे', असे जो जाणतो तोही 'मी' च होय. पण कपटी असणारा 'मी' व त्याला जाणणारा 'मी' हे एक नव्हेत. जाणणारा मी म्हणजे आत्मा अथवा विज्ञान त्याला ज्ञानाचा विषय या रीतीने जाणता येत नाही. 'विज्ञानारम् अरे केन विजानीयात्?'

तो ज्ञानविषय नसल्याने त्याच्या स्वरूपास उपाधी नाही. अमक्याहून लहान, तमक्याहून मोठा अशी इयत्ता त्याला नाही. इथे आहे आणि तिथे नाही अशी देशमर्यादा त्याला घालता येणार नाही. आज आहे, काल होता अशी कालिक उपाधीही त्याला चिकटविता येणार नाही.

**आत्म्याचे स्वयंप्रकाशत्व**

हा निरूपाधिक आत्मा ज्ञानविषय म्हणून जाणता आला नाही तरी त्याचे अस्तित्व संशयास्पद नाही. कारण तो स्वसंवेद्य अथवा स्वयंप्रकाश आहे. स्वयंप्रकाश आहे याचा अर्थ त्याचे अस्तित्व सिद्ध करण्याची आवश्यकता नाही, आणि शक्यताही नाही. याच्याउलट तिजोरीत सोन्याची चीप आहे असे सिद्ध करावयाचे असेल तर तिचे कोणाला तरी ज्ञान झाले पाहिजे. तिच्या अस्तित्वाची सिद्धी ज्ञानाधीन आहे. ते अस्तित्व स्वप्रतिष्ठ नाही. 'तेथे सोन्याची चीप नाही' असे होऊ शकते. पण 'मी नाही' असे म्हटले तरी म्हणणारा उरतोच. नाही असे म्हणत असतानाच तो भासतो. त्याचे हे भासणे म्हणजेच असणे. 'मी आहे' यातील मी हे व्याकरणाच्या सोयीसाठी आले आहे. ते काढून टाकल्यावर जे निव्वळ 'आहे' उरते ते आत्म्याचे स्वयंप्रकाशत्व. आत्म्याचे अस्तित्व स्वप्रतिष्ठित आहे. सोन्याच्या चिपेच्या अस्तित्वाचा प्रकार याहून निराळा. तिच्याहून अन्य असलेल्या ज्ञात्याला तिचे भान होणे हे तिच्या अस्तित्वसिद्धीला आवश्यक आहे. सोन्याची चीप दृश्य आहे. आत्मा दृक आहे. दृकदृश्यासंबंधात दृश्याचे अस्तित्व दृक–अधीन आहे. दृकचे अस्तित्व स्वयंसिद्ध आहे. 'चिंतयामि अत: अस्मि' या आपल्या प्रतिपादनात देकार्तने वास्तविक स्वयंप्रकाश आत्मतत्त्वाची सिद्धी केली होती. त्याला मात्र आपण सोपाधिक 'मी' चे अथवा जीवात्म्याचे अस्तित्व सिद्ध केले असे वाटते.

**चिद्‌विलासवाद**

विश्वांतील नाना पदार्थ हे दृश्य आहेत, ते ज्ञानविषय आहेत. अर्थात् त्यांचे अस्तित्व आत्म्यावर अवलंबून आहे. आत्मा आहे म्हणून ते आहेत. हा आत्मा नसता तर – जगदंधकार प्रसंग :। या मताचे नाव आत्मवाद. आत्मवादाचे विश्व झिडकारले पाहिजे असे नाही. विश्वात जे जे आहे त्याचा उगम स्वयंप्रकाश आत्मतत्त्वात आहे एवढेच आत्मवाद म्हणेल. अशेष विश्व हे आत्मतत्त्वाचा विलास आहे (जग त्याची वस्तुप्रभा) असे सांगणारा ज्ञानेश्वरांच्या चिदविलासावाद ही आत्मवादाचीच मांडणी होय.

**बर्क्लेचा चिद्वाद**

बर्क्लेच्या चिद्वादाशी आत्मवादाची तुलना करता येईल. त्याच्या मते जे जे अस्तित्वात आहे ते प्रत्ययरूपच असले पाहिजे. आता, जे माझे प्रत्यय नव्हेत असे कितीतरी पदार्थ अस्तित्वात आहेत हे कोणासही मान्य करावे लागेल. म्हणून त्यांना प्रत्ययत्व येण्यासाठी बर्क्ले परामात्म्याकडे धाव घेतो व सृष्टीतील सर्व पदार्थ त्याचे प्रत्यय म्हणूनच अस्तित्वात आहेत असे सांगतो. याच्याउलट वर सांगितलेल्या आत्मवादात आत्म्याच्या स्वसंवेद्य अस्तित्वाशी सुरुवात करून त्याच्यावर दृश्य पदार्थांची (अथवा बर्क्लेच्या प्रत्ययाची) प्रतिष्ठा केली जाते.

'आत्मवाद' याचे आणखीही दोन अर्थ होऊ शकतात – १) व्यक्तीच्या अंतर्यामी जसा आत्मा आहे, तसा सृष्टीच्या अंतर्यामीही आत्मतत्त्व आहे असा सृष्टीकडे पाहण्याचा उपनिषदांचा दृष्टिकोन आहे. व्यक्तीचा आत्मा आणि सृष्टीच्या बुडाशी असलेले आत्मतत्त्व ही एकरूपच आहेत या उपनिषद विचाराला **आत्मवाद** म्हणण्याचा प्रघात आहे. तथापि, 'आत्मन' हा शब्द एक कर्तृत्ववाचक सर्वनाम असल्याने, त्या शब्दाने, विविध स्तरांची अथवा कोशांची एक रचना या स्वरूपातील मानवी व्यक्तित्वाचा निर्देश होतो असे दिसते. अशा रचनेच्या विश्लेषणाला स्थूल देहापासून (अन्नमय कोश) प्रारंभ करून क्रमश: विविध अंत:स्थ कोशांमधून प्रगत होत, तिच्या आनंदमय अधिष्ठानापर्यंत जाणे अशक्य आहे. हे कार्यापासून अंत:स्थ कारणाकडे जाणारे, स्थूलापासून सूक्ष्माकडे जाणारे, बाह्यांगाकडून अंतरंगाकडे जाणारे, कनिष्ठ स्तराकडून श्रेष्ठ स्तराकडे जाणारे, अधिष्ठिनाकडून अधिष्ठानभूत नियंत्रकाकडे जाणारे, बाह्य आविष्काराकडून त्याच्या अंत:स्थ बीजाकडे अथवा भूमीकडे जाणारे एक मूल्यमापक विश्लेषण, ज्याला विवेक म्हणता येईल ते होय. यातील मूल्यमापन ज्या सिद्धांतानुसार होते तो सिध्दांत असा की, जे सूक्ष्मतर, अंत:स्थ, व्यापक, अंत:प्रेरक अथवा संक्षेपत: 'प्रत्यगात्मा' आहे ते अधिक सत्तान्वित, अधिकांश सत्य, नित्य आणि अविकारी असे आहे. उपनिषदांनी असा 'विवेक' म्हणजे मूल्यात्मक विश्लेषण विचार केलेला असून, त्याच्या आधारे, आत्म्याच्या अनेक पर्यायी मालिका मांडल्या आहेत. उदाहरणार्थ, 'ह्या अखिल विश्वाचे वस्त्र कोणत्या धाग्यांनी विणलेले आहे?' या गार्गीच्या प्रश्नाला दिलेल्या उत्तरामध्ये पृथ्वी, जल, वायू, आकाश इत्यादीपासून ब्रह्मलोक आाणि ईश्वराचे अनिर्वचनीय स्वरूप येथपर्यंतच्या विश्वव्यापी तत्त्वांची मालिका मांडलेली आहे. (बृहदारण्यक उपनिषद ३.६) नंतर ३.७ मध्ये याज्ञवल्क्याने अंतर्यामी, अमृत, पृथ्वी, जल इत्यादींमध्ये वास करणारा, त्यांहून भिन्न, त्यांना अज्ञात असलेला, त्याचे नियंत्रण करणारा प्रत्यगात्मा आहे असा उदात्त उपदेश केला आहे. कठोपनिषदामध्ये ३.१०.११ इंद्रियगोचर वस्तू, मन, बुद्धी, महदात्मा, अव्यक्त, पुरुष अशी एक सांख्यपूर्व तत्त्वमालिका मांडून दाखविलेली आढळते. शंकराचार्यांनी या तत्त्वमालिकेचे विवरण करताना म्हटले आहे की, या मालिकेतील प्रत्येक उत्तरपद 'पूर्वपदाचा 'प्रत्यगात्मा' असल्याने, ते पूर्वपदाहून श्रेष्ठत्वर, सूक्ष्मतर महत्तर आहे.' 'पुरुष' ही या परंपरेची 'अत्युच्च सीमा, सूक्ष्मतत्त्व, महत्त्व आणि प्रत्यगात्मत्व यांच्या परमोत्कर्षाची आणि पर्यवसानाची अंतिम अवस्था होय.' या प्रकारच्या तत्त्वमालिकांच्या मांडणीमध्ये प्रथमत: कनिष्ठ आत्म्याची एक श्रेणी मांडलेली असून, नंतर एका परमात्मतत्त्वाचे (परमात्मा) प्रतिपादन केले आहे. हे परमात्मतत्त्व म्हणजे परब्रह्मच होय असे म्हटले आहे. ज्याला अन्यत्र 'जीवात्मा' असे नाव दिले आहे. त्या महदात्म्यालाही अनेक ठिकाणी इतर तत्त्वांच्या तुलनेने, महत्त्वाचे स्थान दिलेले दिसते.

२) ज्या विविध अनुभूती आपणास एकसारख्या येत राहतात त्यांना स्वत:च्या साक्षित्वाने एकत्र करणारा व स्थिर रूपाने त्यांच्या बुडाशी राहणारा आत्मा नावाचा पदार्थ निश्चितपणे आहे या मतासही 'आत्मवाद' म्हणता येईल. असे स्थिर तत्त्व न मानणे हा 'अनात्मवाद' आत्मा मनात अनेक कल्पना आणू शकतो किंवा त्या बदलू शकतो. म्हणून क्रियाशीलता हे आत्म्याचे वैशिष्ट्य आहे. भावना किंवा विचार मनाखेरीज राहू शकत नाहीत. प्रत्येक अनुभव ज्ञात्यापाशी येऊन थडकतो हे सर्वजण मान्य करतील. हे विश्व, आत्मे व त्यांच्या कल्पना यांनी बनलेले आहे.

**सेंट ऑगस्टीन याचे आत्माविषयक विचार**

''ईश्वर व आत्मा यांचे सम्यक ज्ञान मी मिळवू इच्छितो'' ही अंतर्गत जाणीव म्हणजेच बुद्धी. स्वत्वाची ओळख हेच तिचे पहिले कार्य होय. याप्रमाणे आत्मा स्वत:च्याच प्रेरणेने व स्वत:च्याच क्रियांच्यामार्फत स्वत:ची ओळख पटवून घेतो. ''आत्मा, त्याने मिळविलेले स्वत:च्या स्वरूपाचे ज्ञान व त्याची स्वत:वरची प्रीति – ह्या तीन गोष्टींनीच आत्मैक्य सिद्ध होते'' ''बुद्धी हा 'आत्म्याचा नेत्र' व 'ज्ञानाचे तत्त्व' असून तिच्याच साहाय्याने आत्मा पाहतो व अंतर्ज्ञान प्राप्त करून घेतो. विचार करणे म्हणजे मुख्यत: स्वस्वरूपाबद्दल व आत्मविस्मृतीबद्दलचा विचार करणे असते. आत्म्याच्या पलीकडे असणाऱ्या विश्वातील सर्वव्यापी तत्त्वांवर आत्म्याचे विचार केंद्रित होतात व त्यामुळे त्या विचारांनाही प्रेरणा मिळते व प्रकाश मिळतो. ह्यामुळेच आत्म्याच्या ठिकाणी अशी एक स्वाभाविक इच्छा निर्माण होते की, जी त्याला सतत परमात्म्याच्या शाश्वत व स्वयंप्रकटित स्वरूपाकडे (लोगोसकडे – शब्दब्रह्माकडे) आकृष्ट करते.

'दैवी प्रेरणाच मनुष्याच्या आत्म्याला व बुद्धीला चालना देते', ही कल्पनाच ऑगस्टीनच्या तत्त्वज्ञानाचे वैशिष्ट्य आहे. ऑगस्टीननंतर झालेले ख्रिस्ती तत्त्ववेत्ते याच मताला चिकटून राहिले व त्यालाच त्यांनी अधिक सुसंस्कृत रूप दिले. इंद्रियांवर अवलंबून असणाऱ्या आत्मा सभोवारच्या विषयांच्या जंजाळात कधीकधी स्वत:लाच विसरून जातो, परंतु त्याला पुन्हा स्वत:च्या अस्तित्वाची, व अंत:स्थ गुरूची आठवण होते. याच आठवणीला 'आत्म्याची चिरंतन वर्तमानाची स्मृती' म्हणता येईल.

अंतर्गत आत्म्याच्या कल्पनेतच ईश्वराचे अस्तित्व अभिप्रेत असते. आत्म्याला निश्चितच काही सत्याचे ज्ञान झालेले असते. (उदा. संशयवादाचे खंडन) या आत्म्याला अंतिम सत्य हे आपल्यापेक्षा श्रेष्ठ व अधिक व्यापक आहे असा अनुभव येतो. बुद्धीला तेजोमय करणारे सत्य संपूर्ण सत्यच असले पाहिजे व संपूर्ण सत्य म्हणजेच अपरिहार्य शाश्वत व अविकार्य असा परमात्माच, म्हणून ईश्वर आहेच असे असूनसुद्धा मानवी जीवनात ईश्वराच्या सत्य स्वरूपाचा जीवाला साक्षात्कार होत नाही. आत्म्याला ईश्वराची अभावत्वाने म्हणजे 'नेति नेति' अशीच ओळख होते. ईश्वर हा व्यक्तित्वाचा व सत्याचा, तसेच सौंदर्य–प्रेम–आनंद यांचे परमोच्च स्वरूप, परंतु असंकीर्ण व निर्गुण असतो, एवढीच जाणीव आत्म्याला होते. ईश्वरासंबंधी ही जाणीव म्हणजेच विकारी आत्म्याला प्रकाश व शक्ती देणाऱ्या विश्वांतील विश्वनिर्मात्याची आत्म्याला पटलेली ओळखच होय. विकारी आत्मा अविकारी परमात्म्यापासून (आदिकारणापासून) भिन्न भावाने राहूच शकणार नाही. विश्वातील भूतमात्रांच्या (आत्म्यांच्या) बदलत्या स्वरूपाच्या आधारानेच ऑगस्टीन ह्याने ईश्वराचे अस्तित्व सिद्ध केले आहे.

मानव म्हणजे निव्वळ आत्मा नव्हे, तर तो आत्म्याने सचेतन केलेले शरीर धारण करणारा प्राणी होय. आत्मा चैतन्यस्वरूप असल्यामुळे तो मानवाचे शरीर व्यापून राहतो. ''मनुष्य हा विचारशक्ती असलेला मर्त्य प्राणी आहे.'' मानव, हा आत्मा व शरीर यांचा संयोग असलेला बुद्धियुक्त प्राणी आहे.'' आत्म्याला स्वतःची जाणीव असते, यावरूनच तो चैतन्य व अमर असला पाहिजे. आत्मा प्राण्यांप्रमाणे आईबापांच्या पोटी जन्मलेला नसतो, किंवा पदार्थाशी त्याचा संयोग होण्यापूर्वी त्याची निर्मिती होऊन तो अस्तित्वात नसतो, तर देहाची (गर्भरूपाने) निर्मिती होतानाच त्या देहाच्या आनुवंशिक गुणलक्षणांसह ईश्वरच त्याची निर्मिती करतो.

**ऑटो रूडॉल्फ याचे आत्म्यासंबंधी मत**

आत्म्याची स्वायत्तता व त्याची धार्मिक क्षमता या ऑटोच्या दृष्टीने फार महत्त्वाच्या आहेत. आत्मा स्वायत्त आहे ह्याचा अर्थ ऑटोच्या मते असा आहे की, निसर्गनियमांहून त्याचे नियम मूलतःच वेगळे असतात. ते वर्णनात्मक नसून 'आदेशक' असतात व ते आत्म्याच्या स्वतःच्या स्वरूपावरून घडत असतात आणि तो आपल्या मूलभूत प्रेरणेप्रमाणे व स्वरूपाप्रमाणे वाढत असतो. तो विशद करून सांगता येत नाही, व त्याच्या वर्तनाचे पूर्वकथनही करता येत नाही, असे ऑटोचे म्हणणे आहे.

**डायोनिशियस याचे आत्म्याविषयक मत**

बायबलात सांगितल्याप्रमाणे 'ईश्वरनिर्मित, परंतु अशरीरी अगर चिन्मय आत्म्याच्या म्हणजेच देवदूतांच्या उच्च-नीच श्रेणी असतात,' असे मत डायोनिशियसने प्रस्थापित केले. ईश्वर हे सर्वश्रेष्ठ तत्त्व आहे. निर्माता या नात्याने तो सर्व सृष्ट वस्तूंमध्ये वास करतो, परंतु तो सर्वांच्या अतीत असतो. विधी व निषेधरूप मार्ग हे गूढ ईश्वरवादाप्रत नेतात. हा 'गूढ ईश्वरवाद' आत्म्याच्या विरक्तपणास शुद्ध करणारी अशी परिसीमा असून, ईश्वरी कृपेने संवर्धित व समुन्नत झालेल्या त्याच्या प्रज्ञान-विज्ञानाचे ते फळ आहे.

ज्ञानेंद्रिये व बुद्धी कुंठित झाल्यावर, ईश्वरी कृपाप्रसादाने आत्म्याची उन्नती होत जाते व त्याला ईश्वरी स्वरूपाच्या परमोच्च रहस्याची प्राप्ती होते. हा मानवी प्रयत्नांचा विजय नसतो, तर ही केवळ ईश्वरी देणगी असते. हा एक अनन्यसाधारण अनुभव असतो व तो शब्दांनी व्यक्त करता येत नाही.

**डिमॉक्रिटसचे आत्मासंबंधी मत**

डिमॉक्रिटसच्या मते, गणिती नियमांनुसार चालणाऱ्या परमाणूंच्या गतियंत्रणेमुळे विश्वाची रचना झाली आहे. अणू व पोकळी हेच विश्वाचे गुणधर्म आहेत. विश्वासंबंधी जे खरे तेच मानवी, तसेच दैवी आत्म्याबद्दल खरे आहे. इतर सर्व वस्तूंप्रमाणे आत्मा हा अणूंनी बनलेला आहे. तो अत्यंत मुलायम, गोल, चपल व ज्वलंत अणूंचा बनलेला असतो. ते अणू सर्व शरीरभर पसरलेले असतात व दोन स्थूल अणूत एक सूक्ष्म अणू असतो. वेगवेगळ्या अवयवांत त्यांची वेगवेगळी कार्ये असतात. शिर हे बुद्धीचे अधिष्ठान आहे, हृदय हे क्रोधाचे व यकृत वासनेचे आहे. शिणामुळे लुप्त झालेल्या अणूंची जागा भरून काढण्याकरिता देह जोवर श्वासावाटे अणू ओढून घेऊ शकतो तोपर्यंत आत्मा टिकून राहतो.

**प्लेटोप्रणीत आत्म्याचे अमरत्व**

प्लेटोने आत्म्याच्या अमरत्वाचे तीन युक्तिवाद दिले आहेत –

१) आत्म्यात काही 'आयडिआ' (सारतत्त्व) सुप्त असतात. तेव्हा या जगातील वास्तव्याआधी त्याला पूर्वास्तित्व असून, तेव्हा त्याला आयडिआंचे दर्शन होत असले पाहिजे. या युक्तिवादावरून पूर्वजन्म सिद्ध

होतो. जगाची प्रक्रिया परस्परविरुद्धांच्या परिवर्तनाने चालू असते, म्हणून पूर्वजन्मानंतर हा जन्म आला तसा यानंतर दुसरे जीवन असणारच. एरवी सर्व जीवनाचा अंत होऊन मृत विश्व शिल्लक राहील.

२) विनाश म्हणजे संकीर्णाचे सरलात रूपांतर. जे सरल आहे ते अविभाज्य व म्हणून अविनाशी आहे. आत्माही आयडिआप्रमाणे तसाच आहे, अर्थात् तो अविनाशी आहे, पण येथे आत्म्याचे अविभाज्यत्व ठळकपणे मांडण्यापेक्षा प्लेटोला आत्म्याचा दैवी स्वभाव सांगायचा होता, असे टेलर म्हणतो.

सिमिअस व सिबिस पूर्वजन्म मानतात, पण अमरत्व मानत नाहीत. सिमिअस म्हणतो – वीणेत जसे संगीत तसा शरीरात आत्मा असतो. वीणा फुटली की संगीत विरते म्हणून, शरीराबरोबर आत्माही नाश पावेल. सॉक्रेटीस म्हणतो की, पूर्वजन्म मानल्यावर अमरत्व न मानणे स्वतःच्या मनाशीच विसंगत आहे. शिवाय वीणेतील संगीताप्रमाणे आत्मा हा शरीराचा परिणाम नसून कारण आहे. अर्थातच आत्माच आधी असतो, तेव्हा वीणेचे उदाहरणच चुकीचे आहे. सिबिस म्हणतो की, आत्मा शरीराचा परिणाम नसून तोच ते निर्माण करतो, असे मानले तरी सध्याचे हे शरीर शेवटचेच नाही कशावरून? शरीरे निर्माण करण्याची आत्म्याची शक्ती दिवसेदिवस कमी होत जाऊन संपणार नाही काय? या आक्षेपाच्या बुडाशी अर्वाचीन कालातील उपोत्पादवाद व विश्वाबद्दलचे यंत्रवादी तत्त्वज्ञान आहे. याअन्वये शरीराला दिशा दाखविता दाखविता मनाची शक्ती संपून जाईल, पण निसर्गातील कोणतीच गोष्ट यंत्रवादाने पूर्ण स्पष्ट होत नाही, असे सॉक्रेटीसला सांगावयाचे आहे. हा युक्तिवाद चालू असताना नैसर्गिक शास्त्रांत विशेष गती नाही, म्हणून दुसरी पद्धती शोधली पाहिजे, असे सॉक्रेटीस म्हणतो. ही शोधलेली पद्धती गणितात्मक व नैगमनिक आहे. शास्त्रीयपद्धती म्हणून येथे आयडिआंचा सिद्धांत मांडला आहे. वेदन सोडून जो नित्य अशा आयडिआंचा अवलंब करतो, त्याला त्या प्रत्येक क्षणी अमृतत्वाची प्रचीती येते.

३) तिसऱ्या युक्तिवादात आयडिआंचे अस्तित्व गृहीत धरले आहे. सारभूत गुणावरून वस्तूचा स्वभाव सांगितला आहे. जीवनात आयडिआचा अंश असल्याने त्यात मृत्यूची आयडिआ कधीच प्रवेश करणार नाही, कारण जीवन व मृत्यू या व्याघाती आयडिआ असून परस्पर–व्यावर्तक आहेत, युक्तिवादांचे तात्पर्य नैतिक आहे. आत्मा अमर नसेल तर दुष्टांचे पाप मृत्यूबरोबर संपुष्टात येईल, व सज्जनांच्या सत्कर्माचे फल मिळण्याचे राहून जाईल. हे अयोग्य होय. आत्मा अमर आहे व म्हणून प्रत्येकाला पापपुण्याचे गाठोडे जन्मोजन्मी वागवावे लागते, तेव्हा सद्वर्तन श्रेयस्कर आहे. ऐहिक जीवन व संपत्ती कुचकामाची आहेत. खऱ्या अमरतेसाठी आत्मकल्याणच साधले पाहिजे. हा प्रयोजनवादी दृष्टिकोनच वस्तूंचे खरे उपपादन देऊ शकेल.

मृत्यूत्तर जीव परलोकास जाऊन आपल्या कर्मांची फळे भोगतो. दुष्कर्म करणारे रौरवास जातात व सत्कर्म करणारे इहलोकाच्या कारागृहातून सुटून स्वर्गास जातात. ज्यांची अंतःकरणे तत्त्वज्ञानाने निर्मळ झाली आहेत, असे आत्मे अशरीरी अवस्थेत अखंडानंदाचा उपभोग घेतात. हे फल विलोभनीय आहे व ते मिळवण्यासाठी मनुष्याची आशा दुर्दम्य आहे. अशारीतीने मृत्यूच्या वेळेस ईश्वरी राज्यात जाण्याच्या कल्पनेने सर्वोत्कृष्ट गाणाऱ्या हंसाप्रमाणे सॉक्रेटीस अमरत्वाचे अखेरचे श्रुतिमनोहर गीत ऐकवून जातो.

प्लेटोने आत्म्यामध्ये बौद्धिक व अबौद्धिक असे भाग कल्पिले असून अबौद्धिक भागात ऊर्जा (उफाळणारे तत्त्व) व क्षुधा (शारीरिक गरजा) यांचा समावेश केला आहे. त्या–त्या भागाचे कार्य उत्तम तऱ्हेने चालणे म्हणजे

एकेक सद्‌गुण अंगी असणे, असे तो म्हणतो. क्षुधेचे कार्य नीट चाखणे म्हणजे संयम हा गुण, ऊर्जेचा गुण धैर्य व बौद्धिक भागाचा सुज्ञता हा सद्‌गुण आहे. या सर्वांचे कार्य नीटपणे चालले की, आणखी एक सदगुण येतो – तो म्हणजे सुसंवाद म्हणजेच न्याय. संयम, धैर्य, सुज्ञता व न्याय हे मुख्य सद्‌गुण असून न्याय हा चरम सद्‌गुण आहे. एकसूत्रता व सुसंवाद यावर प्लेटोचा फार भर असून, आत्म्याच्या या विभाजनाशी त्याचे राज्य शास्त्रीय सिद्धांत निगडित आहेत. ज्या व्यक्तीच्या सर्व कार्यात एकसूत्रता नाही, तिला त्याने लोकशाही छाप माणूस म्हटले आहे व लोकशाहीबद्दलची नापसंती व्यक्त केली आहे.

**हेनरिश रिकर्टचे आत्माविषयक मत**

रिकर्टने 'मूल्य ठरविणारा आत्मा' ह्या संकल्पनेचा पुरस्कार करून मूल्यांच्या जगाचा वास्तव जगाशी समन्वय करण्याचा प्रयत्न केला आहे. आत्म्याच्या जिवंत अनुभवातच वास्तव व मूल्य ह्यांचा समन्वय होत असतो. हा समन्वय निरूपाधिक (ॲब्सोल्यूट) किंवा अंतिम (अल्टिमेट) असा असत नाही, म्हणून आत्मा व विषय ह्यांना सर्वोच्च एकतेत जोडण्याची कामगिरी अजून शिल्लक राहतेच. ह्याच्यासाठी रिकर्टने पूर्णविश्वाच्या कल्पनेचा पुरस्कार केला आहे. ह्या कल्पनेमुळे द्वैतवाद बराचसा नाहीसा होतो व त्याऐवजी अद्वैताचा दृष्टिकोन निर्माण होतो. कारण तिच्यात वास्तव, मूल्य व मूल्य ठरविणारा आत्मा ह्या तिघांचे दृढ संघटन होते. पूर्व-विश्वाची कल्पना ही मूल्यांचे आधारभूत तत्त्व नव्हे.

**सेंट हिक्टरचा रिचर्ड याचे आत्म्यासंबंधी मत**

मन आणि आत्मा ह्या भिन्न प्रकारच्या श्रेणी आहेत, असे रिचर्डने प्रतिपादिले आहे. मनामध्ये ज्ञानेंद्रिये, कल्पनाशक्ती व विवेकबुद्धी अशा तीन प्रकारच्या शक्ती आहेत. ह्या शक्तींच्या क्रियांचा त्याने सविस्तर ऊहापोह केला आहे. आत्म्यामध्ये मननशील बुद्धी व स्वतंत्र इच्छाशक्ती यांचा अंतर्भाव होतो, आणि स्वतंत्र इच्छाशक्ती ही (स्वत: निवडलेल्या गोष्टींवर) प्रेम करण्याची शक्ती असते. ईशकृपेने प्रभावित झालेल्या मननशील बुद्धीला अगोचर अशा दैवी शक्तींचा प्रत्यक्ष अस्तित्वात असल्याप्रमाणे साक्षात्कार होऊ शकतो. हा अनुभव तीन टप्प्यांनी किंवा प्रकारांनी प्राप्त होतो. पहिला टप्पा चिंतन, दुसरा मनन व तिसरा शुद्ध ध्यान. या अनुभवाची परिणती भक्तीमध्ये– ईशप्रेमामध्ये होते. हे प्रेम म्हणजेच साक्षात् अनुभविलेल्या ईशस्वरूपाला आत्म्याची होणारी संपूर्ण शरणागति होय.

**रूसो जे.जे. याचे आत्म्यासंबंधी विचार**

विश्वातील सुसंबद्धता व एकता, विश्वनिर्मात्या ईश्वराचा चतुरपणा प्रतिबिंबित करतात. बुद्धीपेक्षा भावनेने सृष्टीची अंतिम कोंडी अधिक उलगडतात. ईश्वराने निर्माण केलेल्या व्यवस्थेशी एकरूप होणे हेच माणसाचे श्रेयस. स्वातंत्र्यामुळे आपल्याला आत्म्याच्या चितस्वरूपाची खात्री पटते. आत्मा अमर आहे. ईश्वराला पुरतेपणी समजणे अशक्य आहे, पण त्याच्याबद्दलची खात्री पुरेशी आहे. ईश्वराने मनुष्याला श्रेयस समजण्यासाठी बुद्धी, निवडण्यासाठी स्वातंत्र्य व त्यावर प्रेम करण्यासाठी सद्सद्भावना अस्खलनशील असून तीच उत्तम मार्गदर्शक आहे.

## ३) आत्मा – भारतीय व पाश्चात्य दृष्टिकोन (संमिश्र विवेचन)[६२]

### जीवात्मन् (जीव)

आत्मा हे जीवनाचे अंतर्यामी तत्त्व आहे, हे सर्वमान्य आहे. ते वनस्पतिरूप (वृक्षांमध्ये), प्राणरूप (पशूंमध्ये) किंवा बुद्धिरूप (मानवांमध्ये) असू शकते. सर्वचिद्वादी (उदा. जैन) असे प्रतिपादन करतात की, खनिज पदार्थांमध्येदेखील आत्मे असतात.

### आत्म्याचे स्वरूप

प्रारंभी आत्मा हा 'प्राण' ह्याजीवन–चिन्हाशी एकरूप मानला गेला, (प्राण, आत्मा – असा ऋग्वेदामध्ये केवळ चार (४) वेळा निर्देश आहे) किंवा अणूंच्या संघातासारखे एखादे भौतिक तत्त्व (डेमॉक्रिटस, एपिक्युरस) किंवा सूक्ष्म तेज (स्टोइक) म्हणून गणला गेला. हॉब्स, लापेट्री आणि इतर जडवादी तत्त्वज्ञांनी ह्या विचारप्रवृत्तीचा मागोवा घेत, आत्मा ही बोधघटनांची एकता, अथवा एक उद्भावी घटना किंवा उपघटना मानली. पुढे ह्या विचारपरंपरेतील काहींनी आत्मा हे केवळ कल्पित मानले (बौद्ध आणि ह्यूम) सर्वसाधारणपणे, तो आध्यात्मिक (किमान मानवांमध्ये तरी) म्हणजे बौद्धिक ज्ञान आणि स्वतंत्र अध्यवसाय या स्वरूपाचा मानला जातो. सॉक्रेटीसने ही आध्यात्मिकता मुख्यता नैतिक कारणांच्या आधारे प्रतिपादन केली. प्लेटो, ॲरिस्टॉटल, प्लॉटिनस आणि ख्रिश्चन विचारवंतानी त्या कल्पनेचा विस्तार केला. भारतामध्ये उपनिषदांपासून ते दर्शनांपर्यंत आत्म्याच्या कल्पनेचा अशाच प्रकारे विकास झाला. प्लेटोने आत्मा स्वभावतःच शुद्ध आध्यात्मिक स्वरूपाचा मानला आणि अस्वाभाविकतः शुद्ध आध्यात्मिक स्वरूपाचा मानला आणि अस्वाभाविकतः यदृच्छ्या आत्म्याचा एका जन्मपरंपरेमध्ये शरीराशी संबंध येतो असे मानले. देकार्त, मालब्रांश, स्पिनोझा (विचार आणि विस्तार ह्या पर्यायांचा समान्तरवाद), लायब्निझ (चिदणूंचा पूर्वप्रस्थापित सुसंवाद) ह्यांनी आत्मा आणि शरीर याविषयीचा हा द्वैतवादी सिद्धांत पुढे चालू ठेवला. ॲरिस्टॉटलने आत्मा हा जिवंत शरीरातील 'आकार किंवा 'क्रिया' (कार्यशक्ती) आहे असे मानले. असे असल्यामुळे मानवी आत्मा मूल द्रव्याला प्रत्यक्षपणे साकार करतो आणि ही दोन सहतत्त्वे मिळून एक शरीर–चेतन द्रव्य तयार होते. हे द्रव्य म्हणजेच मनुष्य या स्वरूपातील पूर्ण व्यक्ती किंवा जीवात्मा होय. सेंट टॉमस ॲक्वायनसने ह्या कल्पनेचा विस्तार केला आहे आणि पुढे तो विचार कॅथॉलिक तत्त्वज्ञानाचा मध्यवर्ती सिद्धांत बनला. त्याच्यापूर्वी सेंट ऑगस्टीनने फक्त आत्मा आणि शरीर ह्यांच्या स्वाभाविक संयोगाचा उल्लेख केला होता. या कल्पनेचे काही प्रमाणात एन. हार्टमन आणि जी. मार्सेल यांनी पुनःप्रतिपादन केले. प्लॉटिनसला मानवी आत्म्याचे कनिष्ठ (सायकी) आणि श्रेष्ठ (चिद्‌बीज) असे दोन भाग मानणे अवश्य वाटले. ह्यामुळेच ॲरिस्टॉटलवादी तत्त्वज्ञ चिद्‌बीजाचा एक स्वतंत्र वैश्विक 'क्रियाशील बुद्धितत्त्व' म्हणून विचार करण्यास प्रवृत्त झाले. (अलेक्झांडर ऑफ ॲफ्रोडिसियस, ॲव्हिसेना, ॲव्हेरूस) ॲक्वायनस आणि आर. बेकन यांना श्रेष्ठ क्रियाशील बुद्धीची गरज पटली आणि ह्या क्रियाशील बुद्धीचे त्यांनी निरूपाधिक ईश्वराशी तादात्म्य मानले, तरीपण आत्म्याला त्याची स्वतःची अशी कार्यात्मक, सान्त, क्रियाशील बुद्धी आहे, अशी ॲक्वायनसची धारणा होती. पाश्चात्य तत्त्वज्ञानामध्ये सामान्यपणे इंद्रिये, कल्पनाशक्ती, किंवा अंतःकरण किंवा सामान्य बोध, स्मृती, इंद्रिय–वासना, बुद्धी, बौद्धिक वासना किंवा अध्ययसाय ही आत्म्याची कार्ये किंवा कार्यशक्ती होत असे मानले जाते. भारतामध्ये कठोपनिषदाने ६.७.८ सर्वप्रथम आत्म्याचे पुढील विश्लेषण दिले

आहे. इंद्रिये, मन, सत्त्व (म्हणजे बुद्धी), महान–आत्मा (म्हणजे जीवात्मन) ह्यापलीकडे केवळ अव्यक्त (म्हणजे विश्वव्यापी प्रकृति) आणि दैवी 'पुरुष' असतात. भगवद्गीतेमध्ये ३.४२ 'महान–आत्मन्' पर्यंतचे हे विश्लेषण परत पाहावयास मिळते. मात्र, ह्या महान आत्मन्‌ला त्रेचाळिसाव्या ४३ श्लोकात नुसते 'आत्मन' असे म्हटले आहे. प्राचीन सांख्य दर्शन मन आणि बुद्धी (महत)यांच्या दरम्यान अहंकार या तत्त्वाची भर घालते, परंतु त्या दर्शनाने भौतिक सृष्टीतील ही सर्व प्रकृतिगत तत्त्वें पुरुषाहून भिन्न मानली आहेत. हा 'पुरुष' वर उल्लेख केलेल्या महान–आत्मन किंवा आत्मन याच्याशी अनुरूप आहे. परंतु तो शुद्ध, अविभक्त, क्रियारहित आणि उदासीन चैतन्य असा असून अंतिम अव्यक्तात किंवा दैवी 'पुरुषा'त त्याचे मूळ नाही. ह्याउलट शंकराचार्य जीवात्म्याला चिद्रूप मानतात, परंतु जीवात्मा हा केवळ चैतन्य मात्र नाही, किंबहुना केवळ चैतन्य, म्हणजे परमात्मा (ब्रह्म) हे त्याचे अधिष्ठान आहे. जीवात्म्यापेक्षा परमात्मा महत्तर आणि अधिक अंतर्यामी (म्हणजे अंतरात्मा आणि अंतर्यामी) आहे. तोच सर्व जीवात्म्यांची प्रेरक शक्ती आहे (सर्वात्मन). तेव्हा परमात्म्याच्या दृष्टीने, जीवात्मा हा नाम–रूपात्मक, कार्य–स्वरूपी आणि एखाद्या अवगुंठनाप्रमाणे अध्यास (उपाधि) आहे. त्याच्या सान्त स्वरूपाच्या व बाह्यात्कारी स्वतंत्रतेच्या पलीकडे गेल्यावरच आपणास त्याचा मूलाधार आणि त्याचे अधिष्ठान म्हणजे केवलस्वरूपी सच्चिदानंद ब्रह्म त्याच्या एकमेवाद्वितीस स्वरूपात पाहता व अनुभवता येते. सांख्य व अद्वैत यांचा समन्वय करून, रामानुजाचार्य जीवात्म्याला उपाधि नव्हे तर 'प्रकार' म्हणजे 'विशिष्ट' ब्रह्माचा अंश आणि शेष मानतात. मध्वाचार्यांच्या मते, जीवात्मा ईश्वराहून नित्य भिन्न आणि ईश्वराबरोबर सहास्तित्व असलेला असला तरी, तो ईश्वराचा आभास, प्रतिबिंब आणि अंशच आहे. नैयायिकांच्या दृष्टीने आत्मा हे एक स्वतंत्र द्रव्य असून, त्याच्या ठिकाणी गुण असतात. शंकराचार्यांचा उपदेश शुद्ध मायावाद किंवा अविश्ववाद आहे असा अर्थ लावणारे काही शांकरवादी, फक्त ब्रह्मालाच सत्ता आहे आणि जीवाच्या किंवा जीवात्म्याच्या ठिकाणी सत्ता नाही, असे प्रतिपादन करतात.

**आत्म्याची निर्मिती**

आत्म्याला पूर्वीपासूनच अस्तित्व (पूर्व–अस्तित्व) आहे आणि तो अनादि आहे. (प्लेटो, प्लॉटिनस, सर्वेश्वरवादी, कांट, भारतीय अध्यात्मवादी) किंवा तो जडद्रव्यापासून निर्माण होतो (जडवादी), किंवा तो माता–पित्यांपासून निर्माण होतो (टर्ट्यूलिअन), किंवा तो 'बाहेरून' ठसविला जातो (ॲरिस्टॉटल), किंवा तो ईश्वरानिर्मित आहे (ॲक्वायनस, बहुतेक ख्रिश्चन विचारवंत, देकार्त, लायब्निझ, सनातनी मुस्लिम) अशा आत्म्याच्या निर्मितीसंबंधी विविध उपपत्ती दिल्या गेलेल्या आहेत. सांख्य, योग, जैन, न्याय, वैशेषिक आणि मध्वाचार्य हे वगळता इतर भारतीय अध्यात्मवादी असे मानतात की, आत्मा जरी अनादि (कर्म सिद्धान्ताप्रमाणे तो तसा मानणे आवश्यकच आहे) असला, आणि प्रकृतीपासून विकास पावलेला नसला, तरी तो ब्रह्मापासून कोणत्या ना कोणत्या अर्थाने, परिणामाने म्हणा अगर विवर्ताने म्हणा, निर्माण झालेला आहे.

**'स्व' किंवा जीवात्मा**

भारतात व पाश्चात्य देशांमध्ये ह्या संज्ञांचा अर्थ अनेकदा भिन्न तऱ्हेने लावला जातो. भारतात, या संज्ञा सामान्यतः आत्म्याच्या संज्ञांशी (जीव, जीवात्मन, सांख्य 'पुरुष' इत्यादी) समानार्थी मानल्या जातात, परंतु 'स्व' आणि जीवात्मा यांच्यात मात्र बहुधा फरक केला जातो. त्या परिस्थितीत 'स्व' हा आत्म्याने निर्माण

केलेला अहंकार किंवा व्यक्तित्व (हे बहुतांशी काल्पनिकच समजले जाते) असून, ते आत्म्याला स्वार्थ आणि त्याचे दुष्परिणाम यांच्याशी बद्ध करते. पाश्चात्य देशांमध्ये 'स्व' आणि 'जीवात्मन' हे शब्द 'व्यक्ती'शी समानार्थी मानले जातात आणि ते मनुष्याचे शरीर व आत्मा यांचा संघात किंवा क्वचित व्यक्तिमत्त्वाचे अधिष्ठान म्हणजे मनुष्याचा आध्यात्मिक आत्मा असा निर्देश करतात. हा जीव इतर व्यक्तींकडे अभिमुख असतो. ईश्वरवाद्यांच्या मते, तो त्याच्या उगमाकडे आणि अधिष्ठानाकडे – म्हणजे ईश्वराकडे – अभिमुख असतो. त्यामुळे स्वार्थ हा काही त्याचा अनिवार्य सह-घटक नाही. 'अहं-त्वं' संबंधाबद्दल बराच ऊहापोह झालेला आहे.

### ४) इस्लामी तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे स्वरूप[६३]

अल-फ़राबी, इब्न-सीना, इब्न ख़ल्दून व डॉ. मुहम्मद इक़बाल या इस्लामी तत्त्ववेत्त्यांच्या लिखाणात आत्म्याचे स्वरूपाचे विवेचन आढळून येते. तसेच प्रसिद्ध धर्मशास्त्रज्ञ मिर्ज़ा गुलाम अहमद क़ादियानी यांनी पण 'इस्लामी मूल्यांचे तत्त्वज्ञान' नामक आपल्या ग्रंथात आत्म्यासंबंधी प्रकाश टाकला आहे. पुढे क्रमशः उपरोक्त विद्वान विचारवंतांचे विचार प्रस्तुत करण्यात येत आहे.

**१) अल-फ़राबी** (मृ.इ.स.९५०) – अबू नासर अल-फराबी हा एक अत्यंत सुप्रसिद्ध इराणी तत्त्वज्ञ होता. त्याचा मुख्य विषय तर्कशास्त्र हा होता. आधुनिक चिदवाद्यांप्रमाणे त्याने तर्कशास्त्र व ज्ञानमीमांसा ही समानार्थक मानली. अल-फराबीच्या मते, विशेष सत्ये जाणून घेतल्यानंतरच सामान्य सत्यांचे निगमन करता येते. आणि इंद्रियगम्य अनुभव मिळविल्यानंतरच संकल्पनात्मक ज्ञान मिळविता येते.

बुद्धीच्या सिद्धांताच्या बाबतीत अल-फ़राबी हा आपला पूर्वसूरी अल-किंदी याचे अनुकरण करतो आणि आत्म्याच्या चार शक्तींचे वर्णन करतो. त्या चार शक्ती अशा – संभाव्य किंवा सुप्त प्रज्ञा, क्रियाशील प्रज्ञा, उपार्जित प्रज्ञा आणि कारक प्रज्ञा.

**(१) संभाव्य किंवा सुप्त प्रज्ञा–** हिला 'अक़्ल हय्यूलानी' (निष्क्रिय प्रज्ञा) असे म्हणतात. वस्तूशी संबंध असलेल्या उपाधीपासून वस्तूचे मूलतत्त्व बुद्धीने वेगळे काढून त्याला जाणण्याची जी मानवी शक्ती ती म्हणजेच सुप्त प्रज्ञा. ॲरिस्टॉटलच्या अनेकेंद्रियवेदन ('कॉमनसेन्स') या कल्पनेशी हिचे पुष्कळच साम्य आहे.

**(२) क्रियाशील प्रज्ञा –** हिला 'अक़्ल बिलफ़ेल' असे नाव आहे. क्रियाशील बनून मूलतत्त्व वेगळे काढण्यास मदत करते ती ही सुप्त शक्ती होय.

**(३) कारक प्रज्ञा –** हिला 'अक़्ल फ़आल' असे नाव आहे. ही बाह्य शक्ती आहे. हिचा उगम ईश्वरापासून झालेला असून, माणसांतील सुप्त शक्ती जागृत करून त्याला कार्यप्रवण करण्यास ती समर्थ असते.

**(४) उपार्जित प्रज्ञा –** हिला 'अक़्ल मुस्तफ़ाद' असे म्हणतात. ही प्रज्ञाकारक प्रज्ञेच्या प्रेरणेने विकसित होते व सक्रिय बनते.

अशा प्रकारे क्रियाशील प्रज्ञा आणि सुप्त प्रज्ञा यांचा संबंध आकारतत्त्व (फॉर्म) व आशयद्रव्य (मॅटर) यांच्या संबंधासारखा आहे, परंतु कारकप्रज्ञा ही बाहेरून प्रवेश करते आणि तिच्या क्रियेमुळे प्रज्ञेना नवीन शक्ती प्राप्त होतात, व त्यांच्यायोगे सर्वात मोठे कर्तृत्व ती 'उपार्जित' करते. अल-फ़राबी हा शेवटपर्यंत धर्मनिष्ठ

मुसलमान राहिला. त्यामुळे कुराणांतील विचारांवर ॲरिस्टॉटलीय मानसशास्त्राचा काय परिणाम होतो, याचे मर्म त्याला समजले नाही. ॲरिस्टॉटलीय सिद्धांतानुसार आत्म्यामध्ये वनस्पतिजगतात व प्राणिजगतात समानपणे आढळणाऱ्या वेगवेगळ्या शक्ती अथवा भाग असतात. शिवाय ॲरिस्टॉटल हा प्रत्यक्ष ज्ञान, इंद्रिये इत्यादींच्या शक्तींचा उल्लेख करतो, परंतु बाहेरून प्रवेश करून केवळ मानवामध्येच निवास करून राहणारा (रॅशनल सोल) बुद्धिनिष्ठ आत्मा हाच केवळ अविनाशी असतो. अशा प्रकारच्या सिद्धांतामुळे मानव आणि मनुष्येतर जीवसृष्टी यांच्यामध्ये एक दुर्लंघ्य खाई निर्माण होते. त्यामुळेच ॲरिस्टॉटलीय दृष्टिकोणातूनच विचार करणारे लोक – मग ते सनातनी मुसलमान असोत की कॅथॉलिक चर्चचे अनुयायी असोत – मनुष्येतर प्राण्याशी कर्तव्यबुद्धीने भूतदयेची वागणूक ठेवण्यास तयार असले, तरी त्यांना 'हक्क' देण्यास का तयार होऊ शकत नाहीत, याचाही खुलासा त्या सिद्धांतावरून होतो, परंतु ॲरिस्टॉटलीय सिद्धांतातील अत्यंत अमूर्त व बुद्धिनिष्ठ आत्मा हाच तेवढा मानवामधील असा भाग आहे की, जो अमर होऊ शकेल. मानवेतर प्राण्यांमध्ये विकासाची कितीही क्षमता असली तरी तो या कोटीला पोचू शकत नाही. अशा प्रकारचा शरीरापासून वेगळा काढलेला आत्मा आणि मानवेतर प्राण्यांमधील आत्म्याच्या खालच्या कोटीच्या शक्ती, यांचे चित्र कुराणामध्ये रंगविलेल्या मरणोत्तर जीवनाच्या चित्राशी जमत नाही. शिवाय कुराणाच्या मते आत्म्याच्या पुन: शरीराशी संयोग झाल्याखेरीज मरणोत्तर जीवन पूर्ण होत नाही, पण ही गोष्ट ॲरिस्टॉटलच्या अनुयायांना मान्य होणे शक्य नाही. याच कारणामुळे ॲरिस्टॉटलच्या शिकवणुकीचे समर्थन करणाऱ्या तत्त्वज्ञांवर हल्ले चढविण्यात आले, कारण तसे करण्यामध्ये ते आत्म्याच्या वैयक्तिक अस्तित्वाच्या कल्पनेला सुरूंग लावीत होते आणि पुनरूत्थानाच्या सिद्धांताला विरोध करीत होते.

**२) इब्न सीना (इ.स.९८०–१०३७)** – इब्न सीनाच्या मते आत्मा हा शरीरावर परिणाम करणाऱ्या शक्तींचा (कोषांचा) एक समुच्चय असतो. वनस्पतींचा आत्मा हे आत्म्याचे सर्वात साधेसुधे स्वरूप होय. पोषण व उत्पादन या दोन क्षेत्रापुरतेच त्याचे कार्य मर्यादित असते. मानवेतर प्राण्यांच्या आत्म्यांमध्ये वनस्पतींतील आत्म्याचे गुण तर असतातच, शिवाय त्यांच्यात आणखीही गुणांची भर पडलेली असते. मानवी आत्मा त्यात आणखी भर घालतो. त्याला 'बुद्धिनिष्ठ' किंवा 'सुज्ञ आत्मा' असे म्हटले जाते.

प्रत्यक्ष इंद्रिय–ज्ञानाच्या शक्ती अंशत: आंतरिक असतात. बाह्य शक्ती शरीरात विद्यमान असतात आणि आत्मा त्या शरीरात असतो. शरीरामध्ये आठ इंद्रिये असतात. दृष्टी, श्रवण, रसना, घ्राण, स्पर्श, (उष्ण व शीत यांची जाणीव करून देणारे इंद्रिय), कोरडे व ओले यांची कल्पना आणून देणारे इंद्रिय, मऊ व टणक यांचा अनुभव घडविणारे इंद्रिय आणि खरखरीत व गुळगुळीत यांची जाणीव करून देणारे इंद्रिय. अनुभव घेणाऱ्याच्या आत्म्यामध्ये बाह्य वस्तूचा ठसा उमटविण्याच्या कामी ही इंद्रिये साह्यभूत होतात. इंद्रियजन्य प्रत्यक्ष ज्ञानाच्या आंतरिक शक्ती पुढीलप्रमाणे होत. (१) अल मुसव्विरा (रचनात्मक शक्ती), (२) अल मुफ़क्किरा (वेदनात्मक शक्ती), (३) अलवहम (निश्चित मत बनविणारी विवेक–शक्ती), (४) अल हाफ़िज़ा किंवा अल ज़ाकिरा (स्मरणशक्ती). माणसे व जनावरे इंद्रियांच्याद्वारे विशिष्ट वस्तूंचे ज्ञान मिळवितात, तर माणूस तर्काच्याद्वारे सामान्य तत्त्वांचे ज्ञान मिळवितो. माणसाच्या बुद्धिनिष्ठ आत्मा ऊर्फ अक़्ल याला शारीरिक शक्ती व्यतिरिक्त स्वत:च्या शक्तींची जाणीव असते. त्याचा योगायोगाने उपाधिद्वारा शरीराशी संबंध जोडला गेला असला तरी आत्मा हा अलग व स्वतंत्र घटक आहे, हे ओळखले पाहिजे.

**३) इब खल्दून (इ.स. १३३२–१४०६)** – इब खल्दूनच्या मते आत्मा हा स्वभावत: ज्ञानरहित असतो, परंतु अनुभवासंबंधी मनन करण्याची शक्ती त्याच्यामध्ये असते. केवळ अंत:स्फूर्तीच्याद्वारेच माणसाला ज्ञानाचे अंतर्दर्शन होऊ शकते. या ज्ञानाची मांडणी व स्पष्टीकरण आकारिक तर्कशास्त्राच्या नियमांनुसार करता येते. तर्कशास्त्राचे कार्य आपल्याला चुकीपासून वाचविणे हे होय. ते बुद्धीला तीक्ष्ण बनविते आणि माणसाला अचूक चिंतनाच्या ध्येयाप्रत घेऊन जाते. म्हणून तर्कशास्त्र हे एक सहायक शास्त्र आहे, असे मानले पाहिजे. तथापि ज्या माणसाची बुद्धी पुरेशी वैज्ञानिक असेल त्याला तर्कशास्त्रीय मार्गदर्शनावर अवलंबून न राहता स्वतंत्रपणे प्रश्नांची उत्तरे शोधून काढण्यासाठी चिंतन करता येईल. या शास्त्रीय दृष्टिकोनामुळे इब खल्दून याने फलज्योतिष व रसायन (किमियागिरी) यांसारख्या आपल्या पूर्वसूरींच्या दृष्टीने महत्त्वाच्या शास्त्रांचा इन्कार केला. तत्त्वज्ञानांच्या गूढवादी बुद्धिवादालाही त्याने कडाडून विरोध केला. त्याच्या शास्त्रीय मतांवर धार्मिक बाबींचा प्रभाव फार थोडा पडलेला आहे, ही गोष्ट लक्षात घेण्याजोगी आहे.

**४) डॉ. मुहम्मद इक़बाल (इ.स. १८७३–१९३८)** – सर मुहम्मद इक़बाल हे अर्वाचीन इस्लामचे सर्वश्रेष्ठ विचारप्रवर्तक होत. यांनी उर्दूतील तत्त्वज्ञान उच्च शिखरावर पोहोचविले, आणि म्हणून अर्वाचीन इस्लामचे ते सर्वश्रेष्ठ विचारप्रवर्तक गणले जातात. मुस्लिम मनावर त्यांना दैववाद व अकर्मण्यता यांचा पगडा बसलेला आढळला. त्यांच्या मते प्लेटोच्या तत्त्वज्ञानामुळे मानवाच्या मनात खोट्या सुरक्षिततेची भावना निर्माण होते, म्हणून त्याचाही समाचार घेण्यास ते सरसावले.

प्लेटोचे तत्त्वज्ञान केवळ स्वप्नसृष्टीत विहार करणारांसाठी आहे, त्यांत कर्तव्याची प्रेरणा नाही व ते तत्त्वज्ञान व्यक्तीच्या जीवनाचा मुख्य आधार असणाऱ्या व्यक्तीच्या आत्म्याचे अस्तित्व नाकारते अशी टीका करून इक़बालनी आत्मचैतन्याच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार केला. त्यांच्या मते सर्व प्रकारचे जीवन म्हणजे आत्मचैतन्याचा विलास होय. या चैतन्यातच अगणित विश्वे अव्यक्त नांदत असतात. जेव्हा हा आत्मा प्रबुद्ध अवस्थेप्रत जातो व आपले चैतन्य प्रकट करतो तेव्हा विचारांचे विश्व व्यक्त होते व बाह्य अनात्म सृष्टीही प्रकाशमान होते. विषय, पदार्थ, साधने व कारणे इत्यादी अनेक रूपें आपल्या प्रकटीकरणासाठी आत्माच निर्माण करतो. काल ही आत्म्याची रंगभूमी आहे, आणि काल चिरंतन असल्यामुळे आत्मा जे जे व्यक्त करतो ते ते चिरंतन स्वरूपाचे असते. जीवन म्हणजे अनंताच्या जाणिवेचा एक तरंग आहे. कालाचे सातत्ययुक्त चिरंतनत्व ओळखणे यातच चिरंतन जीवनाचे रहस्य आहे. इच्छेतून जीवनाचा जन्म होतो आणि इच्छाच जीवनाचे उद्दिष्ट ठरवीत असते. ज्याला इच्छा (कामना) नाही, ध्येय नाही ती व्यक्ती मृतवत होय. कामनेमुळे जीवनाला आकार येतो व कामना त्याला समृद्ध बनविते. धर्माच्या पायावर संघटित केलेल्या समाजाशी तादात्म्य पावण्यानेच आत्मा पूर्णतया सार्थ होतो. आत्म्याचे उन्नयन प्रेमानेच होणे शक्य आहे. प्रेम हे सर्व प्रकारच्या ज्ञानाचा आणि श्रेयसाधनेचा आत्मा आहे. प्रेम म्हणजे देहभानरहित होऊन केलेली ईश्वराची भक्ती, असे इक़बाल यांचे प्रतिपादन आहे. हेच जीवनाचे मूलतत्त्व व सर्व प्रकारच्या ध्येयांचे व महत्कृत्यांचे स्फूर्तिस्थान आहे. ज्ञानमीमांसेच्या दृष्टीने बोलावयाचे तर ज्ञानप्राप्तीचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणून प्रेममय भक्तीला इक़बाल मान्यता देतात. बुद्धी (अक़्ल) ही मनुष्याची एक गौण शक्ती आहे.

**५) हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद साहब क़ादियानी[६४] (इ.स.१८३४–१९०७)** – हजरत मिर्ज़ा गुलाम अहमद साहब क़ादियानी यांनी आत्म्याचे विवेचन बीजस्वरूपात केले आहे. मानवाच्या शारीरिक (प्राकृतिक), नैतिक आणि अध्यात्मिक अशा तीन अवस्था असतात. तदनुसार मानवी क्रिया तीन प्रकारच्या असतात. पवित्र कुरआनमध्ये उपरोक्त तीन अवस्थांची तीन वेगवेगळी बीजे असल्याचे दर्शविण्यात आलेले आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास, ज्या तीन झऱ्यांमधून या तीन अवस्थांचा प्रवाह सुरू होतो ते तीन झरे त्यामध्ये दर्शविण्यात आलेले आहेत.

**पहिले बीज, वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करणारे मन**

सर्व नैसर्गिक अवस्थांचे उगमस्थान असलेल्या पहिल्या झऱ्यास पवित्र कुरआनामध्ये 'नफ़्से अम्मारह' असे संबोधण्यात आलेले आहे. त्याचा अर्थ वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करणारे मन असा आहे. त्यात म्हटले आहे की –

''मनुष्याचे मन सदैव वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करत असते.'' १२:५३ याचा अर्थ असा आहे की मनुष्याचे मन त्यास वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करत असते आणि त्यांस पूर्णावस्था साध्य करण्यास व नैतिक अवस्थेप्रत जाण्यास प्रतिबंध करीत असते आणि त्यास अनिष्ट वाईट मार्गाने जाण्यास उद्युक्त करीत असते. अशा प्रकारे दुष्ट व स्वैर वर्तनाची प्रवृत्ती ही एक मानवी अवस्था असून मनुष्य नैतिक अवस्थेत जाण्याआधी त्याच्या मनावर संपूर्णत: तिचा कबजा असतो. ज्ञान आणि बुद्धीचा वापर करून आपल्या आचरणात सुधारणा न करता जोपर्यंत त्याची जनावरांप्रमाणे खाण्यापिण्याची, झोपण्याची, जगण्याची, संतापण्याची आणि कोपण्याची स्वाभाविक प्रवृत्ती असते तोपर्यंत मनुष्य ज्या अवस्थेत राहतो ती ही मनुष्याची स्वाभाविक अवस्था होय. जेव्हा मनुष्य ज्ञान आणि बुद्धीनुसार आचरण करतो आणि आपल्या स्वाभाविक अवस्थेवर नियंत्रण मिळवून तिला योग्य ती दिशा देतो तेव्हा ती अवस्था त्याची स्वाभाविक अवस्था राहात नाही तर तिला त्याची नैतिक अवस्था असे म्हटले जाते.

**दुसरे बीज, अलिप्त राहणारे किंवा तुच्छता दर्शविणारे मन**

मनुष्याच्या नैतिक अवस्थेच्या या बीजास पवित्र कुरआनामध्ये 'नफ़्से लव्वामा' असे संबोधण्यात आलेले आहे. त्यात असे म्हटलेले आहे की,

''मी स्वत:ला वाईटापासून अलिप्त ठेवणाऱ्या प्रवृत्तीस साक्षी ठेवून सांगतो'' ७५:२ याचा अर्थ प्रत्येक प्रकारच्या अनीतीपासून व स्वैराचारापासून स्वत:ला अलिप्त ठेवणाऱ्या प्रवृत्तीस मी साक्षी ठेवून सांगतो असा आहे. वाईटापासून स्वत:ला अलिप्त ठेवणारे मन हे मानवी अवस्थेचे असे दुसरे बीज आहे ज्यातून नैतिक अवस्था उगम पावते. या अवस्थेंमध्ये मनुष्याचे जनावरांशी असणारे सादृष्य संपुष्टात येते. या ठिकाणी या प्रवृत्तीस साक्षी ठेवणे याचा अर्थ त्या प्रवृत्तीचा एक प्रकारे सन्मान करणे होय. कारण वाईट गोष्टी करण्यास प्रवृत्त करणाऱ्या मनाच्या अवस्थेत क्रमश: सुधारणा होऊन ते स्वत:ला वाईटापासून अलिप्त ठेवणाऱ्या प्रवृत्तीपर्यंत येऊन पोचले आणि ईश्वरी मूल्यमापनानुसार ही प्रवृत्ती आदरास पात्र ठरली आहे. ही अवस्था मनुष्यामध्ये अनीती विषयी तुच्छता निर्माण करते आणि त्यास त्याच्या स्वाभाविक इच्छांच्या व जनावरांप्रमाणे स्वैर वर्तन करण्याच्या प्रवृत्तीच्या आहारी जाऊ देत नाही म्हणून या अवस्थेला किंवा प्रवृत्तीला वरीलप्रमाणे संबोधन प्राप्त

झालेले आहे. या अवस्थेची अशी अपेक्षा असते की मनुष्याने चांगल्या व उच्च अवस्थेत असावे आणि त्याचे नैतिक आचार-विचार चांगले असावेत आणि मानवी आयुष्याच्या कोणत्याही स्वरूपामध्ये कोणत्याही प्रकारचे स्वैरवर्तन दिसून येऊ नये व नैसर्गिक भावना आणि इच्छा यांच्यावर विवेकबुद्धीचा अंकुश असावा. प्रत्येक प्रकारच्या वाईट गोष्टी विषयी ही अवस्था तुच्छता दर्शवित असल्यामुळे तिला वाईटापासून स्वत:स अलिप्त ठेवीत असली तरी धर्माचरण करण्याच्या बाबतीत ती पूर्णपणे प्रभावी ठरत नाही आणि कधीकधी ती नैसर्गिक भावनांच्या आहारी जाते व त्यामुळे धडपडते आणि खाली पडते. दुर्बल असलेल्या लहान मुलासारखी ही अवस्था असते. त्या मुलाची धडपडण्याची आणि खाली पडण्याची इच्छा नसते. परंतु आपल्या दुर्बलतेमुळे ते मूल तसे धडपडते व खाली पडते आणि नंतर आपल्या दुबळेपणाबद्दल त्या मुलाला पश्चाताप होत असतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास मनाची ही अशी नैतिक अवस्था आहे जेव्हा ते मन आपल्यासाठी उच्च नैतिक आचार-विचार सामावून घेण्याचा प्रयत्न करीत असते व कोणत्याही प्रकारच्या अवज्ञेचा तिला तिटकारा असतो, परंतु याबाबतीत ती पूर्णपणे यशस्वी होऊ शकत नाही.

**तिसरे बीज, संतुष्ट आत्मा**

मनुष्याच्या अध्यात्मिक अवस्थेचा प्रारंभ असे ज्यास म्हणता येईल त्या त्या तिसऱ्या बीजास पवित्र कुरआनमध्ये 'नफ़्से मुतमइन्नाह' असे संबोधण्यात आलेले आहे. त्याचा अर्थ संतुष्ट आत्मा असा आहे. त्यात असे म्हटलेले आहे की -

''ईश्वरचरणी दिलासा लाभलेल्या हे संतुष्ट आत्म्या तुझ्या विधात्याकडे (अशा अवस्थेत) परत जा (की) तू त्याच्यावर प्रसन्न आणि तो तुझ्यावर प्रसन्न. तेव्हा आता तू माझ्या निवडक सेवकांमध्ये दाखल हो आणि माझ्या (स्वर्गीय) उपवनात प्रविष्ट हो.'' ८९:२७-३०

ही अशी अवस्था असते जेव्हा मनुष्याचा आत्मा सर्व प्रकारच्या दुर्बलतेपासून मुक्त झालेला असतो आणि अध्यात्मिक शक्तींनी समर्थ झालेला असतो व त्या सर्वशक्तिमान ईश्वराशी त्याचा संबंध प्रस्थापित झालेला असतो ज्याच्या प्रेरणेविना त्याचे अस्तित्वच राहू शकत नाही. ज्याप्रमाणे उंचावरून वाहत येणारा पाण्याचा प्रवाह त्याच्या झोतामुळे व मध्ये कोणताही अडथळा नसल्याने अतिशय वेगाने पुढे धावतो त्याचप्रमाणे संतुष्ट आत्मा अतिशय शीघ्र गतीने ईश्वराकडे धाव घेत असतो. ईश्वरचरणी दिलासा प्राप्त झालेल्या आत्म्याला आपल्या प्रभूकडे परतण्याचा संदेश वरील ईश्वरी वचनामध्ये देण्यात आलेला आहे. याच जीवनात त्यात फार मोठे परिवर्तन घडून येते आणि याच लोकी त्यास स्वर्गसुखाची प्राप्ती होते. या श्लोकामध्ये अशा आत्म्यास आपल्या प्रभूकडे परत येण्याचा संदेश दिलेला असल्याने त्या आत्म्याचे त्याच्या प्रभूकडून संगोपन होत असते आणि त्या आत्म्याचे ईश्वराप्रती असलेले प्रेम हेच त्याच्या संगोपनाचे रूप धारण करते व तो आत्मा या जीवनाच्या झऱ्याशी प्रेमामृताचे पान करतो आणि जीवनमरणाच्या चक्रातून मुक्त होतो.

''जो ऐहिकतेचा त्याग करून आपल्या आत्म्यास पवित्र करील त्यास सर्व प्रकारच्या त्रासातून मुक्त करण्यात येईल आणि तो असफल होणार नाही, परंतु जो ऐहिकतेच्या आहारी जाईल तो जीवनात निराशा पदरी पाडून घेईल.'' ९१:९-१०

थोडक्यात, या तीन अवस्थांना मानवाच्या प्राकृतिक, नैतिक व अध्यात्मिक अवस्था असे म्हणता येईल. मनुष्याच्या स्वाभाविक अथवा नैसर्गिक इच्छा जेव्हा सुप्तावस्थेतून जागृत होतात तेव्हा त्या अतिशय भयानक

स्वरूप धारण करतात आणि बऱ्याच वेळा त्या नैतिक व अध्यात्मिक गुणांचा विनाश करतात. ईश्वराच्या पवित्र ग्रंथात त्यांना वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करणारे मन असे म्हटलेले आहे. याबाबतीत मानवाच्या स्वाभाविक अवस्थेविषयी पवित्र कुरआनचे मत काय आहे, त्या संबंधात त्यात कोणती शिकवण देण्यात आलेली आहे, आणि त्या अवस्थेवर नियंत्रण मिळवण्याचा कोणता मार्ग त्यात दाखवलेला आहे असे प्रश्न मनात निर्माण होतात. त्याचे उत्तर असे आहे की पवित्र कुरआन नुसार मानवाच्या स्वाभाविक अवस्थेचा त्याच्या नैतिक व अध्यात्मिक अवस्थांशी खूपच दृढ संबंध असतो आणि तो इतका दृढ असतो की मनुष्याच्या खाण्यापिण्याच्या पद्धतीचा त्याच्या नैतिक व अध्यात्मिक अवस्थांवर परिणाम होत असतो. असे म्हटले जाते की मिठाच्या खाणीत जे काही पडते त्या सर्वाचे मीठ होऊन जाते तसेच मानवाच्या स्वाभाविक अवस्थेवर जर धर्मशास्त्राच्या आज्ञांच्या सहाय्याने नियंत्रण मिळविण्यात आले तर तीच अवस्था त्याची नैतिक अवस्था होते आणि त्याच्या अध्यात्मिक अवस्थेवरही तिचा उत्तम परिणाम होतो. म्हणूनच पवित्र कुरआनमध्ये शारीरिक शुद्धता आणि अध्यात्मिक लीनता या गोष्टींवर विशेष भर देण्यात आलेला आहे. दृश्य परिणामांवरून असे सिद्ध झालेले आहे की, शारीरिक अवस्थांचा आत्म्यावर फार खोलवर परिणाम होत असतो. जसे आमचे डोळे जेव्हा अश्रूंनी भरून येतात, अगदी डोळ्यांमध्ये अश्रू मुद्दामहून आणलेले असतील तरीही, त्यांचा मनावर ताबडतोब परिणाम होतो आणि ते अतिशय दु:खी होते. त्याचप्रमाणे आपण जेव्हा हसू लागतो, ते हास्य अगदी कृत्रिम असले तरीही आपले मन आनंदी होऊ लागते. प्रार्थनेच्या वेळी नतमस्तक झाल्यामुळे मनामध्ये लीनतेची भावना निर्माण होत असते, असेही प्रत्ययास आलेले आहे. उलटपक्षी मान वर करून छाती फुगवून आपण जेव्हा ताठ उभे राहतो तेव्हा त्या वृत्तीमुळे गर्विष्ठपणाची आणि निरर्थक दिमाखाची भावना निर्माण होते. या सर्व गोष्टींवरून शारीरिक अवस्थांचा आत्मिक अवस्थांवर निश्चितपणे परिणाम होत असतो हे सिद्ध होते.

अनुभवावरून असेही दिसून येते की विविध प्रकारच्या आहाराचा विविध प्रकारे बुद्धीवर आणि मनावर परिणाम होत असतो. उदाहरणादाखल, सूक्ष्म अवलोकन केल्यास असे दिसून येते की जे लोक मांस भक्षण करीत नाहीत त्यांच्यातील शूरपणाची वृत्ती हळूहळू कमी होत जाते आणि अखेरीस ते मनाने अगदीच दुबळे होतात व ईश्वराकडून प्राप्त झालेली एक गौरवशाली शक्ती गमावून बसतात. मांसभक्षक प्राण्यांमध्ये जेवढा शूरपणा दिसून येतो तेवढा शूरपणा वनस्पती किंवा गवत खाणाऱ्या प्राण्यांमध्ये दिसून येत नाही. या सृष्टी नियमाने या गोष्टीस आणखी दुजोराच मिळतो. पक्ष्यांच्या बाबतीतही हीच गोष्ट लागू आहे. त्यावरून आहाराचा नैतिक आचार विचारांवर परिणाम होत असतो यात कोणतीही शंका नाही. उलटपक्षी जे लोक मुख्यत्वे करून अधिक प्रमाणात मांसाचा समावेश असलेला आहार घेतात आणि अतिशय कमी प्रमाणात भाजीपाल्याचा आपल्या आहारात समावेश करतात त्या लोकांमधील नम्रता आणि लीनता कमी होत जाते. जे लोक यातील मध्यममार्गाचे अनुसरण करतात त्या लोकांमध्ये दोन्ही गुण विकसित होतात. म्हणूनच सर्वशक्तिमान ईश्वराने पवित्र कुरआनमध्ये असे म्हटले आहे की –

''खा आणि प्या परंतु त्याबाबतीत अतिरेक करू नका.'' ७:३१ याचाच अर्थ असा की मांस आणि इतर पदार्थांचे भक्षण करा परंतु कोणत्याही पदार्थाचे मर्यादेपेक्षा अतिरिक्त प्रमाणात सेवन करू नका. कारण त्यामुळे कदाचित तुमच्या नैतिक अवस्थेवर विपरित परिणाम होईल आणि तुमचे आरोग्यही धोक्यात येईल.

ज्याप्रमाणे शारीरिक आचरणाचा आत्म्यावर परिणाम होत असतो त्याचप्रमाणे काही वेळा आत्म्याचा शरीरावर परिणाम होत असतो. उदाहरणार्थ, एखाद्या मनुष्याला दु:ख होते तेव्हा त्याचे डोळे अश्रूंनी ओले होतात, आणि जेव्हा एखाद्या मनुष्यास आनंद होतो तेव्हा त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमलते. खाणे, पिणे, निजणे, झोपेतून जागे होणे, इकडेतिकडे फिरणे, विश्रांती घेणे, स्नान करणे इत्यादींसारख्या आपल्या सर्व शारीरिक रचनेचा आपल्या संपूर्ण मनुष्यत्वाशी फार निकटचा संबंध आहे. मेंदूच्या एका विवक्षित भागाला इजा पोचली तर त्या मनुष्याची स्मरणशक्ती नाहीशी होते. मेंदूच्या दुसऱ्या एका भागाला इजा पोचली तर मनुष्य बेशुद्ध पडतो. विषारी हवा शरीरात विपरित परिणाम करते आणि ती शरीरात जाऊन नंतर मनावर विपरित परिणाम करते आणि नैतिक प्रेरणांचा शरीरातील ज्या यंत्रणेशी संबंध असतो ती संपूर्ण यंत्रणा कोलमडून पडते व तो अभागी मनुष्य वेडापिशासारखा होऊन तात्काळ मृत्यू पावतो.

अशा प्रकारे शरीराला होणाऱ्या इजांवरून असे दिसते की आत्मा आणि शरीर यांचा अतिशय गूढ असा परस्पर संबंध आहे आणि त्याची उकल ही मनुष्याच्या बुद्धीच्या आवाक्यापलिकडची गोष्ट आहे. शरीरावर होणाऱ्या परिणामांवरून असे दिसून येते की शरीर ही आत्म्याची जननी आहे. गरोदर स्त्रीच्या गर्भाशयात वरून कोठूनतरी येऊन प्रविष्ट होत नसतो. तो शुक्रबीजामध्येच अस्तित्वात असलेला एक प्रकाशकिरण असतो आणि गर्भाशयातील पिंड जसा विकसित होऊ लागतो तसा तो तेजोमय होऊ लागतो. सर्वशक्तिमान ईश्वराच्या वाणीची आपल्याला अशी शिकवण आहे की गर्भाशयात प्रविष्ट झालेल्या शुक्रबीजापासून तयार झालेल्या शरीरामधून आत्मा विकसित होत असतो, याबाबतीत पवित्र कुरआनात असे म्हटले आहे की–

''मग आम्ही त्यास नवीन रूपात घडवले. म्हणून अल्लाह मोठा समृद्ध आहे, सर्वोत्तम निर्मितीकार आहे.'' २३:१४ याचा अर्थ असा की गर्भाशयात तयार झालेल्या शरीरामध्ये ईश्वर नवीन निर्मिती करतो. त्या नवीन निर्मितीस जीवात्मा असे म्हणतात. ईश्वर अतिशय समृद्ध आहे, निर्मितीकार म्हणून त्याच्या समान अन्य कोणीही नाही.

शरीरातून नवीन निर्माण करण्यात आलेला आत्मा विकसित होत असतो हे कथन अतिशय गूढ असून त्यावरून आत्म्याचे खरे स्वरूप प्रकट होते आणि आत्मा व शरीर यांचा परस्परांशी असलेला दृढ संबंध दिसून येतो. याद्वारे आम्हाला अशी शिकवण देण्यात येत आहे की जेव्हा मनुष्याचे आचार–विचार आणि कृती या ईश्वराच्या मार्गात सन्मार्गानुकूल होऊ लागतात तेव्हा त्यांच्या मुळाशी वर उल्लेखिलेलेच तत्त्वज्ञान असते, म्हणजेच ज्याप्रमाणे शुक्रबीजामध्ये आत्मा प्रविष्ट केला जातो त्याप्रमाणे या सर्व प्रामाणिक आचार विचारांमध्ये आत्मा प्रविष्ट झालेला असतो. या आचारविचारांचे शरीर जसजसे विकसित होऊ लागते तेव्हा त्या आचार विचारांमध्ये प्रविष्ट झालेला आत्माही विकसित होऊ लागतो आणि जेव्हा ते शरीर पूर्णपणे विकसित होते तेव्हा त्यातील आत्मा आपल्या संपूर्ण तेजानिशी प्रकाशमान होतो व आपले आत्मिक स्वरूप व्यक्त करतो. या अवस्थेमध्ये ते सर्व आचारविचार पूर्णपणे चैतन्यमय होतात. जेव्हा आचारविचारांचे शरीर पूर्णपणे विकसित पावते तेव्हा त्यातून विजेच्या लखलखाटाप्रमाणे काहीतरी चमकू लागते. ही एक अशी अवस्था आहे जिच्या संबंधात सर्वशक्तिमान ईश्वराने पवित्र कुरआनमध्ये असे म्हटले आहे की –

''जेव्हा मी त्यास परिपूर्ण आकार देईन आणि त्याच्यात त्याच्या तेजाचे सर्व आविष्कार प्रतिष्ठापित करीन व माझा आत्मा त्याच्यात फुंकीन तेव्हा तुम्ही सर्वजण त्याच्यासमोर नतमस्तक व्हा.'' १५:२९ या श्लोकामध्ये

असे सूचित करण्यात आलेले आहे की सर्व आचारविचारांच्या दृष्टीने योग्य अशी अवस्था परिपूर्णपणे विकसित झाल्यानंतरच त्यामध्ये आत्मा प्रकाशमान होत असतो आणि त्याचे कर्तेपण ईश्वराने स्वत:कडेच घेतलेले आहे, कारण ऐहिक जीवन समाप्त झाल्यानंतरच ती अवस्था परिपूर्ण होत असते. अशा प्रकारे प्रारंभी मंद असलेला हा दैवी प्रकाश अचानक तेजोमय होऊन चमकू लागतो. त्यामुळे हा ईश्वरी आविष्कार पाहिल्यावर प्रत्येकजण त्यासमोर नतमस्तक होतो आणि स्वाभाविकत:च त्यास त्याची ओढ वाटू लागते केवळ शैतान त्यास अपवाद असतो, कारण त्यास अंध:काराविषयी प्रेम असते.

**आत्म्याची निर्मिती**

आत्मा हा शरीरात विकसित होणारा आणि गर्भाशयात संगोपन होणारा एक सूक्ष्म प्रकाश आहे ही गोष्ट नि:संशय सत्य आहे. सुरुवातीस तो सुप्तावस्थेत व अगोचर असतो आणि नंतर तो आपले स्वरूप व्यक्त करतो. अगदी सुरुवातीपासून त्याचे गुणतत्त्व शुक्रबीजामध्ये अस्तित्वात असते. ईश्वरी योजना, आज्ञा आणि इच्छा यानुसार अतिशय गूढ रीतीने त्याचा शुक्रबीजाशी संबंध प्रस्थापित झालेला असतो. ते एक तेजोमय व प्रकाशमान असलेले शुक्रबीजच असते. द्रव्य वा द्रव्याचा भाग असतो त्याप्रमाणे तो शुक्रबीजाचा एक भाग असतो असे म्हणता येत नाही, किंवा तो बाहेरून कोठूनतरी येतो अथवा जमिनीवर येऊन पडतो व शुक्रबीजाच्या द्रव्याशी मिसळून जातो असेही म्हणता येत नाही. गारगोटीमध्ये ज्याप्रमाणे अग्नी सुप्तावस्थेत अस्तित्वात असतो तसाच तो शुक्रबीजामध्ये सुप्तावस्थेत अस्तित्वात असतो. ईश्वरी ग्रंथात जे म्हटले आहे त्याचा आत्मा स्वतंत्र अस्तित्व असलेल्या स्वरूपात आकाशातून खाली उतरत असतो आणि वातावरणातून जमिनीवर पडतो आणि योगायोगाने शुक्रबीजामध्ये मिसळून जातो व त्याच्या बरोबरच गर्भाशयात प्रवेश करतो असाही अर्थ होत नाही. अशा प्रकारच्या कल्पनेला कशाचाही आधार नाही. सृष्टि नियमाच्या तो विरुद्ध आहे. दररोज आपण हे पाहत असतो की हजारो किडे घाणेरडे व शिळे अन्न दूषित करत असतात आणि स्वच्छ न केलेल्या जखमांमध्ये हजारो किडे पडत असतात. घाणेरड्या कपड्यामध्ये शेकडो उवा पडत असतात आणि माणसाच्या पोटामध्ये कित्येक प्रकारचे जंतू निर्माण होत असतात. ते सर्व किडे व जंतू बाहेरून कोठून तरी येतात किंवा आकाशातून खाली पडताना पाहता येतात असे म्हणता येत नाही. तसेच आत्मा हा शरीरामध्येच विकास पावत असतो हे सत्य आहे आणि तो स्वयंभू नसून निर्माण केला जातो हेही यामुळे सिद्ध होते.

**आत्म्याचा दुसरा जन्म**

ज्या सर्वशक्तिमान ईश्वराने आपल्या संपूर्ण सामर्थ्याने शरीरामधून आत्म्याची निर्मिती केली आहे त्या ईश्वराची अशी योजना असल्याचे दिसून येते की आत्म्याचा दुसरा जन्म देखील शरीराद्वारेच व्हावा. आत्म्याची हालचाल ही शरीराच्या हालचालीनुसार होत असते. जर शरीर एखाद्या विशिष्ट दिशेने जाऊ लागले तर आत्माही आपोआप त्यापाठोपाठ जाऊ लागतो. म्हणून मानवाच्या प्राकृतिक अवस्थेकडे लक्ष पुरविणे हे ईश्वरी ग्रंथाचे महत्त्वाचे कार्य आहे, म्हणून पवित्र कुरआनाने मनुष्याची प्राकृतिक अवस्था सुधारण्याकडे विशेष लक्ष दिलेले आहे आणि मनुष्याचे सर्व प्रकारचे आचरण, त्याची वाणी, त्याचे रडणे, बोलणे, शांत रहाणे, विवाह करणे, अविवाहित राहणे, चालणे, थांबणे, शारीरिक स्वच्छता, स्नान करणे, निरोगी अवस्थेत आणि रोगी अवस्थेत विशेष प्रकारचे आचरण करणे इत्यादींच्या संबंधात मार्गदर्शन केलेले आहे. मनुष्याच्या शारीरिक अवस्थेचा

त्याच्या आत्मिक अवस्थेवर खोलवर परिणाम होत असतो असेही त्यात म्हटलेले आहे. या सर्व मार्गदर्शनपर आज्ञांचा तपशीलवार उलगडा करून दाखवण्याचा प्रयत्न म्हणजे वाचकांचा अमूल्य वेळ घेण्यासारखे ठरेल. म्हणून हा प्रयत्न टाळण्यात आलेला आहे.

**आत्म्याच्या अनुषंगाने मानवाचा क्रमशः विकास**

ईश्वराचे पवित्र ग्रंथ कुरआनाचे विचारपूर्वक मनन केले असता असे दिसून येते की त्यामध्ये मनुष्याच्या प्राकृतिक अवस्थेत सुधारणा घडवून नंतर त्यास उच्च प्रकारच्या अवस्थेप्रत नेण्याकरता नीतिनियम विहित केलेले आहेत आणि मनुष्याची सर्वोच्च आत्मिक अवस्थेपर्यंत उन्नती घडवून आणण्याचा त्याचा उद्देश आहे. प्रथमतः ईश्वर मनुष्यास बसणे, उभे राहणे, खाणे, पिणे, बोलणे इत्यादींसारख्या सामाजिक आचरणासंबंधातील नीतिनियमांची शिकवण देऊ इच्छितो आणि अशा प्रकारे रानटी अवस्थेतून त्याची मुक्तता करून जनावरांपेक्षा त्यास वेगळी अवस्था प्राप्त करून देऊ इच्छितो आणि अशा प्रकारे त्यास जिला सामाजिक संस्कृती असे म्हणता येईल अशी प्राथमिक स्वरूपाची नैतिक अवस्था साध्य करून देऊ इच्छितो. या दोन्ही पद्धती मानवाच्या प्राकृतिक अवस्थेत सुधारणा घडवून आणण्याशी संबंधित असल्याने एकाच प्रक्रियेचा त्या भाग आहेत. त्यांच्यामध्ये केवळ कमी अधिक दर्जाचा फरक आहे. सर्वज्ञ असलेल्या त्या एकमेव ईश्वराने या नैतिक पद्धतीची अशी योजना केलेली आहे की मनुष्यास नीच अवस्थेतून अगदी उच्च नैतिक अवस्थेपर्यंत आपली उन्नती साध्य करता यावी.

मनुष्याने आपल्या खऱ्या निर्मितीकाराच्या प्रेमासाठी आणि त्याचा कृपाप्रसाद संपादन करण्यासाठी संपूर्णपणे त्याच्या चरणी समर्पित होणे ही त्या उन्नतीची तिसरी पायरी आहे. या अवस्थेत त्याचे संपूर्ण शरीर ईश्वरचरणी समर्पित झालेले असते. उन्नतीच्या या टप्प्याचे मुसलमानांना सातत्याने स्मरण करून देण्याकरताच त्यांच्या धर्माला इस्लाम हे नाव देण्यात आलेले आहे, कारण इस्लामचा अर्थ स्वतःला पूर्णपणे ईश्वरचरणी समर्पित करणे व मागे काहीही न ठेवणे असा आहे. याबाबत कीर्तिमान ईश्वराने असे म्हटलेले आहे की :

मोक्ष याचा अर्थ मनुष्याने स्वतः संपूर्णपणे ईश्वराला शरण जावे आणि ईश्वराच्या कार्यात स्वतःचे बलिदान देऊ करावे, आणि केवळ आपल्या हेतूद्वारे नव्हे तर आपल्या सदाचरणाने देखील आपला भक्तीमधील प्रामाणिकपणा सिद्ध करावा असा आहे. अशा प्रकारे जो स्वतः सदाचरणी आहे त्यास त्याचे फळ ईश्वराकडून मिळणार आहे. ''असे लोक कोणत्याही प्रकारच्या भयाने ग्रस्त होणार नाहीत आणि त्यांना दुःख भोगावे लागणार नाही.'' २:११२ ''त्यांना असे सांग की – माझी प्रार्थना (उपासना) आणि माझा त्याग, माझे जीवन आणि माझे मरण हे सर्व त्या ईश्वरासाठी आहे, जो सर्व विश्वाचा विधाता आहे आणि त्याच्या बरोबरीचे स्थान अन्य कोणालाही नाही. मला अशीच आज्ञा देण्यात आलेली आहे आणि इस्लामच्या या धारणेची जे पूर्तता करतात आणि अल्लाहच्या कार्यात स्वतःचे बलिदान देऊ करतात त्या सर्वांमध्ये मी अग्रणी आहे.'' ६:१६२–६३ ''हा माझा सरळमार्ग आहे, म्हणून त्याचे अनुसरण करा आणि जे मार्ग तुम्हाला त्याच्या मार्गापासून दूर घेऊन जातील अशा कोणत्याही अन्य मार्गांनी जाऊ नका.'' ६:१५३ ''त्यांना असे सांग की – जर तुम्ही ईश्वरावर प्रेम करीत असाल तर माझे अनुकरण करा आणि माझ्या मार्गाने या. यामुळे ईश्वर तुमच्यावर प्रेम करील आणि तुम्हाला तुमच्या दोषांची क्षमा करील. तो अतिशय क्षमाशील व नित्य कृपावंत आहे.'' ३:३१

हे लक्षात असू द्यावे की सर्व शक्तिमान ईश्वराच्या पवित्र ग्रंथात दर्शविल्याप्रमाणे वाईट गोष्ट करणारे मन हे जिचे उगमस्थान आहे ती मानवाची प्राकृतिक अवस्था ही त्याच्या नैतिक अवस्थेपासून वेगळी नाही. ईश्वराच्या पवित्र ग्रंथामध्ये (कुरआनामध्ये) मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्ती आणि आशा आकांक्षा यांना प्राकृतिक अवस्था म्हणून संबोधण्यात आलेले आहे. जेव्हा या प्राकृतिक अवस्थांचे सद्‌सद्‌विवेक बुद्धीने नियमन व नियंत्रण करण्यात येते आणि योग्य त्यावेळी व ठिकाणी त्या कृतीत आणल्या जातात तेव्हा याच प्राकृतिक अवस्था नैतिक गुणांचे स्वरूप धारण करतात. याचप्रमाणे नैतिक अवस्थादेखील आत्मिक अवस्थांपासून पूर्णपणे भिन्न नसतात. नैतिक अवस्थांमध्ये जेव्हा ईश्वराप्रती संपूर्ण समर्पणाची भावना निर्माण होते व आत्म्याचे पूर्णत: शुद्धीकरण होते आणि सर्व ऐहिक गोष्टींचा त्याग करून संपूर्णत: ईश्वराला शरण जातात आणि त्यांच्यात पूर्णत: भक्तीची व समर्पणाची आणि संपूर्ण शांतीची आणि समाधानाची भावना निर्माण होते आणि ईश्वरी इच्छेशी संपूर्णपणे तादात्म्य साध्य होते तेव्हा याच नैतिक अवस्था आत्मिक अवस्थांचे रूप धारण करतात. प्रत्येक नैतिक गुण त्यास योग्य असलेल्या ठिकाणी आणि वेळी आचरणात आणून आणि ईश्वराच्या मार्गात श्रद्धापूर्वक वाटचाल करून व त्याच्याप्रति संपूर्ण समर्पणाची भावना ठेवून आध्यात्मिक अवस्था साध्य करता येते. जो खरोखर ईश्वराचा होतो त्याच्याविना अस्तित्वात राहू शकत नाही. ईश्वराचा साक्षात्कार झालेला मनुष्य हा ईश्वराने सोडलेल्या माशासारखा आहे आणि ईश्वराचे प्रेम हे त्या माशाचे पाणी आहे.

**आत्मिक अवस्था**

आत्मिक अवस्था कोणत्या आहेत? हा खरा प्रश्न आहे. या अगोदरच नमूद केल्याप्रमाणे संतुष्ट आत्मा हा मनुष्याच्या आध्यात्मिक अवस्थेचा प्रारंभ किंवा उगमस्थान असतो, जो सदाचरणी मनुष्याची प्रगती करून त्यास ईश्वराच्या समीप नेऊन ठेवतो. अल्लाहने याबाबतीत असे म्हटलेले आहे की –

''ईश्वरचरणी दिलासा लाभलेल्या हे संतुष्ट आत्म्या तुझ्या विधात्याकडे (अशा अवस्थेत) परत जा (की) तू त्याच्यावर प्रसन्न आणि तो तुझ्यावर प्रसन्न. तेव्हा आता तू माझ्या निवडक सेवकांमध्ये दाखल हो आणि माझ्या (स्वर्गीय) उपवनात प्रविष्ट हो.'' ८९:२७-३०

मनुष्याला ईश्वरचरणी दिलासा मिळालेला असणे आणि त्याने त्याचे सर्व प्रकारचे समाधान, आनंद व परमानंद ईश्वराच्या ठायीच केंद्रित केलेले असणे हीच मनुष्याची या ऐहिक जीवनातील सर्वोच्च आत्मिक अवस्था होय हे लक्षात घ्यायला हवे. याच अवस्थेला स्वर्गीय जीवन असे म्हटलेले आहे. या अवस्थेमध्ये मनुष्याला त्याचा शुद्ध प्रामाणिकपणा, सचोटी आणि निष्ठा यांचे फळ म्हणून याच इहलोकात स्वर्गीय जीवनाची प्राप्ती होत असते. इतर लोक पारलौकिक जीवनात स्वर्ग प्राप्तीची अपेक्षा ठेवीत असतात तर हा मनुष्य मात्र याच इहलोकी त्या स्वर्गात प्रविष्ट होत असतो. या टप्प्यावर मनुष्यास अशी जाणीव होऊ लागते की त्यास जी उपासना पद्धती ठरवून दिलेली आहे ती वास्तवात त्याच्या आत्म्याचे संवर्धन किंवा उन्नती करणारा एक आहारच असतो आणि त्यावरच त्याचे आत्मिक जीवन अवलंबून असते व त्याची पूर्ती पारलौकिक जीवनापर्यंत लांबणीवर पडत असते. स्वत:चे मन त्याच्या अयोग्य व वाईट कर्माबद्दल त्यास दोषी ठरवत असते आणि तरीही ते त्याच्यामध्ये सद्‌गुणांच्या प्राप्तीची आस पूर्णपणे निर्माण करू शकत नाही आणि त्याच्या कुविचारांविषयी खरा तिरस्कार निर्माण करू शकत नाही व पूर्णपणे तो मनुष्य सदाचारणाचे अनुसरण करू शकत नाही आणि या

भावनेमुळेच त्याच्यात बदल होऊ लागतो व याच क्षणी किंवा अवस्थेमध्ये त्याच्या संतुष्ट आत्म्याची उन्नती होण्यास प्रारंभ होतो. ह्या अवस्थेप्रत पोचल्यावर मनुष्य आपला संपूर्ण उत्कर्ष करून घेण्यास समर्थ झालेला असतो. सर्व मनोविकार नष्ट होऊ लागतात आणि आत्म्यावर मनोबल देणारा वारा वाहू लागतो व त्यामुळे तो मनुष्य आपल्या गतकाळातील दुर्बलतेकडे किंवा दोषांकडे पश्चात्तापाच्या भावनेने पाहू लागतो. यावेळी स्वाभाविक वृत्ती आणि सवयी यांमध्ये आमूलाग्र परिवर्तन घडून येते व मनुष्य त्याच्या पूर्वीच्या अवस्थेमधून पूर्णपणे बाहेर काढला जातो. तो स्वच्छ व शुद्ध केला जातो आणि ईश्वर स्वहस्ते त्याच्या हृदयात नीतीमत्तेविषयी प्रेम निर्माण करतो व अनीतीची अपवित्रता त्यातून बाहेर काढून फेकून देत असतो. सत्याचरणी सेवा त्याच्या हृदयरूपी किल्ल्यात प्रवेश करते व शेवटी सत्याचा विजय होतो आणि असत्य आपली शस्त्रे खाली ठेवून पलायन करते. त्याच्या मनावर ईश्वराचा हात ठेवला जातो आणि तो आपले प्रत्येक पाऊल ईश्वराच्या कृपाछत्राखाली टाकू लागतो. सर्वशक्तिमान ईश्वराने पुढील वचनांमध्ये हे सर्व दर्शविलेले आहे.

''हेच ते लोक होत ज्यांच्या अंत:करणात अल्लाहने खरीखुरी श्रद्धा अंकित करून ठेवली आहे आणि ज्यांना आपल्याकडून ईशवाणी पाठवून त्याने सहाय्य केले आहे.'' ५८:२२ ''अल्लाहने तुमच्यामध्ये श्रद्धेविषयी प्रेम निर्माण केले आहे आणि तुमच्या मनामध्ये तिला सुंदर रूपात दर्शविले आहे, आणि त्याने अश्रद्धा, दुष्टपणा आणि अवज्ञा या गोष्टींविषयी तुमच्या मनात अप्रियता निर्माण केली आहे. हे सर्व अल्लाहच्या कृपेने व अनुग्रहाने झालेले आहे. अल्लाह हा सर्वज्ञ व बुद्धिवंत आहे.'' ४९:७–८ ''सत्य आले आणि असत्य नाहीसे झाले आहे. असत्य अवश्य नाहीसे होणार आहे.'' १७:८१

हे सर्व मनुष्य तिसऱ्या अवस्थेमध्ये जी आत्मिक अवस्था प्राप्त करतो त्याच्याशी संबंधित आहे. कोणताही मनुष्य या अवस्थेप्रत आल्याखेरीज खरी अंतर्दृष्टी प्राप्त करू शकत नाही. ईश्वराने त्यांच्या अंत:करणामध्ये श्रद्धा निर्माण करणे आणि ईशवाणी पाठवून त्यांना सहाय्य करणे म्हणजे कोणालाही ईश्वरी सहाय्याशिवाय खरी शुद्धता व सदाचरणी वृत्ती प्राप्त होऊ शकत नाही. स्वत:ला ज्यावेळी मनुष्य दोष देत असतो तेव्हा त्याची अवस्था अशी असते की त्यास वारंवार पश्चात्ताप होत असतो आणि तरीही त्याचे पतन होत असते व कित्येकदा तो निराश होतो आणि आपली अवस्था सुधारण्याच्या पलीकडची आहे असे त्यास वाटू लागते. काही काळ तो या अवस्थेमध्ये राहतो आणि योग्य वेळ येते तेव्हा त्याच्यावर एखाद्या रात्री किंवा दिवसा ईश्वरी शक्ती असलेल्या प्रकाशाचा प्रभाव पडतो. त्या प्रकाशाच्या प्रभावामुळे त्याच्यामध्ये आश्चर्यकारक परिवर्तन घडून येते आणि त्यावर एक अदृश्य हाताचे नियंत्रण असल्याची त्यास जाणीव होते व दृष्टी समोर आश्चर्यकारी जग दिसू लागते त्यावेळी त्यास जाणीव होते की ईश्वराचे अस्तित्व आहे आणि त्याच्या नेत्रांमध्ये पूर्वी कधीही नव्हती अशी प्रकाशाची दिव्य शक्ती निर्माण होते.

आम्हाला तो मार्ग कसा सापडू शकेल आणि आम्हाला तो दिव्य प्रकाश कसा प्राप्त होईल? हे लक्षात घ्या की प्रत्येक परिणामामागे किंवा कार्यामागे एखादे कारण असते आणि प्रत्येक कृतीमागे एखादे कारण असते आणि प्रत्येक कृतीमागे एक कृती करणारा असतो. प्रत्येक प्रकारचे भान संपादन करण्याचा एक मार्ग ठरलेला असतो आणि त्या मार्गाला सन्मार्ग असे म्हणतात. निसर्गाने अगदी प्रारंभापासून जे नीतिनियम ठरवून दिलेले आहेत त्यांना अनुसरून आचरण केल्याशिवाय या इहलोकी कोणत्याही गोष्टीची प्राप्ती होऊ शकणार नाही. सृष्टी

नियमावरून आपल्याला असे दिसून येते की प्रत्येक उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी एक योग्य मार्ग ठरवून देण्यात आलेला आहे आणि या मार्गाचे अनुसरण केल्यास त्या उद्दिष्टाची प्राप्ती होऊ शकते. उदाहरणार्थ, आपण एका अंधार असलेल्या खोलीत बसलो आहोत आणि आपल्याला प्रकाश हवा असेल तर सूर्यप्रकाश मिळविण्यासाठी त्या दिशेने असलेली खिडकी उघडणे हाच आमच्या दृष्टीने योग्य मार्ग असतो. जेव्हा आपण खिडकी उघडतो तेव्हा सूर्यप्रकाश तात्काळ खोलीमध्ये येतो आणि तिला प्रकाशमय बनवतो. त्यामुळे ईश्वराचे प्रेम आणि कृपा प्राप्त करण्यासाठी कोणतीतरी खिडकी असावी, आणि आत्मिक शुद्धावस्था प्राप्त करण्याची ठरवून दिलेली पद्धती असावी हे उघड आहे. म्हणून आपण आपली इतर उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ज्याप्रमाणे योग्य मार्ग शोधतो त्याचप्रमाणे आत्मिक शुद्धावस्थेप्रत नेणारा योग्य मार्ग आपण शोधला पाहिजे. केवळ आपल्या तर्कबुद्धीचा वापर करून आणि आपण स्वतःच ठरविलेल्या पद्धतीने ईश्वराचा शोध घेणे ही योग्य पद्धती नव्हे. केवळ त्या ईश्वराच्या शक्तिमान हातांनाच उघडता येतात ते दरवाजे आपल्या तर्कबुद्धीने आणि तत्त्वज्ञानाने खुले होऊ शकणार नाहीत. आपण आपल्या पद्धतींनी त्या चिरंजीव व स्वयंपूर्ण ईश्वराचा शोध घेऊ शकत नाही. या उद्दिष्टाची प्राप्ती करण्याचा केवळ एकच योग्य मार्ग आहे आणि तो म्हणजे प्रथमतः आपण आपल्या सर्व शक्ती व सामर्थ्यानिशी आपले जीवन त्या सर्वशक्तिमान ईश्वराच्या ठायी अर्पण करावे आणि मग त्याची प्राप्ती होण्यासाठी प्रार्थनेमध्ये स्वतः मग्न व्हावे आणि अशा प्रकारे स्वतः ईश्वराच्याद्वारेच ईश्वराचा शोध घ्यावा.

### ५) आत्म्याचे चतुष् अंगी स्वरूप

**१) आत्म्याच्या चार अवस्था –** १) जागृती, २) स्वप्न, ३) सुषुप्ती आणि ४) तुरीय अशा आत्म्याच्या चार अवस्था आहेत. जागृतीत आत्म्यास बाह्य स्थूल गोष्टींचे ज्ञान होते. स्वप्नात त्याला सूक्ष्म वस्तूंचे ज्ञान होते. सुषुप्तीत कोणतेच स्वप्न किंवा इच्छा नसते. तो स्वकेंद्रस्थ असतो. तुरीयावस्थेत त्याला कोणतेच ज्ञान होत नाही. तो जाणिवेच्यापलीकडे असतो. अशा आत्म्याला प्रपंचोपशम, शांत, शिव, अद्वैत म्हणतात.

आत्म्याचे ज्ञान हे कल्पनेने होत नसून प्रत्ययाने होते. ज्ञान हा आत्म्याचा आगंतुक गुण आहे. आत्मा अस्तित्वात असून अंतःस्फूर्त ज्ञानाने कळतो. आत्मा स्वतःसिद्ध आहे. मोक्ष ही आत्म्याचीच शुद्धावस्था होय. भक्ती, प्रेम व सदाचरण हीच आत्म्याच्या उन्नतीची खरी साधने होत.

**२) आत्म्याच्या चार शक्ती –** १) संभाव्य किंवा सुप्त प्रज्ञा, २) क्रियाशील प्रज्ञा, ३) कारक प्रज्ञा आणि ४) उपार्जित प्रज्ञा अशा आत्म्याच्या चार शक्ती आहेत. आत्म्याच्या या चार शक्ती प्रसिद्ध इस्लामी तत्त्वज्ञ अबू नासर अल–फ़राबी प्रणीत आहेत. या चार शक्तींचे सविस्तर विवेचन याअगोदर आलेलेच आहे.

**३) आत्म्याची चार कार्ये (कार्यशक्ती) –** १) कल्पना, २) स्मृती, ३) वासना आणि ४) बुद्धी अशी आत्म्याची चार कार्ये होत. पाश्चात्त्य तत्त्वज्ञानामध्ये सामान्यपणे इंद्रिये, कल्पनाशक्ती किंवा अंतःकरण किंवा सामान्य–बोध, स्मृती, इंद्रिय–वासना, बुद्धी, बौद्धिक वासना किंवा अध्यवसाय ही आत्म्याची कार्ये किंवा कार्यशक्ती होत असे मानले जाते.

**४) आत्म्याच्या चार श्रेणी (रांगा) –** गुणांच्या उतरंडीच्या आधारे इस्लामी अध्यात्मशास्त्रामध्ये आत्म्याच्या चार रांगा म्हणजेच श्रेणी कल्पिण्यात आलेले आहेत. तदनुसार १) प्रथम रांग प्रेषितांची, २) द्वितीय रांग संतांची, ३) तृतीय रांग श्रद्धावंतांची आणि ४) चतुर्थ व शेवटची रांग अश्रद्धावंतांची आहे.

मनुष्याच्या आत्म्याचे आध्यात्मिकता आणि आध्यात्मिक क्रिया हे प्रधान घटक आहेत, आणि आत्मा जसजसा बाह्य जगतापासून मुक्त होत जातो तसतशी त्याची अभिव्यक्ती अधिकाधिक पूर्ण होत जाते. सत्य, सुंदर व शिव हे आत्म्याचे तीन अंश (पैलू) कधीही स्वतंत्र नसतात. ते एकमेकांशी निगडित असतात. 'तत्त्वज्ञान हे आत्म्याचे औषध आहे' असे एपिक्युरस म्हणतो. 'हृदयाचे पावित्र्य, विरक्ती, प्रार्थना व ध्यान यांनीच खरे तत्त्वज्ञान प्राप्त होते. तत्त्वज्ञानाची परिणती गूढ चिंतनात (ईश्वरी रहस्याच्या ध्यानात) होते. आरंभी मनुष्य स्वतःच्या प्रयत्नाने या चिंतनाकडे लक्ष लावतो, नंतर ईश्वरी कृपाप्रसादाने तो आपोआपच त्यात रममाण होतो.' –ह्यू व्हिक्टर

## ६) सूफ़ी तत्त्वज्ञानप्रणीत आत्म्याचे विवेचन[६५]

सूफ़ींचे असे मत आहे की परमेश्वरास ओळखण्यासाठी प्रथम स्वतःस जाणणे आवश्यक असते. 'परमेश्वरामध्ये परतण्यासाठी' ज्या साधनेची आवश्यकता असते त्यासाठी हे आवश्यक आहे की, मानवाने स्वतःस आपले शरीर आणि आत्म्यास ओळखले पाहिजे. एका हदीस (प्रेषित–वचना)मध्ये असे म्हटले गेले आहे की 'पृथ्वी आणि आकाशामध्ये मी सामावू शकत नाही, परंतु माझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्या दासांच्या म्हणजेच भक्ताच्या हृदयामध्ये मी विराजमान असतो.' ('मी' म्हणजे परमेश्वर) परमेश्वराची सत्ता अणू–रेणूमध्ये विद्यमान असते. तो प्रत्येक अणु–रेणूमध्ये विराजमान असतो, परंतु माणूस आपल्या अपूर्णतेमुळे त्याला पाहू शकत नाही. त्याच्या 'एकत्त्वे'स ओळखणे यासाठी कठीण होऊन जाते की सृष्टीचे सर्व पदार्थ, सर्व जगत् प्रपंच हे स्वतःच पटल–पडदा बनलेले असतात, आणि पडदा आड असल्यामुळे त्यापलीकडील वस्तू दिसू शकत नाहीत. म्हणून त्या 'एकत्वा'ची जाणीव त्यास होत नाही. माणूस हा स्वतः आपले स्वार्थ आणि आपल्या चिंतांमध्ये आकंठ बुडलेला असतो. त्याला इतर काही पाहण्याची सवड नसते. याच कारणामुळे ऐहिक माया–मोहांमध्ये गुरफटलेले त्याचे हृदय–मन–चित्त हे परमेश्वर आणि त्याच्या दरम्यान एक आवरण स्वरूपात आडकाठी बनून जाते. सूप्रसिद्ध फ़ारसी तत्त्वज्ञ कवी रूमीने आपल्या 'मसनवी' (कथा–काव्य) मध्ये असे म्हटले आहे की परमेश्वराने प्रेषित (मुहम्मद स) यांना असे सांगितले की मी वर–खाली, आकाश, पृथ्वी, स्वर्ग यांपैकी कोठेच नसतो, परंतु एवढे मात्र निश्चित आहे की मी खजिन्याप्रमाणे श्रद्धावंताच्या हृदयामध्ये सुरक्षितपणे लपलेला असतो. म्हणून जर परमेश्वराचा शोध घ्यायचा असेल तर त्याला अशाच प्रकारच्या चित्तामध्ये शोधले पाहिजे. तो परम–सौंदर्य तशाच प्रकारच्या चित्तामध्ये निवास करतो. म्हणूनच परमेश्वरास बाहेर कोठेच शोधले जाऊ नये. म्हणून आत्मा आणि परमात्मा यांच्या संबंधात विचार करण्यासाठी सूफ़ींचा आत्म्यासंबंधी सिद्धांत जाणणे आवश्यक आहे.

सूफ़ी आत्म्याचे दोन भेद करतात – १) नफ़्स (पतित आत्मा किंवा वासना) आणि २) रूह (उच्च किंवा विशुद्ध आत्मा). नफ़्स हे खालच्या प्रकारचे – हीन कोटीचे असते. ते सर्व प्रकारच्या कुप्रवृत्तींचे स्थळ असते. रूह सदवृत्तींचे उगमस्थळ आहे. नफ़्स भावावेगाने सक्रिय –परिचालित असते, तर रूह विवेकाद्वारे. या दोहोंमध्ये संघर्ष निरंतर चाललेला असतो आणि ते आत्म्यास परस्पर विरुद्ध दिशांमध्ये ओढत असतात. सूफ़ींच्या मतान्वये उच्चतर आत्मा म्हणजेच रूह याचे अस्तित्व शरीर निर्माण होण्याअगोदर असते आणि परमेश्वरच आत्म्यास मानव–शरीरामध्ये पाठवून देतो. या उच्चतर आत्मा–रूह–चे पण तीन विभाग मानण्यात

आले आहेत – १) क़ल्ब अथवा मन, २) रूह अथवा प्राण, आणि ३) सिर्र अथवा मर्म किंवा अंत:करण. हे सिर्रच सर्वात आतील भाग आहे. येथेच सूफ़ी साधक परमेश्वराचे दर्शन करीत असतात. येथे कसल्याच प्रकारची कलुषता प्रवेश करू शकत नाही. हेच जणु परमेश्वराचे निवासस्थान आहे. तेथे तो मनुष्यास ओळखत असतो आणि मनुष्य तेथे परमेश्वराचे ज्ञान प्राप्त करत असतो. उमर बिन–उस्मान अल–मक्की (मृत्यू इ.स. ९०९च्या सुमारास) हे सूफ़ी साधक आत्म्याविषयी लिहितात – ''शरीर निर्माण होण्याच्या सात हजार वर्ष अगोदर परमेश्वाने क़ल्ब अथवा मन निर्माण केले आणि त्यास आपल्या जवळ ठेवून घेतले. क़ल्ब अथवा मनाच्या निर्माणाअगोदर सात हजार वर्ष परमेश्वराने रूह अथवा प्राण निर्माण केले आणि त्याला परमेश्वराचे साहचर्य ('उन्स') लाभले आणि रूहच्या पण सात हजार वर्ष अगोदर त्याने सिर्र अथवा अंत:करण निर्माण केले आणि त्याला 'वस्ल' म्हणजे एकमेकतेची अवस्था किंवा तद्रुपता प्राप्त झाली. परमेश्वराने अंत:करणावर दर दिवशी तिनशे साठ वेळा आपल्या सौंदर्याचे रहस्य उद्घाटित होऊ दिले आणि त्याच्यावर तीनशेसाठ वेळा आपली दयादृष्टी फिरविली आणि रूह अथवा प्राणास प्रेम–तत्त्वाशी परिचय करून दिला आणि क़ल्ब अथवा मनावर तीनशेसाठ वेळा साहचर्याचे भेद प्रकट केले. याचा परिणाम असा झाला की ते या दृश्य जगाकडेच पाहत राहिले आणि स्वत:सच श्रेष्ठ मानले आणि अशा प्रकारे त्यांच्यामध्ये अहंकार आणि दंभाची भावना निर्माण झाली आणि ते संपूर्णपणे अहंकारी बनून गेले. ....... यानंतर परमेश्वराने सिर्रला रूहमध्ये, रूहला क़ल्बमध्ये आणि क़ल्बला शरीरामध्ये बंदिस्त करून टाकले. यानंतर त्यांच्याशी त्याने बुद्धीचा संयोग घडवून आणला आणि प्रेषितांना पाठवून दिले आणि आदेश दिले आणि तेव्हा त्यांच्यापैकी प्रत्येक आपापल्या प्रारंभिक अवस्थेस प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील झाला. परमेश्वाने त्यांना प्रार्थना करण्याचा आदेश दिला. यांपैकी शरीर तर प्रार्थनेमध्ये मग्न झाले आणि मन प्रेमाचा अधिकारी बनला. रूहला त्याचे सान्निध्य प्राप्त झाले आणि अंत:करणास त्याच्याशी (परमेश्वराशी) एकत्व प्राप्त करण्यामध्येच शांतता प्राप्त करण्याचा अनुभव आला!'' (अली बिन उस्मान हुजवीरी – 'कश्फ़ुल महजूब' पृ. ३०९)

सूफ़ींच्या मतानुसार हा आत्मा संसारामध्ये येण्यापूर्वी परमेश्वराशी अभिन्न स्वरूपात होता. तो या संसारामध्ये विद्यमान असताना आपल्या निर्मात्यापासून निर्वासित असतो आणि ज्या काळापर्यंत तो मानवी शरीरामध्ये (वास करून) असतो तो त्याचा निर्वासनकाळ असतो. हा आत्मा अपार्थिव आहे आणि वास्तविक हे जग त्याचे निवासस्थान नव्हे. तो त्या आध्यात्मिक जगापासून काही कारणवश जगामध्ये येतो आणि या जगामध्ये निवास करण्याकरिता त्याला या जगाशी अनुरूप असे शरीर धारण करावे लागते तरी पण त्याचे आकर्षण हे आपल्या वास्तविक निवासस्थानाकडे असते. परंतु हे शरीर आणि जड जगताचे नानाविध प्रलोभने त्याच्यावर अशाप्रकारे प्रभाव टाकत असतात की त्याच्यासाठी आपले उगमस्थान आणि आपल्या वास्तविक जगाचे ज्ञान प्राप्त करून घेणे कठीण होऊन जाते.

हा आत्मा सर्वप्रथम तर पवित्र (म्हणूनच) निर्माण झाला होता परंतु नफ़्स (वासना) त्याला खाली खेचण्याचा प्रयत्न करते. नफ़्समुळेच आत्मा कलुषित बनतो आणि त्याच्यामध्ये कुप्रवृत्ती – वाईट विचार प्रवेश करतात. तो आत्म्यास नरकाकडे घेऊन जातो. परमेश्वराने नफ़्सची निर्मिती यासाठी केली आहे की, तो आत्म्यास न चुकता प्रहार करत असावा की जेणेकरून आत्म्यास परमात्म्याचे विस्मरण होऊ नये. रूह (प्राण)

आत्म्यास वर ओढून घेतो. परमेश्वरासंबंधी प्रवृत्तींचे हे निवासस्थान आहे म्हणून साधक हा रूह द्वारे नफ़्सवर नियंत्रण राखू (ठेवू) शकतो. साधनेद्वारे आत्म्याच्या कलुषतेस दूर केले जाऊ शकते आणि त्याला पूर्वावस्था प्राप्त होऊ शकते, कारण की आत्मा वास्तविक पवित्र आणि स्वच्छ असतो. अबू तालिबचे असे मत आहे की साधक हा मनास पवित्र करून परमेश्वराच्या विभूतींचे ध्यान करत क्रमशः त्या अवस्थेमध्ये पोहोचू शकतो की परमेश्वराच्या स्मरणाशिवाय त्याच्या आत्म्यामध्ये इतर काहीच (शिल्लक) असू शकत नाही. हे 'ज़िक्र' (नामस्मरण) आणि 'मुराक़बा' (ध्यान) यांच्या द्वारेच शक्य होऊ शकते.

आत्मा, क़ल्ब, रूप, नफ़्स इत्यादींसंबंधी अनेक प्रकारची मते आहेत. क़ल्ब, माणसाच्या बौद्धिक क्रियांच्या आधारे आहे. हा अंतर्मनातील – अंतरतमातील अत्यंत गोपनीय आणि सच्चाभावनांची उद्भावना करणारा आहे. हा बाह्य इंद्रियांद्वारे दृश्य जगामधील अभिव्यक्त होणारे परमेश्वरासंबंधी ज्ञानास ग्रहण करतो आणि त्यांना अंतर्मनामध्ये प्रकाशित करतो. अंतर्मनाच्या सूक्ष्म इंद्रियांना त्याच्याशी अवगत करवितो. याचा बुद्धीशी संबंध आहे. बुद्धीद्वारे परमेश्वरास जाणले (ओळखले) जाऊ शकत नाही, परंतु क़ल्ब काहीसा असा आहे की तो सर्व पदार्थांचे (सदार्थांचे) सार-तत्त्व जाणू शकतो आणि जेव्हा ज्ञान आणि श्रद्धा यांचा प्रकाश त्याच्यावर पडतो तेव्हा अध्यात्म विश्वाचे संपूर्ण रहस्यांचे ज्ञान तो प्राप्त करू शकतो. तो इंद्रियांचा शिकार बनून (विषय वासनेमध्ये लिप्त होऊन) कधी तर्काच्या बळावर एका बाजूस ओढला जातो तर कधी वासनेच्या आहारी जाऊन दुसरीकडे. ही (अवस्था) भौतिक स्थूल जगत आणि अध्यात्मिक (सूक्ष्म) जगत् यांच्या दरम्यानची आहे. विश्वब्रह्मांडाचे दोन भाग आहेत. एक दृश्य पार्थिव जड जगत् आहे. हे आदिभूतापासून उत्पन्न झालेले आहे. यास आलमे ख़ल्क़ असे म्हणतात. दुसरे अदृश्य, आध्यात्मिक जगत आहे. हे परमेश्वराच्या आज्ञेमुळे एका निमिषमात्रात उत्पन्न (निर्माण) झालेले आहे. परमेश्वराने आदेश दिला –'कुन' ('होऊन जा', 'भव') आणि ते बनले (निर्माण झाले) यास आलमे-अम्र असे म्हणतात. क़ल्ब या दोहोंच्या मध्ये स्थित आहे. वास्तविक हे रूह (आत्मा) आणि नफ़्स (वासना) यांच्या मध्यभागी आहे. प्रकाश आणि अंधःकार यांच्या संधि-स्थळावर स्थित जणू काही एक कुरूक्षेत्र म्हणजेच युद्धक्षेत्र बनून राहिलेला असतो. येथे सद्वृत्ती आणि कुप्रवृत्ती यांच्यामध्ये संघर्ष चाललेला असतो. एकीकडे हा परमेश्वरासंबंधी ज्ञान प्राप्त करण्यासाठी मोकळा असतो तर दुसरीकडे तो इंद्रियजन्य माया-मरीचिकास प्रवेश करू देतो. आरशासमान तो परमेश्वराच्या नामांना प्रतिबिंबित करतो. इब्नुल अरबीचे मत आहे की परमेश्वराच्या ज्या नामा (इस्म)चे साक्षात् तो करतो त्या नामास अनुरूप असे रूप हा ग्रहण करतो जसे मेण अनेक प्रकारच्या आकृतींमध्ये परिवर्तित होऊन जातो. हा क़ल्ब, रक्त-मांसाने बनलेल्या हृत्पिंडापासून भिन्न आहे. तरी पण या शरीरामध्ये हृदयासोबत तो एक रहस्यमय पद्धतीने जोडला गेला आहे.

इब्नुल फ़रीदने रूहला अमर मानले आहे आणि असे दाखवून दिले आहे की, त्याच्यामध्ये वाईटपणा येऊ शकत नाही आणि अदृश्य जगामध्ये त्याचे ठिकाण आहे. परमेश्वराचे प्रेम हा रूहचाच विषय आहे, नफ़्सचा नव्हे. परमेश्वराच्या प्रेमाचे आश्रयस्थळ रूह आहे. अब्दुल करीम जीलीने रूह आणि रूहुल-कुद्स असे दोन विभाग केले आहेत. रूह (आत्मा)स जीलीने देवदूत मानले आहे. त्यास 'हक़ीक़तुल-मुहम्मदिया' म्हटले आहे आणि त्याला 'कुत्ब' असे नाव दिले आहे. जीलीच्या मतानुसार परमेश्वराने आपल्या ज्योतिच्या मदतीने रूह (आत्मा)ची सृष्टी केली आणि मग त्याच्यापासून विश्व (जगत्) निर्माण केले. 'रूहुल-कुद्स' (पवित्र आत्मा)

मानवाच्या शरीरामधील सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक इंद्रिय आहे. मनुष्याच्या शरीरामध्ये 'रूहुल-कुद्स'च्या प्रवेशासंबंधी जीली यांचे म्हणणे आहे की जेव्हा परमेश्वर स्वत:स अभिव्यक्त (प्रकट) करू इच्छितो तेव्हा तो मनुष्यामध्ये 'फ़ना' (निर्वाण)ची अवस्था निर्माण करतो. त्या परिस्थितीत मनुष्याच्या मनात मानवीय ज्योति आणि जीव-जगताच्या विशेषत्वाचे अवसान होऊन जाते आणि मग परमेश्वर एका आध्यात्मिक द्रव्यास त्या जागी मनुष्यामध्ये घुसवितो. हा द्रव्य परमेश्वराहून वेगळा नसतो आणि माणसाशी जुडलेला पण नसतो. यामध्येच परमेश्वर स्वत:स अभिव्यक्त करतो. परमेश्वराची अभिव्यक्ती परमेश्वराशिवाय कोठेच होत नाही. हेच द्रव्य 'रूहुल-कुद्स' आहे. (आर.ए.निकलसन - 'स्टडीज इन इस्लामिक मिस्टिसिझम' पृ. १२८) या पवित्र आत्म्यास जीलीने अनित्य आणि परमेश्वराद्वारे सृष्ट मानले आहे. रूह आणि रूहुल-कुदस हे दोन्ही परमेश्वराचेच आत्म्यासमान आहेत आणि परमेश्वराच्या अनुषंगाने हे नित्य आहेत तर मनुष्याच्या संबंधाने अनित्य.

हुजवीरी यांनी रूह (आत्मा)स एक सूक्ष्म द्रव्य-विशेष मानले आहे. हे गुण नव्हे. हे सूक्ष्म द्रव्य-विशेष ('जिस्म-ए-लतीफ़') आहे म्हणून याला पाहिले जाऊ शकते, परंतु ते साध्या डोळ्यांनी पाहिले जाऊ शकत नाही. हे फक्त 'चश्मेदिल' अर्थात् हृदयाच्या नेत्राने पाहिले जाऊ शकते. म्हणजेच मन:श्चक्षूच याला पाहू शकतात. हुजवीरीने याला अनित्य मानले आहे. रूह हे परमेश्वराद्वारे निर्मित असल्याचे तो मानतो. त्याचे म्हणणे आहे की शरीर निर्माण होण्याअगोदर हा विद्यमान होता. परमेश्वर शरीर आणि रूह (आत्मा) यांना जोडणारा आहे. जेव्हा शरीर निर्माण होते तेव्हा परमेश्वर त्याच्यामध्ये रूह (आत्मा) फुंकतो.

सूफ़ी मानवामधील सर्व प्रकारच्या वाईटांचे मूळ नफ़्सला (वासना) मानतात. त्यांच्या मतानुसार हा नफ़्स सदासर्वकाळ अध:पतनाकडे घेऊन जाणारा असतो. तो नित्य मानवास पतनाकडे प्रवृत्त करीत असतो. नफ़्स (जड आत्मा म्हणजे वासना) ला चांगल्या प्रकारे ओळखून त्याच्यावर विजय प्राप्त करणे. सूफ़ीसाठी आवश्यक असते, कारण की याच्याशिवाय परमेश्वराशी मिलन शक्य होत नाही. सूफ़ी साधकांनी याच्यापासून सावधान राहण्याविषयी वारंवार कल्पना दिली आहे. अबू सुलेमान दारानी यांनी म्हटले आहे की नफ़्स (वासना) फार मोठे धोकेबाज आहे. जे परमेश्वराच्या मार्गावर चालतात त्यांच्या आड तो येतो. याचे दमन (करणे) हे सर्वात मोठे कर्तव्य आहे. प्रेषित मुहम्मद स. यांनी इतर संघर्षांपेक्षा 'मुजाहदत अल्-नफ़्स' अर्थात् आपल्या वासनेविरुद्ध संघर्षास उच्च स्थान दिले आहे. जुन्नून मिस्री, अबू यज़ीद बिस्तामी, मुहम्मद बिन अली अल-तिरमिजी, जुन्नैद बग़दादी इत्यादी मोठ-मोठ्या सूफ़ी साधकांनी नफ़्सला ओळखून त्याच्याशी संघर्ष करणे आणि त्याचे दमन करण्यावर विशेष भर दिले आहे. जुन्नैदनी तर इथपर्यंत म्हटले आहे की नफ़्सच्या इशाऱ्यावर नाचणारा माणूस हा पक्का श्रद्धाहीन (काफ़िर) किंवा नास्तिक असतो. तो इस्लाम विरोधी आचरण करणारा असतो.

तसे पाहता 'नफ़्स' या शब्दाचा अर्थ काही वाईटपणाचा द्योतक नाही. याचा (खरा) अर्थ 'एखाद्या वस्तूचे तत्त्व आणि वास्तविकता' आहे, परंतु लोकांनी याचा वेगवेगळ्या अर्थांनी प्रयोग केला आहे. साधारणपणे सूफ़ी याला जड आत्मा किंवा वासना म्हणून असे संबोधतात. हा वाईट मार्गाकडे घेऊन जातो. अब्दुल करीम जीली असे मानतात की इब्लीस (शैतानांचा महागुरू) हा नफ़्सपासून उत्पन्न झालेला आहे, आणि सर्व प्रकारच्या वाईटांचे मूळ यालाच मानतात. या नफ़्सला सूफ़ी एक पदार्थ, एक द्रव्य-विशेष मानतात. सूफ़ी साधकांच्या कथांवरून असे दिसते की त्यांनी या नफ़्सला नाना रूपांमध्ये, नाना जीवांच्या आकृती धारण करताना पाहिले आहे.

एका दरवेशाचे असे म्हणणे आहे की त्याने आपल्या नफ़्सला एका मूषका (उंदरा) च्या स्वरूपात पाहिले. नफ़्सच्या स्वरूपाविषयी अधिक माहिती विचारली असता त्या दरवेशास सांगण्यात आले की जे सतर्क (जागरूक) नसतात त्यांचे तर तो विनाशच करून टाकणारा आहे, कारण की तो नेहमी वाईटाकडेच खेचत असतो. याशिवाय त्याने असे पण सांगितले की जे परंपरेस प्रेम करणारे आहेत त्यांचा तर तो मुक्तिदाता आहे, कारण की तो वाईटासह त्यांच्यासोबत नसता तर ते आपल्या पावित्र्याचे गर्व आणि अहंकाराने भरून गेले असते. शेख़ अबुल क़ासिम गुरगाँवी यांनी त्याला सापाच्या रूपात पाहिले होते. गुरगाँवी हे आपल्या काळचे एक प्रख्यात 'कुत्ब' होते. शेख अबुल अब्बास शकरनीने त्याला एक पिवळ्या (रंगाच्या) कुत्र्याच्या रूपात पाहिले होते. नसाच्या मुहम्मद बिन उलयानच्या गळ्यामधून तो एक कोल्ह्याच्या रूपात निघाला. मर्वच्या शेख अबू अली सियाहने त्यास आपल्याच स्वरूपामध्ये पाहिले. काहीनी जणू त्याचे केस शेख (सद्गुरू) च्या हातांमध्ये धरण्यास दिले आणि शेख यांनी त्याला झाडास बांधले. जेव्हा ते त्याला नष्ट करू इच्छित होते तेव्हा नफ़्सने त्याला म्हटले की, 'लश्करे खुदायम' म्हणजेच मी परमेश्वराचा सैनिक आहे. (म्हणून) त्याला नष्ट केले जाऊ शकत नाही.

सूफ़ी साधकांच्या कथांपासून नफ़्सविषयी त्यांच्या दृष्टिकोनाचा पत्ता लागतो. एक तर ते की वास्तविक नफ़्स एक द्रव्य–विशेष आहे. तो नाना रूपे धारण करतो आणि तो गुण नव्हे आणि दुसरे हे की तो वाईटपणाचे मूळ आहे. तिसरे हे की त्याचे विनाश घडवून आणता येऊ शकत नाही, यद्यपि वाईटापासून दूर करण्यासंबंधी प्रयत्न केले जाऊ शकतात. चौथे असे की याच्या अस्तित्वाची गरजच नव्हे तर आवश्यकता आहे की ज्याच्यामुळे साधक हा नेहमी सावध म्हणजे सावधानचित्त असावा आणि आपल्या आध्यात्मिक मार्गावर त्याने अविचल–दृढ असावे.

नफ़्सवर विजय मिळविण्यासाठी सूफ़ी साधक वेगवेगळ्या उपायांचा अवलंब करतात. यांपैकी काही बाह्य आहेत. यांचा संबंध शरीराशी असतो, आणि काही उपाय असे आहेत की ज्यांचा संबंध अंत:करणाशी असतो. याच्या दमनासाठी सूफ़ी साधक उपवास, मौन, एकांत–सेवन इत्यादींचा आश्रय घेतात.

कित्येक असे साधक आहेत की जे नफ़्सच्या दमनासाठी उपवास–व्रत करतात. असे म्हटले जाते की उपवासामुळे नफ़्सवर नियंत्रण ठेवणे शक्य होते आणि याच्या अभ्यासामुळे हळू–हळू नफ़्स पवित्र आणि शुद्ध बनतो. सहल बिन अब्दुल्ला तश्तरी यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यामध्ये फार थोडेच (अल्प प्रमाणात) भोजन केले होते. पंधरा दिवसांनंतर ते एकदा भोजन करायचे. अशा प्रकारे नफ़्सवर नियंत्रण ठेवण्यास म्हणजेच उपवास–व्रताच्या आधारे नफ़्सला नियंत्रणाधिन करण्याच्या क्रियेस सूफ़ी 'अल मौतुल अबयाज़' अर्थात् श्वेत मृत्यू असे म्हणतात. सुंदर वस्त्रांचा त्याग करून जुने कपडे नेसून गरीबाप्रमाणे जीवन व्यतीत करण्यास 'अल मौतुल अख़्ज़र' अर्थात हरित मृत्यू असे म्हणतात. आणि तिसऱ्या प्रकारचा आणखी एक मृत्यू आहे, ज्याला 'अल मौतुल अस्वद' म्हणजेच कृष्ण मृत्यू (काळा मृत्यू) असे म्हणतात. यामध्ये साधक हा जाणूनबुजून धोका मोल घेतो. सत्यासाठी सर्व प्रकारचे त्रास सहन करतो आणि कष्टांच्या स्वागतासाठी तत्पर असतो.

नफ़्सच्या शुद्धिकरणाच्या प्रक्रियेस लक्षात घेवून त्याच्या कोटि (श्रेणी, प्रकार) सांगण्यात येतात. त्या अशा – (यांच्यापैकी काहींमध्ये वासनेचा अंश असतो)

१) नफ़्से अम्मारा (दुष्टात्मा, भ्रष्ट आत्मा)
२) नफ़्से लव्वामा (दूषित करणारा आत्मा, प्रदूषणकारी आत्मा)
३) नफ़्से मुल्हिमा (अनुप्राणित आत्मा, ईशप्रेरित आत्मा)
४) नफ़्से राज़िय्या (संतुष्ट आत्मा, तृप्त आत्मा)
५) नफ़्से मरेज़्ज़िय्या (तुष्टिदायक आत्मा)
६) नफ़्से मुतमइन्ना (प्रशांत आत्मा)
७) नफ़्से साफ़िया व कामिल (विशुद्ध आणि परिपूर्ण आत्मा)

अशा प्रकारे सूफ़ींनी अनेक प्रकारे आत्म्याविषयी विचार प्रकट केलेले आहेत. आत्म्यामध्ये अशी शक्ती आहे की तो या भौतिक जगापासून पलीकडे जाऊन परमेश्वराशी साक्षात्कार करू शकतो, त्याच्याशी तो एकरूप होऊ शकतो. या भौतिक जगापासून आध्यात्मिक जगामध्ये पोहोचणे सच्च्या साधकास सहज शक्य आहे. त्याच्यावर परमेश्वराची दयेची सावली नेहमी राहते. तिच्याच मदतीने कुठल्याही अभ्यासाविना या स्थूल जगाच्या बंधनांना तोडून – छिन्न-विछिन्न करून तो त्या (आध्यात्मिक) जगामध्ये पोहोचतो. यासाठी भरपूर साधनेची गरज (निकड) असते. विभिन्न उपायांनी साधक या शक्तीस प्राप्त करतो. क्रमशः तो अग्रेसर होतो आणि त्याच्या (डोळ्यासमोर) असलेले पटले हळू-हळू दूर सारले जातात आणि मग तो परमेश्वराच्या विभूतींचे दर्शन करू शकतो. साधकाचे उद्दिष्ट याहून पुढे जाण्याचे असते. तो त्या अवस्थेस प्राप्त करू इच्छितो की ज्यामध्ये तो परमेश्वराशी एकरूप होऊ शकेल. तादात्म्य प्राप्त करू शकेल. म्हणून आत्म्याच्या रहस्यांना जाणणे आणि त्यावर नियंत्रण प्राप्त करणे हे सूफ़ी साधनेचे महत्त्वपूर्ण अंग आहे.

### ७) सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून आत्म्याचे स्वरूप व त्याचे प्रकार[६६]

**सूक्ष्म शरीर – स्पष्टीकरण**

मानवाच्या भौतिक दृश्य शरीरामध्ये एक आंतरिक सूक्ष्म शरीर घेरलेले आहे. सूफ़ींच्या पारिभाषिक शब्दामध्ये याला 'नफ़्स' (वासना), 'क़ल्ब' (मन) आणि 'रूह' (प्राण किंवा आत्मा) असे म्हणतात. याला फक्त अंत:श्चक्षूंनी पाहता येऊ शकते. स्वप्न, दैवी सुसमाचार (बशारत), देववाणी (आकाशवाणी) (इलहाम), प्रेषितांसाठी दैवी आदेश (वहइ), दिव्यदृष्टीज्ञान (कश्फ़) आणि चमत्कार (करामत व मुअजिज़ात), तसेच दैवी प्रेरणा (इल्क़ा) या सर्वांचा संबंध याच सूक्ष्म शरीराशी असतो. हेच सूक्ष्म शरीर खरे तर मानवाचे वास्तव आहे. या वास्तवास जो कोणी आत्मा, मन आणि वासनेच्या बळावर ओळखेल तो आत्मज्ञानाशी परिचित होईल. मानवी छातीच्या डाव्या बाजूस असलेला मांसाचा गोळा म्हणजे मन नव्हे. परंतु मानवाचे वास्तव असलेले त्या मनास बाह्य डोळे पाहू शकत नाहीत. जी वस्तू बाह्य डोळ्यांनी दिसते तिला दृश्य जग असे म्हणतात. हे अंतर्मन अदृश्य जगामधून येऊन या दृश्य शरीरामध्ये यासाठी स्वार झालेला आहे की मानवाने परलोकाच्या अनंताच्या यात्रेचे टप्पे पार पाडावेत. मांसाचा गोळा ज्याला मन असे म्हणतात तो त्याची स्वारी आहे आणि शरीराचे सर्व अवयव हे त्याचे शस्त्र आणि लष्कर आहेत आणि तो मन (चित्त, अंत:करण) सर्व शरीराचा शासक आहे. ब्रह्मज्ञान आणि त्याच्या अपार सौंदर्याचे दर्शन या मनाचे गुण आहे, आणि त्याच्यावरच कष्टदायक उपासनेचा

भार लादलेला आहे. त्यालाच जाब-जबाब आणि हिशोब द्यायचा आहे. धर्मशास्त्रानुसार त्यालाच श्रेयांक प्राप्त करायचे आहेत आणि दंड भोगायचे आहे.

**वासनेची ओळख**

वासना ('नफ़्स') एक परंतु तिचे दुर्गुण असंख्य! वासनेस ओळखणे सोपे नाही. यथाशक्य तिची ओळख करून घेणे जरुरीचे आहे. इतकेच नव्हे तर ईश्वराच्या मार्गाकडे अग्रेसर होण्यासाठी ते अनिवार्य ठरते. ते यासाठी की वासनेच्या ज्ञानावर ईश्वराचे ज्ञान (प्राप्त करून घेणे) अवलंबून असते. ईश्वराची ओळख नसेल तर उपासना-भक्ती व्यर्थ आहे आणि भक्तीच्या स्वीकृतीवरून ईश्वराचे दासत्व सिद्ध होते आणि दासत्वाच्या सिद्धत्वेमध्येच उपास्यत्व, एकत्त्व आणि मीलन कायम होते. वासना (नफ़्स) मानवाचे निंद्य असे दुर्गुण आहे, तर विशुद्ध आत्मा (रूह) त्याचे प्रशंसनीय असे सद्गुण आहे.

**क) नफ़्सचे प्रकार**

**१) नफ़्से अम्मारा अर्थात् भ्रष्ट आत्म्याची ओळख**

सर्वश्रेष्ठ ईश्वराचे वचन आहे - ''वाईटाकडे प्रवृत्त करणे हे भ्रष्ट आत्म्याचे (नफ़्से अम्मारा) कार्य आहे.'' आणि ''तुझा घोर शत्रू तुझी वासना आहे, जे तुझ्या दोन्ही पैलूंच्या (वक्षस्थळाच्या) दरम्यान आहे.''
'नफ़्से अम्मारा' म्हणजेच नाठाळ वासनेशिवाय दुसरे काहीच नाही.

**भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा) चा जन्म**

एक प्रेषित - वचन (हदीस) मध्ये असे म्हटले आहे की प्रेषित आदम यांनी सर्वप्रथम जेव्हा आपली दृष्टी उत्तुंग अशा ईश्वरी सिंहासना ('अर्श मुअल्ला') वर टाकली तेव्हा त्यांना त्यावर असे लिहिलेले आढळले - 'ला इलाह इल्लल्लाह, मुहम्मदुर्रसूलुल्लाह' म्हणजेच अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही (आणि) मुहम्मद स. हे अल्लाहचे ईशदूत (रसूल) आहेत. हे पाहिल्यावर त्यांच्या मनामध्ये स्वाभिमान जागृत झाला आणि ईश्वराच्या दरबारामध्ये त्यांनी असे निवेदन केले की अल्लाहचे ईशदूत (रसूल) मुहम्मद स. हे कोण बरे आहेत? त्यावर असा आदेश आला की, मुहम्मद स. हे ब्रह्मांड निर्मितीचे कारणस्वरूप आहेत. ते प्रेषित परिसमापक आहेत, इहलोक व परलोक या दोन्ही जगांसाठी कृपास्वरूप आहेत, समस्त प्रेषितांचे प्रमुख आहेत आणि आत्म्यांचे पिता आहेत. शेवटच्या युगात तुमच्या संततीत जन्मतील आणि तुमच्या अपराधांचे मोक्षदाता असतील. ही प्रशंसा ऐकून प्रेषित आदम यांच्या मनामध्ये एक प्रकारची दुष्प्रेरणा निर्माण झाली की पुत्राचे पित्यासाठी मोक्षदाता बनणे कसे (संभव) असू शकेल? तेव्हा तत्काळ सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या आदेशावरून सर्वप्रमुख देवदूत जिब्रईल हे प्रेषित आदम यांच्या सेवेत उपस्थित झाले. त्यांनी त्यांच्या दुष्प्रेरणेचे दोन भाग केले. त्यापैकी अर्ध्या हिश्श्यास स्वर्गामध्ये पेरून टाकले व परिणामी नवपरिणितासारखे गव्हाच्या दाण्यापासून गहूची सुंदर रोपे उगवली (आणि पुढे) हेच प्रेषित आदम यांच्या लज्जेचे व पश्चात्तापाचे कारण बनले आणि उरलेला दुसरा अर्धा भाग प्रेषित आदम यांच्या पोटात बाकी राहिला. या हिश्श्यापासून भ्रष्ट आत्मा म्हणजेच नफ़्से अम्मारा जन्मला.

हा भ्रष्ट आत्मा आदम यांच्या संततीसोबत उत्पन्न होतो आणि तो मानवासोबत शेवटच्या श्वासापर्यंत असतो, परंतु तो आपले स्वरूप व गुण सतत बदलत असतो. हदीसमध्ये असे निवेदन आहे की प्रत्येक

मानवासोबत एक जिन्न अर्थात् यक्ष-किन्नर, शैतान उत्पन्न होतो. यावर प्रेषितांच्या सहचरांनी - सोबत्यांनी अशी विचारणा केली की, हे अल्लाहचे ईशदूत (रसूल) काय आपल्यासोबत पण हा यक्ष-शैतान असतो? यावर ते उत्तरले की, होय माझ्यासोबत पण एक जिन्न म्हणजेच यक्ष-किन्नर, शैताना उत्पन्न झालेला आहे, परंतु माझा तो शैतान मुसलमान झाला.

**भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा) चा स्वभाव**

सत्कार्यांपासून लांब ठेवणे, वाईट कामाकडे रस निर्माण करून प्रवृत्त करणे, ईश्वर आणि त्याचे प्रेषित यांच्या विरोधात कटिबद्ध असणे हा भ्रष्ट आत्म्याचा स्वभाव आहे. याव्यतिरिक्त लोलुपता, हाव, विषय वासनेत लिप्त राहणे, श्रद्धाहीनता, सहभागिता, अहंकार, बडेजावपणा यासारख्या अनेक वाईट प्रवृत्ती त्याच्यामध्ये असतात.

भ्रष्ट आत्म्याचा प्रभाव वासनेवर प्रबळ असतो. वासनेच्या चवीमुळे हा आत्मा फार मस्त असतो. कधी कधी तर भ्रष्ट आत्मा हा दैवी प्रेमास भौतिक प्रेमामध्ये रूपांतरित करून टाकतो. मोठमोठे साधू-संत, सद्गुरू, ज्ञानी आणि उपासक यांना ऐन वेळेस आपल्या वासनेच्या जाळ्यामध्ये ओढून शैतानाच्या स्वरूपामध्ये बदलून टाकतो. हदीसमध्ये असे सांगण्यात आले आहे की भ्रष्ट आत्म्याची धोकादायक चाली हजार प्रकारच्या आहेत. हा आत्मा साधनामार्गावरील फार मोठा शत्रू आहे. निर्लज्ज श्रद्धाहीन असे या भ्रष्ट आत्म्याचे चित्र आहे. तो एकेश्वरवादाचा महा शत्रू आहे.

**भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा)चे वास्तव**

याच्या स्वभावामध्ये नेहमी उद्धटपणा प्रबळ असतो. म्हणून हा भ्रष्ट आत्मा दारिद्र्य व भुके कंगाल अवस्थेमध्ये माणसास पिसाळलेला कुत्रा बनवून टाकतो. क्रोधाच्या रुद्र अवतारामध्ये तो माणसास धिकृत शैताना आणि इबलीस सारखा भांडखोर बनवून सोडतो. ईश्वरी कृपा प्रसाद लाभल्यानंतर तो दारिद्र्याचे विस्मरण करवितो. ईश्वरत्वाचा दावा करण्यास भाग पाडतो आणि दानधर्माच्या वेळी क़ारूनसारखा कंजूष बनून जातो. दिखाव्यासाठी वायफळ खर्च करतो आणि भांडण तंटे करण्यास प्रवृत्त करतो.

**भ्रष्ट आत्म्या (नफ़्से अम्मारा) चे षड्यंत्र**

भ्रष्ट आत्मा हा जीवनभर (आजीवन) आपल्या षड्यंत्रामध्ये मग्न असतो. चाळीस हजाराहून जास्त अशा त्याच्या षड्यंत्राच्या युक्ती योजण्यात आलेल्या आहेत. हा माणसास प्राय: वाईट गोष्टींमध्ये आपल्या षड्यंत्राच्या साहाय्याने गुंतवून फसवितो. काही वेळेस भल्या भल्या सज्जनांना त्यांच्या सत्कार्यांमध्ये विघ्ने निर्माण करून त्यांना पथभ्रष्ट करून टाकतो. सदाचरणी लोकांची सत्कर्मे घटविण्यासाठी आणि दुराचाऱ्यांची दुष्कर्मे वृद्धिंगत करण्यामध्ये हा कटिबद्ध असतो.

''हिंस्त्र पशूंना इजा पोहोचविण्याअगोदरच मारून टाका'' या हदीस (प्रेषित वचना)मध्ये याच 'नफ़्से अम्मारा' कडे संकेत आहे. जोपर्यंत ईश्वराचा भक्त यास ओळखून सतर्क व जागरूक बनत नाही व त्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित करीत नाही तोपर्यंत त्याची पुढची मजल संपलीच म्हणून समजा. हदीस क़ुदसीमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वर असे निर्दिष्ट करतो की, मी आपल्या प्रसन्नतेस वासना विरोधी वृत्तीमध्ये (दडवून) ठेवले आहे. (परंतु) लोक त्याचा शोध वासनेमध्ये करतात. म्हणून ते तर मग मला कसे बरे प्राप्त करतील!

'नफ़्से अम्मारा'चे आधिपत्य अधिकांशपणे वासनेवर असते. याची अशी इच्छा असते की प्रत्येक गोष्ट आपल्या मुठीबाहेर जाऊ नये. मानवास त्याच्या प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर कशा प्रकारे वाईटपणा निर्माण करावे, ईश्वराच्या मार्गापासून त्याला कसे च्युत करावे या गोष्टी या भ्रष्ट आत्म्यास चांगल्या प्रकारे अवगत असतात. ब्रह्मज्ञानी मात्र 'आत्मबोधा'च्या बळावर त्याला चांगल्या प्रकारे ओळखून असतो. तो ईश्वरकृपेमुळे आपले चित्त परिष्कार घडवून आणतो. सारांश, साधकाच्या साधना मार्गावरील हा एक प्रबळ शत्रू आहे.

**२) नफ़्से लव्वामा (दूषित करणारा वा प्रदूषणकारी आत्मा)**

सर्वश्रेष्ठ ईश्वराचे वचन आहे - ''आणि वाचवले त्याच्या आत्म्यास (मनास) त्याच्या वाईट प्रवृत्तीपासून'' - तसेच (माणसाचे टोचणारे) मन, जे (वाईट कामांविषयी) त्याला दोष देत असते, त्यास साक्ष ठेवून (मी-परमेश्वर) सांगतो.'' ७५:२. 'नफ़्से लव्वामा'चे अनेक स्वभाव-गुण आहेत. ईश्वराच्या भक्तांशी मेलजोल राखणे, त्यांना भेटणे, ईश्वराचा मार्ग शोधणे, ऐहिक आणि पारमार्थिक अशी दोन्ही कर्मे करणे, अपराध करणे आणि पश्चात्तापही व्यक्त करत राहणे, 'लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण' याचा उत्तम नमुना म्हणजे सदरहू आत्मा. 'आत एक पण बाहेर दुसरेच' असे चित्त तो प्रकट करतो, जिव्हेवर नम्रता पण मनात मात्र अहंकार, इतरांचे छिद्रान्वेषण करणे, ज्येष्ठ मंडळींच्या चुका काढत बसणे इत्यादी या प्रदूषणकारी आत्म्याचे स्वाभाविक गुण (दुर्गुण) आहेत.

'नफ़्से लव्वामा' यास मन व चित्त ('दिल') असे पण म्हणतात. क्षणोक्षणी त्याच्यामध्ये बरे-वाईट विचार निर्माण होत असतात. ते विचार माणसास बेचैन आणि अधीर बनवून सोडतात. या आत्म्याचा सर्वात मोठा धोका हा आहे की तो मानवाची अशी समजूत घालतो की मानव हा प्रमादांचा पुतळा आहे. म्हणून प्रमाद माणसासाठी आणि माणूस प्रमादासाठी निर्माण केला गेलेला आहे. म्हणजेच हा 'नफ़्से लव्वामा', 'नफ़्से अम्मारा'स, ईश्वराचे भय बाळगण्यास आणि अपराध न करण्याचे उपदेश देतो परंतु ईश्वर आणि त्याचे प्रेषित यांचे अवज्ञेमध्ये तो त्याचा साथ देतो, त्याच्याशी सहभागी होतो. प्रत्येक मजल व टप्प्यावर साधकाने या दोन्ही आत्म्यावर विशेष लक्ष देऊन सावधानचित्त राहिले पाहिजे.

**मन वा चित्त -** वर उल्लेख केल्याप्रमाणे 'नफ़्से लव्वामा' स 'दिल' म्हणजेच मन किंवा चित्त पण म्हणतात. मन आणि त्याचे विशेष गुण याविषयी वर्णन करण्यास धर्मशास्त्राने परवानगी दिलेली नाही, कारण की, मनाचा आत्म्याशी संबंध आहे आणि आत्म्याविषयी पवित्र कुराणामध्ये असा श्लोक आहे -

''ते तुम्हाला आत्म्याविषयी प्रश्न करतात (विचारतात), (त्यांना) सांगा, 'आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे, (पण हे मानवा! तू त्याचे स्वरूप समजू शकत नाहीस कारण) तुला अत्यल्प ज्ञान प्रदान केलेले आहे. (तिचे आकलन तुझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे.)'' १७:८५

''सावधान! निर्मिती करणे हे त्याचेच काम आहे आणि आदेश देणे अर्थात् आज्ञा करणे (पण)'' -

अल्लाहची कार्ये ही आज्ञा-जगताशी निगडित असतात. म्हणूनच त्याने (परमेश्वराने) (आत्म्यासंबंधी) अधिक चिकित्सा करण्यास मनाई केली आहे. इहलोक आणि आज्ञालोक हे दोन्ही वेगवेगळे जग आहेत. ज्या वस्तू वा गोष्टीमध्ये मोज-माप, प्रमाण, वाढ-घट या गोष्टींचा प्रवेश असेल त्यास इहलोक असे म्हणतात. कारण

की शब्दकोशानुसार 'ख़ल्क़' अर्थात् निर्मितीचा अर्थ आहे अनुमान करणे, अंदाज बांधणे, आणि मानवाच्या मनासाठी किंवा चित्तासाठी अंदाज आहे. म्हणून विभाजन ग्राह्य नाही. जर ते (मन) विभाज्य असते तर एकीकडे एखाद्या वस्तूविषयी अज्ञान तर दुसरीकडे त्याविषयी ज्ञान असणे हे बरोबर ठरले असते, चुकीचे झाले नसते. अर्थात, एकाच वेळी ज्ञान व अज्ञान सोबत राहिले असते. ही गोष्ट तर अशक्य आहे आणि आत्मा अविभाज्य असून त्याच्यामध्ये परिणाम व अनुमान यांना वाव नसल्यामुळे पण मात्र असे असूनसुद्धा तो निर्मित आहे. आणि असे की निर्मिती अनुमान किंवा अंदाज करण्यास म्हणतात तद्वत उत्पन्न (निर्माण) करण्यास पण म्हणतात. या अर्थी आत्मा हा भौतिक (इहलोक) जगाशी निगडित आहे आणि दुसऱ्या अर्थाच्या संदर्भाने तो आज्ञाजगत म्हणजे आध्यात्मिक जगताशी संबंधित आहे. जे लोक आत्म्यास अनादि, देह रुंदी इत्यादी मानतात, ते काही बरोबर नाही. ते यासाठी की अनादि सत्ता एक अल्लाहच आहे आणि रुंदी ही आत्मनिर्भर नसते, तिला एखाद्या वस्तूचा आधार घ्यावा लागतो, ती दुसऱ्यावर निर्भर असते. आत्मा मानवाचे मूळ आहे आणि देह हा त्याच्या अधीन आहे. देहाचे तुकडे होऊ शकतात मात्र आत्मा हा अभेद्य व अविभाज्य असतो. (म्हणून) आत्मा हा प्रभू-आज्ञेशिवाय (दुसरे) काहीच नाही.

वाईटापासून ते चांगुलपणापर्यंत मानवाच्या मनाचे तीन टप्पे असतात. ते याप्रमाणे - मनुष्याचे मन सुरुवातीस खेळ करमणुकीत गुंतलेले असते व पुण्याकडे म्हणजेच सत्कर्मांकडे मुळीच वळत नाही. असल्या मनाला ''अम्मारा-बिस्सुअ'' म्हणजे वाईट कामांची प्रेरणा करणारे म्हणतात. ''मन तर (मनुष्यास) दुष्ट वासनांसाठी (नित्य) प्रवृत्त करीतच राहते.'' १२:५३ (वा ''मनच वाईट गोष्ट करण्यास प्रवृत्त करीत असते'') पुढे शुद्धीवर येऊन बरे वाईट त्याला कळू लागते व ते वाईटापासून पराङमुख होते व केव्हा केव्हा आपणच आपल्याला दोष देऊ लागते तेव्हा त्याला **'लव्वामा'** म्हणजे दोष देणारे म्हणतात. ''(मनुष्याचे) मन जे (त्याला वाईट कामांविषयी) दोष देत असते त्याची शपथ वाहतो आहे ना !'' ७५:२ तदनंतर मनुष्य जेव्हा पूर्णपणे सुधारून जातो व मनापासून पुण्याकडे वळतो व पापापासून पळू लागतो व दुःखही सहन करतो तेव्हा त्याला **'मुत्मइन्ना'** म्हणजे समाधान पावलेले मन म्हणतात. ''(आणि सदाचारी माणसाला अल्लाह म्हणेल) 'हे शांती लाभलेल्या आत्म्या !'' ८९:२७

**मनाचे स्वरूप व वैशिष्ट्य**

सजीव प्राण्यांना पण आत्मा आहे, परंतु ज्या आत्म्यास मन किंवा चित्त असे म्हणतात, ते सर्वश्रेष्ठ परमेश्वरास ओळखण्याचे, ज्ञानप्राप्तीचे स्थान आहे. मानवेतर सजीव प्राण्यांकरिता तो आत्मा नव्हे. तो ना देह आहे ना त्याला (लांबी) रुंदी आहे, परंतु देवदूतांच्या मोतीचे जिन्नसासारखे एक जिन्नस आहे. त्याचे वास्तव जाणून घेणे यथाशक्य कठीण आहे. म्हणून त्याचे सविस्तर वर्णन करणे म्हणजे धर्मशास्त्राच्या आदेशाचे उल्लंघन करण्यासारखे आहे. ईश्वरप्राप्तीच्या आकांक्षेसाठी धर्मशास्त्र आणि साधनेच्या नियमांनुसार अत्यंत अथक प्रयत्न व घोर साधनेची नितांत गरज असते. एखादा साधक आटोकाट प्रयत्नाच्या बळावर सफल होतो तेव्हा ब्रह्मज्ञानप्राप्तीमुळे त्याचे मन किंवा चित्त प्रकाशमान होऊन जाते. जसे की पुढील कौराणिक श्लोकामध्ये निर्दिष्ट आहे -

''आणि ते लोक ज्यांनी आमच्या मार्गामध्ये आटोकाट प्रयत्न केले आम्ही त्यांना अवश्य आमचा मार्ग दाखऊ''-

हे देह जणू काही एक शहर आहे आणि हात-पाय काम करणारे मजूर आहेत. या शहराचा शासक मन किंवा चित्त आहे आणि विवेकबुद्धी त्या शासकाचे वजीर (प्रधान) आहे. राग-क्रोध हा कोतवाल आहे आणि इच्छा-आकांक्षा अंमलदार आहे. शरीर मनाच्या अधीन असलेला प्रदेश आहे. यामध्ये मनाचे विविध प्रकारचे लष्कर आहे - फौजफाटा आहे आणि मन परमेश्वराचा आहे. परमेश्वराची शुभकारिता किंवा त्याचे तेज हे त्याचे ज्ञान आहे. त्याचे बोध आहे. इंद्रियांचा संबंध शरीराशी आहे. इंद्रिये वेगवेगळ्या प्रकारची आहेत. त्यांपैकी पाहणे, हुंगणे, ऐकणे, चाखणे आणि स्पर्श करणे या पाच बाह्य इंद्रिये आहेत. तर विचार, स्मृती, चिंतन, कल्पना आणि भ्रांति (भ्रम) या मेंदूशी निगडित असलेली पाच आंतर इंद्रिये आहेत. मनास शरीराची आवश्यकता असते. म्हणून तर आंतरिक आणि बाह्य इंद्रियांची गरज भासली आणि मानवी देह हा पृथ्वी, आप, तेज आणि वायू या चार भूतांनी मिळून बनलेला आहे. मात्र तो (शरीर) अत्यंत अशक्त आहे. यासाठीच शरीराला खाण्या-पिण्याची गरज भासते. यासाठी त्याला दोन प्रकारच्या सेनेंची गरज लागते. एक व्यक्त - प्रकट लष्कर आहे, जसे हात, पाय, तोंड, दात, पोट इत्यादी आणि दुसरी सेना आहे अव्यक्त जसे भूक, तहान, राग (क्रोध), इच्छा-आकांक्षा इत्यादी आणि हे सर्व शारीरिक शक्तीसाठी उपयोगी पडतात. यांपैकी एखाद्यामध्ये जर बिघाड निर्माण झाला तरी शरीरामध्ये बिघाड निर्माण होतो अपितु ऐहिक आणि पारमार्थिक कामे पण बिघडून जातात. ही सर्व सैन्ये मनाच्या ताब्यात असतात आणि मन हा सर्वांचा सम्राट आहे.

ईश्वराचे सौंदर्य न्याहाळण्यासाठी (पाहण्यासाठी) मनास निर्माण करण्यात आले आहे. वरील विवेचनावरून स्पष्ट आहे की उपरोक्त आंतरिक व बाह्य सेना शरीरास सशक्त बनवण्यासाठी आणि त्याच्या रक्षणासाठी निर्माण करण्यात आलेली आहे. अतएव हे शरीराचे सेवक आहेत आणि खाणे-पिणे शरीराची खाद्यसामुग्री आहे, आणि शरीरास इंद्रियांचे ओझे वाहून नेण्यासाठी घडवले आहे. म्हणून शरीर हे इंद्रियांचे सेवक आहे. इंद्रियांना विवेकबुद्धीची हेरगिरी करण्यासाठी निर्माण करण्यात आले आहे की जेणेकरून मनासाठी दीपक बनून जावेत आणि त्याच्या प्रकाशात ईश्वरी दरबार मनास दिसू लागावे. कारण प्रभु-दर्शन हे मनाचे (साठी) स्वर्ग आहे. विवेकबुद्धी ही मनाची सेविका आहे आणि मन ईश्वर सैंदर्याच्या दृश्यासाठी निर्माण केले गेले आहे. तर जेव्हा मन हे ते दृश्य पाहण्यात मग्न होऊन जाते तेव्हा भक्त हा ईश्वराच्या दरबाराचा सेवक-सेवेकरी बनतो. सेवकास निर्माण करून त्याला प्रदेश, सेना आणि देहाची स्वारी यासाठी देण्यात आली आहे की त्याने मर्त्य जगापासून चिरंतन जगाकडे म्हणजेच ईश्वरी दरबाराची सर्वोच्च स्थानाची सहल करावी.

मनाचे महत्त्व दोन कारणांसाठी आहे. ते आहेत १. ज्ञान आणि २. सामर्थ्य. ज्ञानाचे महत्त्व दोन प्रकारचे आहे - एक बाह्य तर दुसरे आंतरिक. बाह्य ज्ञान हे सर्वपरिचितच आहे, परंतु आंतरिक गुप्त ज्ञान हे अत्यंत गुप्तपणे लपलेले असते. हे ज्ञान सर्वोत्तम असते. त्या ज्ञानास सर्वजण ओळखू शकत नाहीत. प्रकट-व्यक्त ज्ञानापासून पाच इंद्रियांचे पाच दरवाजे बाहेरच्या बाजूस उघडतात. त्याचप्रमाणे गुप्त ज्ञानापासून आलम मलकूत म्हणजेच देवलोक आलम रूहानी म्हणजेच आत्मिक किंवा आध्यात्मिक लोकाकडे पण मनामध्ये एक दार उघडे केले गेले आहे. परंतु जे लोक शारीरिक (भौतिक) जगाची अनुभूती घेतात आणि बाह्य इंद्रियांनाच ज्ञानमार्ग मानतात ते खरोखर ब्रह्मज्ञानापासून वंचित असतात. आत्म्याच्या जगाची सहल त्यांच्या नशिबी नसते.

**आत्म्याच्या जगाची सहल (विहार)**

निद्रेमध्ये मानवाची बाह्य – दृश्य इंद्रिये निष्क्रिय असतात आणि मनामध्ये आंतरिक इंद्रियांचे द्वार उघडले जाते आणि आत्म्याचे जग व सुरक्षित पट्टिका अर्थात सुस्पष्ट ग्रंथामध्ये परोक्षाच्या गोष्टी दिसू लागतात. भविष्यामध्ये जे काही घडणार आहे ते दिसू लागते. त्याची स्पष्ट माहिती होते किंवा दृष्टांत दिसू लागतो. (अशा गोष्टीस) मीमांसेची गरज भासते. परंतु जे अधिकारी साधक असतात ते जागृत अवस्थेत पण आत्म्याच्या जगाशी परिचित असतात. मन आरशासारखे आहे. म्हणून त्यामध्ये विश्वाचे प्रतिबिंब उमटलेले असते. स्वच्छ व निर्मळ आरशासमोर जेव्हा सचित्र आरशास धरले जाते तेव्हा तिची चित्रे त्या निर्मळ आरशामध्ये दिसू लागतात. अशाप्रकारे जेव्हा सचित्र आरशास धरले जाते तेव्हा तिची चित्रे त्या निर्मळ आरशामध्ये दिसू लागतात. अशाप्रकारे मन जेव्हा स्वच्छ निर्मळ आरशासारखे असेल आणि अनुभूतीशी तिचा संबंध–विच्छेद घडलेला असेल तेव्हा ते सुस्पष्ट ग्रंथा ('लौह–ए–महफूज) शी स्पर्धा निर्माण करू शकते. अशा वेळेस सुस्पष्ट ग्रंथामध्ये समस्त ब्रह्मांडाचे जे स्वरूप रेखाटलेले असते ते मनामध्ये स्पष्टपणे दिसू लागते. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वचन आहे –''जेव्हा आम्ही तुझ्यापासून तुझा पडदा हटविले तेव्हा तुझी दृष्टी आज अत्यंत तीक्ष्ण आहे.''

**१) स्वप्न व सुसमाचार व त्यांचे वास्तव**

मानवी देहाचा सांगाडा हा चार महाभूतांचा – पृथ्वी, आप, तेज आणि वायू – बनलेला पार्थिव पुतळा आहे. यामध्ये आंतरिक तेजस्वी व आध्यात्मिक पुतळा विद्यमान आहे. जसे की हे दोन्ही दृश्य व अदृश्य जग निर्माण झालेले आहेत. या भौतिक विश्वामध्ये माणसामध्ये फक्त शुभवार्तांचे स्वप्न किंवा मनन–चिंतनामध्ये अदृश्य जग म्हणजेच आत्म्याच्या जगाचे दर्शन त्याच्या नशीबी असते. मानवाची बाह्य इंद्रिये निष्क्रिय बनून सर्व भौतिक कार्ये स्थगित होऊन जातात. जणू की त्यावेळेस एक प्रकारची अचेतन अवस्था मृत्यूसारखी स्थिती निर्माण होते आणि मग आंतरिक इंद्रिये तत्काळ एकामागून एक सक्रिय होऊ लागतात. त्या वेळेस आज्ञा जगातील म्हणजेच परोक्ष सूक्ष्म जगामधील वस्तू दृष्टोत्पत्तीस येऊ लागतात. यालाच स्वप्न किंवा शुभवार्ता आणि परोक्ष दर्शन असे म्हणतात. स्वप्नास लघु मृत्यू म्हणून पण संबोधतात आणि निद्रेस मृत्यूची भगिनी असे म्हणतात. निद्रेस अर्ध–मृत्यू इत्यादी म्हणून मीमांसा केली गेली आहे. म्हणून बाह्य इंद्रियांच्या शक्ती निष्क्रिय होणे आणि शारीरिक अवयवांची हालचाल बंद होणे याचे नाव पण मृत्यू असे आहे आणि मरणोत्तर जे काही उघड होणार आहे त्याचा काहीसा नमुना स्वप्नामध्ये जरूर दिसून येतो. याव्यतिरिक्त मरणोत्तर स्थितीमधील जे काही परिणाम घडत असतात ते स्वप्नात दिसून येणे पण संभवनीय आहे. कारण की आज्ञांचे जग आणि परोक्ष जगामध्ये डोकावून पाहणे याकरिता (स्वप्न) हेच एक स्रोत आहे – माध्यम आहे. सच्च्या स्वप्नापासून एक सुजाण माणूस परलोकाच्या प्रमाणासाठी अत्यंत योग्य असे निष्कर्ष काढू शकतो. याच कारणास्तव सच्च्या स्वप्नांना प्रेषितत्त्वाचे एक अंतराळ म्हणून ग्रहीत (मानण्यात) करण्यात आले आहे.

**स्वप्नाचे प्रकार**

स्वप्नाचे दोन प्रकार आहेत. पहिला प्रकार हा की, स्वप्नाच्या वेळेस मानवावर वासना व विचारशक्ती प्रबळ बनून, बाह्येंद्रिये म्हणजेच स्पर्श, श्रवण, घ्राण, स्वाद आणि दृष्टी यांच्या विवेकशक्तीच्या विचार–कोषागारामध्ये संग्रहित होऊन जातात आणि त्यांचे प्रतिबिंब मनाच्या आरशावर उमटते. त्यावेळेस तेच

वासनामय विचार आणि कल्पना स्वप्नात दिसू लागतात. अशा प्रकारच्या स्वप्नांना चिंताक्रांत आणि अविश्वसनीय विचार असे म्हणतात. दुसऱ्या शब्दात, स्वप्न म्हणजे चिंताक्रांत व अविश्वसनीय विचार! दुसरा प्रकार हा की अनुभूती जगाशी संबंध-विच्छेद करून जेव्हा वाकशक्ती, पंच ज्ञानेंद्रिये आणि प्रकट शक्ती अननुभूत विश्व किंवा आत्म्याच्या जगाकडे उन्मुख होते तेव्हा त्या स्वच्छ मोतीवर म्हणजेच निर्मळ मनावर परोक्षाचे प्रसंग हे स्वच्छ निर्मळ आरशामध्ये वस्तूंच्या दिसणाऱ्या (उमटणाऱ्या) सुस्पष्ट प्रतिबिंबासारखे उमटू लागतात अर्थात् दिसू लागतात. मग ते जागृत (सचेतन) विश्वामध्ये हुबेहूब तसेच घडत असतात. अशा प्रकारच्या खऱ्या (सत्य) स्वप्नांना प्रेषितत्त्वाचा एक भाग कल्पिण्यात येतो. या दोन प्रकारांव्यतिरिक्त तिसरी अवस्था अशी पण आहे की मनाच्या आरशास सचेतन जगाचे अभ्यस्त विचार मलिन करून टाकतात. परिणामी त्यावर अदृश्य जगाचे प्रसंग यथाशक्य प्रतिबिंबित होऊ शकत नाहीत. त्यावेळेस मनामध्ये सुविचार आणि कुविचार यांच्यामध्ये रणकंदन माजलेले असते. त्यांच्या दरम्यान संघर्ष छिडलेला असतो. त्यावेळेस स्वप्नाचा काही भाग सत्य तर काही काळजी वाटण्यासारखा असतो. कधी माणूस स्वप्नामध्ये अशा आंतरिक प्रदेशामध्ये प्रवेश करतो की जेथे दैनंदिनाचे स्वाभाविक विचार, वासनामय संकल्प आणि भौतिक मोह-मायेस प्रवेशच नसतो आणि माणूस हा सकाळच्या स्वच्छ प्रकाशासारखा चित्रपटाच्या पडद्यावरील सक्रिय व सवाक प्रतिमांच्या स्वरूपात स्वप्नामध्ये स्पष्टपणे पाहतो आणि हे स्वप्न सत्य असल्याचे त्याला दुसऱ्या दिवशी वा आठवड्यात किंवा महिन्यात अथवा वर्षभरात त्याला प्रचिती येते. म्हणून असले सत्य स्वप्न हे मनाच्या सत्य वास्तवांचा नमुना असते. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे कथन आहे - ''मनाने जे काही पाहिले ते खोटे असल्याचे प्रमाणित होत नाही.''

या जगामध्ये प्रत्येक मनुष्यास सत्य स्वप्न हे कमीत कमी एकदा का होईना जरूर पडते. तो मनाने अत्यंत वाईट का असेना. यावरून या गोष्टीचा भरपूर सबळ पुरावा मिळू शकतो की मानवामध्ये या शारीरिक अवयव आणि बाह्य इंद्रिये व्यतिरिक्त आणखी एक वस्तू संवेद्य किंवा बोधगम्य आहे, जिला अंतरंग व्यक्तित्व किंवा मन आणि आत्मा असे म्हणतात. दृश्य बाह्य जगाची परंपरा-श्रृंखला ही बोधगम्यता किंवा संवेद्यतेपर्यंतच सीमित नाही, अपितु या भौतिक जगाव्यतिरिक्त एक सूक्ष्म आणि आत्मिक वा आध्यात्मिक विश्व पण अस्तित्वात आहे. याचे प्रभाव कधी-कधी या भौतिक जगामध्ये पार्थिव शरीरावर उमटलेले असतात. म्हणूनच मानवामधील चांगले -वाईट, लहान-थोर, दुर्बळ अल्पमती स्त्रिया वा पुरुष इतकेच नव्हे तर श्रद्धाहीन, पाखंडी इत्यादी पण प्रत्येक प्रकारची माणसे कोणते ना कोणते तरी सत्य स्वप्न आपल्या हयातीत अवश्य पाहतात. ही वासना, व हे मन आणि हा आत्मा यांची उन्मुखता सर्वांसाठी खुली आहे. अधिकांशपणे असे दिसून येते की जो प्रसंग किंवा घटना स्वप्नात पाहण्यात येते ती दुसऱ्या दिवशी सकाळी किंवा आठवड्याच्या आत हुबेहूब त्याचप्रमाणे घडलेली असते. किंवा एखादी हरवलेली वस्तू स्वप्न-दर्शनामुळे सापडून जाते. त्याचप्रमाणे एखाद्याच्या मृत्यूची किंवा जन्माच्या बातमीची सुवार्ता ऐकल्यावर तसेच घडून येते. अशा प्रकारच्या अनेक शुभवार्ता जागृतावस्थेमध्ये तंतोतंत घडून येतात. हे काम बाह्य ज्ञानेंद्रिये आणि शारीरिक संवेद्यांचे मुळीच नाही, परंतु ही सर्व आध्यात्मिक सूक्ष्म विश्वाची कर्मे होत. अंतरंगामध्ये यांचे वास्तव असते आणि अंतर्बोधांमुळे हे व्यक्त किंवा संवेद्य बनतात. सदाचारी लोक तर असले सत्य स्वप्न व सुसमाचार दररोज पाहतात, ऐकतात आणि ते

त्यांना सदैव खरे आढळून येतात. काही प्रसन्नचित्त लोक आपल्या चित्त परिष्काराच्या बळावर भूत, वर्तमान आणि भविष्यात घडणाऱ्या घटना जागृत अवस्थेतच पाहत असतात. मग संत-महात्मा आणि प्रेषितांच्या बाबतीत काय बरे सांगावे! त्यांचे मन तर 'जमशेदचा प्याला' आणि 'सिकंदरचा आरसा' असतो की ज्यामध्ये समस्त ब्रह्मांडाच्या घटना आणि वास्तव स्पष्टपणे दिसू लागतात. (प्रसिद्ध आहे की इराणचा शासक जमशेद याने असा एक प्याला बनविला होता की, ज्याच्या मदतीने संपूर्ण जगाची स्थिती अवगत होत असे.)

मानवी मन हे सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे राजसिंहासन, पादपीठ आणि सुबोध ग्रंथाचा एक नमुना असतो. ज्या (व्यक्तीच्या) मनाच्या दुर्बीणीचा आरसा जितका विस्तीर्ण (सखोल) असेल तितक्या प्रमाणात परोक्षाचे वास्तव आणि आत्मिक - आध्यात्मिक वस्तू सुस्पष्ट दिसू लागतील. साध्या भौतिक सूक्ष्मदर्शक यंत्रामधून लहानातले लहान, सूक्ष्मातले सूक्ष्म जीवजंतू स्पष्टपणे पाहता येणे शक्य आहे, तर मग सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा एखाद्या संत महात्मा किंवा प्रेषिताच्या मनाच्या सूक्ष्मदर्शक यंत्रास वाटेल तितकी विशालता (सखोलता) प्रदान करून संपूर्ण जगाचे दर्शन त्यांना घडवून आणत असेल तर त्यात काय बरे आश्चर्य! पुरुषोत्तम (नरोत्तम) हा ईश्वरकृपेने आपली दिव्यदृष्टी आणि दूरदृष्टीने ब्रह्मांडाच्या प्रकट आणि अप्रकट, व्यक्त आणि अव्यक्त अशा सर्व प्रकारच्या वस्तू पाहू शकतो आणि तो त्यांना आपल्या अधिकाराखाली आणू शकतो. नरोत्तम हा ईश्वराचा उप-प्रभारी असतो.

### 'इस्तिख़ार' म्हणजेच दैवी सहायतेची इच्छा आणि शुभाशुभ बोध

परमेश्वराचे सदाचारी दास आणि भक्त जेव्हा एखाद्या गोष्टीविषयी भविष्यात घडून येणारे प्रसंग अथवा एखाद्या कामांसंदर्भात बरे-वाईट परिणाम जाणू इच्छितात तेव्हा ते यासाठी 'इस्तिख़ार' म्हणजेच दैवी सहायतेची इच्छा प्रकट करताना किंवा शुभाशुभ जाणू इच्छितात. अशा वेळेस तन्निमित्त अधिकाची उपासना करतात, पवित्र कुराण पाठ करतात, ईश्वराची करुणा भाकून कृपायाचना करून झोपतात. तेव्हा त्यांना स्वप्नामध्ये याचे स्पष्ट उत्तर व श्रेयांक प्राप्त होते. काही प्रसन्नचित्त ब्रह्मज्ञानी लोक जागृत अवस्तेत आपल्या चित्ताकडे लक्ष (ध्यान) वळवतात आणि तत्काळ निमिषमात्रात सर्व काही जाणून घेतात. मन आरशासारखे असते. अशाच लोकांकरिता हदीसमध्ये असे आले आहे की मनापासूनच आज्ञा मागत जा. त्याचेच आदेश पाळत जा. हे पोहोचलेल्या लोकांचे काम आहे. सर्वसाधारण लोकांचे नव्हे. सर्वसाधारण लोकांनी दैवी सहायतेची इच्छा करावी - बाळगावी. अधिकाची उपासना करून दैवी सहायतेसाठी कृपायाचना करावी आणि ''अल्लाह अल्लाह'' असे मन:पूर्वक नामस्मरण करून मनास स्वच्छ केले गेले पाहिजे. मनन करावे व मग झोपी जावे. जर मनास समाधान झाले (वाटले) तर लाभ होणार आहे, असे गृहीत धरावे. आणि जर मनास भीति वाटत असेल किंवा मन चिंतामग्न होत असेल तर धोका आणि हानी होणार असे समजावे. मन किंवा चित्त हे स्वप्न किंवा मनन ('मुराक़बा') यांच्या आधारे कामाचे नुक़सान किंवा फ़ायदा जाणून घेते.

### २) आत्म्यासंबंधी दिव्यदृष्टीज्ञान ('कश्फुलकुलूब')

काही लोकांना जेव्हा दिव्यदृष्टी प्राप्त होऊ लागते तेव्हा त्यांना मनन किंवा स्वप्नामध्ये आपल्या घरात घटित होणाऱ्या घटना दिसू लागतात. अत: ते अशाच प्रकारे दिसू लागत असतात. अशा प्रकारे जेव्हा दिव्यदृष्टीप्राप्त

व्यक्तीची नजर जसजशी विस्तीर्ण होत जाते तसतशे त्या व्यक्तीला आपल्या आळीतील, संपूर्ण शहर, जिल्हा इतकेच नव्हे तर आपले प्रांत आणि राष्ट्राच्या घटना व परिस्थिती माहित होऊन जाते. काहींना तर आठवडा, महिना, वर्ष इतकेच नव्हे तर काहींना संपूर्ण आयुष्याची परिस्थिती माहित होऊन जाते. अशाप्रकारच्या अनुगामी नवसाधकांनी अशा प्रकारच्या भविष्यकालीन घटना आणि चांगल्या स्वप्नांना इतरांसमोर उघड न करता आपल्या मनामध्ये गुप्त ठेवावे. सर्वांसमोर ते उघड करून कीर्ति संपादन करण्याचे प्रयत्न करू नये. कारण की आत्मप्रदर्शनामुळे ही स्थिती नष्ट होऊन जाते. दुसऱ्यांदा मनन साधणे अशक्य होऊन जाते. दिव्यदृष्टीदात्याने आपल्या रहस्यांना गुप्त गोपनीय ठेवले पाहिजे. त्याने दृढनिश्चयी असावे. स्थिरचित्त, चमत्कार करणारा, 'ग़ौस', 'कुत्ब', 'अवताद', 'अबदाल', 'अख़यार', इत्यादी 'रिजालुलग़ैब' म्हणजेच परोक्ष ईश्वरनिष्ठाच्या गटामध्ये किंवा संप्रदायामध्ये त्याचा समावेश केला जातो. अशांना पूर्ण ब्रह्मज्ञान, स्थायी दिव्यदृष्टीज्ञान प्रदान करून अंतर्ज्ञानाचे अधिकारी बनविले जाते.

**दिव्य दृष्टीचे स्वरूप**

आपल्या डोळ्यांना कशाच्याही आड नसलेले व जवळ असलेले पदार्थ दिसू शकतात. या ज्ञानेंद्रियांच्या ग्रहणशक्तीस मर्यादा असतात. परंतु सिद्ध पुरुषांना अत्यंत सूक्ष्म, कशाच्याही आड असलेले व कितीही दूर असलेले पदार्थ दिसू शकतात. मानवाचे शरीर (पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश या) पंचमहाभूतांचे बनले आहे, तर चित्त किंवा मन पंचमहाभूतांच्या तन्मात्रांपासून बनलेले असते. या पंचमहाभूतांतील सत्त्व, रज, तम हे तिन्ही गुण शरीर, इंद्रिये व चित्तात (मनात) अंतर्भूत होतात. कैवल्यप्राप्तीच्या इच्छेने साधक तपश्चर्या, तसेच योगसाधना करतात. त्याद्वारा अंतर्भूत सत्त्वगुणाची वृद्धी होत जाते. त्यामुळे देहाची जी इंद्रियरूप द्वारे आहेत, त्यात सत्त्वगुणाचा प्रकाश फाकून त्यांची ज्ञानग्रहणक्षमता वाढीस लागते. तपाच्या योगाने इंद्रिये व चित्त (मन) यातील अशुद्धी नाहीशी होऊन कार्यसिद्धी व इंद्रियसिद्धी साधकाच्या ठिकाणी सहजपणे प्रकट होऊ लागतात.

### ३) वह्इ (प्रेषितांसाठी दैवी आदेश–आज्ञा), इलहाम (देववाणी) आणि इल्क़ा (दैवी प्रेरणा) यांची वस्तुस्थिती –

'वह्इ' याचा अर्थ आहे सूचन, सूचक बोलणे. याला प्रज्ञान असेही म्हणता येईल. प्रेषितांना स्फुरित होणारा, पोचविला जाणारा, ईश्वरी शब्द म्हणजेच प्रज्ञान होय. यालाच 'वहइ' असे म्हणतात. संदर्भानुसार 'वहइ'चे वेगवेगळ्या अर्थाचे संकेत पवित्र कुराणामध्ये विद्यमान आहेत. ते पुढीलप्रमाणे होत –

''हे नबी! आम्ही तुमच्याकडे त्याच प्रकारे दिव्य प्रकटन ('वहइ') पाठविले आहे, ज्याप्रकारे नूह आणि त्यानंतरच्या प्रेषितांकडे पाठविले होते. आम्ही इब्राहीम, इस्माईल, इसहाक़, याक़ूब आणि याकूबची संतती, ईसा, अय्यूब, युनूस, हारून आणि सुलेमानकडे दिव्य प्रकटन पाठविले. आम्ही दाऊदला ज़बूर (धर्मग्रंथ) दिला होता. आम्ही त्या प्रेषितांवर देखील दिव्य प्रकटन अवतरित केले, ज्यांचा उल्लेख आम्ही यापूर्वी केला आहे आणि त्या प्रेषितांवर ज्यांचा उल्लेख तुमच्याजवळ केला नाही. आणि अल्लाहने मूसाशी आज्ञा कळवणारे संभाषण केले होते.'' ४:१६३–६४ ''आणि पाहा, तुमच्या विधात्याने मधमाशीला (अशी) प्रेरणा दिली (दिव्य प्रकटन केले) की, पर्वतामध्ये आणि वृक्षामध्ये आणि मांडवावर चढविलेल्या वेलीत आपले मोहोळ बनव व

प्रत्येक प्रकारचे फळांचे रस शोषून घे आणि आपल्या विधात्याच्या मार्गाने बिनदिक्कतपणे अनुसरण कर.'' १६:६८-६९ ''हे मूसा, आम्ही पुन्हा एकदा तुझ्यावर उपकार केले. आठव ती घटका जेव्हा आम्ही तुझ्या आईला इशारा केला, असा इशारा जो दिव्य प्रकटनाद्वारेच केला जातो की या बाळाला पेटीत ठेव आणि पेटी नदीत सोडून दे. नदी तिला काठावर फेकून देईल आणि तिला माझा शत्रू आणि या बाळाचा शत्रू उचलून घेईल.'' २०:३७-३९ ''निःसंशय, हे (कुरआन) सर्व जगांच्या स्वामीने प्रकट केलेले आहे. हे घेऊन तुझ्या हृदयावर विश्वसनीय आत्मा उतरला आहे.'' २६:१९२-९३ ''कोणत्याही मनुष्याचा हा दर्जा नाही की अल्लाहने त्याच्याशी समक्ष बोलणी करावी. त्याची बोलणी एक तर 'वह्य' (संकेता)च्या स्वरूपात होते, अथवा पडद्यामागून अथवा मग तो एखादा संदेशवाहक (देवदूत) पाठवितो आणि तो त्याच्या आज्ञेने जे काही इच्छितो ''वह्य'' (बोध) करतो, तो उच्चतर आणि बुद्धिमान आहे आणि अशाचप्रकारे (हे प्रेषित) आम्ही आपल्या आज्ञेने एक ''रूह'' (आत्मा) तुमच्याकडे ''वह्य'' (दिव्यबोध) केली आहे.'' ४२:५१-५२ ''मग त्याने अल्लाहच्या दासाला दिव्यबोध पोहोचविले जे काही दिव्यबोध त्याला पोहोचवायचे होते. दृष्टीने जे काही पाहिले, मनाने त्यात असत्य मिसळले नाही.'' ५३:१०-११ ''निःसंदेह, प्रत्येक धर्मप्रजेमध्ये ('उम्मत') सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे असे सेवक (भक्त) आहेत की ज्यांच्याशी तो परमेश्वर संभाषण करतो आणि माझ्या धर्मप्रजेमध्ये सुद्धा असे सेवक आहेत की ज्यांच्याशी तो परमेश्वर संवाद साधतो.'' हदीस.

सर्वोच्च अल्लाहकडून नबीवर जे मार्गदर्शन किंवा दिव्यबोध उतरत असते त्याला 'वही' किंवा वह्य असे म्हणतात. अंबिया ('नबी'चे अनेक वचनी रूप) यांच्यावर उतरणाऱ्या मार्गदर्शनाला 'वही' यासाठी म्हटले गेले आहे की त्याचे अवतरण इतर माणसांच्या दृष्टीपासून गुप्त असते. 'वही' म्हणजे केवळ अर्थ असे नाही तर त्यात शब्द व शब्दरचना सर्व काही समाविष्ट असतात. म्हणून 'वही'ला स्पष्ट शब्दात अल्लाहची वाणी देखील म्हणता येईल.

कोणतीही व्यक्ती अशी नाही की जिच्या मनामध्ये सद्विचार आकाशवाणी ('इलहाम') स्वरूपात येत नाहीत, परंतु ते मनामध्येच निर्माण होतात. मन (चित्त) हे भौतिक (वस्तू) नसून, त्याचा संबंध आत्म्याशी असतो, आत्मिक वा आध्यात्मिक जगाशी असतो आणि बाह्य इंद्रिये ही दृश्य वा व्यक्त जगाशी(च) संबंधित असतात. म्हणून ते आत्म्याच्या जगास पहाण्याच्या आड येतात. प्रेषितांतर 'वह्यी' संत-महात्म्यांना 'इलहाम' आणि श्रद्धावंतांना 'इल्क़ा' म्हणजेच दैवी प्रेरणा ही आत्म्याच्या जगापासून प्राप्त होत असतात.

### ४) मनना ('मुराक़बा')चे वास्तव

लोक जे काही स्वप्नामध्ये पाहतात, त्यास जागृत अवस्थेमध्ये पाहण्यास मनन अर्थात् 'मुराक़बा' असे म्हणतात. स्वप्नामध्ये बेसावधगिरी असते. त्यामुळे स्वप्नातील दृश्ये स्पष्ट दिसत नाहीत आणि पुष्कळशा गोष्टी जागे झाल्यावर आठवत नाहीत. परंतु मनना ('मुराक़बा') मध्ये प्रत्येक श्वासाची जाणीव आणि प्रत्येक पाऊलावर दक्ष दृष्टी असल्याकारणाने प्रत्येक प्रकारचे जग हे स्पष्टपणे दिसते. म्हणजेच देवलोक (मलकूत), तपःलोक (जबरूत), सत्यलोक (लाहूत) इत्यादी ठळकपणे दिसतात. ज्याच्यासाठी हा मार्ग उघडला जातो त्याचा निश्चितच लाभ होतो. म्हणजेच तो चित्र-विचित्र अशा आश्चर्यकारक स्थानके आणि मजलांची सहल करीत असतो. तो मोठमोठाली अशक्य अशी कार्ये लीलया संपन्न करतो. ''मला पृथ्वी दाखवण्यात आली

आणि मग तिच्या पूर्व व पश्चिम दिशांना पाहिले. (हदीस – तबरानी) सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे पण वचन आहे –

''अशाप्रकारे आम्ही प्रेषित इब्राहीम यांना आकाश व पृथ्वीचे वैभव दाखवितो.''–

## ५) चमत्कार (करामत)

संत–महात्म्यांचे चमत्कार ही सत्य घटना असते. सन्मार्गावर असलेल्या संतांना वासनांचा कुमार्ग आड येत असतो. त्यामुळे त्यांची आध्यात्मिक प्रगती खुंटते. मात्र संत मोठ्या साहसाने भ्रष्ट आत्म्या ('नफ़्से अम्मारा) शी निकराने मुकाबला करतात. त्यास जेरीस आणण्याचा प्रयत्न करतात. आणि जर भ्रष्ट आत्मा हार मानत नसत असेल तर दोघांमध्ये संघर्ष उत्पन्न होतो. सरते शेवटी सत्याचा म्हणजेच सत् प्रवृत्तीचा विजय होतो आणि वासना बरबाद होते. अशा संघर्षमय स्थितीच्या अंतिम परिणामाचे नाव आहे 'कश्फ़ व करामत' म्हणजेच दिव्यदृष्टीज्ञान व चमत्कार.

चमत्काराचे काही प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत –

**(१) करामत –** संतांकडून घडणारे मानवी स्वभाव–विरोधी कृत्य म्हणजेच चमत्कार होय. जसे पाण्यावर चालणे, आकाशात (हवेत) उडणे.

**(२) अरहास –** संदेष्टत्व ('नबुवत') प्राप्तिअगोदर एखाद्या संदेष्टा ('नबी') कडून घडून येणारे असाधारण कृत्य म्हणजेच चमत्कार होय.

**(३) मोजिज़ा –** संदेष्टत्व प्राप्तीनंतर घडून येणारे संदेष्ट्याचे चमत्कार. संताची 'करामत'ही वास्तविकपणे संदेष्ट्याचे मोजिज़ा असते.

**(४) मअूनत –** सदाचरणी धर्मपरायण व्यक्तीकडून घडून येणारे चमत्कार म्हणजे मअूनत होय.

**(५) मक्र व इस्तदराज –** नास्तिकाकडून घडून येणारे चमत्कार, यास इस्तदराज असे म्हणतात.

## ६) जादू आणि दृष्ट लागणेचे वास्तव –

मनामध्ये जेव्हा ईर्ष्या आणि मत्सराची शक्ती बेहद्द वाढते तेव्हा मन हे बाँबचा गोळा बनते आणि दृष्टीमध्ये व्याकुळता आणि उष्णता निर्माण होते आणि त्याचा मनस्ताप निष्पाप बालके, प्राणी आणि अमूल्य वस्तूंवर वार करतो. या कृतीस त्यांच्यावर नजर लावणे असे म्हणतात. यालाच दृष्ट लागणे असेही म्हणतात. अशा प्रकारे दृष्ट लागण्याने हानी पोहोचते, नुकसान होते. जर एखाद्या चांगल्या पशूस पाहिल्यावर आपल्या मत्सरी वृत्ती व दृष्टीमुळे तो पशू मरून जाण्याचा (कु)विचार मनात आल्यास तो पशू मरूनही जाईल.

मनात एखाद्याचे वाईट चिंतून, त्याचे वाईट घडण्याचा संकल्प करून एखादा प्रभावकारी मंत्र मनात म्हटल्यावर त्याचा अपेक्षित परिणाम घडून आल्यास, या कृतीस 'जादू' असे म्हणतात. या सर्व बाबींमध्ये माणसाचा दूषित करणारा आत्मा अर्थात् नफ़्से लव्वामाची भूमिका अत्यंत प्रभावशाली असते. म्हणजेच यामध्ये मना (चित्ता)चा हस्तक्षेप असतो. त्याचाच दखल असतो. हदीस पाक मध्ये अशी नोंद आहे की – ''वाईट नज़र माणसास थडग्यामध्ये पोचविते आणि उंटास स्वयंपाकाच्या तप्त भांड्यामध्ये घालते.'' दुसरी एक हदीस अशी आहे – ''दृष्ट लागणे सत्य आहे.''

मनामध्ये ज्या शक्ती आहेत त्यांपैकी ही एक आश्चर्यकारक अशी शक्ती आहे. असले खास काम जर प्रेषितांकडून होत असेल तर ते 'मोजिज़ा' आहे. जर संताकडून व्यक्त होत असेल तर ते 'करामत' आहे असला वैशिष्ट्यधारक जर सतकर्मांमध्ये व्यस्त असेल तर त्याला पण सत्कर्मपरायणी असे म्हणतात. जर तो वाईट कामामध्ये व्यस्त असेल तर त्यास जादूगार आणि दृष्ट नज़री असे म्हणतात. 'मोजिज़ा', 'करामत' आणि 'जादू' ही सर्व माणसाच्या मनाच्या सामर्थ्याची वैशिष्ट्ये आहेत, परंतु यांच्यामध्ये फार फ़रक़ आहे.

### ३) नफ़्से मुल्हिमा अर्थात् ईशप्रेरित वा अनुप्राणित आत्मा

सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वचन आहे – "प्रत्येक जीवाला मृत्यूची चव चाखावयाचीच आहे. आम्ही तुम्हा (सर्वांची) चांगल्या आणि वाईट (परिस्थितीद्वारे) परीक्षा घेत असतो, (तुमची) पारख करण्यासाठी. आणि (शेवटी), तुम्हा सर्वांना आमच्याकडेच परत यायचे आहे." २१:३५ "तो असा दिवस असेल (आहे) की कोणाही जीवावर कोणत्याच जीवाचा अधिकार नसेल. प्रत्येक जीवाला मृत्यूची चव चाखायचीच आहे. या सर्वांना आमच्याकडेच परत यायचे आहे."

हा असा मध्य भागातील आत्मा (वासना) आहे की जर साधक हा 'नफ़्से अम्मारा' अर्थात् भ्रष्ट, दुष्ट आत्मा आणि 'नफ़्से लव्वामा' म्हणजेच दूषित करणारा आत्मा संपूर्णपणे आपल्या नियंत्रणामध्ये ठेवत असेल तर ईशप्रेरित आत्म्या ('नफ़्से मुल्हिमा') मध्ये त्याला समाधान मिळू लागते. उपासना आणि साधनेमध्ये त्याला आनंद प्राप्त होतो. ईश्वरकृपेने वासनेशी संघर्ष व ईश्वराचे चिंतन-मनन सतत चालू राहते.

या टप्प्यावर मानवामधील दुष्ट पिशाच्च प्रवृत्ती बंद होऊन जातात. मानवी (सत्) प्रवृत्ती उचंबळून प्रकट होतात. पवित्र सत्कर्मे निर्मळ मनाने निर्विघ्नपणे पार पडतात. चित्त (मन) त्याचे शांतिप्रिय आणि आत्मा प्रामाणिक बनून जातो. मन त्याचे प्रभु नाम स्मरणामध्ये तल्लीन होऊन जाते. देवदूत आणि संदेशहरांचे आत्मे त्याला दिसू लागतात.

'नफ़्से मुल्हिमा' म्हणजेच ईशप्रेरित आत्म्यास 'रूहे इन्सानी' अर्थात् मानवी आत्मा पण म्हणतात. या टप्प्यावर त्याला पुढचे लक्ष्य – उद्दिष्ट सोपे वाटू लागते. आपल्या जागरूक ब्रह्मज्ञानामुळे त्याच्या अंत:करणामध्ये मार्गदर्शनाचा प्रकाश प्रकटणे आरंभ होते. 'इह्दिनस् सिरातल् मुस्तक़ीम' म्हणजेच 'आम्हाला सन्मार्ग दाखव' अर्थातच त्याला पुढील उद्दिष्ट स्पष्टपणे दिसू लागते. 'तमसोऽमा ज्योतिर्गमय' म्हणजेच वासनेच्या अंध:कारापासून निघून आत्म्याच्या स्वच्छ प्रकाशामध्ये वाटचाल सुरू करतो.

या ईशप्रेरित आत्म्यापाशी आल्यानंतर फार सतर्कता बाळगली पाहिजे. अभिलाषा, उत्कंठेच्या अश्वापासून खाली उतरू नये. थोडेसे प्राशन करून बहकवू जाऊ नये. जे काही मनामध्ये निर्माण होईल त्यास गुप्त, गोपनीय ठेवावे आणि अग्रेसर होत जाणे, आणि हे चांगले लक्षात ठेवावे की मध्यभागी असलेल्या नफ़्से मुल्हिमा अर्थात् ईशप्रेरित आत्म्याच्या पुढील टप्प्यावर चिरंतनता, शाश्वतता ('बक़ा') आहे आणि मागच्या टप्प्यावर निर्वाण ('फ़ना') आहे. आणि पुढच्या टप्प्यावर समाधान, संतोष आहे, तर मागच्या टप्प्यामध्ये काळजी, चिंतेचे साम्राज्य आहे. फक्त इशारा (संकेत) पुरेसे आहे.

### ४. नफ़्से मुतमइन्ना अर्थात् शांतात्मन् किंवा प्रशांत आत्मा

''(पण सदाचारी माणसाला अल्लाह म्हणेल,) हे समाधान, शांती लाभलेल्या आत्म्या! तू अशाप्रकारे आपल्या विधात्याकडे परत ये, (की) तू त्याच्यावर प्रसन्न (संतुष्ट) आणि तो तुजवर प्रसन्न (संतुष्ट). मग माझ्या निवडक भक्तां(दासां-सेवकां)मध्ये सामील (प्रविष्ट) हो आणि माझ्या स्वर्गात प्रविष्ट हो.'' ८९:२७-३०

जसे की या आत्म्याचे नावच 'मुतमइन्ना' म्हणजेच शांतात्मन आहे. म्हणून या टप्प्यावर माणसाच्या मनास शांतीचा लाभ होतो. तो प्रसन्नचित्त होतो. येथे मानव हा आपल्याच आत्मज्ञानावर - आत्मबोधावर - स्वत: मुग्ध आहे, मोहित आहे. म्हणजेच ईश्वरी सत्तेशिवाय येथे कोणीच उपस्थित नाही. येथे प्रेयसी ('माशूक') चे दर्शन आहे. निर्वाणा ('फ़ना') पासून चिरंतनते ('बक़ा') च्या टप्प्यावर आलेला आहे. तेथून परतीचा प्रवास नाही. नित्य स्थिर राहून आपल्या मनास दर्शन आणि पर्यवेक्षणामध्ये ठेवायचे आहे. या टप्प्यावर समाधानाची जिव्हा ईश्वरी तेज - तीक्ष्ण तलवार बनते. दृष्टी मातीस सोने बनविण्यासारखी अति गुणकारी बनते. हात साक्षात ईश्वराचेच हात ('यदुल्ला') बनून जातात. कान 'समीउल्ला' म्हणजेच ईश्वराचे ऐकणे आणि जिव्हा 'कलीमउल्ला' अर्थातच ईश्वराची वाणी बनून जातात आणि मन-चित्त-अंत:करण त्याचे 'अर्शुल्ला' म्हणजेच ईश्वराच्या राजसिंहासनासारखे बनून जाते. म्हणजेच मानव हा माझा रहस्य आहे आणि मी त्याचे रहस्य-गुह्य आहे. ही गोष्ट येथे स्पष्ट होऊन जाते. मनास पूर्ण समाधान आणि आत्म्यास परिपूर्ण संतोष प्राप्त होते.

हे लक्षात असावे की साधन हा अभिलाषा, उत्कंठेच्या अश्वावर आरूढ होऊन या टप्प्यावर पोहोचलेला आहे. इकडे-तिकडे भटकलेला नाही. आणि आपल्या दृष्टीस नेहमी उच्च स्थळावर ठेवत येथपर्यंत आलेला आहे. तेव्हा कुठे हे भाग्य त्याला लाभलेले आहे. 'ही ईश्वराची कृपा आहे.' 'हाज़ा मिन फ़ज़्लि रब्बी' आपल्या आत्म्यास सुशोभित करा म्हणजेच सुरक्षित ठेवा. जपा. दिव्य दृष्टी आणि चमत्कारापासून परावृत्त व्हा. साधकास आपली निरासक्ती पुरेशी आहे. अल्लाहच पुरेसा आहे. बाकी सर्व काही तोच आहे. ज्ञानोदय झाल्यानंतर सर्व वासनाक्षय होतो व अनुभूती-निरास झाल्यावर मुक्त स्वरूपात नफ़्से मुतमइन्ना हा 'शांतात्मन' असतो (बनतो).

### ५) नफ़्से रहमानिया अर्थात् दिव्य आत्मा

''पण, आम्ही लवकरच या लोकांस आपल्या (सामर्थ्याच्या) निशाण्या किंवा संकेत (जगाच्या) आसमंतातही दाखवू व खुद्द त्यांच्यांतही, येथपर्यंत की यांना जाहीर होऊन जाईल की हे कुराण (अल्लाहकडून) आलेले सत्य होय, (की त्याची भविष्ये खरी होत चालली आहते.)'' ४१;५३

हे उघड (स्पष्ट) आहे की नफ़्से अम्मारा (भ्रष्ट आत्मा), नफ़्से लव्वामा (दूषित करणारा आत्मा) आणि नफ़्से मुल्हिमा (ईशप्रेरित आत्मा) या तीन्ही टप्प्यांवर वासनेशी आटोकाट संघर्ष करत, व चित्त परिष्कार करून साधक हा नफ़्से मुतमइन्ना (प्रशांत आत्मा) मध्ये प्रवेश करतो. तेथे त्याला मन:शांती आणि आत्म्यास समाधान प्राप्त झाले. आता कोणतीच वासना शिल्लक राहिली नाही. परंतु या चारी आत्म्यांचा शासक नफ़्से रहमानिया म्हणजेच दिव्य आत्मा आहे. सर्व वासनांवर याचेच आधिपत्य आहे, शासन आहे, आणि सर्व आत्मे याच्यामध्येच समाविष्ट आहेत. म्हणून याचे 'नफ़्से रहमानी' असे नामकरण झाले आहे. हा आत्मा समस्त सामर्थ्य आणि पराकाष्ठेचा धनी आहे. तोच उपासनेस योग्य असा उपास्य आहे. तोच सत्य उपास्य आहे.

या संदर्भात स्वत: परमेश्वराचे वचन आहे –

''मीच अल्लाह आहे, माझ्याशिवाय दुसरा कोणीच अन्य उपास्य (ईश्वर) नाही.'' २०:१४ किंवा ''अल्लाह हा असे (अधिष्ठान) आहे की त्याच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही उपास्य नाही.'' ४:८७

या सर्वोच्च स्थळावर साधकामध्ये आपोआप सुधारणा घडून येते. येथे कोणीच परका नसतो. साधक सर्व काही जाणतो. प्रत्येक वस्तू त्याच्यासाठी सुस्पष्ट असते. मानव हा परमेश्वराचा आरसा आहे. 'अल इन्सानु मिरातुर्रहमान'. प्रकाशच प्रकाश आहे. प्रभूच प्रभू आहे. म्हणजेच या टप्प्यावर ईश्वर मानवामध्ये दृग्गोचर होतो. याला 'मुरब्बी' असे म्हणतात. म्हणजेच मानव हा ईश्वरास धारण करणारा असतो .

या संदर्भात सुप्रसिद्ध दखनी कवी व दक्षिण भारतातील गुलबर्गा(कलबुर्गी)येथील प्रसिद्ध सूफ़ी संत बंदा नवाज़ यांचे एक दखनी काव्यचरण पाहण्याजोगे आहे. ते असे –

*''मन अरफ़ दावत है और नफ़्स सो हैगा क़लम ।*
*क़द अरफ़ के लौह ऊपर रब्ब: हैगा रक़म ।।*
*नफ़्स से जारी हुए औलाद-ए-आदम है बहम ।*
*नफ़्स जिसको बोलते सो हज़रत आदम का दम ।।''* – ख्वाजा बंदा नवाज़

### ख) देह-संसृष्ट आत्म्याचे प्रकार[६७]

**प्रस्तावना –** सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आकाशाचे सात स्तर आणि पृथ्वीचे सात स्तर निर्माण केले आहेत. याच कारणामुळे त्याने मातीतून वनस्पती उगविल्या आणि त्या वनस्पतींपासून जनावरे (प्राणी) आणि जनावरांपासून मनुष्यास परिपूर्ण निर्माण केले. यानंतर त्यांच्यासाठी चार प्रकारचे आत्मे प्रदान केले. प्रथम जड आत्मा, द्वितीय वनस्पती आत्मा, तृतीय पशु आत्मा आणि चतुर्थ मानवी आत्मा. अशाप्रकारे आत्म्यास उत्पन्न करून पाण्याच्या मदतीने त्यास टवटवीतपणा आणि चैतन्य पुरविले आणि त्याच्यामध्ये 'रूह कुदसी' म्हणजेच पवित्र आत्मा यास प्रविष्ट करविले आणि याच्यामध्ये आत्मा पशुस्वरूप आहे आणि वानस्पतिक वासना आहे आणि मानव आत्मा विवेक-बुद्धी आहे. हा आत्मा चकचकित काचेसारखा आहे आणि मानवी आत्मा दिव्यामधील तेलासारखा आहे. विशुद्धतेने विशुद्धता आणि सूक्ष्मतेने सूक्ष्मता प्राप्त होते. आत्म्यास दृष्टी असते व जाणीव पण असते. जसे प्रकाश हे दैवी प्रकाशाशी निगडित असते. याच कारणास्तव तप:लोका ('जबरूत')मध्ये याची बैठक आहे, याचे आसन आहे. या प्रकाशास ओळखण्याची रीत (पद्धत) अशी आहे – सर्वप्रथम स्वत:च्या अस्तित्वास ओळखले पाहिजे. म्हणजेच 'स्व' ची जाणीव असावी. दुसरी ओळख विश्वाची – ब्रह्मांडाची असावी. तिसरी ओळख आहे 'स्वप्राणा'ची म्हणजेच आत्म्याची. 'जो स्वत:स ओळखतो तो आपल्या प्रभूस ओळखतो.'

प्रथम अस्तित्व आहे स्थूल देहाचे म्हणजेच 'वाजिबुलवजूद'चे. दुसरे लिंग देह अर्थात् 'मुमकिनुल वजूद' आहे. तिसरे आहे कारण देह म्हणजेच 'मुमतनुलवजूद'. चौथे आहे महाकारण देह अर्थात् 'आरिफुलवजूद'. आणि सर्वात शेवटी पाचवे आहे 'वाहदलवजूद' म्हणजेच सूक्ष्म देह. या सर्व देहसंसृष्ट आत्म्यांचे देह संकीर्तन पुढीलप्रमाणे आहे –

### १) वाजिबुल वजूद – स्थूल देह

ज्याचे अस्तित्व आहे, ज्याचे अस्तित्व असणे जरूरीचे आहे त्यास 'वाजिब' असे म्हणतात. हे अस्तित्व आपल्या सत्तेने स्वयंभू आहे. हे वास्तविक आराध्याचे, उपास्याचे अस्तित्व आहे. याच्या नाम ('ज़ात') रूपां ('सिफ़ात')मध्ये कोणत्याच प्रकारचे बदल घडून येत नसतात. 'व हुवलहय्युल क़य्यूम.' म्हणजेच 'तो परमेश्वर चैतन्य आणि अविनाशी आहे.' त्याला कधीच विनाश नाही. तो चिरंजीव आहे. तो नित्य आहे. परंतु माणसाचे हे पार्थिव अस्तित्व पण साधारण वस्तू नाही. आत्मा, मन आणि वासना याच्याच माध्यमाने दृष्टिपथात आलेले आहेत आणि याच अस्तित्वाच्या बळावर सर्वश्रेष्ठ परमेश्वरास ओळखले जाते. म्हणूनच या कारणास्तव पार्थिव अस्तित्वाची आवश्यकता आहे. या अस्तित्वाचे विलय होणे किंवा शाश्वत राहणे हे एक प्रकारचे गूढ रहस्य आहे.

या संदर्भात सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य आणि तत्त्वज्ञ ख्वाजा बंदा नवाज़ गेसूदराज़ हुसैनी गुलबर्गानिवासी यांनी आपल्या शिष्यांना सांगितले की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने कृपेखातर मानवास हे दृश्य शरीर बहाल केले आहे की जेणेकरून त्याने यास सुरक्षित ठेवावे. जर बेसावधगिरी बाळगली तर विनाश निश्चित आहे. निवाड्याच्या दिवशी परमेश्वर जेव्हा दुसरे शरीर अर्पण करेल मानवास पुन्हा जिवंत उठवेल तेव्हा तो या नूतन शरीराऐवजी त्याच्या बदल्यात त्याची सर्व सत्कर्मे हिरावून घेईल. शिष्यांनी शंका व्यक्त करत त्यांना विचारले की हे पार्थिव शरीर कशा प्रकारे सुरक्षित ठेवले जाऊ शकते. सद्‌गुरू बंदा नवाज़ यांनी उत्तर दिले की विशुद्ध उपजीविका, सत्पात्री दान आणि मनामधील कळवळा यांच्या आधारे ''अल्लाह अल्लाह'' (हे परमेश्वरा! हे परमेश्वरा!) म्हणत आळवणी केल्यास हे पार्थिव शरीर (मरणोत्तर) थडग्यामध्ये सुरक्षित राहते. याचे दृष्टांत मातीचे भांड्यासारखे आहे. आगीमध्ये तप्त करून मातीचे भांडे बाहेर काढल्यास ते आप, तेज व वायुमुळे नष्ट होत नाही. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने मानवी देह निर्माण करून त्यात त्याने आपला प्राण फुंकला. देह आणि आत्मा एकत्र झाले तेव्हा वास्तविक अस्तित्व प्रकट झाले म्हणजेच ईश्वरी नाम-रूपांचे वास्तव प्रकट झाले. या वास्तवाचे मोती मन आहे. यामध्ये ईश्वराचे दैवी राजसिंहासना ('अर्श') चे गुण विद्यमान आहेत. याच कारणास्तव हा पार्थिव देह 'वाजिबुलवजूद' म्हणजेच स्थूल देह बनला. याचे वेताळ ('मुवक्किल') प्रमुख देवदूत मीकाईल हे आहेत. हे अस्तित्व तेव्हा निर्माण झाले जेव्हा पाणी मातीशी मिसळलेले होते म्हणजेच चिखल होते.

### २) मुमकिनुल वजूद – लिंग देह

'मुमकिनुल वजूद' ते आहे की जिचे अस्तित्व असणे व नसणे हे जरूरी-आवश्यक नसते. हे अस्तित्व कधी असते तर कधी नसते. आणि हे अस्तित्व समस्त विश्वाचे-ब्रह्मांडाचे अस्तित्व आहे. सर्वोच्च आकाशापासून ते भूतळापर्यंत, शरीरापासून ते मन व आत्म्यापर्यंत हे अस्तित्व – हा देह सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अस्तित्वामुळे कायम आहे. हे अस्तित्व या पार्थिव शरीरामध्ये देह स्वरूपात विद्यमान आहे. ते मानवाच्या निद्रिस्त अवस्थेमध्ये बाहेर पडून हजारो प्रकारच्या विभिन्न आकार व आकृती ग्रहण करते, धारण करते. या देहास आध्यात्मिक ('रूहानी') पण म्हणतात. आजकाल पाश्चात्य देशांमध्ये या 'वजूद' अर्थात् अस्तित्वाची फार चर्चा (चाललेली) आहे. ब्रह्मज्ञानीपण आपल्या कल्पना-शक्तीच्या बळावर पार्थिव शरीरापासून याला वेगळे करतो. याशिवाय निद्रेच्या काळात या देहापासून ब्रह्मज्ञानी फार काही शिकतो. जर हे देह चांगल्या आणि

पवित्र स्थळी सहल करीत असेल तर समजावे की ब्रह्मज्ञानीची तपस्या आणि उपासना योग्य अशा टप्प्यावर आहे. हा देह ध्यानी-मनी आणि अवलोकनामध्ये अशा नवीन-नवीन गोष्टी दाखवितो याअगोदर त्याला याची कधीच जाणीव नव्हती. जसे की याचे नाव 'मुमकिन' म्हणजेच 'संभव', 'शक्य' असे पडले आहे. म्हणूनच याच्या मदतीने प्रत्येक कार्य संभव-शक्य होते. याला 'रूह-ए-जारी' म्हणजेच प्रवाही आत्मा असे पण म्हणतात. याच आत्म्याशी वायद्याच्या जगा ('आलम-ए-मीसाक़')मध्ये - दृढ प्रतिज्ञेच्या विश्वामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रश्न उपस्थित केला होता की 'काय मी तुमचा प्रभू नाही?'

हा 'मुमकिनुल वजूद' म्हणजेच लिंग देह दोन प्रकारचा आहे - १) आहे ('हस्त') आणि २) नाही ('नेस्त'). क्षणार्धात असंख्य रूपे बनतात आणि अंतर्धान पावतात (होतात.) आणि कित्येक स्वरूप बराच काळ टिकतात. एक हदीस (प्रेषित-वचन) आहे - पार्थिव शरीराअगोदर हजार वर्ष पूर्व आत्मांना निर्माण करण्यात आले. खरोखर हा लिंग देह 'रूह-ए-कुदसी' म्हणजेच पवित्र आत्म्यामुळे कायम आहे. हा पवित्र आत्मा सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे प्रतिबिंब किंवा पडछाया आहे. भौतिक शरीरास गती प्रदान करून त्यास सहल घडविणे ही त्याचीच जबाबदारी आहे. म्हणून 'रूह-ए-कुदसी' म्हणजेच पवित्र आत्म्यामुळे कायम आहे. हा पवित्र आत्मा सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे प्रतिबिंब किंवा पडछाया आहे. भौतिक शरीरास गती प्रदान करून त्यास सहल घडवणे ही त्याचीच जबाबदारी आहे. म्हणून 'रूह-ए-कुदसी'पण अनिवार्य आहे. या 'मुमकिनुल वजूद' म्हणजेच लिंग देहाचे स्थळ पण मन आहे. कारण प्रत्येक प्रकारच्या विचारांचे समष्टिगत स्वरूप मनामध्येच निर्माण होतात. या लिंग देहास 'निर्मळ मार्ग'पण म्हणतात. स्थूल देह हा भौतिक द्वार बनले, तर लिंग देह हे विशुद्ध आत्मिक -आध्यात्मिक द्वार बनले.

या लिंग देहाचे वेताळ ('मुवक्किल') प्रमुख देवदूत इस्त्राफ़ील हे आहेत. वायू यांच्या अधीन असते. ते वायूस चालवितात. या लिंग देहामध्ये वायूपेक्षा जास्त शक्ती व बळ असल्यामुळे हा एका क्षणातच पूर्वेहून पश्चिमेकडे, उत्तरेहून दक्षिणेकडे पोहोचू शकतो. तसेच क्षणार्धात सर्वोच्च आकाशा ('अर्श') पासून ते पृथ्वीतळापर्यंत लीलया सहल करून परत येतो. या लिंग देहामध्ये ही प्रबळ शक्ती तेव्हा निर्माण झाली जेव्हा मानवजातीचे आद्यपिताप्रमह आणि आद्य प्रेषित आदम यांच्या शरीरामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्वप्रथम आपले प्राण ('रूह') फुंकले. परमेश्वराचे वचन आहे - ''व नफ़ख़्तु फ़ीहि मिर्रूही'' म्हणजेच ''आणि माझा आत्मा त्याच्यात फुंकीन'' १५:२९ 'फुंकीन' हे परमेश्वराच्या त्या आत्म्यासंबंधी आहे आणि मानवाच्या या प्राणास-आत्म्यास 'नफ़ख़्तु' शिवाय जीवन नाही. ती ईश्वराची संकल्प-शक्ती आहे जी या लिंग देहामध्ये आहे.

**३) मुमतनुलवजूद : कारण देह**

मी अस्तित्वास पाहिल्यानंतर असे आढळले की ते जुन्यातले जुने होते, प्राचीनामधील प्राचीन होते. 'मुमततुल वजूद'च्या धात्वर्थावरून असे माहित पडते की सर्वश्रेष्ठ परमेश्वराशिवाय अन्य कोणत्याच वस्तूचे अस्तित्व नाही. म्हणून हा कारण देह ईश्वराचे अस्तित्व आहे. प्रथम व शेवटी, आत व बाहेर 'अल्लाह'च 'अल्लाह' आहे. याचाच अर्थ असा की ईश्वर सर्वत्र आहे. तो सर्वव्यापी आहे. परमेश्वराचे वचन आहे - ''सर्वश्रेष्ठ प्रभूशिवाय अन्य कोणतेच अस्तित्व नाही.'' ''अल्लाहखेरीज अन्य कोणताही ईश्वर नाही. त्याच्याव्यतिरिक्त इतर प्रत्येक गोष्ट नाश पावणार आहे.'' २८:८८ अनादि (काळा)मध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सत्तेशिवाय काहीच (अस्तित्वात) नव्हते. केवळ एकमात्र सत्ता होती. जेव्हा परमेश्वराच्या या सत्तेने

अस्तित्वहीनतेचा तगादा केला की स्वत:शिवाय कोणतीच (दुसरी) वस्तू नाही. हेच कारण देह आहे, 'मुमतनलवजूद' आहे. या कारण देहास 'स्थळनिरपेक्ष' म्हणजेच 'ला मकान' असे म्हणतात. कारण की ना ती सत्ता (ज़ात) आहे ना रूप-गुण (सिफ़त), परंतु समस्त वस्तूंचे स्थळ आहे. दोन्ही जगांच्या (लोकांच्या) - इहलोक व परलोक - शक्यता याच कारण देहामुळे निर्माण झाल्या आहेत. ज्याने आपल्या आत्म्या (वासने)स ओळखले त्याने आपल्या प्रभू म्हणजेच कारण देहास ओळखले. ब्रह्मज्ञानी जेव्हा या कारण देहास स्वत:मध्ये पाहतो तेव्हा तो दोन्ही जगांच्या स्वामीपर्यंत उड्डाण घेतो. हे यासाठी की या कारण देहास 'प्रभू', 'स्वामी' ('रब') पण म्हणतात. एक हदीस आहे - प्रभूस प्रभुमध्ये पाहिले. हे याचे उद्दिष्ट आहे. साधकाने सद्गुरूच्या संकेताच्या बळावर प्रथम या कारण देहास ओळखून घ्यावे. यानंतर त्याने स्वत:स आंतर-बाह्य हालचाल व विचारांपासून अलिप्त ठेवावे आणि डोळे मिटून असे स्वस्थ, कोणतीच हालचाल न करता, बसावे, जणू काही तो अचल दगडच आहे. लवकरच त्याच्यासाठी कारण देहाचे वास्तव उघड होऊन जाते. या कारण देहाचा वेताळ इज्राईल हा प्रमुख देवदूत आहे. हा मृत्यूचा देवदूत आहे. सर्व सजीवांच्या मृत्यूची जबाबदारी याच्यावर सोपविलेली आहे. कारण देहास प्राप्त करण्यासाठी 'मरणाअगोदर मरण क्रमप्राप्त असते.' - हदीस

येथे हे चांगल्या प्रकारे जाणून घेतले पाहिजे की परमेश्वराच्या सत्तेचा निरस्तित्वाच्या (अस्तित्वहीनतेच्या) अस्तित्वाचा तगादा म्हणजे वास्तविक सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे अस्तित्वच आहे. कारण देहामध्ये जो आत्मा आहे तो पवित्र आत्मा म्हणजेच रूह कुदसी आहे. हा परमेश्वराचा प्रतिबिंब - पडछाया आहे. कारण देहाचे अस्तित्व आणि आत्म्याचे अस्तित्व आपसामध्ये वेगळे (भिन्न) नाहीत. सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा आपल्या कारण देहासह कायम आहे आणि पवित्र आत्मा म्हणजेच रूह कुदसी हा सर्वश्रेष्ठ परमेश्वरासोबत कायम आहे. संकेत मात्र पुरेसे आहे. अधिक चर्चेसाठी धर्मशास्त्रामध्ये परवानगी नाही. या टप्प्यावर मोठ्या चातुर्याने कार्य साधा. धोक्यांपासून सुरक्षित राहा. कारण की मूळ गोष्ट महाकारण देहा ('आरिफ़ुल वजूद') मध्ये प्रवेश करण्याची आहे.

**४) आरिफ़ुल वजूद - महाकारण देह**

आणि प्रत्येक दृष्टीने सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अस्तित्वामुळेच प्रत्येक वस्तू अस्तित्वात आहे. 'आत्म-बोध' किंवा 'स्व-परिचय' च्या मार्गामध्ये 'आरिफ़ुल वजूद' म्हणजेच महाकारण देह त्यास म्हणतात की जो आपल्या अस्तित्वाचा ज्ञाता आहे. म्हणजेच या अस्तित्वामुळे आपले अस्तित्व काय आहे आणि आपली अस्तित्वहीनता काय आहे, ही गोष्ट ध्यानात येते आणि या अस्तित्वास महाकारण देह यासाठी म्हणतात की हा महाकारण देह अशा स्वरूपात आहे की ज्याच्यावर सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे अस्तित्व चरितार्थ होते. साधक जेव्हा या टप्प्यावर पोहोचतो तेव्हा तो आपल्या ज्ञानाच्या बळावर याच्याशी चांगला परिचित होऊन जातो आणि तो आपल्या प्रभूचे रहस्य ओळखतो आणि मग तो ब्रह्मज्ञानी म्हणजेच 'आरिफ़बिल्ला' बनून जातो.

स्थूल देह, लिंग देह आणि कारण देह हे आपल्या स्थैर्यासाठी महाकारण देहावर निर्भर असतात. 'मी लपलेला खजिना आहे', हे याच महाकारण देहाचे रहस्य आहे. यामध्ये प्रकाशच प्रकाश आहे. रहस्यच रहस्ये आहेत. या महाकारण देहाची वाणी (शब्द) आहे - 'कुन फ़यकून' म्हणजेच परमेश्वर आज्ञेने 'हो' म्हणण्याचा अवकाश की ते निमिषमात्रात तत्काल 'होऊन जाते' 'कुल्ल जमीलु मिन जमालिल्ला'शी मथिथार्थ याच महाकारण देहाशी आहे. आणि हीच 'जो आपल्या आत्म्यास ओळखतो तो आपल्या प्रभूस ओळखतो,' त्याची ओळख आहे.

साधकाने आपल्या अस्तित्वामध्ये महाकारण देहाच्या दर्जास ओळखले पाहिजे, की जेणेकरून सर्वश्रेष्ठ परमेश्वरास प्राप्त करावे. ज्याप्रमाणे तो कारण देहामध्ये ईश्वरेतराच्या विचारांपासून मुक्त होऊन डोळे मिटवून बसला होता आणि सर्वांपासून विभक्त होऊन कारण देहास त्याने प्राप्त केले होते, परंतु त्याच्यामध्ये अहंकार होता. यास्तव या मुग्धतेस आपल्या दृष्टीपासून दूर सारावे तेव्हा कोठे महाकारण देह त्याच्यावर प्रकट होईल. या महाकारण देहास 'मुहम्मदी प्रकाश' म्हणजेच 'नूर-ए-मुहम्मदी'पण म्हणतात. हे स्थळ आपल्या मुळारंभाकडे प्रयाण करण्याचे आहे. एक हदीस आहे – 'प्रत्येक वस्तू ही आपल्या मुळाकडे प्रयाण करते.' म्हणजेच त्याच्याकडे वशीला लावा (धरा). म्हणजेच आशय हा की व्यक्त गुणांना नष्ट करा. लुप्त करा. आणि महाकारण देह प्राप्त करा. साधकाने हे जाणावे की या गुणास आपले स्वत:चे मानू नये. याला ओलांडून स्वत:वर दृष्टी ठेवावी व विचार करावे की मी कोण आहे, काय आहे आणि माझे मन मुळात काय आहे? जेव्हा 'जो स्वत:स जाणतो' चे गूज त्याच्यावर उघडले जाईल तेव्हा तो स्वत: स्वत:स ओळखेल की त्याचे निरपेक्ष अस्तित्व काय आहे. मग साधक जेव्हा आपल्या निरपेक्ष अस्तित्वास ओळखेल तेव्हा निरपेक्ष अस्तित्व सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सत्तेच्या अस्तित्वास पण आपल्या या अस्तित्वाच्या आधारावर ओळखेल. 'तो परमेश्वरास ओळखतो'ची हीच ओळख आहे.

या टप्प्यावर साधक हा आपल्या अस्तित्वाच्या बळावर (आधारे) स्वत:स पाहतो आणि समजतो की माझे ब्रह्मज्ञान मी स्वत: आहे आणि माझे अस्तित्व हे ब्रह्मज्ञानामुळे आहे आणि मी ब्रह्मज्ञानी आहे. यावरून हे सिद्ध झाले की महाकारण देह हे ब्रह्मज्ञानाचे चर्वण आहे, सार आहे.

जेव्हा साधक आपल्या ब्रह्मज्ञानाशी परिचित होतो तेव्हा तो याच्या गुणांशी पण परिचित असावा. महाकारण देहाचे शरीर प्रकाशमय आणि आत्मा पवित्र असतो. वेताळ याचे जिब्रईल हे प्रमुख देवदूत आहेत. वेताळ जिब्रईलचा आशय हा आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराची वाणी आणि आकाशवाणी (इलहाम) यांना ग्रहण करावे – आत्मसात करावे. प्रेषित मुहम्मद स. यांचे अस्तित्व प्रकाशमय महाकारण देह होते. म्हणून सर्वप्रमुख देवदूत जिब्रईल हे त्यांचे खास वेताळ होते. विशेषत्वेकरून प्रेषितामध्ये ही योग्यता पराकाष्ठेच्या दर्जावर होती. या योग्यतेचे नाव जिब्रईल आहे आणि याच जिब्रईलपासून प्रेषित ईश्वर-वाणी प्राप्त करत असत. आशय हा की महाकारण देहाचा प्रकाश प्रेषित मुहम्मद स. यांच्या तोडीचा आहे. साधकाने या दर्जास ओळखावे की जेणेकरून मुहम्मदी अस्तित्वाच्या दर्जापर्यंत (त्याची) पोहोच व्हावी.

दिव्य आरोहण म्हणजेच 'मेराज'च्या दर्ज्यामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रेषित मुहम्मद स. यांच्याशी संवाद साधला होता. या दिव्य वाणीस ग्रहण करण्याची क्षमता ही जिब्रईलच्या आत्म्याचे वास्तव आहे. सारांश, या पद्धतीनेच इहलोकामध्ये – या जगामध्ये प्रेषित मुहम्मद स. यांना आदेश प्राप्त झाले.

महाकारण देह हा आपल्या श्रवणशक्तीने ही वाणी ऐकतो आणि तो दिव्य आदेश घेऊन आपल्या अधीन असलेले तीन देह अर्थात् स्थूल देह, लिंग देह आणि कारण देह यावर ते आदेश जारी करतो. जी वाणी शारीरिक अस्तित्वाच्या आधारे ऐकली जाते प्रथम शारीरिक कानांपर्यंत पोहोचते, नंतर आत्मिक वा आध्यात्मिक देहाच्या कानांपर्यंत पोहोचते, यानंतर अंध:कारमय देहाच्या कानांपर्यंत पोहोचते. याच्यानंतर प्रकाशाच्या देहाच्या कानांपर्यंत पोहोचते. याचाच अर्थ असा की सर्वश्रेष्ठ परमेश्वर जे काही वाणी, तेजांश प्रकटन, आदेशाचा आनंद,

दर्शन, अवलोकन, चिंतन प्रदान करतो हे सर्व प्रथम महाकारण देहास पोहोचवितो, मग कारण देहास, नंतर लिंग देहास याच्यानंतर स्थूल देहास पोहोचवितो. हे पोहोचलेल्या साधकासाठी परीक्षित आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराची प्रत्येक वाणी जी प्रकाश स्वरूपात असते तिला रहस्य असे म्हणतात. जेव्हा ते देहावर प्रकट होते तेव्हा त्यास 'हातिफ़' म्हणजेच हाका मारणारा, बोलविणारा असे म्हणतात. हे ज्या देहावर प्रकट होतात, त्या देहासमानच गणले जातात. याच कारणास्तव या ध्वनींना म्हणजेच वाणीस ओळखणे कठीण जाते, परंतु महाकारण देहच हे ओळखू शकतो. या दर्जावर पोहोचल्यानंतर सर्वप्रथम सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून वाणी होते (येते) की जेणेकरून साधकाने ईश्वरी वाणीस समजून घ्यावे. यानंतर तेजांश प्रकट होते की जेणेकरून तो याच्या साहाय्याने ईश्वराचे सौंदर्यदर्शन करावे. हे दर्शन, अवलोकन, चिंतन पवित्र आत्म्या ('रूह-ए-कुदसी') सोबत आहे आणि समस्त दर्शन हे फक्त आत्म्याशी निगडित असते. ईश्वर वाणी ऐकण्याची क्षमता फक्त प्रकाशमय देहामध्येच असते. एक हदीस आहे - 'मन हे शरीर आणि आत्म्याच्या दरम्यान आहे आणि प्रकाश हा आत्मा व ईश्वरी सत्तेच्या दरम्यान आहे.' परंतु या स्थळास आत्मा आणि शरीर म्हटले गेले आहे, परंतु हे शरीर व हा आत्मा हे पाऱ्याप्रमाणे चकचकीत आहेत म्हणजेच आत्मा आणि शरीर एक दुसऱ्याशी भिन्न नाहीत. अर्थ हा की पवित्र आत्मा हा प्रभू दर्शनासाठी सक्षम असतो. मात्र अट अशी की हुतात्मा मन प्राप्त असेल तर अवलोकन, चिंतन, निरीक्षण केले जाऊ शकते.

एका हदीसमध्ये म्हटले आहे की मी अल्लाहच्या प्रकाशापासून आहे आणि प्रत्येक वस्तू माझ्या प्रकाशापासून आहे. यास्तव याचा अर्थ असा आहे की प्रेषित मुहम्मद स. हे परमेश्वरासमान आहेत आणि ब्रह्मांडाचे अस्तित्व हे त्यांच्या पवित्र अस्तित्वासारखे आहे. याला महाकारण देह म्हटले जाते. कारण की महाकारण देह हा प्रकाशाचे सारस्वरूप आहे. याचे गुण व अवयव ईश्वरी सत्तेच्या सौंदर्याशिवाय तपशीलवार दिसून येत नाहीत. अशाच प्रकारे सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा पण आपल्या अस्तित्वानिशी कायम आहे, परंतु प्रकाशमय महाकारण देहाशिवाय दिसत नाही. जेव्हा हे अस्तित्व परिपूर्णपणे सिद्धहस्त ब्रह्मज्ञान्यास प्राप्त होते तेव्हा ते 'रूह-ए-मुहम्मदी' म्हणजेच मुहम्मदीय आत्म्याच्या दर्जापर्यंत पोहोचतो.

**चेतावणी - ताकीद -** या टप्प्यावर व दर्जावर पण नवीनता अनिवार्य आहे. म्हणून साधकाने जेव्हा आपल्या ब्रह्मज्ञानास आपण ओळखले असावे म्हणजेच आत्मा, मन व वासना यांच्या वेताळाशी परिचित झाले असल्यास तेव्हा त्याने ते विस्मृत करावे की जेणेकरून ब्रह्मज्ञानप्राप्तीचा मार्ग प्राप्त व्हावे.

**५. वाहदल वजूद - सूक्ष्म देह**

कोणीही त्याच्याशिवाय अस्तित्वात नाही आणि कोणतेच अस्तित्व हे त्याच्या अस्तित्वाशिवाय नाही. हे अस्तित्व परम विशुद्ध अल्लाहचे पवित्र अस्तित्व आहे आणि त्याला विशुद्ध सत्ता पण म्हणतात. हे अस्तित्व आपल्या सत्तेनिशी एकमेव असून आपल्या अस्तित्वाशी कायम आहे. हे अस्तित्व एकटे-एकमेव असून कोणत्याही सहभागित्वाविना आहे. ते स्थळविरहित असून दिक्कालातीत आहे. पारिभाषिक वर्णाक्षरांच्या अनुषंगाने ते 'ला' म्हणजेच निषेधसूचक 'नाही' स्वरूपात आहे. या अस्तित्वाचे गुह्य व रहस्य "जिकडे पहाल तिकडे अल्लाहचाच चेहरा आहे." हे आहे. हे अस्तित्व सूक्ष्म देह आहे. म्हणून ते सर्वांच्या आकलनापलीकडे आहे. हे एकतेमध्ये (वहदत) विविधता (वाहिदियत) आणि एकत्त्वते (अहदियत) मध्ये ईश्वरी सत्तेचे विशुद्ध

एकेश्वरवाद (तौहीद) आहे. या अस्तित्वाचे विवेचन करण्यासाठी लेखणी असहाय आहे. हा निरासक्तीचा परमोच्च बिंदू वा शिखर आहे.

*''जो भेद की इस सूरत ज़ेबा में छुपा है*
*हो जाएगा फ़ाश तो कह दे कि खुदा है ।।''*

**भावार्थ –** जे रहस्य या सुंदर चेहऱ्यामध्ये दडलेले आहे, जर ते उद्घाटित (व्यक्त) झाले तर, म्हण की ते परमेश्वर आहे.

या सूक्ष्म देहापर्यंत पोहोचणे ही गोष्ट सर्वांच्या आवाक्यात नव्हे. एक हदीस आहे – निरासक्ती पूर्णत्वास पोहोचणे ही अट आहे.

जेव्हा साधक स्थूल देह, लिंग देह, कारण देह आणि महाकारण देह या चार देहाना पार करून (ओलांडून) या सूक्ष्म देहामध्ये पदार्पण करतो तेव्हा तो स्वत:व्यतिरिक्त कोणालाच पाहात नाही. म्हणजे सूक्ष्म देह हा स्थूल देहामध्ये दिसून येतो. याचे रहस्य हीच हदीस कुद्सी (पवित्र प्रेषित वचन) आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा गुप्त खजिना बनून होता. त्याला ही गोष्ट पसंत पडली की अस्तित्वांतर्गत अस्तित्व बनून स्वत: ओळखले जाऊ. म्हणून त्याने सृष्टी प्रकट केली. म्हणजेच परम पवित्र व परमश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या विशुद्ध सत्तेस आपल्या सूक्ष्म देहाच्या प्रतिबिंबावरून महाकारण देहास अस्तित्वात आणले आणि ते 'नूर मुहम्मदी' म्हणजेच मुहम्मदीय प्रकाश आहे. महाकारण देहाच्या अस्तित्वावरून कारण देहाचे निरस्तित्व (अस्तित्वहीनता) निर्माण झाले. कारण देहाच्या अस्तित्वहीनतेने लिंग देह प्रकट केले आणि लिंग देहापासून स्थूल देह उदयास आले. या अनुषंगाने स्थूल देह हे लिंग देहाचे आविष्करण, आणि लिंग देह हे कारण देहाचे आविष्करण आणि कारण देह हे महाकारण देहाचे आविष्कारण, आणि महाकारण देह हे सूक्ष्म देहाचे आविष्कारण आहे. यावरून ही गोष्ट ठळकपणे लक्षात येते की ज्याने सूक्ष्म देहामध्ये पदार्पण केले त्याने पार्थिव परिष्करणापासून स्थूल देह प्राप्त केले.

हे चांगल्या प्रकारे लक्षात असावे की हे सर्व देह आपल्या वास्तवास प्राप्त करण्यासाठी आत्म–बोधाच्या– स्व परिचयाच्या मार्गामधील एक साधन आहेत, माध्यम आहेत. ज्याप्रमाणे स्थूल देहाचा मार्ग धर्मशास्त्र ('शरीअत') हा राजमार्ग आहे, लिंग देहाचा मार्ग अध्यात्म ('तरीक़त') आहे, कारण देहाचा मार्ग जीवनभक्ती ('हक़ीक़त') आहे, आणि महाकारण देहाचा मार्ग ब्रह्मज्ञानप्राप्ती ('मारिफ़त') आहे तद्वत सूक्ष्म देहाचा राजमार्ग अद्वैतवाद ('तोहीद') हा आहे आणि हाच तो राजमार्ग आहे जेथे इतर सर्व रस्ते येऊन मिळतात. यावरून हे ज्ञात होते की अद्वैतवादाचा टप्पा गाठण्यासाठी धर्मशास्त्राच्या मार्गावर चालणे हे आद्य कर्तव्य आहे. हे यासाठी की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या सत्तेच्या अद्वैतावरून स्वत:स प्रत्यक्ष ब्रह्मज्ञानामध्ये पाहिले आणि आपल्या ब्रह्मज्ञानास ऐन जीवन भक्तीस्वरूपात पाहिले आणि आपल्या जीवन भक्तीस ऐन अध्यात्मासोबत पसंत करून आपल्या अध्यात्मास ऐन धर्मशास्त्र बनविले आणि हाच सन्मार्ग आहे – सरळ मार्ग आहे. म्हणून धर्मशास्त्र प्रेषित मुहम्मद स. यांनी आखलेली ती 'लक्ष्मण–रेषा' आहे की जिच्याविषयी कोणतीच व्यक्ती समेट घडवू शकत नाही. साधकाने अद्वैतवादाच्या टप्प्यावर पोहोचण्याचे प्रयत्न करावेत.

*''कोशिश करे इन्सान तो क्या नहीं मिलता*
*वो मस्ला क्या है जो हल नहीं होता ।।''*

**भावार्थ** – मानवाने जर प्रयत्न केले तर काय साध्य होत नाही? ज्याचे निराकरण होत नाही ती समस्याच काय बरे आहे!

या टप्प्यावर पोहोचल्यानंतर 'ज्याने आपल्या आत्म्यास जाणले त्याने आपल्या प्रभूस ओळखले' – याचे सर्व मार्ग खुले होतात, की जेणेकरून साधकास समस्त विश्वाची सहल घडावी आणि आपल्या अस्तित्वाच्या परिचयाच्या बळावर सर्व विश्वाची लीला न्याहाळावी. ज्याप्रमाणे ईश्वराचे ज्ञान या विश्वासंबंधी त्याच्यासाठी आवश्यक आहे त्याचप्रमाणे अद्वैतवादामध्ये त्याचे ज्ञान हे ईश्वरी ज्ञानाच्या बरोबर आहे. तो समस्त वस्तूंना ओळखू लागतो. अतएव तो एकटा आहे आणि परम पवित्र सर्वश्रेष्ठ परमेश्वरासोबत सूक्ष्म देहाच्या जवळपर्यंत पोहचलेला असतो. साधक हा सूक्ष्म देहामध्ये आपले अस्तित्व आणि परमेश्वराच्या अस्तित्वास एकसमान पाहतो. त्यास दोन्ही एकसारखे वाटतात. म्हणजेच तो सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे चैतन्य ('हय्यु') या गुणास सिद्ध करतो की परमेश्वर हा चिरंजीव आहे म्हणून त्याची परिगणना ही जिवंतांमध्ये होते. मग जगास पण तो समदृष्टीने पाहतो. हाच "त्याने (आदमला) सर्व नावे शिकविली." २:३१ चा टप्पा आहे. हे परमेश्वरासोबत ज्ञानजन्य अद्वैतवाद आणि सत्तात्मक अद्वैतवाद आहे. ईश्वराचे गुण स्वत:मध्ये सद्गुण स्वरूपात निर्माण करा. ही गोष्ट परमेश्वराच्या कृपेवर निर्भर आहे. दास किंवा भक्त ईश्वरी गुणांचे नाव आहे. हे ऐन निर्वाण ('फ़ना') आहे. भक्ताच्या शाश्वततेचा ('बक़ा') हा अर्थ आहे की त्याने आपल्या अस्तित्वास मिटवून टाकावे व परमेश्वराच्या अस्तित्वाशी (एकरूप होऊन) बाकी रहावे. या टप्प्यावर साधकास अशी अनुभूती येते की तो परमेश्वर आहे, परंतु याची उद्घोषणा करणे म्हणजे फासावर लटकण्यासारखे आहे. याहून अधिक ईश्वराची कृपा काय बरे असू शकेल की त्याने साधकाच्या अस्तित्वास आपल्या अस्तित्वामध्ये विलीन करून घ्यावे आणि आपल्या अस्तित्वाच्या कृपेने त्याच्यावर आपलेपणाची नजर घालावी की ज्यामुळे त्याने स्वत:सच परमेश्वर कल्पावे. यासंबंधी ईश्वर कथन आहे की, (तो भक्त) माझ्यामुळेच पाहतो, माझ्यामुळेच बोलतो आणि माझ्यामुळेच धरतो.

सामिप्याच्या या स्थळामध्ये साधक हा सर्व प्रकारच्या गरजांपासून निरपेक्ष असतो. "पवित्र परमेश्वर हा सर्व विश्वापासून नि:स्पृह आहे, निरपेक्ष आहे." –११२:२ एस हदीस आहे की सिद्धहस्त निरासक्त ('फ़क़ीर') हा आपली वासना, आपला आत्मा आणि प्रभूपासून निरपेक्ष असतो. हा ईश्वराचा नि:स्पृहतेचा गुण आहे, जे साधकामध्ये निर्माण होते. सामिप्याचा, नैकट्याचा हा टप्पा सर्व टप्प्यांहून सर्वश्रेष्ठ आहे. साधक या टप्प्यामध्ये आपल्या सूक्ष्म देहात नित्य कायम असतो.

## ग) आत्म्याचे स्वरूप – सूफ़ी तत्त्वज्ञानाचा दृष्टिकोन

**आत्म्याचे स्वरूप** – 'शरीअत' म्हणजेच धर्मशास्त्रामध्ये 'रूह' म्हणजेच आत्मा हा 'प्रभूचा आदेश' 'अम्र रब्बी' आहे. वास्तविक ब्रह्मज्ञानियांच्या दृष्टिकोनातून तो ईश्वराचे आविष्करण व त्याच्या सत्ते ('ज़ात') चे मर्म आहे. तत्त्वज्ञ 'रूह' अर्थात् आत्म्याला सवाक् वासना ('नफ़्से नातिक़ा') असे म्हणतात. वैज्ञानिकांच्या मते आत्मा हा विवेक–बुद्धीचा आहे, तर सर्वसाधारण लोकांचे असे मत आहे की आत्मा ('रूह') विश्व–ज्ञान ('अक़्ल कुल') आहे.

वैद्यकशास्त्रामध्ये याचे विवेचन पुढीलप्रमाणे करण्यात आले आहे –

जेव्हा अन्नाचे रूपांतर रक्तामध्ये होऊन हृदयाच्या डाव्या बाजूस पोहोचते आणि परिपक्व होते आणि सूक्ष्म ज्वर बनून यकृतामध्ये पोहोचते तेव्हा त्यास अंतरात्मा ('रूह-ए-बातिनी') असे म्हणतात. आणि जेव्हा यकृतापासून निघून मेंदूमध्ये येऊन स्नायुसमूहामध्ये संचार करू लागते तेव्हा त्याचे 'रूह-ए-नफ़्सानी' म्हणजेच वासनामय आत्मा असे होते. आणि जेव्हा स्नायुंमधून हृदयामध्ये येऊन द्रवरूपात संपूर्ण शरीरात प्रवेश करते तेव्हा त्यास 'रूह-ए-हैवानी' म्हणजेच पशुआत्मा असे म्हणतात. हा आत्मा शरीराचा सूर्य आहे आणि याचे स्रोत किंवा उगम मन आहे.

हे सर्व आत्मे निर्मित आणि नाशिवंत आहेत. परंतु आणखी एक 'रूह' म्हणजेच आत्मा आहे ज्याला 'अम्रे रब्ब', 'रूहुल्ला', 'रूहे इन्सानी' इत्यादी म्हणतात. यांना क्रमशः 'ईश्वराज्ञा', 'अल्लाहचा आत्मा', 'दैवी आत्मा', 'मानवी आत्मा' असे म्हणता येईल. हा आत्मा देहांमध्ये प्रवेश करणे किंवा शरीरांमधून बाहेर पडण्यापासून मुक्त आहे. या आत्म्यास संत-महात्मे आणि ब्रह्मज्ञानी यांच्याशिवाय सर्वसामान्य लोक ओळखू शकत नाहीत. परमेश्वराचे वचन आहे – ''आणि आत्म्यासंबंधी तुम्हास फारच थोडे ज्ञान देण्यात आले आहे.'' १७:८५ 'थोडेच'चे वास्तव हे आहे की ते 'कुन फ़ैकून' अर्थातच नाद ब्रह्म किंवा 'भव' म्हणजेच 'हो' म्हणण्याचाच अवकाश की निमिषमात्रात ती गोष्ट निर्माण होऊन जाते – याचे रहस्य आहे.

हे सर्व विदित व सर्वज्ञात आहे की मानवी शरीरामध्ये पाणी, तैल, वायू इत्यादी वर्तमान असतात. म्हणजेच अस्थि, मांस, चर्म इत्यादी जड (घन) वस्तू आहेत आणि श्वासाचा वायू जो शरीरात पसरलेला आहे तो वायू आहे. यालाच प्राणवायू म्हणून संबोधले जाते. हे वास्तव आहे की, हृदय आणि फुफ्फुसामध्ये श्वासाचा वायू रक्तप्रवाहामध्ये नसा-नसामध्ये, प्रत्येक नाडीमध्ये क्षणोक्षणी प्रवाहित होत असतो. हाच तो प्राणाचा तंतु आहे की ज्यामुळे मानवी आत्म्याचे विद्युत् तंतु आपल्या विद्युत्‌गृहापासून निघून मानवी मन व मेंदूच्या शेवटच्या भागापर्यंत पोहोचून मानवी अस्तित्वाच्या समस्त यंत्रास उबदार आणि प्रकाशित बनवितात. शास्त्रज्ञ, रसायनतज्ज्ञ, औषधनिर्माते आणि डॉक्टर ही सर्व मंडळी या अव्यक्त आत्मिक विद्युत्‌धारेशी परिचित आहेत. हे लोक रक्त किंवा त्याच्या सूक्ष्म द्रव्यविशेष तापास 'रूह' म्हणजेच आत्मा असे म्हणतात. यद्यपि आत्मा जर रक्त वा वायू वा उष्णता असता तर मग मात्र मृत्यू घडून येताक्षणीच मानवाच्या अस्तित्वामध्ये अर्थातच देहामध्ये पुन्हा वायू किंवा कृत्रिम उष्णता दिल्यानंतर मानव हा पुन्हा जिवंत झाला असता. अथवा जर आत्मा केवळ भौतिक – शारीरिक अस्तित्वाचा ताप असता तर मानवी शरीराचे काही अवयव तुटल्यामुळे आत्मा हा काही प्रमाणात सदोष झाला असता आणि त्याच्यामध्ये काहीतरी कमी निर्माण झाली असती, यद्यपि असे होत नाही. आत्मा ('रूह') हा आज्ञेच्या जगातील एक सूक्ष्म अदृश्य अशी वस्तू आहे. तो आज्ञेच्या जगा ('आलम-ए-अम्र') च्या प्रकाशाची एक विद्युत्-धारा आहे जी प्रकाशाच्या खाणीच्या विद्युत् गृहापासून या प्राण तंतुद्वारे मानवी देहामध्ये येत-जात असते, आणि याला सप्राण आणि तेजोमय ठेवते. ईश्वर म्हणतो – ''आणि ते तुला आत्म्याविषयी विचारीत आहेत. (तू त्यांना असे) सांग (की), 'आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे, आणि तुम्हाला (त्याविषयी) फार थोडे ज्ञान देण्यात आलेले आहे'.'' १७:८५ 'आलम-ए-ख़ल्क़' अर्थात् इहलोक, 'आलम-ए-शहादत' म्हणजेच दृश्य जग या भौतिक जगात म्हणतात, तर 'आलम-ए-अम्र' म्हणजेच आज्ञेचे जग, 'आलम-ए-ग़ैब' किंवा 'आलम-ए-अनफ़्स' अर्थात् परोक्ष जग,

अदृश्य जग त्या सूक्ष्म, आंतरिक आणि आत्मिक वा आध्यात्मिक जगात म्हणतात. 'खबरदार ! इहलोक आणि आज्ञा-लोक हे दोन्ही अल्लाहसाठीच आहेत.' सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा जड आणि सूक्ष्म या दोन्ही जगांचा मालक आणि प्रभू आहे. याच 'रूह' अर्थात् आत्म्याच्या संबंधात ईश्वरी विधान आहे – ''आणि जेव्हा मी त्याला पूर्ण आकार देऊन, त्यात (आदम मध्ये) माझ्या आत्म्याची फुंकर मारेन, तेव्हा तुम्ही त्याच्यासमोर नतमस्तक व्हा.'' १५:२९

सारांश, आत्म्यास भौतिक मानवी शरीरामध्ये फुंकण्यासंबंधी जे रहस्य आणि संकेत आहे ते या गोष्टीस स्पष्टपणे प्रमाणित करते की 'रूह' म्हणजेच आत्मा ज्या फुंकीने मानवी देहामध्ये प्रविष्ट करविले आहे तो हाच प्राण तंतु आणि श्वासाचा वायू आहे जो मानवाच्या श्वासोच्छ्वासामध्ये प्रत्येक क्षण येत-जात असतो. अरबी भाषेत हवेस, वायूस 'रीह' असे म्हणतात. आणि हा शब्द 'रूह' याच अरबी शब्द 'रीह'पासून बनलेला आहे. त्याची व्युत्पत्ती याच 'रीह'पासून आहे. आणि 'नफ़स' फुंक आणि वायूस म्हणतात. आणि 'नफ़्स', प्राण आणि आत्म्यास म्हणतात. यावरून असे दिसून येते की 'रीह' आणि 'रूह' तसेच 'नफ़स' आणि 'नफ़्स' हे दोन्ही शब्द -युग्म समानार्थी असून ते दोन्ही एकच (शब्द) आहेत. कारण की 'रूह' म्हणजेच आत्म्याचे हवेशी-वायूशी एक जवळचा आणि आंतरिक संबंध आहे आणि 'रूह' म्हणजेच आत्मा हा हवेप्रमाणे सूक्ष्म आहे आणि तो अदृश्य (वस्तू) आहे. म्हणून आत्मा ('रूह') जो की एक सूक्ष्म मोती आहे हवेच्या सूक्ष्म धाग्याने मानवी शरीरामध्ये बांधला गेला आहे. अथवा तत्त्वविद् आणि सहनशील निर्मात्याने – विधात्याने आत्म्याच्या सूक्ष्म व स्थळातीत पक्ष्यास हवे (वायू)च्या सूक्ष्म तंतूनी मानवी शरीराच्या स्थूल किंवा भौतिक पिंजऱ्यामध्ये कैद करून ठेवले आहे.

ज्याअर्थी आत्मा हा आज्ञेच्या विश्वातील एक अति सूक्ष्म वस्तू आहे त्याअर्थी भौतिकतेच्या स्थूल जगामध्ये मजबूतपणे दृढ राहणे हे सूक्ष्माशी संबंधाविना अशक्य गोष्ट आहे. याच कारणास्तव निर्माता ईश्वराने या भौतिक जगाच्या तत्त्वांमध्ये सर्वात सूक्ष्मतम वस्तू वायू म्हणजेच हवेशी संबंधाची योजना बनविली, आणि हाच सूक्ष्म तंतु या स्थलरहित वीराच्या म्हणजेच आत्म्याच्या पायात बांधून मानवी शरीराच्या पिंजऱ्यामध्ये कैद करून टाकले. म्हणून 'रीह' म्हणजेच वायुच्या मदतीने मानवी शरीरामध्ये आत्म्यास स्थानबद्ध करून टाकले. आणि याच श्वासाचा वायू (हवा) व प्राणतंतु यांच्याद्वारेच आज्ञा जगाच्या विद्युत्गृहापासून त्याला प्रकाशाची विद्युत्धारा म्हणजेच आत्म्यासाठी खाद्य आणि बळ (शक्ती) प्राप्त होते.

जगाच्या प्रत्येक वस्तूमध्ये मग ते खनिजपदार्थ असो वा वनस्पती असो किंवा प्राणी असो या सर्वांमध्ये एक प्रकारचा आत्मा असतो आणि प्रत्येक वस्तू श्वास घेते, परंतु खनिकात्मा, वनस्पती आत्मा, पशु आत्मा, मानवी आत्मा, देवदूती आत्मा या सर्वांमध्ये भेद असल्यामुळे त्यांचे दर्जे व श्रेणींमध्ये अंतर आहे. प्रत्येक आत्मा हा याच हवाई संबंधामुळे जगामध्ये येत असतो आणि पिशाच्चविद्यावेत्त्यांना ('माहिरीन-ए-हाज़िरात') ही गोष्ट अज्ञात नाही की हवेच्या माध्यमाविना अदृश्य जीवधारी – म्हणजेच यक्ष, किन्नर, देवदूत आणि आत्म्यांच्या या जगामध्ये – यांचे येणे-जाणे अशक्य आहे. हवेमुळेच पिशाच्चयोनी नियंत्रण पद्धती कार्यरत होते. जेव्हा कधी या भौतिक जगामध्ये परोक्ष जगाची सूक्ष्म सृष्टी निमंत्रित केली जाते किंवा पाठविली जाते तेव्हा तिच्यासोबत हवेचे हिंदोळे – हवेच्या लहरी येत असतात आणि हवा चालू लागते. सारांश, या सूक्ष्म आध्यात्मिक सजीवांना जगाच्या स्थूल वातावरणामध्ये हवेच्या सूक्ष्म आवागमना- यातायातामध्ये पाठविले जाते. म्हणून प्रेषित सुलेमान

यांच्या पिशाच्चयोनीविद्येसंबंधात सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वचन आहे –

''आणि आम्ही सुसाट वारा सुलेमानच्या अधीन केला होता. तो त्याच्या आज्ञेने त्या भूभागाकडे वाहत असे, जो आमच्या (विशेष) कृपेने समृद्ध झालेला आहे. आणि आम्ही सर्व गोष्टींचे जाणकार आहोत. आणि असुरांतून (जिन्नांपैकी) काहींना आम्ही त्याच्या अधीन केले होते. ते सुलेमानासाठी समुद्रात बुड्या मारीत असत व याशिवाय इतर बरीच कामे करीत असत, आणि आम्हीच त्यांना सावरून होतो (की मेहनतीला कंटाळून कोठे पळून जाऊ शकत नव्हते.) (आणि आम्ही त्यांच्यावर नजर ठेवून होतो.)'' २१:८१-८२

श्रद्धावंतांचे मुकुटमणी आणि प्रेषितांचे जावई अली यांच्याकडून असे सांगण्यात येते की बदर येथील युद्धाच्यावेळी अशी जबरदस्त वेगवान सुसाटी हवा चालली की ती 'न भूतो' अशी होती. अशाप्रकारे तीन वेळेस ती सुसाट हवा चालली. प्रथम हवेच्या वेळी प्रमुख देवदूत जिब्रईल हे आपल्या एक हज़ार देवदूतांसह आमच्या दिमतीला आले. दुसऱ्या वेळेस प्रमुख देवदूत मीकाईल हे मदतीला धावले तर तिसऱ्या वेळेस प्रमुख देवदूत इस्राफ़ील एक एक हजार देवदूतांच्या फौजेसह आमच्या मदतीसाठी सुसाट हवेसोबत युद्धभूमीवर खाली उतरले.

सारांश, जगामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या लाडक्या भक्तांच्या, कठीण प्रसंगामध्ये, त्यांच्या मदतीकरिता अशा प्रकारच्या परोक्ष सेनेंची गरज भासली. ती मदत सुसाट वारा (हवा) किंवा विजेच्या कडकडाहटसह मेघगर्जनेच्या स्वरूपात अदृश्य सेनेसोबत पाठविली गेली. यावरून असे सिद्ध होते की आत्मिक-आध्यात्मिक सजीवांना या भौतिक जगामध्ये येण्या-जाण्यासाठी हवेच्या सूक्ष्म स्वारीची नितांत गरज असते.

**मानवी देहामध्ये कोणता आत्मा केव्हा दाखल होतो**

पुरुषाचा शुक्राणू जेव्हा स्त्रीच्या गर्भामध्ये प्रवेश करतो तेव्हा ईश्वरी आदेश 'कुन फ़ैकून' म्हणजेच 'भव', 'हो', प्राप्त होताक्षणीच गर्भधारणा होते. म्हणजेच गर्भाशयामध्ये बीज पेरले गेले. पुढे कालांतराने जसे 'बीज तसे फळ' याची प्रचिती येते. तो शुक्राणु चाळीस दिवसामध्ये मांसाचा गोळा बनतो म्हणजेच आईच्या पोटातच त्या गर्भाची वाढ होत असते. त्या गर्भास भौतिक खाद्य हे आईच्या विटाळापासून अर्थात् दूषित रक्तापासून पोहोचत असते. या भौतिक खाद्यापासून त्याचे भौतिक शरीर वाढत असते. त्याच सुमारास त्याच्यामध्ये खनिज आत्मा जुडलेला असतो. खनिज आत्मा हा त्या मांसाच्या गोळ्यास जिवंत ठेवतो. नंतर त्याच्यामध्ये वनस्पती आत्मा दाखल होतो व त्या (गर्भा)स स्वरूप प्रदान करतो आणि त्याची वाढ करतो परंतु अंदाजे सहा महिन्यानंतर त्याच्यामध्ये पशुआत्मा प्रवेश करता क्षणीच गर्भस्थ शिशु हा पोटामध्ये हालचाल करू लागतो आणि त्याला अन्न (खाद्य) बेंबीच्या नाळपासून मिळण्यास सुरुवात होते. परंतु गर्भाची संपूर्ण वाढ झाल्यानंतर बाळ हा आईच्या पोटातून बाहेर येतो तत्क्षणीच आज्ञा जगताचा मानवी आत्मा त्याच्यामध्ये घातला जातो. तेव्हा ते बाळ (शिशु) हवेच्या मदतीने श्वास घेणे सुरू करते आणि प्राणतंतु आज्ञा जगापासून एक अदृश्य दांडीच्या स्वरूपात त्याच्याबरोबर जोडले जाते आणि अशा प्रकारे नाकाच्या दोन्ही नाकपुड्यांसाठी आज्ञा जगताचे दोन्ही दृढ आणि बाह्य किंवा भद्र आणि रुद्र यांच्या विद्युत्धारेचे प्राणतंतुसाठी येण्या-जाण्याचे मार्ग बनून जातात. आणि शिवाय हा प्राण तंतु आत्मिक खाद्य अर्थात् विचारचक्र आणि मानसिक आंदोलने यासाठी पण संपर्क सूत्र बनून जातात. याचा संबंध आज्ञा विश्वाचे आत्मिक आणि आंतरिक विद्युत्गृहाशी जोडलेला आहे. आणि याच्यामुळेच मानवी मन आणि देहाची समस्त यंत्रसामुग्री प्रकाशमय स्वरूपात चाललेली असते.

मानवी शरीराच्या स्वरूपाकडे लक्ष दिल्यास असे आढळून येते की, या देहास दोन नाकपुड्या, दोन कान, दोन डोळे, दोन ओठ, दोन जबडे, दोन हात, दोन पाय, पंच ज्ञानेंद्रिये आणि पंचकर्मेंद्रिये स्वरूपामधील या दोन प्रकारच्या विद्युत् तारांना मानवी मन आणि मेंदूपर्यंत पोहोचण्याचा मार्ग आणि संबंध प्रस्थापक बनलेले आहेत. मानवी देह हे एक प्रकारचे विद्युत् यंत्र आहे. यामध्ये विभिन्न विद्युत् तारांच्या माध्यमाने विभिन्न प्रकारची वीज येत जात असते. आणि हे यंत्र एखाद्या विशिष्ट अशा गरजेसाठी चालू आहे. सारांश, या शारीरिक यंत्रसामुग्री म्हणजे आत्म्याच्या जीवनाचा हेतू आपल्याशी संबंधित असलेले भौतिक अस्तित्वासाठी खाद्यान्न पुरवठा करणे आणि भौतिक उपजीविका प्राप्त करण्यासाठीचे ज्ञान प्राप्त करणे हे आहे. मानवास आत्मिक खाद्याच्या साहाय्याने आत्मिक आणि प्रकाशमय बळ प्राप्त करून घेणे जरूरीचे आहे.

### घ) आत्म्याचे प्रकार : सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून

**प्रस्तावना –** आत्म्याविषयी पवित्र कुराणामध्ये दोन ठिकाणी मार्मिक शब्दरचनेत मांडणी करण्यात आली आहे. ती अशी –

(१) ''ते (लोक) तुम्हाला आत्म्याविषयी विचारतात, (त्यांना) सांगा, 'आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे, (पण हे मानवा! तू त्याचे स्वरूप समजू शकत नाहीस कारण) तुला अत्यल्प ज्ञान प्रदान केलेले आहे. (तिचे आकलन तुझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे.)''' १७:८५

(२) ''त्याचे काम तर असे आहे की जेव्हा तो कोणाही वस्तूचा संकल्प करतो तेव्हा तो तिला केवळ (एवढेच) सांगतो की 'हो' व ती होऊन जाते.'' ३६:८२

**किंवा**

''जेव्हा कोणतीही गोष्ट करण्याचा निर्णय करतो, तेव्हा तो तिच्याबाबतीत केवळ ''कुन'' (''भव'') असे म्हणतो आणि ती होते.'' २:११७

**किंवा**

''आणि जेव्हाही आम्ही एखादी गोष्ट अस्तित्वात आणू इच्छितो, तेव्हा तिच्या बाबतीत एवढेच म्हणतो, 'अस्तित्वात ये', आणि ती (तात्काळ) अस्तित्वात येते.'' १६:४०

उपरोक्त (१) आणि (२) श्रेणीच्या श्लोकांमध्ये शब्द 'अम्रि रब्बी' (विधात्याच्या आज्ञेने) आणि 'कुन फ़यकून' (हो व ती होऊन जाते) यांमध्ये ब्रह्मज्ञान आणि गूढज्ञान यांच्यामध्ये फार घनिष्ठ संबंध आहे. 'मानव हा माझा रहस्य आहे आणि मी मानवाचा रहस्य आहे',च्या अनुषंगाने ब्रह्मज्ञानियाच्या मनामध्ये त्याचे रहस्य उघडले जातात. हे रहस्य अनादि आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा आपले विशेष असे स्थिरचित्त आणि कृतज्ञ भक्तांच्या – दासांच्या मनामध्ये हे अवतरित करतो – उघड करतो. म्हणूनच ब्रह्मांडातील सर्वश्रेष्ठ सृष्टीचा गौरव असलेले पुरुषोत्तम प्रेषित मुहम्मद स. यांच्यासंबंधी सर्वश्रेष्ठ परमेश्वर असे म्हणतो की, ''व मा अूतीतुम् मिनल इल्मि इल्ला क़लीलन्'' अर्थात् ''तुम्हाला त्याविषयी फार थोडे ज्ञान देण्यात आलेले आहे.'' १७:८५ याचा अर्थ असा नव्हे की प्रेषित मुहम्मद स यांना कमी ज्ञान देण्यात आले होते, परंतु 'रूह' म्हणजेच आत्म्यासंबंधी अधिक खुलासा करण्यासंबंधी मनाई करण्यात आली होती. कारण की आत्मा हा एक रहस्य आहे आणि हे गूढ मुहम्मदी प्रकाशामध्ये (निहित) आहे.

**नूर–ए–मुहम्मदी अर्थात् मुहम्मदी प्रकाशाचा उदय (जन्म)**

सर्वश्रेष्ठ परमेश्वरास आत्म्याचे जग निर्माण करण्याची इच्छा झाली. म्हणून त्याने सर्वप्रथम प्रेषित मुहम्मद स. यांचा विजयी–सफल आत्मा निर्माण केला म्हणजे मुहम्मदी प्रकाश उदयास आले. जेव्हा या विशुद्ध चकचकीत प्रकाशाचे दर्शन झाले तेव्हा परमेश्वरास स्वत:चेच प्रतिबिंब दिसून आले आणि तो आपल्या प्रतिबिंबावर मुग्ध झाला आणि त्याला आपला सखा (मित्र) बनविले. यानंतर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या मुहम्मदी प्रकाशास संपूर्णपणे प्रकट करण्याचा विशेष, इरादा केला आणि आपल्या सत्य वाणीने उद्‌गार काढले 'कुन' ('भव') म्हणजेच माझा इरादा पूर्ण होवो. मग लगेच 'फ़यकून' ('होऊन गेले', 'निर्माण झाले') झाले. म्हणजेच अठरा हजार विश्वांना क्षणार्धामध्ये निर्माण केले. समस्त यक्ष–किन्नर व मानव आणि देवदूतांचे आत्मे यांना निर्माण करून 'अ–लस्तु, बिरब्बिकुम' म्हणजेच ''काय मी तुमचा प्रभू नाही?'' अशी विचारणा केली.

**विशुद्ध पंचदेह (पंजतन पाक)–**

पारिभाषिक शब्दांच्या दृष्टीने 'कुन्' या शब्दाचा आशय विशुद्ध पंचदेह म्हणजेच 'पंजतन पाक' असा आहे. म्हणजे पंच आत्मा, पंच वासना आणि पंच देह, असा आहे. या पंच देहामध्ये अठरा हजार विश्वे सामाविलेली (समाविष्ट) आहेत. म्हणून विशुद्ध पंचदेहास 'बर्ज़ख़ कुब्रा' म्हणजेच बृहत अंतराय, बृहत् अडकण असे म्हणतात. शब्द 'कुन्' मध्ये पाच वर्णाक्षरे आहेत. ते असे – १. काफ़ (क), २. नून, ३. जज़्म (हलन्त), ४. पेश (उकार) आणि ५. नुक़्ता (बिंदु). सर्वश्रेष्ठ परमेश्वराने जेव्हा आपल्या प्रकाशास प्रकाशामध्ये पाहिले तेव्हा विशुद्ध पंचदेहांना शब्द 'कुन'पासून निर्माण केले म्हणजेच 'काफ़' पासून प्रेषित मुहम्मद स. 'पेश'पासून (प्रेषितांचे जावई) अली, 'नून' पासून प्रेषित कन्या व अलींची धर्मपत्नी बीबी फ़ातिमा, 'जज़्म' पासून प्रेषितांचे नातू (थोरले) इमाम हसन आणि 'नुक़्ते' पासून प्रेषितांचे धाकटे नातू इमाम हुसैन यांची निर्मिती केली. प्रथम विशुद्ध पंचदेही आहेत. त्यानंतर या पंचदेहापासून समस्त विश्व व देह आणि आत्मे सहभागित्वविहीन एकमेव अल्लाहने निर्माण केले.

'रूह' अर्थात् आत्मा म्हणजे ईश्वराज्ञा आहे व तो एकटा आहे – एक आहे, परंतु देहस्वरूपामध्ये टप्प्या टप्प्यावर तो आपल्या स्वभाव गुण–धर्मांमुळे भाव बदलतो. म्हणून 'रूह' (आत्मा) हा पाच आत्मा (रूह), पाच वासना (नफ़्स) आणि पाच देह (वजूद) या प्रकारांमध्ये मोडते. म्हणजे प्रेषित मुहम्मद स. म्हणाले होते की, मी अल्लाहच्या प्रकाशापासून निर्माण झालेलो आहे आणि शेष सर्व वस्तू या माझ्या प्रकाशापासून निर्माण झालेल्या आहेत. हाच पंचतनपाक म्हणजेच विशुद्ध पंचदेहचा खुलासा आहे.

हदीस अर्थात् प्रेषित–वचनामध्ये अशी नोंद आहे की चार वस्तू परम पवित्र अल्लाहने सर्वात अगोदर उत्पन्न केलेल्या आहेत. १) सर्वात अगोदर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने माझ्या प्रकाशास निर्माण केले. २) सर्वात अगोदर अल्लाहने माझ्या आत्म्यास निर्माण केले. ३) सर्वात अगोदर सर्वश्रेष्ठ परमेश्वराने माझ्या विवेक–बुद्धीस निर्माण केले. ४) सर्वात अगोदर सर्वश्रेष्ठ अल्लाहने लेखणीस निर्माण केले. म्हणजेच प्रकाश, आत्मा, विवेक–बुद्धी आणि लेखणी (ज्ञान) या चार वस्तू प्राथमिकतेमध्ये एक दुसऱ्याशी गूढ संबंध ठेवून आहेत. पवित्र परमेश्वराच्या आविष्करणामध्ये पण चार गोष्टी आहेत अर्थात् 'हुवल अव्वल' (तोच प्रथम आहे) ची पडछाया प्रकाश आहे. 'हुवल आख़िर' (तोच शेवटी आहे)ची पडछाया विवेकबुद्धी आहे. 'हुवल बातिन' (तोच अव्यक्त आहे) ची

पडछाया आत्मा आहे, तर 'हुवल ज़ाहिर' (तोच व्यक्त-प्रकट आहे.) ची पडछाया लेखणी (ज्ञान) आहे. या चार श्रेणींमध्ये मुहम्मदी प्रकाश, मुहम्मदी आत्मा, मुहम्मदी वासना आणि मुहम्मदी देहाचे रहस्य दडलेले आहेत. याच ज्ञानाचा आविष्कार दैवी ज्ञान आहे आणि हेच सर्वश्रेष्ठ आत्म्याचे आविष्करण आहे आणि याच सर्वात महान आत्म्यापासून समस्त आत्म्यांचा आविष्कार (अभिव्यक्ती) आहे. आत्म्याच्या संबंधात अधिक ज्ञान दिले गेले नाही.

**आत्म्याचे प्रकार**

सूफ़ी तत्त्वज्ञानामध्ये आत्म्याचे पुढील पाच प्रकार मानले गेले आहेत - १. रूह-ए-जारी, २. रूह-ए-सिफ़ली, ३. रूह-ए-मलिकी, ४. रूह-ए-कुद्सी आणि ५. रूह-ए-उल्वी यांचे क्रमशः विवेचन पुढे देण्यात येत आहे -

**१) रूह-ए-जारी - निरंतर प्रवासी आत्मा**

'परमपवित्र परमेश्वराचा जयजयकार असो! त्याचा आत्मा उडून गेला.'' ''आपल्या आत्म्याचा त्याग कर आणि वर ये.'' या दोन्ही कौराणिक श्लोकांचा संकेत निरंतर प्रवासी आत्म्याकडे आहे. हा आत्मा मानवाच्या देहामध्ये तोंडापासून प्रवाहित होऊन विहार करण्यासाठी निघतो. हा आत्मा अनेक टप्प्यांवर थांबत थांबत अग्रेसर होतो. याचे थांबणे आणि चालण्यामुळे शरीराचे अनेक अवयव हालचाल करू लागतात. ते गतिमान बनतात. पोट, खांदा, मूत्रपिंड आणि आतडे या आत्म्याच्या मदतीने सक्रिय होतात. या आत्म्याचे स्थळ मर्यादित आहे, परंतु हा पृथ्वीच्या पृष्ठभागावर आपला पूर्ण कब्जा प्रस्थापित करतो.

या आत्म्याचे प्रवाही आत्मा असे नाव पडण्याचे कारण हे आहे की तो जात-येत असतो. स्थिर नसतो. वास्तविक हा आत्मा स्वतः होऊन कायम नसतो. 'रूह-ए-सिफ़्ली' म्हणजे निम्न श्रेणीच्या आत्म्यापासून या आत्म्यास शक्ती प्राप्त होते. साधक लोक या आत्म्यास प्रतिबंध करण्यामध्ये रस घेतात. 'सोडून दे (त्याग कर) आपल्या आत्म्यास आणि 'वर ये' या ईश्वरी आदेशानुसार आत्म्यास प्रतिबंध करत करत एके दिवशी (आपल्या) कब्ज्यामध्ये आणू शकतात, कारण की या आत्म्याचा मृत्यूशी काहीच संबंध नाही, परंतु याचा संबंध निम्नात्म्या (रूह-ए-सिफ़ली)शी आहे.

**२) रूह-ए-सिफ़ली : निम्न आत्मा किंवा अधोमुखी आत्मा**

यास एक विश्वस्त आत्मा घेऊन आला. हा आत्मा एक विश्वस्त ठेव ('अमानत') आहे. हा आत्मा आपला प्रवास देहामध्ये नाकापासून सुरू करतो आणि संपूर्ण शरीरभर हा प्रवास चल स्वरूपात असतो. म्हणजे न थांबता आपले गंतव्यस्थळ ('मंजिल') प्राप्त करतो (पोहोचतो.) आणि फुफ्फुसांपर्यंत पोहोचतो. हा संपूर्ण शरीराला आपल्या नियंत्रणामध्ये ठेवतो. हा आत्मा पृथ्वी आणि आकाशामध्ये विहार करून क्षणभरात परत आपल्या शरीरामध्ये येतो. हा आत्मा निद्रा आणि मृत्यू पासून मुक्त आहे, अलिप्त आहे. याला विनाश नाही. यास उचलले जाते तेव्हा सजीवाचा मृत्यू येऊन ठेपतो (घडतो). या आत्म्यामध्ये पुष्कळसे रहस्य लपलेले आहेत. साधक लोक याच्यावर नेहमी लक्ष ठेवून असतात आणि हृदयस्थ जप (ज़िक्र क़ल्बी) आणि आत्मिक जपा (ज़िक्र रूही)च्या बळावर या आत्म्यास आपल्या नियंत्रणात आणून देह त्याग करतात. हा निम्न आत्मा स्वप्नाच्या वेळेस देह सोडून बाहेर जातो आणि नाना प्रकारचे स्वप्न दर्शन घडवितो. या आत्म्यामध्ये अशी

योग्यता असते की आपल्या आत्म्याच्या पडछायेच्या मदतीने हजारो आकृत्या बनवितो आणि पृथ्वी व आकाशामध्ये प्रत्येक स्थळी विहार करतो म्हणून या आत्म्यास निम्न आत्मा म्हणजे 'रूह-ए-सिफ़ली' असे म्हणतात.

### ३) रूह-ए-मलिकी : देवदूती आत्मा

''सांगा, आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे.'' १७:८५ आणि त्याच्यातर्फे आणखी एक आत्मा होता. म्हणून तुम्ही अल्लाह आणि त्याचा प्रेषित यावर श्रद्धा (विश्वास) ठेवा. या कौराणिक श्लोकाच्या भाष्यामध्ये या घटनेचे वर्णन प्रस्तुत केले गेले आहे की जेव्हा (आद्य प्रेषित व मानव) आदम यांच्या शरीरामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपले प्राण फुंकले तेव्हा त्यामधील एका आत्म्यास प्रेषित ईसाची माता मरयम यांच्या पोटात म्हणजेच गर्भामध्ये विश्वासू आत्मा प्रमुख देवदूत जिब्रईल यांना ठेवण्यात आले, तेव्हा प्रेषित ईसा हे अल्लाहच्या आत्मा स्वरूपात म्हणजेच 'रूहल्ला' म्हणून जन्मले. पवित्र अल्लाह हा शासकांचा शासक आहे. याचे रहस्य तोच जाणो. आम्हाला काय माहित! पारिभाषिक शब्दामध्ये 'वरूहुमिनुहु'स रूह-ए-मलिकी म्हणजेच देवदूतीय आत्मा असे म्हणतात. हा ऊर्ध्वमुखी आत्मा असतो.

हा देवदूतीय आत्मा एक गुह्य-रहस्य आहे. हा आत्मा आपला प्रवास देहामध्ये डोळ्या (नेत्रा)पासून सुरू करतो आणि यकृतामध्ये हा निवास करतो. या आत्म्यामध्ये इतकी असंख्य रहस्ये लपलेली असतात की त्याना ओळखणे व समजणे कठीण बनते. याचे एक रहस्य हे पण आहे की, 'कुद्रतुल ऐन' म्हणजेच मार्गदर्शनपर दृष्टी. याच्या मुठीत सप्त पृथ्वी आणि सप्त आकाश असतात. या आत्म्याचा संबंध प्रकाशाशी आहे. या आत्म्यामध्ये जे रहस्य लपलेले असते ते साधकावर उघडणे जरूरीचे असते, नाहीतर पुढील मजल कठीण होऊन जाते. (बसते) साधक हा वेडा तरी बनतो किंवा ब्रह्मीभूत होऊन जातो आणि या अवस्थेमध्ये त्याला मृत्यू घडतो. जर ऐन वेळेस त्याला सद्‌गुरूचे मार्गदर्शन लाभले तर पवित्र आत्म्यानिशी परम पवित्र परमेश्वर त्याच्या मदतीस धावून येतो आणि मग त्याच्यासाठी पुढील मजल सोपी होऊन जाते. या आत्म्यामध्ये एवढी अफाट शक्ती असते की एका क्षणामध्ये तो पृथ्वी आणि आकाशाची सहल करून येतो आणि देह आकाशाची विलक्षणता आणि अद्‌भुतता यांचे दर्शन करून मस्त होऊन जातो.

### ४) रूह-ए-कुद्सी : पवित्र आत्मा (पवित्रात्मा)

'रूह-ए-कुदसी' म्हणजे 'पवित्र आत्म्यानिशी मदत केली गेली.' ''या भाग्यशाली रात्रीमध्ये देवदूत व आत्मा प्रत्येक बाबीच्या संबंधात आपल्या विधात्याच्या आज्ञेने उतरत असतात.'' ९५:४ **किंवा** ''त्या भाग्यशाली रात्री (असंख्य) स्वर्गदूत व (प्रमुख स्वर्गदूतांपैकी एक असलेला जिब्रीला हा) स्वर्गदूत आपल्या पालनकर्त्याच्या परवानगीने प्रत्येक गोष्टीसंबंधाने त्याचे आदेश घेऊन (पृथ्वीवर) उतरतात.'' ९७:४

हा पवित्र आत्मा आपला प्रवास कानापासून सुरू करतो आणि पित्ताशयावर याचे मुक्काम असते. या आत्म्यास मर्म पण म्हणतात. यासाठी की हा एक विशेष (प्रकारचा) आत्मा आहे. सहा वस्तू याच्या अधीन असतात. त्या आहेत - १) अर्श म्हणजे ईश्वराचे राजसिंहासन, २) कुर्सी अर्थात् ईश्वराचे पादपीठ, ३) लौह म्हणजेच सुरक्षित पट्टिका (लेखशिळा) किंवा सुस्पष्ट ग्रंथ, ४) क़लम अर्थात् लेखणी (दिव्य ज्ञान), ५) पृथ्वी आणि ६) आकाश. हा आत्मा उत्तुंग उड्डाण करणारा आहे. याची प्रारंभिक मजल आकाशांचा वरचा भाग आहे.

म्हणून साधक लोक आपली नज़र (दृष्टी) वरच ठेवतात आणि इहलोक व परलोक या दोन्ही जगांची माहिती या आत्म्यापासून घेतात. हा आत्मा एका क्षणात अल्लाहच्या पवित्र सत्तेची भेट करून आपल्या स्थळी परत येतो.'' त्यालाच प्रत्येक वस्तूचे परिपूर्ण ज्ञान आहे.'' २:२९ म्हणजेच भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळामधील सर्व गोष्टींचे ज्ञान या आत्म्यास असते. या टप्प्यावर सर्वश्रेष्ठ परमेश्वर पवित्र आत्म्यानिशी साधकांची मदत करतो. म्हणजेच पवित्र आत्मा हा साधकास आंतर-बाह्य ज्ञान आणि भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाच्या गोष्टींची जाणीव करून देतो आणि त्याला तन्मय भक्ता ('साहब-ए-हाल')च्या श्रेणीस पोहोचवितो. 'रूहुल कुद्स' आणि 'रूहुल अमीन' यामधील जो फरक आणि रहस्य लपलेले आहे त्याचे उद्घाटन केल्यास महान धर्मशास्त्रास धक्का पोहोचतो. पवित्र आत्म्याच्या संबंधात पुष्कळशी गुह्ये आहेत. त्यांना सद्गुरूची सेवा करून जाणून घ्यावे. ''तुम्हाला (त्याविषयी) फार थोडे ज्ञान देण्यात आलेले आहे.'' - १७:८५.

**५) रूह-ए-उल्वी : ऊर्ध्व आत्मा किंवा उच्चगामी आत्मा**

'व नफ़ख़्तु फ़ीहि मिर्रूही' म्हणजेच 'आणि माझा आत्मा त्याच्यात फुंकीन' - १५:२९. हा आत्मा देहामध्ये प्रकाशाच्या स्थळापासून सुरू होऊन विशुद्ध सत्तेस म्हणजेच ईश्वरास जाऊन मिळतो. या आत्म्याचे वर्णन करण्यास लेखणी असमर्थ आहे. थेंबापासून समुद्र आणि समुद्रापासून थेंब बनणे याचे चमत्कार आहे. या आत्म्याच्या सामर्थ्याच्या आवाक्यात प्रत्येक गोष्ट येते. म्हणजेच याच्या परिवृत्ताच्या बाहेर कोणतीच वस्तू नाही. 'अला कुल्लि शैइन्' - ६५:१२ आणि 'अला कुल्लि शैइम्-मुहीतुन्'- ४१:५४. म्हणजेच 'प्रत्येक वस्तुमात्रांवर अल्लाहचे सामर्थ्य आहे.' - ६५:१२. आणि 'सर्व गोष्टी या निश्चितच त्याच्या अधीन आहेत.' - ४१:५४. हा आत्मा प्रकाशावर प्रकाश आहे. या आत्म्यामध्ये समस्त आविष्करणे आहेत. या आत्म्यास 'जात पाक' अर्थात विशुद्ध सत्ता आणि 'रूह पाक' म्हणजे विशुद्ध आत्मा पण म्हणतात. लक्षात असू द्या की, विशुद्ध सत्तेला, विशुद्ध आत्म्याचे म्हणजे रूह-ए-उल्वी अर्थात ऊर्ध्व आत्म्याचे जाऊन मिळणे याला 'वस्लत' म्हणजे एकमेक होणे, परमैक्य असे म्हणतात. उपरोक्त चार आत्म्यांचे मूळ हे उर्ध्व आत्मा हा आहे.

साधक लोक हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी 'ला' म्हणजेच 'नव्हे' या निषिद्धाची पुनरावृत्तीमध्ये मग्न असतात. ज्याने 'ला' म्हणजे ('नाही') या वर्णाक्षराचे मर्म समजून घेतले त्याने उर्ध्व आत्म्यास चांगल्या प्रकारे जाणून घेतले असे मानावे. खरे म्हणजे बोधगम्य झाल्यावर पुन्हा तो 'ला' कुठे राहिला? हदीस आहे - ज्याने आपल्या आत्म्याच्या ज्ञानाने आपल्या प्रभूस जाणले, तो मूक बनून जातो. पुन्हा एक हदीस आहे - जो सर्वश्रेष्ठ अल्लाहस ओळखतो तो त्याला साद देत नसतो, आणि जो ओळखत नाही तो सर्वश्रेष्ठ अल्लाहस साद देत असतो.

*''हरके: शनाख़्त अल्लाह न गोयद अल्लाह अू*
*हरके: ब: गुफ़्त अल्लाह न: शनाख़्त अल्लाह रा''*

या फ़ारसी काव्य चरणाचा भावार्थ असा आहे - जो अल्लाहस ओळखतो तो त्याला 'अल्लाह' म्हणत नाही. जो कोणी 'अल्लाह' म्हणतो तो अल्लाहस ओळखणारा नसतो.

**बृहत् अंतराय : पंच पवित्र देहधारी**[६८]

‘‘कुन्’ (म्हणजेच ‘हो’) या परमेश्वराच्या आदेशाचे गुह्य निराकरण; याच न्यायाने समानार्थी ‘भव’चे तंतोतंत तसेच निराकरण

**विवेचन**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| كُنْ | → | १ | | २ | | ३ | | ४ | | ५ |
| | | ك | | ُ | | ن | | ر | | • |
| ‘भव’ | → | ब् | + | ह् | + | अ | + | व् | + | अ |

| **प्रेषित मुहम्मद**<br>ك<br><br>**क**<br>**ब्** | **अली**<br>پیش<br>ُ<br>**‘उ’कार**<br>**ह्** | **बीबी फातिमा**<br>نون<br>ن<br>**‘न’ वर्ण**<br>**अ** | **इमाम हसन**<br>جزم<br>ر<br>**युग्मकारी**<br>**व्** | **इमाम हुसैन**<br>نکته<br>•<br>**अनुस्वार**<br>**अ** |
|---|---|---|---|---|
| पहिला देह<br>सूक्ष्म देह<br>(वाहिदुलवुजूद) | दुसरा देह<br>महाकारण देह<br>(आरिफुलवुजूद) | तिसरा देह<br>कारण देह<br>(मुमतनुल वुजूद) | चौथा देह<br>लिंग देह<br>(मुमकिनुल वुजूद) | पाचवा देह<br>स्थूल देह<br>(वाजिबुलवुजूद) |
| सत्ता : प्रकाश | कर्ण : अग्नी<br>(तेज) | नेत्र : आप | नासिका : वायू<br>(नाक) | मुख : पृथ्वी |
| अज़ाज़ील | इज्राईल | मीकाईल | इस्राफ़ील | जिब्रील |
| मौन जप<br>(ज़िक्रे खफ़ी) | मर्म जप<br>(ज़िक्रे सिर्री) | आत्मिक जप<br>(ज़िक्रे रूही) | हृदयस्थ जप<br>(ज़िक्रे क़ल्बी) | सस्वर जप<br>(ज़िक्रे जली) |
| विशुद्ध परिपूर्ण आत्मा<br>(नफ्से रहमानी) | प्रशांत आत्मा<br>(नफ्से मुत्मैन्ना) | अनुप्राणित आत्मा<br>(नफ्से मुल्हिमा) | प्रदूषणकारी आत्मा<br>(नफ्से लव्वामा) | भ्रष्ट, दुष्ट आत्मा<br>(वासना)<br>(नफ्से अम्मारा) |
| उच्चगामी आत्मा<br>(रूहे उल्वी) | पवित्रात्मा<br>(रूहे कुद्दुसी) | ऊर्ध्वमुखी आत्मा<br>(रूहे मलिकी) | अधोमुखी आत्मा<br>(रूहे सिफ़ली) | प्रवाही आत्मा<br>(रूहे जारी) |
| शून्य व प्राण | श्राव्यता | दृश्यात्मकता | अस्तित्वता<br>(आहेपणा) | वाचिकता |
| आत्म्याचे प्राण<br>सत्ता (ज़ात) | तेज (अग्नीचे) प्राण<br>वायू | पाण्याचे प्राण<br>अग्नी | वायूचे प्राण<br>अंतरिक्ष | पृथ्वीचे प्राण<br>आप (पाणी) |

### च) सूफ़ी साधनामार्गामध्ये आत्म्याची भूमिका (महत्त्व)

प्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ साधक हुजवीरी यांनी 'रूह' म्हणजेच आत्म्याला एक सूक्ष्म द्रव्य मानले आहे. आत्मा हे काही गुण नव्हे. हा एक सूक्ष्म द्रव्य विशेष असल्यामुळे त्याला पाहिले जाऊ शकते, परंतु हा साध्या डोळ्यांनी पाहता येणे अशक्य आहे. हा केवळ 'चश्मेदिल' अर्थात हृदयचक्षूंनी पाहिला जाऊ शकतो. ईश्वर पण चर्मचक्षूंना नव्हे तरी अंत:चक्षूंना दिसतो.

हुज्वीरी यांनी 'रूह'ला अनित्य मानले आहे. त्यांनी आत्म्यास परमेश्वराद्वारा निर्मित मानले आहे. त्यांचे असे मत आहे की देह (शरीर) निर्माण होण्याअगोदर आत्मा अस्तित्वात होता. परमेश्वर हा शरीर आणि आत्मा यांचा संयोग घडवून आणणारा आहे.

दुसरे एक प्रसिद्ध तत्त्वज्ञ अब्दुल करीम जीली यांच्या मतान्वये परमेश्वराने आपल्या ज्योतीच्या मदतीने 'रूह' अर्थात आत्म्यास निर्माण केले आणि मग त्याच्यापासून विश्व (जग) निर्माण केले. 'रूहुल कुद्स' म्हणजे पवित्र आत्मा हा मानव शरीरामधील सर्वश्रेष्ठ आध्यात्मिक इंद्रिय आहे. जेव्हा परमेश्वर हा स्वत:स अभिव्यक्त करू इच्छितो, तेव्हा तो मनुष्यामध्ये 'फ़ना' म्हणजेच विलय किंवा निर्वाणीची स्थिती निर्माण करतो. त्या अवस्थेमध्ये मनुष्यामधील मानवीय ज्योती आणि जीव-जगताच्या विशेषत्वाचे अवसान होऊन जाते आणि मग परमेश्वर एका आध्यात्मिक द्रव्यास त्या ठिकाणी मनुष्यामध्ये प्रविष्ट करवितो. हे द्रव्य परमेश्वरापासून वेगळे नसते आणि मनुष्याशी पण जोडलेले नसते. यामध्येच परमेश्वर स्वत:स अभिव्यक्त करतो. परमेश्वराची अभिव्यक्ती परमेश्वराशिवाय काहीच नसते. हेच द्रव्य 'रूहुल कुद्स' म्हणजेच पवित्र आत्मा आहे. आत्मा हा परमेश्वराच्या अनुषंगाने नित्य आहे, तर मनुष्याच्या अनुषंगाने अनित्य आहे.

सूफ़ींच्या मताप्रमाणे आत्म्याचे दोन प्रकार (भेद) आहेत (१) नफ़्स (वासना) आणि (२) रूह (आत्मा). नफ़्स निम्न कोटीचे आहे. ते सर्व प्रकारच्या कुप्रवृत्तींचे स्थान आहे. रूह सद्प्रवृत्तीचे उगमस्थळ आहे. नफ़्स भावनेंच्या आहारी असते; तर रूह विवेकाच्या बळावर सक्रिय होते. या दोहोंमध्ये निरंतर संघर्ष चाललेला असतो. नफ़्स आत्म्यास (रूहला) विपरीत दिशेमध्ये ओढत असते. म्हणून नफ़्सला चांगल्या प्रकारे ओळखणे व तसे ओळखून त्याच्यावर विजय प्राप्त करणे सूफ़ीसाठी आवश्यक असते. कारण की याशिवाय परमेश्वराशी मीलन शक्य नसते.

सूफ़ी साधकांच्या मते आत्म्यामध्ये अशी अपार आणि प्रबळ शक्ती असते की, तो हे भौतिक जग ओलांडून परमेश्वराशी साक्षात्कार साधू शकतो, त्याशी एकरूप होऊ शकतो. या भौतिक जगापासून आध्यात्मिक जगामध्ये पोहोचणे (प्रवेश करणे) खऱ्या साधकासाठी सहज शक्य आहे. त्याच्यावर परमेश्वराची दया नेहमी असते आणि परमेश्वराच्या दयेच्या आणि कृपेच्या बळावर कुठल्याच अभ्यासाविना या स्थूल जगाच्या बंधनांना तोडून तो त्या आध्यात्मिक जगामध्ये पोहोचतो. उपासना, जप, तप, उपवासव्रत, प्राणायाम इत्यादी विभिन्न उपायांनी साधक हा या शक्तीस प्राप्त करून घेतो. क्रमश: तो अग्रेसर होत जातो, आणि त्याच्या डोळ्यांसमोरील अज्ञानाचे पडदे हळूहळू दूर सारले जातात, हटू लागतात. मग तो शेवटी परमेश्वराच्या विभूतींचे दर्शन करण्यामध्ये सफल-यशस्वी होतो. साधकाचे उद्दिष्ट या टप्प्याहून आणखी पुढे जाण्याचे असते. तो ती

अवस्था गाठू इच्छितो (प्राप्त करू इच्छितो), की ज्यामध्ये तो परमेश्वराशी एकरूप होऊ शकेल. म्हणून आत्म्याच्या रहस्यांना समजणे, ओळखणे व त्यावर नियंत्रण ठेवणे हे सूफ़ी साधनेचे महत्त्वपूर्ण अंग आहे.

'आत्मा' संबंधी सूफ़ी तत्त्ववेत्त्यांनी पण सविस्तर चर्चा केली आहे. प्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ इब्ने रुश्दचे गुरू इब्ने तुफ़ैल यांच्या मते 'शरीराचे वास्तव हे दोन वैशिष्ट्यांनी युक्त आहे. – एक आहे त्याची भौतिकता आणि देह तत्त्व आणि दुसरे आहे त्याचे स्वरूप आणि आत्मा.'

(इब्ने तुफ़ैल : हय्य बिन यक़्जान (उर्दू संस्करण) – पृ. ६४)

निष्प्राण शरीरांच्या स्वभावापासून ते मनुष्याच्या विवेकी आत्म्यापर्यंत स्वरूपाचे अनेक भेद (श्रेणी) आढळून येतात. याविषयी विचार करताना इब्ने तुफ़ैल यांनी म्हटले आहे की सर्व स्वरूपांचे मूळ 'वाजिबुल वजूद' अर्थात स्थूल देहाशी निगडित आहे. याचे अस्तित्व स्वयंभू असते. याचे अस्तित्व दुसऱ्या कोणत्याच अस्तित्वावर निर्भर नाही. ते निरपेक्ष असते. ही गोष्ट सूर्य आणि त्याचा प्रकाश यासारखीच आहे. वास्तविक सूर्य आणि त्याचा प्रकाश एकच आहे, परंतु विविध शरीरांवर–पदार्थांवर पडल्यानंतर त्या प्रकाशामध्ये अनेकतेचा आभास होऊ लागतो.

मुळाच्या दृष्टीने पाहता 'स्वरूपा'मध्ये अनेकता नाहीच; परंतु शरीरांच्या–पदार्थांच्या मोठ्या संख्येच्या दृष्टीने ते अनेक दिसू लागतात. तद्वत् सूर्याचा प्रकाश एकच असूनसुद्धा जेव्हा तो अनेक शरीरांवर–पदार्थांवर पडतो, तेव्हा त्यांच्या क्षमतांच्या दृष्टीने त्याच्या प्रतिबिंबीत होण्याच्या विभिन्न श्रेणी निर्माण होतात–बनतात. सूक्ष्म शरीर, जसे वायू यामध्ये सूर्याची किरणे अजिबात प्रतिबिंबित होत नाहीत, जड आणि लेपविहीन शरीरामध्ये काही मात्रेमध्ये, कमी प्रमाणात प्रतिबिंबित होतात, जसे दगड, लाकूड इत्यादी. जड आणि चकचकीत लेपदार शरीरामध्ये–वस्तूमध्ये किरण जास्त प्रमाणात प्रतिबिंबित होतात जसे, आरसा, काच. काही काच किंवा आरसे या मात्रे (सीमे) पर्यंत सूर्यप्रकाशास आपल्यामध्ये केंद्रीत करून घेतात की त्यांच्यामध्ये इतकी उष्णता निर्माण होते की आपल्यामधील तीव्र ज्वलनशक्तीमुळे इतर पदार्थास जाळतात देखील. आत्म्याच्या संबंधी काहीसा असाच प्रकार आहे. आत्म्यावर अल्लाहची कृपादृष्टी म्हणजेच 'फ़ैज़ान' होते. ज्या आत्म्यामध्ये जेवढी क्षमता असते, तो त्याच हिशोबाने परमेश्वराच्या ज्योतीपासून ज्योतिर्मय होतो. अधिक क्षमताधारी आत्म्यास अधिक प्रमाणात परमेश्वराचा प्रकाश प्राप्त होतो; तर कमी क्षमताधारी आत्म्यास कमी प्रमाणात.

इब्ने तुफ़ैलचे कथन आहे की, 'मानव–आत्मा पण सर्व स्वरूपांप्रमाणे परमेश्वराचा आदेश (आज्ञा) म्हणजे त्याचा 'अम्र' किंवा त्याची कृपा–दया म्हणजे 'फ़ैज़ान'च आहे.'' (इब्ने तुफ़ैल : हय्य बिन य़क़्जान (उर्दू संस्करण), पृ. ६९.) यामुळेच त्याने असा निष्कर्ष काढला की आत्मा अशी एखादी कोणतीच गोष्ट नाही की जी शरीरामध्ये ठेवलेली असेल किंवा शरीराने आवेष्टित असेल. परंतु आत्मा हा अल्लाहची आज्ञा म्हणजेच 'अम्र' असल्यामुळे हे शरीराशी निगडित होऊन जाते आणि तो शरीराशी असा जुळून जातो की बुद्धी, विवेक, अनुभूति किंवा धारणा कोणत्याच प्रकारे त्याला शरीरापासून वेगळे केले जाऊ शकत नाही. असे म्हणता येऊ शकत नाही की हे शरीर आहे आणि हा आत्मा आहे. आत्मा संपूर्ण शरीराशी जुडलेला असतो. परंतु तो शारीरिकता किंवा आकाराने बांधला गेलेला नसतो.

सूफ़ी साधना मार्गावर आत्म्याच्या प्रवासाची दिशा ढोबळपणे पुढीलप्रमाणे ठरविता येऊ शकते –

सर्व आत्म्यांचा म्हणजेच मानवांचा धनी एकच आहे. तो म्हणजे अर्थातच परमेश्वर होय. आत्म्याचे आपले एक निराळे अस्तित्व आहे. तो ईश्वरापासून प्रसूत होतो (निघतो). तो सर्वस्वी परमेश्वराचा असतो. तो शरीराहून – देहाहून स्वतंत्र असतो. माणसाच्या आयुष्यामधील सर्व क्रियाकलापांचा तो त्याच्या शरीरामधील निरीक्षण करणारा मूक प्रेक्षक असतो.

ईश्वरभक्तीमध्ये आपल्या समस्त संवेदना, या आमची चेतना आणि सर्व संवेदनांचा संचालक असलेला सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सेवेमध्ये तत्पर असतात. जेव्हा आत्मा अशा प्रकारची उत्कट सेवा देतो, तेव्हा त्याचे दोन आनुषंगिक परिणाम दिसून येतात. पहिला परिणाम म्हणजे भक्त हा सर्व प्रकारच्या भौतिक उपाधींपासून मुक्त होतो आणि दुसरे म्हणजे त्याच्या मलीन संवेदना भक्तीमुळे शुद्ध होऊन जातात. भक्तांचे तादात्म्य सर्वश्रेष्ठ परमेश्वरामध्ये निमग्न होऊन जाते. अशी आत्मविस्मृती आणि तादात्म्यता यामुळे ईश्वराशी मीलनावस्थे (हक़ीक़त)चा उदय होतो.

ईश्वराकडे घेऊन जाण्याऱ्या साधना मार्गावर अग्रेसर होत असताना सूफ़ी संत साधकास एक वर्तुळ परिवृत्त दिसू लागते. त्या (वर्तुळा)चे परिघ, त्याची त्रिज्या आणि त्याचा केंद्रबिंदू हे सर्व सूफ़ीवादामध्ये १) शरीअत, २) तरीक़त, ३) मारिफ़त आणि ४) हक़ीक़त हे ईश्वरप्राप्तीचे चार सोपानांशी निगडित आहेत. ते याप्रमाणे –

क) वर्तुळाचा केंद्रबिंदू हा सत्य म्हणजेच 'हक़ीक़त' चे निदर्शक आहे,

ख) परिघ हे धर्मशास्त्राचे सिध्दान्त (नियम) म्हणजेच 'शरीअत', ब्रह्मज्ञान अर्थात 'मारिफ़त', प्रेम म्हणजेच 'महब्ब:', भय अर्थात 'मख़फ' यांचे लक्षण आहे.

ग) त्रिज्या साधनामार्ग म्हणजेच 'तरीक़त' या नात्याने कार्यप्रवृत्त आहे, आणि

घ) त्रिज्या म्हणजेच 'तरीक़त' हे वर्तुळाच्या मध्यबिंदूस्थानी असलेले अदृश्य केंद्र असलेले निर्गुण आणि दृश्य परिघ असलेले सगुण यांना जोडते.

'तरीक़त'च्या मार्गावर निर्गुण अगोचर केंद्राकडे अग्रेसर होताना म्हणजेच 'हक़ीक़त'कडे प्रयाण करताना सूफ़ी किंवा संताचा देह प्रवास करीत नसून, त्याचा आत्मा प्रवास करीत असतो. 'तरीक़त'वर मार्ग आक्रमण करीत असताना, सूफ़ी किंवा संतास आत्म्या ('रूह')च्या पुढील सोपानांमधून जावे लागते.

अ) मक़ामन्नफ़्स म्हणजेच वासनेचे सोपान

आ) मक़ाम–अल्–क़ल्ब अर्थात चित्तस्थान, मनोभूमी,

इ) मक़ामरूह म्हणजेच विशुद्ध आत्म्याचे स्थळ.

ई) मक़ाम–अस्–सिर्र अर्थात मर्मस्थळ, अंत:करण.

उ) मक़ाम–अल्–कुर्ब म्हणजेच सामिप्यस्थळ, सान्निध्यस्थळ.

ऊ) मक़ाम–अल्–वस्ल अर्थात मिलन भूमी म्हणजेच ईश्वराशी तादात्म्य.

उपरोक्त सोपानांचा संक्षिप्त परिचय याप्रमाणे आहे –

**अ) मक़ामन्नफ़्स : वासनास्थळ –** हा माणसा (भक्ता)च्या आयुष्यामधील प्रथम अटळ थांबा आहे. विकासाच्या प्राथमिक टप्प्यामध्ये शरीर हे आपल्या केवळ पाशवी इच्छा–आकांक्षाच्या पूर्ततेमध्ये मग्न असते.

जिवंत राहण्यासाठी शरीरास अन्नोदकाची गरज असते. ही ईश्वरदत्त अशी एक अट आहे. निरागस बालके, शिशु हे निर्णय आणि शिक्षेपासून निर्भय असतात. या सोपानावर निर्णयशक्ती आणि विचारशक्ती अद्याप विकसित झालेल्या नसतात. त्यांचा विकास नंतर घडून येतो. वासनेपासून परावृत्त न होता पुष्कळसे लोक प्रौढत्वास इतकेच नव्हे तर वृद्धत्वास पोहोचतात.

**आ) मक़ाम–अल्– क़ल्ब : चित्तस्थान, मनोभूमी** –जेव्हा एखादी व्यक्ती 'नफ़्स' म्हणजेच वासनेवर काही प्रमाणात नियंत्रण मिळविण्यात यशस्वी होते, म्हणजेच प्रबळ इच्छेचा विकास करणे, जबाबदारीची जाणीव होणे, सारासार विचार करणे, करुणा, सभ्यता अशासारखे सद्गुण अंगी बाळगणे या सर्व लक्षणांसह मक़ामन्नफ़्स म्हणजेच वासनास्थळ पार करून मक़ाम–अल्–क़ल्ब अर्थात चित्तस्थानी किंवा मनोभूमीवर येऊन पोहोचते तेव्हा ती व्यक्ती म्हणेल, 'मी जगामध्ये सत्कर्मेच करीन, आहे त्या स्थितीत मी निसर्गावर प्रेम करीन. मी प्रत्येकाचा स्वीकार करीन, जीवन म्हणजे एखादे आश्चर्यच आहे! सकारात्मक पैलू असूनसुद्धा, हे आत्म्याच्या प्रगतीचे दुसरे सोपान आहे.

**इ) मक़ामर्रूह : विशुद्ध आत्म्याचे स्थळ** – एखाद्या सद्गुरूंच्या मार्गदर्शनाविना आत्म्याच्या उत्क्रांतीचा उच्चतर सोपान गाठणे हे फार अवघड असते. त्याच्या मार्गदर्शनाखाली विभिन्न सरावांनी दया, करुणा, सुविचार आणि अनुशासन यांच्या बळावर 'मक़ामर्रूह'कडे अग्रेसर होऊन पूर्णावस्थेचे उच्च कळस गाठता येईल. हा टप्पा गाठलेली कोणतीही व्यक्ती इतरांना प्रेम आणि आध्यात्मिकतेची प्रतिमूर्ती वाटू लागेल. या टप्प्यावर साधकामध्ये एक प्रकारचा उत्कंठातीरेक दिसून येतो. यामुळे सखोल आत्मशुद्धी होते. परिणामी (प्रेषित मुहम्मद स· यांनी सांगितल्याप्रमाणे), पानगळीमुळे वृक्षाची पाने जशी गळून पडतात तद्वत पापे गळून पडतात, झडून जातात. हा उत्कंठातिरेक आत्म्याची कलुषता भस्मसात करतो.

**ई) मक़ाम–अस्–सिर्र : मर्मस्थळ, अंत:करण** – भाग्यशाली, दैवी गुह्यांच्या टप्प्यावर, संपूर्ण विश्व आपल्या ताब्यात असलेली यंत्रणा समजू शकतात. स्पष्टपणे ऐकण्याची क्षमता त्यांच्यामध्ये पूर्णपणे विकसित झालेली असते. इतरांच्या मनातील विचार जाणून घेण्याची क्षमता त्यांच्यामध्ये निर्माण होते. अदृश्य जगाच्या वार्ता घेऊन देवदूत त्यांच्याकडे येतात.

**उ) मक़ाम–अल्–कुर्ब : सान्निध्यस्थळ** – या सोपानामध्ये खरोखर परमेश्वराशी जवळीक साधली जाते. 'अर्श' म्हणजेच परमेश्वराचे राजसिंहासन ज्यामध्ये आहे अशा सर्वोच्च स्वर्गाचे सुख साधक उपभोगत असतो. त्याला इहलोकामधील सगळ्या सगळ्या सोयी उपलब्ध असतात. त्याला परलोकामधील दृश्यांचे ओझरते दर्शन घडते. ते सदासर्वदा आनंदमग्न असतात. त्यांना खाणे–पिणे, झोपणे, वस्त्र नेसणे यांविषयी काहीच पर्वा नसते. ते दिव्यत्वाच्या प्रचितीमध्ये मदमस्त असतात. ते ईश्वरामध्ये विलीन होऊन जातात.

**ऊ) मक़ाम–अल्–व़स्ल : मिलनभूमी वा ईश्वराशी तादात्म्य** – या सोपानावर भक्तासाठी परमेश्वर हा प्रेयसी असतो व तो स्वत: प्रियकर असतो. सदासर्वदा दैवी एकत्त्वतेच्या बंधनामध्ये दोघे बांधले गेलेले असतात. इतर सोपानांप्रमाणे हा टप्पा प्रयत्नसाध्य नसतो. सर्वश्रेष्ठ परमेश्वर हाच निर्णय घेतो आणि आपल्या इच्छेनुसार भक्तास निवडतो. या लोकांना 'वली' म्हणजेच ईश्वराचे प्रिय सखा (मित्र) असे म्हणतात.

**छ) चित्तनियंत्रण आणि चित्ताग्रता – आत्म्यासाठी पूरक भूमिका –** मानवाचे मनावरील ताब्यास चित्तनियंत्रण असे म्हणतात, तर मनास एकाग्र ठेवण्याच्या प्रयत्नास चित्ताग्रता असे म्हणतात. सबळ मन हे आत्म्यासाठी पूरक ठरते. स्थिर आचरणामध्ये 'अहं'चा मनापासून संबंध–विच्छेद अनुस्युत आहे. जेव्हा मन स्वार्थी इच्छांमध्ये गुंतलेले असते, तेव्हा ते यशापयश यांचे मूल्यांकन करते आणि ते कदापि मुक्त होत नाही. त्याला मुक्त होण्यासाठी स्वार्थी इच्छांपासून निस्वार्थी इच्छांकडे उन्मुक्त होण्याची गरज असते. मनावरील विजय हे सर्वात मोठे असते. मन हे अष्टधा प्रकृतीपैकी एक आहे. पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, मन, बुद्धी आणि अहंकार यांना अष्टधा प्रकृती असे म्हणतात. हे स्वभावाचे अष्टांगी विभाजन आहे.

मन हे बुद्धीद्वारे नियंत्रित होते आणि मनाचे ज्ञानेंद्रियांवर नियंत्रण असते. येथे रथ–रूपकाचा दृष्टांत समर्पक वाटतो. म्हणून जर ज्ञानेंद्रिये हे रथ ओढणारे अश्व (घोडे) असतील तर बुद्धी ही त्या रथाची सारथी असते. मन हा या बुद्धीरूपी सारथ्याच्या हातातील पट्टा आहे. जर सारथ्याचे आपल्या पट्ट्याच्या धाकाने घोड्यांवर नियंत्रण असेल, तर रथ हा योग्य दिशेने ओढला जातो. मन हे रथास योग्य दिशेने ओढण्याचे आश्चर्यकारक कार्य करते, मात्र तो निर्णयाचा प्रमुख अधिकारी नसतो. बुद्धी ही प्रमुख अधिकारी असते. जर बुद्धी निद्रिस्त किंवा प्रसुप्त असेल तर दैनंदिन जीवनामध्ये मनास वाटेल ते ऐकण्याची सवय जडते.

अहंकाराच्या निर्णयामुळे बुद्धी आणि मन यांच्या दरम्यान संघर्ष निर्माण होतो. इतर प्राण्यांमध्ये हे कधीच आढळून येत नाही. (जाणीव किंवा चेतना म्हणजे माणसाची अशी एक मनोवस्था असते की तो विशुद्ध अंत:करणाने, निर्मळ मनाने बोलतो आणि कृती करतो. असा माणूस सत्यव्रती आणि सदाचरणी असतो. तो इतरांसाठी त्यागमय जीवन जगतो.) मनाने नेहमी बुद्धीची आज्ञा पाळली पाहिजे आणि त्याप्रमाणे त्याने इंद्रियांना आज्ञा केली पाहिजे. तरच मन आणि बुद्धी यांमध्ये संघर्ष किंवा द्वंद्व निर्माण होणार नाही. जेव्हा आपण अस्ताव्यस्त किंवा विचलित मनाविषयी बोलतो, तेव्हा असे समजावे की आपल्या हातून बुद्धीला अपेक्षित नसलेली एखादी कृती घडली असली पाहिजे.

एकेश्वरवादामध्ये अटळ श्रद्धा, दैनंदिन अनिवार्य अशा पंचोपासना करणे, वर्षातून नियत महिनाभर उपवासव्रत करणे, वार्षिक धर्मकर न चुकता देणे आणि आर्थिकदृष्ट्या शक्य असणाऱ्या सुदृढ व्यक्तीने आयुष्यातून निदान एकदा (काब्याची) महातीर्थयात्रा करणे या बाबी व्यक्तीस अल्लाह आणि त्याचे प्रेषित (मुहम्मद) यावर श्रद्धा ठेवणारा एक श्रद्धावंत म्हणून गणला जाण्यास पुरेसा आहेत. परंतु आध्यात्मिक उत्तुंगता गाठण्यासाठी आणि प्रभुदर्शनासाठी ईश्वराप्रती अगाध प्रेम विकसित करण्याची आवश्यकता असते. आपल्या चित्ताची एकाग्रता अखंडपणे ईश्वराकडे खिळवून ईश्वराप्रती प्रेम प्राप्त केले जाऊ शकते.

प्रभुदर्शन ध्यासामधील प्रगती ही उपासकाच्या उपासनेमधील सरावाची गुणवत्ता आणि भक्तीमधील तल्लीनता यावर अवलंबून असते. याशिवाय थोर संत–महात्म्यांचा सत्संग पण महत्त्वाचा असतो. ऐहिक सुख, वैभवांचा त्याग करणे, निरंतर प्रभुनामस्मरणामध्ये मग्न असणे, आपल्या आचरणामध्ये विश्रंभ जपणे, ईश्वरभक्तीमध्ये मग्न असणे या प्रभुदर्शनासाठी आवश्यक अशा बाबी आहेत. शेवटी प्रभुदर्शन हे सर्वस्वी प्रभूची दया आणि प्रभुची कृपा यावर अवलंबून असते, हे नि:संशय होय.

## ८) सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्यांचा आत्माविषयक दृष्टिकोन

### १) अली बिन उस्मान जल्लाबी हुजवीरी : 'कश्फुल महजूब' ग्रंथावरून

यहूदी लोकांच्या बहकविण्यामुळे उद्युक्त होऊन श्रद्धाहीन कुरेशींनी नफ़र बिन हारिस याला प्रेषित मुहंमद यांच्याकडे पाठवून विचारणा करून घेतली की 'रूह' म्हणजेच आत्मा कशास म्हणतात, त्याचे स्वरूप काय आहे, त्याचे वैशिष्ट्य काय आहे? तेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने, (जो अंत:करणाच्या रहस्यांना जाणतो) प्रथम 'रूह' अर्थात आत्म्याच्या प्रत्यक्ष अस्तित्वास सिद्ध करून प्रेषितास म्हटले, "ते तुम्हाला आत्म्याविषयी प्रश्न करतात. (आणि मग त्याच्या अनादि असण्यासंबंधी नाकारून जेव्हा ते विचारतील तेव्हा (त्यांना) सांगा, 'आत्मा माझ्या पालनकर्त्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे, (पण हे मानवा! तू त्याचे स्वरूप समजू शकत नाहीस कारण) तुला अत्यल्प ज्ञान प्रदान केलेले आहे. (तिचे आकलन तुझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे).' – १७:८५. या संदर्भात प्रेषितांनी पण म्हटले आहे की, "आत्मे असंख्य लष्करांस्वरूपात एका ठिकाणी गोळा (एकत्रित जमलेले) आहेत. यांपैकी ज्यांची ओळख आत्म्यांच्या जगामध्ये होऊन जाते, ते या इहलोकी अवतरित होऊन सुद्धा ते एकमेकास आवडतात, आणि ते जेथे अनोळखी होते, ते या इहलोकी येऊन सुद्धा एकमेकांशी वेगळेच राहतात." आणि अशाच प्रकारचे अनेक प्रमाण आत्म्यासंबंधी आहेत; परंतु यांच्यापैकी कोणीच आत्म्याच्या वास्तवाबद्दल चर्चा केलेली नाही. (कारण स्वत: परमेश्वराकडून फक्त एवढेच संकेत दिले गेले आहेत की "हा त्याचा आदेश आहे.") परिणामस्वरूप प्रत्येक संप्रदाय हा आपापली मते व्यक्त करतो.

एका संप्रदायाचे असे मत आहे की, "आत्मा हे शरीरास जिवंत ठेवण्याचे साधन आहे. म्हणजेच आत्मा हे शरीरास जिवंत ठेवण्याचे साक्षात जीवन आहे." मीमांसकाचा एक गट याच विचारांशी सहमत आहे. या अर्थाद्वारे आत्मा जणू एक भूततत्त्व आहे, आणि ईश्वरी आज्ञेमुळे (हेच भूततत्त्व) प्रत्येक सजिवास जिवंत ठेवते, आणि (प्रत्येक सजिवामध्ये) जो संयोग, जी हालचाल अथवा जे संमेलन दिसते, ते याच्यामुळेच आहे, आणि याचप्रमाणे त्या समस्त बाधा की ज्यांच्यामुळे शारीरिक परिवर्तन घडते (ते याच आत्म्यामुळे होत असते.)

दुसऱ्या एका संप्रदायाचे असे मत आहे की, "आत्मा हा जीवनाव्यतिरिक्त कोणती तरी वस्तू आहे, जीवन त्याच्या व्यतिरिक्त आढळून येत नाही, आणि ज्याप्रमाणे आत्मा हा शरीराशिवाय राहू शकत नाही, तद्वत जीव हा आत्म्याशिवाय राहू शकत नाही. जणू आत्मा आणि जीव हे परस्पर अंगांगी आहेत आणि या दोहोपैकी कोणीच एक दुसऱ्याशिवाय आढळून येत नाही. जसे वेदना आणि त्याचे ज्ञान (या आहेत तरी दोन गोष्टी, परंतु एक दुसऱ्याशी वेगळ्या असू शकत नाहीत.) आणि या अर्थी पण (आत्मा हा) भूततत्त्व आहे जसे की जीव हा एक भूत तत्त्व आहे.

सर्वसाधारण संत-महात्मे या मताचे आहेत की आत्मा प्रत्यक्ष आहे(च), तो गुण नव्हे. म्हणजेच तो सत्त्व आहे, भूततत्त्व नाही. कारण की जोपर्यंत आत्मा हा शरीरामध्ये विद्यमान असतो, तोपर्यंतच आपल्या प्रभावी सवयीनुसार परमेश्वर त्या शरीरास सजीव ठेवतो, आणि हे की, मानवी जीवन एक गुण आहे. ज्याचे अस्तित्व त्याच्यावरच अवलंबून (निर्भर) असते. तथापि आत्म्याचे सामर्थ्य, त्याची योग्यता एक ठेवी ('अमानत') सारखी आहे. ही ठेव शरीरामध्ये सुरक्षित ठेवण्यात आली आहे. आणि हे पण यथायोग्य आहे की तो, (आत्मा) माणसापासून विभक्त होऊन जावे, (तरी पण) माणूस जिवंत असावा. जसे की स्वप्नावस्थेत हे घडते.

स्वप्नामध्ये आत्मा निघून जातो, आणि जीव (प्राण) तरी पण शिल्लक राहतो. पण हे मात्र योग्य नव्हे की आत्मा निघून जाण्याच्या अवस्थेमध्ये ज्ञान आणि बुद्धी नियमानुसार बाकी राहावेत. (जागृत अवस्थेमध्ये ज्याप्रमाणे ज्ञान आणि बुद्धी कार्यमग्न असतात. त्याप्रमाणे ते मृतावस्थेत (कार्यशील) नसतात. हे स्पष्ट आहे की स्वप्नामध्ये ज्ञान आणि बुद्धीचे कार्य स्थगित होऊन जाते, आणि माणूस जणूकाही मेलेलाच असतो. म्हणून प्रेषित मुहंमद यांचे वचन आहे की, ''हुतात्म्यांचे आत्मे पक्षांच्या हृत्पिंडांमध्ये असतात.'' यावरून असा निष्कर्ष निघतो की आत्मा (हा नि:संदेह) एक सत्त्व ('जौहर') आहे. (जो नित्य आत्मनिर्भर आहे.) याचप्रमाणे प्रेषितांच्या या मताप्रमाणे की, ''आत्मे लष्कराच्या स्वरूपात एकत्रित करण्यात आलेले आहेत.'' – यावरून अंतिमत: हेच सिद्ध होते की ते लष्कर आहेत अवश्य, या व्यतिरिक्तपण असतील, आणि हे स्पष्ट आहे की भूत तत्त्वावर (जे नित् आत्मनिर्भर नाही.) चिरस्थायित्वतेचा संबंध लादणे योग्य नव्हे. म्हणून 'रूह' अर्थात आत्मा हा एक सूक्ष्म द्रव्य विशेष आहे. तो परमेश्वराच्या आज्ञेने शरीरामध्ये प्रवेश करतो, आणि त्याच्या आज्ञेमुळे तो परत फिरतो. आणि परमेश्वर मुहम्मद म्हणतात की, ''मी दिव्य आरोहणा ('शबे मेराज')च्या रात्री आदम, यूसुफ, मूसा, हारून, ईसा आणि इब्राहीम या प्रेषितांना आकाशांवर पाहिले.'' अंतत: ते या प्रेषितांचे आत्मेच असतील. आता जर आत्म्यांना भूत तत्त्वे मानले गेले तर ते नित्य आत्मनिर्भर कसे बरे होऊ शकतात आणि स–शरीर स्वरूपामध्ये प्रेषित त्यांना कसे बरे पाहू शकले असते? यासाठी की अस्तित्वासाठी कोणता तरी आधार असणे आवश्यक आहे, की ज्याला त्या आत्म्याचे भूत तत्त्व म्हणून गणले जाऊ शकेल. अतएव त्याचा आधार सत्त्वच ('जोहर') असू शकतो; आणि सत्त्वे ही नेहमी संयुक्त आणि स्थूल स्वरूपामध्ये असतात, तर आत्मे हे सूक्ष्म द्रव्य विशेष असतात. म्हणून त्यांना संयुक्त आणि स्थूल स्वरूपामध्ये (म्हणजेच स–शरीर) का बरे म्हणून पाहिले जाऊ शकते. म्हणून हे उचित ठरते की ते (आत्मे) पक्षांच्या हृत्पिंडामध्ये असावेत. आणि हे पण योग्य, उचित आहे की ते लष्करांचे लष्कर स्वरूपात असावेत. आणि हे पण योग्य वाटते की सही हदीसांच्या उक्तीप्रमाणे त्यांचे आवागमन (येणे–जाणे) सुरू असावे. आणि त्यांचे शरीरामध्ये प्रवेश करणे आणि पुन्हा नंतर शरीरापासून (इतरत्र) निघून जाणे हे ईश्वराच्या आज्ञेनुसार घडते. जसे की स्वत: सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो, ''आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे.'' – १७:८५. म्हणजे परमेश्वराच्या इच्छा–शक्ती–प्रेरित आज्ञेचा परिणाम हा आत्मा, अदेही व निराकार होय.

आता प्रश्न शिल्लक राहतो नास्तिकांच्या मतभेदांचा उल्लेख, जे आत्म्यास स्वयंभू आणि अनादि मानतात. ते त्याची पूजा करतात, आणि ते त्याच्याशिवाय कोणत्याच वस्तूस कर्ता आणि योजनाकार व प्रबंधकुशल म्हणून स्वीकार करीत नाहीत. याच आत्म्यांना ते स्वयंभू उपास्य आणि अनादि प्रबंधकुशल मानतात. आणि ते असे समजतात की एकच आत्मा हा एका व्यक्तीच्या शरीरापासून निघून दुसऱ्या व्यक्तीच्या शरीरामध्ये प्रवेश करतो. परकाया प्रवेशाचा हा भ्रम त्यांच्या मनामध्ये इतका घट्ट बसलेला आहे की इतर कोणत्याच विषयाबद्दल इतके मतैक्य (एकमत) झाले नसेल. भारत, तिबेट, चीनमधील जवळ जवळ सर्व लोकांमध्ये या देहांतरावर एकमत आढळते. नसारा म्हणजेच ख्रिश्चन लोकांचे पण जवळपास असेच मत आहे. एक आत्म्याच्या दुसऱ्या शरीरामध्ये प्रवेश करण्यासंबंधी जे दोन गट किंवा संप्रदाय आहेत, ते पण याच मताशी सहमत आहेत, आणि ते या दृष्टिकोनासच योग्य ठरवतात, व ते याबाबतीत दुराग्रही पण आहेत. ते आपल्या

दाव्याच्या समर्थनार्थ प्रमाण पण प्रस्तुत करतात. म्हणून या सर्व संप्रदायाशी आमचे म्हणणे आहे की शब्द 'अनादि' वा 'स्वयंभू'शी तुमचा आशय वा अभिप्राय काय आहे? आत्म्याचे अस्तित्व नवनिर्मिती अनादि आहे. किंवा फक्त स्वयंभू (म्हणजेच नित्य अनादि)? जर त्यांचे उत्तर असेल की (वा त्यांचा अभिप्राय असेल की) तो नवनिर्मित अनादि आहे; तर मग त्या मतभेदाचे भांडणच मिटून जाते. कारण की आमचे पण असेच मत आहे, की आत्मा नवनिर्मित असताना पण अति प्राचीन म्हणजेच अनादि आहे. याचे कारण असे की याचे अस्तित्व हे कुठल्याही परिस्थितीत मानवी शरीराअगोदरचे आहे. (म्हणजेच आत्मे हे आहेत अर्वाचिन, नवनिर्मित, परंतु ते या अर्थी प्राचीन किंवा अनादि आहेत की त्यांची निर्मिती शरीरे निर्माण होण्याअगोदरची आहे.) जसे प्रेषित मुहम्मद यांचे मत होते की, ''निःसंशय, सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आत्म्यांना शरीरे निर्माण होण्याअगोदर निर्माण केलेले आहे. आणि जेव्हा आत्म्याचे अर्वाचीन तत्त्व सत्य सिद्ध झाले तेव्हा शेवटी (अंततः) हे पण सत्य आहे की, अर्वाचीन दुसऱ्या अर्वाचीनापासून प्राचीन असेल तर ते पण अर्वाचीनच असते. म्हणून हा (आत्मा) परमेश्वराच्या सृष्टीमधील एक सृष्ट वस्तू आहे. याला दुसऱ्या वस्तूशी (अर्थात शरीराशी) जोडले गेले आहे आणि या दोहोंच्या संयुगामध्ये परमेश्वरी इच्छेने जीवन दृष्टीगोचर होते. म्हणजेच परमेश्वराच्या सृष्टीमधील एक सृष्ट वस्तू आहे, आणि शरीर किंवा देह एक दुसरी वस्तू आहे. परमेश्वर जेव्हा एखाद्या प्राण्यास सजीव बनवू इच्छितो तेव्हा तो आज्ञा करतो की आत्म्याने शरीराशी जुडून जावे, त्याच्याशी संबंध प्रस्थापित करावेत, तेव्हा त्यास जीवनाची देणगी प्राप्त होते. (तेव्हा असेच घडते आणि एक सजीव अस्तित्वात येते.)

परंतु या आत्म्याचे एका शरीरापासून दुसऱ्या शरीरामध्ये प्रवेश करत परिभ्रमण करणे, योग्य नव्हे. हे यासाठी की जर एका व्यक्तिसाठी दोनदा जगणे (शक्य नाही) योग्य नव्हे, तर मग एका आत्म्यासाठी दोन शरीरे पण योग्य वस्तू असू शकत नाहीत. आणि जर सही हदीसांमध्ये असे मत नसते आणि प्रेषित मुहम्मद आपल्या वचनांमध्ये आणि उपदेशांमध्ये सत्य नसते तर केवळ बुद्धीच्या अनुषंगाने आत्म्याचा अभिप्राय प्राणाशिवाय अन्य काहीच घेतला जाऊ शकला असता. अशा परिस्थितीमध्ये तर त्यास फक्त गुणच म्हटले जाऊ शकले असते, आणि त्यास स्वतः कायम आत्मनिर्भर कदापि म्हटले जाऊ शकले असते.

(आता आम्ही त्यांच्या दुसऱ्या संभाव्य उत्तराच्या विश्लेषणाकरिता असे गृहीत धरले की) जर ते असे म्हणत असतील की आमच्या या विधानाचा अभिप्राय असा आहे की येथे आम्ही अनादि किंवा स्वयंभूचा अर्थ नित्य अनादि असा घेतो. (म्हणजेच तो नित्य अनादि आहे. आणि सदैव अनादि राहील) तर मग आम्ही असे विचारतो की काय तो (आत्मा) कायमस्वरूपी स्वावलंबी आहे किंवा त्यांचे स्थैर्य दुसऱ्याच्या आधारावर टिकलेले आहे (अर्थात परावलंबी आहे)? या प्रश्नाचे त्यांचे उत्तर असे असेल की, तो (आत्मा) स्वतः कायम आहे; तर मग आम्ही असे विचारतो की काय अल्लाह हा सर्वस्वी स्वामी आहे की नाही? याच्या उत्तरार्थ जर ते म्हणतील की, नाही तो सृष्टीचा निर्माता आणि स्वामी नाही; तर मग त्यांनी दुसरा अनादिस सिद्ध करणे अनिवार्य ठरेल. आणि ही गोष्ट तर्कातीत आणि तर्कविरोधी आहे; कारण की अनादिची कोणतीच सीमा (हद्द) नसते. आणि दोन अनादिंचे अस्तित्व हे एक दुसऱ्याची सीमा (हद्द) निश्चित करेल आणि हे अशक्य आहे.

(कारण की जेथे सीमांचा उल्लेख येतो, तेथे अनादिची गोष्टच संपून जाते. जे सीमेमध्ये बांधले गेले असेल ते अनादि कसे बरे असेल?) आणि जर ते म्हणतील की परमेश्वरच विश्वाचा निर्माता आणि स्वामी आहे तर मग आम्ही म्हणतो की, पुरे झाले (आणि) हे सिद्ध झाले की अनादि फक्त त्या परमेश्वराचीच सत्ता आहे आणि समस्त सृष्टी ही अर्वाचीन आहे, आणि हे अशक्य आहे की अर्वाचीन आणि प्राचीन यांची सरमिसळ होऊ शकेल किंवा त्यांचे आपसात संयोग घडून यावे किंवा त्यांच्यामध्ये ऐक्य घडून यावे - प्रस्थापित व्हावे किंवा एक दुसऱ्यामध्ये प्रवेश करून जावे किंवा अर्वाचिन हे प्राचीनतेचे आधार बनून जावे. किंवा प्राचीन हे अर्वाचीनशी जोडले जावे, कारण की ज्या वस्तूस इतर वस्तूंशी जोडले जाते तेव्हा ती तशीच होऊन जाते. आणि संयोग व वियोगाची साखळी नवनिर्मित किंवा अर्वाचीनाशिवाय इतर कोणत्याच गोष्टीवर निर्माण होऊ शकत नाही. (आणि शिवाय त्या अनादि सत्तेव्यतिरिक्त बाकी सर्व नवनिर्मितच आहेत.) कारण की हे सर्व एक दुसऱ्याशी एकसारख्या वस्तू बनल्या आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराची पवित्र सत्ता ही त्यांच्याहून कितीतरी पटीने अधिक उच्च आणि श्रेष्ठ आहे.

जर त्यांचे असे म्हणणे असेल की तो (आत्मा) स्वत: कायम नाही आणि त्याचे स्थैर्य हे दुसऱ्यावर निर्भर आहे किंवा इतरांशी अवलंबून आहे, तर याचे पण दोन प्रकार होऊ शकतात - म्हणजेच एक तर त्यास गुण म्हणावे लागेल नाहीतर त्यास भूततत्त्व ठरवले जाईल. जर त्यास भूततत्त्व म्हणावे तर हे आवश्यक ठरते की तो एखाद्या स्थळ विशेषामध्ये असेल, किंवा स्थळ विरहित अवस्थेमध्ये! जर तो स्थळ विशेषामध्ये असेल तर त्याचे स्थळ पण त्याच्या स्वत:सारखेच असेल (म्हणजेच तो भूततत्त्व असेल आणि आपल्या वास्तवामध्ये इतरांशी जुडलेला असेल.) आणि शिवाय अनादि या शब्दाचा संबंध या दोहोंसाठी निष्प्रभावी किंवा असत्य बनून जाईल. आणि जर असे म्हणण्यात आले की तो अ-स्थानाधीन आहे तर त्याच प्रमाणे अशक्य आहे की जे भूततत्त्व स्वत:च जातीनिशी कायम नसावे. त्याचे अस्थानाधीन असणे बुद्धीविरोधी गोष्ट आहे. आणि जर अवतारवादी आणि परकाया प्रवेशवादी लोकांप्रमाणे अनादि असे गुण ठरविले तर हे उत्स्फूर्तपणे अशक्य आहे की सर्व नवनिर्मिती - अर्वाचीन आहेत. कारण की जर हे योग्य असेल की त्याचे अमर जीवन बनले तर मग हे पण योग्य आहे की परमेश्वराप्रमाणेच सजीव सृष्टीपण प्रत्येक वस्तूवर प्रभावशाली बनून जाईल. गुणधारकामध्ये नेहमी गुण सामावलेले असतात, तर मग हे कसे बरे शक्य आहे की गुण हे अनादि-प्राचीन असावे आणि त्याचा गुणधारी हा नवनिर्मित-अर्वाचिन असावा? तर मग हे सुस्पष्ट आहे की अनादि-प्राचीनास नवनिर्मित-अर्वाचीनाशी काहीच देणे घेणे नाही. (म्हणजेच त्याच्याशी मुळीच काही संबंध नाही.) अतएव नास्तिकांचे आत्मासंबंधी सर्वचे सर्व प्रमाण खोटे आहेत. आणि शिवाय आत्मा निर्मित (अर्वाचीन) आहे आणि सर्व श्रेष्ठ परमेश्वराच्या आज्ञाधीन-आज्ञांकित आहे (जसे की बाकी समस्त सृष्टी). आणि जी व्यक्ती याविरोधी मत नोंदविते तिला प्राचीन (अनादि) आणि अर्वाचीन (नवनिर्मित) मधील फरकच कळले नाही. आणि हे सरासर योग्य नव्हे की संतत्वाच्या योग्य पदावर असताना संताने परमेश्वराच्या गुणांशी अनभिज्ञ असावे. परमेश्वराने मानवास विचार करण्यासाठी बुद्धीची अप्रतिम देणगी बहाल केली आहे. याचा सुयोग्य उपयोग मानवाने करायचा असतो. अशा या अप्रतीम देणगीविषयी परमेश्वराचे आभारच!

**आत्मे दहा स्थानांवर स्थायिक आहेत : आत्म्याच्या आधारे मानवाच्या दहा श्रेणी (प्रकार)**

संत-महात्म्यामध्ये अबू बकर वास्ती नावाचे एक संत महात्मे होऊन गेलेत. त्यांनी आत्म्याविषयी आपले विचार प्रकट केले आहेत. ते म्हणतात की, आत्म्यांची विविध दहा स्थळे आहेत, म्हणजेच आत्मे हे दहा स्थानांवर स्थायिक आहेत. ते याप्रमाणे -

१) एक स्थान त्या लोकांच्या आत्म्यांचे आहे, जे अज्ञान-अंधकारामध्ये लिप्त असून अपराधांमध्ये बुडालेले आहेत. त्यांना याची जाणीव नसते की त्यांच्याशी कसला व्यवहार केला जात आहे. हा **पापी जनांचा, अपराधी लोकांचा आत्मा** असतो.

२) दुसरे स्थान त्या **संयमी आणि इंद्रिय-निग्रही लोकांच्या आत्म्यांचे** आहे, हे भौतिक आकाश म्हणजेच जगास दिसणाऱ्या प्रथम आकाशावर असतात. हे आत्मे आपल्या सत्कर्मांच्या आधारे प्रसन्नचित्त असतात. आपली उपासना आणि भक्तीच्या बळावर हे पहिल्या आकाशांवर इकडे तिकडे विहार करीत असतात.

३) तिसऱ्या स्थानावर त्या **सच्छिष्यांचे आत्मे** आहेत. हे चौथ्या आकाशावर असतात. हे दृढ संकल्पी आणि सुसभ्य लोक असतात. हे आपले सत्य आणि सुकर्मांच्या छायेमध्ये (खाली) देवदूतांसोबत राहतात.

४) चौथ्या स्थानावर **प्रेषित निर्दिष्ट सन्मार्गगामी आज्ञाधारक लोकांचे आत्मे** प्रकाशाच्या कंदीलांमध्ये परमेश्वराच्या राजसिंहासनाशी लटकलेली (लोंबकळलेली) असतात. यांचे अन्नोदक ईश्वरी कृपा व दैवी चैतन्य आणि ईश्वरी सान्निध्य असते.

५) पाचव्या स्थानावर **कृतज्ञ लोकांचे आत्मे** स्थायिक असतात. हे सत्य पवित्रतेच्या पडद्यामध्ये उच्चपदस्थ स्थळमध्ये हर्षोल्लासित आणि आणि आनंदित असतात.

६) सहाव्या स्थानावर **हुतात्म्यांचे आत्मे** स्थायिक असतात. हे स्वर्गामध्ये पक्ष्यांच्या हत्पिंडामध्ये राहतात. हे स्वर्गाच्या नंदनवनामध्ये वाटेल त्यावेळी वाटेल त्या ठिकाणी जाऊ शकतात.

७) सातव्या स्थानावर **ईशप्रेमी भक्तांचे आत्मे** स्थायिक असतात. हे स्वच्छ प्रकाशांच्या पडद्यांमध्ये शिष्टाचारासाठी वास्तव्य केलेले आहेत.

८) आठव्या स्थानावर **ब्रह्मज्ञानी लोकांचे आत्मे** स्थायिक आहेत. ते रात्रंदिवस ईश्वराच्या सत्य वचनांचे पारायण करून ईश्वराप्रती आपले प्रेमनिवेदन करतात आणि पृथ्वीवरील स्वर्गामध्ये आपल्या घरांकडे पाहात असतात.

९) नवव्या स्थानावर **ईश्वरनिष्ठ मांदियाळांचे आत्मे**('औलियाए अल्लाह') ईश्वराच्या दर्शनामध्येच मग्न व तल्लीन असतात. या तल्लीनतेच्या परिणामांमुळे ना ते इतर कोणत्याच वस्तूस जाणतात ना त्याच्या व्यतिरिक्त इतर कोणतीच गोष्ट त्यांना आराम व मन:शांती देऊ शकते. आणि

१०) दहाव्या स्थानावर **सिद्ध-संन्यासी ('दरवेश') लोकांचे आत्मे** स्थायिक आहेत. ते निर्वाण अवस्थेमध्ये ईश्वर सान्निध्याचा शुभलाभ करून घेतात.

**कालानुक्रमाच्या दृष्टीने आत्म्याच्या निर्मितीचे स्थान**

हुजवीरी यांनी आत्म्यास अनित्य मानले आहे. ते आत्म्यास परमेश्वरद्वारा निर्मित मानतात. त्यांचे असे मत आहे की शरीराच्या निर्मिती अगोदर आत्मा विद्यमान होता. परमेश्वर हा शरीर आणि आत्मा यांना जोडणारा आहे.

कालानुक्रमाच्या दृष्टीने आत्म्याच्या निर्मितीचे स्थानाविषयी संकेत प्रसिद्ध सूफ़ी साधक उमर बिन उस्मान अल्-मक्की यांच्या 'किताब-ए-मुहब्बत' या ग्रंथामध्ये प्राप्त होतो. आत्म्याविषयी ते लिहितात -

''शरीर निर्मितीच्या सात हजार वर्षे अगोदर परमेश्वराने क़ल्ब अथवा मनाची सृष्टी केली आणि त्यास आपल्या जवळ ठेवून घेतले. क़ल्ब अथवा मनाच्या निर्मितीच्या सात हजार वर्षे अगोदर परमेश्वराने रूह अथवा आत्मा (प्राण) याची सृष्टी केली, आणि त्याला परमेश्वराचे साहचर्य ('उन्स') लाभले आणि आत्म्याच्या सात हजार वर्षे अगोदर पण त्याने सिर्र अथवा अंत:करणाची निर्मिती केली, आणि त्याला वस्ल (संयोग)ची स्थिती प्राप्त झाली आणि अंत:करणावर दररोज तीनशेसाठ वेळा आपली दृष्टी फिरवली आणि रूह अथवा प्राणास (आत्म्यास) प्रेम-तत्त्वाशी परिचय घडवून आणला (ओळख करून दिली) आणि क़ल्ब अथवा मनावर तिनशेसाठ वेळा साहचर्याचे भेद (गूज) प्रकट केले. याचा परिणाम असा झाला की ते या दृश्य जगाकडेच पहाण्यात मग्न झाले आणि स्वत:स इतरांपेक्षा श्रेष्ठ जाणले आणि अशा प्रकारे त्यांच्यामध्ये अहंकार आणि दांभिकता भरून गेली. परिणामी परमेश्वराने त्यांच्यापैकी प्रत्येकास कसोटीवर कसले. त्याची कसोटी अशी होती - अंत:करणास आत्म्यामध्ये, आत्म्यास मनामध्ये, आणि मनास शरीराच्या पिंजऱ्यामध्ये बंद करून ठेवले. यानंतर त्याने त्याच्यासोबत बुद्धीस पण जोडले आणि प्रेषितांना जगामध्ये पाठविले आणि त्यांना आदेश दिले आणि मग त्यांच्यापैकी प्रत्येक हा आपापली प्राथमिक अवस्था प्राप्त करण्याच्या प्रयत्नामध्ये लागला, आणि त्यांपैकी प्रत्येक, आज्ञेमध्ये आपले खास कर्तव्य शोधू लागले. उदाहरणार्थ, परमेश्वराने त्यांना प्रार्थना-भक्ती-उपासना करण्याचा आदेश दिला. या आज्ञापालनामध्ये शरीर तर प्रार्थनेमध्ये मग्न झाले आणि मन प्रेमाचे अधिकारी बनले. आत्म्यास त्याचे सान्निध्य प्राप्त झाले आणि अंत:करणास त्याच्यासोबत एकत्व प्राप्त करण्यामध्येच शांतीचा लाभ झाला. शांतीचा अनुभव आला.'' - (अली बिन उस्मान हुजवीरी - 'कशफुल महजूब' पृ. ४८२)

**२) शेख़ अबू नसर सराज : 'किताबु लुमा' ग्रंथावरून**

सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य शेख़ अबू नसर सराज यांनी 'किताबुल लुमा' या आपल्या ग्रंथामध्ये आत्म्यासंबंधी चुकीची मते उधृत करून, त्याविषयी भक्तांचा दृष्टिकोन मांडला आहे. तो याप्रमाणे -

**आत्म्याविषयी चुकीची मते :** एक जनसमुदाय तो आहे की ज्याने आत्म्यांविषयी चुकीची धारणा मान्य केली. त्यांचे अनेक संप्रदाय आहेत. त्या सर्वांनी चूक केली व ते पथभ्रष्ट झाले. कारण की त्यांनी एक अशा गोष्टीच्या दशेविषयी (स्थितीविषयी) विचार व मनन केले की ज्याच्याविषयी अल्लाह (परमेश्वराने) ने दशे (स्थितीस) सच वेगळे ठेवून दिले आणि तिला ज्ञान-क्षेत्रापासून दूर केले. त्याने कुणालाही अशी परवानगी (अनुमती) दिली नाही की त्यांनी आत्म्यासंबंधी ईश्वरोक्त व्याख्येव्यतिरिक्त इतर काही खुलासा करावा.

एक गट म्हणतो, आत्मा हा अल्लाहच्या प्रकाशामधून एक प्रकाश आहे आणि त्यास सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे सत्तात्मक प्रकाश जाणले. यामुळे ते साफ बुडाले.

एक दुसरा गट म्हणतो की, आत्मा परमेश्वराच्या जीवनापासून निर्माण झालेले एक जीवन आहे.

काहींनी असे म्हटले आहे की, आत्मे हे निर्मित (सृष्ट) आहेत आणि पवित्र आत्मा (रूहुलकुदूस) हा परमेश्वराच्या सत्तेपासून (निर्माण झालेला) आहे.

एका गटाचे असे म्हणणे आहे की, सर्वसामान्य लोकांचे आत्मे हे निर्मित आहेत, तर महात्म्यांचे आत्मे हे अनिर्मित आहेत.

काही लोकांची अशी धारणा होती की, आत्मे अनादि आहेत. ते ना मरतात, ना त्यांना दंड भोगावे लागते. ते जुने पण होत नाहीत.

काही लोकांचा असा विचार आहे की, आत्मे एका शरीरापासून दुसऱ्या शरीरामध्ये प्रवेश करतात. ते आत्म्याच्या स्थानांतरणास मानतात.

एका संप्रदायाची अशी विचारधारा आहे की श्रद्धाहीनास एक आत्मा असतो, श्रद्धावंतास तीन आत्मे असतात, तर प्रेषित आणि सत्यनिष्ठांना पाच आत्मे असतात.

काहीजण म्हणतात की आत्मा हा प्रकाशापासून उत्पन्न केला गेला आहे.

काही असे म्हणतात की आत्मा हा आध्यात्मिकता आहे. याची निर्मिती देवलोकांपासून झाली आहे. जेव्हा आत्मा विशुद्ध असतो तेव्हा तो देवलोकाकडे ('मलकूत') परत फिरतो.

काही लोकांचा असा विचार आहे की आत्मे दोन प्रकारचे आहेत - (१) लाहूती म्हणजेच सत्यलोकीय, आणि (२) नासूती अर्थात भुव:लोकीय.

सारांश, उपरोक्त सर्व लोकांनी आत्म्याविषयी जी काही मते मांडलेली आहेत ती चुकीची आहेत. ते सरळ पथभ्रष्टतेमध्ये पडले. आपण चूक करीत आहोत याविषयी ते बेसावध झाले. याचे कारण आहे ईश्वराने मनाई केलेले असताना सुद्धा त्यांनी आत्म्याविषयी गहन चिंतन आणि मनन केले. या संदर्भात सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे कथन आहे -''हे लोक तुम्हाला आत्म्याविषयी विचारतात, सांगा, ''हा आत्मा माझ्या पालनकर्त्याच्या आज्ञेने येतो, पण तुम्हा लोकांना अल्पज्ञान मिळाले आहे.'' - १७:८५.

**आत्म्याविषयी भक्तांचा दृष्टिकोन**

आत्म्याविषयी भक्तांच्या दृष्टिकोनानुसार सर्व आत्मे हे निर्मित (सृष्ट) आहेत. आत्मा हा अल्लाहच्या आज्ञांपैकी एक आज्ञा आहे. अल्लाह व त्यांच्या दरम्यान याशिवाय कोणतेच नाते नाही की आत्मा हा त्याच्या स्वामित्वाची (एक) वस्तू आहे. आत्मे हे परमेश्वराच्या आज्ञाधीन असतात. ते नित्य-निरंतर त्याच्या सामर्थ्याच्या कब्ज्यामध्ये असतात.

आत्मे एका शरीरापासून निघून दुसऱ्या शरीरामध्ये प्रवेश करीत नाहीत. ते शरीराप्रमाणेच मृत्यूची चव चाखतात. शरीरासोबतच ते आराम प्राप्त करतात आणि शरीरासोबतच दंड भोगतात. आत्मे त्याच शरीरांमध्ये जमा होतील ज्यांच्या मधून ते बाहेर पडलेले असतील.

अल्लाहने आद्य प्रेषित आदमच्या आत्म्यास देवलोकापासून निर्माण केले असून त्यांच्या शरीरास मातीपासून बनविले आहे.

उपरोक्त विवेचनामध्ये ज्या ज्या लोकांचे आत्म्याविषयी चुकीच्या धारणा प्रस्तुत केल्या गेल्या आहेत, त्या सिद्ध करण्याची प्रत्येकापाशी प्रमाणे आहेत. आणि अशाच प्रकारे त्यांचे प्रमाद आणि मते खोडून काढण्यासंबंधी भक्तांपाशी स्पष्ट मते विद्यमान आहेत, परंतु विस्तारभयास्तव संक्षिप्ततेवरच संतोष करण्यात आले आहे. ते

काही का असेन, जे काही विवेचन आहे, ते जिज्ञासूंसाठी पुरेसे आहे. – (शेख़ अबू नसर सराज – 'किताबुल लुमा', पृ. ७१८–१९.)

**३) अबू हामिद इमाम अल्‌ग़ज़ाली : 'हक़ीक़त–ए–रूह–ए–इन्सानी'च्या आधारे (स्वैर अनुवाद)[६१]**

**''आमुच्या सम आम्ही घडविले आणि आम्ही त्यामध्ये आपला प्राण फुंकला.''**

स्वभावाचे सर्वोत्तम विशुद्धीकरण आणि नेमस्तपणा (संयम) निर्माण करणाऱ्या आत्म्याच्या शक्य कृतीस 'समकरण' असे म्हणतात. ही सारखेपणा निर्माण करण्याची कृती असते. आद्य प्रेषित आदम यांच्या आत्म्याचे निवासस्थान चिकणमाती होते. याच्या आधारे त्यांच्या शरीराचा सांगाडा बनला. माणसामध्ये असलेल्या जीवनाच्या अंकुरापासून त्यांचे वंशज निर्माण झाले. जगामध्ये चिखल आणि दगड यासारखे घन पदार्थ आहेत, किंवा पाण्यासारखे द्रव पदार्थ आहेत. या दोहोंपैकी एकापासून किंवा यांच्या संयुगापासून अग्नी प्रदीप्त होत नाही. योग्य बदल झाल्याशिवाय चिखलावर अग्नीचा प्रभाव घडून येत नाही. नैसर्गिक प्रक्रियेमुळे चिखलापासून नियमित एक शाक बनते. मानव शाकभाजी खातो आणि पचवितो. ते त्याच्या शरीरामध्ये रक्त आणि द्रव पदार्थ बनविते. निष्कर्षणाच्या एका प्रक्रियेद्वारे, माणसामध्ये रक्ताच्या सत्त्वापासून जीवाणु तयार होतो. भावी मातेच्या गर्भामध्ये या जीवाणुंची संरचना तयार होते, की जेणेकरून ते आत्म्यासाठी योग्य असे निवासस्थान बनते. एका दिव्याच्या वातीच्या प्रज्वलनासाठी ही प्रक्रिया असते. वातीने भरपूर प्रमाणात तेल शोषून घेतल्यानंतर ती प्रज्वलनशील बनते. सारांश, जेव्हा जीवाणु हा सर्वोच्च परिपूर्णता आणि स्वभावाचे समकरण साध्य करतो, तेव्हा तो एक आत्मा ग्रहण करण्यास सक्षम बनतो. मग केवळ जीवनदाता परमेश्वराकडून भ्रूणास समर्पक असे प्राण म्हणजेच आत्मा प्रदान करण्याचे कार्य तेवढे शिल्लक राहते. 'समकरण'चा अर्थ आहे जीवाणुचे प्राण (आत्मा) ग्रहण करण्याक्षम योग्यता निर्माण करून घेण्याची प्रक्रिया.

**श्वास**

वाती(भ्रूणा)चे, आत्म्याच्या ज्वालेमुळे प्रदीप्त होण्याचे नाव श्वास आहे. जेव्हा एखादा चकमक पेटविणारा माणूस, त्यावर फुंकर मारतो तेव्हा ज्वाला उफाळून निघते. म्हणून श्वास (फुंकर) हा ज्वालेस कारणीभूत ठरतो. ईश्वराच्या अनुषंगाने हे निर्धारित कारण म्हणजे एक प्रकारची अनुचित अभिव्यक्ती आहे, आणि म्हणून येथे कारणामुळे कार्य घडून येते.

**पवित्र कुराणामध्ये अभिव्यक्त आहे**

''परमेश्वर त्यांच्यावर रागावला आणि अशा प्रकारे (त्याने) बदला घेतला.'' राग आलेल्या माणसावर प्रभाव – त्याच्या स्वभावावर प्रभाव टाकणारी भावना म्हणजे राग होय. रागामुळे तो विचलित होतो. ईश्वराच्या बाबतीत हे अशक्यच आहे. कारण येथे रागाचा प्रभाव अभीष्ट आहे. ज्याच्यावर राग कोसळला आहे असा इसम नाहीसा आहे. अशा प्रकारे रागाचा परिणाम हा कारणस्वरूप घडून येतो. त्याच प्रमाणे कारणामुळे जे कार्य (श्वास) घडते ते प्रत्यक्ष श्वासच होय. येथे प्रत्यक्ष श्वास फुंकण्याची क्रिया नाही.

**वात आणि ज्वाला**

हा दोन गुणांचा मिलाप आहे. एक गुण आहे प्रत्यक्ष कृतीचे किंवा निर्मितीचे, आणि दुसरे आत्मग्रहण करण्यास योग्य अशा एका स्वभावाचे अस्तित्व. कर्ता म्हणजे दाता परमेश्वर होय. आणि तो गरज असणाऱ्यांना योग्य त्या गोष्टी पुरवितो आणि हे ते गरजू ग्रहण करण्यास सक्षम असतात. अस्तित्व ग्रहण करण्यास पात्र असलेल्यांना तो अस्तित्व प्रदान करतो. त्याचा दुसरा एक गुण आहे. सामर्थ्य (शक्ती, बळ) तो सूर्यासारखा आहे. दिसण्यास योग्य अशा वस्तूंवर प्रकाश पाडून तो (सूर्य) त्यांना दृश्यमान करतो. सूर्य आणि त्यांच्या दरम्यान काहीच नसते. अशा प्रकारे ग्रहण करण्याचा गुण म्हणजे त्या वस्तूची प्रत्यक्ष पारदर्शकताच होय. एखाद्या आरशाचे तेज कमी होते. त्याची प्रतिबिंब करण्याची क्षमता निष्प्रभ होते. अशा वेळेस आरशासमोर चेहरे असतानासुद्धा त्यामध्ये त्यांचे प्रतिबिंब पडत नाही. मग उजाळा देणारा हा आरशास उजाळा देणे सुरू करतो. आणि त्यावरील गंज काढून टाकतो. गंज नाहीसा झाल्यावर समोरील चेहरे हळूहळू प्रतिबिंबित होऊ लागतात. त्याच प्रमाणे गर्भाची वाढ होऊन भ्रूण निर्माण होते आणि तो भ्रूण स्वभाव आणि परिपूर्णतेच्या समकरण अवस्थेस जेव्हा पोहोचतो तेव्हा आत्म्याच्या निर्मात्यापासून आत्मापण त्यामध्ये व्यक्त होतो – दिसू लागतो. निर्मात्यामध्ये (या प्रक्रियेस) काहीच बदल घडत नसतो. आत्म्याचे पूर्वी अस्तित्व नव्हते, नंतर त्याची निर्मिती झाली, असे म्हणणे म्हणजे प्रमादाशिवाय दुसरे काहीच नाही. आरशामधील एखाद्या चेहऱ्याच्या प्रतिबिंबाचा अभाव हा आरसा चकचकीत होण्याअगोदर चेहऱ्याच्या अस्तित्वहीनतेचे निदर्शक नव्हे.

**महान परोपकार**

एखाद्या भांड्यामधून पाणी जेव्हा हातावर पडते, तेव्हा पाण्याचे कण भांड्यापासून वेगळे होतात आणि (मग) हातावर पडतात. परमेश्वराच्या महान परोपकाराचे हे एक चपखल उदाहरण नव्हे. तथापि हे एखाद्या घरावर पडणाऱ्या सूर्यप्रकाशासारखे तुलनीय आहे. सूर्यापासून त्याची किरणे वेगळी होतात असा लोकांचा गैरसमज आहे. ते वस्तू किंवा भिंतींवर पसरतात असे ते समजतात. सूर्यकिरणे ग्रहण करण्याची योग्य पात्रता असल्यामुळे एखाद्या वस्तूचे दिसू लागण्याचे कारण म्हणजे सूर्याचा प्रकाश. जरी ते एखाद्या भिंतीवर अंधुकपणे का दिसेना! हे आरशामधील एखाद्या चेहऱ्याचे प्रतिबिंब होण्यासारखे आहे. चेहरा त्या व्यक्तीपासून वेगळा होत नाही. आणि तो प्रत्यक्ष आरशास जाऊन चिकटत नाही. व्यक्तींचा चेहरा हा आरशामधील चेहऱ्याचे अस्तित्वाचे कारण आहे. त्याच्यामध्ये परावर्तनाची क्षमता – पात्रता आहे. तेथे एकीकडे विभक्तता नाही; तर दुसरीकडे बिलगणे नाही. अस्तित्व धारण करण्याचा रोख असलेल्या वस्तूंचे अस्तित्वाचे कारण म्हणजे परमेश्वराचा महान परोपकार हे होय.

**आत्मा काय आहे?**

हा एक असा प्रश्न आहे की ज्याचे उत्तर अयोग्य व्यक्तींसमोर उघड करून सांगण्याची मनाई परमेश्वराने प्रेषित मुहम्मद यांना केली होती. समजून घेण्याची पात्रता धारण करणाऱ्या बुद्धिमान लोकांकरिता मनाई नव्हती. ज्याप्रमाणे एखाद्या भांड्यामध्ये पाणी ओतले जाते, तद्वत आत्मा हा देहामध्ये ओतविले जाणारी एखादी वस्तू नव्हे. एखाद्या काळ्या वस्तूचे काळेपण किंवा ज्ञात्यामधील ज्ञान याप्रमाणे आत्मा हा माणसाचा मेंदू आणि मन

(चित्त) यामधील एखादा विस्तार नव्हे. या उलट तो स्वत:ची आणि (निर्माता) परमेश्वराची जाणीव असलेला एक सारतत्त्व किंवा स्वत्त्व आहे.

ज्ञान म्हणजे अनुभवाचे विस्तार. जर आत्मा हा विस्तार असेल तर विस्तारावर विस्ताराचे अस्तित्व शक्य होईल. हे मात्र तत्त्ववेत्त्यांच्या मतानुसार एक अशक्यता आहे. आणखी एक सिद्धी अशी आहे की, आत्मा हा एक सारतत्त्व किंवा सत्त्व आहे, एक विस्तार नव्हे. एखाद्या वस्तूची एक मिती असल्याकारणाने एक विस्तार हा एक गुणधारी असतो; परंतु आत्म्यास दोन परस्पर विरोधी गुण असतात. तो जसा स्वत:स ओळखतो तद्वत आपल्या निर्माणकर्त्यास पण ओळखतो. आत्मा हा एखादे देह वा शरीर नव्हे. देह हा विभाजनयोग्य असतो. जर आत्मा हा विभाजनयोग्य अथवा तुटणारा असता तर त्याच्या एका भागामध्ये ज्ञान असते, आणि दुसऱ्या भागामध्ये अज्ञान. अशाप्रकारे तो एकाच वेळेस त्याच वस्तूविषयी ज्ञानी आणि अज्ञानी झाला असता. एकाच वस्तूचे एकाच वेळेस ज्ञान आणि अज्ञान हे दोन्ही अशक्य असते.

अशा प्रकारे आत्मा हा एक असून तो अखंड आहे. त्याला अवयव वा विभाग नाहीत, आणि तो अशी एक वस्तू आहे की जी विभागली जाऊ शकत नाही. भाग किंवा अंश हा शब्द आत्म्यासाठी समर्पक नाही; कारण अंश हा एक अंशी दर्शवितो, आणि येथे अंशीचे अस्तित्व नाही. एक हा दहाचा जसा एक अंश असतो त्याप्रमाणे, त्या अर्थी तो अंश असेल. दहामध्ये विद्यमान असलेले सर्व अंश जेव्हा घेतले जातील तेव्हा एक हा अंशापैकी असेल. संपूर्ण विश्व-सृष्टी घ्या अथवा मानवाच्या अस्तित्वाचे घटक असलेले वस्तू (गोष्टी) घ्या, त्यांचा आत्मा हा त्यापैकी एक असेल.

**आत्मा कसा अस्तित्वात असतो**

आत्मा हा ना देहामध्ये असतो ना देह सोडून; तो ना त्याच्याशी वेगळा असतो ना त्याच्याशी संबंधित. हे सिद्ध करण्यात आले आहे की आत्मा हा ना आधिभौतिक (शारीरिक) आहे ना अवकाशीय. जेव्हा तो यापैकी काहीच नाही; तर मग त्याची अ-विभक्तता आणि विभक्ततेचा प्रश्न त्याच्याशी असंबधित ठरतो. हे जणु असे आहे की जसे एखाद्या खनिज पदार्थ वा धातूशी अज्ञान किंवा ज्ञानाचा प्रश्न उभे राहणे. एखाद्या धातूस ना ज्ञान असते ना अज्ञान; कारण ज्ञान आणि अज्ञानासाठी सजीव असणे ही एक अट असते; आणि खनिज पदार्थ वा धातू हा पूर्णपणे अ-जीव असल्यामुळे, सजीवावर जे काही अवलंबून असते, त्याचा पण निषेध (नकार) केला गेला पाहिजे.

**आत्म्याची दिशा**

देहाशी निगडित किंवा एखादी विशिष्ट दिशा निदर्शक अशा एखाद्या अवकाशामध्ये असलेल्या सर्व गुणांपासून आत्मा हा मुक्त असतो. हे एखाद्या देहाचे गुण किंवा आकार असतात; आणि जेव्हा हे सिद्ध झाले की आत्मा हा ना एखाद्या देहाचा विस्तार; तर मग तो त्या सर्व गुणांपासून मुक्त आहे.

**निषिद्ध विवेचन**

सर्वसामान्य लोकांना याचे आकलन होऊ शकत नाही. लोक दोन प्रकारचे असतात - (१) सर्वसामान्य आणि (२) निवडक (अभिजन) (बुद्धिमान). सर्वसामान्य लोकांना ईश्वराच्या गुणांचे आकलन होत नाही. अशा परिस्थितीत ते कसे बरे आत्म्याच्या गुणांना समजू शकतील? भौतिकवादाचा पगडा असल्यामुळे करामती

आणि हंबली संप्रदायाचे लोक आधिभौतिकवादी बनून गेलेले आहेत. त्यांनी ईश्वराच्या गुणांनाच नाकारले आहे. ईश्वर हा अशरीरी असू शकेल ही गोष्ट हे मुळीच समजू शकत नाहीत. एक टप्पा पुढे असलेल्या लोकांनी नि:संशय आधिभौतिकता नाकारली आहे. आधिभौतिकतेवर अवलंबून असलेल्या गुणांना मात्र ते नाकारू शकले नाहीत. त्यांनी आपली एक दिशा निश्चित केलेली आहे. सर्वात शेवटी येतात अशअरी आणि मुअतज़िला संप्रदायाचे लोक. हे अत्यंत पुढे गेलेले असे अग्रेसर लोक आहेत. त्यांची धारणा अशी आहे की परमेश्वर हा दिशा (दिक्) आणि परावलंबित्वापासून मुक्त असलेले अस्तित्व आहे.

**गुह्ये ही सर्वसाधारण लोकांसाठी का बरे नसतात.**

त्यांच्यामध्ये असा एक विचार-प्रवाह दृढमूल झालेला आहे की ईश्वराव्यतिरिक्त जे गुण आत्म्यास चिकटविलेले आहेत (आत्म्याशी निगडित मानण्यात आलेले आहेत) ते अशक्य आहे. जर कोणी हे गुण आत्म्याशी निगडित मानत असेल तर त्याच्यावर असनातनीचा शिक्का पडलाच म्हणून समजा. ते असे विचार करतील की ईश्वराचे विशिष्ट गुण हे केवळ आत्म्यामध्येच नसतात, तर ते व्यक्तीमध्ये वैयक्तिकरित्या पण आढळतात.

**गुण ईश्वरास समाईक आणि असमाईक कसे आहेत.**

त्यांचे असे मत आहे की अंतराळामध्ये दोन वस्तू एकाच ठिकाणी एकाच वेळेस राहू शकत नाहीत. त्याचप्रमाणे त्यांचे असे पण मत आहे की अंतराळविहीनामध्ये दोन वस्तू एकाच ठिकाणी, एकाच वेळेस राहणे अशक्य आहे. पहिल्या अवस्थेमध्ये (अंतराळामधील दोन वस्तूंचे), त्यांचा असा विचार आहे की, त्यांच्यामधील फरक नाहीसा होईल, आणि ते एकमेकांमध्ये मिसळून एक होतील. दुसऱ्या अवस्थेमध्ये, त्यांचा असा विचार आहे की अंतराळविरहित अवस्थेमध्ये जर दोन पैकी एका वस्तूस अवकाशाची गरज नसेल तर त्यांच्यामधील फरक नाहीसा होईल. दोन आयाम एकच अवकाश व्यापू शकत नाहीत. आक्षेप साधार वाटतो. ही एक उघड चूक ठरेल की अवकाशामुळे दोन वस्तूंमधील फरक माहीत होऊन जातो. या फरकाचे स्रोत तीन असतील : **अवकाशापासून** - दोन ठिकाणच्या दोन वस्तू फरक दर्शविणाऱ्या असतात, **काळपासून** - एका सत्त्वामधील दोन विस्तार दोन वेगवेगळ्या काळामध्ये फरक दर्शविणाऱ्या असतात, आणि तिसरा स्रोत आहे **व्याख्येचा**. केवळ वर्णन किंवा व्याख्येच्या आधारे एकाच काळामधील एकाच वस्तूमधील वेगळे विस्तार फरक दर्शविणारे असतात. जसे, उदाहरणार्थ, एका विशिष्ट वस्तूमधील खारटपणा आणि ओलावा (दमटपणा). दिक्काल एकच आहेत. परंतु केवळ वर्णनाच्या आधारे ते विभिन्न (फरक दर्शविणारे) वाटतात. केवळ वर्णन किंवा व्याख्येच्या आधारे ज्ञान आणि (दैवी) संकल्प यांच्यामध्ये फरक दृष्टीगोचर होतो, अन्यथा अंशी एकच असतो. जेव्हा वस्तूंच्या विस्ताराची कल्पना केली जाते आणि भेद दर्शविले जाते, वेगवेगळ्या वस्तू, जरी त्या आकाशामध्ये नसल्या, तरी त्यांची कल्पना केली जाऊ शकते, आणि त्यांच्यामधील फरक दाखविला जाऊ शकतो. असे वाटते की असे गुण आत्म्याशी निगडित करणे म्हणजे त्याच्यावर ईश्वराचे गुण बहाल करण्यासारखे आहे, आणि त्या दोघांना एक समान - एक सारखे बनविण्यासारखे आहे. हे तसे नव्हे; मानव आणि ईश्वरामध्ये साम्य प्रस्थापित केले जात नाही. जेव्हा आपण म्हणतो की मानव हा सजीव, जाणणारा, शक्तिशाली, ऐकणारा, बोलणारा प्राणी आहे; यद्यपी हे सर्व गुण ईश्वराचे पण आहेत; तेव्हा अवकाशविहीन

असणे हा काही ईश्वराचा एक विशिष्ट गुण नाही. कोणीच सहभागी होत नसणारा ईश्वराचा विशेष गुण म्हणजे त्याची चिरंतनता. तो आपल्या सत्त्वाने चिरंजीव आहे – आपल्या सत्त्वाने चिरस्थायी आहे आणि याप्रमाणे सर्व वस्तूंचे सत्त्व शून्यता हे आहे त्याचे अस्तित्व हे ईश्वराकडून उसने घेतलेले असते. ईश्वराचे अस्तित्व हे त्याचे सत्त्व आहे आणि ते उसने घेतलेले नाही; चिरंतनता हा ईश्वराचाच विशिष्ट गुण आहे.

**माझ्या आत्म्याची फुंकर मारली**

प्रश्न असा निर्माण होतो : ''माझ्या आत्म्याची का बरे? फुंकरचा विशेष उल्लेख कशासाठी?'' सर्वचजण ईश्वराच्या अस्तित्वाचे ऋणी आहेत; आत्म्याच्या संदर्भात हे वैशिष्ट्य कशासाठी?

पवित्र कुराणामध्ये ईश्वराने असे म्हटले आहे : ''आणि (ती वेळ आठवा) जेव्हा तुझ्या पालनकर्त्याने देवदूतांना म्हटले, 'मी सडलेल्या चिखलाच्या खणखणीत मातीपासून मानवाची निर्मिती करणार आहे.' तर जेव्हा मी त्याला पूर्णपणे बनवून चुकेन व त्यात आपला (स्वनिर्मित) आत्मा फुंकेन, तेव्हा तुम्ही त्याच्यापुढे साष्टांग नमस्कार घालीत (भराभर पालथे) पडा.'' – १५:२८०२९. या 'फुंकरा'चा काय बरे अर्थ आहे? जर याचा अर्थ असा असेल की, ईश्वराने (प्रत्यक्ष) फुंकर मारली आणि ती मानवा (च्या शरीरा)मध्ये प्रविष्ट झाली, तर मग ईश्वराच्या स्वभावामध्ये विभाजन शक्य आहे; परंतु हे होऊ शकत नाही. या प्रश्नाचे उत्तर सूर्याच्या दृष्टांताने देता येईल. जर सूर्य म्हणत असेल की, ''मी पृथ्वीस प्रकाश दिला आहे,'' तर हे बरोबर होईल. जरी पृथ्वीवर अल्प प्रमाणात प्रकाश का असेना, परंतु ते वातावरणासारखे नसेल. अशा प्रकारे आत्मा हा अवकाश आणि मितीपासून मुक्त होता; प्रत्येकाची जाणीव असण्याची शक्यता त्याच्यामध्ये अव्यक्त होती, जरी त्याची तुलना ईश्वराशी होत नाही; तरी पण अन्य वस्तूंमध्ये अशा प्रकारची संभावना मुळीच नव्हती, आणि म्हणून ही विशिष्टता.

**आत्मा ईश्वराची आज्ञा**

'आज्ञाचे जग' हे फक्त असे जग आहे की ज्यामध्ये माप नाही, अंदाज नाही अथवा आलेखन नाही; आणि निर्मितीचे जग हे असे जग असते की ज्यामध्ये हे गुण विद्यमान असतात. याचा अगत्य अर्थ नवीन शोध नव्हे. म्हणून 'आज्ञाचे जग' हे असे जग आहे की ते संवेदना, विचार, दिशा (दिक्) आणि अवकाश या पलीकडील आहे. त्याच्यामध्ये परिमाण नाही. ते मापाचा विषय होऊ शकत नाही. ते मापाच्या टप्प्याबाहेर आहे; परंतु निर्मितीचे जग हे या उलट आहे. मानव आणि देवदूतांचे आत्मे हे आज्ञेच्या जगाशी संबंधित आहेत.

**काय आत्मा निर्मित आहे.**

आत्मा हा अनिर्मित आहे, असे जरी लोकांचा एक गट मानत असला तरी माझा त्यावर विश्वास नाही. आम्ही 'आत्मा हा निर्मित नाही' या अर्थी मानतो की त्याचे मोजमाप घेऊ शकले जात नाही किंवा त्याचे विभाजन होऊ शकत नाही. परंतु तो निर्मित या अर्थी आहे की तो मौलिक नव्हे आणि चिरकाल टिकणारा नाही. जेव्हा भ्रूण हा पूर्णपणे योग्य व अनुरूप बनतो, तेव्हा आत्मा हा स्वत: त्यामध्ये व्यक्त होतो. ज्याप्रमाणे एखाद्या आरशाची चमक भरपूर प्रमाणात असते. तेव्हा त्यामध्ये तत्काळ चेहरा दिसू लागतो. तशाच प्रकारची गोष्ट आत्म्याच्या बाबतीत आहे.

अगोदर एखाद्या चेहऱ्याचे अस्तित्व असेल, परंतु त्याचे प्रतिबिंब आरशात तोपर्यंत पडत नाही जोपर्यंत त्यास योग्य नसतो. जेव्हा लवकरच आरसा उजळून जातो, तो चकचकीत होतो तेव्हाच चेहरा त्यामध्ये प्रतिबिंबित होतो.

**विभक्तपणानंतर**

देहाशी संयोगाच्या कारणाने, ज्ञान, अज्ञान, विशुद्धता, अशुद्धता (मलिनता), चांगली नितिमत्ता आणि या उलटचे सर्व गुण आत्मा आत्मसात करतो. यांचे आत्मसात करण्यामुळे त्यांचा विभक्तपणा कायम राहील. संयोगापूर्वी अशी अवस्था नव्हती.

**ईश्वराची प्रतिमा**

'सूरत' (प्रतिमा किंवा चेहरा) या अरबी शब्दाचे अरबीमध्ये विभिन्न अर्थ आहेत. शरीराचे जसे आपण आकार पाहतो, तद्वत या शब्दाचा अर्थ होतो. आकार किंवा आकाराचे एकीकरण. काही वेळेस याचा अर्थ प्रमेय वा विधान असा होतो. कोणी युक्लिडच्या एखाद्या वादग्रस्त गूढ मुद्द्याचे स्वरूप वा 'सूरत' असेही पण म्हणेल. परिस्थितींच्या एखाद्या एकत्रीकरणाची प्रतिमा किंवा स्वरूप असेही कोणी एखादा म्हणेल. येथे आकार किंवा प्रतिमा ('सूरत') म्हणजे वस्तूचे लाक्षणिक स्वरूप होय. म्हणजेच सत्त्व आणि गुण व कृती (नाम-रूप-क्रिया) यामधील संबंध होय. आम्ही विवेचन केलेलेच आहे की आत्मा हा एक सत्त्व असतो. तो ना एखादे शरीर असतो ना एखादा विस्तार. दिक्‌कालात सामावलेले असे ते एक सत्त्व नसते. त्याचा ना शरीराशी संबंध असतो ना तो शरीर सोडून असतो. तो ना शरीरात असतो ना शरीर विरहित असतो. या गोष्टी ईश्वरामध्येपण आढळतात. दैवी सप्तगुणांविषयी विचार करा. ईश्वराचे जे सप्त गुण आहेत तेच आत्म्यामध्ये पण अढळ असतात. जसे आत्मा हा सजीव (सप्राण), ज्ञाता, शक्तिशाली, संकल्पक, ऐकणारा, पाहणारा आणि बोलणारा आहे. हे सप्तगुण ईश्वराचे पण आहेत.

**माणसाच्या कर्मांचे स्रोत (उगम)**

संकल्प किंवा हेतू माणसांच्या कर्माचा स्रोत असतो. तो स्वत: मनामध्ये उदय पावतो, व्यक्त होतो; आणि पाशविक आत्म्याच्या (हलके आकाशीय बाष्पासाठी हा एक शब्द आहे) साहाय्याने शरीर-प्रणालीमध्ये त्याचे वहन होते, आणि मेंदूपर्यंत जाऊन पोहोचतो. तेथून तो मज्जातंतूच्या शिरावर कार्यप्रवृत्त होतो. तो मज्जातंतूपासून निघून धमनी (नाड्या), रक्तवाहिन्या (नसा) आणि स्नायूंमध्ये पोहोचतो. जेव्हा मज्जातंतूची शीर त्याला शोषून घेते - अंतर्लीन करते तेव्हा बोट हालचाल करू लागते आणि बोटाच्या माध्यमाने लेखणी लिखाणास प्रवृत्त होते; मग शाईमध्ये गती (हालचाल) निर्माण होते आणि शेवटी लिखाणाचे एक स्वरूप दृष्टीगोचर होते. मुळात हेच संकल्प, निश्चय किंवा हेतूमध्ये दडलेले होते. हे स्वरूप आपल्या विचार-कोषागारामध्ये असलेल्या स्वरूपाबर हुकूम असते. जो कोणी ईश्वरी लीलांमध्ये प्रविष्ट होऊन त्यांविषयी चिंतन करतो आणि आकाशे, ग्रह आणि त्यांच्या प्रभावाविषयी चिंतन करू लागतो, तेव्हा तो आश्चर्यचकीत झाल्याशिवाय राहात नाही. त्याला हा विचार उमगतो की ब्रह्मांडामध्ये देवदूत तीच भूमिका वठवितात, जी पिंडाडामध्ये म्हणजेच मानवी शरीरामध्ये मनाच्या शक्ती वठवतात. मानवाचे आपल्या शरीरावरील नियंत्रण हे ईश्वराच्या ब्रह्मांडावर असलेल्या नियंत्रणासारखे असते.

तशाच प्रकारचे नियंत्रण माणसाचे आपल्या मना ('कल्ब') वर असते. मेंदूस समानांतर (समांतर) असलेले पादपीठ ('कुर्सी') आणि इंद्रियांना समानांतर असलेले देवदूत, हे स्वभावत: आपला स्वामी-धनी परमेश्वराचे आज्ञाधारक असतात व ते त्याची अवज्ञा करीत नाहीत, जसे आमची इंद्रिये आमची अवज्ञा करीत नाहीत. (मानवी) शरीराचे अवयव आणि स्नायू हे आकाशांशी समानांतर (समांतर) असतात. हाताच्या बोटांमधील शक्ती ही प्रत्येक सजीवास ईश्वराने प्रदान केलेल्या स्वभावासारखी असते. कागद, लेखणी आणि शाई (आमच्या उपमेमधील) हे स्वत: एकीकरण (संगठन) आणि विक्षेपण (वाताहात) अभिव्यक्त करणारे तत्त्व आहे. आपल्या विचाराचा आरसा हा सुरक्षित पट्टिका किंवा सुस्पष्ट ग्रंथ म्हणजेच 'लौह-ए-महफ़ूज़'च्या समांतराचे निदर्शक आहे. सदरहू समस्त विवेचन हे पुढीलप्रमाणे कोष्टक स्वरूपात मांडता येईल –

**कोष्टक**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १)परमात्मा | अर्श (सिंहासन) | कुर्सी (पादपीठ) | देवदूत | आकाश | स्वभाव | लौह-ए-महफ़ूज़ (सुस्पष्ट ग्रंथ)(सुरक्षित पट्टिका) |
| २)जीवात्मा | मन | मेंदू | ज्ञानेंद्रिये | स्नायू / अवयव | हस्तांगुली शक्ती | विचार दर्पण |

ज्या कुणास वरील बाब समजली असेल त्याला पुढील प्रेषित वचनांचा मथितार्थ चांगल्या प्रकारे कळून येईल : ''परमेश्वराने मानवास आपल्या प्रतिमा स्वरूपात निर्माण केले.'' ''जो कोणी आपल्या वासने (आत्म्या)स ओळखतो तो आपल्या परमेश्वरास ओळखतो.'' जर उपरोक्त संबंध आणि समानतेना जाणले गेले नसेल तर, केवळ आपल्या वासनेच्या – आत्म्याच्या ज्ञानाच्या आधारे आपल्या ईश्वरास मानव समजू शकत नाही. जर ईश्वराने आपले लक्ष मानव आणि विश्वामधील सर्व वस्तूंवर एकवटले नसते, आणि त्याला एक सूक्ष्म नमुना बनविले नसते आणि त्याला या सूक्ष्म जगाचा धनी, शासक ('रब्ब') बनविले नसते तर तो या बृहत्तर जग आणि त्याचा प्रभू ('रब्ब') यास ओळखले नसते. असा प्रभू की जो आपले ज्ञान, आपली शक्ती आणि आपले चातुर्य यांच्या बळावर समस्त ब्रह्मांडावर नियंत्रण ठेवून आहे. त्याला ईश्वराच्या अनंत गुणांपैकी कोणत्याही गुणाची जाणीव झाली नव्हती. अशा एका संबंधाच्या आधारे, आत्मा ('नफ़्स') हा त्याच्या निर्मात्याच्या ज्ञानाच्या शिडीची एक पायरी बनून जातो.

**प्रेषित मुहम्मद यांची प्रतिक्रिया**

प्रेषित मुहम्मद स. म्हणाले आहेत : ''शरीरे निर्माण होण्याच्या दोन हजार वर्षे अगोदर ईश्वराने आत्मे निर्माण केले.'' ''मी सर्व प्रेषितांच्या अगोदर (विद्यमान) होतो, परंतु ईश्वरी अभियानामध्ये मी सर्वात शेवटी होतो.'' ''जेव्हा आदम हे अद्यापि ओली माती स्वरूपात होते, तेव्हा मी एक प्रेषित होतो.'' पहिले प्रेषित वचन हे स्पष्टपणे दाखवून देते की आत्मा हा अचिर आहे आणि तो एक निर्मित वस्तू आहे. सकृद्दर्शनी असे वाटते की, जणू शरीरांअगोदर आत्मे निर्माण करण्यात आले, आणि ते त्यांच्या अगोदर अस्तित्वात होते. तथापि, हे शक्य आहे की, आत्मे म्हणजे देवदूतांचे आत्मे होत, आणि शरीरे म्हणून ज्यांचा उल्लेख करण्यात आला आहे

ते 'अर्श' म्हणजेच ईश्वरी राजसिंहासन, 'कुर्सी' अर्थात पादपीठ, आकाशे, ग्रह (तारे), चिखल आणि जल (पाणी) हे सर्व होत. लक्षात ठेवा की सूर्याच्या देहाच्या मानाने सर्व मिळून मानवी शरीरे ही तुलनात्मकदृष्ट्या अति क्षुल्लक लहान आहेत. पृथ्वीवरील आकाश आणि त्यावरील आकाशे यांच्या तुलनेत सूर्याचा देह हा कल्पनातीत लहान आहे; आणि अशाच प्रकारे शेवटी जेव्हा सर्व काही सामावून घेतलेल्या 'कुर्सी' म्हणजेच पादपीठाजवळ जाऊन पोहोचतो, तेव्हा तर सूर्याच्या लहानपणाची-लघुतेची कल्पनाच करवत नाही. 'कुर्सी' अर्थात पादपीठ हे 'अर्श' म्हणजेच ईश्वराचे सिंहासनाच्या तुलनेमध्ये इतके लहान आहे की या दोघांमध्ये तुलनाच होऊ शकत नाही. जेव्हा या सर्वांचा विचार करण्यात येतो तेव्हा सर्व मिळून मानवांची शरीरे इतकी क्षुल्लकपणे लहान वाटतात की त्यांचा विचारपण करवत नाही. हे पण लक्षात ठेवा की सर्व मिळून मानवांचे आत्मे हे पण विश्व-शरीरा (मानवापासून 'अर्श'पर्यंत - 'फर्श'पासून 'अर्श'पर्यंत)च्या तुलनेत अति लहान, अति सूक्ष्म आहेत. समस्त विश्वास (ब्रह्मांडास) संपूर्णपणे व्यापलेल्या अग्नीच्या तुलनेत जसे एखाद्या वाताची लहान ज्वाला वाटावी, तसेच रोशनाईचा प्रकाश प्राप्त झालेल्या(व्यक्ती)स त्यांचे स्वरूप भासते. तो अग्नी म्हणजे देवदूतांचा आत्मा होय. देवदूतांमध्ये एका प्रकारचे श्रेणीकरण आहे - उतरंड आहे. ते वेगवेगळे आहेत, आणि त्यांपैकी कोणतेच दोन देवदूत एकाच श्रेणीमध्ये नसतात. या उलट मानवी आत्म्यांची स्थिती असते. बहुविविधता असूनही पण मानवी आत्मे हे एकाच प्रकारचे व एकाच श्रेणीचे असतात. परमेश्वराने देवदूतांना (पवित्र कुराणांध्ये) असे वदविले : ''आमच्यापैकी प्रत्येकाचे निश्चित असे स्थान आहे.'' ''आम्ही पवित्र असलेल्यांपैकी आहोत.''

प्रेषित म्हणतात की 'नमना' (साधनांगविक्षेपा)मध्ये 'रुकू'मध्ये असलेले देवदूत 'प्रणिपात' अर्थात 'सज्दा' करीत नाहीत; आणि जे स्थितप्रज्ञ अवस्थेमध्ये म्हणजेच 'क़ियाम'मध्ये आहेत, असले देवदूत 'नमन' अर्थात 'रुकू' करीत नाहीत. निःसंशय प्रत्येका (देवदूता)चे आपापले निर्धारित स्थान (स्थळ) आहे. अशा प्रकारे प्रेषित वचनामध्ये निर्दिष्ट आत्मे आणि शरीरे हे देवदूत आणि ब्रह्मांडामधील इतर मंडळी (वस्तू) आहेत. दुसऱ्या हदीसाप्रमाणे, ''प्रेषितांच्या निर्मितीमध्ये मी सर्वप्रथम आहे; परंतु (ईश्वरी अभियानामध्ये) त्या सर्वांच्या शेवटी आहे.'' येथे निर्मितीचा अर्थ आहे (या अगोदर) वर सांगितल्याप्रमाणे तोच अंदाज, तीच योजना (प्रारूप) किंवा तेच भाकित आहे. 'अस्तित्वामध्ये आणणे' असा त्याचा अर्थ नव्हे; कारण प्रेषित (मुहम्मद) हे जन्मण्याअगोदर विद्यमान नव्हते. त्यांच्यामध्ये दिसून आलेल्या सर्वोत्कृष्टता आणि परिपूर्णता या ईश्वरी योजनेमध्ये सर्वप्रथम होत्या; परंतु प्रेषितांमध्ये अभिव्यक्तीच्या दृष्टीने सर्वात शेवटी होत्या. हे 'प्रथम विचार, मग कृती' या अरबी म्हणीसारखे आहे. एक अभियंता एक इमारत बांधण्याचा विचार करतो. त्याच्या मनांतर्गत योजनेमध्ये ती संपूर्णपणे बांधलेली इमारत अस्तित्वात असते, परंतु तिचे दृश्य स्वरूप प्रत्यक्ष इमारत उभी राहिल्यानंतर आपणास दिसते. दृश्य इमारत हे त्याचे शेवटचे कार्य असते. मात्र इमारतीच्या बांधकामाच्या सुरुवातीपासून ते इमारत बांधून पूर्ण झाल्यापर्यंत अनेक टप्पे असतात. जसे, पायाचे खोदकाम, सामानांची जुळवा जुळव, भिंती उभ्या करणे, छत टाकणे इत्यादी. आपले विचार-प्रारूपास अंतिम दृश्य स्वरूपात पोहोचविण्यासाठी हे केवळ मधले - दरम्यानचे टप्पे आहेत.

**मानवी अस्तित्वाचे काय प्रयोजन (हेतू) आहे?**

ईश्वरी सान्निध्य लाभ, सामिप्य सहवासाची सर्वोत्तमता जाणून घेणे हा मानवी अस्तित्वाचा मुख्य हेतू आहे, त्याचे प्रमुख प्रयोजन आहे. प्रेषित मुहम्मद यांच्या शिकवणुकीपासून आपणास हे समजून येते. सर्वप्रथम पायाभरणी (शिलान्यास) करावी लागते. हे संपन्न झाल्यावर टप्प्याटप्प्याने बांधकाम प्रगतीपथावर येऊन शेवटी इमारत पूर्ण होते. प्रेषित आदमच्या स्वरूपात पायाभरणी झाली आणि प्रेषित मुहम्मद यांच्या रूपाने शेवटचा हात फिरवला गेला. ते (मुहम्मद) अल्लाहचे प्रेषित आणि अंतिम प्रेषित आहेत. – ३३:४०. या उक्तीचा हा अर्थ आहे; कारण परिपूर्णतेमध्ये आणखी वाढ म्हणजे एक दोषच. आपल्या हाताची परिपूर्णता ही आपल्या एका हाताच्या तळव्यास पाच बोटे असण्यामध्ये आहे. ज्याप्रमाणे चार बोटेवाला माणूस हा दोषपूर्ण गणला जातो, तद्वत सहा बोटे असणारा एखादा माणूसपण सदोषच गणला जातो. परिपूर्णता ही पाच बोटांमध्ये आणि फक्त पाचच (बोटांमध्ये) निहित आहे; सहावे बोट हे एक उपांग किंवा जोड असून ते एक दोष आहे. प्रेषित मुहम्मद यांनी प्रेषितत्त्वाची तुलना एका इमारतीशी केली आहे; अशी इमारत की ती पूर्ण बांधून झालेली आहे; मात्र एकच विटेची कमतरता आहे. त्या अपूर्ण इमारतीस परिपूर्णता प्रदान करणारी शेवटची वीट म्हणजे त्यांचे स्वत:चे (शेवटचे) प्रेषितत्त्व होय. अशा प्रकारे आपण पाहतो की, एका पूर्ण इमारतीस जादाची गरज नसते; आणि जर (त्यामध्ये जादाची) वाढ असेल ती वाढ एक प्रकारचे दोष ठरेल. या सर्व बाबी सर्व प्रथम ईश्वराच्या अंदाजामध्ये विद्यमान होत्या. जरी त्या अस्तित्वामध्ये सर्वात शेवटी आल्या. तिसऱ्या हदीसाच्या बाबतीत : ''जेव्हा आदम हे अद्यापि ओली चिकण माती स्वरूपात होते तेव्हा मी एक प्रेषित होतो.'' याचे स्पष्टीकरण त्याच अनुषंगाने आहे.

जोपर्यंत आदमच्या संततीमध्ये, सृष्टी-निर्मितीच्या हेतूस परिपूर्णतेमध्ये पोहोचविणारा एखादा पुरुषोत्तम (नरोत्तम) निर्माण होत नाही, तोपर्यंत आदमच्या संततीची निर्मिती पूर्ण होऊ शकणार नाही. आमचा असा विश्वास आहे की मुहम्मद यांच्यामध्ये जेव्हा प्रेषिताचा पवित्र आत्मा प्रवेश करता झाला तेव्हा ब्रह्मांड परिपूर्ण अवस्थेस पोहोचले. ज्याप्रमाणे एखादा वास्तुशिल्प अभियंता हा एका कागदावर सर्वप्रथम इमारतीच्या प्रारूपाचे आरेखन करतो, त्याचप्रमाणे परमेश्वर सर्वप्रथम एक पूर्वानुमान करतो आणि मग ते वास्तवात उतरवतो. वास्तुशिल्प अभियंता हा आपल्या लेखणीने प्रारूप तयार करतो; परंतु त्या अभियंत्याचे (इमारतीचे) ज्ञान त्याच्या लेखणीने आपल्या ज्ञानाच्या पाटीवर (कागदावर) आरेखित करतो. लक्षात असू द्या, की पाटी (किंवा कागद) हे फक्त एक साधन असते. तिच्यामध्ये कोरून घेण्याची क्षमता (किंवा स्वाभाविक कल) असते, आणि या पाटीवर आकृती काढण्याचे साधन एक लेखणी असते. ही लेखणी आणि पाटी (कागद) म्हणजे एक बोरू आणि एक आयताकार फळा नव्हे. भौतिकता ही त्यांच्या अस्तित्वाची एक अट नव्हे. ईश्वराची लेखणी आणि पाटी त्याच्या हातास साजेशी अशा असाव्यात. त्या भौतिक अस्तित्वापासून मुक्त आहेत. ती आध्यात्मिक सत्त्वे आहेत, एवढे मात्र सत्य होय.

**४) शेख़ अबुल हसन नूरी : 'रिसाला मक़ामातल कुलूब' या ग्रंथाच्या आधारे[७०]**

शेख़ अबुल हसन नूरी यांनी आपले अरबी ग्रंथ 'रिसाला मक़ामातल कुलूब'मध्ये आत्म्याच्या भेदोपभेदांविषयी सांगोपांग, सखोल व सविस्तर विवेचन केले आहे. सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रामध्ये

आत्म्याविषयी इतके सखोल चिंतन करणारे कदाचित हे सर्वप्रथम सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य असावेत. त्या विस्तारामध्ये न शिरता येथे आम्ही फक्त त्याची रूपरेषा प्रस्तुत करीत आहोत –

**१) प्रस्तावना**

प्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य शेख़ अबुल हसन नूरी यांचे असे मत आहे की मनांचे चार पडाव किंवा स्थळे आहेत. त्या अनुषंगाने परमेश्वराने मनास चार नावाने नामित (नामाभिधान) केले आहे – (१) 'सदर', (२) 'कल्ब', (३) 'फ़वाद' (४) 'लुब्ब'. यांपैकी 'सदर' हे 'इस्लाम'चे म्हणजेच संपूर्ण शरणागती वा परिपूर्ण आत्मसमर्पणाचे – नाव आहे. म्हणून 'सदर' हे 'इस्लाम'चे मूळ स्रोत आहे. पवित्र कुराणमध्ये याचा निर्देश असा आहे – ''तर मग ज्या माणसाचे अंत:करण **('सदर')** इस्लामच्या स्वीकृतीसाठी अल्लाहने खुले केलेले आहे.'' – ३९:२२. 'क़ल्ब' हे 'ईमान' अर्थात श्रद्धेचे उगम स्थळ आहे. याविषयी परमेश्वराचे विधान असे आहे – ''परंतु अल्लाहने तुमच्या मनात **('क़ल्ब')** श्रद्धेविषयी प्रेम निर्माण केले आहे आणि तुमच्या मनामध्ये तिला सुंदर स्वरूपात (दर्शविले) आहे.'' – ४९:७. 'फ़वाद' हे 'मारिफ़त' अर्थात ब्रह्मज्ञानाचे स्रोत–स्थळ आहे. याविषयी पुढील कौराणिक श्लोकामध्ये असे नमूद आहे – ''पैगंबराच्या मनाने **('फ़वाद')** जे पाहिले त्याबद्दल काहीही खोटे सांगितले नाही.'' – ५३:११. 'लुब्ब' ही एकेश्वरवादाची ('तौहीद') खाण आहे. पवित्र कुराणामध्ये याचा निर्देश असा आहे – ''बुद्धिमानां **('लुब्ब')** (च्या समजण्या) करिता (ईश्वर सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (संकेत, खुणा) होत.'' – ३:१९०. अशा प्रकारे 'लुब्ब' हे एकेश्वरवादाचे साधन असून 'फ़वाद' हे ब्रह्मज्ञानाचे साधन आहे. त्याचप्रमाणे 'क़ल्ब' हे श्रद्धेचे, तर 'सदर' हे 'इस्लाम'चे म्हणजेच संपूर्ण शरणागतीचे साधन आहे. एकेश्वरवाद परमेश्वरास निखालस व सहभागीविहीन मानतो आणि ब्रह्मज्ञान सर्व दिव्य गुण आणि सुंदर अशी शुभनामे ही परमेश्वरासच योग्य व उचित असल्याचे ठामपणे समजते, तसेच श्रद्धा ही कुठल्याच प्रकारच्या हानि–लाभाचा विचार न करणारी ईश्वराप्रती मनाची ओढ आणि त्याच्याविषयी प्रेम असते. ती ईश्वरावर मुग्ध असते.

'इस्लाम' म्हणजे प्रपत्ति अर्थात ईश्वरास संपूर्णपणे शरण जाऊन त्याच्या आज्ञापालनामध्ये समर्पित होऊन त्याचे स्वाधीन होण्याचे नाव आहे. ईश्वरी प्रसाद प्राप्त करणे हे उद्दिष्ट असते. प्रेषित मुहम्मद यांनी 'इस्लाम'ची एक सुटसुटीत आणि समावेशक अशी व्याख्या सांगितली आहे : ईश्वरनिष्ठ असणे आणि त्या निष्ठेवर निश्चळ राहणे. व्यक्त आणि अव्यक्त अशी सर्व कार्ये ईश्वरावर सोपवून त्याचा स्वीकार करण्याचे नाव 'इस्लाम' आहे, आणि हा प्रकाश एकनिष्ठ एकेश्वरवाद्यांच्या मनामध्ये विद्यमान असतो. ब्रह्मज्ञान हे एकेश्वरवादाशिवाय नसते व श्रद्धा ही ब्रह्मज्ञानाशिवाय नसते. आणि प्रपत्ति अर्थात 'इस्लाम' श्रद्धेशिवाय योग्य ठरत नसते आणि ज्याच्यामध्ये श्रद्धा नसते, त्याच्यामध्ये 'इस्लाम'चा पत्ता नसतो. आणि जी व्यक्ती 'इस्लाम' धारण करीत नाही तिची कर्मे आणि आचरण निरुपयोगी सिद्ध होतात. अतएव परलोकाच्या आठवणीशी इस्लामचा प्रकाश निगडित असतो आणि वासनेच्या किल्मिषांपासून सजग (जागरूक) असण्याचे नाव आहे श्रद्धेचा प्रकाश. भूतकाळातील प्रमादांची आठवण ठेवण्याचे नाव आहे ब्रह्मज्ञानाच्या प्रकाश. पडद्यामागील (म्हणजेच अव्यक्त) वास्तवे उघडून दाखविण्याचे नाव आहे एकेश्वरवादाचा प्रखर प्रकाश. अशा प्रकारे परलोकाची आठवण ठेवणे हे चित्त परिष्कारासाठी यथायोग्य असते. अंधकारमय वासनेमधील जागृती म्हणजे इंद्रिय–निग्रह होय. वासनेच्या

नियंत्रणासाठी पूर्वी घडलेल्या प्रमादांची आठवण ठेवणे आवश्यक ठरते. वास्तव पाहण्याचे मूळ, हक्कांच्या विचारामध्ये असते, आणि सेवक अर्थात भक्त त्या चित्त परिष्कराच्या बळावर ईश्वरी कृपा प्राप्त करून घेतो. त्यास समाधान आणि सन्मान दोन्ही प्राप्त होतात. परंतु वासना परिष्कार म्हणजेच त्याची ओळख व संरक्षण; व इंद्रिय–निग्रह अर्थात वासनेमध्ये सुधारणा व तिच्यावर प्रभुत्व आणि मनाचे निरीक्षण म्हणजेच परमेश्वराच्या अप्रकट उपकारांची समीक्षा व हक्कांचा व्यवहार अर्थात अंतर्यामी परमेश्वराच्या देणगीचे पर्यवेक्षण – हा व्यवहार (हे आचरण) वचनपूर्तीचे ठरेल. आणि मनाचे निरीक्षण संरक्षणाच्या सीमेपर्यंत जाऊन भिडते; व संयम, जी काही मर्जी असेल आणि चित्त परिष्कार जो काही त्याबाबतीत संयम नसेल याची फलनिष्पत्ती होते.

**२) श्रद्धावंताच्या मन–मंदिराची गुण–वैशिष्ट्ये**

हे जाणून घ्या की परमेश्वराने श्रद्धावंतांच्या अंतर्मनास 'क़ल्ब' अर्थात चित्त म्हणून संबोधले आहे आणि आपल्या कृपेच्या शीतलतेच्या मदतीने त्याने सहभागित्व, शंका, वैर आणि फूट यापासून त्यास शुद्ध ठेवले आहे, तो आपल्या कृपेने कृतज्ञतेचे मेघ पाठवून देतो की जेणे करून आत्मविश्वास, विश्रंभ आणि निष्कपट प्रेमाचा वर्षाव व्हावे आणि भय, आशा व प्रेम त्यामध्ये उत्पन्न व्हावे. एकेश्वरवादापासून हे गुणगान घेऊन त्या मनाच्या वरच्या बाजूस एका पाटीवर लिहून ठवलेले आहे आणि पृथ्वीतळावरील त्या पाटीवर त्याची मर्जी फैलावलेली आहे. त्या प्रफुल्ल मनासमोर ब्रह्मज्ञानाचे चिन्ह दिसून येते. त्याचे तंतू श्रद्धावंतांच्या मना (चित्ता)मध्ये, त्याच्या शाखा आकाशामध्ये व ईश्वरी सिंहासनाच्याखाली असतात. याविषयी कुराणोक्त प्रमाण आहे – ''त्याच्या फांद्या आकाशाला भिडलेल्या आहेत.'' – १४:२४. त्या दिव्य आसनाच्या पाठीमागे उजवीकडे व डावीकडे शरीअत म्हणजेच कर्मकांड ठेवलेले आहे, आणि त्याच्या कृपेच्या उद्यानास एक उघडे दार आहे आणि त्यामध्ये ईशस्तवन आणि ईशपावित्र्याच्या अनेक प्रकारची हवा खाली वहात असते आणि प्रभूनामस्मरणाची पेरणी केली जाते आणि मार्गदर्शनाच्या नदी (जलप्रवाहा)पासून फलनिष्पत्तीसाठी सिंचनाकरिता पाण्याचे पाट वहात असतात आणि मनाच्या मंदिरावर उंचीवर कृपेची कंदीले लटकविलेली असतात आणि त्यामध्ये परिमार्जनासाठी तेल भरलेले असते आणि त्याचा दिवा धर्मपरायणतेच्या प्रकाशाने उजळलेला असतो. कृतज्ञता त्याला उच्चस्थानावर पोहोचवून विनाश व विनाशकापासून वाचवते आणि त्याच्या संरक्षणासाठी टाळे लावलेले असून त्यास व्यर्थ उत्पन्न केलेले नाही – ना प्रमुख देवदूत जिब्रईल, ना मीकाईल, ना इस्राफ़ील – हे निषिद्ध नव्हेत आणि असे म्हटले गेले आहे की, हा जमिनीमधील माझा खजिना आहे व माझे दृष्टी–स्थळ (डोळा) आहे आणि माझ्या एकेश्वरवादाचे स्थळ आहे आणि मी त्याचा रहिवाशी आहे. याचा रहिवाशी किती तरी उत्तम आहे व हे निवासस्थान पण किती तरी उत्तम आहे!

**३) नामस्मरणामध्ये श्रद्धावंतांच्या मनाशी ईश्वराविषयी प्रितीची ओळख**

लक्षात असू द्या की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने श्रद्धावंतांच्या मनाशी पुढील गोष्टी निगडित करून ठेवल्या आहेत. याचे प्रत्यंतर पवित्र कुराणामधील पुढील श्लोकांवरून येईल – ''जे आपल्या विधात्याचे भय बाळगतात त्यांच्या त्वचेवर रोमांच उभे राहतात, त्यांची गात्रे (तन) आणि अंत:करणे (मन) मृदू होऊन, अल्लाहच्या स्मरणासाठी प्रवृत्त होतात.'' – ३९:२२. ''आम्ही विचार व आचार स्वातंत्र्याचा) हा ठेवा आकाश, धरती आणि पर्वत यांना देऊ केला, पण त्यांनी ती जबाबदारी उचलण्यास नकार दिला, कारण ते त्या जबाबदारीचे भार

उचलण्यास घाबरले. पण माणसाने (मुद्दाम व अविचारीपणे) ती (जबाबदारी) उचलली. खरोखर त्याने स्वत:ला सर्वात मूर्ख व सर्वात दुष्ट सिद्ध केले.'' – ३३:७२. ''(अल्लाह श्रद्धावंतांचे काळीज थंड करील,'' किंवा ''(अल्लाह) श्रद्धावंत लोकांची मने (भयापासून) मुक्त करील.'' – ९:१४. ''पण अल्लाहने तुमच्या मनात श्रद्धेबद्दल प्रेम निर्माण केले आणि तिला तुमच्या मनांत प्रिय वाटेल असे दर्शविले.'' – ४९.७. ''तोच होय ज्याने श्रद्धावंतांच्या ह्रदयामध्ये मन:शांती (यासाठी) अवतीर्ण केली की आधीच असलेल्या त्यांच्या श्रद्धेमध्ये आणखी श्रद्धेची भर पडावी.'' – ४८:४. ''अल्लाह इच्छितो त्यांस आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवितो.'' – २४:३५

**४) ईश्वरास नाकारणाऱ्या श्रद्धाहीन मनाची स्थिती**

श्रद्धाहीन मनाच्या स्थितीचे चित्र पवित्र कुराणामध्ये असे रेखाटले गेले आहे – ''आणि अल्लाह ज्यास पथभ्रष्ट होऊ देऊ इच्छितो त्याच्या मनाची (कवाडे) तो संकुचित करतो.'' – ६:१२५. ''त्यानंतर तुमची मने कठोर झाली, दगडासारखी कठोर, किंवा त्यापेक्षाही अधिक कठोर'' – २:७४. ''नव्हे! वस्तुस्थिती ही आहे की, त्यांच्या दुष्कृत्यांचा, त्यांच्या ह्रदयावर गंज चढलेला आहे.'' – ८३:१४. ''त्यांनी म्हटले, आमच्या मनाची कवाडे (तुमचे म्हणणे ऐकण्यासाठी) आवरणामध्ये (बंद) आहेत.'' –२:८८. ''अल्लाने त्यांची मने आणि कान मोहर लावून (बंद) केले आहे.'' – ४७:२४. ''पण जे लोक पारलौकिक (शाश्वत) जीवनावर विश्वास ठेवत नाहीत, त्यांची मने सत्याविषयी तिटकाऱ्याने भरलेली आहेत.'' – १६:२२.

**५) मनाच्या तीन श्रेणी**

मनाची प्रथम श्रेणी ही पापी – पातकी लोकांची आहे. त्यांचे मन भग्न असते. ते कलुषित असते. त्यामध्ये शैतान वसती करून राहतात. दुसऱ्या श्रेणीचे मन हे आज्ञाकारी लोकांचे असते. ते ज्ञानी, सत्कर्मे करणारे निष्कपट लोकांचे निवासस्थान असते. यामध्ये सत्कर्मांचा संग्रह असतो. त्यांच्या संरक्षणासाठी त्यांच्यावर निरीक्षण ठेवले जाते. तिसरी श्रेणी ही ब्रह्मज्ञानी लोकांच्या मनाची असते. हे एक प्रकारचे शाही खजिना असते. यामध्ये हिरे, रत्ने व पाचू यांचा कोष असतो. यांचा रक्षणकर्ता स्वत: शासक असतो. तोच त्यांचा साथी आणि समर्थक असतो. त्यावर त्याची नजर असते, कारण की दुसरा कोणी शासक नसतो.

**६) ब्रह्मज्ञानी लोकांच्या मनाचे वैशिष्ट्य**

परमेश्वराने पृथ्वीतळावर उद्याने निर्माण केली आहेत. त्याच्यामध्ये जो कोणी पेरतो तो स्वर्गाची लालसा करीत नाही, आणि ती ब्रह्मज्ञानी लोकांची मने असतात.

**७) निर्मळ अंत:करणाचे गुणविशेष**

भक्तीपासून पराकाष्ठा, प्रसन्नतेपासून श्रेष्ठता, उजवीकडून दानवृत्ती, डावीकडून ममत्व, प्रभुदर्शनासाठी अग्रेसरता, चिरंतनतेची दृष्टी व संकेत डोक्यापासून, अर्थात बुद्धीपासून. या सर्व गोष्टी निर्मळ अंत:करण असलेल्या भक्तास प्राप्त होतात.

असे म्हणतात की मनाच्या (अंत:करणाच्या) नम्रतेचे चार टप्पे असतात –

एक शंकेपासून सुरक्षित मन, दुसरे पथभ्रष्ट करणाऱ्या इच्छा, आकांक्षा व लोभापासून सुरक्षित मन, तिसरे अहंकार व पाखंड यापासून सुरक्षित मन आणि चौथे उपाधी म्हणजेच भगवंतावाचून इतर सर्वांचे स्मरण करण्यापासून सुरक्षित मन.

शाह शुजाउद्दीन किरमानी यांचे असे मत आहे की, पुढील तीन गोष्टींनी अंत:करण सुरक्षित राहते - सर्वांशी संतुष्ट असणे, लोकांमध्ये चांगुलपण पाहणे आणि प्रत्येक माणसास विवश समजणे.

**८) भक्तांच्या मनांचे लक्षण (गुण)**

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रेषित मूसा यांना म्हटले की, तू आपल्या मनास माझ्या भक्तीसाठी दृढ - स्थिर ठेव. कारण की मी तुझ्या मनास माझ्या भक्तीसाठी वचनबद्ध केले आहे आणि तुझ्या मनामध्ये माझ्याविषयी प्रेम विस्तीर्ण केले आहे. तुझ्या ब्रह्मज्ञानाचा पाया मजविषयी श्रद्धेने भक्कम केले आहे. तुझ्या मनामध्ये माझ्याविषयी उत्कंठा तळपत ठेवली आहे. तुझ्या मनाच्या संतोषासाठी व नेत्रसुखासाठी मी रात्र निर्माण केली आहे. तुझ्या मनामध्ये मजविषयी चिंतनाची - मननाची ओढ निर्माण केली आहे. माझ्या कृपेचा वर्षाव तुजवर केलेला आहे. सत्याचा पहारा तुझ्या श्वासावर ठेवलेला आहे. माझ्या भक्तीचे रोपटे तुझ्या मनामध्ये मी रोवले आहे. त्याचे पत्ते संपूर्णपणे माझ्याशी एकनिष्ठ आहेत. प्रेम निवेदनाची फळे तिच्या फांद्यांवर लटकलेली (लोंबकळलेली) आहेत. तुझ्या मनामध्ये अनादि काळाची गूढता उलगडून दाखविली आहे, आणि तुझ्या मनामध्ये माझ्या भक्तीविषयी प्रेमाची दृढ धारणा ठेवली आहे.

**९) श्रद्धावंतांच्या मनाची तटबंदी**

सर्वश्रेष्ठ परमेश्वराने श्रद्धावंतांच्या मनाची तटबंदी सात भिंती आणि सात चक्रांनी (मजबूत केली आहे, की जेणेकरून शैतानास त्याच्यामध्ये प्रवेश करता येणे शक्य होऊ नये.

पहिली तटबंदी ही ब्रह्मज्ञानाची आहे. त्याची भिंत रत्नांची आहे. त्यावर दुसरी एक तटबंदी आवेष्टित आहे व ती आहे परमेश्वरावरील श्रद्धा. ही सोनेरी आहे. त्याच्यावर एक पोलादी आवेष्टन आहे आणि ते वचन आणि कर्माची निष्कपटता आहे. त्याच्यावर लोखंडाचे आवरण आहे आणि ते आहे विधिलिखित भाग्यावर संतुष्ट राहणे. त्याच्यावर तांब्याचे आवरण आहे आणि ते ब्राह्मी नित्य कर्मे पार पाडणे. त्याच्यावर तंदुलचे आवरण आहे. ते म्हणजे ईश्वराच्या विधीनिषेधता होत. आणि याच्यावर मृण्मयाचे म्हणजेच मातीचे आवरण आहे, आणि ते प्रत्येक कर्मामध्ये आत्म्याची शिष्टता आहे, कारण की पवित्र कुराणामध्ये अभिव्यक्त आहे - ''निश्चितच जे माझे सच्चे भक्त आहेत, त्यांच्यावर तुझी (शैतानाची) सत्ता मुळीच चालणार नाही.'' - १५:४२. आणि श्रद्धावंत हा सप्त चक्राकार तटबंदीमध्ये सुरक्षित आहे. जोपर्यंत श्रद्धाळू भक्ताचे अंत:करण शुद्ध आहे तोपर्यंत शैतानास आत प्रवेश करण्याचा मार्ग सापडणार नाही.

**१०) श्रद्धावंतांच्या मनामधील अग्नी**

ब्रह्मज्ञानी श्रद्धावंतांच्या मना (अंत:करणा)मध्ये चार प्रकारचा अग्नी असतो - भयाचा अग्नी, प्रेमाग्नी, ज्ञानाग्नी आणि तितिक्षेचा अग्नी. भयाचा अग्नी हा अपराधाची गोडी नेस्तनाबूत करतो, प्रेमाचा अग्नी हा उपासनेचा गोडवा किंवा खडतरता प्रदीप्त करतो. ब्रह्मज्ञानाचा अग्नी हा मध्यभागापासून मधुर प्रेम-व्यवहार घेऊन गेलेला असतो आणि तितिक्षेचा अग्नी आत्म्यास तप्त करून प्रियकराच्या मर्जीपर्यंत पोहोचवितो.

**११) ब्रह्मज्ञानी श्रद्धावंताचे मनोद्यान**

ब्रह्मज्ञानींच्या मनोद्यानामध्ये तीन प्रकारचे चरणे संभवते. एक अत्याचार वा अनीतीचे उद्यानामध्ये, दुसरे चांगल्या वस्तूंच्या (उपकरणांच्या) उद्यानामध्ये, तिसरे सुख, चैन, व खुशालीच्या उद्यानामध्ये, जेव्हा

अनीतीच्या उद्यानामध्ये त्याचे मन असते, तेव्हा लज्जेचे त्याच्यावर प्रभुत्व असते. जेव्हा ते उपकरणांच्या उद्यानामध्ये असते तेव्हा त्याच्यामध्ये आशेचे किरण उदयास येते आणि जेव्हा ते चांगल्या वस्तूंच्या उद्यानामध्ये असते तेव्हा ते भक्तिभावामध्ये स्थिर राहते.

**१२) ब्रह्मज्ञानीच्या अंत:करणाचा प्रकाश**

ब्रह्मज्ञानीच्या अंत:करणामध्ये तीन प्रकारचा प्रकाश असतो : ब्रह्मज्ञानाचा प्रकाश, विवेक-बुद्धीचा प्रकाश आणि ज्ञानप्रकाश. ब्रह्मज्ञान सूर्यासारखे असते, विवेक-बुद्धी चंद्रासारखे तर ज्ञान नभोमंडळातील ताऱ्यांसारखे असते. ब्रह्मज्ञानाच्या प्रकाशामुळे विषय-वासना व लोभ नाहीसे होतात. विवेक-बुद्धीच्या प्रकाशामुळे वासना नष्ट होते आणि ज्ञान प्रकाशामुळे अज्ञान अंध:कार दूर होतो. अशा प्रकारे ब्रह्मज्ञानी हा ब्रह्मज्ञानाच्या प्रकाशाच्या बळावर परमेश्वरास पाहतो; विवेक-बुद्धीच्या प्रकाशाने तो सत्यास पाहतो आणि ज्ञानप्रकाशाच्या मदतीने तो सत्य आचरण करतो.

**१३) ब्रह्मज्ञानीच्या मनात प्रथम निर्माण होणारी गोष्ट (वस्तू)**

ज्या सेवकाचे किंवा भक्ताचे परमेश्वर कल्याण करू इच्छितो त्याच्या अंत:करणामध्ये सर्वप्रथम तो प्रकाश वा ज्योति प्रकट करतो. त्या ज्योतिपासून आभा किंवा चमक निर्माण होते. त्या आभेमधून किरण निर्माण होते आणि ते चंद्राचे (शीतल) किरण असते. शेवटी ते किरण सूर्याचे किरण बनते. जेव्हा या सूर्यकिरणामधून प्रकाश पसरतो तेव्हा जग व जगामधील प्रत्येक वस्तू त्याच्या मनास शीतल वाटते व ते चंद्रासारखे वाटते. शेवटी जे काही आहे ते सर्व तो जाणत नाही. तो फक्त ईश्वरासच जाणतो. त्या परिस्थितीमध्ये त्याचे शरीर, त्याचे मन, त्याची वाणी हे सर्व प्रकाश बनून जातात. याविषयी पवित्र कुराणामध्ये अभिव्यक्त आहे – ''(मग) प्रकाशावर प्रकाश आहे. अल्लाह इच्छितो त्यास आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवितो.'' – २४:३५.

**१४) ब्रह्मज्ञानीच्या मना (अंत:करणा)चे निर्झर (समुद्र)**

ब्रह्मज्ञानी जोपर्यंत तीन समुद्र पार करत नाही तोपर्यंत त्यास ईश्वरी सिद्धी प्राप्त होत नाही : एक प्रभुत्वाचे समुद्र, दुसरे तप:लोकत्वाचे समुद्र आणि तिसरे सत्यलोकत्वाचे समुद्र. प्रभुत्वाचे समुद्र असे असते की जेव्हा तो त्याच्या वैभवाच्या प्रकाशामध्ये प्रवेश करतो, तेव्हा त्यास उमजून येते की पालनकर्ता हा परमेश्वर आहे. व तो स्वत: त्याचा पोषित आहे. म्हणून त्याचे मन अत्यंत विचारमग्न होऊन जाते. त्याच्या जिव्हेवर ईश्वरी देणग्यांची नावे खेळू लागतात. त्याचे डोळे जगाचे सुख वैभव पाहून शिकवण ग्रहण करतात आणि त्याचा आत्मा ईश्वराचा शोध घेण्यामध्ये आणि त्याच्या सेवेत मग्न असतो. अशा परिस्थितीमध्ये असे समजणे उचित आहे की त्याची उपासना हा समुद्र आहे, सेवा (भक्ती) एक नौका आहे, सुखसमृद्धी हे त्या नौकेचे शीड (मरुत् पट) आहे, आणि ईश्वराच्या उपकारांचे स्मरण म्हणजे समुद्रावर वहाणारा वारा (वायू) आहे आणि बोधग्रहण किंवा शिकवण नावाडी आहे. मनोकामनेची हवा नौकेवर धडकते आणि ती तप:लोकाच्या समुद्रावर येऊन फैलावते. येथे दुसऱ्या नौकेचे काहीच काम नसते. म्हणून येथे उत्कंठा, प्रेम आणि प्रायश्चित्ताचे एक सेतू उभारले जाते. (उभे केले जाते) व त्या पुलावरून ब्रह्मज्ञानी हा सत्यलोकत्वाच्या समुद्रापर्यंत येऊन पोहोचतो.

या समुद्रास गाठल्यावर तेथे ना नौका असते, ना सेतू (पूल). येथे तो आत्मसमर्पणास तत्पर असतो आणि स्वत:स त्या समुद्राच्या पाण्यामध्ये झोकून घेतो. प्रेम वा स्नेहाचा वायू, आणि चमत्काराची लाट त्याला तारतात

आणि त्याला समुद्रतटावर नेऊन पोहचवितात. आणि येथेच त्याला ईश्वरी सिद्धी प्राप्त होते. जेव्हा तो ईश्वरी महात्म्य आणि प्रतापास ओळखतो तेव्हा त्याचे अंत:करण चार गोष्टींनी सुशोभित होऊन जाते. त्याच्या मनाच्या दरम्यान ब्रह्मज्ञानाचा दिवा तळपतो, त्याच्या उजवीकडे ईश्वरी महात्म्य, त्याच्या समोर ईश्वरी प्रताप आणि त्याच्या पाठीमागे प्रतिष्ठेची पडछाया दिसू लागतात. म्हणून भक्त हा सर्वत्र ब्रह्मज्ञानाचा प्रकाश आणि चिंतनाच्या दृष्टीने पाहू लागतो.

**१५) ब्रह्मज्ञानीच्या मनामध्ये ब्रह्मज्ञानाचा वृक्ष**

सर्वप्रथम ब्रह्मज्ञानीच्या मनामध्ये चमत्काराचा वर्षाव होऊ लागतो आणि ब्रह्मज्ञानाच्या वृक्षास त्याच्या पाच फांद्यांवर फळ येऊ लागते. त्याची एक शाखा ही परमेश्वराच्या राजसिंहासनास जाऊन पोहोचते, दूसरी पूर्वेकडे, तिसरी पश्चिमेकडे, चौथी उजव्या क्षितिजाकडे तर पाचवी डाव्या क्षितिजाकडे पोहोचते.

जी शाखा ईश्वरी सिंहासनास जाऊन पोहोचते, तिला प्रतापापासून पाणी प्राप्त होते. आणि तिचे फळ असते ईश्वरप्रार्थना, आणि जी शाखा पूर्वेकडे पोहोचते तिला चमत्काराने सिंचले जाते आणि तिचे फळ असते सेवा (भक्ती), आणि जी शाखा पश्चिमेकडे पोहोचते तिला कृपेचे पाणी पोहोचते आणि तिचे फळ असते ज्ञान व शिकवण. ही शिकवण उपासनेच्या अधीन स्वनिष्कर्षित अशी असते. आणि जी शाखा उजवीकडील क्षितिजाकडे आहे, तिला प्रेमाने सिंचित केले जाते, आणि तिचे फळ असते प्रभुनामस्मरण आणि जी शाखा डावीकडील क्षितिजाकडे असते, तिला प्रायश्चिताने सिंचले जाते आणि तिचे फळ असते प्रभू-दर्शन. हे सर्व काही परमेश्वराच्या कृपेवर अवलंबून आहे.

**१६) ब्रह्मज्ञानाच्या मनाची जिव्हा आणि तिच्या संवादाचे लक्षण**

श्रद्धावंताच्या मनाची तीन लक्षणे आहेत - एक हे की सर्व अपराधांना पश्चातापाच्या पडद्यामध्ये लपविले व सर्व सत्कर्मांना नामस्मरणाच्या पडद्याने लपविले. ते सर्व वस्तूंना सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्रेमाच्या पडद्यामध्ये यासाठी लपविते की इहलोक व परलोक या दोन्ही जगांमध्ये ईश्वर प्रेमाशिवाय दुसरे काहीच नसावे. श्रद्धावंताची वाणी म्हणजे सर्वस्वी परमेश्वराच्या असंख्य देणग्यांचा उल्लेख होय, व वासनेस अपराध करण्याच्या प्रवृत्तीपासून रोखून धरण्याकरीता तिच्यावर सदैव जागरूक असा पहारा ठेवणे होय. ब्रह्मज्ञानासंबंधी चार गोष्टी सांगितल्या जातात - जिव्हेने ईशस्तवन, जिव्हेने कृतज्ञताज्ञापन, जिव्हेने तक्रारीचा सूर आळवणे आणि जिव्हेने विवशता अभिव्यक्त करणे. श्रद्धावंत हा आपल्या जिव्हेने ईशस्तवनामध्ये प्रभूच्या देणग्यांविषयी कृतज्ञता व्यक्त करतो. तो कृतज्ञतेमध्ये परमेश्वराचा सेवक म्हणजेच एकनिष्ठ भक्त बनतो. तो आपल्या तक्रारीचा सूर असलेल्या जिव्हेने आपल्या वासनेचे किल्मिष समोर ठेवतो. तो आपल्या विवशतेच्या जिव्हेने अपराधांकडे उन्मुख व प्रवृत्त होण्यासंबंधी माफ़ीनामा ईश्वरासमोर ठेवतो, आणि जेव्हा तो भाष्य ऐकतो तेव्हा तो त्या भाष्यास वांछित जाणतो आणि मीमांसा ऐकल्या नंतर तिला विद्वानांच्या हवाली करतो आणि म्हणतो की ईश्वरच जाणो!

**१७) श्रद्धावंतांच्या मनाचे दृष्टांत**

श्रद्धावंताचे मन हे दोन दारे असलेल्या एका घरासारखे आहे. एक दार इहलोकाच्या रस्त्याकडे उघडते, तर दुसरे दार हे परलोकाकडे उघडते. प्रथम हे एक शिकवण आहे; तर दुसरे चिंतन. त्या घरामध्ये एक लाकडी पलंग आहे. त्या पलंगाला चार पाय आहेत. पहिले पाय भीतिदायक प्रतापाचे आहेत, दुसरे उपासनेमधील विनय व

नम्रता, तिसरे अपराधांचा त्याग आणि चौथे यमलोकाचे भय. सिंहासनावर नरेश आसनस्थ आहे. त्याचे दोन वजीर आहेत. तो नरेश म्हणजे आत्मविश्वास होय. उजवीकडील वजीर हा भय आहे, तर डावीकडील हा आशा आहे. त्या सिंहासनासमोर बारा महान सेनापती उभे आहेत. पहिला सेनापती हा साक्ष नोंदविणारा आहे. ते इस्लामचे सजविलेले आधारस्तंभ आहेत; दुसरा उपासना वा भक्ती ('नमाज'). हा इस्लामचा आधारस्तंभ आहे. तिसरा धर्मदान ('ज़कात'). ही इस्लामची स्वच्छता आहे. चौथा उपवासव्रत ('रोज़ा') हे इस्लामचे पराकाष्ठा आहे. पाचवे महातीर्थ यात्रा ('हज') होय. हा इस्लामचा एक प्रमुख स्तंभ आहे. सहावे दिवाणी कायदे, हे इस्लामची प्रतिष्ठा आहेत. सातवे विधी आज्ञा, हे इस्लामचे संरक्षक आहेत. आठवे निषिद्ध आज्ञा, हे इस्लामचे प्रमाण (सिद्धता) आहेत. नववे भ्रातृसंघ वा समाज-बांधव, हे इस्लामची शोभा आहेत. दहावे दान, हे इस्लामचे रत्न आहे. स्वजनांप्रति प्रेम राखणे व यथाशक्ती त्यांची मदत करणे, हे इस्लामची आत्मीयता व ममता आहे आणि बारावे हे मोक्ष होय. यामुळे इस्लाम सुरक्षित राहते.

**१८) श्रद्धावंताच्या मनामधील ब्रह्मज्ञानाच्या वृक्षाचे दृष्टांत**

श्रद्धावंताच्या मनामधील बह्मज्ञानाचे दृष्टांत हे एक अशा वृक्षासारखे आहे की ज्याला सात शाखा (फांद्या) आहेत. एक फांदी त्याच्या डोळ्याकडे आहे, दुसरी फांदी जिव्हेकडे आहे, तिसरी त्याच्या अंत:करणाकडे, चौथी त्याच्या आत्म्या (वासने)कडे आहे, पाचवी विश्वनिर्माता ईश्वराकडे, सहावी परलोकाकडे तर सातवी फांदी ही त्याच्या परमेश्वराकडे आहे. प्रत्येक फांदीला दोन प्रकारची फळे आहेत. अंत:करणाकडील फांदीस उत्कंठा आणि पश्चातापाची फळ आहेत. आत्मा (वासने)कडील फांदीस संयम आणि उपासनेची फळ आहेत आणि शेवटी परमेश्वराकडे असलेल्या शाखेस ईश्वर सान्निध्य आणि प्रभू-दर्शनाची फळ आहेत.

**१९) लोभ व लालसेच्या वृक्षाचे दृष्टांत**

मानवाच्या अंत:करणामध्ये असलेल्या लोभाचे दृष्टांत हे अशा एका वृक्षासारखे आहे की ज्याला सात शाखा (फांद्या) फुटलेल्या आहेत. एक शाखा त्याच्या डोळ्याकडे आहे, दुसरी त्याच्या जिव्हेकडे, तिसरी त्याच्या अंत:करणाकडे, चौथी त्याच्या आत्म्या (वासने)कडे, पाचवी लोकांकडे, सहावी जगाकडे आणि सातवी परलोकाकडे (आहे.) डोळ्याकडे असलेल्या शाखेस अभिलाषा आणि कामातुरता याची फळे आहेत, जिव्हेकडील शाखेस चहाडी व चुगलीची फळे आहेत, अंत:करणाकडील फांदीस द्वेष आणि शत्रुत्वाची फळे आहेत, आत्मा (वासना)कडील शाखेस निषिद्ध आणि शंकेच्या गोष्टी आहेत, लोकांकडे असलेल्या फांदीस धूर्तता आणि चलाखीची फळ आहेत. जगाकडील फांदीस देखावा (दिखावट) व पाखंडाचे फळ आहेत व शेवटी परलोकाकडे असलेल्या शाखेस पश्चाताप आणि निराशेची फळे आहेत.

**२०) ब्रह्मज्ञानीच्या मनोद्यानाची वैशिष्ट्ये**

ब्रह्मज्ञानीच्या अंत:करणामध्ये दहा उद्याने आहेत. पहिले उद्यान एकेश्वरवादाचे, दुसरे साधना-मार्गाचे, तिसरे दृढ विश्वासाचे, चौथे नम्रतेचे, पाचवे वैधतेचे, सहावे सहिष्णुतेचे, सातवे दानशीलतेचे, आठवे मनोवांछिताचे, नववे निष्कपट प्रेमाचे आणि दहावे ज्ञानाचे उद्यान होय. श्रद्धावंत हा त्या उद्यानाचा प्रणेता आहे, आणि तो या उद्यानामध्ये नित्य वास करून असतो. ज्यावेळी तो एकेश्वरवादाच्या उद्यानामध्ये सहभागीत्व आणि फूट पाहतो त्यावेळी तो त्यांना समूळ उखडून फेकून देतो. आणि जर त्या उद्यानामध्ये नव प्रघात आणि

लोभ यांचा मार्ग त्याला दिसल्यास तो त्यांना पायदळी तुडवितो. जर त्या उद्यानामध्ये विश्वासास शंका आणि कुविचार गिळंकृत करीत असतील तर त्यांना काढून तो फेकून देतो. जर त्या उद्यानामध्ये उद्दंडता व आत्मश्लाघा यांचे आतिथ्य होत असेल तर तो त्यांना गाडून टाकतो. जर त्या उद्यानामध्ये वैध, हे निषिद्ध आणि संदेहास्पद वाटत असेल तर त्यांना पण उपटून टाकतो. जर सहनशीलतेमध्ये शत्रुत्व आणि द्वेष दिसून आले तर तो त्यांचीही पण वाट लावतो. जर त्या उद्यानामध्ये दानशीलतेमध्ये कंजूषी आणि हाव दिसून आले तर त्यांनाही तो उखडून टाकतो. जर त्या उद्यानामध्ये निष्कपट प्रेमामध्ये पाखंड व ढोंग दिसून आले तर तो त्यांचीही पण तीच गत करतो. जर त्या उद्यानामध्ये, मनोवांछितेस अधीरता व तक्रारीचे सूर लागले असल्यास तो त्यांचे पण योग्य निवारण करतो. शेवटी जर त्या उद्यानामध्ये ज्ञानास, अज्ञान व बेसावधगिरीचे वेष्टण चिकटलेले असेल तर त्यास पण तो फाडून फेकून देतो.

**२१) भक्त किंवा अभक्तांच्या मनावर होणारा (कृपेचा/अवकृपेचा) वर्षाव**

वर्षा दोन प्रकारची असते : कृपेची वर्षा व अवकृपे (संकटा)ची वर्षा. कृपा चांगुलपणावर प्रभाव टाकते. संकट निष्ठुरतेवर कोसळते. तीन कारणामुळे कृपेची वर्षा होत नाही. प्रथम पाखंडयुक्त मन असल्यास, दुसरे बुद्धीभ्रष्ट असल्यास, तिसरे शत्रुत्वाचे हेतूने केले गेलेले छुपे पाप.

अवकृपेची वर्षा किंवा संकटाचे कोसळणे हे तीन कारणामुळे घडते – वैध सोडून निषिद्धाचे सेवन करणे, व जुलूम करण्याचे निश्चय दर्शविणे. कृपेच्या वर्षावामध्ये चार गोष्टी असतात – दहशतीचा कडकडाट, उत्कंठेची चपला (तडित), चमत्काराची वर्षा, सुख-चैनचा शीतल वायू. दहशतीचा कडकडाट हा पश्चातापाच्या मनामध्ये गोंगाट माजवितो; उत्कंठेची चपला ही स्थिरचित्तांच्या – संयमी लोकांच्या मनामध्ये चमकते, आणि चमत्काराची वर्षा ईश्वरनिष्ठांच्या मांदियाळीमध्ये होते आणि सुख-चैनचा शीतल वायू ब्रह्मज्ञानीच्या मनावर घोंगावतो. त्याचप्रमाणे, संकट कोसळण्यामध्ये चार गोष्टी असतात – अविचाराच्या विजेची कडकडाहट, शत्रुत्वाची चपला, द्वेषाची वर्षा, धुळीने माखलेल्या शीतल वायूचा पडदा. परंतु अविचाराच्या विजेची कडकडाहट हा श्रद्धाहीन नास्तिकांच्या मनामध्ये असतो आणि शत्रुत्वाची चपला ही मिथ्याचारी लोकांमध्ये असते. द्वेषाचा वर्षाव जुलमी लोकांच्या मनामध्ये होत असतो, तर अपराधी लोकांच्या मनामध्ये धुळीने माखलेल्या शीतल वायूचा पडदा असतो.

१९



## प्रकरण – १९

# पुरुषोत्तम (नरोत्तम)

**मानवाचा महिमान : मानवाची थोरवी**

मानव ईश्वराची सर्वोत्तम रचना आहे. मानव हा सृष्टीचा मुकुटमणी आहे. सजीव सृष्टीचाच नव्हे; तर समस्त सृष्टीच्या उतरंडीमध्ये मानवाचे स्थान सर्वोच्च आहे. त्याची उभी काठी, त्याची वाक् शक्ती आणि विवेकबुद्धी या वरदान त्रयीच्या बळावर तो ब्रह्मांडावर अधिराज्य गाजवितो. वाणी तर एकमात्र मानवासाठीच एक अमोघ वरदान आहे.

मानवाच्या कृतीचा आद्य प्रवर्तक ईश्वर आहे. परमेश्वराने त्याला संकल्पस्वातंत्र्य आणि कर्मस्वातंत्र्य बहाल केले आहे. ॲरिस्टॉटलच्या मते स्वाध्यायामध्ये सिद्ध पूर्वनिहित असते. अणूमध्ये विराट दडलेला आहे. बीमध्ये विशाल वटवृक्ष अंतर्निहित आहे. शिशुमध्ये पिता बनण्याची क्षमता विद्यमान आहे. तद्वत मानव हा एक असा अप्रतिम पिंडांड आहे की ज्यांमध्ये ब्रह्मांडाचे समस्त घटक व तत्त्वे विद्यमान आहेत. म्हणूनच म्हटले जाते – ''जे ब्रह्मांडी ते पिंडी.''

जरी सृष्टीमध्ये मानवाचे आविष्करण हे सर्वात शेवटी झाले तरी मानव हा वास्तविक ईश्वराचा प्रतिनमुना आहे. तो सद्‌गुण आणि दुर्गुणांचा पुतळा आहे. तो वाईटपणाच्या पैलूने शैतानाहून अधिक निष्ठुर व निकृष्ट आहे; तर चांगुलपणाच्या पैलूने तो देवदूतांहूनही अधिक उत्कृष्ट व श्रेष्ठ आहे. त्याच्यामध्ये उपरोक्त दोन्ही पैलू एकवटलेले आहेत. यावरून ब्रह्मांडामधील त्याच्या सर्वोच्च स्थानाची कल्पना आल्याशिवाय राहात नाही. म्हणून तर तो इहलोकामध्ये परमेश्वराचा उपप्रभारी किंवा उत्तराधिकारी आहे. २:३० कारण परमेश्वराने त्याला आपल्या हातांनी बनविलेले आहे. – ३८:७५. त्यास संगोपनाच्या सर्वोत्तम पद्धतीने वाढविले आहे. – ९५:४. परमेश्वराने आत्मा फुंकला. – १५:२९. आणि आपल्या उपकारांचे वरदान प्रदान केले. – १६:४.

'करावे तसे भरावे', 'पेराल तसे उगवते' हा न्याय परमेश्वराने मानवासाठी लागू करून ''त्याने प्रत्येक मनुष्याचे प्रारब्ध त्याच्या गळ्यात बांधून टाकले आहे.'' – १७:१३. ''प्रत्येकाला त्याच्या कर्माचा परिणाम भोगावाच लागणार आहे, आणि ओझे वाहणारी कोणतीही व्यक्ती दुसऱ्याचे ओझे आपल्या शिरावर घेत नाही.'' – ६:१६४. ''आणि तोच आहे, ज्याने या भूतलावर तुम्हाला (इतरांचे) वारस बनविले आणि तुमच्यापैकी काहींना इतरांपेक्षा श्रेष्ठ दर्जा यासाठी प्रदान केला की, त्याने जे काही तुम्हाला दिलेले आहे त्याद्वारे त्याला तुमची परीक्षा घेता यावी.'' – ६:१६५. ''आम्ही ही (विचार व आचार स्वातंत्र्याची) ठेव (अमानत)

आकाशे, भूमी आणि पर्वत यांच्यासमोर ठेवली. प्रत्येकाने ती (जबाबदारी) उचलण्याला नकार दिला, आणि तिला भ्याले, आणि माणसाने (जणू मुद्दाम अविचारीपणाने) ती उचलली. तो (आपल्या ठायी) फारच अनर्थकारी (होता आणि अनर्थकारी होण्यापलीकडे) फारच अज्ञानीही होता. (आणि ती उचलली तर तिचा आवश्यक परिणामही हा व्हायचाच होता.)'' - ३३:७२.

सृष्टीनिर्मितीची सुरुवात आदिभूतापासून होते. या आदिभूतापासून मूलतत्त्व, स्वर्ग, चार महाभूते, आकाश, ग्रह-तारे इत्यादींचा आविष्कार झाला. नंतर सप्तग्रहांच्या प्रभावामुळे परिणामी धातू, खनिज, वनस्पती आणि जीव-जंतूंचा उद्‌भव होतो. जीव-जंतूंची चरम परिणती मानवामध्ये येऊन समाप्त होते. अशा प्रकारे सर्वात शेवटी सर्वनिधान ('जामिअ') मानवाचा उद्‌भव होतो. त्यानंतर मानव हा आपल्या बहुगुण संपन्नते ('रफ़ीउदर्जात')च्या बळावर पुरुषोत्तम वा नरोत्तम ('इन्सानुल कामिल') या सर्वोच्च दर्जावर जाऊन पोहोचतो.

जीव जगत्‌मध्ये अन्यतम मानव हा आहे, आणि मानवामध्ये पण उच्चतम आणि अन्यतम 'पुरुषोत्तम' वा 'नरोत्तम' आहे. सर्व प्राणी जाणतेपणाने किंवा अजाणतेपणाने या पुरुषोत्तमाच्या स्तरापर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्नशील असतात, कारण की येथे पोहोचल्यावर ते 'विश्वज्ञान' ('अक्ल-ए-अव्वल')मध्ये प्रवेश करतात आणि तेथे पोहोचून आत्मा त्या परम ऐश्वर्याच्या मनात प्रवेश करू शकतो. अशा प्रकारे पुरुषोत्तम वा नरोत्तमाची निर्मिती ही परमेश्वराशी अनुरूप अशीच झालेली असते. यावरून मानवाचा महिमान किती मोठा आहे याची कल्पना येते.

**मानवतत्त्व**

प्रसर्जन सिद्धान्तानुसार १) अहदियत (सर्वदा मुक्त अवस्था) २) वहदत (स्वरूप मुक्त अवस्था) आणि बाहेदियत (जीवनमुक्त अवस्था) अवस्थेचे असे तीन टप्पे आहेत. एकूण अठ्ठावीस (२८) दैवी नाम साधर्म्य यास अनुलक्षून परमेश्वराचे सर्वश्रेष्ठ नाम 'अल्लाह'शी साधर्म्य साधणारे असे 'इन्सानुल कामिल' (पुरुषोत्तम, नरोत्तम) हे नाम मानवाशी निगडित आहे. त्यामुळे मानव हा आत्मिक लोक, प्रतिकृती (मिसाल) लोक आणि भौतिक लोक या सर्व लोकांचा अंगीकार करतो. पवित्र कुराणामध्ये म्हटलेले आहे - ''आम्ही लवकरच क्षितीजावर आणि त्यांच्या व्यक्तित्त्वांमध्ये आमचे संकेत त्यांना येथवर दाखवू जेव्हा त्यांना सुस्पष्टपणे असे कळून येईल की ते सत्य आहे.'' - ४१:५३.

**१) नरोत्तमाचे आत्मिक पैलू -** प्रसर्जनाचा पहिला टप्पा अहदियत (सर्वदा मुक्त अवस्था) मध्ये 'अल्लाह' हे नाम वास्तविक नामी असते. आत्मा लोक हा अल्लाह या नामाचा आत्मा असतो; तर प्रतिकृती 'मिसाल' लोक त्याच नामाचे अंत:करण असते. आत्मा लोकाशी प्रथम चार प्रभु-नाम संबंधित असतात, तर पुढील तीन नावे ही प्रतिकृती लोकांशी निगडित असतात. उरलेल्या एकवीस नामांपैकी दहा हे खगोलीय पितृका म्हणून ओळखले जातात, आणि पुढची दहा नामे ऐहिक मातृका म्हणून संबोधले जातात आणि शेवटचे सर्वोच्च अठ्ठाविसावे नाव हे 'इन्सानुल कामिल' (नरोत्तम) असे आहे.

नरोत्तमाचा वास्तविक अर्थ विशद करणारा अरबी भाषेतील 'इन्सान' हा शब्द मोठा समर्पक आहे. या शब्दाची व्युत्पत्ती 'उन्स' (रती, प्रेम) या शब्दापासून मानतात; तर इतर 'नस' (अर्थात विस्मरणशीलता) या

शब्दापासून मानतात. कारण ऐहिक जीवन मुळी विस्मरणशीलतेपासून सुरू होऊन त्याची इतिश्रीही विस्मरणशीलतेतच होते. काही म्हणतात की 'इन्सान' हा शब्द 'ऐन सन' या शब्दापासून आलेला आहे. याचे अर्थ आहे 'चक्षूवत्' अर्थात डोळ्यांसारखे. मानव हा ईश्वराचा डोळा असून, या डोळ्यानेच ईश्वर हा आपले रूप-गुण मर्यादित स्वरूपात न्याहाळीत असतो. अशा प्रकारे इन्सानुल कामिल अर्थात नरोत्तम हा आरसा असून त्यामध्ये ईश्वराचे नाम-रूपाचे संपूर्ण प्रतिबिंब उमटलेले असते. मात्र परमेश्वर हा आपल्याच ज्ञानप्रकाशात प्रकट होत असतो.

नरोत्तमाची निर्मिती परमेश्वराशी अनुरूप अशीच झालेली आहे. नरोत्तम अशी व्यक्ती असते जिला परमेश्वराशी 'एकत्वा'ची संपूर्ण अनुभूती प्राप्त झालेली असते, मुहियुद्दीन इब्नुल अरबी याने नरोत्तमाची चर्चा करताना असे दाखवून दिले आहे की आपले गुण प्रकट व्हावेत अशी परमेश्वरास जेव्हा इच्छा झाली तेव्हा त्याने मानवरूप क्षुद्र लोकाची (नरोत्तम) सृष्टी निर्माण केली. या नरोत्तम सृष्टीद्वारे परमेश्वराचे 'बोध' (सिर्र) स्वतः त्याच्याजवळ अभिव्यक्त व्हावे, हा हेतू होता. आदमपासून ते मुहम्मदपर्यंत होऊन गेलेले सर्व प्रेषित, संत, महात्मे, औलिया हे सर्व नरोत्तमाच्या श्रेणीत मोडतात. याचाच अर्थ असा आहे की संत आणि औलिया असे लोक असतात की ज्यांचे आत्मे हे परमेश्वराच्या प्रकाशामध्ये विलीन झालेले असतात. त्यांना दैवी ज्ञानप्राप्ती झालेली असते. ते अदृश्य आणि अज्ञात वस्तूंना जवळून पाहू शकतात आणि ते त्यांना ओळखतात.

'इन्सानुल कामिल' (इन्सान कामिल = नरोत्तम) या ग्रंथाचे ग्रंथकर्ते अब्दुल करीम जीली यांच्या मतानुसार नरोत्तम हा समान वस्तूंच्या सृष्टीचे कारण आदिभूत असतो. तोच परमेश्वराच्या प्रथम काळजीचा विषय आहे. नरोत्तम हा भौतिक जगात - इहलोकात अवतरित होतो, आणि नंतर त्यापासून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत असतो व शेवटी तो आपल्या मूळ स्थानास पोहोचतो. तो विश्व-ब्रह्मांडाचा रक्षक आहे. तोच सृष्टिनिर्मितीस कारणीभूत आहे. त्याच्याद्वारे परमेश्वर स्वत:ला पाहात असतो. कारण की परमेश्वराचे नाम आणि गुण समग्र रूपात नरोत्तमामध्ये एकवटले असतात. तो परमेश्वराची साक्षात प्रति छबी आहे. म्हणून विश्वरूप 'तदत्व' आणि मानवरूप 'अहम तत्त्व' या दोन्ही रूपांचा तो समन्वय आहे.

एकीकडे नरोत्तम हा परमेश्वराची प्रतिछबी आहे तर दुसरीकडे तो या जड प्रकृतीचा चरमोत्कर्ष आहे. अशा प्रकारे तो परमेश्वराच्या नामाचे दोन्ही पैलू - सृष्टी आणि स्रष्टा यांच्या ऐक्यास आपल्यामध्ये प्रकट करतो. सृष्टीच्या अभिव्यक्ती रूपात तो सर्वोच्च आहे. तो मानवरूपात ईश्वरीय गुण आणि स्वरूपास प्रकाशित करणारा आहे. त्याचे हृदय 'अल् अर्श'शी (परमेश्वराचे सिंहासन); मन 'अल् कलम'शी (दैवी लेखणी) तर आत्मा 'लौहे महफूज'(सुरक्षित पट्टिका) सोबत जोडले गेले आहे. संपूर्ण तत्त्वांहून वरचढ अशी त्याची प्रकृती (स्वभाव) आहे. तो आपल्या सद्विचारांमध्ये देवदूतांहून वरचढ आहे, आपल्या शंकाकुशंका यामध्ये यक्षयोनी आणि दुष्ट आत्मे यांच्या वर आहे आणि आपल्यामध्ये प्रकट करू शकतो. तो मानव रूपात ईश्वर आहे आणि आपल्या निजत्वास (हुविय्या) सोडून दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या अस्तित्वास ओळखत नाही. तो परमेश्वराचा नामरूपी दर्पण आहे तर परमेश्वरासाठी पण तो आरसा आहे.

१) जीवन, २) ज्ञान, ३) शक्ती, ४) श्रवण, ५) दृक् (दृष्टी), ६) संकल्प आणि ७) वाचा हे परमेश्वराचे सप्तगुण आहेत.

हे सर्व गुण मानवात पण विद्यमान आहेत. परमेश्वराचे रुद्रनाम (जलाल) आणि भद्रनाम (जमाल) मानवामध्ये अभिव्यक्त होत असतात. परंतु मानवामध्ये हे सर्व गुण व नाम मर्यादित किंवा सीमाबद्ध असतात. परमेश्वराची सत्ता, त्याची नावे आणि गुण, त्याचे क्रियाकलाप हे सर्व असीम असतात. परमेश्वराचे काही गुण आणि नामे अशी आहेत की ती केवळ परमेश्वराच्याच ज्ञानकक्षेत सामावलेली असतात. परमेश्वर हा स्वत: अनादि अनंत असा आहे, तर मनुष्य हा परमेश्वराच्याच ज्ञानकक्षेत अनादि आणि अनंत असा आहे. अशा प्रकारे यद्यपि मनुष्य हा परमेश्वराचा प्रतिछबी आहे, परंतु ठीक तशा प्रकारचा नव्हे जसे की एखाद्या व्यक्तीची मातीची मूर्ती असावी.

भौतिक जगापासून आध्यात्मिक जगाकडे प्रयाण करण्याची शक्ती प्रत्येक मनुष्यामध्ये लपलेली असते; परंतु फारच थोड्या लोकांना ही उपलब्ध असते. प्रेषित, औलिया, संत-महात्मे इत्यादी परमेश्वराच्या अनुग्रहामुळे जागृत अवस्थेत देखील दैवी अनुभव प्राप्त करून घेतात. नरोत्तम हा परमेश्वर आणि मानवास जोडणारी साखळी आहे. तो जगास मार्गदर्शन करतो आणि सन्मार्ग दाखवितो. भटकलेल्या लोकांना योग्य मार्गावर लावून देतो. त्याचे जीवन, त्याची साधना मानवास प्रेरणा देत असते. अब्दुल करीम जीली याने सर्वश्रेष्ठ नरोत्तम प्रेषित मुहम्मद यांना मानले आहे. सूफ़ीचे असे मत आहे की मुहम्मद हेच परमेश्वराची अंतिम आणि संपूर्ण अभिव्यक्ती आहे. त्यांच्या धारणेनुसार या सृष्टीनिर्मितीच्या अगोदर मुहम्मद हे उपस्थित होते आणि त्यांच्याच प्रकाशाने ही सृष्टी निर्माण झाली आहे. 'हकीकतुल मुहम्मदिया' हेच आहे. याला 'नूरूल मुहम्मदिया' पण म्हणतात.

**२) नरोत्तमाचे दैहिक पैलू –** नरोत्तमाच्या शारीरिक पैलूस आपण 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' किंवा जे 'पिंडी ते ब्रह्मांडी' असे म्हणू शकतो. सूफ़ींचे असे मत आहे की सृष्टीचे विभिन्न पदार्थ हे ईश्वराचे एक किंवा दुसऱ्या गुणास अभिव्यक्त करतात, परंतु मानव त्याच्या सर्व गुणांची अभिव्यक्ती करतो. मानवाने या ब्रह्मांडरूपी बृहत् जगास (विश्वाला) आपल्यात लपविलेले आहे. तो परमेश्वराची एक विशिष्ट अशी सृष्टी आहे. त्याच्यामध्येच जणू काही परमेश्वर आपल्या सर्व गुणवैशिष्ट्यांना प्रत्यक्ष करीत असतो. हे विश्व-ब्रह्मांड त्या सर्व वस्तूंची गोळाबेरीज आहे की ज्यामध्ये प्रत्येक वस्तू परमेश्वराच्या नामास वेगवेगळ्या प्रकारात अभिव्यक्त करते; परंतु त्यांच्यात त्या परमेश्वराच्या पूर्णत्वास अभिव्यक्त करण्याचे सामर्थ्य नसते. म्हणून परमेश्वराने मानवास निर्माण केले. मानव हा त्या परमेश्वराच्या प्रतिछबीच्या आत्म्यासारखा आहे. अशा प्रकारे मानवामध्ये नाम-गुणांचा संयोग होतो. अशा प्रकारे, वेगवेगळ्या स्वरूपात ब्रह्मांडामध्ये अभिव्यक्त होत असलेल्या संपूर्ण गुणांना मानव हा ग्रहण करून अभिव्यक्त करतो. म्हणून तो मानव या स्वरूपात क्षुद्र लोक (आलमे सुग्रा) गणला जातो. तो संपूर्ण बाह्य बृहत् लोकास (आलमे कुबरा) आपल्यात धारण करून बसलेला आहे. म्हणूनच मानवाच्या हृदयास (अंत:करण) ओळखल्यास परमेश्वराची ओळख पटते.

भौतिक जग हे परमेश्वराच्या 'अज्जाहिर' (व्यक्त रूप) या नामाचे प्रकटीकरण आहे.) ज्याप्रमाणे आत्मा-लोक आणि प्रतिकृती (मिसाल) लोक मानवात एकवटलेले आहेत. त्याचप्रमाणे भौतिक जग त्याच्यामध्ये लघु स्वरूपात विद्यमान आहे. 'अल्-अर्श' (दिव्य सिंहासन) पासून ते इन्सान (मानव) पर्यंतची वीस नामे मानवात आढळून येतात. ती येणेप्रमाणे) ८) कुर्सी (पादपीठ) – गतिशील, भ्रमणशील – कवटी, ९) फ़लक-उल-

मनाज़िल – स्फटिकमय ग्रह (नक्षत्रविहीन महाव्योम), कवटीतील कळा, १०) फ़लक–अल–बुरूज – राशीचक्र. राशिचक्रामध्ये एकूण बारा (१२) राशी यांप्रमाणे आहेत : १. मेष – शीर्ष, डोके, २. वृषभ – ग्रीवा, मान, ३. मिथुन – हस्त, हात, ४. कर्क – स्तनाग्र, ५. सिंह – वक्ष, ६. कन्या – हृदय, ७. तुळा – नाभी, बेंबी, ८. वृश्चिक – गुप्तांग, ९. धनु – जांघ, १०. मकर – नितंब. ११. कुंभ – पाय आणि १२. मीन – पायाचे तळवे. ११) जुहल – शनि – प्लीहा, १२) मुश्तरी – गुरू – यकृत, १३) मिर्रीख – मंगळ – वृक्क (मूत्रपिंड) गुरदा (Kidneys), १४) शम्स – आदित्य – हृदयातील काळा ठिपका, १५) जुहरा – शुक्र – पित्ताशय, १६) उतारद – बुध – मेंदू, १७) क़मर – शशी, राका – फुप्फुस, १८) नार – तेजोवलय – पित्त, १९) हवा – वायुवलय – क़फ २०) मा – आपवलय – रक्त. २१) अर्ज – पृथ्वीवलय – कृष्णपित्त (Black Biles), २२) मादन – खनिजे – दात, २३) नबातात – वनस्पती – केस आणि नखे, २४) हैवान – पशू – लालसा, कामातुरता, २५) मलायक – देवदूत – मनोवृत्ती, सदवृत्ती, २६) जिन्न – यक्ष योनी, मनातील शंका, २७) इन्सान – मानव, नर – मन आणि सर्वात शेवटी २८) इन्सानुल कामिल – नरोत्तम – उपरोक्त सर्वांची संगुटिका, समष्टी.

विश्वनिर्माता या दृष्टीने परमेश्वराची एकूण अठ्ठावीस (२८) नामे आहेत. त्याच्याशी निगडित अशी निर्मित रूपे पण अठ्ठावीस आहेत. उपरोक्त अनुल्लेखित सात (७) नामांपैकी प्रथम चार नामे ही आत्मा–लोकाशी संबंधित आहेत. तर उरलेली तीन नामे ही प्रतिकृती लोकाशी निगडित आहेत. ती सात नामे क्रमश: याप्रमाणे आहेत –

१) अक्ले कुल (विश्वज्ञान), २) नफ़्से कुल (विश्वात्मा), ३) तबियते कुल (निरपेक्ष प्रकृती), ४) जौहरे हबा (भौतिक तत्त्व), ५) जिस्मे कुल (निरपेक्ष देह), ६) शक्ले कुल (निरपेक्ष रूप) आणि ७) अर्श (परमेश्वरी सिंहासन).

**३) नरोत्तमाचे प्रतीकात्मक पैलू –** एकदा हजरत अली (प्रेषित मुहम्मद यांचे जावई) आपल्या प्रवचनामध्ये एवढे तल्लीन झाले होते की, त्यांच्या तोंडून उत्स्फूर्तपणे पुढील उद्‌गार निघाले, – 'मी बिस्मिला' या शुभनामांतर्गत असलेला एक बिंदू आहे, मी (प्रारब्धाचे लिखाण करणारी) लेखणी आहे. मी सुरक्षित पट्टीका (लौहे महफ़ूज) आहे, मी अर्श (परमेश्वरी सिंहासन) आहे, मी कुर्सी (पादपीठ) आहे आणि मी आकाश (समावात) आहे. परमेश्वराचे नाम (अल्लाह) हे व्याख्यातीत असल्यामुळे युक्लिडच्या बिंदूप्रमाणे ते नकारार्थी आहे. परमेश्वराचे नाम (ज़ात) काय आहे हे सांगण्यापेक्षा ते काय नाही आहे, हे सांगणे जास्त शक्य आहे. जेव्हा ज़ात (नाम)ने आपली छाया–सावली पसरविण्यास सुरुवात केली, तेव्हा ते बोधमय – ज्ञेय झाले. पवित्र कुराणात याचे संकेत अशा प्रकारे आहे – ''तू पाहिले नाहीस काय की तुझा विधाता सावली कशी पसरवितो?'' – २५:४५. जेव्हा ज़ात (ईश्वरी नामा)चा हा बिंदू सप्तबिंदूपर्यंत विकसित झाला (लांब झाला), तेव्हा ते ज्ञेय स्वरूपात आले. अरबी सुलेखक, अरबीचे प्रथम वर्णाक्षर 'अलिफ' हे सप्तबिंदू लांबीपर्यंत लिहितात जसे –  जेव्हा हे सप्तबिंदू उदयास आले तेव्हा अहदियत (सर्वदा मुक्त सुषुप्तावस्था) हे वाहिदियत (जीवनमुक्त जागृतावस्था)मध्ये परिणत झाले. हे सप्तबिंदू म्हणजेच ईश्वराचे सप्तगुण आहेत. – १) ज्ञान

(इल्म), २) प्रकाश (नूर), ३) जीवन (वजूद), ४0 संकल्प – इच्छा (इरादा), ५) श्रवण (समा), ६) दृष्टी (बसर) आणि ७. वाणी (कलाम). या गुणोद्भवामुळे आणि याशिवाय पुनः अधिक अंतरणामुळे स्थूल देह (वाजिबूल वजूद) हे लिंग देह (मुमकिनुल वजूद) बनले. उभे 'अलिफ' हे वर्णाक्षर आडवे झुकले आणि त्याने 'बे' हे वर्णाक्षराचे स्वरूप धारण केले. खरोखरच आडव्या स्वरूपातील खाली एक बिंदू असलेले 'अलिफ'च (ب) आहे. 'अलिफ' हा अरबी वर्णमालेच्या सर्व २८ वर्णाक्षरांमध्ये सरळ व वक्राकार रूपाने विद्यमान आहे. म्हणजेच स्थूल देह हा सर्व प्रकारच्या व्यक्त आणि अव्यक्त जगांमध्ये व्याप्त आहे.

प्रेषित मुहम्मद हे निर्विवादपणे एक सर्वश्रेष्ठ नरोत्तम आहेत. त्यांच्याचसाठी विश्वनिर्मिती झाल्यामुळे प्रत्येक मानवाच्या चेहऱ्यावर त्यांचे अरबी भाषेत लिहिण्यात येणाऱ्या 'मुहम्मद' या नावाची रूपरेषा उमटलेली दिसून येते. धर्मपरायण श्रद्धाळू मुस्लिम लोक हे आपल्या मृत्युशय्येमध्ये इन्सानुल कामिल (नरोत्तम)च्या अंतरायमध्ये चिरनिद्रा घेण्याची उत्कट इच्छा बाळगून असतात.

**क) सय्यद मुहम्मद अल–हुसैनी गेसूदराज उपाख्य बंदा नवाजप्रणीत नरोत्तम (इन्सान–ए–कामिल)**

ब्रह्मांडनिर्मितीचे रहस्य हे, सूफ़ी सतत उद्धृत करत असलेल्या, दैवी प्रेषित वचन (हदीस कुद्सी) यामध्ये दडलेले आहे. ते म्हणजे प्रेषित दाऊद यांनी ईश्वरास विचारलेला हा प्रश्न की त्याने हे ब्रह्मांड (विश्व) का बरे निर्माण केले? ईश्वराने उत्तर दिले, ''मी एक दडलेला खजिना होतो आणि मी प्रकट–व्यक्त व्हावे हे आवडले म्हणून (मी ब्रह्मांड निर्मिले).''

उपरोक्त प्रेषित वचनाचे विवेचन करताना गेसूदराज म्हणतात की, 'खजिना' म्हणजे ईश्वराचे नाम (ज़ात), त्याच्या विविधांगी रूपांसह–गुणांसह. हे गुण आहेत – सौंदर्य (जमाल), प्रताप (जलाल), बळ (कुद्रत), ज्ञान (इल्म), श्रवण (समा), दृष्टी (बसर) आणि तत्सम इतर. हे गुण परमेश्वरामध्ये सुप्त शक्तिस्वरूपात विद्यमान असतात. हे कर्मस्तरावर व्यक्त व्हावेत असे त्याने इच्छिले. एखाद्या प्रियकराची आपल्या प्रेयसीसाठी असलेल्या उत्कट इच्छेप्रमाणे त्याची 'गरज' होती. हे आपल्या परीने अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण गेसूदराज यांना असे वाटते की निर्मितीचा मूळ आणि अंतिम हेतू हा प्रेम (मुहब्बत) आणि ब्रह्मज्ञान (मारिफ़त) असल्यामुळे परमेश्वराने म्हटले की ''ज्ञात होणे मला प्रिय वाटते.''

विश्वनिर्मितीचे दोन टप्पे आहेत. पहिल्या टप्प्यात परमेश्वर मानवास सोडून विविध जातीचे (अन्वा) पदार्थ समूह (ज़वात, वुजूदात) जसे सूर्य, चंद्र, ग्रह–तारे, पर्वत, वृक्ष, प्राणी व यांसारखे इतर निर्माण केले. थोडक्यात मानवविरहित ब्रह्मांड. प्रत्येक पदार्थामधून परमेश्वराचे एक–एक गुण व्यक्त झाले. (उदयास आले.)

पहिला टप्पा हा समाधानकारक नव्हता. कारण त्यामुळे परमेश्वराची मनोवांछित इच्छा पूर्ण होणारी नव्हती : प्रत्यक्ष दृष्टिक्षेपात माझ्या प्रकटीकरणास संपूर्णपणे जाणण्याची क्षमता असलेली त्या व्यक्तीची (आन कस) अद्याप गरज होती. अशा प्रकारे निर्मितीच्या दुसऱ्या टप्प्यास सुरुवात होते. हा टप्पा मानवाच्या आविर्भावाने सुरू होतो. परमेश्वर असे म्हटल्याचे सांगण्यात येते की, ''मी एक हजार वर्षेपर्यंत माझे डोके माझ्या मांड्यात (गुडघ्यामध्ये) घालून डोळे मिटून विचार करू लागलो, आणि त्याचा शोध घेऊ लागलो की कोणते बरे एखादे रूप आणि एखादी संरचना माझ्या प्रकटीकरण किंवा अभिव्यक्तीच्या माध्यमाने मला जाणू शकेल. मी मानवाच्या रूपाशिवाय इतर कोणत्याच रूपाविषयी विचार करू शकलो नाही. याच कारणामुळे आणि याच

हेतूने, चाळीस वर्षेपर्यंत मी आपल्या दोन्ही हातांनी (मानवाचे आदि प्रपितामह) आदमची आकृती घडविण्याखातर माती कालविली, की जेणेकरून पृथ्वीतलावर तो माझा एक प्रतिनिधी बनून जावे आणि माझ्या स्वर्गात माझा एक सार बनावे. अनिवार्यत: सर्व प्रकारची प्रकटीकरणे त्या आकृतीमध्ये सामावलेली असावीत अथवा त्यामध्ये ब्रह्मांडामधील सर्व प्रकारच्या जाती आणि पदार्थ यांची सर्वसमावेशकता असावी, की जेणेकरून तो (मानव) स्वत: होऊन मला ओळखेल.''

विविध (वैविध्यपूर्ण) वस्तूंमध्ये परमेश्वराच्या गुणांचे प्रकटीकरण करणे एवढाच (विश्व) निर्मितीचा हेतू नसून त्याच्या स्वत:च्या व्यक्तित्वाची जाण ठेवणे पण आहे. हे केवळ इतर अन्य व्यक्तींच्या आत्म-बोधाने शक्य आहे, म्हणजेच परिपूर्ण मानवी व्यक्ती अर्थातच नरोत्तम किंवा पुरुषोत्तम. यालाच काही भाष्यकार 'मुहम्मदीय आलोक' (नूर-ए-मुहम्मद) असे म्हणतात. यालाच मानवाचे समष्टिगत वस्तूंचे सार असे म्हणता येईल. 'घागरात सागर.' दुसऱ्या शब्दात सारांशरूपाने असे म्हणता येईल, 'जो स्वत:स ओळखतो तो आपल्या प्रभूस ओळखतो.'


मानव हा जरी विश्वाचे समष्टिगत रूप असला तरी कुठलाही मनुष्य विश्वाचे समष्टीगत रूप नसतो. हा मनुष्य फक्त पुरुषोत्तम किंवा नरोत्तम असतो आणि प्रेषित मुहम्मद हे नरोत्तम आहेत. नरोत्तमच 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' याचे निदर्शक असतो. नरोत्तम (नूर-ए-मुहम्मद) सत्याची किंवा ईश्वराची (हक्क) प्रेयसी होता व नित्य राहील. प्रत्येक अस्तित्वमय वस्तूचे तो आकलन करतो आणि प्रत्येक अन्य प्रकाश हा त्याच्या प्रकाशापासून उद्‌भवतो. तोच प्रकाश सर्वप्रथम असून शेवटचा पण तोच आहे. तोच अंतर्बाह्य प्रकाश आहे, कारण की तो नामाची अभिव्यक्ती - प्रकटीकरण (मज़हर-ए-जात) आहे.

परमेश्वराने मानवास सर्वसमावेशक असे स्वरूप प्रदान केले आहे. सर्व पदार्थ मानवाच्या चौकटीत निर्माण केले आहे. याचाच अर्थ असा की अव्यक्त स्वरूपात असलले परमेश्वराचे सर्व गुण मानवाच्या माध्यमातून प्रत्यक्षपणे व्यक्त होतात. मानवाचे अंत:करण (दिल) या सर्वांना ग्रहण करते. हा निर्मितीस्रोत प्रत्यक्षपणे परमेश्वराच्या छायेचा प्रतिबिंब असतो. म्हणजेच सूक्ष्मलक्षी जग या नात्याने मानव समस्त ब्रह्मांडास प्रतिबिंबित करतो. जगाच्या माध्यमाने परमेश्वर ओळखला जाऊ शकत नाही. प्रत्युत सूफ़ींची तऱ्हा काही औरच आहे. म्हणून तर ते म्हणतात. ''घरी बसून प्रवास करा'' आणि परत ''जनसमूहामध्ये एकांतवास शोधा.'' म्हणजेच मानवाच्या स्वत:च्या अस्त्विामध्येच ब्रह्मांड दिसून येते. ''पिंडी ब्रह्मांड'' - पिंडातच ब्रह्मांड. ''आत्मावलोकन करा म्हणजे तुम्हास सर्व काही दिसेल.''

ब्रह्मांडनिर्मितीसंबंधी कर्मणी प्रयोगात असलेले प्रसिद्ध दैवी प्रेषित वचन (हदीस कुदसी) कर्तरी प्रयोगात ठेवून गेसूदराज यांनी केलेले विश्लेषण अत्यंत मनोरंजक आहे. मूळ वचन याप्रमाणे आहे - ''मी एक दडलेला खजिना होतो आणि मी प्रकट व्हावे हे आवडल्यामुळे मी ब्रह्मांड निर्मिले.'' गेसूदराज यांनी सदरहू विधान कर्तरी प्रयोगामध्ये असे मांडले आहे. - ''स्वत:स जाणून घेण्यासाठी मी ब्रह्मांड निर्मिती केली.'' (खल्क रा आफरीदम ता खुदा रा शनासम.) म्हणजेच, गेसूदराज विवेचन करतात की, वस्तूंना अस्तित्व प्रदान करण्याअगोदर परमेश्वर हा 'सर्वज्ञ' होता, तर वस्तूंच्या अस्तित्वनिर्मिती नंतर तो 'सर्वज्ञात' झाला. याचा आपण असा अर्थ घेऊ शकतो की निर्मिती अगोदर असलेले परमेश्वराचे सुप्त सार्वभौमिक ज्ञान हे निर्मिती नंतर विशिष्ट असे अनुभवात्मक ज्ञान

बनले. गूढ अनुभूतीच्या संदर्भात गेसूदराज अशा प्रकारच्या ज्ञानास ‘‘प्रत्यक्ष दृष्टी दर्शन’’ (ऐन अल्-इयान) असे संबोधतात. भाष्यकाराच्या भाषेत याला असे म्हणता येईल की, ‘‘अव्यक्त स्वरूपात परमेश्वराचे एक ज्ञेय स्वरूपात असणे म्हणजेच त्याचे सर्वज्ञ असणे होय,’’ तर त्याचे व्यक्त असणे हे त्याचे सर्वज्ञात रूप असते. ‘‘आरशाच्या एका सुंदर दृष्टांताद्वारे गेसूदराज यांनी सदरहू कल्पना आणखी जास्त स्पष्ट केली आहे. मानव आपले स्वत:चे प्रतिबिंब आरशात पाहू शकतो. ‘‘मात्र कोणतीच व्यक्ती स्वत:चे प्रतिबिंब आरशाविना पाहूच शकत नाही. प्रतिबिंब पाहण्यासाठी आरसा हवा असतो. (६४८) म्हणून तुम्ही आपल्या स्व-व्यक्तित्वाकडे पाहा. म्हणजे तुम्ही आपले स्वत:चे सौंदर्य न्याहाळाल.’’ गेसूदराज पुढे म्हणतात की हे असे आहे जणू की लैलाचे आरशात पाहताना स्वत:च्या सौंदर्यास मजनूँ संबोधण्यासारखे आहे. ‘‘तो (परमेश्वर) प्रत्येक अणूरेणूमध्ये आहे. तो प्रत्येकासोबत आहे, (परंतु) प्रत्येक वस्तू ही त्याच्यापासून (निर्मित) आहे आणि त्याच्या अस्तित्वात आहे. तो स्वत: स्वत:स पाहतो आणि स्वत:शीच क्रीडा करतो. स्वत:स सोडून इतरांशी तो व्यस्त नसतो.’’ तथापि गेसूदराज यांच्या मते निर्मितीचा आंतरिक अर्थ आणि हेतू; ‘‘मी ज्ञात व्हावे हे आवडल्यामुळे’’ या विधानावरून ‘प्रेम’ (मुहब्बत) आणि ‘ज्ञेय’ वा ‘ब्रह्मज्ञान’ (मारिफत) असा होतो. ते पुढे म्हणतात, ‘प्रेम’, ‘रती’ (इश्क) नसते तर आकाशाने अर्थात सूर्य-चंद्र यांनी दिशा बदलली नसती, समुद्रास उकळी आली नसती, पाऊस पडला नसता, वनस्पती उगवल्या नसत्या, प्राणी जन्मले नसते, मानव प्रौढ झाला नसता, परमेश्वराची कोणीच उपासना केली नसती आणि परममेश्वराचे सौंदर्य कुणीच पाहिले नसते.’’

सारांश, परमेश्वराचे ‘सर्वज्ञ’ असणे, यातच निर्मितीची संपूर्ण प्रक्रिया सामावलेली आहे आणि त्याचे आणि त्याचे ‘सर्वज्ञात’ होणे, हे सूफ़ी त्या परतीच्या साधनायात्रेचे निदर्शक आहे. अशा प्रकारे चक्र पूर्ण होतो आणि परमेश्वर हा आरशात स्वत:स पाहिलेला असतो.




**नरोत्तम व पुरुषोत्तम (इन्सान-ए-कामिल)**

उपरोक्त विवेचनावरून ‘हदीस कुद्दुसी’ हा शब्द ‘नरोत्तम’ या सर्वप्रथम निर्मितीकडे अंगुलीनिर्देश करतो. नरोत्तम हा या अर्थी ‘परिपूर्ण’ मानला जातो की सर्व अस्तित्वांच्या संपूर्णतेचे त्याला आकलन असते. दुसऱ्या शब्दामध्ये प्रत्येक वस्तूमध्ये अभिव्यक्त परमेश्वराच्या गुणांची संपूर्णता, ही नरोत्तम या संकल्पनेमध्ये समष्टिरूपात एकवटलेली दिसून येते. वास्तविक नरोत्तमाची संकल्पना ही परमेश्वराच्या समस्त नामारूपांची परिपूर्ण अभिव्यक्ती असते. ही अभिव्यक्ती परमेश्वराच्या स्वत:च्या चेतनेमध्ये होत असते. अशा प्रकारे तो

बृहत्तर विश्वाचा प्रतिरूप असतो. निर्मितीस्रोत, मुहम्मद असण्याची वास्तविकता, मुहम्मदीय प्रकाश किंवा आलोक, सर्वात महान चेतना हे सर्व शब्दप्रयोग बृहत्तर विश्व किंवा नरोत्तमासाठी समानार्थी म्हणून प्रयुक्त होतात. परमेश्वराच्या दृष्टीक्षेपाने पाहता बृहत्तर विश्व हे दैवी निर्मितीस्रोत असते. यालाच प्रभु-कृपा असेही संबोधता येऊ शकते. येथे आम्ही मानवाच्या दृष्टिकोनातून विवेचन प्रस्तुत करीत आहोत. थोडक्यात, जर बृहत्तर विश्व हे नरोत्तम असेल तर विशिष्ट स्वरूपात हा पुरुषोत्तम कोण बरे असेल? मग आपण पाहू की ही संकल्पना कशा प्रकारे परतीच्या प्रवासातील सूक्ष्मलक्षी जगाचे प्रतीक बनून जाते.


गेसूदराज सविस्तर विवेचन करतात की, नरोत्तम (पुरुषोत्तम) हा प्रेषित मुहम्मदाशिवाय दुसरा कुणीही नाही. कारण हे सर्वात अधिक परिपूर्ण आहेत. ते इतर सर्व प्रेषितांहून श्रेष्ठतर आहेत. म्हणून ते 'प्रेषितांची मुद्रा' म्हणजेच अंतिम प्रेषित - ३३:४० आहेत. ('खातिमन्नबिय्यन') ते सर्व अस्तिवांचे प्रकटीकरण आहेत आणि त्यांच्याच खातर परमेश्वराने (आदि प्रपितामह) आदम आणि विश्वाची निर्मिती केली. अशा प्रकारे प्रथमत: गेसूदराज यांनी 'बृहत्तर विश्व', 'मुहम्मदाची चेतना' आणि 'सूक्ष्मलक्षी जग', 'प्रेषितांची मुद्रा' यामधील फरक न दाखवता, दोन्ही स्तरांची ओळख करून देण्यात जास्त भर दिला आहे. मात्र त्यांनी 'अहमद' आणि 'मुहम्मद' यामधील फरक मान्य केले आहे.

एका दीर्घ प्रक्रियेच्या फलस्वरूप प्रेषित मुहम्मद निर्माण झाले. (उदयास आले, जन्मले) ही प्रक्रिया उसाच्या रसापासून साखर तयार करण्यासारखी आहे. गेसूदराज लिहितात की, संपूर्ण सृष्टीची चाळणी केल्यावर परिणामस्वरूप आदम व इतर सर्व प्रेषित जन्मास आले. पुन्हा या प्रेषितांची चाळणी केल्यानंतर परिणामी प्रेषित मुहम्मद यांचा जन्म झाला. याच कारणास्तव आदम, नूह, मूसा, इब्राहीम व ईसा या प्रमुख प्रेषितांचे तसेच इतर सर्व प्रेषितांचे पूर्णत्व प्रेषित मुहम्मदमध्ये 'रोख' स्वरूपात एकवटलेले आहे. अशा प्रकारे, इतरांना त्यांचा हेवा वाटावे असे त्यांचे पूर्णत्व होते. ते सोबत एक शिया हदीस (प्रेषित वचन) पण जोडतात. ती हदीस याप्रमाणे आहे. 'आदमच्या निर्मिती अगोदर चार हजार वर्षांपूर्वी मी आणि अली एकाच प्रकाशापासून निर्माण झालेले आहोत.' प्रेषित मुहम्मद यांच्या या पूर्णत्वाच्या गुणधर्मांमुळे कदाचित गेसूदराज हे मुस्लिम सूफ़ी संतांना बनी इस्त्राईलच्या प्रेषितांसमकक्ष मानत असत. शिवाय, नरोत्तमाच्या दृष्टिकोनातून प्रेषित मुहम्मद हे संपूर्णपणे परमेश्वराशी अभिन्न होते. हे निर्मितिस्रोत वा दैवी कृपा दर्शविते. हे परमेश्वराच्या नामाचे (जात) प्रारंभिक प्रकटीकरण आहे. याला सय्यद हुसैनी 'द्वितीय सागर' (दरियाए दुय्यम) असे म्हणतात. तर परमेश्वराचे प्रत्यक्ष नाम हे 'प्रथम सागर' (दरियाए अव्वल) आहे. निर्मितीस्रोत वा दैवी कृपा प्रत्यक्षपणे 'परात्पर शून्य स्थाना' पासून येते. प्रेषित मुहम्मद हे ईश्वराच्या नामाच्या अभिव्यक्ती स्वरूप आहेत. शिवाय ब्रह्मांडनिर्मिती-रचनेमध्ये उपरोक्त दोन 'नाम' (जात) हे नरोत्तमाचे सकारात्मक आणि नकारात्मक असे दोन पैलू दर्शवितात. म्हणून असे म्हणणे वावगे ठरणार नाही की 'पुरुषोत्तम' वा 'दैवी निर्मितीस्रोत' वा 'मुहम्मदाच्या अस्त्विाची वास्तविकता' या स्वरूपात परमेश्वराची निर्मिती किंवा प्रकटीकरण त्याच्या स्वत:च्या नामातच निर्माण झाले. थोडक्यात हे प्रकटीकरण परमेश्वराच्या चेतनेत निर्माण झाले. प्रेषित आणि परमेश्वरामध्ये असलेल्या अद्वितीय आणि आत्मविरोधी सत्य स्वरूप संबंधावर प्रकाश टाकण्यासाठी गेसूदराज हे पुढील कौराणिक श्लोक उद्धृत करतात - 'जो कोणी प्रेषितांच्या आज्ञेचे पालन करतो, तो खरोखर अल्लाहच्याच आज्ञेचे पालन करतो.' - ४:८०.

एका अन्य दृष्टिकोनातून या संकल्पनेची अत्यंत रोचक अशी एक मीमांसा गेसूदराज यांनी प्रस्तुत केली आहे. ती अशी – परमेश्वराने स्वत:स तीन टप्प्यांवर प्रकट केले. या (परमेश्वरा)ने 'एका' (अहद)पासून 'परम स्तुत्य' (अहमद) आणि मग 'स्तुतीयोग्य' (मुहम्मद) प्रकट केले. 'अहमद'मधील वर्णाक्षर 'म' (मीम) हे 'अहद' वर एक परिवेष्टन (पडदा) आहे. हे विवेचन अत्यंत विशिष्ट असे आहे, कारण हे समस्येचे तीन पैलू स्पष्ट करते. आमच्या विवेचनानुसार 'अहद' हे त्रानातीत परमेश्वराचे निर्देश करते. 'अहमद' हे नरोत्तम वा पुरुषोत्तम दर्शवितो अथवा बृहत रूपामध्ये दैवी निर्मितीस्रोत दर्शवितो आणि 'मुहम्मद' हे सूक्ष्म रूपात प्रेषित मुहम्मदवर प्रकाश टाकते. ते नरोत्तम आणि परमेश्वर यामधील अंतर सुद्धा राखते. हे पुढील कौराणिक श्लोकांमध्ये स्पष्ट आहे – 'आणि तो (प्रेषित) क्षितिजाच्या सर्वोच्च ठिकाणी होता तेव्हा (अल्लाहने) आपली ईशवाणी प्रकट केली आहे. नंतर तो (प्रेषित) (ईश्वराच्या) समीप आणखी वर गेला; मग तो खाली (मानव जातीकडे) आला, त्यामध्ये तो (जणू काही) दोन धनुष्यांची एक दोरी (असल्याप्रमाणे) जवळ किंवा त्यापेक्षाही जवळ आला.' ५३:७–९. या 'जवळच्या अंतराला' गेसूदराज 'अहमद मधील 'म' (मीम) मानतात.

ब्रह्मांडनिर्मिती – रचनेमध्ये बृहत्तर जगाचे काय स्थान आहे, याची सर्वसाधारण कल्पना गेसूदराज यांच्या पुढील विवेचनावरून स्पष्ट होते.

**(वरा–उल–वरा)**



प्रेषित मुहम्मद यांचे आपण दोन पैलू पाहिलेत - १) बृहत्तम तर दुसरे २) लघुत्तम किंवा सूक्ष्मलक्षी रूप. एका वेगळ्या तऱ्हेने असेही म्हणता येईल - आंतरिक दृष्टीने पाहता ते बृहत्तम आहेत; तर बाह्य दृष्टीने पाहता ते लघुत्तम वाटतात. अशा प्रकारे, बृहत्तम रूप हे संत-त्त्व विलायत दर्शविते, तर लघुत्तम रूप हे प्रेषित-त्त्व नबुवत या गुणांचे निदर्शक आहेत. प्रेषित-त्त्व (प्रेषिताची ऐतिहासिक आकृती) आणि संत-त्त्व (नरोत्तम वा पुरुषोत्तम) हे दोन्ही एका भौतिक (शारीरिक) अस्तित्वामध्ये एकरूप होऊन जातात. म्हणजेच प्रेषित मुहम्मद यांचे वास्तविक एक व्यक्ती या नात्याने शारीरिक स्वरूप आणि वास्तविक हे दोन्ही एकच आहेत. इतर अन्य सर्व व्यक्तींपेक्षा त्यांच्या श्रेष्ठत्वामुळे प्रेषित मुहम्मद हे अंर्तबाह्य दोन्ही स्वरूपात प्रत्यादर्श म्हणून गणले जातात. दोन्ही प्रकारे त्यांचे अनुकरण - अनुसरण झाले पाहिजे. अशा प्रकारे बाह्यत: त्यांनी प्रस्तुत केलेल्या आचारसंहितेचे परिपालन सूफ़ीने केले पाहिजे आणि आंतरिक दृष्टीने ते, नरोत्तम (पुरुषोत्तम) असल्यामुळे गूढ प्रवासामध्ये उत्कर्ष साधण्यामध्ये तो (सूफ़ी) बराच लांब असतो. प्रभु-प्रकाश अर्थात प्रभु-दर्शनाचे दुसरे पैलू हे स्पष्ट करते. हे मानवासाठी त्याचे प्रकटीकरण असते. याच दृष्टिकोनातून परमेश्वर हा 'सर्वज्ञात' (खबीर) बनून जातो.

**नरोत्तम आणि साधनेचा गूढ प्रवास**

गेसूदराज यांनी गूढ विकासाचे पाच टप्पे मानले आहेत - १) कर्मकांड (शरीअत), २) उपासनाकांड (तरीक़त), ३) वास्तविकता (हक़ीक़त), ४) वास्तविकतेचे सत्य (हक़्क़-ऊल-हक़ीक़त) आणि ५) सत्याची वास्तविकता (हक़ीक़त अल - हक़्क़) या टप्प्यांचे ते असे विवेचन करतात - कर्मकांड वा विधि-विधान (शरीअत) म्हणजे नरोत्तमाची वचने, उपदेश (गुफ़्त), उपासनाकांड किंवा साधनामार्ग नरोत्तमाचे कार्य (कृती/कर्द) असते, वास्तविकता (हक़ीक़त) ही नरोत्तमाची दृष्टी (दीद) असते; वास्तविकतेचे सत्य (हक़्क़ अल्-हक़ीक़त) नरोत्तमाचे असणे (अस्तित्व) (बूद) असते आणि सत्याची वास्तविकता (हक़ीक़त-अल्-हक़्क़) नरोत्तमाच्या निरस्तित्वाचे अस्तित्व असते. गेसूदराज यांनी इतरत्र एक सहाव्या टप्प्याचा पण उल्लेख केला आहे. तो आहे 'परमसत्य' (अल्-हक़्क़) ते त्याला 'अस्तित्वाचे अस्तित्व आणि निरस्तित्वाचे अस्तित्व' (बूद-ए-बूद व बूद-ए ना बूद) असे संबोधतात. दुसऱ्या एका ग्रंथात ते 'सत्याचे सत्य' (हक़्क़-ए हक़्क़) म्हणून संबोधून त्याचा खुलासा 'अस्तित्वासाठी अस्तित्व' (बूद रा बूद) असे करतात. हे दोन्ही समानार्थी वाटतात. हे त्रानातीत परमेश्वराचे निर्देश करतात. तो परात्पर शून्य स्थानावर (वरा उल-वरा) विराजमान असतो. हा एक टप्पा असा आहे की जो द्वैततेची मान्यता स्वीकार करतो. उपरोक्त प्रथम पाच टप्प्यांशी या सहाव्या टप्प्याची गल्लत करता कामा नये. एखादे गूढवादी सूफ़ी साधकाचा शेवटचा टप्पा हा 'सत्याची वास्तविकता' असतो. येथे त्याला परमेश्वर हा परात्पर शून्य स्थलावर असतो, याची जाणीव होते. 'परम सत्य' किंवा 'सत्याचे सत्य' याचे विवेचन असल्याचा भास होतो. हा एक टप्पा कदाचित 'हक़्क़ अल्-हक़ीक़त' आणि 'हक़ीक़त अल्-हक़्क़' या दोन्हींचा एकत्रित टप्पा वाटतो.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, विधी-विधान किंवा कर्मकांड (शरीअत) सेवकत्वासाठी (उबुदिय्यत) अनिवार्य असते. यामध्ये धार्मिक कर्तव्यकर्माचे परिपालन असते, आणि यामुळे साधक हा आपल्या हृदयास पवित्र करण्याचा प्रयत्न करतो. यामुळे साधनेच्या गूढ प्रवासात त्याला प्रगती साधता येते.

कर्मकांडानुसार तो स्वत:स परमेश्वराच्या सेवेत मग्न ठेवतो. या अनिवार्य कर्तव्यकर्माचे गेसूदराज दोन प्रकार मानतात. प्रथम प्रकारामध्ये ईश्वराची सेवा करणे, याचा समावेश होतो. उदाहरणार्थ, प्रार्थना-उपासना करणे, दुष्कृत्यापासून परावृत्त होणे, इतरांचे हक्कभंग न करणे, न्यायास कवटाळणे आणि थोडक्यात धर्माच्या सीमेच्या आत राहणे. दुसऱ्या प्रकारामध्ये नित्य सेवकत्व भावात राहणे मोडते. (बा-सिफ़ात ए बंदगी) दुसऱ्या शब्दामध्ये जे काही सर्व योग्य असेल त्यावर दृढ राहणे आणि एखाद्या सेवकास आणि सेवकत्वासाठी जे काही लायक असेल ते सर्व अमलात आणणे. पहिला प्रकार हा विधी-विधाना (शरीअत)शी संबंधित आहे किंवा नरोत्तमाच्या वचनांशी निगडित आहे. दुसरा प्रकार साधनामार्ग (तरीकत) किंवा नरोत्तमाच्या कर्माशी (कर्द) संबंधित आहे.

तिसरा आणि चौथा टप्पा स्पष्ट करताना म्हणजेच वास्तविकता (हक़ीक़त) अथवा नरोत्तमाची 'दृष्टी' आणि वास्तविकतेचे सत्य (हक़्क़-अल्-हक़ीक़त) अथवा नरोत्तमाचे 'अस्तित्व', गेसूदराज पवित्र कुराणातील दृष्टांत देतात. हक़ीक़त नावाच्या या तिसऱ्या टप्प्यामध्ये साधकास परमेश्वराच्या वास्तविक स्वरूपाचे ज्ञान होते आणि मग तो परमेश्वरावर संपूर्णपणे अवलंबून राहतो. तो विश्रंभ (तवक्कुल) बनतो. या संदर्भातील दृष्टांतांपैकी एक दृष्टांत आहे, प्रेषित (मूसा) आणि 'प्रखर वृक्षाचे.' ते म्हणतात की, हा तिसरा टप्पा 'वास्तविकता' (हक़ीक़त) अनुभवण्यासारखे आहे. गेसूदराज म्हणतात की, 'प्रखर वृक्ष' आणि 'मागून त्याला घालण्यात आलेली साद' हे त्या (परमेश्वरा)च्या पासून अवतरित झालेले प्रकटीकरण आहे, प्रत्यक्ष परमेश्वराची वाणी नव्हे. आणि जेव्हा तो (मूसा) त्या (आगीजवळ) आला, तेव्हा पवित्र ठिकाणी त्या खोऱ्याच्या उजव्या किनाऱ्यावर शुभ क्षेत्रात एका वृक्षामधून त्यास साद घालण्यात आली. 'हे मूसा, खरोखरीच मी अल्लाह आहे, सर्व जगांचा स्वामी.' - २८:३०.

नरोत्तमाच्या दृष्टीचा हा तिसरा टप्पा परमेश्वराचे प्रकटीकरण आणि परमेश्वर यामधील फरक दर्शवितो. 'दृष्टी'च्या तिसऱ्या गूढ प्रगतीपासून नरोत्तमाचे अस्तित्व किंवा वास्तविकतेपासून वास्तविकतेच्या सत्यापर्यंतचा हा चौथा टप्पा, एक अत्यंत कठीण कर्म आहे. वास्तविकतेचा सत्य, या चौथ्या टप्प्याचे विवेचन त्यांनी प्रेषित मूसाशी संबंधित एक दुसऱ्या घटनेच्या मदतीने केले आहे. तो प्रसंग आहे परमेश्वरास प्रत्यक्ष पाहण्याचा प्रेषित मूसा यांचा हट्ट. 'जेव्हा मूसा आम्ही नेमून दिलेल्या वेळी आला व त्याच्या विधात्याने त्याच्याशी संभाषण केले, तेव्हा त्याने विनंती केली की, 'हे माझ्या विधात्या ! मला सक्षम दृष्टी दे की मी तुला पाहावे.' (त्यावर) त्याने उत्तर दिले (की), 'तू मला कधीही पाहू शकणार नाहीस, बरे तर त्या समोरील पर्वताकडे पाहा, जर तो आपल्या जागी स्थिर राहिला तर अलबत तू मला पाहू शकशील.' म्हणून त्याच्या विधात्याने जेव्हा पर्वतावर तेज प्रकट केले तेव्हा त्याला चक्काचूर केले, आणि मूसा घेरी येऊन कोसळला. जेव्हा शुद्धीवर आला, तेव्हा म्हणाला, 'तू (अतिशय) पवित्र आहेस. मी तुझ्यापाशी पश्चाताप व्यक्त करतो आणि श्रद्धा ठेवणाऱ्यांपैकी मी सर्वात पहिला (श्रद्धावंत) आहे.' - ७:१४३, गेसूदराज पुढे लिहितात की खरोखर मूसा 'दृष्टी'च्या टप्प्यापासून 'अस्तित्वा (असण्या)च्या टप्प्यापर्यंत जाऊ इच्छित होते. ते पुन्हा म्हणतात की, नरोत्तमाच्या इच्छेस प्रत्यक्षात अवतरित करण्याच्या परिवर्तनाच्या या अवस्थेस स्पष्ट करणे हे अशक्य आहे. हे या कारणास्तव अशक्य आहे की या चौथ्या टप्प्यावर तुम्ही(च) आहात, परंतु वास्तविकतेचे सत्य ('हक़्क़ अल्-हक़ीक़त') हे तुमच्या

गुणांमध्ये बदल (सिफात-ए तू गर्दद) घडवून आणते. तुम्ही बेशुद्ध होऊन जाल, हे शक्य आहे. तुम्हाला जाणीव नसेल. वास्तविकतेच्या अस्तित्वामध्ये (दर बूद-ए हक़ीक़त) हे निरस्तित्वामध्ये (नाबूद) रूपांतरित होऊन जाईल, परिणामी तुमच्या गुणांमध्ये बदल घडून येतो. म्हणून गेसूदराज यांना असे वाटते की, वास्तविकतेच्या सत्याच्या टप्प्याची अनुभूतीचे वर्णन उदाहरणाशिवाय दृष्टांताशिवाय करता येऊ शकत नाही. परमानंद अवस्थेतील सूफ़ींचे उत्स्फूर्त भावोद्गार हे या विशिष्ट अनुभूतीची परिणती असते. अशा भावोद्गारापासून निर्मित 'एकत्वाची-सायुज्यतेची कल्पना' (गुमान-ए इत्तिहाद) ही या टप्प्याशी निगडित आहे.

शेवटच्या पाचव्या टप्प्याविषयी गेसूदराज यांना फार काही सांगता येण्यासारखे नाही. सत्याचे वास्तविकतेचे टप्प्याविषयी (हक़ीक़त अल्-हक़्क़) आकलन वास्तविक कोणीही करू शकणार नाही. मग तो एखादा प्रेषित किंवा एखादा संत-महात्मा किंवा एखादा देवदूत का असेना. याचे आकलन केवळ नरोत्तम करू शकतो. याचा अर्थ असा नव्हे की एखाद्या सूफ़ीची पोहोच इथपर्यंत अशक्य असू शकेल. उलट सत्याच्या वास्तविकतेच्या या टप्प्यावर एखादा सूफ़ी पोहोचतो. हा नरोत्तमाचा 'निरअस्तित्वाच्या अस्तित्वाचा' टप्पा असतो. कारण सूफ़ीसाठी हा शेवटचा टप्पा असतो. शिवाय या टप्प्याच्या पलीकडे जे काही आहे ते समजण्याच्या पलीकडे आहे. हे 'परात्पर शून्य स्थल' या संकल्पनेमध्ये अनुस्युत (समाविष्ट) आहे. विकासाच्या उच्चतर टप्प्यावर असलेल्या एखाद्या सूफ़ीस या (निम्नस्तर) टप्प्याचे आकलन होते. जोवर सूफ़ी एका टप्प्यावर स्थिर राहतो, तोवर आकलनाच्या अभावामुळे त्याची प्रगती अवरुद्ध होते. शिवाय, शेवटच्या दोन टप्प्यांमध्ये फार घनिष्ठ संबंध आहे. वास्तविकतेचे सत्य आणि सत्याची वास्तविकता यामध्ये घनिष्ठ संबंध प्रभु-प्रकाश किंवा प्रभु-दर्शन या निमित्ताने आहे.

उपरोक्त दोन टप्प्यांशी निगडित प्रभु-प्रकाशाचे (तजल्ली) दोन स्तर आहेत. निम्नस्तर स्तराचा संबंध वास्तविकतेचे सत्य (हक़्क़ अल्-हक़ीक़त) या चौथ्या टप्प्याशी आहे. उच्चतर स्तर हा पाचवा टप्पा सत्याची वास्तविकता (हक़्क़-अल्-हक़ीक़त) वर दृगोच्चर होतो. पूर्ववर्ती टप्पा हा उत्तेजना अवस्थेचे (सुक्र) वर्णन करतो, तर परवर्ती गंभीर अवस्थेचे (सह्व) निर्देश करतो. चौथ्या टप्प्यावरील निम्नस्तर हा दैवीकृपा किंवा दैवी निर्मितीस्रोत याचे प्रकटीकरण असतो. दुसऱ्या शब्दात ते ईश्वराचे समस्त गुण (तजल्ली ए-सिफ़ात) आणि नामिकांचे (अस्मा) प्रकटन असते. गेसूदराज निवेदन करतात की, या प्रकटीकरणामुळे परमेश्वराची (अल्लाहची) सर्व ९९ नावे गूढ साधकाचे गुण बनतात. हा साधक मुहम्मद असण्याच्या 'वास्तविकते'च्या गुणामुळे, तिच्या कथनाची पुनरावृत्ती करतो आणि मग परमानंद अवस्थेमध्ये आपल्या तोंडातून उत्स्फूर्त भावोद्गार काढतो. कारण तो स्वत:स परमेश्वर समजतो. गेसूदराज यांना असे वाटते की, साधकास येथेच निश्चितपणे आध्यात्मिक सद्गुरूची आवश्यकता भासते. त्यांच्या मते याच टप्प्यावर मंसूर-अल्-हल्लाज, अबू यज़ीद अल्-बस्तामी यांच्यासारखे उन्मत्त सूफ़ी असतात. म्हणून तर त्यांचे उद्गार असतात. 'अनल हक' म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' मीच परमेश्वर आहे. इत्यादी.

प्रभु-प्रकाशाचे सर्वोच्च स्तर 'नामच' (तज्जली-ए-जात) आहे. हा उच्चस्तरीय प्रकाश पाचव्या टप्प्यावरील सत्याची वास्तविकता (हक़ीक़त अल्-हक़्क़) येथे दिसतो. साधकाच्या उत्तेजनपर गंभीर अवस्थेचे

हे द्योतक असते. या अभिव्यक्तीचे सर्वांत रोचक पैलू म्हणजे साधकाचे या चौथ्या टप्प्यावर असताना साधकामध्ये जो 'अहम' असतो. 'सुबहान अल्लाह' (परमेश्वर तुझाच गौरव आहे). 'तो (परमेश्वर)च परम सत्य आहे. असे त्याचे वारंवार म्हणणे होय. तत्पूर्वी चौथ्या टप्प्यावर तो याउलट असे म्हणायचा 'मीच परम सत्य आहे', 'माझाच गौरव असो.'


गूढ सूफ़ी साधकांमध्ये घडून येणाऱ्या बदलामुळे या दोन टप्प्यांचे महत्त्व आहे. वास्तविकेचे सत्य (हक़ीक़त अल्-हक़्क़) या चौथ्या टप्प्यावर असताना साधकामध्ये जो 'अहम' (अना) असतो, तो सत्याची वास्तविकता (हक़ीक़त अल्-हक़्क़) या पाचव्या टप्प्यावर संपूर्णपणे नाहीसा होतो. त्याचा अहंकार नष्ट होतो. ही मंसूर अल-हल्लाजची अहंता (अन्नीय:) म्हणजेच 'मीपणा' आहे, याचा संक्षिप्त उल्लेख गेसूदराज करतात. 'माझे मी-पण (माझी अहंता) तुझ्यात आणि माझ्या दरम्यान पुरेपूर भरलेले आहे.' सत्याची वास्तविकता या पाचव्या टप्प्यावर गंभीरता (सहव) आणि विलय (महव) या दोन्ही अवस्था (मनोदशा) कार्यरत असतात. गूढ सूफ़ी साधकाची 'अहं-ता' ही नाम (जात) प्रकाशात विलीन होते आणि म्हणून तो (आता) म्हणतो, 'तो (परमेश्वर)च परम सत्य आहे.'

प्रभुप्रकाशच्या आधारे असलेल्या उपरोक्त दोन टप्प्यांमधील सूक्ष्म भेद हे बृहत्तमाचे दोन पैलू स्पष्ट करते. परिवेष्टनातील पैलू, यालाच आपण नकारात्मक पैलू म्हणू या. येथे 'मी-पणा' (अहं-ता) अद्याप असतो आणि गूढवादी सूफ़ी 'अहं ब्रह्मास्मी' म्हणजेच मीच परमेश्वर आहे, असे उच्चारित असतो. परिवेष्टित पैलू, यालाच आपण सकारात्मक पैलू म्हणू या, येथे गंभीरता किंवा 'जाणीव' (शुऊर) अध्याहृत आहे. येथे 'अहंता' (मी पणा) संपूर्णपणे नष्ट होते आणि गूढवादी सूफ़ी म्हणू लागतात. तो '(परमेश्वर)च परम सत्य आहे.' येथे हे विशेष करून लक्षात ठेवावे की परिवेष्ठित पैलू परात्पर शून्य स्थल निर्दिष्ट करते. प्रभुनामाशी (बा अस्मा) एकरूप झालेल्या साधकास दोन गोष्टींचे सत्यापन झालेले असते आणि तो अप्रतिम स्वभाव धारण करतो, एक तर अनंत यातना (दर्दे बे निहायती) आणि दुसरी गोष्ट अथांग समुद्राचे (दरियाए बेपायान) दर्शन (मुशाहिदता). हीच संकल्पना अबुल हसन नूरी यांनी मांडली असल्याची नोंद करून त्यांचे मत उद्धृत केले आहे. ''जर मी आहे तर तो नाही आणि जर तो आहे, तर मी नाही.'' (अगर मनमअू नीस्त व अगर अूस्त म न: अम.) 'अनंत यातनेमुळे', 'अहं ब्रह्मास्मी' म्हणजेच मी परमेश्वर आहे. असे उद्गार निघतात; तर 'अथांग समुद्र' तो परमेश्वरच परम सत्य आहे.'' याचा निर्देश करतो. मी परमेश्वर आहे, असे उद्गार निघतात. गेसूदराज यांच्या मते हा साधनेच्या गूढ प्रवासाचा सर्वोच्च टप्पा आहे. यालाच ते 'तद-त्त्व' (त्याचिया) (हुवीयत) असे म्हणतात.

सत्याची वास्तविकता ही पाचव्या टप्प्यावर, गूढ साधकास 'नाम' (जात) दिसू लागतो. येथे त्याला परमेश्वर त्रानातील असल्याची जाणीव होते आणि तो परात्पर शून्य स्थल असतो (वरा-उल-वरा). याच कारणास्तव ते 'परम ऐक्या'स (वुसूल) 'विशेष चेतना' (शुऊर-इ-खास्सी) असे संबोधतात, तसेच 'तू नाहीस, तो (च) आहे.' याची त्याला निश्चिती होते. याशिवाय शोध (वुजूद) याची पण 'चेतना' (शुऊर) आणि एक पूर्वसूचित अवस्था (इत्तिला) अशी ते व्याख्या करतात. या जाणिवेस ते 'प्रत्यक्ष दर्शन' (ऐन अल-इयान) असे म्हणतात. अनेकतेमध्ये एकता आणि एकतेमध्ये अनेकता असे त्याचे वैशिष्ट्य आहे; परंतु गेसूदराज यांच्या मते

असे नव्हे की परमेश्वराचे अस्तित्व सर्वामध्ये आहे. तथापि त्याची दया (फ़ैज़) मात्र सर्वांना घेरून आहे. 'पण माझी दया प्रत्येक वस्तूवर आच्छादित आहे.' -७:१५६ याच आधारे सूफ़ी म्हणतो, 'मी जे काही पाहतो त्या सर्वांमध्ये मी तुला ओळखतो.'

गेसूदराज यांच्या मतानुसार सृष्टी-रचना आणि गूढ साधकाच्या प्रवासाच्या दृष्टिकोनातून दोन्ही पैलूंचे तुलनात्मक रेखाचित्र खाली देण्यात येत आहे.




प्रेषितत्वाच्या दृष्टिकोनातून संबंधित टप्पे हे चढत्या क्रमाने असतील 'जबाबदारीचे ओझे' (बार), कर्म (कार), 'चातुर्य' (हिकमत), 'संत-त्त्व' व 'अर्हत-त्त्व' (वलायत) आणि 'प्रेषितत्त्व' (नुबुव्वत), संगीत श्रवणाच्या (समा) संदर्भात या टप्प्यासाठी प्रयुक्त पारिभाषिक शब्द असे आहेत. 'प्रयत्न' (कुसूद) 'आगमन' (वुरूद), 'ग्वाही' (शुहूद), शोध (वुजूद) आणि 'विलुप्त' (खुमूद). सूफ़ी मानसशास्त्रान्वये उपरोक्त टप्प्यांसाठी संबंधित सूक्ष्म द्रव पदार्थ (लतायफ़) याप्रमाणे आहेत - 'आत्मा' वा 'वासना' (नफ़्स), 'अंत:करण' (क़ल्ब), 'चेतना' वा 'आत्मा' (रूह), 'मर्म' (सिर्र), 'गुह्य', 'अव्यक्त' (ख़फ़ी).

सारांश, सृष्टीमध्ये मानव हा परमेश्वराची विशिष्ट अशी अभिव्यक्ती आहे. सजीवांमध्ये त्याचे स्थान सर्वोच्च आहे, परंतु मानवाचा चरमोत्कर्ष 'नरोत्तम' वा 'पुरुषोत्तम' आहे, नरोत्तमामध्ये परमेश्वराचे सर्व नाम-गुण एकवटलेले असतात. तो मानव आणि परमेश्वर यांमधील दुवा किंवा साखळी आहे. परमेश्वर त्याच्यामध्येच स्वत:स संपूर्णपणे व्यक्त करतो आणि अशा प्रकारे तो स्वत:स ओळखतो.

नरोत्तम हा साधनेद्वारे सर्व टप्पे पार करत एका स्तरावरून दुसऱ्या स्तरावर वर चढत चढत शेवटी अशा अवस्थेस जाऊन पोहोचतो की तो परमेश्वराशी 'एकत्व'तेचा बोध प्राप्त करतो. तो परमेश्वराचे साक्षात साक्षात्कार करण्याचे सामर्थ्य पण राखतो. म्हणून तो एकाच वेळेस प्रकृती आणि परमेश्वर या दोहोंच्या शक्तींना आरशाप्रमाणे दाखवून देतो. नरोत्तम अशी व्यक्ती असते की जी परमेश्वराशी 'एकत्वतेची' पूर्ण अनुभूती प्राप्त केलेली असते. त्याची निर्मिती ही परमेश्वराच्या अनुरूपच झालेली असते.

**ज्ञानक्षेत्रामधील मूलभूत तत्त्वांचे स्तर : पाच टप्प्यांशी निगडित पाच स्तर –**

| टप्पे | | परात्पर शून्य स्थल (वरा–उल–वरा) परम सत्य, सत्याचे सत्य | |
|---|---|---|---|
| ५) | नाम (ज़ात) | सत्याची वास्तविकता (हक़ीक़त अल–हक्क) परब्रह्म चेतना | गूढ अव्यक्त (खफ़ी) |
| ४) | रूप, गुण (सिफ़ात) | वास्तविकतेचे सत्य (हक़्क़ उल–हक़ीक़त) चैतन्य सत्य | मर्म (सिर्र) |
| ३) | (भक्ती) नामे (अस्मा) | वास्तविकता (हक़ीक़त) | आत्मा (रूह) |
| २) | कर्म (अफ़आल) | साधना मार्ग (तरीक़त) | मन, हृदय (दिल) |
| १) | कर्मआधार (मफ़ाईल) | विधि–विधान, कर्मकांड (शरीअत) | वासना (नफ़्स) |

(डॉ. मुहम्मद आज़म – 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' – पृ. ८८–९२, व पृ. ९६–१०९)

**नरोत्तमा (पुरुषोत्तमा) चे प्रकार**[७१]

लक्षात असू द्या की पुरुषोत्तम वा नरोत्तम, समस्त नाम–रूपे (गुण) हे दोन विभागामध्ये विभागले गेले आहेत. एक विभाग किंवा प्रकार हा त्याच्या उजव्या बाजूस आहे; तर दुसरा प्रकार हा त्याच्या डाव्या बाजूस आहे. त्याच्या उजवीकडे जीवन, ज्ञान, सामर्थ्य, संकल्प, श्रवण शक्ती, दृक् शक्ती आणि वाक् शक्ती हे सप्तगुण आहेत; तर डावीकडे अनाद्यता, अनंतता. प्रथमता, अंतिमता इत्यादी दैवी गुण आहेत. या सर्वांव्यतिरिक्त त्यास एक शीतल आनंद, स्वाद पण आहे. याचे नाव सर्वश्रेष्ठत्वतेचे स्वाद असे आहे. त्यास तो क्षेत्रत्वाच्या दृष्टीने आपल्या समस्त अस्तित्वामध्ये अनुभूत करतो. इथपर्यंत की काही निरासक्त लोकांनी या आनंदमग्न अवस्थेमध्ये लिप्त होण्याची विनवणी केली आहे. या लोकांना हेय समजणाऱ्या व्यक्तीच्या मतामुळे तुम्ही अहंकारी, घमेंडखोर बनून जावे. कारण की त्याला या स्थळाची ना जाणीव असते ना ज्ञान. या स्थळावर पुरुषोत्तमा (नरोत्तमा)स याच्या संबंधात नाम–रूपांसारखी समृद्धी प्राप्त होते. यांच्याकडे त्याची दृष्टी नसते; तथापि नाम–रूपे आणि अधिसत्ता ('ज़ात') यापासून विरक्त होऊन म्हणजेच एकटे पडून (होऊन) तो त्याच्या तदत्वा ('हुविय्यत')च्या अस्तित्वामध्ये कोणत्याच गोष्टीस जाणत नाही. अंत:करणामधील दृढ विश्वास आणि

गुह्य ज्ञानाच्या अभिव्यक्तीच्या बळावर तो अस्तित्वास म्हणजेच जगास पाहतो – मग ते अस्तित्व उच्च (श्रेष्ठ) असो वा सर्वसामान्य जगातील असंख्य वस्तूंना तो स्वत: जातीनिशी अशा रीतीने पाहतो की जसे की (जणू की) एखादी व्यक्ती ही आपल्या मनामधील विचार आणि वास्तवास पाहते. पुरुषोत्तमा (नरोत्तमा)स आपल्या मनापासून सामान्य व उच्च विचारांना हटविण्याचे म्हणजेच वेगळे करण्याचे सामर्थ्य असते. मग जगामधील गोष्टींमध्ये कुठल्याच वस्तूशी त्याचा व्यवहार ना विशेष्य असल्यामुळे असतो ना कोणत्या तरी साधन स्वरूपात ना नावाखातर ना जगरहाटीच्या निमित्ताने; परंतु तो असा व्यवहार असतो जसे की आमच्यापैकी कुणाशी तरी तो संभाषण करतो किंवा जेवण-खाण करत आहे. पुरुषोत्तमाचे तीन मध्य जग आहेत आणि त्याच्यापुढे एक स्थळ आहे. त्या स्थळाचे नाव परिसमापक ('ख़त्ताम') आहे. प्रथम मध्य जग हे मार्गदर्शन ('हिदायत') आहे. ते नाम-रूपांशी निगडित आहे. दुसऱ्या मध्य जगाचे नाव आहे मध्यवर्ती. ते दैवी वास्तवांसह मानवी चेतनेचे आकाश आहे. जेव्हा हे स्रोत स्थळ परिपूर्ण बनून जाते तेव्हा नरोत्तम हा सर्व अव्यक्त वस्तूंना ओळखतो-जाणतो. गुह्य गोष्टींपैकी आपल्या मनाला वाटेल त्या गूजाची तो माहिती करून घेतो.

येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की अदृश्याच्या चाव्या (किल्ल्या) ह्या परमेश्वराशिवाय इतर कुणाच्याच हातात नसतात. या संदर्भात पवित्र कुराण निवेदन करते की, ''अदृश्या (अदृष्टा)च्या चाव्या (किल्ल्या) त्याच्याचपाशी आहेत, त्याच्याशिवाय त्यांना (मानवांसाठी अदृश्य असलेल्या गोष्टी) कोणीही जाणत नाही.'' – ६:५९. परमेश्वर हा मनाला वाटेल तेव्हा चावी लावून परोक्ष जाणून घेतो. येथे लेखक सय्यद अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली यांचा अभिप्राय संभवत: त्या घटनांशी असावा की ज्या मनोकामनेमध्ये घडत असतात. ईश्वरच सत्य ते जाणो!

तिसरे मध्य जग हे वेगवेगळ्या युक्त्यांनी घडून येणाऱ्या दैवी चमत्कारांना जाणून घेण्याचे आहे. नेहमी सामर्थ्याच्या साम्राज्यामध्ये मानवाकडून चमत्कार घडत असतात. इथपर्यंत की चमत्कार आणि दैवी बुद्धिमत्ता हे त्याच्या स्वभावाचे भाग बनून जातात. त्यावेळेस त्याला इहलोक व परलोक – या दोन्ही लोकांमध्ये आपले सामर्थ्य व्यक्त करण्याची आज्ञा दिली जाते. मग जेव्हा त्याला या तृतीय मध्य जगामध्ये कौशल्य प्राप्त होते तेव्हा त्या वेळेस तो परिसमाप्तीचे स्थळामध्ये ('मक़ाम-ए-ख़त्ताम') उतरतो. हे स्थळ ईश्वरी प्रताप आणि दया व कृपेशी निगडित आहे. त्या ईश्वरी महत्ता किंवा ईश्वराशिवाय काहीच नाही. आणि ते स्थळ अपार आहे. त्याला हद्द नाही. याच्या पराकाष्टेचा पत्ता नाही. या स्थळावर माणसे वेगवेगळ्या श्रेणींमध्ये असतात. त्यांपैकी काही निपुण, दक्ष आहेत; तर काही सर्वांगपूर्ण आहेत. काही विद्वान आहेत; तर काही महापंडित आहेत.

वर नमूद केल्याप्रमाणे संपूर्ण ब्रह्मांडाचे समस्त घटक हे पुरुषोत्तम म्हणजेच नरोत्तमामध्ये एकवटलेले असतात. ते कशा प्रकारे एकवटलेले आहेत याचा खुलासा उपरोक्त कोष्टकावरून होतो –

**पुरुषोत्तम (नरोत्तम) : संपूर्ण ब्रह्मांड घटकधारी**
**पुरुषोत्तम वा नरोत्तम ('इन्सान-ए-कामिल')ची तुलना 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' शी**

| **ब्रह्मांडामधील घटक**<br>**ब्रह्मांड** | **पिंडा(नरोत्तमा)मध्ये अवस्थान**<br>**पिंड** |
|---|---|
| हक़ायक़ उलूविया = सर्वोच्च वास्तव | लताफ़त = सूक्ष्मता, मृदुलता |
| हक़ायक सिफ़लिया = रसातळीय वास्तव | कसाफ़त = मलिनता, जड |
| हक़ायक़ खल्किया = सृष्टीचे वास्तव | क़ल्ब = अंत:करण |
| अर्श = ईश्वरी राजसिंहासन | अनियत = अहंकार |
| कुर्सी = पादपीठ | मक़ाम-ए-आला = उच्च स्थळ, लक्ष्मण रेषा |
| सिद्रतुल मुंतहा = कल्पवृक्ष, 'लक्ष्मण रेषा' | अक़्ल = विवेकबुद्धी |
| कलम-ए-आला = सर्वोच्च लेखणी (दिव्य ज्ञान) | नफ़्स = वासना / आत्मा |
| लौह-ए-महफ़ूज = सुस्पष्ट ग्रंथ, सुरक्षित पाटी | तबा = स्वभावधर्म |
| अनासिर = पंचमहाभूत | क़ाबलियत = द्रव्य-योग्यता |
| हैयूला = मूल प्रकृती, जड तत्त्व | ख़ेज़-ए-हैकल = रूपवर्धक |
| गुब्बार वा ज़र्रात = रजकण, अणुरेणू | राय = मत |
| फ़लक-ए-अतलस = सर्वोपरि आकाश | मुदरिका =ज्ञान, बोध |
| सितारोंवाला आसमान = पार्थिव तारेयुक्त आकाश | हिम्मत = साहस |
| सातवाँ आसमान: लाबिय:/दामिआ=शनी ग्रहाचे आकाश | वहम = संशयकल्लोळ, कल्पना विभ्रम |
| छटा आसमान : ख़ालसा = गुरू ग्रहाचे आकाश | हम्म = दु:ख, खेद, ताप, एकाग्रचित्तता |
| पाँचवा आसमान : मसहरा = मंगळ ग्रहाचे आकाश | फ़हम = समज, चातुर्य |
| चौथा आसमान : ज़ाहिरा = रवी ग्रहाचे आकाश | ख़याल = विचार |
| तीसरा आसमान : मलकूत = शुक्र ग्रहाचे आकाश | फ़िकर = चिंतन |
| दूसरा आसमान : माऊन = बुध ग्रहाचे आकाश | हाफ़िजा = स्मरणशक्ती . |
| पहला आसमान : रुक़ैया = सोम ग्रहाचे आकाश | कवी लामसा = प्रबळ स्पर्शशक्ती |
| जुहल = शनी ग्रह | क़वी दाफ़िआ = प्रबळ विसर्जन शक्ती |
| मुश्तरी = गुरू ग्रह | क़वी मुर्हिका = प्रबळ हालचाल (गती) शक्ती |
| मिर्रीख = मंगळ ग्रह | कुव्वत-ए-बासिरा = दृष्टी . |
| शम्स = रवी ग्रह | कुव्वत-ए-ज़ायका = चव . |
| जुहरा = शुक्र ग्रह | कुव्वत-ए-शाम्मा = घ्राणशक्ती |
| उतारद = बुध ग्रह | कुव्वत-ए-सामिआ = श्रवणशक्ती |
| क़मर = सोम ग्रह | हरारत = उष्णता |
| कुर्रए नार = तेज महाभूत | बरूदत = शीतलता |
| कुर्रए आब = आप महाभूत | रतूबत = आर्द्रता |
| कुर्रए हवाई = वायू महाभूत | यबूसत = शुष्कता |
| कुर्रए अरज़ = पृथ्वी महाभूत | ख़वातिर =आशंका, संदेह |

मलायका = देवदूत
जिन्न व शयातीन = यक्ष, किन्नर व शैतान
बहायम = पशू
शेर = सिंह
भेडिया = लांडगा
बंदर = वानर
मोश = मूशक, उंदिर
परिंदा = पक्षी
माद्दा सफ़राविया = पित्त तत्त्व
माद्दा बलग़िया = कफ तत्त्व
माद्दा दमाविया = रक्त तत्त्व
माद्दा सौदाविया = वात तत्त्व
सातवाँ दरिया = सातवे समुद्र
सातवाँ माद्दा = सप्तम तत्त्व, प्रकृति
छ: मुतफ़रा चीजें=सहा विभिन्न वस्तू (गोष्टी),शाखा
हूविय्यत = तदत्त्व
अर्ज़ = पृथ्वी, वसुंधरा
जमादात = जड पदार्थ
नबातात = वनस्पती
हैवान = प्राणी
दूसरे आदमी = अन्य मानव
बादशाह = नरेश
वज़ीर = अमात्य, सचिव
क़ाज़ी = न्यायमूर्ती
कोतवाल = फौजदार
ऐवान = प्रासाद, राजप्रासाद
मोमिनीन = श्रद्धावंत
मुश्रिकीन = बहुदेववादी
मलिक-ए-मुक़र्रब = निकटवर्ती देवदूत

वसाविस = नाठाळ वासना
हैवानियत = पाशविकता
कुव्वत-ए-क़ाहिरा नब्जिया = बलवान नाड्या, शिरा
कुव्वत-ए-गिरफ्त = पकडची शक्ती
कुव्वत-ए-माकिरा = छळ करण्याची शक्ती
ख़ादिआ = षड्यंत्रकारी शक्ती
कुव्वत-ए-हसिदा = द्वेषवृत्ती
कुव्वत-ए-हरीसा = हावरटपणा
रूहानियत = आत्मा तत्त्व
आग = अग्नी, तेज
पानी = आप
हवा = वायू
मिट्टी = पृथ्वी, माती
थूक (थुंकी), एँट (लाळ), पसीना (घाम) कानोंका मैला (कानांतील मळ),आँसू (अश्रू),पेशाब (लघवी), शरीरामधील सर्व नाड्या आणि त्वचेच्या दरम्यान खेळणारे (प्रवाहित) रक्त.
मीठा (गोड), खट्टा (तरट), कडवा (कडू), नमकीन (खारट), बदबूदजार (दुर्गंधीयुक्त), खुश्बूदार (सुगंधित)
ज़ात = नाम, अधिसतता
वस्फ़ = गुण
अनयाब = दात
बाल और नाखून = केस आणि नखे
कुव्वत-ए-शहविया = कामातुरतेची शक्ती
बशरियत = माणूसपण
रूह = आत्मा
नज़र-ए-फ़िक्री = चिंतन दृष्टी
राय पसंदीदा = सुयोग्य निर्णय
ज़िन्न = विचार, धारणा
उरूक़ और तमाम, कुव्वतें = स्नायू, नाड्या आणि सर्व शक्ती
य़कीन = दृढ विश्वास, पक्की श्रद्धा
शक व शूबा = शंका आणि संशय
इन्सान-ए-कामिल = पुरुषोत्तम, नरोत्तम.

**ख) सय्यद अब्दुल करीम जीलीप्रणीत नरोत्तम (इन्सान–ए–कामिल)**

*''मानव हा सृष्टीचा अंतिम पुनरावलोकन नव्हे,*
*तर मग तो विवेकाची दृष्टी तर नसेल?*
*ब्रह्मांडाचे जीवनचक्र न्याहाळा, म्हणजे कळेल की*
*मानव हा बंद लिफाफ्यावरील पत्ता आणि मोहोरच!''*

**– उमर ख़य्याम**

'नरोत्तम' वा 'पुरुषोत्तम' ही संज्ञा सर्वप्रथम सूफ़ी तत्त्वज्ञ इब्नुल अरबी यांनी वापरल्याचे दिसते. नरोत्तमाविषयी ('अल्–इन्सानुल–कामिल') जेव्हा चर्चा होते तेव्हा सूफ़ींची त्याविषयी काय धारणा आहे, हे जाणून घेताना आपणास ही गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की नरोत्तमाची संकल्पना ही सूफ़ीवादाइतकीच पुरातन आहे. या प्रश्नाचे उत्तर अनेक प्रकारे देता येईल, मात्र याची एक सर्वसाधारण परिभाषा – व्याख्या पाहता, कदाचित आपण म्हणू की दैवी सत्तेशी एकत्त्वाची संपूर्ण अनुभूती संपादन करणारा तत्सम निर्मित एक मनुष्य म्हणजेच पुरुषोत्तम किंवा नरोत्तम होय. प्रेषित आणि संतांना होणारी ही अनुभूती आणि इतरांना प्रतीकांमध्ये झाकून टाकणारी त्यांची अनुभूती, हा सूफ़ी अध्यात्माचा पाया आहे. म्हणूनच नरोत्तमांच्या श्रेणीमध्ये केवळ प्रेषित आदम पासून ते मुहम्मदपर्यंतचे सर्व प्रेषित यांचाच समावेश होत नसून सूफ़ींमधील अत्यंत वरच्या दर्जाचे संत–महात्मे असलेले 'औलिया' ('वली'चे अनेकवचनी रूप) ('खुसूसुलखुसूस') यांचा पण समावेश होतो. 'वली' या शब्दाचा मूळ अर्थ 'समीप' वा 'जवळ' असा आहे; मात्र 'सखा', 'मित्र' किंवा 'साधक' या अर्थी तो प्रयुक्त होतो. वली किंवा संत हा नरोत्तमाचा लोकप्रचलित प्रकार आहे. हे लक्षात घेता की भविष्यवाणी हे इस्लामी संतत्त्वाचे प्रधान लक्षण तर आहेच, मात्र याशिवाय अज्ञान आणि परोक्ष गोर्ष्टींविषयी दिव्य प्रकाश, दिव्य दृष्टी आणि दिव्य ज्ञान त्यांना असते, हे काही कमी नाही. 'प्रचंड प्रभेच्या एकमात्र सत्य प्रकाशा'मध्ये त्यांची शुद्ध हरपते आणि चेतना विलुप्त होते. ईश्वराशी ऐक्याची एक अत्यानंददायक भावना 'वली'ची बनते. 'वली' हा मध्यस्थाची भूमिकापण वटवितो. मानव आणि परम त्रानातीत परमेश्वर यामधील महदंतर यास जोडणारा असा सेतू तो प्रस्थापित करतो. 'वली' अर्थात संत हे उतरंडीमध्ये क्रमश: क्रमबद्ध असतात. या उतरंडीमध्ये सर्वोच्च स्थानी 'कुत्ब' हा असतो. या जगाचे संचालन संतांच्या एक कार्यकारी मंडळाच्या अदृश्य प्रशासनाने चाललेले असते.

**पूर्ण पुरुष* : पुरुषोत्तम : नरोत्तम**

जिर्लीनी पूर्ण पुरुषाचे केलेले विवेचन गूढ साहित्यास दिलेले महत्त्वपूर्ण योगदान आहे. तो कुत्ब असतो. त्याच्या भोवती संपूर्ण जग फिरते. त्याला अनेक रूपे असतात. या रूपांमध्ये कधी नावे असतात, कधी नसतात. मूळ रूप मुहंमदाचे (स्व) आहे. त्यांना अबू कासिम वा शमसुद्दीनसुद्धा म्हटले जाते. जिर्लीचा दावा आहे की, त्यांचे गुरू शरफुद्दीन इस्माईल जब्रती यांच्या रूपात प्रेषित (स्व) त्यांना भेटले. जीलींनी त्यांना ओळखले नाही. प्रत्येक युगात ते (स्व) येतात. त्यांना कुणाचेही रूप घेता येते. जेव्हा ते (स्व) शिबलींच्या रूपात प्रकट झाले. शिबली त्यांच्या शिष्याला म्हणाले, ''तुम्ही साक्षीदार राहा, मी ईश्वराचा प्रेषित (स्व) आहे.'' शिष्य त्यांच्या (स्व) तेजाने प्रकाशमान होऊन म्हणाला, ''तुम्ही प्रेषित (स्व) आहात याची मी साक्ष देतो.'' स्वप्नात माणूस

एकाला दुसऱ्या रूपात पाहू शकतो. गूढवादी अनुभूतीत हे घडू शकेल काय, या प्रश्नाचे उत्तर होकारार्थी येणे कठीण आहे. पण गूढवादी हे सत्य मानतात. प्रेषितांचा (स्व) जितका जास्त आदर करता येईल तेवढा करावयास हवा. ते समाजातील त्रुटी व दुष्कृत्ये दूर करू शकतात. अस्तित्वाच्या सर्व वेगळेपणाच्या विरुद्ध पूर्ण पुरुष असतात. आत्मिक दृष्टीने अधिक, श्रेष्ठपणाच्या वेगळेपणाविरुद्ध व शारीरिकदृष्ट्या कनिष्ठ वेगळेपणाविरुद्ध ते (स्व) असतात. ईश्वराच्या सिंहासनासमोर त्यांचे (स्व) हृदय असते व मन दैवी लेखणीजवळ! त्यांचा (स्व) आत्मा लोहे महेफूजसमोर असतो. त्यांची (स्व)रूप बदलण्याची क्षमता भौतिकतेसमोर असते. देवदूतांसमोर ते (स्व) विचारांनी उपस्थित असतात.

पूर्ण पुरुष ही ईश्वराची प्रतिमा (नुस्खा) असते. आदमला परमेश्वराने स्वत:बरहुकूम तयार केले, या प्रेषितांच्या (स्व) वचनाचा हवाला जिली देतात. ईश्वर जिवंत आहे; सर्व शक्तिमान, ज्ञाता, इच्छा करणारा, ऐकणारा आणि बोलणारा आहे. माणसाची हीच वैशिष्ट्ये आहेत. दैवी हुवैय्या (तदत्त्व)बरोबर त्याचा हुवैय्या असतो व दैवी अनिय्या (अहंता)बरोबर त्याचा हुवैय्या असतो. पूर्णतेविरुद्ध तो पूर्ण आहे. विश्वाविरुद्ध तो विश्व आहे. विशिष्टाविरुद्ध तो विशिष्ट आहे. पूर्ण पुरुषाला साराची नावे व दैवी वैशिष्ट्ये मूलभूतपणे व सार्वभौमत्वामुळे प्राप्त होतात. त्याचे सत्यस्वरूप त्याने अधोरेखीत होते. त्याची आध्यात्मिकता प्रतीकांनी दर्शविली जाते. त्याच्या दृष्टीने जगात पूर्ण पुरुषाखेरीज काहीच अस्तित्वात नसते. आरशाशिवाय जसे आपण प्रतिबिंब पाहू शकत नाही, तसा ईश्वर आणि पूर्ण पुरुषात संबंध असतो. पूर्ण पुरुष त्याची प्रतिमा आरशात पाहत नाही, तर ईश्वराचे नाव पाहतो. ईश्वरानेच ठरविले आहे की, त्याची गुणवैशिष्ट्ये केवळ पूर्ण पुरुषातच व्यक्त होतील. आकाश व पृथ्वीने दैवी वैशिष्ट्ये घ्यावीत, अशी सूचना ईश्वराने केली आहे; परंतु त्यांची हिंमत झाली नाही. माणूस अन्यायी व अज्ञानी असला तरी ही जबाबदारी माणसाने स्वीकारली (कुरआन, ३३.७२). माणूस अज्ञानी व अन्यायी आहे, हे विशिष्ट अर्थाने म्हटले आहे. भौतिक जगात तो आत्म्याची काळजी वाहत नाही; त्याला भरकटू देतो. म्हणून तो अन्यायी आहे. तर त्याला स्वत:चे महान मूल्य न कळणे हे अज्ञान आहे. माणसाच्या डाव्या व उजव्या बाजूंना गुणवैशिष्ट्ये असतात. त्याच्या संपूर्ण अस्तित्वातून आभा फाकते. तिला 'ईश्वरमुख' म्हटले जाते. त्याची पद्धत स्वतंत्र असते. ती सोडून इतरांचे अस्तित्व जाणून घेण्याची त्याला गरज नसते. आपल्या ध्यानातून त्याचे व्यवस्थित प्रसरण होते. आपल्या सारात तो हे सर्व पाहतो. खरे पाहता, सामान्य लोकही त्यांच्या विचार व साशंकतेचा विचार करतात. पूर्ण पुरुष प्रत्येक छोटा-मोठा विचार आपल्यापासून दूर ठेवण्यास समर्थ असतो. त्याचे सामर्थ्य दुय्यम स्रोतातून येत नाही. त्याचे खाणे, पिणे, बोलणे स्वतंत्र असते.

माणूस अर्थात संत एका अत्युच्च क्षणी ईश्वरात हरवून घेतो. परंतु त्याच्यात व ईश्वरात तादात्म्य नसते. जिली पूर्ण पुरुषाला आत्मा व सर्वांचे उगमस्थान मानतात. पूर्ण पुरुषाच्या शारीरिक, मानसिक व बौद्धिक संरचनेवर जिलींनी लेखन केले. ते मानतात की, आत्मा, हृदय, बुद्धी, प्रतिक्षिप्तता या सर्वांचा संबंध दिव्य शक्तीशी येतो. अत्युच्च मानसशास्त्रीय तत्त्वे पवित्र आत्म्यात (रुहूल कूद्दूस) व्यक्त होतात. यालाच रूह नावाचा देवदूत म्हणतात. सूफ़ींच्या तांत्रिक भाषेत अल् हक्क म्हणतात. अल् हक्कच्या माध्यमातून जगाची निर्मिती होते. त्यातून प्रेषित मुहंमद (स्व) यांच्या संकल्पनेची निर्मिती झाली. रुहूल कूद्दूस आणि रूह एकच

आहेत. ईश्वराच्या संदर्भात अविनाशी आहेत. माणसाच्या संदर्भात विनाशी आहेत. रुहुल कूद्दूस अस्तित्वात आहे व इतरांपेक्षा वेगळा आहे. त्याच्याशी एकात्मता साधायची असेल. तर गूढवादी जीवनाचा अत्युच्च कळस गाठावा लागतो. अशी व्यक्ती सातत्याने दैवी जागरूकतेचा ध्यास धरते, कारण ती त्याचे उगमस्थान असते. ईश्वर त्या त्या व्यक्तीचे हात, पाय, डोळा, कान, जीभ बनतो. आजाऱ्यास त्याने स्पर्श केला. तर त्याचे आजारपण जाते. ती व्यक्ती जशी इच्छा करते, तसे घडते. येशूला जसे पवित्र आत्म्याने सामर्थ्य मिळाले, तसे व्यक्तीला मिळते. प्रेषित मुहम्मदांना (स्व) ईश्वराचे सृजनात जागरूक होण्याचे साधन जिली मानतात.

ईश्वराने त्याच्या प्रकाशातून 'रूह' नावाचा देवदूत निर्माण केला. त्यातून त्याने जगाची निर्मिती केली. त्याच्या काही नावांपैकी एक नाव अल्लाहचा शब्द (अम्र अल्लाह) असे आहे. तो सर्वश्रेष्ठ देवदूत आहे. तो देवदूतांचा प्रमुख आहे. ईश्वराने निर्माण केलेल्या वस्तुमात्राचे कारण आहे. अस्तित्वाच्या व्यवस्थेत तो शिस्त निर्माण करतो. ईश्वराच्या सिंहासनास तो आधार देतो. श्रेष्ठ व कनिष्ठ प्रकारचे देवदूत तो तयार करतो. महासागरासमोर पाण्याच्या थेंबाचे जे स्थान आहे, ते साध्या देवदूतांचे आहे. ईश्वराच्या सिंहासनाचे जे आठ आधार सांगितले जातात, त्यांच्या साह्याने मानवी अस्तित्वाचा संबंध त्याच्या आत्म्याशी जोडला जातो. हे आठ आधार म्हणजे – (१) बुद्धी (अक्ल), (२) निर्णयशक्ती (वह्य), (३) परावर्तन, (४) विचार (खयाल), (५) स्मरणशक्ती (अल् हाफिज), (६) कल्पना (अल् मुसव्विरा), (७) आकलन (अल् मुद्रिक), (८) आत्मा (नफ्स). ईश्वराने रूहवर दैवी पालकत्व सोपविले आहे. हक़ीक़ते मुहंमदी (स्व) मध्ये ईश्वर अवतरतो, म्हणून प्रेषित (स्व) मानव जातीतील सर्वोच्च आहेत. ईश्वर आपल्या गुणवैशिष्टांनी सृजनात प्रकट होत असला तरी त्याच्या सारात तो या देवदूताच्या स्वरूपात प्रकट होतो. ईश्वर व प्रेषित (स्व) सोडून तो कुणाच्या दृष्टीस पडत नाही. जेव्हा संत त्याला ओळखतो आणि देवदूताने केलेल्या उपदेशाचे आकलन करतो, तेव्हा तो (कुत्ब) बनतो. या स्तंभाभोवती (कुत्ब) जग फिरते; तरी या स्तंभाला देवदूतच धारण करतो किंवा त्याने नेमलेले देवदूत हे कार्य करतात. ईश्वराची आज्ञा प्रथम त्याला मिळते, नंतर तो कनिष्ठ देवदूतांना आज्ञा करतो.

उच्च प्रतीच्या देवदूतांमध्ये इस्राफ़ील, जिब्रईल, मिकाईल, इस्राईल व अल्नून (सुरक्षित संकलिकेखाली) हे प्रमुख् देवदूत आहेत. अल् कलम, अल् मुदब्बिर यांचे स्थान ईश्वराच्या सिंहासनाखाली असते. मुफस्सिल इमामुल मूबीनखाली असतो. या देवदूतांना आदमला सजदा करण्याची आज्ञा ईश्वराने दिली नव्हती. तशी आज्ञा दिली असती, तर आदमच्या वंशजांनी त्याला ओळखले असते. स्वप्नात ईश्वर लोकांना जसा देवदूताच्या रूपात दिसतो, तसे सजदा करणारे देवदूत दैवी समानतेच्या आकारात दिसत असतात. माणसांना पडणाऱ्या स्वप्नांमध्ये ते देवदूत निर्जीव वस्तूंचा आकार घेतात. म्हणून स्वप्नात निर्जीव आपल्याशी बोलतात. प्रेषित मुहम्मद (स्व) यांचे एक कथन साररूपाने असे सांगता येईल की, खरे स्वप्न ईश्वरी प्रेरणा असते, कारण ते स्वप्न देवदूत आणतात. खरे स्वप्न प्रेषितत्वाच्या १/४६ असतो. इब्लिसने आदमला सजदा करण्याची ईश्वरी आज्ञा अमान्य केली. त्याची वंशावळसुद्धा माणूस स्वप्नात पाहू शकतो. पण स्वप्ने असत्य असतात. अतिशय उच्च देवदूतांना दैवी माणसेच पाहू शकतात. त्यांना तशी ईश्वरी देणगी असते. मानवी मर्यादा उल्लंघून त्यांना आकलन होते. रूहला असणाऱ्या पैलूप्रमाणे तिला नाव दिले जाते. उदा. – उदात्त कलम, प्रेषित मुहंमदांचा (स्व) आत्मा, प्रथम बुद्धी इ. पण ईश्वरासमोर त्याला एकच नाव आहे – अल् रूह – विश्व–ज्ञान.

प्रेषित मुहंमद (स्व) यांच्याविषयीची कल्पना अशी – ईश्वराने त्याच्या प्रतिमेत आदमची निर्मिती केली. ईश्वराने त्याच्या बाह्य रूपात आदमला खलिफा नेमले. मला माहित होते की, ईश्वराने मला (स्व) सृजनाचे उद्दिष्ट बनविले आणि पाहा – त्या वैभवशाली, सर्वत्र उपस्थित असणाऱ्याचा आवाज आला, 'तू कुत्ब आहेस, ज्याच्या भोवती सौंदर्य फिरत असते. तू सूर्य आहेस, ज्याच्या प्रकाशाने पूर्ण चंद्र प्रकाशाने भरून जातो. तू ते आहेस, ज्याच्यासाठी आम्ही प्रारूप तयार केले. तुझ्यासाठी आम्ही स्वर्गाचे दार बनविले. हिंद व सलमा, अझ्झा व अस्मा यांच्या वास्तवतेचे प्रतीक आम्ही तुम्हाला बनविले. आम्ही तुम्हाला अत्युच्च प्रकारची व शुद्ध गुणवैशिष्ट्ये बहाल केलीत. सौंदर्य तुम्हाला मंत्रमुग्ध करू शकत नाही. वैभवसंपन्नता तुमचे डोळे दिपवू शकत नाही. तुमच्यासाठी परिपूर्णता सहजसाध्य आहे. या भौतिक जगाच्या वर्तुळाचा केंद्रबिंदू तुम्ही आहात.

सूफ़ींमध्ये हृदय आणि आत्मा यात फरक केला जात नाही. ईश्वराने आपला आत्मा आदममध्ये टाकला. जिली त्याला अविनाशी तत्त्व म्हणतात. सृजनातील उत्तम नमुना म्हणून ईश्वर माणसाकडे पाहतो. सर्व नावे आणि गुणवैशिष्ट्ये तो प्रतिबिंबित करतो. बदललेल्या गुणवैशिष्ट्यांचा त्यावर पट्कन परिणाम होतो. आरशाप्रमाणे त्याला दोन्ही बाजू असतात. त्याचा चेहरा सतत प्रकाशाकडे असतो. याला लक्ष (अल् हम्म) असे म्हणतात. तो 'अल् हम्म' म्हणजे अंत:करणाची ईश्वरावरील आटोकाट एकाग्रचित्तता. तो हृदयाचा डोळा आहे. जेव्हा नाव विरुद्ध असते, तेव्हा लक्ष वेधले जाऊन हृदय त्याला पाहते. त्याचा परिणाम हृदयावर होऊन ते नाव अदृश्य होते दुसरी नावे येतात. हृदयाच्या पाठीमागे लक्ष वेधले जात नाही आणि गुणवैशिष्ट्ये हृदयाचे खरे स्वरूप प्रकट करतात, काही व्यक्ती इतक्या भाग्यवान असतात की, त्यांचे हृदय शुद्ध ठेवण्यासाठी फारसे प्रयत्न पडत नाहीत. परंतु काहींचे या उलट असते. मूळ केलेल्या परिचयामध्ये, ईश्वर हिशेब करून त्यांना सत्कर्मांचे फल देतो. तो त्याचा हक्क आहे. मिळालेली देणगी नव्हे! गुणवैशिष्ट्यांचे जग हृदय प्रतिबिंबित करते किंवा ते विश्वाचे प्रतिबिंब असते. ईश्वर ग्वाही देतो की, ''पृथ्वी व आकाश मला सामावून घेऊ शकत नाही; पण माझ्यावर श्रद्धा असणाऱ्या माझ्या सेवकाचे हृदय मला सामावून घेते.''(५१)

ईश्वराने प्रेषित मुहंमदच्या (स्व) तेजापासून जगाची निर्मिती केली. तेथूनच सर्वाधिक सामर्थ्यवान व ईश्वरनिकटच्या इस्त्राफिलची निर्मिती झाली. त्यांचे (स्व) दैवी गुण कामिलपासून तयार करण्यात आले. त्यांच्या (स्व) तेजापासून इस्त्राईल – मृत्युदूताची निर्मिती झाली. प्रेषितांच्या (स्व) निर्णयक्षमतेस 'वहम' म्हटले जाते. तो इतर – बुद्धी, आकलन, कल्पना – गुणांना मागे टाकतो. वहमला जितक्या वेगाने आकलन होते तितके कोणत्याच घटकाला होत नाही. त्याच्यामुळेच माणूस पाण्यावरून चालू शकेल किंवा हवेत उडू शकेल. सर्व बाबींवर त्याची सत्ता चालते. आत्म्यात असणाऱ्या त्रुटी व मर्यादांची त्याला जाणीव असल्याने वरच्या दिशेने तो स्वर्गात जातो. तसे नसेल, तर तो नरकात जातो. माणसाच्या कर्मानुरूप त्याला इस्राईल दृष्टीस पडतो किंवा तो अदृश्य होतो. कर्माप्रमाणे माणसाला सुगंध येतो किंवा दुर्गंध! इस्राईलला पाहून माणूस मोहित होतो. इतका की, त्यावरून नज़र ढळत नाही. माणसाच्या शरीरातून रूह निघून जातो व तो नि:श्चेष्ट होतो. या स्वप्नविरहित अवस्थेत आत्मा आलमे बरज़खमध्ये (मध्य जगत्, अंतराय) असतो.

आध्यात्मिकतेचे उदात्त तेज ध्यान आहे. त्याचे उद्दिष्ट केवळ ईश्वर असते. तुम्ही ध्यानमग्न असाल, तर त्याची फले तुम्हास चाखावयास मिळतील. त्याचे रहस्य तुम्हाला गुरू उघड करून दाखवतील, बाह्य जगातील

वितरणाचे कार्य मिकाईल करतात. कल्पान्तानंतर देवदूतांचे रूपांतर बुद्धीत केले जाईल. कल्पनाशक्ती वस्तूंच्या आकाराचे इंद्रियजन्य आकलन करते व त्यातील द्रव्य अदृश्य झाल्यावर तो विचाररूपात राखून ठेवते. रूह आणि नफ्स यामध्ये असलेला फरक उलेमांनी आणि वेदान्त पंडितांनीही मान्य केला आहे. त्यावर वेगळे भाष्य करण्याची गरज नाही. निकल्सन यांनी नफ्सचे भाषांतर soul असे करून त्याचा निर्देश appetitive आणि sensual असे केले आहे, त्यामुळे त्याचे ईश्वराशी मीलन असंभव आहे.

जीलींना हा फरक मान्य नाही. नफ्स हे इब्लीसचे उगमस्थान मानीत, ते त्याला ईश्वराचे मर्म (सिर्र) म्हणतात. ईश्वराचे ते सार आहे. ईश्वरी गुणवैशिष्ट्यांनी त्याची निर्मिती झाली. ईश्वराने त्याच्या नफ्समधून प्रेषितांच्या (स्व) नफ्सची निर्मिती केली. निकल्सन म्हणतात की, जिलींनी निर्भीडपणे म्हटले की, माणसाचे पतन त्याच्या दैवी स्वरूपामध्ये आहे. आदमने ईश्वराज्ञा न पाळणे, हा त्याच्यात असलेल्या स्वामित्वाच्या भावनेचा परिणाम आहे. ईश्वराज्ञा झुगारण्यात खूप त्रास आहे, हे माहीत असून आदमने तसे केले; पण त्यात सार्वभौमत्वाची गोडी आहे, हेही त्याला माहीत होते.[५२] आदमचा गोंधळ उडाला व त्याचे पतन झाले. याचा अर्थ असा की, पर्याय निवड निर्धारित असते किंवा स्वतंत्र असते. पर्याय निर्धारित करणे ईश्वरावर अवलंबून असते. व्यक्तीला जेव्हा अभिमानाने झपाटलेले असते, तेव्हा ती तिच्या स्वत:विषयीच्या ज्ञानावर आधारित निर्णय घेते. ईश्वराच्या इच्छेशी सुसंगत निर्णय घेतले, तर मनस्ताप टाळता येऊ शकतो. ईश्वरी सारातून अनेक परस्परविरोधी बाबी निर्माण होतात, असे जीलींनी दर्शविले आहे. ज्ञानेश्वरीत आल्याप्रमाणे 'देव सर्व मानसिक अवस्थांशी एकरूप आहे. त्याचप्रमाणे तो बाह्य वस्तूंशीदेखील एकरूप आहे. अर्जुनाने विश्वरूप पाहिले, तेव्हा त्यास बाहेर सर्वत्र देव दिसला नाही काय? तू नाहीस असे स्थान कोठे आहे, ते सांग! असे अर्जुनाने देवास विचारले.[(५३)] विश्वात अनेक परस्परविरोधी बाबी आहेत, केवळ सौंदर्यच आहे असे नाही. ईश्वराची अभिव्यक्ती सर्वांत आहे.

जीली आपली तत्त्वप्रणाली वेदान्ताच्या सुरात सूर मिसळून व्यक्त करतात. माणूस ईश्वरी प्रतिमेत तयार करण्यात आल्याचे उल्लेख आपण पाहिले. माणूस विश्वाचा आत्मा असल्याचे ते सांगतात. विश्वनिर्मितीपूर्वी ईस्वराचे अस्तित्व स्वत:तच होते. तो इतर वस्तुमात्रांत प्रकट झाला नव्हता. ईश्वराची अशी संकल्पना सर्व संबंधापलीकडची आहे. जिली पुढे व्यापक ईश्वराची संकल्पना मांडतात. त्यांनी दहा धर्मांचा उल्लेख केला आहे. इतर धर्म या दहा धर्मांमधून निर्माण झाले. (१) मूर्तिपूजक, (२) उष्णता, थंडी, कोरडेपणा, दमटपणा (पृथ्वी, आप, तेज, वायू या चार महाभूतांना पुजणारा धर्म – मूलतत्त्वोपासकांचा धर्म) यांना पुजणारा धर्म, (३) सात ग्रहांची आराधना करणाऱ्या तत्त्वचिंतकांचा धर्म, (४) प्रकाश व अंधाराची पूजा करणारे द्वैतवादी, (५) इराणी अग्निपूजकांचा धर्म, (६) भौतिकवादी लोकांचा धर्म, (७) ब्राह्मण, जे अब्राहमच्या धर्माला मानतात, (८) ज्यू (यहूदी), (९) ख्रिश्चन (नसारा) आणि (१०) इस्लाम.


ईश्वर सर्व धर्माचे सार आहे. जगातील सर्व विचार ईश्वराची गुणवैशिष्ट्ये आहेत. ईश्वराची उपासना व्हावी, या उद्दिष्टासाठी सर्व सृजन झाले आहे. उपासना करण्याचे प्रकार वेगवेगळे असण्याचे कारण असे आहे की, त्यात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात ईश्वराचे प्रकटीकरण असतेच. अश्रद्धा, पाप ही दैवी कर्मेच असून ती ईश्वराचे पूर्णत्व सिद्ध करतात. ईश्वराची वैभवसंपन्नताच सैतान सांगतो. त्याने केलेला आज्ञाभंग चिरंतन

वजूद (अधिसत्ते) च्या

**अल्लाहची शुभनामे**


**(पालक)**

१. बदीअ (अनुपम सृष्टा)
२. बायस (बीजरूप, कारण)
३. बातिन (अगोचर)
४. आख़िर (अंत)
५. ज़ाहिर (गोचर)
६. हकीम (तत्त्वविद्)
७. मुहीत (सर्व समावेशक)
८. शकूर (गुणग्राहक)
९. ग़नी (निःस्पृह)
१०. मुक़्तदिर (सत्त्व)
११. रब (प्रभू)
१२. अलीम (परमज्ञानी)
१३. क़ाहिर (प्रकोपी)
१४. नूर (प्रकाशरूप)
१५. मुसव्विर (रूपनिर्माता)
१६. मुहसिय (परिवेष्टक)
१७. मुहैमिन (त्राता)
१८. क़ाबिज़ (अधिष्ठाता)
१९. हय्य (चैतन्य)
२०. मुहिय्य (जीवनदाता)
२१. मुमीत (मृत्यूदाता)
२२. अज़ीज़ (प्रबळ)
२३. रज़्ज़ाक़ (अन्नदाता)
२४. मुज़िल (पराभूतकारी)
२५. क़वी (महाशक्तिशाली)
२६. लतीफ़ (सूक्ष्मदर्शी)
२७. जामेअ (सर्वनिधान)
२८. रफ़िउद्दरजात (बहुगुणसंपन्न)




समस्त ब्रह्मांड समावेशक

## श्रेणींचा नकाशा




**तदनुषंगिक भौतिक रूप**
**(पाल्य)**

१. अक्लेकुल (विश्वज्ञान, निरपेक्ष विवेक)
२. नफ़्सेकुल (विश्वात्मा)
३. तबियतेकुल (निरपेक्ष प्रकृती)
४. जौहरे हबा (जडद्रव्य सार, भौतिक तत्त्व)
५. जिस्मे कुल (विश्व देह, निरपेक्ष देह)
६. शक्ले कुल (विश्वरूप, निरपेक्ष रूप)
७. अर्श (ईश-सिंहासन)
८. कुर्सी (पादपीठ)
९. फ़लकुल मनाज़िल (नक्षत्र)
१०. फ़लकुल बुरूज (राशी)
११. जुहल (शनी)
१२. मुश्तरी (गुरू)
१३. मिर्रीख़ (मंगळ)
१४. शम्स (रवी)
१५. ज़ुहरा (शुक्र)
१६. उतारिद (बुध)
१७. क़मर (सोम)
१८. नार (तेज, अग्नी)
१९. हवा (वायू)
२०. मा (आप)
२१. अर्ज़ (पृथ्वी)
२२. मादन (खनिज)
२३. नबातात (वनस्पती)
२४. हैवान (प्राणी)
२५. मलायक (देवदूत)
२६. जिन (यक्ष-किन्नर)
२७. इन्सान (मानव)
२८. इन्सानुल कामिल (पुरुषोत्तम, नरोत्तम)

**इन्सानुल कामिल (पुरुषोत्तम, नरोत्तम)**

इच्छेसमोर काहीच नाही. ईश्वराची दया त्याच्या अवकृपेपेक्षा अनंत पटींनी जास्त आहे. त्याच्या सर्वोत्तम स्वरूपातील आराधना परिपूर्ण असेल. नास्तिकातही ईश्वरी सार आहे. मूर्तींची पूजा करणाऱ्यांना मूर्ती हेच सत्य वाटते. त्यांच्या सत्याविषयीच्या श्रद्धेवर ते अवलंबून राहील. विशेष म्हणजे, जिली त्यांच्या विचारांना कुरआनचा आधार देतात. 'प्रत्येक पंथ त्यांच्या स्थितीत आनंद लुटेल (कुरआन २३:५३).' म्हणजे भौतिक जगात व त्याबरोबर आध्यात्मिक जगात चिरंतन आनंद उपभोगतील. मूर्तींची आराधना करण्यात जर कुणाला त्रास सहन करावा लागत असेल, तरी त्यातही मूर्तिपूजक आनंद घेतील. ती योजना ईश्वर करून ठेवतो. इथे त्रास सहन करणारा मूर्तिप्रेमाने ईश्वराचा आश्रय मागत नाही. त्याच्या वेदना वाढवावयाची ईश्वराची इच्छा असेल, तर वेदनेतील आनंद देणे कमी करतो. अशा स्थितीत तो ईश्वराची करुणा भाकतो. अतिशय विपन्नावस्थेत त्यांना तो उत्तर देतो. (कुरआन २७:६२) जीलींच्या व्यक्तिगत मतावर आक्षेप घेण्याचे कारण नाही; परंतु उद्धृत केलेल्या कुरआनच्या आयतींचा (श्लोकांचा) अर्थ व संदर्भ पाहिला, तर तो जीलींच्या विश्लेषणापासून लांब जात आहे, असे स्पष्टपणे जाणवते याची नोंद घेणे अत्यावश्यक आहे. त्याचप्रमाणे निकल्सन यांनी दिलेल्या कुरआनच्या सूरहसंबंधी, छपाईची चूक झाली असावी. सन १९८८ च्या आवृत्तीत (इदाराह-इ-अदबियत-इ-देल्ली) पान १३२ वर कुरआनमधील एक संदर्भ २३:५५ असा दिला आहे, जो २३:५३ असा हवा; तर दुसरा २७:६३ दर्शविला आहे, तो २७:५३ असा हवा; तर दुसरा २७:६३ दर्शविला आहे. तो २७:६२ असा हवा.

वरील संदर्भ काळजीपूर्वक वाचले तर दिसते की, निकल्सन यांनी दिलेल्या अर्थाच्या 'थोडेसे' जवळ २३:५३ आहे, आणि २३:५५ चा दुरान्वयाने संबंध नाही. २७:६३ मध्ये इतर ईश्वर असण्याच्या श्रद्धेचे खंडन आहे, तर निकल्सन यांनी दिलेल्या जिलींच्या अर्थाच्या जवळ २७:६२ हा भाग आहे. स्पष्टीकरणासाठी प्रसिद्ध कुरआन भाष्यकार ए. यूसुफ अली (The Holy Quran : Amana Corn. USA WASH 1983) पहा.

''पण नंतर लोकांनी आपसात फाटाफूट करून वेगवेगळ्या संप्रदायाची शकले निर्माण केलीत. आणि (आता) ज्या समुहाकडे जे आहे, त्यावर त्याला अभिमान आहे.'' - २३:५३.

But people have cut off Their affair (of unity) Between them, into sects : Each party rejoices in that which is with itself. (पान ८८४) (२३:५३) तसेच

''तो कोण आहे, जो असहायाच्या हाकेला प्रतिसाद देतो, जेव्हा तो त्याचा धावा करतो, आणि त्याचे दुःख दूर करतो, आणि कोण तुम्हाला पृथ्वीवरचे वारस बनवतो. अल्लाहशिवाय दुसरा कोणी उपास्य आहे का? पण तुम्ही लोक अगदी क्वचितच बोध ग्रहण करता.'' - २७:६२.

or who listens to the (soul) Distressed when it calls On Him, and who relieves Its suffering and makes you (Mankind) inheritors of the earth? Can there be another god, Besides God? Little it is That ye heed (२७:६२) (पान ९९३-९४)

या अध्यायांच्या (सूरहच्या) प्रस्तावना वाचल्या की, त्यांमध्ये एकेश्वरवादाचा ठोस पुरस्कार करण्यात आला असून, अनेकेश्वरवादाचे खंडन केले आहे, हे दिसते. या सर्वांचा अर्थ सूफ़ी उदारमतवादाने काढू शकतात. *(डॉ. अलीम वकील - 'एकाच पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी', पृ. १०७-१७)

२०



प्रकरण २०

# आध्यात्मिक जीवन व आध्यात्मिक अनुभूती

### १) आध्यात्मिक जीवन

### क) अध्यात्म : जीवनविषयीचा दृष्टिकोन

मुळात अध्यात्माचा खोलवर अभ्यास केला तर असे आढळेल की, अध्यात्म म्हणजे जीवनविषयक दृष्टिकोन. जीवनाकडे कशा दृष्टिकोनाने पाहिले असता प्रत्येक जण सुखी, समाधानी होईल, याचे ज्ञान. आणि प्रत्येक व्यक्तीस मग तो कोणत्याही जाती धर्माचा का असेना, शाश्वत असे ते ज्ञान आहे, हा जीवनविषयक दृष्टिकोन म्हणजेच अध्यात्म ज्ञान. ते सर्व लोकांसाठीच शाश्वत असे ज्ञान आहे, म्हणून ते श्रेष्ठ आहे. विज्ञान सुख देते; पण समाधान व आनंद देण्यास ते अपुरे पडते. आणि अध्यात्म सुख, समाधान आणि आनंद तिन्ही देते. चित्तवृत्ती-निरोध, सत्संग-अनुरोध आणि आत्मबोध-प्रबोध हे आध्यात्मिक जागृतीचे घटक आहेत. अध्यात्म क्षेत्रामध्ये ज्ञान मानवी मस्तकाचे आहार आहे. कर्म त्याची प्राण-श्री आहे, आणि उपासना त्याच्या हृदयाची विश्राम-भूमी आहे, संतप्त हृदयाची शीतल छाया आहे. हे सर्व मिळून आत्म्यास संतोष आणि तृप्ती प्रदान करतात. ज्ञान दोन प्रकारचे असते - व्यावहारिक आणि आध्यात्मिक.

भक्तीचा केंद्रबिंदू माणूस आहे. माणसाच्या वृत्ती सुधारण्याचे काम भक्तीमुळे होते. माणसाच्या मनात सुख-दुःख व समस्यांचा उगम होतो. मन शुद्ध करण्यासाठीच 'स्व'चा अध्याय - 'स्वाध्याय' आहे. सुसंस्कार, सद्विचार, सदाचार आणि सत्कर्म हा अध्यात्माचा पाया आहे.

### ख) स्वतःचे शुद्धीकरण : आध्यात्मिक जीवनाची पूर्वतयारी

'अनंताचे तर्कशास्त्र' याचे प्रणेते श्री अरविंद यांच्या आध्यात्मिक तत्त्वज्ञानाचे मूळ त्यांच्या द्रष्टे विचारांच्या आध्यात्मिक अनुभवांतच आहे. त्यांच्या परिवर्तनाच्या योगसाधनेत नीतिमित्तेला सर्वंकष नसले तरी अनन्यसाधारण महत्त्व आहे. सध्याच्या आपल्या उच्चतम नैतिक मानदंडांतसुद्धा अनुल्लंघनीय किंवा शाश्वत व निरपेक्ष असे काही नाही. एका तऱ्हेने नैतिक मानदंड हे एक प्रकारच्या कृत्रिम मानसिक निर्मितीच आहेत. आत्म्याची अबाधित सत्ये म्हणजे कोरलेले काळे दगड खचित नव्हेत. ते सापेक्ष आहेत. एवढेच नव्हे तर संक्रमणशील आहेत. त्यांना शाश्वत व दृढ मानदंड समजणे म्हणजे श्रेष्ठ दैवी नियम व मनुष्यावर होणारे दिव्यत्वाचे संक्रमण यांच्या आड अडसर उभारणे होय.

नीतिमूल्यांचे संवर्धन करणे हा आध्यात्मिक जीवनाच्या दृष्टीने अपरिहार्य असा टप्पा आहे. जे जे काही मानवाला व जगताला दिव्य व परिपूर्ण जीवनाप्रत नेते त्याला त्याला शुभ असे साधारणपणे म्हणता येईल. या परिपूर्तीला अडथळा करून तिचा भंग जे जे करते ते ते अशुभ होय. अर्थातच पूर्तता ही प्रगतीशील असल्याने शुभ व अशुभ यांचाही आशय व परिमाणे बदलत असतात. त्यांचा अर्थ व मूल्यही बदलत जातात असे श्री अरविंदांनी दाखवून दिले आहे. आध्यात्मिक पातळीवर आपण शुभाशुभांच्या पलीकडे जातो. कारण त्या पातळीवर शुभ किंवा अशुभ आपण ज्याला म्हणतो त्याच्या प्रयोजनाची व दिव्य उपयोगितेची जाणीव होते. शेवटी जिथे मानवी जीवन संपून दिव्य जीवनाला आरंभ होतो, तिथे सर्व अशुभाचा कायापालट होऊन त्याचे व्यवहारातील दिव्य शुभात रूपांतर होते. आपणा पामरांचे क्षुल्लक नियम व पावित्र्याच्या क्षणभंगुर कल्पना दिव्य आविष्कारणाला जखडून टाकण्यास असमर्थ आहेत. म्हणून श्री अरविंदांच्या मते अशा विशिष्ट मनोनियमानुसार घडून आणलेले स्वत:चे शुद्धीकरण, ही मानवी स्वभावाचे समग्र परिवर्तन हेच आपले ध्येय मानणाऱ्या आध्यात्मिक जीवनाची केवळ पूर्वतयारी आहे.

हे सर्व परिवर्तन घडवून आणणाऱ्या तत्त्वाला श्री अरविंद 'श्रेष्ठ मन' म्हणतात. श्रेष्ठ मन हा आविष्काराचा उच्चतम प्रकार आहे. अज्ञ अशा मानवी मनापासून ते विश्वव्यापी उच्चतर मनापर्यंतच्या सर्व मनोवृत्तींना श्रेष्ठ मन सहज मागे टाकते. मात्र मन हा विकासाचा अंतिम टप्पा नाही. 'श्रेष्ठ मन' म्हणजे, अनंताचा चैतन्यशाली आत्मसाक्षात्कार होय. अस्तित्वाचे व अनुभवाचे पूर्णत्व फक्त श्रेष्ठ मनातच आढळते.

**ग) भूतलावरील दिव्य जीवन व अध्यात्मज्ञान्यांचा नवसमाज**

विकास प्रक्रिया व इतिहास यांची शेवटची परिणति व कळस म्हणजे भूतलावरील दिव्य जीवन होय. 'श्रेष्ठ मन' हे सत्य आहे. आणि विकास प्रक्रियेचा स्वभाव पाहता श्रेष्ठ मनाचे आगमन अपरिहार्य आहे. तीच या जगात खरा दिव्य आविष्कार घडवून आणते; चेतन व जड यातील अंतिम विरोधाभास नाहीसा करते आणि प्राकृतिक सृष्टीचे सार्वभौम अस्तित्व मुक्त मनाने स्वीकारावयाचा मार्ग सुलभ करते.

प्राकृतिक सृष्टीच्या अशा तऱ्हेच्या परिवर्तनाने एक नवीन तऱ्हेचे समष्टि जीवन व एक नवीन समाज–व्यवस्था अस्तित्वात येऊन इतिहासाला दिव्य सफलता प्राप्त होईल. या नवसमाजाचा गाभा म्हणजे अध्यात्म ज्ञान झालेल्या विभूतींची अवतीर्ण झालेली एक जात किंवा वंश होय. आज मनुष्य हा जितक्या प्रमाणात इतर प्राण्यांपेक्षा उच्चतर आहे, त्याच प्रमाणात आजच्या मनुष्यप्राण्याहून हा समाज उच्चतर असेल. स्वर्गारोहण हे मनुष्याचे खरे साधन नसून, ऐहिक लोकात – इथेच आत्मपदाकडे त्याचे आरोहण, त्याच आत्म्याचे सामान्य मानवतेत अवतरण व मानवाच्या पार्थिव स्वभावाचे परिवर्तन हेच त्याचे खरे साध्य आहे. कुठल्यातरी मरणोत्तर मुक्तीसाठी नव्हे तर याच परिवर्तनासाठी मानवता एका नवीन जन्माची वाट पाहात आहे, असा नवीन जन्म होणे हीच आतापर्यंतच्या प्रदीर्घ, क्लिष्ट आणि दु:खपूर्ण वाटचालीची अंतिम परिणति व शेवटचा कळस होय.

**घ) आध्यात्मिकता व मानवी जीवनाचे सारसर्वस्व**

मानवी अनुभवांचे वैशिष्ट्यच मुळी हे आहे की, त्यात अंतर्बाह्यांगांचा समन्वय एकत्र सापडतो. म्हणूनच संपूर्णता हे त्याचे प्रधान लक्षण आहे; परंतु असे जरी असले तरी सर्वसाधारण मानवाला अशा संपूर्णतेची जाणीव असतेच असे मात्र नाही. व्यावहारिक जीवनाच्या धकाधकीत आपण बहुतेक आर्थिक विवंचनेत गुरफटून केवळ

आधिभौतिक सुख मिळविण्यासाठीच आपली सर्व शक्ती खर्च करतो; पण मानव म्हणजे नुसता जड पिंड नसून, त्यात बुद्धी असते; उच्च आध्यात्मिक ध्येयांची आकांक्षा पण असते. आध्यात्मिकता ही आधिभौतिकतेपेक्षा जास्त महत्त्वाची असते, ह्याचा किती तरी पुरावा मानव संस्कृतीच्या इतिहासात आढळतो; व त्यामुळे आध्यात्मिकता मानवी जीवनाचे सारसर्वस्व आहे हे विचारी मनाला पटू लागते.

मानवाच्या आध्यात्मिक जाणिवेचा जो अत्युच्च आविष्कार होतो, त्यात व्यक्तिनिष्ठ आणि वस्तुनिष्ठ असा भेद नष्ट होतो आणि या अभेदाच्या जाणिवेतून उदात्त आनंदाचा अनुभव देणारे सर्जनशील सामर्थ्य व्यक्तीस प्राप्त होते आणि त्याबरोबर उत्स्फूर्तपणे समाजसेवा करण्यास त्या व्यक्तीला प्रेरणा मिळते.

पापकर्मांचा त्याग केल्याशिवाय मनुष्य भक्त होऊ शकत नाही. आध्यात्मिक गुरूंच्या व शास्त्राच्या आज्ञेनुसार स्वत:ला भक्तिमय सेवेमध्ये संलग्न करणे हा आध्यात्मिक स्तरावर राहण्याचा मार्ग आहे. आध्यात्मिक स्तर म्हणजे त्या स्तरावर कोणतेही पापकृत्य नसते. त्या स्तरावर 'पापमय' असे काहीच नसते. मनुष्य भौतिक स्तरावर असतो तेव्हाच 'पुण्यकर्मे' आणि 'पापकर्मे' असतात. 'चांगले' आणि 'वाईट', 'पुण्य' आणि 'पाप' हे सर्व भौतिक स्तरावरच विचारात घेतले जाते. परंतु मनुष्य दिव्य स्तरावर येतो तेव्हा तो आपोआपच निष्पाप होतो. याची पुष्टी भगवद्‌गीतेत या प्रमाणे होते. – ''जो मनुष्य सर्व परिस्थितीत एकनिष्ठ होऊन पूर्णतया भक्तीमध्ये संलग्न होतो तो तत्काळ त्रिगुणांच्या पलीकडे जातो आणि ब्रह्मस्तराप्रत ऊन्नत होतो.'' – १४:२६

**च) मानवी स्वभावातील आध्यात्मिकता**

सर्वात श्रेष्ठ प्राणी बुद्धिमान असतो, व तो म्हणजे मानव. त्याचा भौतिक आत्मा हे चित्तत्व (स्पिरिट) असते व तेच सर्व जडाला चैतन्य पुरविणारे असते. मानवामध्ये आध्यात्मिक व अमर अशा आत्म्याचे संप्रवेशन होत असल्याने मानवाच्या ठिकाणी हक्क व कर्तव्यें यांची क्षमता निर्माण होते; आणि त्यांचा स्वतंत्रपणे व जबाबदारीने त्याने पाठपुरावा करावयाचा असतो. याप्रमाणे पूर्णाच्या सेवेसाठी केवळ साधन न बनता मानव स्वत:च स्वत:चे उद्दिष्ट बनतो व तो स्वत:करीताच ईश्वराचाही आवडता बनतो. ह्यामुळे त्याला एक प्रकारची प्रतिष्ठा प्राप्त होते, व तिच्यामुळे 'मानव हा ईश्वराच्या प्रतिमेप्रमाणे घडविलेला आहे' असे म्हटले जाते. त्याच्या या प्रतिष्ठेस अनुरूप होण्यासाठी त्याने नैतिक नियमांचे पालन केले पाहिजे. मानव – व्यक्तींच्या स्वभावात जी आध्यात्मिकता अनुस्युत असते व जी त्याच्या शारीरिकतेवर अधिराज्य चालविते, तिचे एक अपरिहार्य व्यक्तिकरण म्हणजे नैतिक नियम होत. याप्रमाणे मानवाने आपले विचार व कृती यामध्ये सर्वश्रेष्ठ अंतिम सत्ता जो ईश्वर तोच आपला स्रष्टा व अंतिम अर्थ किंवा श्रेय आहे हे मान्य केले पाहिजे. त्याचप्रमाणे इतर माणसे ही स्वत:च अंतिम उद्दिष्टे आहेत, असे समजून, त्यांच्याविषयी आदर व प्रेम बाळगले पाहिजे. आपल्या प्रमाणेच त्यांना जगण्याचा, निकोप आरोग्य ठेवण्याचा, स्वत:च्या गरजा भागविण्यासाठी भौतिक वस्तू संपादन करण्याचा, सुव्यवस्थित शांतता, स्वातंत्र्य व सत्य अनुभविण्याचा हक्क असतो व तो प्रत्येकाने इतरांच्या बाबतीतही उचलून धरला पाहिजे.

**छ) अध्यात्मवाद : आनंददायक**

भारतीय लोकांमध्ये एक आध्यात्मिक मनोवृत्ती असल्यामुळे आशेचा नित्य प्रति संचार होत असतो. अध्यात्मवाद जगामध्ये एक शाश्वत नैतिक व्यवस्थेचा संकेत करतो. येथे मनुष्याचे कृतकर्म सुरक्षित राहतात. या

आधारावर मनुष्य आपल्या वर्तमानकाळच्या जीवनाच्या दु:खांना पूर्व जन्माच्या वाईट कर्मांचा परिणाम समजू (मानू) लागतो. परिणामी तो आपल्या वर्तमानकाळच्या जीवनाच्या सत्कर्मांच्या आधारे भावी जीवनास सुखी करण्याचा प्रयत्न करतो. ऋग्वेद या नैतिक व्यवस्थेस 'ऋत'; मीमांसा 'अपूर्व' आणि न्यायवैशेषिक 'अदृष्ट' असे म्हणतात.

नैतिक संस्थानचा संस्थापक ईश्वर आहे. तो कर्मानुसार जीवांना फला (कर्मफला)ची व्यवस्था करतो. ईश्वराशिवाय कर्म-नियमांचे संचालन शक्य नाही, कारण की नियमाचा कोणी तरी नियामक हा असला पाहिजे. कर्मवाद व्यक्तीचे कृत स्वातंत्र्य आणि उत्तरदायित्व दोहोंची व्याख्या करतो. सुख आणि श्रेय (धर्म) यांचे समन्वयच नि:श्रेयस आहे. श्रेय (धर्म) नैतिक कर्म आहे आणि सुख त्यांचे फळ. साधारण स्तरावर सुख आणि धर्म यामध्ये विरोध दिसून येतो. सुख म्हणजे इच्छेची तृप्ती आणि धर्म नाव आहे इच्छा-तृप्तीचा त्याग. तरी पण, साधारण सुखाहून भिन्न (वेगळे) असलेले, धर्माचे सुखद फळ मिळेल. सत् संकल्पी आनंदाचा लाभ उठवितो, सुखाचा नव्हे.

## २) आध्यात्मिक अनुभूती[७२]

### १) आध्यात्मिक अनुभूती – सामान्य परिचय

आध्यात्मिक अनुभूतींचा धर्माच्या उदात्त तत्त्वांशी अत्यंत जवळचा संबंध आहे. म्हणून तर धर्म आणि अध्यात्म ही दोन्ही एकमेकांशी बरोबर असतात. महर्षि कणाद यांच्या मते धर्म हा इहलोक आणि परलोकाची समृद्धी आणि कल्याणाचे विधान करणारी उत्कृष्ट साधना-पद्धती आहे. 'यतोऽभ्युदयनि: श्रेय ससिद्धः स धर्म:' – कणाद. सुप्रसिद्ध पाश्चात्य तत्त्वज्ञ व्हाइटहेडच्या अंतर्भेदी दृष्टीनुसार, धार्मिक विचार, काल्पनिक चित्रांपासून वर उठून अभिव्यक्तीच्या प्रामाणिकतेमध्ये विकसित होतात. धर्म, मानव स्वभावाद्वारे ईश्वराच्या शोधाची प्रतिक्रिया आहे. कवींद्र रवींद्रनाथ टागोर यांच्या मतानुसार धर्म अंत:प्रकृती आहे. तीच समस्त वस्तूंचे ध्रुव सत्य आहे. धर्मच ते परम उद्दिष्ट आहे, जे आमच्या (मना)मध्ये कार्यप्रवृत्त असते.

डॉ. देवराज यांच्या शब्दांमध्ये ''धार्मिक अथवा आध्यात्मिक अनुभूती मुळातच एक गूढ परिणती, लक्ष्य अथवा सत्तेची प्रचिती आहे, जी जीवनाच्या समस्त मूल्यांचे मूळ अथवा आधार मानली जाते. ज्याला आपण धार्मिक वा आध्यात्मिक जीवन म्हणतो, ते असे जीवन आहे जे उक्त लक्ष्य आणि सत्तेच्या सापेक्षतेमध्ये जगले जाते.'' (डॉ. देवराज – संस्कृति का दार्शनिक विवेचन, पृ. ३२३) डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या कथनानुसार ''धर्म एक प्रकारचे जीवन आणि अनुभव आहे. ते तत्त्वज्ञान आणि अनुभवाची वस्तू आहे. ही अनुभूती म्हणजे भावना अथवा आपल्या मनाची कल्पना नव्हे, परंतु ही अनुभूती म्हणजे संपूर्ण व्यक्तित्वाची, अखंड चैतन्याच्या केंद्रीय सत्तेप्रती उन्मुख भाव आहे. धार्मिक अनुभूती स्वत: प्रमाण आहे. धर्म विश्वासावर आधारित आहे.'' (डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् – हिंदुओंका जीवन-दर्शन; अनुवादक – कृष्ण किंकर सिंह, पृ. १३)

स्थूल रूपाने धर्माचे दोन भाग किंवा पैलू निश्चित होतात, पैकी एक सामान्य असून दुसरे विशेष आहे. पहिला हा दुसऱ्यापेक्षा अधिक स्थायी, व्यापक आणि उदार आहे. म्हणून दुसऱ्याचे पहिल्यामध्ये समाहार होऊन

जाते. 'भारतीय संस्कृती'चे प्रख्यात लेखक श्री. साने गुरूजी यांनी यालाच धर्माचे यम रूप आणि नियम रूप अशी नावे दिली आहेत. धर्माचे यम रूप भाग बदलत नाहीत, परंतु नियम रूप भाग मात्र बदलत असतो. म्हणून यमचा अर्थ आहे अचल धर्म, तर नियमचा अर्थ आहे चल धर्म. यम धर्म हा त्रिकालाबाधित तत्त्वांनी युक्त असतो. जसे, सत्य, अहिंसा, संयम, दया, प्रेम, परोपकार इत्यादी. नियम धर्मामध्ये कर्मकांडाचे विधान असते. कर्मकांडे ही परिवर्तनशील असतात. तर यम धर्म हा अपरिवर्तनशील असतो.

विश्वासाच्या मजबूत पायावर धर्माचा प्रासाद उभा असतो. विश्वास आत्म्याची अंत:र्दृष्टी असते. ज्याप्रमाणे शारीरिक इंद्रियांद्वारे भौतिक पदार्थांचे ग्रहण होते त्याच प्रमाणे आत्म्याच्या प्राणशक्तीद्वारे आध्यात्मिक भाव ग्रहण केले जातात. मतमतांतरांची अंधश्रद्धा म्हणजे विश्वास नव्हे. धर्म हा एक प्रकारचा विश्वास किंवा अंतर्दृष्टी आहे. धार्मिक अंत:र्दृष्टी पण इतर उपलब्धींसारखीच एक वस्तू आहे की जेथून विचार आरंभ होतात आणि जेथे त्यांचे प्रत्यावर्तन पण होते.

आध्यात्मिक साधना, साधकांमध्ये विश्वासमूलक अंत:र्दृष्टी निर्माण करून प्रत्यावर्तनाची प्रेरणा निर्माण करते. मनुष्य विविध कोशांच्या आवरणांमुळे क्रमश: अधोमुखी भूमीमध्ये उतरत जातो. त्याचा आत्मा इतक्या जास्त स्थूल आवरणांमध्ये लपून जातो की त्यावर अनेक थरांची सघनता जमल्यामुळे त्याची प्रकाश-किरणे स्थूल स्थलांच्या आवरणांना पार करण्यामध्ये असमर्थ ठरतात, आणि मग जीव (जीवात्मा) अज्ञान-अंधकारामध्ये खितपत पडून 'पुनरपि जननम् पुनरपि मरणम्'च्या चक्रापासून मुक्त होत नाही. जोपर्यंत साधक या स्तरांच्या पटावरण-घनास चिरडून आत्मसाक्षात्कार घडवून (प्राप्त करून) घेत नाही, तोपर्यंत त्याचे कल्याण अशक्य आहे. वेदांत्यांनी खालून क्रमश: वर घेऊन जाणारे, स्थूलतेपासून सूक्ष्मतेकडे गतिशील करणारे पाच कोशांची कल्पना केली आहे - (१) अन्नमय कोश, (२) प्राणमय कोश, (३) मनोमय कोश, (४) विज्ञानमय कोश, आणि (५) आनंदमय कोश. हे सर्व क्रमश: उत्तरोत्तर सूक्ष्मतर आणि श्रेष्ठतर होत जातात.

तैत्तिरीय उपनिषदाच्या भृगवल्लीमध्ये वरूणचा पुत्र भृगुच्या मनोरंजक कथेमुळे आनंदमय कोशाची उपलब्धी ही एकमेव चरम सत्य स्वरूपात मान्य करण्यात आली आहे आणि तेच साधकासाठी साध्य आहे. उपरोक्त पाच कोशांच्या स्तरांनी आवृत्त आत्म्यास जीवात्मा ही संज्ञा दिली जाते. भौतिक पदार्थ, प्राण, मन आणि बुद्धीने युक्त हे चार कोश जागृत आणि स्वप्न अवस्थेमध्ये राहतात आणि शेवटच्या आनंदमय कोशामध्ये प्रगाढ सुषुप्तिची अवस्था असते. ज्याप्रमाणे सर्वात उंचावरील शेवटच्या पायरीपर्यंत पोहोचविण्यामध्ये खालच्या पायऱ्यांची भूमिकेची गरज असते, त्याचप्रमाणे स्थूलतेपासून उत्तरोत्तर सूक्ष्मतेकडे घेऊन जाणाऱ्या क्रियांमुळेच साधक हा शेवटच्या आनंदभूमीमध्ये पोहोचतो. स्थूल स्तरांच्या कार्यांमध्ये विरोध आणि विकृती उत्पन्न झाल्यास सूक्ष्म कार्ये साधकाची मदत न करता त्यांना आणखी विकृत करून टाकतात. म्हणून त्यांना अशा प्रकारे सहजपणे सुधारणे साधकांसाठी अत्यंत आवश्यक असते की त्यामध्ये परस्पर सामरस्याची भावना उत्पन्न होऊन जावी आणि मग ते कसल्याच प्रकारचा अडथळा निर्माण करण्यापेक्षा स्वेच्छापूर्वक मदत करण्यामध्ये लागावेत. म्हणून हे अत्यंत आवश्यक आहे की मनाच्या प्रवृत्तींना बहिर्मुख बनवावेत. सर्व प्रकारच्या बाह्य पूजाविधी, की ज्याच्यामुळे बहिर्मुख वृत्तींना मदत आणि उत्तेजन मिळते, यामुळे बंदच नव्हे, तर संपूर्णपणे तिरस्कृत केल्या गेल्या पाहिजेत. संतांनी या समस्येचे निराकरण करण्याकरिता एक चांगला उपाय शोधला आहे, तो म्हणजे सहज साधनेचा.

## २) आध्यात्मिकतेची मानसशास्त्रीय बैठक

*''गर बगोयम ज़ नज़र दोस्त निहानस्त ग़लत ।*
*वर बगोयम के: बहर दीदा अयानस्त ग़लत ।।*
*शश जहत फ़ैज़पज़ीर अज़ नज़र रहमत-ए-अू ।*
*वर बगोयम के:बसूए निगरानस्त ग़लत ।।''*

**भावानुवाद :** जर मी म्हणेन की, प्रेयसी डोळ्यास दिसत नाही म्हणजेच अदृश्य आहे, तर हे खोटे असेल! जर मी म्हणेन की, ती प्रत्येकास दिसते, हे (पण) असत्य (खोटे) असेल!

प्रेमाच्या प्रभेमुळे – कीर्तिमुळे साही दिशा (षट् आयाम) तेजस्वी झाल्या आहेत, परंतु (अशा परिस्थितीत) जर मी म्हणेन की, ती (प्रेयसी) एका दिलेल्या टोकावर आपला चेहरा खिळविते, तर हे पण असत्य असेल!

साधना मार्गाच्या प्रगतीमध्ये सूफ़ींच्या मनामध्ये भावभावनांचे नाना प्रकारचे तरंग उमटतात. कधी तो संपूर्णपणे आत्मविस्मृत होऊन जातो; तर कधी तो दैवी सत्वाशिवाय काहीच पाहात नाही; तर काही वेळेस त्याचे संभाषण रूपकाच्या भाषेत असते. परंतु तरी पण तो मानवी अहंचे एक प्रत्यक्ष ज्ञान किंवा संवेदन बाकी ठेवतो; आणि आपल्या आध्यात्मिक अनुभूतीच्या माध्यमाने तो आपल्या अमरतेची कल्पना करतो आणि पार्थिवतेपासून व मौलाना जलालुद्दीन रूमीच्या 'मसनवी' म्हणजेच कथा-काव्यामध्ये नमूद असलेल्या, असत्यापासून तो मुक्त होतो. अध्यात्माकडे प्रवृत्त होण्याविषयी ईश्वरी आदेश असा आहे – ''(आध्यात्मिक बाबतीत) अशा व्यक्तीचा मार्ग धर, जी मजकडे वळली आहे.'' – ३१:१५

इस्लामचे सुप्रसिद्ध आधुनिक विचारवंत मुहम्मद इक़्बाल यांच्या शब्दांमध्ये, मुस्लिम विचारवंत संप्रदायाच्या मते, अहं (जीवात्मा) हा एक शुद्ध, आविभाज्य आणि निर्विकार अशा आत्म्याचे एक मूलभूत द्रव्य आहे. तो मानसिक अवस्थांच्या गटापासून संपूर्णपणे वेगळा असून काळ संक्रमणामुळे अप्रभावित राहणारा आहे. आमची जाणीव असलेली अनुभूती ही एक मिलाफ (ऐक्य) असते. मानसिक अवस्था या एकमेकांशी संबंधित असतात, कारण की सारख्या बदलत्या गुणप्रवाहामध्ये, या शुद्ध द्रव्याचे अनेक गुण अपरिवर्तित अवस्थेमध्ये टिकून राहतात. जेव्हा मी मूळ प्रत्यक्ष ज्ञान आणि सध्याची स्मृतीची कृती यामध्ये बदल घडू देत नसेल तेव्हाच माझे तुम्हास ओळखणे शक्य आहे. तथापि या संप्रदायाचा कल आणि रस जितका आध्यात्मिकतेमध्ये होता तितका मानसशास्त्रीय नव्हता. परंतु जरी आम्ही आत्म्याची सत्ता, आमची जाणीव असलेल्या अनुभूतीच्या तथ्यांचे स्पष्टीकरण स्वरूपात घेतले काय, किंवा अमरत्वाचा एक आधार म्हणून घेतले काय, मला अशी भीती आहे की त्यामुळे ना मानसशास्त्रीय कुतूहल, ना आध्यात्मिक कुतूहलाचे शमन होते. आधुनिक तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यास कांटचे शुद्ध विवेकाचे तर्कदोष किंवा हेत्वाभास सुपरिचित आहेत. प्रत्येक विचाराशी निगडित असे 'मी जाणतो' ('मला वाटते') हे कांटच्या मते, विचाराची एक शुद्ध औपचारिक अशी अट आहे, आणि विचाराची एक शुद्ध औपचारिक अट पासून ते सत्ताशास्त्रीय द्रव्यापर्यंतचे संक्रमण हे तर्कशास्त्रीयदृष्ट्या असंगत आहे. उपरोक्त संपूर्ण विधान असे आहे – 'मला वाटते म्हणून मी आहे.' अर्थात 'जानामि अत: अस्मि', 'चिंतयामि अत: अस्मि' म्हणजेच 'मी विचार करतो त्या अर्थी मी आहे' या शब्दात देकार्तने, त्याच्या मते, ज्ञानशास्त्रीय दृष्ट्या ज्ञानाला पायाभूत असलेली अंत:प्रज्ञा सूत्ररूपाने मांडली आहे.)

अनुभूतीच्या विषयाकडे पहाण्याच्या कांटच्या दृष्टिकोनाव्यतिरिक्त, एखाद्या वस्तूची वा द्रव्याची अविभाजनता तिचे अविनाशित्व सिद्ध करीत नाही. कांट स्वत:च अभिप्राय व्यक्त करतो की, एखादे सखोल असलेले (अदृश्य) गुण किंवा अकस्मात नष्ट होणारे अविभाजित द्रव्य हळूहळू शून्यामध्ये नाहीसे होईल. द्रव्याचे हे स्थिर मत कोणतेच मानसशास्त्रीय कुतूहल शांत करू शकत नाही. हे त्या कौतूहलास उपयोगी पडण्यासारखे नाही. प्रथमत:, एखादे भौतिक वस्तूचे वजन (भार) हे त्या वस्तूचे गुण असते, उदाहरणार्थ या अर्थी, आपल्या सचेतन अनुभूतीच्या घटकांना, एखाद्या जीवात्म्याचे मूलभूत द्रव्याचे गुणस्वरूपात मानणे (समजणे) कठीण असते. निरीक्षण असे दर्शविते की अनुभूती म्हणजे निर्दिष्टाच्या विशेष कृती, आणि तद्वत त्यांचे आपले एक स्वत:चे विशिष्ट अस्तित्व असते. लैर्डच्या जोरदार अभिप्रायानुसार, "त्यांचे एक नवीन जग बनते (निर्माण होते), आणि केवळ एका जुन्या जगामधील नवीन तोंडवळा नव्हे." दुसरे असे की, जरी आपण अनुभूतांना गुण मानले, तरी ते जीवात्म्याच्या मूलद्रव्यामध्ये ते मुळातच कसे असतात, हे आपण शोधू शकत नाही. अशा प्रकारे आपणास असे आढळून येते की आपली चेतन अनुभूती जीवात्म्याचे मूलद्रव्य स्वरूपात असलेल्या अहंचा आम्हास सुगावा देऊ शकत नाही. कारण, अभ्युपगमाच्या साहाय्याने जीवात्मा मूलद्रव्य स्वत: अनुभूतीमध्ये व्यक्त होत नाही. आणि पुन्हा असेही निदर्शनास आणले जाईल की त्याच वस्तूस वेगवेगळ्या वेळेस नियंत्रित करणाऱ्या विभिन्न जीवात्मा-द्रव्याची असंभाव्यता विचारात घेता, अशा घटनांचे समाधानकारक पुरेसे स्पष्टीकरण हा सिद्धान्त देऊ शकत नाही.

तरी पण आपल्या चेतन अनुभूतीचे स्पष्टीकरण, आपणासाठी अहं (जीवात्मा) पर्यंत पोहोचू शकण्याचा एकमेव मार्ग आहे. म्हणून आपण आधुनिक मानसशास्त्राकडे वळू या, आणि ते अहंच्या स्वभावावर कसा प्रकाश पाडते हे पाहू या. विलियम जेम्सने चेतनेस एक प्रकारचे 'विचार-प्रवाह' कल्पिले आहे - एक अनुभूत सातत्यासह परिवर्तनाचा एक सचेत प्रवाह. त्याला आपल्या अनुभूतींमध्ये कार्यरत एक प्रकारचा एक एकजुटीचा सिद्धान्त दिसून येतो की ज्याच्यावर आकडे ('hooks') टाकण्यात आलेले आहेत, आणि तदनुषंगाने मानसिक जीवन प्रवाहामध्ये एक दुसऱ्यास पकडता येईल. अहंमध्ये वैयक्तिक जीवनाच्या भावना भरलेल्या असतात, आणि अशा प्रकारे तो विचार प्रणालीचा भाग असतो. धडधडणारा किंवा धडधडलेला, विचाराच्या नाडीचा प्रत्येक ठोका हा जाणणारा आणि आठवणारा एक अविभाज्य घटक (मिलाफ) असतो. अहं (जीवात्मा) म्हणजे विचाराचा विद्यमान ठोका आणि या विद्यमान ठोक्यानंतर येणारा ठोका यांच्यामुळे प्रवाहित ठोक्याचे विनियोगाचे नाव होय. आपल्या मनाचे सदरहू वर्णन हे अतिशय निखालस (मुक्त, मोकळे) आहे, परंतु मी असा विचार करण्याचे धाडस करतो की, ते आपणामध्ये आढळून येणाऱ्या चेतनेशी, जाणीवेशी प्रामाणिक नसते. चेतना ही काहीशी एकटी असते. ती आपल्या मानसिक जीवनामध्ये पूर्वकल्पित असते आणि एकमेकांशी अभिप्राय कळविणारे असे चेतनेचे लहान तुकडे नसतात. चेतनेविषयीचे हे मत, अहंला सुगावा लागू देण्याऐवजी, अनुभूतीकडे सापेक्ष रीतीने कायमस्वरूपी असलेल्या तत्त्वाकडे संपूर्णपणे कानाडोळा करते. प्रवाही विचारांमध्ये सत्तेचे किंवा सत्तत्त्वाचे सातत्य नसते. जेव्हा यांपैकी कोणते तरी एक विद्यमान असते, तेव्हा दुसरे हे संपूर्णपणे अंतर्धान झालेले असते. वज्रलेपी विनष्ट असा प्रवाही विचार, हा वर्तमान विचाराच्या मदतीने कसा बरे जाणता येईल आणि त्याचे विनियोग करता येईल? जिला आपण अनुभूती म्हणतो असा अहं परस्पर

शिरकाव करणाऱ्या बाहुल्याव्यतिरिक्त असतो, असे माझ्या म्हणण्याचा अर्थ नव्हे. आंतरिक अनुभूती हे सक्रिय अहं असते. समजणे, निर्णय करणे आणि निश्चयन या कृतीमध्ये आपण अहंची योग्यता जाणतो. पर्यावरणाचा उल्लंघन करणारा अहं (जीवात्मा) आणि अहंचे उल्लंघन करणारे पर्यावरण यामुळे अहंचे जीवन हे एक प्रकारचे ताणतणाव बनून जाते. या परस्पर उल्लंघनाच्या आखाड्याबाहेर अहं उभे राहात नाही. एक अधिकृत ऊर्जा स्वरूपामध्ये ते (अहं) त्यात वर्तमान (विद्यमान) असते. ते आपल्या स्वतःच्या अनुभूतीने निर्माण होते आणि शिस्तबद्ध होते. अहंच्या या अधिकृत कार्यासंबंधी पवित्र कुराण अत्यंत स्पष्ट शब्दांमध्ये असे नमूद करते :

''ते तुम्हाला आत्म्याविषयी प्रश्न करतात, (त्यांना) सांगा, आत्मा माझ्या विधात्याच्या आज्ञेने (अस्तित्वात) आहे, (पण हे मानवा! तू त्याचे स्वरूप समजू शकत नाहीस कारण) तुला अत्यल्प ज्ञान प्रदान केलेले आहे. (तिचे आकलन तुझ्या आवाक्याबाहेरची गोष्ट आहे.)'' – १७:८५.

उपरोक्त श्लोकांतर्गत मूळ अरबी शब्द 'अम्र' याचे अर्थ जाणण्यासाठी, आपणास पवित्र कुराणोक्त 'अम्र' आणि 'ख़ल्क़' या दोन शब्दांमधील अर्थात असलेला फरक जाणून घ्यावे लागेल. परमेश्वर हा दोन पद्धतीने आपली निर्मिती प्रक्रिया – जगदुत्पत्तीची क्रिया करतो. या विषयीचे त्याने आम्हास अवतरण केले आहे. या दोन पद्धती व्यक्त करण्यासाठी 'ख़ल्क़' म्हणजे सृष्ट्युत्पत्ती, निर्मिती आणि 'अम्र' म्हणजे ईश्वराज्ञा. जसे कुराण म्हणते : ''तोच निर्मिती (विश्व निर्माण) करतो आणि तोच आज्ञा देतो.'' उपरोक्त श्लोकाचा अभिप्राय असा आहे की आत्म्याचा अनिवार्य स्वभाव हा आज्ञापालन आहे. कारण ते परमेश्वराच्या आज्ञामूलक ऊर्जेपासून अग्रेसर होते; मात्र दैवी (परमेश्वरी) 'अम्र' म्हणजेच आज्ञा जीवात्मा–घटकांवर कशा प्रकारे कार्यप्रवृत्त होते, याविषयी आम्ही अनभिज्ञ आहोत. 'रब्बी' ('माझा प्रभू') हे विधानामधील प्रयुक्त वैयक्तिक सर्वनाम हे जीवात्म्याचा स्वभाव आणि त्याचे वर्तन यावर आणखी जास्त प्रकाश टाकते. टप्प्यामध्ये होणारे सर्व बदल, समतोल आणि त्याच्या मिलाफामधील परिणामकारकता या सर्वांसकट आत्मा हा कोणता तरी वैयक्तिक आणि विशिष्ट असा असला पाहिजे, असे सूचित करण्याचा आशय दिसतो. ''प्रत्येक माणूस हा आपल्या स्वतःच्या पद्धतीने कर्म (कृती) करतो; परंतु तुमचा प्रभू हे उत्तम प्रकारे जाणतो की कोणास त्याच्या मार्गामध्ये सर्वोत्तम मार्गदर्शन लाभलेले आहे.'' अशा प्रकारे, माझे खरे व्यक्तिमत्व हे एक वस्तू नव्हे; तर एक कृती (कर्तव्यकर्म) आहे. माझी अनुभूती ही परस्पर संदर्भित अशा कर्तव्य–कर्मांची फक्त एक मालिका असते. ती आज्ञादायक दिशादर्शक अशा एका हेतुच्या मिलाफाने एकत्र असलेली अशी अनुभूती आहे. माझे संपूर्ण सत्तत्त्व हे माझ्या आज्ञाधारक हेतुमध्ये वर्तमान – विद्यमान आहे. अवकाशामधील एखादी वस्तू किंवा कालप्रवाहामधील अनुभूतीचे एखादे सट यांच्याप्रमाणे तुम्ही मजकडे पाहू शकत नाही. माझे निर्णय, माझा संकल्प, माझ्या मनाचा कल, माझी ध्येये आणि महत्त्वाकांक्षा यांना समजून तुम्ही माझी योग्यता ओळखली पाहिजे.

दुसरा प्रश्न आहे – अवकाश आणि काळाच्या क्रम–व्यवस्थेमध्ये आत्मा कसा उदयास येतो? या मुद्द्यावर पवित्र कुराणाची शिकवण अत्यंत स्पष्ट आहे.

''आम्ही मानवाला मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले. मग आम्ही त्यास वीर्याच्या एका बिंदूच्या रूपात, एता सुरक्षित स्थानी (म्हणजेच गर्भाशयात) ठेवले. मग आम्ही त्या वीर्याला गोठलेल्या रक्ताच्या रूपात विकसित केले, आणि पुढे आम्ही त्यास मांसाच्या गोळ्याच्या रूपात विकसित केले. पुढे आम्ही त्या मांसाच्या

गोळ्यात हाडे विकसित केली आणि आम्ही त्या हाडांवर मांसाचे आवरण चढवले. मग (शेवटी) त्याला **एका नवीन निर्मितीच्या रूपाने घडवून टाकले.** खरोखर, प्रशंसनीय आहे अल्लाह, सर्वोत्तम निर्मितीकार!'' – २३:१२–१४.

माणसाचे 'एक नवीन निर्मितीच्या रूपाने घडवून टाकणे' हे शारीरिक सावयव रचनेच्या आधारावर विकसित होते. उप–जीवात्म्यांच्या वसाहतीमधून एक सखोल आत्मा निरंतर माझ्यावर प्रभाव टाकत असतो, आणि अशा प्रकारे अनुभूतीचे एक पद्धतशीर मिलाफ निर्माण करण्याची तो मला परवानगी देतो. जरी गूढ रीतीने एकत्रित असले तरी आत्मा आणि शरीर या दोन गोष्टी एक दुसऱ्यापासून स्वतंत्र नाहीत काय? मी या विचाराप्रत येऊन पोहोचलेला आहे की वस्तूचे एक स्वतंत्र अस्तित्व असल्याचे अभ्युपगम (प्राक् कल्पना) हे संपूर्णपणे अयाचित (न मागता दिलेले) आहे. स्वत:स वगळून इंद्रियवेदनेचे निदान एक आंशिक भाग असलेले जड द्रव्याचे केवळ समर्थन करता येऊ शकते. स्वत:स वगळून असलेल्या काहीसे विशिष्ट असे प्राथमिक गुण असल्याचे गृहीत धरता येईल. हे माझ्यामध्ये असलेल्या विशिष्ट इंद्रियवेदनांशी अनुरूप असे आहेत; आणि त्या गुणांमध्ये विश्वास असल्याचे मी समर्थन या आधारावर करतो की कारणाचे परिणामांशी काही साम्य असले पाहिजे. परंतु कारण आणि कार्यामध्ये साम्य असलेच पाहिजे असे काही नाही. जर माझे यश दुसऱ्यास सलत असेल, तर माझे यश आणि त्याचे सलणे यामध्ये परस्पर साम्य (मुळीच) नाही. तरी पण नित्याचा अनुभव आणि भौतिक विज्ञान हे जड द्रव्याचे एक स्वतंत्र अस्तित्व असल्याचे गृहीत धरतात. म्हणून आपण तात्पुरते असे गृहीत धरू या की शरीर आणि आत्मा ही दोन्ही स्वतंत्र असूनसुद्धा काही रहस्यमय – गूढ पद्धतीने जुडलेल्या वस्तू आहेत. तथापि, जर ते परस्पर स्वतंत्र असून एक दुसऱ्यावर प्रभाव टाकत नाहीत, तर मग त्या दोहोंमधील बदल तंतोतंत समांतरपणे घडत असतात.

तत्त्वज्ञ लेबनिज़च्या मताप्रमाणे हे काहीसे पूर्वनियोजित मेळ असल्यामुळे घडते. यामुळे आत्मा हा शरीरामध्ये घडणाऱ्या गोष्टींचा एक मूक प्रेक्षक बनून राहतो. जर, दुसरीकडे, आपण असे गृहीत धरले की ते आपसात एकमेकांवर प्रभाव टाकतात, तेव्हा त्यांच्या परस्पर आंतरक्रिया (अन्योन्य क्रिया) या नेमक्या कशा घडतात आणि कुठे घडतात, या आंतरक्रियेमध्ये दोघांपैकी कोण पुढाकार घेतो, ही गोष्ट दाखवून देणारी निरीक्षणक्षम तथ्ये आपण शोधू शकत नाही. आत्मा हा शारीरिक कार्ये सिद्ध करणारा शरीराचा एक अवयव आहे किंवा शरीर हे आत्म्याचे एक साधन आहे. आंतर–क्रियेच्या सिद्धान्तासाठी उपरोक्त दोन्ही विधाने सम प्रमाणात सत्य आहेत. मानसशास्त्रज्ञ लँगचा भावनेचा सिद्धान्त असे दर्शविण्याचा प्रयत्न करतो की आंतरक्रियेमध्ये (अन्योन्य क्रियेमध्ये) शरीर हा पुढाकार घेतो. तथापि या सिद्धान्ताचे खंडन करणारी अनेक तथ्ये आहेत. येथे ती तथ्ये मांडणे शक्य नाही. एवढे निदर्शनास आणून देणे पुरेसे आहे की, जरी शरीर हे पुढाकार घेत असेल तरी भावनेच्या विकासामध्ये एका निश्चित टप्प्यावर एक सहमतीदर्शक घटक या नात्याने मन प्रवेश करतेच, आणि हे पण तितकेच खरे आहे की इतर बाह्य प्रचोदके (उद्दीपके) सतत मनावर प्रभाव टाकत असतात. एखादी भावना पुढे वाढीस लागेल किंवा एखादे प्रचोदक आपले कार्य प्रवृत्त होणे चालू ठेवेल, हे माझे त्यावर लक्ष ठेवण्यावर अवलंबून आहे. एखाद्या भावनेचा किंवा एखाद्या प्रचोदकाचा शेवट (परिणती) हा सरते शेवटी मनाची संमती ठरविते.

अशा प्रकारे समांतरता आणि अन्योन्य क्रिया या दोन्ही असमाधानकारक आहेत. तरी पण मन (आत्मा) आणि शरीर कृतीमध्ये एक होऊन जातात. मी मेजावरील एखादे पुस्तक उचलतो, तेव्हा माझी एकच आणि अविभाज्य अशी कृती असते. या क्रियेमध्ये शरीराचा आणि मनाचा किती हिस्सा आहे, यांच्यामधील असलेल्या फटीमध्ये एक रेषा आखणे अशक्य आहे. कसेही करून ते एकाच पद्धतीशी निगडित असले पाहिजेत, आणि कुराणोक्त मताप्रमाणे ते एकाच पद्धतीशी निगडित असतात. 'खल्क म्हणजेच निर्मिती (सृष्टी) त्याचीच आहे आणि 'अम्र' अर्थात आज्ञा किंवा आदेश (पण) त्याचाच आहे.'' अशा प्रकारची गोष्ट कशी बुद्धिगम्य असेल आपण हे पाहिले आहे की शरीर हे परिपूर्ण पोकळीमध्ये स्थित एखादी वस्तू (गोष्ट) नव्हे. शरीर म्हणजे घटनांची किंवा कृतीची एक प्रणाली, पद्धती होय. अनुभूतीची प्रणाली, जिला आपण आत्मा किंवा जीवात्मा (अहं) म्हणून संबोधतो, ही पण कृतींची एक प्रणालीच होय. यामुळे आत्मा आणि शरीर यांच्यामधील फरक हा पुसून टाकला जात नाही. ते फक्त त्या दोघांना एकमेकांच्या जवळ आणून सोडते. उत्स्फूर्तता हा जीवात्म्याचा गुणधर्म आहे; शरीर निर्धारित करणाऱ्या कृती स्वतः पुनरावृत्त होतात. शरीर म्हणजे संग्रहित कृती किंवा आत्म्याची सवय; आणि या दृष्टीने तो त्याच्यापासून सुटा करता येण्याजोगा नव्हे. ते चेतनेचे एक कायमचे मूलतत्त्व आहे. ते या कायमस्वरूपी मूलतत्त्व या दृष्टीने बाहेरून स्थिर असल्यासारखे वाटते. तर मग जडद्रव्य काय आहे? ती एक निम्न श्रेणीच्या जीवात्म्यांची एक वसाहत आहे. त्यामधून ससीम जीवन आणि एक उच्च श्रेणीची चेतना यांचा उदय होतो. त्यांचा संबंध आणि त्यांची अनोन्य-क्रिया एका विशिष्ट मात्रेच्या गुंतागुंतीस पोहोचल्यावर हे घडते. हे आत्म-मार्गदर्शनाच्या महत्त्वाच्या गोष्टीपर्यंत पोहोचण्याचे जग आहे. यामध्ये अंतिम सत्तत्त्व कदाचित आपले गूज उघडे करून दाखविते, आणि आपल्या अंतिम स्वभावाचा (स्वरूपाचा) सुगावा पुरविते. निम्न स्तरापासून उच्च स्तर उदय पावते, ही वस्तुस्थिती उच्चस्तराचे महत्त्वपूर्ण मूल्य आणि अंतिम परिणती या महत्त्वाच्या असतात. विकासनिष्पन्न प्रसृत उत्क्रांतीचे समर्थक आपल्यास सांगतात की, आपल्या स्वतःच्या अस्तित्वाच्या स्तरावर नवोन्मेषशाली विकास ही एक आकस्मिक, आकल्पित आणि नवीन वस्तुस्थिती असते, आणि तिचा खुलासा यांत्रिकपणे करता येऊ शकत नाही. खरोखर जीवनाची उत्क्रांती आपणास असे दाखवून देते की जरी सुरुवातीस मानसिक हे शारीरिकतेच्या अधीन असते, तरी जसजशी तिच्या शक्तीमध्ये वाढ होते तसतशी ती शारीरिकतेवर आपले अधिराज्य गाजवू लागते आणि सरते शेवटी एक संपूर्ण स्वातंत्र्याच्या दर्जावर जाऊन पोहोचते. विशुद्ध शारीरिक स्तर नावाची एखादी वस्तू भौतिकता धारण करणारी या अर्थी पण नाही. ज्याला आपण जीवन (जीव) आणि मन म्हणतो ते पण प्राथमिकपणे कल्पक संयोग विकसित करण्यामध्ये सक्षम नसतात. मानसिक आणि वेदनक्षमाने युक्त अशा देवतेची गरज भासते. अंतिम् अहंम् हा नवोन्मेषशाली विकासास विकसित करतो. तो स्वभावाने अंतर्यामी असतो. त्याचे वर्णन पवित्र कुराणामध्ये असे आहे : ''हुवल्-अव्वलु वल्-आख़िरू वज़्ज़ाहिरू वल्बातिनु''- ५७:३. अर्थात् ''तो आदि आहे व तोच अंत (आहे), आणि तो दृष्ट आहे व तोच अदृष्ट आहे.'' - ५७:३

जडद्रव्याचे हे मत एक महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित करते. आपण हे पाहिले आहे की अहं वा जीवात्मा ताठर नाही. तो वेळेवर आपले व्यवस्थापन करतो. तो आपल्या अनुभूतीने निर्माण होऊन शिस्तबद्ध आहे. शिवाय आणखी स्पष्ट आहे की प्रकृतीपासून त्याच्यामध्ये आणि त्याच्यापासून प्रकृतीमध्ये कारणत्व प्रवाह त्यामध्ये

प्रवाहित होते. काय आपल्या कृती जीवात्मा निर्धारित करतो? जर असे असेल तर मग जीवात्म्याचा आत्म-नियतवाद हा अवकाश-काळ व्यवस्थेच्या परिनियंत्रणवादाशी कशा प्रकारे संबंधित आहे? काय वैयक्तिक कार्यकारण संबंध सिद्धान्त एक विशेष प्रकारचे कारणत्व आहे अथवा प्रकृती यंत्रणेचे एक छद्म रूप आहे? असा दावा केला जातो की सदरहू दोन प्रकारचे नियतवाद हे परस्पर व्यावर्तक नाहीत. शिवाय मानवी कृतीस पण वैज्ञानिक पद्धती तितकीच लागू आहे. मानवी विमर्श कृती ही प्रेरकांमधील एक संघर्ष असल्याचे मानले (समजले) जाते. तो संघर्ष जीवात्म्याचे स्वतःचे सध्याचे किंवा वारसा प्राप्त कर्म अथवा अकर्माचा समजून विचारात घेतला जात नाही; परंतु मनाच्या क्षेत्रावर आपसात भांडणारे अनेक बाह्य शक्तींसारखा असि-धुमश्चक्रवत् (तलवार बहाद्दरासारखा) तो संघर्ष असतो. तरी पण एक वस्तुस्थिती म्हणून शेवटची निवड ही सर्वात शक्तिशाली बळाने ठरविलेली असते असे मानले जाते. मात्र तो एक निव्वळ शारीरिक परिणामांसारखा, परिणामकारक तृप्त प्रेरणेसारखा नसतो. हे मत की जीवात्म्याची कार्यप्रणाली ही विचार विमर्श संकल्पनांची एक परंपरा असते, शेवटी ते इंद्रिय संवेदनांची प्रमाणे निश्चय करणारी असतात. ते फक्त आधुनिक विज्ञानाचा आधार असलेले अणु जडवादाचे एक नवीन स्वरूप असते. अशा प्रकारचा एक दृष्टिकोन हा चेतनेच्या साचेबंद विवेचनाच्या समर्थनार्थ एक जोरदार कल्पना पुढे मांडू शकत नाही. नव्यतर मानसशास्त्र आम्हास असे शिकविते की इंद्रियसंवेदन परंपरेशिवाय 'अंतर्दृष्टी, मर्मदृष्टी'ची वस्तुस्थिती यास विवेकी आचरणाचा एक काळजीपूर्वक अभ्यास आमच्यासमोर मांडतो. ही 'मर्मदृष्टी' जीवात्म्याची पदार्थांची अवकाश-कालिक आणि कारणासंबंधी कृतज्ञता असते, म्हणजेच ती तूर्तास जीवात्म्याने निश्चित केलेल्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने एक क्लिष्ट समष्टिमधील साधन घटकांची निवड असते. सहेतुक कर्माची अनुभूती प्राप्त करण्यासाठी आणि ध्येय गाठण्यासाठी मी प्रत्यक्ष प्राप्त केलेले यश यासाठी तो एक समंजस प्रयत्न आहे. त्यामुळे माझ्या एका वैयक्तिक कारणासाठी माझ्या कार्यक्षमतेविषयी मला खात्री होते (वाटते). शरीरशास्त्र ज्याची खात्री देत नाही अशी, भावी परिस्थिती विषयीची एक दृष्टी ही एक सहेतुक कार्याचे अनिवार्य वैशिष्ट्य आहे. सत्य हे आहे की, कारण शृंखलेमध्ये जीवात्म्यासाठी एक स्थान शोधण्याचा आमचा प्रयत्न हा, स्वतः आपल्या प्रयत्नांसाठी जीवात्म्याची एक कृत्रिम रचना आहे. जीवात्म्यास एका क्लिष्ट वातावरणामध्ये दिवस काढायचे असतात. जोपर्यंत भोवती असलेल्या पदार्थांच्या स्वभाव-आचार पद्धतीविषयीचे काहीसे आश्वासन जीवात्म्यास मिळत नाही, तो पर्यंत त्या वातावरणामध्ये आपले जीवन तो टिकवू शकत नाही, आणि ते सत्तत्त्वाचे स्वभावगुणधर्माचे एक अंतिम अभिव्यक्ती नसते. खरोखर, प्रकृतीच्या अशा प्रकारच्या स्पष्टीकरणामध्ये जीवात्मा हा आपल्या वातावरणास ओळखून त्याच्यावर प्रभुत्व संपादन करतो आणि त्यायोगे आपले स्वातंत्र्य प्राप्त करून त्याचा विस्तार करतो.

अशा प्रकारे जीवात्म्याच्या कर्मामधील मूलद्रव्याचे मार्गदर्शन आणि आदेशाचे नियंत्रण हे स्पष्टपणे दर्शविते की जीवात्मा हा एक मुक्त व्यक्तिगत कारणत्व आहे. तो परम आत्म्याचे स्वातंत्र्य आणि जीवनामधील आपला हिस्सा घेतो. खासगी स्वयंकर्तृत्वास समर्थ अशा एका ससीम जीवात्म्याच्या उदयास अनुमती देऊन त्या परम आत्म्याने आपल्या स्वतःच्या मुक्त अध्यवसाया (संकल्पा)स मर्यादित करून सोडले आहे. या सचेतन वर्तनाचे स्वातंत्र्य हे कुराण समर्थित जीवात्मा-कार्याचे दृष्टिकोणापासून अनुमानित आहे. या मुद्द्यांशी संबंधित असे अनेक अचूक सुस्पष्ट श्लोक आहेत :

''आणि (त्यांना) सांगा, हे 'सत्य' (म्हणजे हे कुराण) तुमच्या विधात्याकडून प्रकट झाले आहे, मग ज्याला वाटेल त्याने त्यावर विश्वास ठेवावा आणि ज्याला वाटेल त्याने मानण्यास नकार द्यावा. (म्हणजे प्रत्येकास या गोष्टीचे पूर्ण स्वातंत्र्य आहे,)'' – १८:२९.

''(आणि आम्ही म्हणालो), जर तुम्ही चांगले केले तर आपल्याच (हिता)साठी चांगले केले; आणि जर वाईट केले तर ते ही आपल्यासाठी.'' – १७:७.

खरोखर इस्लाम मानवी मानसशास्त्राचे एक अत्यंत महत्त्वपूर्ण तथ्याचा स्वीकार करते. म्हणजेच, मुक्त कृती करणाऱ्या शक्तीचे अभ्युदय आणि अध:पतन आणि ते जीवात्म्याच्या जीवनामध्ये एक स्थिर आणि अक्षय कारण स्वरूपात, मुक्तपणे कृती करण्याच्या शक्तीस पदरी ठेवून घेण्यास उत्सुक असते. दैनंदिन नित्य उपासनेच्या वेळा, कुराणाच्या आदेशाप्रमाणे, जीवन आणि स्वातंत्र्याच्या अंतिम उगम स्रोताशी (अर्थात परमेश्वराशी) जवळीक साधून, जीवात्म्याच्या 'सावधगिरी'स पुन: प्रस्थापित करतात. याचा हेतू जीवात्म्यास झोप आणि दैनंदिन व्यापार–उदीमाच्या सहज परिणामांपासून जीवात्म्यास वाचविण्याचा असतो. इस्लाममध्ये उपासना ही जीवात्म्यास यंत्रवादापासून मुक्त (सुटका) करून स्वातंत्र्याकडे वळविण्यासाठी असते. उपरनिर्दिष्ट हेतूस अंमलात आणणाऱ्या एकनिष्ठ भक्ताच्या उपासनेविषयी पवित्र कुराण निर्दिष्ट करते :

''आपल्या पालनकर्त्याचे सकाळी व संध्याकाळी स्मरण करीत जा, मनातल्या मनात, अनुनय विनय आणि भय बाळगून आणि हळू आवाजात; आणि **बेसावध राहू नकोस**. जे देवदूत तुझ्या विधात्याच्या ठायी निकटतम स्थान राखतात ते कधीही आपल्या मोठेपणाच्या दर्पात त्याच्या भक्तीपासून पराङ्मुख होत नाहीत; तर ते त्याचे पावित्र्यगान करतात आणि त्याच्यापुढे स्वत: नतमस्तक होतात.'' – ७:२०५–०६.

उपरोक्त श्लोकामध्ये एकनिष्ठ भक्तास 'सावधगिरी' बाळगण्याचा इशारा देण्यात आला आहे. 'सावधगिरी' ही एकनिष्ठ भक्ताच्या उपासनेचे प्रमुख लक्षण असल्याचे संकेत पुढील श्लोकात विद्यमान आहे; तसेच उपासनेमध्ये जे गफलत करतात (बेसावध असतात), त्यामुळे होणारा गंभीर परिणाम किंवा गफलतीमध्ये (बेसावधगिरीमध्ये) असताना उपासना न केलेली बरे, असा हितोपदेश सर्वश्रेष्ठ परमेश्वर पवित्र कुराणामध्ये असा करतो –

''मग विनाश आहे त्या भक्तांसाठी (नमाज पढणाऱ्यांसाठी) जे आपल्या भक्तीत – उपासनेत (नमाजात) तिच्या वास्तवाचे भान ठेवत नाहीत (गफलत करतात), दिखाऊपणा करतात.'' – १०७:४–६.

''हे श्रद्धावंतांनो! जेव्हा तुमचे मन धूसर असेल, तेव्हा उपासने (नमाजा)च्या जवळपासही जाऊ नका, परंतु सावधानचित्त अवस्थेमध्ये उपासना (नमाज) कधीही टाळू नका.'' – ४:४३.

''त्या (उपासनालयात) सकाळ सांज असे लोक परमेश्वरा (च्या नावा)ची जी पवित्रता गातात; की ज्यांना उदीम व्यापार व क्रयविक्रय ही परमेश्वराचे नामस्मरण करणे व उपासना करणे (नमाज पडणे) व दानधर्म ('ज़कात' देणे) करणे या गोष्टींपासून **बेसावध** (गाफिल) करू शकत नाहीत. (का की, ते लोक) त्या दिवसाला भितात की जेव्हा (भयामुळे) हृदये फाटून जातील व डोळे (फिरलेचे फिरलेच राहून जातील)'' – २४:३६–३७.

तथापि कुराणामध्ये प्रारब्ध व भाग्याची संकल्पना सर्वत्र पसरलेली आहे, हे नाकारता येऊ शकत नाही. कुराणोक्त प्रारब्धाची संकल्पना संक्षिप्तपणे अशी मांडता येईल –

मुस्लिम पंथ हे प्रारब्ध किंवा पूर्वनियतीच्या सिद्धान्तास धार्मिक आध्यात्मिक स्वरूपात पाहतात. विशुद्ध आध्यात्मिक दृष्टिकोनापासून पाहिल्यास ते कर्मस्वातंत्र्याचे सिद्धान्त अर्थातच कर्म सिद्धान्त आणि नियतीवाद आहे. तथापि धार्मिक नियतीवाद हा एक प्रकारचा दैववाद किंवा भाग्यवाद आहे. सर्व आस्तिक धर्मांचा असा विश्वास आहे की ईश्वराची आपली इच्छा असते आणि तो आपल्या मर्जीप्रमाणे जगास निर्देश देत असतो. इस्लाम म्हणजे ईश्वरी इच्छेसमोर आत्मसमर्पण, संपूर्ण शरणागती!

इस्लाम इहलोकाला मायाजाल मानीत नाही. इहलोक एक कर्तव्यभूमी आहे. इहलोक परलोकासाठी शेती आहे. पेराल तसे उगवते. पुनरुत्थानाचा दिवस अटळ आहे. तो न्यायनिवाड्याचा दिवस असेल. त्या दिवशी मानवी कृत्यांचा निवाडा होईल. परमेश्वरापाशी मानवी कृत्यांची नोंद पूर्णपणे ठेवलेली असेल. ''एका चोख नोंदवहीत आम्ही सर्व गोष्टींची नोंद केलेली आहे.'' – ३६:१२. ''ही आमची नोंद वही आहे. ती तुमच्याविरुद्ध खरी खुरी साक्ष देत आहे. तुम्ही (जी काही) कर्मे करीत होता, ती (सर्व) आम्ही नोंदवून घेत होतो.'' – ४५:२९. ''सर्व वस्तुमात्रांवर नि:संशय अल्लाहची सत्ता आहे.'' – ३:१६५.

माणूस हा आपल्या कर्माचा मुख्य कर्ता नसून, तो भाग्याचा गुलाम असल्याचे पण कुराण आपल्या निदर्शनास आणून देते. जसे, ''प्रत्येक माणसाचे प्राक्तन आम्ही त्याच्या गळ्यात बांधलेले आहे... ओझे वाहणारा कोणताही (मनुष्य) दुसऱ्याचे ओझे वाहणार नाही.'' – १७:१३–१५. ''प्रत्येक जीव हा त्याने जे काही केलेले आहे त्याच्या बदल्यात गहाण आहे.'' – ७४:३८. ''प्रत्येक जीवाला त्याच्या कर्माचा पुरेपूर मोबदला देण्यात येईल.'' – ३९:७०. ''आम्ही नरकास श्रद्धाहीनांसाठी कारागृह बनविले आहे.'' – १७:८. ''कृतकर्मांचा मोबदला जिन्न (यक्षयोनी) व मानव या दोघांना दिला जातो.'' – ४६:१८. सारांश जे पथभ्रष्ट होतात त्यांना नरक आणि जे सदाचरणी आहेत त्यांना मोक्ष लाभणारच.

प्रारब्धासंबंधी हा मुद्दा विशेष करून विचारात घेण्यास अधिक योग्य आहे कारण की, 'डिक्लाइन ऑफ दी वेस्ट' (अर्थ : पाश्चात्यांची उतरती कळा) या ग्रंथामध्ये स्पेंगलर असे विचार मांडताना दिसतो की इस्लाम हा जीवात्म्याचे एक संपूर्ण नकाराचे तात्पर्य दर्शवितो. प्रारब्धाविषयी ('तक़दीर') कुराणोक्त मत वर नोंदविलेले आहेच. स्पेंगलर स्वतः असे निदर्शनास आणून देतो की जगास आपले बनविण्याचे दोन मार्ग आहेत. एक तर बौद्धिक आहे, तर दुसऱ्यास अधिक चांगल्या अभिव्यक्तीच्या अभावामुळे, उत्साहवर्धक असे म्हणू. बौद्धिक मार्ग हा जगास परिणामवादाची एक ताठर पद्धती म्हणून समजण्यावर अवलंबून आहे. एक समष्टि स्वरूपात जीवनाच्या अटळ गरजेस संपूर्णपणे स्वीकारण्याचे नाव म्हणजे उत्साहवर्धक मार्ग होय. आपली आंतरिक समृद्धता उघड करून हा मार्ग क्रमिक काळ निर्माण करतो. विश्वा(ब्रह्मांडा)स आत्मसात करणाऱ्या उत्साहवर्धक मार्गास कुराण 'ईमान' म्हणजेच श्रद्धा म्हणून वर्णन करते. एका विशिष्ट प्रकारच्या एक किंवा अधिक प्रमेयां (विधानां)वर केवळ एक निष्क्रिय विश्वास ठेवण्याचे नाव 'ईमान' म्हणजेच श्रद्धा नव्हे. एक दुर्लभ अनुभूतीपासून निष्पन्न सजीव–सप्राण हमीचे नाव म्हणजे श्रद्धा! केवळ सशक्त व्यक्तीच या अनुभूतीपर्यंत पोहोचण्यास सक्षम असतात, आणि त्यामध्ये उच्चतर 'दैववाद' वा 'भाग्यवाद' अंतर्भूत (समाविष्ट) आहे

(असतो). नेपोलियनने असे म्हटल्याचे सांगतात : ''मी एक वस्तू आहे, एक इसम (व्यक्ती) नव्हे.'' हा एकत्त्व प्रवर्धक अनुभूती स्वत:स अभिव्यक्त करण्याचा एक मार्ग आहे. प्रेषित मुहम्मद यांच्या मतान्वये, इस्लामच्या धार्मिक अनुभूतीच्या इतिहासामध्ये, मानवामध्ये दैवी गुणांची निर्मिती अवलंबून असते. ही अनुभूती अशा प्रकारच्या वाक्यांशामध्ये आढळून येते : ''मी कल्पक सत्य आहे.'' ('अनल हक़') – हल्लाज मन्सूर. ''मी भाग्य (प्रारब्ध) आहे.'' – मुआविया. ''मी सवाक् (चालता बोलता) कुरआन आहे.'' – अली. ''मला ईश्वर–महिमा आहे.'' – बा यज़ीद. उच्चतर इस्लामी सूफ़ीवादामध्ये एकत्त्व प्रवर्धक अनुभूती जीवात्म्याची परम आत्म्यामध्ये काहीशी तल्लीनतेमुळे आपली स्वत:ची ओळख नाहीशी करणे नव्हे. वास्तविक पाहता ते परम आत्म्याचे जीवात्म्याच्या प्रिय आलिंगनामध्ये बदलणे आहे. सुप्रसिद्ध फ़ारसी तत्त्वज्ञ कवी जलालुद्दीन रूमी म्हणतो :

''संताच्या ज्ञानामध्ये दैवी ज्ञान (दिव्य ज्ञान) हरवले जाते!
आणि अशा गोष्टींवर लोकांचा विश्वास बसणे कसे बरे शक्य आहे?''

या अभिवृद्धीमध्ये अनुस्युत दैववाद (भाग्यवाद), स्पेंग्लर विचार करीत असल्याप्रमाणे, जीवात्म्याचा नकार नव्हे. कुठल्याच प्रकारच्या बाधेची पर्वा न करणारे असे ते जीवन आणि अनिर्बंध शक्ती–बळ आहे. सभोवताली बंदूकीच्या गोळीबाराचा वर्षाव होत असताना सुद्धा ते एखाद्या माणसास शांत चित्ताने अविचलपणे आपली उपासना करण्यास समर्थ बनवू शकते.

येथेच अमरत्वाच्या प्रश्नाकडे वळण्याची वेळ आहे. हल्लीच्या युगामध्ये अमरत्वाच्या प्रश्नावर जेवढे म्हणून साहित्य उपलब्ध आहे ते यापूर्वी कधीच उपलब्ध नव्हते. आधुनिक भौतिकवादाच्या विजयी घोडदौडीमध्ये सुद्धा या साहित्याची दिवसेंदिवस वाढ होत आहे. तथापि शुद्ध आध्यात्मिक युक्तिवाद, हा व्यक्तिगत अमरत्वामध्ये विधायक श्रद्धा, वास्तविक निष्ठा आपणास प्रदान करू शकत नाही. इस्लामी तत्त्वज्ञानाच्या इतिहासामध्ये, इब्न–ए–रुश्द या तत्त्वज्ञाने अमरत्वाचा प्रश्न एक शुद्ध आध्यात्मिक दृष्टिकोनाने हाताळला आहे, आणि मी धाडसाने असे विधान करतो की तो निष्कर्षाप्रत पोहोचला नाही. कुरआनमध्ये प्रयुक्त 'नफ़्स' आणि 'रूह' या दोन शब्दांमुळे कदाचित त्याने इंद्रियवेदन आणि प्रज्ञेमध्ये एक फरक असल्याचे निदर्शनास आणले. वर वर पाहता उपरोक्त दोन्ही, मानवामध्ये दोन विरोधी तत्त्वे कल्पून त्यांमध्ये एक प्रकारचा संघर्ष असल्याचे सूचित करण्यात येते. उपरोक्त 'नफ़्स' आणि 'रूह' या दोन शब्द प्रयोगांमुळे अनेक इस्लामी तत्त्वज्ञ गोंधळले आहेत. तथापि, जर इब्न–ए–रूश्दचे द्वैतवाद कुरआनावर आधारलेले असेल तर, मला अशी भीती आहे की ही त्याची चूक आहे. कारण मुस्लिम ब्रह्मज्ञान्यांच्या कल्पनेप्रमाणे कुरआनमध्ये 'नफ़्स' हा शब्द पारिभाषिक अर्थाने वापरला गेला नाही. इब्न–ए–रूश्दच्या मते प्रज्ञा ही शरीराचा एक अवयव नव्हे. ती एक वेगळ्या प्रकारची सत्ता आहे. ती व्यक्तित्वास अतिक्रमित करते. म्हणून ते एक आहे, वैश्विक आहे आणि शाश्वत आहे. रेननच्या विचाराप्रमाणे, प्रज्ञेने शाश्वत एकत्वाचा अर्थबोध मानवता आणि संस्कृतीचे चिरंतनत्व असा असेल. हे वैयक्तिक अमरत्व असेल असे ठामपणे म्हणता येत नाही.

**मानवाचे प्रारब्ध : कुरानचा दृष्टिकोन (कुरआनची शिकवण)**

आता आपण या संदर्भात पवित्र कुराणाच्या शिकवणीकडे वळू या. मानवाच्या प्रारब्धाविषयी कुरआनचे मत आंशिक जीवशास्त्रीय आहे. आम्ही आंशिक जीवशास्त्रीय या कारणासाठी म्हणतो की याविषयी कुरआनने जीवशास्त्रीय स्वरूपाची काही विधाने केली आहेत. सजीवाच्या स्वभावाविषयी एक सखोल अंतर्दृष्टी असल्याशिवाय हे आपण समजू शकत नाही. उदाहरणार्थ, 'बर्ज़ख़'च्या तथ्याविषयी निवेदन आहे. 'बर्ज़ख़' म्हणजेच मध्यलोक, मध्य जगत, स्व–र्लोक. ही कदाचित मृत्यू आणि पुनरुत्थान या दरम्यानची काहीशी गंभीर अनिश्चिततेची एक अवस्था असावी. पुनरुत्थानाचे पण वेगळ्या प्रकारे विचार करण्यात आलेले आहे. ख्रिश्चन धर्माप्रमाणे, एक ऐतिहासिक व्यक्ती येशू ख्रिस्तच्या प्रत्यक्ष पुनरुत्थानाच्या पुराव्याच्या आधारासारखी शक्यता कुरआन मान्य करीत नाही. असे वाटते की हा युक्तीवाद पुनरुत्थानास जीवनाचे एक सार्वत्रिक म्हणजेच वैश्विक रूप मानतो. काही अंशी पक्षी आणि प्राण्यांच्या बाबतीत पण हे खरे आहे.

वैयक्तिक अमरत्वाच्या क़ौराणिक सिद्धान्तास सविस्तरपणे जाणण्याअगोदर प्रथम आपण **अमरत्वाची समस्या** जाणून घेऊ या. ईश्वरवादी दृष्टिकोनानुसार अमरत्वाचा असा अभिप्राय आहे की कालचक्रामध्ये अविच्छिन्न स्वरूपात व्यक्तींचे स्थायित्व असे बनलेले असावे की त्यांच्या व्यक्तित्वाच्या पूर्णतेसाठी त्यांना निरंतर संधी मिळत गेली पाहिजे.

अमरता ही एक नैतिक मान्यता आहे. नैतिक मान्यता नैतिक जीवनाचे आधारभूत तत्त्वे असतात. या मान्यता तर्कसिद्ध सिद्धान्त नसून, व्यवहारत: अनिवार्य असलेल्या पूर्वकल्पना असतात. आत्म्याची अमरता, कर्म–फल–सिद्धान्त, प्रगतीची आवश्यकता, संकल्प स्वातंत्र्य आणि ईश्वराची सत्ता या प्रमुख नैतिक मान्यता आहेत. या मान्यतांमध्ये आत्म्याची अमरता ही सर्वात महत्त्वपूर्ण आहे. आत्मा सर्वोत्कृष्ट महत्त्वपूर्ण आणि मूल्यवान वस्तू आहे, कारण जगामधील प्रत्येक वस्तू याच्याकरिताच प्रिय समजली जाते. आत्म्याची नित्यता इतर मान्यतांची आधारशीला आहे.

मानवाच्या मनामध्ये अमरत्वाच्या अभिलाषेची स्पष्ट झलक आदिम धर्मापासून ते आध्यात्मिक धर्मापर्यंत विविध स्वरूपात दिसून येते. गैलवेच्या कथनानुसार, ''धर्मांच्या विकासासोबतच अमरतेची इच्छा प्रबळ होत गेली. याचे स्पष्ट संकेत प्रारंभिक जीववादी धर्मापासून ते अध्यात्मवादी धर्मापर्यंत प्राप्त होते.'' ईश्वरामध्ये विश्वास करणे तितकेसे आवश्यक नाही, जितके की आत्म्याच्या अमरतेमध्ये विश्वास करणे. अमरत्वावर अविश्वास ठेवणारी व्यक्ती ना पुनर्जन्म मान्य करते ना कर्म–फल–संबंधास स्वीकारते. मानवामध्ये अमरतेची जिज्ञासा ही स्वाभाविक आहे. मनुष्य सुखाने जगू इच्छितो. मानव जीवन म्हणजे सुख–दु:खाचे मिश्रण होय. तरी पण तो विशुद्ध सुखी जीवनाच्या शोधात असतो. जर त्याचे इहलौकिक जीवन सुखी नसेल तर तो मरणोत्तर सुखी पारलौकिक जीवनाची आशा बाळगून असतो. अशा प्रकारे तो हे मान्य करून चालतो की आत्मा अमर आहे आणि केव्हा ना केव्हा तरी त्याला विशुद्ध सुखी जीवन अवश्य मिळेलच. विशुद्ध सुखी जीवनासाठी मनुष्यास नैतिक मूल्ये आत्मसात करावी लागतात. सध्याचे भौतिक जीवनच एकमात्र जीवन नव्हे. मनुष्यास अशी पूर्ण आशा आहे की मरणोत्तर जीवन अवश्य आहे. तेथे त्यास धर्मानुकूल विशुद्ध सुख जरूर मिळणारच. मानवाच्या अमरत्वाविषयी जिज्ञासेचा आधार नैतिक चेतना आहे. मरणोत्तर जीवनामध्ये विश्वास ठेवल्याने मनुष्यास कर्म

करण्याची प्रेरणा मिळते आणि त्याच्या जीवनामध्ये आशेचा संचार होतो. कांटच्या दृष्टीने, नैतिक अपूर्णतेच्या परिपूर्णतेसाठी भावी जीवन अत्यावश्यक आहे. मृत्युमुळे शरीराचा नाश होतो, आत्म्याचा नव्हे. जर्जर शरीरापासून उद्दिष्टप्राप्ती शक्य नाही. अमर आत्मा जर्जर शरीराचा त्याग करून दिव्य शरीर प्राप्त करतो आणि आपल्या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी तत्पर असतो.

जीववादाच्या अनुसार, मृत्युनंतर पूर्वजांचा आत्मा भूत-प्रेत स्वरूपात विहार करीत असतो. भयभीत लोक प्रेतात्म्यास पूजा इत्यादींनी संतुष्ट करून अनिष्टापासून वाचण्याचा प्रयत्न करतात. इथूनच अमरत्वाच्या भावनेचा उदय दृष्टिगोचर होतो.

**१) दार्शनिक तर्क –** आत्मा ज्ञानाचा स्रोत आहे. ज्ञान स्वरूपत: दिक्कालातील असल्याकारणाने नित्य आत्म्यामध्येच निवास करतो. ज्ञान अनुत्पन्नधर्मा आहे. तो सहज आणि जन्मजात आहे. अनुस्मरण या गोष्टीचे प्रमाण आहे की आत्मा हा या जन्मापूर्वी अस्तित्वात होता. शरीर नश्वर आहे, तर आत्मा हा अनश्वर. सॉक्रेटिस आत्म्यास अमर मानतो, आणि शरीरास आत्म्याचे बंधन कल्पित करतो. आत्मा दिव्य लोकाचा निवासी आहे. प्लेटो पण विज्ञानांच्या संस्मरणाच्या आधारावर आत्म्याच्या अमरतेस सिद्ध करतो.

तत्त्वशास्त्र अर्थात सत्ताशास्त्र आत्म्यास सरस आध्यात्मिक द्रव्य मानतो. विश्लेषण आणि विनाश यौगिकाचे होते, अमिश्र, सरळ आणि असंगाचे नव्हे. आत्मा सरळ, असंग आणि अविभाज्य असल्याकारणाने नित्य आहे. लाइबनिज आत्म्यास अनश्वर चिदणु म्हणतो, जो स्वरूपत: चेतन, अविभाज्य आणि तात्त्विक आहे. देकार्त 'मी आहे' या स्वरूपामध्ये आत्म्याची नित्यता प्रमाणित करतो. 'मी आहे' चे ज्ञान स्वत: प्रमाणित असते. आत्म्याचे ज्ञान 'मी आहे' स्वरूपात स्वप्न, जागृत आणि सुषुप्ति या सर्व अवस्थांमध्ये अविरळ रूपात होत असते. आत्मा निर्विकल्प अतींद्रिय स्वानुभूती रूपामध्ये स्वत: सिद्ध आहे, असेच कांटचे पण मत आहे. आत्मा नित्य ज्ञाता आहे. ह्यूम विषयाच्या स्वरूपात आत्म्यास पकडू पाहतो. यामुळेच आत्म्यास ओळखण्यामध्ये तो यशस्वी झाला नाही.

जैन-दर्शन आत्म्यास शुद्ध ज्ञान आणि चैतन्य स्वरूपात पाहतो. त्यानुसार आत्मा अनंत दर्शन, अनंत ज्ञान, अनंत वीर्य आणि अनंत आनंदाने संपन्न आहे. परमार्थत:, आत्मा नित्य (ध्रुव) आहे. सुख, दु:ख, स्मृती, संकल्प, ज्ञान इत्यादी धर्म, धर्मी स्वरूपात आत्म्याच्या सत्तेस प्रमाणित करतात. परिचालक, प्रायोजक आणि निमित्तकारण स्वरूपात आत्म्याची सत्ता स्वत: सिद्ध आहे.

न्याय-दर्शन पण आत्म्यास नित्य आणि विभू समजते. सुख-दु:खाचा धर्मी असल्याकारणाने आत्म्याचे अस्तित्व सिद्ध आहे, आणि तो पूर्वानुभूतींचा आगार आहे.

सांख्य-दर्शन आत्म्यास नित्य, मुक्त, शुद्ध, बुद्ध, चैतन्य, अविकारी, स्वयंभू आणि शरीरादीपासून भिन्न समजते. मीमांसा-दर्शनानुसार, आत्मा नित्य अविनाशी द्रव्य आहे, जो मरणोत्तर कर्म-फल भोगण्यासाठी सदैव विद्यमान असतो. वेदान्त आत्म्यास नित्य मुक्त, निर्विकार, सच्चिदानंद आणि ब्रह्मस्वरूप म्हणतो. मोक्ष आणि बंधन दोन्ही अवस्थांमध्ये आत्म्याची सत्ता आहे. मुक्तात्मा नित्य आनंदाचा लाभ घेतो आणि बद्धात्मा भोगतो.

विश्वामधील सर्व वस्तू नश्वर आहेत. नश्वरतेस ओळखण्यासाठी एक अनश्वर आध्यात्मिक सत्ता स्वरूपात आत्मा हा नित्य विद्यमान असतो. संसाराच्या क्षणभंगुरतेचे निर्देशन करीत, पण तो स्वत: नित्य आणि चिरंतन

आहे. एक नित्य ज्ञात्याच्या स्वरूपात सृष्टीचे भाव आणि प्रलयाच्या अभावास ओळखण्यासाठी आत्म्याची सत्ता अपरिहार्य आहे.

**२) नैतिक तर्क –** मनुष्य सामाजिकाप्रमाणे एक नैतिक प्राणी पण आहे. 'नैतिकतेची परिपूर्णता' त्याच्यासाठी एक आदर्श आहे. त्या महान आदर्शास प्राप्त करण्यासाठी मानवाचे वर्तमानकालीन जीवन अत्यल्प आहे. या आदर्श प्राप्तीच्या हेतूसाठी आत्म्यास अमर मानणे स्वाभाविक आहे. याच कारणामुळे ज्या आत्म्यास कांटने 'Critique of Pure Reason' या ग्रंथापासून निर्वासित केले होते, त्याची पुन: प्रस्थापना 'Critique of Practical Reason' या ग्रंथामध्ये करून घेतली आणि आत्म्याच्या अमरतेची एक अनिवार्य अशी हक्काची मागणी स्वरूपात त्याने स्वीकारले.

अविरत नैतिक प्रगतीमुळे नैतिक आदर्शाची प्राप्ती शक्य आहे. म्हणून प्रगतीच्या अनिवार्यतेच्या दृष्टीने आत्म्यास अमर समजणे आवश्यक आहे.

**३) मनोवैज्ञानिक तर्क –** बालकांची विलक्षण स्मरणशक्ती आत्म्याच्या अमरत्वास पुष्टी देते. एकाच वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये बौद्धिक भिन्नतेचे कारण संस्कार आहे. संस्कार पूर्वजन्मार्जित असतात.

व्यक्तित्व संरचना आणि व्यक्तित्वाचा विकास यांना अमरत्वाची अपेक्षा असते. मानसशास्त्रज्ञ मृतात्म्यांशी संभाषण करीत असताना पाहिले गेले आहेत. या आधारावर पण आत्म्याची अमरता सिद्ध होते.

**४) धार्मिक तर्क –** अमरत्वाचा धार्मिक आधार ईश्वर आहे. भक्त स्वत:स ईश्वराचा अंश कल्पून स्वत:ला नित्य मानतो. संत आणि साधक स्वत:स जीवनमुक्त मानतात आणि अमरत्वाच्या धार्मिक आधारास पुष्ट करतात. संत आणि प्रेषितांना शाश्वत मूल्यांचा नित्य अनुभव असतो. त्यांना पूर्व घटनांचे प्रत्यक्ष ज्ञान असते. गौतम बुद्ध, येशू मसीह, गुरू नानक, हज़रत मुहम्मद पैगंबर साहेब इत्यादी याचे प्रमाण आहेत. इतकेच नव्हे तर, मानवी मूल्यांच्या संरक्षणाखातर धर्म आत्म्यास अमर मानतो.

धार्मिक व्यक्ती जीवनाप्रती आस्थावान असतात आणि मृत्यू त्यांच्यासाठी काळजी करण्यासारखा विषय नसतो. आस्थाहीन अज्ञानी लोकच मृत्यूमुळे व्यथित होताना आढळतात. संत आणि प्रेषित स्वत:स नित्यमुक्त मानतात आणि सांसारिक नश्वरतेपासून अलिप्त होऊन ईश्वराच्या भक्तीसंपन्नतेचा उपक्रम करतात. ते शरीरास नश्वर तर आत्म्यास अनश्वर मानतात. त्यांच्या मते शरीर मिथ्या असून आत्माच 'परमसत्' आहे.

### व्यक्तित्वपूर्ण अमरता

अमरत्वासंबंधी दोन प्रमुख संकल्पना आहेत. (१) ईश्वरवादी अमरता, आणि (२) अनीश्वरवादी अमरता. ईश्वरवादी अमरतेस व्यक्तित्वहीन अमरतेची संज्ञा दिली जाऊ शकते.

व्यक्तित्वपूर्ण अमरतेची संकल्पना समजून घेण्याअगोदर अमरत्वासंबंधी भारतीय तत्त्वज्ञानाचे पण मत जाणून घेणे आवश्यक आहे. भारतीय चिंतन परंपरेमध्ये अमरतेचे दोन प्रकार दिसून येतात – (१) जीवनमुक्ती आणि (२) विदेहमुक्ती. जीवनमुक्तीस सदेह अमरता पण म्हटले जाते. षड्रिपूंवर विजय प्राप्त करून व्यक्ती जेव्हा निष्काम कार्य संपादन करते तेव्हा ती सांसारिक परिपाशापासून स्वत:स मुक्त समजते. जीवनमुक्ताच्या शरीरामधून शुभ कर्मे सहजपणे अशा रीतीने निघत असतात की जशा समुद्रामध्ये लाटा उत्पन्न होत असतात.

ज्याप्रमाणे सर्प मोहाविना आपली जुनी चर्मकाया सोडून देतो, त्याच प्रमाणे जीवनमुक्त हा कुठल्याही मोहाशिवाय शरीराचा त्याग करतो. देह धारण करून सुद्धा त्याचे आचरण विदेहाप्रमाणे असते. तो आपल्या ज्ञानाग्नीमध्ये कर्मांना जाळून अशा प्रकारे भस्मसात करतो की पुनर्जन्माचा प्रश्नच उपस्थित होत नाही. आवागमनाच्या चक्रापासून मुक्त होणे म्हणजे मोक्ष होय. जीवनमुक्त जेव्हा शरीराचा त्याग करतो तेव्हा तो विदेह मुक्त होऊन जातो. जीवनमुक्तापाशी प्रारब्ध कर्म स्वरूपात शरीर असतो, परंतु विदेहमुक्त सर्व प्रकारच्या कर्मांनी सर्वथा मुक्त बनून जातो.

मरणोत्तर जीवन एक तर व्यक्तित्वपूर्ण असेल किंवा व्यक्तित्वहीन? व्यक्तित्वपूर्ण जीवन एक तर सदेह असेल किंवा विदेह? पाश्चात्य ईश्वरवादी जीवास सदेह आत्मा म्हणतात आणि त्यांच्या मतानुसार मरणोत्तर जीवन पण दैहिक आत्मा स्वरूपात असले पाहिजे. काय सर्व जीवात्मा शेवटपर्यंत सुरक्षित राहतील? ख्रिश्चनवाद्यांच्या मतानुसार पापी लोक कायम स्वरूपी नाश पावतील, कारण पापाची मजूरी मृत्यू असते. मात्र धार्मिक व्यक्तीच शेवटपर्यंत सुरक्षित राहतील. या दृष्टीने पण अमरतेचे दोन प्रकार आहेत – (१) सहेतुक किंवा सप्रतिबंध अमरता आणि (२) अहेतुक किंवा अप्रतिबंध अमरता. धार्मिकतेस अमरतेची अनिवार्य अशी अट मानल्यामुळे अमरता ही सहेतुक किंवा सप्रतिबंधित होऊन जाते. येथे धार्मिक व्यक्तीसच अमर मानले जाते, अधार्मिकास नव्हे. नीति वचनांमध्ये असे म्हटले गेले आहे, – ''धर्ममार्गच जीवन आहे. याच्या मार्गामध्ये मृत्युस वाव नाही.'' अप्रतिबंध अमरतेनुसार सर्व काही अमर राहतील – भलेही ते पाप करोत की पुण्य. कर्म–फल भोगण्यासाठी शेवटपर्यंत त्यांना संरक्षित राहावे लागेल. अहेतुक अथवा अप्रतिबंध अमरतेविषयी दोन मते प्रचलित आहेत – एक तर सर्व जीवात्मे कोणत्या ना कोणत्या स्वरूपात जिवंत राहतील अथवा मरणोपरान्त पूर्णपणे विलीन होऊन जातील आणि शेवटच्या न्याय दिनी त्यांना पुनर्जीवित करण्यात येईल. यहूदी आणि इस्लाम धर्म याच संकल्पनेस पुनरुत्थानवाद असे म्हणतात. त्यांच्या मते, न्यायाच्या दिवशी सर्व मृतांच्या आत्म्यांचे पुनरुत्थान होते. तद्नंतर कर्मानुसार कायमस्वरूपी त्यांना स्वर्गवास दिला जातो किंवा नरकवास घडतो. पुनरुत्थानात्मक जीवनानंतर मृत्यू नाही.

आता आपण व्यक्तित्वपूर्ण अमरतेकडे वळू या. मरणोपरान्त जीवनामध्ये पण सातत्यता टिकून रहावी असा व्यक्तित्वपूर्ण अमरतेचा अभिप्राय आहे. जर सुसंगठीत आत्मचेतना ही जीवनाचा अभिप्राय असेल तर मरणोत्तर व्यक्तित्वाचे (कायम) असणे हे अनिवार्य आहे. ईश्वरवाद्यांचे असे मत आहे की कालातीत जीवनामध्ये पण व्यक्तित्व विद्यमान असते. पूर्ववर्ती जीवनामधील त्रुटी मनुष्य दूर करू इच्छितो आणि आपले अपूर्ण राहिलेले आदर्श त्यांच्या संपूर्णत्वामध्ये पाहू इच्छितो. अमरता आदर्शांच्या परिपूर्णतेची सुसंधी आहे. कांटच्या मतान्वये, मरणोत्तर जीवन आदर्शांच्या परिपूर्णतेसाठी अत्यंत आवश्यक आहे. मरणानंतर व्यक्तीचे विचार, चिंतन आणि आदर्श जसेच्या तसे कायम राहतात. त्यांना उत्तरवर्ती जीवनाच्या सत् प्रयत्नांमुळे सुगठित केले जाते आणि त्यांच्यामध्ये सुधारणा घडवून आणली जाते.

आदर्शांना त्यांच्या संपूर्णतेमध्ये प्राप्त करणे मानव जीवनाचे सर्वोत्कृष्ट लक्ष्य असते. अमर जीवन अकालिक नसून सार्वकालिक असते. उत्तरवर्ती (परवर्ती) जीवनास विकसित जीवन असे म्हटले जाते. अमरतेचा अभिप्राय आहे जीवनाची उत्तमता आणि त्याची परिपूर्णता. अमरता मानवी मूल्यांना परिपूर्ण बनविण्याची सुसंधी आहे.

अमरतेचा संबंध देहसिद्धीशी असतो. देहसिद्धीचे सापेक्ष देहसिद्धी आणि निरपेक्ष देहसिद्धी असे दोन प्रकार आहेत. यांपैकी सापेक्ष दैहिक अमरत्व एक प्रकारचे सुदीर्घ जीवनमात्र आहे. परंतु निरपेक्ष अमरत्व वस्तुतः अमरत्व नाही. परंतु ते मृत्युंजयत्व आहे.

मरणोत्तर जीवनामध्ये आत्मा सदेह असतो की विदेह? सांख्य आणि गीतेच्या मतानुसार विदेह आत्माच शाश्वत असतो. ख्रिश्चन धर्म आणि इस्लाम धर्म सदेह आत्म्याच्या अस्तित्वामध्ये आस्था ठेवतात. त्यांच्या मतानुसार, अंतिम न्यायनिवाड्याच्या दिवशी मृत व्यक्ती आपल्या कर्मांच्या न्याय निर्णयासाठी सशरीर ईश्वरासमोर उपस्थित (हजर) असते. ईश्वराचे न्यायालय शुभाशुभ कर्मांनुसार त्या व्यक्तीस योग्य ते स्वर्गलाभ किंवा नरकवास घोषित करते. हेच पुनरुत्थानात्मक जीवन आहे. यानंतर मृत्यू नसतो. कुराणोक्त इस्लामी धारणेप्रमाणे प्रेषित मुहम्मद यांचे दिव्यारोहण ('मेराज') हे सदेह होते, जीवन्मुक्त अवस्थेमध्ये होते. ही बाब मुद्दाम लक्षात ठेवण्यासारखी आहे.

जीवात्म्याच्या वैयक्तिक अमरत्वाच्या अनुषंगाने कुराणोक्त तीन गोष्टी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. त्या अत्यंत सुस्पष्ट आहेत त्याबाबतीत मतभेद असण्याचे मुळीच कारण नाही.

१) जीवात्म्यास कालानुक्रमाच्या दृष्टीने एक सुरुवात असते. अवकाश-कालक्रमामध्ये तिच्या उगमाचे पूर्व-अस्तित्व नसते. ही बाब पूर्वोक्त ५७:३ या कौराणिक श्लोकांवरून स्पष्ट होते.

२) कुराणाच्या मताप्रमाणे पृथ्वीतळावर (इहलोकामध्ये) जीवात्म्याच्या पुनरागमनाची शक्यता नाही. ही बाब पुढील श्लोकांवरून स्पष्ट होते.

''जेव्हा त्यां(नास्तिकां)च्यापैकी एखाद्याचे मरण जवळ येऊन ठेपेल व तो (विनवणी करीत) म्हणेल की, 'हे माझ्या विधात्या, मला परत पाठव, म्हणजे ज्या(जगा)ला मी सोडून आलो आहे त्यात (पुन्हा जाऊन) मी सुकृत्ये करावीत.' (आम्ही दूतांस संबोधून म्हणू की) छे! छे! तो एक (अघटित) गोष्ट बोलतो आहे (तर त्याला बोलू दे; असल्या मागण्या कोठे मंजूर होऊ लागल्या आहेत?) आणि त्यांच्यामागे **त्या दिवसापर्यंत एक अडसर आहे ज्या दिवशी त्यांना पुन्हा जिवंत करून उठविले जाईल.''** - २३:९९-१००

''आणि शपथ चंद्राची की जेव्हा तो परिपूर्ण होतो, की तुम्हाला निःसंशय एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत जावे लागणार आहे.'' - ८४:१८-१९.

''त्या वीर्याचा मनुष्य तुम्ही बनवता की आम्ही बनवितो? आम्हीच तुम्हा सर्वांसाठी मृत्यू अटळ ठरविले आहे. आणि (तसे करण्यापासून) आम्हाला (कोणीही) प्रतिबंध करू शकणार नाही. (आम्ही यासाठी समर्थ आहोत) की, तुमच्या जागी तुमच्या सारख्यांची निर्मिती करून आणू किंवा तुमच्यात परिवर्तन घडवून आणू आणि अशा आकारात **तुमची पुनःनिर्मिती करू ज्याविषयी (सध्या) तुम्ही अनभिज्ञ आहात.''** - ५६:५९-६१.

३) सान्तता, ससीमता, परिमितता हे काही एखादे दुर्भाग्य नव्हे :

''आकाशात आणि पृथ्वीवर असा कोणीही नाही ज्यास कृपाशील ईश्वरासमोर दास म्हणून यावे लागणार नाही. निःसंशय (आपल्या बुद्धीने) त्याने त्यांना वेढून ठेवलेले आहे. आणि त्यांची पूर्णतः गणती करून ठेवली

आहे. आणि **त्यांच्यापैकी प्रत्येक जण पुनरुत्थानाच्या दिवशी त्याच्यासमोर एकटा हजर होईल.**'' - १९:९३-९५.

हा एक अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्दा आहे. इस्लामचा मोक्ष (मुक्ती) सिद्धान्त चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी त्याचे योग्य आकलन झाले पाहिजे. कृत कर्माचे परिणाम आणि क्रियमाण कर्माची भावी शक्यता आजमाविण्यासाठी, आपल्या व्यक्तित्वाच्या अपरिवर्तनीय एकत्त्वतेसह, जीवात्मा हा परम आत्म्याकडे प्रयाण करील.

''आणि आम्ही प्रत्येक मनुष्याचे प्राक्तन (प्रारब्ध) त्याच्या गळ्यात बांधून टाकले आहे. आणि पुनरुत्थानाच्या दिवशी आम्ही त्याचे कर्मपत्रक काढून, त्याच्यासमोर प्रस्तुत करू, जे त्यास स्पष्टपणे उघडलेले दिसून येईल. (आणि त्याला सांगितले जाईल) 'वाच, ही आहे तुझी कर्मवही.' आज स्वत:चा हिशेब करण्यास तू स्वत:च पर्याप्त आहेस.'' - १७:१३-१४.

माणसाचे शेवटचे भाग्य काही का असेना. मात्र ते व्यक्तित्वाचे हरवणे, गमावणे नसते. ससीमतेपासून ते संपूर्ण मुक्ती स्वरूपात मानवी परमानंदाची सर्वोच्च अवस्था म्हणून कुराण विचार करीत नाही. मानवाची जीवात्मा स्वरूपात_आपल्या कर्माची सावधगिरी, अप्रतिमता आणि सघनता याच्या क्रमिक विकासामध्ये 'न संपणारी (अक्षय) बक्षिसी' अवलंबून असते. लवकरच पुढे येणाऱ्या न्यायनिवाड्याच्या दिवसाचे 'सार्वत्रिक विध्वंसा'चे दृश्यसुद्धा एक संपूर्ण विकसित जीवात्म्याच्या पूर्ण शांतीस ढळू शकत नाही.

''आणि (त्या दिवशी) जेव्हा शिंग फुंकले जाईल, तेव्हा आकाश व पृथ्वीवर जे कोणी आहेत, ते (सर्व जीव) मूर्च्छित होऊन (खाली) कोसळतील, त्यास **अपवाद फक्त त्यांचा असेल ज्यांना अल्लाह (परमेश्वर) (वाचवू इच्छिल)**.'' - ३९:६८.

सघनतेच्या परमोच्च बिंदूस पोचलेल्या जीवात्म्याशिवाय कोणाचा बरे अपवाद होऊ शकेल? सर्वसमावेशक आत्म्याशी प्रत्यक्ष संपर्क साधलेला असून सुद्धा, जेव्हा जीवात्मा हा संपूर्णपणे सावधगिरी बाळगलेला असतो, तेव्हा या विकासाचा चरमबिंदू (अत्युच्च बिंदू) गाठला जातो. ''त्याची दृष्टी ना विचलित झाली, ना भरकटली (मर्यादेपलीकडे गेली.)'' - ५३:१७.

हा आदर्श इस्लाममधील पूर्ण पारंगत मानवत्त्वाचा आहे. एक फ़ारसी काव्यचरणामध्ये प्रेषित मुहम्मद यांच्या दैवी ज्ञान-प्रकाशाची जी महती वर्णित आहे, त्यापेक्षा अधिक चांगल्या पद्धतीची अभिव्यक्ती इतरत्र कोठेच आढळत नाही.

''विधात्याच्या पर्वतावरील झुळूकमात्र तेजांशामुळे मूसा घेरी येऊन कोसळला.'' - ७:१४३. मात्र प्रेषित मुहम्मद यांनी अल्लाहस् प्रत्यक्ष सुहास्य वदनाने आपल्या चर्मचक्षूंनी पाहिले. ''त्याने आपल्या विधात्याच्या (सामर्थ्याच्या) मोठ-मोठ्या निशाण्या पाहिल्या.'' - ५३:१८.

सर्वेश्वरवादी सूफ़ीवाद अशा प्रकारच्या मताची उघड बाजू घेऊ शकत नाही, आणि या बाबतीत तात्त्विक (दार्शनिक) स्वरूपाची एक अडचण निदर्शनास आणतो. अनंत परम आत्मा आणि सान्त जीवात्मा हे दोन्ही परस्पर बहिर्भूत कसे बरे असू शकतील? अनंत आत्म्याशिवाय सान्त आत्मा काय आपले सान्तत्व राखू शकतो? अनंत अशा परम आत्म्याच्या सत्य स्वरूपाविषयी असलेल्या एक गैरसमजूतीवर ही अडचण

आधारलेली आहे. सच्ची अनंतता म्हणजे अनंत विस्तार नव्हे. सर्व प्राप्त सान्त विस्तारांना स्वीकारल्याशिवाय अनंततेची कल्पना केली जाऊ शकत नाही. तिचा स्वभाव घनतेवर अवलंबून आहे, विस्तारावर नव्हे; आणि ज्या क्षणी आपण घनतेवर दृष्टीक्षेप खिळवितो त्या क्षणापासून आम्ही हे पाहण्यास सुरुवात करतो की सान्त जीवात्मा हा वेगळा असावा; अनंतापासून विभक्त नसेना का. विस्ताराच्या अनुषंगाने मी एक भाग असलेल्या अवकाशीय कालक्रमामुळे विलीन होतो. सघनतेच्या अनुषंगाने, मी त्याच अवकाशीय पार्थिव क्रमास, माझ्याशी संपूर्णपणे परकीय असलेल्या त्या 'अन्या' ('इतरा')शी रुजवात करणारा, असे समजतो. माझे जीवन आणि निर्वाहासाठी निर्भर असलेल्यांशी मी विभक्त आहे आणि तरी पण मी त्याच्याशी जवळीकपणे संबंधित आहे.

या तीन मुद्द्यांचे स्पष्ट आकलन झाल्यानंतर, सिद्धान्ताच्या शेष भागाचा विचार करणे सोपे जाते. कुराणाच्या मते, मानव हा विश्वाच्या स्वामीचे (म्हणजेच परमेश्वराचे) अधीन होऊन अमर बनणे, हे सर्व त्याच्यासाठी मोकळे आहे.

**''मनुष्याला असे वाटते की काय, त्यास (वाटेल ते करण्यासाठी) असेच सोडून देण्यात येईल? (म्हणजे त्याच्याशी जाब विचारला जाणार नाही?) प्रथमत: गर्भाशयात टाकला गेलेला वीर्याचा एक बिंदू नव्हता का?** वीर्यापासून पुढे तो एक गुठळी झाला, मग अल्लाहने त्यास घडविले व पूर्ण संतुलनासह त्याच्या अवयवांची रचना केली. आणि त्याचे दोन प्रकार बनविले. म्हणजे नर व नारी. कां हा (परमेश्वर ज्याने सर्व काही केले तो पुनरूत्थानात) मृताला जिवंत करण्यास समर्थ नसेल का?'' - ७५:३६-४०.

ज्या एक जीवाच्या उत्क्रांतीसाठी लाखो वर्षे लागलीत अशा एका जीवास एक क्षुल्लक निरुपयोगी वस्तू कल्पून टाकून देण्यात येईल, हे अत्यंत अशक्य आहे. एक नित्य संवर्धनशील जीवात्मा या नात्याने तो ब्रह्मांडाच्या सार्थकतेचा भाग बनू शकतो :

''आणि माणसाची व ज्याने त्याला नीटनीटके बनविले त्याची (शपथ); मग त्याला चांगले वाईट समजण्याची प्रेरणा दिली. ज्याने आपल्या आत्म्याला **शुचिर्भूत केले,** खरोखर तोच आपल्या मनोरथात सफल झाला. आणि ज्याने त्याचे **दमन केले** तो असफल झाला.'' - ९१:७-१०.

आणि आत्म्याचा विकास कसा होऊ द्यायचा आणि त्याला भ्रष्ट होण्यापासून कसे वाचवायचे? अर्थात सत्कर्माने :

''असीम समृद्ध आहे तो, ज्याच्या हाती समस्त विश्वाची सत्ता आहे. प्रत्येक वस्तुमात्रावर त्याचेच नियंत्रण आहे. **त्यानेच तुमची कसोटी पाहण्यासाठी जीवन व मृत्यू निर्माण केले. तुमच्यापैकी कोण चांगली कामे करतो, (हे त्याला पाहायचे आहे). तो सर्व शक्तिमान (असूनही) फार क्षमाशील आहे.'' -** ६७:१-२.

जीवन जीवात्म्याच्या कर्मासाठी एक अवसर (संधी) देऊ करतो, आणि जीवात्म्याच्या संश्लिष्ट कर्मासाठी मृत्यू ही पहिली कसोटी आहे. सुखदायक आणि दु:खदायक अशी कर्मे नसतात. ती फक्त अहंकार-मान्य म्हणजेच अहंकारी आणि अहंकार-शून्य म्हणजेच निरंहकारी कर्मे असतात. ते कृत्यच किंवा कर्मच असते जे जीवात्म्यास त्याच्या भावी जीवनास विलीन होण्याचे किंवा शिस्त लावण्याची तयारी करून घेते. अहंकार-मान्य जीवात्म्याचे तत्त्व म्हणजे जीवात्म्याच्या स्वत:साठी तसेच इतरांसाठी आदरभाव होय. वैयक्तिक अमरत्व

(अमरता) म्हणूनच, हक्क म्हणून आपली वस्तू नसते. वैयक्तिक प्रयत्नांच्या बळावर ती प्राप्त करावी लागते. मानव हा फक्त त्यासाठी एक उमेदवार असतो. सान्त चेतना ही आपल्या हेतूस निष्फळ ठरविते, हे गृहीत जडवादाचे सगळ्यात जास्त अशक्त करणारे असे प्रमाद आहे. तत्त्वज्ञान आणि विज्ञान हे त्या उद्दिष्टाजवळ पोचणारे फक्त एक मार्ग आहेत. आपल्यासाठी इतर मार्ग पण खुले आहेत. माझे जीवन आणि निर्वाहासाठी निर्भर असलेल्यांशी मी विभक्त आहे व आणि तरी पण मी त्याच्याशी जवळीकपणे संबंधित आहे. जर शारीरिक विलयनामुळे बसणाऱ्या धक्क्याच्या विरोधात कृत कर्म जीवात्म्यास भरपूर बळकटी आणत असेल तर मृत्यू हा कुराणामधील वर्णनाप्रमाणे फक्त एक प्रकारचा मार्ग म्हणजेच 'बर्ज़ख़' आहे. म्हणजेच 'मध्य लोक' आहे. सूफ़ीमत अनुभूतीच्या नोंदी असे दर्शवितात की 'बर्ज़ख़' ही चेतनेची एक अशी अवस्था आहे की जी जीवात्म्याच्या कलामधील काळ आणि अवकाशाप्रती एक बदल दर्शविते. त्यामध्ये अविश्वसनीय असे काहीच नाही. हेल्म्होल्टज़ याने सर्व प्रथम असा शोध लावला की चेतनेस जागृत करण्यासाठी स्नायूंच्या उद्दीपनास वेळ लागतो. हे जर तसे असेल तर, हल्लीचा आमची शारीरिक संरचना ही काळाच्या आमच्या सध्याच्या मताच्या तळाशी असते, आणि जर या संरचनेच्या विलयामध्ये जीवात्मा वाचत असेल तर काळ आणि अवकाशाविषयी आजच्या वर्तनामधील एक बदल हा संपूर्णपणे स्वाभाविक वाटतो. अशा प्रकारच्या एखाद्या बदलाविषयी आम्ही अनभिज्ञ नाही. आमच्या स्वप्नामध्ये दृश्यांचे प्रचंड दृढीकरण घडते आणि मृत्युसमयी कधी कधी स्मृतीचा परमानंद प्राप्त होतो. काळाच्या वेगवेगळ्या इयत्तांसाठी जीवात्म्याची क्षमता अनावृत्त होते. म्हणून 'बर्ज़ख़'ची अवस्था ही अपेक्षेची केवळ एक मूक अवस्था वाटत नाही. ही अशी एक अवस्था असते की ज्यामध्ये जीवात्मा सत्तत्त्व म्हणजेच परम आत्म्याच्या नूतन आल्हादकारक पैलूंची एक झलक पकडतो आणि या पैलूंशी समायोजन करून घेण्यास स्वत:स तयार करतो. ती एक मोठ्या मानसिक विस्कळीतपणाची एक अवस्था असली पाहिजे, विशेषत: संपूर्ण वाढ झालेल्या जीवात्म्यांच्या बाबतीत हा विस्कळीतपणा आढळतो. त्यांनी एक विशिष्ट अवकाशीय पार्थिव क्रमावर स्वाभाविकपणे नियत कर्माच्या पद्धती विकसित केलेल्या असतात. आणि याचा अभिप्राय होईल कमी भाग्यवंतांचा मृत्यू. तथापि स्वत:स उच्च स्थानी पोचून आपले पुनरुत्थान साध्य करेपर्यंत जीवात्म्यास आपले संघर्ष सुरू ठेवले पाहिजे. म्हणून पुनरुत्थान ही काही एखादी बाह्य घटना नव्हे. ते जीवात्मामधील एक जीवन प्रक्रियेचे समापन आहे. वैयक्तिक असो की वैश्विक, पुनरुत्थान म्हणजे जीवात्म्याच्या विगत सिद्धी आणि त्याच्या भावी संभावना यांचे एक प्रकारचे सिंहावलोकनाशिवाय दुसरे अधिक काहीच नाही. जीवात्म्याच्या पुनर्विकासाच्या घटनेविषयी त्याच्या प्रथम अविष्करणाच्या साम्यावरून कुराण युक्तिवाद करते :

''आणि (जो) माणूस (पुनरुत्थानास नाकारतो, तो आश्चर्यचकित होऊन) पुसत असतो की, का (खरोखरीच) मी एकदा मरण पावल्यानंतर, पुन्हा जिवंत करून मला उठविले जाईल? **मनुष्याला ही साधी गोष्ट आठवत नाही का, आम्ही त्याला या आधीही निर्माण केले, जेव्हा तो काहीच नव्हता?''** – १९: ६६–६७.

''आम्ही तुम्हा सर्वांसाठी मृत्यू अटळ ठरविले आहे. आणि (तसे करण्यापासून) आम्हाला रोखू शकेल असा कोणीही नाही. (आम्ही यासाठी समर्थ आहोत) की, तुमच्या जागी तुमच्या सारख्यांची निर्मिती करून

आणू किंवा तुमच्यात परिवर्तन घडवून आणू आणि अशा आकारात तुमची पुन:निर्मिती करू ज्याविषयी (सध्या) तुम्ही अनभिज्ञ आहात. तुम्हाला आपल्या पहिल्या निर्मितीचे निश्चितपणे ज्ञान आहे. त्यापासून तुम्ही बोध का घेत नाही?'' – ५६:६०–६२.

मानवाचा सर्वप्रथम नवउन्मेष कसा झाला? उपरोक्त दोन श्लोकांमधील अंतर्भूत संकेतमय युक्तिवादाने खरोखर मुस्लिम तत्त्वज्ञान्यांमध्ये एक नवीन क्षेत्र उघडले. सर्वसाधारणपणे वातावरण आणि स्थलांतरामुळे प्राणीजीवनामध्ये होणारे बदल सुचविणारा प्रथम तत्त्वज्ञ जाहिज़ (मृत्यू २५५ हिजरी) हा होता. 'इख़्वान्नुसफ़ा' म्हणजेच विशुद्ध भ्रातृत्व भाव या नावाच्या संघटनेने जाहिज़चे मत सविस्तर स्पष्ट केले. तथापि, एक स्पष्ट आणि बऱ्याच अंशी आधुनिक असलेला, मानवाच्या उगमासंबंधी सिद्धान्त समोर ठेवणारा (देणारा) प्रथम मुस्लिम विचारवंत (तत्त्वज्ञ) इब्न–ए–मस्कवैय: (मृत्यू ४२१ हिजरी) हा होता. एक जैविक उत्क्रांती स्वरूपात अमरतेच्या प्रश्नास सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ सूफ़ी कवी रूमीने विचारात घेतले आहे. काही इस्लामी तत्त्ववेत्त्यांनी या समस्येचे निराकरण विशुद्ध आध्यात्मिक स्वरूपाच्या युक्तिवादांनी केले आहे. तथापि उत्क्रांतीच्या सिद्धान्ताने, आधुनिक जगास, जीवनासाठी आशा व उत्साह निर्माण न करता, निराशा व चिंतेमध्ये ढकलून सोडले. याचे कारण असमर्थनीय आधुनिक गृहीतकामध्ये शोधता येते. हे गृहीतक असे आहे की, मानवाची सध्याची मानसिक आणि शारीरिक संरचना ही जैविक उत्क्रांतीमधील 'ब्रह्मवाक्य' अर्थात शेवटचा शब्द आहे आणि एक शारीरिक परिणाम स्वरूपात मृत्यूस साधक अर्थ नाही. जीवनासाठी आशेचा दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी आणि उत्साहाचा अग्नी पेटविण्यासाठी आजच्या जगास एक रूमीची गरज आहे. या संदर्भातील अप्रतिम काव्यपंक्ती येथे नोंदविता येतील.

*''सर्वप्रथम मानवाचा उदय असेंद्रिय पदार्थांच्या वर्गा (श्रेणी) मध्ये झाला,*
*नंतर तेथून तो वनस्पतींमध्ये बदलला,*
*कित्येक वर्षे तो वनस्पतींपैकी एक म्हणून जगला,*
*असेंद्रिय अवस्था फार काही वेगळी नसल्याने प्राण्याच्या अवस्थेकडे गेला,*
*एक वनस्पती स्वरूपात आपल्या अवस्थेची त्याला आठवण नव्हती.*
*वनस्पती जगाकडील कल त्याने अनुभवल्याशिवाय,*
*विशेषत: वसंत ऋतुच्यावेळी आणि बहरणाऱ्या सुगंधी फुलांच्या कालावधीमध्ये*
*शिशुंचा मातेप्रती असलेला ओढा (आकर्षणा)प्रमाणे,*
*स्तनपानाची आवड (कल) का असते, याची जाणीव त्यांना नसते.*
*तुम्ही जाणताच, पुन्हा महान निर्मात्या (ईश्वरा)ने (मानवास)*
*प्राण्याच्या अवस्थेपासून मानव अवस्थेमध्ये ओढले (खेचले),*
*अशा प्रकारे मानव प्रकृतीच्या एका अवस्थेपासून दुसऱ्या अवस्थेकडे गेला,*
*सज्ञान, ज्ञानी आणि सशक्त बनेपर्यंत, जसा की तो आता आहे.*
*आपल्या आदिम आत्म्याविषयी सध्या त्याला आठवत नाही,*
*सध्याच्या आपल्या आत्म्यापासून त्याला पुन्हा बदलले जाईल.''*

तथापि मानवाची पुनरुत्पत्ती (नव उन्मेष) ही त्याच्या पूर्वीच्या शारीरिक माध्यमाची पुनरुत्पत्ती असते काय, या मुद्द्याने मुस्लिम तत्त्ववेत्ते आणि धर्माचार्यांमध्ये जास्त मतभेद उत्पन्न (निर्माण) झाले आहेत. इस्लामचे शेवटचे महान धर्माचार्य शाह वली उल्लाह देहलवीसहित अधिकांश या मताकडे झुकलेले दिसतात. ते असा विचार करण्यामध्ये अनुकूल वाटतात की जीवात्म्याच्या नवीन वातावरणास निदान काही प्रमाणामध्ये अनुकूल असे शारीरिक माध्यम जरूर समाविष्ट असते. आम्हाला असे वाटते की हे मत मुख्यत्वे करून या वस्तुस्थितीवर आधारलेले आहे की काही स्थानगत संदर्भ किंवा आनुभविक पार्श्वभूमी असल्याशिवाय, व्यक्ती या नात्याने जीवात्मा अकल्पनीय आहे. तथापि, खालील कौराणिक श्लोक, या मुद्यावर काही प्रकाश टाकते :

''ही तर अजब गोष्ट आहे, की जेव्हा आम्ही मरून जाऊ व (गळून कुजून) माती होऊन जाऊ तेव्हा (आम्हास पुनरुत्थानात दुसऱ्यांदा जिवंत करून उठविले जाईल?) हे पुनरपि (जिवंत) होणे तर बिलकुलच दुरापास्त होय. आम्ही चांगले जाणतो की, माती त्यांच्या शरीराला कशा प्रकारे नष्ट करते, आणि आमच्याकडे एक (सुरक्षित महान) ग्रंथ आहे, ज्यात प्रत्येक गोष्ट नमूद केलेली आहे.'' – ५०:३–४.

आमच्या मते हे श्लोक स्पष्टपणे संकेतित करते की ब्रह्मांडाचा स्वभाव असा आहे की सध्याच्या वातावरणामध्ये, व्यक्तित्व निदर्शक वाटणारे लहान लहान तुकडे झाल्यानंतर सुद्धा, मानवी कृतीमधून शेवटच्या कार्यासाठी आवश्यक अशा व्यक्तित्वाचा प्रकार, अन्य मार्गाने प्रस्थापित करण्याची मोकळीक ब्रह्मांडास आहे. तो अन्य मार्ग काय आहे हे आपणास माहित नाही. किती का सूक्ष्म असेना, 'दुसऱ्या निर्मिती'शी संबंधित एखादे शरीराचे गुणधर्माविषयी आम्हाला कोणतीच मर्मदृष्टी पण नसते. ती एक वस्तुस्थिती असल्याचे कुराणामधील साम्ये फक्त सूचित करतात. ती 'दुसऱ्या निर्मिती'चा स्वभाव आणि चारित्र्य उघड करण्यासाठी नसतात. म्हणून तत्त्वज्ञानाच्या भाषेमध्ये बोलायचे झाल्यास आम्ही यापुढे जाऊ शकत नाही – मानवाचा मागील इतिहास पाहता असे वाटते की शरीराच्या संपूर्ण नाशासोबतच त्याचे जीवन समाप्त होते, ही अत्यंत असंभाव्य अशी बाब आहे.

तथापि कुराणाच्या शिकवणीनुसार, जीवात्म्याचे पुनरुत्थान हे त्यास एक 'तीक्ष्ण दृष्टी' प्रदान करते, की जिच्या साहाय्याने तो आपले स्व–निर्मित ''प्राक्तन आपल्या गळ्याभोवती बांधलेले स्पष्टपणे पाहतो.''

''आणि प्रत्येक जण (कर्माचा जाब देण्यासाठी) हजर होईल; (एक देवदूत तर) त्याच्या संगती हाकणारा असेल व (एक दूत त्याचे कर्मपत्रक घेऊन त्याच्या कर्मांचा) साक्ष देणारा. (सांगितले जाईल की), तू यापासून बेसावध होतास. (आज) आम्ही तुमच्या (गफलतीचा) पडदा दूर केला आहे, म्हणून आज तुझी दृष्टी फार तीक्ष्ण झालेली आहे.'' – ५०:२१.

स्वर्ग आणि नरक या अवस्था आहेत, स्थाने नव्हेत. कुराणामधील त्यांची वर्णने ही शास्त्रीय म्हणजेच एक आंतरिक वस्तुस्थितीचे दृश्य प्रतिनिधी आहेत. कुराणाच्या शब्दांमध्ये नरक हा ''परमेश्वराने पेटवलेला (चेतवलेला) असा अग्नी आहे जो अंत:करणांना घेरतो.'' – एक मानव या नात्याने दु:खद जाणीव आहे. स्वर्ग म्हणजे विनाशकारी शक्तींवर विजयाचे आनंद होय. इस्लाममध्ये शाश्वत नरकवासासाठी अशी कोणतीच गोष्ट नाही. नरकाशी संबंधित, काही श्लोकांमध्ये प्रयुक्त 'शाश्वत' या शब्दाचे वास्तविक अर्थ 'एक कालखंड' असल्याचे स्वत: कुराण सांगते. जसे – ''नि:संशय नरकाग्नी पाळतीतच लागून आहे. (व तोच) शिरजोरांचे

(दुराचाऱ्यांचे) ठिकाण (होय); की ते त्यातच युगानुयुग (पडून) राहतील.'' - ७८:२१-२३. काळ हा व्यक्तिमत्वाच्या विकासाकरिता संपूर्णपणे निरर्थक असू शकत नाही. चारित्र्याची प्रवृत्ती कायम-शाश्वत असण्याकडे असते; तिच्या पुनश्च आकारासाठी वेळ हा लागणारच. म्हणून कुराणाच्या कल्पनेप्रमाणे नरक हा एक बदला घेणाऱ्या ईश्वराकडून कायमस्वरूपी तीव्र वेदनेची शिक्षा देणारा एक खड्डा नव्हे. ती एक सुधारात्मक अनुभूती असते. ती एक निष्ठुर आत्म्यास पुन्हा एकदा संवेदनशील आत्मा स्वरूपात दैवी कृपेच्या आनंददायक वाऱ्याची झुळूकाकडे वळविते. जीवन हे एक आणि अखंड (स्वरूपात) असते. ''प्रत्येक क्षणी एक नव्या वैभवामध्ये असलेल्या अनंत सत्तेपासून म्हणजेच परमेश्वरापासून'' नित्य आल्हाददायक प्रकाश ग्रहण करण्यासाठी मानव हा नेहमी अग्रेसर होत असतो, आणि दैवी प्रकाश ग्रहण करणारा हा फक्त एक निष्क्रिय ग्रहीता नसतो. एक मुक्त जीवात्म्याचे प्रत्येक कर्म हे एक नवीन प्रसंग निर्माण करीत असते, आणि अशा प्रकारे निर्माणकारी विकासाच्या आणखी जास्त संधी उपलब्ध करून देते.

### ३) प्रतीकवाद

फळात जसा वृक्षाचा विस्तार साठवलेला असतो, त्याचप्रमाणे प्रतीकात अनंत अर्थ साठवलेला असतो. प्रत्येक बाह्य क्रिया आंतरिक विचाराचे प्रतीक असते. अर्थामुळे प्रतीक जिवंत वाटते. सार्थक प्रतीकास सामर्थ्य येते. प्रतीकास नवीन अर्थ प्राप्त झाल्यामुळे अर्थाचा विकास होत असतो.

कमळ हे भारतीय संस्कृतीचे प्रतीक आहे. सर्व प्रतीकांचा राजा असे कमळास म्हटले तरी चालेल. 'कमळा'चे प्रतीक म्हणते, ''अनासक्त राहा, प्रकाशाची पूजा करा, अमंगलापासून मंगल घ्या. तपस्या करा, केवळ सत्कर्मात रमा, नवीन नवीन जोडा.''

स्वस्तिक या चिन्हाचे प्रतीक म्हणजे कल्याण, सर्वांचे शुभ असो, सर्वांचे भले होवो, असा त्या चिन्हाचा भाव आहे.

उपनिषदांत भगवान सूर्यनारायण हे प्रतीक सांगितले आहे. हा सूर्य म्हणजे नारायण. सूर्य हा चैतन्यमय प्रभूचे स्वरूप. सूर्य चराचराला चालना देतो. सूर्य उगवताच फुले फुलतात, पक्षी गातात, उडतात, गायी गुरे हिंडू फिरू लागतात, मानवांचे व्यवहार सुरू होतात. त्या विश्वंभराच्या विश्वचालनेची कल्पना या सूर्यावरून येईल. सूर्याची उपासना म्हणजेच या विश्वेश्वराची उपासना!

'ओम्' हे परमेश्वराचे प्रतीकात्मक नाम आहे. ते सर्व नामांचे सार आहे. सर्व शब्दसृष्टी कढवून हे एक 'ओम्' अक्षर निर्माण केले आहे. ओम्मध्ये सारे स्वर आले, सारी व्यंजने आली. सारी सारी वाङ्मये आली, सारे वेद आले. 'ओम्' ही परमेश्वराची वाङ्मयीन मूर्ती!

म्हणून नाम हे महान प्रतीक आहे. नाम उच्चारताच सारे आठवते. सारा इतिहास एका नावात येऊन बसलेला असतो. आई हा शब्द उच्चारताच मातेचे अनंत प्रेम आठवते. बाळ हा शब्द आठवताच मातेला मुलाच्या शतस्मृती आठवतात.

नामाला अपार महत्त्व आहे. ते कोठेही घेता येते. घरी-दारी, उठता-बसता-निजता, हे नामरूप दर्शन आहे. या अक्षर प्रतीकात केवढे सामर्थ्य आहे? चिंच म्हणताच जिभेला पाणी सुटते, हा सर्वांचा अनुभव आहे. म्हणून या नामाला कमी लेखू नका. सारा संसार नामरूपात्मक आहे; परंतु ते नामरूपसुद्धा शेवटी नामात

सामावून जाते व केवळ नाम उरते प्रतीकांमुळे त्या वस्तूंच्या अंतरंगाला हात लावला असे वाटते, रसग्रहण केल्यासारखे वाटते.

नवीन तत्त्वज्ञान येताच नवीन प्रतीकेही येतात. भारताचा तिरंगा हा सर्व धर्मांच्या ऐक्याचे चिन्ह आहे. लाल झेंडा हे एक नवीन प्रतीक आहे. जगातील श्रमजीवी लोकांचे ते ऐक्यचिन्ह आहे. हातोडा, कोयता म्हणजे श्रममहात्म्याची प्रतीके.

स्वाभाविकपणे अशा आश्चर्यजनक आत्मानुभूतीसह, सूफ़ी विचारधारेमध्ये परिपूर्णतेस पोचणारी, आपली स्वत:चा एक प्रतीकवादाची पद्धती मन:श्चक्षु विकसित करते. 'मिश्कात अल्-अन्वार' या आपल्या ग्रंथामध्ये सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ इमाम ग़ज़ाली म्हणतात की, या प्रतीकवादाच्या स्पष्टीकरणामध्ये दोन प्रमुख गोष्टी (विचार) समाविष्ट आहेत. यांच्या तपासासाठी अमर्याद वाव आहे, परंतु येथे मी अत्यंत संक्षिप्तपणे फक्त संकेत करीत आहे.

**प्रथम,** प्रतीकवादाचे शासन आणि पद्धत; प्रतीकाच्या नमुन्याचे आधारे आदर्श स्वरूपाचे तात्पर्य ग्रहण करण्याची रीत, दोहोंमधील परस्पर संबंध, संवेदन विश्व (आकारासाठी चिकणमाती पुरवठा करणारे, प्रतीकवादाचे जडवाद) आणि संकल्पना अवतरित करणारे लोकोत्तर विश्व यामधील या सादृश्याचे आंतरिक स्वभाव.

**दुसरे,** आपल्या नाशिवंत पार्थिवाच्या अनेक तात्पर्यांच्या श्रेणी, आणि प्रत्येकाने धारण केलेल्या प्रकाशाची मात्रा. म्हणून पहिल्याचे विवेचन करण्यासाठी आम्ही दुसऱ्या प्रतीकवादाचे प्रतीपादन करतो. मात्र तत्पूर्वी प्रतीकवाद म्हणजे काय, हे थोडक्यात पाहू.

**प्रतीकवाद**

धर्म आदर्शमूलक असतो, म्हणून धार्मिक कथन आदर्शात्मक कथन असतात. धर्माचा मूळ उद्देश असतो – परम सत्तेशी अर्थात परमेश्वरी साक्षात्कार. यास्तव धर्म-भाषा ही प्रकृतित: उत्प्रेरक (Evocative) असते. धार्मिक प्रकथन हे असंज्ञानात्मक असते. कारण हे असीम, अनिर्धार्य, अनन्य, निरूपाधिक अतीत अशा सत्तेच्या बाबतीत कथन असते. अनन्यसत्ता अनुभवातीत असते. तिचे शब्दश: कथन शक्य नसते. शाब्दिक कथन स्थळ-काळामध्ये असलेल्या वस्तू (खुर्ची, पुस्तक, पाटी, घर इत्यादी) आणि आत्मवर्ती प्रत्यय (४ + ४ = ८) यांच्यासंबंधी प्रयुक्त होऊ शकते. 'परमसत्' एक तर ना दिक्कालावृत्त असते ना दुसरे आत्मवर्ती प्रत्यय पण असते. म्हणून हिची ओळख ना आत्मनिष्ठ स्वरूपात होते ना वस्तुनिष्ठ स्वरूपात. अशा प्रकारे 'परमसत्'चे वर्णन शाब्दिक नसून प्रतीकात्मक असते. तात्पर्य, धर्माची भाषा ही प्रतीकांची भाषा असते. प्रतीक गूढ असतात.

प्रतीक स्वत:स सोडून अन्य सत्तेकडे इंगित करणारे चिन्ह असतात. चिन्हाशी वस्तूचा संबंध बाह्य असतो; तर प्रतीकाचे प्रतीक्याशी संबंध आंतरिक असतो. प्रतीक हा प्रतीक्यामध्ये भागग्राही (अंशस्वरूपी) असतो. पांढरा झेंडा हा फक्त झेंडाच नसतो, तर तो शांतीचा प्रतीक असतो. लिंग व त्रिशंकू हे शंकराचे प्रतीक असतात. वेणू आणि धेनु हे कृष्णाचे प्रतीक असतात. ज्या सत्तेस अभिव्यक्त करण्यामध्ये सामान्य भाषा असमर्थ ठरते, तेथेच प्रतीक वापरले जातात. सामान्य भाषेत आकलनापलीकडे असलेल्या अतींद्रिय आणि विश्वातीत सत्तेचे

भान प्रतीकांच्या माध्यमाने लाक्षणीक स्वरूपात होते. प्रतीकांमुळेच सत्याचे अव्यक्त रूप व्यक्त होते. अल्लाहची जेवढी म्हणून नावे आहेत, ती सर्व त्याचे प्रतीक आहेत. अशा प्रकारे धर्माची भाषा ही मुळात प्रतीकात्मक असते. परमसत्तेची कथनीयता ही शाब्दीक नसून, प्रतीकात्मक असते. शिवलिंग हे ब्रह्मांडाचे प्रतीक आहे.

केवळ मानस प्रत्यक्ष आणि कल्पनेमध्ये येणारे विचार, भाव आणि अनुभूतींचे गोचर संकेत अथवा चिन्ह प्रतीक असतात. प्रतीकाची सत्ता तिच्या अर्थव्यंजकतेमध्ये असते, वस्तुरूपतेमध्ये नव्हे. प्रतीकांद्वारेच ईश्वराची बाह्यनिष्ठता पण सिद्ध होते. प्रतीकच ससीम आणि असीममध्ये, सगुण आणि निर्गुणमध्ये संबंध प्रस्थापित करतो. 'निरूपाधिक अतीत' याचे ज्ञान प्रतीकमुळेच शक्य आहे. प्रतीक अकथनी याचे कथन असते. अनिर्वचनीयचे निर्वचन असते. दुर्बोधाचे बोध असते. प्रतीकाच्या मदतीने व्यक्ती प्रतीक्यपर्यंत पोहोचते. प्रतीकांच्या माध्यमाने व्यक्तीस 'परमसत्'चे भान होते. हीच तर प्रतीकांची सार्थकथा आहे. प्रतीक धारणेचे विषय असते, वस्तूचे सूचक नव्हे. सामान्यपणे प्रतीक अमूर्त भावांचे मूर्तरूप असते. सारांश प्रतीक परम सत्तेस ओळखण्याचे प्रकाशस्तंभ आहे. संकल्पामुळे धर्मामध्ये प्रतीकवादाचा विकास होतो. धर्मामध्ये प्रतीकाच्या आधारे सत्याचा शोध घेतला जातो. धार्मिक प्रतीक आध्यात्मिक प्रत्ययांचे वाहक असतात. 'मानवीकरण' धार्मिक चेतनेचे मेरूदंड असते. आश्चर्याची भावना आणि आनंदाची कामना यांचा योग प्रतीकांच्या प्रयोगामध्ये अंतर्निहित असतो.

**१) प्रतीकवादामधील बहिरंग आणि अंतरंग : प्रतिरूप आणि अप्रतिरूप**

जगत दोन आहेत, आध्यात्मिक आणि जड (भौतिक), किंवा वाटल्यास एक इंद्रियगम्य जग आणि एक बोधगम्य जग; किंवा वाटल्यास पुन्हा एक उच्च जग आणि एक कनिष्ठ जग. या सर्व अभिव्यक्ती जवळपास सारख्याच आहेत, आणि त्यांच्या मधील फरक केवळ दृष्टिकोनाचा आहे. जर तुम्ही दोन्ही जगांना त्यांच्यामध्ये जाणाल तर तुम्ही पहिली अभिव्यक्ती उपयोगात आणता, त्यांना समजण्यासाठी उपयुक्त इंद्रियांच्या बाबतीत म्हणत असाल तर दुसऱ्या अभिव्यक्तीकडे संकेत असेल; जर त्यांच्या आपसात असलेल्या परस्पर संबंधाविषयी असेल, तर तुम्ही तिसऱ्या अभिव्यक्ती विषयी बोलता. त्यांना तुम्ही कदाचित सत्ता जगत् आणि इंद्रिय संवेदन जगत् व इंद्रियातील विश्व आणि लोकोत्तर जग असेही म्हणू शकता. या परिभाषिक शब्दावलीमधील बहुविधता आणि तदनुषंगिक संकल्पनांची अनेकविधता पाहून तत्त्वज्ञानाचा विद्यार्थी गोंधळात पडला नसेल तर आश्चर्य वाटावयास नको. परंतु ज्याला संबंधित शब्दावलीचा अर्थ माहित आहे त्याच्या दृष्टीने संकल्पना प्राथमिक असतात, तर परिभाषिक शब्दावली गौण; मात्र अप्रबुद्ध नेमके याचे उलटे समजतील. त्यांच्यासाठी वास्तव उघडण्याचे पारिभाषिक शब्द हे उगमस्थान असतात. अशा दोन प्रकारच्या मानसिकतेसंबंधी आपणास कुराणमध्ये एक संकेत आढळतो, ''जो आपली मान खाली वाकवून चालतो तो किंवा जो ताठपणे एका सरळ मार्गावर चालतो, यापैकी कोण अधिक चांगले मार्गदर्शन लाभलेला असला पाहिजे?''

**२) दोन जग (विश्वे) : त्यांची रूपे आणि प्रति-रूपे**

दोन लोकां(जगां)ची म्हणजेच इहलोक व परलोकाची अशी संकल्पना आहे. आपणास जाणण्याची दुसरी गोष्ट आहे की, लोकोत्तर जग हे एक अदृश्य जग आहे. कारण अधिकांश लोकांसाठी ते इंद्रियातीत असते,

म्हणजे दृश्य नसते; आणि प्रत्यक्ष जग हे संवेदनांचे वा प्रत्यक्ष ज्ञानाचे जग असते. कारण त्यामधील सर्व काही प्रत्यक्ष (दृष्टीगोचर) असते. लोकोत्तर जग हे एक असे ठिकाण असते, की जेथून प्रज्ञात्मक, बुद्धिगम्य जगाकडे आपण उत्कर्ष साधतो; आणि, परंतु दोहोमधील या संबंधासाठी आणि त्यांच्यामधील परस्पर संबंधांसाठी, उच्चतर टप्प्याकडील वरचा मार्ग निषिद्ध असेल; तर मग सत्तात्मक सान्निध्याकडील प्रगती आणि अल्लाह(परमेश्वरा)च्या जवळपास जाणे पण अशक्य होऊन बसेल. जोपर्यंत दैवी पावित्र्याच्या मजबूत 'वाड्या'च्या केंद्रस्थानीच आपले पाय रोवत नाही तोपर्यंत कोणताच मनुष्य अल्लाहच्या जवळपास फिरकू शकत नाही. आता आपल्यासाठी 'दैवी पावित्र्य' याचा अर्थ संवेदना आणि कल्पना यांच्या आकलनापलीकडील जग असा होईल. ज्याला आपण दैवी पावित्र्याच्या मजबूत 'वाडा' आणि सर्वातीतता (परत्व) म्हणतो तेथून तिऱ्हाईत (परका) आत्मा ना बाहेर जातो ना आतमध्ये येतो, त्या जगाच्या या नियमाच्या अनुषंगाने ही बाब आहे. मानवी चेतना ही या सर्वातीतते (परत्वा)च्या आविष्करणाचा मार्ग असतो. याला कदाचित 'पवित्र खोरे (दरी)' असे म्हणता येईल.

पुन्हा, या 'वाड्यां'मध्ये लहान कक्ष आहेत. यांपैकी काही दैवी पावित्र्याच्या संकल्पनेमध्ये जास्त खोलवर शिरलेले आहेत. परंतु या 'वाड्या'मध्ये लहान कक्षांच्या अनेक श्रेणी सामावलेल्या आहेत. अंतर्दृष्टी असलेल्या लोकांसाठी हे गूढ (कोडे) आहे असे समजू नये. परंतु हा विषय आम्हाला लांबवता येऊ शकत नाही, कारण या सर्वांचे विवेचन करणे म्हणजे विषयांतर करण्यासारखे ठरेल. या पारिभाषिक शब्दांचा अभ्यास तुम्ही स्वतः करायचा आहे.

चर्चित विषयाकडे वळता : आम्ही म्हटल्याप्रमाणे, दृश्य जग (इहलोक) हे लोकोत्तर जगाकडे निघून जाण्याचे ठिकाण असते. ''साधकाची सरळ सन्मार्गावरील प्रगती'' त्या ऊर्ध्वमुखी वृत्ती (मार्गा)ची अभिव्यक्ती असते, की जिला 'श्रद्धा' ('विश्वास'), 'योग्य मार्गदर्शनाची हवेली (वाडा)' असेही म्हणता येईल. जर दोन्ही जगांदरम्यान संबंध नसते, आंतर-संबंध मुळीच नसते, तर एक-दुसऱ्यासाठी उर्ध्वमुखी प्रगती अगम्य ठरली असती. म्हणून दैवी कृपेने दृश्य जगास (इहलोक, भौतिक जगास) लोकोत्तर जगाशी एक सादृश्य प्रदान केले, आणि याच कारणामुळे संवेदना जगामध्ये अशी एक पण वस्तू (पदार्थ) नाही की जिच्याकरिता पारलौकिकामध्ये एखादे प्रतीक नसेल. संयोगवश असेही पण असू शकते की ऐहिक जगामधील एखाद्या वस्तूसाठी लोकोत्तर जगामध्ये अनेक वस्तूंचे प्रतिकीकरण असेल, आणि तद्वत तसेच लोकोत्तर जगामधील एखाद्या वस्तूसाठी इहलोकामध्ये अनेक प्रतीके असू शकतील. कुठल्यातरी पैलूने प्रति-रूपाशी समानता आणि सादृश्य असलेल्या एखाद्या वस्तूस आपण नमुनेदार किंवा प्रतीकात्मक (वस्तू) म्हणतो.

या प्रतीकांची एक संपूर्ण यादी (परिगणना) तयार करण्याचे ठरविल्यास दोन्ही लोकां (इहलोक व परलोकां)मधील विद्यमान समस्त वस्तू संपतील! असे महाभयंकर कार्य मर्त्य असलेल्या माणसांकडून कधीच पूर्ण होऊ शकणार नाही. मागे भूतकाळात आमच्या मानवी अंत:शक्ती तिच्या आकलनास पुरेशा ठरल्या नाहीत; आणि अल्पकालिक आयुष्यामुळे आम्ही वर्तमानकालात पण तिचे संपूर्ण विवरण देऊ शकत नाही. फार तर एखादे उदाहरण आम्ही तुम्हास स्पष्ट करू शकतो. थोड्या नमुन्यापासून अधिक जादांचे अनुमान काढता येते; कारण संशोधनाच्या दारामुळे (दरवाज्यामुळे) या ज्ञानाची गुह्ये तुम्हास स्पष्टपणे उघडलेली दिसतील.

**३) प्रतीकवादाचे एक उदाहरण : ‘कुरआन’ मधील प्रेषित इब्राहीम यांच्या दृष्टांता (कथे)वरून**

आता ऐका. वास्तव लोकोत्तर जग हे प्रकाशयुक्त मूलभूत द्रव्यांनी भरलेले असते. त्यांना ‘देवदूत’ असे म्हणतात. त्या मूलभूत द्रव्यांपासून विविध मर्त्य चैतन्यांवर विविध प्रकारचे प्रकाश प्रसारित होतात आणि या कारणांमुळे या देवदूतांना ‘महिम’, ‘उच्च’ असे म्हणतात; तर अल्लाहस् (परमेश्वरास) ‘महामहिम’, ‘परमोच्च’ म्हणून संबोधतात.

‘‘तोच आहे सर्वोच्च आणि समस्त विश्वाच्या सत्ताकेंद्राचा मालक!’’ – ४०:१५. ‘‘सर्व स्तुती अल्लाहसाठीच आहे, जो मालक आहे आकाशांचा आणि मालक आहे पृथ्वीचा, आणि मालक आहे सकल जगांचा. सर्व महानता त्याचीच आहे आकाशात आणि पृथ्वीवर. तो सर्वशक्तिमान आहे, अस्सल बुद्धिमान आहे!’’ – ४५:३६–३७

या उच्चांचे प्रकाशमानतेच्या दृष्टीने विविध दर्जे असतात. तदनुसार यांची प्रतीके दृश्य इहलोकामध्ये ठळकपणे सूर्य, चंद्र आणि तारे असली पाहिजेत (ठरतात) आणि साधना मार्गावरील साधक हा सर्वप्रथम एका **ताऱ्याशी** अनुरूप मात्रेपर्यंत प्रगती साधतो. त्या ताऱ्याच्या प्रकाशाची चमक (प्रभा) त्याला दिसते. त्याच्यावर हे प्रकट होते की, ताऱ्याखालील समस्त जग ही त्याची चमक आणि प्रभावामुळे त्याची आराधना किंवा भक्ती करते. एखादी अति सुंदर आणि अति उत्कृष्ट वस्तू पाहिल्यानंतर तिच्यावर फिदा होऊन माणूस उत्स्फूर्तपणे उद्गारतो, ‘किती सुंदर आहे ही वस्तू!’ तद्वत त्या लुकलुकणाऱ्या अत्यंत सुंदर आणि उत्कृष्ट ताऱ्याकडे पाहून साधक उत्स्फूर्तपणे ‘हा माझा प्रभू आहे!’ असे न म्हणेल तरच नवल! (मग) तो अग्रेसर होतो. जेव्हा त्याला यापेक्षा जास्त प्रकाशमान असलेल्या अन्य वस्तूच्या प्रकाशाच्या मात्रेची जाणीव होते, म्हणजेच **चंद्राच्या** अति मोहक आणि शीतल प्रकाश असलेल्या प्रतीकाचे दर्शन घडते, तेव्हा तो साधक उत्स्फूर्तपणे पुन्हा पुन्हा उद्गारतो, ‘‘पहा! किती सुंदर आणि जास्त मोठा आहे हा!’’ आपल्याशी वरिष्ठ आणि श्रेष्ठ असलेल्या चंद्राच्या तुलनेने, उंच चांदण्यामध्ये जेव्हा तारा मावळला तेव्हा तो साधक अर्थात प्रेषित म्हणाला, की ‘‘मावळणाऱ्या (वस्तूंस) तर मी पसंत करीत नाही. (की मी त्यांना परमेश्वर मानावे?)’’ आणि अशा प्रकारे तो अग्रेसर होतो आणि शेवटी **सूर्याचे** प्रतीक असलेल्या प्रकाशाच्या मात्रेवर पोहोचतो. हे पुन्हा त्याला पूर्वीच्या (म्हणजेच चंद्रा)पेक्षा महानतर आणि उच्चतर आढळते, परंतु तरीसुद्धा दोहोंमधील असणाऱ्या संबंधाच्या कारणाने तो तुलना करू लागतो. परंतु तुलनेमध्ये दोषास्पदता दोहोंमध्ये आढळून आल्यामुळे साधक इब्राहीम याला अपरिपूर्णता दिसून आली. ही अपरिपूर्णता किंवा दोषास्पदता दोहोंमधील ‘मावळणे’ होय. दृढ श्रद्धा असलेल्या भक्तास सन्मार्गाची सुबुद्धी परमेश्वर कशा प्रकारे देत असतो, याचे प्रत्यंतर म्हणजे उपरोक्त प्रेषित इब्राहीमशी निगडित प्रसंग होय. पवित्र कुराणाच्या शब्दांमध्ये या प्रसंगाचे निवेदन असे आहे :

‘‘आणि अशा प्रकारे आम्ही इब्राहीमला (सन्मार्गाची समज लाभावी) आणि त्याने दृढ श्रद्धा (विश्वास) ठेवणाऱ्या लोकांपैकी व्हावे, म्हणून त्याला आकाशांची आणि पृथ्वीची राज्य व्यवस्था दाखवू लागलो. आणि जेव्हा त्याच्यावर रात्रीचा काळोख दाटला, तेव्हा त्याला एक **तारा** दिसला, (ताऱ्याला पाहून) तो म्हणाला, ‘हा आहे माझा विधाता!’ परंतु जेव्हा तो तारा अस्तंगत झाला, तेव्हा तो म्हणाला, ‘जे अस्तंगत होतात ते मला आवडत नाहीत.’ नंतर जेव्हा त्याने प्रकाश पसरवीत उदय पावणारा **चंद्र** पाहिला, तेव्हा तो म्हणाला. ‘हा आहे

माझा विधाता!' परंतु जेव्हा तो (चंद्र) अस्तंगत झाला, तेव्हा तो म्हणाला, 'जर माझ्या विधात्याने मला मार्ग दाखविला नाही, तर मी खचितच पथभ्रष्ट लोकांपैकी होऊन बसेन.' नंतर (पुन्हा) जेव्हा त्याने प्रकाश पसरवीत उदय पावणारा **सूर्य** पाहिला (तेव्हा) तो म्हणाला, 'हा माझा विधाता आहे. (आणि) हा सर्वात मोठा आहे.' परंतु जेव्हा तो (सूर्य) अस्तंगत झाला (तेव्हा) तो (आपल्या लोकांना) म्हणाला, ''लोकांनो! ज्या वस्तूंस तुम्ही (परमेश्वराचा) साथी मानता, मी तर त्यांजपासून (अगदीच) अलिप्त आहे. मी तर एकाग्रचित्त होऊन (पूर्ण) निष्ठेने, आपले तोंड **ज्याने** आकाश व पृथ्वीही निर्माण केली त्याच (परम पवित्र परमेश्वरा)कडे फिरविले आहे; आणि मी तर त्यांच्यात सामील नाही, जे इतरांना अल्लाहचे समकक्ष ठरवतात. (म्हणजे मी अनेकेश्वरवादी, मूर्तीपूजकांपैकी नाहीच. आता मी सृष्टीच्या निर्मात्याचा सच्चा भक्त बनून राहणार आहे.)

उपरोक्त दृष्टांतार्गत रूपकाचे, इस्लामचे गाढे पंडित अब्दुल्ला यूसुफ अली प्रणीत अत्यंत समर्पक व सुंदर असे निरुपण (भाष्य) पुढील प्रमाणे आहे. – आता प्रेषित इब्राहीमची कथा पाहा. ते कॅल्डियन लोकांमध्ये राहिले. त्या लोकांना तारे आणि ग्रहांचे उत्तम ज्ञान होते. परंतु इब्राहीम त्या भौतिक जगापलीकडे गेले आणि त्यांनी त्या पलीकडील आध्यात्मिक जग पाहिले. त्यांच्या पूर्वजांच्या मूर्त्या त्यांच्यासाठी निरर्थक होत्या. तो पहिला टप्पा होता. परंतु परमेश्वर त्यांना अनेक अंश उच्चतर स्तरावर घेऊन गेला. परमेश्वराने त्यांना निरपेक्षपणे भौतिक जगाचे नियम आणि प्रबळ शक्ती यांच्या मागे असलेले आध्यात्मिक वैभव दाखवून दिले.

१) या रूपकाचे तीन टप्पे आहेत. ते प्रेषित इब्राहीम यांच्या आध्यात्मिक प्रबोधनाच्या पायऱ्या दर्शवितात. त्यांनी प्रत्यक्षपणे तारे किंवा ग्रहांची पूजा केली, असे मुळीच समजू नये. आपल्या पूर्वजांच्या मूर्तिपूजेची निरुपयोगिता सिद्ध झाल्यानंतर, आकाशात चकाकणाऱ्या सुदूर सुंदर वस्तूंच्या पूजेची निरर्थकता त्यांना दिसू लागली. गावंढळ त्यांच्यामध्ये नसताना सुद्धा एक प्रबळ शक्ती असल्याचे मानत, त्यांपैकी एक प्रकार म्हणजे अंधाऱ्या रात्री लुकलुकणारा एक तारा होय. त्याच्यामध्ये आपले भाग्य, नशीब दडलेले आहे, अशी धर्मभोळी कल्पना (प्रचलित) होती, परंतु अधिक सत्य ज्ञान हे उघड करून सांगे की विश्वसंचालक परमेश्वराच्या आज्ञापित नैसर्गिक नियमानुसार त्याचे उदय व अस्त होत असते, आणि दिवसाच्या स्वच्छ प्रकाशामध्ये त्याचे प्रकाश निस्तेज बनते. म्हणून त्याची पूजा ही व्यर्थ, निरुपयोगी आहे. तारा म्हणजे एक प्रकारची शक्ती नव्हे, सर्वप्रबळ महाशक्ती तर नव्हेच नव्हे!

२) हेच रूपक पुढे नेत असे म्हणता येईल की, चंद्र हा ताऱ्यापेक्षा आकाराने मोठा आहे, आणि अधिक सतेज आहे. या विषयी अधिक माहिती स्वरूपात असे म्हणता येईल की, चंद्र हा केवळ ताऱ्यांसारखा अस्तंगतच होत नाही, तर तो दर ताशी कलाकलाने आपले स्वरूप बदलत असतो. म्हणजेच चंद्राच्या कला असतात. त्यामध्ये वाढ होत असते. आणि तो परप्रकाशित असल्यामुळे, आपल्या प्रकाशासाठी त्याला सूर्यावर अवलंबून रहावे लागते. स्वरूप कसे फसवे असतात! हा काही ईश्वर नाही! त्या टप्प्यावर तुम्ही रात्रीच्या अंध:कारामध्ये फसण्याऐवजी अधिक विश्वासार्ह अशी बाब शोधू लागता. मग तुम्ही परमेश्वराच्या मार्गदर्शनाची याचना करता.

३) पुढचा टप्पा हा सूर्याच्या रूपकाचा आहे. तुम्ही दिवसाच्या स्वच्छ प्रकाशात असता. आता तुम्हास योग्य संकेत लाभला आहे. तुम्ही आकाशामध्ये सर्वात मोठा तारा पाहता. परंतु खरोखर तो सर्वात मोठा आहे?

ब्रह्मांडामध्ये आकाशात सूर्यपेक्षा मोठे असे हजारो खपिंड आहेत. आणि दररोज सूर्य उगवतो व मावळतो. असा तुमचा निर्माता ईश्वर नसतो. ही समस्त ब्रह्मांडनिर्मिती त्या परमेश्वराची आश्चर्यकारक लीला आहे. ही सृष्टी त्याच्या आश्चर्याचा खेळ आहे. खऱ्या विश्वंभराकडे उन्मुख होणाऱ्यास, हे विश्वपूजन म्हणजे मूर्खता नव्हे काय? या सर्व मूर्खपणाच्या गोष्टींचा आपण त्याग करू या, आणि एकच ईश्वर असल्याचे सत्य जाहीर करू या. ('दि होली कुरआन' - पृ. ३०९-१०.)

आता 'ज्याने' या शब्दप्रयोगामुळे काय बरे अर्थ सूचित होत असेल! हे कोणत्याच प्रकारची तुलना किंवा संबंध नसलेले असे सर्वात जास्त संदिग्धतेचे चिन्ह आहे. कारण, जर एखादा विचारत असेल की, या "(की) ज्याने"शी तुलनीय किंवा सुसंगत असलेले प्रतीक काय असेल? या प्रश्नाचे कोणतेच उत्तर कल्पना करण्यासारखे नाही. एक सत्तत्त्व असलेल्या अल्लाशिवाय सर्व संबंधातीत असा कोणीच नसणार, अशा प्रकारे, काही अरबांनी अल्लाहच्या प्रेषितांना विचारले, "अल्लाहशी आपला संबंध कसा असेल बरे?" पुढील उत्तर मिळाल्याचे समजते. "म्हणा, तो अल्लाह एक आहे! त्याचे दिवस ना संपलेत ना सुरू झालेत; तो ना एक पिता आहे ना एक पुत्र; आणि तत्सम कोणीच नाही, नाही, एक पण नाही." याचाच अर्थ असा की तो (ईश्वर) संबंधातीत आहे.

"(पैगंबर!) (त्यांना) सांगा, "अल्लाह आहे प्रत्येक वस्तूचा निर्माता, तो एकटा आहे, सर्वांवर प्रभुत्व ठेवणारा आहे." - १३:१६. "(पैगंबर! हे लोक अल्लाहविषयी विचारतात), तुम्ही त्यांना सांगा, "अल्लाह एकच आहे. तो आत्मनिर्भर (व स्वयंपूर्ण) आहे. ना तो जनिता आहे ना जन्य. (असा आहे तो अल्लाह) आणि कोणीही त्याच्या समान नाही.)" - ११२:१-४.

पुन्हा जेव्हा फिरऔनने प्रेषित मूसास विचारले : "मग कोण बरे आहे विश्वाचा स्वामी?" जणू काही तो परमेश्वराचे स्वत्त्व जाणण्याची मागणी करीत होता. मूसानी फक्त एवढेच सांगितले की, "त्याची सृष्टी", कारण प्रश्नकर्त्याच्या मनास या अधिक सुस्पष्ट होत्या; आणि म्हणून त्यांनी उत्तर दिले, "आकाशे आणि पृथ्वीचा स्वामी." अल्लाहचे मूळ स्वरूप सांगण्याचे टाळत असल्याचे समजून त्यावर आक्षेप घेत फिरऔन आपल्या दरबारी मंडळींना उपहासगर्भितपणे म्हणाला, "पहा, हा काय म्हणतो!" मग मूसानी म्हटले, "तुमचा स्वामी आणि तुमच्या पित्याचा स्वामी." फिरऔनने मूसा यांना वेडा म्हणून घोषित केले. परमेश्वर स्वत्त्वाच्या वर्तनासाठी त्याने साम्याची मागणी केली, आणि मूसा यांनी उत्तर दिले, "त्याच्या सृष्टीपासून" आणि म्हणून फिरऔन म्हणाला, "तुमच्याकडे पाठविण्यात आलेला प्रेषित वेडा आहे."

**४) प्रतीकवादाचे मूलभूत दृष्टांत : मुख्यत: पवित्र कुराणातील प्रेषित मूसा यांच्या कथेवरून**

प्रतीकात्मक पद्धती स्पष्ट करण्यासाठी आम्ही निवडलेल्या नमुन्याकडे आता आपण वळू या. साक्षात्कार निरूपण शास्त्र हे प्रत्येक प्रकारच्या प्रतीकाचे मूल्य निर्धारित करते; कारण "साक्षात्कार हा भविष्यवाणीचा एक भाग असतो." आपसातील परस्पर साम्य आणि एक समाईक आध्यात्मिक संकल्पनेमधील असलेला त्यांचा वाटा म्हणजे सर्वांवर प्रकाश पसरविणारा, या कारणामुळे साक्षात्कारामध्ये दिसणाऱ्या **सूर्याचे** निरुपण, सर्वश्रेष्ठ सत्ताधीश शासकाकडून व्हावे, हे स्पष्टच आहे. नव्हे कधी **चंद्राचा** प्रतिरूप हा त्या सर्वश्रेष्ठ सत्ताधीशाचा मंत्री असेल. कारण आपल्या अनुपस्थितीमध्ये सूर्य हा चंद्राच्या माध्यमाने जगावर प्रकाश पाडत असतो, आणि तसेच

आपल्या मंत्र्याच्या माध्यमाने, प्रजेने कधीच न पाहिलेले, सर्वश्रेष्ठ सत्ताधीश, आपल्या प्रजेवर प्रभाव टाकत असतो. तसेच स्वप्न पाहणारी व्यक्ती आपल्या स्वप्नामध्ये आपल्या हाताच्या बोटामध्ये एक आंगठी पाहतो. तिच्या साहाय्याने ती व्यक्ती लोकांची तोंडे बंद करून स्त्रियांची गुह्ये सुरक्षित ठेवते. यांची स्वप्न मीमांसा करायला सांगितले की हा संकेत पवित्र रमज़ान महिन्यामधील प्रात:कालच्या उपासनेकरिता (नमाजासाठी) दिलेली आरोळी (अज़ान) असते. शिवाय पुन्हा जो आपल्या स्वप्नामध्ये ज़ैतूनचे तेल (olive oil) एका ज़ैतूनच्या वृक्षावर ओतत असल्याचे पाहतो, याची मीमांसा अशी आहे की, जिच्याशी लग्न केले आहे ती दासी म्हणजे तिची माता होय. याची जाणीव त्याला नसते. परंतु प्रतीकांची नाना प्रकारे होणारी सर्व प्रकारांची मीमांसा व्यक्त करणे अशक्य असते आणि म्हणून त्याची गणती करणे अशक्य असते. आपण फक्त असे म्हणू शकतो की ज्याप्रमाणे चेतनेच्या लोकोत्तर जगामधील विशिष्ट भूतां (जीवां)चे प्रतीकीकरण सूर्य, चंद्र आणि तारे यांनी होते आणि जेव्हा संकल्पनेचा मुद्दा हा प्रकाशाव्यतिरिक्त विशेष नमुनेदार असेल, तेव्हा इतरांचे निर्धारण हे वेगळ्या प्रकारांनी होईल.

उदाहरणार्थ, त्या चैतन्य जगतामधील त्या भूतांमध्ये जर काही एक दृढ आणि अपरिवर्तनशील असेल, महान आणि कधीच कमी होणारे नसेल, की ज्या पासून अंत:करणामध्ये ज्ञान–सरिता प्रवाहित होत असेल आणि आर्षज्ञानाची उत्कृष्ठता प्रतिबिंबित होत असेल, एका दरीमध्ये पाण्याचा प्रवाह वहात असेल, तर तिची प्रतीकात्मता **पर्वत** म्हणून निश्चित होईल. (पर्वताने तिचे प्रतीकीकरण होईल.) आणखी, जर अत्युत्कृष्टतेचा महाप्रसाद प्राप्त करणारी ती भूतें (जीव) विभिन्न श्रेणींची असतील, तर त्यांचे प्रतीकीकरण हे **दरीं**ने होईल, आणि जर अत्युत्कृष्टतेचा तो महाप्रसाद माणसांच्या अंत:करणाकडे स्थलांतरित होत असेल, तर ही अंत:करणे पण दऱ्यांनी प्रतीकीकृत होऊन जातील. प्रमुख दरी प्रेषित, संत–महात्मे आणि धर्म–पंडित यांचे प्रतिनिधित्व करील. या नंतर त्यांचे पश्चगामी अनुयायी येतील. म्हणून, जर या दऱ्या प्रमुख दरीच्या खालच्या भागात असून त्यांना त्यापासून पाणी मिळत असेल, तर ती प्रमुख दरी निश्चितपणे **'उजवी' दरी** असेल. तर तिचे एकमेव उजवेपण आणि श्रेष्ठत्व असेल. आणि शेवटी सर्वात खालची दरी येईल. 'उजव्या' दरीच्या सर्वात शेवटची व सर्वात शेवटची पातळी गाठलेल्या दरीपासून तिला पाण्याचा पुरवठा होतो, आणि त्याप्रमाणे तिला उजव्या दरीच्या सगळ्यात खोल आणि मध्य भागापासून पाण्याचा पुरवठा न होता, त्या **उजव्या दरीच्या कांठापासून** पुरवठा होतो.

परंतु जर एखाद्या प्रेषिताचा आत्मा हा दैवी प्रेरणेने प्रकाशित एक **दिवा** या स्वरूपात असेल (''त्यांत आपला (स्वनिर्मित) आत्मा स्वबळाने फुंकेन'' – १५:२९. ''मग त्याची घडवणूक केली, आणि आपल्या आत्म्याची फुंकर मारली.'' – ३२:९. तर **अग्नी** हा त्या दिव्याच्या प्रदीप्त होण्याच्या स्रोताचे प्रतीक आहे. काही जण प्रेषितांच्या शिकवणुकीचा लाभ आपल्या जीवनामध्ये परंपरागत (रूढीवादी) पद्धतीने उठवतात; तर काही अंतर्दृष्टी, मर्मदृष्टीच्या देणगीने आपले ऐहिक जीवन उजळवितात. म्हणून काहीच शोध न घेणारे रूढीवादी लोकांचे प्रतीक एक **अग्निशिखा** किंवा एक **मशाल** (दिवटी) किंवा एक **सन्मित्र** असतात; तर प्रेषितांचे काही आदर्श गुण धारणकर्ते हे लोक **अग्नीचा उबदारपणा** प्राप्त करणारांशी प्रतीकबद्ध होतात. कारण अग्नीच्या गुणधर्माविषयी ऐकून माणसास उबदारपणा प्राप्त होत नसून त्याच्या सान्निध्यात

गेल्याशिवाय उबदारपणाची अनुभूती येत नाही. अंतर्दृष्टी प्राप्त करणारे लोक हे प्रेषितांच्या सान्निध्यात असलेल्यांपैकी असतात.

जर प्रेषितांचा पहिला टप्पा हा, संवेदना आणि कल्पना यांच्या व्यत्ययांपासून फार लांब असेल, आणि त्यांचे रूपांतरण हे पवित्र सर्वातीततेच्या जगामध्ये होत असेल, तर त्या टप्प्याचे प्रतीकीरण हे **'पवित्र दरी'**ने होते. आणि जर दोन्ही (इहलोक व परलोक) जगांचा त्याग केल्याशिवाय ती पवित्र नदी पायदळी तुडविली जाणार नसेल आणि आत्म्याचे एक सत्तात्मक वास्तवा (परकमेश्वरा)कडे अभिमुख होणे असेल (कारण इहलोक आणि परलोक हे सह-सापेक्ष आहेत, दोन्ही मानवी प्रकाश-द्रव्यांचे वियोज्य आहेत, आणि कधी त्यांना काढता येते तर कधी घालता येते.) तर मग हे दोन्ही जगांचा त्याग, मक्केच्या महायात्रेच्यावेळी तीर्थंकराचे (यात्रेकरूंचे) आपल्या दोन्ही पायातील पादत्राणे उतरवून (काढून) अनवाणी होण्याचे प्रतीक आहे. तो तीर्थंकर हा काबा दर्शनाच्यावेळी आपली नेहमीची वस्त्रप्रावरणे बाजूस काढून यात्रेची न शिवलेली शुभ्र वस्त्रे नेसतो.

एवढेच नव्हे तर, परंतु आता आपणास पुन्हा एकदा सर्वसत्ताधारी सान्निध्याकडे म्हणजेच ईश्वरी सत्तेकडे वळले पाहिजे. जर त्या सत्तेपाशी काही तरी असे असेल की जेणे करून ग्रहणक्षम अंत:करणाच्या पाटीवर अनेक आध्यात्मिक विद्या (दैवी विज्ञान) बिंबविल्या (ठसविल्या) जातात. बिंबविले जाणारे ते काही तरी हे **लेखणीने** प्रतीकबद्ध होईल. कारण त्या अंत:करणामध्ये ज्याच्यावर या गोष्टी (वस्तू) ठसविण्यात आल्या आहेत. त्या **पाटी, पुस्तक** आणि **कागदाचे भेंडोळे (गुंडाळी)** या नमुन्यात असतील. जर लिहिणाऱ्या लेखणीच्यावर, कोणी तिला लिहिण्यासाठी उपयोगात आणण्यास भाग पाडत असेल, तर तिचा नमुना **हात** होईल. जर ती प्रभुसत्ता हात आणि पाटी, लेखणी आणि पुस्तक, यांना एका निश्चित क्रमात समावेश करून घेत असेल, तर ती **आकृतीबंध (आकार)** किंवा **(प्रतिमा) बिंब** या नमुन्यात असेल. आणि जर, सादृश्याच्या आधारावर मानवी आकृतीबंध हा एक सुनिश्चित क्रमामध्ये असेल तर तिची निर्मिती ही ''कृपाळू परमेश्वराची प्रतिमा, आकृतीबंध'' या स्वरूपात केली. पवित्र कुराणामध्ये याचे संकेत असे आहे – ''हे मानवा! तुला कोणत्या वस्तूने आपल्या **उदार पालनकर्त्याचे** सेवेत उद्धट केले? की, त्याने तुला बनविले व (बनविलेही तर) फार परिपूर्ण बनविले आणि तुझी अवयवे बेताची ठेवली. (मग) ज्या कोणा **आकृतीत** इच्छिले तीत तुझी (म्हणजे तुझ्या अवयवांची) जोडणी केली.'' – ८२:६-८. ''आम्ही मानवाला **उत्तम आकार** देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केलेले आहे.'' ९५:४.

''त्याने पृथ्वी आकाशांना सत्याधिष्ठित निर्माण केले आहे. आणि त्यानेच तुमच्या आकृती बनविल्या आणि तुमच्या आकृतीही (बनविल्या त्या) सुंदर बनविल्या.'' – ६४:३.

'कृपाळूंच्या प्रतिमेमध्ये' आणि 'अल्लाहच्या प्रतिमेमध्ये' या दोन वाक्यांशामध्ये फरक असलेले आता दिसते. कारण दैवी **कृपेमुळेच** दैवी सत्तेच्या प्रतिमेस त्या 'प्रतिमे'मध्ये समाविष्ट व्हावे लागले. आणि मग अल्लाह (परमेश्वरा)ने आपल्या दयेच्या छत्राखाली मानवाचे आदि प्रपितामह प्रेषित आदम यांना समस्त जगामधील प्रत्येक प्रजाती आणि उपजाती यांचा समावेश असलेली 'प्रतिमा' किंवा 'आकृतीबंधा'चे एक सारतत्त्व प्रदान केले, इतके की आदमच जगाचे सर्वस्व होते (आहेत), असे वाटावे. अथवा आदम हे जगाचे

सारभूत प्रत वाटावेत. आणि आदमचा आकृतीबंध – ही सारभूत प्रतिमा – अल्लाहच्या हस्ताक्षरामध्ये कोरला गेला आहे, की जेणे करून **आदम** हे दैवी हस्ताक्षर वाटावेत. ही अक्षरांची वर्णमाला नव्हे. (कारण त्याचे हस्ताक्षर हे अक्षर वर्णातीत असते, त्याचा शब्द पण ध्वनी आणि वर्णाक्षरातीत असतो, आणि त्याची लेखणी बोरूच्या पलीकडची असते आणि त्याचा हात चर्म–मांस–अस्थींच्या पलीकडचा असतो.) मग आता, या **कृपेविना**, प्रत्येक आदमपुत्र आपल्या सर्वसत्ताधीश प्रभूस जाणण्यास असमर्थ ठरला असता; कारण ''जो स्वत:स (स्वत:च्या आत्म्यास) ओळखतो तो आपल्या प्रभूस ओळखतो.'' मग दैवी कृपेच्या या परिणामांमुळे आदमची निर्मिती ही 'कृपाळू परमेश्वराच्या प्रतिमा' स्वरूपात झाली, 'अल्लाहच्या प्रतिमास्वरूपात' नव्हे. म्हणून ईश्वराचे सान्निध्य म्हणजे कृपाळू ईश्वराचे सान्निध्य नव्हे, नरेशत्वचे पण सान्निध्य नव्हे. तसेच सर्वसत्ताधीश प्रभुत्वाचे पण नव्हे; याच कारणास्तव परमेश्वराने आम्हास यांच्या सान्निध्यापासून संरक्षण प्राप्त करण्यासंबंधी वारंवार प्रार्थना करण्याचा आदेश दिला आहे. (''हे पैगंबरा! तू आपल्या संरक्षणासाठी अशी) प्रार्थना करीत अस की, 'मी शरण जाऊ इच्छितो' (त्या) मानवजातीच्या विधात्याला. (समस्त) मानवजातीच्या उपास्य परमेश्वराला.'' – ११४:१–३. **जर या संकल्पनेच्या मुळाशी** ''अल्लाहने माणसास कृपाळूच्या प्रतिमेमध्ये निर्माण केले,'' हे शब्दसमूह नव्हते, तर मग ते 'आपल्या प्रतिमेमध्ये' असे असावयास हवे होते. परंतु महान वार्तिकाकार ('मुहद्दिस') बुख़ारी यांच्या मते शब्दरचना होती – 'कृपाळूच्या प्रतिमेमध्ये'.

परंतु ज्याअर्थी शासकाचे सान्निध्य आणि सर्वाधिपतीचे सान्निध्य यामधील अंतर स्पष्ट करण्यासाठी एक दीर्घ स्पष्टीकरणाची गरज असते, म्हणून आपण हा विषय बदलून प्रतीक–पद्धतीच्या मागील नमुन्यावर संतुष्ट राहिलेले बरे, कारण, खरोखर हा एक अथांग समुद्र आहे.

परंतु जर या प्रतीकवादामुळे तुम्हाला काहीसा तिटकारा आल्याचे भासल्यास, तर तुम्ही कुराणामधील पुढील संहितेशी स्वत:स संतुष्ट होऊ द्यावे. ''त्याने आकाशापासून पाऊस वर्षविले आणि त्यातूनच तुम्हाला पिण्याचे पाणी मिळते. आणि मग ते (पाणी) गरजेनुसार आपल्या क्षमतेप्रमाणे दऱ्यांमध्ये वहात गेले.'' – १६:१०. कारण या संहितेवरील भाष्ये आपणास असे सांगतात की येथे पाणी हे **ज्ञानाचे** प्रतीक आहे, तर दऱ्या या **मानवाची अंत:करणे** आहेत.

याचे संकेत उत्तमपणे उमर ख़य्यामच्या रूबायां (चौपदी, चोपाया)मध्ये आपल्याला आढळते. त्यांपैकी काही रूबाया अशा आहेत. (गद्य – सरलार्थ)

१) पुन्हा ऐका. पवित्र रमज़ान महिन्याचा अखेर. नूतन चंद्रदर्शन, वृद्ध कुंभकाराच्या दुकानी मी एकटा उभा. रांगांमध्ये मातीची भांडी मला दिसली – ५९.

२) आणि काय आश्चर्य! त्या मातीच्या भांड्यांपैकी काहींना वाचा फुटली; तर काही मूक स्तब्ध होते. आणि इतक्यात अकस्मातपणे एक अधीर उद्गारला, ''कृपा करून मला सांगा की कोण कुंभकार आहे, आणि कोण मातीचे भांडे?''–६०.

३) मग दुसरा म्हणाला, – ''खचितच (हे) व्यर्थ नाही. सामान्य मातीपासून माझे मूलभूत द्रव्य काढून घेण्यात आले. ज्याने मला बारकाईने घडविले (आकार दिले) आहे. तोच मला पुन्हा आपल्या पायाखाली तुडवून सामान्य माती बनवून टाकील.'' – ६१.

४) दुसरा म्हणाला, – ''काय, आनंदाने मद्यपान करणारा एक तिरसट मद्यपी मुलगा (मद्यपानानंतर) मद्याचा प्याला कधीच फोडत नसतो! ज्याने हे भांडे आपल्या कलाने विशुद्ध प्रेमाने बनविले तो (पण) संतापाच्या भरात फोडणार नाही कशावरून!'' – ६२.

५) कुणीच उत्तर दिले नाही; परंतु काही काळ स्तब्धतेनंतर एक जास्तच कुरूप भांडे म्हणाले : ''माझे तिरपे वाकलेले रूप पाहून ते माझा उपहास करतात! कुंभाराचे माझ्यावर हात फिरवले गेले नव्हते काय?'' – ६३.

६) एक म्हणाला, – ''पिंपातून दारू काढून देणारे लोक निश्चितच म्हणतील, आणि त्याचा चेहरा नरकाच्या धुराने लेपतील (रंगवतील), ते आमच्या काहीशा कठोर परीक्षेबद्दल बोलतात – छी! तो एक सज्जन गृहस्थ आहे, आणि सर्व काही ठीक होईल.''–६४.

७) एक दीर्घ उसासा घेऊन दुसरा बोलला, – ''दीर्घ विस्मृतीमुळे माझी चिकण माती कोरडी झाली; परंतु जुन्या परिचित अशा (द्राक्ष)रसाने मला भरून टाका. मला वाटते मी लवकरात लवकरच बरा होईन.'' – ६५.

८) अशा प्रकारे भांडी एकामागून एक बोलत होती. नवचंद्रदर्शनाविषयी सर्वजण जे बोलत होते त्याची एकाने हेरगिरी केली : मग ते आपसात एक दुसऱ्याला ढकलू लागले. (आणि म्हणू लागले) बंधू, बंधू! कान देऊन लक्षपूर्वक ऐका – कुंभाराच्या एका खांदेगाठीमधून करकर असा आवाज येत आहे! – ६६.

९) आहा! द्राक्षाशी माझ्या निस्तेज जीवनाचे नाते आहे, या कारणास्तव माझी जीवनलीला समाप्त झाल्यावर माझ्या शरीरास मरणोत्तर स्नान घाला, आणि द्राक्षलतांच्या पानांमध्ये गुंडाळून त्यावर पाण्याचे एक झोत टाका. अशा प्रकारे मला एखाद्या शीतल उद्यानाशेजारी मला पुरून टाका. – ६७.

१०) कारण माझ्या पुरलेल्या मृत शरीरापासून मधुर वासाचा पाश हवेमध्ये जोराने आवळला जाईल, एखादा सच्चा श्रद्धावंत जवळून जाताना बेसावधपणे गाठला जाईल. – ६८.

११) खरोखर ज्या मूर्त्यांशी मी इतकी वर्षे प्रेम केले, त्यांनी लोकांच्या नजरेत माझी पत बरीच गमावली आहे. एका उथळ मद्य प्याल्यामध्ये माझी अब्रू बुडवून टाकली आहे, आणि एका गाण्याखातर माझी इभ्रत विकून टाकली आहे. – ६९.

१२) खरोखर, खरोखरीच मी शपथपूर्वक अनेकदा या अगोदर पश्चाताप व्यक्त केले आहे – परंतु शपथ घेण्याच्या वेळेस मी न प्यालेल्या (मधुपान न केलेला) होतो काय? आणि तेव्हाच आपल्या हातांमध्ये गुलाबाचे ताटवे घेऊन वसंत ऋतुचे आगमन झाले. माझे जुने पश्चाताप चूर्ण चूर्ण झाले. – ७०.

१३) श्रद्धाहीनाप्रमाणेच मदिरेने पण माझ्याशी खेळ केला आहे, आणि माझ्या इभ्रतीचा लांब झगा माझ्यापासून हिसकावून घेतला आहे. दारूविके काय विकत घेतात, याविषयी मला नेहमी आश्चर्य वाटते. ते आपली भारी वस्तू (मदिरा) निम्म्या किंमतीमध्ये विकतात. – ७१.

### ४) फ़ना (संभूती, निर्वाण) आणि बक़ा (असंभूती)

#### १) 'फ़ना' व 'बक़ा' – सूफ़ी साधकांच्या दृष्टिकोनातून

सरते शेवटी 'फ़ना' आणि 'बक़ा'च्या अस्तित्वाच्या अवस्थेचे महत्त्व ओळखले जाते म्हणजेच ज्याचे निर्वाण होते, नाश होते, विलय होते आणि जे नित्य कायम राहते. जे शाश्वत असते अशा अवस्थेचे होय;

अथवा सर्वश्रेष्ठ किंवा सर्वोच्च सत्तेच्या सत्त्वामध्ये अंतर्लीन करण्याची मन:शक्ती आणि प्रक्रिया याचे महत्त्व समजून घेण्याची गरज भासते. म्हणून या संदर्भात सूफ़ी साधकांची काय मते होती हे प्रथम जाणून घेतले पाहिजे.

सूफ़ींचा 'फ़ना' आणि 'बक़ा'शी काय तात्पर्य होता, हे जाणून घेण्याअगोदर कुराणचा या संदर्भात काय दृष्टिकोन आहे, हे समजून घेणे श्रेयस्कर ठरेल. त्यामुळे जीवनाचे उद्दिष्ट साध्य करण्यामध्ये 'फ़ना' आणि 'बक़ा'चे महत्त्व स्पष्ट होईल. पवित्र क़ुराण स्पष्ट शब्दांमध्ये उल्लेख करते की ''पृथ्वीवर (तसेच आकाशात) जे जे आहे ते सर्व संपुष्टात येणार आहे आणि भव्यतेने व महानतेने परिपूर्ण असे तुझ्या पालनकर्त्याचे स्वत्त्व नेहमीसाठी कायम राहणारे आहे.'' – ५५:२६–२७. दुसऱ्या एका ठिकाणी आहे, ''जे काही तुमच्या जवळ आहे, ते सर्व संपुष्टात येणे अटळ आहे. पण जे काही अल्लाहकडे आहे, ते कधीच संपुष्टात येणार नाही.'' – १६:९६.

कुराणच्या उपरोक्त दोन श्लोकांवर गंभीरपणे विचार केल्यास 'फ़ना' आणि 'बक़ा'च्या व्याख्या आपोआप निश्चित होऊन जातात. कुराणाच्या मते फ़नाचा असा अर्थ आहे की जग आणि त्यामधील सर्व वस्तू या समाप्त होणाऱ्या आहेत, त्या 'फ़ानी' म्हणजेच नष्ट होणाऱ्या, संपुष्टात येणाऱ्या अशा आहेत. म्हणून त्यांची 'फ़ना' होणे आहे. मानवास पण हाच भोग भोगायचा आहे. आणि 'बक़ा' केवळ ईश्वरी सत्तेसच प्राप्त आहे. त्याच्या व्यतिरिक्त दुसरे कोणीच बाकी राहणारे नाही. सूफ़ींनी 'फ़ना' आणि 'बक़ा' या दोन शब्दांना विविध अर्थ प्रदान करून त्यांच्या व्याख्यांमध्ये प्राण फुंकून दिले आहेत.

सुप्रसिद्ध सूफ़ी साधक अली बिन उस्मान अल–जुल्लाबी हुजवीरी यांच्या मते 'फ़ना' आणि 'बक़ा' याचा अर्थ असा आहे की मनुष्याने आपल्या मनामध्ये असलेले अज्ञान, सुप्तावस्था, ईश्वराची अवज्ञा आणि आपल्या मनोकामनांची दासता यांच्या अनुसरणास तिलांजली द्यावी, त्यांना नष्ट करून टाकावे, इथपर्यंत की ईश्वराचे ज्ञान आणि त्याचे स्मरण व त्याचे आज्ञापालनच बाकी राहून जावेत. ('कशफुल महजूब' – पृ. २६६.)

हजरत इब्राहीम शैबानी म्हणतात की 'फ़ना' आणि 'बक़ा' यांचा केंद्रबिंदू निष्ठा आणि मनुष्याच्या संपूर्ण जीवनामध्ये विशुद्ध एकेश्वरवाद क्रियाशील असणे आणि आज्ञापालनामध्ये मग्न राहणे या गोष्टींवर असला पाहिजे.

आधुनिक युगामधील प्रसिद्ध भारतीय सूफ़ी मौलाना अश्रफ़ अली थानवी यांनी 'फ़ना'स दोन विभागामध्ये विभाजित केले आहे. – एकास त्यांनी 'फ़ना–ए–वाक़ई' म्हणजेच वास्तविक फ़ना आणि दुसऱ्यास 'फ़ना–ए–इल्मी' अर्थातच ज्ञानस्तरीय फ़ना असे म्हटले आहे.

'फ़ना–ए–वाक़ई' म्हणजे व्यक्तीने स्वत:स प्रत्येक कुकर्मापासून वाचवून ठेवले पाहिजे. काम, क्रोध, मद, मोह, मत्सर आणि लोभ या षड्रीपूंपासून अलिप्त राहण्यास 'फ़ना–ए–वाक़ई' म्हणतात. 'फ़ना–ए–इल्मी'चा हा अर्थ आहे की मनामध्ये अल्लाहशिवाय कोणत्याच वस्तूचे भय आणि दबदबा राहू नये, अर्थात अल्लाहशिवाय इतर कोणत्याच गोष्टीविषयी प्रेम नसावे. त्याच्या मनामध्ये फक्त परमेश्वर आणि त्याचे प्रेमच वसले पाहिजे.

सूफ़ी परमेश्वरप्राप्तीस आपल्या जीवनाचे उद्दिष्ट समजतात – मानतात. परमेश्वर प्राप्तीचेच दुसरे नाव 'फ़ना' आहे असे सूफ़ी मानतात. अशा प्रकारे साधक अहंकार नष्ट करून फ़नास प्राप्त करतो. 'बक़ा'संबंधी त्यांचे असे मत आहे की ही 'फ़ना' नंतरची अवस्था आहे.

अंतिम उद्दिष्टाची चर्चा करताना सूफ़ींच्या मनामध्ये स्वाभाविकपणे हा प्रश्न उपस्थित होतो की 'एकमेक' होण्याचा अर्थ काय आहे? परमेश्वरामध्ये संपूर्णपणे विलीन होऊन जाणे म्हणजे 'एकमेक' होणे आहे किंवा परमेश्वरामध्ये निवास करण्याच्या स्थितीस 'एकमेक' होणे म्हणतात? या बाबीविषयी सूफ़ींमध्ये पूर्ण मतभेद आहे. त्यांच्यामध्ये अनेक असे आहेत की जे 'फ़ना' या प्रथम अवस्थेसच अंतिम उद्दिष्ट आणि साधकाची शेवटची मजल मानतात, आणि अनेक असेही पण आहेत की जे 'बक़ा' या दुसऱ्या अवस्थेस अंतिम उद्दिष्ट मानतात. असे म्हणतात की 'फ़ना'च्या अवस्थेमध्ये साधक जागतिक प्रपंचापासून मुक्त आपल्या अस्तित्वाचे लय करतो. अनेक वर्षेपर्यंत यालाच सूफ़ी आपले उद्दिष्ट मानत. परंतु हळुहळू सूफ़ी सनातनपंथी इस्लामच्या प्रभावामुळे यालाच शेवटची अवस्था मानण्यामध्ये संकोच करू लागले. त्यांनी यालाच शेवटची अवस्था मानली नाही. त्यांच्या मते वास्तविक अस्तित्वाची सुरुवात 'फ़ना' नंतर होते. अहंकार नष्ट केल्यानंतर साधकास 'फ़ना'ची प्राप्ती होते, आणि त्यानंतरच 'बक़ा'ची अवस्था येते. यामध्ये साधक हा परमेश्वराशी एकमेक होऊन राहू लागतो.

'फ़ना'चे विवेचन अनेक प्रकारे केले गेले आहे. 'फ़ना'चे विवेचन करताना म्हटले गेले आहे, की सूफ़ी-साधनमार्गावर अग्रेसर होत, साधक जेव्हा सर्व इच्छा आणि कलुषतेपासून मुक्त होऊन जातो, तेव्हा त्याचा आत्मा परमात्म्यामध्ये लीन (विलीन) होऊन जातो आणि यालाच 'फ़ना' म्हणतात. त्यावेळेस अहंकारामध्ये चेतना उरत नाही आणि त्यामुळे आत्म-पर भाव मिटून जातो. त्यावेळेस साधकास ना सुखाची चिंता असते ना दुःखाची पर्वा. तो त्या सर्वांपासून वेगळा होऊन जातो, की ज्यांच्यामुळे सुख-दुःखाची प्राप्ती होते. साधकाच्या साऱ्या वासनांचे, सर्व आकांक्षांचे अवसान होऊन जाते. तो परमात्म्यासोबतच 'मस्तमौला' बनून राहतो. त्याच्या व्यक्तिगत जीवनाची काहीच सार्थकता नसते. यालाच सूफ़ी 'महव' म्हणजेच लोप किंवा पुसून टाकणे म्हणतात. म्हणून 'फ़ना'मध्ये लीन व्यक्ती धर्मशास्त्राच्या विधी-विधानांचे पालन कसे बरे करू शकेल, हे सहजपणे समजून येण्यासारखे आहे. अशा व्यक्तीसाठी म्हटले जाते की परमेश्वर तिची काळजी घेतो. बायज़ीद बिस्तामीसारख्या संतांच्या बातमीत म्हटले जाते की ते भावाविष्टतेच्या अवस्थेमध्ये असायचे. फक्त उपासने-प्रार्थने ('नमाज़')च्या वेळेस त्यांची चेतना परत (जागृत होत) येत असे. इतर वेळेस ते त्याच अवस्थे (अचेतन)मध्ये असत. 'फ़ना'ची व्याख्या करताना आर. ए. निकोल्सन यांनी म्हटले आहे की, सर्व आकांक्षा, सर्व स्वार्थ आणि सांसारिक माया-मोह नष्ट झालेल्या अशा आत्म्याची उर्ध्वगती म्हणजे 'फ़ना' होय. आणि अशा प्रकारे जेव्हा तो स्व-चिंतनाशी विरक्त होऊन जातो, तेव्हा तो स्वत: परम प्रियतमेच्या चिंतेचा विषय बनतो. प्रियकर आणि प्रेयसी यांचे ऐक्य स्थापित होऊन जाते.

कालाबाधी, कुशैरी यासारख्या सूफ़ी साधनांनी 'फ़ना'विषयी आपले विचार काहीसे अशा प्रकारे व्यक्त केले आहेत. ज्या क्षणी आत्मा अनंत सौंदर्याचे दर्शन करतो, त्या क्षणी त्याला आपल्या अस्तित्वाची जाणीव नाहीशी होते. त्याचे आत्मज्ञान गळून पडते. इंद्रियगम्य विषयांपासून तो दूर होतो आणि प्राणीजगतासंबंधी त्याचे सर्व ज्ञान नष्ट होते. स्वात्म-ज्ञानाचे तिरोहित होऊन जाण्यास 'फ़ना' असे म्हणतात. सूफ़ी जेव्हा असे म्हणतात की आत्मा परमात्मामध्ये विलीन होऊन जातो, तेव्हा त्याचा अर्थ असा होत नाही की तो काहीच शिल्लक राहात नाही. परंतु त्याचा असा अभिप्राय असतो की, तो सर्वव्यापक सत्तेमध्ये विलीन होऊन त्याचा भाग बनून

जातो. गोल्डजिहरने दाखवून दिले आहे की, सूफ़ींच्या मते आत्माविशेषचा नाश होत नाही, परंतु तो परमात्म्याशी एकमेक होऊन जातो. सर्वव्यापी सत्तारूपी अथांग महासागरामध्ये एक थेंबाप्रमाणे तो विलीन होऊन जातो. त्याची स्वतंत्र सत्ता उरत नाही. अशाप्रकारे आपणास आढळून येते की 'फ़ना'चे भिन्न भिन्न स्तर, पैलू आणि अर्थ आहेत. जसे – (१) सर्व आकांक्षा आणि वासना यांचा विनाश होऊन त्याद्वारे आत्म्याचे नैतिक रूपांतर होणे, (२) परमेश्वराच्या गुणांच्या चिंतनाद्वारे सर्व दिसून येणाऱ्या वस्तू, सर्व कर्मे, सर्व चिंता आणि सर्व वासना या मनापासून नाहीशा होणे (मिटून जाणे.), (३) समस्त चैतन्यशक्तीचे निष्क्रिय होऊन जाणे, (४) 'फ़ना'च्या शेवटच्या अवस्थेपर्यंत पोचणे की ज्यामध्ये फ़ना–प्राप्तीचे ज्ञान पण नाहीसे होते. यालाच 'फ़ना–अल्–फ़ना' असे म्हणतात.

फ़नाची व्याख्या काहीशी अशाच प्रकारे केली आहे, परंतु नंतर अबू सईद अल–सर्राज यांनी त्यांच्या नंतरच्या स्थितीवरही प्रकाश टाकला आहे. अल–सर्राज यांनी 'फ़ना'स अंतिम उद्दिष्ट मानले नाही. परंतु त्यांनी 'बक़ा'स अंतिम उद्दिष्ट मानले आहे. 'बक़ा'मध्ये आत्मा, परमात्मामध्ये निवास करू लागतो. – त्याच्याशी एकमेक होऊन राहतो. 'फ़ना'ची शेवटची अवस्था म्हणजे 'बक़ा'चा प्रारंभ होय.

इस्लामच्या धार्मिक सिद्धान्तामध्ये पूर्ण आस्था ठेवणारे सूफ़ी साधक अल–सर्राजच्या या विचाराशी सहमत आहेत. काहींचे असे मत आहे की वास्तविक 'फ़ना'ची स्थितीच सूफ़ी साधकाचे अंतिम उद्दिष्ट आहे, आणि त्यानंतरची स्थिती 'बक़ा'ची गोष्ट जी नंतर उभी करण्यात आली आणि तिच्यावर जोर देण्यात येऊ लागला, तिच्या पाठीमागे एक विशेष मनोवृत्ती कार्यप्रवृत्त होती, आणि ती मनोवृत्ती म्हणजे सूफ़ींचा स्वतःस इस्लाम धर्माचे संपूर्णपणे अनुयायी असण्याचे सिद्ध करण्याचा आग्रह मात्र होता. काही दृष्टीने हे योग्य पण असू शकते. सूफ़ीवादाचा आविर्भाव (आविष्कार) इस्लामच्याच अंतर्गत झालेला आहे, आणि इस्लाम–धर्माची अशी मान्यता आहे की आत्म्याची सत्ता कोणत्याही परिस्थितीमध्ये कायम असते आणि त्या आत्म्याचा नाश होत नाही. म्हणून सूफ़ींचा कल याकडे असणे हे काही अस्वाभाविक नाही.

दुसरे एक प्रसिद्ध सूफ़ी साधक अली बिन उस्मान हुजवीरीने 'फ़ना' आणि 'बक़ा'ची व्याख्या करताना दाखवून दिले आहे की 'फ़ना' वास्तवात एखाद्या वस्तूच्या अपूर्णतेचे ज्ञान आणि तिला प्राप्त करण्याच्या इच्छेची उपरती निर्माण होणे आहे. 'फ़ना'च्या अवस्थेमध्ये ना प्रेमासाठी स्थान आहे आणि ना घृणेसाठी. तसेच 'बक़ा'च्या अवस्थेमध्ये ना संयोगाचे स्थान असते आणि ना वियोगाचे. हुजवीरीने या मतास चुकीचे मानले आहे की 'फ़ना'च्या अवस्थेमध्ये व्यक्तीचे अस्तित्व – त्याचे स्वरूप आणि गुण – यांचा विनाश होऊन जातो. याचप्रमाणे 'बक़ा'च्या अवस्थेमध्ये हे मानणे चुकीचे आहे की मनुष्यामध्ये परमेश्वराची स्थिती असते कारण की याचा अर्थ असा होईल की परमेश्वर हा मनुष्य स्वरूपात अवतरित होतो आणि मनुष्यांच्या सर्व गुणांचा अधिकारी बनून जातो. म्हणून 'फ़ना' (लय होणे, नाश पावणे) आणि 'बक़ा' (चिरस्थायित्व) मनुष्याचे स्वतःचेच गुण आहेत. फ़नाचा आशय आहे एका गुणाचे नाश पावणे हे त्याच्याजागी दुसरे गुण ('बक़ा') आल्याकारणाने घडते. जर 'फ़ना' आणि 'बक़ा' हा एक दुसऱ्यापासून एकदम स्वतंत्र मानले तर फ़नाचा अर्थ इतर सर्व वस्तूंच्या स्मृतीचा लोप होणे आहे, आणि 'बक़ा'चा अर्थ परमेश्वराच्या स्मरणामधील स्थिती आहे. ज्याच्या इच्छांचे संपूर्णपणे निरसन झालेले असते तो परमेश्वराच्या इच्छेमुळे परिचालित होतो. ज्याप्रमाणे

लोखंडास अग्नीमध्ये तप्त केल्यानंतर तो अग्नीसारखा लालभडक होऊन जातो. आणि उष्णता हा जो अग्नीचा गुण आहे तो तप्त लोखंडामध्ये येतो. परंतु लोखंडाचे स्वरूप नष्ट होत नाही. म्हणून फ़ना आणि बक़ाच्या अवस्थेचा हा अर्थ होतो की मनुष्याचे गुण, स्वभाव आणि कर्म तसेच त्याच्या संपूर्ण इच्छा नष्ट होतात तेव्हा तो संपूर्णपणे परमेश्वरी इच्छेने परिचालित होतो.

हुजवीरीने 'फ़ना' आणि 'बक़ा' यांच्या व्याख्यांसंबंधी विचार करताना असे सांगितले आहे की, ते सर्व एकाच आशयास व्यक्त करतात, फक्त म्हणण्याची रीत वेगळी आहे. हुजवीरीचे म्हणणे आहे की जेव्हा माणसाचे हृदय परमेश्वराची शक्ती आणि विभूतीच्या प्रकाशाने प्रकाशित होऊन जाते, तेव्हा त्या परम ऐश्वर्यास अभिभूत करणारा प्रकाश त्याच्या मनापासून इहलोक अथवा परलोकाच्या अस्तित्वाचे ज्ञान दूर करतो. सूफ़ींचे 'अहवाल' आणि 'मुक़ामात' व्यर्थ प्रतीत होऊ लागतात. तर्क आणि भावना (भावप्रवणता) दोन्हीसाठी तो जणू मृतकासारखा बनून जातो. इतपर्यंत की 'फ़ना'चे 'फ़ना' होऊन जाते की जिच्यामध्ये 'फ़ना' प्राप्तीचे ज्ञान पण नाहीसे होऊन जाते. आणि 'फ़नाच्या फ़ना'मध्ये त्याच्या जिभेवर परमेश्वराचे नाम राहते. तो विनम्र आणि दीन बनून जातो.

सय्यद अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली या सूफ़ी साधकाने एके ठिकाणी म्हटले आहे की जेव्हा माणूस परमेश्वराच्या नावाच्या आरशामध्ये पाहतो तेव्हा तो उत्तमपणे समजतो की परमेश्वराशिवाय अन्य (दुसरे) काहीच नाही. आणि त्या क्षणी त्याला या गोष्टीचे ज्ञान होते की त्याचे ऐकणे, पाहणे, बोलणे, वास्तवात परमेश्वराचे ऐकणे, पाहणे आणि बोलणे असते. त्यावेळेस त्याला अशी अनुभूती होते की परमेश्वराचे जीवनच वास्तविक त्याचे जीवन असते आणि परमेश्वराचे ज्ञानच त्याचे ज्ञान, परमेश्वराची इच्छाच त्याची इच्छा असते. परमेश्वराची शक्तीच त्याची शक्ती आणि तो जाणून घेतो की परमेश्वरातच्या गुणांमुळेच सर्व पदार्थ गुणधारी (गुणयुक्त) आहेत.

परंतु अशा प्रकारचे परिवर्तन साधकांमध्ये कसे घडून येते आणि का घडते? याचे स्पष्टीकरण करणे कठीण आहे. या संबंधात लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे की मुसलमान ही गोष्ट मानत नाहीत की परमेश्वराची सत्ता ('ज़ात') साधकामध्ये परिवर्तन घडवून आणते. याला ते 'हुलूल' म्हणजेच परकायाप्रवेश अर्थात एका आत्म्याचे दुसऱ्या शरीरामध्ये प्रवेश करणे किंवा देहांतरण असे म्हणतात. ते हे पण मानत नाहीत की मनुष्याच्या आणि परमेश्वराच्या स्वभावामध्ये सादृश्य घडून येते. याला ते 'इत्तिहाद' म्हणजेच एकत्व असे म्हणतात. परमेश्वराशी मीलनाच्या पूर्णावस्थेमध्ये साधकाची सत्ता आहे तशी राहते किंवा नाही? अधिकांश सूफ़ी ही गोष्ट मान्य करण्यास तयार नसतील की परमेश्वरामध्ये असताना पण एक वेगळी चेतन सत्ता राहू शकते. ते मानतात की जसे पावसाचे थेंब समुद्रामध्ये पडल्यावर ते नष्ट होत नाहीत, परंतु त्यांचे आपले वेगळे अस्तित्व नसते. अ-शरीरी आत्म्याच्या त्या सर्वव्यापक सत्तेशी तशाच प्रकारचे अभेद आहे.

हुजवीरीने म्हटले आहे की जे लोक असे समजतात की 'फ़ना'चा अर्थ सत्ता आणि या शरीराचे नष्ट होणे आहे, ते लोक चूक करतात. त्याचप्रमाणे असे पण समजणे चुकीचे आहे की 'बक़ा'च्या स्थितीमध्ये परमेश्वर मनुष्यामध्ये निवास करू लागतो. 'फ़ना'चा वास्तविक अर्थ असा आहे की आपल्या दोषांविषयी मनुष्य जागरूक होऊन जातो, आणि आपल्या इच्छेनुसार तो त्यापासून मुक्त होऊन जातो. जो कोणी आपल्या इच्छेनुसार,

क्षणिक लांब जातो तो परमेश्वराच्या नित्य इच्छेचा भाग बनून जातो. परमेश्वराचे गुण माणसाचे गुण बनून जातात, किंवा परमेश्वराचे गुण माणसामध्ये येतात, हे अत्यंत अशक्य आहे.

अल-सर्राजने पण असेच म्हटले आहे की काही लोक अन्नोदकाचा त्याग करून अशी आशा करतात की यामुळे मनुष्याचे शरीर अशक्त बनल्यामुळे त्यामध्ये परमेश्वराचे गुण येतात. त्याचे असे म्हणणे आहे की या सिद्धान्तास मानणारे लोक अज्ञानी आहेत. ते जीव आणि स्वाभाविक गुणधर्मामध्ये फरक करू शकत नाहीत. मनुष्य-धर्म हा मनुष्यापासून त्याच प्रकारे दूर होऊ शकत नाही ज्याप्रकारे काळ्या वस्तूपासून काळेपणा अथवा पांढऱ्या वस्तूपासून पांढरेपणा दूर होऊ शकत नाही. परंतु परम सत्याचे शक्तिशाली अपूर्व प्रकाश त्याच्यामध्ये बदल घडवून आणतो. म्हणून अल-सर्राजचे असे मत आहे की जे 'फ़ना'च्या सिद्धान्तास मानणारे आहेत त्यांचा अर्थ असा होतो की मनुष्य आपले कर्म सोडून ईश्वर चिंतन करतो. कारण की तोच या सर्व कर्मांचा कारण स्वरूप आहे, आणि तो आपल्या भक्तांसाठी सर्व काही करतो. अल-सर्राजने परमेश्वराची सत्ता ('ज़ात') आणि परमेश्वराचे गुण ('सिफ़ात') यांना वेगळे मानले आहे. आपल्या गुणांशी विभक्त होऊन परमेश्वराच्या गुणांमध्ये प्रविष्ट होणे याचा अर्थ त्यांनी असा सांगितला आहे की मनुष्य आपल्या इच्छा-शक्तीशी विभक्त होऊन परमेश्वराच्या इच्छा-शक्तीमध्ये प्रवेश करतो. कारण की साधक हे जाणून असतो की परमेश्वरच त्याच्या इच्छा-शक्तीचा कारण असतो, असे कल्पून तो ईश्वराप्रती आकृष्ट होतो. अल-सर्राजने दाखवून दिले आहे की साधकाच्या हृदयामध्ये परमेश्वर प्रवेश करीत नसतो, तर परमेश्वराविषयी साधकाचा विश्वास, त्याची श्रद्धा, परमेश्वराच्या 'एकत्वा'प्रती त्याची आस्था आणि परमेश्वराच्या नाम-स्मरणाप्रती श्रद्धेचाच त्याच्या हृदयामध्ये प्रवेश होते.

सूफ़ी साधक निफ़ारी यांनी असे दाखवून दिले आहे की परमेश्वरास शोधणारे भक्त किंवा साधक तीन प्रकारचे असतात. पहिले असतात उपासक. ते स्वर्गप्राप्तीच्या अभिलाषेकरिता उपासना करतात. दुसरे असतात धार्मिक तत्वत्त्वेत्ते आणि शास्त्रीय ज्ञान प्राप्त करणारे पंडित. ते परमेश्वराच्या ऐश्वर्यापासून परमेश्वराची ओळख करून घेतात. ते आटोकाट प्रयत्न करून सुद्धा परमेश्वराच्या विभूतीस प्राप्त करू शकत नाहीत. म्हणून परमेश्वरास ते अज्ञेय मानतात. तिसरे असतात ब्रह्मज्ञानी (आरिफ़). ते भावाविष्ट अवस्थेमध्ये परमेश्वराचे दर्शन करतात. आध्यात्मिक ज्ञान (मारिफ़) हे परमेश्वराच्या एकत्वतेचे बोध असते.

निफ़ारीने 'फ़ना' आणि 'फ़ानी' (क्षणभंगुर) या शब्दांऐवजी 'वाक़फ़त' आणि 'वाक़िफ़' हे शब्द वापरले आहेत. 'वाक़फ़त'शी त्याचा अभिप्राय आहे सर्व साधनांचा अन्त, आणि 'वाक़िफ़'चा अर्थ त्या साधकाशी आहे जो सर्व प्रकारच्या क्रिया-विधी आणि साधना (उपासने)पासून विभक्त होऊन जातो. 'वाक़फ़त' प्रकाशमान असते. आणि अंधारासारख्या असलेल्या भिन्नत्वाच्या भावनेस ते दूर करते. हे सर्व दृश्य वस्तूंना मूळ स्वरूपात आणि शाश्वत प्रकाशामध्ये आणणारे आहे. 'म्हणून 'वाक़िफ़' काळ आणि स्थळाच्या परिधीस अतिक्रमित करतो. आता तो प्रत्येक घरा (जीवा)मध्ये प्रवेश करतो. परंतु त्याच्यामध्ये तो स्वत:चा अटकाव करून घेत नाही, प्रत्येक कूपाचे पाणी पितो परंतु त्याची तृष्णा तृप्त होत नाही आणि तेव्हा तो माझ्या (परमेश्वरा)जवळ पोहोचतो. आणि मीच त्याचे घर (निवासस्थान) बनून जातो, आणि तो माझ्यातच राहू लागतो.' याचा अर्थ असा आहे की परमेश्वराच्या सर्व गुणांना तो ओळखू लागतो आणि सर्व प्रकारच्या

अनुभूतींचा तो ज्ञाता बनतो. तो फक्त नामोच्चारावरच संतुष्ट राहात नाही, परंतु ज्याचे नाव घेतले जाते त्याच्याच शोधात तो राहतो. तो परमेश्वराच्या सत्ते ('ज़ात')चे स्मरण करू लागतो. त्यामध्ये ध्यानमग्न होऊन जातो आणि त्यामध्ये आपल्या स्वरूपाचे सादृश्य प्राप्त करतो. तो आता प्रार्थना-उपासना करीत नाही. प्रार्थना मनुष्याची परमेश्वराप्रती असते, परंतु वाक़फ़तमध्ये मनुष्य कोठे आहे? तेथे तर परमेश्वराशिवाय काहीच (उरत) नाही. येथे साधक आणि साध्यामध्ये अभेद होऊन जाते. आणि 'वाक़फ़त' पासून 'वाक़िफ' जेव्हा अतीत होऊन जातो तेव्हा तो स्वत: प्रकाश-रूप बनून जातो. त्या वेळेस परमेश्वराचे ज्ञानच त्याचे ज्ञान असते, आणि जेव्हा तो परमेश्वराचे गुणगान करतो तेव्हा त्या गुणगानाचा उगम परमेश्वरच असतो. तो स्वत:सच (या स्वरूपात) पाहतो जसे की तो प्रारंभी होता.

काही सूफ़ी साधक असे मानतात की ही अवस्था मृत्यूनंतरची आहे. परंतु अधिकांश असे आहेत की जे इहलोकी याच जीवनामध्ये त्या अवस्थेस प्राप्त करण्याची गोष्ट करतात. येथे अशा दोन प्रकारच्या साधकांचे प्रसंग आम्ही देत आहोत की जिच्यामुळे 'फ़ना' आणि 'बक़ा'विषयी सूफ़ींच्या दृष्टिकोनाची कल्पना येईल. असे म्हणतात की 'फ़ना'च्या अवस्थेमध्ये इंद्रिय-जनित ज्ञान लुप्त होऊन जाते. सरी अल-सकती नावाच्या एका सुप्रसिद्ध साधकाने दाखवून दिले आहे की त्या अवस्थेमध्ये जर माणसावर तलवारीचा वार करण्यात आला तर ते त्यास माहित पडणार नाही. त्याला त्या वाराची अनुभूती येणार नाही. अबुल खैर-अल-अकताच्या पायामध्ये एक असा घाव होता जो सडून गेलेला होता. तत्कालीन वैद्यांनी पाय कापण्याचा सल्ला दिला. परंतु अल-अकतास हे मान्य नव्हते. ते शल्य चिकित्सेस तयार नव्हते. परंतु त्यांच्या शिष्यांच्या सल्ल्यानुसार ते प्रार्थने (नमाज़) मध्ये असताना त्यांचा पाय कापण्यात आला. त्यांची प्रार्थना संपल्यावर त्यांना कळून चुकले की त्यांचा तो पाय कापून टाकण्यात आलेला आहे. 'नफ़हात अल-उन्स' या आपल्या ग्रंथामध्ये प्रसिद्ध सूफ़ी साधक नुरूद्दीन अब्दुर्रहमान जामी यांनी प्रसिद्ध सूफ़ी संत शहाबुद्दीन सुहरावर्दी यांच्या एका शिष्याविषयी लिहिले आहे की, 'फ़ना'च्या टप्प्यावर परमेश्वराच्या 'एकत्वते'चे ध्यान करत तो 'हाल' (भावाविष्टा)च्या अवस्थेमध्ये होता. एके दिवशी तो रडू लागला आणि रडत रडत आपले दु:ख व्यक्त करू लागला. त्याच्या सद्गुरूंनी त्याला विचारले की तुझे काय दुखत आहे? तुला कसली यातना आहे? त्याने सांगितले की 'अनेकत्वा'च्या बाधेमुळे तो त्या 'एका' (परमेश्वरा)च्या दर्शनापासून वंचित झाला आहे. त्याची याचना नामंजूर करण्यात आली आहे, आणि तो पूर्वीच्या उल्हास अवस्थेस प्राप्त करू शकत नाही. सद्गुरूंनी त्याला सांगितले की ही 'बक़ा'च्या पूर्ववर्ती (अगोदर)ची अवस्था आहे आणि सध्याची अवस्था ही अगोदरच्या अवस्थेहून अधिक उच्च आणि उत्कृष्ट आहे.

वर ज्या अवस्थेच्या प्राप्तीची गोष्ट सांगण्यात आली आहे. त्यामध्ये त्या अवस्थेचे एक चित्र आहे जेव्हा साधक हा अतिशय साधनेनंतर भावाविष्ट अवस्थेस पोहोचतो, परमानंद अवस्था गाठतो. पुन्हा परमेश्वराच्या 'एकत्वा'चे ध्यान करत तो 'उल्हास' या अवस्थेमध्ये राहतो आणि संसारापासून त्याच्या संबंधाची ताटातूट होते. पुन्हा तो पुढे अग्रेसर होतो. जेव्हा त्याचा उल्हास आणि भावाविष्ट अवस्थेचे अस्थैर्य कमी होऊन जाते आणि त्याच्यामध्ये शांती येत जाते आणि तो 'बक़ा'च्या अवस्थेकडे अग्रेसर होत जातो. 'फ़ना'ची अवस्था पार पाडून तो 'बक़ा'च्या पर्यंत पोहोचतो. फ़नाच्या अवस्थेची सर्व लक्षणे हळूहळू अवसान पावतात. याच

'फ़ना'च्या अवस्थेचे तिरोभाव झाले आहे. आणि दुसरी अवस्था अद्याप येणे बाकी आहे तेव्हा उपरोक्त साधकास वाटले की त्याची साधना पूर्णपणे सफल झाली नाही आणि परमेश्वराने त्याला स्वीकारले नाही कारण की परमेश्वराच्या कृपेशिवाय काहीच शक्य नाही.

सूफ़ी साधक इब्नुल फ़रीद आणि अबू सईद इब्न अबील ख़ैर यांनी त्या साधकाविषयी सांगितले आहे, जो 'बक़ा'च्या अवस्थेस पोहोचलेला आहे. त्यांचे मत असे आहे की 'फ़ना'चे पूरक 'बक़ा' आहे. एकीकडे साधकाचे अस्तित्व, त्याचे आत्मभाव तिरोहित होते आणि दुसरीकडे वास्तविक आणि सर्वव्यापक सत्तेबरोबर त्याचा एकात्मभाव प्रस्थापित होतो. स्वात्म्याच्या मृत्यूची पूर्णाहुती परमेश्वरामध्ये शाश्वत जीवनाच्या प्राप्तीसोबत होते. जेथे त्याचे वास्तविक क्षणिक (क्षणभंगूर) जीवन समाप्त होते, तेथे त्याला वास्तविक जीवन प्राप्त होते. जीवनाच्या समाप्तीचा अर्थ 'अहं'काराचे तिरोहित होणे हे आहे. या शाश्वत जीवनामध्ये त्याचे मागील सर्व गुण पुन्हा प्राप्त होऊन जातात आणि ते सच्चे (खरे), विशुद्ध आणि दिव्य बनून प्राप्त होतात. अशा प्रकारचा साधक ज्याने या बक़ाची अवस्था प्राप्त केलेली आहे. आता केवळ 'एका'च्या चिंतनामध्ये सोल्हासपूर्ण उन्मत्त बनून राहात नाही आणि ना माणसाशी वेगळे होऊन संसार-त्यागी बनतो. अबू सईदचे म्हणणे आहे की खरा संत जगाच्या माणसांच्या दरम्यान येत जात असतो. त्यांच्यासह तो भोजन करतो, त्यांच्या सोबत झोपतो. बाजारामध्ये जाऊन खरेदी विक्री करतो. विवाह करतो आणि सामाजिक कार्यामध्ये भाग घेतो, परंतु एक क्षणभर सुद्धा परमेश्वराचे विस्मरण होऊ देत नाही.

अशा प्रकारे आपणास आढळून येते की सूफ़ींचे परम उद्दिष्ट परमेश्वराशी एकरूप होणे आहे आणि याला परम उद्दिष्ट मान्य करण्यामागे कुराणोक्त एक प्रसंग आहे ज्याची चर्चा सूफ़ी वारंवार करीत असतात आणि याबाबतीत त्यांचे आपले एक वेगळे भाष्य आहे. असे म्हटले जाते की सृष्टी निर्माण करण्याअगोदर परमेश्वराने त्या सर्व अशरीरी आत्म्यांना आपल्या समोर बोलावून घेतले की ज्यांना पृथ्वीतळावर निवास (रहावयाचे) करावयाचे होते आणि त्यांना म्हणाला की, ''काय मी तुमचा प्रभू नाही?'' प्रत्येक आत्म्याने उत्तर दिले 'होय' ७:१७२. आणि याचेच स्मरण सूफ़ी वारंवार करतात की त्याच परम सत्याचा शोध घेऊन त्याच्यापाशीच पोहोचणे आत्म्याचे उद्दिष्ट आहे. कारण की तेथेच पोचून तो शांती प्राप्त करील. आत्म्याचे परमात्माकडील यात्रेचे जे अनुभव आहेत आणि 'एकरूप' ('एकमेक') होण्याच्या अवस्थेची अनुभूती आहे त्याचे वर्णन सूफ़ी-साधक भावाविष्ट अवस्थेमध्ये करतात.

**शाश्वत जीवनाकडे वाटचाल**

'फ़ना' आणि 'बक़ा'च्या उपरोक्त चर्चेवरून ही गोष्ट चाळून चाळून समोर येते की सूफ़ींपाशी शाश्वत जीवनामधील सुख-शांतीची प्राप्तीच त्यांचे परम उद्दिष्ट आहे. 'फ़ना' आणि 'बक़ा'च्या पाठीमागे जो भाव (आशय) कार्यरत आहे, तो याचेच द्योतक आहे. पवित्र कुराणमध्ये आहे -

''यद्यपी परलोक (म्हणजेच पारलौकिक जीवन) (त्यापेक्षा) अधिक उत्तम व चिरंतन आहे.'' - ८७:१७. या जीवनाचे स्मरण कुराणाने अनेक शब्दांनी केले आहे. -

''आणि ज्यांचे चेहरे (आनंदाने) चमकत असतील, ते अल्लाहच्या कृपाछत्राखाली असतील, तिथेच ते सदैव राहतील.'' - ३:१०७.

''कदाचित आमचा विधाता यांच्याऐवजी यांच्यापेक्षा चांगली (बाग) देईल, आम्ही विनम्र होऊन आमच्या विधात्याची विनवणी करतो.'' - ६८:३२.

''खरोखर सदाचरणी लोकांसाठी त्यांच्या विधात्याकडे सुखसमृद्धीची नंदनवने आहेत.'' - ६८:३४.

''यानंतरचे जीवन तुमच्यासाठी या जीवनापेक्षा (कित्येक पटीने) अधिक चांगले असणार, यात शंकाच नाही.'' - ९३:४.

''पण तुम्ही (लोक) याच जगातील जीवनाला प्राधान्य देता. पण यानंतरचे जीवन यापेक्षा उत्तम व कायमस्वरूपी आहे.'' - ८७:१६-१७.

''तेव्हा ज्याच्या चांगल्या कर्माचे पारडे जड असेल, त्यास सर्वसुखसंपन्न जीवन लाभेल.'' - १०१:६-७.

कुराण हे पण स्पष्ट करते की हे जीवन शाश्वत जीवन असेल, अमर, नित्य राहणारे. पवित्र कुराणाच्या शब्दांमध्ये-

''पहिला मृत्यू (जो ते इहलोकी चाखून चुकलेले) त्या शिवाय तेथे त्यांना मृत्यूचा (कटू स्वाद) चाखावाच लागणार नाही.'' - ४४:५६.

या शाश्वत जीवनाची सफलता सूफ़ी ईश्वराची प्रसन्नता प्राप्त करण्यामध्ये असल्याचे मानतात आणि ते आपले संपूर्ण आयुष्य या उद्देश्य प्राप्तीमध्ये खर्च करतात. या शाश्वत जीवनाची रूपरेषा पहा.

''आणि (त्या दिवशी) स्वर्ग सदाचारी (ईश-भिरू) लोकांच्याजवळ आणले जाईल. त्याच्यापासून फार दूर नसेल. (त्यांना सांगितले जाईल, हाच तो (स्वर्ग) आहे. ज्याचे वचन तुम्हाला दिले जात आहे, हे त्या प्रत्येकाचे ठिकाण आहे, ज्याला नेहमी अल्लाहची ओढ असायची आणि मनात नेहमी (अल्लाहचीच) आठवण असायची. तो (प्रत्येक माणूस) जे कृपावंत (अल्लाहप्रती) त्याला न पाहूनही भीतीयुक्त आदर बाळगायचा आणि (आज) पश्चातापाची भावना बाळगून असलेल्या अंत:करणासह त्याच्याकडे आला. तर आता (सदैव) शांतीसह स्वर्गात प्रवेश करा. हा तो दिवस आहे, जिथून अनंतकालीन (सुखी) जीवनाची सुरुवात होत आहे. तिथे त्यांच्यासाठी ते सर्व काही असेल जे ते इच्छितील. आणि (त्यांना देण्यासाठी) आमच्याकडे आणखी खूप काही आहे.''- ५०:३१-३५.

कुराणातील स्वर्ग व पुनरूज्जीवन यासंबंधीच्या शिकवणीचा अर्थ सूफ़ी पंथियांनी केवळ माणसांच्या नव्हे तर त्याच्या संपूर्ण अहं-केंद्रिततेचा विनाश (फ़ना) आणि ईश्वराची कार्ये, गुण किंवा त्याच्या 'स्व'त्वाशी सायुज्जता पावलेले सतत्व (बक़ा) या परिभाषेत लावला आहे.

### (२) 'फना' व 'बक़ा' - दार्शनिक दृष्टिकोन[७३]

'फ़ना'चा शब्दश: अर्थ आहे एखाद्या पदार्थाची अशाश्वत अवस्था. म्हणजेच शाश्वतीची स्थिती समाप्त होते. तेव्हा ते पदार्थ फ़नास पोहोचले असे म्हटले जाते. जग हे फक्त फ़नाच्या अवस्थेस पोहोचेल; आणि बाकी जीवन बक़ामध्ये सुरक्षित राहील. ''वल् आख़िरतु ख़ैरून् व अबक़.'' फ़नाचा विचार एक गुण स्वरूपात करण्यात येत नाही. पाण्यामध्ये ज्याप्रमाणे साखर विरघळते त्याप्रमाणे ते एक विलय नाही. 'कश्फ़ुल महजूब' (पृ. २६२)चा ग्रंथकर्ता असे विचार मांडतो की फ़ना हे सत्त्वाचे अभाव नसते, ते सारतत्त्वाचे विलय नसते. नसलेल्याचे अस्तित्वात येणे, उदयास येणे म्हणजे बक़ा आणि नंतर ते फ़ना होत नाही, जसे स्वर्ग आणि नरक.

ते पूर्वी अस्तित्वात नसलेले पण नव्हे, आणि ईश्वराच्या सत्त्वासारखे नंतर अस्तित्वहीन होणार नाही. मुस्लिम शास्त्र प्रामाण्यवादी (पंडिती) ईश्वरशास्त्रज्ञ असे मानतात की एखाद्या वस्तूचे गुणांचे शून्य बनण्याच्या प्रक्रियेस फ़ना म्हणता येईल; आणि बक़ा म्हणजे त्याच गुणांची चिरंतनता. सूफ़ीसाठी मात्र आपल्या स्वतःच्या गुणांची जाणीव नसण्याचे नाव फ़ना आहे; आणि ईश्वराचे गुण स्वरूपात तिच्या मान्यतेचे नाव बक़ा आहे. साधका (भक्ता)स आपल्या आत्म्याची जाणीव नसते, म्हणजेच त्याचा आत्मा हा त्याच्यासाठी नसतो; परंतु त्याला फक्त प्रदर्शनकारी, प्रदर्शित आणि प्रदर्शन किंवा आविष्कारकर्ता, आविष्कृत आणि आविष्करण यांची जाणीव असते. जोपर्यंत तुम्ही स्वतःस पाहता तोपर्यंत ईश्वर दृष्टीआड असतो, आणि जेव्हा तो तुमच्या दृष्टीक्षेपात असतो तेव्हा तुम्ही दृष्टीआड होता. एक उदाहरण घ्या, जेव्हा तुम्ही शब्दांवर लक्ष केंद्रित करता, तेव्हा तुमची दृष्टी शाईपासून ढळते, आणि जेव्हा तुम्ही शाईवर लक्ष केंद्रित करता, तेव्हा तुम्ही शब्दांना दृष्टीआड करता. कडप्पामधील गुर्रूमकुंडा येथील एक सूफ़ी कवी शाह कमाल म्हणाले होते :

''ज़ात व सिफ़ात मेरे ज़ात व सिफ़ात उनके
बंदे में और खुदा में निस्बत इसे कहते हैं ।''

म्हणजेच माझी नाम-रूपे ही त्याची नाम-रूपे आहेत. हाच तर भक्त (साधक) आणि ईश्वर यांच्यामधील संबंध आहे. ब्रह्मज्ञान्या ('अरिफ़')च्या चेतनेमध्ये **संभाव्यतेची** सार्थकता नाहीशी होते; अर्थात त्याचे पार्थिव शरीर नव्हे. काही असे काळजीपूर्वक विचार करतात की प्रत्यक्ष वस्तूच्या भौतिकतेचा विनाश होत नसतो; तर फ़ना म्हणजे ज्ञानामध्ये एखाद्या वस्तूचे विलुप्त होणे होय. इतर असा विचार करतात की ते दृष्टीआड होऊन जाते - दृष्टीपासून लुप्त होते.

इतर काही असेही पण विचार करणारे आहेत की फ़ना म्हणजे परमेश्वराच्या आत्म्यामध्ये साधका (माणसा)च्या आत्म्याचे म्हणजेच अहंकाराचे लोप होऊन जाण्याचे नाव आहे. फ़नामध्ये साधक (सेवक) ईश्वराच्या तन्मात्रा वा मर्यादा स्वरूपात या मर्यादा वा तन्मात्रा स्वरूपात गाठतो आणि तो आपली 'अहंता' सर्वत्र पसरवतो. बक़ामध्ये ईश्वराची चेतना ही साधका (सेवका)च्या चेतनेच्या मुळाशी असते. सुप्रसिद्ध फ़ारसी गूढवादी कवी जलालुद्दीन रूमी म्हणतो :

*''सूफ़ीच्या चेतनेमध्ये ईश्वराची चेतना हरवून जाते - लुप्त होते,*
*सर्वसामान्य लोक यावर कसा विश्वास ठेवतील!*
*सूफ़ीचे ज्ञान रेषा असते आणि ईश्वराचे ज्ञान बिंदू.*
*एखाद्या रेषेचे अस्तित्व हे बिंदूच्या अस्तित्वावर निर्भर असते.''*

(अर्थात रेषा ही बिंदूपासूनच बनते.)

अशा प्रकारे सूफ़ी हा आपल्या आत्म्याचा विनाश पाहतो; आणि तो स्वतःस चिरंतन आत्म्याविना समजतो. हे लौकिक - ऐहिक संवित् अर्थात चेतना आहे. याला कुराणने 'मक़ाम-ए-महमूद' म्हणजेच प्रसंशित अभिचरण किंवा स्तब्ध स्थळ वा स्तुत्य स्थान म्हणून संबोधले आहे. हे प्रेषित मुहम्मद यांच्यासाठी राखीव आहे. येथूनच ते अंतिम न्याय दिवशी आपल्या धर्मप्रजेसाठी - वास्तविक मानव जातीसाठी (मुक्तीकरिता) मध्यस्थी करतील. ''नवल नव्हे की तुझा पालनकर्ता (पुनरुत्थानाच्या दिवशी - मरणोत्तर जीवनात) अत्यंत

प्रशंसनिय अशा प्रतिष्ठित स्थळी पोहोचवील.'' - १७:७९. ('रब्बुक मक़ामम् महमूदन्' - १७:७९)

ऱ्हाइनलँड येथील चौदाव्या शतकामधील गूढवादी संत बर्नार्ड याने ईश्वराच्या अंत:करणाच्या मदतीने आपल्या विचारांना ओळखले. जर्मनीच्या ख्रिश्चन गूढवाद्यांच्या मते निर्वाण म्हणजे साधका (सेवका)च्या सत्तेचे विनाश करणे नव्हे; परंतु दिव्यत्वामध्ये मानवी पैलूचे विलय करणे आहे. असे म्हटले जाते की 'ख़िलाफ़त' म्हणजेच उत्तराधिकारी निवडण्याच्या वेळेस, सर्वप्रथम 'फ़ना' आणि 'बक़ा' या प्रश्नाच्या (सुयोग्य) उत्तराचा आधार घेण्यात आला होता.

प्रेषित मुहम्मद[स.] यांचे महापरिनिर्वाण झाल्याचे जेव्हा घोषित करण्यात आले, तेव्हा सक़ीफ़ बनी साइदा येथे लोक एकत्र जमा झाले, आणि मग ते प्रेषितांचे मावसभाऊ आणि जावई (त्यांच्या प्रिय सुकन्या फ़ातिमा यांचे नवरे) अली यांच्याकडे गेले, आणि म्हणाले, ''साक्षात्काराबद्दल तुमचे काय मत आहे?'' ते म्हणाले : ''मी जग पहात नाही. परंतु मी फक्त परमेश्वर पाहतो.'' म्हणजेच मला जग दिसत नसून, फक्त परमेश्वरच दिसतो. ('मा रैतु शयन् इल्ला रैतुल्लाह्') मग ते त्यांचे दुसरे जावई उस्मान यांच्याकडे गेले आणि तोच प्रश्न विचारला. त्यांनी उत्तर दिले : ''मला जग दिसत नाही, परंतु त्यास अनुसरून ईश्वर दिसतो (पाहतो).'' (''मा रैतु शयन् इल्ला रैतुल्लाह् ह बदबु'') नंतर ते उमर यांच्याकडे जाऊन त्यांच्यासमोर तोच प्रश्न ठेवला. ते म्हणाले : ''मी जग पहात नाही, तत्पूर्वी मला ईश्वर दिसतो.'' (''मा रैतु शयन् इल्ला रैतुल्लाह् ह कुब्लहु''). मग शेवटी ते अबू बक्र यांच्याकडे गेले. त्यांना पण तोच प्रश्न विचारला. त्यांनी उत्तर दिले : मी जग पहात नाही, परंतु त्याच्यासोबतच परमेश्वरास पाहतो. (''मा रैतु शयन् इल्ला रैतुल्लाह् ह म अहु'') प्रेषितांच्या महापरिनिर्वाणाच्या वेळी अंदाजे १,४४,००० सहचर होते. (ह्यूजेसकृत 'डिक्शनरी ऑफ़ इस्लाम'मधील 'अस्हाब' या प्रविष्टीप्रमाणे). या चारींचे उत्तर ऐकून त्या मतदारसंघाने असा विचार केला की जरी अली यांचे साक्षात्कार अत्यंत परिपूर्ण असे होते, तरी पण राजशकट चालविण्यासाठी ते अत्यंत कठीण असे होते, आणि म्हणून अबू बक्र यांच्या समतोल उत्तरामुळे त्यांनी अबू बक्र यांची प्रथम 'ख़लीफ़ा' म्हणजेच उत्तराधिकारी म्हणून निवड केली. कारण त्यांच्या दृष्टीमध्ये एकाच वेळेस प्रभू ('रब्ब') आणि सेवक म्हणजेच भक्त वा साधक ('अब्द') हे दोन्ही होते.

'फ़ना'मध्ये 'अब्द' म्हणजेच साधक भक्ताची नाम-रूपे आणि कर्म हे ईश्वराची नाम-रूपे आणि कर्म बनतात. 'उपाधी' ('मा सिवाल्ला') म्हणजेच ईश्वरा व्यतिरिक्त इतर सर्वांची चेतना साधका-भक्तास म्हणजेच 'अब्द' नसते. ईश्वर हा कर्ता बनतो, तर 'अब्द' हा त्याचे साधन वा कारणत्व ('कुर्ब-ए-फ़राइज़') बनतो. प्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ कवी जलालुद्दीन रूमी यांनी ही बाब एका रूपकामध्ये अशी बांधली आहे :

(प्रेषित) नूह आपल्या राष्ट्रबांधवाना म्हणाले, ''मी, मी नव्हे''
मी नाही(च), ईश्वरच चिरंतन आहे.
मानवी संवेदनेपासून जेव्हा अहंता गळून पडते,
तेव्हा ईश्वरच बोलू लागतो, ऐकू लागतो आणि उमजू लागतो
जेव्हा ममत्व अहंता नसते, तेव्हा अहं हा ईश्वराचा श्वास असतो
एखाद्याची अहंता त्याच्याशी जोडणे म्हणजे एक पापकर्म होय.

याच्या व्यत्यासी प्रक्रियेमध्ये 'अब्द' (साधक) हा कर्ता बनतो; आणि ईश्वर हा त्याचे साधन बनतो. या प्रक्रियेस 'कुर्ब-ए-नवाफ़िल' असे म्हणतात – माझ्या माध्यमाने तो ऐकतो आणि माझ्या माध्यमातून तो पाहतो. जे दृश्य जगास पाहतात आणि सत्य हे त्यांच्यासाठी अदृश्य असते, अशा लोकांना विवेकी ('ज़ाविल-अक्ल')जन असे म्हणतात; आणि जे सत्यास दृश्य स्वरूपात पाहतात आणि जगास अदृश्य जाणतात, अशा लोकांना द्रष्टे ('ज़ाविलैन') लोक असे म्हणतात. फ़नाचे दोन प्रकार असल्याचे मानतात – पहिले, सत्त्वाची फ़ना जसे, हिम अथवा गारांचे पाण्यामध्ये रूपांतरण आणि दुसरे, गुणांची फ़ना जसे, अग्नीमध्ये जाळला जाणारा तंतोतंत अग्नीसारखा लालभडक लोखंड. पहिल्या उदाहरणामध्ये, अब्द हा तोच (ईश्वर) बनतो (''हु-हु''); तोच दुसऱ्यामध्ये, तो त्याच्या सारखा बनतो (''का अन्न हु-हु''). 'ज़ात' म्हणजेच सत्तेमधील पहिली फ़ना ही प्रेषित मुहम्मद यांचा अधिकार असतो, हा अधिकार इतर कोणासही नसतो; कारण की मुहम्मदाची सत्ता ही ईश्वराचे स्वत:विषयी प्रथम बोध होते – पहिली जाणीव होती. हे फक्त चेतनेच्या एका अवस्थेचे नाव नव्हे. बाय़जीद बिस्तामी यांनी म्हटले आहे की प्रत्येकाची (साधकाची) आपली तंद्रा – अवस्था असते. ('हाल') वा तंद्रा ही विचाराची परिणती असते. नरोत्तम किंवा पुरुषोत्तम हा विचारांच्या अधीन नसतो. त्याच्याकडे वास्तवाचे प्रकाश असते. त्याचे मन:चक्षू उघडे असतात, आणि तो प्रदीप्त, सुस्पष्ट प्रखर प्रकाशित असतो; आणि म्हणून बक़ा ही केवळ भाव-समाधीची किंवा सहजानंदाची फलनिष्पत्ती नसते. फ़ना अनेक प्रकारांनी साध्य होते. सर्वप्रथम, ईश्वराकडून आकर्षण (सुरू) असते. पवित्र कुराण म्हणते – ''इहलोक व परलोकामध्ये (साधकाने) अनुसरलेल्या सद्गुणांच्या सम प्रमाणातच परमेश्वरापासूनची ओढ (आकर्षण) असते.'' याचाच अर्थ असा की, परमेश्वर अनुग्रहपूर्वक आध्यात्मिक ज्ञान ('मारिफ़') त्यालाच देतो, ज्याला त्याने यास योग्य बनविले आहे. परमेश्वराच्या कृपेने प्राप्त ज्ञानाच्या बळावरच साधकास परमेश्वराचे दर्शन घडते आणि अशा प्रकारे त्याच्याशी साक्षात्कार करत तो परमेश्वराशी एकरूप होऊन जातो. एक हदीस (प्रेषित-वचन) आहे : ''माझ्यासाठी ईश्वरापाशी एक ख़ास वेळ असतो, की जेव्हा ना अत्यंत जवळचे देवदूत सोबत असतात ना पाठवले गेलेले (इतर) प्रेषित मजबरोबर असतात.'' ईश्वराकडील ओढ (आकर्षण) आणि त्याच्याशी तल्लीनतेमुळे निष्पन्न अर्थास अभिव्यक्त करण्यासाठी फ़ना हा शब्द अबू सईद अहरार यांनी वापरला आहे.

सूफ़ीचा आध्यात्मिक प्रवास 'फ़ना' पासून सुरू होतो व 'बक़ा' ही त्या प्रवासाची शेवटची मजल असते. 'फ़ना' – 'सैर-ए-इल्लल्लाह'चा शेवट आहे; तर 'बक़ा' 'सैर-ए-फ़िल्लल्लाह'चा प्रारंभ. हे संदेष्ट्याचे (नबी)चे स्थळ आहे. ती व्यक्ती 'फ़ानी' होते – विलय पावते – विषमतेपासून आणि 'बाक़ी' म्हणजेच कायम-शेष राहते समतेमध्ये.

दुसरे असे की, विधी-विधान-धारांच्या परिपालनामुळे ('अहकाम-ए-शरीअत') याची जाणीव होते. प्रभू आणि त्याचा भक्त या दोहोंमधील संबंध निर्धारण हे शरीअतचे अंतरंग आहे. त्याचेच बहिरंग हे विशिष्ट शारीरिक कृतींचा सराव आणि त्यांचा निर्वाह, हा आहे. म्हणजेच ध्यान-योग, जप-जाप्य, उपासना (नमाज पडणे) 'समा', 'रक्स़' इत्यादींमध्ये नियमानुसार करण्यात येणाऱ्या शारीरिक क्रिया व अंगविक्षेप. राजनिष्ठा हे जीवनाचे सर्वोच्च श्रेय, नि:श्रेयस असते. एखाद्या व्यक्तीचे शारीरिक जीवन किंवा एखाद्या समुदायाचे सामूहिक जीवन यांना पण निष्ठा बाळगावी लागते व पाळावी लागते. निष्ठा प्रस्थापित झाल्यानंतर ती टिकवली पण

पाहिजे. नाही तर, उपयोगात न आणल्यामुळे, तिची शक्ती आणि ओज कमी होऊन जाईल. सुसंगठित जग निर्मितीमध्ये उपयोग आणि अनुपयोग हे दोन घटक अत्यंत महत्वपूर्ण ठरलेले आहेत. चार्लस् डार्विन याने असे मत नोंदविले आहे की, उपयोग आणि अनुपयोगच्या प्रक्रियेमुळे नवीन प्रजाती उत्क्रांतीत झाल्या आणि जुन्या प्रजाती नष्ट झाल्या. त्याचप्रमाणे एखादी भावना जोपासणे, सशक्त बनविणे आणि तिला परिपूर्ण करण्यामध्ये उपयोग आणि अनुपयोग यांची महत्त्वपूर्ण अशी भूमिका राहिली आहे. काही विशिष्ट कर्मांच्या साहाय्याने एकेश्वरवादाची संकल्पना बळकट करता येऊ शकते. ही कर्मे म्हणजे इस्लामची विधी–आज्ञा होत. सर्व मुसलमानांकरिता या अनिवार्य आहेत. मानवी स्वभाव पाहता ही कर्मे कधीच सोडता येण्यासारखी नाहीत. तथापि विशेषज्ञ, दक्ष मंडळींनी ईश्वर–ज्ञान–प्राप्तीच्या सोप्या युक्ती शोधल्या आहेत. (पृथ्वीतलावर) जितकी म्हणून माणसे आहेत तेवढेच (अनेक) मार्ग ईश्वराकडे घेऊन जाणारे आहेत.

बाह्य देखाव्याचा तिरस्कार करणारे अनिर्बंध स्वच्छंद मनमौजी सूफ़ींचा अपवाद वगळता सर्वजण विधी–विधानांचे परिपालन करतात आणि समस्त प्रेषितांमध्ये आस्था विश्वास ठेवतात. एक सद्गुरू हा धर्माच्या विधी–आज्ञा तंतोतंत पाळणारा असतो. शिवाय तो आपल्या सोप्या युक्ती पण अंमलात आणतो. ही युक्ती किंवा पद्धती साधना ('सुलूक', यात्रा) म्हणून ओळखली जाते. अधोमुखी वृत्तांशावरील ओघ हा 'तनज़ुलात–ए–सित्ता' (सहा अधोमुखी टप्पे) म्हणजेच 'प्रसर्जन सिद्धान्त' किंवा 'उपपत्ती सिद्धान्त' आहे. ती ईश्वराची 'अब्द' म्हणजे भक्ता–सेवकाकडे प्रयाण यात्रा असते. समुद्राचे थेंबाकडे प्रयाण असते. तिच्याशी सुसंगत अशी 'अब्द' म्हणजे भक्ता–सेवकाचा ऊर्ध्वमुखी वृत्तांशावरील ओघ हा त्याचा 'सुलूक' म्हणजे त्याची साधना असते. ती भक्ताची ईश्वराकडे प्रयाण यात्रा असते; थेंबाचे समुद्राकडील प्रयाण असते. सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ सूफ़ी साधक व 'इन्सान–ए–कामिल' या ग्रंथाचे ग्रंथकर्ते सय्यद अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली यांच्या मते 'प्रसर्जन सिद्धान्ताचे' चार टप्पे असतात.

**१) पहिला टप्पा : सफ़र–उल्लाह –** हा टप्पा म्हणजे साधकाचे ज्ञानाकडे प्रयाण होय. हा प्रवास किंवा यात्रा दुष्टता किंवा पातकीपणापासून सुरू होऊन आज्ञाधारकपणा, नम्रता व शरणागतीकडे वळतो व मग कर्मकांडांकडे प्रवृत्त होतो.

**२) दुसरा टप्पा : सफ़र–इल'ल्लाह –** हा प्रवास बेसावधगिरीपासून सुरू होऊन ईश्वर नामस्मरणाकडे अग्रेसर होतो अथवा (कैसरी यांच्या मतान्वये) साधक एक आविष्करण असलेल्या 'इस्म' अर्थात नामाची पुनरावृत्ती.

**३) तिसरा टप्पा : सफ़र–फ़िल्लाह –** ईश्वराच्या नाम–रूपांच्या (सत्ता आणि गुण) दिशेने साधकाची परतीची यात्रा.

**४) चौथा टप्पा : सफ़र–बिल्लाह –** जेव्हा साधक (यात्री) हा शिखरावर पोहोचतो, तेव्हा तो जगामध्ये सुधारणा करण्यासाठी व प्रबोधन घडवून आणण्यासाठी ईश्वरी गुणांसह सगळ्यात खालच्या थरावर पुन्हा येतो.

तो नरोत्तम किंवा पुरुषोत्तम आहे जो, प्रभुत्व असतानासुद्धा आपल्या परिपूर्णतेने एका गुलामाचे काम करतो.

सफ़र-इल'ल्लाहमध्ये साधक हा फ़नास पोहोचतो आणि सफ़र-फ़िल्लाहमध्ये, तो बक़ास पोहोचतो. पहिल्यामध्ये तो 'इस्म'मध्ये विलीन होऊन जातो. तो त्या 'इस्म'चे एक आविष्करण असतो. दुसऱ्यामध्ये तो त्या 'इस्म' (नामा)मध्ये चिरस्थायित्व प्राप्त करतो. तथापि प्रेषित मुहम्मद स. यांनी वैभव, प्रतापास परत आणले की ज्यापासून ते प्रत्यक्षपणे अभिव्यक्त झाले होते.

सफ़र-इल'ल्लाहमध्ये साधक हा अजून मर्यादित स्वरूपात असतो. म्हणजेच तो अद्याप साधकच असतो. त्याने फक्त या गोष्टीचा स्वीकार केलेला आहे की अल्लाहशिवाय कोणाचेच अस्तित्व नाही. सफ़र-फ़िल्लाहमध्ये त्याच्यासमोर निसर्गाची गुह्ये ही सुस्पष्ट, पारदर्शक असतात. तो ब्रह्मलीन, ब्रह्मीभूत ('मज़ज़ूब') बनतो. सफ़र-इल'ल्लाहचा शेवट म्हणजे 'फ़ना'; आणि 'बक़ा' म्हणजे सफ़र फ़िल्लाहचा प्रारंभ होय.

उपरोक्त यात्रांचे विवेचन काही विद्वानांनी पुढील प्रमाणे केलेले आहे – काही विद्वानांनी सूफ़ींच्या तीन यात्रा मानून त्यांचे स्पष्टीकरण अशा रीतीने केले आहे :

**१) सैर इल'ल्लाह** म्हणजेच ही परमेश्वराकडील यात्रा असते. या यात्रेमध्ये साधक हा इहलोक सोडून परलोकी पोहोचतो. असे परमेश्वराच्या आदेशामुळे घडते. यामध्ये साधक हा 'वाहिदियत' आणि 'वहदत'चे टप्पे पार करतो. या यात्रेचा शेवट 'हक़ीक़ते मुहम्मदिया'मध्ये होतो.

सैर इल'ल्लाहमध्ये साधक हा मानसोपचार करून रोगमुक्त झाला. ज़िक्र अर्थात नामस्मरण आणि शुग़्ल म्हणजे क्रिया-विधी संपन्न करून निर्माण कार्य सुरू केले, इथपर्यंत की 'ज़िक्र'च्या ज्योतीमुळे तो झगमगून उठला, संकटाचे निवारण झाले, मन शुद्ध बनले, दुश्चरित्र समाप्त झाले, सच्चरित्र विकसित झाले, सत्कर्माची गोडी स्वभाव बनली आणि अल्लाहशी संबंध कायम झाले. ही आहे सैर इल'ल्लाह.

**२) सैर फ़िल्लाह** म्हणजे परमात्मामध्ये यात्रा. यामध्ये साधक हा परमेश्वराच्या सत्ते (ज़ात)मध्ये लय होऊन जातो, विलीन होतो. हा 'अहदियत'चा टप्पा आहे. अल्लाहची सत्ता आणि त्याच्या गुणाचे यथायोग्य उद्घाटन म्हणजेच आविष्करण होते. अल्लाहशी साधकाचा संबंध दृढ पासून दृढतर होतो. जीवन रहस्यमय बनून जाते. ही असीम अवस्था आहे. एका फ़ारसी कवीने ही गोष्ट अशी मांडली आहे –

*''बहरेस्त बहरे इश्क़ कि हेचश किनारा नीस्त,*
*ईंजा जजार्यी कि जां बसपारन्द चारा नीस्त।''*

अर्थात प्रेमाचा समुद्र हा असा समुद्र आहे की ज्याला किनारा नाही. येथे प्राण समर्पण केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही.

**३) सैर अनि'ल्लाह** या यात्रेमध्ये साधक परमेश्वराच्या गुणांनी विभूषित होऊन अभिव्यक्त होणाऱ्या जगामध्ये परत फिरतो. ही 'फना' नंतरची 'बक़ा' अवस्था आहे. 'लया'नंतरची 'स्थिती'ची अवस्था आहे. म्हणजेच विलयानंतची स्थितीची यात्रा आहे.

भारतीय तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून सूफ़ींच्या उपरोक्त तीन यात्रांना पुढील शब्दांत मांडता येईल. – अद्वैत सूफ़ी साहित्यामध्ये परमेश्वराच्या तीन यात्रांचे विवरण प्राप्त होते. त्यांपैकी पहिली यात्रा आहे – परमेश्वरापासून बहिर्मुख झाल्यानंतर अविद्येच्या अविलंबनाने जीवभाव धारण करून मानवी भावाच्या प्राप्तीपर्यंत. दुसरी यात्रा आहे – मनुष्य भावामध्ये ज्ञानप्राप्तीद्वारे अविद्येस सारून (हटवून) पुन्हा सचेतन भावाच्या सहाय्याने निज-भाव

किंवा परमात्म भावाची प्राप्ती आणि सोऽहं स्वरूपामध्ये आपल्या बोधस्वरूपाचे संपूर्ण परिचय प्राप्त होण्यापर्यंत पहिली यात्रा ही अज्ञानाची यात्रा आहे, तर दुसरी ज्ञानाची. परमेश्वर अज्ञान ग्रहण करतो, जीवभाव धारण करतो आणि शेवटी मनुष्य देह धारण करतो. याचा एकमात्र उद्देश आहे – चैतन्याचा विकास-संपादन. त्यासाठी देहधारण आणि त्याचा क्रम-विकास आवश्यक आहे.

थोडक्यात एक यात्रा आहे – ज्यामध्ये भगवतसत्ता ही आपल्या स्वरूपापासून बाहेर निघते. दुसरी आहे – ज्यामध्ये सत्ता बाहेरून अंतर्मुख होऊन आपल्या स्वरूपामध्ये प्रवेश करते. या प्रवेशानंतर पण त्या स्वरूपामध्ये आतल्या आत जी परम अव्यक्तकडील यात्रा असते, तिलाच ही तिसरी यात्रा समजावे.

शत्तारी संप्रदायाच्या मतान्वये, सालिक हा स्वत:च्या ज्ञानामध्ये अवरोहित होतो. येथे त्यांच्या बाबतीत आत्म्याचा निर्वाण (विनाश) होत नाही. 'फ़क्र' हा 'फ़ना'साठी दुसरा शब्द आहे. प्रेषित म्हणाले होते, ''निरासक्ती माझा अभिमान आहे'' आणि ते माझ्यापासून आहे. ते आणखी म्हणाले की इहलोक आणि परलोक या दोन्ही जगांमध्ये तोंड काळे करण्याचे नाव 'फ़क्र' म्हणजेच निरासक्ती आहे. म्हणजेच चेहऱ्यावर काळे फासल्यानंतर ते ओळखू येत नाही. म्हणून एक 'फ़कीर' निरासक्त हा 'फ़ानी' (विनष्ट, निर्वाणप्राप्त)शी समानार्थ असतो. तथापि काही जण पहिली 'सफ़र' गाळतात. (वगळतात.) कैसरी यांनी इब्न-अरबीच्या 'फ़सूस-उल्-हिकम' (फ़सी आदम) या ग्रंथाच्या भाष्यामध्ये फक्त शेवटच्या तीन टप्प्यांचा उल्लेख केला आहे. त्यांपैकी पहिले दोन सोपान उर्ध्वगामी आहेत, तर शेवटचे हे अधोगामी आहे.

अकस्मात भाव-समाधी किंवा तंद्रेमध्ये मग्न होणारे जर्मनीमधील गॉर्लिझचे चर्मकार गूढवादी जेकब बेहमेन आणि संत पॉल यांच्याप्रमाणे, ही यात्रा करत असताना काही साधक अकस्मात उत्कर्ष अवस्थेस पोहोचून अत्यानंदामध्ये डुंबून जातात. मध्ययुगीन गूढवाद हा पॅरिस येथील संत व्हिक्टर संप्रदायाचे ह्यूगोप्रणीत वचनामृताशी संयुक्त झालेला होता. त्याचप्रमाणे इस्लामचा सूफ़ीवाद हा अबू हामिद इमाम अल्-ग़ज़ाली 'हुज्जतुल इस्लाम'च्या 'इल्म-ए-कलाम' म्हणजेच तर्कशास्त्र किंवा मीमांसा विज्ञानाशी जुडलेला होता. ह्यूगो याने मानवी मन:शक्तीचे त्रिविध विभाजन प्रस्तुत केले आहे – (१) ज्ञान, (२) ध्यान (चिंतन) आणि (३) धारणा, यांना क्रमशः 'मुजाहदा', 'मुराक़बा' आणि 'मुशाहदा' या सूफ़ी शब्दावलीमध्ये मांडता येईल. आपल्या उत्कर्षाच्या सर्वोच्च दर्जावर, मानव हा सर्वांमध्ये ईश्वराचे दर्शन करतो. संत व्हिक्टर संप्रदायाच्या रिचर्ड याने चिंतन, मननाचे सहा टप्पे सांगितले आहेत – दोन दृश्य, दोन अदृश्य आणि दोन दैवी (दिव्य). सूफ़ी आपल्या ऊर्ध्वमुखी ओघामध्ये चार टप्पे मानतात. प्रथम, त्याच्या निरीक्षणामध्ये असे येते की सर्व वस्तू (पदार्थ) ईश्वराच्या नाम-रूपांचे आविष्करण असतात. हे बहुविध वस्तू आहेत. त्यांच्यामध्ये तो (ईश्वर) प्रतिबिंबित होतो. येथे सूफ़ी आपल्या वासनेशी दोन हात करतो. त्याची वासना वस्तूंचे स्वतंत्र अस्तित्व असल्याचे दर्शविते. हा **'मुजाहदा'** (यमनियम) म्हणजेच आटोकाट संघर्ष आहे. नंतर त्याच्या निरीक्षणामध्ये येते की, समष्टी स्वरूपात जग एक आरसा आहे आणि ते परमेश्वराच्या नामरूपांचे आविष्करण आहे. हा **'मुकाशफ़ा'** आहे. याला योगी-प्रत्यक्ष वा योगीदर्शन म्हणतात. नंतर त्याला आढळते की त्याचे स्वत:चे ज्ञान समस्त वस्तूंना घेरून आहे. अशा प्रकारे तो आरसा आहे. त्याच्यामध्ये जग प्रतिबिंबित होते. पूर्वी निरहंकार आरसा होता. आता त्याला स्वत:चाच अहंकार आरसा आहे. हा **'मुराक़बा'** आहे. याला मनन वा चिंतन म्हणतात. नंतर तो

आपल्या दृष्टीक्षेपातून आपल्या आत्म्यासह (अर्थात अहंकार आणि निरहंकार दोन्ही) सर्व वस्तूंना काढून टाकतो, त्यांना अस्तित्वशून्य मानतो. आणि त्याला आढळून येते की दृष्टा आणि ज्ञाता स्वत: ईश्वर आहे. हा **'मुशाहदा'** आहे. याला अंतरावलोकन म्हणता येईल. ''सर्व वस्तू नाशवान आहेत; मात्र आपले तेज, प्रताप आणि सौंदर्यासह फक्त तुमचा प्रभू ईश्वर अविनाशी आहे.'' – ५५:२६–२७. ''जितकी म्हणून (सृष्टी) भूतलावर आहे ती सर्व नाश पावणारी आहे. केवळ तुझ्या विधात्याचे प्रतापी आणि उदार रूपच तेवढे कायम आहे.'' – ५५:२६–२७. मौलाना रूमी यांनी हीच संकल्पना सारगर्भित स्वरूपात अशा पद्धतीने मांडली आहे:

*''जर काही क्षणासाठी तू, मी आणि आम्हापेक्षा जास्त उन्नती केलीस,*
*तर तुला आढळेल की दोन्ही जग तुझ्यानेच भरलेले आहेत.*
*ही तन्मात्रा तुझ्या सख्याच्या चेहऱ्यावरील अवगुंठन (पटल) आहे,*
*जेव्हा तन्मात्रा नाहीशी होते तेव्हा सर्व त्याच्यातच (सामावलेले) असते.''*

म्हणून 'हमाअूस्त' (सर्व काही तोच (ईश्वर) आहे)चा सिद्धान्त हा सर्व वस्तूंची एकत्रितपणे समष्टी म्हणजे परमेश्वर नव्हे – जसे सर्वेश्वरवादी मानतात; परंतु साधकाचे ज्ञान किंवा दृष्टी किंवा दोहोंमधून सर्व तन्मात्रा ('ताय्युनात') नाहीशा होणे आहे. त्यांच्या मते, इहलोक व परलोक – दोन्ही जग आविर्भावाच्या मर्यादा आहेत – आणि सत्तत्त्व हे ईश्वराचे सत्त्व असते.

या शेवटच्या अवस्थेमध्ये साधक (सेवक 'अब्द') पुन्हा अवतरित होत असल्याचे सांगितले जाते. तो स्वत:च मेलेला असतो, आणि ईश्वराच्या जीवनात जिवंत असतो. सूफ़ीसाठी पुन्हा अवतार नसतो, जसा श्रीकृष्ण हा धर्माच्या अभ्युदयासाठी मानवी रूप धारण करून स्वत: अवतार घेतो. तो धर्मसुधारणेसाठी मानवजातीमध्ये अवतारित होतो. आपल्या अवताराचे प्रयोजन स्पष्ट करताना श्रीकृष्ण म्हणतात :

*''चूँ अहवाल-ए-दुनिया बि गर्दद ख़सी ।*
*नुमायाम खुदरा बि शक्लि कसी ।।''*

अर्थात जेव्हा जगामध्ये अनाचार माजतो –
तेव्हा मी कुणाच्या तरी स्वरूपात स्वत:स प्रकट करतो.

'गीते'मधील मूळ संहितेचे मराठी गद्य भाषांतर असे आहे –

''जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचा अभ्युदय होतो, तेव्हा तेव्हा सज्जनांच्या रक्षणासाठी, दुर्जनांच्या विनाशासाठी मी (परमेश्वर) अवतार घेतो (मी स्वत: अवतीर्ण होतो.)'' – ४:७.

येथे साधकच स्वत:स मानसिक, नैतिक आणि आध्यात्मिक स्वरूपात एक दुसऱ्या चरित्र स्वरूपात स्वत:स रूपांतरित करतो, इतके की त्याचे नाम, त्याची रूपे आणि त्याचे कर्म हे ईश्वराचेच सत्त्व, गुण आणि कर्मे बनून जातात. तो ''पुन्हा जन्मतो, (मात्र) विकारशील मूल कारणापासून नव्हे, परंतु ईश्वराच्या आज्ञेने अविकारी कारणापासून जन्मून तो जिवंत राहतो आणि नित्य दृढ राहतो.'' प्रख्यात फ़ारसी तत्त्वज्ञ कवी महमूद शबिस्तरी हा आपले काव्य – ग्रंथ 'गुलशन-ए-राज़' मध्ये म्हणतो :

*''आत्मतत्त्व मेल्यानंतर तो जिवंत होतो आणि पुन्हा*
*तो दुसऱ्या मार्गावर धावतो, आपल्या अंतापासून ते सुरुवाती पर्यंत.*

*तो कर्मकांडास ('शरीअत') आपले बहिर्वस्त्र बनवितो*
*परंतु आपल्या स्वभावाचे ठिकाण हे सत्यच असल्याचे जाणतो.''*

ऊर्ध्वमुखी वृत्तांशावरील प्रवासांमध्ये (सफ़र इल'-ल्लाह आणि सफ़र फ़िल्लाह), ईश्वर हा साधकाचा आरसा असतो. एकाग्र दृष्टीच्या घनीभवनामध्ये आरसा दृष्टिक्षेपापासून नाहीसा होतो म्हणजेच विलुप्त होतो; आणि साधक आपला आत्मा पाहतो आणि मार्गस्थ होतो. नंतरच्या अधोगामी यात्रेमध्ये – 'वहदत'पासून मानवाच्या टप्प्यापर्यंत, साधक हा आरसा बनतो आणि नाहीसा होतो. आणि फक्त ईश्वरच उरतो. सफ़र फ़िल्लाहमध्ये, साधकाचे गुण विलुप्त होतात, आणि ईश्वराचे गुण (म्हणजेच 'अस्मा') फक्त उरतात; साधक ईश्वराच्या गुणांमध्ये प्रयत्नांसह मार्गस्थ होतो; साधका (सेवका, 'अब्द')चे गुण हे ईश्वराचे सान्त, मर्यादित गुण असतात.

*''जोपर्यंत (भगवत् कृपेचे) मधुप्राशन सूफ़ी करीत नाही तो पर्यंत तो निर्मळ होत नाही*
*नवख्यास परिपक्व होण्यासाठी अधिकाधिक साधनेची गरज भासते.''*

ईश्वर जणू काही स्वेच्छेने अशा मर्यादांशी – तन्मात्रांशी अभ्यस्त असतो, आणि त्यांना आपले इच्छेविरुद्ध काढून फेकून देतो. साधक या तन्मात्रा फेकून देण्याचा प्रयत्न करतो आणि परिपूर्ण बनतो. स्वतःच स्वतःपासून विरक्त, उदासीन होणाऱ्या ईश्वराच्या केवलवादावर तन्मात्रा (मर्यादा) आच्छादन टाकतात. या टप्प्यावर, साधक हा फक्त अत्यंत आवश्यक असलेली अनिवार्य नित्य कर्मे, प्रेषित अनुमोदित नैमित्तिक कर्मे यांचे पालन करतो आणि उपकार, सद्भावसुद्धा नाकारतो. 'जवाहिर-उस्-सुलूक' या आपल्या ग्रंथामध्ये वेल्लोरचे सूफ़ी संत शाह मुहिय्युद्दीन साहेब आणि 'रिसालए हयात-ए-जाँ' या अप्रकाशित ग्रंथामध्ये अब्दुल नबी सवी यांनी असाच अभिप्राय नोंदविला आहे.

जेव्हा साधक हा स्वतः केवलवादाशी अभ्यस्त झालेला असतो तेव्हा या सफ़र बिल्लाहमध्ये आपल्या तन्मात्रा-मर्यादांना मागे सारतो आणि 'मुसावी-उत्-तर्फैन' म्हणजेच सुवर्णमध्य बनतो (म्हणजेच दोन पराकोटीच्या शक्ती आणि अंतरा दरम्यान समतोल राखतो). आता त्याच्यासाठी सृष्ट्या (ईश्वरा) पासून पडदा पटल नसते किंवा स्रष्टा हा सृष्टीपासून पडदा नसतो, आणि त्याच्यासाठी अनिवार्य अस्तित्व हे दोन्ही सारखे असतात; आणि चिंतनाच्या साहाय्याने त्याने आपल्या व्यक्तित्वामध्ये 'हज़्रत-ए-ख़म्सा' (पंचावतरण, पंचमहाभूते) आणि त्यांचे तपशीलाचा शोध घेतलेला असतो; आणि मग तो नरोत्तम वा पुरुषोत्तम बनतो. हा तो टप्पा आहे की ज्यामध्ये संत आणि प्रेषित आपली भूमिका वठवितात.

'मुजाहदा'नंतर जेव्हा साधक 'मुकाशफ़ा' या टप्प्यावर पोहोचतो तेव्हा त्याला 'तजल्लीय्यात'ची अनुभूती येते. त्याला प्रभूप्रकाश दिसतो. त्याला प्रभूदर्शन घडते. 'तजल्ली' म्हणजे एक अनावरण, विशिष्ट गुह्यांचे एक आकलन होय. नाम, रूपे आणि तत्त्वांच्या वैभवाच्या साधनाशिवाय ते ज़ात अर्थात सत्तेचे आविष्करण असते. प्रथम वर्णक्षेत्र म्हणजेच रंगांचा प्रांत असतो. हे शैतानी म्हणजेच आसुरी असतात, म्हणजेच यामध्ये साधकाची वासना प्रबळ असते. या क्षेत्रातील एक विद्वान मायर त्यांना भ्रमोत्पादक आणि मोहिनी माया म्हणून संबोधतात. हे स्पष्ट असे दृष्टिभ्रम किंवा ध्वनीभ्रम, 'अंधारामधील चेहरे' इत्यादी असतात. डोळे बंद केल्यानंतर मूळ सप्तरंगापैकी एक किंवा जास्त रंगांमध्ये, ते नेत्रदर्पणावर प्रकाशाच्या प्रभावाचे अवशेष असतील; अथवा

निद्रादेवी निरोप घेत असताना एखादे प्रकाश प्रकट होण्याचे ते चिन्ह असेल; अथवा ते मेंदूच्या एखाद्या कल्पनेची करामत (चमत्कार) असतील. तथापि सच्चे रहस्योद्घाटन 'आलम-ए-मिसाल' म्हणजेच सादृश्य जगाचे प्रतिबिंब असते. (रंगाचे एक विश्व असलेले सच्चे विचार-विश्व). शेवटचा टप्पा (क्षेत्र) हा एक वर्णहीन प्रदेश असतो किंवा पवित्र कुराण म्हणते त्याप्रमाणे. ''परमेश्वरासोबत ना सकाळ असते ना संध्याकाळ,'' अबू सईद अबुल ख़ैर (मृत्यू इ. स. १०४९) यांनी प्रकाशाचे तीन प्रकार मांडले आहेत. पहिला प्रकार म्हणजे **'बुरूक़'**. हे नागमोडी (वक्राकार) प्रकाशझोत असतात. ते ताऱ्यांच्या स्वरूपात मागे सोडतात. यानंतर **'लवामिह'** असतो. याची तुलना विजेच्या वारंवार होणाऱ्या चमचमाटाशी केली जाते. हे पाण्याच्या पारदर्शक पृष्ठभागावर पडणाऱ्या सूर्याच्या किरणासारखे असते. तिसरे आहे **'लवायह'**. याची तुलना एक चकाकणाऱ्या प्रकाशमान दिव्याशी केली जाते. ('सिराजन् मुनीरन्'). येथेच प्रपितामह इब्राहीम यांच्या कुराणोक्त साधनेचे दृष्टांत नोंदविणे समर्पक योग्य ठरेल. जेव्हा प्रेषित इब्राहीम यांनी आपल्या साधनेमध्ये प्रगती केली. तेव्हा त्यांनी आपल्या हृदयाच्या अस्पष्ट कोपऱ्यामध्ये एक तारा पाहिला, आणि ते म्हणाले, ''हा माझा प्रभू आहे,'' ('हाज़ा रब्बी'), आणि जेव्हा तो अस्तंगत झाला तेव्हा ते म्हणाले : जे अस्त पावतात ते मला प्रिय नाहीत. ('ला अुहिब्बुल्-आफ़िलीन'); आणि त्याचप्रमाणे त्यांनी चंद्राचा उदय-अस्त पाहिले; तद्वत सूर्याचेही पण उदय-अस्त पाहिले, तेव्हा त्यांनी तोच उपरोक्त शेरा मारला. शेवटी त्यांचा निष्कर्ष होता : ''(आता) मी एकाग्रचित्त होऊन (पूर्ण) निष्ठेने त्या (ईश्वरा) च्याकडे वळलो आहे, ज्याने आकाशांना आणि पृथ्वीला निर्माण केले. (म्हणजे आता मी सृष्टीच्या निर्मात्याचा सच्चा भक्त बनून राहणार आहे) आणि मी त्यांच्यात सामील नाही. जे इतरांना अल्लाहचे समकक्ष ठरवतात. (म्हणजे मी अनेकेश्वरवादी नाही).'' (''इन्नी वजहतु वज्हिय लिल्लज़ी फ़तरस्समावाति वल्अर्ज़ हनीफ़वँ मा अना मिनल्मुश्रिकीन'') – ६:७९.

शेख अहमद मुजद्दिद (११ वे शतक) यांनी आपल्या साधनेमधील प्राप्तीनुसार, ऊर्ध्वमुखी टप्प्यामध्ये, वेगवेगळ्या पायऱ्यांवर वेगवेगळे रंग पाहिले आहेत. ते एक नक़्शबंदी गूढवादी होते. त्यांनी, मानवी शरीरामध्ये मानेपासून ते बेंबीपर्यंत सहा अवस्थांचा शोध लावला आहे. त्यांनी त्यांना 'लताइफ़-ए-सित्ता' असे नाव दिले आहे. हे सूक्ष्म देह आहेत. पातंजलीच्या कुंडलिनीप्रमाणेच हे एक दुसऱ्यास घेरलेले आहेत. लतायफ-ए-सित्ताचा सिद्धान्त जवळ जवळ कुंडलिनीच्या षट्चक्र सिद्धान्तासारखा आहे, 'क़ल्ब' (अंत:करण)चा वर्ण पिवळा आहे; 'रूह' (आत्मा)चा लाल आहे. 'सिर्र' (मर्म)चा पांढरा आहे; 'ख़फ़ी' (गुह्य)चा काळा आहे; आणि 'अख़्फ़ा' (गुह्यतम)चा हिरवा आहे. ('नफ़्स') म्हणजे वासनेस शैतानाचा प्रतिनिधी कल्पून तिचा रंग निळा असल्याचे मानले जाते. मात्र याचे स्थान बेंबीखाली आहे. येथे या गोष्टीची नोंद घेतली पाहिजे की इमाम ग़ज़ालीच्या 'इह्या-उल-उलूम'मध्ये दिलेल्या एक संदेहास्पद 'हदीस' म्हणजे प्रेषित-वचनामध्ये दिलेल्या टप्प्यांप्रमाणे हे टप्पे आहेत. ती 'हदीस' अशी आहे – मानवाच्या शरीरामध्ये एक मांसपिंड आहे. या पिंडामध्ये 'क़ल्ब' अथवा मन, चित्त आहे; चित्तामध्ये विवेकबुद्धी; विवेक-बुद्धीमध्ये 'फ़वाद' (अंत:करण); 'फ़वाद'मध्ये 'ख़फ़ी' (गुह्य) आहे, आणि 'ख़फ़ी'मध्ये 'अहं' 'मी' आहे. काहींचे असे मत आहे की 'नफ़्स' (वासना)चा रंग निळा आहे, आणि 'रूह'चा रंग गेरू आहे. जेव्हा 'नफ़्स' – वासना संपूर्णपणे लुप्त (नाहीशी) होते, तेव्हा पांढरेपणा निष्प्रभ करतो. आत्म्याचा रंग वारंवार हिरक बनतो, शेवटचा टप्पा हा वर्णहीनतेचा टप्पा

आहे. या टप्प्यामध्ये सर्व काही नाहीसे होते, आणि साधक हा एक 'फ़ना' अवस्थेमध्ये बुडून जातो. प्रसिद्ध आंग्ल कवी टेन्निसनने म्हटल्याप्रमाणे, साधक 'अनुभवातीत विस्मय' अनुभवतो. यालाच सूफ़ी 'आलम-ए-हैरत' अर्थात विस्मय जगत् असे म्हणतात. (''परमेश्वरासोबत ना सकाळ असते ना संध्याकाळ.'') सूफ़ींच्या पोशाखाचा, विशेषत: फेटा किंवा टोपी (शिरस्त्राण)चा रंग हा त्यांच्या साधनेयात्रेच्या टप्प्याचे निदर्शक असते, म्हणजेच जर त्याच्या शिरस्त्राणाचे रंग गेरू असेल, तर याचा असा अभिप्राय आहे की त्याची साधना 'रूह' म्हणजे आत्म्याच्या टप्प्यावर पोहोचली आहे.

**३) 'फ़ना' – सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ सूफ़ी इमाम अल्-ग़ज़ालीचा दृष्टिकोन**

या विवेचनाशी, आचार्य तत्त्वज्ञ सूफ़ी इमाम अल्-ग़ज़ालीच्या 'फ़ना'च्या संकल्पाची, तुलना करता येईल. उपासना-भक्ती-प्रार्थने(नमाजा)चे तीन पटले (पडदे) वा यवनिका असतात, असे ग़ज़ाली म्हणतात. त्यापैकी प्रथम प्रार्थना (उपासना) ही जिव्हेने उच्चारित होते. म्हणजेच ही जिव्होच्चारित उपासना होय. दुसरे चित्ताची एकाग्रता होय. अथक प्रयत्न आणि दृढ निश्चयाच्या बळावर जेव्हा चित्त (मन) कुविचारांनी अविचल अवस्थेमध्ये अशा बिंदुवर (ठिकाणी) पोहोचते की ते दैवी – आध्यात्मिक गोष्टींवर एकाग्रचित्त होऊन जाते. तिसरे पटल (पडदा) हे आहे की आध्यात्मिक बाबींवरील स्थिर चित्ता(मना)स महत् प्रयासाने विचलित करता येऊ शकते. उपासनेचे सार तेव्हा दृष्टिगोचर होते जेव्हा प्रार्थनेने ज्या परमेश्वराला आळविले जाते, त्याला महत्प्रयासाने द्रवित करता येऊ शकते. आव्हानित परमेश्वर उपासका (भक्ता)च्या मनाचा ताबा घेतो आणि उपासकाचे चित्त (अंत:करण) परमेश्वरामध्ये विलीन होते. त्याची प्रार्थना थांबते (संपते). त्याची आत्मचेतना स्थायी असते. म्हणून प्रार्थनेचा केवळ विचारसुद्धा त्याला एक पटल (पडदा) आणि एक अडथळा वाटू लागतो. गुह्य ज्ञानाचे तज्ज्ञ साधक या अवस्थेस 'तल्लीनता' किंवा 'निमग्नता' म्हणून संबोधतात. जेव्हा एखादा माणूस इतका तल्लीन किंवा निमग्न होऊन जातो की त्याची ज्ञानेंद्रिये अकार्यशील बनतात. परिणामी कल्पित व अकल्पिताची त्याच्या मनास जाणीव नाहीशी होते – होय, जणू काही तो या सर्वांपासून अज्ञानी असतो. प्रथम त्याच्या साधनेचा प्रवास हा त्याच्या प्रभू**कडे** असतो, मग त्याच्या प्रभू**मध्ये** असतो, परंतु आपण संपूर्णपणे तल्लीन – निमग्न आहोत, याची जाणीव साधकास झाल्यास, ते त्याच्यासाठी एक कलंक ठरते; कारण अशी ती तल्लीनता ही नावाखातर असते. ती तल्लीनतेची नेणीव असते.

''मला याची जाणीव आहे की माझे हे शब्द संकुचित ब्रह्मज्ञान्यांना एक पांचट विवेचन वाटेल, परंतु ते निरर्थक मुळीच नाहीत. का? ज्या अवस्थेबद्दल मी बोलतो ती अवस्था अशा माणसाच्या अवस्थेसारखी आहे ज्याला इतर वस्तू प्रिय असतात – जसे संपत्ती, प्रतिष्ठा, ऐषआराम; तसेच जसे आपण पाहतो की काही जण प्रेमात मग्न असतात, तर काही जण रागामुळे इतके जेरीस येतात की ते कुणाचेही ऐकावयास तयार नसतात अथवा जवळून कोण जात आहे हे पाहात नाही, आणि ते भावातिरेकामध्ये इतके मग्न होऊन जातात की आपण इतके मग्न झालेलो आहोत याची त्यांना जाणीव नसते. कारण तुम्ही तुमच्या चित्ताच्या निमग्नतेकडे जितके लक्ष द्याल, तुम्ही तितकेच अवश्य त्या (ईश्वरा)पासून भिन्न दिशेला वळाल, जो तुमची तल्लीनता – निमग्नता घडवून आणतो.''......

''आणि आता, 'तल्लीन'तेच्या स्वरूपाविषयी सुव्यवस्थित माहिती दिल्यानंतर, आणि शंकांना दूर सारून, जी गोष्ट (बाब) आकलन करण्यास तुम्ही असमर्थ असाल, तर ती गोष्ट असत्य आहे.'' असे म्हणून

तिला कलंकित करू नका. सर्वश्रेष्ठ परमेश्वर पवित्र कुराणात म्हणतो : ''जे त्यांच्या आकलना पलीकडे असते ते त्यास मिथ्या असल्याचे आरोप करतात. (शिक्कामोर्तब करतात.)'' – 'तल्लीनते'चा अर्थ स्पष्ट केल्यानंतर, तुम्ही हे जाणले पाहिजे की साधना–यात्रेचा प्रारंभ हा परमेश्वरा**कडे** असतो आणि परमेश्वरा**मधील** साधना–यात्रा हे तिचे उद्दिष्ट असते, कारण या नंतरच्या अवस्थेमध्ये परमेश्वरामधील 'तल्लीनता' किंवा 'निमग्नता' निर्माण होते. या मंदगमनाचा आरंभ हा डोळे दिपविणाऱ्या प्रकाशाच्या एका चकाकीसारखा असतो; मग नंतर तो सवयीचा (भाग) होऊन जातो, चित्तास एक उच्चतर जगामध्ये वर उचलले जाते, की ज्या ठिकाणी सर्वात जास्त विशुद्ध असे अनिवार्य सत्तत्व आविष्कृत होते, आणि आध्यात्मिक जगाच्या स्वरूपाने मानवी चित्त (तुडुंब) भरले जाते, परमेश्वराचे वैभव, ऐश्वर्य उघड केले जाते आणि त्यावर प्रकट होते. आता, सर्वप्रथम जे उदयास येते, ते म्हणजे देवदूत, अंतरात्मे प्रेषित आणि संत–महात्मे होत. पडदा आड असल्यामुळे, एक क्षणभर, त्यांचे सुंदर स्वरूप, मला समजत नाही, निश्चित असे विशिष्ट सत्य कुठून प्रकट होतात हे कळत नाही; परंतु जस जसा मार्ग खुला होत जातो, तस तसा परमेश्वर आपले रूप (आपला चेहरा) उघडे करून दाखवण्यास सुरू करतो. अशा (दैवी) दृश्यांचे ओझरते दर्शन घेणारा, की जेथून तो (साधक) खालच्या जगाकडे परततो, तो सर्व अधम ऐहिक गोष्टींचा तिटकारा करून, जगाच्या फसवणूकीवर समाधान पावणारा, अशाकडे पाहून नवल वाटत नसेल, तर काय कुणी भव्यतर उंचीवर उत्कर्ष गाठण्यास कधीच प्रयत्न करणार नाही? असे मी विचारतो.''

तंतोतंत अशाच प्रकारच्या सिद्धान्ताची शिकवण स्वत:स डायोनिसिस म्हणवून घेणाऱ्या लेखकाने दिली आहे. नुकतेच त्याला सिरियाचा एक भिक्षु (मठवासी) स्टीफन बर सुदैली या नावाने ओळखले गेले आहे. त्याचे सिद्धान्त म्हणजे प्लॉटिनसच्या सिद्धान्ताचे केवळ एक पुनर्विधान आहे. त्याच्या सिद्धान्ताचे सार असे आहे –

सत्ता मिश्र श्रेणी मिळून बनली आहे. प्रथम 'तद्‌एकम्', नंतर बुद्धी, नंतर आत्मा व शेवटी जड सृष्टी. सत्तेविषयी विशिष्ट वृत्ती धारण केली तर मोक्ष प्राप्ती होते. ''उत्पन्न झालेल्याला उत्पादकाची सतत ओढ लागते व तो त्यावर प्रेम करतो.'' ('एन्निॲड्स', ५:१,६). ज्या अर्थी प्रत्येक उच्च श्रेणीत कनिष्ठ श्रेणी समाविष्ट आहे, त्या अर्थी कोणत्याही श्रेणीला आपले उगमस्थान शोधावयाचे असेल तर स्वत:त प्रवेश केला पाहिजे. मनुष्याकरता मोक्ष म्हणजे त्यानं स्वत:तील उच्च कार्यशक्तींना त्यांच्या अस्तित्वाच्या भिन्न श्रेणींच्या उगमस्थानांकडे वळविणे हे होय. म्हणून हा धर्म आंतरिकतेचा धर्म आहे.

आत्म्यांमधील अविवेकापासून सद्‌गुणामुळे आत्मा स्वत:ची मुक्तता करून घेतो, तेव्हा आत्म्यांमधील हिणकस भाग विचाराचा मान राखतो. मनुष्य हा एक बुद्धिमान प्राणी आहे. बुद्धी 'ध्यान' असते. मनुष्याच्या जीवनांतील ''ध्यानाचे कार्य व ध्यानाचा कळस म्हणजे 'परमानंद' होय. हीच समाधी हो.

'जस जसे आपण एकाकडे वळतो, तस तसे आपण उच्च पातळीवर राहू लागतो ..... जे स्थान सर्व दुरितांपासून मुक्त आहे, त्याकडे आपला आत्मा दुरितमुक्त होऊन चढू लागतो. तेथे तो जाणतो. तेथे तो बंधमुक्त होतो. तेथे तो खरोखर जगतो.' ('एन्निॲड्स', ६, प्रबंध ९, भाग ९). सर्व मनुष्यांना प्राप्त होऊ शकणारा मोक्षाचा आदर्श प्लॉटिनस प्रतिपादतो. त्याचे सार असे : ''भूतलावरील सर्व गोष्टींविषयी अनासक्ती, सर्व ऐहिक सुखांविषयी तिरस्कार, एकाचे त्या एकमेव अंतिम तत्त्वाकडे प्रयाण.'' – (६:९,११).

### ५. रूपक

येथे प्रेमाचे स्वरूप विषद करणारे फ़ारसीचे तत्त्वज्ञ महाकवी मौलाना जलालुद्दीन रूमी यांचे रूपक नोंदविणे अप्रशस्त ठरणार नाही. जवळ जवळ सर्व धर्मांमध्ये परमेश्वराविषयी प्रेमास महत्त्वाचे स्थान दिले गेले आहे. परमेश्वर प्राप्तीचे जेवढे म्हणून साधन आणि मार्ग दाखविले गेले आहेत. त्यामध्ये प्रेमास फार मोठे स्थान दिले गेले आहे. प्रेमाद्वारे मनुष्याच्या हृदयामध्ये श्रद्धा आणि विश्वास उत्पन्न होतात. गूढवादी याच प्रेमास घेऊन अग्रेसर होतात. याच्याच बळावर परमेश्वरास प्राप्त करण्याची आशा बाळगून असतात.

प्रेम ही एक अशी उत्प्रेरक शक्ती आहे की जी साधकास आध्यात्मिक मार्गाकडे वळवते. ही एक अशी वासना आहे की जी इतर सर्व वासनांना हृदयापासून दूर फेकून देते. प्रेमास आपल्या सांसारिक वस्तू आणि कामना यांचा परित्याग करावा लागतो. इतकेच नव्हे तर त्याला संपूर्णपणे स्वत:स आपल्या परम प्रियकरास समर्पित व्हावे लागते. असे केल्याशिवाय, आपल्या अहंकारास नष्ट केल्याशिवाय अलौकिक प्रेमाचा तो अधिकारी बनू शकत नाही.

प्रियकरास प्राप्त करणे हे केव्हा आणि कसे शक्य होऊ शकते याचे अत्यंत सुंदर वर्णन महाकवी जलालुद्दीन रूमी यांनी आपल्या 'मसनवी' म्हणजेच कथा-काव्यांमध्ये दिले आहे. त्याची सुरुवात अशी होते –

प्रेयसीचे दार कुणीतरी खटखटवले. आतून आवाज आला ''कोण आहे?'' त्याने उत्तर दिले ''मी आहे.'' आतून आवाज आला, ''या घरामध्ये 'तू' (तुला) आणि 'मी' (मला) या दोघांसाठी स्थान नाही.'' प्रियकर निघून गेला. तो एकांत सेवनामध्ये राहू लागला, प्रार्थनेमध्ये मग्न राहू लागला. त्याने उपवास सुरू केले. एका वर्षानंतर तो पुन्हा परत आला. त्याने पुन्हा खटखटवले. आवाज आला ''कोण आहे?'' प्रियकराने उत्तर दिले ''तू आहेस.'' आणि मग दार उघडले गेले. म्हणून जो पर्यंत मनुष्य 'मी' आणि 'तू'च्या बंधनापासून स्वत:स मुक्त करीत नाही तोपर्यंत आवडत्या प्रेयसीस प्राप्त करणे शक्य नाही. ही प्रेमाची गल्ली फारच अरुंद आहे. (म्हणून) यामध्ये दोन एकाच वेळेस प्राप्त करू शकत नाहीत. जोपर्यंत 'अहं' कायम आहे तोपर्यंत तिला प्राप्त करणे कठीण आहे आणि जेव्हा ती सापडते तेव्हा 'अहं' राहात नाही.

यावरून स्पष्ट आहे की गूढवादी साधक प्रेमास परमेश्वर प्राप्तीचे साधन मानतात. परमेश्वरास ते आपली आवडती प्रेयसी मानतात. ईश्वरापाशी अहंकारास मुळीच थारा नसतो. म्हणून 'अहं'मुळे कुठलेच दार उघडू शकत नाही, कारण 'अहंकारास' दैवी विलक्षण सौंदर्यामध्ये आत्मविस्मृत होऊन विलीन व्हावेच लागेल, तेव्हाच परमेश्वराशी ऐक्य साध्य होईल. ही संपूर्ण अनुभूती कवी मौलाना रूमी आपल्या 'मसनवी'मध्ये अशी मांडतात –

एक माणूस आला आणि आपल्या मित्राचे दार ठोठावले : मित्राने त्यास विचारले, हे भल्या माणसा कोण आहेस तू?

त्याने उत्तर दिले, 'मी' (आहे.) मित्र म्हणाला, ''चालते हो! ही काय (तुझ्या आत येण्याची) वेळ नव्हे. एका मेजावर अननुभवी (नवागता)साठी स्थान नसते.

अपक्वास अनुपस्थिती आणि वियोगाच्या अग्नीशिवाय कोण परिपक्व बनवील? त्याला दंभापासून कोण तारणारा आहे?

तो हतभागी माणूस निघून लांब गेला, आणि आपल्या मित्राच्या वियोगामध्ये वर्षभर फिरत राहिला. वियोगाच्या स्फुल्लिंगा (ज्वाले)मध्ये जळत तप्त होत राहिला.

तो तप्त मित्र परिपक्व झाला : नंतर तो परत आला आणि पुन्हा आपल्या साथीच्या घराजवळ मागेपुढे पाऊल टाकू लागला.

भीतीच्या भुताटकीने आणि आदरभावाच्या नम्रतेने त्याने दार ठोठावले – आपल्या तोंडाने अनादराचा शब्द निघू नये म्हणून.

त्याचा मित्र त्याला म्हणाला, ''दारापाशी कोण आहे?'' त्याने उत्तर दिले, ''हे मनमोहन! दारापाशी तू आहेस.''

त्याचा मित्र म्हणाला, ''आता ज्याअर्थी तू मी आहे, त्याअर्थी हे माझे 'स्व' आत ये. (या) कक्षामध्ये दोन 'अहं'साठी (मुळीच) स्थान नाही.''

''दोऱ्याची दोन्ही टोके सुईसाठी नसतात म्हणजेच दोरा एकाच टोकाने सुईमध्ये ओवला जातो : ज्याअर्थी तू एकटा आहेस त्याअर्थी तू या सुईमध्ये ओवून घे.''

दोरा सुईशी जोडला जातो : सुईचे नेढे उंटासाठी योग्य नसते.

तपस्वीच्या योगसाधनेच्या मोठी कातरशिवाय उंटाचे शरीर कसे बरे सुरेख होऊ शकेल? म्हणजेच विरक्ताच्या योगसाधने (तपा)मुळे साधा माणूस सुद्धा ईश्वराच्या कनिष्ठ भक्ताच्या श्रेणीस पोहोचू शकतो.

''त्यासाठी, हे वाचका! ईश्वराच्या शक्तीची गरज असते, कारण अशक्य कोटीतल्या प्रत्येक गोष्टींसाठी (अल्लाहचा आदेश), 'हो' तर ते होते.'' – ३:४७. 'कुन् फ़ यकून.'

त्याच्या सामर्थ्यामुळे प्रत्येक अशक्य गोष्ट ही शक्य होते; त्याच्या भीतीमुळे प्रत्येक अनावर शांत बनतो.

जन्मांध आणि महारोगीच काय? सर्वशक्तीमान परमेश्वर मृतास पण एका क्षणात जिवंत करतो.

आणि मृतापेक्षा अधिक मेलेले असे निरस्तित्व (अस्तित्वहीनता) यास परमेश्वर आपल्या अस्तित्वात येण्यास भाग पाडतो.

पवित्र कुराणाच्या श्लोकाची संहिता वाचा, ''दररोज तो (परमेश्वर) कशात तरी मग्न असतो.'' : त्याला तुम्ही आळशी निष्क्रिय समजू नका.

दररोज त्याचे कमीत कमी काम म्हणजे, तो तीन फौजा पाठवितो :

एक फौज पित्यांच्या कटिप्रदेशातून मातांकडे, की जेणेकरून गर्भाशयामध्ये गर्भाची वाढ व्हावी.

एक फौज गर्भाशयापासून पृथ्वीतलावर, की जेणेकरून जग हे स्त्री–पुरुषांनी भरून जावे;

एक फौज इहलोकापासून मरणोत्तरा (परलोका)कडे की जेणेकरून प्रत्येक जीवाने सत्कर्मांचे सौंदर्य न्याहाळावे.

या प्रवचनाला अंत नाही. या, दोन प्रामाणिक आणि समर्पित मित्रांकडे परत येण्याची त्वरा करा.

सुप्रसिद्ध फ़ारसी सूफ़ी कवी हाफ़िज आपल्या खालील ग़ज़लांमध्ये प्रतीकवादाचे तेच सूर आवळतो (म्हणतो) :– (गद्य रूपांतर)

**(१)**

होय, हे मधुबाले! मधुवितरणाचे चक्र सुरू कर आणि मला मधुप्याला दे. कारण की सुरुवातीस प्रेम (करणे) सोपे वाटले; परंतु अडचणी वाढल्या. त्या मृगनाभीच्या सुगंधाची शपथ! शीतल वायू शेवटी तिला अशा ऐटीत उघडेल की तिच्या कस्तूरी कुरळ्या केसांच्या सुरकुत्यामुळे चित्तां (मनां)मध्ये (कशा प्रकारे) रक्त जमलेले असेल. जर मदिरालयाचा वृद्ध बंधक म्हणेल तर तू प्रार्थनासनी वस्त्रास मदिरेमध्ये रंगून घे. यासाठी की साधक हा ध्येय गाठण्याची रीत अणि मार्ग याविषयी अनभिज्ञ नसतो. मला प्रियकराच्या दारी कसली शांती, आणि कसला आराम? की जेव्हा प्रत्येक क्षणी घंटा घोषणा करीत आहे की आपल्या उंटाचा हौदा कसून घ्या. काळोखी रात्र, लाटांची भीती आणि असे भयंकर व भयानक जलचक्र की किनाऱ्यावरचे निश्‍चिंत लोक आमची (दु)र्दशा कसे बरे समजू शकतील! स्वार्थामुळे माझी सर्व कामे शेवटी बदनामीस पोहोचली आहेत. ते गूज कसे बरे लपेल की ज्याच्यामुळे मैफिली रंगल्या जातात? हे हाफ़िज, जर तुला दर्शन हवे असेल तर तू त्यांच्यापासून लपून जा. जेव्हा तुझी प्रियकराशी भेट होईल तेव्हा तू संसाराचा त्याग कर.

तात्पर्य, मदिरेमुळे निर्माण होणारे आत्मविस्मरणच सर्व समस्यांचे (एकमेव) उपाय आहे. प्रात:काळच्या शीतल वायूचा गंध हा कुरळ्या केसांच्या प्रभावामुळे आहे. प्रियकराच्या उत्कट आठवणीमुळे प्रेयसीचे अंत:करण जखमी आहे. अनुभवी वृद्धांची आज्ञा ही हितकारक असते. कूच करण्याच्या वेळेस अग्रेसर होत असताना सूचनेसाठी घंटानाद केला जातो. ज्यांच्या मनात प्रेम नसते. त्यांना प्रेमाच्या वाटेतील यातना कळत नसतात. प्रेयसीच्या बदनामीच्या कथेने मैफ़िली प्रतिध्वनित होतात. प्रियकराचे दर्शन घडत असताना, विश्‍व आणि विश्‍वामधील समस्त वस्तूंचे विस्मरण झाले पाहिजे.

**(२)**

हे मधुबाले, उठ आणि मधुप्याला दे. दुर्भाग्याच्या दु:खावर धूळ फेक. माझ्या हाती मदिरेचा प्याला ठेव (दे) की जेणेकरून मी आपल्या डोक्यावरील निळा फेटा काढून फेकून देईन. यद्यपि सूज्ञांच्या दृष्टीमध्ये ही बदनामी आहे, आम्हास बदनामी आणि नावलौकीकाची पर्वा नाही. मदिरा दे, घमेंडखोरीची (ही) फुंकर कुठवर? मेल्या (दुर्दैवी) वासनेच्या डोक्यावर धूळ पडो! माझ्या दग्ध चित्ताच्या धुराने या अपरिपक्वांना जाळून टाकले. आपल्या उन्मत्त मनातील निषिद्ध गूज, ख़ास किंवा सर्वसाधारण लोकांना माहित झाल्याचे मला तरी जाणवत नाही. त्या प्रियकराशी मी खुश (प्रसन्न) आहे, की ज्याने एकाच वेळेस माझ्या चित्तापासून आराम हिसकावून घेतले. वाटिकेमध्ये तो पुन्हा सुरू वृक्षास पाहणार नाही की ज्याने चंदेरी देहासारखे सुरू वृक्षास पाहिले आहे. तुला आता संसाराची काळजी नाही; म्हणून तू दु:ख करू नकोस. चांगल्या प्रकारे अन्नोदक सेवन करीत जा. भाग्यास प्रसन्न ठेव. हे हाफ़िज! रात्रंदिवसाच्या सक्तीपासून संयम धारण कर. शेवटी, एके दिवशी तू आपले उद्दिष्ट साध्य करशील.

तात्पर्य, मदिरेच्या मातीमध्ये दु:खाचे विस्मरण करावे. प्रियकराच्या उंचीच्या मानाने सुरू वृक्षाची उंची काहीच नसते. प्रेम हा इतका उच्च असतो.

(३)

ज्या साधकास मद्य-बाजाराचा रस्ता माहित झाला, त्याला दुसरा दरवाजा ठोठावणे हे वाईट वाटले. काळाने (दैवाने) मद्यपानाचे (किंवा उन्मत्तेचे) मुकुट त्याला दिले आहे की ज्याने यश हे त्याच टोपीमध्ये दडलेले आहे, हे जाणले आहे. ज्याला मदिरालयाच्या चौकटीचा रस्ता सापडला त्याने मदिरेच्या प्याल्याच्या उपकारामुळे सूफ़ींच्या आश्रमाचे गूज जाणले. ज्याने मदिरा पात्रेच्या मात्रेचा खुणावरून इहलोक व परलोक या दोन्ही जगांची रहस्ये जाणून घेतली आहेत त्याने जमशीदच्या पेल्याप्रमाणे जगातल्या सर्व गोष्टी रस्त्याच्या मातीच्या कणांपासून जाणून घेतल्या आहेत. माझ्या मनाने मधुबालेच्या पांढऱ्या फुलापासून प्राणाची शाश्वती मागितली नाही. कारण त्याने निष्ठुर प्रेयसीची परिपाठी (पद्धती) जाणली. वेड्या लोकांच्या आज्ञापालनाशिवाय आमच्याकडून कसलीच अपेक्षा ठेवू नकोस. ते यासाठी की आमच्या धर्माच्या धर्माचार्याने बुद्धीमानीस अपराध मानले. सकाळच्या वेळी भाग्याच्या ग्रहाच्या जुल्मामुळे माझ्या डोळ्यांना इतके रडू आले की ही गोष्ट सूर्याने पाहिली आणि चंद्राने ओळखले. ती दृष्टी किती भाग्यवान आहे की जिने मदिरेच्या पेल्याचे ओठ आणि मधुबालेच्या चेहऱ्यास प्रथमेची चंद्रकोर आणि पौर्णिमेचा पूर्णचंद्र जाणले. त्या उच्च प्रतिष्ठित बादशहाने आकाशाच्या नऊ (९) पडद्यांना दरबाराच्या मेहरपी (मोखल)च्या झुकलेल्या भागाचा नमुना जाणले. हाफ़िजची गोष्ट आणि लपून छपून मद्यपान करणे ही बाब केवळ शिपाई आणि फौजदार यांनाच ठाऊक आहे असे नव्हे तर बादशाहस पण याची कल्पना आहे.

(४)

जर त्याने माझ्यावर तलवारीचे वार केले तर मी त्याचे हात थांबविणार नाही. (प्रतिकार करणार नाही). जर त्याने माझ्यावर बाण फेकले तर मी त्याचा आभारी राहीन. आमच्या धनुष्यासारख्या भुवया असलेल्यास सांगा की त्याने बाण फेकू नये, की जेणे करून मी तुझे हात आणि मांडीवर मी आपले प्राण अर्पण करीन. संसाराच्या दु:खाने मला पछाडले आहे. मधुप्यालाशिवाय माझा कोणीच मदतगार नाही. हे आशेच्या उष:कालाच्या सूर्या, तू उगव (बाहेर ये) कारण की मी विरहाच्या रात्रीच्या हातामध्ये कैदी झालो आहे. हे (धर्मो)पदेशका, तू मला लहान मुलांसारखा कुठवर भुरळ पाडशील? – मला बागेतील सफरचंद आणि दुधाच्या नदीचे आमीष दाखवून. मी असा पक्षी आहे की, ज्याची शीळ सातव्या आकाशामध्ये असलेल्या कल्पवृक्षा ('सिद्रा')पर्यंत पोहोचते. हे मदिरालयाच्या व्यवस्थापका! माझी याचना ऐक. एक घोट (मदिरेने) मला तरुण बनव. मी वृद्ध आहे. कालच मी तुझ्या लांब केसाची शपथ खाल्ली आहे. की मी तुझ्या पदस्पर्शापासून आपले डोके मुळीच हटवणार नाही. (कवी) हाफ़िजप्रमाणे ईशपरायणतेची गोधडी जाळून टाक, ते यासाठी की मी जरी अग्नी बनून गेलो तरी त्यामध्ये आगीची उष्णता असणार नाही आणि परिणामी तिचा प्रभाव दिसणार नाही.

(५)

तुझ्या केशपाशामध्ये मन आपोआप मुग्ध (आसक्त) झालेला आहे. आपल्या लटक्या हावभावांनी त्याची कत्तल करून टाक. हीच त्याची शिक्षा आहे. जर माझी मनोकामना तुझ्या हाताने पूर्ण होत असेल तर ती लवकर

पूर्ण कर, ते यासाठी की जवळच्यासाठी चांगुलपण असते. हे माझी प्राणप्रिये! तुझ्या गळ्याची शपथ! ज्याप्रमाणे काळोख्या रात्री दीपक प्रकाश-दान करून आपली लीला समाप्त करतो त्याचप्रमाणे मी पण विरहा (वियोगा)च्या रात्रींमध्ये स्वत:स नष्ट करीत आहे. हे बुलबुल (गोवत्सक) पक्षी! जेव्हा तू प्रेम करण्याचा निश्चय केला होतास तेव्हा मी तुला म्हणालो होतो की असे करू नकोस. यासाठी की हे आपोआप उगवलेले फूल आपल्यासाठी आहेत. फुलाचे सौंदर्य सुंदर सुरकुतेदार कस्तूरीचे गरजवंत नसते. यासाठी की सैल झग्याच्या लांब दोऱ्यापासून त्याला लाभ प्राप्त होतो. भाग्याच्या संकोच नसलेल्या सहचराच्या घरी जाऊ नकोस. यासाठी की तुझ्या सुख-शांतीचा कोनाडा तुझ्या घरातच आहे. प्रेम आणि अंत:करणाच्या शर्यतीमध्ये हाफ़िज हरला. अद्याप तो आपल्या वचनपूर्तीवर कायम (दृढ) आहे. याच मालिकेमधील रूपक व प्रतीकवादाचा एक-एक नमुना आम्ही पुढे देत आहोत.

**१) शम्स तबरीज़ यांच्या 'दीवान' (समग्र काव्य संग्रहा) मधून : (गद्य रूपांतर)**

आपल्या समाजबांधवांसारखा बनून जा की जेणेकरून तुला आध्यात्मिक आनंद प्राप्त होईल. मदिरालयाच्या रस्त्यामध्ये प्रवेश कर, म्हणजे तू मद्यप्यांना पाहशील. प्रेम-प्याला पिऊन टाक, म्हणजे तुला लाज वाटणार नाही. तुझे चर्मचक्षू मिटव. म्हणजे तुला दिव्य (अव्यक्त) नेत्र दिसेल. जर तुला आलिंगन हवे असेल तर तू आपले बाहू मोकळे कर. परम सुंदरी प्रेयसीचा चेहरा पाहण्यासाठी, मातीची मूर्ती उद्ध्वस्त कर. एका म्हाताऱ्या स्त्रीसाठी इतका जास्त हुंडा ('महर' अर्थात स्त्रीधन) देण्यास तू का बरे तत्पर आहेस? तीन भाकरींसाठी तू कुठवर तलवार आणि भाला-बरचीकडे पाहात बसशील? नेहमी रात्री प्रेयसी परत येते : (म्हणून) आज रात्री अफू सेवन करू नकोस. तोंडात अन्नाचा घास घेऊ नकोस, म्हणजे तुला तोंडाची गोडी कळून येईल. पहा! मधुबाला जुलमी गडे नव्हे, आणि त्यांच्या सभेमध्ये एक मंडळ आहे. त्या मंडळामध्ये दाखल हो, बसून राहा; कालचक्रा (प्रारब्धा)ला किती वेळपर्यंत मान देत बसशील? आता विचार कर. एक स्वस्त सौदा आहे : एक जीवन दे आणि (मोबदल्यात) शंभर घे. मेंढपाळाचे प्रेम अनुभवण्यासाठी लांडगे आणि कुत्रे यांचा स्वभाव सोडून दे. तू म्हणालास : 'माझ्या शत्रूने माझ्यापासून अमुक हिरावून घेतले' : जा, ईश्वराचे चिंतन-मनन करण्यासाठी त्या इसमास सोडून दे. विचार-निर्माता परमेश्वराशिवाय इतर कुणाचेही चिंतन करू नकोस. भाकरीच्या काळजीपेक्षा आत्म्याविषयीची चिंता अधिक बरी असते. ईश्वराची पृथ्वी इतकी विशाल असताना, तू एका कारागृहामध्ये खुशाल का झोपला आहेस? स्वर्गामध्ये सर्व बाबींचा उलगडा होणार आहे; म्हणून गुंतागुंतीचे विचार सोडून दे. वाचेस आवर (मौन धारण कर.) म्हणजे परलोकामध्ये तुला वाचा फुटेल. इहलोक आणि ऐहिक नश्वर जीवनाचा त्याग कर, म्हणजे तू परलोकाचे शाश्वत जीवन पाहशील.

**प्रतीक निरुपण :** आलिंगनासाठी बाहू मोकळे करणे म्हणजे कुणाकडून अपेक्षा ठेवू नये. म्हातारी स्त्री भौतिक व्यवहारांचे प्रतीक आहे. तीन भाकरीसाठी कुणाच्या सेवेत (येथे लष्करी सेवेत) रूजू होणे, म्हणजे आपल्या क्षमता विकण्यासारखे आहे. समाजबांधव म्हणजे दैवी एकत्त्व, सर्वेसर्वा, किंवा संत-मंडळी, मदिरालय म्हणजे ईश्वर. मूर्ती म्हणजे अहंकार. हुंडा-महर म्हणजे मनाचे सुख. तोंडातील अन्नाचा घास म्हणजे प्रेयसीचे सुंदर ओठ.

२) मौलाना जलालुद्दीन रूमी यांच्या 'मसनवी' (कथा-काव्या) मधून :

*''इश्क़ रा पाँसद पर अस्त व हर परी ।*
*अज़ फ़राज़-ए-अर्श ता तहतस्सरी ।।''*

(उपरोक्त काव्य-चरणांचे प्रस्तुत भाष्य मियाँ अबूल माली या सूफ़ी संत भाष्यकाराचे आहे. ते शहज़ादा दारा शिकोह यांच्या 'सकीनतुल औलिया', पृ. २६२-६३ ग्रंथामधून घेतलेले आहे.)

**निरूपण :** उपरोक्त कडव्यामध्ये प्रेमाचे वैशिष्ट्य प्रतिबिंबित आहे. प्रेमात उत्कर्ष आणि अपकर्ष या दोन गोष्टी असतात. पक्षी हा वर-खाली भरारी घेत असतो. तो कधी आकाशात अत्यंत उंचीवर उडत असतो तर कधी थेट जमिनीपर्यंत खाली येत असतो. त्याचे वर, खाली उडणे हे सतत चालू असते. स्थैर्य हा त्याचा स्थायी भाव नसतो. परिवर्तन किंवा हालचाल हा त्याचा स्वभावधर्म असतो. या साम्याच्या आधारे प्रेमास पक्ष्याची उपमा दिली आहे. पक्ष्याचे पंख दोन बाजूंमध्ये विभागलेले असतात. एक उजवा पिसारा व दुसरा डावा पिसारा. उजवा पिसारा आशेचा असतो; तर डावा पिसारा भयाचा असतो; म्हणजेच ते दोन पिसारे म्हणजे आशा आणि भय या दोन प्रेरणा होत. प्रत्येक पिसाऱ्यामध्ये पाचशे पंख (पिसे) गृहीत धरल्यास दोन्ही पिसाऱ्यांचे मिळून एकूण एक हजार पंख होतात, आणि खुद्द पक्ष्याचे प्रकाराचे नाव त्यात मिसळल्यास एकूण त्याची एक हजार एक नावे होतात. म्हणजेच परमेश्वराची आठवण (नाम-स्मरण) एक हजार एक नावांनी केली जाते. त्यापैकी एक नाव 'इस्म-ए-ज़ाती' अर्थात सत्तात्मक नाम 'अल्लाह' असे आहे. हे ईश्वराचे एकमेव नाव आहे. 'अल्लाह'ची खरी ओळख प्रेमस्वरूपात होते. म्हणूनच परमेश्वर म्हणजे प्रेम व प्रेम म्हणजेच परमेश्वर! बाकीची हजार नावे दोन सम-समान संख्येत विभागली जातात. अर्थात दोन प्रकारची ती नावे आहेत, (१) 'जलाली' (रुद्र नामे) आणि (२) 'जमाली' (भद्र नावे). म्हणजेच परमेश्वराची पाचशे नावे जलाली म्हणजेच रौद्र स्वरूपाची आहेत, तर उरलेली पाचशे नावे जमाली म्हणजेच भद्र अशी आहेत आणि हे स्पष्टच आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या रौद्र आणि भद्र स्वरूपात कोणताच भाग कल्पना करता येण्यासारखा नाही. म्हणजेच ती दोन्ही कल्पनातीत आहेत. या विवेचनावरून हे स्पष्ट आहे की, अल्लाहची 'ज़ात' अर्थात 'नाम' (प्रभू-नाम) हे फक्त 'जलाली' आणि 'जमाली' या पाच-पाचशे गुणधारी नामांच्या पडद्याआड लपलेले आणि गुप्त नसून ते त्या गुणांमुळे प्रकट आहे, व्यक्त आहे. आकाशापासून ते पृथ्वीतळावरील सर्व काही परमेश्वराच्या अधीन आहे. त्या सर्वांवर परमेश्वराची सत्ता, त्याचा अधिकार चालतो.

तात्पर्य परमेश्वराने मानवी जीवन भय आणि आशा या दोन प्रमुख प्रेरणांवर निर्भर ठेवले आहे. ''ते श्रद्धावंत (शिक्षेच्या) भीतीने व (कृपाप्राप्तीच्या) आशेने आपल्या प्रभूचा धावा करीत असतात.'' - ३२:१६. ''ते प्रभूची भीति बाळगतात, आणि वाईट हिशोबाची धास्ती राखतात, आणि आपल्या प्रभूच्या प्रसन्नतेच्या अभिलाषेने जे सर्व धीराने सहन करतात.'' - १३:२१-२२. पक्षाचा उजवा पिसारा म्हणजे आशेची प्रेरणा, तर डावा पिसारा म्हणजे भयाची प्रेरणा होय. ते दोन पिसारे हे भय आणि आशा या दोन प्रेरणांचे प्रतीक आहेत. या दोन प्रेरणांचा उल्लेख पवित्र कुराणामध्ये वारंवार आलेला आहे. जसे - ''भयपूर्वक आणि आशापूर्वक त्या (ईश्वराचे) आवाहन करा.'' - ७:५६. ''आम्ही अवश्य तुमची कसोटी पाहू भय, भूक, जीवित व वित्त हानी व फळांची हानी यांद्वारे, (या सर्व अवस्थेत) जे संयमपूर्ण आचरण करतील त्यांना शुभ समाचार द्या.'' -

२:१५५. ''निश्चितपणे तुमचे धन आणि तुमचे प्राण या संबंधाने तुमची परीक्षा घेण्यात येईल.'' – ३:१८६. ''(श्रद्धावंतांनो!) आम्ही तुम्हा सर्वांची अवश्य कसोटी पाहणार.'' – ४७:३१. ''(लोकांनो!) या गोष्टीचा कदापि विसर पडू देऊ नका की, या जगातील जीवन अन्य काही नसून केवळ खेळ व तमाशा आहे आणि (क्षणभंगुर) शोभेचा एक देखावा मात्र आहे व आपसात बढ़ाई मिरविण्याचा (खेळ) आहे. आणि संपत्ती व संततीच्या बाबतीत एकमेकांच्या पुढे जाण्याची (व्यर्थ) स्पर्धा आहे. (पण) यानंतरच्या (अनंतकालीन) जगात (दोन परिणाम) पुढे येतील (पहिले श्रद्धाहीनांसाठी) कठोर शिक्षा व (दुसरे श्रद्धावंतांसाठी) क्षमा व (अल्लाहची प्रसन्नता). तर या जगातील जीवनात, दुसरे काही नसून केवळ क्षणभंगूर व फसवे सुख आहे. (लोकांनो!) तुम्ही आपल्या पालनकर्त्याच्या क्षमेकडे धाव मारा व (तशीच) स्वर्गाकडे (धाव मारा).'' – ५७:२०–२१.

उपरोक्त प्रतीक योजना सूत्र–रूपाने अशी मांडता येईल :

(१) इश्क़–प्रेम–पक्षी अर्थात परमेश्वर, (२) पक्षांच्या दोन बाजू (पिसारे) अर्थात परमेश्वराची जलाली व जमाली (रुद्र आणि भद्र) अशा दोन प्रकारची सगुण नावे, (३) पाच–पाचशे पंख म्हणजेच परमेश्वराची पाच–पाचशे अशी (जलाली व जमाली) सहस्त्र नावे. भावार्थाने परमेश्वराच्या अनंत नावांचे द्योतक, (४) दोन पिसारे हे भय आणि आशा या दोन प्रेरणांचे द्योतक आहेत, (५) तो (एक) पक्षी म्हणजेच तो एक परमेश्वर होय.

**६) आध्यात्मिक अनुभूती : व्यक्तित्वाची भूमिका**

'फ़ना'मध्ये भक्ताच्या व्यक्तित्वाचे विलय होऊन जाते. म्हणून येथे व्यक्तित्व संकल्पनेचा विषय उपस्थित होतो. भक्ताचे व्यक्तित्व परमेश्वराच्या व्यक्तित्वामध्ये विलीन होते, निमग्न होते. म्हणून सर्वप्रथम आपण परमेश्वराचे व्यक्तित्व म्हणजे काय हे जाणून घेऊ. इस्लामी संदर्भाच्या पार्श्वभूमीमध्ये 'दिव्य व्यक्तित्वाची' संकल्पना तितकीशी स्पष्ट होत नाही. म्हणून आपणास शब्दकोशास शरण जावे लागेल. म्हणून शब्दकोश असे सांगतो की 'व्यक्तित्व' म्हणजे 'शख़्सियत'; परंतु 'शख़्स' म्हणजे 'एक व्यक्ती', 'एक इसम' या अर्थी तो 'अल्लाह'स म्हणजेच परमेश्वरास खरोखर लागू होत नाही. तथापि एक हदीस (प्रेषित–वचन)मध्ये अल्लाहच्या संदर्भात असे निवेदन आहे, ''ला शख़्स अग़यरू मिन् अल्लाहि'' म्हणजेच ''अल्लाविषयी जास्त हेवा करणारा असा (दुसरा) कोणीच इसम (कोणतीच व्यक्ती) नाही.'' 'हुव' म्हणजेच 'तो' या सर्वनामापासून बनलेले एक भाववाचक नाम 'हुवियत' ('तदत्त्व') हे व्यक्ती वा इसमाऐवजी व्यक्तित्व दर्शविते. सर्व कल्पनांचा समावेश असलेले निरपेक्ष दैवी सत्तत्व या अर्थी काही सूफ़ी या (शब्दा)चा वापर करतात; जसे बी मध्ये वृक्ष हा सुप्त, अव्यक्त अवस्थेमध्ये विद्यमान असतो तद्वत व्यक्तित्व असते. दुसरा शब्द 'ज़ात' (सत्ता) आहे. हे ईश्वराचे नाम आहे. ते रूपा (गुणां)हून भिन्न आहे. ते ईश्वराचे सत्तत्व व्यक्त करते. 'ज़ात'मुळे पदार्थ त्याचप्रमाणे व्यक्तीचे सत्तत्त्व याचा निर्देश होतो. इस्लामी धारणेनुसार अल्लाहस 'फ़र्द' म्हणजेच एकमेव, आणि तत्सम कोणीच नसल्याचे अर्थातच एक अद्वितीय व्यक्तित्व असल्याचे मानले जाते. या संदर्भात प्रा. सी. सी. जे. वेब्ब यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते म्हणतात : ''भक्त आणि ईश्वर यांच्या दरम्यान असलेले संबंध पाहता, फक्त **वैयक्तिक संबंध** या अनुषंगाने, काय त्या ईश्वराचे वर्णन वैयक्तिक स्वरूपात योग्य प्रकारे करता येऊ शकते? आणि शिवाय असे की अति सर्वात्मता आणि अति परत्वता यांच्यावर आराध्य विषयाच्या अति दाबामुळे असे वैयक्तिक संबंध समानपणे वगळले जातात. (प्रा. सी. सी. जे. वेब्ब – गॉड अँड पर्सनॅलिटी, पृ. ४६)

सूफ़ींची अशी धारणा आहे की एकेश्वरवादाचे आकलन बुद्धीद्वारे होत नसते, परंतु ईश्वराच्या अनुमतीने, आपल्या आध्यात्मिक अनुभूतीमध्ये जाणीव असलेल्यांना याचे गूज उघडले जाते. ईश्वराशी प्रेम करण्यासाठी व त्याला जाणण्यासाठी सूफ़ीने स्वत:स विलीन केल्याशिवाय एकत्त्ववादी यास ईश्वर एकच असल्याची जाणीव संपूर्णपणे होणे अशक्य आहे. ''मानवी स्वभावाच्या संपण्यामध्ये दैवी स्वभावाची निरपेक्षते (केवलतत्त्वते)ची ओळख होणे,'' की जेणेकरून ''माणसाची अंतिम अवस्था ही मागे फिरून प्रथम अवस्था बनते आणि अस्तित्वापूर्वी तो जसा होता तसाच पुन्हा बनतो (होतो).'' (अबू नसर सर्राज – 'किताब अल्-लुमा', पृ. २९, ११). तो सिद्धान्त ज्या क्षणी अशा एका धर्माच्या विरोधात उभा राहिला की ज्यामध्ये ज्ञान आणि प्रेमाच्या विषय स्वरूपात परमेश्वराची आराधना केली जाते – कारण, त्या क्षणी एक पूर्ण परत्वाच्या सिद्धान्ताने मानवी व्यक्तित्वाचे दैवी व्यक्तित्वाच्या गूढ ऐक्यापर्यंत सरळ घेऊन जाणे, हे अटळ (अपरिहार्य) होते (ठरते.) ईश्वर आणि मानवामधील अनंत अंतर फक्त ईश्वरच नाहीसा करू शकतो; मानवामध्ये हे अंतर कमी करण्याचे सामर्थ्य नसते. सर्वशक्तिमानाच्या संकल्पामुळे हे दुर्लक्षित होते. आध्यात्मिक तंद्रेच्या किंवा भावोल्हासाचा संपूर्ण सिद्धान्त आणि सरावाच्या पाठीमागे ही संकल्पना आहे. सूफ़ी यावर अत्यंत भर देतात. आपल्या इंद्रियानुभवातील वैभवामुळे, जो ईश्वर अकस्मात एक प्रखर ज्योत स्वरूपात स्वत:स अनिर्वचनीय – शब्दातीत नैकट्या (सान्निध्या)मध्ये प्रकट करतो, याच्या प्रभावामुळे द्रष्टाचा चेतन जीवात्मा का बरे नाहीसा होणार नाही? विषयी आणि विषयमधील भेद संपूर्णपणे का बरे नष्ट होऊ नये? कारण इथे ईश्वरच सर्वस्व असतो, त्याच्या व्यतिरिक्त कोणीच नसते.

आपल्या भक्ताशी असलेल्या वैयक्तिक संबंधावर ईश्वराचे व्यक्तित्व अवलंबून असले पाहिजे, आणि अशा वैयक्तिक संबंधाशी एक तर अति सर्वात्मवाद सिद्धान्त किंवा अति परत्व सिद्धान्त विसंगत असला पाहिजे. 'अनल हक़' ('अहं ब्रह्मास्मि') अर्थात 'मी ईश्वर आहे' या गर्जनेचे पुरस्कर्ते सुप्रसिद्ध सूफ़ी संत मन्सूर हल्लाज समर्थपणे असे प्रतिपादन करतो की ईश्वर हा इंद्रियानुभवातीत आहे. आणि म्हणून विश्वंभराने नेहमी विश्वापासून स्वतंत्र (वेगळे) राहिले पाहिजे. यात मुळीच शंका नाही की, 'फ़ना' म्हणजेच निर्वाणाची, संभूतीची अनुभूती ही एक वैयक्तिक ईश्वराच्या श्रद्धेशी सुसंगत अशीच आहे. उद्दिष्टाच्या दृष्टीने पाहता तीच अनुभूती सर्वेश्वरवादासाठी एक आधार ठरते. 'निर्वाण' अवस्थेमध्ये व्यक्तित्वाचा अध्यास कायमचा नाहीसा होतो. 'फ़ना'चा दृष्टिकोन नकारात्मक स्वरूपाचा आहे, तर 'बक़ा'चा दृष्टिकोन सकारात्मक आहे. 'फ़ना' म्हणजेच निर्वाणच्या निषेधात्मक सिद्धान्ताचे समर्थक फ़ारसी सूफ़ी बायज़ीद बिस्तामी हे होते, तर 'बक़ा' अर्थात शाश्वततेच्या विधायक सिद्धान्ताचे पुरस्कर्ते होते अबू सईद अल्-ख़र्राज़. सूफ़ी साधकाचे अंतिम उद्दिष्ट जीवात्म्याचा मृत्यू नसून ('फ़ना') ईश्वरामधील शाश्वत जीवन ('बक़ा') असते.

परमेश्वराशी ऐक्य साधणे किंवा त्याच्याशी तल्लीन होणे, निमग्न होणे अथवा एकरूप होणे हे सूफ़ीचे परम उद्दिष्ट असते. 'अल-हक्क'शी पुन्हा 'एकत्व' साध्य करणे हे सूफ़ी-साधनेचे सर्वोच्च ध्येय असते. सूफ़ी साधक जेव्हा हे पाहतो आणि जेव्हा त्याला अनुभूती होते की समस्त क्रिया आणि अस्तित्वांचा एकमात्र कारण परमेश्वराची शक्ती आहे आणि हे समस्त दृश्य जग त्याची अभिव्यक्ती मात्र आहे, तेव्हा तो त्या गूढास जाणू इच्छितो. त्याला हे माहीत असते की त्या गूढाचे भेदन तर्क आणि बुद्धीचा विषय नसतो. त्याला जाणण्यासाठी

मनुष्यास साधनेद्वारे स्वत:स तत्पर ठेवावे लागते की जेणेकरून त्या ज्योतीच्या एका किरणास आपल्या हृदयामध्ये ग्रहण करावे आणि त्या किरणाच्या प्रकाशामध्ये 'अल्-हक्क' अर्थात परमेश्वरास पाहू शकेल. त्याला माहीत असते की हे असत् जग आरशाप्रमाणे त्याच्या नाम-गुणांना प्रतिबिंबित करते आणि मनुष्य आपल्यामध्ये या समस्त ब्रह्मांडास लपवून परमेश्वराच्या सर्व गुणांना प्रतिबिंबित करीत आहे. परंतु मनुष्य एवढ्या ज्ञानावरच संतुष्ट राहात नाही. या गूढास ओळखणे मात्र आपले उद्दिष्ट मानत नाही, परंतु त्याच्याही पुढे जाऊन तो त्या परम सत्याशी एकरूप होऊ इच्छितो. हे परम सत्यच सर्वांचे उगमस्थान आणि सर्वांचा परिचालक आहे. त्याचीच सत्ता एकमात्र सत्ता आहे आणि तोच एकमात्र शक्ती आहे. **आधुनिक सूफ़ी संत हज़रत इनायतखान** असे मत नोंदवितात की जगात केवळ एकच सत्य आहे. हे सत्य आपल्याच मनात दडलेले असते. ज्यावेळी आपल्याला या सत्याविषयीचे ज्ञान अवगत होते तेव्हाच आपल्याला परमेश्वराची आत्मानुभूती होते.

परमेश्वराशी एकरूप झालेल्या अवस्थेचे वर्णन करणे अत्यंत अशक्य आहे. या अवस्थेपर्यंत पोहोचणे सर्वांना शक्य नाही. प्रेषित आणि उच्च श्रेणीचे संत असे काही थोडेच, परमेश्वराच्या कृपेने त्या अवस्थेपर्यंत पोहोचतात. त्यांच्या जीवनामध्ये कधी तरी असे क्षण येतात, की जेव्हा ते समस्त इंद्रियगत विषयांपासून अतीत होऊन जातात आणि त्या आध्यात्मिक जगास ते पाहू लागतात. त्या जगामध्ये स्थल-काळ नावाची कोणतीच वस्तू नसते. सर्व पदार्थांचा उगमस्थळ असलेल्या त्या परम-सत्यास ते प्रत्यक्ष पाहू लागतात. ते या पदार्थांमध्ये अभिव्यक्त होणारे एकमात्र सत्य असते. त्याच्या महात्म्यांचे अनुभव आणि कथनांच्या आधारे सूफ़ींची 'एकरूप' होण्याची अवस्था आणि आध्यात्मिक जगाच्या इतर रहस्यांना जाणण्याचे प्रयत्न केले जातात. ही अनुभूती स्वत:च अशी असते की तिला सर्वसामान्य भाषेमध्ये अभिव्यक्त करणे अशक्य असते. म्हणून त्यांना समजण्याकरिता संकेत आणि प्रतीकांची मदत घ्यावी लागते. त्या अवस्थेस पोहोचलेले साधक पण त्यांना स्पष्ट करण्यासंबंधी आपली असमर्थता व्यक्त करतात.

अशा प्रकारे आपण पाहतो की सूफ़ींचे परम उद्दिष्ट परमेश्वराशी एकरूप होणे हे आहे आणि याला अंतिम उद्दिष्ट मान्य करण्यापाठीमागे पवित्र कुराणामधील एक प्रसंग आहे. सूफ़ी या प्रसंगाची चर्चा वारंवार करतात आणि त्याचे भाष्य त्यांचे आपले असे विशिष्ट आहे. असे म्हटले जाते की सृष्टी निर्माण करण्याअगोदर परमेश्वराने त्या सर्व अशरीरी आत्म्यांना आपल्यासमोर बोलाविले की ज्यांना पृथ्वीवर विकास करण्यासाठी पाठवायचे होते आणि तो त्यांना म्हणाला की, ''काय मी तुमचा प्रभू नाही?'' प्रत्येक आत्म्याने उत्तर दिले 'होय' आणि याचीच सूफ़ी वारंवार आठवण करतात की त्याच परम सत्याचा शोध घ्यायचा आहे आणि त्याच्यापाशी पोहोचणे हे आत्म्याचे उद्दिष्ट आहे, कारण की तेथेच त्याला शांतीचा लाभ होणार आहे. आत्म्याच्या परमात्माकडील यात्रेचे जे अनुभव आहेत आणि 'एकरूप' होण्याच्या अवस्थेची जी अनुभूती आहे, त्याचे वर्णन सूफ़ी साधक भावाविष्टतेच्या अवस्थेमध्ये करतात. आत्म्यासंबंधी उपरोक्त प्रसंग पवित्र कुराणाच्या शब्दांमध्ये असा आहे - ''जेव्हा तुझा विधाता आदमच्या संततीच्या कमरेतून त्यांची अपत्ये काढतो आणि त्यांनाच त्यांच्याविरुद्ध साक्षी बनवतो (व विचारतो की) 'मी तुमचा विधाता नाही नाही काय?' ते म्हणतात, 'होय, आम्ही या गोष्टीस साक्ष आहोत.' (हे अशासाठी करतो की) पुनरुत्थानाच्या दिवशी तुम्ही असे म्हणू नये की आम्ही याविषयी खरोखर अनभिज्ञ होतो.'' - ७:१७२.

सूफ़ी साधक आणि कवी शर्फुद्दीन उमर इब्नुल फ़रीद याने साधनेच्या क्षेत्रामध्ये तीन प्रकारच्या अनुभूतींचा उल्लेख केलेला आहे – (१) प्राकृत, (२) अ-प्राकृत आणि (३) अति-प्राकृत. साधारण व्यक्तींच्या बहुविध आणि परिवर्तनशील अनुभवास 'प्राकृत' म्हटले जाऊ शकते. यामध्ये साधक हा नाना प्रकारच्या चिंता आणि अनुभूतींचा शिकार (भक्ष्य) बनलेला असतो. 'अ-प्राकृत' अनुभूती ती असते की ज्यामध्ये 'प्राकृत' अनुभूतींचे अवसान आणि भावोल्हासाचे आधिपत्य असते आणि 'अति-प्राकृत' अनुभूती यानंतरची गोष्ट आहे. त्या वेळेस सर्व अनुभूतीचे पर्यवसान 'एकत्वा'मध्ये होऊन जाते. साधकास परमेश्वराशी 'एकत्व'तेचा बोध होतो. परमेश्वराच्या सत्तेमध्ये त्याची स्थिती असते. पहिल्या अवस्थेमध्ये साधक स्वत: आणि परमेश्वरा दरम्यान असलेल्या अंतरास ओळखतो. परमेश्वराहून भिन्न असलेल्या आपल्या सत्तेचे त्याला भान असते. दुसऱ्या अवस्थेमध्ये या भिन्नत्वाचे तिरोभाव होऊन जाते. त्याला आपली आणि परमेश्वराच्या सत्तेचे ज्ञान असत नाही. भावोल्हासाची – सहजानंदाची ही अवस्था कधी समाप्त होते तर कधी कधी कायम असते. आणि याच्यानंतर तिसरी अवस्था येते. या तिसऱ्या अवस्थेमध्ये त्याला अलौकिक ज्ञान प्राप्त होते, आणि तो स्वत:स परमेश्वराहून वेगळे भिन्न मानीत नाही, जणू की तो परमेश्वरामध्येच निवास करीत आहे. परंतु त्या अवस्थेमध्ये त्याला याची पण जाणीव असते की तो परमेश्वराची सृष्टी आहे, आणि त्याच्याशी एकत्वाची – एकरूपतेची जाणीव असताना सुद्धा त्याला आपल्या वेगळे-स्वतंत्र सत्तेचे भान असते.

आता प्रश्न असा उपस्थित होतो की, परमेश्वराचे प्रत्यक्ष दर्शन कसे केले जाऊ शकते? त्याच्या विभूतीचे दर्शन करणे कसे शक्य होऊ शकते? पवित्र कुराणामध्ये ज्या परमेश्वराविषयी म्हटले गेले आहे की ''अल्लाह आकाशांचा व पृथ्वीचा प्रकाश आहे.'' – २४:३५. त्याला मनुष्य आपल्या डोळ्यांनी कसे पाहू शकेल? सूफ़ींचे म्हणणे आहे की त्याला या डोळ्यांनी पाहाता येत नाही – पाहाता येऊ शकत नाही. त्याला हृदयाच्या अंतर्दृष्टीने पाहाता येते. असे म्हणतात की अदृश्य जगामध्ये जे लपलेले आहे त्यास विश्वासाच्या प्रकाशामध्ये पहाण्याचे नाव 'अंतर्दृष्टी' आहे, आणि हा स्वयंभूत विश्वास की ज्याच्या मदतीने हृदय परमेश्वरास पाहाते. तो (विश्वास) परमेश्वराच्या ज्योतीची एक राशी (किरण) आहे. परमेश्वरच याला हृदयामध्ये घालणारा आहे. जर असे नसते तर त्याला पाहाणे शक्य झाले नसते. फक्त एवढेच नव्हे तर जो प्रकाश साधकाच्या हृदयास आलोकित करतो तो दूरदृष्टी ('फ़िरासत')ची अलौकिक शक्ती पण प्रदान करतो. या शक्तीसंबंधी सूफ़ींमध्ये मतभेद आहे. काही म्हणतात की आत्मा हा अनादि आहे आणि दूरदृष्टीची ही दिव्य शक्ती आत्म्यासोबतच परमेश्वराने दिली आहे. सनातनपंथी सूफ़ींना हे मान्य नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की दूरदृष्टीची शक्ती ही ज्ञान आणि निरीक्षण शक्तीच्या परिणामस्वरूप प्राप्त होते. हिला परमेश्वराने निर्माण केले आहे. तो आपल्या कृपापात्रांना अनुग्रहपूर्वक हिचे वाटप करतो. सच्चा – खरा श्रद्धावंत हा अल्लाहच्या ज्योतिच्या मदतीने (आश्रयाने) पाहातो.

आणखी एक प्रश्न शिल्लक उरतो, तो हा की परम उद्दिष्टाची प्राप्ती कसे होऊ शकेल? याला असेही पण म्हणता येईल की त्या परमेश्वरास कसे प्राप्त करावे? तो इंद्रियांनी ओळखला जाऊ शकत नाही, कारण की तो भौतिक जगाच्या अतीत (पलीकडे) आहे. बुद्धीने पण त्याला ओळखले जाऊ शकत नाही, कारण तो तर्कापलीकडे आहे, सीमेच्या पलीकडे तर्काची गती (उडी) नसते. जर (धर्म) ग्रंथांच्या सूक्ष्म अभ्यासाने प्राप्त

करावे तर तेही अशक्य आहे, कारण पुस्तकी-विद्या ही आमच्या अहंभावनेस फक्त उत्तेजन देऊ शकते. परंतु ती गोष्ट देऊ शकत नाही की जिच्यामुळे परमेश्वरास ओळखता येते. वाग्जालामध्ये सत्य लपून जाते.

सूफ़ी म्हणतात की परमेश्वरास तोच ओळखतो जो स्वत:स ओळखतो. सूफ़ी-साधकाचे म्हणणे असते की, परमेश्वराचे साम्राज्य अंत:करणामध्ये असते. त्यालाच ओळखायचे आहे. त्याला ओळखल्याशिवाय परमेश्वराला ओळखता येऊ शकत नाही. स्वत:स ओळखणे म्हणजेच आत्म्यास ओळखणे आहे. परंतु या मार्गामधील अडथळा म्हणजे अ-सत्‌चा पडदा होय. परम-सत्तेचे दर्शन करण्यासाठी या असत्‌वर विजय मिळविले पाहिजे. त्याच्यावर अज्ञानाची धूळ पसरलेली आहे. तिला स्वच्छ केले पाहिजे. म्हणून अ-सत्‌वर विजय मिळविण्यासाठी आत्म्यावर विजय प्राप्त करावे लागेल, कारण त्याच्यामुळेच आमच्या अवती भोवती चारी दिशेस माया-जाल पसरलेले आहे आणि त्यालाच आम्ही सत्य समजून असतो. म्हणून आत्म्यावर विजय प्राप्त करून आणि त्याचे खरे ज्ञान प्राप्त करून साधक आपले परम उद्दिष्ट साध्य करू शकतो आणि या आत्म्यावर सूफ़ींच्या मते प्रेमाच्या साहाय्याने विजय मिळविले जाऊ शकते. शिवाय प्रेम आणि ज्ञान ही सूफ़ी साधना-रथाची दोन चाके आहेत, आणि त्यांचा सारथी आहे परमेश्वर!

### ७) सूफ़ींचे अध्यात्म-विश्व : रूपरेषा

धर्म आणि अध्यात्म हे दोन्ही खांद्यास खांदा लावून चालत असतात. कारण या दोघांचे प्रमेय सामाईक आहे. ते प्रमेय आहे ईश्वर, जीव म्हणजेच मानव आणि जगत्. धर्माची उदात्त तत्त्वे ही अध्यात्माचे घटक ठरतात. ईश्वर हा धर्माप्रमाणेच आध्यात्म-विश्वाच्या केंद्रस्थानी असतो. ईश्वराचे स्वरूप आणि त्याच्या लीला सूफ़ी संत उघड करून सांगतात. मानवनिर्मितीचे प्रयोजन ईश्वराची भक्ती करणे हा आहे. म्हणून परमेश्वराची भक्ती ही मानवाचे आद्य कर्तव्य ठरते. याशिवाय उत्तम व यशस्वी जीवन जगण्याचा मंत्र परमेश्वर आपल्या दैवी ग्रंथामध्ये आज्ञा स्वरूपात मानवासमोर मांडतो. उदात्त नीतिमत्ता जपणे हे यशस्वी जीवनासाठी अत्यंत प्रेरक असा घटक आहे. सर्व मानव ही परमेश्वराची लेकरे आहेत. प्रेमाने ईश्वराशी ऐक्य साधता येते. परमेश्वराला प्रत्येक मानवाच्या उद्धाराची चिंता असते. मानवाच्या आध्यात्मिक उन्नतीला सहायभूत होणे हेच तर मुळी जगताचे प्रयोजन आहे. गृहस्थाश्रमी जीवन हे आध्यात्मिक मिलन असून ईश्वराच्या आणि मानवाच्या सेवेचे साधनच आहे. नि:स्वार्थीपणा हा आध्यात्मिक मिलन असून ईश्वराच्या आणि मानवाच्या सेवेचे साधनच आहे. नि:स्वार्थीपणा हा आध्यात्मिक उद्धाराची पहिली पायरी आहे, असे गीता सांगते. कारण जेव्हा मनुष्य या पातळीपर्यंत पोहोचतो तेव्हा त्याचा अहंपणा लोप पावतो.

मानव समूहप्रिय प्राणी आहे. समाजात राहताना प्रत्येकाचे कर्तव्य ठरविण्याचे कार्य धर्म करीत असतो. अहिंसा, सत्य, सदाचार, शुचिता, प्रभु नाम-स्मरण अशा प्रकारच्या धर्माज्ञा असतात. नित्य कर्मे करणाऱ्याला पुण्य मिळते, स्वर्गवास घडतो अशा संकल्पना मांडल्याने धर्माज्ञांचे पालन करण्याची प्रेरणा मिळते. या आचारांमागचा विचार समजण्याचे शास्त्र म्हणजे **अध्यात्म**. धर्माज्ञांचा अर्थ समजून घेणे हा आध्यात्मिक प्रकृतीचा विषय आहे. अध्यात्माचा पाठपुरावा करणारी व्यक्ती पुण्य मिळवू इच्छिते. ही शांती याच जन्मी, इथेच हवी असते; तर मिळालेल्या पुण्याचे लाभ मृत्यूनंतर, पुढच्या जीवनात स्वर्गात जाण्याने मिळणार असतात.

धर्म संपूर्ण विश्वाचे 'सत्' आहे, त्याचे प्राणतत्त्व आहे. धर्म अखिल ब्रह्मांडाच्या अस्तित्वाचा आधार आहे. ते जीवनाचे सत्य आहे. तात्विक धर्म सह-अस्तित्वाचा धर्म आहे. 'सर्वधर्म समभाव' तिचा स्वभाव आहे. हाच तात्विक धर्म विश्वधर्म आहे.

धर्म सर्वांचे उपजीवन आणि लोकस्थितीचा कारण आहे; संपूर्ण ब्रह्मांडाचा उन्नायक आणि पोषक तत्त्व आहे; आत्म्यास निरोगी राखण्यासाठी मूल्यांचे अनुसंधान आहे, पूर्णतेच्या दिशेमध्ये अग्रेसर होण्याचा यशस्वी प्रयत्न आहे; समग्र विश्वाप्रती प्रेमाचे उत्स आणि नैतिकतेचा संस्थान आहे. धर्म जगामधील वस्तूंच्या आत-बाहेर असलेल्या सत्याचे दर्शन घडविणे आहे.

वास्तविक, धर्म सत्याची अनुभूती असते. संपूर्ण ब्रह्मांड धर्माचे साक्षात रूप आणि अभिव्यक्ती आहे. धर्म समस्त आत्म-सन्मानाची विधायक अशी एक वृत्ती आहे.

धर्माच्या काही महत्त्वपूर्ण व्याख्या अशा आहेत – टायलरचा विचार आहे – ''धर्म आध्यात्मिक सत्तेमध्ये विश्वासाचे नाव आहे.'' आध्यात्मिक सत्ता लौकिक जगापलीकडील सत्ता आहे. लौकिक सत्ता अपूर्ण आहे. मनुष्य संपूर्णत्वास प्राप्त करून अभाव, भय आणि सीमेपासून मुक्त होऊ इच्छितो. यास्तव, तो आध्यात्मिक सत्तेस शरण जातो. जर्मन तत्त्वज्ञ कांटचा दृष्टिकोन आहे – ''धर्म दैवी अथवा ईश्वरीय आदेश स्वरूपात समस्त कर्तव्याची मान्यता आहे.'' कांटचा असा विश्वास आहे की, कर्तव्य ईश्वरीय आदेश स्वरूपामध्ये मानवास प्राप्त होतात. कर्तव्यांचे सम्यक् स्वरूपात पालन आणि संपादनच खरी ईश्वर-पूजा आहे. मॅथ्यू आर्नल्ड म्हणतो, ''भावनायुक्त नैतिकतेचे नाव धर्म आहे.'' सुप्रसिद्ध समाज-शास्त्रज्ञ दुर्खीम याचे कथन आहे की, ''धर्म पवित्र वस्तूंशी निगडित विश्वास आणि आचरणांची अशी एक समग्र व्यवस्था आहे की यावर विश्वास करणाऱ्यांस एका नैतिक समुदायाशी जोडते.'' जेम्स मार्टिन्यू यांच्या दृष्टिमध्ये, ''धर्म एका चिरंतन ईश्वरामध्ये विश्वास आणि त्याची आराधना आहे. हे ते अतिमानस आणि दैवी संकल्प आहे की जे अखिल ब्रह्मांडावर शासन करते आणि मानवतेस नैतिक सूत्रांमध्ये गुंफविते.''

धर्म संपूर्ण मानव-मनाची प्रतिक्रिया असते. 'संपूर्ण मानव-मन' हे ज्ञान, भावना आणि संकल्पाची समष्टि असते. ज्ञानाशी अनुकूल भावना असली पाहिजे आणि भावनेशी अनुकूल क्रिया. धर्माचा प्रासाद विश्वासाच्या मजबूत पायावर उभा असतो. धार्मिक चेतनेच्या मुळाशी आध्यात्मिक असंतोष असतो. ज्ञानास भावनेच्या रंगामध्ये रंगून क्रियात्मक रूप प्रदान करण्यामध्येच धार्मिक चेतनेच्या समस्येचे समुचित समाधान असते. तत्त्वज्ञान विरहित आचरण हे पाखंड असते. भावनेच्या समस्येचे समाधान श्रद्धेमध्ये असते आणि क्रियेच्या समस्येचे समाधान आत्म-संयमामध्ये असते. विवेकामुळे आध्यात्मिक तत्त्वाचे ज्ञान होते. ज्ञानोदयानंतर आध्यात्मिक सत्तेप्रती श्रद्धा उत्पन्न होते. श्रद्धेने भावविभोर झालेली व्यक्ती आध्यात्मिक तत्त्वाप्रती क्रियाशील (सक्रिय) असते. कर्मकांड आणि उपासना-विधान याच क्रियेचा परिणाम आहेत.

धार्मिक चेतना आध्यात्मिक भुकेचा परिणाम असते. ती विवेकपरक असते. ज्ञान धार्मिक चेतनेचा जनक असतो. सांख्य-दर्शनाच्या मते ज्ञानामुळेच मोक्ष प्राप्त होते आणि अज्ञान बंधनाचे कारण बनते. मनुष्य एक विचारशील प्राणी आहे. तो आध्यात्मिक प्रगतीसाठी व्याकुळ असतो. भौतिक समृद्धीच त्याच्यासाठी सर्वस्व नसते. याच्यापुढे जाऊन तो आध्यात्मिकतेप्रती सर्वार्पण करू इच्छितो.

धार्मिक चेतनेची खरी अभिव्यक्ती भक्त आणि ईश्वराच्या तादात्म्य संबंधामध्ये होते. श्रद्धेविना धार्मिक चेतना अशक्य आहे. 'आत्मपरमात्मैक्य भाव' धार्मिक चेतनेचा मूळ मंत्र आहे. आराधक आणि आराध्य यांचे एकाकार होणे हे भावनापरक असते. भावनेमुळे हृदयामध्ये धार्मिक किंवा आध्यात्मिक चेतनेची लहर उत्पन्न होते आणि क्रियेमुळे तिचे व्यावहारिक पक्ष समृद्ध बनते.

खऱ्या आध्यात्मिक (धार्मिक) चेतनेसाठी इंद्रिय-निग्रह एक आवश्यक अट असते. इंद्रियांना विवेक संयमित करतो, भावना नव्हे. इंद्रिय-निग्रहानंतरच व्यक्तीच्या हृदयामध्ये आध्यात्मिक चेतना उगम पावते. विवेकच धर्म-अधर्माचा मीमांसक असतो. पाश्चात्य तत्त्वज्ञ व्हाइटहेडच्या मते, धर्म व्यक्तीच्या एकान्त जीवनामध्ये केले गेलेल्या क्रियेचे नाव असते.

श्रद्धा, विश्वास किंवा अंतर्दृष्टीचे नाव धर्म आहे. म्हणून श्रद्धा ही धर्माचा गाभा असते. श्रद्धा किंवा विश्वास आत्म्याची अंतर्दृष्टी असते. ज्याप्रमाणे शारीरिक इंद्रियांनी भौतिक पदार्थ हाताळले जातात, त्याचप्रमाणे श्रद्धेच्या प्राणशक्तीने आध्यात्मिक भाव ग्रहण केले जातात. आध्यात्मिक साधना, साधकामध्ये श्रद्धामूलक अंतर्दृष्टी निर्माण करून प्रत्यावर्तनाच्या प्रेरणेस जागृत करते. सूफ़ी साधकाचे संपूर्ण जीवन सत्याच्या प्रयोगामध्ये व्यतीत होते. ते अखिल सृष्टीच्या कणा-कणामध्ये आत्मछबी पाहतात. द्वैताचा त्याग करणे व अनासक्त प्रेम वाढविणे हेच सर्व धर्मांचे सार आहे. सूफ़ी साधक याचे प्रबळ समर्थक आहेत.

प्राचीनकाळी आचार-नीतीस धर्मस्वरूपात ग्रहण केले जाई. इहलोक आणि परलोक सुधारण्यासाठी मनुष्यासाठी आचार-नीतीचे आचरण करणे परम कर्तव्य समजले जाई. नैतिकानुशासनाच्या मुळाशी दोन प्रकारचे विचार कार्य करतात. पहिल्या विचारानुसार दैवी-विधान अत्याज्य आहे आणि दुसऱ्या मतानुसार नैतिकता किंवा आचार नीति आनंद प्राप्तीचे मनोरम माध्यम आहे. पूर्णाकडे जाण्याच्या अंतःकरणातील नैसर्गिक तळमळीमुळे मनुष्य जो प्रयत्न करतो तीच नीती होय. आपल्या हृदय-सिंहासनी विराजमान झालेल्या आत्मराजाची ती आज्ञा होय. जडत्व व चैतन्य यांच्यामधील सांध्यावर मनुष्य उभा आहे. मनुष्य प्राणी हा दैवी व आसुरी वृत्तींच्या युद्धाचे कुरूक्षेत्र असल्यामुळे नीतीच्या प्रश्नाला फार महत्त्व आहे. माणसाचा जन्म जणु या युद्धासाठीच आहे व त्याचा विकासही या युद्धातूनच होतो.

आत्मसाक्षात्कार हे नीतीचे ध्येय आहे. आत्मस्वरूपी स्थिर झालेल्या पुरुषाचे आचरण हेच नैतिक आचरण होय. इंद्रियसुख आणि वासनातृप्ती म्हणजे नैतिक जीवन नव्हे. बुद्धी व ज्ञान हे नैतिक जीवनाचे आधार आहेत. जीवन हा एक यज्ञ आहे व तप, दान, सरलता, अहिंसा व सत्यवचन या त्या यज्ञाच्या दक्षिणा आहेत. या पाच गुणांमध्ये वैयक्तिक व सामाजिक नीतीचा अंतर्भाव होतो. काम, क्रोध व लोभ हे माणसाचे शत्रू असल्यामुळे त्यांना जिंकण्यासाठी दम, दया व दान या गुणांची उपासना केली पाहिजे.

धर्मश्रद्धा हा नीतीचा पाया आहे. तिच्याशिवाय नैतिक आचरण करण्याला माणसाला स्फूर्ती किंवा धैर्य मिळणार नाही. जगात सर्वत्र संघर्ष, दुःख आणि अमंगलता दिसत असली, तरी जीवनाचे अंतिम स्वरूप मंगल व आनंदमय आहे असे वाटणे हीच धर्मश्रद्धा होय. या धर्मश्रद्धेमुळेच माणसे जीवनातील आपत्ती आणि अपयश सहन करूनही नैतिक आचरणावर अढळ राहू शकतात. धर्मश्रद्धेशिवाय नीती म्हणजे अप्राप्यासाठी चालविलेली अखंड धडपड होय. अशा जीवनात शांती व समाधान यांचा कधी लाभ होणार नाही. यासाठी नैतिक जीवन

ईश्वरमय व सेवामय बनते. या अवस्थेला पोचलेल्या पुरुषाला जीवनात नीतीच्या विधिनिषेधांना काही प्रयोजन उरत नाही. तो आत्मसंपन्न पुरुष पुण्य व पाप या कल्पनांच्या पलीकडे जातो. तो सत्कर्माने मोठा होत नाही व असत्कर्माने लहान होत नाही. त्याला काही केल्याने वा न केल्याने ताप होत नाही. दीप उजळताच गाढ अंधकार एकदम नष्ट होतो. तेथे अमंगलाला अवकाशच कोठला? हीच ती ब्राह्मी स्थिती किंवा सिद्धावस्था होय.

अध्यात्म-विज्ञानानुसार मानवी मनोवृत्तीच सर्व काही असते. मन शाई शुष्क करणाऱ्या कागदासारखे असते. शाईचा जो रंग असेल तोच रंग त्याच्यावर उमटतो. अधिकांश लोकांची मने आपल्या परिसराच्या रंगामध्ये रंगून जातात. ते दुष्प्रभावाखाली लवकर येतात. सत् प्रवृत्तीकडे महत् प्रयासाने वळतात. ज्याने विचार करणे, बुद्धीचा सदुपयोग करणे, बऱ्या-वाईटास ओळखणे. आपली इच्छाशक्ती वा सृजनात्मक शक्तीचा उपयोग करून घेणे बंद केले असेल; तर तो अगोदरच मृत (मेलेला) असतो.

हे लक्षात घ्या, साधकाच्या इच्छा-शक्तीमध्ये ईश्वराची सर्वशक्तिमान शक्ती निहित असते.

एखाद्या कुविचाराच्या विषाने एकदा का अहंकारामध्ये आपले बस्तान बसवून घेतले की मग त्याला बाहेर काढणे अत्यंत कठीण होते. जेव्हा कुविचारांचे विष मनामध्ये पूर्णपणे फैलावते तेव्हा मनाची शक्ती त्याच्या विरोधात काहीच करू शकत नाही. म्हणून आत्मनिरीक्षण आणि आत्मपरीक्षण करण्याची गरज असते. आत्मपरीक्षणाने आत्म-ज्ञान झाल्यानंतर आत्मविश्लेषण करता येऊ शकते. हे एकदा शक्य झाले तर आत्म-विजय काही फार लांबची गोष्ट नसते. आपल्या अहंकारावर विजय प्राप्त करून ईश्वराच्या दरबारामध्ये आपले स्थान पुन्हा ग्रहण करणे, हे सूफ़ी साधकाचे परम कर्तव्य असते.

परमेश्वर आध्यात्मिकतेचा समुद्र असतो. त्याच्यापासून सर्व काही घ्या, तरी पण तो आहे तसाच राहतो – अनादि, अनंत, अपार. तो कधीच रिकामा होत नाही. तो आम्हास कोणत्या तरी गूढ तत्त्वाच्या माध्यमाने शिकवण देत नाही, तर ज्ञानप्रकाशातील महात्म्यांच्या माध्यमाने तो आम्हास शिकवितो. तो अदृश्य आहे, परंतु जे नेहमी त्याच्याशी तन्मय राहतात अशा उत्कट साधकाची बुद्धी आणि आत्मिक अनुभूतीच्या माध्यमाने प्रकट होतो.

**सूफ़ींच्या अध्यात्म-विश्वाची व्यवच्छेदक लक्षणे**

एकेश्वरवादावरील अढळ श्रद्धा, परमेश्वराची दया व कृपा यावर दृढविश्वास, ईश्वराज्ञांचे आटोकाट परिपालन, चित्त परिष्कार (वासना भंजन), निर्मळ अंत:करणयुक्त परमेश्वराची अविचल भक्ती, 'वसुधैव कुटुंबकम'ची उत्कट लालसा आणि प्राणीमात्रांची सेवा हे सूफ़ींच्या अध्यात्म-विश्वाचे प्रमुख घटक आहेत. ईश्वराच्या शिक्षेचे भय आणि त्याच्या कृपाप्रसादाची आशा या दोन प्रेरणांच्या प्रभावाखाली सूफ़ी ईश्वर नाम-स्मरणात आणि त्याच्या भक्तीमध्ये मग्न असतात. श्रद्धासमन्वित परिपूर्ण आत्मसमर्पित (शरणागत) भक्त्युत्कर्षा (भक्तीच्या उत्कर्षा)चे नाव 'सद्धर्म' आहे. यालाच 'इस्लाम धर्म' असेही म्हणता येईल. सूफ़ींचे अध्यात्म-विश्व हे इस्लामी धर्मशास्त्राच्या आचार-संहितेने पुरेपूर भरलेले आहे. म्हणून त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या अध्यात्म-विश्वामध्ये उमटलेले दिसणे स्वाभाविक आहे. इस्लामच्या उपरोक्त धारणांनी सूफ़ींचे अध्यात्म-विश्व तुडुंब भरलेले आहे, त्या तथ्याचे कुराणोक्त पुरावे पुढे सादर करण्यात येत आहेत. –

आध्यात्मिक जीवनातील यशासाठी परमेश्वराने एक त्रि-सूत्री विधान पवित्र कुराणामध्ये या शब्दांत मांडले आहे : ''पण जो कोणी मरणोत्तर जीवनातील (यश प्राप्तीची) **इच्छा** करीत असेल आणि त्यासाठी जसे **प्रयत्न** करायला पाहिजेत, तसे प्रयत्न त्याने केले असतील, आणि हे सर्व **सत्य श्रद्धा** बाळगून केलेले असतील, तरच अशा लोकांचे **प्रयत्न यशस्वी** ठरतील (अर्थात त्यांच्या प्रयत्नांना ईश्वरकृपेचा लाभ होईल.)'' - १७:१९.

उपरोक्त श्लोकांतर्गत असलेले त्रि-सूत्र गणिताच्या भाषेमध्ये असे मांडता येईल -

इच्छा + प्रयत्न + श्रद्धा = यश, साफल्य.

सद्धर्माच्या निर्मितीमध्ये हेच त्रि-सूत्र पुढील त्रिसूत्रामध्ये परिणत झाल्याचे दिसून येते. हे सूत्र आहे. -

इस्लाम + ईमान + एहसान = मुक्ती, ईश्वर सान्निध्य.

बाह्य साधना आणि आचरणाच्या दृष्टीने पाहिल्यास सद्धर्म अर्थात अध्यात्म हे 'इस्लाम' ठरते. संपूर्ण शरणागती किंवा परिपूर्ण आत्मसमर्पणाचेच नाव 'इस्लाम' आहे. संपूर्ण विश्वासापर्यंत पोहोचलेल्या प्रगल्भ ज्ञानाचे नाव 'श्रद्धा' ('ईमान') आहे. श्रद्धा अध्यात्माच्या प्रासादाचा मजबूत पाया असते. परमेश्वरास साक्षात् पाहात असल्याप्रमाणे भक्ती करणे, जर हे शक्य नसेल तर तो (ईश्वर) तर तुम्हास पाहात आहे, याची जाण ठेवून भक्ती संपन्न करण्याचे नाव 'एहसान' आहे. हा भक्तीचा सर्वोच्च उत्कर्ष बिंदू आहे. याला भक्त्युत्कर्ष (भक्तीचा उत्कर्ष) असे म्हणता येईल.

सद्धर्म म्हणजेच अध्यात्माचे दोन पैलू आहेत. (१) बहिरंग पैलू आणि (२) अंतरंग पैलू. या दोन्ही पैलूंचे शब्द-चित्र पवित्र कुराणामध्ये असे रेखाटले गेले आहे :

**१) अध्यात्माचे बहिरंग :** मानव म्हणजे ईश्वराची प्रतिछाया - प्रतिरूप याची जाणीव आणि दृढ धारणेचे नाव 'श्रद्धा' किंवा 'विश्वास' आहे. अशी वृत्ती अंगीकारणारा हा श्रद्धावंत म्हणून गणला जातो. श्रद्धावंताचे गुण दर्शविताना ईश्वर म्हणतो :

''जो कोणी सदाचाराने वागत असेल, मग तो पुरुष असो वा स्त्री, आणि श्रद्धावंत असेल त्यास आम्ही निर्मळ जीवन प्रदान करू, आणि अशांना आम्ही त्यांच्या उत्तम कर्मांनुसार त्यांचा मोबदला निश्चितच प्रदान करू.'' - १६:९७.

''(पैगंबर! तुम्ही त्यांना) सांगा, (खरे तर हे आहे की,) पवित्र आत्म्याने (म्हणजे जिब्रील या देवदूताने) तुमच्या विधात्याकडून हा (ग्रंथ) या सत्य उद्देशासहित आणलेला आहे की, त्याद्वारे श्रद्धावंतांना त्यांच्या (श्रद्धेच्या बाबतीत) अधिक दृढता लाभावी. तसेच हा (ग्रंथ) मार्गदर्शक व शुभवार्ता आहे आज्ञापालन करणाऱ्यांसाठी.'' - १६:१०२.

''हे विवेकपूर्ण ग्रंथाचे संदेश आहेत. (त्यात) मार्गदर्शन व कृपा आहे, सदाचारी लोकांसाठी. जे नित्यउपासना करतात (नमाज पढतात) व दानधर्म ('ज़कात' देतात) करतात आणि मृत्युपश्चात जीवनावर दृढ विश्वास ठेवतात.'' - ३१:२-४.

''(त्यांना) सांगा, माझी प्रार्थना (नमाज़), तसेच माझ्या सर्व प्रकारच्या उपासना, सर्व प्रकारचा त्याग व माझे मरणे (सर्व) केवळ विश्वाचा पालनकर्ता असलेल्या अल्लाहसाठीच आहे. त्याच्या बरोबरीचा कोणीच नाही, आणि मला असाच आदेश प्राप्त झाला आहे आणि मी त्याला समर्पित होणाऱ्या लोकांत (नेहमी)

अग्रणी राहीन.'' – ६:१६२–६३. ''मला अशी आज्ञा करण्यात आलेली आहे की, मी श्रद्धावंतांपैकी व्हावे. आणि आपले ध्यान सदैव (सत्य) श्रद्धेकडे पूर्ण एकाग्रपूर्वक ठेवावे. (म्हणजे अढळपणे सत्य श्रद्धेवर कायम राहावे).'' – १०:१०४–०५. ''(पैगंबर! तुम्ही लोकांना) सांगा, 'मला अशी आज्ञा देण्यात आलेली आहे की, मी केवळ अल्लाहचीच उपासना करावी. त्याच्याच प्रती पूर्ण समर्पण भाव बाळगून, आणि मला अशी आज्ञा देण्यात आली आहे की, सर्वप्रथम मी स्वतः अल्लाहला पूर्णपणे समर्पित व्हावे.'' – ३९:११–१२. ''धर्मश्रद्धेच्या बाबतीत त्याच्याहून अधिक चांगला कोण असू शकतो, ज्याने (पूर्णपणे) स्वत:ला अल्लाहच्या स्वाधीन केले आणि तो सत्कर्मे करणारा आहे.'' – ४:१२५. ''जो कोणी स्वत:ला संपूर्णपणे अल्लाहच्या स्वाधीन करेल, आणि सत्कर्मे करीत राहील, अशा व्यक्तीसाठी त्याच्या विधात्याजवळ त्याचे बक्षीस तयार आहे. असे लोक कोणत्याही प्रकारच्या भयाने ग्रस्त होणार नाहीत आणि कोणत्याही प्रकारच्या दु:खाशी त्यांचा कधी सामना होणार नाही.'' – २:११२.

उपरोक्त समस्त श्लोकांमध्ये 'इस्लाम' आणि 'एहसान'चा उल्लेख अशा पद्धतीने झालेला आहे की त्यामुळे मानवाच्या अंत:करणामध्ये 'श्रध्दे'चे ('ईमान') वास्तव्य निश्चितपणे असते, हे स्पष्ट होते.

**२) अध्यात्माचे अंतरंग :**

अध्यात्माचे अंतरंग हे श्रद्धेच्या आंतरिक स्वरूपावरून खुलते. ते कसे, हे पुढील कौराणिक श्लोक उघड करून सांगतात.

''जे श्रद्धावान (विश्वासू) आहेत त्यांना (तर सर्वांहून) अधिक परमेश्वरासाठी प्रीति असते.'' – २:१६५. (''जे श्रद्धावंत आहेत त्यांचा प्रेम–भाव सर्वात जास्त अल्लाहसाठीच असतो.'' – २:१६५.) ''खरे श्रद्धावान तर ते (लोक) आहेत, जेव्हा (त्यांच्यापुढे) अल्लाहचा उल्लेख होतो, तेव्हा (भीतीयुक्त आदराने) त्यांच्या हृदयाचा थरकाप उडतो. आणि जेव्हा अल्लाहची संदेशवचने त्यांच्या कानी पडतात, तेव्हा त्यांची श्रद्धा अधिक बळकट होते, आणि ते आपल्या विधात्यावर दृढ विश्वास ठेवतात.'' – ८:२. ''निश्चितच, जे लोक आपल्या विधात्याविषयी आदरयुक्त भय बाळगतात आणि जे आपल्या विधात्याच्या संदेशांवर (दृढ) विश्वास ठेवतात. आणि जे लोक कोणालाही आपल्या विधात्याचे सहभागी ठरवत नाहीत. आणि जे लोक जितके काही त्यांच्याने देववते ते (परमार्थाने) देतात, आणि (यावरही) त्यांची अंत:करणे या गोष्टीला भीतच राहतात की, त्यांना आपल्या विधात्याकडे परतून जावयाचे आहे (पाहा! देणे देवविणे तेथे मान्य होत नाही)! हेच लोक चांगल्या कामात त्वरा करतात आणि त्यासाठी पुढे पुढे सरसावतात.'' – २३:५७–६१. ''अल्लाहने सर्वोत्तम संदेश ग्रंथ प्रकट केलेले आहेत, ज्यातील संदेशवचने ऐकून किंवा वाचून त्या लोकांच्या अंगावर शहारे उभे राहतात, जे आपल्या विधात्याची जाण बाळगून आहेत. मग त्यांचे तन व मन मृदू होऊन, अल्लाहच्या स्मरणासाठी प्रवृत्त होतात. हे (कुराण) ईश्वरी सन्मार्ग होय.'' ३९:२३. ''समजूतदार लोक अल्लाहचे स्मरण करतात उठता, बसता आणि कुशीवर पहुडले असताना (या सर्व स्थितीत).'' – ३:१९१. (दिवस असो वा रात्र) आपल्या विधात्याच्या नावाचे (प्रत्येक प्रसंगी) स्मरण करीत राहा. आणि संपूर्ण निष्ठेने त्याच्या प्रति समर्पित असा.'' – ७३:८. ''सच्चे श्रद्धावंत तर ते लोक आहेत, जे अल्लाहवर व त्याच्या पैगंबरावर श्रद्धा धारण करतात आणि मग त्याविषयी मुळीच शंका घेत नाहीत. आणि आपले धन व प्राण पणाला लावून प्रयत्नांची पराकाष्ठा

(म्हणजेच 'जिहाद') करतात. हेच लोक सत्यवादी आहेत.'' – ४९:१५. ''ज्या लोकांनी श्रद्धा धारण केली आणि (अल्लाहसाठी) स्वदेश त्याग केला, आणि अल्लाहच्या कार्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली (म्हणजेच 'जिहाद' केला). तेच लोक अस्सल श्रद्धावंत आहेत.'' – ८:७४. ''हे श्रद्धावंत लोकहो! (खऱ्या अर्थाने) विश्वास ठेवणारे बना, अल्लाहवर व त्याच्या पैगंबरावर व त्याच्या ग्रंथावर ('कुरआन')वर, जो (पैगंबर मुहम्मदांवर) अवतरित केला गेला व (कुराणाचे) पूर्वी जे ग्रंथ (इतर पैगंबरास) प्रकट केले, त्यांवर (विश्वास ठेवा). आणि जो कोणी अल्लाहला आणि त्याच्या दुतांना आणि त्यांच्या ग्रंथांना आणि त्याच्या पैगंबरांना आणि (न्यायाच्या) अंतिम दिवसाला मानण्यास नकार देईल, तर तो निश्चितपणे (कुमार्गावर) भरकटत फार दूर निघून गेला.'' – ४:१३६. ''जे लोक अल्लावर आणि त्याच्या पैगंबरांवर विश्वास ठेवत नाहीत, आणि अल्लाह व त्याच्या पैगंबरादरम्यान (श्रद्धा ठेवण्याचा बाबतीत) फरक करू इच्छितात, आणि म्हणतात, 'आम्ही पैगंबरावर विश्वास ठेवतो आणि काहीवर ठेवत नाही.' आणि यातील मधला मार्ग स्वीकारू इच्छितात. असेच लोक सत्य नाकारणारे पक्के श्रद्धाहीन आहेत यात मुळीच शंका नाही.'' – ४:१५०-५१.

**अध्यात्म मार्गाचे सप्त सोपान**

सूफ़ींचा अध्यात्म मार्ग हा सात पावलांचा आहे. मानवी देहामध्ये असलेल्या सप्त चक्रांप्रमाणेच ही सप्त पाऊलवाट आहे. यातील पायऱ्या तर इहलोकाशी संबंधित आहेत. यांचा संबंध शरीर आणि वासनेशी आहे. उरलेले इतर पाच सोपान अध्यात्म विश्वाशी निगडित आहेत. हे सोपान आहेत – चित्त वा अंतःकरण, आत्मा, मर्म, गुह्य आणि गुह्यतम. (१) जिस्म (देह), (२) नफ़्स (वासना), (३) क़ल्ब (चित्त वा अंतःकरण), (४) रूह (आत्मा), (५) सिर्र (मर्म), (६) ख़फ़ी (गुह्य) आणि (७) अख़्फ़ा (गुह्यतम) अर्थात ब्रह्मांड या सात पायऱ्या ओलांडताना प्रत्येक पायरीवर दहा हजार आवरणे-पडदे गळून पडतात. हे प्रकाशाचे असोत की अंधाराचे. ''निःसंशय, सर्वश्रेष्ठ परमेश्वर आणि त्याचा दास-भक्त यांच्या दरम्यान प्रकाश आणि अंधाराचे सत्तर हजार पडदे आहेत.'' – 'मिश्कात शरीफ़.'

साधकाचे प्रथम पाऊल अध्यात्म-विश्वामध्ये पडल्यानंतर कर्मांचा प्रकाश प्रकट होतो. दुसऱ्या पाऊलावर प्रकाशाचे आविष्करण होते; तर तिसऱ्या पाऊलामध्ये सत्तेचा प्रकाश पडू लागतो. मग प्रकाशाच्या श्रेणींनुसार तो प्रगती करीत अग्रेसर होतो. ही बाब परम ज्ञान्यांपासून लपून राहिलेली नाही. या सात पाऊलांमध्ये प्रत्येक पाऊलावर साधक स्वतःपासून दूर (लांब) आणि परम सत्य परमेश्वराजवळ जातो. त्याची ही मजल इथपर्यंत असते की ही काही सर्व पाऊले परिपूर्ण होण्यासोबतच ईश्वर सान्निध्यपण पूर्णपणे होऊन जाते. यावेळेस साधकास 'फ़ना' व 'बक़ा'ची स्थिती प्राप्त होते आणि तो विशेष संतत्वाच्या दर्जास पोहोचतो.

**सूफ़ींच्या श्रद्धेचे यथार्थ स्वरूप : एक नमुना**

अल्लाहचे खरे स्वरूपाचे सत्यापन म्हणजे वास्तविक श्रद्धा होय. त्याचे खरे स्वरूप जाणकारापासून जाणून घेण्याचे आवाहन करत अल्लाहचे स्वरूप पवित्र कुराण पुढील शब्दांत व्यक्त करते :

''(तोच) परमदयाळू (परमेश्वर) होय, म्हणून त्याच्या (लीले)विषयी तर कोणा माहितगारासच पुस. (हे अजाण नास्तिक काय जाणतील?)'' – २५:५९

अल्लाहचे स्वरूप असे विषद करण्यात आले आहे -

''परमेश्वर (असा परम पवित्र होय की) त्याच्याशिवाय अन्य कोणताही उपास्य (देव) नाही.'' (अल्लाह - त्याच्याशिवाय दुसरा कोणी ईश्वर नाही.) तो चिरंजीव, (अवघ्या सृष्टीचा शाश्वत) सांभाळकर्ता आहे. त्याला तंद्रा (डुलकी) घेरीत नाही आणि निद्रा (वेढीत) नाही. आकाश आणि पृथ्वी यांमध्ये जे काही आहे ते सर्व त्याचेच आहे. त्याच्या अनुज्ञेशिवाय त्याच्याकडे शिफारस करील असा कोण आहे? जे काही लोकांचे पुढे येते व जे काही त्यांच्या मागून (होणार) आहे ते (सर्व) त्याला विदित आहे. आणि लोक त्याच्या ज्ञानाचे कस्पटासही पोहोचू शकत नाहीत; पण जेवढे तो इच्छील तेवढेच काय ते (ते जाणतात). त्याच्या (सत्तारूपी) सिंहासनाने आकाश व पृथ्वी यांना व्यापून टाकलेले आहे. व (आकाश आणि पृथ्वी) या दोहोचे संरक्षण त्याला (मुळीच) जड जात नाही. आणि तो (अति) परात्पर व महिमावंत आहे.'' - २:२५५.

पवित्र कुराणातील हे एक सुदीर्घतम महाश्लोक आहे. याला 'आयतल-कुर्सी' म्हणजेच महाश्लोकासन असे नाव दिले गेले आहे. या श्लोकांतर्गत आध्यात्मिक श्रद्धेचे एकूण दहा टप्पे पडतात. त्या टप्प्यांचे विवेचन पुढील प्रमाणे करता येते. हे टप्पे मूळ अरबी श्लोकावर आधारभूत असल्याकारणाने, प्रथम अरबी भाषेतील तो श्लोक नोंदवून नंतर टप्प्यांनुसार त्याचे विवेचन प्रस्तुत करण्यात येत आहे. अरबीमधील तो श्लोक असा आहे-

(१) ''अल्लाहु ला इलाह इल्ला हुव, (२) अल्हय्युल्क़य्युमु , (३) ला तअ्ख़ुज़ुहू सिनतुंव्व ला नौमुन् , (४) लह मा फ़िस्सामावाति् व मा फ़िल्अर्ज़ि , (५) मन् ज़ल्लज़ी यश्फ़उ इन्दहू इल्ला बिइज़्निह, (६) यऽलमु मा बैन ऐदीहिम् व मा ख़ल्फ़हुम, (७) व ला युहीतून बिशैइम्मिन् इल्मिह इल्ला बिमा शाअ, (८) वसिअ कुर्सिय्युहुस्समावाति वल्अर्ज़, (९) व ला यऊदुह हिफ़्ज़ुहुमा , (१०) व हुवल् अलिय्युल्-अज़ीमु''- २:५५५. - ('आयतल् कुर्सी')

**१) ''अल्लाहु ला इलाह इल्ला हुव''** - अल्लाह, त्याच्याशिवाय दुसरा कोणी ईश्वर (उपास्य) नाही. ब्रह्मांडामध्ये अल्लाह (परमेश्वरा) शिवाय अन्य कोणीच उपास्य नाही. ब्रह्मांडामधील सर्वजण त्याचे उपासक आहेत. आकाशांमध्ये आणि पृथ्वीवर एकमेव सर्वश्रेष्ठत्व हे त्या (अल्लाह)च्याच विशुद्ध सत्तेसाठी विशेष करून आहे. सेवकांना म्हणजेच भक्तांना उपास्याच्या स्तरापर्यंत पोहोचणे अशक्य असते आणि सर्वश्रेष्ठ अल्लाह पण मानवाच्या श्रेणीपर्यंत खाली उतरत नाही.

सर्वश्रेष्ठ अल्लाह तो आहे की ज्याने बाकी सर्वांना निर्माण केले, त्यांना जीवन प्रदान केले आणि आईच्या कुशीपासून ते कबरीपर्यंतची समस्त व्यवस्था निर्माण केली. ''अतिशय वैभवशाली आहे तो (अल्लाह) ज्याच्याकडे आकाश व पृथ्वी यांची अधिसत्ता आहे, आणि या अधिसत्तेत त्याचा कोणीही भागीदार नाही, व प्रत्येक वस्तू त्याने निर्माण केलेली आहे, आणि त्या प्रत्येक वस्तूस (तिचे) उचित प्रमाण ठरवून दिले आहे. तरी देखील नास्तिकांनी परमेश्वराशिवाय (दुसरे) असे उपास्य पत्करून ठेवले आहेत, की जे कोणतीच वस्तू निर्माण करीत नाहीत, किंबहुना ते स्वतःच निर्माण केले गेलेले आहेत, आणि ज्यांच्याकडे स्वतःचीच हानी किंवा लाभ करण्याचे सामर्थ्य नाही आणि ना मृत्यू त्यांच्या अधीन आहे ना जीवन वा ना पुनरुत्थान.'' - २५:१-३.

**२) ''अल्हय्युल्क़यूमु''** – सजीव सृष्टीमध्ये कोणताच असा प्राणी नाही की तो आपल्या जीवनासाठी आत्मनिर्भर असेल. जीवन तर त्यांना (बाहेरून) प्रदान केले जाते आणि मग एके दिवशी त्यांचे प्राणोत्क्रमण होते आणि पुन्हा तो प्राण ईश्वर इच्छेनुसारच परत येणार. सर्वश्रेष्ठ अल्लाह असा चिरंजीव आहे की त्याचा ना आरंभ आहे ना शेवट. जीवन हे त्या परमेश्वराचे अनादि व अनंत असे गुण आहे. स्रष्टा आणि सृष्टीच्या जीवनामध्ये हाच तर फरक आहे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर आपल्या प्रेषितांस सांगतो की : ''(पैगंबर!) तुम्हालाही मरायचे आहे. आणि ते देखील मरणार आहेत, यात मुळीच शंका नाही.'' – ३९:३०. चिरंतनतेचा गुण तर विशेष करून अल्लाहशीच निगडित आहे.

चिरंजीवत्वाचा असा अर्थ आहे की तो अल्लाह समस्त ब्रह्मांड आणि प्राणीमात्रांस हालचाल व गती प्रदान करतो आणि त्यांच्या व्यवस्थेची सुयोग्य देखरेख करतो. म्हणून समस्त विश्व आणि प्राणीमात्र त्याच्यावरच निर्भर आहेत, त्याच्यावरच अवलंबून आहेत; तो मात्र आत्मनिर्भर आहे, निस्पृह आहे.

सर्वश्रेष्ठ अल्लाह आकाशे व पृथ्वी यामध्ये असलेल्या सर्वांवर देखरेख करतो. या देखरेखीमध्ये नियंत्रण हे सर्वस्वी त्याच्याच हातांमध्ये असते. त्याच्या निर्णयाविरुद्ध घडणे हे अशक्य असते; कारण की प्रत्येक वस्तू ही आपले स्थैर्य, गती आणि अस्तित्वासाठी सर्वस्वी अल्लाहवरच अवलंबून असते. ''नि:संशय, तो केवळ अल्लाह आहे, ज्याने आकाश आणि पृथ्वी यांना, त्यांनी (आपल्या कक्षेतून) ढळू नये म्हणून त्यांना धरून ठेवले आहे. आणि जर ते आपल्या स्थानापासून ढळले तर त्याच्याशिवाय दुसरा असा कोणीच नाही, जो त्यांना धरून ठेवू शकेल.'' – ३५:४१.

चिरंजीवित्व आणि शाश्वतता हे एकेश्वरवादाच्या गुणांना अशा प्रकारे प्रकट करतात की त्यामुळे सहभागीत्वाची नकारता स्पष्ट होते आणि परमेश्वराच्या अस्तित्वाचे एकमेवत्व आणि अद्वितीयत्त्व ठळकपणे स्पष्ट होते.

**३) ''ला तअ्खुज़ुहू सिनतुंव्व ला नौमुन्''** – झोपेच्या सुरुवातीस डुलकी डोळ्यांच्या पापण्यांना घेरते आणि झोपणे संपूर्ण निद्रेस म्हणतात. तंद्रेमध्ये बेसावधगिरीचे क्षण निर्माण होतात. आणि आम्ही स्वत:स आणि आसपासच्या वातावरणास विस्मृत होऊन जातो. एवढेच नव्हे तर जाग आल्यानंतर सुद्धा बौद्धिक जागृती मंद होते. थकव्याच्या वेळेस ती आणखी मंद होते आणि चुका घडू लागतात; परंतु विश्वंभरास कोणतीच गोष्ट व्यस्त आणि गाफ़िल करू शकत नाही. पृथ्वीवरील घटनांचा आकाशाच्या कोणत्याच घटनेवर परिणाम होत नाही. म्हणून परमेश्वरास थकवा किंवा कंटाळा कधीच येत नाही. त्याच्याकडून प्रमाद घडत नाहीत. म्हणून आकाशांपासून ते पृथ्वीतळावरील एक कण सुद्धा त्याच्या पकडीतून निसटत नाही – निसटू शकत नाही.

**४) ''लहू मा फ़िस्सामावाति व मा फ़िल्अर्ज़ि''**– सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे साम्राज्य आणि त्यावरील त्याची मालकी अत्यंत विस्तीर्ण आहे. त्याला सीमा नाही. संपूर्ण ब्रह्मांड आपल्या सर्वोच्चतेपासून रसातळापर्यंत त्याच्याच स्वामित्वामध्ये आहे. आकाशांचे क्षितिज आणि पृथ्वीचा खोल भाग त्याच्याच स्वामित्वाच्या हद्दीमध्ये येतात.

जे अजाण लोक परमेश्वराचा भागीदार असल्याचे कल्पितात, या ब्रह्मांडातील कणभर सुद्धा त्यांचा नसतो. जर मूर्तिकारांनी घडविलेली ती मूर्ति असेल तर ती सुद्धा त्यांच्या मालकीची नसते. आणि जर मानव असतील तर मानव त्याच्या स्वामित्वामध्ये असतात. त्याने आईच्या पोटात त्यांना घडविले, त्यांना स्वरूप प्रदान केले आणि त्यांच्या हृदयांना जीवनाचे ठोके प्रदान केले. जर परमेश्वर त्यांच्या हृदयक्रियेस बंद करू इच्छित असेल तर त्याला याबाबतीत प्रतिकार करणारा असा कोण आहे?

पृथ्वीतळावरील मालकीची संकल्पना क्षणभंगुर असते. काही लोक काही काळासाठी काही भूभागाचे मालक बनून जातात आणि अवज्ञा व विद्रोह करू लागतात. इतक्यात अकस्मात यमदूत येतो आणि क्षणात त्यांना गतप्राण करून टाकतो. अशा प्रकारे त्यांना आपल्या मालकीचे सर्व काही येथेच मागे सोडून जावे लागते. आकाश आणि पृथ्वीचा मालक आणि वारस असलेल्या त्या परमेश्वरासाठी हे सर्व मागे सोडून जावे लागते. ''आणि (पुनरुत्थानाचे दिवशी आम्ही त्यांना उद्देशून म्हणू की) पहिल्यांदा जसे आम्ही तुम्हास निर्मिले होते तसेच एकटे एकटे तुम्ही आमच्या समोर (अखेर) आलाच आला. आणि जो काही (साज सरंजाम) आम्ही तुम्हास (जगात) दिला होता तो (सर्व) तुम्ही आपल्या पाठीमागे सोडून आला.'' – ६:९४.

**५) ''मन् ज़ल्लज़ी यश्फ़उ इन्दह् इल्ला बिइज़्निह''** – इस्लामची अशी सर्वसाधारण धारणा आहे की अनेकेश्वरवादी आणि नास्तिकासाठी मोक्ष अशक्य आहे. कोणा देवदूतास किंवा प्रेषितास हा अधिकार नाही की त्याने सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या दरबारामध्ये जाऊन अशी शिफारस करावी की अमक्यास माफ कर. मोक्षाचा पाया श्रद्धा आणि सदाचारच आहे. म्हणूनच सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो : ''हे श्रद्धावंत लोकहो! ज्या दिवशी कोणतीही खरेदी आणि विक्री होणार नाही, (कोणतीही) मैत्री राहणार नाही, आणि (कोणाची) मध्यस्थी (ऐकली जाणार) नाही असा (पुनरुत्थानाचा) दिवस येण्याआधीच आम्ही तुम्हाला जे काही दिले आहे त्यातून खर्च करा, आणि जे (अल्लाहवर) श्रद्धा ठेवीत नाहीत ते (स्वतःचेच) नुकसान करून घेत आहेत.'' – २:२५४. परमेश्वर बहुदेववादी आणि अपराधी लोकांचा शेवट कसा होतो, याची कल्पना देतात असे सांगतो : ''जो कोणी इतरांना अल्लाहचा समकक्ष ठरवेल, अशा व्यक्तीला अल्लाह स्वर्गात कदापि प्रवेश देणार नाही. आणि अशा व्यक्तीचे ठिकाण (तर केवळ नरकाची) आग आहे. आणि अत्याचारी लोकांचा कोणीही साहाय्यकर्ता असणार नाही.'' – ५:७२. ''आणि पुनरुत्थानाच्या दिवशी) कोणीही दुसऱ्या कोणा (च्या पापा)चे ओझे आपल्यावर घेणार नाही. आणि जर कोणावर (पापांचे मोठे) भारी ओझे असेल व तो आपल्या ओझ्याला हात लावण्यासाठी (कोणालाही) बोलावील तर त्याचे किंचितही ओझे वाहून दिले जाणार नाही. व (मग ज्याला त्याने बोलाविले आहे त्याचा) तो नातलगच (का) असेना!'' – ३५:१७.

एखाद्या अपराध्याच्या शिक्षेमध्ये सूट किंवा माफ़ी मिळण्यासाठी कोणताच देवदूत किंवा प्रेषित परमेश्वराकडे शिफारस करण्याचे साहस मुळीच करणार नाही. ते परमेश्वराच्या अनुभूतीने शिफारस करतील आणि ते पण त्या व्यक्तीसाठी की ज्याच्यावर परमेश्वराची मर्जी असेल. जसे – ''तो बोलण्याआधी ते बोलत नाहीत, आणि (केवळ) त्याच्या आज्ञेनुसार काम करतात. त्यांच्या पुढे काय आहे आणि त्याच्यामागे काय आहे ते तो चांगले जाणतो, आणि ते त्याच्या व्यतिरिक्त अन्य कोणाचीही मध्यस्थी करीत नाहीत ज्यास तो

(अल्लाह) पसंत करील, आणि जे त्याच्या भीतीमुळे दक्षतेने वागत असतात.'' – २२:२७-२८. ''त्या दिवशी शिफारस कोणाच्याही कामी येणार नाही. पण फक्त (ती व्यक्ती बोलू शकेल) जिला कृपावंत (अल्लाहने) बोलण्याची परवानगी दिली असेल व ज्याचे बोलणे तो पसंत करेल. (अशालाच परवानगी असेल, आणि अल्लाहला चांगले माहीत आहे की, परवानगी दिल्यानंतर कोण काय बोलणार).'' – २०:१०९.

**६) ''यऽलमु मा बैन ऐदीहिम् व मा ख़ल्फ़हुम''** – सर्वश्रेष्ठ परमेश्वरापासून पृथ्वी व आकाशामधील कोणतीच गोष्ट गुप्त नाही, लपलेली नाही. त्याच्यासाठी भूत, वर्तमान आणि भविष्य या सर्व काळांचे ज्ञान सारखेच आहे. जणू काही ब्रह्मांड जेव्हापासून निर्माण झाले आहे आणि जेव्हा त्याचे शेवट होईल हे सर्व त्याच्यासाठी पुस्तकाच्या एका पानासारखे आहे की ज्यामध्ये आरंभ व शेवट जवळ आणि दूर सर्व सारखेच आहेत. अतएव हे स्पष्ट आहे की एखाद्या व्यक्तीने लपून छपून कोणती तरी वस्तू निर्माण केली असेल आणि ती त्याला माहित नसेल. शून्यापासून एखादी वस्तू निर्माण करणे हे अल्लाहच करू शकतो. मानवी प्रयत्नांचे परिक्षेत्र भौतिक आहे आणि त्याच्यामध्ये सुद्धा जे काही बदल घडत असतात ते ईश्वरी योजनेशिवाय शक्य नसते. म्हणून तर, ईश्वर अमुक वस्तूस जाणत नाही, असे म्हटल्यास त्याचा निश्चित अर्थ असा होतो की ती वस्तू अस्तित्वात नाही.

''आणि ते अल्लाहला सोडून अशांची उपासना करतात जे (त्या उपासकांना) ना लाभ पोचवू शकतात, ना हानी. आणि ते म्हणतात की, ते अल्लाहजवळ आमची शिफारस करणारे आहेत. (पैगंबर! त्यांना) सांगा, तुम्ही अल्लाहला अशा गोष्टीविषयी माहिती देत आहात का की, जी गोष्ट आकाशामध्ये किंवा पृथ्वीवर आहे, (पण) ती (गोष्ट) त्याला माहित नाही? असीम आहे त्याची किर्ती! ते ज्यांना त्या (अल्लाह)चे समकक्ष ठरवतात त्यांच्या पेक्षा किती तरी तो श्रेष्ठ आहे.'' – १०:१८. जरा विचार करा. मनामध्ये जो कोणता विचार निर्माण होतो त्याला पण परमेश्वर जाणतो. त्याचे ज्ञान सर्वांना वेढलेले आहे. मग तुम्ही खात्रीपूर्वक ओरडाल :

''ते म्हणतात, 'हे प्रभू! तुझ्या कृपेने व ज्ञानाने जे जे – अस्तित्वात आहे, त्यांना वेढून घेतलेले आहे. (हे अल्लाह!) तू त्या लोकांना माफ करून टाक, जे पश्चात्तापदग्ध होऊन तुझ्याकडे वळतात, आणि तुझ्या मार्गाचा अवलंब करतात. तू त्यांना नरकाच्या शिक्षेपासून (अवश्य) वाचव. हे प्रभू! आणि तू त्यांना कायम वास्तव्याच्या बागांत प्रविष्ट कर, ज्याविषयी तू त्यांना वचन दिलेले आहेस.'' – ४०:७-८.

**७) ''व ला युहीतून बिशैइम्मिन् इल्मिह इल्ला बिमा शाअ''** – ज्ञानाचे स्रोत मूळ स्वरूपात परमेश्वराच्या मर्जीपासून निघतात. इथपर्यंत की डोळे आणि कानाद्वारे जे काही ज्ञात (माहित) होते जर ते नसतील तर मानव आपल्या बुद्धीने आपल्या परिसरास पण ओळखू शकणार नाही. याहून गहन गोष्टींचे ज्ञान मानवी विवेकबुद्धीच्या श्रेणींशी संबंधित असते. आईच्या पोटात असतानाच या विवेकापासून आम्हास आमचा हिस्सा मिळतो.

ज्ञान-मंदिरामध्ये मानव आपल्या विवेकाच्या गवाक्षांमधून डोकावतो. ईश्वराच्या मर्जीने त्याला जी काही साधारण आणि विशिष्ट अशी साधने दिलेली आहेत, त्यांच्याच परिक्षेत्रामध्ये तो मर्यादित असतो. ज्ञान आणि ब्रह्मज्ञानाचे सर्वसाधारण स्रोत – ब्रह्मांडाचे खुले पुस्तक, जीवनाशी मानवी अनुभूतींमध्ये विस्तारलेले आहेत. आपली चेतना, विचार-विमर्श आणि अनुभवाच्या बळावर त्या क्षेत्रामध्ये, कुठल्याही बंधनाशिवाय आम्ही फार लांबपर्यंत जाऊ शकतो; परंतु परोक्षांच्या गोष्टींचे ज्ञानाचे स्रोत दैवी प्रज्ञानच असते.

'वह्यी' म्हणजेच दैवी प्रज्ञान हे अंत:करणाचे सु-संवाद असते, चिंतनाचा विकास नव्हे. प्रमुख देवदूत जिब्रीलने आणलेल्या ईश्वरी शिकवणीचे ते नाव आहे. आणि यासाठी सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपले प्रेषित निवडले आणि अंतिम प्रेषितत्त्वावर त्याची इतिश्री (शेवट) केली. परोक्षाचे ज्ञान सर्वांसाठी खुले नाही. आणि प्रेषित्त्वाच्या समाप्तीनंतर तर दिव्य वाणी अवतरित होऊ शकत नाही. म्हणून आता असे विधान केले जाऊ शकत नाही की, 'परमेश्वर इच्छील त्यास ज्ञान प्रदान करील.'

**८) ''वसिअ कुर्सिय्युहुस्समावाति वल्‌अर्ज़''** – सर्वसाधारणपणे असा समज होतो की आकाश आणि पृथ्वी या सर्वश्रेष्ठ अल्लाहच्या स्वामित्वाच्या हद्दी आहेत. हे संपूर्णपणे चुकीचे आहे. यांचे वास्तव केवळ सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सामर्थ्याच्या काही निशाणांपैकी आहे. ''त्याच्या (सामर्थ्याच्या) खुणांपैकी आहेत, आकाश व पृथ्वी यांची निर्मिती. आणि ते सर्व सजीव प्राणी देखील, जे त्याने त्यांच्या आसपास (पृथ्वीवर) पसरवून टाकलेले आहेत.'' – ४२:२९. ''आणि त्याच्या निशाण्यांपैकी (एक निशाणी ही देखील आहे) की, आकाश आणि पृथ्वी हे त्याच्या आज्ञेने (दृढतापूर्वक) स्थिर आहेत, (व संपूर्ण संतुलनासह कार्य करीत आहेत).'' – ३०:२५.

आकाश आणि पृथ्वी सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या त्या अगणित (असंख्य) निशाण्यांपैकी आहेत की ज्यांची गणना केली जाऊ शकत नाही आणि सर्वच्या सर्व सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या अधीनस्थ इच्छेच्या परिपूर्ण परिवृत्तामध्ये आहेत आणि तो समस्त ब्रह्मांड आणि प्राणीमात्रांवर लक्ष देऊन आहे. ''पण अल्लाहने त्यांना सर्व बाजूंनी वेढून ठेवलेले आहे.'' – ८५:२०.

**९) ''व ला यऊदुह हिफ़्ज़ुहुमा''** – म्हणजेच ज्याप्रमाणे प्रथम वेळेस पृथ्वी व आकाशांना निर्माण करताना सर्वश्रेष्ठ परमेश्वरास किंचितसुद्धा प्रयास पडले नाहीत त्याचप्रमाणे त्यांचे संरक्षण व त्यांची यथावत स्थिती कायम राखणे आणि त्यांना सुव्यवस्थित ठेवणे यासाठी पण त्याला काहीच प्रयास पडत नाहीत जसे की परमेश्वर निवेदन करतो :

''आम्ही आकाशाला आमच्या बाहुबलाने रचले, आणि आम्ही (फारच) व्यापक सामर्थ्य बाळगतो. आणि आम्हीच पृथ्वीचा विस्तारही केलेला आहे. आणि किती (उत्तम संतुलनासह) आम्ही तिचा विस्तार केलेला आहे! – ५१:४७-४८.

म्हणजेच अल्लाहच्या सामर्थ्यापुढे त्यां (पृथ्वी व आकाशां)ना निर्माण करणे फार क्षुल्लक गोष्ट आहे. जसे की एखाद्यापाशी सोन्या-चांदीचे फार मोठे खजिने आहेत आणि त्याने त्यापैकी थोडेसे दान दिले तर त्याला

याची जाणीव पण होणार नाही की त्याने फार मोठे दान दिले. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे दृष्टांत तर किती श्रेष्ठ आहे. ब्रह्मांडाची निर्मिती करणे आणि जगरहाटी करणे या गोष्टी त्याचे माहात्म्य व सामर्थ्यापुढे काहीच नाहीत.

**(१०) ''व हुवल् अलियुल् – अज़ीमु''** – उपरोक्त विवेचनाच्या उपसंहार स्वरूप दोन सुंदर ईश्वरी नामांचा येथे उल्लेख करण्यात आलेला आहे, जे त्याच्याशी सुसंगत असेच आहेत, म्हणजेच त्याची सर्वोच्चता – अति परात्परता आणि महानता, यास अभिव्यक्त करतात.

उपरोक्त वर्णित अशी दृढ श्रद्धा आपल्या अध्यात्म मार्गावर लीलया अग्रेसर होण्यासाठी सूफ़ीस अत्यंत उपयोगी सिद्ध होते, यात मुळीच शंका नाही. कारण श्रद्धा हे भक्ति-भावनेचे अनिवार्य अंग असते. शिवाय, श्रद्धा मनाची ती वृत्ती असते. जी साधकास विश्वाच्या विविधतेमध्ये एकसूत्रतेचे दर्शन घडविते. तर्कामुळे हे शक्य नाही. श्रद्धा-विश्वास भक्तिभावनेचे सूत्रधार असतात. श्रद्धा अशा विश्वासाचे नाव आहे की जिला तर्क-सम्मत करण्याची अपेक्षा नसते. सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ कांट आणि शंकराचार्य यांनी अज्ञातास ज्ञात करण्यामध्ये तर्काची व्यर्थता आणि श्रद्धेच्या उपयोगितेचे समर्थन केले आहे. ईश्वर प्रणिधान यास योगदर्शन आपला नियम मानते. कारण ईश्वर प्रणिधानामध्ये प्रपत्ति, श्रद्धा आणि विश्वास यांचा समावेश असतो. श्रद्धेच्या जबरदस्त आकर्षणाची परिणती प्रभू-प्रितीमध्ये होते, याचा पुरावा पुढील कौराणिक श्लोक आहे. (या श्लोकाचा उल्लेख या अगोदर झालेला आहेच.) ''वास्तविक जे श्रद्धा धारण करतात त्यांना अल्लाहच सर्वाधिक प्रिय असतो.'' – २:१६५. ''श्रद्धा ही अंत:करणाची विचारशक्ती आहे आणि ईश्वराच्या अनुग्रहाने श्रद्धा प्राप्त होणे शक्य आहे;'' असे पाश्चात्य तत्त्वज्ञ पास्कल ब्लेस याचे मत आहे. उत्कटपणे कृतिशील झालेली विवेकशक्ती म्हणजेच श्रद्धा. कृतिशीलता हा श्रद्धेचा, तर निष्क्रियता हा अंधश्रद्धेचा गुणधर्म आहे. श्रद्धेचा अर्थ आहे अंत:करणाने ओळखणे, जिव्हेने उच्चारणे आणि शारीरिक अवयवांनी कर्मप्रवृत्त होणे.

परमेश्वराचे स्मरण श्रद्धेचे भांडवल असते. प्रत्येक याचक त्याच्या नामस्मरणाने शासक बनतो. परमेश्वराच्या याचनेमध्ये सेवकाचे (साधकाचे) सर्वस्व समर्पणच वास्तविक श्रद्धा आहे. सूफ़ीवादानुसार श्रद्धा म्हणजे एखादे प्रदत्त प्रमेयाच्या सत्याचे केवळ दृढ विश्वास नसून ते अनिवार्यत: कर्मासाठी एक आधारस्वरूप त्या प्रमेयाचा स्वीकार पण असते. श्रद्धा अंत:करणापासून सुरू होते आणि माणसाच्या प्रकट आचरण स्वरूपात परिपूर्ण बनते. श्रद्धा आणि आचरण हे दोन्ही सोबत चालतात.

संयम आणि शिष्टाचार श्रद्धेची लक्षणे आहेत. अशा प्रकारे 'आयतल्-कुर्सी'मध्ये सूफ़ींच्या यथार्थ श्रद्धेचे प्रतिबिंब उमटलेले आहे. शेवटी सच्चे श्रद्धावंतांची ओळख स्वत: अल्लाह या शब्दांत करून देतो. ''(सच्चे श्रद्धावंत ते लोक आहेत), ज्यांच्या हृदयपटलावर अल्लाहने श्रद्धा कोरून टाकली आहे. आणि आपल्याकडून प्रेरणा देऊन त्यांना दृढता प्रदान केली आहे. अल्लाह त्यांच्यावर प्रसन्न आणि तेही त्याच्यावर प्रसन्न. हेच लोक अल्लाहच्या गटातील ('हिज़बुल्लाह') सदस्य आहेत. आणि निश्चितच अल्लाचा गट यशस्वी होणार आहे.'' – ५८:२२.

२१

## प्रकरण – २१
# भक्तिशास्त्र

### १) भक्ती : भारतीय दार्शनिक दृष्टिकोन
### १) साधना – व्याख्या व स्वरूप

एखाद्या विशिष्ट उद्दिष्टाच्या सिद्धी (साध्या)साठी स्थिर चित्त राहून जी अविच्छिन्न क्रिया केली जाते तिला साधना असे म्हणतात. मग भलेही ती (क्रिया) भौतिक-सुख-समृद्धीसाठी केलेला प्रयत्न असो अथवा पारलौकिक आनंदप्राप्तीसाठीचा प्रयत्न असो. साधक या सिद्धीच्या अस्तित्वामध्ये विश्वास ठेवून कार्यमग्न असतो आणि जोपर्यंत त्याला संपूर्ण यश प्राप्त होत नाही तोपर्यंत त्याचे प्रयत्न चालू असतात. प्राय: साधना आत्मानुसंधानाच्या मार्गामध्ये प्रवृत्त करून आत्म्यास परमात्मप्राप्तीसाठी आध्यात्मिक मार्ग प्रशस्त करते. आत्मबोधास जागृत करणाऱ्या चैतन्य–भावनेस पण साधना म्हटले जाऊ शकते. ''आत्मा जेव्हा संकीर्ण स्वत्वाच्या सीमेमध्ये सीमित केला जातो, तेव्हा आपले वैशिष्ट्य गमावून बसतो. याची विशेषता एकत्वामध्ये आहे. तो विश्वाशी समभाव ठेवूनच आपल्या सत्य स्वरूपाचे बोध करू शकतो आणि तेव्हाच त्याला आनंदाची अनुभूती होते. विश्व–चेतनेची किल्ली आत्म–चेतना आहे. आपल्या आत्म्यास स्वत:शी वेगळे जाणणेच ब्रह्म–ज्ञानाची पहिली पायरी आहे. आपणास संपूर्ण श्रद्धेसह याची जाणीव झाली पाहिजे की आपले सत्य स्वरूप – वास्तविक स्वरूप आत्म्यामध्ये आहे. संपूर्ण कल्याणामध्ये जीवन जगणे हे, असीममध्ये आपल्या जीवनाची अनुभूतता प्राप्त करणे आहे. जीवनाचा हा अत्यंत व्यापक असा अर्थ आहे. यास आपण आत्मिक दृष्टीने जीवनाच्या पूर्णतेस अनुभव करीत व पाहातच समजू शकतो. आपल्या व्यक्तित्वाच्या सीमान्त भिंती आपणास आपल्या सीमेकडे ढकलून देतात आणि अशाच प्रकारे आम्हास असीमकडे पण घेऊन जातात. जेव्हा आपण या सीमांना असीम बनविण्याचा प्रयत्न करतो, तेव्हाच आपणास परस्पर–विरोधी भावनांमध्ये संघर्ष आढळून येतो. आनंदाची प्रचीती आपणास तेव्हाच होते जेव्हा आपण आपल्या आत्म्याचा संसाराशी आणि संसाराच्या आत्म्याचा विराटाच्या आत्म्याशी एकत्वाचा अनुभव करतो.'' (रवींद्रनाथ ठाकूर – साधना; अनुवादक, सत्यकाम विद्यालंकार, पृ. २४, २६, ४९, ७४, ९४.)

### २) साधना–भेद आणि साधनेचे उद्दिष्ट

आमची साधना तपाची असू दे की ज्ञानाची अथवा कर्मयोग किंवा सदाचरणाची असू दे अथवा भक्ती–प्रेमाची असू दे. त्या सर्वांचा समाहार एकच उद्दिष्टामध्ये होऊन जातो. आणि ते म्हणजे साधना–मार्गावरील साधकांचे गंतव्य–स्थळ म्हणजे एकमात्र ईश्वरच होय.

साधारणपणे आमची चेतना बहिर्मुखी असते. समुचित मनोनिग्रहाने चतुर्दिक्  विखुरलेल्या चेतनेस अंतर्मुखी बनवून एका उद्दिष्टाकडे केंद्रित करणे हे साधनेचे सर्वोच्च उद्दिष्ट असते. खोल पाण्यात बुडी मारून आत्मानुभूतीचे मोती शोधण्यामध्ये प्रवृत्त होणेच आपले प्रमुख कर्तव्य आहे. 'अंतर्मुखी व्हा', 'आत परत चला' समस्त साधनांचा एक मात्र हेच सूत्र आहे. (स्वामी शुद्धानंदजी भारती - कल्याण, साधनांक 'साधन और सिद्धी', पृ. २६२.) म्हणून प्रत्येक साधकास याच उद्दिष्टाचे लक्षण बनण्यासाठी प्राणपणाने प्रयत्न केले पाहिजेत.

**३) परमपद प्राप्तीचे तीन मार्ग**

अतिप्राचीन काळापासून भारतीय साधनेमध्ये परम-पद प्राप्त करण्याचे तीन मार्ग प्रचलित आहेत - (१) ज्ञान-मार्ग, (२) योग-मार्ग आणि (३) भक्ति-मार्ग. यापैकी कधी एखादे प्रमुख तर इतर गौण मानले गेलेत; तर कधी तिघांमध्ये समन्वय स्थापित करण्याचे प्रयत्न पण झालेत; परंतु या तिघांमध्ये कधीच विच्छिन्नता येऊ दिली गेली नाही. प्राय: ते एक दुसऱ्याचे पूरक म्हणून मानले जात असत, मग भलेही या तिघांचा विकास विशेष करून आपल्या स्वाभाविक स्वरूपात का झाला असेना.

**१) ज्ञान-मार्ग :** वेदत्रयीमध्ये ज्ञान, कर्म आणि भक्ती हे तिन्ही साधन एक दुसऱ्याच पूरक मानले गेले आहेत. त्यांचे समन्वय हे मानव जीवनाच्या सर्वोच्च उद्दिष्टास सिद्ध करणारे आहे. ज्ञान आम्हास उद्दिष्टाचे बोध करून देतो, कर्म त्या उद्दिष्टापर्यंत पोहोचवितो आणि भक्ती त्या उद्दिष्टामध्ये तल्लीन करते. ज्ञान, कर्म आणि भक्तीस उजळवितो. भक्ती, ज्ञान आणि कर्माचा उद्रेक करते. कर्म इतर दोघांच्या निष्पादनामध्ये सहायता करतो. गीतेमध्ये पण ज्ञान, कर्म आणि भक्तीचे त्रैत विद्यमान आहे.

ज्ञान-मार्गाशी तात्पर्य सामान्यपणे उपनिषद्मूलक ब्रह्मवाद किंवा अद्वैतवादाशी आहे. ज्ञान-मार्ग, ज्ञानानेच जीवाची मुक्ती स्वीकारतो. उपनिषदांचे समग्र साहित्य प्रत्यक्षपणे ज्ञानाच्या मजबूत पायावर आधारित आहे. परमेश्वराच्या स्वरूपास ओळखणे आणि त्याच्याशी आपल्या अभिन्नतेची अनुभूती करणे या गोष्टी ज्ञानक्षेत्राच्या अंतर्गत येतात. गुरूकडून हे ज्ञान प्राप्त करून जेव्हा साधक तदनुकूल आपली जीवनपद्धती घडवितो तेव्हा तो ज्ञान-साधनेस महत्त्व देत असल्याचे प्रतीत होते. ज्ञानाची ही साधना सर्वांसाठी सुलभ नसते. याच्यासाठी शारीरिक शुद्धता आणि मनाची एकाग्रता पण आवश्यक असते. या दोन्ही गोष्टी योग साधनेच्या अंतर्गत येतात. म्हणून प्रत्येक ज्ञान-साधकास योग-साधना पण करावी लागते.

भागवतपुरस्कृत मधुरा भक्तिमध्ये ज्ञान, वैराग्य, कर्म, योग आणि प्रेम - सर्व एकाच ठिकाणी समन्वित झाले आहेत. प्रेमाची सरस रसधारा ज्ञान मधुर भक्तिसाधनेमध्ये प्रवाहित होत असते. ज्ञान, भक्तीची पृष्ठभूमी असते. ज्ञानामुळे मायाग्रस्त अंधार नाश पावतो. आत्मस्फुरित अद्वैतानुभूतीस संत 'ज्ञान' किंवा 'सहज ज्ञान' असे म्हणतात आणि हीच 'अनुभूती' किंवा 'ज्ञान' त्यांच्या भक्तीचा आधार आहे. हे ज्ञान, भक्तिचे विरोधी नसून, तिचे पूरक आहे. ज्ञानाच्या भूमिमध्येच सद्गुरूद्वारा भगवद्भक्तीचे बीजारोपण होते.

**२) योग-मार्ग :** कोणत्याच भारतीय साधना-मार्गामध्ये योगाचे भक्तीशी विरोध दिसून येत नाही. कोणत्याही साधनेच्या पूर्तीसाठी मनाची एकाग्रता अपेक्षित असते. मनास अंतर्मुख केल्याशिवाय परमात्म-तत्त्वाची प्राप्ती दुर्लभ आहे. म्हणून योग सर्वप्रथम चित्तवृत्तीच्या निरोधाची शिकवण देतो. योग मनास बाह्य

विषयांपासून वळवून आत्मोन्मुख करण्याचे एक सशक्त माध्यम आहे. म्हणून तर भक्तीच्या सिद्धीसाठी योगाची आवश्यक भूमिका भक्तांनी मान्य केली आहे. भक्तिसाधना योगाशिवाय होऊ शकत नाही. भागवतामध्ये (२।१।१६-१८, २१) म्हटले गेले आहे की, प्राणायामाद्वारे चित्ताच्या वृत्तींना प्रतिबंध करून, बाह्य विषयांपासून इंद्रियांना परावृत्त करून आणि मनास वासनाशून्य करून ईश्वराच्या स्वरूपाविषयी चिंतन-ध्यान केले पाहिजे. अशा प्रकारच्या साधनेमुळे योग्यास लवकरच सिद्धी प्राप्त होते. गीता (६।४७) मध्ये श्रद्धापूर्वक परमेश्वराची भक्ती करणारास सर्वश्रेष्ठ योगी असे म्हटले आहे. दुसरीकडे पतंजलिने आपल्या 'योगसूत्रा'मध्ये 'ईश्वर-प्रणिधान' असे म्हणून ईश्वर-चिंतनास योगाच्या साधनस्वरूपात स्वीकारले आहे. योगाभ्यासाकडे प्रवृत्त होणाऱ्या साधकाच्या मनामध्ये श्रद्धादी गुणांचे असणे आवश्यक आहे. भक्तास एकाग्रता प्राप्त झाल्यानंतर योग्यासारखी अनुभूती येते. म्हणून अत्यंत प्राचीन काळापासून योग आणि भक्ती यांच्या दरम्यान परस्पर मैत्री-संबंध प्रस्थापित झाले होते, आणि भक्ति-मार्गामध्ये योगास भगवद् प्राप्तीचे एक उत्तम माध्यम म्हणून स्वीकारण्यात आले होते. संतांच्या मते योगाची एकमात्र सिद्धी परमेश्वराचे साक्षात्कार करण्यामध्ये आहे.

**३) भक्ति-मार्ग :** भक्तिमार्गाचे श्रेष्ठत्व निरपवाद आहे. (१) ईश्वर प्रेमस्वरूप असून तो वेदपठनाने, तपाने, योगयागाने, दानाने, कर्माने किंवा ज्ञानाने प्राप्त होत नाही, तर तो केवळ भक्तीनेच मिळतो. (२) भक्तिमार्ग अनुसरण्याकरिता साधकास काही विशेषाधिकार असावा लागत नाही. तेथे वर्ण, जात, लिंग, आश्रम इत्यादी भेद आड येत नाहीत; म्हणून हा मार्ग सर्वांस खुला आहे. (३) हा मार्ग अनुसरण्यास सोपा असून त्याला बाह्य साधनसामग्रीची गरज नाही.

भक्ति हा शब्द 'भज्' म्हणजे 'सेवा करणे' ह्या संस्कृत धातूपासून आला आहे. 'ईश्वराच्या ठिकाणी निरतिशय प्रेम' (शांडिल्यसूत्र) किंवा 'परमात्म्याच्या ठिकाणी नितांत प्रेम (नारद-भक्तिसूत्र). अशा भक्तीच्या प्रमुख व्याख्या आहेत. भक्तीत प्रेम किंवा भाव हा प्रमुख असून बाह्योपचार गौण आहेत.

भक्तिमार्गाचा इतिहास थोडक्यात असा सांगता येईल - भक्तिमार्गाचे मूळ आपणास वेदकाळांत आढळते. वेदांतील निरनिराळ्या देवांची स्तुति-स्तोत्रे गाणारी सूक्ते व प्रार्थनामंत्र यात भक्तिमार्गाची बीजे आहेत. वेदांतातही - उपनिषदे व ब्रह्मसूत्रे गाणारी सूक्ते व प्रार्थनामंत्र यात भक्तिमार्गाची बीजे आहेत. वेदांतातही - उपनिषदे व ब्रह्मसूत्रे यातही - ब्रह्माचे वर्णन दोन प्रकारांचे असून, त्यातील सगुण ब्रह्म हे उपास्य असल्याचे कट्टर निर्गुणवादी व ज्ञानमार्गी शंकराचार्यांचेही मत आहे. उपास्य ब्रह्म सगुण असले तरी निराकारच आहे; परंतु निराकार व म्हणून इंद्रियांस अगोचर अशा वस्तूंवर प्रेम करणे किंवा त्याच्या ठिकाणी वृत्ती तदाकार करणे, सामान्य मनुष्यास अत्यंत दुःसाध्य असल्यामुळे, मनापुढे काही तरी नामरूपात्मक व्यक्त वस्तू ठेवण्याची आवश्यकता वाटते; म्हणून व्यक्त सगुणाची उपासना सांगितली आहे.

भागवतादी पुराणांनी, वैष्णव आचार्यांनी, तसेच सर्व प्रांतांतील साधु-संतांनी, महाराष्ट्रात ज्ञानेश्वरादी भागवत संप्रदायी, तसेच रामदास व इतर अनेक साधुसंतांनी सगुणभक्तीचा, प्रतीकोपासनेचा व मूर्तिपूजेचा पुरस्कार केलेला आढळतो. प्रतीक व बाह्योपचार यांना महत्त्व नसून 'शुद्ध भाव' हाच महत्त्वाचा आहे, असे साधुसंतांनी निक्षून सांगितले आहे तरी, सामान्य भक्त ईश्वराच्या खऱ्या स्वरूपाच्या अज्ञानामुळे प्रतीक हेच सारसर्वस्व मानून त्यात अडकतो व प्रतीकांतील भेद हेच कलहाला कारणीभूत होतात. म्हणून कबीर, नानक इत्यादी संतांनी अव्यक्तोपासनेचा पुरस्कार केला.

आता भक्तीच्या प्रकारांविषयी थोडेसे. भक्ती म्हणजे भगवंतावरील प्रेम. हे प्रेम निरनिराळ्या प्रकारे आविष्कृत होते. यावरून भक्ती ही एकच असून, तिचे अनेक प्रकार होतात. भागवत पुराणात सांगितलेले विष्णूचे श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन हे नवविध भक्ति-प्रकार सर्वसामान्यपणे स्वीकारले गेले आहेत. यास 'नवविधाभक्ती' असे म्हणतात. नारदभक्तीसूत्रात मात्र गुणमाहात्म्यासक्ती, रूपासक्ती, पूजासक्ती, स्मरणासक्ती, दासासक्ती, सख्यासक्ती, कांतासक्ती, वात्सल्यासक्ती, आत्मनिवेदनासक्ती व तन्मयासक्ती व परमविरहासक्ती अशी अकरा प्रकारची भक्ती सांगितली आहे. भक्तीचे उपरोक्त अकरा प्रकार आहेत.

ईश्वराप्रती एकांत भाव किंवा अनन्य प्रेमच **पराभक्ती** आहे. ईश्वरास समर्पित केलेले कर्म आपले शुभाशुभ फळ प्राप्त करण्यामध्ये असमर्थ असल्याकारणाने बंधनकारक असत नाही. त्याची ही बंधनहीनताच पराभक्तीचे प्राप्तीचे द्वार आहे. पूर्व पुण्याच्या फलस्वरूपात **गौणी भक्ती** प्राप्त होतात आणि त्या पराभक्तीच्या प्राप्तीमध्ये साहायक होतात. पराभक्तीमुळे तत्त्वज्ञानाचे उदय होते. त्यामुळे विकारबुद्धी लय पावते आणि भक्तास परमेश्वराचे दर्शन घडू लागते. म्हणून भक्तीचा आश्रय ग्रहण करणेच श्रेयस्कर असते.

परमेश्वर स्वरूपाच्या यथार्थ ज्ञानाने त्यावर केलेले निर्व्याज, निर्हेतूक, निरतिशय प्रेमच **'पराभक्ती'** होय. हे शुद्ध प्रेम त्रिगुणातीत, कामनारहीत, क्षणाक्षणाला वृद्धिंगत होणारे, अविच्छिन्न, अत्यंत सूक्ष्म, अनिर्वचनीय व केवळ अनुभवगम्य आहे. ही भक्ती अनन्य, अव्यभिचारी व गुर्वी म्हणजे श्रेष्ठ आहे. या भक्तास 'ज्ञानीभक्त' म्हणतात.

परमेश्वराच्या यथार्थ ज्ञानाच्या अभावातून सहेतुक, सकाम अशी जी भक्ती होते, तिला **'गौणी भक्ती'** म्हणतात. गौणी भक्तीचे सात्त्विकी, राजसी व तामसी भक्ती असे तीन प्रकार व भक्तांच्या हेतूवरून आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी असे तीन प्रकार होतात. आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी व ज्ञानी या चतुर्विध भक्तीचा उत्तरोत्तर श्रेष्ठत्वाचा क्रम भगवद्‌गीतेत, ज्ञानेश्वरीत व एकनाथी भागवतात सांगितला आहे. ज्ञानी ही सर्वश्रेष्ठ श्रेणी आहे. त्यांनी वैराग्य धारण केलेले असते. **सात्त्विक भक्त** हे निष्काम कर्मयोगी असतात. **राजस** गुणांच्या **भक्तांना** कर्मफलाची आवश्यकता असते. ते विलासी आणि लोभी असतात. **तामसी भक्त** हे नास्तिक, वेदविरोधी, स्वार्थी आणि व्यभिचारी असतात. अशा पापी लोकांना ईश्वर क्षमा करत नाही. वास्तविकपणे हे लोक भक्तांच्या वर्गीकरणातील नसतात.

भक्ती करताना शरीर, मन आणि हृदय यांमध्ये एकतानता असली पाहिजे. ईश्वराचा जप वाणीने, भजन-श्रवण कानांनी, चिंतन-मनन मनाने, पूजा पादसेवन शरीराने, तर दास्य, सख्य आणि वात्सल्य हृदयातून प्रकट होतात.

ज्ञानोत्तर भक्ती शक्य असल्याचे मत ज्ञानेश्वरादी संतांनी मांडले आहे. ज्ञानोत्तर उपास्य, उपासक व उपासना ही त्रिपुटी संपल्यावर, भक्ती हा व्यापार शक्य नसल्यामुळे, ज्ञान व कर्म याप्रमाणे भक्ति ही ज्ञानोत्तर निष्ठा होऊ शकत नाही, असे लोकमान्य टिळक प्रतिपादन करतात, पण द्वैताभावी भक्तिनिष्ठा शक्य नसेल तर त्याच न्यायाने कर्मनिष्ठाही अशक्य ठरते. टिळकांनी शंकराचार्याप्रमाणे 'ज्ञानं संन्यासलक्षणं' असे मान्य करून ज्ञानोत्तर कोणताच व्यापार शक्य नाही असे मान्य करावे अथवा व्यापार शक्य असेल तर भक्तीची शक्यता मान्य

करावी. ज्ञानेश्वरादी संत ज्ञानोत्तर भक्ती शक्य आहे, एवढेच नव्हे तर, ज्ञानोत्तरच खऱ्या अर्थाने भक्ती होते, म्हणून 'भक्ती' ही 'निष्ठा' आहे असे सांगतात.

## २) भक्ती : पूर्ववर्ती परंपरा आणि प्रवृत्ती

**१) 'भक्ती' शब्दाची व्याख्या** – 'भक्ती' या शब्दाचा सामान्य अर्थ 'सेवा' आहे. महामुनि शांडिल्य यांच्या मतानुसार ईश्वराप्रती अतिशय प्रेमाचे नाव 'भक्ती' आहे. देवर्षी नारद यांनी त्यास 'परमप्रेम रूपा' असे मानले आहे. त्यांच्या मतानुसार भगवंताप्रती अनन्य प्रेम असणे म्हणजे भक्ती होय. ज्ञान, कर्म इत्यादी साधनांचा आधार न घेता आणि सर्वस्वी स्पृहाशून्य बनून चित्तवृत्ती अनन्य भावाने जेव्हा भगवंतामध्ये केंद्रीत होऊन जाते, अशा एकनिष्ठ प्रेमभावनेस 'भक्ती'चे नाव दिले जाते. विषयीची विषयांप्रती जी अत्यंत आसक्ती असते तिला वळवून जर भगवंताकडे नेल्यास ती अहैतुकी किंवा शुद्ध भक्ती बनते. अशा स्थितीमध्ये पोहोचल्यानंतर मानवी आत्मा सुखाचा शोध बाह्य संसाराच्या दुसऱ्या वस्तुमध्ये करीत नाही, परंतु ज्या चैतन्यतत्त्वाने त्याचा उगम झालेला आहे त्यामध्येच संपूर्णपणे विलीन होण्यासाठी तो कामासक्त मनासारखी व्यग्रता प्राप्त करतो. हेच भक्तीचे उत्कृष्ट रूप आहे. 'तत्त्वमसि' चे उपासक वेदांती शंकराचार्य यांनी आत्मस्वरूपाच्या शोधास भक्ती मानले आहे. 'स्वस्वरूपानुसंधानं भक्तिरित्याभिधीयते।'

भक्ती म्हणजे सहस्त्रावधी अडचणींना न जुमानणारा ईश्वराबद्दलच्या प्रेमाचा अखंड प्रवाह. भक्ती स्वत:बद्दल किंवा आपल्या वस्तूबद्दल वाटणाऱ्या आपुलकीला मागे टाकते. ईश्वर हीच शुद्ध व मंगल गुणांची खाण आहे, या खात्रीने तिचे पोषण होते. केवल ज्ञानाने संसाराची निवृत्ती होते, पण आनंदवृद्धीसाठी कर्मसापेक्ष ज्ञानाची जरूरी आहे. मोक्षसाधन असे ज्ञानाला जिथे जिथे म्हटले आहे तिथे तिथे 'ज्ञान म्हणजे भक्ती' असा अर्थ आहे. कारण ज्ञान हा भक्तीचाच एक भाग आहे.

**२) भक्तीचे स्वरूप (सामान्य)** – भक्ती स्वभावानेच रस रूप, दिव्य आणि चिन्मय आहे. ती तत्त्वज्ञानरूपी फळाचे अनुपम रस आहे. रसाकडील ओढ प्राणिमात्रामध्ये स्वाभाविकपणे असते. ज्याची क्षति होते किंवा तृप्ती होते त्यास रस म्हणत नाहीत. जे तत्त्व क्षतिरहित किंवा तृप्तीरहित असते, ते आपल्या स्वरूपाने अगाध आणि अनंत असते; परंतु याचे रहस्य तेव्हाच उघडले जाते जेव्हा साधक रसासाठी आपल्या स्वाभाविक गरजेपासून निराश होत नाही. तथापि तो त्यासाठी नित्य उत्कंठापूर्वक लालायित राहतो. भक्ती ही अविनाशी आणि न शमणारी अशी तहान असते. ती उत्तरोत्तर वृद्धींगत होणारी अशी असते. जो भगवत् प्रेमामृतरसाचे पान करतो, त्याला मोक्षरूपी सिद्धीची गरज नसते. या सिद्धी तर अशा प्रिय भक्ताच्या सेवेची संधी शोधत असतात. स्वत: ईश्वराने भागवतामध्ये म्हटले आहे की माझ्याशी चित्त लावणारे माझे प्रेमी भक्त मला सोडून ब्रह्मपद, इंद्रासन, चक्रवर्ती राज्य, लोकांतरांचे आधिपत्य, योगाच्या सर्व सिद्धी आणि सायुज्य मुक्ती (मोक्ष) इत्यादी काहीच मागत नाहीत. (श्रीमद्भागवत ११।१४।१४)

या जगामध्ये सत्-असत्, पाप-पुण्य, प्रकाश-अंधकार, गुण-दोष इत्यादींमध्ये परस्पर विरोधी दुर्द्धर्ष संघर्ष-संग्राम चालू आहे. त्यामुळे साधक असंमजस बनतो. कधी तो प्रकृतीच्या प्रपंचाकडे वळतो, तर कधी जागरूकपणे चिन्मय प्रकाशाकडे ओढला जातो. कर्म आणि ज्ञान यामधील द्वंद्वामुळे साधक हा परस्परविरोधी

दिशांमध्ये ओढला जातो. त्यामुळे मोठी बिकट परिस्थिती निर्माण होते. आनंदाची स्थिती ना सत्च्या प्रसारामध्ये म्हणजेच प्रकृतीच्या प्रपंचामध्ये असते ना चित् अर्थात जीवाच्या ज्ञान प्रयत्नामध्ये. तो सत् आणि चित् यापलीकडे आनंद स्वरूप परमेश्वर असतो. सच्चिदानंद परमेश्वरामध्येच सत् (प्रकृती), चित् (जीव) आणि आनंद यांचा लय होतो. जीवाची संपूर्ण साधना आनंद तत्त्वास उपलब्ध करण्यासाठी असते. आनंद तत्त्वास प्राप्त करून तो तद्रूप होऊन जातो. आपल्या उगम स्थळापर्यंत पोहोचणे किंवा त्यामध्ये मिसळून जाण्याची व्याकुळता, ज्या आनंद तत्त्वामुळे आमचे मूळ स्वरूप निर्मित झाले आहे, त्याचाच अनुभव घेण्याची व्यग्रता – हाच उपासनेचा हेतू आहे. हीच साधना म्हणजे 'भक्ती' आहे. येथे उपासना व भक्ती यांतील तारतम्य जाणून घेणे आवश्यक आहे.

**३) उपासना व भक्ती यांतील तारतम्य!** – वेदांमध्ये कर्मकांड, उपासनाकांड व ज्ञानकांड अशी तीन कांडे जीवनाच्या त्रिगुणांना अनुलक्षून केलेली आहेत. तमोगुणप्रधान लोकांसाठी कर्मकांड, रजोगुणप्रधान लोकांसाठी उपासनाकांड व सत्तवगुणप्रधान लोकांसाठी ज्ञानकांड अशी सुंदर व्यवस्था आहे. एकाच मनुष्यामध्येही तमोगुणाचे आधिक्य असते तेव्हा त्यास कर्मकांडाचा उपदेश करतात; कर्मकांडाप्रमाणे वागून चित्तशुद्धी झाल्यानंतर तो उपासनाकांडाचा अधिकारी होतो; उपासनेने चित्ताचे चांचल्य म्हणजे रजोगुण क्षीण होतो व सत्त्वगुण वाढतो, तेव्हा तो ज्ञानकांडाचा अधिकारी होतो. याप्रमाणे कर्म–उपासना–ज्ञानाने चित्ताने मल, विक्षेप व आवरण हो दोष नाहीसे होऊन 'चित्ताचे चैतन्य' होते व साधक कृतार्थ होतो.

ज्ञान हे वस्तुतंत्र व उपासना ही कर्तृतंत्र म्हणजे कर्त्याच्या आधीन असते. कर्त्याच्या भावनेवर ती अवलंबून असते. वस्तूच्या स्वरूपाचा विचार केला म्हणजे तिचे ज्ञान होते. ते होऊ नये अशी इच्छा केली तरी झाल्याशिवाय राहात नाही, पण उपासना ही कर्त्याच्या इच्छेवर अवलंबून असते. ती करणे, न करणे किंवा कशीतरी करणे हे पुरुषाच्या इच्छेप्रमाणे होऊ शकते. असे ज्ञान आणि उपासना यांतील वैलक्षण्य आहे.

दुसरे, 'ज्ञान' म्हणजे 'आहे तसे' यथार्थत्वाने जाणणे आणि 'उपासना' म्हणजे निकृष्टामध्ये उत्कृष्ट बुद्धी अथवा अल्पामध्ये महद् बुद्धी करणे. उदाहरणार्थ, शालिग्रामशीलेत विष्णुबुद्धी इत्यादी. उपासनेतही निर्गुणोपासना व सगुणोपासना असे मुख्य दोन भेद आहेत. निर्गुणोपासनेला 'अहंग्रहोपासना' व सगुणोपासनेला 'प्रतीकोपासना' म्हणतात. 'एकंदर उपनिषदांत सांगितलेल्या गुणांवरून ज्याचा लक्षणावृत्तीने बोध झाला आहे. असे 'अखंड एकरस ब्रह्मच मी आहे' अशी निरंतर भावना करणे हीच निर्गुण उपासना होय. हिलाच अहंग्रहोपासना म्हणतात. (बापटशास्त्रीकृत सुबोध पंचदशी, ध्यानदीप.) निर्गुणोपासना ही ज्ञानाच्या समीप आहे. निर्गुणोपासना परिपक्व झाली की, तीच सविकल्प समाधी होते व पुढे तीच निर्विकल्प समाधी बनते.

उपासना ही मानीवच असल्यामुळे तिला यथार्थ ज्ञान म्हणता येत नाही व जे ज्ञान यथार्थ नाही, अयथार्थ आहे, त्याला भ्रम म्हणतात. हा भ्रमही 'संवादी' व 'विसंवादी' अशा दोन प्रकारचा आहे. संवादी भ्रमाने प्रवृत्त झालेल्या मनुष्यास शेवटी इष्ट वस्तूचा लाभ होतो; विसंवादी भ्रमाने तो होत नाही. उपासना ही संवादी भ्रम असल्यामुळे तिच्यापासून इष्ट वस्तूची प्राप्ती होते.

परमात्म्याचे निर्गुण रूप म्हणजे सच्चिदानंद व सगुण रूप म्हणजे अवतार देह. पैकी निर्गुण रूप हे व्यापक व सगुण रूप हे एकदेशी आहे. अखंडैकरस चैतन्य जे अनंतकोटी ब्रह्मांडांना व्यापून पुन्हा अनंत्वाने उरले आहे,

ते परमात्म्याचे निजरूप, निर्गुणरूप; त्याची 'इदं'त्वाने उपासना न करता, 'अहं'-त्वाने उपासना करावयाची, अर्थात त्या ब्रह्मचैतन्याचा अंश जो आपल्या अंतःकरणात नित्य स्फुटद्रूप आहे, त्याकडे वृत्ती फिरवावयाची. हिला **निर्गुण भक्ती** म्हणतात. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे चैतन्याचे अनुसंधान करणे ही निर्गुण भक्ती अथवा निर्गुण उपासना आणि भगवंताच्या अनंत अवतारांपैकी आपल्या आवडीनुसार कोणत्याही अवतार रूपाचे ध्यान, अर्चन, वंदन, गुणगायन इत्यादी करणे ही सगुण उपासना. उप म्हणजे जवळ आणि आसन म्हणजे बसणे; ही जी देवाच्याजवळ जाऊन बसण्याची युक्ती अथवा क्रिया हिला उपासना म्हणतात. उपासनेसच भक्ती म्हणण्याचा प्रघात आहे आणि अशी भक्ती 'उत्कट' रीतीने झाली म्हणजे स्वप्रकाश ज्ञानाचा उदय होतो. ह्या हेतूनेच 'भक्ती ज्ञानाची माऊली' असे श्री तुकाराम महाराज म्हणतात.

श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन हे भक्तीचे नऊ प्रकार सर्वश्रुत आहेतच. यांना 'नवविधा भक्ती' असे म्हणतात. सर्वोपनिषदांचे सार गीता व गीतेचा विस्तार भागवत असे विद्वान लोक म्हणतात. भागवत हा पुराण ग्रंथ आहे; तथापि इतर पुराणे ही 'पंचलक्षणात्मक' व भागवत 'दशलक्षणात्मक' आहे; त्यामुळे इतर पुराणांपेक्षा भागवतास विशेष मान आहे. भागवत हे नुसते पुराण नसून, भक्तीचे ते स्वतंत्र 'शास्त्र' आहे. 'भक्त्या भागवतं शास्त्रं' असे तत्त्वज्ञ विद्वानांचे त्याबद्दल आदरयुक्त मत आहे. इतर ग्रंथांप्रमाणे भक्तीने ज्ञान होते असे यात सांगितले असले तरी, ज्ञानानंतरच निजभक्तीचा म्हणजे खऱ्या भक्तीचा अथवा 'पराभक्तीचा' उदय होतो, असे यात प्रतिपादले आहे. ज्ञानापूर्वी करण्याच्या भक्तीला 'साधनरूपा' भक्ती आणि ज्ञानानंतर करण्याच्या भक्तीला 'फलरूपाभक्ती' म्हणतात. उपासना ही साधनारूपा भक्तीत मोडते. उपनिषदात पंचविद्योपासना सांगितली आहे; पण पुढे ज्ञानकांडाच्या प्रसंगात उपासनेचा त्यागही उघडपणे सांगितला आहे, परंतु भक्ती ही ज्ञानाचे फळ असल्यामुळे तिचा स्वीकारच तत्त्वज्ञ संतांनी व ऋषींनी पुरस्कारला आहे. भक्तीचा त्याग कुठेच कोणी सांगितलेला नाही. तात्पर्य, ज्ञान झाल्यानंतर सात्मरूपाने भगवंताला जाणून त्याची केली जाणारी भक्ती हिचेच नाव खरी 'भक्ती' व त्यापूर्वीची भक्ती ही 'उपासना' होय असे जाणावे. याप्रमाणे उपासना व भक्ती यांमध्ये तारतम्य आहे.

**४) भक्तीचा स्वाद –** ज्ञान, कर्म आणि भक्ती यांचा संबंध अन्योन्य आहे. कर्म, ज्ञान व योग यांपेक्षा भक्ती ही श्रेष्ठ होय. शांडिल्य सूत्रांत ईश्वरभक्ती ही श्रेष्ठ मानली गेली आहे. उपाधि-हान हेच मोक्षाचे कारण आहे आणि ईश्वर-भक्तीनेच उपाधि-हान होते. आत्मज्ञानाने नव्हे. ईश्वराच्या ठिकाणी परम अनुरक्ति म्हणजे भक्ती, अशी भक्तीची व्याख्या केली जाते, हे आपण पाहिले आहेच. त्या ईश्वराची भक्ती जो करतो तो अमृतत्व प्राप्त करतो. भक्ति-भावना उत्पन्न होणे हे देखील परमेश्वराच्या कारुण्यामुळे किंवा कृपेमुळेच शक्य आहे. भक्तीचे अंतिम साध्य मोक्ष असून ईश्वराचे आनंदमय स्मरण, संकीर्तन हे त्याचे साधन होय.

सृष्टीची प्रत्येक रचना अथवा निर्माणाच्या पृष्ठभूमीमध्ये कामभावना निहित असते. आणि ही कामभावनाच ज्ञान आणि कर्मास प्रेरणा देते. रचना-क्रमामध्ये परमेश्वरापासून भाव आणि भावापासून तपरूप ज्ञान आणि कर्म प्रकट होतात, जे नंतर नामरूपात्मक जगतामध्ये परिणत होऊन जातात. विलीनीकरणामध्ये हा क्रम उलटतो. नाम आणि रूप भावामध्ये आणि भाव परमेश्वरामध्ये लय होतो. भक्त पण अशाच प्रकारे

आपल्या चित्तवृत्तींना नाम-रूपाच्या आश्रयाने भावामध्ये, नंतर भावच्या आश्रयाने परमेश्वरामध्ये लीन करून टाकतो. भक्ति-योग याच भाव-पद्धतीचेच दुसरे नाव आहे. (डॉ. मुंशीराम शर्मा, भक्ति का विकास, पृ. ७३)

प्रभू प्रति आपली प्रेमभावना समर्पित करत ऋग्वेदचा एक ऋषि म्हणतो की, जसे पती, पत्नीकडे आकर्षित होतो तसेच आम्ही (मानव) त्या महान् देवाप्रती आकृष्ट होऊन जातो. भक्ताची भगवंतामध्ये आसक्ती आणि कामी पुरुषाची स्त्रीमधील आसक्ती - या दोहोंच्या आकर्षणाचे स्वरूप समान (एकसारखे) आहे; तथापि या दोहोच्या धरातलामध्ये स्पष्टपणे मोठे अंतर आहे - एक बहिर्मुखी आहे, तर दुसरे अंतर्मुखी. कामासक्त स्थितीमध्ये आम्ही एखाद्याची बाह्य केंद्राची परिक्रमा करू लागतो. परंतु भक्तीच्या साधनेमध्ये स्वत:च्या चैतन्य-केंद्राची प्रदक्षिणा करायची असते. जो ज्याची प्रदक्षिणा करतो, त्याच्या गुणांचा आधार त्याच्या आत्म्यामध्ये हेरत असतो. कारण की तो त्याच्या प्रभाव क्षेत्राकडे आकर्षित होऊन त्याच्याशी तन्मय होऊन जातो. रतिचे आकर्षण केंद्र सोडून जेव्हा पुरुष स्वत:च्याच चैतन्य केंद्रामध्ये समाविष्ट होऊन जातो तेव्हा त्याला अलौकिक स्वाद-रूचीचा अनुभव येतो - अनुभूती होते. विषय-रसाच्या अस्तित्वाचे सत्य जितके मजबूत असते, त्यापेक्षा अधिक सत्यात्मक भक्ति-रसाची उपलब्धी असते. वस्तुत: ते रस आधिदैविक धरातलापासून उतरून स्थूल भूतांमध्ये येते. प्राणांमध्ये जे मधु आहे, तेच सर्व काही आहे. स्थूल भूतांचे मधु तर त्याचीच अनुभूती आहे. जे मन विषयांपासून गोडी ओढते तेच जेव्हा परत फिरून आतमध्ये गोडी शोधू लागते, तेव्हा त्याला आपल्या चैतन्य केंद्रांमध्ये मधाने भरलेले मधाचे पोळे हाती लागते. हे कोश प्राप्त झाल्यावरच, त्याला खऱ्या भक्तीचे स्वाद येते. संक्षिप्तपणे हेच भक्तीचे स्वरूप आणि स्वादाचे आस्वाद आहे. याला चाखून चाखणाऱ्याच्या भक्तिविषयी काय बोलायचे! असा भक्त मोक्षाची पण सहज उपेक्षा करतो.

भगवंताला भक्ताची नम्रता, त्याचा हृद्य भाव फार आवडतो. म्हणून तो द्रवतो व भक्ताच्या इप्सित कामना पूर्ण करतो. भक्तावर कृपेची पाखर घालतो. त्याला आपला म्हणतो. हा भक्तीच्या अवीट स्वादाचाच परिणाम आहे. परमेश्वराची अनन्य भक्ती केली, तर तो भक्ताच्या अंकित होतो.

**५) भगवद्‌भक्तीचे निर्मळ स्वरूप** – भक्ती हा धर्माचा भावनिक पैलू आहे. तिचा संबंध प्रामुख्याने मनाशी असतो. भक्ती ईश्वर प्राप्तीसाठी आध्यत्मिक आराधना असते. भक्ती म्हणजेच मानसिक श्रद्धा. श्रद्धेचे स्वरूपच भक्तीचे रूप दर्शवित असते. भक्ती हीच सर्वश्रेष्ठ कर्तव्यपूजा होय. मंदिरातील देवपूजेत भक्ती कधीच प्रकट होत नसते. कारण ती हृदयमंदिरातून कृतीरूपाने दिसत असते. भक्ती मन:स्वास्थ्याठी प्रेरणादायी शक्ती ठरते.

भक्ती म्हणजे प्रेममय योग! ईश्वराविषयीचा प्रेमभाव आणि ब्रह्मज्ञान यांचा समन्वय म्हणजे भक्तियोग! ईश्वराविषयी पराकोटीचे आकर्षण निर्माण झालेल्या प्रेमाची परिणती भक्तीत होते. विवेक, विमोक, अभ्यास, क्रिया, कल्याण, अनवसाद आणि अनुद्धर्ष या सात प्रकारच्या अभ्यासामुळे परमात्म्याची प्राप्ती होते.

प्रपत्ती हे भक्तीचे प्रधान अंग होय. प्रपत्ती म्हणजे शरणागती. सर्वभावाने ईश्वराला शरण जाणे म्हणजे प्रपत्ती होय. परमेश्वराचे अभयहस्त व वरदहस्त असे दोन कृपाहस्त आहेत. अभय हस्ताद्वारे तो भक्ताला अभय देऊन त्याचे रक्षण करतो तर वरदहस्ताद्वारे तो भक्तांची मनोकामना पूर्ण करतो. प्रपत्तीप्रमाणेच श्रद्धा पण भक्ति-भावनेचे अनिवार्य अंग आहे.

''परमेश्वराच्याच उपासनेच्या योगे इहलोकी व परलोकी शुभ प्राप्त होते.'' व ''त्याच्या ठायीं प्रीति, पूज्यत्व बुद्धी व अनन्यभाव ठेवून तत्पूर्वक त्याचे मानसिक भजन, पूजन करणे व त्यास प्रिय अशी कृत्ये करणे हीच त्याची खरी **उपासना**'' या दोन तत्त्वांत भक्तीचे निर्मळ स्वरूप कोणते, ते दाखविले आहे, असे विचारांती कोणासही दिसून येण्यासारखे आहे.

चैतन्यरूप परमेश्वराची उपासना म्हणजे मंत्रतंत्राचा प्रयोग करणे, किंवा नुसते हठयोगासारखे ध्यान करीत बसणेही नव्हे. ईश्वराच्या ठायीं पूज्यबुद्धी व परम प्रेम ठेवणे म्हणजे त्याची **भक्ती** करणे, भक्तीने त्याचे भजनध्यान करणे, सत्यास व धर्मासच अनुसरून आपली वृत्ती आणि आचरण ठेवून त्याचे सत्य स्वरूप व धर्म स्वरूप आपल्या अंत:करणात विकसित करणे, यावत् मनुष्य आणि इतर प्राणी यांजविषयी प्रेम आपल्या हृदयात स्थिर करून आणि त्यास अनुसरून त्यांचे कल्याण करण्याविषयी झटून परमेश्वराचे प्रेमस्वरूप आपल्या अंत:करणात विकसित करणे, त्याची इच्छा सर्व गोष्टींमध्ये प्रमाण धरून, आपली एकीकडे सोडून देऊन, स्वात्मा त्याला समर्पण करणे ही त्याची **उपासना**.

मानसिक भजन पूजन जर करायाचे, तर ते इतर कोणत्याही देवतेचे न करता त्या परम शक्तिमान, परम पवित्र, परमथोर, करुणानिधान, सर्वांतर्यामी सर्व नियामक, सर्वसाक्षी, सर्वदा जागृत, प्रेममय, दयाघन, जगन्नियंत्या परमेश्वराचेच करणे इष्ट आहे व तो आपला अधिकार आहे. परमेश्वरास प्रिय होतील तीच कृत्ये करण्याचा आपल्याला अधिकार आहे. आणि अशा प्रकारच्या आचारांतच परमेश्वराची खरी **भक्ती** आहे. सारांश, आपला सर्व संसार हा परमेश्वराची भक्ती करण्याचे स्थळ आहे, व आपल्या आचरणाच्या विमलपणाची कसोटी म्हणजे ते परमेश्वरास प्रिय असणे ही होय, हे रात्रंदिवस लक्षात ठेऊन वागणारा खरा ईश्वरभक्त होय व त्याची भक्ती निर्मळ भक्ती होय.

**६) भक्तीचा उद्‌भव आणि विकास –** भारताचे आदि साहित्य वेदसंहिता आणि ब्राह्मण-ग्रंथांमध्ये 'भक्ती' या शब्दाचा स्पष्ट उल्लेख सापडत नाही; परंतु देवतांच्या प्रेममय भावुक स्तुतींमध्ये भगवच्छरणागतीची भावपूर्ण व्यंजना समाविष्ट आहे.

वैदिक भक्तीचे तीन घटक आहेत : स्तुती, प्रार्थना आणि उपासना. वैदिक ऋषींचा बहुदेववाद एकेश्वरवादामध्ये रूपांतरित झाल्यानंतर भक्तीची भावना स्वाभाविकपणे अनेकाऐवजी एकाकडेच अग्रेसर होते. 'एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति'च्या भावनेने प्रेरित होऊन उपनिषद्‌कालीन साधक इतस्तत: विखुरलेल्या शक्तींमध्ये समन्वय प्रस्थापित करत आपल्या ध्यानास कोणत्या तरी एक रूपामध्ये केंद्रित करतो आणि बहिर्मुखी जीवनास अंतर्मुखी बनवून अद्वैत-तत्त्वाच्या साक्षात्कारावर विशेष भर देतो. श्वेताश्वतर उपनिषद् ६।२३ मध्ये त्या परमप्रभूच्या प्रसादामुळेच सिद्धी प्राप्तीचा उल्लेख आहे. बृहदारण्यक ४।३।२१ मध्ये म्हटले गेले आहे की, ज्या प्रकारे प्रेयसीच्या आलिंगन-पाशामध्ये बद्ध पुरुषाची बाह्य आणि आंतरिक चेतना लुप्त होऊन जाते, त्याच प्रकारे प्राज्ञ-आत्म्याने आलिंगित जीव आपली सर्व चेतना हरवून पूर्णकाम होऊन जातो. गीतेमध्ये कर्म, ज्ञान आणि भक्ती, या तिन्हींचे समन्वय करण्यात आले आहे. यामध्ये वैदिक हिंसापूर्ण यज्ञपरक काम्य-कर्माच्या जागी निष्काम-कर्माची प्रतिष्ठा करून निवृत्ती ज्ञानकांडाच्या जागी प्रवृत्ती परायण भगवद्-भक्तीची श्रेष्ठता प्रतिपादित केली आहे.

पुढे सात्वतांच्या उदय काळामध्ये (१५०० इ.स.पूर्व) पांचरात्र-मतामध्ये भक्तीस एक आंदोलनाचे रूप प्राप्त होते. वैष्णव धर्माची प्राचीनतम संज्ञा भागवत धर्म वा पांचरात्र-मत अशी आहे. जो आश्रितांना सुख देतो, तो सात्, परमेश्वर ज्यांचा आहे, ते सात्वत अर्थात महाभागवत आहेत. पांचरात्र धर्म, सात्वत धर्माचे शेवटचे विकसित रूप होते. यामध्ये ईश्वराच्या भक्तीचे समर्थन अनेक तंत्र किंवा संहितांच्या आधारावर केले गेले आहे. अहिर्बुंध्य संहितेमध्ये ३७।२८२,९ शरणागतीच्या सहा प्रकारांची - (१) अनुकूलाचे संकल्प, (२) प्रतिकूलाचा त्याग, (३) गोप्तृत्ववरण, (४) रक्षणाचे विश्वास, (५) आत्मनिक्षेप आणि (६) कार्पण्य (यांची) विशद चर्चा करण्यात आली आहे. पांचरात्रांच्या मतानुसार जीव अनादि, चिदानंदघन भगवत्स्वरूपच आहे. सृष्टीच्या आरंभी भगवंताची निग्रहशक्ती जीवाचे विभुत्व, शक्तिमत्व आणि सर्वज्ञत्व यांचे लोप करते, की ज्यामुळे जीव क्रमशः अणू, किंचित्कर आणि अल्पज्ञ बनून जातो आणि आपल्या पूर्व कर्मांनुसार भव-संकटाच्या बिकट कांतारामध्ये भटकत राहतो.

पांचरात्र-शास्त्रानुसार भगवंताच्या अनुग्रह शक्तीने युक्त भक्तीच बद्ध जीवास संसाराच्या दुःखांपासून मुक्ती मिळवून देण्याचे एकमात्र साधन आहे. सर्वस्वपणे स्वतःस भगवंताप्रती समर्पण करण्याचे नावच **शरणागती** आहे. शरणागती, वैष्णव-भक्ताची मानसिक भावना आहे.

**७) पुराणांची ओळख -** ऋषींनी वेद आणि उपनिषदांमध्ये ज्या परमेश्वराचे स्वरूप आणि महिमेचे वर्णन केलेले आहे, ते सर्वसाधारण बुद्धीपलीकडील असाधारण प्रज्ञेची अपेक्षा ठेवते. म्हणून कृष्ण द्वैपायन व्यास यांनी कृपा करून गूढ परमतत्त्वास रसाळ, सुबोध भाषेमध्ये लिहून पुराणांची रचना केली. पुराणांमध्ये वैष्णव धर्माची चर्चा आहे. मत्स्य, कुर्म, वराह आणि वामन ही चार पुराणे विष्णुच्या चार अवतारांशी निगडित आहेत; तर नारद, ब्रह्म-वैवर्त, पद्म, विष्णु आणि श्रीमद्भागवत-पुराण हे विष्णुचे आध्यात्मिक स्वरूप आणि प्रतिष्ठे स्वरूपात लिहिले गेले आहेत.

सर्व पुराणांमध्ये श्रीमद्भागवतचा महिमा महान आहे. याला भक्ति-शास्त्राचे सर्वस्व म्हणून मानण्यात आले आहे आणि वेद रूपी कल्पवृक्षाचे परिपक्व फळ म्हणून म्हटले गेले आहे. याला शुकदेव यांनी आपल्या मधुर वाणीने पीयूषवर्षी बनविले आहे. (श्रीमद्भागवत - १।१।२) वल्लभाचार्यांनी भगवंतास महर्षि व्यास देवाची 'समाधी भाषी' मानले आहे. वैष्णव धर्माचे अवांतरकालीन सर्व संप्रदाय - वल्लभ, चैतन्य इत्यादी भागवताशी अनुप्राणित आहेत. भक्तीचे शास्त्रीय विवेचन करणारे शांडिल्यभक्ति सूत्र आणि नारदभक्ति सूत्र पण याच्याशी प्रभावित झालेले दिसून येतात.

**८) भागवत भक्तीचे स्वरूप - क) भागवताचे साध्य पक्ष :** भागवतामध्ये भगवंताच्या विभूती, सगुण अवतार आणि लीलेंचे अत्यंत रसाळ वर्णन केले गेले आहे. भगवंत विशुद्ध केवल ज्ञानस्वरूप, सत्य, पूर्ण, अनादि, अनंत, नित्य, निर्गुण आणि अद्वय आहेत. (श्रीमद्भागवत - २।९।६२) भागवताचे अध्यात्म पक्ष पूर्ण अद्वैतपरक आणि व्यवहार पक्ष विशुद्ध भक्तिपरक आहे. अद्वैत-ज्ञानासोबत भक्तीचे समन्वय हे भागवताचे वैशिष्ट्य आहे. ब्रह्म स्वतः स्वरूपतः निर्गुण आहे. तो मायेशी मिसळून सगुण बनतो, अविद्याजन्य प्रतिबिंब रूपामध्ये जीव आणि विवर्त स्वरूपामध्ये जगत् बनून जातो. मुनिगण ज्याला ब्रह्म म्हणून संबोधतात, तेच

परमपुरुष भगवंताचे स्वरूप आहे. ब्रह्म शांत, नित्यानंदरूप, अशोक, अभय, सत्-असत्च्या पलीकडील आत्म-तत्त्वरूप आहे. शब्दांमध्ये त्याला व्यक्त करणे अशक्य आहे.

परमेश्वर विश्वाच्या उत्पत्तीचा निर्मित आणि उपादान असे दोन्ही कारण आहे, परंतु त्याचे कोणीच कारण नाही. तो स्वयंभू स्वयंस्थित आहे. मूल-तत्त्व आत्मा आहे, व्यापक तत्त्व ब्रह्म आहे. सत्यामुळे आत्म्याची प्राप्ती म्हणजे ब्रह्म. हा आत्मा देह-बद्ध स्वरूपामध्ये जीवात्मा बनून जातो आणि देह-विकारांनी रहित असताना तो परमात्मा बनून जातो. चित्तच आमच्या शरीरामधील सर्वाधिक सूक्ष्म आणि शक्तिशाली अंश आहे. ब्रह्मांडामध्ये जी शक्ति-चेतना आणि ज्ञान आणि क्रिया स्वरूपात आढळून येते तीच शरीरामध्ये एकत्र होऊन ज्ञाता आणि कर्ता स्वरूपात उपलब्ध होते. समष्टिगतापासून ती व्यष्टिगत बनून जाते. म्हणून परमेश्वरास ओळखण्यासाठी चित्तावरच प्रक्रिया करण्याची, त्याचाच आधार घेण्याची आवश्यकता असते.

**ख) भागवताचे साधन पक्ष :** भागवत, भक्तिशास्त्राचे विश्वकोष मानले जाते. यामध्ये भक्तीची तत्त्वे आणि प्रेम-सिद्धान्त यांचे मार्मिक विवेचन प्रस्तुत करण्यात आले आहे. भक्तीचे दोन प्रमुख प्रकार मानले गेले आहेत - (१) साधन रूप - वैध आणि नवविधा, (२) साध्यरूप - प्रेमा किंवा प्रेम-लक्षणा. भक्ती तर हृदयाचा अनन्य भाव आहे, जो कोणत्याच अभिलाषाशिवाय - निर्हेतुक - भगवंताप्रती होत असतो. श्री. हरिभाऊ उपाध्याय यांच्या कथनानुसार, ‘‘भक्ती मनाची ओढ आहे. मनास जे आवडते तिकडेच मन वळते, तिकडेच मनाचा ओढा असतो. अशाच प्रकारे मनास ज्याची आवड असते त्यास आपल्याकडे ओढून पण घेतो. हीच आकर्षण-क्रिया (आकर्षण-शक्ती) भक्तीचे बीज आहे. जेव्हा याचे रूप आकर्षक होऊन जाते, आणि प्रेम समर्पणोत्सुक होऊन जाते तेव्हा यास भक्ती असे म्हणतात.’’ (श्री हरिभाऊ उपाध्याय, भागवत धर्म, प्रथम संस्करण १९५१, अध्याय ३।३५ पृ. ९२) साध्यरूप प्रेमलक्षणा भक्तिमध्ये चित्ताचा निर्मलतम प्रवाह हा निरंतरपणे अविच्छिन्न गतीने भगवंताकडे वाहात असतो. श्रीमद्‌भागवतामध्ये ज्ञान आणि कर्माहून भक्तीस उच्च स्थान देण्यात आले आहे. त्याच्या माहात्म्य-प्रकरणामध्ये ज्ञान आणि कर्माहून भक्तीस उच्च स्थान देण्यात आले आहे. त्याच्या माहात्म्य-प्रकरणामध्ये ज्ञान आणि बैराग्यास भक्तीची संतती मानण्यात आल्या आहेत. ज्यांच्या हृदयामध्ये एक मात्र श्रीहरि भक्तीचे निवास असते, ते त्रिलोकांमध्ये निर्धन असूनसुद्धा परमधन्य आहेत, कारण या भक्तीच्या दोरीमध्ये स्वत:स बांधून घेऊन साक्षात् भगवंत पण आपले परम धाम सोडून त्याच्या हृदयामध्ये निवास करतात. परमेश्वराचा अनन्य भक्त मोठमोठ्या सिद्धी आणि मोक्षाची अभिलाषा, भक्तीपुढे मुळीच करीत नाही. भक्ती समस्त पाप-राशीस संपूर्णपणे जाळून भस्मसात करते.

योग-साधन, ज्ञान-विज्ञान, धर्म-अनुष्ठान, जप-पाठ आणि तप-त्याग परमेश्वरास प्राप्त करण्यामध्ये तितकेसे समर्थ नाहीत जितकी की दिवसे-दिवस वृद्धींगत होणारी परमेश्वराची अनन्य प्रेममयी भक्ती. (श्रीमद्‌भागवत - ११।१४।१९-२१.) ‘‘मी संतांचा अत्यंत प्रिय आत्मा आहे, मी अनन्य श्रद्धा-भक्तीनेच त्यांना प्राप्त होतो. मला प्राप्त करण्याचा एकमात्र हाच उपाय आहे. माझी अनन्य भक्ती, जन्माने चांडाळास जाति-दोषापासून मुक्त करून त्यास पवित्र बनविते.’’ (श्रीमद्‌भागवत - ११।१४।१९-२१) जो पर्यंत संपूर्ण शरीर पुलकित होऊन जात नाही; चित्त द्रवित होऊन गद्‌गद् होऊन जात नाही, आनंदाश्रू डोळ्यांमधून वाहात नाहीत आणि अंतरंग व बहिरंग भक्तीच्या महापुरामध्ये चित्त बुडत नाही, तोपर्यंत याचे शुद्ध होण्याची शक्यता

नसते. (श्रीमद्भागवत - ११।१४।१९-२१) ज्याप्रमाणे सोने अग्नीमध्ये तप्त केल्यानंतर आपले मळ सोडून चकचकीतपणे आपल्या शुद्ध स्वरूपात येते, त्याच प्रमाणे माझ्या भक्तियोगाद्वारे आत्मा कर्मवासनेपासून मुक्त होऊन मलाच प्राप्त करून घेतो, कारण की मीच त्याचे वास्तविक स्वरूप आहे. (श्रीमद्भागवत - ११।१४।२३-२५) भागवतमध्ये भक्तीच्या नऊ (९) प्रकारच्या साधनांचा उल्लेख आहे - १) श्रवण, २) कीर्तन, ३) स्मरण, ४) पाद सेवन, ५) अर्चन, ६) वंदन, ७) दास्य, ८) सख्य आणि ९) आत्मनिवेदन वा शरणागती. (श्रीमद्भागवत - ७।५।२३-२४) याचेच नाव 'नवविधा भक्ती' असे आहे.

भागवतमध्ये सगुण साकार भगवंताचे अनेक अवतार आणि चरित्रलीलांचा गान आहे. असे असूनही भगवंताचे शुद्ध स्वरूप निर्गुण, निराकार म्हणूनच दाखविले आहे. त्याच्या भक्तीचा त्यामध्ये विरोध नसून तीच आत्म-तत्वाचे कारण मानली गेली आहे. भगवत् प्राप्तीचा एकमात्र उपाय प्रभूची साध्यरूपा प्रेमलक्षणा भक्तीच आहे. या अमूल्य भक्तीस प्राप्त करून भक्त मोठ-मोठ्या योगसिद्धी आणि मोक्षास पण हेय मानतो. भक्तीच्या एकनिष्ठतेच्या ज्वालेमध्ये जाति-दोष, कर्म-विपाक आणि पाप-राशी भस्म होऊन जातात आणि साधक हा शुद्धात्मा बनून भगवद् रूप होऊन जातो.

**९) भक्तीची शास्त्रीय व्याख्या : शांडिल्यभक्ति सूत्र व नारदभक्ति सूत्र -** शास्त्रीय स्वरूपात भक्तीचे विवेचन करणारे ग्रंथ शांडिल्य भक्तिसूत्र, नारदभक्ति सूत्र, रूप गोस्वामीकृत उज्ज्वल नीलमणी आणि भक्तिरसामृतसिंधू तसेच मधुसूदन सरस्वती यांचे भक्तिरसायन इत्यादी आहेत. या ग्रंथांमध्ये भक्तीच्या सैद्धान्तिक पक्षाचे शास्त्रीय विवेचन केलेले आहे. नारद भक्तिसूत्रापेक्षा शांडिल्य भक्तिसूत्र अधिक प्राचीन आहे. हे दोन्ही ग्रंथ भागवतावर आधारलेले मानले जातात. शांडिल्यभक्ति सूत्रांचा उत्तर भारतामध्ये विशेष प्रचार झालेला आहे. या दोन्ही सूत्र-ग्रंथांमध्ये ईश्वरविषयक अनुरागा (प्रेमा)सच भक्तीची संज्ञा दिली गेली आहे.

**क) शांडिल्य-सूत्र :** या ग्रंथामध्ये एकूण शंभर (१००) सूत्रे आहेत. महर्षि शांडिल्य यांच्या मतानुसार भक्ती ही ईश्वराच्या प्रती परम अनुराग रूपा असते - 'सा परानुरक्तिरीश्वरे ।' जीव हा ब्रह्मापसून भिन्न नसतो. ईश्वरामध्ये ज्याची सम्यक् निष्ठा किंवा भक्ती असते, तो अमृतत्वास पोहोचतो. ज्ञान, योग आणि कर्म - या सर्वांमध्ये भक्ती श्रेष्ठ आहे. भक्ती ही क्रियारूप नसते, कारण ज्ञानाप्रमाणे ती पण कर्त्याच्या प्रयत्नांची अपेक्षा ठेवीत नाही. भक्तीच्या उदयामुळे ज्ञानाचा क्षय होतो, म्हणून ज्ञान आणि भक्तीमध्ये एकता नसते. द्वेषाची विरोधिनी आणि रस शब्दाने प्रतिपाद्य असल्याकारणाने भक्ती ही सस्वरूपा असते. योगाप्रमाणे भक्तीचा प्रेमाशी विरोध नाही. भक्ती ही स्वत: रागात्मिका आहे, कारण ईश्वरविषयक रागा (प्रेमा)स भक्ती असे म्हणतात. म्हणून ती त्याज्य नाही. विषयाप्रती आसक्तीच त्याज्य आहे. आचार्य कश्यप यांच्या मतानुसार भक्ती ही ऐश्वर्यपरा म्हणजेच ईश्वराच्या ईशत्वामध्ये असते. बुद्धी जेव्हा एकमात्र परमेश्वराचेच आश्रय घेते तेव्हाच ती मोक्षदायिनी बनते, कारण की परमेश्वर सर्व जीवांपासून अतीत आहे.

भक्तीची दृढता आणि निर्मलतेचे ज्ञान लौकिक प्रेमाप्रमाणेच बाह्य चिन्हांद्वारे होते. भगवंताप्रती एकांत भाव किंवा अनन्य प्रेमच **पराभक्ती** आहे. भगवंतास समर्पित केले गेलेले कर्म आपले शुभाशुभ फल देण्यामध्ये असमर्थ असल्याकारणाने बंधनकारक नसते. त्याची ही बंधनहीनताच पराभक्तीचे प्राप्तीचे द्वार आहे.

**गौणीभक्ती**चे तीन भेद आहेत – (१) आर्त भक्ती, (२) जिज्ञासा भक्ती व (३) अर्थार्थिता भक्ती. भक्तीमध्ये सर्वांना समान अधिकार आहेत. अन्य भक्तिद्वारे बुद्धीचे अत्यंत लय झाल्यामुळे परमेश्वराचे साक्षात्काररूप बोध प्राप्त झाल्यानंतर जीवाचे कर्म आणि भोक्तृत्व नष्ट होऊन जाते, केवळ आयुष्याचे बंधन बाकी राहते, अर्थात शेष आयुष्यामध्ये तो जीवनमुक्त अवस्थेमध्ये राहतो. पराभक्तीमुळे तत्त्वज्ञानाचे उदय झाल्यामुळे विकारबुद्धीचे लय होऊन जाते, आणि सर्वत्र परमेश्वराचे दर्शन होऊ लागते, म्हणून भक्तीचे आश्रय ग्रहण करणेच श्रेयस्कर असते.

**ख) नारदभक्ति सूत्र :** या ग्रंथामध्ये एकूण चौऱ्याऐंशी (८४) सूत्रे आहेत. देवर्षि नारद यांच्या मते भगवंतामध्ये अनन्य प्रेम होऊन जाणे (असणे) म्हणजेच भक्ती होय. – 'सात्वास्मिन् परमप्रेमरूपा ।' ती अमृतस्वरूपा आहे. हिला प्राप्त करून मनुष्य सिद्ध बनून जातो, अमर होऊन जातो आणि तृप्त होऊन जातो. भगवंताशी अनुकूल कर्म करणेच त्याच्या प्रतिकूल विषयामध्ये उदासीनता दाखविणे हे आहे. देवर्षि नारद यांच्या मते समस्त कर्मे आणि आचारांना भगवंतासाठी अर्पण करणे आणि त्याच्या विस्मरणामध्ये परम व्याकुळतेचा अनुभव करणेच **भक्ती** आहे. प्रेमरूपा भक्ती कर्म, ज्ञान आणि योग या सर्वाहून श्रेष्ठ आहे; कारण की ती कोणत्याच फल-प्राप्तीच्या आकांक्षेने केली जात नाही. ती स्वत:च आपले फळ आहे – 'फलरूपत्वात्', भक्तीमध्ये कर्म आणि ज्ञानयोगासारखा अहंकार नसतो. काही आचार्यांच्या मते भक्तीचे साधन ज्ञानच आहे. दुसरे आचार्य भक्ती आणि ज्ञानास एक दुसऱ्याचे पूरक मानतात, परंतु नारद यांच्या मतानुसार भक्ती ही फलरूपा आहे. संसाराच्या बंधनापासून मुक्त होण्याची इच्छा राखणाऱ्यांनी भक्तीच ग्रहण केली पाहिजे. भक्तीसाठी सर्वात मुख्य साधन सद्‌गुरू आणि भगवंताची लेश मात्र कृपाच आहे. महापुरुष अथवा संतजनांचा सत्संग अत्यंत दुर्लभ आहे. ते पण भगवंताच्या कृपेनेच प्राप्त होते.

**प्रेमरूपा भक्ती** आणि गौणी भक्तीचे स्वरूप स्पष्ट करताना नारद म्हणतात की प्रेमाचे स्वरूप हे मूक माणसाच्या स्वादासारखे अनिर्वचनीय आहे. ती गुणरहित, कामनारहित, प्रतिक्षण वाढत जाणारी, अखंड आणि अत्यंत सूक्ष्म स्वरूप आहे. या प्रेमास प्राप्त करून प्रियकर या प्रेमासच पाहतो, प्रेमासच ऐकतो, प्रेमाचेच वर्णन करतो आणि प्रेमाचेच चिंतन करतो. **गौणीभक्ती** सत्व, रज आणि तमरूप गुणांच्या भेदांमुळे किंवा आर्त, जिज्ञासू व अर्थार्थीच्या भेदांमुळे तीन प्रकारची असते. यापैकी तामसीपेक्षा राजसी आणि राजसीपेक्षा सात्विकी भक्ती उत्तम असते.

स्वानुभूती रूप, शांति रूप, परमानंद रूप असल्याकारणाने भक्ती, ज्ञानयोगादीपेक्षा सुलभ आहे. निष्काम बनून नित्य दास्य आणि नित्य कांता भावाने भगवंताशी प्रेम केले पाहिजे. असले अन्य भक्तच श्रेष्ठ असतात. भक्तांमध्ये जाति, विद्या, रूप, कुळ, धन आणि क्रियादीचा भेद नसतो, कारण सर्व भक्त हे भगवंताचेच असतात.

भक्तांनी अहिंसा, सत्य आणि धर्माचे पालन केले पाहिजे आणि निश्चिंतपणे सर्वस्व भावनेने भगवंताचे भजन केले पाहिजे. क्षणार्धभर सुद्धा भजनाविना व्यर्थ दवडू नये. यामुळे भगवंत लवकरच भक्तांच्या हृदयामध्ये प्रकट होतात, कारण की कायिक, वाचिक आणि मानसिक या तिन्ही सत्वांमध्ये भक्तीच श्रेष्ठ आहे.

प्रेमरूपा भक्ती एक असून पण अकरा (११) प्रकारची असते : १) गुणमाहात्म्यासक्ती (भगवंताचे गुण आणि महात्म्यामध्ये आसक्ती), २) रूपासक्ती, ३) पूजासक्ती, ४) स्मरणासक्ती, ५) दास्यासक्ती, ६) सख्यासक्ती, ७) कांतासक्ती, ८) वात्सल्यासक्ती, ९) आत्मनिवेदनासक्ती, १०) तन्मयासक्ती आणि ११) परम विरहासक्ती. शेवटी सर्व मतभेदांना टाळून असे म्हणावे लागते की भक्तीच सर्वश्रेष्ठ आहे.

**१०) साररूपात भक्तीचे स्वरूप :** रामानंदस्वामी यांनी भक्तीची जी व्याख्या केली आहे त्यावरून भक्तीचे स्वरूप-लक्षण स्पष्टपणे लक्षात येतात. त्यांच्या व्याख्येच्या आधारे भक्तीची अशी वैशिष्ट्ये माहित पडतात -

(क) परमेश्वराप्रती अनुरागा (प्रेमा)स भक्ती म्हणतात;

(ख) या प्रेमा (अनुरागा)मध्ये अनन्यता आवश्यक आहे;

(ग) भगवंताची सेवा करणेच खरोखर त्याची भक्ती करणे आहे;

(घ) तैल धारेप्रमाणेच अखंड नामस्मरण करणेच भक्ती आहे.

रामानंदांनी भक्तीचे दोन प्रमुख घटक प्रपत्ति आणि न्यास असे मानले आहेत.

लौकिक भोगांशी विमुखता, ईश्वराज्ञापालन आणि ईश्वरी इच्छेमुळे जे काही घडते त्यावर प्रसन्न असणे, ही खऱ्या प्रभु-भक्तीची लक्षणे आहेत. सहनशीलता आणि सत्यपरायणता यांच्या संयोगाशिवाय प्रभुप्रेम पूर्णत्वास पोहोचत नाही. चित्तशुद्ध आणि सद्‌गुणोपासना आणि त्या उपासनेद्वारे प्रसंगानुसार इतरांसाठी आपल्या सुखाचे समर्पण, हीच परमेश्वराची श्रेष्ठ भक्ती आहे. ज्ञान जीवनाचे फळ आहे; तर भक्ती त्याचे रस. मुखी नारायणाचे नाम आणि हाती भूतदयेचे काम. हाच भक्ति-मार्ग आहे. भक्तीची पराकाष्ठा यामध्ये आहे की आम्ही सर्वव्यापी प्रभूस आपल्या हृदयामध्ये पहावयास सुरू करू. पराभक्ती ही आहे की या समस्त विश्वास प्रभूचे देव मानले जावे. भक्ती म्हणजे निष्काम कर्म. गुणांचे उत्कर्ष आणि त्यांचे पूर्णत्व साधण्याचा प्रयत्न हे भक्तीचे खरे लक्षण आहे. मोक्ष-प्राप्तीच्या साधनामंध्ये भक्तीच सर्वांहून श्रेष्ठ आहे. भगवंत फक्त भक्तीने तृप्त होतात.

## ३) सूफ़ींची उपासना (इबादत)

या उपासनांकडे पहाण्याचा त्यांचा दृष्टिकोन समस्त इस्लामी उपासना पद्धतीच सूफ़ी स्वीकारतात व ती आचरणामध्ये आणतात. मात्र सर्वसामान्य सनातनी इस्लामी धारणेपेक्षा वेगळा असतो. इस्लामी उपासनेमध्ये एकेश्वरवादी निष्ठा व श्रद्धा, उपासना-भक्ती (नमाज़), उपवास व्रत ('रोज़ा'), धर्मकर वा धर्मदान ('ज़कात') आणि महातीर्थ यात्रा ('हज') या पाच गोष्टींचा समावेश होतो. 'कुरआन' आणि 'सुन्नत' (प्रेषितमार्ग)चे अनुसरणकर्ते सूफ़ी उपरोक्त इस्लामी पंचस्तंभांना कसे बरे टाळतील?

**१) एकेश्वरवादी निष्ठा आणि श्रद्धा (तौहीद) –** सुरुवातीस सूफ़ी साधकांनी परमात्मा, आत्मा, सृष्टी आणि त्यांच्या परस्पर संबंधाविषयी पवित्र कुराणाच्या भाषेमध्ये आणि इस्लामच्या कट्टर सिद्धान्तानुरूप समजून घेण्याचे प्रयत्न केले. इस्लामच्या कट्टर सिद्धान्तानुसार परमेश्वर अज्ञेय, अलौकिक आणि सृष्टीपासून अतीत आणि वेगळा असा आहे. इस्लामचा एकेश्वरवाद परमेश्वरा (अल्लाह)शिवाय कोणत्याच दैवी शक्तीच्या सत्तेस

स्वीकार करत नाही. अनेकेश्वरवादा (बहुदेववादा)स इस्लाम धर्मात फार मोठे पाप मानले गेले आहे. या सिद्धान्तानुसार परमेश्वर एक आहे आणि त्याच्या शिवाय दुसरा कोणीच (उपास्य) नाही. तो सर्वशक्तीमान आहे. त्याची तुलना केली जाऊ शकत नाही. तो अद्वितीय आहे. त्याच्या सारखा तोच आहे. त्याची सर्वशक्तीमत्ता अक्षुण्ण आहे. त्याच्या बरोबरीचा कोणीच नाही. त्याच्याकडे कायदे-कानूंमध्ये कोणीच दखल देऊ शकत नाही. त्यांमध्ये कोणीही परिवर्तन घडवून आणू शकत नाही. आत्मा आणि दृश्य जगाची सत्ता त्याच्या पासून वेगळी आहे. तो सर्वातीत आहे. त्याचे न्याय हे त्याचेच आहे. त्यामध्ये कोणीच व्यवधान निर्माण करू शकत नाही. तो अवतार धारण करीत नाही. तोच या जगताचा कारण आहे आणि तोच निर्माता आहे. त्याच्याच इच्छेवर ही सृष्टी निर्भर आहे. समस्त वस्तू त्यानेच निर्माण केलेल्या आहेत. तो सर्व काही पाहातो. प्रत्येक सजीवाच्या चांगल्या-वाईटाचा तोच निर्णायक आहे. त्याचे न्याय कधीच चुकीचे नसते. तो क्षमाशील आहे. तोच एकमात्र असा आहे की जो आमच्यामध्ये आशा आणि भीती निर्माण करतो. तसाच तो अनादि आणि असीम आहे. तो निर्गुण आहे. तो स्थळ-काळापलीकडे आहे. तो एकरस आहे. जगाचे सर्व व्यवहार त्याच्या शक्तीवरच चाललेले असतात. जे काही आपण पाहतो ते सर्व त्याची सत्ता आणि तिची शक्ती याची ओळख करून देतात; परंतु अज्ञानवश आम्ही त्याला पाहू शकत नाही.

परमेश्वराचे सौंदर्य, त्याचे ऐश्वर्य आणि त्याच्या पूर्णतेचे ज्ञान उपासकांना - भक्तांना अनन्य भक्तिद्वारे होते. कोणास कधी सौंदर्यामुळेच त्याचे भान होते तर इतरांना कधी त्याच्या अनन्य विभूतीमुळे. परमेश्वर आणि मानवामध्ये असलेल्या अंतरावर पवित्र कुराण अत्यंत भर देते, तरी पण अशी मान्यता आहे की मनुष्य हा इतर प्राण्यांहून विशिष्ट आहे. तो ईश्वरीय विधानास आकलन करून घेण्यास समर्थ होऊ शकतो. जे साधक आत्मविस्मृत होऊन परमेश्वराच्या विभूतीची अनुभूती घेतात, त्यांचे जीवन परमात्मामय बनून जाते व त्याच्यातच गुंग होऊन जातात. त्यांच्यावर परमेश्वराची कृपावृष्टी होते आणि ते परमेश्वरास प्राप्त करून आनंद स्वरूप होऊन जातात.

सुरुवातीस सूफ़ी साधक याच सिद्धान्तास मानत असत, परंतु नंतर हळुहळू ते या सिद्धान्तास पोहोचले की, वास्तविक सत्ता आणि परम सत्य तोच (ईश्वर) आहे. त्यांचे असे मत होते की परमेश्वराच्या सत्तेव्यतिरिक्त इतर अन्य सत्तेची कल्पना यामुळे बहुदेववाद जन्मतो. त्यांच्या मतानुसार तो (ईश्वर) 'एक' आहे आणि तत्सम तोच आहे, अन्य कोणी नाही. तो फक्त 'एक'च नसून तोच सर्व काही (सर्वस्व) आहे, तोच परम सत्य आहे. त्याचे 'एकत्व' सर्वव्यापी आहे. त्याची विभूती जी आम्ही सर्वत्र पाहतो, ती त्याची वास्तविक सर्वव्यापी सत्ता आहे. तो सर्व काही जाणतो, सर्व काही पाहातो आणि आपल्या इच्छेनुसार सर्वांचे संचालन करतो आणि सर्व कार्ये त्याच्याच इच्छेच्या परिणामस्वरूप असतात. सर्वांचा आदि तोच आहे. या सिद्धान्तास मान्य केल्यामुळे सूफ़ी साधक या निष्कर्षास पोहोचले की परमेश्वराचा वास सर्वांमध्ये आहे आणि सर्व प्राण्यांचे निवास परमेश्वरामध्ये आहे. परमेश्वराच्या सर्वातीत रूपाशी या मताचा मेळ बसत नाही.

परंतु गूढवाद्यांचे असे मत आहे की परमेश्वर हा सर्वातीत आहे आणि सर्वगत पण. जो सर्वातीत आहे, निरूपाधी आहे, निर्गुण आहे तो सोपाधि, सगुण आणि सर्वगत कसा बरे होऊ शकतो! त्या असीमला सीमेमध्ये कसे मर्यादित केले जाऊ शकते? तर्कनिष्ठांच्या मनामध्ये असले प्रश्न नेहमी उपस्थित होतात आणि अशा

प्रकारच्या परस्परविरोधी गोष्टींसाठी त्यांच्याकडे कोणतेच उत्तर नसते. परंतु गूढवाद्यांना यामध्ये कोणतीच अडचण भासत नाही. ते या प्रश्नाचे उत्तर सहजपणे देऊन जातात. त्यांचे असे मत आहे की, परमेश्वर हा परमसत्य आहे आणि तर्कनिष्ठास त्या परम सत्यास बुद्धीद्वारे समजून घेणे अवघड गोष्ट आहे. परंतु गूढवादी साधक सहजपणे आपल्या आंतरिक प्रेमाच्या बळावर त्यास ओळखतो – समजून घेतो. त्याला ओळखण्यासाठी भक्ती लागते, निष्काम प्रेमाची गरज असते, कारण की तो (ईश्वर) प्रेम–स्वरूप आहे, तो आनंद–स्वरूप आहे, तो अनंत सौंदर्य आहे.

मानव हा ब्रह्मांडाचा मुकुटमणी असल्यामुळे, या विश्वावर अधिराज्य करण्याची क्षमता परमेश्वराने त्याला बहाल केली आहे. समस्त विश्व त्याच्या अधीन आहे. विश्वाची निर्मिती त्याच्या सेवेसाठी आहे. ईश्वरापाशी मानवाचा एवढा मोठा महिमान आहे! तर मग नरोत्तम किंवा पुरुषोत्तमाचे केवढे मोठे स्थान असेल!! नरोत्तमाखातरच परमेश्वराने विश्व निर्माण केले आहे. म्हणून ईश्वराची निष्ठा आणि श्रद्धेसोबतच नरोत्तम असलेले प्रेषित मुहम्मद स. हे परमेश्वराचे प्रेषित असल्याबद्दलची श्रद्धा बाळगणे पण अनिवार्य ठरते. म्हणून परमेश्वर हाच एकमेव उपास्य असून प्रेषित मुहम्मद स. हे त्याचे प्रेषित आहेत, अशी दृढ श्रद्धा सूफ़ी साधक बाळगतात.

**२) उपासना–भक्ती (नमाज़)** – इस्लाममध्ये भक्ती–उपासने (नमाज)साठी शारीरिक स्वच्छता ही पूर्व अट अनिवार्य आहे. शिष्टतेच्या आधारावर बनलेल्या सामाजिक आदर्शामध्ये सर्वात अगोदर स्वच्छता व शुचिता ही गोष्ट मान्य करण्यात आली आहे. या बाह्य स्वच्छतेवर भर देण्याशिवाय सूफ़ी अंत:करणाच्या विशुद्धतेवर आणि वाईट सवयी आणि दुष्चरित्रतेच्या शुचितेवर फार भर देतात.

नमाज़ (भक्ती) एकीकडे परमेश्वराची उपासना आहे तर दुसरीकडे परमेश्वरापर्यंत पोहोचण्याचे साधन पण आहे. नमाज़मध्ये एकीकडे मनास शुद्ध केले जाते, तर दुसरीकडे शरीरास पण स्वच्छ ठेवणे ही एक मूळ अट आहे. स्वच्छता आणि शुद्धता ही इस्लामची मूळ शिकवण आहे. पवित्र कुराणमध्ये म्हटले गेले आहे – यामध्ये असे काही लोक आहेत की ज्यांना स्वच्छता आवडते (प्रिय असते). दुसऱ्या एका ठिकाणी असे सांगितले गेले आहे – ''निश्चितच अल्लाह त्यांना पसंत करतो जे त्याच्याकडे पश्चातापासह वळतात, आणि जे स्वत:ला स्वच्छ व शुद्ध ठेवतात त्यांना (तो) पसंत करतो.'' – २:२२२.

सूफ़ी स्वच्छता आणि शूचितेवर फार जास्त भर देतात. त्यांच्यापाशी बाह्य स्वच्छता तर आवश्यक आहेच शिवाय आंतरिक शुचिता पण तितकीच आवश्यक आहे. या दोन्ही गोष्टी सोबत असतात व त्या दोन्ही एक दुसऱ्यास बळकटी आणतात.

'कश्फ़ुल महजूब'चे लेखक दाता गंज बख्श अली हुजवीरी यांनी या संदर्भात सूफ़ींच्या काही प्रसंगाच्या नोंदी मांडल्या आहेत. ते म्हणतात की, सूफ़ी साधक अबू ताहिर हरमी हे चाळीस वर्षेपर्यंत मक्केमध्ये बैतुल्लाहची सेवा करीत राहिले, परंतु त्यांनी मक्केच्या हद्दीमध्ये कधीच आचमन ('वज़ू') केले नाही. ते 'वज़ू' अर्थात आचमन करण्यासाठी दर वेळी हरमच्या बाहेर जात. ते म्हणत की ज्या भूमीस अल्लाहने आपल्याशी निगडित केले आहे. त्यावर मी आचमन कसे बरे करू आणि त्यावर मी आचमनाचे पापाने भरलेले पाणी कसे बरे पसरवू?

सूफ़ी संत अबू बक्र शिब्ली यांच्या संबंधात असे म्हटले जाते की एक दिवस 'वज़ू' म्हणजे आचमन करून (उपासनेसाठी) मशिदीकडे निघाले. त्यांना एक आवाज ऐकू आला की, अबू बक्र! तू आपल्या बहिरंगास ठीक-ठाक करून घेतलेस, परंतु तुझ्या अंतरंगाची शुचिता कोठे गेली? तेव्हा त्यांच्या तात्काळ लक्षात आले की त्यांचे मन (लक्ष) घरामधील एका वस्तूकडे लागले आहे. तेथूनच ते परत फिरले आणि घरातील सर्व सामान परमेश्वराप्रित्यर्थ दान देऊन टाकले. ते वर्षभर, नमाज़साठी पुरतील, एवढ्या वस्त्राशिवाय, काहीच आपल्या जवळ शिल्लक ठेवले नाही. त्यानंतर ते सूफ़ी महात्मा जुनैदपाशी आले. तेव्हा ते त्यांना म्हणाले, हे अबू बक्र! तू अंगिकारलेली ही शुचिता फारच उत्तम आणि उपयोगी होती. आता परमेश्वर तुला नित्य स्वच्छ व शुद्ध ठेवेल. यानंतर शिब्ली म्हणतात की यानंतर मी कधीच आचमनाशिवाय ('बे-वजू') राहिलो नाही.

'नमाज़'साठी आवश्यक असलेल्या शुचितेस तत्त्वज्ञ सूफ़ी आचार्य इमाम ग़ज़ाली यांनी चार विभागांमध्ये विभाजित केले आहे -

१) बाह्य (शारीरिक) शुचिता,

२) शारीरिक अवयवांचे अपराधांपासून मुक्त असणे,

३) मनाचे वाईटपणापासून अलिप्त असणे,

४) अंत:करणाची शुचिता.

नमाज़ (भक्ती)साठी या चारी शुचितेची गरज (अपेक्षा) असते. पोशाखाचे वस्त्र स्वच्छ असावे, देह स्वच्छ असावे, प्रार्थनेचे स्थळ (स्थान) स्वच्छ असावे, आणि मनास शुद्ध ठेवून प्रभू नामस्मरणामध्ये मग्न होऊन जाणे, हीच तर 'नमाज़' आहे.

इमाम ग़ज़ाली म्हणतात की 'नमाज़' म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण, पवित्र कुरआनचे वेचक श्लोकांचे पठण, परमेश्वरापाशी कृपायाचना आणि त्याच्याशी सु-संवाद साधण्याशिवाय दुसरे काहीच नाही. या गोष्टी मनाच्या एकाग्रतेशिवाय शक्य नाहीत. कुरआनला समजल्याशिवाय ना नमाज पूर्ण होऊ शकते, ना परमेश्वराची महानता. त्याचा दबदबा आणि त्याच्या रुद्रावताराखाली आल्याशिवाय त्याची परिपूर्तता होऊ शकत नाही. जेवढी समज आणि ज्ञान अधिक असेल तेवढेच ईश्वराचे भय अधिक असेल आणि मनाची एकाग्रता वृद्धिंगत होईल. (इमाम ग़ज़ाली - 'एह्या-उल्-उलूम' पृ. ११५)

ते पुढे लिहितात - आंतरिक शुचिता ही वास्तविक परमेश्वराच्या नाम-स्मरणास मनामध्ये ठासून भरण्याशिवाय दुसरे काहीच नाही आणि यामुळेच नमाजची पूर्ती होते. चांगल्या प्रकारे जाणून असा की बहिरंगास तर कपड्यांमध्ये लपवाल, परंतु अंतरंगास परमेश्वरापासून कसे बरे लपवाल? म्हणून त्याच्या समोर मान-सन्मानासह हजर राहा आणि पक्के जाणून असा की तो परमेश्वर अंत:करणाच्या गुह्यांना चांगल्या प्रकारे जाणतो. (इमाम ग़ज़ाली - 'एह्या-उल्-उलूम' पृ. ११५ .)

दुसरे एक तत्त्वज्ञ सूफ़ी आचार्य शेख़ शहाबुद्दीन सहरवर्दी असे म्हणतात की, 'नमाज़' अल्लाह आणि त्याचा भक्त यांच्यामधील संबंधांना मज़बूत करते, आणि ज्याअर्थी ही अल्लाह आणि त्याचे भक्त यांच्यामधील संबंध दृढ करते त्याअर्थी भक्तासाठी हे आवश्यक आहे की त्याने विनम्रता अंगिकारावी. असे झाल्यास त्याचे हृदय ज्योतिर्मय बनून जाईल. (शेख़ शहाबुद्दीन सुहरवर्दी - 'अवारिफ़ुल मआरिफ़' - पृ. ३१७)

‘नमाज़’ ही कशा प्रकारे बहिरंग आणि अंतरंग या दोहोस शुद्ध करते, या संबंधात काही अटींची परिपूर्तता आवश्यक असते. यांपैकी काही अटींचा उल्लेख सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य दातागंज बख़्श अली हुजवीरी यांनी केला आहे. त्या अटी अशा आहेत –

पहिली अट ही स्वच्छतेची आहे. बाह्य मळ सारल्यानंतर शरीराची स्वच्छता होते. मनास मनोकामनांच्या दास्यतेपासून मुक्त करून आणि उपाधी–प्रेमाचा त्याग करून आंतरिक शुचिता साध्य करता येते. बाह्य मळापासून कपडे स्वच्छ असावेत आणि कपड्याची आंतरिक शुचिता म्हणजे ते वैध कमाईपासून शिवलेले असावेत. बाहेरील दृश्य घाणीपासून जागा स्वच्छ असावी आणि त्या जागेची अंतरंग शुचिता म्हणजे ती जागा जोर–जबरदस्तीने व जुलूम करून हस्तगत केलेली नसावी.

दुसरी अट अशी की ‘काबागृहा’कडे तोंड करून प्रार्थना संपन्न करण्याची आहे. हे त्याचे बहिरंग आहे. मनास ईश्वरी राजसिंहासनाकडे आकृष्ट करणे, हे त्याचे अंतरंग आहे.

तिसरी अट आहे नमाजसाठी उभे राहणे. उपासक उभे रहाण्यास समर्थ असेल तर त्याने सरळ उभे रहावे. हे तिचे बहिरंग आहे. स्वत:स अशा परिस्थितीमध्ये परमेश्वरासमोर उभे असल्याचे कल्पिणे हे तिचे तिसरे अंतरंग आहे.

चौथी अट आहे मनोनिश्चय किंवा दृढ संकल्प. निश्चयास मुखनिसृत स्वरूपामध्ये अभिव्यक्त करणे हे तिचे बहिरंग आहे, आणि हा संकल्प फक्त परमेश्वरासाठीच दृढ आहे, हे तिचे अंतरंग आहे.

पाचवी अट ‘तक्बीर’ म्हणजेच ‘अल्लाहच सर्वश्रेष्ठ आहे’ असे उद्‌गार काढणे. तोंडाने ‘अल्लाहु अक् बर’ उच्चारित करणे हे तिचे बहिरंग आहे; तर अल्लाहचे महात्म्य आणि त्याचे रौद्र स्वरूप यामुळे उपासकाच्या मनाचा थरकाप होणे, हे तिचे अंतरंग आहे.

हुजवीरी पुढे म्हणतात की हळुवारपणे कुरआनच्या वेचक श्लोकांचे पठण करावे क्रमवार, आणि ईशवाणीच्या महानतेसह नमन (‘रूकूअ’) करावे. थरकापत, प्रणिपात (‘सज्दा’) करावे विनम्रतेसह, उपविश्यासन (‘क़ादा’) करावे. भेटीदरम्यान जणू की ईश्वराच्या दरबारामध्ये बसलेला आहे, आणि शांती (‘सलाम’) आठवावी निर्वाणा (‘फ़ना’)च्या वैशिष्ट्यासह की त्याचे अस्तित्व संपूर्ण सृष्टीसाठी हितकारी व कल्याणाचे स्रोत असेल. (हुजवीरी – ‘कश्फुल महजूब’ – पृ. ४६४.)

‘नमाज़’मध्ये एकाग्रता किती जरूरीची असते याबाबतीत शेख शहाबुद्दीन सुहरवर्दी आणि हुजवीरी यांनी काही प्रसंग (घटना) नमूद केले आहेत. हज़रत आइशा म्हणतात की अल्लाहचे प्रेषित मुहम्मद यांच्या छातीमधून नमाजच्या वेळी असा आवाज निघायचा की जणू भांड्यामध्ये उत्कलन सुरू आहे. हा आवाज मदीनेच्या गल्लीमध्ये पण ऐकू यायचा. (शेख शहाबुद्दी सहरवर्दी – ‘आवारिफ़ुल मआरिफ़’ – पृ. ३३६.) आणि हज़रत अली जेव्हा ‘नमाज़’ संपन्न करण्यासाठी तत्पर बनत तेव्हा त्यांच्या शरीरावरील रोमांच त्यांच्या कपड्याबाहेर पडे आणि थरथर कापत ते म्हणत असत – ती ‘ठेव’ परत करण्याची वेळ आलेली आहे, जिला उचलण्याविषयी आकाशे आणि पृथ्वी यांनी आपली असमर्थता दर्शविली होती. (हुजवीरी – ‘कश्फुल महजूब’ – पृ. ४६५.)

पवित्र कुराणामध्ये याचा उल्लेख असा आहे – ''आम्ही (विचार व आचार स्वातंत्र्याचा) ठेवा (अमानत) आकाशे, पृथ्वी आणि पर्वत यांना देऊ केला, पण त्यांनी ती जबाबदारी उचलण्यास नकार दिला. कारण ते त्या जबाबदारीचे भार उचलण्याच्या बाबतीत घाबरले. पण माणसाने (मुद्दाम व अविचारीपणे) ती उचलून घेतली. खरोखर त्याने स्वत:ला सर्वात मूर्ख व सर्वात दुष्ट सिद्ध केले.'' – ३३:७२.

नमाज़मध्ये सूफ़ी केवढे रस घेत आणि केवढे आनंद अनुभव करीत आणि त्यामध्ये त्यांची केवढी तल्लीनता असायची, याविषयी काही घटनांचा उल्लेख हुजवीरी यांनी 'कश्फ़ुल महजूब' या ग्रंथामध्ये केला आहे. त्यांनी अब्दुल्लाह बिन मुबारक यांच्या कथनास उधृत करून म्हटले आहे की त्यांनी आपल्या बालपणी एक ईश्वर-भक्त उपासिका स्त्रीस पाहिले होते. नमाज़मध्ये असताना एका विंचूने तिला जवळ जवळ चाळीस वेळा दंश केले, परंतु ती तिळमात्र विचलित झाली नाही. जेव्हा तिची नमाज संपली तेव्हा मी म्हणालो, अग, आई! तू विंचूस का झटकले नाहीस? ती म्हणाली, बेटा! तू लहान आहेस. परमेश्वराच्या कामाच्या वेळेस म्हणजेच परमेश्वराच्या भक्तीमध्ये असताना, मी आपले स्वत:चे काम कसे सुरू करीन?

तसव्वुफच्या साधना मार्गामध्ये काय प्रत्येक सूफ़ीस कर्मकांडाचे (शरीअत) पालन करणे आवश्यक आहे! काही थोडे सूफ़ी सोडून बाकीचे सर्व सूफ़ींचे असे मत आहे की, भावाविष्टाच्या अवस्थेमध्ये आणि चेतना हरवून बसलेल्या स्थितीमध्ये असतानाचे अपवाद वगळून कर्मकांडा (शरीअत)चे परिपालन करणे अत्यंत आवश्यक आहे. हुजवीरी यांनी यासंबंधी एक चांगली गोष्ट सांगितली आहे. ते म्हणतात की, जेव्हा अल्लाह हा आपल्या सेवका (भक्ता)स अशा स्थितीपर्यंत पोहोचवून देतो की तो त्या (प्रभूच्या) प्रेमामध्ये मस्त होऊन जातो आणि त्याच्याशिवाय त्याला चैन पडत नाही, तेव्हा या मार्गामधील कष्ट आणि संकटे व अडथळे त्याच्यासाठी आरामदायक, सुखदायक आणि रसाळ बनून जातात. जस जसे त्याचे प्रेम वृद्धींगत होत जाईल तस तसे प्रेयसीच्या आज्ञापालनामध्ये कष्ट करणे सोपे होत जाईल. याच कारणामुळे हज़रत मुहम्मद रात्रं-दिवस इतकी जास्त नमाज़ पढत की त्यांचे पाय सुजत आणि भक्ती (नमाज़)मध्ये त्यांची गोडी वृद्धींगत होई.

**३) उपवास व्रत (रोज़ा) :** इमाम इब्ने क़य्यिम यांनी उपवासव्रत – 'रोज़ा'चा उद्देश मनास वासनांपासून सुरक्षित ठेवणे, असे सांगितले आहे, की जेणेकरून उपवासव्रतीमध्ये सात्त्विक जीवन जगण्याची क्षमता निर्माण होऊन जावी. बाह्य इंद्रिये आणि अंत:शक्तींना विकृत तत्त्वांपासून सुरक्षित ठेवून व्यर्थ गोष्टींना बाहेर निष्कासित करण्यामध्ये उपवास व्रताची प्रमुख भूमिका असते. म्हणून त्यामुळे ईशपरायणतेत फार मोठा आधार प्राप्त होतो. (इब्ने क़य्यिम – 'जादुलमआद', – पृ. ८२.) पवित्र कुराणामध्ये उपवासव्रता (रोज़ा)चा उद्देश्य हेच सांगितले गेले आहे – ''श्रद्धावंतांनो! तुमच्यासाठी उपवासव्रत ('रोज़ा') अनिवार्य करण्यात आले आहे. ज्याप्रमाणे तुमचे पूर्वीचे (ग्रंथधारी) लोकांस उपवास पाळणे कर्तव्य केले गेले होते. अशासाठी की तुम्ही (कित्येक पापाविषयी) कदाचित् जपाल. ..... जर तुम्ही समजाल तर उपवास करणे हे (काही झाले तरी) तुमच्या ठायी उत्तमच होय. ..... तर तुमच्यापैकी ज्याची (आपल्या आयुष्यात) या महिन्याशी ('रमज़ान') गाठ पडेल त्याने त्यात उपवास करावा.'' – २:१८३-८५. वासनेस नियंत्रित करण्यामध्ये उपवास व्रताची अनुकूल भूमिका असते. अभद्र वाणी, कुविचार आणि दुष्कर्मे यांपासून परावृत्त होण्याचे नाव 'सौम' वा 'रोज़ा' आहे. 'रोज़ा' एक उपासना कर्म

आहे. आध्यात्मिक उंची गाठण्यासाठी आणि शाश्वत मोक्ष साध्य करण्यासाठी केलेली उपासना किंवा प्रार्थनेचे नाव 'रोज़ा' आहे.

प्रेषित मुहम्मद यांनी अल्लाहतर्फे असे सांगितले आहे की प्रत्येक सत्कर्माचा बदला हा दहा पटापासून ते सातशे पटापर्यंत मिळत असतो, परंतु उपवासव्रता ('रोज़ा')चा बदला हा ज्याअर्थी माझ्यासाठी आहे, त्याअर्थी मी त्याचा ('अपार') बदला स्वत: देईन. एक प्रेषित-वचन ('हदीस') आहे की, संयम हा श्रद्धेचा अर्धा हिस्सा असतो, तर रोज़ा (उपवासव्रत) हा संयमाचा अर्धा हिस्सा (असतो).

शेख यह्या बिन मुआज़ यांचे कथन आहे की, जेव्हा सच्छिष्य पोटभर खाऊ लागतो तेव्हा देवदूत प्रेमापोटी त्याच्यावर अश्रू वाहतात (ओसंडतात) आणि जो कोणी खाण्याच्या लोभामध्ये पडला, समजावे की तो वासनेच्या अग्नीमध्ये जळाला, कारण की आदमची संतान हजार प्रकारच्या वाईटपणामध्ये गुंतलेली असते आणि ते सर्व शैतानाच्या हातामध्ये लटकलेले असतात. म्हणून जेव्हा मानव हा भुकेल्या पोटी असतो आणि आपल्या तोंडास नियंत्रणामध्ये ठेवून मनाची साधना करतो, तेव्हा हे सर्व अंश सुकून जातात किंवा भुकेच्या आगीमध्ये जळून जातात, तेव्हा शैतान त्याच्या सावलीपासून लांब पळून जातो; परंतु जेव्हा पोट भरलेले असते आणि आपल्या तोंडास वासना तृप्तीसाठी मोकाट सोडून देतो तेव्हा ते अंश तृप्त होऊन जातात.

पोटाचे भरलेले असणे हा मनाच्या कालव्याचा असा प्रवाह आहे, की ज्याच्यावरून शैतान निघून जातो, आणि भूक आत्म्याचा तो प्रवाह आहे, की जिच्यावर देवदूत उतरतात. म्हणून शैतान भुकेलेल्या माणसापासून सुद्धा एक क्षण हारतो, परंतु तो पोटभरू व्यक्तीची गळाभेट घेतो, मग भलेही तो उभे राहून उपासनेमध्ये का मग्न असेना! जर तो झोपलेला असेल तर न जाणो त्याचे काय हाल झाले असते! म्हणून एक खरा सच्छिष्य खाण्या-पिण्याच्या (अन्नोदकाच्या) मागणीसाठी ईश्वरासमोर आपले निवेदन करतो. म्हणून उपवासव्रत ('रोज़ा') भुकेच्या स्थितीमध्ये शैतानास लांब पळवून लावण्यामध्ये आणि मनावर नियंत्रण प्राप्त करण्यासाठी एक उत्तम उपाय आहे. (शेख़ शहाबुद्दीन सुहरवर्दी - 'अवारिफुल मआरिफ़' - पृ. ३३९-४०.)

हुजवीरी यांच्या मते उपवासव्रत ('रोज़ा') एक अशी उपासना आहे की, जर एखाद्याच्या मनामध्ये अल्लाहचे भय नसेल, तर तो मोठ्या सहजपणे सर्व काही खाऊन-पिऊन लोकांसमोर उपवासव्रती आणि संयमी बनून राहू शकतो. उपवासव्रताची चोरी परमेश्वराशिवाय कोणीच पकडू शकत नाही.

जुनैद बग़दादी यांनी उपवासव्रतास अर्धे साधनामार्ग ('तरीक़त') मानले आहे. त्यांचा असा तर्क आहे की उपवासव्रतामध्ये दिखाऊपणास काहीच वाव नसतो. म्हणून निष्ठेशिवाय कोणीच उपवासव्रत राखू शकत नाही आणि समस्त साधनामार्ग यामध्येच लपलेले आहे. (हुजवीरी - 'कश्फुल महजूब' - पृ. ३२४.)

**४) धर्मदान (ज़कात) :** भक्ती (नमाज़) आणि उपवासव्रता ('रोज़ा') प्रमाणेच धर्मदान (ज़कात) मनाची शुद्धी आणि धन प्राप्तीचे साधन आहे. 'ज़कात'ला प्रेषित मुहम्मद यांनी धन-संपत्ती आणि त्या धनाच्या मालकासाठी शुद्धीचे कारण मानले आहे. इमाम ग़ज़ाली यांनी आपले ग्रंथ 'एह्याउल उलूम' आणि इब्न-ए-क़य्यिम यांनी 'ज़ादुल मआद'मध्ये 'ज़कात'संबंधी विवरण दिले आहे. 'ज़कात' अर्थात धर्मदान मनाच्या शुद्धीकरणाचे काम करते याविषयी पवित्र कुराणमध्ये अशी नोंद आहे - ''(पैगंबर!) तुम्ही त्यांच्या संपत्तीतून (जे) दान (ते देत आहेत त्याचा) स्वीकार करा. म्हणजे तुम्ही त्याच्या साहाय्याने त्यांचे चित्त शुद्ध व पवित्र

कराल. आणि तुम्ही त्यांच्यासाठी प्रार्थना करा. तुमची प्रार्थना त्यांच्यासाठी खरोखरच मन:शांतीचे साधन बनेल. आणि अल्लाह सर्व काही ऐकणारा व सर्व काही जाणणारा आहे. त्यांना हे माहीत नाही का की, अल्लाह आपल्या भक्तांच्या पश्चात्तापाचा स्वीकार करतो. आणि त्यांच्या दानास स्वीकृती प्रदान करतो. आणि (तो) केवळ अल्लाह आहे (जो) पश्चात्तापाचा स्वीकार करतो. आणि (तो) कृपाळू आहे.'' - ९:१०३-०४. पवित्र कुराणामध्ये जागोजागी धर्मदान करण्याविषयी ताकीद देण्यात आलेली आहे आणि धर्मदान अर्थात ज़कात न दिल्यास त्याच्या गंभीर परिणामांची धमकी दिली गेली आहे. म्हटले गेले आहे - 'जे लोक सोने चांदी जमा करतात आणि अल्लाहच्या मार्गात खर्च करीत नाहीत (म्हणजे 'ज़कात' देत नाहीत) -

'ज़कात' न देणाऱ्यांची फार मोठी प्रताडना केली गेली आहे. अबू हुरैरह म्हणतात की ज्या व्यक्तीकडे, ज़कात न दिली गेलेली संपत्ती असेल, त्या संपत्तीस पुनरुत्थानाच्या दिवशी एक विषारी सापाच्या स्वरूपात आणण्यात येईल. त्या सापाच्या तोंडामध्ये विषाच्या दोन पिशव्या असतील. तो साप विषबाधा करण्यासाठी त्या व्यक्तीच्या शोधात निघेल. शेवटी तो त्या व्यक्तीवर झडप घालून म्हणेल की मी तुझा खजिना आहे (जे तू संग्रहित केले होतेस.)

'ज़कात' हे एक अनिवार्य असे कर्तव्यकर्म आहे की प्रत्येक धनवान व्यक्तीस ते दिले पाहिजेच. 'धनवान व्यक्ती'ची व्याख्या करताना असे सांगितले गेले आहे की ज्या इसमाजवळ साडेबावन्न तोळे चांदी किंवा साडेसात तोळे सोने, अथवा उपरोक्त सोन्याचांदीच्या किमती एवढी रक्कम एक वर्षपर्यंत शिल्लक असली पाहिजे. याशिवाय उंट, गाय, शेळी इत्यादी जनावरांवर पण ज़कात निश्चित केली गेली आहे. शेतीमधील पिके आणि फळे यावर पण ज़कातीचा एक निश्चित हिस्सा आहे. सोने, चांदी आणि रुपये-पैशांवर अडीच टक्के (२$^{१}/_{२}$%) ज़कात निर्धारित केली गेली आहे. (याची कारण-मीमांसा पृष्ठ क्रमांक २६१-२६५ वर दिली गेलेली आहेच.) ज़कात उघडपणे दिली जाऊ शकते, परंतु दान गुप्त रीतीने देणे श्रेयस्कर आहे.

सदक़ात म्हणजेच दान-पुण्य जे ईद अर्थात सणाच्या अगोदर दिले जातात, ते श्रीमंतासाठी - धनवंतासाठी अनिवार्य आहेत; परंतु इतर दान-पुण्य अनिवार्य नाहीत. तरी पण ईश्वराची प्रसन्नता प्राप्त करण्यासाठी याची अत्यंत ताकीद देण्यात आली आहे.

सूफ़ींचे असे मत आहे की, ज़कात आणि दान-पुण्य हे मनुष्याच्या मनापासून संपत्तीचा मोह कमी करतात आणि त्याला सांसारिक वस्तूंपासून विरक्त बनवितात.

प्रेषित-वचन अर्थात हदीस आहे की, परमेश्वराच्या प्रेषितांनी म्हटले - मनुष्य ओरडेल, माझी धन-संपत्ती, माझी धन-संपत्ती, यद्यपि त्याची धन-संपत्ती तीन प्रकारचीच होती -

(१) जे काही त्याने खाल्ले-पिल्ले किंवा नेसले आणि फाटून गेले, हे त्याचे धन आहे, (२) जे इतरांवर (साठी)खर्च केले ते परलोकासाठी भांडार बनले, (३) याशिवाय जे काही होते ते सर्व समाप्त झाले किंवा इतर लोकांसाठी त्याने सोडून दिले. (इमाम बुख़ारी-सहीह बुख़ारी, भाग-१)

इब्न-ए-हिब्बान यांनी अबू ज़र यांच्या वतीने एक घटनेचा उल्लेख केला आहे. ती घटना अशी - बनी इस्त्राईलमध्ये एक तपस्वी होता. त्याने एका मठामध्ये साठ वर्षे तपस्या केली. एके दिवशी पाऊस झाला आणि संपूर्ण क्षेत्र हिरवेगार झाले. त्याने आपल्या डोंगरावरील मठामधून पाहिले (डोकावले) तेव्हा तो सृष्टीसौंदर्य

पाहून भारावून गेला आणि तो उद्गारला खाली दरीमध्ये जाऊन ते सृष्टीसौंदर्य पाहिल्यास किती बरे होईल! आणि तेथेच तपस्या करता आली तर! यास्तव तो मठामधून एक दिवस खाली आला. त्याच्यापाशी दोन भाकरी होत्या. त्या भाकरीसह तो खाली उतरला. दरीमध्ये उतरत असताना वाटेत त्याची भेट एक सुंदर युवतीशी झाली. तो तिच्याशी बोलू लागला. ती युवतीपण मोठ्या आनंदाने त्याच्याशी संवाद करीत होती. अकस्मात् वासनेने त्या तपस्व्यावर हल्ला केला. वासनेच्या आहारी जाऊन त्याने त्या युवतीवर बलात्कार केला. आणि नंतर तो स्नानासाठी तलावाकडे निघाला. रस्त्यात एक भिकारी येऊन त्याच्याकडे भीक मागू लागला. त्या संन्याशाने त्या भिकाऱ्यास आपल्या दोन्ही भाकरी जेवण्यासाठी देऊन टाकल्या. नंतर तो संन्यासी-तपस्वी मृत्यू पावला. मृत्यूनंतर त्याच्या कर्माचा हिशेब घेण्यात आला. तेव्हा व्यभिचाराचे पारडे झुकले. नंतर त्याच्या इतर सत्कर्मासह, दान दिलेल्या त्या दोन्ही भाकरी पण सोबत ठेवण्यात आल्या. तेव्हा ते पारडे झुकले आणि त्याचे व्यभिचारी कृत्यास माफ़ी दिली गेली. यावरून पुण्यप्राप्तीमध्ये दानाची किती असाधारण भूमिका असते, हे स्पष्ट होते.

दान साधकासाठी बरकतीचे साधन पण बनून जाते. अशा प्रकारच्या एका प्रसंगाचा उल्लेख हुजवीरीपण करतात. ते म्हणतात की अब्दुल्लाह बिन जाफ़र यांचे वर्णन आहे की मी एक गायरान कुरणापासून जात होतो. तेव्हा मला असे दिसले की एक हब्शी (निग्रो) गुलाम आपल्या शेळ्या चारत होता. इतक्यात एक भुकेला कुत्रा आला आणि तो त्याच्यासमोर बसला. त्या हब्शी गुलामाने आपली एक भाकर काढून त्या कुत्र्यापुढे ठेवून दिली. ती भाकर त्या कुत्र्याने खाल्ली. अशाच प्रकारे त्याने स्वत: खाण्यासाठी आणलेल्या तिन्ही भाकरी त्या भुकेल्या कुत्र्यास देऊन त्याची भूक भागविली. त्यांनी त्या गुलामास विचारले की त्याला जेवण्यासाठी रोज किती भाकरी मिळतात. त्याने उत्तर दिले की आपण पाहिल्याप्रमाणे तीन भाकरी मिळतात. यावर मी त्याला विचारले की मग सर्व भाकरी कुत्र्यास का बरे दिलेस? त्या गुलामाने उत्तर दिले की ही कुत्र्याची जागा नव्हे. हा कुत्रा फार लांबून आपली भूक शमविण्याच्या आशेने येथे आला आहे. त्याचा अपेक्षा-भंग होऊन त्याचे परिश्रम वाया जाऊ नयेत, असा मी विचार केला. अब्दुल्ला म्हणतात की त्याची ही गोष्ट मला इतकी भावली की मी त्या गुलामासहित, बकऱ्यांसहित (शेळ्यांसहित) ते कुरण विकत घेतले. गुलामास मुक्त केले आणि सांगितले की या सर्व शेळ्या आणि हे कुरण आता तुझ्या मालकीचे आहे. मी हे सर्व काही तुला दान म्हणून देऊन टाकले. गुलामाने मला आशीर्वाद दिले. शेळ्या आणि कुरण सर्व काही दान स्वरूप देऊन टाकले आणि तेथून चालता झाला. (हुजवीरी - 'कश्फ़ुल महजूब' - पृ. ३२०.)

इमाम ग़ज़ाली यांनी काही हदीस (प्रेषित-वचने) पण या संदर्भात नोंदविले आहेत. जसे - 'नरकापासून वाचवून घ्या, मग भले ही खजूरीचा एक तुकडा दान देऊन, हे पण शक्य नसेल तर चांगले बोल तरी बोला.'

'दान वाईटपणा आणि दुष्टपणाचे सत्तर दरवाजे बंद करून टाकतो.'

सूफ़ी साधक इब्राहीम ख़वास आणि जुनैद बग़दादी यांचे असे मत आहे की 'ज़कात' (धर्मकर, धर्मदान) वसूल करण्यापेक्षा दान ('सदक़ा') वसूल करणे हे श्रेयस्कर असते. (इमाम ग़ज़ाली - 'ख़ुलासा एह्याउल - उलूम' - पृ. १२५-२६.)

**५) महातीर्थ यात्रा (हज) :** नमाज़, रोज़ा आणि ज़कात प्रमाणेच हज पण इस्लामचा एक स्तंभ आहे. याचे महत्त्व या कारणास्तव आहे की यामध्ये नमाज़, रोज़ा आणि ज़कातचे सर्व गुण समाविष्ट आहेत. अशा प्रकारे हज हे समस्त उपासनांचे एक संयुग (मिश्रण) बनून जाते. म्हणूनच हजसंबंधी मोठी ताकीद आहे आणि प्रत्येक (आर्थिक आणि शारीरिक दृष्टीने) समर्थ व्यक्तीसाठी आपल्या आयुष्यामध्ये एकदा हज करणे अनिवार्य ठरवले गेले आहे. पवित्र कुराणात यासंबंधी निर्देश आहे – ''जे लोक या (अल्लाहच्या घरा)पर्यंत पोहोचण्यास समर्थ आहेत, त्यांच्यावर हे बंधनकारक आहे की, त्यांनी अल्लाहसाठी हज करावा.'' – ३:९७. यावरून स्पष्ट होते की काबागृहाची यात्रा करण्याची ऐपत व क्षमता असणाऱ्यांसाठी हज अनिवार्य आहे.

हजचा हेतू पवित्र कुराण पुढील शब्दांत अभिव्यक्त करते – ''(हे पैगंबरा! त्या वेळेचे स्मरण कर की) जेव्हा आम्ही 'इब्राहीम'च्या (भक्ती) करता ('काबा') गृहाच्या जागेची स्थापना केली (व आज्ञापिले) की माझ्याबरोबर कोणाही वस्तूला (ईश्वरत्वाचा) भागीदार मानू नकोस. आणि माझ्या (या) घराला प्रदक्षिणा करणारे व उभे राहणारे व ओणवे होऊन नमन करणारे आणि साष्टांग नमस्कार घालणारे (म्हणजे नमाज पडणारे) यांजकरिता स्वच्छ ठेव. आणि लोकांत 'हज्ज' (यात्रे)चा डांगोरा वाजीव की लोक तुजकडे (पळ घेत) येतील. (त्यांपैकी कित्येक तर) पायी पायी व कित्येक (हर तऱ्हेच्या शेडक्या) रोडक्या स्वाऱ्या ज्या दूरदूरच्या हरेक मार्गाने आलेल्या असतील. त्यांवर (स्वार असतील). (या प्रवासात त्यांचा उद्देश हा होईल) की आपल्या फायद्याच्या (म्हणजे व्यापारा)साठी (ही वेळेवर) येऊन हजर व्हावे आणि (तसेच) परमेश्वराने जी चतुष्पाद जनावरे त्यांना दिली आहेत (ती बळी देतांना त्या) (यज्ञाचे तीन) नियमित दिवसात त्यांनी परमेश्वराचे नाव घ्यावे. तर (लोकांनो!) यज्ञा (च्या मांसा)तून तुम्हीही खा आणि संकटपीडित (व) अन्नास मोताद अशासही खाऊ घाला. नंतर लोकांस पाहिजे आहे की (यज्ञानंतर) आपला मळ (जो 'एहराम'च्या दिवसांत अंगावर जमून गेला असेल तो) उतरून टाकावा व आपले नवस पूर्ण करावेत आणि पुरातन (उपासनालय म्हणजे 'काबा') गृहाला प्रदक्षिणा घालावी. (एक गोष्ट तर) ही (झाली); आणि (या व्यतिरिक्त) जो कोणी ईश्वराज्ञापित (सर्व) सन्माननीय वस्तूंचा आदर व महिमा ठेवील, तर हे त्याच्या विधात्यासमीप त्याच्यासाठी उत्तम होय.'' २२:२६:३०.

हजच्या विधीसाठी पाच गोष्टी अनिवार्य आहेत –

१) 'एहराम' बांधणे म्हणजेच शरीरावर न शिवलेली शुभ्र वस्त्र परिधान करणे. हे एका निश्चित स्थळी यात्रेकरूस नेसावे लागतात.

२) 'तवाफ़' म्हणजेच प्रदक्षिणा किंवा परिक्रमा. मक्केला पोहोचल्यानंतर 'काबा'च्या सात परिक्रमा कराव्या लागतात याला 'तवाफ़' असे म्हणतात.

३) 'सई' म्हणजेच मार्ग आक्रमण. काबाजवळील 'सफ़ा' आणि 'मर्वः' या दोन टेकडीदरम्यान जरा वेगाने चालण्यास 'सई' म्हणतात. याचा पवित्र कुराणमध्ये दाखला असा आहे. – ''निश्चितपणे सफ़ा व मर्वः अल्लाहने स्थापित केलेल्या आहेत म्हणून जी व्यक्ती पवित्र घराची यात्रा (म्हणजेच हज) करीत असेल किंवा उम्रा (हजच्या ठरलेल्या कालावधीशिवाय इतर वेळेत केलेली अल्पयात्रा) करीत असेल, तर त्या

व्यक्तीने यांची परिक्रमा केल्यास काहीही आक्षेपार्ह नाही.'' - २: १५८. '' 'हज' व 'उम्रा' अल्लाहसाठी पूर्ण करा.'' - २: १९६.

४) 'अरफ़ात' (च्या मैदानामध्ये) मध्ये वास्तव्य - जवळच अरफ़ातचे मैदान आहे. येथे सर्व हाजी म्हणजेच यात्रेकरूंना एकत्र व्हावे लागते, मग तेथे प्रवचन ऐकावे लागते आणि भक्ती (नमाज़) करावी लागते.

५) 'हल्क़' म्हणजे मुंडन. शेवटी केशवपन करावे लागते.

एकीकडे हज हे एक प्रकारचे आंतरराष्ट्रीय सम्मेलन (संमेलन) आहे, तर दुसरीकडे शुचिता आणि आत्म-शुद्धीचे साधन पण आहे. याशिवाय पवित्र कुराणमध्ये असे नमूद आहे - ''आणि ह्या काबागृहाला आम्ही साऱ्या लोकांसाठी 'मध्यवर्ती शांतीस्थान' निश्चित केले आणि लोकांना आदेश दिला की इब्राहीम ज्या ठिकाणी प्रार्थनेसाठी उभा राहतो त्या स्थानाला कायम स्वरूपी नमाजचे स्थान बनवा आणि इब्राहीम व इस्माईलला आदेश दिला की, 'माझ्या या घराला परिक्रमा आणि एकांतवास तसेच नमन आणि प्रणिपात (नमाज अदा) करणाऱ्यांसाठी स्वच्छ (पवित्र) ठेवा.'' - २: १२५. हज संबंधीच असे म्हटले गेले आहे की हज करणारा/करणारी व्यक्ती ही हज पूर्ण केल्यानंतर इतकी पवित्र होऊन जाते की, जणू आईच्या पोटातून नुकतेच जन्मलेले निरागस मूलच होय.

हुजवीरी यांच्या मते हजचा उद्देश हा आहे की माणसाने स्वत:स संपूर्णपणे अल्लास आत्मसमर्पित होऊन जावे, जसे की त्या (अल्लाह)च्या घराचा पाया रचणारे प्रेषित इब्राहीम यांनी स्वत:स समर्पित केले होते.

हजचे मूळ वास्तव जुनैद बग़दादी यांच्या पुढील प्रसंगावरून (घटनेवरून) उद्घाटित होते -

एक इसम त्यांच्या सेवेत उपस्थित झाला. त्यांनी त्याला विचारले, तू कुठून आलास? तो म्हणाला, मी हजवरून परत आलो आहे. त्यांनी त्यास पुन्हा विचारले, काय तू खरोखर हज करून आलास? त्याने उत्तर दिले, होय. ते म्हणाले, जेव्हा तू हजचा निश्चय करून यात्रा सुरू केली होतीस, तेव्हा तू त्यावेळेस आपल्या अपराधाचे प्रायश्चित केलेस की नाही? त्याने उत्तर दिले, नाही. मी तर याबाबतीत विचारसुद्धा केला नाही. मग ते म्हणाले, तर मग तू हजसाठी निघालाच नाहीस. नंतर त्यांनी विचारले, हज यात्रेच्या दरम्यान तू जे टप्पे पार केलेस आणि रात्री मुक्काम केलेस तेव्हा तू काय अल्लाहचे सान्निध्य प्राप्त करण्याचे टप्पे आणि त्या साधना-मार्गामधील 'स्थळे' पार करण्याची व्यवस्था केली होतीस? त्याने उत्तर दिले, याविषयी मी विचारच केले नव्हते. ते म्हणाले, तर मग तू ईश्वराच्या गृहाची यात्रा केली नाहीस ना त्याचे टप्पे पार केलेस. नंतर पुन्हा त्यांनी विचारले की जेव्हा 'एहराम' बांधलेस आणि आपले नेहमीचे कपडे उतरविलेस, तेव्हा त्यासोबतच तू वाईटपणा आणि वाईट सवयी सोडून दिल्यास का? तो म्हणाला, याकडे तर मी लक्ष दिले नाही. ते म्हणाले, तर मग तू 'एहराम' बांधले नाहीस. यानंतर जुनैद यांनी विचारले की जेव्हा तू अरफातच्या मैदानात पोहोचलास तेव्हा तुला काय दिसले? आणि तुला याची काय अनुभूती झाली की तू अल्लाहस आपल्या समोर उभा पाहात आहेस? त्याने उत्तर दिले, नाही असे काही घडले नाही. ते म्हणाले, मग तर तू अरफ़ातला गेलाच नाहीस. यानंतर त्यांनी त्याला विचारले, जेव्हा तू मुजदल्फा येथे गेलास तेव्हा काय तू आपल्या मनोकामनांचा त्याग केलास वा नाही? त्यानं उत्तर दिले, मी याकडे लक्ष दिले नाही. ते मग म्हणाले बस, तू मुजदल्फा येथे गेलाच नाहीस. नंतर त्यांनी विचारले की जेव्हा तू काबागृहाची परिक्रमा केलीस, तेव्हा त्यावेळेस तू ईश्वराच्या सौंदर्याचे अवलोकन केलेस

की नाही? तो म्हणाला की नाही, मला तर असे काहीच दिसले नाही. नंतर त्यांनी विचारले, जेव्हा तू सफ़ा-मर्व: टेकड्यांच्या दरम्यान 'सई' केलीस, तेव्हा त्या 'सई'ची वास्तविकता, तिचा अभिप्राय आणि तिच्या उद्देश्याची तुला अनुभूती झाली का नाही? त्या इसमाने म्हटले की, नाही. मी यांच्या अभिप्रायास समजलो नाही. तेव्हा ते म्हणाले की तर मग तू अजून पर्यंत 'सई' पण केली नाहीस. नंतर त्यांनी विचारले की जेव्हा तू (जनावराचे) बलिदानाचा संकल्प केलास तेव्हा त्याठिकाणी तू परमेश्वराच्या मार्गामध्ये आपल्या इच्छांची तिलांजली दिली की नाही? त्याने उत्तर दिले की नाही, याकडे पण लक्ष गेले नाही. तेव्हा ते म्हणाले, बस, तर तू बलिदानसुद्धा केले नाहीस. मग त्यांनी त्याला विचारले की जेव्हा 'जमरात' या स्थळी शैतानास खडे मारलेस तेव्हा तू आपले वाईट सवयी आणि दुर्गुणांना दूर फेकलेस की नाही? त्याने उत्तर दिले की नाही. तेव्हा ते म्हणाले, तू खडे सुद्धा मारले नाहीस. परत जा आणि या सर्व वैशिष्ट्यांसह हज (संपन्न) कर, इथपर्यंत की तू प्रेषित इब्राहीम यांच्या स्थळापर्यंत पोहोचून जावेस, त्या इब्राहीम यांच्या स्थळापर्यंत की ज्यांनी आपल्या विधात्याच्या एकनिष्ठतेचा हक्क अदा केला होता. (हुजवीरी - 'कश्फुल महजूब' - पृ. ३३३-३४.)

फारच थोडे सूफ़ी असे आहेत की ज्यांनी हज केले नसेल. यावरून त्यांच्यापाशी असलेल्या हजच्या महत्त्वाचा अंदाज लावता येऊ शकतो.

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की सूफ़ी हे उपासना-विधीच्या बहिरंगास महत्त्व न देता ते तिच्या अंतरंगास महत्त्व देत असत. उपासनेच्या अंतरंगाचे वास्तविक अभिप्राय जाणून त्यानुसार आपला आचार ठेवीत. भक्ती (उपासने)चे मर्म ओळखून आपल्या ईश्वरपरायणतेचे स्वरूप निर्धारित करीत. सालीच्या आत असलेल्या गराकडे आपली दृष्टी वळवीत. ते भक्तीचे खरे वास्तव ओळखत. ते ईश्वराशी तादात्म्य निर्माण करण्याची सवय बाळगतात. ईश्वरापर्यंत पोहोचण्याचे मार्ग भक्तांच्या संख्येइतपत असतात. याची त्यांना जाण असते. तरी पण त्यांचा असा विश्वास असतो की शरीअत (कर्मकांड) माणूस आणि ईश्वर यांच्यामध्ये नाते निर्माण करते. सद्गुरू शरीअत काटेकोरपणे पाळतात. याशिवाय त्यांचे काही छोटे मार्ग असतात. तीर्थयात्रेची पद्धत असते. साधकाचे प्रार्थनेमध्ये आत्मविलुप्त होणे, ही त्याची खरी भक्ती होय.

### ४) सूफ़ींच्या उपासना - विधी : दार्शनिक विवेचन

#### (१) 'तौहीद' : एकेश्वरवादी श्रद्धा आणि निष्ठा

सर्वप्रथम दार्शनिक दृष्टिकोनातून 'एकेश्वरवाद' म्हणजे काय आणि त्याचे सिद्धान्त याविषयी संक्षिप्त माहिती प्राप्त करून घेऊ या. एकेश्वरवाद म्हणजे 'एक ईश्वरा'मधील आस्था होय. विश्व त्या एक ईश्वराचे परिणाम किंवा विवर्त आहे. एकेश्वरवाद सुविकसित मानव बुद्धीची देणगी आहे, आणि धर्माची परिपक्व अवस्था आहे. अनेकेश्वरवादापासून ते एकेश्वरवादापर्यंतची यात्रा ही धार्मिक अनुभूतीची उत्तरोत्तर प्रगाढतेचा परिणाम आहे. एकेश्वरवाद ईश्वरास शुभ गुणांचा धाम मानतो.

एकेश्वरवादाचे प्रमुख सिद्धान्त पुढीलप्रमाणे आहेत -

१) ईश्वर हा विश्वाचा कर्ता, मूल्यांचा संरक्षक आणि सृष्टीचा आद्यन्त संचालक आहे.

२) ईश्वर एक असीम, नित्य, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, सर्वव्यापक आणि सर्वोच्च शुभ-सत्ता आहे.

३) काही एकेश्वरवादी ईश्वरास सगुण आणि विश्वव्यापी मानतात; तर काहींच्या दृष्टीमध्ये ईश्वर हा व्यक्तित्वशून्य आणि विश्वातीत आहे.

४) ईश्वर 'अकारण कारण' (Uncaused cause) आहे. उपनिषदामध्ये ईश्वरास 'स्वयंभू' म्हटले आहे. ॲरिस्टॉटलने त्याला 'गतिदायक अगतिमान' (Unmoved Mover) मानले आहे. ईश्वर विश्वाच्या समस्त घटनांचा आद्य प्रवर्तक आहे आणि तो स्वत: गतिमान आहे.

५) ईश्वर सद्‌गुणांचे अधिष्ठान आहे. मानवाच्या तुलनेत ईश्वराच्या चेतनेचा विस्तार अनंत आहे. त्याच्या चेतनेच्या अवधानामध्ये असंख्य घटना सम्मिलीत असतात. तो अनंत शक्यतांचा आगार असून संपूर्णत्वाची अनुप्रेरणा आहे.

६) ईश्वराने विश्वाची सृष्टी यासाठी केली आहे की शेवटी संकल्प स्वातंत्र्यपूर्ण मानवाने ईश्वराज्ञांचे परिपालन करून सत्संकल्पी जीव बनून जावे आणि सांसारिक पाशांपासून मुक्त होऊन जावे.

७) ईश्वर हा अनंत सर्जनात्मक शक्तिसंपन्न आहे. विश्व अनंत घटनांचा अनुक्रम आहे. अशा विश्वाची रचना ना सान्त मानव करू शकतो ना जड पदार्थ. रचनात्मक कार्य स्वत: चेतन सत्तेस परिपुष्ट करते. जे जड आहे ते रचना करण्यामध्ये अशक्त आहे. अशा प्रकारे एक अप्रतिम शिल्पकार या स्वरूपात ईश्वराची सत्ता सिद्ध आहे.

'तौहीद'विषयी सूफ़ी साधकांचा दृष्टिकोन काहीसा असा आहे –

ईश्वर एक आहे. त्याच्या सारतत्त्वात आणि गुणवैशिष्ट्यांत त्याचा कुणी भागीदार नाही. ईश्वराला कुणीही पर्याय नाही. त्याच्या कृतीत कुणाला सहभाग नाही. याला एकात्मता म्हणतात. एकात्मता तीन प्रकारची असते – (१) ईश्वराचे त्याच्या एकत्वासंबंधी ज्ञान, (२) ईश्वराची सृजनास त्याला 'एक' मानण्याची आज्ञा आणि (३) ईश्वर एक असण्यासंबंधीचे लोकांचे ज्ञान. ईश्वराचे एक असणे संख्यात्मक नाही. हुजवीरी म्हणतात, ''त्याला मर्यादा नाही. सहा दिशा नाहीत. परिमाण नाही. तो अद्वितीय आहे. तो अकस्मात नाही. त्याला द्रव्याची गरज नाही. तो द्रव्यही नाही, कारण द्रव्य टिकण्यासाठी आणखी इतर द्रव्याची गरज असते. तो घटक नाही, ज्यात गतिशीलता व गतिशून्यता असते. तो आत्मा नाही, ज्याला सांगण्याची गरज असते. तो शरीर नाही, ज्यात अवयव आहेत. तो सर्व वस्तूंना व्यापत नाही, नाही तर तो व्यापलेल्या वस्तूंप्रमाणे झाला असता. तो कशाला जोडलेला नसतो, नाही तर तो एखाद्या वस्तूचा भाग झाला असता. कुठल्याही अर्थाने तो अपूर्ण नाही; दोषमुक्त आहे. त्याच्यासारखा कुणीच नाही. त्याला मूलबाळ नाही. त्याचे सार व गुणवैशिष्ट्ये अपरिवर्तनीय आहेत. ते ईश्वरानेच सांगितले आहे व श्रद्धाळू (मुस्लिम) त्यावर विश्वास ठेवतात. पाखंडी त्याला जी गुणवैशिष्ट्ये जोडतात, त्यांपासून तो मुक्त आहे. तोच जिवंत आहे. ज्ञानी, क्षमाशील, इच्छिणारा, शक्तिमान, ऐकणारा, बोलणारा, पाहणारा आणि शेष राहणारा आहे. त्याचे ज्ञान सर्वव्यापी आहे. म्हणजेच तो सर्वज्ञ आहे. त्याच्यात 'अवस्था' नाही. त्याचे सामर्थ्य त्याच्यात एकवटलेले नसते. त्याचे पाहणे, ऐकणे आणि वेगवेगळ्या ठिकाणी विभागले गेलेले नाही.''

ईश्वर त्याच्या गुणवैशिष्ट्यांसह चिरंतन काळापासून अस्तित्वात आहे. ओळखल्या जाणाऱ्या सर्व वस्तू त्याच्या ज्ञानकक्षेबाहेर नाहीत. सर्वांचे अस्तित्व त्याच्यावर अवलंबून आहे. त्याच्या इच्छेप्रमाणे तो करतो.

त्याची इच्छा निरपेक्ष सत्य आहे. त्याचे मित्र त्याला शरण जातात. चांगले व वाईट भविष्य तो घडवतो. आशा करावयाची व घाबरायचे फक्त त्याला. नफा आणि नुकसान तो देतो. तोच न्याय देतो आणि तो शहाणपणाचा असतो.

काळाच्या बंधात निर्माण झालेल्यांना चिरंतनापासून वेगळे करणे म्हणजे एकत्व, अशी जुनैद यांनी एकत्वाची व्याख्या केली आहे. ईश्वरी विश्व चिरंतन आणि भौतिक जग क्षणिक आहे. भौतिकतेचे स्थान चिरंतन नाही किंवा भौतिकता चिरंतनतेचे स्थान नाही. चिरंतनता आणि भौतिकता एकजिनसी नाहीत. चिरंतनता भौतिक जगात अवतरते किंवा जोडली जाते असे मानले तर, ईश्वराचे चिरंतनत्व कायम राहत नाही व जगाची उत्पत्ती कशी झाली, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. ईश्वराच्या चिरंतनतेची असंख्य उदाहरणे भौतिक जगात दिसतात; मात्र माणूस त्याकडे लक्ष देत नाही. त्याच्याकडून नामस्मरण करण्यावर जोर दिला जातो. हसन मन्सूर हल्लाज म्हणतात, एकत्वाकडे जाण्याची पहिली पायरी म्हणजे वेगवेगळेपणाचा विलय करणे आहे. वेगळेपणा म्हणजे अपूर्णत्वाचा वेगळेपणा आहे. याला हल्लाज यांनी 'आफ़ात' हा शब्द वापरला आहे.

ईश्वराशिवाय काही अस्तित्वात आहे, असे मानणे वेगळेपणा आहे. ईश्वराच्या एकत्वाचे त्यामुळे खंडन होते. सूफ़ी साधक हसरींच्या मते, एकत्वाची पाच तत्त्वे आहेत –

(१) भौतिकतेचे उच्चाटन, (२) ईश्वरी चिरंतनत्वाचा स्वीकार, (३) सांसारिक बाबींपासून मुक्तता, (४) सार्वजनिक संपर्काचा त्याग आणि (५) माहीत असलेल्या व नसलेल्या ज्ञानाचे विस्मरण.

(डॉ. अलीम वकील – 'एकाच पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी' पृ. २३०–३१)

एकेश्वरवादी श्रद्धेविषयी पवित्र कुराणामध्ये असे संकेत आहेत –

''(लोकांनो!) तुमचा उपास्य केवळ अल्लाह आहे.'' – २:१६३. (पैगंबर! हे लोक अल्लाहविषयी विचारतात) तुम्ही त्यांना सांगा, 'अल्लाह एकच आहे.' '' – ११२:१. ''अल्लाहने असे म्हटलेले आहे (की) ''दोन (किंवा त्याहून अधिक) उपास्यांची उपासना करू नका. तो एकच (उपासनेयोग्य) अल्लाह आहे.'' – १६:५१. ''आणि (नेहमी हे लक्षात ठेवा) की, तुमचा ईश्वर केवळ एकच ईश्वर आहे.'' – २२:३४. याशिवाय प्रत्येक वस्तूचे एक न एक आपले गुणधर्म असते. ते या गोष्टीचे प्रमाण आहे की तो (ईश्वर) एक आहे.

खरोखर 'तौहीद' म्हणजेच एकेश्वरवादाचा अर्थच हा आहे की एखाद्या वस्तू (तत्त्वा)चे एक असण्याविषयी दृढ निष्ठा धारण करून त्याचे एक असण्यासंबंधी खरे ज्ञान प्राप्त करून घ्यावे की जेणेकरून वास्तवाचे संपूर्ण बोध होऊन जावे आणि जेव्हा हे ज्ञात होऊन तिचे वास्तविकता स्वरूप कळून येईल तेव्हा या गोष्टीची पुरेपूर खात्री होऊन जाईल की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा एक आहे, त्याची सत्ता तर सोडाच, त्याचे गुण पण अद्वितीय असेच आहेत. त्याच्या कार्यांमध्ये कोणीच सहभागी नाही आणि तत्सम कोणीही नाही. एकेश्वरवाद्यांनी अल्लाहस् त्याच्या गुणांच्या आधारे ओळखले आहे. त्यानी सदरहू ज्ञान आणि दृढ विश्वासाच्या बळावर प्रमाण प्राप्त करून एकेश्वरवादाच्या वास्तवास ओळखून घेतले आहे. 'तौहीद' म्हणजेच एकेश्वरवादाचे तीन प्रकार आहेत –

१) पहिली 'तौहीद' ही ईश्वराच्या एकत्वासंबंधी आहे. म्हणजेच स्वत: परमेश्वराचे आपल्या सत्तेस एकमेव जाणणे हे होय. त्याला आपल्या एकत्त्वतेची जाणीव असते.

२) दुसरी ‘तौहीद’ ती आहे जी लोकांसाठी असते. म्हणजेच लोकांना परमेश्वराची ही आज्ञा असणे की त्यांनी ईश्वराच्या एकत्वतेस मान्य करावे. या आज्ञेसोबतच भक्ताच्या अंत:करणामध्ये एकत्त्वतेचे स्फुरण (जोश) निर्माण होऊन जावे.

३) तिसरी ‘तौहीद’ हा अल्लाहसाठी भक्तांचे एकत्त्व आहे. म्हणजेच लोकांचे हे ओळखणे की तो सर्वश्रेष्ठ परमेश्वर एकमेव व अद्वितीय आहे. त्याचा सहभागी कोणीच नाही आणि तत्सम पण कोणीही नाही.

म्हणून साधकास जेव्हा ब्रह्मज्ञानाची प्राप्ती होते आणि तो ब्रह्मज्ञानी बनून जातो तेव्हाच तो परमेश्वराच्या एकत्त्वतेच्या वास्तवास ओळखू शकतो. आणि ती हीच गोष्ट आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वर एक आहे. कोणीही त्याच्याशी एकत्त्वतेचा दावा करू शकत नाही, यद्यपि कोणतीच वस्तू त्याच्यापासून वेगळी (स्वतंत्र) नाही. द्वैतास मुळीच वाव नाही.

एकेश्वरवादाचे ब्रह्मसूत्र (‘कल्मा’) आहे. – **‘‘ला इलाह इल्लल्लाह मुहम्मदु र्‍रसूलुल्लाह’’** म्हणजेच अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही, मुहम्मद हे त्याचे प्रेषित आहेत. इस्लामी एकेश्वरवादी धारणेचे प्रतिबिंब यात उमटलेले आहे.

उपरोक्त ब्रह्मसूत्राचे पुढीलप्रमाणे तीन टप्पे पडतात –

१) ‘ला इलाह इल्लल्लाह’ – या टप्प्यामध्ये तल्लीनता (जज़्ब) आहे. प्रभू (रब्ब)चे सत्यापन आहे. अभेद (जमा) आहे. अद्वैत (ऐनियत) आहे. ‘हक़ीक़त’ नाकारणारा अनेकेश्वरवादी, बहुदेववादी (मुश्रिक).

२) ‘मुहम्मदु र्‍रसूलुल्लाह’ – या दुसऱ्या टप्प्यामध्ये साधना (सुलूक) आहे. भक्ता-सेवका (अब्द)चे सत्यापन आहे. भेद (फ़र्क) आहे. द्वैत (ग़ैरियत) आहे. ‘शरीअत’ नाकारणारा नास्तिक (मुलहिद).

३) ‘ला इलाह इल्लल्लाह मुहम्मदु र्‍रसूलुल्लाह’ – या शेवटच्या संपूर्ण टप्प्यामध्ये ब्रह्मज्ञान (इर्फ़ान) आहे. महाअभेद (जमुलजमा) आहे. भक्तासह प्रभूचे सत्यापन आहे. या संपूर्ण ब्रह्मसूत्रास मानणारा हा विशुद्ध एकेश्वरवादी (मुवह्हिद) गणला जातो.

द्वैतासह अद्वैत अथवा अद्वैतासह द्वैत सूचक आहे.

इस्लामच्या उपासना स्थळाचे शिखर हे ‘‘अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही, मुहम्मद हे त्याचे प्रेषित आहेत.’’ (‘‘ला इलाह इल्लल्लाह मुहम्मदु र्‍रसूलुल्लाह’’ या ब्रह्मवाक्या (‘कल्मा’)च्या मेरू-दंडावर उंचावलेले आहे. या उपासना स्थळामध्ये एकात एक अशी चार अंतर्गत प्रांगणे आहेत. (शिवाय) एक पवित्र ठिकाण आहे.’’ त्यांनी मला एक प्रार्थना मंदिर बनवावे की जेणे करून मी त्यांच्यामध्ये निवास करीन.’’ (एक्सोडस – २५-८) असे (प्रेषित) मूसास (त्याचा) प्रभू म्हणाला. जर एखाद्याचे उद्दिष्ट (ते) प्रार्थना मंदिर गाठायचे असेल तर त्याने शरीअत (कर्मकांड)च्या प्रथम प्रांगणात पदार्पण केले पाहिजे. ‘‘ईश्वराशिवाय कोणीच उपासनेस योग्य नाही.’’ (‘ला माबूद इल्लल्लाह’) मुहम्मद हे ईश्वराचे पाठविलेले प्रेषित आहेत. हा शिष्टाचारतेचा दरबार आहे. यानंतर दुसऱ्या आवारामध्ये प्रवेश होतो. साधकाचा एका विशिष्ट दिशेमध्ये अग्रेसर होण्याचे संकल्पाचे हे निदर्शक आहे. म्हणजेच त्या प्रार्थना मंदिराकडे कूच करण्यासाठी तो कटिबद्ध आहे. हे तरीक़त (साधना-मार्ग) आहे. जेव्हा येशू ख्रिस्त म्हणाला, ‘‘मी, सत्य आणि जीवनाचा तो मार्ग आहे की माझ्यावाचून कोणताही मनुष्य परम पित्याकडे (प्रभूकडे) येत नाही.’’ (जॉह्न, १४, ६) ‘‘तेव्हा त्याने याच टप्प्याचा निर्देश केले आहे. जेव्हा

साधक हा तरीक़त किंवा सुलूक (साधना-मार्ग)मध्ये प्रवेश करतो तेव्हा तो आपल्या शरीअतचा त्याग करीत नाही, जसे की सूफ़ी तत्त्वज्ञ कवी महमूद शबिस्तरी याने आपले काव्य-ग्रंथ 'गुलशन-ए-राज़' (गुह्य-वाटिका) मध्ये (ओळ क्रमांक ३५०) म्हटले आहे – (गद्य रूपांतर)

*''तो (साधक) कर्मकांडास आपले बहिर्वस्त्र बनवितो.*
*परंतु हे जाणतो की आपले स्वभाव-स्थळ हेच सत्य आहे.''*

तरीक़त (साधना-मार्ग) एवढेच म्हणते : ''ईश्वराशिवाय कोणतेच गंतव्य-स्थळ नाही ('ला मक़् सुदु इलल्लाह') आणि मुहम्मद हे ईश्वरी प्रकाशाचे आविष्करण आहेत.'' एक हदीस (प्रेषित-वचन) आहे : माझा उदय ईश्वराच्या प्रकाशापासून झालेला आहे आणि (इतर) सर्व वस्तू माझ्या प्रकाशापासून निर्माण झालेल्या आहेत. ('अना मिन् नूरिल्लाहि व कुल्लु शैइन मिन् नूरि') तुम्ही मग तिसऱ्या आवारामध्ये दाखल होता. तेथे तुम्हास स्वत: ईश्वराशिवाय कुणाचेच अस्तित्व दिसून येत नाही. ('ला मौजूद, इल्लल्लाह') आणि मुहम्मदाचे अस्तित्व हे ईश्वराच्या अस्तित्वावर अवलंबून आहे. यानंतर तुम्ही प्रार्थना मंदिरामध्ये प्रवेश करता आणि तेथे तुम्हास स्वत: ईश्वराशिवाय काहीच दिसत नाही. ('ला मशहुद इल्लल्लाह'). ईश्वर आपल्या निर्मिती म्हणजेच सृष्टीमध्ये स्वयंप्रमाण, स्वतः सिद्ध आहे. निर्गुण हे सगुण मध्ये स्वतः सिद्ध आहे. निर्गुण, गुणातीत, वर्णहीन हा आपल्या तन्मात्रांमध्ये स्वत:च प्रमाण(भूत) आहे. कोणत्याच मर्यादाविना, तन्मात्राविना ईश्वर हा ईश्वर आहे आणि सेवक किंवा साधक तन्मात्रांमध्ये असतो. तो मर्यादांशी बांधील असतो. आणि मुहम्मद हे स्वत:च्या सर्वप्रथम ज्ञानामध्ये स्वत:चेच सत्तत्त्व असतात. इस्लामचे इतर चार आधारस्तंभ आहेत – 'सलात' (फ़ारसी भाषेमध्ये 'नमाज़',. 'सौम' (फ़ारसी भाषेमध्ये 'रोज़ा'), 'ज़कात' (धर्मकर, दानधर्म) आणि 'हज्ज' (मक्केची वार्षिक महातीर्थयात्रा), यांचे क्रमशः दार्शनिक विवेचन पुढे प्रस्तुत करण्यात येत आहे–

**२) 'सलात' : नमाज़ : भक्ती उपासना**

**१) भक्ती-महिमा : प्रार्थना महती**

**भक्ती :** धर्माच्या दोन बाजू असतात. १) आचार धर्म व २) विचार धर्म. आचारधर्म कसे वागावे हे सांगतो, तर विचार धर्म म्हणजे ते तसे का वागावे हे सांगतो. हा विचार धर्म म्हणजे आध्यात्मिक प्रकृती. आत्मनिरीक्षण आणि ध्यान या आध्यात्मिक प्रकृती सुधारण्याच्या पद्धती सर्व धर्मात आहेत. सदाचारांमागचा विचार समजण्याचे शास्त्र म्हणजे अध्यात्म शास्त्र.

अध्यात्म शास्त्रात ईश्वर प्राप्तीचे तीन प्रमुख मार्ग सांगितले आहेत. ते म्हणजे -१) कर्म, २) ज्ञान आणि ३) भक्ती. यांपैकी भक्ती हा अत्यंत महत्त्वाचा आणि तुलनेने सुलभ मार्ग आहे. यालाच 'नामयोग' असे म्हणता येईल. परम कल्याण प्राप्त करून देणाऱ्या सर्व योगांमध्ये नामयोग सर्वश्रेष्ठ होय. कारण तो अथपासून इतिपर्यंत आहे. मोक्षमार्ग सोपा करण्याचे सामर्थ्यही नामात आहे. नामस्मरण हा भक्तीचा एक सहजसुलभ असा मार्ग आहे.

नामसाधनेने इंद्रिये कामवासना विसरतात. नामाच्या चिंतनाने परमेश्वर भक्तांच्या अधीन होतो. नाम प्रभावाने पापे जळतात. नामसाधनेची जी वाट स्वल्प आहे. ती निश्चित फल देणारी आणि अधिकार निरपेक्ष

आहे. नामाने काम-क्रोधाचे दहन होते. अहंकार देशोधडीला लागतो. नामस्मरण करण्यासाठी स्थळ, काळ, वेळ आणि दशेचे बंधन नसते.

प्रत्येक धर्माची प्रामुख्याने तीन अंगे असतात. १) ईश्वराची संकल्पना व त्याच्या उपासनेचा मार्ग, २) नीतिमूल्यांची शिकवण आणि ३) भौतिक जीवनाचे नियमन. भक्ताच्या ईश्वरी संकल्पनेत ईश्वराचे स्वरूप साधारणपणे असे असते - ईश्वर एक आहे व तोच सर्व चराचर सृष्टीचा निर्माता व नियंत्रक आहे. तो निर्गुण, निराकार व निर्विकार आहे. तो सर्वव्यापी आहे. तो पोषणकर्ता आहे. तो निरपेक्ष, नि:स्पृह आहे. तो न जनिता आहे, न जन्य. तत्सम कोणीही नाही. तो दृष्ट आणि अदृष्ट आहे. तो आदि आणि अंत आहे. तोच परम सत्य आहे. तो सर्वज्ञ आहे.

उपासना भक्तीचे एक साधन आहे. भक्ती ईश्वरप्राप्तीसाठी आध्यात्मिक आराधना असते. भक्ती म्हणजेच मानसिक श्रद्धा आणि उत्कटपणे कृतिशील झालेली विवेकशक्ती म्हणजेच श्रद्धा. श्रद्धेचे स्वरूपच भक्तीचे रूप दर्शवित असते. भक्ती म्हणजे प्रेममय योग! ईश्वराविषयीचा प्रेमभाव आणि ब्रह्मज्ञान यांचा समन्वय म्हणजे भक्तियोग! ईश्वराविषयी पराकोटीचे आकर्षण निर्माण झालेल्या प्रेमाची परिणती भक्तीत होते. (डॉ. मुहम्मद आज़म - 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' - पृ. १५९-६०)

अकृत्रिम भावाने भगवंताचे अनुसंधान म्हणजे भक्ती होय. चैतन्याचा अंगभूत असणाऱ्या सहज प्रीतीचे नाव म्हणजे भक्ती. भक्ती निर्धारपूर्वक हवी. ईश्वरनामाचे नित्य स्मरण करणे हाच सुलभ भक्तीमार्ग आहे. व्यापक ईश्वरी शक्तीचे ध्यानचिंतन, भजन, पूजन, नित्य नामस्मरणासाठी भक्ती देखील निर्धारपूर्वक, प्रयत्नपूर्वक करावी लागते. भक्ती प्रासंगिक करार नव्हे, तर ती सदैव व सर्वत्र करण्याची उपासना आहे. मुखाने ईश्वरनाम, कानाने गुणकीर्ती, डोळ्यांनी दर्शनसुख, पावले सन्मार्गाची आणि हात सत्कार्यात गुंतलेले अशी आचरण प्रणाली अनुसरणारी ही भक्ती होय.

अल्लाहने आपली भक्ती आणि प्रार्थना करण्याचा आदेश पवित्र कुराणामध्ये स्पष्ट शब्दांत असे मांडले आहे - ''तोच (परमेश्वर खरा उपास्य) होय की जो आकाशातही भक्तीस पात्र आहे व पृथ्वीवरही भक्तीस योग्य आहे. आणि तो बुद्धीमान व सर्वज्ञ आहे.'' - ४३:८४. ''(लोकांनो!) तुमच्या विधात्याने म्हटले आहे, 'माझी प्रार्थना करा. मी तुमच्या प्रार्थनेला प्रतिसाद देईन' पण जे लोक माझ्या उपासनेविषयी अहंकार बाळगतात, ते निश्चितच अपमानित होऊन नरकात प्रवेश करतील.'' - ४०:६०.

भक्तीचा सगळ्यात सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण होय. उपास्यांचे जमेल तसे आणि जमेल तितके अधिकाधिक नामस्मरण करणे, एवढाच सुलभ भक्तिमार्ग आहे. नाम घेता घेता नीतिमान वर्तन असावे, ही भक्तीमार्गाच्या एकाच नाण्याची दुसरी बाजू आहे. नाम आणि नीति या दोन पाऊलबळानेच भक्तिमार्गावर वाटचाल करता येते. नामस्मरण सदैव करावे, प्रेमपूर्वक आणि श्रद्धापूर्वक करावे.

जो देवापासून कधीही विभक्त नसतो त्याला भक्त म्हणतात. जो मनुष्य सदैव देवाशी अनुसंधान ठेवतो, हृदयात परमेश्वराचेच चिंतन करतो त्याच्या हृदयात देव नेहमीच वास्तव्य करतो. ज्याचा नामस्मरणावर विश्वास आहे, देवावर पूर्ण श्रद्धा आहे त्यालाच देवाच्या कृपेची अनुभूती येते.

अंत:करणाच्या शुद्धीसाठी कर्म आहे, पारमार्थिक तत्त्वाचे ज्ञान होण्यासाठी नाही. पारमार्थिक तत्त्वाचे ज्ञान विचाराने होते. अगदी कोटी कर्मे केले तरी नाही. मुक्तीसाठी ज्ञानाची आवश्यकता आहे. साधकांनी परमेश्वर प्राप्तीसाठी ज्ञानोपासक बनणे गरजेचे आहे. जीवनात शुद्धता महत्त्वाची असते. जीवनाची शुद्धता म्हणजे विकारांपासून दूर जाणे होय. ज्याच्या भावना शुद्ध असतात, त्याचे विचार शुद्ध असतात. शुद्ध विचारांतून वर्तन शुद्ध होते.

अनन्य श्रद्धा व शरणागती ही परमेश्वराला भार वाहण्यास भाग पाडते. अनन्यभावाने परमेश्वराला शरण गेल्यास त्याच्या अगाध कृपेची अनुभूती भक्तास होते. परमेश्वरावर पूर्ण श्रद्धा ठेवली पाहिजे. कारण 'श्रद्धा ईश्वरास कार्यप्रवृत्त करते.' – (जोएल ऑस्टीन.) प्रत्येक कर्म त्याला स्मरून अर्पण केले पाहिजे. म्हणजे कृपेस फार वेळ लागत नाही.

**प्रार्थना :** प्रार्थना म्हणजे परमतत्त्वाचा ध्यास व सहवास. प्रार्थना अंत:करणापासून केल्यावर त्याच्या पाऊलखुणा तिथे भावतात. ईश्वराचे विशाल स्वरूप प्रार्थनेतून कळते. प्रत्येकाने आपले जीवन प्रार्थनाशील ठेवण्याचा निश्चयात्मक प्रयत्न करावा. प्रार्थनेसारखे धर्मबल वाढविणारे, स्वत:च्या दुर्बलतेविषयी जागृती उत्पन्न करणारे, परमेश्वराच्या प्रेमाची साक्ष पटवून देणारे, कर्तव्य जागृती उत्पन्न करून बल देणारे, परमेश्वराचा व आपला निकट संबंध दाखविणारे दुसरे साधन नाही. म्हणून थोर साधक आणि साधुसंताप्रमाणे प्रार्थनेमध्ये देवाच्या चरणांचा एकनिष्ठेने आश्रय करावे. देवापाशी आपले हृदय उघडे करावे. त्याच्या सान्निध्याची आवड वाढवावी. या प्रयत्नांमध्ये जसजशी गती होईल, तसतशी प्रार्थना अंत:करणाला पीळ पाडून होतील व साधकाचे सामर्थ्य वाढत जाईल.

मानवी जीवनात प्रार्थनेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. नम्रतासूचक विधान अशी प्रार्थनेची व्याख्या केली जाते. प्रार्थनेतून लाभणाऱ्या नैतिक, आध्यात्मिक शक्तीचा प्रत्यय तिच्या नियमिततेवर अवलंबून आहे, त्यातून लाभणारी शक्ती मानवी शक्तीच्या बाहेरची आहे, ती तर स्वर्गद्वार रक्षिका म्हटली गेली आहे. संतांचे निरातिशय आनंदाचे ठिकाण, दु:खितांचे, पतितांचे संरक्षक कवच, असे प्रार्थनेचे स्वरूप आहे. मानवी कल्पनाशक्तीच्या कक्षेत न येणाऱ्या किती तरी गोष्टी आर्त प्रार्थनेतून घडण्याची उदाहरणे आहेत. प्रार्थना हे मानस स्थान आहे. विनोबा भावे प्रार्थनेला स्नान, भोजन आणि झोप याची उपमा देतात. स्नानाने शरीर शुद्ध होते तर प्रार्थनेने मनाची निर्मलता प्राप्त करून घेता येते. भोजनाने शरीराला समाधान तर प्रार्थनेने मनाला शांतीचा लाभ होतो. थोडक्यात शुद्धी, शांती आणि पुष्टी या तीनही गोष्टी प्रार्थनेने प्राप्त होतात. विश्वाचे नियंत्रण करणारा सर्वशक्तिमान परमेश्वर चैतन्यरूपाने सर्वांच्या अंतरात विराजमान आहे. संत सांगतात, 'जेथे जातो तेथे तू माझ्या सांगाती, चालविसी हाती धरोनिया ।' हा नित्य सांगाती असलेला, शरीरातून वेगळा आहे. अनंत ब्रह्मांडाचे प्रतिबिंब म्हणजेच जीवगत चैतन्य होय. या प्रतिबिंबाने मूळ बिंबाशी प्रार्थनेतूनच ऐक्य साधले जाते. आत्मशक्तीने परमात्म शक्तीशी संवाद साधला जातो. म्हणून प्रार्थनेचे महत्त्व आहे. प्रार्थना शब्दांनी होते. तशीच मौनाने होते. वेदोपनिषदांनी, सर्व भाषांतील संतांनी प्रार्थनेसाठी शब्दांचे भांडार दिले आहे. त्यांच्या आर्त शब्दांनी प्रार्थना प्रभावी ठरते. विनोबांनी ईशवास्योपनिषद, स्थितप्रज्ञ लक्षणे, सर्वधर्माचे सार असलेली नाममाला प्रार्थनेसाठी घेतली तर गांधीजींनी नम्रतेच्या सम्राटाला प्रार्थनेतून आवाहन केले.

प्रार्थना म्हणजे दैनंदिन जीवनाची संजीवनीच. जगातील सर्व अनिष्ट प्रथांवर प्रार्थना हा उपाय आहे. प्रार्थनेने मनाची स्वच्छता होते. प्रार्थना म्हणजे मनाची मशागत, आत्म्याशी संवाद. सुप्त मानवी शक्ती, सचेत करणारी गुरूकिल्ली. मनातील वाईट विचार (काम, क्रोध, मद, लोभ, मत्सर, मोह, दंभ, संशय, चिंता) इत्यादी प्रार्थनेने नष्ट होतात. प्रार्थना ही हृदयाची जिव्हाळ्याने, प्रेमाने ईश्वराला मारलेली हाक असते. प्रार्थना करणाऱ्याचे अंत:करणच त्यात ओतलेले असते. म्हणून प्रार्थना हा ईश्वराप्रत पोहोचण्याचा जवळचा राजमार्ग होय. प्रार्थना ही हृदयाने मनापासून मारलेली हाक असते. प्रार्थनेतून एक प्रकारची शक्ती निर्माण होते. प्रार्थनेच्या प्रभावासाठी मन निर्मळ असावे लागते. प्रार्थना ही याचना नसते. प्रार्थना हे एक पसायदान असते. प्रार्थना हे थोतांड नाही, अंधश्रद्धाही नाही तर मनुष्याला तारणारी, प्रेरणा देणारी, विघ्नांचा नाश करणारी प्रचंड शक्ती आहे, हे प्रत्येकाने मनाशी बिंबवून ठेवावे. संकल्प करून प्रार्थना करा, तो संकल्प पुरा झालाच पाहिजे. कोणताही संकल्प आपल्या मनावर चितारला गेला की, क्षणार्धात तो संकल्प विश्वभर संचार करतो. म्हणून लक्षावधी मैल दूर असणाऱ्या माणसाचे विकार केवळ प्रार्थनेने दूर करता येतात, हे आता विज्ञानमान्य झाले आहे. चांगले संकल्प करून त्यासाठी केलेली प्रार्थना कधीही वाया जात नाही. भक्त देवाकडे जातो, तेव्हा देव भक्ताकडे येतो. प्रार्थना ही देवाची असते. प्रार्थनेमुळे देव मनात येतो व मनही मोठे होते. कोत्या मनात देव मावणार कसा? प्रार्थनेमुळे मानसिक समाधान मिळते. प्रार्थनेत मनाची एकाग्रता झालेली असते. प्रार्थनेमुळे मनात मांगल्याचे अधिष्ठान होते. आर्त मनाने केलेली प्रार्थना फलद्रूप होतेच होते.

### २) इस्लामी प्रार्थने (नमाज़) विषयी थोडेसे

**प्रार्थनेसाठी इस्लाम पुरस्कृत अनिवार्य बाबी पुढीलप्रमाणे :**

प्रत्येक मनुष्य हा दीनदुर्बल आहे. आपल्या जीवनातील प्रत्येक लहानमोठ्या गरजेसाठी त्याला परमेश्वराच्या मदतीची गरज आहे. परमेश्वर सर्वसमर्थ व परमस्तुत्य आहे. त्याचा आदेश आहे, ''लोकांनो! तुम्ही (प्रत्येक क्षणी) अल्लाहचे गरजवंत आहात, तर तो अल्लाह स्वयंपूर्ण (आत्मनिर्भर व निरपेक्ष) असा आहे. तो (सदैव) सुस्तुत्य आहे.'' ३५:१५ म्हणून तर दीनदुर्बळ दासाचे (भक्ताचे) कर्तव्य आहे की, त्याने आपल्या प्रत्येक गरजेसाठी परमेश्वराचा धावा करावा.

प्रार्थना करण्यासाठी ईश्वरी आदेश असा आहे, ''तुमचा विधाता म्हणतो (की), ''माझी कृपायाचना करा; मी तुमच्या कृपायाचनेला प्रतिसाद देईन.'' ४०:६० ''(लोकांनो!) तुम्ही अतिशय लीनतेने आणि गुप्तपणे (आत्म्याच्या आवाजाने) आपल्या विधात्यासमोर विनवणी करा. निश्चितच भक्तिमर्यादेचे उल्लंघन करणारे लोक त्याला प्रिय नाहीत.'' ७:५५

परमपूज्य प्रेषित मुहम्मद स. यांचे कथन आहे की, प्रार्थना आराधना आहे, उपासना, साधना आहे. प्रार्थना (भक्ती) ही उपासनेचे, आराधनेचे मुख्य अंग; उपासनेचा गाभा आहे. प्रार्थना देवदासाच्या (भक्ताच्या) हातातील हमखास शस्त्र आहे. ती धर्माचा आधारस्तंभ आहे. आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. प्रार्थना स्वर्गाची चावी आहे.

प्रार्थना प्रत्येक संकटासाठी रामबाण उपाय आहे. कोसळलेल्या संकटावर मात करण्यासाठी प्रार्थना उपयोगी असते तसेच ती येऊ घातलेल्या म्हणजेच भविष्यकाळातील संकटासाठी पण उपयोगी असते. कोसळलेल्या संकटांशी प्रार्थनेचा मुकाबला (सामना) महाप्रलयाच्या न्याय दिवसापर्यंत चालूच असतो.

**इस्लामपुरस्कृत प्रार्थनेच्या प्रमुख अटी (शर्ती) :**

**१) विनय –** फक्त परमेश्वरालाच प्रार्थना निवेदली जावी. परमेश्वराचा दैवी आदेश आहे – ''परमेश्वराप्रीत्यर्थ शुद्ध धर्मपालन करून त्याचीच उपासना करा. सर्व स्तुती सकल जगांचा पालनकर्ता असा जो परमेश्वर त्यालाच (योग्य) होय.'' ४०–६५ किंवा ''तोच अजर–अमर चैतन्यमय असलेला (ईश्वर) आहे. त्याच्याशिवाय दुसरा कोणीच ईश्वर नाही, म्हणून (लोकांनो!) तुम्ही फक्त त्याचीच प्रार्थना करा, त्याच्याचप्रती पूर्ण समर्पणभाव बाळगून. सर्व प्रकारच्या स्तुतीचा अधिकारी तो अल्लाहच आहे, जो समस्त विश्वांचा (जगांचा) विधाता आहे.'' ४०:६५

**२) मन:पूर्वकता :** प्रार्थना करते वेळी साधकाचे मन परमेश्वराकडे आकृष्ट झाले पाहिजे. प्रार्थनेची सार्थकता व तिचा आशय लक्षात (ध्यानात) ठेवण्याबरोबरच तिच्या स्वीकृतीबद्दल ठाम विश्वास पण मनी असला पाहिजे. प्रेषित वचन आहे – ''परमेश्वराची प्रार्थना करते वेळी तिच्या स्वीकृतीविषयी दृढ विश्वास बाळगावा, कारण की परमेश्वर बेपर्वाईने व बेसावध मनाने केलेली प्रार्थना स्वीकारीत नसतो.'' – बुख़ारी

**३) नम्रता व शालीनता :** प्रार्थनेच्या वेळी भक्ताने नम्रता व शालीनता बाळगावी व तसे दृष्टोत्पत्तीस पण आणावे. ईश्वरी आदेश आहे – ''अतिशय लीनतेने आणि गुप्तपणे तुमच्या विधात्याची आळवणी करा.'' ७ :५५

प्रार्थना एक प्रकारची याचना आहे. म्हणूनच याचकासाठी नम्रता व शालीनता आवश्यक असते. त्याचबरोबर आपल्या प्रमादांची स्वीकृती, भविष्यकाळात त्यांची पुनरावृत्ती न होण्याविषयी अभिवचन व त्याचबरोबर भक्तास– साधकास अनुतापही झाला पाहिजे.

**४) ईशस्तवन आणि प्रभू–नामस्मरण :** प्रार्थना करण्याअगोदर परमेश्वराचे गोडवे गायले पाहिजे आणि परमपवित्र प्रेषित मुहम्मद[स.] यांच्यासाठी परमदया व परमशांतीचे आव्हान केले गेले पाहिजे. अंतरासत्ती अर्थात स्वस्तिश्री केली पाहिजे. प्रार्थनेत आपल्या सर्वोत्तम कर्मांचा अभिनिवेश असावा. प्रार्थनेसाठी किब्लामुखी म्हणजेच भारतामध्ये पश्चिम दिशेस तोंड करून आसीन व्हावे व दंडवत बसावे. परमेश्वराच्या सुंदर–सुंदर नावांनिशी प्रार्थना आळवावी. परमेश्वराचा आदेश आहे–

''(सर्व) परिपूर्ण गुणांचा स्वामी (केवळ) अल्लाह हाच आहे. त्याची (सर्वच) नावे सुंदर आहेत. तर अशाच नावांनी त्याची आळवणी करा (धावा करा).'' ७ :१८० म्हणून आठवा व आळवा त्या परमेश्वरास त्याच्या सुंदर सुंदर नावांनिशी.

सारांश, प्रार्थना सर्वांगपरिपूर्ण, सुप्रतिष्ठित व संक्षिप्त असावी. प्रार्थनेसाठी भक्ताने विशुद्ध तनमनाने स्वच्छ जागेवर आसीन व्हावे. इस्लामध्ये प्रार्थनेसाठी बाह्य स्वच्छता आणि आंतरिक शुचिता अनिवार्य मानली गेली आहे.

**५) 'आमीन/तथास्तु' :** सूरए फ़ातिहा अर्थात् मंगलाचरण समाप्तीनंतर भक्ताने 'आमीन' म्हणजेच 'तथास्तु' अवश्य म्हणावे. आपली प्रार्थना स्वीकारली गेली आहे, असा ठाम विश्वास भक्तास होतो तेव्हा त्याने सविनय असे जरूर म्हणावे, ''ज्याचा दबदबा व गौरवामुळे सत्कार्ये तडीस नेली जातात, त्या परमेश्वराचा मी कोटिशः कृतज्ञ व ऋणी आहे.'' – तिरमिज़ी

### ३) 'नमाज़' अनिवार्य कशासाठी?

परमेश्वराने मानवाची निर्मिती आपल्या भक्तीच्या प्रयोजनासाठी केली आहे. त्यामुळे परमेश्वराची भक्ती (उपासना) करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य ठरते. याचा उल्लेख पवित्र कुराणात असा आहे, ''मी जिन्न अर्थात यक्षयोनी, किन्नर आणि माणसे यांना यासाठीच निर्माण केले आहे की, त्यांनी माझी उपासना (भक्ती) करावी.'' ५१:५६ त्याने आपली उपासना-भक्ती म्हणजेच नमाज़ ही आमरण करत राहावी. कारण अल्लाहचा तसा आदेश आहे. ''तुझ्या विधात्याचे स्तवन करीत त्याचे गुणगान कर आणि (त्याच्यासमोर) नतमस्तक होणाऱ्यांपैकी एक हो; आणि तू आपणास मरण येईपर्यंत आपल्या विधात्याची उपासना करीत राहा (नमाज़ पढत जा).'' १५:९८-९९.

नमाज़ ही अल्लाहच्या (परात्पर परब्रह्म) प्रतिष्ठेस साजेशी अशी एक सुप्रतिष्ठित भक्तिसाधना आहे. ती भक्ताची प्रामाणिक निष्ठा अभिव्यक्त करते. कारण ''केवळ प्रामाणिक निष्ठेनेच अल्लाहचा अनुग्रह प्राप्त होत असतो.'' ३९ :३ ईश्वरभक्तीचा ध्यास हा अंत:करणापासून असावा. उपास्यामध्ये उपासकाची परम तल्लीनता असावी.

संपूर्ण कुराणात अनेक ठिकाणी उपासनेची-भक्तीची म्हणजेच नमाज़ाची अनिवार्यता पुढीलप्रमाणे विशद केली आहे –

''नतमस्तक व्हा, अल्लाहसमोर आणि त्याचीच भक्ती (उपासना) करा.'' ५३:६२ ''हे श्रद्धावंतांनो! उपासनेत (नमाज़मध्ये) लीन व्हा, नतमस्तक व्हा, आपल्या विधात्याची भक्ती करा, सत्कृत्ये करा की तुम्ही सफल (यशस्वी) व्हावे.'' २२:७७ ''निःसंशय त्या श्रद्धावंतांना यश प्राप्त होते, जे आपल्या भक्तीत (नमाज़ात) विनम्रता अंगीकारतात, व्यर्थ गोष्टींपासूनअलिप्त राहतात, दान देण्यात सक्रिय असतात आणि शील रक्षण करतात.'' २३:१-५ ''तू हे पाहिले नाहीस काय की आकाशात आणि भूमीवर जे कोणी आहेत ते सर्व आणि सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्ष, पशू आणि मानवजातीतील अनेकजण अल्लाहलाच प्रणिपात करीत आहेत; परंतु अनेक असेही आहेत जे शिक्षेस पात्र ठरत आहेत.'' २२:१८ ''काय तुम्ही पाहत नाही की अल्लाहचेच पावित्र्यगान (गुणगान) करीत आहेत, हे सर्वजण; जे आकाशात आणि पृथ्वीवर आहेत आणि पक्षी जे पंख पसरून उडत आहेत. प्रत्येकास आपल्या भक्तीची व स्तवनाची पद्धती माहीत आहे.'' २४:४१ ''सप्त आकाश व भूमी आणि त्यामध्ये जे काही आहे ते सर्व त्याच्या वैभवाचे गुणगान करतात. अशी कोणतीही वस्तू नाही की त्याच्या स्तुतीसह त्याच्या वैभवाचे (पावित्र्याचे) गुणगान करीत नसेल. परंतु त्यांचे गुणगान तुम्हाला समजत नाही.'' १७ :४४ म्हणूनच परधर्मी लोकांच्या प्रार्थनापद्धतीस मुळीच नावे ठेवू नयेत. त्यांच्या भक्तीपद्धतीवर कधीच टीका करू नये. याचा संकेत पवित्र कुराणामध्ये पुढील शब्दात आहे- ''प्रत्येक जनसमूहास आम्ही

उपासनेच्या पद्धती निर्धारित करून दिलेल्या आहेत ज्यांचे ते पालन करीत असतात.'' २२:६७ ''तुमच्यापैकी प्रत्येकासाठी आम्ही धर्मनीती व मार्ग ठरवून दिलेला आहे आणि जर अल्लाहने त्याची इच्छा (अमलात आणली) असती, तर त्याने तुम्हा (सर्वांना) एकाच संप्रदायाचे लोक बनवले असते, परंतु (तो) त्याने तुम्हाला जे दिलेले आहे त्याद्वारे तुमची परीक्षा घेऊ इच्छितो. म्हणून सत्कर्माच्या बाबतीत एकमेकांशी स्पर्धा करीत पुढे व्हा.'' ५:४८ आणि तुमच्यासाठी धर्मामध्ये कोणतेच क्लेश ठेवलेले नाहीत.'' २२:७८ किंवा ''धर्माच्या बाबतीत त्याने तुमच्यावर (असह्य) असे ओझे लादलेले नाही.'' २२:७८ म्हणूनच माणसाने ईश्वरभक्ती म्हणजे क्लेश किंवा ओझे म्हणून कदापि समजू नये. किंबहुना भक्ती हे ईश्वरी कृपाप्राप्तीचे एक साधन आहे.

इस्लामेतर भक्तीपद्धतीचा उपहास न करण्याची ताकीद पवित्र कुराणमध्ये पुढील शब्दांत केली आहे, ''आणि (मुसलमानांनो!) जे लोक परमेश्वराशिवाय इतरांस (उपास्य म्हणून, गरजा सारण्यास) बोलावतात (म्हणजे त्यांची पूजाअर्चा करतात, उपासना करतात, धावा करतात) त्यांना अपशब्द बोलू नका, त्यांचा उपहास करू नका, की एखादे वेळेस असे होऊ नये की ते अनेकेश्वरवादाच्या पुढे जाऊन द्वेषाचे भरात, नकळत परमेश्वरास (अल्लाहस) हकनाक बोलू लागतील. आम्ही तर अशाच प्रकारे प्रत्येक गटासाठी त्याच्या कर्मांना सुशोभित करून दाखवले आहे. शेवटी त्या सर्वांना त्यांच्या पालनकर्त्याकडे परत जायचे आहे. तर जसजशी कर्मे ते (जगात) करीत होते त्यांचे बरे-वाईट परमेश्वर त्यांना विदित करील.''- ६ :१०८ येथे परमेश्वराने लोकांस एक फार महत्त्वाचा उपदेश केला आहे. तो हा की, कोणीही दुसऱ्या कोणाच्या उपास्य देवास, मग पाहिजे तर त्या मूर्तीच का असेनात, अपशब्द बोलू नये. कारण असे केल्याने त्या लोकांसही अज्ञानाच्या भरात आवेश येऊन ते परमेश्वराला अपशब्द बोलतील.

पवित्र कुराणमध्ये जवळजवळ सातशे वेळा, नमाज़ पढण्यासंबंधी, ईश्वराची भक्ती-उपासना करण्याविषयी ताकीद देण्यात आलेली आहे. जसे, ''निःसंशय मी अल्लाह आहे; माझ्याशिवाय दुसरा कोणताही ईश्वर नाही, म्हणून माझी उपासना (भक्ती) कर आणि माझ्या नामस्मरणासाठी नमाज़ पढ (प्रार्थना कर, उपासना कर).'' २०:१४ ''हे प्रेषित, पठन करा या ग्रंथाचे जो तुमच्याकडे दिव्यबोधद्वारे पाठवला गेला आहे आणि नित्यनेमाने उपासना (नमाज़) करा. उपासना निर्लज्जतेपासून आणि दुष्कृत्यापासून निश्चितच परावृत्त करते आणि अल्लाहचे नामस्मरण सर्वोत्तम सदाचार आहे.'' २९:४५

विधिवत नमाज़ (उपासना) वास्तविक पाहता असे एक अनिवार्य कर्तव्यकर्म आहे जे नियमित वेळेसह श्रद्धावंतांसाठी आवश्यक केले गेले आहे. हीच गोष्ट पवित्र कुराण अत्यंत स्पष्ट शब्दात अशाप्रकारे मांडते- ''(पूर्णपणे) विधिवत नमाज़ अदा करा. नमाज़ ठरवून दिलेल्या वेळेस अदा करणे, हे श्रद्धावंतांचे अनिवार्य कर्तव्य आहे.'' ४:१०३.

### ४) 'नमाज़'च्या पूर्वअटी

इस्लामी उपासना किंवा भक्तीपद्धतीमध्ये स्वच्छता आणि शुचितेस अत्यंत महत्त्व दिले गेले आहे; किंबहुना या 'नमाज़'साठी पूर्व अटी आहेत. भक्ताने स्वच्छ स्थानावर, आपल्या स्वच्छ शरीरासह आणि निर्मळ मनाने प्रभूची-ईश्वराची भक्ती केली पाहिजे. म्हणून नमाज़साठी आचमन म्हणजेच 'वज़ू' करणे आवश्यक ठरवले गेले आहे. त्याशिवाय नमाज़च (भक्तीच) संपन्न होऊ शकत नाही.

बाह्य शारीरिक स्वच्छता आंतरिक मनाला शुचिता प्रदान करून पावित्र्य निर्माण करण्यास हातभार लावीत असते. म्हणून नमाज़ (भक्ती-उपासना) सुरू करण्याआगोदर आचमन म्हणजेच 'वज़ू' करणे आवश्यक ठरवले आहे. ईश्वरेतर विचारांच्या मलिनतेपासून मनाच्या आरशास स्वच्छ ठेवणे हा नमाज़-उपासनेचा हेतू असतो. शिवाय अंत:करणाचे चक्षू नमाज़-उपासनेमुळेच उघडतात. अमल, विमल व कोमल अंत:करणासह तल्लीन उपासना श्रेयस्कर असल्यामुळे श्रेयांकात म्हणजेच सद्‌गतीमध्ये फार वरचढ असते.

कालबद्धता, स्थलस्वच्छता, (भक्ताची) शारीरिक शुचिता, मानसिक विशुद्धता आणि अंत:करणाची-आत्म्याची पवित्रता या विधिवत् नमाज़च्या (उपासनेच्या) अनिवार्य अशा पूर्वअटी आहेत. अर्थात उपासनेसाठी स्थळाचे बंधन नाही, मात्र काळाचे निश्चित बंधन आहे. पृथ्वीतलावरील प्रत्येक स्वच्छ भूखंड हा नमाज़-भक्तीसाठी, नमनासाठी वैध व योग्य मानले गेले आहे. उपासनागृहामध्येच उपासना केली गेली पाहिजे, असा इस्लाममध्ये मुळीच दंडक नाही. 'वज़ू' म्हणजेच आचमन कसे व का करावे, याचा खुलासा पवित्र कुराण पुढील शब्दांत करते -

"हे श्रद्धावंतांनो! जेव्हा तुम्ही नमाज़ासाठी उठाल तेव्हा हे आवश्यक आहे की, तुम्ही आपला चेहरा (तोंड) आणि कोपरापर्यंत हात (पाण्याने) स्वच्छ धुवा. आपले (ओले) हात आपल्या डोक्यावरून फिरवा आणि पाय घोट्यापर्यंत (पाण्याने) धुवा. जर तुम्ही (समागम केल्यामुळे) अपवित्र असाल तर स्नान करून शुचिर्भूत व्हा; जर तुम्ही आजारी असाल किंवा (अपवित्र असताना तुम्ही) प्रवास करीत असाल, किंवा तुमच्यापैकी एखादा शौचास जाऊन आला असेल किंवा तुम्ही स्त्रियांशी अंगसंग केला असेल, आणि तुम्हाला **पाणी** उपलब्ध नसेल तर **स्वच्छ मातीचा** उपयोग करा, त्या मातीवर फक्त हात मारून आपल्या चेहऱ्यावर व हातांवर फिरवा (मृत्तिका प्रक्षालन करा), अल्लाहची तुम्हाला कष्ट पोहोचवण्याची अजिबात इच्छा नाही. परंतु त्याची तुम्हाला शुचिर्भूत करण्याची आणि तुमच्यावर त्याचा पूर्ण अनुग्रह करण्याची इच्छा आहे. ज्या योगे तुम्ही (त्याचे) कृतज्ञ बनाल." ५:६

नमाज़ (भक्ती) मध्ये नमाज़ी अर्थात भक्ताने परमेश्वरासमोर लीन होऊन विनयाने सर्वोत्तम स्थितीत उपस्थित राहिले पाहिजे. यासाठी त्याने आपल्या शरीरावर योग्य वस्त्रप्रावरणे धारण करून आपल्या सदाचरणवृत्तीचे प्रदर्शन करावे. कारण सुयोग्य वस्त्रप्रावरणांमुळे शीलरक्षण होत असते. जसे, "हे आदमची संतती! तुमच्या शरीरातील लज्जाअंग (अवयव [गुप्तांग]) झाकून टाकण्यासाठी आम्ही (भूतलावर) तुमच्याकडे वस्त्रप्रावरणं (पोशाख) अवतरवले आहेत आणि खरोखरच ते तुमच्यासाठी शरीररक्षण व भूषणाचे साधनदेखील आहे. सर्वोत्तम पोशाख ईशकोपाच्या भयाचे, सदाचरण वृत्तीचे वस्त्रप्रावरण हेच आहे." ७ :२६ "हे आदमच्या मुलांनो! उपासनेच्या प्रत्येक (वेळी आणि) स्थळी आपली आकर्षक व स्वच्छ वस्त्राभूषणे धारण करून स्वत:ला शुचिर्भूत ठेवा." ७:३१

"नि:संशय त्या श्रद्धावंतांना यश प्राप्त होते, जे आपल्या उपासनेत (नमाज़ात) विनम्रता अंगिकारतात आणि जे सर्व निरर्थक गोष्टींपासून अलिप्त राहतात आणि जे दान (ज़कात) देण्यात सक्रिय असतात आणि जे आपल्या शीलाचे (गुप्तांगाचे) रक्षण करतात आणि जे त्यांच्यावर (टाकलेल्या) विश्वासाच्या आणि त्यांच्या करारांच्या बाबतील दक्ष असतात आणि जे आपल्या उपासनेचे (नमाज़ाचे) पालन करण्यात अतिशय काटेकोर

असतात, हेच लोक ते वारस आहेत जे वारशात स्वर्ग (नंदनवन) प्राप्त करतील आणि त्यात सदैव राहतील.'' २३:१-५,; ८-११

''जे उपासना (नमाज़) करतात, जे आपल्या उपासनेत नेहमी सातत्य ठेवतात, ज्यांचा धनसंपत्तीत याचक व वंचित असलेल्यांचा एक नियत हिस्सा आहे, जे निवाड्याच्या दिवसाला सत्याधिष्ठित मानतात, जे आपल्या विधात्याच्या शिक्षेचे भय बाळगतात, जे आपल्या गुप्तांगांचे रक्षण करतात, जे आपल्या अमानतीचे रक्षण आणि आपल्या वचनांचा आदर करतात, जे आपल्या साक्षीत सचोटीवर दृढ राहतात आणि जे आपल्या नित्य उपासनेच्या (नमाज़ाच्या) बाबतीत दक्ष असतात, हेच लोक सन्मानासह (स्वर्गीय) उपवनात असतील.'' ७०:१९-३५. ''संयम व नमाज़ (उपासना) याद्वारे अल्लाहकडे साहाय्याची याचना करा. नि:संशय नमाज़ हे अत्यंत कठीण कार्य आहे आणि खरोखर पापभीरू लोकांव्यतिरिक्त इतर लोकांच्या दृष्टीने ही कठीण गोष्ट आहे.'' २:४५.

''अल्लाह आपल्या वचनांद्वारे असत्य मिटवतो आणि सत्य प्रस्थापित करीत असतो. नि:संशय तो (लोकांच्या) मनातील अंतस्थ विचारदेखील पूर्णपणे जाणून असतो आणि तोच होय जो आपल्या सेवकांकडून पश्चात्ताप मान्य करतो. (क्षमायाचना स्वीकारतो) आणि त्यांच्या पापांची क्षमा करतो आणि तुम्ही जी काही (कर्मे) करता ती तो जाणतो आणि जे श्रद्धा बाळगतात व सत्कर्मे करतात (त्यांच्या प्रार्थना) तो स्वीकारतो आणि आपल्या कृपेने तो त्यांना अधिकाधिक देतो आणि श्रद्धाहीनांसाठी कठोर शिक्षा निश्चित आहे.'' ४२:२४-२६.

### ५) 'नमाज़'चे स्वरूप

**नमाज़चे स्वरूप आकृतिबद्ध स्वरूपात पुढीलप्रमाणे मांडता येते :**

**नमाज़ : सलात – इस्लामी उपासना : इस्लामी भक्ती-पद्धती : नामस्क्रियाविधान**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ↓ न | (१) आकृती | (१) बहिरंग | (१) हैयत | 1. Form | ↓ स |
| मा | (२) प्रकृती | (२) अंतरंग | (२) रूह | 2. Spirit | ला |
| . ज | (३) रहस्य | (३) गूढशोधन | (३) राज़ | 3. Secrets | त |

**नमाज़ चे तीन स्तर**

नमाज़ अर्थात इस्लामी उपासनापद्धतीचे सूक्ष्म अवलोकन केल्यास आपणास तिचे तीन पैलू दिसून येतात ते असे - (१) आकृती किंवा बहिरंग (form), (२) प्रकृती किंवा अंतरंग (spirit) आणि (३) रहस्य किंवा गूढ शोधन (secrets). नमाज़ांतर्गत संपन्न होणाऱ्या भक्ताच्या विधिमान्य विविध शारीरिक विक्षेपांनी नमाज़ची आकृती बनते. हे तिचे बहिरंग होय. तर तदंतर्गत प्रयुक्त त्याच्या मानसिक जपकर्मांनी नमाज़च्या प्रकृतीचा आलेख बनतो. हे तिचे अंतरंग होय. या सर्व कृतिकर्मांचे सूफ़ीप्रणीत निरूपणाने तिचे रहस्य उलगडते. हे गूढशोधन होय.

नमाज़ अर्थात भक्ती-उपासना हे एक ईश्वरी कोषागार आहे. त्याची किल्ली कृपायाचना (दुआ) आहे. वैध उपजीविका या किल्लीचे कप्पे आहेत. कृपायाचना उपासनेचे मर्म आहे. ईश्वराची उपासना हा भक्ताचा अधिकार आहे. आणि ईश्वरनिर्दिष्ट कर्तव्य पण. ईश्वरी आदेशांचे पालन करणे हे भक्ताचे कर्तव्य आहे. उपासक हा उपासनेचा अवतार असतो. पराकोटीची उपासना ईश्वरी आज्ञापालनाचे नाव आहे. ती शारीरिक तुष्टीची चरमसीमा असते. म्हणून उपासनेचा संकेत हा ईश्वरलीनतेकडे असतो. ईश्वरतन्मय अवस्थेत उपासकास प्रभुदर्शन घडावे, हे उपासनेचे ईप्सित असते.

नमाज़ संपन्न करण्याच्या पद्धतीमुळे नमाज़ची आकृती बनते. त्या आकृतीचे घटक पुढीलप्रमाणे दिसून येतात.

नमाज़ : सलात →
(उपासना, भक्ती, प्रार्थना)

- १. पूर्वांग ⟶ वज़ू (आचमन) आणि तहारत (शुचिता) व नियत (दृढ संकल्प, निश्चय)
- २. मध्यांग ⟶
  - १. आकृती (बहिरंग)
  - २. प्रकृती (अंतरंग)
- ३. उत्तरांग ⟶ दुआ (कृपायाचना), अस्तग़्फ़ार (क्षमायाचना)
- ४. उपांग ⟶ मन्नत (नवस), कुर्बानी (बलिदान, यज्ञ) ज़कात (धर्मकर) इत्यादी

नमाज़ (सलात) ही दिव्यारोहणामध्ये ('मेराज') प्रेषित मुहम्मद स. यांना ईश्वरदत्त आणि ईश्वरपुरस्कृत इस्लामी भक्ती-पद्धतीची एक अनुपम अशी भेट आहे.

### १) नमाज़ची आकृती : बहिरंग

नमाज़साठी पूर्वतयारी म्हणून 'वज़ू' म्हणजेच आचमन करून शुचिर्भूत होणे आवश्यक असते. 'वज़ू' अर्थात आचमन हा शरीरशुद्धीचा एक विधी आहे. शरीरशुद्धीमुळे आळस आणि शैथिल्य नाहीसे होते, उत्साहाचा संचार होतो आणि परिणामी चित्तशुद्धीस हातभार लावला जातो. 'वज़ू' केल्यानंतर उपासकाने (भक्ताने) प्रार्थनापटावर (उपासना वल्कल) म्हणजेच 'मुसल्ल्यावर' उभे राहून नमाज़चा संकल्प वा निश्चय करावा. मग 'अल्लाहु अकबर' (परमेश्वर सर्वश्रेष्ठ आहे) हे म्हणत दोन्ही हातांच्या अंगठ्यांनी कानांच्या लोलकांस स्पर्श करावे. नंतर हात खाली घेऊन बेंबीखाली दोन्ही अशा प्रकारे बांधून घ्यावेत की उजवा हात वर तर डावा हात खाली असेल. आणि अंगठा आणि कनिष्ठिकेने (करांगुळी) गोल धरावे आणि उरलेली तीन बोटे (तर्जनी, मध्यमा व अनामिका) बरोबर ठेवावीत. (स्त्रियांनी खांद्यापर्यंत हात उंचावून छातीवर बांधून घ्यावेत.) दृष्टी प्रणिपात जेथे होईल त्या जागेवर खिळवावी. इकडे तिकडे मुळीच पाहू नये. प्रथम ही कृपायाचना म्हणावी

– ''सुबहानक–ल्लाहुम्म, व बिहम्दिक व तबार कस्मुक व तआला जद्दुक व ला इलाहा ग़ैरूक'' ''अऊँज़ु बिल्लाहि मिनश्शयता निर्रजीम'' (''हे प्रभो! आम्ही तुझे पावित्र्यगान करतो आणि तुझेच स्तवन करतो व तुझे नाव समृद्धीदायक आहे आणि तुझे महात्म्य श्रेष्ठतर आहे आणि तुझ्याशिवाय अन्य कुणी उपास्य नाही.'' ''निष्कासित, सैतानाच्या आक्रमणापासून मी अल्लाहचा (परमेश्वरा) शरणागत होतो.'' नंतर 'सूरए फ़ातिहा' म्हणजेच मंगलाचरण म्हणावे. ते मंगलाचरण असे आहे, ''बिस्मिल्ला हि र्रहमा निर्रहीम'' (कृपावंत आणि दयावंत अल्लाहच्या नावाने मी आरंभ करतो). ''अल्हम्दु लिल्लाहि रब्बिल् आलमीन अर्रहमा निर्रहीम मालिकि यौमिद्दीन – इय्याक नअबुदु व इय्याक नस्तईन. इहदिनस्सिरातल मुस्तक़ीम, सिरा तल्लज़ीन अन्अम्त अलैहिम ग़ैरिल मग़ज़ूबि अलैहिम वलज़्ज़वाऽल्लीन. (आमीन)''

(''अवघे वंदन अल्लाचेच असो; तो अखिल विश्वांचा निर्माता आणि पोषणकर्ता आहे. अत्यंत दयाळू आणि कृपाळू , न्यायदिनाच्या नाथा, आम्ही तुझीच उपासना करतो आणि तुझेच साहाय्य मागतो. आम्हांस सत्यमार्गावर ने. अशांचा मार्ग की, ज्यांच्यावर तू प्रसन्न होतोस; अशांच्या नको की ज्यांच्यावर तुझा कोप घडतो आणि जे मार्गभ्रष्ट झाले आहेत. [तथास्तु])''.

यानंतर पवित्र कुराणातील एखादी लहान 'सूरत' म्हणजेच अध्यायाचे वाचन करावे जसे–

''कुल् हु वल्लाहु अहद. अल्लाहु स्समद. लम्यलिद व लम् यूलद वलम् य कुल्लहु कुफ़ुवतन् अहद्.'' (''[तू असे] म्हण [की], तो अल्लाह एकच आहे, अल्लाह, तो निरपेक्ष आहे. तो न जनिता आहे, न जन्य. तत्सम कोणीही नाही.'')

**किंवा**

''इन्ना अअत्वयूना कल् कौसर. फ़स्वल्लि लि रब्बिक वन्हर. इन्न शा निअक हुवल अब्तर.'' (''निःसंशय आम्ही तुला [प्रत्येक वस्तूची] विपुलता प्रदान केली आहे; म्हणून आपल्या विधात्याची उपासना कर. (नमाज़ पढ) आणि त्याच्यासाठी त्याग कर. निःसंशय, तुझा शत्रूच संततीहीन असेल.'')

**अथवा** याला पर्याय म्हणून मोठ्या अध्यायातील कमीत–कमी तीन सलग श्लोकांचे पठण करावे **किंवा** एकच सुदीर्घतम श्लोक अर्थात अध्याय क्रमांक २ मधील श्लोक क्रमांक २५५ चे पठण करावे. या सुदीर्घतम श्लोकाचे नाव आहे 'आयत ल् कुर्सी' म्हणजेच महाश्लोकासन. मग 'अल्लाहु अकबर' म्हणत 'रुकू' म्हणजेच स्कंध किंवा नमन अवस्थेमध्ये जावे. बेंबीवरील हात उघडून, वाकून दोन्ही हातांनी दोन्ही गुडघ्यांना मज़बूत धरावे. हात वाकलेले नसावेत आणि कमर (कंबर) व डोके समतल असावेत आणि दृष्टी दोन्ही पायामधोमध असलेल्या जमिनीवर राखावी आणि तीन वेळेस 'सुब्हान रब्बियल् अ‍ॅज़ीम' ('मी महान परमेश्वराचे पावित्र्य निवेदन करतो.') म्हणत 'रुकू' अर्थात नमनापासून 'समी अल्लाहुलिमत् हमिदः' (परमेश्वराने त्याचे ऐकले ज्याने त्याचे स्तवन केले.' हे म्हणत ताठ उभे राहावे आणि एका वेळेस म्हणावे 'रब्बना लकल् हम्दु ('हे आमच्या प्रभो! समस्त स्तवन तुझ्याचसाठी आहे.') नंतर 'अल्लाहु अकबर' (परमेश्वर सर्वश्रेष्ठ आहे, सर्वात महान आहे.) म्हणत 'सज्दे' अर्थात प्रणिपात अवस्थेमध्ये जावे.

परमात्म्याला जाणण्यासाठी प्रणिपात आवश्यक आहे. परमात्म्याचे स्वरूप वर्णन करताना उपनिषदे म्हणतात – ''अदृष्टो द्रष्टा, अमतो मन्ता, अविज्ञातो विज्ञाता'' म्हणजे ज्याला कोणी पाहिलेले नाही, पण जो

सर्वांना पाहतो, ज्याच्यासंबंधी कोणी चिंतन करू शकत नाही, पण ज्याच्या चिंतनात सर्व येतात, ज्याला कोणी जाणू शकत नाही, पण ज्याच्या ज्ञानाच्या कक्षेत सर्व येते तो परमात्मा. प्रणिपात म्हणजे दंडवत! पण केवळ बाह्य नम्रतेने केलेल्या नमस्काराने ज्ञान होत नाही. अशा नमस्कारात अपूर्णता आहे; कारण त्यात शरणागती नाही, श्रद्धा नाही, नावलौकिकाचे विस्मरण नाही; म्हणून खरा प्रणिपात घडत नाही. 'प्रणिपात' याचा अर्थ नि:शेष पडणे, थोडाही अहंकार शिल्लक न ठेवता नतमस्तक होणे.

नमस्काराच्या केवळ बाह्यकृतीने परमात्मा जाणता येत नाही, तर संपूर्ण विश्वासाने अंतरंग शरणागतीने घातलेल्या प्रणिपातामुळे त्याच्याशी एकरूपता घडते, तेव्हाच तो जाणला जातो. प्राप्त होतो.

(हे) अशाप्रकारे की, प्रथम दोन्ही गुडघे जमिनीवर टेकवावे, मग दोन्ही हात जमिनीवर ठेवावे, नंतर नाक जमिनीवर टेकवावे, मग माथा जमिनीवर टेकवावा. दृष्टी नाकाच्या टोकाकडे असावी. हाता-पायांची बोटे किब्ल्याकडे म्हणजेच भारतात पश्चिम दिशेकडे असावीत. हातांचे कोपर जमिनीवर टेकलेले नसावेत, ते जमिनीपासून उंच असावेत. 'सज्दे' म्हणजेच प्रणिपात अवस्थेमध्ये तीनदा 'सुब्हान रब्बियल् आला' (म्हणजेच मी महान परमेश्वराचे पावित्र्य निवेदन करतो) म्हणावे. मग प्रणिपाताहून वर उठून दोन्ही हात (दोन्ही मांड्यांवर) ठेवून अशाप्रकारे बसावे की उजव्या पायास उभे ठेवावे आणि डाव्या पायास उजव्या पायाकडे घेऊन जावे. (वळवावे) (वज्रासन बैठक घ्यावी) आणि दृष्टी अंत:करणावर (मनावर) खिळवावी. (स्त्रियांनी दोन्ही पाय उजवीकडे वळवावेत) आणि दोन्ही पायांवर बसून एकदा पठण करावे (म्हणावे) 'अल्लाहुम्मा अग़्फ़र्ली व अर्रहमनी' (हे परमेश्वरा! आम्हांस क्षमा कर व आमच्यावर दया कर.) पुन्हा सज्देमध्ये म्हणजेच प्रणिपात अवस्थेमध्ये जावे आणि ज्याप्रमाणे प्रथम प्रणिपात केले होते त्याप्रमाणे द्वितीय प्रणिपात संपन्न करावे. येथे प्रथम (पहिली) 'रकात' म्हणजेच स्कंध किंवा साधनांग चक्र समाप्त होते. दुसऱ्या 'रकात' अर्थात स्कंधासाठी 'अल्लाहु अकबर' (परमेश्वर सर्वांत थोर आहे) असे म्हणत उभे रहावे आणि 'सूर ए फातिहा' म्हणजेच मंगलाचरण अध्याय म्हणावे; मात्र 'सुबहानक-ल्लाहुम्म' म्हणू नये. ते सोडून द्यावे आणि शेष सर्व प्रथम 'रकात' म्हणजेच स्कंधाप्रमाणे संपन्न करावे. पुन्हा दोन प्रणिपातांनंतर पूर्वोक्तप्रमाणे बसून याचे पठण करावे. ''अत्तहिय्यातु लिल्लाहि वस्सलवातु व त्तोय्यबातु अस्सलामु अलैक अय्युहन्-नबीय्यु रहमतुल्लाहि व बरकातुहु. अस्सलामु अलैना व अला इबादिल्लाहि स्सालिहीन. अशहदु अल्-ला-इलाहा इल्लल्लाहु व अश्हदु अन्न मुहम्मदन् अब्दुहु व रसूलुहु.'' (''वाचिक, कायिक, मानसिक आणि समस्त सत्कर्मांच्या उपासना अल्लाहसाठीच आहेत आणि हे ईश-संदेष्टे! तुमच्यावर शांती असो आणि कृपा असो अल्लाहची आणि त्याच्या बरकती, शांती असो आमच्यावर आणि अल्लाहच्या सदाचारी दासां (भक्तां)वर. मी ग्वाही देतो की अल्लाहशिवाय कोणीच उपासनेस योग्य (उपास्य) नाही, आणि याची पण ग्वाही देतो की, मुहम्मद[स.] अल्लाहचे दास आणि प्रेषित आहेत.) [याला 'तशहुद' म्हणजेच साक्षांकन किंवा 'अतैहियात' म्हणजेच उपासना विविधा, असे म्हणतात.] नंतर 'दरूद-ए-इब्राहीमी' म्हणजेच इब्राहीमी अंतरासक्ती किंवा स्वस्ति-श्री चे पठण करावे - ''अल्लाहुम्म स्वल्लेअला मुहम्मदिंव् व अला आले मुहम्मदिन्, कमा स्वलैत अला इब्राहीम व अला आले इब्राहीम इन्नक हमीदुम्मजीद. अल्लाहुम्म बारिक अला मुहम्मदिंव् व अला आले मुहम्मदिन्, कमा बारकत अला इब्राहीम व अला आले इब्राहीम इन्नक हमीदुम्मजीद.'' (''हे परमेश्वरा! तू मुहम्मद[स.] आणि त्यांच्या संततीवर दया

कर. जसे की तू प्रेषित इब्राहीम आणि त्यांच्या संततीवर दया केली होतीस. निःसंशय तू प्रशंसेस योग्य आणि महान आहेस. हे परमेश्वरा! जसे तू प्रेषित इब्राहीम आणि त्यांच्या संततीवर बरकत दिली होतीस, तशीच बरकत तू मुहम्मद[स.] आणि त्यांच्या संततीवर कर. निःसंशय तू प्रशंसेस योग्य आणि महान आहेस.'' [याला 'दरूद शरीफ़' म्हणजेच पवित्र अंतरासत्ती किंवा स्वस्तिक असे म्हणतात.] यानंतर पुढील आळवणी म्हणावी – ''अल्ला हुम्म इन्नी ज़लम्तु नफ़्सी जुल्मन कसीरंव वला यग़्फ़िरूज़्ज़ूनूब इल्ला अन्त फ़ग़्फ़िर्ली मग़्फ़िरतम मिन इन्दिक वरहम्नी इन्नक अन्तल ग़फ़ूरूर्रहीम.'' (''हे अल्लाह! मी आपल्या आत्म्यावर फार जुलूम केले आहेत आणि तुझ्याशिवाय अपराधांची कोण बरे क्षमा करणार? तू आपल्याकडून विशेष क्षमेने मला क्षमा कर आणि माझ्यावर दया कर. निःसंशय, तूच क्षमा करणारा, अत्यंत कृपाळू आहेस.'') यानंतर उजवीकडे तोंड वळवून म्हणावे – 'अस्सलामु अलैकुम व रहमतुल्लाहि'. (तुमच्यावर शांती असावी आणि अल्लाहची कृपा.) मग डावीकडे तोंड वळवून याचीच पुनरावृत्ती करावी. येथे नमाज़ पूर्ण होते. यानंतर नमाज़चे उत्तरांग सुरू होते. या टप्प्यावर पुढील 'दुआ' म्हणजेच कृपायाचना म्हणावी–

''अल्ला हुम्म अन्तस्सलामु व मिन्कस्सलामु व इलैक यर्जिउस्सलामु हैयिना रब्बना बिस्सलामि व अदखिलना दारस्सलाम तबारकत रब्बना व तआलैत या ज़लजलालि वल इक्राम.''

(''हे अल्लाह! तूच शांती देणारा आहेस आणि तुझ्याकडून शांती प्राप्त होऊ शकते. आम्हास सुखासमाधानामध्ये जिवंत ठेव आणि आम्हास शांतिगृहामध्ये म्हणजेच स्वर्गामध्ये प्रविष्ट कर. तू मोठा बरकतवाला आहेस. हे परमेश्वरा! तू फार महान आहेस. हे महानतेचा व श्रेष्ठतेचा स्वामी, तू फार मोठा बरकतवाला आहेस. तू महान आहेस.'')

जर नमाज़ मध्ये तीन रकात अर्थात स्कंध असतील (मग़रिब म्हणजेच सूर्यास्ताच्या वेळी संपन्न होणाऱ्या नमाज़ मध्ये तीन रकात असतात.) तर 'अत्तहिय्यात' नंतर 'अल्लाहु अकबर' म्हणून उभे राहावे आणि तिसरी रकात– स्कंध दुसऱ्या रकातीप्रमाणे संपन्न करावी. तिसरी रकातमध्ये फक्त मंगलाचरण पाठ करावे. जर नमाज़मध्ये चार रकात अर्थात स्कंध असतील तर तिसरी रकात पहिल्या रकात प्रमाणे संपन्न करून, चौथी रकात ही दुसऱ्या रकातीप्रमाणे संपन्न करावी. जेव्हा 'फर्ज' म्हणजेच नित्यकर्म, ब्राह्मीकर्म, नमाज़साठी उभे असाल तेव्हा प्रथम 'तकबीर' (ईश–माहात्म्य) म्हणजे 'अल्लाहु अकबर' म्हणावे. प्रत्येक अनिवार्य नमाज़मध्ये नित्यकर्म (फ़र्ज़) आणि संविधान कर्म (सुन्नत) असतात आणि इशा म्हणजेच रात्रीच्या नमाज़मध्ये वितर (एकल विषम) रकाती असतात आणि काही नमाज़सोबत 'नवाफ़िल म्हणजेच तद्अधिक (अतिरिक्त) रकाती संपन्न केल्या जातात.

नमाज़च्या पूर्वांगामध्ये भक्ताच्या दृढ संकल्पाचा म्हणजेच 'निय्यत'चा समावेश असतो. तो आपले मनोनिश्चय पुढील शब्दांमध्ये व्यक्त करतो– ''इन्नी वज्जहतु वज्हिय लिल्लजी फ़तरस्समावाति वल्अर्ज़ हनीफ़ंव्व मा अना मिनल्मुश्रिकीन–'' (''मी तर एकाग्र होऊन आपले मुख (ध्यान) त्या अल्लाहकडे केंद्रित केले आहे ज्याने आकाशाला आणि पृथ्वीला निर्माण केले आहे आणि मी कदापि अनेकेश्वरवाद्यांपैकी नाही.'') लक्षात ठेवा, नमाज़साठी 'निय्यत' ची अभिव्यक्ती ही पूर्वअट आहे.

श्रद्धाळू भक्ताचे मन हे परमेश्वराचे (अल्लाहचे) सिंहासन असते आणि हदीस–ए–कुद्सी (निर्विकारी प्रेषित

उवाच) मध्ये अभिव्यक्त आहे की, ईश्वर म्हणतो, माझ्यासाठी जर कोठे अवकाश असेल तर ते श्रद्धाळू भक्ताच्या मनात होय. वास्तविक पाहता (वस्तुत:) मानवाचे मन हे दैवी गूढ गुंजन आणि ईश्वरी कृपा–निधीचे सिंहासन आहे; परंतु हे सर्वस्वी मनाच्या स्वरूपावर अवलंबून आहे. कारण चंचल मन प्रपंच करते; तर निश्चल, एकाग्र मन परमार्थ साधते.

समस्त ब्रह्मांड हे जगन्नियंतेच्या अधीन आहे. जिकडे पाहावे तिकडे अल्लाह आणि अल्लाहच आहे. यास्तव आदेश आहे की, नमाज़मध्ये स्थितप्रज्ञावस्थेत ('क़याम') असताना उपासकाने प्रणिपातस्थळास पाहावे म्हणजे मृदा प्रावरणाच्या (मातीच्या थराचे) लज्जेचे विस्मरण होऊ नये आणि नमन ('रूकू') अवस्थेत दोन्ही पायांकडे पहावे. प्रणिपाता ('सज्दा') मध्ये नाकास पाहावे आणि लघ्वासन म्हणजेच दोन प्रणिपात मध्यंतरामध्ये ('जलसा') दोन्ही हातांकडे पाहात राहावे. उपविश्यासन ('क़ादा') मध्ये वक्षस्थळास पाहत राहावे. कारण वक्षस्थळ हे अंत:करणाचे निवासस्थान आहे. व अंत:करण हे परमेश्वराचे सिंहासन आहे. म्हणूनच उपासकाची–भक्ताची दृष्टी परमेश्वरावर राहील. परमेश्वराच्या प्रेषिताने 'नमाज़ ही श्रद्धाळू भक्तासाठी दिव्यारोहण ('मेराज') म्हणजेच साक्षात् प्रभु–दर्शन असते' असे जे म्हटले आहे, ते खरेच आहे. दर्शन क्षमता असेल तर तो उपासक 'नामी'स पाहील, नसेल तर त्याने फक्त 'नामा'सच पाहत राहावे.

**२) नमाज़ची प्रकृती : अंतरंग**

उपासकाने नमाज़ वास्तविकपणे अशारीतीने संपन्न करावी की ज्या वेळेस तो आपल्या जिव्हेने ' तकबीर–ए–तहरीमा' म्हणजे 'अल्लाहु अकबर' म्हणतो अर्थात ईश्वरी सर्वश्रेष्ठतेची सुप्रतिष्ठित उद्‌घोषणा करतो तेव्हा त्याने हे जाणावे की ईश्वर हा सर्वात मोठा आहे आणि तो आपल्या महानतेचा गुणगौरव स्वत:च करताना निवेदितो की, मी आपल्या गुणाने भद्र आहे आणि आपल्या एकत्वतेमध्ये समस्त गुणांहून सर्वश्रेष्ठ आहे आणि जेव्हा उपासक आपल्या नाभीवर (बेंबीस) हात ठेवतो तेव्हा त्याने अशी कल्पना करावी की ईश्वर (अल्लाह) स्तब्ध, मौन आहे, आणि जेव्हा तो ईशस्तवन ('सना') आरंभ करतो तेव्हा त्याने हा विचार मनात आणावा की ईश्वराचे परमधाम (सिंहासन) ('अर्श') चोहीकडून देवदूतांकरवी वर अलगद उचललेला आहे. त्या परमधामाचा समोरील उजवीकडील पाय आपल्या स्कंधावर घेणारा पहिला देवदूत उद्‌गारतो –

१) **'सुबहानक ल्लाहुम्म व बिहम्दिक'** अर्थात 'हे प्रभो! आम्ही तुझे पावित्र्य मान्य करतो आणि तुझेच स्तवन करतो.' आणि दुसरा देवदूत, जो समोरील डावा पाय आपल्या स्कंधावर घेतो, तो म्हणतो–

२) **'व तबारकस्मुक'** अर्थात 'व तुझेच नाव समृद्धीदायक आहे'. आणि मागील उजवा पाय उचलणारा तिसरा देवदूत निवेदन करतो –

३) **'व तआला जद्दुक'** म्हणजेच 'आणि तुझे महात्म्य श्रेष्ठतर आहे.' आणि मागील डावा पाय उचलणारा चौथा देवदूत म्हणतो –

४) **'व ला इलाहा ग़ैरूक'** म्हणजेच तुझ्याशिवाय अन्य कुणी उपास्य नाही.'

उपरोक्त चार वाणींचे समष्टीगत नाव आहे – 'इस्तिफ़्ताह' 'देदिप्यमान वैभवानिशी एकमेवतेचा तो रत्न म्हणजेच अल्लाह (परमेश्वर) अंत:करणाच्या परमधामावर (सिंहासन) शोभायमान आहे आणि या चारी देवदूतांचे मानस–वाणी नि:सृत स्तोम ('तस्बीह') तो ऐकत आहे. ''ज्यांनी सिंहासन उचलून धरले आहे आणि

जे त्याच्याभोवती आहेत ते (देवदूत) आपल्या विधात्याची स्तुती करीत आहेत. त्याच्या पावित्र्याचे गुणगान करीत आहेत. आणि त्याच्यावर श्रद्धा बाळगीत आहेत. आणि श्रद्धांवंतांसाठी क्षमायाचना करीत आहेत (व म्हणत आहेत की), '(हे) आमच्या विधात्या, तू सर्व वस्तुमात्रांना (आपली) कृपा व ज्ञान यांमध्ये सामावून घेतलेले आहेस म्हणून पश्चात्ताप पावून तुझा मार्ग स्वीकारणाऱ्यांना (तू) क्षमा कर आणि त्यांना नरकाच्या शिक्षेपासून वाचव.'' ४०:७

यानंतर उपासकाचे 'तअव्वुज़ म्हणजेच 'अऊज़ु बिल्लाहि मिनश्शयता निर्रजीम' अर्थात निष्कासित शैतानाच्या आक्रमणापासून मी अल्लाहचा (परमेश्वर) शरणागत होतो असे म्हणावे. म्हणजेच आपल्या अस्तित्वाच्या मनोरथापासून आश्रयाची याचना करावी आणि 'बिस्मिल्ला हिर्रहमा निर्रहीम' अर्थात कृपावंत आणि दयावंत अल्लाहच्या नावाने (मी आरंभ करतो) म्हणत प्रभु नाम सत्य आहे ही दृढ धारणा मनात बाळगावी आणि मग 'सूर ए फ़ातिहा' अर्थात मंगलाचरण पाठ म्हणावे.

''अल्हम्दु लिल्लाहि रब्बिल आलमीन अर्रहमा निर्रहीम मालिकि यौमिद्दिन. इय्याक नअबुदु व इय्याक नस्तईन. इहदिनस्सिरातल मुस्तक़ीम, सिरा तल्लजीन अन्अम्त अलैहिम ग़ैरिल मग़ज़ूबि अलैहिम वलज़्ज़्वाऽल्लीन. (आमीन)'' अर्थात ''स्तवन फक्त अल्लाहसाठीच (परात्पर परब्रह्मसाठीच) आहे. जो सर्व जगांचा प्रभू आहे. एकमात्र कृपावंत आणि दयावंत, निवाड्याच्या दिवसाचा अधिपती. (हे अल्लाह) आम्ही केवळ तुझीच उपासना करतो आणि तुझेच साहाय्य याचितो. आम्हाला सन्मार्ग दाखव. त्या लोकांचा मार्ग ज्यांना तू अनुग्रहित केलेस. जे कोपग्रस्त झाले नाहीत व जे पदभ्रष्ट झालेले नाहीत (तथास्तु).''

परंतु या वेळेस या गोष्टीवर पक्का विश्वास ठेवावा की, परम पवित्र वैभवशाली अल्लाह (परमेश्वर) आपल्या नामरूपाचा स्वत:च प्रशंसक आहे आणि तो अशा प्रकारे आपले स्तवन व गुणगान व्यक्त करतो की मी दोन्ही जगांचा (इहलोक व परलोक) प्रभू आहे आणि सर्व प्रकारची स्तुती व गुणगान विशेषत्वेकरून माझ्याच नामरूपास यथायोग्य आहे. आनंद-मंगल, प्रसन्नतेमध्ये यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही स्तवन व गुणगानामध्ये योग्य असा नाही. कारण की, प्रशंसक माझे 'नाम' ('ज़ात') आहे आणि प्रशंसित-स्तवनीय माझे 'रूप' ('सिफ़त') आहे.

उपरोक्त मंगलाचरण अध्याय पठणानंतर अधीनस्थ अध्याय म्हणून उपासक जेव्हा 'सूरए इख़लास' (ऐकेश्वरवादी अध्याय) चे पठण करतो-

''कुल् हु वल्लाहु अहद. अल्लाहुस्समद. लम्यलिद् व लम्यूलद् वलम् य कुल्लहु कुफुवन् अहद्'' अर्थात 'म्हण (हे मुहम्मद!) अल्लाह (परमेश्वर) एक आहे. तो निस्पृह आहे. तो न जनिता आहे न जन्य. तत्सम कोणीही नाही.''

तेव्हा या वेळेस या अध्यायाचे भावार्थ अशाप्रकारे ग्रहण करावे की परमपवित्र अल्लाह (ईश्वर) आपली एकेश्वरवादिता व्यक्त करताना असे निवेदन करतो, की प्रकाश जगत् परलोकी आणि प्रकट जगत् (इहलोकी) या दोन्ही जगांमध्ये माझ्याशिवाय दुसरा कोणीही नाही आणि सर्वत्र माझीच एकमेवता व अद्वितीयता प्रकट आहे. व्यक्त आणि अव्यक्तांमध्ये मी सर्वांपासून अलिप्त आहे. माझा कोणीही सहभागी नाही. कारण माझ्या निरपेक्षतेत-निस्पृहतेत आणि एकत्वतेत कोणीही सहभागी नाही.

उपासक जेव्हा नमन (रूकू) अवस्थेमध्ये जातो तेव्हा तो 'सुबहान रब्बियल् अज़ीम म्हणतो. अर्थात मी महान परमेश्वराकडे पावित्र्य निवेदन करतो. त्या वेळेस या सूक्ष्म गोष्टीची जाणीव ठेवावी की परम पवित्र अल्लाह (परमेश्वर) परमधामावर ('अर्श') विराजमान आहे आणि परमधाम (दिव्य सिंहासन – अर्श) पादपीठावर (कुर्सी) कायम आहे. म्हणून तर अल्लाहचे पवित्र नाम त्यास आदेश देतो की, हे पादपीठ, तू सर्वोच्च आणि सर्वश्रेष्ठ आहेस आणि ही श्रेष्ठता या कारणामुळे आहे की तुझ्या पाठीवर माझे परमधाम स्थित आहे आणि उपासक जेव्हा 'तस्सीअ' म्हणजेच 'समी अल्लाहुलिमन् हमिदः' अर्थात परमेश्वराने त्याचे ऐकले ज्याने त्याचे स्तवन केले. असे म्हणत अल्पोत्थानम ('क़ौमा') करील तेव्हा हे विचार करावे की, परम पवित्र अल्लाह आपल्या अद्वैताच्या मैदानात आपल्या आद्यतेच्या सार्थ अभिमानासह उभा आहे. यानंतर अधिनायक (पेश इमाम) व अनुगामी (त्याच्या पाठीमागे उपासना करणारे उपासक) (मुक़्तदी) 'तहमीद' म्हणजेच 'रब्बना लकल् हम्दु' अर्थात हे आमच्या प्रभो! समस्त स्तवन तुझ्यासाठी आहे. म्हणत उपासक जेव्हा प्रणिपात करतो, तेव्हा तो 'तस्बीह' म्हणजेच 'सुबूहान रब्बियल् आला' अर्थात मी महान परमेश्वराचे पावित्र्य निवेदन करतो, असे म्हणतो तेव्हा त्याने या गोष्टीवर पक्का विश्वास ठेवावा की तो सर्वश्रेष्ठ परमेश्वर आपले गुण प्रशंसिताच्या वदनाने पृथ्वीतलावर प्रशंसा आणि धन्यवाद ज्ञापन करून पुन्हा त्याची अशाप्रकारे प्रशंसा करतो की, 'हे धरित्री! आपल्या पदामध्ये सर्वश्रेष्ठ असलेले सत्त्व, रज व तम हे त्रिगुण, तुझे महात्म्य आणि उच्चतेसमोर तुच्छतम आहेत. आणि ही महानता तुला यासाठी प्राप्त झाली आहे की तुझ्या पाठीवर माझे परमधान (सिंहासन) व पादपीठ (कुर्सी) दोन्ही स्थिर आहेत आणि तू यांना आपल्या पाठीवर घेतले आहेस.'

जेव्हा उपासक प्रणिपात अवस्थेतून प्रथम अल्प विश्राम बैठकीत म्हणजेच लघ्वासनामध्ये ('जलसा') बसलेला असेल, तेव्हा त्याने चिंतन करावे की नाम ('ज़ात') शिष्टाचार स्थळी तो सलज्ज – मान (डोके) झुकवून मौनव्रतात बसलेला आहे आणि उपासक जेव्हा उपविश्यासन ('क़ादा') अवस्थेत येतो तेव्हा त्याने हे रहस्य समजून घ्यावे की तो एकमेव अद्वितीय आपले रूप ('सिफ़त') मुहम्मद स. वर अंतरासत्ती ('दरूद') म्हणजे कृपावृष्टी करतो आणि मुहम्मद स. चे रूप ('सिफ़त') त्याच्यावर साक्ष्य प्रमाण ('तशहुद') प्रस्तुत करताना म्हणत असते की, तुझी प्रारंभिकता आणि एकत्वता सत्य आहे आणि तू हे परमेश्वर! समस्त दोषांपासून मुक्त आहेस. आणि सर्व दोषांपासून तू पवित्र आहेस. अनंतापर्यंत तू अवनतिविहीन आहेस. तू सदासर्वदा नित्य जिवंत, चैतन्य व कायम असशील आणि तुला कधीच अधोगती नाही आणि जेव्हा उपासक शांतिनिवेदन ('सलाम', 'तस्लीम') करतो तेव्हा त्या क्षणी त्याने कल्पना करावी की तो राजसिंहासनासीन व नमनता दोन्हीकडे आपल्या प्रकटीकरणाकडे पाहतो. आणि जेव्हा तो परमधाम ('अर्श') पासून पृथ्वीतला ('फ़र्श') पर्यंत आपल्या प्रकटीकरणाव्यतिरिक्त कुणालाच पाहत नाही तेव्हा तो आपल्या नावाचे स्वतःच वैभव गुणगान, स्तोम ('तस्बीह') करतो.

नमाज़ची आकृती तिच्या प्रकृतीशी कशी निगडित आहे हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल. नमाजाच्या आकृतीत समाविष्ट विविध टप्पे हे भक्ताच्या (नमाजीच्या) भावनेशी किंवा भावविश्वाशी निगडित असे आहेत. अर्थात 'तकबीर'मध्ये (ईश्वर महात्म्य निवेदन) सुसंवाद आहे. 'रूकू'मध्ये (नमन) भय आहे, 'कौमा' (अल्पोत्थानम)मध्ये दर्शन आहे, 'सज्दा'मध्ये (प्रणिपात) मध्ये विलय आहे. 'क़ऊद'मध्ये (उपविश्यासन) प्रेम

आहे, ‘जलसा’ (लघ्वासन) मध्ये निरीक्षण आहे. जणू काही नमाज़चा प्रत्येक टप्पा हा गूढगुंजनाने भरलेला आहे.

**३) नमाज़चे रहस्य : गूढशोधन**

इस्लामी भक्तीपद्धतीसाठी अरबी भाषेतील ‘सलात’ आणि फारसी भाषेतील ‘नमाज़’ हे दोन शब्द प्रयोगात आहेत. या दोन्ही शब्दांतर्गत असलेल्या वर्णाक्षरांमध्ये गूढशोधन करता येते. ते रहस्योद्घाटन पुढीलप्रमाणे आहे –

**(१) सलात :** ‘सलात’ या अरबी शब्दामध्ये ‘स’ , ‘ल’, ‘अ’ आणि ‘त’ अशी चार वर्णाक्षरे समाविष्ट आहेत. प्रत्येक वर्णाक्षराचे गूढार्थ याप्रमाणे आहे – प्रथम अक्षर ‘स’ (ص) ‘सही’ अर्थात योग्य सत्य अर्थद्योतक आहे. दुसरे अक्षर ‘ल’ (ل) हे ‘नफ़ी’ अर्थात निषेध, अभाव हे अर्थ दर्शविते. तिसरे अक्षर ‘अ’ (ا) हे अल्लाह (परमेश्वरा) चे द्योतक आहे. आणि शेवटचे चौथे अक्षर ‘त’ (ت) हे ‘तुझे’ असा अर्थ दर्शविते. याचा संपूर्ण मथितार्थ होतो – ‘अल्लाह (परमेश्वर) शिवाय काहीच सत्य नाही.’

**(२) नमाज़ :** ‘नमाज़’ या फारसी भाषेतील शब्दामध्ये पण चारच वर्णाक्षरे समाविष्ट आहेत. ती चार अक्षरे अनुक्रमे आहेत – ‘न’, ‘म’, ‘अ’ आणि ‘ज़.’ प्रथम अक्षर ‘न’ (ن) अर्थात मानवाने स्वत:स नाहीसे करावे दुसरे अक्षर ‘म’ (م) अर्थात आपणास उपस्थित पाहावे. तिसरे अक्षर ‘अ’ (ا) अर्थात अल्लाहस आणि शेवटचे चौथे अक्षर ‘ज़’ (ز) म्हणजे जमिनीवर, पृथ्वीतलावर, कारण की ‘फ़ातिहा’ (मंगलाचरण) मुहम्मद आहेत आणि ‘इख़लास’ (एकेश्वरवाद) परमेश्वर (खुदा) आहे आणि हा परमेश्वर आपल्या मुहम्मदबरोबर व्यक्त आहे. याचा संपूर्ण मथितार्थ आहे– मानवाने पृथ्वीतलावर स्वत:स नाही असे समजून (करून) निर्वाणस्वरूपात अल्लाहस आपणासमोर उपस्थित पाहावे. खरोखर, हा भक्तीचा कळस आहे, भक्तीचा चरम उत्कर्ष आहे, उपासनेची पराकोटी आहे.

ईश्वरसामिप्याच्या उपासनेत उपासकास आपल्या अस्तित्वाचे विलय करून ईश्वराच्या अस्तित्वाकडे पाहायचे असते, परंतु स्वत:स अस्तित्वशून्य आणि ईश्वरास व्यक्त रूपात पहाणे, एक अत्यंत अशक्यप्राय असे कर्म आहे. सामिप्याच्या उपासनेचा उपासक हा नेहमी विलयाच्या समुद्रात अंतर्धान असतो. अशी उपासना पोहोचलेल्या साधकानांच साध्य होते. ती इतरांना अशक्य असते.

**४) कुराणोक्त भक्ती–रहस्य**

पवित्र कुराणामध्ये प्रार्थनोपदेश स्वरूपात भक्तीचे रहस्य निर्दिष्ट केले गेले आहे ते याप्रमाणे –

‘‘पांघरूण घेणाऱ्या! ऊठ आणि सावध कर आणि आपल्या प्रभूची महत्ता वर्णन कर आणि स्वत:ला शुद्ध राख व अशुचितेपासून दूर राहा. अधिक मोबदला मिळवण्याच्या इच्छेने, उपकार करू नकोस आणि आपल्या प्रभूसाठी धीर धर.’’ – ७४:१–७.

‘‘चादर पांघरणाऱ्या! रात्री उठून (प्रार्थना कर) मात्र थोडा वेळ अर्धी रात्र, अथवा त्याहून थोडी कमी कर. अथवा त्याहून अधिक कर. आणि हळू पण स्पष्ट आवाजात कुराणाचे पठण कर. खरोखर, मी तुझ्यावर एका प्रभावी शब्दाचा भार टाकणार आहे. नि:संदेह, रात्रीचे जागरण वासना–दमनासाठी फार तीव्र आहे आणि वाणीला सरळ करणारे आहे. नि:संशय, तुला दिवसा फार काम असते. म्हणून रात्री तुझ्या प्रभूचे नामस्मरण कर

आणि एकाग्रतेने त्याच्याकडे वळ. तो पूर्वेचा आणि पश्चिमेचा प्रभू आहे, ज्याच्या व्यतिरिक्त कोणी भजनीय नाही. तरी त्यालाच आपला बचाव करणारा ठरव. आणि ते लोक जे काही म्हणतात ते सहन कर. आणि त्यांना गोडीने सोड.'' ७३:१-१०

''जेव्हा कुराण-पठण होईल, तेव्हा कान देऊन ऐका आणि मौन राखा. अशासाठी की, तुमच्यावर कृपा व्हावी. आपल्या प्रभूला मनात स्मरत रहा. नम्रतेने, भीतीने आणि हळू आवाजात; सकाळी, संध्याकाळी. आणि निष्काळजी होऊ नकोस. खरोखर जे तुझ्या प्रभुसानिध्य आहेत, ते त्याची भक्ती न करण्याचा उद्धटपणा करीत नाहीत. ते त्याच्या पवित्र नामाचा जप करीत असतात आणि त्याला प्रणिपात करीत असतात.'' ७:२०४-२०६.

''म्हण - अल्लाह म्हणून बाहिले वा रहमान म्हणून, कसेही बाहलो तरी सर्वच सुंदर नावे त्याची आहेत. प्रार्थना करतांना मोठा आवाज काढू नका व उगीच पुटपुटल्यासारखेही करू नका. मधला मार्ग अनुसरा.'' १७:११०

''तू हे जाण की ईश्वराव्यतिरिक्त कुणीही भजनीय नाही आणि आपल्या दोषांसाठी त्याची क्षमा माग; आणि श्रद्धावंत आणि श्रद्धावती यांच्यासाठीही (माग). ईश्वर तुमच्या धावपळीचे स्थान आणि अंतिम विश्राम-धाम जाणतो.'' - ४७:१९.

''श्रद्धावंतांनो! सामुदायिक प्रार्थनेच्यचा दिवशी हाक येताच ईश्वरस्मरणास्तव धावा आणि क्रय-विक्रय सोडा. तुमचे यात भले आहे. जर तुम्ही हे जाणाल तर, जेव्हा प्रार्थना पूर्ण होईल, तेव्हा मग चोहोकडे जा आणि ईश्वराची संपदा शोधा आणि ईश्वराचे स्मरण करीत असा. म्हणजे तुमचे भले होईल आणि जेव्हा ते लोक काही क्रय-विक्रय अथवा करमणूक पाहतात तेव्हा विस्कळीत होऊन तिकडे धावतात आणि तुला उभाच सोडून जातात. (त्यांना) सांग- जे ईश्वराजवळ आहे ते करमणुकीपेक्षा आणि क्रय-विक्रयापेक्षा पुष्कळच चांगले आहे. आणि परमेश्वर सर्वोत्तम जीविका देणारा आहे.'' ६२:९-११ ''मनात भय व आशा ठेवून त्याचाच (परमेश्वराचा) धावा करा.'' ७:५६

''...... ईश-स्मरणाने अंत:समाधान लाभते, हे ध्यानी असू द्या.'' १३:२८

''तुला जो दिव्य ग्रंथ दिला; तो वाचत जा. आणि नियमित प्रार्थना कर. निर्लज्जतेच्या तिरस्करणीय कृत्यांपासून प्रार्थना वाचवते आणि ईश्वरस्मरण सर्वांहून थोर आहे, यात शंका नाही. तुमच्या सर्व कृती ईश्वर जाणतो.'' २९:४५. ''(पश्चातापदग्ध होऊन) त्याच्याकडे या (ईश्वराकडे आपले ध्यान एकाग्र करा) आणि त्याचे भय बाळगा. त्याची नित्य प्रार्थना करा. (नमाज़ पढा) व त्यांच्यापैकी होऊ नका जे (ईश्वराच्या बरोबरीने) इतर उपास्यांना सहभागी कल्पितात.'' ३०:३१.

**५) नमाज़च्या घटकांचे गूढशोधन**

नमाज़मध्ये (भक्ती-उपासनामध्ये) शरीराप्रमाणे मनसुद्धा कार्यमग्न असते. मानवी शरीर हे ईश्वरभक्तीचे महान साधन असल्यामुळे ते चांगले व स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक असते. म्हणून उपासनेसाठी तत्पूर्वीचे 'वज़ू' म्हणजेच आचमन हे अनिवार्य ठरवले गेले आहे. काया-चित्त शुद्धीशिवाय निर्मल भक्ती संपन्न होत नसते. आचमनाने शरीर शुद्ध होते तर पश्चात्तापाने चित्त म्हणजेच मन शुद्ध होते. त्याचे महत्त्व पवित्र कुराण असे स्पष्ट करते - ''निश्चितच अल्लाह त्यांना पसंत करतो जे त्याच्याकडे पश्चात्तापासह वळतात, आणि जे

स्वत:ला स्वच्छ व शुद्ध ठेवतात.'' २:२२२

नमाज़ (उपासना) मुस्लिमांसाठी पवित्र आचरण आहे; तर श्रद्धावंतांसाठी ते नेत्रसुख आहे. शारीरिक बाह्य स्वच्छता आंतरिक मनाला शुचिता प्रदान करून पावित्र्य निर्माण करण्यास हातभार लावत असते. म्हणून नमाज़साठी तयार होण्याअगोदर 'वज़ू' म्हणजेच आचमन आवश्यक ठरवले गेले आहे. ईश्वरेतर विचारांच्या मलिनतेपासून मनाच्या आरशास स्वच्छ ठेवणे हा उपासनेचा हेतू असतो. शिवाय अंत:करणाचे चक्षू उपासनेमुळेच उघडतात.

नमाज़मध्ये समस्त शारीरिक व मानसिक अवयव कार्यरत असतात. ते जागरूक व सचेत होऊन आपापली कर्तव्ये पार पाडीत असतात. शरीर नमन व प्राणिपातामध्ये निमग्न असते, तर अंत:करण तल्लीनतेत विलीन होते. जिव्हा ईश्वरनामस्मरणामध्ये मग्न असते. तर्जनी एकेश्वरवादी निष्ठेकडे निर्देश करीत असते. पंचज्ञानेंद्रिये ध्यानाच्या उपासनेत मग्न असतात. मन नीतिच्या उपासनेत असते. आत्मा ब्रह्मज्ञानाच्या उपासनेत व्यस्त असतो. मस्तक (डोके) दर्शनाच्या उपासनेत तत्पर असते. सारांश, मनाचा एक-एक कप्पा आपापल्या क्षमतेनुसार उपासना घडवीत असतो आणि हे सर्व इस्लामी नमाज़चे घटक आहेत. नमाज़ वास्तविक पाहता मानसिक स्नान आहे, जे दिवसातून पाच वेळा संपन्न होते. तर मग या उपर मानसिक कलुषता कशी बरे शिल्लक राहू शकेल? म्हणून तर सांगितले गेले आहे- एक नमाज़ दुसऱ्या नमाज़च्या दरम्यान घडणाऱ्या अपराधाचे निराकरण करते.

मानवाचे मन हे परमेश्वराचे निवासस्थान आहे. त्याच्या निवासस्थानास स्वच्छ व पवित्र ठेवणे हे भक्ताचे आद्य कर्तव्य आहे. जसे शरीराला पाणी स्नान घालते, तसेच मनाला स्नान घालते ते तीर्थ. पश्चात्तापाच्या तीर्थाने मानवी मन निर्मळ व आरशासारखे स्वच्छ व चकचकीत बनते. याच कारणास्तव प्रत्येक नमाज़ सुरू करण्याअगोदर भक्ताने (नमाज़ीने) शुचितेची दोन 'रकात' (साधनांगचक्रे) म्हणजेच स्कंध 'वज़ू दोगानाच्या' स्वरूपात संपन्न करणे आवश्यक असते. त्यामुळे भक्तीसाठी तत्पर असलेले भक्ताचे मन उजळून निघते आणि भक्तीमध्ये गोडी निर्माण होते. परमेश्वर म्हणतो - ''मी कोठेच सामावत नाही. मात्र श्रद्धावंताच्या (भक्ताच्या) मनात.''

नमाज़मध्ये (भक्ती) उपासकाची (नमाज़ी) बाह्य साधनांगे वगळता त्याचे समस्त अंतरंग हे सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडेच ध्यानस्थ ठेवले पाहिजे आणि सर्वांग सर्वस्वपणे परमेश्वराच्या भक्तीत एकाग्रचित्ताने तल्लीन राहिले पाहिजे आणि त्याच्याच गुणगौरवामध्ये व्यस्त असले पाहिजे. आणि याचसाठी तर नमाज़च्या रांगेत उभे राहिल्या राहिल्या तो सर्वप्रथम प्रतिज्ञास्वरूप असा दृढ संकल्प (निय्यत) करतो की - ''मी सदैव परमेश्वरचरणी लीन होऊन, माझे ध्यान त्याच्याकडे वळवलेले आहे. ज्याने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली आहे, आणि मी, जे लोक इतरांना (ईश्वर म्हणून) परमेश्वराचे सहभागी ठरवतात, त्या (बहुदेववादी) लोकांपैकी नाही.'' ६:७९. कारण ''त्याची (विधात्याची) आज्ञा तर अशी आहे की प्रत्येक प्रार्थनास्थळी योग्य दिशेला आपले ध्यान केंद्रित करा आणि धर्मात प्रामाणिक होऊन उपासनेमध्ये त्याच्याकडेच तुमचे ध्यान केंद्रित करून त्याचा धावा करा.'' ७:२९

नमाज़ एक वैभवपूर्ण उपासना आहे. म्हणून आचमनाशिवाय प्रणिपात निषिद्ध मानले गेले आहे. इस्लामध्ये अंतरात्म्यावर फार अधिक भर देण्यात आला आहे. आंतरिक शुचिता सद्धर्माचे वास्तविक तत्त्व गणले गेले

आहे. मनुष्यास आवश्यक आहे की त्याने प्रत्येक क्षण नित्य लीनता व नम्रतेसह प्रभुनामस्मरणामध्ये राहावे आणि सदैव ईश्वराचे आज्ञापालन करावे. सर्वश्रेष्ठ परमेश्वर आदेश देतो की, माझा दास (भक्त) किती का अपराधी असेना, मी त्याचे सगळे अपराध – पाप क्षमा करीन, मात्र 'शिर्क' अर्थात सहभागित्वाचा अपराध कदापि क्षमापित होणार नाही. नमाज़मुळे ईश्वरी सान्निध्य निर्माण होते. याचा कुराणोक्त पुरावा असा आहे – ''तू बिनधोक (परमेश्वरापुढे) साष्टांग नमस्कार घाल. (म्हणजे नमाज़ पढ) व त्याचे सान्निध्य प्राप्त कर.'' ९६:१९ तिच्यामुळे ईशकृपा अवतरित होते. उपजीविका बहुलतेचे ते साधन बनते. ऐहिक आणि पारमार्थिक प्रगती साध्य होते.

सर्वप्रकारच्या शंका–कुशंकांना लाथाडून, सत् मनोनिश्चयाने, प्रसन्नचित्ताने व मन:पूर्वक दत्तचित्त राहून नमाज़ (भक्ती) संपन्न केली पाहिजे म्हणजे नमाज़ी–भक्ताची अशी दृढ धारणा होईल की परमेश्वर साक्षात्–प्रत्यक्ष माझ्यासमोर आहे आणि मी त्याच्यासमोर आहे. आणि तो मला पाहत आहे. यालाच भक्तीची परमोच्च अवस्था म्हणता येईल. याच संदर्भात प्रेषितवचन आहे– परमेश्वराची उपासना अशारीतीने करा की जणू तुम्ही त्यास प्रत्यक्ष पाहत आहात. जर तुम्ही पाहू शकत नसाल तर एवढे मात्र खात्रीपूर्वक लक्षात ठेवा की, तो तुम्हाला नक्की पाहत आहे. याला 'एहसान' असे म्हणतात. आपण याला भक्तीचा उत्कर्ष म्हणू या. हा साक्षात भक्तीचा कळस आहे.

भक्त मनातल्या मनात ईशस्तवन पुढील शब्दात व्यक्त करतो– ''हे अल्लाह (परात्पर परब्रह्म)! तुझे स्वत्व निर्मळ व पवित्र आहे. तू प्रत्येक प्रकारच्या प्रशंसेस पात्र आहेस. तुझे नाव बरकतीचे आहे. तुझे वैभव उच्च आहे आणि तुझ्याशिवाय अन्य कोणी उपास्य नाही.''

नमाज़मध्ये (क) चार कर्मश्रेणी (ख) चार अवस्था , (ग) सहा जप आणि (घ) पाच अनुबंधसूत्रे यांचा समावेश होतो. नमाज़मध्ये पुढील **चार कर्मश्रेणी** समाविष्ट असतात.

१) फ़र्ज़ ([ब्राह्मी] नित्यकर्म), २) सुन्नत ([प्रेषित] संविधान कर्म), ३) वाजिब (नैमित्तिक कर्म) आणि ४) नफ़िल किंवा नवाफ़िल (अतिरिक्त कर्म) या कर्मश्रेणी पदानुक्रमानुसार आहेत. ही कर्मश्रेणींची उतरंड आहे.

नमाज़मध्ये नमाज़ी (भक्त) हा दैहिक आणि मानसिक अशा दोन प्रकारच्या कर्मांमध्ये मग्न असतो. म्हणून भक्ताची दोन प्रकारची कर्मे असतात. १) देह कर्म आणि २) मानस कर्म. देह कर्मामध्ये **चार** प्रकारच्या **अवस्थांचा** समावेश असतो. याला **'अवस्था चतुष्टय'** असे म्हणता येईल. त्या चार अवस्था अशा आहेत–

१) क़याम (स्थितप्रज्ञावस्था), २) क़अूद (उपविश्यासन), ३) रूकू (नमन किंवा स्कंध) आणि ४) सज्दा (प्रणिपात). उपासनेतील या सर्व क्रिया दैहिक आहेत.

मानस कर्मामध्ये एकूण **सहा जप** असतात. त्यांना **षट् जाप** असे म्हणता येईल. ते याप्रमाणे आहेत –

१) क़िरअत (पवित्र कुराण श्लोक पाठ), २) तस्बीह (स्तोम वा महिमागान), ३) हम्द (ईशस्तवन), ४) अस्तग़फ़ार (क्षमायाचना), ५) दुआ (कृपायाचना) व ६) दरूद (अंतरासत्ती) अशाप्रकारे नमाज़मध्ये भक्ताचे देह आणि मन हे दोन्ही कार्यरत असतात.

नमाज़चा आणखी एक विशेष असा आहे की, त्यामध्ये परमेश्वर आणि भक्त या दोघांमध्ये अनुबंध असतो. हे अनुबंध एकूण पाच आहेत. याला नमाज़मध्ये निहित परमात्मा आणि जीवात्मा (भक्त) या दोघांमधील **'पंच अनुबंध सूत्र'** असेही म्हणता येईल. हे 'पंच अनुबंध सूत्र' असे आहे –

१) ईश गौरव, २) ईशस्तवन, ३) भक्ताचे सर्वस्व समर्पण, ४) भक्त व परमेश्वर या दोघांमध्ये परस्पर दृढअनुबंध (हा अनुबंध परमेश्वर–भक्त यामधील संवाद स्वरूप असतो. हा संवाद 'मंगलाचरण' – सूर ए फ़ातिहामध्ये समाविष्ट आहे) आणि ५) भक्ताची (दासाची) इच्छा परिपूर्ती किंवा मनोकामना परिपूर्ती.

अल्लाहस दुर्गुणांनी पुरेपूर भरलेले भक्ताचे प्रदूषित अंत:करण कदापि ग्राह्य नसते. त्याच कारणावरून प्रेषित मुहम्मद[स.] म्हणाले आहेत – स्वच्छता व शुचितेशिवाय नमाज़ स्वीकृत होत नाही आणि अंत:करणपूर्वकतेशिवाय नमाज़च नाही. अल्लाह तुमचे बहिरंग पाहत नाही. तो तुमच्या अंतरंगास न्याहाळीत असतो. जोपर्यंत भक्ताचे अंत:करण शुद्ध असत नाही तोपर्यंत ते मुळीच ग्राह्य नसते. यामुळेच बेसावध अशा भक्तांची नमाज़ मुळीच ग्राह्य होत नाही. भक्त–उपासक हा उपासनेच्या वेळी परमेश्वराशी साक्षात्कार करीत असतो आणि तो त्याच्या प्रेमात, प्रकाशात आणि ऐश्वर्यात स्वत:स विसरून जातो. त्या वेळी तो जणू परमेश्वराशी प्रत्यक्ष संभाषणामध्ये व्यस्त असतो. त्याचे प्रेम–निवेदन ही आपली भाषा स्वत:च आविष्कृत करते. त्याची भाषा जिव्हा–निसृत नसते, तर ती आत्मा–निसृत असते. अशाप्रकारे ईश्वरभक्तीचा ध्यास हा अंत:करणातून असावा. उपासकाची उपास्यामध्ये परम तल्लीनता असावी. आपल्या उत्कट भक्तीसाठी त्याने परमेश्वराकडे असे मागणे उपस्थित करावे – ''हे प्रभो! माझे मन तुझ्या गुण–स्मरणात नित्य मग्न असून दे. माझी वाणी तुझ्या कीर्तनात व्यस्त असू दे. आणि माझे शरीर हे तुझ्या सेवेत तत्पर असू दे.'' भक्ताचा सर्वस्व समर्पण भाव पवित्र कुराणात असा प्रतिबिंबित झालेला आहे – ''सांग, माझी (अक्षय) भक्ती (नमाज़) आणि माझा त्याग व माझे जीवन आणि माझे मरण, सर्व काही विश्वांचा स्वामी अल्लाहसाठीच आहे.'' ६:१६२

सुयोग्य भक्तीचे लक्षण पवित्र कुराणामध्ये असे प्रतिबिंबित झाले आहे – ''अतिशय लीनतेने आणि गुप्तपणे (आत्म्याच्या आवाजाने) आपल्या विधात्यासमोर विनवणी करा आणि मनात भय व आशा ठेवून त्याच्याच धावा करा.'' ७:५५–५६. उत्कट साधक प्रेषित इब्राहीम हे प्रत्येक नमाज़ानंतर अशी कृपायाचना करीत – ''हे प्रभो! मला नमाज़ संपन्न करण्यासाठी दृढचित्त ठेव.''

भक्तीच्या उत्कर्षाचे टप्पे लक्षात घेऊन प्रसिद्ध सूफ़ी सय्यद अशरफ़ जहाँगीर म्हणतात की– ''शरीअतची (कर्मकांड) नमाज़ कर्मेंद्रियांशी संबंधित असते. तरीक़तची (भक्ती–कांड) नमाज़ चिंतनाशी निगडित असते, हक़ीक़तची (ज्ञानकांड) नमाज़ ही रहस्यांची उकल व आत्म्याचे दर्शन करून परमेश्वराशी तल्लीन होणे आहे, तर मारिफ़तची (सिद्धावस्था) नमाज़मध्ये (भक्तीमध्ये) साक्षात प्रभुदर्शन घडते. याच आशयाचे निदर्शक असे उर्दू भाषेतील काव्यचरण याप्रमाणे आहे –

*है शरीअत में इबादत तन के साथ*
*है तरीक़त में इबादत मन के साथ ।।*
*दर हक़ीक़त है इबादत जान से*
*मारिफ़त में दीद है सुबहान से ।।*

सदरहू संकल्पना सविस्तरपणे कोष्टकरूपात पुढीलप्रमाणे मांडता येईल –

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | शरीअत | अन्नभुवन | नरलोक | नासूत | प्रभाव | शरीर |
| २. | तरीक़त | प्राणभुवन | देवलोक | मलकूत | कर्म | मन |
| ३. | हक़ीक़त | मनोभुवन | ऐश्वर्यलोक | जबरूत | रूप | प्राण (आत्मा) |
| ४. | मारिफ़त | विज्ञानभुवन | माधुर्यलोक | लाहूत | नाम | प्रभु–दर्शन |

नमाज़मध्ये भक्ताने कोणत्या टप्प्यावर आपली दृष्टी कोठे खिळवावी याचे निर्देश आहेत. ते असे – 'क़याम' म्हणजे स्थितप्रज्ञावस्थेत भक्ताने प्रणिपात स्थळाकडे पाहावे; 'रूकू' म्हणजे नमन किंवा स्कंधामध्ये आपल्या पायांकडे पाहावे; 'सजदा' म्हणजे प्रणिपातअवस्थेत त्याने नाकाकडे पाहावे; 'जलसा' म्हणजे लघ्वासनामध्ये त्याने हातांकडे पाहावे. आणि 'क़ादा' म्हणजे उपविश्यासन अवस्थेमध्ये त्याने आपल्या वक्षस्थळाकडे पाहावे.

सारांश, मनाचे पावित्र्य, आत्म्याची प्रगल्भता, चारित्र्यसंवर्धन व आचारशुचिता ज्यांवर अवलंबून असते त्या सर्व श्रद्धांना नमाज़ ताजेपणाची टवटवी आणीत असते. नमाज़ इस्लामचा कणा व धर्माचा आधारस्तंभ आहे, मोक्षप्राप्तीची अट आहे, श्रद्धेची रक्षिका आहे आणि पावित्र्याचा पाया आहे. नमाज़ एक असे महान कर्म आहे की ज्यामध्ये शरीर, बुद्धी आणि मन यांचा समावेश असतो आणि या तीन्हीमध्ये तत्त्वज्ञान आणि विवेक यांचे सुंदर सामंजस्य विद्यमान आहे. शरीराच्या हिश्श्यास क़याम (स्थितप्रज्ञावस्था), रूकू (नमन), सज्दा (प्रणिपात) आणि क़अूद (उपविश्यासन) या अवस्था चतुष्टय आले आहेत. यांच्या समष्टीस 'देहकर्म' असे म्हणता येईल. जिव्हेच्या हिश्श्यास क़िरअत किंवा तिलावत (कुरआन श्लोकपाठ), तस्बीह (ईशमहिमागान), हम्द (ईशस्तवन), अस्तग़्फ़ार (क्षमायाचना), दुआ (कृपायाचना) आणि दरूद (अंतरासत्ती किंवा स्वस्तिक) हे षट्जाप आले आहेत. या सर्वांसाठी 'मानसकर्म' असे समष्टीगत नाव देता येईल. बुद्धीच्या हिश्श्यास चिंतन आले असून, मनाच्या हिश्श्यामध्ये ईश्वरप्राप्ती, तन्मयता आणि भक्तिभावाने मन द्रवित होणे, या गोष्टी आल्या आहेत. वरील सर्व गोष्टींचा अंगीकार करून नमाज़ीने आपली नमाज़ अदा केली तर त्यात उत्कट भक्तीचा आनंद तर मिळेलच, पण त्याचबरोबर त्याला मुक्तीचे फळ लाभेल.

### ६) सृष्टिकृत प्रार्थना

सृष्टीचे वेगवेगळे घटकपण आपापल्या प्रार्थनेमध्ये मग्न असतात. जसे– मेघ गर्जना जप करते, पक्षी प्रभु–स्तवन करतात, सावल्या प्रणिपात करतात, सर्व सृष्टी आणि काही माणसे प्रणिपात करतात. सृष्टीचा जप अगम्य असतो. या तथ्याचे कुराणोक्त दाखले पुढीलप्रमाणे आहेत –

''मेघगर्जना त्याची (परमेश्वर) स्तुती करीत, त्याच्या पावित्र्याचे गुणगान करीत असतात आणि देवदूतदेखील भीतियुक्त आदरासहित (त्याचे गुणगान करीत असतात.)'' १३:१३

''तुम्ही हे (चिंतनपूर्वक) पाहत नाही का? की, सर्व (प्राणिमात्र) जे आकाशात आहेत किंवा पृथ्वीवर आहेत, अल्लाहच्या असीम महानतेचे गान गात असतात. तसेच आपले पंख पसरवून उडणारे पक्षीदेखील. त्यापैकी प्रत्येकाला आपापल्या प्रार्थनेची व स्तुतिगान करण्याची पद्धत माहीत आहे. आणि अल्लाहबद्दल ते जे काही करतात, याचे पूर्ण ज्ञान आहे.'' २४:४१

''सात आकाशे, भूमी आणि त्यांतील सर्व त्याचा जप करतात आणि त्याच्या प्रार्थनेसह जप करीत नाही अशी कोणतीही वस्तू नाही. परंतु, त्यांचा जप तुम्हाला कळत नाही. खरोखर तो सहिष्णू व अत्यंत क्षमाशील आहे.'' १७:४४

''आकाशात व जमिनीवर असलेले सर्व स्वेच्छेने किंवा अनिच्छेने अल्लाहपुढेच नतमस्तक होत असतात. तसेच त्यांच्या सावल्यादेखील सकाळ-संध्याकाळ, ईश्वराला प्रणिपात करतात.'' १३:१५

''तुम्हाला या गोष्टीची जाणीव नाही का की, जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीवर आहे, ते सर्व अल्लाहसमोर नतमस्तक असतात. (म्हणजे अल्लाहच्या आज्ञेत अढळपणे बांधलेले) तसेच सूर्य, चंद्र आणि तारे व पर्वत, वृक्ष, पशू आणि लोकांपैकी अनेक (हे सर्व) त्याला प्रणिपात करीत असतात, पण (लोकांपैकी) बरेच असेही आहेत जे शिक्षेस पात्र ठरलेले आहेत.'' २२:१८

''(सत्य नाकारणाऱ्या लोकांनी) या गोष्टीचे कधी निरीक्षण केले नाही का की, अल्लाहने जे काही निर्माण केलेले आहे, त्यांच्या छाया उजवीकडे किंवा डावीकडे वाकून (कशाप्रकारे) अल्लाहसमोर पूर्ण नम्र भावाने नतमस्तक होत आहेत, कारण आकाशातील प्रत्येक वस्तू किंवा पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्र अल्लाहसमोरच नतमस्तक होत असतात. तसेच देवदूतदेखील (त्याच्यासमोर) नतमस्तक आहेत आणि ते (कधीही) अहंकारपूर्वक वर्तन करीत नाहीत. ते आपल्यावर (नजर ठेवून) असलेल्या, आपल्या विधात्याचे (नेहमी) भय बाळगून असतात आणि केवळ तेच करतात ज्याची त्यांना आज्ञा दिली जाते.'' १६:४८-५०

देवदूतांसारखेच वर्तन माणसाकडूनही अल्लाहला अपेक्षित आहे, पण फरक एवढाच आहे की, ते योग्य तेच वर्तन करण्यास बांधील आहेत; पण माणसाची परीक्षा होत असल्याकारणाने माणसासमोर दोन पर्याय उपलब्ध आहेत आणि माणसाचे भले यातच आहे की, त्यानेही योग्य तो पर्याय निवडावा.

### ७) समस्त सृष्टीची प्रार्थना 'नमाज़'मध्ये एकवटलेली आहे

### १) 'नमाज़'मध्ये (इस्लामी उपासना) साधनेचे पैलू

नमाज़मध्ये दोनच मूलभूत गोष्टी आहेत. एक म्हणजे जिव्हेशी संबंधित असलेले जप म्हणजेच तिची प्रकृती आणि दुसरे शारीरिक अवयवांशी संबंधित असलेले तिचे स्वरूप म्हणजेच तिची आकृती होय. ईशस्तवन, मंगलाचरण पाठ, त्याचसोबत पवित्र कुराणातील इतर अध्यायांचे वा श्लोकांचे पठण, हे सर्व जपामध्ये समाविष्ट होतात. यानंतर ईश्वराच्या वैभव गुणगानापासून (स्तोम) ते भक्तिरसामृतात डुंबून जाऊन ईश्वर एकच एक असल्याबद्दलची ग्वाही देण्यापर्यंत भक्ताकडून (नमाज़ी) आपले दास्यत्व व सर्वसमर्पण भाव आणि ईश्वराची सर्वश्रेष्ठता व त्याचे अपार महात्म्य या व्यतिरिक्त अन्य कुठल्याच गोष्टीचे प्रकटन नसते. ही एक प्रकारची

मानसिक आराधना किंवा साधनाच होय. आकृतीच्या दृष्टीने पाहता लीनतेने दोन्ही हात जोडून उभे राहणे, नंतर स्कंध किंवा नमनासाठी वाकणे आणि सर्वात शेवटी आपल्या प्रतिष्ठेचे प्रतीक असलेली नाक व हनुवटी प्रणिपात अवस्थेमध्ये आपल्या उपास्यासमोर टेकणे म्हणजे त्याच्या अत्युच्च प्रतिष्ठेसमोर आपली तुच्छता स्वीकारणे, ही सुप्रतिष्ठित साधना नव्हे तर आणखी काय आहे? अशा प्रकारे नमाज़ ही शारीरिक व मानसिक संमिश्र क्रियाकलापांचे एक अति सुंदर युग्मक आहे.

**२) नमाज़ (उपासना) – समस्त ब्रह्मांडासाठी (ब्राह्मी) नित्यकर्म**

संपूर्ण सृष्टी ही आपल्या उपासनेत मग्न आहे. कारण उपासना ही तिच्यासाठी नित्य कर्म म्हणून निश्चित करण्यात आले आहे. संपूर्ण सृष्टीच्या उपासनेचे अंश नमाज़मध्ये समाविष्ट आहेत. अल्लाहचा आदेश आहे – ''प्रत्येकास आपल्या उपासनेची व स्तवनाची (पद्धती) माहीत आहे.'' २४:४१ ''सप्त आकाश व भूमी आणि त्यांमध्ये जे काही आहे ते सर्व त्याच्या वैभवाचे गुणगान करतात; आणि अशी कोणतीही वस्तू नाही जी त्याच्या स्तुतीसह त्याच्या वैभवाचे गुणगान करीत नसेल; परंतु त्यांचे गुणगान तुम्हाला समजत नाही.'' १७ :४४

स्पष्ट आहे की या समष्टीमध्ये खनिज, प्रस्तर, वनस्पती, प्राणी (पशू-पक्षी), मूलतत्त्वे आणि एकल खपिंड जसे सूर्य व चंद्र या सर्वांचा समावेश होतो. यास्तव प्रत्येकाच्या उपासनेचे स्वरूप हे त्यांच्या स्वभावगुणधर्मानुसार ठेवण्यात आले आहे की जेणेकरून त्यांची उपासना (नमाज़) त्यांच्या स्वभावानुसार स्वाभाविकपणे आपोआप घडत राहावी. जसे-

**१) वृक्ष :** वृक्षांसाठी चालणे, फिरणे, झुकणे नाही. स्थलांतरपण नाही. म्हणून वृक्षांची उपासना (नमाज़) ही स्थिर राहणे होय. त्यांचे स्वरूपच असे बनवले गेले आहे की, साक्षात ते आपल्या बुंध्यावर उभे राहून स्थितप्रज्ञावस्थेत (क़याम) आपली नमाज़ संपन्न (अदा) करीत आहेत. ते सदैव-नित्य उत्थानम अवस्थेत असतात. माणसाच्या उपासनेमध्ये बोध आणि संबोधनाची योग्यता समाविष्ट असते. मात्र वृक्षांच्या उपासनेत यांचा अभाव असतो. त्यांची निर्मितीच अशा पद्धतीने केली गेली आहे की, ते जणू काही नित्य स्थितप्रज्ञावस्थेत उत्थानममध्ये ताठ उभे राहून प्रभूच्या आज्ञेबरहुकूम त्याच्या अधिनस्थ असल्याचे प्रमाण देत आहेत.

**२) चतुष्पाद प्राणी :** पशूंची उपासना ही केवळ नमन-स्कंध (रूकू) आहे. त्यांचे नैसर्गिक स्वरूपच असे बनवले गेले आहे की ते नेहमी परमेश्वरासमोर नमन अवस्थेत वाकलेले असतात. त्यात बदल मुळीच नसतो.

**३) सरीसृप :** सरपटणारे प्राणी आणि कृमी-कीटकांची उपासना (नमाज़) प्रणिपात (सज्दा) अवस्थेची असते. जसे – सर्प, पाल, विंचू आणि कृमी-कीटक यांचे स्वाभाविक स्वरूपच मुळी प्रणिपात अवस्थेसारखे बनवले गेले आहे. साक्षात ते सर्व परमेश्वरासमोर नेहमी प्रणिपात अवस्थेत मग्न आहेत. यामध्ये नाममात्र पण परिवर्तन नसते.

**४) डोंगर-पर्वत :** यांची उपासना उपविश्यासन (क़अूद) अवस्थेत असते. जणूकाही ते नेहमी जमिनीवर आपले दोन्ही गुडघे टेकून बसलेले आहेत आणि नित्य भक्तीत तल्लीन आहेत. त्यांचे स्वरूपच असे आहे की, ते उत्थानम, नमन आणि प्रणिपात करूच शकत नाहीत, याच उपविश्यासनासह ते आपल्या आराधनेत-उपासनेत मग्न आहेत. असे वाटते की, डोंगर-पर्वत हे उपासना विविधा 'अत्तहयात'मध्ये व्यस्त आहेत.

**५) पक्षी :** स्थित्यंतर ही पक्षांची उपासना असते. ते खालून वर आणि वरून खाली आकाशात उडत राहतात. जसे, मानव नमाज़मध्ये स्थितप्रज्ञावस्थेतून उपविश्यासन आणि उपविश्यासन अवस्थेतून स्थितप्रज्ञावस्थेत स्थित्यंतरित होत असतो. जेव्हा पक्षी वरून खाली उडत येतात अथवा जमिनीवर स्थिरावतात (उभे राहतात) तेव्हा ते नमन अवस्थेत असतात; आणि जेव्हा ते खालून वर उडतात तेव्हा ते साक्षात नमन पासून स्थितप्रज्ञावस्थेकडे प्रयाण करतात. आणि आपले पंख पसरून जमिनीवर जेव्हा ओणवे पडतात तेव्हा ते साक्षात प्रणिपात अवस्थेत जातात. म्हणून त्यांची उपासना ही केवळ स्थित्यंतर अवस्था असते. ते कधीच ना संपूर्णपणे नमन अवस्थेत जातात ना प्राणिपात अवस्थेत, ना उपविश्यासन अवस्थेत असतात, परंतु उडताना ते नेहमी वर खाली जात असतात, म्हणून एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेकडे प्रयाण करीत राहणे हीच त्यांची स्वाभाविक उपासना आहे.

**६) ग्रह–आकाश :** ग्रह आणि आकाशाकडे पाहा. त्यांची नमाज़ (उपासना) म्हणजे परिभ्रमण व परिक्रमा आहे. ते एका बिंदूपासून सुरू होऊन भ्रमण करीत पुन्हा त्याच बिंदूवर येऊन ठेपतात व नंतर तीच क्रिया पुन्हा सुरू करतात.

**७) पृथ्वी :** भूतल अर्थात पृथ्वीची नमाज़ ही निश्चलता असून, ही दररोज दिसून येणारी घटना आहे. आणि ही तंतोतंत एखाद्या नवशिक्या भक्ता(नमाज़ी)सारखी नमाज़ आहे, कारण की नमाज़च्या संपूर्ण गतीचा प्रारंभच मुळी स्थैर्यापासून, निश्चलतेपासून सुरू होतो. प्रथम मनुष्य स्थिर असतो, नंतर तो गतिमान होतो. (आपली हालचाल सुरू करतो) मग पृथ्वीसुद्धा साक्षात निश्चल असून ती आपल्या केंद्रावर स्थिर आहे. ही तुच्छता व नम्रतेची परिसीमा आहे. ही बाब नमाज़मध्ये संपूर्णपणे आवश्यक असते. ईश्वरी आदेश आहे – ''अढळ सहनशीलता आणि उपासना (नमाज़) यांद्वारे (अल्लाहकडे) साहाय्याची याचना करा. खरोखर, ही विनयशील लोकांव्यतिरिक्त इतर लोकांसाठी कठीण गोष्ट आहे.'' २: ४५ हीच नम्रता आणि तुच्छतेच्या संतोषाबाबत दुसरीकडे पवित्र कुराणमध्ये पृथ्वीला उद्देशून म्हटले आहे– ''तोच परमेश्वर आहे ज्याने तुमच्यासाठी पृथ्वीला (तुच्छतेच्या दृष्टीने) नम्र बनवले आहे.''

**८) व ९) स्वर्ग (जन्नत) व नरक (दोज़ख़) :** स्वर्ग व नरक या दोघांची नमाज़ याचना अशी आहे– हे परमेश्वरा, आमच्या निवासियांसह आम्हाला भरून टाक. अर्थात प्रेषितवचनामध्ये आहे की स्वर्ग आणि नरक या दोघांनी परमेश्वरापाशी असे मागणे मागितले की, ''प्रलयदिनी आम्हाला भरून टाक.'' आणि दोघांना आश्वासन देण्यात आले आहे की, त्यांना निश्चितपणे भरून टाकण्यात येईल. नरकास धर्मवंचित, पापी लोकांनी भरण्यात येईल. उरलेली जागा दगड व पर्वतांनी भरण्यात येईल. इतके करूनसुद्धा काही जागा शिल्लक राहील आणि नरक म्हणेल की, ''तरी पण अजूनसुद्धा जागा शिल्लक आहे.'' तिचे हेच पालुपद सुरू राहील. शेवटी परमेश्वर रागावून तिला लाथाडेल. मग मात्र ती ''पुरे झाले, पुरे झाले'' असे ओरडू लागेल. इकडे मात्र स्वर्ग इहलोकांतील श्रद्धावंत (स्त्री–पुरुष) उपासकांनी भरून जाईल. सारांश, या दोघांची नमाज़ याचना आणि आळवणी (दुआ) आहे. त्या दिवशी आम्ही नरकास विचारू, ''तू भरून गेला आहेस का? तो उत्तर देईल 'नाही.' आणखी कोणी आहेत का?'' ५०:३०.

**१०) देवदूत :** देवदूतांची नमाज़ पंक्तिबद्ध (रांगेत असणे) असणे ही आहे. देवदूत रांगेत जमा होऊन ईशनामस्मरणामध्ये मग्न असतात. पंक्तिबद्ध असण्याबरोबरच प्रस्तर, खनिज, वनस्पती व पशुपक्षांचे नमाज़चे जे स्वरूप निश्चित करण्यात आले आहे, ते सर्वचे सर्व देवदूतांच्या नमाज़ामध्ये एकवटलेले आहेत. ते सर्व आपल्या स्वभावधर्मानुसार नमाज़मध्ये व्यस्त असतात. काही देवदूतांची नमाज़ ही फक्त नमन (रूकू) असते, तर काहींची केवळ प्रणिपात (सज्दा) असते. असंख्य देवदूत हे उपविश्यासनामध्ये (क़अूद) असतात. कित्येक आकाश व पृथ्वीच्या दरम्यान रात्रंदिवस पक्ष्यांप्रामाणे खाली-वर येत-जात असतात. असंख्य शांतचित्ताने स्थिर अवस्थेत असतात. सारांश, यांच्या रांगेमध्ये असण्यामध्ये- पंक्तिबद्धतेत उपासनेची विविध अंगे समाविष्ट असतात.

नमाज़ची उपरोक्त सर्व विविध रूपे जी प्रस्तर, खनिज, वनस्पती, पशु-पक्षी आणि देवदूत तसेच जगातील विविध मानव समुदाया (समाजा) मध्ये वाटली गेली आहेत. जसे - एखाद्या मानवसमुदायाच्या नमाज़मध्ये केवळ स्थितप्रज्ञावस्था (क़याम) असते, तर दुसऱ्या समुदायामध्ये नमाज़ दंडवतचे रूप धारण करते; तर तिसऱ्यामध्ये फक्त नमन (रूकू) स्वरूपात नमाज़ असते. तसेच एखाद्या मानव समुदायाच्या नमाज़मध्ये फक्त **साष्टांग लोटांगण असते.** जणूकाही फक्त प्रणिपात (सज्दा) करणे असते; तर काहींची नमाज़ ही फक्त उपविश्यासन (क़अूद) असते. समाजाच्या प्रत्येक स्वरूपास अनुरूप असे नामस्मरण व गुणगान (तम्बीह) निश्चित करण्यात आले आहे. भाषा भिन्नतेमुळे एखाद्या परकीय व्यक्तीचे प्रार्थनेचे - साधनेचे- भक्तीचे बोल (मंत्र) समजणे अशक्य असते. तसेच या गोष्टीची नोंद घेत पवित्र कुराण घोषणा करते - ''सप्त आकाशात पृथ्वी आणि यात जे (देवदूत व मनुष्ये) होत ते सर्व त्याची पवित्रता गातात, आणि जितक्या म्हणून वस्तू आहेत, त्या सर्व त्याच्या स्तुतिबरोबरच त्याची पवित्रता वर्णित राहतात. परंतु तुम्हा लोकांस त्यांचे पावित्र्यवर्णन समजत नाही.'' १७:४४

या महाश्लोकामध्ये प्रत्येक कण-कण (अणू-रेणू) जपात मग्न असल्याचे संकेतित केले गेले आहे. प्रेषित वचन आहे की पाणी जोपर्यंत वाहत असते, तोपर्यंत ते जप करीत असते. वृक्ष जोपर्यंत डवरलेला असतो, तोपर्यंत तो जप करीत असतो; वस्त्र जोपर्यंत स्वच्छ असते तोपर्यंत ते जप करीत असते, अन्न (भोजन) जोपर्यंत ताजे असते तोपर्यंत ते जप करीत असते. दगड-गोटे-खडे, पाला-पाचोळा सर्वच्या सर्व प्रभुनामस्मरणात त्याचे गुणगान करीत असतात.

नमाज़ची आकृती म्हणजे उपासनेमधील भक्ताचे शारीरिक विक्षेप. मानसिक जप-कर्म ही तिची प्रकृती आहे. सारांश, नमाज़ामध्येसुद्धा एक आकृती आहे आणि एक प्रकृती पण. तिची आकृती म्हणजे भक्ताचे तदंतर्गत संपन्न होणारे विविध शारीरिक क्रियाकलाप, आणि तिची प्रकृती आहे ईश्वरनामस्मरण. पवित्र कुराणने याच दोन गोष्टी प्रत्येक निर्मित वस्तूशी निगडित ठेवल्या आहेत. ''प्रत्येकास आपल्या उपासनेची व स्तवनाची पद्धती माहीत आहे.'' २४:४१ नमाज़ची आकृती व प्रकृती प्रत्येक निर्मित वस्तूसाठी अनिवार्य ठरवण्यात आल्या आहेत. अशा प्रकारे प्रत्येकास ईश्वराचे उपासक (नमाज़ी) बनवले आहे. मानव हा ईश्वराच्या निर्मितीमध्ये सर्वोच्च स्थानावर आहे. तो प्राणिमात्राचा (सृष्टीचा) मुकुटमणी आहे. अशा परिस्थितीत त्याची नमाज़पण तितकीच उच्च कोटीची असणे स्वाभाविक आहे. ती त्याच्या प्रतिष्ठेस साजेशी असावी, अशी रास्त

अपेक्षा बाळगण्यात काहीच गैर नाही. म्हणून नमाज़मध्ये (इस्लामी उपासनेत) ईश्वराने समस्त ब्रह्मांडाच्या उपासनेचे सार-तत्त्व-समाविष्ट केले आहे.

### ३) इस्लामी नमाज़मध्ये सर्व विश्वाची नमाज़ समाविष्ट आहे

नमाज़च्या सर्वंकष स्वरूप-विधानामध्ये वृक्षांसारखी स्थितप्रज्ञावस्था (क़याम) आहे. नमन (रूकू) चतुष्पाद पशूंसारखे आहे, पंक्तिबद्धता देवदूतांसारखी आहे आणि परिभ्रमण व परिक्रमा आकाश आणि ग्रहांसारखी आहे. म्हणजेच साधनांगविक्षेपाचे-नमनाचे (रूकू) आवर्तन असते- एकापाठोपाठ दुसरे आवर्तन. थोडक्यात, नमाज़मध्ये समस्त सृष्टीकृत जपाचा समावेश आहे. तसेच इतर मानव समुदायांचे उपासनेचे अंशपण यात अधिग्रहित आहेत. पशू, पक्षी, मानव व देवदूत यांच्या जपांचा नामस्मरणाचा समावेश नमाज़मध्ये आहे, म्हणून नमाज़ एक प्रकारचे सर्वंकष नामस्मरण आहे. इतकेच नव्हे तर सर्वांग व सर्वकाळ समावेशक पण आहे.

मानवी शरीरावयांवर दृष्टिक्षेप टाकल्यास आपणास असे आढळून येते की, त्या सर्वांवर नमाज़ परिवेष्टित आहे. जिव्हा जपामध्ये मग्न असते, मन प्रसन्नतेत असते. मेंदू चिंतनशील होतो, हात-पाय क्रियाशील बनतात, चेहरा नतमस्तक होतो, हाताची बोटे प्रसारित तर कधी अप्रसारित असतात. सारांश, प्रत्येक अवयव आपापल्या परीने उपासनेत भाग घेत असतो.

नमाज़ने रात्रंदिवसाच्या सर्व प्रहरांना आपल्यामध्ये सामावून घेतले आहे. सकाळची आल्हाददायक वेळ चित्तप्रसन्नतेची वेळ असते. तिला प्रात:काळच्या ('फ़जर') नमाज़ने आत्मसात केले आहे. मध्यान्हाची (दुपारची) वेळ शिथिलतेची असते. दुपारची ('ज़ुहर') नमाज़ तिला तत्परता प्रदान करते. सायंकाळ हवेशीर फिरायची (हवाखोरीची) वेळ असते. तिच्या असावधानतेस सायंकाळची ('असर') नमाज़ नाहीशी करते. सूर्यास्ताची वेळ ('मग़रिब') संधिकालाची वेळ असते. ती कातरवेळ हूरहूर लावणारी असते. या वेळची ('मग़रिब') नमाज़ भक्तास रात्रीकडे उन्मुख करून त्याला नमवते. रात्रीची वेळ ('इशा') समापनाची वेळ असते, म्हणून या वेळची 'इशा'ची नमाज़ ही शुभ समापन करते. इतकेच नव्हे तर जीवनास घेरून असलेली नमाज़, मृत्यूला पण कवटाळलेली असते. अर्थात समाधीमध्ये (कबरीमध्ये) जर कोणती उपासना सुरू होत असेल तर ती केवळ नमाज़ होय. कर्तव्यकर्माच्या दृष्टीने जर कोणती साधना कबरीमध्ये (समाधी) संपन्न होत असेल तर ती नमाज़ होय. म्हणून मरणोत्तर जीवनास पण नमाज़ घेरून आहे.

### ४) नमाज़च्या आकृतीमध्ये तर्कसुसंगत क्रम

नमाज़मधील विक्षेप-क्रम पण किती सोज्वळ व शुद्ध की, त्यामधील तर्क-सुसंगतता अन्य प्रकारची होऊच शकत नाही. सर्वप्रथम स्थितप्रज्ञावस्था किंवा उत्थानम (क़याम) घ्या. हा अंश नमन वा स्कंधची (रूकू) प्रस्तावना आहे. मग नमन ही प्रणिपाताची (सज्दा) प्रस्तावना आहे. शेवटी प्रणिपात हे उपासनेचे वास्तविक उद्दिष्ट असते. असे वाटते की, प्रत्येक परवर्ती साधनांग सोपान हा तिच्या पूर्ववर्ती सोपानापेक्षा सेव्य-सेवक भावामध्ये अधिक उत्तम आणि अधिक यथोचित असतो. पुन्हा (शिवाय) स्थितप्रज्ञावस्था तत्त्वत: उपासना

नव्हती म्हणून तिच्यात तुच्छतेचा भाव, हीनताभाव, नम्रतेचा भाव नव्हता. म्हणून तर तिच्याकडे मंगलाचरण आणि ईशस्तवन ठेवण्यात आले की, ज्यामुळे प्रभू नामस्मरणाने सेव्य-सेवक भावांतर्गत भक्ताचे मागणे आणि रोदन निर्माण व्हावे. नमन आणि प्रणिपात ही साक्षात उपासनेची अंगे (अंश) असल्यामुळे त्यांच्यात ईश्वरी स्तोत्र किंवा गुणगान भरपूर प्रमाणात भरलेले आहे, की ज्यामुळे भक्त (नमाज़ी) स्वत:स कलंकित समजतो तर परमेश्वरास निष्कलंक. अशाप्रकारे नमाज़चे काही अंश (भाग) हे वस्तुत: आज्ञापालनात मोडत नाहीत जसे, स्थितप्रज्ञावस्था (उत्थानम) आणि उपविश्यासन; तर काही भाग हे वस्तुत: उपासनेत मोडतात, जसे नमन (रूकू) आणि प्रणिपात (सज्दा) म्हणून; तर स्थितप्रज्ञावस्थेत दास्यावस्थेतील प्रभूनामस्मरणास प्रबळ ठेवले आहे आणि नमन व प्रणिपात तत्त्वत: उपासना असल्यामुळे अल्प प्रभुनामस्मरण पर्याप्त मानले गेले आहे. कदाचित याच कारणामुळे आदरसूचक स्थितप्रज्ञावस्थेस यथोचित मानण्यात आले, कारण की ही अवस्था तत्त्वत: उपासना नाही आणि आदरसूचक नमन व प्रणिपातास यथोचित मानण्यात आले नाही; कारण की ते तत्त्वत: उपासनेत मोडतात आणि ज्या अर्थी या चरणामध्ये (सोपान), तत्त्वामध्ये सेव्य-सेवक भाव उत्तरोत्तर वाढत गेलेला आहे, त्याअर्थी सान्निध्यभाव पण उत्तरोत्तर वृद्धिंगत होत गेलेला आहे. इस्लामी नमाज़मध्ये सर्व प्रकारचे सेवक-सेव्य भाव समाविष्ट आहेत. तिचे प्रत्येक स्वरूप इतके परिपूर्ण आहे की तिचे कोणतेच अंश अस्वाभाविक मुळीच नाही.

### ८) दैनंदिन पाच वेळची नमाज़ (उपासना) अनिवार्य होण्याची कारणमीमांसा

प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या दिव्यारोहणामध्ये ('मेराज') त्यांना प्रभु-दर्शन घडले व त्यांना दररोज पन्नास (५०) वेळेस 'नमाज़' पढण्याची- उपासना (भक्ती) करण्याची आज्ञा झाली. त्या आज्ञेसह आपल्या परतीच्या प्रवासामध्ये त्यांची भेट प्रेषित मूसा यांच्याशी झाली. त्यांनी त्यांच्या परमेश्वरभेटीविषयी चौकशी केली. उत्तरादाखल प्रेषित त्यांना म्हणाले की, मला आणि माझ्या धर्मप्रजेसाठी ('उम्मत') परमेश्वराने दररोज पन्नास वेळेस 'नमाज़' पढण्याची आज्ञा केली आहे. मी ती स्वीकारून परतत आहे. तेव्हा प्रेषित मूसा त्यांना म्हणाले की, तुमची धर्मप्रजा एवढी उपासना करू शकणार नाही. परत जा आणि परमेश्वराकडून याची संख्या कमी करून घ्या. तेव्हा प्रेषित मुहम्मद[स.] परमेश्वराकडे परत गेले आणि उपासनेची संख्या कमी करण्याविषयी विनवणी केली. परमेश्वराने प्रेषिताची विनंती मान्य करून ती संख्या पन्नासवरून पंचवीस (२५) केली. त्याचा स्वीकार करून परतत असताना पुन्हा प्रेषित मूसा यांनी विचारले की उपासनेची संख्या किती झाली? ते उत्तरले की, पंचवीस (२५) झाली. तेव्हा प्रेषित मूसा त्यांना म्हणाले ही पण फार आहे. पुन्हा परत जा आणि कमी करून घेऊन या. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे परत जाऊन प्रेषितांनी पंचवीसची पाच (५) इतकी कमी करून घेतली. परतताना पुन्हा प्रेषित मूसा यांनी चौकशी केली की परमेश्वराने ती संख्या किती निर्धारित केली? प्रेषित मुदम्मद[स.] यांनी उत्तर दिले की दररोज पाच वेळेस नमाज़ पढण्याची परमेश्वराने आज्ञा केली आहे. तेव्हा हे ऐकून प्रेषित मूसा पुन्हा म्हणाले की ही संख्या पण जरा जास्तच वाटते. पुन्हा परत जा आणि कमी करून घ्या. तेव्हा प्रेषित मुहम्मद[स.] यांनी उत्तर दिले की परमेश्वराकडे वरचेवर जाऊन अशी मागणी करण्याची मला लाज वाटते म्हणून त्यांनी दैनंदिन पाच

वेळेची प्रभू आदेशित अनिवार्य उपासना स्वीकारली. मात्र यासंबंधी परमेश्वराने त्यांना असे अभिवचन दिले की ही पाच वेळची दैनंदिन नमाज़ पन्नास वेळच्या नमाज़ाच्या श्रेयांकाइतकी असेल. प्रभू आदेशित व प्रेषितास मान्य झाल्यामुळे इस्लामी धर्मप्रजेस ('उम्मत') तेव्हापासून दैनंदिन पाच वेळेची नमाज़ ही अनिवार्य ('फ़र्ज') ठरली, आणि ती नित्य (ब्राह्मी) कर्म स्वरूपात अनिवार्य ठरली. याचे नाव 'फ़र्ज नमाज़' असे आहे.

**पंचकालिक प्रत्येक 'नमाज़' (उपासना) सर्वप्रथम संपन्न करणारे प्रेषित व तिचे गुह्य :**

**१) 'फ़जर'ची (प्रात:काळ) नमाज़ (उपासना) :** अबू हरीरी (हुरैरा) कथन करतात की, प्रेषित मुहम्मद[स.] यांनी असे सांगितले की, **प्रेषित आदम** हे तीनशे वर्षांपर्यंत सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्रकोपामध्ये राहिले आणि या तीनशे वर्षांनंतर अराफ़ात पर्वतावर प्रेषित आदम व ताटातूट झालेली त्यांची धर्मपत्नी हव्वा यांची पुनर्भेट झाली. त्यावेळेस आदम यांनी आपली धर्मपत्नी बीबी हव्वास विचारले की तू मला ओळखलेस का? धर्मपत्नीने उत्तर दिले, होय, ओळखले. त्याच वेळेस संदेशवाहक देवदूत जिब्राईल सर्वश्रेष्ठ परमेश्वराची आज्ञा घेऊन प्रकट झाले. ते म्हणाले की, 'हे आदम! आम्ही तुझ्या अपराधाची क्षमा केली आणि तुला आमचे प्रेषित बनवून आमचे उत्तराधिकारी (सफ़ीउल्ला) बनवले.' ही गोष्ट ऐकताच प्रेषित आदम अत्यंत आनंदित झाले आणि कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी प्रणिपात करू इच्छित होते की इतक्यात परमेश्वराचा हुकूम झाला की 'हे आदम! आचमनाशिवाय ('वज़ू') आम्हास प्रणिपात घालू (करू) नकोस.' तेव्हा आदमने विनवले, 'हे सर्वश्रेष्ठ परमेश्वरा! 'वज़ू' अर्थात आचमन काय असते?' तेव्हा आदेश झाला, 'हे आदम! हे तुमच्या अवज्ञेचे प्रायश्चित्त आहे.' प्रेषित आदम यांनी दोन गोष्टींसाठी कृतज्ञतास्वरूप दोन स्कंध किंवा नमन संपन्न केले आणि त्यांचे सदरहू कर्म हे त्यांचे अपराध क्षमा होण्याचे निमित्त बनले. ती वेळ प्रात:काळची होती. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने हे दोन स्कंध ('रकात') स्वीकारून संदेष्टासमापक मुहम्मद[स.]च्या धर्मप्रजेसाठी ('उम्मत') प्रात:काळची नमाज़ (उपासना) अनिवार्य ठरवली. प्रेषित आदम यांचा ईशमहिमागान किंवा स्तोम ('तस्बीह') असा होता –

''हे आमच्या पालनकर्त्या! आम्ही स्वत:वर (फार मोठा) अत्याचार करून बसलो आहोत आणि तू जर आम्हाला क्षमा केली नाहीस आणि आमच्यावर दया दाखवली नाहीस तर खरोखर आमचा सर्वनाश होईल. ७:२३

**२) 'ज़ुहर'ची (मध्यान्ह–दुपार) नमाज़ (उपासना)** : या उपासनेचा संबंध **प्रेषित इब्राहीमशी** आहे. तिचा आधार असा की, सर्वप्रथम अग्नी हा फुलांसारखा शीतल बनला, दुसरी गोष्ट नमरूद या घमेंडखोर आणि जुलमी नरेशावर विजय मिळवला, तिसरी गोष्ट बीबी हाजरासारखी सुंदर धर्मपत्नी मिळाली आणि चौथी गोष्ट प्रिय सुपुत्र इस्माईल यांचा बळी देताना त्यांच्याऐवजी 'मेश' (मेंढा) उतरला. याच करणास्तव या चार गोष्टींच्या कृतज्ञतेस्वरूप चार नमने (स्कंध) म्हणजेच 'रकात' संपन्न केली. ती वेळ दुपारची (ज़ुहर) होती. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने या चार 'रकाती' (नमने, स्कंध) स्वीकारून संदेष्टासमापक मुहम्मद[स.]च्या धर्मप्रजेसाठी ('उम्मत') दुपारची नमाज़ ('ज़ुहर') अनिवार्य केली. प्रेषित इब्राहीम यांचा ईशमहिमागान किंवा स्तोम ('तस्बीह') असा होता– ''स्तवन फक्त अल्लाहसाठीच आहे. तो एकमेव पूज्य (उपास्य) आहे. सदासर्वदा सर्व स्तुती अल्लाहसाठीच आहे.''

**३) 'असर'ची (सायंकालीन) नमाज़ (उपासना)** – 'असर'च्या नमाज़चे प्रणेते आहेत **प्रेषित यूनुस.** यांच्याशी चार गोष्टी निगडित आहेत. प्रथम ते सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा प्रकोप व रोषापासून मुक्त झाले. दुसरी गोष्ट समुद्रात बुडण्यापासून वाचले, तिसरी गोष्ट माशाच्या पोटातील अंधारापासून सुटले तर चौथी गोष्ट त्यांचे अनुयायी लोक म्हणजेच मुसलमान एकेश्वरवादी निष्ठा राखणारे झाले. म्हणून या चार गोष्टींनी प्रसन्न होऊन आभार-प्रदर्शनार्थ चार नमने (स्कंध) म्हणजेच 'रकात' संपन्न केली. ती वेळ सायंकाळची ('असर') होती. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने ती चार नमने स्वीकारून मुहम्मद[स.] याच्या धर्मप्रजेसाठी अनिवार्य (आवश्यक) ठरविली. प्रेषित यूनुस यांचा महिमागान ('तस्बीह') असा होता – ''(हे अल्लाह!) तुझ्याशिवाय अन्य कोणताही ईश्वर नाही. तू पवित्र आहेस. मी खरोखरच दुराचरणी लोकांपैकी एक होतो.'' २१:८७

**४) 'मग़रिब'ची (सूर्यास्त) नमाज़ (उपासना)** – 'मग़रिब'ची नमाज़ **प्रेषित ईसाशी (येशू ख्रिस्त)** निगडित आहे. त्यांच्या लोकांनी त्यांच्यावर आरोप केला की, ते (ईसा) म्हणतात, ''सलिस सुलसल्लाह'' (तीन आराध्ये [अल्लाह] आहेत) – एक सर्वश्रेष्ठ परमेश्वर, दुसरा प्रेषित ईसा आणि तिसरी माता मर्यम. ही गोष्ट ऐकून प्रेषित ईसा अत्यंत दु:खी झाले आणि फार रडले. पश्चात्ताप व्यक्त करून क्षमायाचना करीत त्यांनी (त्यांच्यावरील दुष्ट आरोपासाठी) तीन रकात (स्कंध, नमने) नमाज़ कृतज्ञतेस्वरूप अदा (संपन्न) केली. ती वेळ सूर्यास्ताची ('मग़रिब') होती. नंतर त्यांनी सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या दरबारी अत्यंत विनयाने व नम्रतेने करुणा भाकली की, हे परमेश्वरा! तू मला प्रेषितत्व बहाल केलेस आणि मी तुझा कृतज्ञ दास आहे आणि माझी माता तुझी सेविका आहे आणि तू तिला जन्म दिला आहेस आणि तू एकमेव आहेस. तुझा सहभागी कोणीच नाही. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रेषित ईसा यांच्या नमाज़ाची तीन रकाती (स्कंध) स्वीकृत करून त्या मुहम्मद[स.] यांच्या धर्मप्रजेसाठी अनिवार्य ठरवल्या. प्रेषित ईसा यांचा महिमागान ('तस्बीह') असा होता– ''स्तुती आहे त्या अल्लाहसाठी ज्याने कुणाला स्वत:चा पुत्रही बनवले नाही व कोणी त्याच्या साम्राज्यात त्याचा भागीदार नाही. आणि तो लाचारही नाही की एखादा त्याचा पाठीराखा असावा, आणि त्याचा महिमा वर्णन करावा. कमाल दर्जाचा महिमा.'' १७:१११

**५) 'इशाअ'ची (रात्र) नमाज़ (उपासना)** – 'इशाअ'च्या नमाज़चे प्रणेते आहेत **प्रेषित मूसा.** यांच्यासंबंधी जे चार प्रसंग उद्भवले, त्यांच्या कृतज्ञतेप्रित्यर्थ संपन्न झालेली ही नमाज़ आहे. ते चार प्रसंग असे – प्रथम, ईश्वराने त्यांना प्रेषितत्व बहाल केले, दुसरे शेळ्यांमध्ये वाघ निघाला, तिसरे धर्मपत्नी सफ़ूरा यांना पुत्ररत्न झाले, तर काहींच्या मते सुकन्या जन्मली. आणि चौथे वादळ आणि पाऊस होऊन शांती प्रस्थापित झाली. ती वेळ रात्रीची होती. उपरोक्त चार गोष्टींसाठी चार रकाती (स्कंध, नमने) कृतज्ञतास्वरूप संपन्न (अदा) केल्या. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्या स्वीकारून मुहम्मद[स.] यांच्या धर्मप्रजेसाठी अनिवार्य केल्या. प्रेषित मूसा यांचा महिमागान ('तस्बीह') असा होता– ''मूसाने विनवले, हे माझ्या पालनकर्त्या! (तुझ्याकडून प्रकाशप्राप्तीसाठी) माझ्या अंत:करणाची (दारे) उघड आणि माझे कार्य माझ्यासाठी सोपे कर आणि माझ्या जिभेचा दोष दूर कर. जेणेकरून लोकांना माझे बोलणे पूर्णपणे समजेल.'' २०:२५-२८.

आणि **'वितर'**ची (रात्रीची एकल विषम उपासना) नमाज़. आमचे महामहिम प्रेषित संदेष्टासमापक मुहम्मद[स.] यांच्यावर 'शबे मेराज' म्हणजेच दिव्यारोहणाच्या रात्री बैतुलमुक़द्दस येथे सर्वप्रथम लागू झाली.

सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा आदेश झाला, ''हे मुहम्मद[स.]! आम्ही तुझ्या धर्मप्रजेस तीन रकात (नमने, स्कंध) संपन्न करण्याचा आदेश दिला आहे. तू आमच्या आदेशानुसार ते संपन्न कर.'' आणि आमच्या प्रेषितांनी 'वितर'च्या तीन रकाती प्रभू आदेशानुसार सर्वप्रथम संपन्न केल्या आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराने त्या तीन 'रकाती' (नमने) मुहम्मद[स.] यांच्या धर्मप्रजेसाठी 'वाजिब' म्हणजेच नैमित्तिक कार्य ठरविले. प्रेषित मुहम्मद[स.] यांचा ईशमहिमागान ('तस्बीह') असा होता – ''(हे प्रेषित), तू त्या परमेश्वरावर भरवसा ठेव जो सचेतन (आहे), मर्त्य नाही. त्याच्या स्तवनासह त्याचे पावित्र्यगान कर.'' (२५:२८) अल्लाह परमपवित्र आहे आणि स्तवन फक्त अल्लाहसाठीच आहे, जो सर्व जगांचा विधाता आहे. तो सर्व साम्राज्याचा पवित्र सम्राट आहे. तो निर्विकार, अधीश्वर आहे. तो गौरवशाली आहे. (हे) आमच्या विधात्या, तू सचेतन देवदूतांचा स्वामी आहेस.''

### ९) दैनंदिन पाच अनिवार्य नमाज़ांच्या कर्मश्रेणी, नमन संख्या आणि वेळ यांचा तक्ता

दररोज दिवसातून पाच वेळेस नमाज़ पढण्याचा आदेश पवित्र कुराणामध्ये असा आढळतो– ''आपल्या पालनकर्त्याचे सकाळी व संध्याकाळी स्मरण करीत जा. मनातल्या मनात, अनुनय, विनय आणि भय बाळगून आणि हळू आवाजात, आणि बेसावध राहू नकोस'' ७:२०५ ''नमाज़ (भक्ती) कायम करा. मध्यान्हीनंतर ते रात्रीच्या अंधारापर्यंत आणि प्रात:कालीन कुरआनपठणदेखील आवश्यक करा. खरोखरच पहाटे कुरआनचे पठण ही साक्षात ईश्वरास विशेष आवडणारी गोष्ट होय.'' १७:७८ ''दिवसाच्या दोन्ही टोकांच्या वेळी आणि (दिवसाच्या सन्निध असलेल्या) रात्रीच्या भागामध्ये उपासना करा. (नमाज़ पढा)'' ११:११४ ''सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तापूर्वी तुझ्या विधात्याचे (त्याच्या) स्तुतीसुमनासह गुणगान कर. (आपल्या प्रभूच्या प्रार्थनेसह त्याचा जप कर आणि रात्रीच्या घटिकांमध्ये आणि दिवसाच्या शेवटीदेखील (त्याचे) गुणगान (जप) कर. यासाठी की तुला (खराखुरा) आनंद प्राप्त व्हावा.'' २०:१३० ''आपल्या पालनकर्त्याच्या स्तुतीसह त्याचे महिमागान करीत राहा, सूर्योदयापूर्वीही आणि सूर्यास्तापूर्वीही, आणि रात्रीच्या समयीदेखील त्याचे स्तुतिगान करा आणि नमाज़ झाल्यानंतरही.'' ५०:३९–४०

भक्ताने (नमाज़ी) कशा पद्धतीने नमाज़ अदा करावी याचेही संकेत पवित्र कुराणामध्ये आढळतात ते असे– ''अतिशय लीनतेने आणि मौनपणे तुमच्या विधात्याची आळवणी करा.'' ७:५५ ''जेव्हा तुम्ही कुरआनचे पठण करू लागाल तेव्हा धिक्कारलेल्या शैतानापासून अल्लाहचा आश्रय मागा.'' १६:९८ ''हे श्रद्धावंतांनो! उपासनेत (नमाज़मध्ये) लीन व्हा. (रूकू) व नतमस्तक व्हा. (सजदा करा) व आपल्या विधात्याची भक्ती करा आणि सत्कृत्ये करा की तुम्ही सफल व्हावे.'' २२:७७. ''नि:संशय त्या श्रद्धावंतांना यश प्राप्त होते, जे आपल्या भक्तीत (नमाज़ात) विनम्रता अंगिकारतात, व्यर्थ गोष्टींपासून अलिप्त राहतात, दान देण्यात सक्रिय असतात आणि शील रक्षण करतात.'' २३:१–५

दैनिक अनिवार्य पंचोपासनांमध्ये, उपासना–वल्कल ('मुसल्ला') हे उपासकाच्या कबरीचे (समाधी) संकेत करते. नमनचा अर्थ होतो विश्व प्रभुस्वरूपामध्ये परमेश्वराचे शरणागत होणे आणि प्रणिपात त्याच्यासाठी एक प्रतीकात्मक मृत्यू असतो. न्याय दिवसाच्या स्वामी स्वरूपात आपल्या प्रभूच्या शरणी जाणे असते.'' (M. M. Pickthall - 'The Cultural side of Islam', p. 60)

| क्र. | क्रमशः → नमाज़चे नाव | सुन्नत फ़र्ज़ अगोदर | फ़र्ज | सुन्नत फ़र्ज़ नंतर | नफ़िल | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | फ़जर (पहाटेची) | २ | २ | × | निषिद्ध आहे | साधारणत: सूर्योदयाच्या अर्धातास अगोदर. सूर्योदय होत असेल तर त्या वेळेस नमाज़ टाळावी, कारण सूर्योदयाच्या वेळेस प्रणिपात निषिद्ध आहे. |
| २. | ज़ोहर | ४ | ४ | २ | २ | मध्यान्हानंतर सुरू. कुठल्याही (दुपारची) वस्तुची सावली दुप्पट असेपर्यंत ही नमाज़ संपन्न करावी. |
| ३. | असर (संध्याकाळची) | ४ | ४ | × | निषिद्ध आहे | ज़ोहरची वेळ संपल्यानंतरपासून ते सूर्यास्तापर्यंत असते, परंतु ऊन पिवळे होईपर्यंत उशीर करणे योग्य नाही. |
| ४. | मग्रिब (सूर्यास्तानंतरची) | × | ३ | २ | २ | सूर्यास्त होताक्षणी सुरू होते आणि पश्चिमेकडे आकाशात तांबूसपणानंतर पांढरपणा लुप्त होईपर्यंत. |
| ५. | इशाअ (रात्रीची) | ४ | ४ | २ | २<br>३ वाजिब (वितरची) | मग्रिबची वेळ संपल्याबरोबर सुरू होते व उष:कालपर्यंत असते. परंतु अर्धरात्रीपर्यंत संपन्न करणे श्रेयस्कर असते. |
| | जुमा (शुक्रवार) | २ तहतुलवज़ू<br>२ तहतुलमस्जिद | २ | ४+२ | २ | ही साधारणपणे स्थानिक सोईनुसार जोहरच्या नमाज़च्या वेळी संपन्न होते. |

(१) फ़र्ज = (ब्राह्मी) नित्यकर्म, (२) सुन्नत = (प्रेषित) संविधान कर्म, (३) वाज़िब = नैमित्तिक कर्म, (४) नफ़िल = अतिरिक्त कर्म, (५) वितर = रात्रीची एकल विषम (उपासना)

उपरोक्त नित्य पंचोपासना व शुक्रवारची उपासनांव्यतिरिक्त दोन सणांचे नमाज़– नमाज़–ए–ईदैन अर्थात (क) बक़री ईदची नमाज़–ए–ईदुज़्ज़ुहा' आणि (ख) उपवासव्रताच्या रमज़ान महिन्याच्या शेवटी येणारी नमाज़–ए–'ईदुलफ़ितर' पण आहेत.

याशिवाय विविध प्रसंगांच्या नमाज़ी अशा आहेत– (१) नमाज़े जनाज़ा म्हणजेच मृतात्म्यासाठी – प्रेतात्म्यासाठी. ही नमाज़ उभे राहून पढली जाते. (२) नमाज़े तरावीह – ही रमज़ान महिन्यात ईशाअच्या नमाज़ा सोबत युग्म–गुच्छक स्वरूपात पढली जाते. (३) नमाज़े इस्तिस्क़ा – ही पावसाच्या याचनेसाठी असते. (४) नमाज़े इस्तख़ारा– ही क्षेमकल्याणासाठी असते. (५) नमाज़े हाजत– ही मनोकामनापूर्तीसाठी असते. (६) नमाज़े शुकर – ही कृतज्ञताज्ञापनासाठी असते. (७) नमाज़े कसवफ़– ही सूर्यग्रहणाच्या वेळेस पढली जाते.

(८) नमाज़े खसवफ़ – ही चंद्रग्रहणाच्या वेळी पढली जाते. (९) नमाज़े क़ज़ा – वेळेवरची नमाज़ चुकल्यानंतर क्षतिपूर्तिसाठी ही पढली जाते. (१०) नमाज़े क़सर – ही युद्धाच्या वेळी कमी करून पढली जाते. (११) नमाज़े सफ़र – ही प्रवासामध्ये संक्षिप्त करून पढली जाते. म्हणजेच चार रकातीऐवजी दोन रकाती स्वरूपात पढली जाते. हा नियम केवळ ज़ुहर, असर आणि इशाअ या नमाज़ांसाठी लागू आहे. (१२) नमाज़े तह्यतुल वज़ू – ही आचमन केल्याबरोबर ताबडतोब दोन रकात मध्ये पढली जाते. (१३) नमाज़े तह्यतुला मस्जिद – ही उपासनागृहाखातर पढली जाते. (१४) नमाज़े इशराक़ – ही सूर्योदयानंतर पढली जाते. (१५) नमाज़े तहज्जुद – ही इशाअनंतर मध्यरात्री पढली जाते. (१६) नमाज़े चाश्त – ही दिवसा दहा वाजता पढली जाते.

**१०) नमाज़ का चुकवू नये (टाळू नये)?**

कुरआनचे एक प्रसिद्ध भाष्यकार शेख हारून यांनी आपल्या भाष्यामध्ये लिहिले आहे की, पुनरुत्थानाच्या दिवशी (प्रलय दिनी) जेव्हा सर्व प्राणिमात्रे आपल्या कर्मांच्या हिशोबासाठी हश्रच्या मैदानात जमा (एकत्रित) होतील तेव्हा **मुसलमान** लोक म्हणतील की धन्यवाद आहे अल्लाहचे की त्याने आम्हाला मुसलमान म्हणून निर्माण केले. यहूदी (ज्यू) म्हणून उत्पन्न केले नाही. (जन्मास घातले नाही) आणि **यहूदी** म्हणतील की, परमेश्वराचे धन्यवाद आहे की, त्याने आम्हांस यहूदी म्हणून जन्म दिला. नसरानी (ख्रिश्चन) म्हणून निर्माण केले नाही आणि **नसरानी** म्हणतील की धन्यवाद आहे त्या अल्लाहचे की ज्याने आम्हास नसरानी जन्मास घातले, मजूसी (अग्निपूजक) म्हणून निर्माण केले नाही आणि **अग्निपूजक (मजूसी)** म्हणतील की, परमेश्वराचे धन्यवाद आहे की त्याने आम्हाला अग्निपूजक म्हणून निर्माण केले, गाढव म्हणून नव्हे, आणि **गाढव** म्हणेल की धन्यवाद आहे परमेश्वराचे की त्याने मला गाढव म्हणून जन्म दिला, कुत्रा म्हणून नव्हे आणि **कुत्रा** म्हणेल की धन्यवाद आहे परमेश्वराचे की त्याने मला कुत्रा म्हणून निर्माण केले, शूकर म्हणून नव्हे. आणि **शूकर** म्हणेल की धन्यवाद आहे त्या परमेश्वराचे की ज्याने मला शूकर म्हणून जन्म दिला, परंतु मुहम्मद[स.] यांच्या धर्मप्रजेमधील (उम्मत) नमाज़ न पढणारी व्यक्ती म्हणून निर्माण केले नाही.

**अभिप्राय–मथितार्थ –** नमाज़ न पढणारी व्यक्ती ही शूकरपेक्षा कनिष्ठ आहे. इतका हीन त्या व्यक्तीचा दर्जा आहे. यास्तव नमाज़ न टाळण्याचा बोध घेणे श्रेयस्कर ठरेल, म्हणून नमाज़ चुकवू नये.

नमाज़ न चुकवण्यासंदर्भात एक सूफ़ी महात्मा फ़ख्रुद्दिन निज़ामी यांचा दृष्टान्त पाहण्यासारखा आहे. निज़ामी हे एक नावाजलेले फार मोठे सूफ़ी संत होते. एकदा त्यांच्याकडे एक शिष्य आला. त्याने आपली मनोकामना आपल्या गुरूसमोर व्यक्त करताना म्हटले की, परमेश्वरास पाहण्याची माझी तीव्र इच्छा आहे. त्यासाठी लाभदायक एखादे जप–पाठ सांगावे,की जेणेकरून प्रभू–दर्शन घडेल. त्या शिष्यास सद्‌गुरू म्हणाले फ़र्ज़ (नित्यकर्म) नमाज़ सोडून दे. हे ऐकून शिष्यास फार आश्चर्य वाटले, आणि त्याला संभ्रम पडला की फ़र्ज़ नमाज़ कसे सोडून द्यावे?

तीन दिवसांनी तो शिष्य पुन्हा हजर झाला आणि पुन्हा म्हणाला गुरूदेव! परमेश्वराच्या दर्शनाची इच्छा आहे. सद्‌गुरू म्हणाले मी तर तुला फ़र्ज़ नमाज़ सोडून देण्याचा जप–पाठ दिला होता. तो शिष्य पुन्हा परत गेला. दोन–तीन दिवसांनी हजर झाला आणि तीच विनंती समोर ठेवली. सद्‌गुरूंनी पुन्हा तेच उत्तर दिले. शेवटी शिष्य

निघून गेला. फ़र्ज़ सोडून देण्याची हिम्मत झाली नाही. ते सोडून देण्याचे धाडस निर्माण झाले नाही. मात्र 'सुन्नत' म्हणजेच (प्रेषित) संविधान कर्मे सोडून देण्याचे धाडस केले. सुन्नतांचा त्याग करून तो झोपी गेला. त्यारात्री स्वप्न-दर्शनामध्ये ईश्वराचे प्रेषित मुहम्मद[स.] यांचे दर्शन झाले. प्रेषितांनी त्याला म्हटले, ''हे विश्वाच्या दासा, माझ्याकडून काय चूक झाली? म्हणून तू माझी संविधान कर्मे ('सुन्नत') सोडून दिलीस? - तत्काळ तो लवकर उठला- त्याने आचमन केले आणि प्रायश्चित्त करून सुन्नते अदा केली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने हा सारा प्रसंग आपले सद्‌गुरू निज़ामीसमोर ठेवले. तेव्हा गुरूदेव त्या शिष्यास म्हणाले की, जर तू फ़र्ज़ सोडून देण्याचे धाडस केले असतेस तर खरोखर परमेश्वराने तुझ्यापुढे हजर राहून विचारले असते की फ़र्ज़ का म्हणून सोडून देतोस!

या दृष्टान्ताचा अभिप्राय सुस्पष्ट आहे की, माणसाने परमेश्वराची भक्ती कधीच सोडू नये, ती चुकवू नये, तिला टाळू नये. परमेश्वर आदेशाप्रमाणे ती नित्यनेमाने संपन्न करावी. यातच भक्ताचे हित आणि कल्याण आहे.

### ११) नमाज़- सूफ़ींचा दृष्टिकोन

नमाज़विषयी सूफ़ींची धारणा कशी होती, हे आम्ही सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ हज़रत दातागंज बख़्श अली बिन उस्मान हुजवीरी यांच्या 'कश्फ़ुल महजूब' या ग्रंथाच्या आधारे प्रातिनिधिक स्वरूपात देत आहोत. यावरून सूफ़ींचा या संदर्भात दृष्टिकोन कसा होता याची पण कल्पना येते.

व्युत्पत्तिशास्त्रानुसार नमाज़चा अर्थ ईश्वराचे स्मरण आणि त्याच्यासमोर संपूर्ण आत्मसमर्पण किंवा शरणागती असा आहे. नमाज़च्या पूर्वतयारीमध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो-

(१) अंतर्बाह्य शुचिता,

(२) अंतर्वस्त्रे व पोशाखाची स्वच्छता - ''आपली वस्त्रे खूप पाक- साफ (स्वच्छ) ठेव.'' ७४:४ येथे अरबी भाषेतील वाक्प्रचाराचा प्रयोग केला गेला आहे. त्याचा अर्थ असा आहे की, आपले चारित्र्य, आपले कर्म चांगले, स्वच्छ व शुचिर्भूत ठेवा. तसेच आपल्या आत्म्यालासुद्धा स्वच्छ, पवित्र व निर्मळ ठेवा. आपले शरीरसुद्धा स्वच्छ ठेवा जे तुमच्या आत्म्याचे वस्त्र आहे, तेच त्याला झाकते, सुरक्षित ठेवते.

अशाप्रकारे शरीरालाच नव्हे तर मनाला सुद्धा सुशोभित करून सुधारून, आत्म्याला पवित्र करून, नमाज़ अदा करावी. सामान्य व स्थूल दृष्टीने शरीराची शोभा जरी भौतिक वस्त्रामुळे आहे तरीदेखील सूक्ष्म दृष्टीने मन व आत्म्याची शोभा व सौंदर्य त्याच्या उदार, पवित्र, विशुद्ध, कोमल व मधुर भावनांमुळेच असते. हे लक्षात ठेवावे की आपल्या जीवनात सभ्य व सुशील बनल्याशिवाय मनात कसल्याही सौंदर्य व माधुर्याचा समावेश होणे शक्य नाही.

(३) नमाज़ासाठी मनोनीत जागा स्वच्छ हवी. (४) 'काबा'कडे चेहरा ठेवून आणि आंतरिकरीत्या ईश्वरी सिंहासनाकडे ('अर्श') चेहरा केला आहे अशी कल्पना करून (५) स्थितप्रज्ञावस्थेत - उत्थानममध्ये राहून आणि आंतरिकदृष्ट्या ईश्वरसामिप्याच्या उद्यानामध्ये आहोत अशी कल्पना करून (६) ईश्वर समोर हजर आहे अशी कल्पना करून, (७) दरारायुक्त आदराने आणि विलय होण्याच्या स्थितीत 'अल्लाहु अकबर' (परमेश्वर सर्वात महान आहे) म्हणणे. एकात्म स्थितीत कुरआनचे पठण माथा झुकवून करावे, गुडघ्यात वाकणे, पुन्हा

सरळ होणे नंतर दोनदा प्रणिपात करणे व उजवीकडे व डावीकडे 'सलाम' फेरणे. नमाज़ची प्रक्रिया सलाम फेरण्याने संपते. उपरोक्त कृती अतिशय लक्षपूर्वक कराव्या लागतात.

सूफ़ी-पथावर पाऊल ठेवणाऱ्यांसाठी नमाज़ असे साधन आहे, ज्याच्या साहाय्याने ते एका स्थानकावर पोहोचू शकतात. 'वज़ू' अर्थात आचमन करणे पश्चातापाची जागा घेते. अध्यात्मिक गुरूवर विसंबणे, 'काबा'ची जागा घेते. नमाज़साठी उभे राहणे स्वत्वविलयाचे रूप घेते. नमाज़मध्ये कुरआन श्लोक-पाठ ध्यानधारणा बनते. माथा टेकवणे, नम्रतासूचक असते. प्रणिपातात स्वत:बद्दलचे ज्ञान होते. यातली श्रद्धा ईश्वराशी जवळीक बनते. 'सलाम' फेरणे भौतिक जगाशी संबंध तोडते आणि स्थानकांपासून मुक्ती देते.

प्रेषित मुहम्मद[स.] जेव्हा गंभीर असत, तेव्हा त्यांचा हबशी (निग्रो) साथी बिलाल यास म्हणत, ''हे बिलाल! 'अज़ान' (प्रार्थनेसाठी आरोळी) देऊन आम्हाला स्वस्थता द्या.'' काही सूफ़ी म्हणतात, नमाज़ म्हणजे अल्लाहच्या सान्निध्यातील उपस्थिती असते; तर काहींच्या मते अनुपस्थिती.

हुजवीरी यांनी मात्र नमाज़ला ईश्वराची आज्ञा मानले आहे. सूफ़ी गुरू आपल्या शिष्यांना नमाज़ची सवय व्हावी, म्हणून चारशे रूकू अर्थात नमन वा स्कंध होतील एवढी नमाज़ रोज पढली पाहिजे, असा दंडक घालीत. नमाज़मध्ये प्रेषितांना[स्व.] खूप आनंद प्राप्त होई, म्हणून तर ते म्हणत, नमाज़ माझ्यासाठी नेत्रसुख आहे. हुजवीरी म्हणतात, ''ज्या वेळी प्रेषित[स्व.] अल्लाहच्या भेटीस गेले, तेव्हा भौतिक बंधनांपासून त्यांचा आत्मा मुक्त करण्यात आला, तसेच जाणिवांच्या प्रमाणांमधून आणि स्थानकातूनही तो मुक्त करण्यात आला. त्यांच्या नैसर्गिक सामर्थ्याचा विलय झाला. त्यांची इच्छा नव्हती पण अंत:प्रेरणेने म्हणाले, ''हे अल्लाह, पलीकडच्या भोगयातनांच्या जगात मला पाठवू नकोस. स्वभाव आणि भावनांच्या प्रभावाखाली टाकू नकोस.' अल्लाह म्हणाला, 'ही माझी आज्ञा आहे की, तुम्ही भौतिक जगात परत जाल. धार्मिक कायदा प्रस्थापित कराल आणि मी तुम्हाला ते देईन, जे मी तुम्हाला इथे दिले आहे.' प्रत्येक नमाज़ाला ते अल्लाहच्या अधिक जवळ ज़ात असत. नमाज़च्या वेळी त्यांना अल्लाहच्या भेटीचे स्मरण होई.' सहल बिन अब्दुल्ला म्हणतात की, प्रामाणिक व सच्चा तो असतो की ज्याच्यासाठी सर्वश्रेष्ठ परमेश्वराने गुमास्ता म्हणून एक देवदूत नेमलेला असतो. हा देवदूत त्याला नमाज़साठी तत्पर करतो व तो झोपलेला असेल तर त्याला (नमाज़साठी) उठवतो. सूफ़ींच्या एका संप्रदायाचे असे म्हणणे आहे की, नमाज़ पढणारा हा चार गोष्टींचा गरजवंत असतो, त्या चार गोष्टी अशा आहेत- (१) वासना क्षय, (२) स्वभाव त्याग (३) चित्तशुद्धी आणि (४) अपूर्व दर्शन. म्हणजेच नमाज़साठी वासनाक्षयाशिवाय पर्याय नाही. सुप्रसिद्ध सूफ़ी संत व आचार्य मन्सूर हल्लाज यांचा चारशे रूकू अर्थात नमन किंवा स्कंध करण्याचा रिवाज होता. त्यांना विचारण्यात आले, तुमचे स्थान जर एवढे उच्च आहे तर तुम्ही एवढा त्रास का घेता? त्यांनी उत्तर दिले, स्वत्वविलय झालेल्या व्यक्तीवर त्रास, आनंद या गोष्टींचा परिणाम होत नाही.

सूफ़ी तत्त्वज्ञ इमाम ग़ज़ाली नमाज़ (प्रार्थने) मधील तीन पटलांचा उल्लेख करतात - (१) मोठ्याने प्रार्थना म्हणणे, (२) जेव्हा मन प्रयत्नपूर्वक, दृढ संकल्पाने कुविचारापासून मुक्त होऊन दैवी विचारांवर केंद्रित होते आणि (३) दैवी विचारांपासून लक्ष दुसरीकडे नेणे. प्रार्थनेचे (भक्तीचे) मर्म हे आहे की, ज्याची प्रार्थना केली जाते आहे, त्याने साधकाचा ताबा घ्यायला हवा. साधकाचे मन ईश्वरात लुप्त होते. त्याची प्रार्थना जणू थांबते.

त्याला स्वत:ची जाणीव रहात नाही. त्याला प्रार्थनेचा विचार येणे, हा एक पटल – पडदा असतो. तो इतका गर्क होतो की, त्याच्यात व त्याच्याबाहेर काय चालले आहे हे 'त्याला काही कळत नाही' हेसुद्धा त्याला कळत नाही. ईश्वराकडे प्रवास करत साधक ईश्वरातच शिरतो.

परमेश्वराची भक्ती ही मानवाचे ईश्वराप्रती असलेल्या कर्तव्यांचे सारतत्त्व आहे. अंत:करणामधील भावना बाहेर ओतून टाकण्याचे नाव भक्ती आहे. ती परमेश्वराची एक निस्सीम प्रार्थना आहे आणि आपल्या विधात्यासमोर आत्म्याच्या अत्यंत विनम्र इच्छांची एक आदरपूर्वक अभिव्यक्ती आहे. सूफ़ीवादामध्ये इतर धार्मिक संकल्पनांप्रमाणेच भक्तीची संकल्पना ही सर्वोच्च विकासावर पोहोचते. पवित्र कुराणाच्या मते भक्ती चित्तशुद्धीचे असे साधन आहे की, जे ईश्वराशी साहचर्य प्रस्थापित करण्याचा एकमेव मार्ग आहे. कुराण म्हणते – ''(पैगंबर!) जो ग्रंथ तुमच्याकडे प्रकट करण्यात आला आहे, त्याचे (इतरांसमोर) पठण करा आणि नित्य प्रार्थना करा (नमाज़ पढा). कारण प्रार्थना (माणसाला) निर्लज्जतेपासून आणि दुष्कृत्यांपासून निश्चितच परावृत्त करते. आणि अल्लाहचे नामस्मरण हे सर्वश्रेष्ठ सत्कृत्य आहे आणि तुम्ही जे काही करता, ते सर्व अल्लाह जाणतो.'' २९:४५ म्हणून सूफ़ीवाद बजावून सांगतो की, भक्ती (प्रार्थना) ही मानवाचे नैतिक स्तर उंचावण्याचे एक साधन आहे. निव्वळ कर्मकांडाचे रूप धारण करणारी, ढोंगी मनापासून निघालेली एक निर्जीव आणि नीरस धर्मानुष्ठानाची प्रार्थना ही मुळीच प्रार्थना नसते. अशा प्रार्थनेच्या विरोधात कुराण उघडपणे म्हणते– ''हा शोक (खेद आहे). ढोंगी लोक जेव्हा प्रार्थनेसाठी (नमाज़ासाठी) उभे राहतात, तेव्हा (मोठ्या) आळसाने उभे राहतात. (कारण) ते केवळ लोकांना दाखवण्यासाठी (आणि त्याच्याकडून स्तुतीचे बोल ऐकण्यासाठी) उभे राहतात, आणि ते अल्लाहचे स्मरण करतात, पण फारच कमी.'' ४:१४२

भक्ताचे निर्मळ मन ईश्वरास भावते. असत्य, दंभ, लालसा, द्वेष, कुटिलपणा, मत्सर, कृपणता, छिद्रान्वेषण, निंदा-नालस्ती, यासारख्या दुर्गुणांनी भरलेले अंत:करण परमेश्वरास ग्राह्य नसते. भक्तीमध्ये मनाची शुचिता अनिवार्य असते. म्हणून तर प्रेषित मुहम्मद[स.] म्हणतात – शुचितेशिवाय नमाज़ ग्राह्य होत नाही आणि एकाग्रचित्ततेशिवाय नमाज़ (संपन्न) होऊ शकत नाही. अल्लाह तुमच्या स्वरूपास पाहत नाही; तर तो तुमच्या मनाच्या संकल्पास निरीक्षीत असतो. तो तुमचे अंतरंग न्याहाळीत असतो. जोपर्यंत अंत:करण निर्मळ नाही तोपर्यंत सर्व काही निरस्त असते. अशा लोकांची नमाज़ ही नमाज़च नसते.

भक्तीमध्ये लक्ष परमेश्वराकडे एकवटलेले असावे आणि उपाधिपासून परावृत्त व्हावे. अधिकारी साधक म्हणतो की, मी अंत:करणाच्या चेहऱ्यास पश्चात्तापाच्या पाण्याने धुवून हृदयाच्या रक्ताने आचमन (वज़ू) करून नमाज़ पढतो. सर्वसाधारण लोक हे पाण्याने आचमन करून ठरलेल्या वेळेवर नमाज़ पढतात; तर खास लोक वासनांचे किल्मिष सारून सावधान चित्त होऊन नमाज़ संपन्न (अदा) करतात; परंतु अत्यंत प्रगत अशा सूफ़ी साधकांची नमाज़ काही औरच असते. तो स्वत:साठी उपाधि म्हणजे ईश्वरेतर विचारांना थारा देत नाही, त्यांना निषिद्ध समजतो, तो जगापासून आचमन (वज़ू) करतो, तो परलोकाशी (ने) स्नान करतो, वासनेस बळी देतो, निर्वाणाच्या समुद्रामध्ये तो खोल बुडी मारतो आणि आपल्या अस्तित्वास तिलांजली देतो.

ईश्वराच्या प्रिय भक्तांची नमाज़ ही त्यांच्या अस्तित्वाचे निषेध असते; तर धर्मनिष्ठांची नमाज़ ही प्रणिपात व नमन असते. नमाज़ीची (भक्त) स्थितप्रज्ञावस्था– उत्थानम, उपविश्यासन, परमेश्वराची सर्वश्रेष्ठ उद्घोषणा

आणि संकल्प हे सर्व तरलतेमध्ये तल्लीन आणि लुप्त आहेत. मी मदिरालयामध्ये मस्तपणे नमाज़ पढतो की ज्यामध्ये न स्थितप्रज्ञावस्था आहे, ना नमन, ना प्रणिपात. हाच आाशय व्यक्त करणारी फारसीभाषेतील काव्यचरणे अशी आहेत–

*नमाज़ – ए–आशिक़ाँ तर्के वजूदस्त*
*नमाज़–ए– ज़ाहिदाँ सज्दा सजूदस्त ।।*
*क़याम व क़ादा व तकबीर व नियत*
*हमा महव अस्त दर ऐन माइय्यत ।।*
*मन मस्त खराबात नमाज़े कि गुज़ारम*
*दर वै न क़यामे न रूकूए न सजूदे ।।*

काश्मीरी सूफ़ी संत शेख नूरूद्दीन सालारदीन हा विश्वाच्या क्षणभंगुरतेवर भर देतो. मानवाशी सतत झगडणाऱ्या व त्याला हैराण करणाऱ्या पाशवी वासनारूपी सैतानावर मात करण्यासाठी तो आत्मसंयमाचा उपदेश देतो. तो धार्मिक रूढी व व्रतवैकल्यांची निंदा करतो. परमेश्वराशी एकरूप होण्याचा ध्यास घेऊन मन एकाग्र केल्याशिवाय नमाज़ पढणे व्यर्थ होय, असे तो म्हणतो. तो पुढे म्हणतो– ''तुला सत्याचा कानोसा घ्यावयाचा आहे ना? मग तुला पंचेद्रियांचे दमन केले पाहिजे. तू विनम्र होतोस म्हणजे आपला पार्थिव देह नमाज़मध्ये वाकवितोस; परंतु तो पार्थिव देह तुला तारू शकणारा नाही. तू शिवाशी (अल्लाहशी) तल्लीन होशील तेव्हाच तुझ्या नमाज़चा (प्रार्थनेचा) काही उपयोग होईल.

''सूफ़ी तत्त्वज्ञानानुसार नमाज़ची (भक्ती) परिपूर्णता पुढील चार गोष्टींवर निर्भर असते. अंत:करणाचे डोळे उपासनेमुळे (नमाज़) उघडतात. म्हणून –

(१) मनाच्या कोनाड्यामध्ये जर चित्ताची एकाग्रता असेल, तर अज्ञानाचे पडदे गळून पडतात. (२) महादाता परमेश्वराकडून जर विवेकाची अभिव्यक्ती उपलब्ध असेल तर दैवी कोपापासून मुक्ती मिळते. (३) अंत:करणाची नम्रता व शालीनता जर शंकाकुशंकांपासून मुक्त असेल तर ईश्वरकृपेचे द्वार उघडले जाते. (४) भक्तीच्या सर्वांगांमध्ये जर विनम्र आणि नम्रभाव असेल तर प्रतिफळाचे बक्षिस (मोबदला) दिले जाते.''

– शेख अबू नसर सराज : 'किताब–उल्–लुमा', पृ. २५४–५५

नमाज़ (प्रार्थना) हे मन एकाग्र करण्याचे साधन आहे. ती मन:पूर्वक केली पाहिजे. शुद्ध अंत:करणाने सर्वांच्या कल्याणासाठी एकत्रितपणे संपन्न होणारी ही सांघिक (सामुदायिक) प्रार्थना असते. प्रार्थना चांगल्या विचारांच्या चिंतनाचे प्रतीक असते. प्रार्थनेमध्ये बळ असते म्हणून ती शुद्ध अंत:करणाने म्हटली गेली पाहिजे. स्वहिताच्या याचनेपेक्षा इतरेजनांच्या क्षेम–कल्याणासाठी केली गेलेली प्रार्थना ही केव्हाही हितकारक ठरते.

नमाज़ आरोग्यास पण पोषक आहे. यासंबंधी प्रसिद्ध सूफ़ी संत अल्–ज़हबी (मृत्यू – इ. स. १३४८) यांचे असे मत आहे की इस्लामी धार्मिक विधीस्वरूपातील उपासना अर्थात सलात म्हणजेच नमाज़मधील शारीरिक ठेवणीतील विशिष्ट बदल चार प्रकारचे आहेत – (१) आत्मिक वा आध्यात्मिक, (२) मानसिक, (३) शारीरिक आणि (४) नैतिक. ते पुढे असे म्हणतात की, हृदय, पोट आणि आतड्यांमधील वेदना नमाज़मुळे नाहीशा होतात. नमाज़मुळे सुख व मानसिक समाधान लाभते. चिंतेचे दमन होते आणि क्रोधाग्नी

शांत होतो. सत्यप्रियता आणि नम्रता वृद्धिंगत होते. अंत:करण कोमल बनते, प्रेमोदय होतो, क्षमा करण्याची वृत्ती बळावते. सूड घेण्याच्या दुर्गुणाविषयी नावड निर्माण होते. याशिवाय एकाग्रचित्तता साध्य झाल्यामुळे जटिल समस्यांविषयी प्राय: योग्य निर्णय घेता येतो आणि समस्यांची अचूक उत्तरे प्राप्त होतात. विस्मृत गोष्टी आठवतात. भौतिक आणि अध्यात्मिक गोष्टींसंबंधी उपाय दृष्टिपथात येतात. नमाज़मध्ये विशेषकरून घडणाऱ्या जोरदार व्यायामामुळे परिणामकारकरीत्या आत्मावलोकन करणे शक्य होते.

**१२) नमाज़ (इस्लामी उपासना) : सूफ़ी तात्त्विक निरूपण :**

धर्माच्या दोन बाजू असतात १. आचारधर्म व २. विचारधर्म. आचारधर्म कसे वागावे हे सांगतो, तर विचारधर्म म्हणजे ते तसे का वागावे हे सांगतो. हा विचारधर्म म्हणजे आध्यात्मिक प्रकृती. आत्मनिरीक्षण आणि ध्यान या आध्यात्मिक प्रकृती सुधारण्याच्या पद्धती सर्व धर्मांत आहेत. सदाचारांमागचा विचार समजण्याचे शास्त्र म्हणजे अध्यात्मशास्त्र.

अध्यात्मशास्त्रात ईश्वरप्राप्तीचे तीन प्रमुख मार्ग सांगितले आहेत, ते म्हणजे १. कर्म, २. ज्ञान आणि ३. भक्ती. यांपैकी भक्ती हा अत्यंत महत्त्वाचा आणि तुलनेने सुलभ मार्ग आहे. या मार्गात असणाऱ्या नवविधाभक्तीमध्ये 'नामसंकीर्तन' या भक्तीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यालाच 'नामयोग' असे म्हणता येईल. परमकल्याण प्राप्त करून देणाऱ्या सर्व योगांमध्ये नामयोग सर्वश्रेष्ठ होय, कारण तो अथपासून इतिपर्यंत आनंददायी आहे. मोक्षमार्ग सोपा करण्याचे सामर्थ्यही नामात आहे. नामस्मरण हा भक्तीचा एक सहजसुलभ असा मार्ग आहे.

नामसाधनेने इंद्रिये कामवासना विसरतात. नामाच्या चिंतनाने परमेश्वर भक्तांच्या अधीन होतो. नामप्रभावाने पापे जळतात. नामसाधनेची वाट स्वल्प आहे. ती निश्चित फल देणारी आणि अधिकारनिरपेक्ष आहे. नामाने कामक्रोधाचे दहन होते. अहंकार देशोधडीला लागतो. नामस्मरण करण्यासाठी स्थळ, काळ, वेळेचे बंधन नसते.

प्रत्येक धर्माची प्रामुख्याने तीन अंगे असतात. १. ईश्वराची संकल्पना व त्याचा उपासनेचा मार्ग, २. नीतिमूल्यांची शिकवण आणि ३. भौतिक जीवनाचे नियमन. भक्ताच्या ईश्वरी संकल्पनेत ईश्वराचे स्वरूप साधारणपणे असे असते. ईश्वर एक आहे व तोच सर्व चराचर सृष्टीचा निर्माता व नियंत्रक आहे. तो निर्गुण, निराकार व निर्विकार आहे. तो सर्वव्यापी आहे. तो पोषणकर्ता आहे. तो निरपेक्ष, नि:स्पृह आहे. तो न जनिता आहे, न जन्य. तत्सम कोणीही नाही. तो दृष्ट आणि अदृष्ट आहे. तो आदि आणि अंत आहे. तोच परमसत्य आहे. तो सर्वज्ञ आहे.

उपासना भक्तीचे एक साधन आहे. भक्ती ईश्वरप्राप्तीसाठी आध्यात्मिक आराधना असते. भक्ती म्हणजेच मानसिक श्रद्धा आणि उत्कटपणे कृतिशील झालेली विवेकशक्ती म्हणजेच श्रद्धा. श्रद्धेचे स्वरूपच भक्तीचे रूप दर्शवत असते. भक्ती म्हणजे प्रेममय योग! ईश्वराविषयीचा प्रेमभाव आणि ब्रह्मज्ञान यांचा समन्वय म्हणजे भक्तीयोग! ईश्वराविषयी पराकोटीचे आकर्षण निर्माण झालेल्या प्रेमाची परिणती भक्तीत होते.

ब्रह्मज्ञानप्राप्तीचा उच्च मार्ग हा इस्लामच्या पंचआधारस्तंभांना छेदून पुढे जातो. हा एक प्रदीर्घ मार्ग आहे. या उद्दिष्टपूर्तीसाठी सूफ़ींनी सरळ, सोपे उपाय शोधून काढले आहेत. त्यापैकी नमाज़ अर्थात उपासना (भक्ती) ही एक आहे. उपासना (नमाज़, सलात) श्रद्धावानांसाठी आरोहणाची सर्वोच्च अवस्था असते आणि चित्ताच्या एकाग्रतेशिवाय खरी अशी उपासना कोणतीच नसते.

परमेश्वराने मानवाची निर्मिती आपल्या भक्तीच्या प्रयोजनासाठी केली आहे. त्यामुळे परमेश्वराची भक्ती (उपासना) करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य ठरते. याचा उल्लेख पवित्र कुराणात असा आहे- ''आणि मी जिन्न (यक्षयोनी) आणि माणसांना यासाठीच निर्माण केले आहे की, त्यांनी माझी उपासना (भक्ती) करावी.'' ५१:५६. शिवाय संपूर्ण कुराणात अनेक ठिकाणी उपासनेची (भक्तीची) अनिवार्यता पुढीलप्रमाणे विशद केली आहे.

''नतमस्तक व्हा, अल्लाहसमोर आणि त्याचीच भक्ती (उपासना) करा.'' ५३:६२ ''हे श्रद्धावंतांनो! उपासनेत (नमाज़मध्ये) लीन व्हा व नतमस्तक व्हा व आपल्या विधात्याची भक्ती करा आणि सत्कृत्ये करा की तुम्ही सफल (यशस्वी) व्हावे.'' २२:७७ ''निःसंशय त्या श्रद्धावंतांना यश प्राप्त होते, जे आपल्या भक्तीत (नमाज़ात) विनम्रता अंगीकारतात, व्यर्थ गोष्टींपासून अलिप्त राहतात, दान देण्यात सक्रिय असतात आणि शील रक्षण करतात.'' २३:१-५ ''तू हे पाहिले नाहीस काय की, आकाशात आणि भूमीवर जे कोणी आहेत ते सर्व आणि सूर्य व चंद्र आणि तारे, पर्वत, वृक्ष, पशू आणि मानवजातीतील अनेकजण अल्लाहलाच प्रणिपात करीत आहेत. परंतु अनेक असेही आहेत जे शिक्षेस पात्र ठरत आहेत.'' २२:१८. ''काय तुम्ही पाहत नाही की अल्लाहचेच पावित्र्यगान (गुणगान) करीत आहेत, ते सर्व जण जे आकाशात आणि पृथ्वीवर आहेत आणि पक्षी जे पंख पसरून उडत आहेत. प्रत्येकास आपल्या भक्तीची व स्तवनाची पद्धती माहीत आहे.'' २४:४१ ''सप्त आकाश व भूमी आणि त्यामध्ये जे काही आहे ते सर्व त्याच्या वैभवाचे गुणगान करतात आणि अशी कोणतीही वस्तू नाही की त्याच्या स्तुतीसह त्याच्या वैभवाचे (पावित्र्याचे) गुणगान करीत नसेल, परंतु त्यांचे गुण (पावित्र्य) गान तुम्हाला समजत नाही.'' १७:४४ ''अतिशय लीनतेने आणि मौनपणे तुमच्या विधात्याची आळवणी करा.'' ७:५५ ''अल्लाहची उपासना करा आणि अनिर्बंध बनलेल्या शैतानापासून अलिप्त राहा.'' १६:३६ ''आपल्या पालनकर्त्याचे सकाळी व संध्याकाळी स्मरण करीत जा. मनातल्या मनात, अनुनय, विनय आणि भय बाळगून आणि हळू आवाजात. आणि बेसावध राहू नकोस (सावधान चित्ताने प्रार्थना कर). जे दूत तुझ्या विधात्याच्या ठायी निकटतम स्थान राखतात, ते कधीही आपल्या मोठेपणाच्या दर्पात त्यांच्या भक्तीपासून पराङ्मुख होत नाहीत, तर ते त्याचे पावित्र्यगान करतात आणि त्याच्यापुढे स्वत: नतमस्तक होतात.'' ७:२०५-०६ ''नमाज़ (भक्ती) कायम करा. मध्यान्हीनंतर ते रात्रीच्या अंधारापर्यंत आणि प्रात:कालीन कुरआन (पठण) देखील अवश्य करा. खरोखरच पहाटे (कुरआनचे) पठण ही साक्षात ईश्वरास विशेष आवडणारी गोष्ट होय.'' १७:७८ ''सफल झाला तो, ज्याने पावित्र्य अंगीकारले आणि आपल्या विधात्याचे नामस्मरण केले. मग नमाज़ (उपासना) अदा केली.'' ८७:१४-१५ ''मग विनाश आहे त्या भक्तांसाठी (नमाज़ पढणाऱ्यांसाठी) ते आपल्या भक्तीत (नमाज़ात) तिच्या वास्तवतेचे भान ठेवत नाहीत. (गफलत करतात) जे दिखाऊपणा करतात.'' १०७:४-६ ''तुझ्या विधात्याचे स्तवन करीत त्याचे गुणगान कर आणि (त्याच्यासमोर) नतमस्तक

होणाऱ्यांपैकी एक हो आणि तू आपणास मृत्यू येईपर्यंत आपल्या विधात्याची उपासना करीत राहा.'' १५:९८-९९ ''नमाज़ाची आणि (विशेषत:) मधल्या-मध्यवर्ती नमाज़ाची काळजी घ्या आणि अल्लाहसमोर विनम्र होऊन उभे राहा.'' २:२३८

नमाज़ अर्थात उपासना हे एक ईश्वरी कोषागार आहे. त्याची किल्ली कृपायाचना (दुआ) आहे. वैध उपजीविका या किल्लीचे कप्पे आहेत. कृपायाचना उपासनेचे मर्म आहे. ईश्वराची उपासना हा भक्ताचा अधिकार आहे आणि ईश्वरनिर्दिष्ट कर्तव्य पण. ईश्वरी आदेशाचे पालन करणे हे भक्ताचे कर्तव्य आहे. उपासक हा उपासनेचा अवतार असतो. पराकोटीची उपासना आज्ञापालनाचे नाव आहे. ती शारीरिक तुष्टीची चरमसीमा असते म्हणून उपासनेचा संकेत हा ईश्वरलीनतेकडे असतो. ईश्वरतन्मय अवस्थेत उपासकास प्रभुदर्शन घडावे, हे उपासनेचे ईप्सित असते.

नमाज़चे (इस्लामी उपासना पद्धती) सूक्ष्म अवलोकन केल्यास आपणास तिचे तीन पैलू दिसून येतात. ते असे- १) आकृती किंवा बहिरंग (form) २) प्रकृती किंवा अंतरंग (spirit), आणि ३) रहस्य किंवा गूढशोधन (secrets). नमाज़-अंतर्गत संपन्न होणाऱ्या भक्ताच्या विधिमान्य विविध शारीरिक विक्षेपांनी नमाज़ची आकृती बनते, तर तदंतर्गत प्रयुक्त त्याच्या मानसिक जपकर्मांनी नमाज़च्या प्रकृतीचा आलेख बनतो. या सर्व कृतिकर्मांचे सूफ़ीप्रणीत निरूपणाने तिचे रहस्य उलगडते.

नमाज़ची आकृती तिच्या प्रकृतीशी कशी निगडित आहे हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल. नमाज़च्या आकृतीत समाविष्ट विविध टप्पे हे भक्ताच्या (नमाज़ीच्या) भावदशेशी किंवा भावविश्वाशी निगडित असे आहेत. अर्थात तकबीर मध्ये (ईश्वर माहात्म्य निवेदन) दहशत (आतंक) आहे; 'क़याम'मध्ये (स्थितप्रज्ञावस्था) समीपता आहे. 'किरअत'मध्ये (कौराणिक श्लोक पाठ) सुसंवाद आहे. 'रूकू'मध्ये (नमन) भय आहे, 'क़ौमा'मध्ये (लघु प्रज्ञावस्था) दर्शन आहे, 'सज्दा'मध्ये (प्रणिपात) विलय आहे, 'क़अूद'मध्ये (उपविश्यासन) प्रेम आहे, 'जल्सा'मध्ये (अल्पासन) निरीक्षण आहे. जणू काही प्रत्येक टप्पा हा गूढगुंजनाने भरलेला आहे.

गूढगुंजनाचा कानोसा घेण्याची सूफ़ींची पद्धत कशी होती, याची प्रचीती आपणास त्यांच्या 'मध्यवर्ती नमाज़ा'शी संबंधित तात्त्विक निरूपणाने येते. संबंधित कुराणी श्लोक असा आहे -

''नमाज़ची आणि (विशेषत:) मधल्या-मध्यवर्ती नमाज़ची काळजी घ्या आणि अल्लाहसमोर विनम्र होऊन उभे राहा.'' २:२३८. सूफ़ी संतांचे या श्लोकावरील भाष्य याप्रमाणे आहे. नमाज़ (सलात) म्हणजे अंत:करण सोडून भक्ताचे सर्व शारीरिक अवयव आणि मधली (मध्यवर्ती) नमाज़ म्हणजे भक्ताचे अंत:करण, त्याचे मन असा त्यांचा अभिप्राय आहे. अर्थात मानवी शरीर हे ईश्वरभक्तीचे महान साधन असल्यामुळे ते चांगले व स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून उपासनेसाठी तत्पूर्वीचे आचमन (वज़ू) हे अनिवार्य ठरविले गेले आहे. यास्तव आदेश आहे - संपूर्ण शारीरिक अवयवांना मलीन होण्यापासून तुम्ही दक्ष राहा. याबाबतीत विशेष काळजी घ्या आणि मुख्यत्वेकरून मनाच्या बाबतीत सतर्क राहा. म्हणजेच जोपर्यंत तुम्ही अल्लाहास सोडून इतरांचे सहभागित्वास (शिर्क) आपल्या मनात थारा देणार नाही तोपर्यंत तुमची नमाज़ (उपासना) अदा होणार नाही. अल्लाहास दुर्गुणांनी पुरेपूर भरलेले भक्ताचे प्रदूषित अंत:करण कदापि ग्राह्य नसते. याच कारणास्तव प्रेषित मुहम्मदसाहेब म्हणाले आहेत- स्वच्छता व शुचितेशिवाय नमाज़ स्वीकृत होत नाही आणि

अंत:करणपूर्वकतेशिवाय नमाज़च नाही. अल्लाह तुमचे बहिरंग पाहात नाही ; तो तुमच्या अंतरंगास न्याहाळीत असतो. जोपर्यंत भक्ताचे अंतरंग शुद्ध नाही तोपर्यंत ते मुळीच ग्राह्य नाही. यामुळेच अशा बेसावध भक्तांची नमाज़ मुळीच ग्राह्य होत नाही.

वास्तविक साधकाची उपासना हे एक धार्मिक कृत्य म्हणून संपन्न होणाऱ्या (केली जाणारी) नित्य नेमाच्या उपासनेहून भिन्न असते. धार्मिक कृत्य या स्वरूपात केली जाणारी उपासना (नमाज़-सलात) ही साधकाच्या उपासनेशी वेळ आणि उपासना विधी या बाबतीत भिन्न नसते तर ती आपल्या भाषेच्या प्रयोगात पण आपले वेगळेपण दाखवून देते. साधक हा उपासनेच्या वेळी परमेश्वराशी साक्षात्कार करत असतो आणि तो त्याच्या प्रेमात, प्रकाशात आणि ऐश्वर्यात स्वत:स विसरून जातो. त्यावेळी तो जणू परमेश्वराशी प्रत्यक्ष संभाषणामध्ये व्यस्त असतो. त्याचे प्रेम-निवेदन ही आपली भाषा स्वत:च आविष्कृत करते. त्याची भाषा जिव्हा-निसृत नसते, तर ती आत्मा-निसृत असते.

नमाज़ (उपासना, भक्ती) ही अल्लाह (परात्पर परब्रह्म)च्या महान प्रतिष्ठेस साजेशी अशी एक सुप्रतिष्ठित भक्तीसाधना आहे. ती भक्ताची प्रामाणिक निष्ठा अभिव्यक्त करते; कारण ''केवळ प्रामाणिक निष्ठेनेच अल्लाहचा अनुग्रह प्राप्त होत असतो.'' ३९:३ ईश्वरभक्तीचा ध्यास हा अंत:करणापासून असावा. उपासकाची उपास्यामध्ये परम तल्लीनता असावी. आपल्या उत्कट भक्तीसाठी त्याने परमेश्वराकडे असे मागणे उपस्थित करावे - ''हे प्रभो! माझे मन तुझ्या गुण-स्मरणात नित्य मग्न असू दे. माझी वाणी तुझ्या कीर्तनात व्यस्त असू दे. आणि माझे शरीर हे तुझ्या सेवेत तत्पर असू दे.'' भक्ताचा सर्वस्व समर्पण भाव पवित्र कुराणात असा प्रतिबिंबित झालेला आहे - ''सांगा, माझी भक्ती (नमाज़) आणि माझा त्याग व माझे जीवन व माझे मरण, सर्व काही विश्वांचा स्वामी अल्लाहसाठीच आहे.'' ६:१६२.

उत्कट साधकांच्या दृष्टिकोनातून भक्ती (उपासना)चे चित्र काहीसे असे असते - प्रेषित इब्राहीम हे प्रत्येक नमाज़ानंतर अशी कृपायाचना करीत- ''हे प्रभो! मला नमाज़ संपन्न करण्यासाठी दृढचित्त ठेव.'' हेतू असा की नमाज़मध्ये स्थिरता व दृढता लाभावी व एक निमिषमात्रही नमाज़चे विस्मरण होता कामा नये आणि ती हीच नमाज़ (भक्ती) आहे, जिच्या बाबतीत सर्वश्रेष्ठ परमेश्वर आदेश देतो, ''नित्य नमाज़ (भक्ती) संपन्न करीत जा. कारण अल्लाह (आपल्या) भक्तांसाठी कनवाळू आहे.'' ३:३० ''अल्लाह (आपल्या) भक्तांची आठवण ठेवणारा आहे.'' ३:१५ ''अल्लाह स्थिरचित्त लोकांवर प्रेम करतो.'' ३:१४६ ''(अल्लाहवर) जे भरवसा ठेवतात त्यांच्यावर नि:संशय अल्लाह प्रेम करतो.'' ३:१५९

एकदा हजरत गौस पाक यांनी परमेश्वरास विनविले की, ''हे प्रभो! माझी कोणती नमाज़ तुझ्या अत्यंत जवळ आहे?'' उत्तर मिळाले - ती नमाज़ (भक्ती) की ज्यामध्ये माझ्याशिवाय कोणी नसेल. इथपर्यंत की भक्ताने (नमाज़ी) आत्मविस्मृत होऊन जावे. अर्थात आपादमस्तक परमेश्वराच्या नामात (ज़ात) तल्लीन होऊन भक्ताने आत्मविलुप्त व्हावे.

भक्तीच्या उत्कर्षाचे टप्पे लक्षात घेऊन सय्यद अशरफ जहाँगीर म्हणतात की, शरीअतची नमाज़ कर्मेंद्रियांशी संबंधित असते. तरीकतची नमाज़ चिंतनाशी निगडित असते आणि हक़ीक़तची नमाज़ ही रहस्याची उकल व आत्म्याचे दर्शन करून परमेश्वराशी तल्लीन होणे आहे. तर मारिफतच्या नमाज़ (भक्ती)मध्ये साक्षात

प्रभुदर्शन घडते. याच आशयाचे निदर्शक असे उर्दू भाषेतील काव्यचरण याप्रमाणे आहे –

*शरीअत में इबादत तन के साथ*
*है तरीक़त में इबादत मन के साथ।।*
*दर हक़ीक़त है इबादत जान से*
*मारिफ़त में दीद है सुबहान से।।*

आत्मशुद्धीविना केल्या जाणाऱ्या उपासनेस साधक खरी उपासना मानण्यास तयार नसतात. एका साधकाचे असे मत आहे की, उपासनेत पुढील चार बाबींचा समावेश असणे अत्यावश्यक आहे – (१) वासनेचा विनाश (वासना क्षय), (२) निसर्गप्रदत्त शक्तींचा लोप, (३) चित्त शुद्धी आणि (४) प्रभुदर्शन उत्कटता. उपरोक्त चारी गोष्टी क्रमशः एकाग्रचित्तता, परमेश्वराच्या शक्तीमत्तेमध्ये आस्था, अध्यात्मिक प्रेम आणि तज्जनित अंतःकरणाच्या पावित्र्याद्वारे साध्य होतात. यावरून हे सहजपणे स्पष्ट होते की, या साधकांच्या मते उपासना ही धार्मिक नित्यक्रिया समजून दररोज पाच वेळेस संपन्न होणाऱ्या नमाज़हून काहीशी वेगळी आहे. ती स्वतः एक साधना आहे आणि साधनेद्वारेच एखादी व्यक्ती त्यास योग्य अशी बनू शकते. सलात (नमाज़, उपासना)मध्येच माझा आनंद सामावलेला आहे. या प्रेषित वचनाचा अर्थ ते आपल्या दृष्टिकोनातून समजतात. काही साधक असे मानतात की साधनेद्वारे परमेश्वराचे दर्शन घडते, तर काहींचे म्हणणे आहे की, साधनेद्वारे इंद्रियजन्य सर्व कार्ये विस्मृत होऊन जातात.

नमाज़चे तत्त्वज्ञान सविस्तरपणे समजून घेतल्यानंतर आता आपण प्रत्यक्ष नमाज़ची संपूर्ण क्रियाविधीशी संबंधित सूफ़ी तात्त्विक निरूपण समजून घेऊ या.

भक्तास (नमाज़ीला) सत्कर्माकडे प्रवृत्त करणे हा नमाज़ (उपासने)चा बाह्य हेतू आहे. ''आणि दिवसाच्या दोन्ही टोकांच्या वेळी (अर्थात सकाळ–संध्याकाळ) आणि (दिवसाच्या सन्निध असलेल्या) रात्रीच्या भागामध्ये उपासना करा. (नमाज़ पढा) सत्कृत्ये दुष्कृत्यांचे निश्चितच उच्चाटन करतात.'' ११:११४ हा नमाज़चा बाह्य हेतू आहे. श्रद्धावंतांसाठी उत्कर्षयात्रा हा तिचा गुह्य हेतू आहे. जेव्हा उपासक (नमाज़ी) आपल्या भक्तीसाठी (नमाज़) उभे राहतो तेव्हा तो या प्रतिज्ञेपासून प्रारंभ करतो. ''मी सदैव (परमेश्वरचरणी) लीन होऊन, माझे ध्यान त्याच्याकडे केंद्रित केले आहे ज्याने आकाशांना आणि पृथ्वीला निर्माण केले आणि मी कदापि अनेकेश्वरवाद्यांपैकी नाही.'' ६:७९ येथे सूफ़ी साधनेचे चार टप्पे – (१) शरीअत (कर्मकांड), (२) तरीक़त (उपासना मार्ग), (३) हक़ीक़त (ज्ञानकांड) आणि (४) मारिफ़त (सिद्धावस्था) यांचा मागमूस लागण्यायोग्य (अनुमार्गणीय) आहे. ''मी माझे ध्यान अल्लाहकडे केंद्रित केले आहे.'' यावरून उपासनेचा हेतू स्पष्ट होतो. हे शरीअत आहे. अर्थात अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही. **''ला माबूद इल्लल्लाह.''** ''ज्याने आकाशांना आणि पृथ्वीला निर्माण केले'' यावरून उपासकाने अंगीकृत केलेला मार्ग स्पष्ट होतो. साध्य होणारे उद्दिष्ट फक्त परमेश्वर (अल्लाह) आहे. **''ला मकसूद इल्लल्लाह''** अर्थात अल्लाहशिवाय कोणतेच उद्दिष्ट नाही हे तरीकत आहे. हा भक्तिमार्ग आहे. ''हनीफँव्व'' मी विशुद्ध एकेश्वरवादी आहे. उपासकास अशी अनुभूती होते की, परमेश्वराशिवाय कुणाचेच अस्तित्व नाही. **''ला मौजूद इल्लल्लाह.''** ही हकीकत आहे. मग तो (उपासक) म्हणतो – मी कदापि अनेकेश्वरवाद्यांपैकी नाही. अर्थात उपासक पाहतो की, एकमेव

परमेश्वराचेच अस्तित्व आहे. बाकी काहीच नाही. **''ला मशहूद इल्ललल्लाह.''** सृष्टीमध्ये स्रष्टा स्वयंसिद्ध आहे. ईश्वराला कोणतीच सीमा नाही. तो असीम आहे. तर भक्त हा सीमेच्या बंधनात आहे. तो ससीम आहे. हे मारिफत आहे. अशाप्रकारे प्रस्तावनेच्या टप्प्यावरच उपासक हे चारी टप्पे ओलांडतो. यानंतर तो आपल्या दोन्ही हातांची बोटे मोकळी करून वर उचलत कानापर्यंत घेऊन जाऊन आपल्या अंगठ्यांनी कानाचे लोलक स्पर्श करतो. यावरून असे वाटते की, उपासक हा साक्षात अशी प्रतिज्ञा करतो की, ''मी परमेश्वरास सोडून इतर सर्वांचा त्याग केला आहे.'' मनोनीत उपासना संपन्न करण्यासाठी जेव्हा तो दृढ संकल्प (निय्यत) करतो. तेव्हा त्याचे हात मोकळे असतात आणि उपासनेची सुरुवात या शब्दांनी करतो – ''अल्लाहच्या नावाने जो कृपाशील (व) दयाळू आहे (मी आरंभ करतो)'' 'अल्लाह' हे एक संमिश्र नाव आहे. ते त्याच्या सर्व मनोगम्य नावांचे समष्टीगत रूप आहे. यानंतर उपासक आणखी वाकतो आणि त्याला चांगली खात्री होते आणि तो परमेश्वरास 'रहमान' असे संबोधित करतो. जो संपूर्ण सृष्टीचा पालनकर्ता आहे. काय संत, काय पापी, तो सर्वांना आपल्या कृपेची भेट (बक्षीस) देतो. तो वाटिका आणि त्याचप्रमाणे उजाड वाळवंटावर वर्षावृष्टी करतो. यानंतर उपासक पुन्हा अधिक वाकतो आणि परमेश्वरास 'रहीम' म्हणून संबोधतो. तो कुणाचीही मेहनत वाया जाऊ देत नाही. तो आपल्या आज्ञाकारी दासांना दयेचे बक्षीस आणि आशीर्वादाचे वाटप करतो. अशाप्रकारे उपासक हा आपल्यात अंतर्लीन होऊन आपल्या विधात्याचे स्मरण करतो. तेव्हा परमेश्वर (अल्लाह) 'सूरए फातिहा' अर्थात मंगलाचरण अध्यायाच्या सुरुवातीच्या तीन श्लोकांमध्ये भक्ताच्या याचनेचे उत्तर देतो. अर्थात हे उत्तर पण उपासकाच्या तोंडातून निघते. उपासकाद्वारा पुनरावृत्त मंगलाचरण अध्याय असा आहे –

सर्व स्तुतीचा अधिकारी अल्लाह हाच (आहे) जो सर्व जगाचा विधाता आहे. १) (जो) कृपाशील (व) दयाळू आहे. २) निवाड्याच्या दिवसाचा अधिपती. ३) (हे अल्लाह) आम्ही केवळ तुझीच उपासना करतो आणि फक्त तुझ्याकडेच साहाय्याची याचना करतो. ४) आम्हाला सन्मार्ग दाखव. ५) अशा लोकांचा मार्ग ज्यांना तू (तुझ्या) कृपेची देणगी दिली आहेस. ६) ज्यांच्यावर (तुझा) प्रकोप झालेला नाही आणि जे पथभ्रष्ट झालेले नाहीत.

परमेश्वर आपली स्तुती स्वत: करतो. ''तो सर्व जगांचा विधाता आहे. (रहमान) आणि रहीम–कृपेस योग्य अशा लोकांना–दासांना, भक्तांवर तो कृपेचा वर्षाव करतो. यानंतर तो अंतिम निवाड्याचा दिवसाचा स्वामी–मालक आहे. जगातील प्रतिकारक आणि परस्परविरोधी शक्तींना तो आपल्या (न्यायाच्या) तराजूत संतुलित ठेवतो. परमेश्वराचे हे उत्तर ऐकून भक्त (दास) पुढील चार श्लोकांमध्ये आपली प्रतिक्रिया अशी व्यक्त करतो. ''हे अल्लाह (परमेश्वर), आम्ही केवळ तुझीच भक्ती (उपासना) करतो. आणि फक्त तुझ्याकडेच साहाय्याची याचना करतो. आम्हाला सन्मार्ग दाखव. अशा लोकांचा मार्ग ज्यांना तू कृपेची देणगी दिली आहेस. ज्यांच्यावर (तुझा) प्रकोप झालेला नाही, आणि जे पथभ्रष्ट झालेले नाहीत.'' म्हणून खरोखर हा अध्याय परमेश्वर आणि त्याचा भक्त या दोघांमधील सुसंवाद आहे. या संवादाची इतिश्री 'आमीन' (तथास्तु) या शब्दाने होते. यानंतर यासोबत गौण स्वरूपात पवित्र कुराणाचा एखादा लघु अध्याय अथवा एखाद्या अध्यायाचे तीन लांब श्लोक अथवा एकच सुदीर्घ श्लोक अर्थात 'आयतल कुर्सी' (महाश्लोकासन)चे वाचन केले जाते. उपासनेअंतर्गत केले जाणारे आसन (शारीरिक विक्षेप) शेवटच्या निवाड्याच्या दिवसाची आठवण करून देते. यानंतर उपासक

(भक्त) आडवे झुकतो. आता खरोखर जणू काही निम्नश्रेणीय चतुष्पाद प्राण्याच्या अवस्थेमध्ये तो उपासना करत आहे असे वाटते. उभ्या अवस्थेत तो मानवप्राण्याप्रमाणे उपासना करतो. जसे की दास हा आपल्या मालकासमोर अदबीने उभा आहे किंवा एखाद्या राजाच्या दरबारामध्ये एक दरबारीसेवक मोठ्या आदबीने उभा असतो. या नमन अवस्थेत तो (उपासक) अनुभव करतो की, त्याची पाठही त्याच्या पापांच्या ओझ्यांमुळे खाली झुकलेली आहे आणि पुन्हा तो तीन वेळा असे म्हणतो– ''सुबहाना रब्बियल अजीम'' विशुद्ध आहे, माझा प्रभू जो सर्वांत मोठा आहे. नंतर तो या नमन अवस्थेतून उभे राहतो आणि म्हणतो – ''समी अल्लाहुलिमन हमिद:'' (परमेश्वराने मी केलेली स्तुती ऐकली) जर उपासना अधिनायका (इमाम, पेश इमाम)च्या अधिपत्याखाली सांघिक स्वरूपात होत असेल तर तो (उपासक) याला जोडूनच आणखी म्हणतो ''रब्बना लकल हम्द'' (हे प्रभो! तुझ्याचसाठी सर्व स्तुती आहे.) यानंतर उपासक हा खाली वाकून नमन अवस्थेमध्ये प्रणिपात (सज्दा) करतो. आता प्रणिपात (सज्दा)चा अर्थ होतो की, उपासक हा निकृष्टतम जीव-जंतु, कृमी-कीटक आणि सरिसृपांप्रमाणे आसनस्थ झाला आहे; आणि तो असे समजतो की त्याने सर्व जगाचा त्याग केलेला आहे आणि आपल्या व्यक्तिमत्त्वास मागे सोडले आहे आणि आपल्या निर्माणकर्त्याच्या दारी धुळीचे चुंबन घेत आहे आणि ही धूळ त्याला पापमुक्त करते. आता तो प्रणिपातामध्ये ''सुबहान रब्बियल आला'' (विशुद्ध आहे माझा प्रभू जो सर्वांत महान आहे.) तीनदा पुनरावृत्ती करतो. अर्थात माझा प्रभू हा सर्व प्रकारच्या स्तुतीपलीकडे आहे. त्याचे प्रथम प्रणिपात हे ईश्वरी आज्ञापालनाच्या फलस्वरूप होते, तर त्यानंतरचा दुसरा प्रणिपात हा ईश्वराच्या धन्यवाद ज्ञापनाचा परिणामस्वरूप असतो. त्याच जानुनमनाची पुनरावृत्ती करत तो (उपासक) बसतो. (कादा) प्रथम आसनामध्ये तो दोन रकातींच्या साधनांगसोपान (संधी), शेवटी फक्त 'तशहूद' किंवा 'अत्तैहियात' (उपासना विविधा) म्हणतो; तर तो तीन आणि चार रकातींच्या (परिक्रमा) नमाज़च्या शेवटी 'तशहुद'सोबत 'दरूद' (अंतरासत्ती, स्वस्ति) आणि दुआ (कृपायाचना)पण म्हणतो. अशाप्रकारे त्याने (उपासकाने) धारण केलेली उपविश्यासन अवस्था निर्देशित करते की एका मनुष्याप्रमाणे उभ्या अवस्थेपासून ते निम्नप्राण्याच्या झुकलेल्या अवस्थेपर्यंत उपासक हा अवरोहित झाला आहे. आणि या नंतर आणखी पुढे जाऊन तो सरिसृपांच्या अवस्थेपासून अवरोहित होऊन प्रस्तरवत (दगडाप्रमाणे) उपविश्यासन अवस्थेस पोहोचतो. अशाप्रकारे उपासक (भक्त) आपल्या निर्मात्याची उपासना (भक्ती) निर्मितीच्या सर्वच टप्प्यांमध्ये मनोगम्य स्वरूपात करतो आणि त्याचप्रमाणे आपल्या दैनंदिन जीवनामध्ये सर्व व्यावहारिक हेतूंनी धारण केलेल्या मनोगम्य अवस्थादेखील प्रयोगात आणतो. आपल्या निर्मात्यासमोर उभे राहून त्याने सर्व प्रकारचे प्रणाम पूर्ण केलेले असतात. ज्याप्रमाणे एखादा महाराजा आपल्या दरबारी सेवकास बसण्याची परवानगी दिल्यानंतर मोठ्या अदबीने बसतो त्याचप्रमाणे उपासकास उपासनेमध्ये बसण्याचा आदेश प्राप्त होतो. जेव्हा दरबारी सेवक दरबारात बसत असतो तेव्हा, तत्पूर्वी त्याला आपल्यासोबत काय काय भेटवस्तू आणल्या आहेत, हे सांगावे लागते. तद्वत उपासक पुन्हा म्हणू लागतो, ''वाचिक, कायिक, मानसिक आणि समस्त सत्कर्मांची उपासना अल्लाहसाठीच आहे.'' अत्तहिय्यातु लिल्लाहि वस्सलवातु व तोय्यबातु.'' हे ऐकून परमेश्वर उत्तर देतो, ''हे नबी (संदेष्टा) शांती असो, आपल्यावर आणि कृपा असो अल्लाहची आणि त्याच्या अपार देणग्यांची.'' ''अस्सलामु अलैक अय्युहन-नबीय्यु रहमतुल्लाहि व बरकातुहु.'' यानंतर उपासक म्हणतो, ''शांती असो आमच्यावर आणि अल्लाहच्या सदाचारी

दासांवर.'' ''अस्सलामु अलैना व अला इबादिल्लाहि स्सालिहीन.'' आणि पुन्हा ''मी ग्वाही देतो की अल्लाहशिवाय इतर कुणीही उपासनायोग्य (उपास्य) नाही आणि अशी पण ग्वाही देतो की, मुहम्मद हे अल्लाहचे सेवक आणि रसूल (प्रेषित) आहेत.''

''अषहदु अल ला इलाहा इल्लल्लाहू व अषहदु अन्न मुहम्मदन अब्दुहु व रसूलुहु.'' हेच ते समूहगीत आहे ज्यामध्ये संपूर्ण सृष्टी प्रभुप्रशंसेमध्ये उपासकासोबत सामील होते.

येथे त्या गोष्टीची आठवण होते की नमाज़ (उपासना) मेराज (दिव्यारोहण) मध्ये प्रस्थापित झाली. (अल्लाहच्या उपस्थितीत प्रेषित मुहम्मद यांची उत्तुंग अशी रात्रीच्या अंतरिक्ष यात्रेस 'मेराज' अर्थात दिव्यारोहण असे म्हणतात) या यात्रेत जिब्रईल देवदूत प्रेषितांच्या सोबत होते; परंतु ते कल्पवृक्षाजवळ (सिद्रतुल मुंतहा) थांबले. तेथून पुढे येण्यास त्यांनी नकार दिला. याचा मतितार्थ असा की जीवनवृक्षापलीकडे विवेक उंच उड्डाण भरू शकत नाही, परंतु प्रेषित मुहम्मद यांना त्यापलीकडे जाऊन आकाशविहीन शून्य प्रदेश अर्थात अरूप स्थळामध्ये ('वरा-उल-वरा') प्रवेश करावे लागले. तेथे पोहोचताच त्यांच्यावर निषेधाज्ञा लागू झाली. ''हे माझ्या प्रिय मित्रा (हबीब) बैस आणि माझे स्तवन कर.'' (''इजलिस या हबीबी व कुहल सनाई'') प्रेषित म्हणाले- ''मी का म्हणून बसू?'' उत्तर होते- भक्तांवर कृपेचा वर्षाव करणे ही ईश्वराची उपासना असते. परमेश्वर आपली नमाज़ (उपासना) अदा करीत आहे. अर्थात परमेश्वर आपल्या उपासनेत व्यस्त, मग्न आहे. प्रेषित बसतात आणि (उपरोक्त) अत्तहिय्यात (उपासना विविधा) वाचू लागतात.

उपरोक्त पद्धतीनुसार सर्व मुस्लिम उपासक आणि सूफ़ी साधक आपली नमाज़ (उपासना) पढतात. अशाप्रकारे नमाज़ (सलात) श्रद्धावंतांचे आरोहण असते आणि खऱ्या भक्ताचे अंत:करण प्रकाशमान होते. याची कुणीच कल्पना करू शकत नाही.

पंचकालिक अनिवार्य नमाज़व्यतिरिक्त सूफ़ींनी नामस्मरणावर भर दिला आहे. दैनंदिन जीवनात श्वासोच्छ्वासावर अवलंबित निरंतर ईश्वर नामस्मरणावर त्यांचा जोर असतो. चित्ताची एकाग्रता (हुजूर-ए-कल्ब) नमाज़मध्ये सुनिश्चित करण्याचा एक सबळ मुद्दा आहे. अधिकांश जानुनमनांमध्ये याची अवहेलना होण्याची दाट शक्यता असते. चित्ताची एकाग्रता साध्य करण्यासाठी उपासकास सावधानचित्त व्हावे लागेल. उपासनेच्या वेळी मुख नि:सृत प्रत्येक शब्द आणि अग्रेसर होणारी प्रत्येक कृती यावर उपासकास विचारपूर्वक आणि निश्चयपूर्वक लक्ष द्यावे लागेल. जर तो म्हणत असेल - ''माझा अल्लाह पवित्र आहे.''(सुबहान कल्लाहु) तर त्याला याच्या अर्थावर -आशयावर किंवा कमीत कमी शब्दांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अशाप्रकारे त्याला आपल्या मनास एका विशिष्ट प्रणालीमध्ये शिस्तबद्ध करावे लागेल. उपासनेत मनाची मशागत ही फार महत्त्वाची बाब आहे. चंचलतेस मुळीच स्थान देऊ नये. प्रणिपात करताना आपला माथा जमिनीवर ज्या बिंदूवर टेकला जातो, त्यावरच उपासकाने आपले लक्ष एकवटले पाहिजे. सर्वसाधारण नमाज़मध्ये एकाग्रता साध्य करण्याचे हेच उपाय आहेत.

सारांश, नमाज़ इस्लामचा कणा आहे. ती धर्माचे आधारस्तंभ आहे. मोक्षप्राप्तीची अट आहे, श्रद्धेची रक्षिका आहे आणि पावित्र्याचा पाया आहे. नमाज़ एक असे महान कर्म आहे की ज्यामध्ये शरीर, बुद्धी आणि हृदय समाविष्ट असतात. आणि या तिघांत तत्त्वज्ञान आणि विवेक यांचे सुंदर सामंजस्य विद्यमान आहे.

शरीराच्या हिश्श्यास कयाम (स्थितप्रज्ञावस्था), रूकू (नमन), सज्दा (प्रणिपात) आणि क़अूद (उपविश्यासन) या अवस्था चतुष्ट्य आले आहेत. यांच्या समष्टीस 'देहकर्म' असे म्हणता येईल. जिव्हे (जिभे)च्या हिश्श्यास किरअत किंवा तिलावत (कुरआन श्लोक-पाठ), तस्बीह (ईशमहिमागान), हम्द (ईशस्तवन), अस्तग्फार (क्षमायाचना), दुआ (कृपायाचना) आणि दरूद (अंतरासत्ती किंवा स्वस्तिक) हे षट्जाप आले आहेत. या सर्वांसाठी 'मानसकर्म' असे समष्टीगत नाव देता येईल. बुद्धीच्या हिश्श्यास चिंतन आले असून, हृदयाच्या हिश्श्यामध्ये ईश्वराच्या प्रति तन्मयता आणि भक्तिभावाने मन द्रवित होणे, या गोष्टी आल्या आहेत. वरील सर्व गोष्टींचा अंगीकार करून नमाज़ीने आपली नमाज़ अदा केली तर त्यात उत्कट भक्तीचा आनंद तर मिळेलच, पण त्याचबरोबर त्याला मुक्तीचे फळ लाभेल. (डॉ. मुहम्मद आज़म, 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन', पृ. १५९-१६८)

**सूफ़ींची सर्वोत्कृष्ट व इतर जनांसाठी एक आदर्श नमाज़-पद्धती**

सूफ़ींची भक्ती-साधना (नमाज़) किती उत्कट असते आणि किती भावपूर्ण असते याविषयी प्रसिद्ध सूफ़ी साधक शेख फ़रीदुद्दीन अत्तार यांनी आपला ग्रंथ 'तज़कर्तुल औलिया' आणि सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य सय्यद अबुल हसन अली बिन उस्मान हुजवीरी यांनी आपला ग्रंथ 'कश्फुल महजूब' मध्ये एक सुप्रसिद्ध सूफ़ी संत हातम असम यांचे दृष्टान्त नमूद केले आहे. ते असे -

एकदा श्रीमान हातम असम या संत महात्म्यांना मुहम्मद इब्न यूसुफ़ अल् फ़र्ग़ानी नावाच्या जिज्ञासू भक्ताने त्यांच्या नमाज़ पढण्याच्या स्वरूपाविषयी व पद्धतीविषयी विचारणा केली की, आपण नमाज़ (भक्ती-उपासना) कशा रितीने संपन्न करता? उत्तरादाखल हातम असम म्हणाले की, ''जेव्हा नमाज़ची वेळ येते तेव्हा मी मोठ्या सतर्कतेने शुद्ध पाण्याने बाह्य आचमन म्हणजे 'वज़ू' करतो. मग उपासनागृहात (मशिदीमध्ये) उपासना स्थळावर अंतरंग आचमनासह म्हणजेच पश्चात्ताप व्यक्त करून उभे राहतो. (कारण पश्चात्तापाने मन निर्मळ बनते) तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर पवित्र काबागृह म्हणजेच 'मस्जिदे हराम' असते. माझ्या उजवीकडे स्वर्ग व डावीकडे नरक आणि पायाखाली बिकट असा सन्मार्गाचा सेतू (पुल, सिरात) असतो. पाठीवर यमदूत उभा असल्याचे कल्पितो (मानतो) आणि 'परमेश्वर सर्वश्रेष्ठ' ('अल्लाहु अकबर') असल्याबद्दल सन्मानपूर्वक उद्घोषणा करतो आणि आदरपूर्वक स्थितप्रज्ञ होतो. मग भयभीत होऊन मोठ्या विनयाने- अदबीने पवित्र कुराणाचे वेचक श्लोक पठण करतो- तसेच लक्षपूर्वक व विचारपूर्वक अधिनायकाचे पवित्र कुराणातील सस्वर पठित महाश्लोक ऐकत व समजून घेत पराकोटीच्या आदरभावाने नमन करतो. अतितुच्छता व लीनतेसह प्रणिपात करतो आणि काबागृहामधील प्रेषित इब्राहीम यांच्या स्थळास ('मुक़ाम-ए-इब्राहीम') दोन्ही भुवयांच्या दरम्यान कल्पून अल्पासन ('जलसा') करतो आणि अत्यंत नम्रतेने मान झुकवून उपासना-विविधाचे ('अत्तहियात') मौन वाचन करतो. मग अत्यंत आशावादी होऊन उजवीकडे व डावीकडे (क्रमश:) कृतज्ञतापूर्वक शांतिनिवेदन ('सलाम') प्रस्तुत करतो. त्या वेळेस प्रभूचे भय आपल्या मनात राखतो. नमाज़ (भक्ती, उपासना) स्वीकृतीची आशा व अस्वीकृतीचे भय मनात बाळगून उभे राहतो आणि भविष्यात आयुष्यभर अशाच उत्कट तऱ्हेने, श्रद्धेने मन:पूर्वक नमाज़ (उपासना) संपन्न करण्याची प्रतिज्ञा मनात ठाम बाळगतो. ('परमेश्वर करो, माझी ही प्रतिज्ञा सफल होवो.')*

*(१. शेख फरीदुद्दीन अत्तार, 'तज़कर्तुल औलिया', पृ. १५०; २. सय्यद अबुल हसन अली बिन उस्मान हुजवीरी, 'कश्फुल महजूब', पृ. ४६५)

भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात नवविधाभक्ती मान्य आहे; तर इस्लाममध्ये पंचविधा भक्ती प्रचलित आहे. (१) श्रवण, (२) कीर्तन, (३) स्मरण, (४) अर्चन आणि (५) दास्य ही ती पंचविधा भक्ती होय. मात्र या साधनरूप वैध आणि पंचविधा भक्तीव्यतिरिक्त सूफ़ींनी साध्यरूप – प्रेमलक्षणा – मधुराभक्ती आत्मसात केलेली आहे. ईश्वरप्रेम हेच त्यांचे अंतिम उद्दिष्ट असते, म्हणून प्रेम हाच त्यांचा खरा धर्म असतो. शिवाय पादसेवनभक्ती ही सद्‌गुरूशी निगडित असल्यामुळे ती सूफ़ींना भावते. कारण सूफ़ी संप्रदायांमध्ये गुरू-शिष्य परंपरेस फार महत्त्व आहे. त्यांची अशी धारणा आहे की अनन्य भक्तिपूर्वक सद्‌गुरूंचे भजन केले पाहिजे. योग्य मार्गदर्शन सद्‌गुरूकडूनच प्राप्त होत असते. गुरूभक्तीवाचून ज्ञान प्राप्त होत नाही, म्हणून ब्रह्मनिष्ठ गुरूजवळ जाऊन त्यांच्याप्रती उत्कट भक्तिभावना ठेवावी. गुरू अज्ञानाचा नाश करतो. तो सिद्धिदाता व पापहर्ता असतो.

**३) 'ज़कात' (धर्मदान, धर्मकर)**

तिसरे अनिवार्य कर्तव्य 'ज़कात' (कर्तव्य-दान) होय. ज़कात केवळ रोख रकमेपुरतीच नसून, सोने, चांदी, व्यापारी माल व पशुधनावरही लागू आहे. महान अल्लाहने प्रत्येक धनवान मुसलमानास हे कर्तव्य अनिवार्य ठरवले आहे की ज्याचेकडे कमीत कमी ४० रुपये शिल्लक व बचत सतत एका संपूर्ण वर्षाच्या काळात उरली असेल, तर त्या शिलकीपैकी एक रुपया त्याने आपल्या एखाद्या कफ़ल्लक नातेवाईकास किंवा एखाद्या लाचार माणसास, एखाद्या दारिद्र्यपीडितास, एखाद्या नवमुस्लिमास, एखाद्या प्रवासी माणसास किंवा एखाद्या कर्जबाजारी माणसास देवून टाकावा.

अशा तऱ्हेने, अल्लाहने धनवानाच्या संपत्तीमध्ये, गोरगरिबांसाठी कमीत कमी अडीच टक्के हिस्सा नियुक्त केला आहे. यापेक्षा जास्त प्रमाणांत एकाद्याने दान केले, तर तो उपकारक होईल व त्याचे पुण्य आणखी अधिक असेल. 'ज़कात' म्हणजे दानधर्म वा तन्निमित्र ठरावीक कर (म्हणजेच २.५०%) की जो खास परमेश्वरालाच अर्पून दिला जातो. त्या देण्याचे पुण्य आहे व त्याचे प्रतिफल परमेश्वरासमीप या जगातच दशपट आहे. ते जणू एक झाड आहे की, ते फुलत व फळत राहते; परंतु जेव्हा दानधर्म देण्यात आपला काही स्वार्थ असेल तर असल्या देण्याचे पुण्य नाही.

असे पाहा की हा तुमचा वाटा काही अल्लाहला पोहचत नाही. तो तुमच्या कसल्याही दानाचा गरजू नाही, परंतु त्याचा असा आदेश आहे की, तुम्ही माझ्याखातर आपल्या एकाद्या निर्धन बांधवास काही दान केले तर ते दान मला दिल्यासारखे आहे. त्या निर्धनातर्फे मी कितीतरी अधिक पटीने त्याचे फळ तुम्हाला देईन. अर्थातच त्यासाठी अट अशी आहे की, दान दिल्यानंतर तुम्ही केलेल्या उपकाराचा उच्चार करता कामा नये. दान घेतलेल्या माणसाला तुच्छ व क:पदार्थ लेखू नये. त्याचेकडून आभारप्रदर्शनाचीसुद्धा अपेक्षा बाळगू नये. तुम्ही केलेल्या दानकर्माचा लोकांमध्ये बोलबाला अगर प्रसिद्धी व्हावी व लोकांनी तुमच्या दानशौर्याचे कौतुक करावे अशी इच्छा बाळगू नये व तसा प्रयत्न करू नये. जर वरील सर्व अमंगळ विचार मनातून काढून टाकून अंत:करण पवित्र राखले व केवळ माझी प्रसन्नता प्राप्त करण्याखातर आपल्या संपत्तीमधून गोरगरिबांना हिस्सा द्याल, तर मी माझ्या अमर्याद संपत्तीमधून तुम्हाला इतके काही देईन, जे कधीही संपणार नाही.

महान अल्लाहने जसे नमाज़ (भक्ती), रोज़ा (उपवास व्रत) आमचेवर अनिवार्य केले आहेत, त्याचप्रमाणे ज़कातसुद्धा आम्हाला अनिवार्य कर्तव्य केले आहे. हा इस्लामचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. जक़ातला आधारस्तंभ यासाठी ठरवले गेले आहे की, ती ईश्वराखातर त्याग करण्याची व तिला प्राधान्य देण्याची भावना व जाणीव मुसलमानांत निर्माण करते; स्वार्थ, संकुचित मनोवृत्ती व संपत्तीलोलुपता यांसारखे दुर्गुण नष्ट करते. धनाची पूजा करणारी धनासक्त, लोभी व कृपण माणसे, तसेच पैशावर जीव ओवाळणारा माणूस, इस्लामसाठी अगदी कुचकामी आहे. जो माणूस आपले रक्त आटवून व घाम गाळून मिळालेली संपत्ती, आपल्या स्वतःच्या गरजेसाठी न वापरता अल्लाहच्या आज्ञेनुसार त्याग करू शकतो, तोच इस्लामच्या सरळ मार्गाने जाऊ शकतो. ज़कात अशा त्यागाचे धडे मुसलमानास गिरवावयास लावते व अल्लाहच्याखातर जेव्हा संपत्तीचा व्यय करण्याचा प्रसंग येतो, तेव्हा संपत्तीला उराशी कवटाळून बसू नये अशी त्याची घडण करून सोडते.

ज़कातचा ऐहिक लाभ असा की, मुसलमानांनी आपापसात एकमेकांना साहाय्य करावे. कोणीही मुसलमान उघडानागडा, भुकेलेला, तुच्छ व कःपदार्थ होऊ नये. श्रीमंतांनी गोरगरिबांना सावरावे व गरिबांनी भीक मागत फिरू नये. कोणाही व्यक्तीने आपली धनसंपत्ती केवळ आपल्या ऐषआरामासाठी व आपल्या शान व लौकिकासाठीच उधळू नये. उलट आपल्या संपत्तीत आपल्या जातीतील विधवांचा, अनाथ व पोरक्यांचा तसेच निराधार व निर्धनाचाही वाटा आहे, ही गोष्ट सतत लक्षात ठेवावी. जे लोक एखादे काम करण्याची क्षमता बाळगतात, परंतु केवळ भांडवलाअभावी ते करू शकत नाहीत, अशा असाहाय लोकांचाही आपल्या संपत्तीत काही हक्क व हिस्सा आहे ही गोष्टही लक्षात असावी. उपजत बुद्धिमान असून केवळ दारिद्र्यामुळे ज्यांना शिक्षण घेणे दुरापास्त होते, अशा बालकांचाही त्यात वाटा आहे. अपंगांचाही त्यात वाटा असतो. कोणतेही काम करण्यास असमर्थ असलेल्यांचाही त्यात वाटा असतो. या सर्वांचा हक्क जी व्यक्ती मानीत नाही ती जुलमी होय. तुमच्या जातीतील हजारो माणसे भाकरीसाठी तडफडत असतांना, हजारो कामगार बेकारीमुळे वणवण करीत भटकत असतांना, तुम्ही आपल्याजवळ पैशाच्या राशी बाळगून असावे, मोठमोठ्या हवेलीत विलासात व ऐषआरामात असावे, मोटारीत फिरावे यापेक्षा अधिक मोठा जुलूम व अन्याय कोणता असेल? इस्लाम अशा प्रकारच्या स्वार्थांधपणाशी शत्रुत्त्व करतो. श्रद्धाहीनांना त्यांची संस्कृती अशी शिकवण देते की, जी काही संपत्ती प्राप्त होते, तिचा संचय करून ठेवावा व व्याजापोटी तिची गुंतवणूक करून भोवतालच्या लोकांची मिळकतही आपल्याकडे ओरबाडून घ्यावी; परंतु मुसलमानांस त्यांचा धर्म अशी शिकवण देतो की, ईश्वराने तुमच्या गरजेपेक्षा अधिक आजीविका व मिळकत प्रदान केली, तर तिचा नुसता संचय करून ठेवू नका तर आपल्या गरजू बांधवांना ते द्या, जेणेकरून त्यांच्याही गरजा भागाव्यात व तुमच्याप्रमाणे तेही मिळवते बनावेत. (सय्यद अबुल आला मौदूदी, भाषांतर : अब्दुल हमीद शेख, 'इस्लाम प्रबोध', पृ. ८३-८५.)

ज़कातविषयी सूफ़ींचा दृष्टिकोन काहीसा असा आहे – ज़कात देणे मुसलमानांचे कर्तव्य आहे. स्थावर संपत्तीवर ज़कात आहे. ज़कात वार्षिक निव्वळ उत्पन्नावर २.५०% देणे सक्तीचे आहे. प्रेषित मुहम्मद[स.] म्हणतात, ''प्रत्येक बाबीसाठी सदक़ा (दान) आहे व घराचा सदक़ा पाहुण्यांची खोली आहे.'' माणसाला जे अनेक प्रकारचे फायदे ईश्वराकडून प्राप्त होतात, त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ज़कात, सदक़ा व दानधर्म केला जातो. शरीर, शरीरातील प्रत्येक अवयव अमूल्य संपत्ती आहे. त्यांच्यासाठी, ते सुरक्षित व

आरोग्यदायी राहावेत या उद्देशाने सदक़ा करण्याची आज्ञा आहे. ईश्वर ज्या देणग्या देतो, त्यासाठी उपकृत राहून दान देणे आवश्यक असते. सूफ़ींच्या बाबतीत या अपेक्षा निरर्थक आहेत, कारण एक तर ज़कात द्यावी लागेल इतकी रक्कम त्यांच्याजवळ येतच नाही व भौतिक जगाकडे त्यांनी पाठ फिरवलेली असते. शिबली म्हणत, ज़कात द्यायच्या कटकटीतून मुक्त होण्यासाठी आपल्याजवळ काही नसलेले बरे! प्रेषित मुहम्मद[स.] अबूबक्र, अली आदी याबाबतीत आदर्श होते.

प्रत्येक मुस्लिमास दान, ज़कात आणि सदक़ा याविषयी माहिती असलीच पाहिजे. ज़कात लागू होईल इतके उत्पादन नाही म्हणून ज़कातविषयी माहितीच घ्यायची नाही असे नाही. जे सूफ़ी दारिद्र्य लादून घेतात, ते ज़कात देत नाहीत व घेतही नाहीत. ज़कात न घेण्याचे कारण घेणाऱ्याचा हात खाली असतो, पण खरे तर ज़कात घेऊन ते ज़कात देणाऱ्यावर त्याचे कर्तव्य पूर्ण करण्यास मदत करून उपकार करतात. दर्वेश या जगतातले नसतात. ते प्रेषितांना येणारे नजराणे, भेटी वाटून टाकीत. (डॉ. अलीम वकील, 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी', पृ. २३७-३८)

**४) रोजा (उपवास व्रत)**

रोज़ा (उपवासव्रत) हे चौथे अनिवार्य कर्तव्य होय. हा रोज़ म्हणजे काय? नमाज़ ज्या धड्याची दररोज तुम्हाला पाच वेळा आठवण करून देत असते, त्याच धड्याची आठवण रोज़ा वर्षातून संपूर्ण एक महिनाभर सतत करून देत असतो. रमज़ानचा महिना येतो व सकाळपासून संध्याकाळ पर्यंत तुमचे खाणेपिणे बंद होते. 'सहरी' म्हणजेच प्रातराश (उपास करण्यापूर्वीचा फराळ किंवा अल्प आहार) करत असताना 'अज़ान' (नमाज़ पूर्वीची बांग) ऐकू येते व खाताखाता तुम्ही हात आवरता. त्यानंतर कसलेही पक्वान्न तुमचेसमोर आले, कितीही भूक अगर तहान लागली, मनाची कितीही तीव्र इच्छा झाली, तरी सूर्यास्तापर्यंत तुम्ही तोंडात अन्नाचा कणही घालीत नाही. केवळ लोकांसमक्षच खातपीत नाही, असे नव्हे, तर जेथे कोणी पाहणारा समक्ष नसतो, अशा एकांतातही पाण्याचा एक थेंबही अगर अन्नाचा एक कणही गिळणे, तुम्हाला शक्य होत नाही. पण ही सर्व बंधने एका विशिष्ट वेळेपर्यंत असतात. 'मग़रिब' (सूर्यास्तानंतरची) अज़ान ऐकूआल्याबरोबर तुम्ही उपवास समाप्त करण्यासाठी फराळावर तुटून पडता. त्यानंतर रात्रभर तुम्ही बिनदिक्कत व बिनधास्तपणे हवा तो पदार्थ खात असता. हे सर्व काय आहे, यासंबंधी विचार करा. या कृत्याच्या मुळाशी ईशभय आहे. तो सर्वव्यापी व सर्वसाक्षी आहे, यावर दृढ विश्वास आहे. मरणोत्तर जीवन व ईश्वरी न्यायालयावर ईमान (श्रद्धा) आहे. कुरआन व प्रेषिताच्या आज्ञांचे कडक पालन आहे. कर्तव्याची प्रखर जाणीव आहे. सहनशीलता, सोशीकपणा व संकटांना समोरे जाण्याच्या धड्याची उजळणी आहे. ईश्वरी प्रसन्नता प्राप्त होण्यासाठी मनाच्या इच्छा-वासना काबूत ठेवणारे बल आहे. दरवर्षी 'रमज़ान'चा महिना येतो, ज्यायोगे संपूर्ण तीस दिवस या रोज़ाद्वारे तुम्हावर संस्कार व्हावेत व तुमच्यात वरील सर्व गुण उत्पन्न होण्याचा प्रयत्न व्हावा व ज्या योगे तुम्ही पक्के व परिपूर्ण मुसलमान बनावे व या सर्व गुणांनी तुम्हाला अशा उपासनेस पात्र बनवून सोडावे, जशी उपासना एका सच्चा मुसलमानांस, आपल्या जीवनात पार पाडणे, हे कर्तव्य आहे.

पुन्हा असे पाहा की, सर्वश्रेष्ठ अल्लाहने 'रोज़ा' सर्व मुसलमानांसाठी एकाच महिन्यात अनिवार्य केला आहे, जेणेकरून सर्वांनी मिळून एकत्रितपणे 'रोज़ा' (उपवास व्रत) करावा व प्रत्येकाने स्वेच्छेनुसार वेगवेगळ्या

वेळी तो करू नये. असे केल्याने अन्य अगणित फायदेही आहेत. संपूर्ण मुसलमान वस्तीत सबंध महिनाभर पावित्र्य व मांगल्य ओतप्रोत भरलेले असते. सर्व वातावरण श्रद्धा व ईशभय व कर्तव्यपूर्तीची प्रबळ इच्छा, आचारशुद्धी व नैतिकता यांनी भरलेले असते. अशा वातावरणांत दुष्कृत्ये गाडली जाऊन सत्कर्मांना उधाण येते. सज्जन माणसे, सत्कर्म करण्यात एकमेकांना साहाय्य करित असतात. दुर्जन दुष्कर्म करण्यास संकोचतात, लाजतात.

निर्धनांना मदत करण्याची भावना धनिकांमध्ये निर्माण होते. ईश्वरीमार्गात धनसंपत्ती खर्च केली जाते. सर्व मुसलमान समान अवस्थेत असतात व असे समान अवस्थेत असणे, त्यांच्यात अशी जाणीव निर्माण करते की, ते एकाच समूहाचे घटक आहेत. त्यांच्यात बंधुभाव, सहानुभुती व आपसातील एकोपा निर्माण होण्यास, हे अत्यंत प्रभावी औषध आहे.

हे सर्व आमच्याच हिताचे आहे. आम्हाला उपाशी राखण्यात परमेश्वराचा कसलाही लाभ होत नाही. त्याने आमच्याच हितासाठी 'रमज़ान' महिन्यातील 'रोज़े' आम्हासाठी अनिवार्य ठरवले आहेत. कसलेही योग्य कारण अगर सबब नसताना, जे कोणी हे अनिवार्य कर्तव्य पार पाडीत नाहीत, ते खुद्द स्वत:वरच अन्याय करीत असतात. जे लोक रमज़ानच्या महिन्यात दिवसा उघडपणे खात-पित असतात, त्यांची तऱ्हा सर्वात जास्त लज्जास्पद आहे. असे करून जणू ते असे घोषित करतात की, ते मुसलमानसमूहापैकी नाहीतच. तसेच ते असे दर्शवत असतात की त्यांना इस्लामच्या अनिवार्य कर्तव्यांची कसलीही पर्वा नसून, ते इतके निर्ढावलेले आहेत की, ज्या ईश्वरास ते मानतात त्याच्या आज्ञा व आदेशही ते सरळ सरळ धाब्यावर बसवतात. आपल्या जमातीपासून वेगळे होणे ज्यांना सोपे आहे, ज्यांना आपल्या निर्माणकर्त्या व पालनकर्त्या-विरुद्ध बंड करताना थोडीसुद्धा लाज वाटत नाही व आपल्या धर्माच्या सर्वश्रेष्ठ नेत्याने ठरवून दिलेल्या नियमांचे जाहीर उल्लंघन करतात, त्यांच्याकडून कोणता माणूस कसली विश्वासार्हता, कसल्या प्रामाणिकपणाची व सदाचाराची, कसल्या कर्तव्यनिष्ठेची व कायदापालनाची अपेक्षा करू शकतो ते दाखवा. (सय्यद अबुल आला मौदूदी, भाषांतर : अब्दुल हमीद शेख, 'इस्लाम प्रबोध', पृ. ८२-८३).

'रोज़ा' हा उर्दू भाषेमधील प्रचलित शब्द आहे. याचा मूळ अरबी शब्द 'सौम' आहे. रोज़ा किंवा सौम हा इस्लामचा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा 'रमज़ान'च्या पवित्र महिन्यात महिनाभर पाळला जातो. याचा कालावधी प्रात:काळपासून सूर्यास्तापार्यंत असतो. 'सौम' या शब्दाचा धात्वार्थ आहे 'परावृत्त होणे.' अभद्र बोल (वाणी), कुविचार आणि दुष्कर्मे यापासून परावृत्त होण्याचे नाव आहे 'सौम.' म्हणजेच 'रोज़ा!' 'रोज़ा' एक उपासनाकर्म आहे. आध्यात्मिक उंची गाठण्यासाठी आणि शाश्वत मोक्ष प्राप्त करण्यासाठी केलेली एक उपासना किंवा प्रार्थनेचे नाव म्हणजे 'रोज़ा' (उपवासव्रत). हा एक प्रकारच्या स्वयंशिस्तीचा अभ्यास होय. त्यामुळे ईश्वरावरील आपली श्रद्धा दृढ होते. प्राणिमात्राचा मुकुटमणी असलेला मानव आणि ईश्वर यामधील अनुबंध या महिन्यात मज़बूत बनतो.

'रमज़ान' हा एक पवित्र महिना आहे. तो दैवी कृपेचा महिना आहे. या महिन्यात स्वर्गाची दारे सताड उघडी ठेवली जातात. प्रेषित मुहम्मद[स.] यांचा उवाच आहे, ''हा संयमाचा महिना आहे, आणि संयमाची बक्षिसी

स्वर्गप्राप्तीशिवाय अन्य काही नाही.'' सत्कर्म, उदारता, ईश्वर परायणता आणि सुधारणा घडवून आणण्याचा हा महिना आहे. आपल्या विगत पापांसाठी अल्लाहची क्षमा प्राप्त करण्याचा हा महिना आहे.

प्रेषित मुहम्मद[स.] म्हणतात, ''आपल्या बिछान्यात निद्राधीन असलेली उपवासव्रती व्यक्ती ही साक्षात उपासना अवस्थेत असते. निद्रेमधील तिचा प्रत्येक श्वास हा ईश्वरमहिमागान ('तम्बीह') असतो; आणि त्या व्यक्तीची निद्राच उपासना असते. लोकहो! या पवित्र महिन्यात जो कोणी उत्तम नैतिक आचरण आत्मसात करतो तो स्वर्गाकडे घेऊन जाणारा 'सिरात' हा केसाहून बारीक असलेला सन्मार्गाचा सेतू सहजतेने पार करेल, तर इतरांचे पाय त्यावर घसरत असतील.''

'रोज़ा'मुळे ईश्वराचा आशीर्वाद आणि त्याची कृपा प्राप्त होते, शिवाय त्याचे मोठे औषधी महत्त्वही आहे. उपवासव्रत निरामय आरोग्याची गुरुकिल्ली आहे. पुष्कळशा शारीरिक व्याधींचे निराकरण करणाचे साधन आहे. 'रोज़ा' हा शरीरस्वास्थ्यासाठीच उपयोगी नसून, त्यामुळे मनःस्वास्थ्य लाभून माणूस सदाचारप्रवृत्त होतो.

'रोज़ा' हा निराहारी, निर्जळी असा एक कडकडीत उपवासव्रत असतो. त्यांचा घनिष्ट संबंध केवळ पचनेंद्रियांशी म्हणजेच पोटाच्या भुकेशी नसून ज्ञानेंद्रिये आणि कर्मेंद्रिये यांच्याशी पण असतो. तोंडाने अभद्र बोलू नये, वाचेने अमंगळ उच्चारू नये, वासनामय कटाक्ष करू नये, परनिंदा करू नये व ऐकू नये, वाईटाकडे दृष्टिक्षेप करू नये, दुष्कर्मांपासून हातांना आवरून धरावे, पापमार्गाकडे पाय वळवू नयेत. क्रोधास नियंत्रणामध्ये ठेवावे, मनात दुष्ट भावना ठेवू नये. इतरेजनांच्या अहिताची कामना करू नये. अशा प्रकारे सर्व इंद्रियांवर संयमाने दमन करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते म्हणून रोज़ा पाळणाऱ्याने पंचज्ञानेंद्रियांवर नियंत्रण ठेवून आपले वर्तन राखावे. षड्रिपूंना डोके वर काढू देवू नये किंवा त्यांच्या आहारी जाऊ नये.

'रोज़ा'चा मुख्य उद्देश ईशभय आणि दुष्कर्मांपासून अलिप्तता हा आहे. भावना आणि वासनांवर नियंत्रण ठेवल्याने ईशभय निर्माण होते. भावना व वासना यांच्यावर नियंत्रण साध्य करण्याचे प्रशिक्षण म्हणजेच 'रोज़ा'. आध्यात्मिक बळ व उत्कर्ष साधण्यासाठी रोज़ा हे एक उत्तम साधन आहे. रोज़ामुळे माणसावरील वासनांचा व कामातुरतेचा पगडा अशक्त व निष्क्रिय होतो. इंद्रियदमन साध्य होते. मानसिक निर्धारशक्ती वाढते. अंतःकरण शुद्ध बनते. मन निर्मळ होते. रोज़ामुळे फक्त तहान व भूक यावर नियंत्रण ठेवले जात नसून त्याच्यामुळे परमेश्वराच्या मर्यादांचे सतत स्मरण ठेवले जाते. इंद्रियदमन केल्याने संयम व सहनशक्तीचे महत्त्व कळून येते. नैतिक शुद्धतेचे महत्त्व वाढते. यामुळे सदाचार व प्रामाणिकपणा वाढीस लागतो. ईशभयामुळे माणसात नैतिकता वाढीस लागते. 'रमज़ान' महिन्याचा पवित्र रोज़ा म्हणजे मनाची शुद्धता होय. या उपवासव्रतामुळे आत्म्याच्या शुद्धीकरणावर व निर्मलतेवर भर दिला जातो. रोज़े (उपवास) म्हणजे मानवी मन, विचार, कृती, आचार व कर्माची पवित्रता होय. रोज़ाच्या नियमितपणात मांगल्य, निर्मलता, शुद्धता व पवित्रता सामावलेली असते.

'रोज़ा'संबंधी कुराणोक्त ईश्वराज्ञा, नियम, अटी व त्याचे फायदे याप्रमाणे आहेत – ''अहो श्रद्धावंतांनो! ज्याप्रमाणे तुमचे पूर्वीच्या (ग्रंथधारी) लोकांस उपास पाळणे अनिवार्य कर्तव्य केले गेले होते, त्याचप्रमाणे ते तुम्हांसाठीही अनिवार्य कर्तव्य केले गेले आहे; अशासाठी की तुम्ही (कित्येक पापांपासून) कदाचित जपाल. (अर्थात संयमी बनाल.) (तेही) गणतीचे काही दिवस (होत). यावरही जो कोणी तुमच्यातून आजारी असेल, अगर प्रवासात असेल तर इतर दिवसातून गणती (त्याने) पुरी करावी आणि ज्यांना भोजन देण्याचे सामर्थ्य आहे

त्यांच्यावर (एका उपासाचा) मोबदला एका (मोताद) गरिबास भोजन घालणे हे होय. आणि जो कोणी आपखुषीने (हे) पुण्य-कृत्य इच्छील, तर ते त्याचे ठायी अधिक उत्तम होय आणि जर तुम्ही समजाल तर उपवास करणे हे (काही झाले तरी) तुमच्यासाठी उत्तमच होय. (उपवासांचा) महिना रमज़ानचा (महिना) होय की ज्यात (उपवास करण्याच्या आज्ञेविषयी परमेश्वराकडून) कुरआन प्रकट झाले आहे; (व कुरआन हे) लोकांस सन्मार्गदर्शक होय. तर (श्रद्धावंतांनो!) तुमच्यातून जो कोणी या महिन्यात (घरी) हजर असेल त्याने या (महिन्या)चे उपास पाळावेत. आणि जो कोणी आजारी असेल अगर प्रवासात असेल तर इतर दिवसांतून गणती (त्याने पुरी करावी) परमेश्वर तुम्हासाठी सुसाध्यता इच्छितो व तो तुम्हांवर सक्ती करू इच्छित नाही. आणि (हे नियम त्याने यासाठी घालून दिले आहेत) की तुम्ही (उपासांची) गणती पुरी करावी व हे की परमेश्वराने जो तुम्हास मार्ग दाखवला आहे त्या (उपकारा)बद्दल तुम्ही त्यास गौरवावे व तुम्ही (त्याची) उपकार स्तुती करावी.'' २:१८३-८५.

''(श्रद्धावंतांनो!) उपवासांचे रात्रीत तुम्हास आपल्या पत्न्यांपाशी जाण्याची मुभा दिली गेली आहे. त्या तुमच्या पदर होत व तुम्ही त्यांचा पदर आहा. परमेश्वराने पाहिले की, तुम्ही (चोरीछुपी त्यांचेपाशी गेल्याने) खुद्द आपलेच (धार्मिक) नुकसान करीत होता, म्हणून त्याने तुमचा पश्चाताप मान्य केला व तुमच्या अपराधांची क्षमा केली. तर आता (उपवासात रात्रीचे समयी) तुम्ही त्यांच्याशी अंगसंग करा; आणि (अंगसंगाच्या परिणाम) जी (पुत्रप्राप्ती) परमेश्वराने तुम्हांसाठी लिहून ठेवली आहे तिची आकांक्षा करा (निव्वळ कामतृप्तीचे नादास लागू नका). आणि तुम्ही खा व प्या, येथपर्यंत की (रात्रीचे) काळ्या धारेपासून प्रातःकालची पांढरी धार तुम्हास स्पष्ट दिसून येऊ लागेल. नंतर रात्र (पडे)पर्यंत उपास पुरा करा आणि (होय) तुम्ही मशिदीत व्रतस्थ असाल, तर (रात्रीही) त्यांच्यापाशी अंगसंग करू नका. ह्या परमेश्वराच्या (ठरावीक) मर्यादा होत; तर तुम्ही त्यांच्या जवळही फिरकू नका. अशाच तऱ्हेने परमेश्वर आपले नियम लोकांस स्पष्ट करून सांगतो की, कदाचित ते (आज्ञाभंगास) जपून वागतील.'' २:१८७ (डॉ. मौलवी मीर महंमद याकूब खान, 'पवित्र कुराण', पृ. ७१-७५)

ईश्वराने सांगितले, ''श्रद्धावंतांनो! उपवास तुमच्यासाठी योजलेले आहेत. उपवास माझ्यासाठी आहेत. त्याच्या मोबदला देणे माझा सर्वोत्तम हक्क आहे.'' याचा अर्थ मोबदल्यास सीमा नाही. सूफ़ीमार्गाचा अर्धा मार्ग उपवास आहे. प्रत्येक महिन्याच्या तेरा, चौदा आणि पंधरा तारखेस सूफ़ी उपवास ठेवत. या दिवसांना श्वेत दिवस म्हणतात. काही सूफ़ी सातत्याने वर्षानुवर्ष उपवास ठेवण्याचा सल्ला देत. उपवासापेक्षा कमी दर्जाची बाब म्हणजे भुकेलेले राहणे. पृथ्वीतलावरील लोकांची भूक हे ईश्वराचे अन्न आहे.

उपवासकाळात अन्नपाण्याचा त्याग करणे ही मोठी गोष्ट नाही, तर स्वतःच्या संपूर्ण वासनांवर नियंत्रण ठेवणे अपेक्षित आहे. जेव्हा माणूस दैवीकृपेने पापांपासून सुरक्षित असतो तेव्हा माणूस आयुष्यभर उपवास करत आहे, असा अर्थ होतो.

**भुकेविषयी :** भूक बुद्धी तल्लख करते, आरोग्य चांगले ठेवते. प्रेषितांनी उपदेश केला, ज्याचा भावार्थ असा की - तुमची पोटं भुकेलेली ठेवा, यकृत तहानलेले ठेवा, शरीरं उघडी ठेवा, शक्यता आहे - या भौतिक जगात तुम्हाला ईश्वराचे दर्शन होईल. भुकेमुळे शरीराला त्रास होतो, असे म्हणतात. पण उपवासाने हृदय प्रज्वलित होते. आत्मा शुद्ध होतो. ईश्वराच्या उपस्थितीत जाण्याची संधी असते. (डॉ. अलीम वकील, 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी', पृ. २३८-३९)

### ५) हज (महातीर्थयात्रा)

हज हे पाचवे अनिवार्य कर्तव्य आहे. सबंध आयुष्यभरात फक्त एकदाच ते पार पाडणे अगत्याचे आहे व जो कोणी पवित्र 'मक्का' शहरापर्यंत जाण्या-येण्याचा खर्च करण्याची क्षमता बाळगतो, केवळ त्यांवरच हे कर्तव्य अनिवार्य केलेले आहे.

आज ज्या ठिकाणी 'मक्का' शहर बसलेले आहे त्याच जागी अनेक वर्षांपूर्वी पैगंबर हजरत इब्राहीम[अ.]नी अल्लाहची उपासना करण्याखातर एक छोटेसे घर बांधले होते. अल्लाहने त्यांच्या निष्ठेची व प्रेमाची अशी काही कदर केली की, त्या छोट्याशा घराला आपले घर घोषित केले व असा आदेश दिला की, ज्या कोणाला आमची उपासना, आराधना करावयाची असेल त्यांनी या घराच्या दिशेने आपले तोंड करून ती करावी. पुढे असेही फर्मावले की जगातील कोणत्याही भागात व कानाकोपऱ्यात राहणारा असो, त्याची ऐपत असल्यास आयुष्यातून एकदा तरी या घराचे दर्शन घेण्याखातर यावे व आमचा अतिप्रिय दास इब्राहीम जितक्या प्रेमाने व मनोभावाने या घराला प्रदक्षिणा घालीत असे, तशाच प्रेमाने व मनोभावाने या घराला प्रदक्षिणा घालावी. पुढे असाही आदेश दिला की, तुम्ही जेव्हा आमच्या घराकडे याल तेव्हा आपली अंत:करणे निर्मळ करा. आपल्या वासनांना आळा घाला. रक्तपात, अनाचार, अर्वाच्य बोलणे यापासून दूर राहा. आपल्या स्वामीच्या दरबारात जितक्या अदबीने व नम्रतेने जाणे आवश्यक असते तशाच पद्धतीने आमच्या घरात दर्शन करावे. जो पृथ्वी व आकाशांचा धनी आहे व ज्याच्या तुलनेत सर्व मानव क्षुल्लक याचक आहेत, अशा सम्राटाच्या सेवेत रूजू होण्यासाठी आपण चाललो आहोत असे समजा.

अशा प्रकारची नम्रता धारण करून अगदी अंत:करणापासून जेव्हा तुम्ही आमची उपासना कराल, तेव्हा आम्ही आपल्या देणग्यांनी तुम्हाला धनसंपन्न करून सोडू.

एका अर्थाने विचार केल्यास हज ही सर्वांत महान उपासना आहे. अल्लाहचे प्रेम जर माणसाच्या अंत:करणात नसेल तर, आपली सर्व कामे व व्यवहार टाकून देऊन आपल्या सर्व प्रियजनांचा व नातेवाईकांचा विरह सहन करून, इतक्या लांबच्या प्रवासाची दगदग कशासाठी सोशील? म्हणूनच हज यात्रेचा इरादा करणे हाच मुळी अल्लाहच्या प्रेमाचा व निष्ठेचा पुरावा होय. हज यात्रेसाठी जेव्हा माणूस निघतो, तेव्हा त्याची अवस्था इतर प्रवासाच्या प्रसंगासारखी नसते. या प्रवासात माणसाचे सर्व लक्ष अल्लाहकडे जास्त असते. त्याच्याबद्दल मनात ध्यास व उत्कटता वाढत असते. 'काबा' जसजसा जवळ येत असतो तसतसे हा प्रेमाग्नी अधिकच उफाळतो. दुष्कृत्ये व पापकृत्ये याबद्दल माणसाचे मन आपोआपच तिरस्कार करू लागते. हातून घडलेल्या पापकर्माबद्दल मनात खजीलपणा निर्माण होतो. भविष्यकाळात आज्ञापालनाची सुबुद्धी व सन्मती प्रदान करण्याविषयी अल्लाहची याचना करीत असते. जप व अल्लाहचे स्मरण व उपासनेत अधिकाधिक रस वाटू लागतो. नमाज़मध्ये असताना अल्लाहसमोर मस्तक टेकण्याचा काळ प्रदीर्घ होऊ लागतो व खूप वेळ झाला तरी मस्तक वर करण्यास मन तयार नसते. कुरआन पठण करताना त्यातून आगळा आनंद मिळू लागतो. रोज़ा (उपवासव्रत) केला असतांना त्याची वेगळीच गोडी अनुभवू लागतो व जेव्हा तो अरबस्तानच्या भूमीत पाऊल ठेवतो, तेव्हा इस्लामचा संपूर्ण प्राथमिक इतिहास त्याच्या नजरेपुढून सरकू लागतो. जागोजागी व पावलोपावली अल्लाहवर उत्कट प्रेम केले त्यांची व त्याचेखातर प्राण कुर्बान (बलिदान, अर्पण) केलेल्यांची चिन्हे व अवशेष

दृष्टीस पडू लागतात. तेथील वाळूचा कणकण इस्लामच्या महानतेची साक्ष देत असतो. प्रत्येक कण व दगडगोटे असा गजर करीत असतात की याच भूमीतून अल्लाहच्या संदेशाचे प्राबल्य वाढले. अशा तऱ्हेने मुसलमानांची अंत:करणे अल्लाहचे प्रेम व इस्लामवरील प्रेमाने ओसंडू लागतात व त्याचा असा काही चिरकाल टिकणारा ठसा त्यांच्या मनावर उमटतो की मरेपर्यंत तो त्याच्या मनातून पुसला जात नाही.

धर्मकर्माबरोबरच इहलौकिकही अनेक फायदे हजयात्रा करण्यामध्ये कृपाळू अल्लाहने ठेवलेले आहेत. हजच्या कारणानेच मक्का शहर हे जगातील सर्व मुस्लिमांचे मध्यवर्ती केंद्र केले गेले आहे. एकाच विशिष्ट वेळी अल्लाहचे नामस्मरण करणारे लाखो मुसलमान जगातील विभिन्न ठिकाणाहून येऊन तेथे एकत्रित होतात. एकमेकांना भेटतात, आपापसात इस्लामी प्रेम प्रस्थापित होते. मुसलमान, मग तो कोणत्याही देशाचा अगर कोणत्याही वंशाचा असला तरी, सर्व एकराष्ट्र असून एकमेकांचे बंधू आहेत, असा ठसा मनावर उमटतो. या आधारे जर एकीकडे हजयात्रा अल्लाहची उपासना आहे; तर त्याच्याबरोबर दुसऱ्या अंगाने ती जगातील एकूण मुसलमानांची आंतरराष्ट्रीय महापरिषद किंवा महासंमेलनही आहे. तसेच मुसलमानांमध्ये विश्वबंधुत्व व एकोपा निर्माण करण्याचे सर्वात मोठे साधन आहे. (सय्यद अबुल आला मौदूदी, भाषांतर : अब्दुल हमीद शेख, 'इस्लाम प्रबोध', पृ. ८५-८६).

हजविषयी सूफ़ींचा दृष्टिकोन असा आहे – वयात आलेल्या, निरोगी, वेडसर नसलेल्या प्रत्येक मुस्लिमास हज करणे सक्तीचे आहे. मात्र सांपत्तिक स्थिती ठीक नसेल, तर हज कर्तव्य राहत नाही. हजचा खास पोषाख असतो. ते म्हणजे दोन पांढरी, न शिवलेली वस्त्रे होय. त्याला 'एहराम' म्हणतात. 'हज' आणि 'उमरा' (हजचा महिना सोडून इतर वेळी मक्का आणि मदिना या शहरांना ही धार्मिक भेट असते.) मध्ये 'काबा'ला प्रदक्षिणा घातल्या जातात. 'सफ़ा' आणि 'मखा' या दोन टेकड्यांच्या दरम्यान चालणे व एका विशिष्ट जागी पळणेही असते. 'हरम' म्हणजे पवित्र प्रदेश. त्यात इब्राहीम या प्रेषितांची दोन स्थानके आहेत. शारीरिक स्थानक मक्का, तर आध्यात्मिक स्थानक ईश्वराशी 'मैत्री' हे आहे. ज्या लोकांना शारीरिक स्थानकाची गरज असते, त्यांनी शरीराशी संबंधित सगळ्या वासनांचा त्याग केला पाहिजे. हज यात्रेचा पोषाख 'कफ़न' म्हणजेच प्रेतवस्त्रासारखा असतो. सर्व प्रकारची हिंसा टाळावयाची असते. अराफ़तच्या मैदानात जाणे, नंतर मुजदलफ़ाला जाणे, तेथे खडे वेचणे, मग मअशर हरामला जाणे, 'काबा'ला प्रदक्षिणा घालणे, मग मीना शहरात जाणे, तेथे तीन दिवस राहणे, ठरावीक पद्धतीने शैतानास खडे मारणे, नंतर केस कापणे व बलिदान (कुर्बानी) करणे. यानंतर हज करणारा नेहमीचे कपडे घालू शकतो. हजमधील सर्व संस्कारांना सूफ़ी वेगळा अर्थ देतात. अराफ़तच्या मैदानामध्ये हजयात्रीक जो उभा असतो तो, मारेफ़त (ब्रह्मज्ञानी)च्या पाठीवर उभा असतो. मुजदल्फ़ा प्रेमाचे प्रतीक आहे. प्रदक्षिणा (परिक्रमा) दैवी शुद्धतेसाठी असते. खडे फेकणे म्हणजे सर्व प्रकारचे वाईट विचार फेकून देणे आहे. मीनामध्ये श्रद्धेची बळकटी आहे. बलिदान म्हणजेच कुर्बानी, कनिष्ठ आत्मा म्हणजेच वासनांचा त्याग आहे. स्वत्वाचा विलय होऊन मैत्रीच्या स्थानकाशी आगमन आहे. शारीरिक स्थानकात पुनर्प्रवेश, शत्रूपासून, त्यांच्या तलवारीपासून संरक्षण आहे; पण आध्यात्मिक स्थानकात जाणे म्हणजे ईश्वरापासून वेगळे न होण्याचा परवाना आहे. जेथे स्वत्वाचा विलय आहे. तेथे ईश्वराच्या घराचा संबंध राहत नाही. सर्व जग ईश्वराचे घर बनते. ध्यानधारणेपर्यंत सूफ़ींची मजल असेल, तर ईश्वराच्या घराची गरज असते. जगात सर्वात काळीकुट्ट जागा कोणती

असेल, तर प्रेयसीविना तिचे घर. काबा महत्त्वाचा नाही तर मैत्रीच्या घरात झालेला स्वत्त्वाचा विलय महत्त्वाचा आहे. काबाचे दर्शन केवळ कारण आहे, निमित्त आहे.

जुन्नून मिसरींनी मीनामध्ये एका तरुणाला पाहिले. सर्व लोक 'कुर्बानी' म्हणजेच पशूंचा बळी देण्यामध्ये मग्न होते, परंतु हा तरुण आपल्या जागेवर स्थिर आणि स्तब्ध बसलेला होता. मी सतत त्याच्याकडे लक्ष देऊन होतो की, पाहू या, हा काय करतोय? आणि हा आहे कोण? इतक्यात तो किंचाळला – ''हे परमेश्वरा! सर्व लोक बलिदान प्रक्रियेमध्ये व्यस्त आहेत आणि मी अशी इच्छा बाळगून आहे की तुझ्या वैभवशाली दरबारामध्ये मी माझ्या वासनेचा बळी द्यावा. मजकडून हेच बलिदान आहे. त्याचा स्वीकार कर.'' असे म्हणून त्याने गळ्याकडे आपली तर्जनी वळवली (जणू 'तकबीर' [अल्लाह सर्वात मोठा आहे] म्हणत आहे) व क्षणात जमिनीवर खाली कोसळला. नंतर मी बारकाईने त्याला पाहिले तेव्हा तो मृत्यू पावलेला आढळला. (डॉ. अलीम वकील, 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी', पृ. २३९-४०)

२२

## प्रकरण – २२

# सूफ़ी – प्रेमपंढरीचे वारकरी

१) क्षण एक पुरे **प्रेमाचा** । वर्षाव पडो मरणांचा ।। – गोविंदाग्रज (कै० राम गणेश गडकरी)

२) **प्रेम** आणि कृपा यांचा खजिना म्हणजे **परमेश्वर.**

३) **प्रेम** आत्म्याचे भोजन आहे.

४) **प्रेम** म्हणजे देहभानरहित होऊन केलेली ईश्वराची **भक्ती.**

### १) प्रेम – दार्शनिक विवेचन

### क) प्रेम : दार्शनिक पैलू

सर्व विषयांचा द्रष्टा असा पिंडातील आत्मा व ब्रह्मांडाचा चालक परमेश्वर अथवा परब्रह्म हे एकच तत्त्व आहे, असा उपनिषदकारांचा सिद्धान्त आहे. अयमात्माब्रह्म। तद्ब्रह्म स आत्मा। 'माणसातील आत्मा आणि आदित्यातील पुरुष हे एकच आहेत'. – (ईश उपनिषद – १६ व तैत्तिरिय उपनिषद – २.८) परमेश्वर या विश्वाच्या अतीत आहे ही ऋग्वेदकालीन कल्पना उपनिषदत्कालात बदलून तो विश्वाला अंतर्बाह्य व्यापून राहिला आहे, ही कल्पना मान्य झाली. अनंत सांताच्या अतीतच नाही, तर ते सांतांत ओतप्रोत आहे. उपनिषद ऋषींनी अंतःसृष्टी हे आत्मशोधनाचे क्षेत्र केल्याचे हे फळ आहे. प्लेटो जन्माला येण्यापूर्वीच ज्ञाता व ज्ञेय यांच्या एकत्वाचा शोध आर्य ऋषींनी लावला होता. आत्मा व ब्रह्म हे एकच आहेत. हे उपनिषदकार ऋषींनी प्रथम जाणले, म्हणून ते अमर, कीर्तीच्या सिंहासनी कायमचे विराजमान झाले आहेत. (Deussen - 'Philosophy of the Upnishads', pp. 39-40) आत्मब्रह्मैक्य ही एक गृहीत धरलेली अस्पष्ट कल्पना नाही. मानवी बुद्धी, भावना व इच्छाशक्ती यांच्या स्वरूपाच्या विश्लेषणातून निष्पन्न होणारा तो अपरिहार्य सिद्धान्त आहे. निसर्ग जर अनाकलनीय, अजेय व प्रेम करण्यास अयोग्य असता तर मानवाला त्याचा विचार करणे, त्याला जिंकणे व त्याच्यावर प्रेम करणे शक्य झाले नसते. निसर्ग मनुष्यासाठी आहे. आकाशातील तारे त्याचा जीवनपथ उजळण्यासाठी आहेत, तर अंधार त्याच्या सर्व बाह्यप्रवृत्ती शांत करून त्याला निद्रादेवीच्या मांडीवर विश्रांती देण्यासाठी आहे. जीवाला शिवाचे ज्ञान संपादन करता यावे याच उद्देशाने ही सृष्टीची शाळा परमेश्वराने उघडली आहे. 'ते ब्रह्म स्वतःचे स्वरूप स्पष्ट करावे म्हणून नानाविध सृष्ट पदार्थांच्या रूपांनी प्रकट झाले. परमात्मा आपल्या शक्तींनी सृष्टिरूप होऊन सृष्टिचक्र चालवत आहे.' (बृहदारण्यक उपनिषद – २.५.१९.) परमात्मा या सृष्टीला निर्माण करतो. तिच्यात चैतन्य घालतो व तिला चालवितो. बाह्य सृष्टीतील नामरूपाखाली

आच्छादित झालेले ब्रह्मतत्त्व व शरीराची उपाधी धारण केलेला आत्मा एकच आहेत. तसेच परमेश्वर आणि त्याने निर्माण केलेली सृष्टीही तत्त्वत: एकच आहेत व त्याचे पूर्ण ज्ञान संपादन करण्यानेच मानवी जीवनाचे सार्थक होते. असा मनुष्य प्रथम विचार करू लागला तेव्हापासून भक्तांचा सिद्धान्त आहे. माणसात आढळणारी साक्षात्काराची तळमळ व **पावित्र्यप्रेम** ही 'तत्त्वमसि'– ते तू आहेस – या सत्याचा पुरावा आहेत. ईश्वर हे ब्रह्माचे सगुण स्वरूप असून अध्यात्मजीवनाचे ते परम साध्य आहे.

''परमेश्वर हा नैतिक गुणांची साक्षात मूर्ती होय. म्हणून **'सर्वांभूती प्रेम'** हे आचरणात आणले पाहिजे. आध्यात्मिक गुणांचे संश्लेषण किंवा समन्वय हे धर्माचे उद्दिष्ट आहे व या उद्दिष्टाचा भर एकेश्वरवादी सत्तेवर अधिष्ठित अशा धार्मिक अनुभूतीच्या एकतेचा आहे.'' राजा राममोहन रॉय. पूर्णाकडे जाण्याच्या अंत:करणातील नैसर्गिक तळमळीमुळे मनुष्य जो प्रयत्न करतो तीच नीती होय. आध्यात्मिक भाषेमध्ये असे म्हणता येईल – ईश्वराकडे जाण्याच्या अंत:करणातील नैसर्गिक तळमळीमुळे भक्त जी **प्रेममय मधुराभक्ती** करतो तीच नीती होय. आपल्या हृदयसिंहासनी विराजमान झालेल्या आत्मराजाची ती आज्ञा होय. नैतिकजीवनाला जेवढ्या द्वैताची जरूर आहे तेवढे हे द्वैत उपनिषदांनी मानलेले आहे; पण आत्मा दिक्, काल व द्वैत यांच्यापलीकडे आहे. म्हणूनच 'द्वैताच्या पलीकडे जा' हा उपदेश सार्थ ठरतो. मोक्ष म्हणजे मुक्ती किंवा सुटका. कशापासून मुक्ती? देहभावना व विषयासक्ती यांच्यापासून मुक्ती. अल्प व सांत यांच्यापासून सुटका. सर्व भूतांना आत्म्यामध्ये पाहणे हा पूर्ण सदाचार होय. नीतीचे हे ध्येय साध्य व्हावयाचे तर मनुष्याने व्यक्तित्वाची संकुचित कुंपणे मोडून सर्व भूते आत्मवत मानली पाहिजेत. जडत्व व चैतन्य यांच्यामधील सांध्यावर मनुष्य उभा आहे. मनुष्यप्राणी हा दैवी व आसुरीवृत्तींच्या युद्धाचे कुरूक्षेत्र असल्यामुळे नीतीच्या प्रश्नाला फार महत्त्व आहे. माणसाचा जन्म जणू या युद्धासाठीच आहे व त्याचा विकासही या युद्धातूनच होतो.

आत्मसाक्षात्कार हे नीतीचे ध्येय आहे. आत्मस्वरूपी स्थिर झालेल्या पुरुषाचे आचरण हेच नैतिक आचरण होय. जीवनाच्या विकासासाठी विकार, लालसा, वासना व आकांक्षा यांचे नियंत्रण करणे जरूर आहे. इंद्रियसुख आणि वासनातृप्ती म्हणजे नैतिक जीवन नव्हे. बुद्धी व ज्ञान हे नैतिकजीवनाचे आधार आहेत. उपनिषदकारांनी हे तत्त्व मनुष्याच्या मनावर बिंबवण्यासाठी सुंदर रूपकाचा आश्रय केला आहे : ''आत्म्याला रथी, शरीराला रथ, बुद्धीला सारथी, मनाला लगाम समजावे. इंद्रियरूपी घोडे विषयाच्या मार्गावरून जातात. शरीर, इंद्रिये व मन यांनी युक्त असलेल्या आत्म्याला विवेकी पुरुष भोक्ता असे म्हणतात. सारथ्याला जसे आपले दांडगे घोडे आवरता येत नाहीत, त्याप्रमाणेच ज्या माणसाची बुद्धी अज्ञानी व मन अशांत असते, त्याला इंद्रिये आवरता येत नाहीत. उलट, कुशल सारथी जसे आपले घोडे नीट चालवू शकतो, त्याप्रमाणे ज्ञानी व शांतचित्त पुरुषांना आपली इंद्रिये आपल्या ताब्यात ठेवता येतात.'' (कठोपनिषद–१.३.३–६) आत्मा हीच खरी प्रिय वस्तू आहे असे समजून त्याची उपासना करावी.

ज्याप्रमाणे जीव त्याचप्रमाणे जगही आत्म्यापासूनच निर्माण झाले आहे, हे माणसाने सदैव लक्षात ठेवले पाहिजे, असे उपनिषदांचे सांगणे आहे. जग आपणच आहोत या भूमिकेतूनच माणसाचा सर्व व्यवहार झाला पाहिजे. यामुळे माणूस अहंकारी व स्वार्थी बनेल असे कोणी म्हणेल; पण उपनिषदांच्या मते आत्मप्रेम म्हणजे स्वार्थ किंवा अहंकार नव्हे. याज्ञवल्क्य म्हणतो, **'आत्मप्रेम** हाच सर्व **प्रेमांचा** आधार आहे'. धनप्रेम, पुत्रप्रेम,

वंशप्रेम, आणि  राष्ट्रप्रेम ही सारी आत्मप्रेमाचीच विशिष्ट स्वरूपे आहेत. सांत वस्तूवरील प्रेम साधनरूप आहे, अनंतावरील प्रेम हेच खरे साधन आहे. याज्ञवल्क्य म्हणतो, ''मैत्रेयी! पतीसाठी पती पत्नीला प्रिय नसतो, तर आत्म्यासाठी प्रिय असतो.'' (बृहद्धारण्यक उपनिषद, २-४-५). हाच न्याय माणसाच्या सर्व वस्तूंवरील प्रेमाला लागू आहे. मनुष्याचा स्वभाव बरा-वाईट असला, तरी त्याच्या अंत:करणात **प्रेमभावना** ही असतेच, कारण **प्रेम करणे** हा माणसाचा स्वभावच आहे. अंत:करणाच्या विकासाबरोबर **प्रेमाचाही विकास** होतो. दांपत्यसंबंध, संतती व संपत्ती हे कौटुंबिक प्रेमाचे विषय होत. मनुष्याच्या अंत:करणात कौटुंबिक प्रेम पुष्कळच असते. कुटुंबाबद्दल आपलेपणाची भावना माणसात असते म्हणून त्याचे कुटुंबावर प्रेम असते. जेथे आपलेपणाची भावना नाही तेथे **प्रेम** वसत नाही. व्यक्तीला स्वत:च्या सुखासाठी आणि विकासासाठी कुटुंबाची अपेक्षा असते. त्याचप्रमाणे त्याला समाजाचीही अपेक्षा असते. समाज संस्थेच्या योगानेच व्यक्तीला ऐहिक व पारमार्थिक कल्याण संपादन करता येते. विचारशील मनुष्याला समाजसंस्थेची योग्यता व उपयुक्तता कळते  व म्हणून कुटुंबाप्रमाणेच समाजाविषयीदेखील त्याच्या मनात आत्मीय भावना असते. ज्या मानाने बौद्धिक विकास होत जातो त्यामानाने मनुष्याची ही आत्मीय भावना विस्तृत होत जाते व त्या प्रमाणात **प्रेमाचे क्षेत्रही** वाढत जाते. सर्व भूतांवर किंवा जगतावर **प्रेम करणे** हेच साधुत्वाचे लक्षण होय. 'वसुधैव कुटुंबकम्' ही वृत्ती बौद्धिक विकासाची, आत्मीय भावनेची व **प्रेमाची परमसीमा** होय.

प्रेम स्वत:सिद्ध आत्म्याचे भोजन आहे. आत्मा धर्माने पवित्र होतो. भक्ती, प्रेम व सदाचरण हीच आत्म्याच्या उन्नतीची खरी साधने होत. श्रद्धा ही भक्तीचा अविभाज्य घटक आहे. ईश्वराचे दर्शन दृष्टीने नव्हे तर श्रद्धेने घडते. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय ईश्वरप्राप्ती आहे. वेदामध्ये एक लहानशी प्रार्थना आहे - 'परमेश्वरा! जगातील सर्व पदार्थांना प्रेमाच्या दृष्टीने बघण्याचे डोळे मला दे.' प्रेम डोळ्यांनी बघत नाही, तर ते हृदयाने-अंत:करणाने पाहते. प्रेम हा स्वर्गाकडे घेऊन जाणारा मार्ग आहे. शुद्ध प्रेम आत्म्याचे असते, देहाचे नव्हे. वासनामय प्रेम मनुष्यासाठी ईश्वराविषयक प्रेमाकरिता अडथळा ठरतो. जगामध्ये चिरकाल टिकणारी गोष्ट प्रेमच आहे. पृथ्वीसाठी जसे सूर्य तसेच नैतिकतेसाठी प्रेम. प्रेम ईश्वराचे सारसर्वस्व आहे; ईश्वर प्रेम आहे. ''जो प्रेमामध्ये असतो तो आपल्या प्रभूमध्ये असतो. आणि प्रभू त्यांच्यामध्ये'' - बायबल. प्रेमाचे सार आहे संपूर्ण आत्मविसर्जन व संपूर्ण पारस्परिकता. जेव्हा मनुष्य प्रेममय बनतो तेव्हा तो ईश्वराची प्रतिकृती बनतो. प्रेमाचे एकच कार्य असते- ते म्हणजे वाईटास  चांगुलपणाने जिंकणे. ईश्वरावर प्रेम करणारास प्रत्येक वस्तुमध्ये चांगुलपण दिसते. प्रेम ईश्वरीय सौंदर्याची भूक आहे. प्रेम ही अंत:करणांना उघडणारी सोनेरी चावी आहे. प्रेम दयाळू  कामांमध्ये दिसून येते आणि मृदुल ध्वनींमध्ये ऐकू येते. प्रेमामुळे द्वेष नष्ट होतो. प्रेम करणे हा जीवाचा स्वभाव आहे. ज्ञानीचे प्रेम वैराग्यामध्ये असते, कामीचे प्रेम संसारामध्ये असते तर भक्ताचे प्रेम भगवंतामध्ये असते.

सूफ़ी सिद्धान्तामध्ये प्रेमाप्रमाणेच ज्ञानाला पण महत्त्व आहे. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार स्वतंत्र व नित्य वस्तूंचे यथार्थ स्वरूप स्पष्ट करणे म्हणजे ज्ञान होय. 'हा ईश्वर व त्याहून वेगळा असा मी जीव, हा ईश्वर माझा स्वामी असून मी जीव त्याचा सेवक आहे' असे जीवाला पटवून देणे व तशी त्याला प्रचीती आणून देणे हे ज्ञानाचे कार्य होय. ज्ञान हेच मोचक आहे. ज्ञानाचा अधिकार परमेश्वराच्या भजनानेच प्राप्त होतो.

भक्ताच्या बाबतीत ही ज्ञानप्राप्तीची प्रक्रिया थोडीशी वेगळी असते. परमेश्वर भक्ताला **दृष्टीद्वारे प्रेम देतो.** त्या प्रेमामुळे विकार, विकल्प व स्वभाव हे त्याचे तीनही दोष तत्काळ नाहीसे होतात आणि प्रेमदान करणारी परमेश्वरमूर्ती हेच आपले साध्यसाधन होय, अशी प्रतीती त्याला होते. ईश्वराकडून ज्ञानीयाला ब्रह्मानंद मिळणे म्हणजे त्याने त्याला पाठीशी घालणे होय; पण भक्ताला मात्र तो पोटाशी धरतो. त्यामुळे भक्ताचा आनंद मोठा असतो. ज्ञानी साध्यानंदात पूर्ण बुडून जातो. तर भक्त हा सावध राहून त्या आनंदाचा उपभोग घेतो.

उपनिषदाच्या मताप्रमाणे ब्रह्म व ईश्वर एकच आहेत. त्याचे सर्वातीतत्व, अज्ञेयत्व व सर्वव्यापकत्व यांच्यावर भर देण्यासाठी त्याला निर्गुण, निराकार ब्रह्म म्हणतात व भक्ताच्या साधनेसाठी अत्यंत आवश्यक असे जे सगुण स्वरूप त्याच्यावर जोर देण्यासाठी त्याला ईश्वर असे म्हणतात. ब्रह्मच मूर्त व अमूर्त आहे – मूर्तामूर्तम्। धर्माचे ध्येय साध्य झाले म्हणजे मनुष्य सगुणाच्याही पलीकडे जातो. धर्माचे ध्येय धर्माच्या पलीकडे जाणे हे आहे. खऱ्या धर्माचा प्रारंभ द्वैतात होत असला, तरी अंत अद्वैतातच होतो.

जीवाने शिवामध्ये विलीन होऊन म्हणजेच 'फ़ना'ची म्हणजेच निर्वाणाची स्थिती प्राप्त करून अद्वैत साध्य करणे हेच सूफ़ी संतांचे अंतिम उद्दिष्ट आहे. या उद्दिष्टप्राप्तीसाठी ते भक्तिमार्गाचा अवलंब करतात आणि यासाठी ते **प्रेमाचा आधार** घेतात, कारण सूफ़ी सिद्धान्त प्रणाली परमतत्त्वाच्या निर्गुण, निराकार रूपावर जोर देते आणि त्या परमलक्ष्याच्या प्राप्तीचे साधन म्हणून **प्रेमास महत्त्व** देते.

### ख) प्रेम : शारीरिक पाया आणि आध्यात्मिक विकास – दार्शनिक निर्वचन*

#### १) आपण प्रेम का बरे करतो?

मानवी अनुभूतीच्या समस्त प्रकारांमध्ये सगळ्यात जास्त चित्तवेधक स्वागतार्ह प्रकार प्रेम आहे आणि ही बाब आश्चर्यकारक आहे की त्याचा उदय आणि विकासाचा अभ्यास फारच थोड्यांनी केलेला आहे. प्रत्येक भाषेमध्ये तिच्यासंबंधी वाङ्मय किती भव्य प्रमाणात प्रवाहित असल्याचे दिसते! काय महाकाव्य, काय नाटक, काय कथा–साहित्य, काय अनुरक्तिपूर्ण अमाप काव्य – आणि तरी पण त्याचे शास्त्र किती अत्यल्प बरे! निसर्गामध्ये त्याचे मूळ स्रोत आणि त्याचा आश्चर्यजनक विकास याची वस्तुनिष्ठ चिकित्सा करण्याचे प्रयत्न अत्यल्पच दिसून येतात.

अर्थात होय, पुरुषांना स्त्रिया आवडतात, त्यांना त्यांची अपेक्षा असते, ते त्यांच्यावर प्रेम करतात. प्रेम 'चंद्र, तारकांना हेलावून सोडते' ते जीवनाचा अंत होण्याअगोदर प्रत्येक जीवास अतिशय उमदे स्वभावाच्या उच्चतेपर्यंत पोहोचविते; परंतु का? मानवाच्या अंत:स्थळामध्ये प्रेम शाश्वतपणे उमलते, उसळते – हा मुद्दा काव्याने सिद्ध करून दाखविले आहे; परंतु त्याच्या तारुण्याचा गुप्त झरा कोठे आहे? एखाद्या मीनाक्षी युवतीच्या कुरळ्या केसावर दृष्टिक्षेप होताच एखादा युवक का बरे भावविव्हल अगर रोमांचित होऊन जातो किंवा आपल्या बाहूवर एखाद्या कोमल युवतीच्या बोटांचा मुलायम स्पर्श झाल्यास तो युवक का बरे उत्तेजित होतो? ती युवती सुंदर आहे म्हणून की काय? परंतु जितक्या प्रमाणात तिचे सौंदर्य त्याचे प्रेम निर्माण करते तितक्याच प्रमाणात त्याचे प्रेम तिचे सौंदर्य खुलवत निर्माण करीत नाही काय? तो प्रेम का बरे करतो?

वार्धक्यापर्यंत पुरुष स्त्रियांचा पिच्छा पुरविण्यामध्ये तत्पर असतात; परंतु तत्परतेअभावी स्त्रिया आपला

पाठलाग मृत्यू येईपर्यंत त्यांना करू देत नाहीत. मानवी व्यवहारामध्ये याच्याइतकी आश्चर्यजनक बाब कोणतीच नाही. दिवसाच्या प्रत्येक क्षणी पुरुषाचे स्त्रीवर मर्यादित कटाक्ष टाकण्याएवढे अटळ असे मानवी आचरणामध्ये काहीच नाही. वर्तमानपत्र वाचण्याचे ढोंग करीत असलेला धूर्त युवक आपल्या शेजारी बसलेल्या युवतीकडे चोरून कसा कटाक्ष करतो हे पहा. त्याचा संवाद ऐका, तो कसे आपल्या चिरस्थायी शिकाराभोवती घुटमळत असतो. त्याच्या कल्पनेचे अनुमान करा, त्या चुंबकीय ज्वालेभोवती ती किती अधीरपणे आपली जागा बदलत असते. ते का बरे? हे असे का होते? अशा प्रबळ इच्छेचे मूळ काय बरे असेल? कोणत्या मार्गाने बरे प्रेम येते (निर्माण होते), ते मागे परतून पाहू या.

**२) जैविक अभिगमन (Approach) किंवा प्रस्तावन**

ज्याप्रमाणे भूक आणि प्रेम व्यक्तीमध्ये एका पाठोपाठ येतात. त्याचप्रमाणे एक समष्टी स्वरूपात जीवन हे आपल्या कक्षेच्या मोठ्या क्रिया केंद्रांसारखे पोषण आणि प्रजोत्पादन यांच्या अवतीभोवती फिरत असते. पौष्टिक आहार हे प्रजोत्पादनाचे एक साधन आहे आणि प्रजोत्पादन हे पोषणासाठी एक साधन आहे. आपण जिवंत राहण्यासाठी खातो, आपण प्रौढ व्हावे, आपण पितृत्वाची जाबाबदारी सांभाळावी यासाठी आपण आहार घेतो, जेवतो, प्रजोत्पादनामध्ये आपल्या मरणाधीन मांसपिंडांपासून 'नवजीवना'करिता आपण वेगळे होऊन जातो. कदाचित पूर्वीपेक्षा अधिक उंची गाठण्यासाठी 'नवजीवना'मध्ये आहार ग्रहण करण्याची आणि पुन्हा वाढ होण्याची शक्ती असेल.

सगळ्यात साध्या कोशाणुमध्ये स्पष्टपणे, विकासच तर फुटून वेगळे होण्यास बाध्य करतो. हे प्रजोत्पादनाचे सगळ्यात निम्न स्वरूप आहे. पोषण करणाऱ्या पृष्ठभागाहून कोशाणुचे द्रव्यमान हे अधिक गतीने विकास पावते. द्रव्यमान पुनः स्थापण्यासाठी ते दोन भागामध्ये विभाजित होते आणि विभाजनामुळे फैलावणारा पृष्ठभाग हा पुनः द्रव्यमानास पुरेसा करतो. आपणास ज्ञान असलेले सगळ्यात लहान जीवाणू हे अथक अशा विभाजन आणि पुनर्विभाजनाच्या साहाय्याने इतक्या असंख्य पटीने वाढतात, की मन गणती करत करत थकून जाते. एकलकोशी सजीव म्हणजेच 'अमीबा' अर्थात एक अति लहान जलचर प्राणी मध्यवर्ती पुंज किंवा मध्यभाग हा दोन मूल बिंदूंमध्ये अगदी लहान अंशांचा एक विचित्र विभक्तपणा अनुभवतो, आणि नंतर संपूर्ण जंतुक विभागले जाऊन दोन नवीन 'अमीबा' निर्माण करतो. येथे जनकत्व आहे, परंतु तरी पण लिंगभेद आढळून येत नाही आणि संभवतः प्रेम नसते. (आढळत नाही.)

जीवाचे दोन विभागामध्ये असले विभाजन हे जीवनाच्या निरंतरतेसाठी निसर्गाच्या क्लृप्तीचे प्रमुख लक्षण आहे. निसर्ग जरी एक हजार गुंतागुंतीचे सूत्र विकसित करीत असले तरी ते कधीच त्याचा त्याग करीत नाही. आदिजीवांमध्ये (किंवा एकपेशीय प्राण्यांमध्ये) विभाजनाची ही पिढी अस्तित्वात आहे, उदीयमान हे फक्त एक प्रकारचे निराळे रूप आहे.

कधी कधी एखाद्या आदिजीवाचे विभाजित कोशाणू एखाद्या श्लेषीय गर्भाशयामध्ये अंत:स्थापित शिल्लक राहतात आणि ते एक 'वसाहत' निर्माण करतात. मग चकित करणारे असे एक विभेदीकरणाचे कार्य उदय पावते (निर्माण होते) : बाह्य कोशाणू पोषणासाठी विशेषत: कार्यप्रवृत्त असतात, तर अंतर्गत कोशाणू हे प्रजोत्पादनामध्ये प्रवृत्त असतात, वसाहत एक प्रकारचे सामाजिक प्राणिजीवन बनते, परस्परावलंबी आणि

सहकारी विभागांसह हिच्या सुरुवातीच्याच सिंहावलोकनात आपणास जीवन 'जननद्रव्याचे पूर्ण वेगळेपणा'स प्रदान करते. यावरच वेजमनचा प्रचलित आनुवंशिकतेचा सिद्धान्त आधारलेला आहे.

सारांश, विभाजनच अनेक पिढ्यांसाठी सातत्याचा हेतू सफल व पूर्ण करीत असते. मानवी स्वत्त्व आणि गटांप्रमाणेच आदिजीवांची अवस्था असते. जेव्हा एखादा पुरुष विवाह करतो तेव्हा तो अधिक सशक्त बनतो, जेव्हा वंश मिसळून जातात तेव्हा ते नूतनीकृत बनतात. तथापि हे साधे मिलन किती का सार्थक असेना यामध्ये प्रेम-पुष्पाचे मूळ असलेले भिन्न व्यक्तींच्या विवाह करण्यामध्ये अनुरूप असे काहीच नाही. निम्नतम जीवांमध्ये असे अनुरूप आपणास आढळून येणे शक्य आहे काय? यासाठी आपण सोळा कोशिकांची वसाहत असलेल्या एका आदिजीवाकडे वळतो. यास 'पँडोरिना' असे नाव आहे. प्रत्येक कोशिका ही दोन स्वतंत्र कोशिकांमध्येच विभाजित होत नसून, बाह्यत: एकसमान असलेले, अनेक अतिसूक्ष्म लहान तुकड्यांमध्ये किंवा 'बीजकणां'मध्ये विभागले जाते आणि जेव्हा दोन बीजकण एकत्र मिसळतात तेव्हा एक नवीन जीव उदयास येतो. तसेच दुसऱ्या वसाहतमय आदिजीवाकडे वळू या. ते आहे 'युडोरिना'. ज्याचा आपण शोध घेत होतो ते गवसले. येथे प्रत्येक कोशिका भिन्न 'बीजाणूंमध्ये' खंडित होते. पैकी काही मोठे आणि सुप्त तर काही सक्रिय आणि लहान आणि जोपर्यंत एक लहान बीजाणू एक मोठ्या बीजाणूमध्ये विलीन होत नाही तोपर्यंत एक नवीन जीव निर्माण होत नाही. 'युडोरिना'मध्ये निसर्गाने लिंगाचा शोध लावण्यास सुरुवात केली.

अधिक क्लिष्ट जीवांमध्ये शरीराचे काही विशिष्ट भाग, जसे वनस्पतींच्या फुलांतील पुंकेसर आणि स्त्रीकेसर, हे बीजाणू निर्मितीसाठी विशेष करून असतात. हे दोन प्रकारचे बीजाणू स्वत: अधिक मोठ्या प्रमाणात विभिन्नपणे असतात आणि जीवन विकास क्रमाच्या नंतरच्या टप्प्यांमध्ये अंडाणु आणि शुक्राणु बनून जातात; परंतु पुष्कळशा प्रजातीमध्ये ही दोन विरोधी मूलतत्त्वे अद्याप, एकाच शरीरामध्ये त्याच जनकत्वापासून निर्मित असतात. उदाहरणार्थ, मातीतील किडा हा आपल्या शरीरामध्ये एका विभागात अंडाणु तर दुसऱ्या विभागात दुसऱ्या मोसमात शुक्राणु निर्माण करतो. हाच प्रकार कालव (शिंपल्यातील मासा) आणि मृदु शरीर असलेले प्राण्यांमध्ये सुद्धा आढळतो. उत्पादक मूल तत्त्वांमध्ये गुटमळून जाऊन निसर्ग पुन्हा जीवांमध्ये नर आणि मादी या स्वरूपात भेद प्रस्थापित करण्यामध्ये डळमळले.

विभेदीकरणाचा एक सगळ्यात सोपा नमुना युग्मसंकलयन म्हणजेच नर-मादी जोडी उत्पन्न करणे, हा वाटतो. हा पक्ष्यांमधील एक आंतरिक (अंतर्गत) परजीवी आहे. येथे एक मोठा जीव मादीमध्ये परिणत होणारा असा आपणास आढळतो. म्हणजेच अंडाणु निर्माण करणारा होय आणि एक बराच लहान जीव, जो कायमस्वरूपी मादीच्या बाजूस संलग्न असतो, आपल्या लहान आकारामुळे, पुरुष जातीच्या मुलाची ऐटदार सत्ता जन्मास येण्याचे भाकीत सांगता येत नाही. लहान शुक्राणु निर्माण करणारा प्राणी हा एक मोठ्या परजीवावरील एक परजीवीसारखा असतो किंवा जीवाच्या एखाद्या अवयवासारखा असतो. तो एका श्रीमतीचा नवरा असल्याचे एखाद्याला कधीच शंका येणार नाही. म्हणजे त्या मादीचा नर असेल अशी कधीच शंका येत नाही.

किड्यांमध्ये मादी ही सहसा नेहमी नरापेक्षा अधिक मोठी आणि अधिक प्रबळ असते. मादी फुलपाखरू हे नर फुलपाखरूपेक्षा पंधरा पट लांब आणि दहापट अधिक वजनाची असते. फक्त पक्षी आणि सस्तन प्राण्यांमध्ये नर हा वरचढ असतो. प्रजोत्पादनाचा अधिकांश भार हा मादीवर अधिक प्रमाणात पडत असल्याकारणाने, प्रेमाच्या शाश्वत युद्धामध्ये ती शारीरिकदृष्ट्या प्रतिबंधित होऊन जाते. या वस्तुस्थितीमुळे नरामध्ये अधिक शक्ती व बळ दिसून येते.

**कृमी-कीटकांच्या चित्र-विचित्र प्रेम-लीला**

कीटकांच्या पुष्कळशा प्रजातींमध्ये मिलन संपल्यानंतर तत्काळ मादी ही नरास खाऊन टाकते. अष्टपाद कोळीमध्ये नर हा आपल्या सुरक्षेसाठी मादीपासून वेगळा असतो. एका निश्चित प्रमाणात कामोत्तेजना निर्माण झाल्याशिवाय तो तिच्याजवळ जात नाही. भित्र्यासारखा तो स्वत:स मादीच्या कोळीष्टकाच्या बाह्य तंतूंशीच संबंध ठेवतो. माघार घेण्यास सोईस्कर व्हावे म्हणून बाहेर जाण्यासाठी तो एक काळजीपूर्वक काठ तयार करतो आणि आत्मविश्वासहीनपणे अग्रेसर होतो. प्राय: मादी त्याला तात्काळ खाते. त्या बिचाऱ्यास प्रेम-विलासाची चवसुद्धा घेता येत नाही. कदाचित ती त्याला चुकीने एक हल्लेखोर समजत असेल अथवा एक कामुकपेक्षा एक भक्ष्यास पसंत करणारी ती एक 'अनुभवी' व्यक्ती असावी. जर ती प्रेमाच्या मन:स्थितीत असेल तर मर्यादेच्या विधीमधून जाईल. ती संकोचाने - लाजेने माघार घेईल, यद्यपि ती नरापेक्षा अधिक मोठी आणि अधिक शक्तिशाली असताना पण ती एका तंतूवरून खाली दुसऱ्या तंतूमधून हळूच निघून जाते तेव्हा नर उत्तेजित होऊन तिचा पाठलाग करतो. शेवटी ती स्वत:स शरण जाते व नरास प्रभुत्वाच्या रम्य भ्रमात टाकते. या टप्प्यावर त्यांची भावना रोमांचकारी व सुसंस्कृत बनते. ते एकमेकास आपल्या स्पर्शेंद्रियांनी हळूवारपणे थापटी मारतात आणि आपला हेतू नाजूकपणे - हळुवारपणे प्रकट करतात. मिलन संपण्याचाच अवकाश की मादी नरावर झेप घेते आणि परिपूर्ण प्रेमाच्या निष्ठुरपणासह त्यास फस्त करते - खाऊन टाकते. कधी कधी तर मिलन संपण्यापूर्वीच ती त्यास खावयास सुरुवात करते. प्रसंगानुसार तो तिच्या घातक खालच्या जबड्यापासून सुटका करून घेण्यासाठी योग्य ती सावधगिरी बाळगतो आणि आपल्या प्रिय प्राणास जपण्यासाठी तो आपल्या आश्रयस्थानाकडे हळूच निघून जातो. त्यानंतर उत्तेजना शांत होईपर्यंत तो एक गंभीर तत्त्वज्ञ बनतो.

फॅब्रे (Fabre) म्हणतो की, मादी बद्धहस्त कीटक प्रियाराधन करणाऱ्या नरास अतिशय क्रौर्याने कडक भुकेल्याप्रमाणे खाऊन टाकते. विपुल प्रमाणात असताना इतर कीटके नरास नाकारतात; परंतु मादी बद्धहस्त कीटक दोन ते सात नरांना सामावून घेते, त्यांच्या शौर्याचा स्वीकार करते आणि आपल्या सोईप्रमाणे त्यांना एका पाठोपाठ खाऊन टाकते. पुष्कळ वेळा आपल्या खाद्यासाठी प्रतीक्षा करण्यास असमर्थ असताना ती आपले डोके फिरविते आणि नर वंशवृद्धीच्या कार्यात मग्न असताना ती नराचा पुढचा भाग खाऊन टाकते. पॉइरेट (Poiret) एक अशी घडलेली घटना नमूद करतो की, नराला पाहता क्षणीच मादीने त्याचे डोके छाटले; परंतु शिरच्छेद झालेल्या शूराने जसे की काहीच घडले नाही या थाटात आपल्या प्रजोत्पादन कार्यास सुरू ठेवले आणि खरे तर प्रेमामध्ये डोके कुठ थाऱ्यावर असते! अशा प्रकारे निम्नतम प्रजातीमध्ये नराचे दुय्यम स्थान पाहिल्यावर आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही.

**क्षण एक पुरे प्रेमाचा**

'क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणांचा!' – ही आहे गोविंदाग्रजांची उत्कट प्रेमाचे चित्रण करणारी एक हृदयस्पर्शी कविता. पण खऱ्याखुऱ्या जिवांचा सगळा अट्टहास चालू असतो मरण टाळत वंशसंवर्धनासाठी. यालाच हातभार लावते शृंगारिक प्रेम. वात्सल्यमय प्रेमही संततीला सांभाळत हेच कार्य बजावते. वनस्पतींचेही प्रेमजीवन असतेच, पण त्यात प्रेममीलनानंतर तत्क्षणी मृत्यूला कवटाळणे कधीच संभवत नाही. या हिरव्या सस्यशृंगाराचे रहस्य अव्वल दर्जाचा स्वीडिश शास्त्रज्ञ कार्ल लिनेयस याने तीनशे वर्षांपूर्वी उलगडून दाखवले. तो म्हणतो की फुले हे तर आहेत सुगंधी रंगमहाल. तिथे चालतात प्रेमचेष्टा. गुलाबांच्या फुलात असते एकच मोहता आणि तिच्याभोवती पिंगा घालणारे कित्येक मोहन; तर कमळाच्या, सोनचाफ्याच्या फुलांत अनेक सजणा-सजणींची कामक्रीडा चालू असते.

तेव्हा वनस्पतिसृष्टीत काही इष्काचा जहरी प्याला नाही, प्रेमाचा मधुघटच आहे. पण कोळी, विंचू, मुंगळे अशा काही प्राणिजातींतल्या नरांच्या नशिबी प्रेममीलनानंतर मृत्यूला कवटाळणे लिहिलेले असते. असाच एक नमुना आहे विंचवांच्या शृंगाराचा. जात्या हिंस्र विंचवांच्या पंजांना सावज पकडण्यासाठी टोकदार नख्या असतात. समोरासमोर ठाकत नख्या एकात एक गुंफून विंचवांचे प्रेमीयुगल पुढे-मागे झुलत नाचायला लागते. नाच रंगला की नर आपल्या रेताची पिशवी जमिनीवर टाकतो आणि मादीला वळवत-वळवत त्या पिशवीवर नेतो. मग ती पटकन आपल्या योनीत ती पिशवी ओढून घेते. त्याक्षणी या प्रेमनृत्याचा कार्यभार साधलेला असतो. आता नराला काहीच नको असते अन् मादीच्या डोक्यात एकच विचार असतो, पोटातल्या नव्या गर्भांना व्यवस्थित पोसणे. आता मादीच्या दृष्टीने नवऱ्याची जबाबदारी पार पाडलेला नर केवळ एक पौष्टिक आहार असतो. तिचा एकच इरादा असतो; त्याला पकडायचा आणि गट्ट करायचा. आता प्रीतिनृत्याचे परिवर्तन होते एका भीतीनृत्यात! मादीच्या बाहुपाशातून सुटून पळून जाण्याचा नर आटोकाट प्रयत्न करतो, तर मादी त्याला आणखी घट्ट मिठीत आवळून मटकावायला बघते. कधी कधी नराची सरशी होऊन तो सुंबाल्या करतो. पण बहुतेकदा 'क्षण एक पुरे प्रेमाचा' असे गुणगुणत त्याला मृत्यूला सामोरे जायला लागते.

मुंग्या-मुंगळ्यांत निवडक नर माद्यांना खास आहार देऊन वंशवेलीला जोपासण्यासाठी तयार करतात. पहिल्या पावसाबरोबर पंख फुटून त्यांचे पुंजके आकाशात भरारी घेतात, उडता-उडता जोडीदार निवडतात, मग खाली उतरून त्यांचे प्रेममीलन होते. ते झाले की, नवफलित राणी नवा संसार मांडावयाच्या खटपटीला लागते, तर आयते पोसले गेलेले नर इकडे-तिकडे भटकत उपाशीपोटी मरून जातात. पण डायकॅका प्रजातीच्या मुंगळ्याची एक आगळीच लगिन कहाणी आहे. यांच्या प्रजोत्पादनासाठी सज्ज केलेल्या भावी राण्या उडत नाहीत. नवऱ्याची ओढ लागली की त्या वारूळाच्या तोंडाशी येऊन आपल्या वासाने कामुक नरांना आकर्षित करतात. त्यांच्या ब्रह्मचर्य पत्करलेल्या कामकरी भगिनी या वधूंभोवती घोळका करून स्वयंवराला आलेल्या नरांना पारखत राहतात. एखादा पसंत पडला की त्याला चक्क गिरफदार (अटक) करून वारूळात घेऊन चलतात. तिथे या सगळ्या करवल्या ठरवतात की या वरदेवाला शुभमंगल सावधान म्हणताच पळून जायची मुभाच ठेवायची नाही. मग एकदा का नवविवाहितांचा समागम सुरू झाला की त्यांचे

एक वेगळेच पालुपद सुरू होते. 'लगिन झालंऽ या बया डोच्कं उडवू या!' त्या करवल्या चक्क त्या नराचा शिरच्छेद करतात. असे बिनडोक्याचे नवरदेव मुंगळे आठ-दहा तास जिंदे राहतात. त्या कालावधीत त्यांची भरपूर शुक्रबीजे नवी राणी आपल्या पोटातल्या एका खास पिशवीत साठवून ठेवते आणि अनेक महिने सवकाशीने वापरत आपल्या संततीला जन्म देत राहते. डायकॅमा मुंगळ्याच्या नराला इष्काचा जहरी प्याला जबरदस्तीने प्यायलाच लागतो. 'क्षण एक पुरे प्रेमाचा, वर्षाव पडो मरणांचा' हे नशीब मानायलाच लागते. अशा आहेत निसर्गाच्या चित्र-विचित्र (प्रेम) लीला!

गर्भधारणेच्या गरजांसाठी निसर्गामध्ये नराचे उपस्थित असणे हे उघडपणे त्याचे ऋण नव्हे. मग कुणाचे ऋण? बहुतकरून पर गर्भधारणेच्या गरजेसाठी लिंगांच्या विभक्तपणामुळे दोन विभिन्न वंशावळीचे वांशिक गुण व क्षमता यांना संततीमध्ये एकत्रित येणे शक्य झाले. द्वि-आनुवंशिकतेचे फायदे इतके स्पष्ट आहेत की, आपणास अशी काही व्यवस्थेची गरज विकसित करावी लागेल की, ज्यामुळे स्व-गर्भधारणा टळेल आणि ते असे आहे. वनस्पतींचे पुनरूत्पत्ती अवयव स्वरूपात असलेल्या फुलांची रचना अशा पद्धतीची असते की एखाद्या वनस्पतीच्या फुलांमधील परागास त्यावनस्पतीच्या स्त्रीकेसरामध्ये प्रवेश करणे क्वचितच शक्य असेल. शंबूका (गोगलगाय) च्या शरीरामध्ये सुद्धा दोन्ही लिंगांची उपस्थिती असतानासुद्धा अवयव अशा पद्धतीने रचलेले असतात की, स्वगर्भधारणा अशक्य असते. अशी निसर्गाची कार्यप्रणाली आहे. आपल्या (मानवी) प्रजातीमध्येसुद्धा सामाजिक आणि मानसशास्त्रीय घटक एकत्रितपणे भाऊ आणि बहिणीमध्ये परस्पर पती-पत्नीसारखे संबंध ठेवण्यास मनाई करतात आणि सगोत्र विवाहास पण सक्त मनाई आहे. व्यभिचार किंवा अगम्यगमन पण निषिद्ध आहे. ही बंदी किंवा निषेध केवळ त्याच परगर्भधारणा प्रवृत्तीचे सर्वोच्च रूप आहे, जे लिंग विभेदीकरणास जबाबदार असते.

'प्रजातीमध्ये अपत्यांची संख्या जितकी जास्त तितका संगोपनाचा काळ कमी असतो, तर अपत्य संख्या जितकी कमी तितका संगोपन काळ दीर्घ होत जातो, असे सर्वसामान्य व सर्वमान्य निरीक्षण आहे. म्हणूनच घरटे न बनविणारे पक्षी दरवर्षी बारा अंडी देतात, ओबडधोबड घरटे बनविणारे पक्षी आठ अंडी देतात, तर लक्षपूर्वक सुव्यवस्थित घरटी बनविणारे पक्षी पाच अंडी देतात.' (Sutherland, A. - 'Origin and Development of the Moral Instincts' Vol I, pp 4-5)

म्हणून थोडे थोडे करून माता-पित्याचे प्रेम जागा भरून काढते आणि निसर्गाच्या अपव्ययाची क्षतिपूर्ती करते. मातृ संगोपनाची प्रवृत्ती असलेल्या सस्तन प्राण्यांमध्ये जोडपे सरासरी वार्षिक तीन अपत्यांना जन्म देते आणि उच्चतर प्रजातीमध्ये ही संख्या घटते. एक सुदीर्घ कालखंडासाठी अपत्याची काळजी घेण्यासाठी एक बाह्य कूस स्वरूपात हळूहळू कुटुंब विकसित होते आणि जसजसे यौवन लांबत जाते तसतसे शिक्षणाच्या कालावधीवर अधिकांश अवलंबून असलेली संस्कृती, पूर्वीपेक्षा जास्त उच्चतर स्तरावर पोहोचते.

आणि आता या शीघ्र जैविक अभिगमनाच्या दृष्टीने प्रेमाची समस्या कशी टिकाव धरते? प्लेटोप्रणित ॲरिस्टोफॅनेस हा 'सिंपोझियम'मध्ये विनोदाने असे उत्तर देतो - ''एक काळ असा होता की, दोन (लिंग) एक होते; परंतु मानव देवाच्या दुष्टपणामुळे - पापामुळे ..... जसे लोणचे बनविण्यासाठी एखाद्या रसदार मऊ सफरचंदाचे दोन भाग केले जातात किंवा तुम्ही जसे एखादे अंडे एका केसाने विभागावे तद्वत माणसे दोन

(विभागा) मध्ये कापली गेली. ..... आपणापैकी प्रत्येक जेव्हा विभागला जातो – वेगळा होतो तेव्हा तो एखाद्या माणसाचा करारनामा असतो ..... आणि तो नेहमी आपल्या अर्धांगिनीची वाट पाहत असतो ..... समग्राची इच्छा आणि पाठलागाचे नाव प्रेम आहे.'' ही एक उत्तम व भव्य व्याख्या आहे. ती महान नाटककाराच्या पुराणकथेच्या एक विद्वत्तापूर्ण निर्वचनाकडे भुरळ घालते. आपण म्हणू शकू की, एक काळ असा होता की, दोन्ही लिंग एकाच शरीरामध्ये विद्यमान होते, अद्याप जसे मातीच्या किड्यामध्ये आहे. नंतर निसर्गाने त्यांना दोन जीवांमध्ये वेगळे केले आणि आता सध्या प्रत्येक भाग हा आपल्या वेगळेपणामुळे स्वत:स एक अर्धा भागच मानतो आणि ऐक्य व परिपूर्णतेसाठी – समग्रतेसाठी आकांक्षा बाळगून आहे.

परंतु ते प्रश्नाचे एक गूढ उत्तर असेल. प्रेम म्हणजे काय? ते निम्नतम आदिजीव बीजाणूमुळे एक अत्युच्च दार्शनिक चेतना गृहीत धरल्यासारखे होईल. प्राय:, जेव्हा नराचे काम प्रथम एक स्वतंत्र जीवामध्ये विशेष करून झाले, तेव्हा त्या आदिम नरांपैकी फार थोड्यांनी प्रयत्न केले अथवा आपल्या 'सहचारिणींशी' मीलन गाठले, आणि फक्त ज्यांनी प्रयत्न केले आणि प्राप्त केले ते पुढील पिढीचे जन्मदाता ठरले आणि यास्तव प्रत्येक पिढीमध्ये प्रेमवीरच तर आपल्या पूरक भागांमध्ये स्वत: सामील होऊन परिपूर्णता प्राप्त व्यष्टी – ज्यांनी जीवनप्रवाहामध्ये मिलाफसाठी आपली कामवासना प्रसारित केली. ज्यांना अशी तीव्र इच्छा झाली नाही किंवा थोडीशी झाली ते अपत्याशिवाय किंवा फारच थोडे अपत्यास सोडून मृत झाले आणि त्यांची उदासीनता व अनास्था छाटली गेली. म्हणून प्रत्येक पिढीस मोठी भूक वाढली, ती प्रभावी कामवासना ठरल्यास आश्चर्य वाटण्यासारखे नाही. ही वासना मृत्यूपेक्षा जास्त प्रबळ ठरते. स्थानापन्न प्रवाहासह मृत्यू नकळत फसवीत असतो. कदाचित – कदाचित प्रेम अवतरित होण्याचा तोच मार्ग आहे.

**३) शारीरिक पाया**

जीवनाच्या शृंखलेमध्ये प्रेमाची उत्क्रांती इतक्या मोठ्या प्रमाणात झाली. आता आपण व्यक्तीमध्ये ते कसे वाढते याचे निरीक्षण करू या. ॲरिस्टॉटल म्हणतो, जर तुम्हाला काही समजून घ्यायचे असेल तर तिचा आरंभ आणि विकास यांचे निरीक्षण करा.

नंतरच्या काळात उत्पन्न होणारे प्रेमानुरागाशी अनुरूप असे काही लहान मुलांमध्ये आहे काय? फ्रायड या प्रख्यात मनोविश्लेषणशास्त्रज्ञाने या प्रश्नाचे उत्तर मोठ्या आत्मविश्वासाने होकारार्थी स्वरूपात दिले आणि अंगठा चोषण आणि स्तनपानाच्या कामोद्दीपक शक्यतांमधून त्याने मनोविकृती – विज्ञानाचे थक्क करणारे किल्ले बांधले; परंतु येथे तथ्ये जेव्हा शास्त्रा (Theory) पासून वेगळी करण्यात आली. तेव्हाती अति सूक्ष्म बनली. एका विशिष्ट काळापर्यंत मानसशास्त्रज्ञ वॅटसन आणि त्यांचे सहकारी यांनी शेकडो लहान मुलांना निरीक्षणाखाली ठेवले आणि मग त्यांना कुठल्याच प्रकारचे लैंगिक वर्तन निदर्शनास आले नाही. (वॅटसन जे. बी. 'बिहेव्हिअर' पृ. २६२)

तथापि लवकरच लहान मुलास विषम लिंगाची जाणीव होते. काही प्रमाणात शरीररचनेविषयी उत्सुकता निर्माण होते. ते लपविण्यास आणि टाळण्यास प्रोत्साहित केले जाते. प्रत्येक स्त्री–पुरुष जातीस एक दुसऱ्यास एक गूढ रहस्य वाटते आणि लज्जा व आकर्षणमिश्रित अशी एक प्रतिक्रिया निर्माण होते. याशिवाय क्वचितच अधिक काही नसते आणि जर वय: संधीअगोदर प्रेम निर्माण होत असेल तर ते संभवता: 'मातृ–

मनोग्रंथी' स्वरूपात असेल. मुलास मातेप्रती आकर्षण असते तर मुलीस पित्याप्रती असते; परंतु ही काय फ्रायडला वाटते तितकी गंभीर बाब नाही. हे काही एक गंड नव्हे, कारण ते ना नेणीव आहे ना अपसामान्य. लहान मुलास हितकर प्रेमासाठी तयारी करून घेण्याचा निसर्गाचा तो मार्ग आहे. जेव्हा संबंध विपरीत असते – जेव्हा मुलग्याचे (पुत्राचे) भावनिक प्रेम पित्याप्रती असते, अथवा मुलीचे मातेप्रती असते तेव्हा मात्र मनोविकृती विज्ञानवेत्त्यांना काळजी वाटणे साहजिक आहे. ही एक प्रकारे धोक्याची सूचना असते.

तारुण्यावस्थेमध्ये प्रेम आपले पहिले स्पष्ट गाणे गाते. अक्षरश: तारुण्य किंवा वय: संधी म्हणजे केश-वय असते – पुरुषामध्ये तजेलपणा अंकुरित होतो, विशेषकरून छातीवरील केसांच्या बाबतीत त्याला क्रूर गर्व असतो आणि चेहरा व हनुवटीवरील केसांबाबतीत पण त्याला तितकाच गर्व असतो. गुणवत्ता आणि प्रचुरतेमध्ये पुनरुत्पादक शक्तीच्या चक्रानुसार केस उगवतात आणि गळतात आणि ओज व तेजाच्या पराकाष्ठेमध्ये ते सर्वोत्तम स्थितीत असतात. अचानक आवाजामध्ये गंभीरता निर्माण होणे हे दुय्यम लैंगिक लक्षणांपैकी एक आहे. हा बदल मुलांच्या बाबतीत तारुण्यामध्ये घडतो. मुलींच्या बाबतीत डोळ्यास आकर्षित करणारी मुलायम रूपरेषा निसर्ग, फुलणाऱ्या मुलींमध्ये निर्माण करतो. मातृत्वासाठी सुलभ असलेले प्रसरित ओटीपोट आणि बाळास स्तनपानासाठी उपयोगी असे भरदार ठासीव 'स्तना'ची देणगी निसर्ग त्यांना देतो.

ही दुय्यम लक्षणे कशामुळे निर्माण होतात? कुणालाच माहीत नाही. मात्र जेव्हा तारुण्य येते तेव्हा प्रजनक कोशाणु फक्त अंडाणु आणि शुक्राणुच निर्माण करीत नसून रक्तामध्ये प्रवेश करणारे अंत:स्राव पण निर्माण करतात आणि परिणामी एक प्रकारचे शारीरिक आणि मानसिक बदल घडवून आणतात, अशी अनुकूलता प्राध्यापक स्टार्लिंग यांना आपल्या उपपत्तीस लाभली. आता फक्त शरीरच नवीन शक्तींनी संपन्न होत नसून, एक हजार प्रकारांनी मन आणि चरित्र पण प्रभावित होतात. रोमॉ रोलॉ म्हणतो, ''जीवनामध्ये असे काही काळ येतात की ज्यामध्ये एखाद्या पुरुषात किंवा एखाद्या स्त्रीमध्ये इंद्रियविषयक सुप्त बदल कार्यरत असतो.'' हे सर्वात जास्त महत्त्वपूर्ण आहे.

शरीर आणि मन नूतन भावनांनी ओतप्रोत होऊन जातात, जिज्ञासा मनास पुढे ओढते, तर शील-संकोच त्यास मागे खेचते, तरुण युवक-युवतीच्या उपस्थितीत तापदायक बनतो आणि ती मुलगी लाजावे कसे हे शिकते. या अगोदर जडमती असलेली मुले अचानक तल्लख बनतात, तसेच या अगोदर आज्ञाधारक असलेली मुले आता एक अतर्क्य असा उद्दामपणा दाखवितात. आत्मनिरीक्षणाची मोहिनी येते, विचित्र विचारमग्नता व दिवास्वप्न पाहण्यात येतात. कल्पना फुलविली जाते आणि काव्यात्मकता वाढते. या वयात सर्व सुशिक्षित हे एक प्रकारचे लेखक – साहित्यकार बनतात आणि अमर ख्यातीचे स्वप्न पाहतात. मनाची प्रत्येक शक्ती चैतन्य निर्माण करते आणि विवेक जगावर प्रश्नांचा एक नवीन हल्ला चढवितो. जर विचारसरणी बराच काळपर्यंत सुरू असेल तर ती व्यक्ती एक शास्त्रज्ञ किंवा एक तत्त्वज्ञ बनून जाते, जर तिचा लवकरच त्याग केला गेला असेल तर ती एक यशस्वी पुरुष बनते आणि मग ती सर्वोच्च पदावर पोहोचेल.

याच वेळेस कला आणि सामाजिक निष्ठा यांच्या मुळास प्रेमातिरेक हे खतपाणी घालते. प्रेम सौंदर्याची कल्पना करते, सौंदर्य शोधते आणि सौंदर्य निर्माण पण करेल, प्रेम शिवची कल्पना करते, शिवचा शोध घेते

आणि ते साध्य करण्यासाठी कृतसंकल्प बनते. जर धर्म हा शिवच्या शोधाच्या भूमिकेत स्वत:स ठेवत असेल तर परिवर्तनशील अंत:करणाच्या आदर्शवादास तो स्पर्श करतो आणि व्यक्तित्त्वाचा एक अविभाज्य भाग बनतो.

तारुण्य-यौवनाचा हा काळ सर्वस्वी आपला अद्‌भुत असा कालावधी असतो - वय असते. हे विवेकाचे वय आहे आणि तरी पण भावनेचे युगारंभ आहे. कल्पनांचा एक वर्षाव आणि प्रेमाचा एक खजिना, मनाची व अंत:करणाची नवसमृद्धी श्रीमंती सर्व बाजूंनी जिकडे तिकडे पसरते. या निर्मोचित वर्षांमध्ये जग कधीच इतके विचित्र भासत नाही आणि तरी पण इतके सुंदर, इतके अगम्य आणि तरी पण इतके विजेय (जिंकण्यायोग्य), प्रत्येक नंतरचे वय हे आशेने त्यांच्याकडे पाठीमागे वळून पाहते. प्रत्येक शक्तीचा तो वसंत ऋतू असतो, प्रत्येक विकासाचा बीज-काल, त्यामध्ये प्रत्येक उदात्त भावनेस आपले पोषण आढळते. ते जीवनाचे नवजागरण - पुनरुत्थान असते.

दरम्यान ही कोणती बरे विचक्षण शक्तीअसते की जी मुलास मुलीकडे भीतीयुक्त खेचत असते आणि मुलीस उत्कंठित लांब बाजूस नेते? एका पुरुषाचे एक स्त्रीप्रती असलेले आमच्या जीवनातील प्रेमाचे हे सर्वात सुंदर फूल निर्माण करण्यासाठी मानवी स्वभावाच्या गुप्त अवकाशामध्ये कार्यरत असे कोणते बरे रहस्य असेल?

जसे प्रेमाचे जैविक मूल स्रोत मीलनासाठी नैसर्गिक चयन आणि विकास आहे. तसेच त्याचे व्यक्तीमधील शारीरिक पाया हा भ्रूणीय (जननिक) द्रव्याचे संग्रहण आहे. अस्वस्थ करणारे जीवनाचे विस्तारण, अवरुद्ध वाढीची चीड, याचा अनुभव संपूर्ण जीवाला येतो आणि अंत:करण (मन) हे एक गोड परंतु तीव्र दु:खानिशी भरलेले असते, जणू आपण अपूर्ण असल्याची जाणीव आणि समष्टी बनून जाण्याची प्रबळ इच्छा त्यामध्ये विद्यमान असते.

अशा उत्तेजकतेच्या अवस्थेमध्ये तारुण्य हजारभर उद्दीपकांनी संवेदनशील होऊन जाते. या अगोदर ते त्यांची दखल घेत नसे. काही ध्वनी तिला (तारुण्याला) भावतात. गाणे गीत गाणि संगीत यांची सवय जडते आणि सूर (स्वर) नवीन कोमलतेकडे वळविते आणि प्रियकरास हर्षभरीत बनविते. काही गंध (वास) आवडतात, विकसित होणाऱ्या शरीराचे माधुर्य, स्वच्छतेचा सुगंध, कामोत्तेजक पौरुषत्वाचे परिमल, ही सर्व प्रेमाची मादक द्रव्ये आहेत. काही हालचाली आकर्षित करतात. नृत्याची ताल आणि पदचाप, खेळाडूंचा झपाटा आणि आत्मविश्वास, मुलींची मनोहर प्रफुल्लता. याव्यतिरिक्त आणखी काही दृश्ये मोहीत करतात. प्रेमाच्या मोसमात रंग गजबजतात आणि तांबडा हा स्वामित्वासाठी अधिपत्यासाठी एक आवाहन ठरते, सहवासाच्या काळात तारुण्य शृंगार करते, जसे पक्षी आणि पशु तुरा आणि शेंडी विकसित करतात आणि विलासमय सहवास करतात. रानटी क्रूर माणसे आपले शरीर रंगवून घेतात आणि लक्ष वेधण्यासाठी व भावना उत्तेजित करण्यासाठी स्वत:स विकृत करून घेतात, वस्त्रप्रावरण उपयुक्तता नव्हे तर एक अलंकार व शोभा बनून जाते, एक सूचन आणि प्रेरक बनते, शौर्य आणि शक्ती कोमल हृदयात घाबरगुंडी उडवून देतात, गर्भगळित करतात आणि प्रत्येक मुलायम रूपरेषा इच्छेस आकर्षित करते. या नवीन अनुभूती ध्वनी, गंध,

स्पर्श, दृक्, श्राव्य, परिमल, गीत, नृत्य आणि नानाविध प्रदर्शनाच्या तारुण्याच्या आत्मपरीक्षणाच्या विचारांना हर्षभरित करून टाकतात आणि ते प्रेमाचे अत्यंत संमोहक प्रेरक बनतात.

अकस्मात सर्व चेतक एकत्रित होतात, सर्व अटी सगळे मिळून प्रकटतात. शरीर आणि मनाच्या भुकेच्या माध्यमाने आयुष्यक्रमाच्या गरजा बोलतात आणि प्रेम जन्म घेते, प्रेमाचा उदय होतो, सकाळच्या आकाशामध्ये जसा प्रकाश असतो तसा अंत:करणामध्ये प्रेम स्वार होतो आणि उत्साह व तेजाने त्यास भरून सोडतो.

**४) मानसिक व आध्यात्मिक विकास**

अशा दृढ आणि नैसर्गिक आधारापासून प्रेमोदय होतो म्हणजेच अध्यात्म आणि काव्यकला. स्थायित्वासाठी या प्रेमानुरागापासून जोडीदारामध्ये परस्परामध्ये एकनिष्ठता निर्माण होते. शरीराच्या या भुकेपासून म्हणजेच आसक्तीपासून सर्वात अनुकूल अशी निष्ठा, परस्परांच्या मनामध्ये उदय पावते, गुफातील रानटी मनुष्याच्या कामातुरतेपासून शेवटी कवीची श्रद्धा निर्माण होते. हा मनुष्याचा पूर्ण आटोका किंवा सप्तस्वर आहे.

प्राचीन लोकांना प्रेमाची जाणीव अत्यल्प असल्याचे वाटते. त्यांना त्याची क्वचितच कल्पना होती, जेव्हा ते लग्न करीत तेव्हा ते अपत्यप्राप्ती आणि नियमित आहाराची खात्री याशिवाय कशाचीच अपेक्षा करीत नसत, रोमांसशी त्यांचा काडीचाही संबंध नसे. नीत्शेचा असा विचार होता की, 'रोमँटिक प्रेम' हा मध्ययुगीन रसिक कवींचा एक शोध होता; परंतु जेथे जेथे संस्कृती विकसित झाली तेथे तेथे एक 'आध्यात्मिक' तत्त्व प्रजोत्पादक अंत:प्रेरणेमध्ये विकसित झाले. आपल्या स्वत:च्या विपर्यस्त पद्धतीने ग्रीकांना रोमान्सचे ज्ञान होते आणि 'अरेबियन नाइटस' याचे प्रमाण आहे की, मध्ययुगीन काव्यासाठी प्रेमाने प्रतीक्षा केली नाही. ख्रिस्ती धर्माने स्त्रीस अगम्य अशी मोहकता प्रदान करून पवित्रतेस प्रतिष्ठा मिळवून दिली. यामुळे प्रेमाचे काव्य परिपक्व होण्यास मदत झाली. मोठ्या कटू स्वभावाचा ल रॉक फौकौल्ड सुद्धा म्हणतो, ''सचेतन करणारा आत्मा जसा शरीराशी संबंधित असतो, तसेच असले प्रेम हे प्रेम करणाऱ्या मनुष्याशी निगडित असते.'' दमुस्से (De Musset) म्हणतो, ''सर्व पुरुष हे विश्वासघातकी, खोटारडे, बडबडे, पाखंडी, अकडू असतात, तर सर्व स्त्रिया बेकार, कृत्रिम (नाटकी) आणि बेइमानी असतात ---- परंतु जगामध्ये एक गोष्ट पवित्र आणि लोकोत्तर आहे आणि ती म्हणजे या दोन दोषास्पद जीवांचे मीलन होय'' आणि आदर व्यक्त करण्यासाठी नीलो आपले मूर्तिभंजन थांबवितो. ''सगळ्यात अति प्रांजळ उक्ती मी ऐकलेली आहे. सच्च्या-खऱ्या प्रेमामध्ये आत्मा हा शरीरास बिलगतो.''

शारीरिक इच्छेचे रोमँटिक प्रेमामध्ये परिवर्तनाचे विवेचन आपण कसे बरे करू शकू? प्रेमाची क्षुधा कोमलतेमध्ये फुलविण्यास कुणी प्रवृत्त केले की जेणेकरून शरीराचे आंदोलन हे आत्म्याची (अंत:करणाचे) कोमलता बनून जावे? विकास होत असताना संस्कृतीने मीलनाचे वय लांबविले आणि अतृप्त इच्छेसह शरीरास सोडून दिले, कल्पनासृष्टीमध्ये अंतर्मुख होणारी इच्छा प्रिय वस्तूस अतृप्त इच्छांच्या आदर्श रंगामध्ये परिधान करण्यामुळे तर नसेल काय? जे आपण प्राप्त करण्याचा प्रयत्न करतो आणि जर ते हाती लागत नसेल तर ते गवसत नसल्याकारणाने अधिक मूल्यवान बनते, वस्तूचे सौंदर्य हे इच्छेच्या शक्तीमध्ये असते

आणि तृप्तीमुळे क्षीण झालेली इच्छा ही नकारामुळे अधिक समृद्ध बनते. म्हणून व्यक्तीच्या तारुण्यामध्ये आणि एखाद्या संस्कृतीच्या प्रगल्भतेमध्ये प्रेम हे पवित्र व दिव्य बनते. कारण तर मग दमन हे पराकोटीच्या अवस्थेत असते आणि संयम व्यक्तीस रम्य मन:स्थितीकडे वळविते.

कसेही करून ते निर्माण होते, प्रेमाच्या मानसिक विकासाचा विचार करू या. इतर प्राण्यांपेक्षा मनुष्यामध्ये कामप्रवृत्ती परोक्ष स्वरूपात विद्यमान असते? परंतु असे असतानाही ती त्याची मुख्य मूल प्रवृत्ती आहे. मनुष्याच्या व्यक्तित्त्वाचा विकास, त्याचा आचार-व्यवहार अधिक प्रमाणात त्याची कामवृत्ती आणि काम प्रवृत्तीशी संबंधित क्रियांवर निर्भर असतो. एक काळ असा होता की, कामप्रवृत्तीस केवळ किशोरावस्था आणि प्रौढावस्थापर्यंत व्यापक समजले जात असे; परंतु आज तिची व्याख्या एवढी विस्तृत झाली आहे की बालकाच्या मातेच्या स्तनपानापासून ते प्रौढांची रचनात्मक कार्ये, काव्य, कला इत्यादींचा तिच्यामध्ये समावेश होतो. या विषयावर ऑस्ट्रियाचा प्रख्यात मानसशास्त्रज्ञ डॉ. सिगमंड फ्रायड याने क्रांतिकारी कार्य केले आहे. ते मनोविश्लेषणशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहे. फ्रायडने असे दाखवून दिले की, मनुष्याची कामवृत्ती ही चार अवस्थांमध्ये प्रकट होते. शैशवावस्थेमध्ये कामवृत्ती ही शिशुंच्या आत्मप्रेमापर्यंतच सीमित असते. शिशु सुरुवातीस आपल्या अवयवावर आणि आपल्या शरीराशी निगडित वस्तूंवर प्रेम करते. बाल्यावस्थेत कामवृत्ती माता-पित्याच्या प्रेमामध्ये परिवर्तित होऊन जाते. या अवस्थेमध्ये पित्यापेक्षा मातेवर त्याचे अधिक प्रेम असते. अशाच प्रकारे कन्येचे प्रेम पित्याप्रती असते. किशोरावस्थेमध्ये बालकाचे प्रेम हे आपल्याच लिंगाच्या इतर समवयस्क बालकांशी असते, म्हणून कन्येचे प्रेम हे इतर कन्यांशी असते. किशोरावस्थेचे प्रेम हे समलैंगिक असते. प्रौढावस्थेमध्ये कामवृत्ती आपल्या परिपक्व अवस्थेत उपस्थित असते. या अवस्थेमध्ये पुरुषाचे प्रेम स्त्रीवर आणि स्त्रीचे प्रेम पुरुषावर असते. या अवस्थेत विषम लैंगिक अवस्था म्हणतात. शाळेत प्रत्येक वर्गामध्ये मुले ही एखाद्या विषमलिंगी शिक्षकावर प्रेम करतात. क्षणभंगूर प्रेमामध्ये रोमांचकारी शोभा सर्वोच्च स्थानी असतेच; विकासमान शरीरामुळे कल्पना हिंदोळे घेते आणि सुंदर प्रतिमा निर्माण करते - प्रकट करते. ती प्रतिमा सहजगत्या इतकी वास्तव वाटते की ती आभासाच्या रंगांमध्ये सुंदर मनपसंत वस्तू जपून ठेवली असावी. येथे शारीरिक तत्त्व जाणीवपूर्वक मुळीच प्रवेश करीत नाही. गटे म्हणतो, ''विशुद्ध अभ्रष्ट तरुणाईमध्ये प्रेमाची प्रथम प्रवृत्ती ही पूर्णपणे एका पवित्र दिशेकडे वळते.''

लवकरच त्यानंतर ती लोकोत्तर अतींद्रिय अनुभूती येते. जिला आपण गोजीरवाणे वासरू म्हणून हीन नाव ठेवतो. यद्यपि एक क्षणभर आपण त्या गोजीर वासरूच्या सौम्य सौंदर्यापासून परावृत्त होत नाही. सर्वसाधारणपणे असले प्रेम हे गुप्त आणि नाकबूल असते तरी पण तिची अल्पशी बक्षिसी निनावी असते. या अवस्थेमध्ये मुली मुलांपेक्षा अधिक धाडसी असतात आणि जरी आपल्या अधिक सजग वर्षांमध्ये हा धाडस बाह्यत: घटलेला असतो तरी पण प्रेमाच्या कलेमध्ये त्या शेवटपर्यंत आपले श्रेष्ठ तंत्र कायम ठेवतात. मुलगा संकोची वाटतो; परंतु मुलगी धीर वाटते, धीट वाटते आणि प्रसंगावर आपले प्रभुत्व गाजविते. मुलगा आपल्या मनोवांछित मुलीस टाळण्यासाठी विशेष प्रयत्न करतो, तो रात्रीच्या अंधारात एकांतामध्ये आपला वेळ घालवतो, अथवा दिवसा उदास भटकतो, आपल्या प्रेयसीच्या उपस्थितीत केलेल्या विचित्र आणाभाक्यावर तो विषण्ण चिंता करतो, मातृ सुलभता व मातृप्रेमामध्ये वाढलेल्या काही तरुणांमध्ये ही

संवेदनशीलता इतक्या प्रमाणात जाणवते की ते आजन्म ब्रह्मचारी राहतील की काय असे वाटते. इतर मुलांमध्ये आत्मप्रदर्शनाचे धैर्य बळकट बनते आणि जेव्हा त्याच्या स्वप्नातील प्रेयसी मुलगी हजर असते, तेव्हा तिची प्रशंसा प्राप्त करण्यासाठी तो आपल्या प्राणाची बाजी लावतो. मादीला हस्तगत करण्यासाठी नर प्राणी रक्तरंजित संघर्षामध्ये आपले बळ दाखवून देतात. याच प्रवृत्तीची पुनरावृत्ती तरुण मुले दाखवून देतात. आपल्या प्रेयसीस हस्तगत करून तिचे अनुमोदित सुहास्य कायम ठेवण्यासाठी परिपक्वतेस आर्थिक संघर्षाची लढाई लढावे लागेल याचे पूर्वानुमान तारुण्यास येते. अशा प्रकारे प्रेम जगरहाटीस प्रवृत्त करते व त्याप्रमाणे त्यास बनविते.

या प्रारंभिक प्रकटीकरणानंतर लवकरच आगमन होणाऱ्या भर तारुण्यामध्ये प्रेम विविध टप्पे पार पाडते, जर तात्कालिक असेल तर ते सामान्य असेल, जर ते स्थायी असेल तर ते कायम असेल. एक कामविकृती ही एक प्रकारची पूर्वजानुरुपता असते – मुळात सामान्य आणि उपयोगी असलेले आणि नंतर सुधारित व सरस असलेले आचरणाचा काहीसा प्राचीन रूप प्रकार निरोगी प्राणिजीवन व व्यक्तिसंघात अशा संदिग्ध अवस्थांमधून फिरत असते आणि मग ते प्रौढ आणि सामान्य प्रेमाकडे धाव घेते.

आता प्रणय याचनेचे दिवस येतात. हा मानवी भाग्योदयाचा सुंदरतम टप्पा असतो. परिपक्वता येईपर्यंत प्रणय निवेदन थांबेल असे काही नाही. बाल्यावस्थेत खेळले जाणाऱ्या खेळांपैकी निम्मे खेळ हे प्रेमाचे खेळ असतात आणि एखादी पाच वर्षाची मुलगी पण मोठ्या कौशल्याने प्रेमाचा दिखावटी खेळ खेळू शकेल. प्रणय याचना मार्मिक अनिवार्य हेतू साध्य करते. ते प्रेमास जास्त पूर्णत्वाने उत्तेजित करते आणि हळूहळू जीवन स्तर व गुण उंचावणारे सर्वोत्तमाच्या निवडीची संधी व वेळ प्रदान करते. प्रौढांमध्ये प्रणय याचनेचे अनुष्ठान हे पुरुषाकडून अर्जवशील अग्रेसरता असते, तर स्त्रियांकडून संमोहक माघार असते. काहीसे अपवाद पण असतील. न्यू गियानामध्ये मुली पुरुषांना प्रणय निवेदन करतात आणि त्यांना विपुल बक्षिसे वाटतात; परंतु ही कौतुकास्पद प्रथा अद्याप आपल्याकडे विकसित झाली नाही. प्राय: पुरुष सकारात्मक आणि आक्रमक भूमिका वटवतात, कारणतो स्वभावत: लढाऊ आणि हिंसक असतो, त्याच्यासाठी स्त्री म्हणजे विजयश्री प्राप्त करून हस्तगत करण्याचे एक बक्षीस असते. सर्व प्रणयक्रीडा द्वंद्वयुद्ध असते आणि सर्व मीलन प्रभुत्वाचा खेळ असते.

स्टॅन्ले हॉल म्हणतो, ''काही नर टोळ इतक्या त्वेषाने लढतात की, त्यांची तुलना ही तरुण कुक्कुट द्वंद्वाशी केली जाऊ शकते. प्रजनन हंगामामध्ये नर मासे प्राणांतापर्यंत लढतात. तारुण्यामध्ये आपल्या वसंत काळात नर सरडे लढत नसलेले क्वचितच आढळून येईल. वसंत ऋतूत अधिकांश नर पक्षी युयुत्सु भांडखोर असतात. भांडणामध्ये ते आपले चोच, पंजे यांचा उपयोग करतात आणि दोन्ही पंख आणि पायांनी टाच मारतात. त्यांच्यासाठी युद्धाचा काळ हा प्रेमाचा काळ पण असतो.'' (स्टॅन्ले हॉल – 'ॲडोलेसन्स' खंड–२, पृ.३६८) माणसांमध्ये युद्ध हे एक प्रकारची वाणिज्य स्पर्धा आणि आत्मप्रदर्शन ठरते. आपण दातांनी लढण्याऐवजी बँक बचतीच्या आधारे लढत असतो आणि व्यापारी शिष्टाचारामागे आपले सर्व पंजे लपलेले असतात.

जर स्त्रिया शहाण्या असतील तर त्या पलायन आणि शालीनतेने लढतील. भय आणि विशुद्धतेमुळे निर्मित आणि कुलीनता व विचक्षणतेमुळे विकसित शील एक प्रकारची व्यूहमय माघार असते. मानवी प्रजातीचे हे वैशिष्ट्य नसून इतर प्राण्यांमध्ये सुद्धा हे आढळते. मादी प्राणी ऋतूबाह्य आणि बंधनबाह्य प्रणयक्रीडेस अनुत्सुक असतात, ते त्याचा प्रतिकार करतात. बौमार्काइसने म्हटले आहे की, इतर प्राण्यांपासून माणूस हा या दृष्टीने वेगळा आहे की तहानलेला नसतानाही पण तो पाणी पितो, आणि सर्व ऋतूंमध्ये प्रेम करतो. सुसंस्कृत लोकांमध्ये शील हे सर्वात सुंदर व उत्कृष्ट असे प्रेमाचे मानसिक विकास असते. ते एक अप्रतिम वैभवाकडे विकसित होते आणि काही वेळेस आत्म्याच्या निगूढतम अंत:प्रेरणांवर विजय मिळविते. प्राचीन मिलेसियामध्ये तेथील सुज्ञ विधायकांनी स्त्रियांच्या आत्महत्येच्या लोणास अशा प्रकारे थोपविले की आत्महत्या केलेल्या स्त्रियांची शवे रस्त्यावरून नग्नावस्थेत नेण्यात यावीत असा आदेश काढून, ती कुप्रथा मोडीस काढली. (एल्लीस एच. 'स्टडीज इन दि सायकॉलॉजी ऑफ सेक्स' खंड-१, पृ. २४)

विल्यम जेम्सचे असे मत होते की, शील जन्मजात प्रवृत्ती नसून ती अर्जित असते. स्त्रियांना असे आढळून आले की उदारता ही अवमान उत्पन्न करते आणि त्यांनी हा आपला निष्कर्ष आपल्या कनक्यांना पोहोचते केले. पुष्कळशा टोळ्यांमध्ये फक्त विवाहित स्त्रिया वस्त्र परिधान करीत. वारसा हक्क अबाधित राहण्यासाठी हे आवश्यक असल्याचे त्यांच्या नवऱ्यांना वाटले. जेव्हा क्रय-विक्रयाची जागा बळजबरी हस्तगत करून लग्न लावण्याचा लोकाचार प्रकार बनला आणि माता-पित्यांना असे आढळले की साध्वी कन्या सर्वोच्च मूल्य आणतात, तेव्हा त्यांनी शुद्धपणे शीलास प्रोत्साहित केले.

या विविध स्रोतांपासून शील हे स्त्रीचे सर्वात मार्मिक मोहकतेमध्ये विकसित झाले. शीलभ्रष्ट स्त्रिया पुरुषांसाठी, सहजगत्या सोडून, आकर्षक नसतात. प्रेम-व्यवहारामध्ये आत्मप्रदर्शनाचा संकोच आणि बक्षिसांमध्ये काटकसर ही अधिक चांगले अस्त्रे ठरतात. जेव्हा रस्त्यावर आपणास गुह्य शरीररचना शिकविली जाते तेव्हा आमचे लक्ष चेतना उत्पन्न करते; परंतु आमच्या 'हेतू' क्वचितच विचलित होतो. तरुण माणसाचे डोळे खाली झुकतात, याचा विचार न करता त्याला वाटते की ही नाजूक राखीव वृत्ती कोमलतेचे आश्वासन देते, स्त्रियांमधील ही सर्वोत्कृष्ट गोष्ट असते. आपले फायदे राखून ठेवून शील हे पुरुषाची क्षमता व साहस चेतविते, काही परिणामाविषयी त्यास सोत्साह आंदोलित करते आणि समाधानकारक सर्वसामान्य पातळी खाली पहुडलेल्या सुप्त शक्ती आवाहन देतात. पक्षी जातीच्या रंजित गौरवाप्रमाणे, पुरुषांची साधक शूर कृत्ये ही स्त्री-पुरुष जातीमधील स्पर्धा – चुरस आणि आत्मप्रदर्शनामुळे कुठपर्यंत असतील हे कोण (बरे) जाणे?

आकर्षणाला आपला मार्ग चोखाळू द्या आणि प्रेमास मातृपितृत्वामध्ये पूर्ण होऊ द्या. बाळाच्या जन्माने इच्छेचा परीघ पूर्ण होऊ द्या. कदाचित पुनरुत्पादनाची एखादी विशिष्ट मूलप्रवृत्ती नसेल; परंतु सहवास आणि मातृ-पितृ संगोपनाची केवळ मूल प्रवृत्ती असावी. निसर्ग धूर्तपणे आपला हेतू साध्य करते आणि तिचे सर्वात सुखद आनुषंगिक उत्पादन म्हणजे मानवजात होय.

जेव्हा बाळ जन्मास येते तेव्हा मातापित्यामधील प्रेम नूतनीकृत होते; परंतु यापूर्वी प्रज्ज्वलित झालेल्या प्रेमाग्नीच्या ज्वालेपासून आश्चर्यकारकरित्या ते निराळे असते. क्षणभंगूर एक असलेल्या दोन्ही माता-

पित्याच्या अंत:करणापासून काही प्रेम – प्रेमांश बाळ स्वत: घेण्याची दाट शक्यता असते. आपल्या नूतन निष्ठेमध्ये पित्यास विसरण्याचा मातेचा कल असतो आणि जर ते लघु नवल एखादी मुलगी असेल तर आपल्या प्रणय निवेदिता प्रिय पत्नीवर असलेले प्रेम पिता हा त्या मुलीकडे वळविण्याच्या मोहात पडतो; परंतु शेवटी ही विचलने आपली मोहिनी गमावून बसतात आणि जोडप्यामध्ये पुन्हा प्रेमाचे नवीन बंध घट्ट विणले जातात.

शेवटी दोन जीवांना विवाहाच्या बंधनामध्ये अडकविण्याचा काळ येतो. कारण मातृ-पितृत्वाच्या त्या वर्षांमध्ये भाग्याची कितीतरी स्थित्यंतरे, कितीतरी शारीरिक यातना आणि अंत:करणाची त्रेधा उडाली असेल! आजारपण चंचल लहरीस एक विशिष्ट खोली आणि शांतचित्तता आणते आणि जवळ येऊन ठेपलेले मृत्यूच्या अरिष्टामध्ये प्रेम एक नूतन जीवन धारण करते. बनविलेल्या आणि एकत्रितपणे कार्यान्वित केलेल्या योजना, हातोहात जिंकलेले विजयश्री आणि वाटून घेतलेली उदासीनता, अनुकूल अशी समान छंद असलेली मने, जवळजवळ व्यक्तित्वांना एक दुसऱ्यामध्ये समाविष्ट करणारी एक पवित्र भागीदारी, इतकेच नव्हे तर त्या दोघांचे दोन निराळे चेहरे सारखेच वाटावेत, इतका एकोपा पती-पत्नीमध्ये निर्माण झालेला असतो. मुलांच्या पाळण्यांकडे दोघे मिळून लक्ष ठेवणे, त्यांची वाढ होत असलेली पाहणे आणि शेवटी नाइलाजाने त्यांना थोडेसे प्रेम देणे, हे सर्व एक बनवायचे असते.

मुलांच्या हास्याने प्रतिध्वनित घर जेव्हा त्यांच्या नि:शब्द आठवणीने मनामध्ये येते तेव्हा, प्रेम जणू सांत्वनपर, तिचे सर्व वैभव पुन्हा अनेक वर्षांच्या सोबत्यासाठी आणून देते. जोपर्यंत ते आपल्या अत्यंत प्रसन्न अशा उपस्थितीमुळे वयाचा एकांतपणा आणि 'महान शत्रू' अर्थात मृत्यूच्या सामिप्याचे भय-दु:ख कमी करीत नाही, तोपर्यंत त्याचा पूर्ण आटोका भरत नाही. इच्छा जशी जाणते तसे जे त्याला जाणतात ते फक्त त्याचे मूळ आणि दुर्वासना जाणतात, आता त्याचा आत्मा शिल्लक राहतो, प्रत्येक शारीरिक तत्त्व (अवयव) जळून गेलेले असते. जुन्या अंत:करणांच्या पुनर्मिलनामध्ये शरीराची मानसिक समृद्धी – उत्कर्षाची भूक पूर्ण होते (शमते).

असा हा प्रेमाचा चक्र आहे. एक दृष्टिक्षेपात ते पहा – सूक्ष्म आदिजीवाच्या कोशाणुंच्या विलयनामध्ये, पशूच्या जबरदस्त कामवासनेमध्ये, असभ्य वन्य मानवाच्या अपरिष्कृत कामातुरतेमध्ये, तरुणाईच्या विचारमग्न आणि द्रवित डोळ्यांमध्ये, एलिझाबेथ ब्राऊनिंगच्या सुनीतांमध्ये आणि प्रेमाचे अर्धशतक गाठलेले, तृप्त आनंदाने थरथरत असलेले वृद्ध जोडप्यामध्ये त्यांचा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी त्यांची मुले आणि नातवंडे एकत्र जमलेली असताना अवयवांच्या चुंबकत्वापासून ते आराधनेच्या काव्यापर्यंत आणि समस्त जीवनाच्या अल्पावधीची एकनिष्ठतेपर्यंतचा मंदगती उत्कर्षाच्या त्या कायापालटापेक्षा अधिक आश्चर्यकारक काय बरे असू शकेल? पुन्हा एकदा सान्तायनाचे गहन शब्द आठवतात : ''प्रत्येक उत्कृष्ट नमुन्याचा एक नैसर्गिक आधार असतो, आणि प्रत्येक नैसर्गिक बाबीचा एक आदर्श विकास असतो.'' प्रेमास आपल्या मुळाविषयी लाज वाटता कामा नये आणि जर इच्छा निष्ठेचा आधार बनत नसेल तर तिचे दमन होऊ द्या.

प्रेमाचा तत्त्वज्ञ प्लेटोने असे म्हटले आहे : ''ज्याला प्रेम स्पर्श करीत नाही, तो अंधारात चाचपडत चालतो.'' आपल्या अंतसमयी लाप्ला (Laplace) यांचे मित्र त्यांचे शोध आणि त्यांचे ग्रंथ यांच्या आधारे त्यांचे सांत्वन करीत असताना त्यांनी त्यांची कानउघाडणी खेदाने अशी केली. या जीवनामधील महत्त्वाच्या गोष्टी नव्हेत. ''तर मग कोणत्या?'' त्यांनी विचारणा केली. आणि त्या वृद्ध शास्त्रज्ञाने, शेवटचा श्वास असताना उत्तर दिले, 'प्रेम'.

सगळ्या गोष्टी क्षणभंगुर, नाशवान आहेत; परंतु प्रेमच एक अनश्वर आहे. ते थडग्यांना परस्पर व्यापते आणि पिढ्याच्या मदतीने मृत्यूच्या फटीस जोडते. मोहभंगाच्या कडवटपणामध्ये ते किती बरे लहान वाटते आणि तरी पण मानवजातीच्या परिप्रेक्ष्यामध्ये ते किती चिरस्थायी वाटते – शेवटी आपण सर्वांस क्षय होण्यापासून किंचित वाचविते आणि तारुण्य व बालकाचा जोम या स्वरूपात आमचे जीवन पुन्हा नवीन स्वरूपात प्रस्थापित करते. थकवा आमचे वैभव आहे आणि आमचे चातुर्य नैराश्य निर्माण करणारे एक छोटासा प्रकाश आहे; परंतु प्रेम अंतःकरणास शब्दातीत अशा सांत्वनेसह उत्साही व प्रेमळ बनविते, आदानामध्ये नव्हे तर प्रदानामध्ये ते अधिक उत्साही असते. प्रेमदान हा प्रेमाचा आदर्श आहे. प्रेमास देण्याचे आकर्षण आहे तर घेण्याचे विकर्षण आहे. (*Will Durant - 'The pleasures of Philosophy' - "Love", pp 100-114)

**ग) प्रेम : अध्यात्म – दर्शनाच्या दृष्टिकोनातून**

प्रेमाचे दोन सर्वमान्य प्रकार आहेत. ते असे – १) आध्यात्मिक वा अलौकिक प्रेम आणि २) भौतिक वा लौकिक प्रेम, **भौतिक प्रेम** हा आध्यात्मिक प्रेमाचा जिना आहे. या जिन्याच्या पायऱ्या चढूनच आध्यात्मिक प्रेमाच्या शिखरापर्यंत पोहोचता येते. समस्त आस्तिक धर्म व दर्शनांनुसार सजीव सृष्टीच नव्हे तर संपूर्ण ब्रह्मांड ही परमेश्वराची निर्मिती आहे. परमेश्वराने स्वतःचा अपवाद वगळता समस्त जीवसृष्टीमध्ये युगुल वा युग्मके निर्माण केली आहेत. सजीव सृष्टीच्या संदर्भात युग्मनिर्मिती आणि स्वाभाविक गुणावगुणांच्या क्षेत्रात द्विदल मांडणी ही परमेश्वराची इहलोकातील अशी समर्पक योजना आहे. ती सुनियोजित आणि न्यायप्रस्थापक पण आहे. परमेश्वराने सर्व सजीव सृष्टीत शारीरिक रचनेतील लिंगभेदानुसार मानव जातीमध्ये स्त्री–पुरुष, पशु–पक्ष्यांमध्ये नर–मादी आणि वनस्पती जगतात फुलांमध्ये पुंकेसर–स्त्रीकेसर अशा स्वरूपात युग्मनिर्मिती केली आहे, तर स्वभाव धर्मभेदानुसार श्रद्धा–अश्रद्धा, न्याय–अन्याय, शुभ–अशुभ, आनंद–दुःख, चांगले–वाईट, गोड–कडू, ज्ञान–अज्ञान इत्यादी स्वरूपात द्विदल मांडणीच कायम केली आहे.

निर्मिती ही जोडप्यामधील परसपर आकर्षण व मीलनामुळे शक्य आहे. याचे कारण परस्परांमधील प्रेमच होय. प्रेम ही चुंबकीय आकर्षण शक्ती आहे. युग्मनिर्मिती व द्विदलता हा अस्तित्व निरंतरतेचा मूलभूत सिद्धान्त आहे. युग्म व द्विदलामुळे सह–अस्तित्व टिकून आहे. म्हणून तर स्त्री–सौंदर्यामुळे पुरुष तिच्याकडे अनायास आकर्षिला जातो. अश्रद्धेमुळे श्रद्धा उठून दिसते. मृत्युमुळे जीवनाचे महत्त्व आहे. अवज्ञेमुळे आज्ञापालनाची गोडी व शोभा आहे. अंधारामुळे प्रकाशाची महती आहे. दुःखद यातनांमुळे सुखोपभोग सुखावतो. घेण्यासाठी देणारा पाहिजे. पापकर्मांच्या धिक्कारामुळे पुण्याईचे गोडवे आहे. सारांश, युग्म

निर्मितीचे महत्त्व पवित्र कुराणाच्या एका श्लोकात असे शब्दबद्ध केले आहे – ''तो (परमेश्वर) कितीतरी पवित्र आहे ज्याने सर्वांच्या जोड्या निर्माण केल्या.'' ३६:३७

भौतिक प्रेमाच्या विकासाचे टप्पे निर्धारित करताना आपल्याला सर्वप्रथम जैविक अभिगमनापासून सुरुवात करून तिच्या शारीरिक पायाचा विचार करावा लागेल. आणि मग क्रमश: मानसिक व आध्यात्मिक विकासाकडे अग्रेसर व्हावे लागेल. एक काळ असा होता की, प्रेमासाठी अनिवार्य असलेली दोन साधने अर्थात दोन्ही लिंग – पुल्लिंग व स्त्रीलिंग – एकाच शरीरामध्ये विद्यमान होती, जसे अद्याप मातीचा किडा गांडूळामध्ये हे आढळून येते. नंतर निसर्गाने त्यांना दोन वेगळ्या जीवां (स्त्री–पुरुष, नर–मादी) मध्ये वेगळे केले आणि आता सध्या, प्रत्येक भाग हा आपल्या वेगळेपणामुळे स्वत:स एक अर्धा भागच मानतो, कारण सहजीवनामध्ये स्त्री–पुरुष या दोघांच्या सहवासाशिवाय जीवन हे आंशिक म्हणजे निम्मेच मानले जाईल आणि म्हणून ऐक्य व परिपूर्णतेसाठी समग्रतेसाठी आकांक्षा बाळगून आहे. पुरुषाशिवाय स्त्री ही कधीच पूर्ण नसते. कदाचित याचसाठी स्त्रीस 'अर्धांगिनी' म्हणून संबोधले जात असावे. पुरुष हा सहवासासाठी स्त्रीची प्रतीक्षा करीत असतो. यावरून असे स्पष्ट होते की, समग्राची इच्छा आणि पाठलागाचे नाव प्रेम आहे.

प्रेम मानवी शरीरामध्ये मनाच्या खोलवर कप्प्यामध्ये साठवलेले असते. प्रियकर हा प्रेयसीच्या सुंदर व मोहक रूपावर मोहीत होऊन, प्रेयसीकडे आकर्षिला जातो आणि परिणामी मनाच्या कप्प्यातील त्याचे सुरक्षित प्रेम हे नाना प्रकारे अभिव्यक्त होऊ लागते. प्रेमयाचना केली जाते. प्रियकर व प्रेयसी हे प्रेमाचे दोन अविभाज्य घटक असतात. हेच तथ्य हिन्दीचे सुप्रसिद्ध राष्ट्र कवी मैथिलीशरण गुप्त यांनी 'दोनो ओर प्रेम पलता है।' या शब्दांमध्ये आपल्या काव्यामध्ये मांडले आहे. प्रेम म्हणजे सर्वांनाच हवीहवीशी वाटणारी सुंदर भावना! प्रेम हा भाव साक्षात ईश्वरापासून ते सर्व प्राणिमात्रांमध्ये केंद्रस्थानी आहे. प्रेम ही परमेश्वराने माणसाला दिलेली अमूल्य देणगी आहे. वात्सल्य आणि मायेचा आधार प्रेम आहे. प्रेम या शब्दाची व्याप्तीच प्रचंड मोठी आहे. प्रेमाने जग जिंकता येते, दमनाने किंवा भीतीने नव्हे.

प्रेमी युगुलाच्या प्रेम व्यवहारामध्ये परस्परात समजूतदारपणा, सहकार्य, सामंजस्य व समन्वयानी युक्त असा एकोपा असेल तर दोघांच्या जीवनामध्ये वसंत फुलतो, जर का त्यापैकी एकाने पाठ फिरविली आणि दुसऱ्याने निरंतर पाठलाग सुरू केले तर मग मात्र प्रेम व्यवहारामध्ये दुरावा निर्माण होऊन वैमनस्याची खोल दरी निर्माण होते व शेवटी विमनस्क मन:स्थितीमध्ये, हताश व घोर निराश होऊन त्यापैकी दोघे किंवा एक पराकोटीचा शेवटचा उपाय म्हणून आत्महत्येचा मार्ग तरी अवलंबेल किंवा दुसऱ्याचा काटा काढण्यासाठी अविचाराने सूड म्हणून हत्येसारखे अघोरी कृत्य करण्यापर्यंत मजल जाईल. येथे हत्या आणि आत्महत्याची समस्या निर्माण होते. प्रेमाच्या नकारात्मक स्वरूपाची ही पराकोटी आहे. मात्र सद्भाव आणि सहवास, प्रेममय सहजीवन सुकर करतात, यात मुळीच शंका नाही.

**आध्यात्मिक प्रेम** हे परमेश्वराशी निगडित असते. प्रेम एक सार्वभौम सत्ता आहे. त्यास कोणीच अपवाद नाही. परमेश्वरसुद्धा प्रेमापासून सुटलेला नाही. त्याच्या मनात आत्म–रतिची (स्व–प्रेमाची) इच्छा (विचार) निर्माण झाल्याकारणाने त्याने ब्रह्मांड निर्माण करण्याचा निर्णय घेतला. कारण इच्छा–आकांक्षातूनच विचार व आचार म्हणजेच कृती उद्भवत असतात. म्हणूनच स्वरूप दर्शनाची ईश्वरी इच्छा ब्रह्मांड

निर्मितीच्या मुळाशी आहे. याचा संकेत पवित्र कुराणामध्ये असा आहे – ''अल्लाह जे इच्छितो ते निर्माण करतो. तो एखादी गोष्ट (कार्य) करण्याचा निर्णय घेतो तेव्हा फक्त म्हणतो की, 'हो' तर (निमिषमात्रामध्ये) ती होते.'' ३:४७ याला 'कुन फ़यकुन'चा सिद्धान्त म्हणतात. म्हणजेच हा भारतीय तत्त्वज्ञानातील 'भव सिद्धान्त' आहे. याला 'नादब्रह्म' सिद्धान्त पण म्हणता येईल. या सिद्धान्ताचा 'अष्टपदी' मानसशास्त्रीय क्रम असा निर्धारित केला जाऊ शकतो.

आपण एकाचे अनेक रूप – 'एकोऽहं बहुस्याम' होऊन जावे अशी कळकळ (Interest) परमेश्वरामध्ये निर्माण झाल्यानंतर त्याची उत्कंठा (Craving) वाढली व त्यामुळे आकांक्षेचा (Desire) जन्म झाला. मग उपरोक्त संकल्प (Purpose) सिद्धीची कामना (Wish) जागृत होऊन इच्छेच्या प्रयत्नापोटी (Endaevour) कृतीस (Action) 'होऊन जा' चा आदेश दिला गेला आणि मनोनिग्रहाच्या (Will) परिणामस्वरूप निमिषमात्रामध्ये वांछित गोष्ट निर्माण झाली. उपरोक्त अष्टपदांची क्रमशः मांडणी अशी करता येईल –

**'कुन फ़यकून' सिद्धान्त अर्थात 'भव' सिद्धान्ताचे मानसशास्त्रीय अष्टपद**

१) कळकळ (Interest)
२) उत्कंठा (Craving)
३) इच्छा–आकांक्षा (Desire)
४) प्रयत्न (Ednaevour)
५) संकल्प (Purpose)
६) कामना (Wish)
७) मनोनिग्रह (Will) आणि
८) क्रिया, कृती (Action)

स्वतःचे रूप स्वतःस पाहता येत नाही. पाहता येणे अशक्य आहे. त्यासाठी दुसरे पारदर्शक साधन व माध्यमाची आवश्यकता असते. आपणास स्वतःचा चेहरा पाहता येत नाही. तो पाहण्यासाठी पारदर्शक आरशाची गरज असते. आपले प्रतिबिंब पाहण्याच्या हेतूने परमेश्वराने ब्रह्मांड निर्मिती सुरू केली. मात्र ब्रह्मांड निर्मिती पूर्वी सर्वत्र घोर अंधःकार होता. काहीच अस्तित्वात नव्हते. अंधारामध्ये प्रतिबिंब पाहता येत नाही. त्यासाठी प्रकाशाची आवश्यकता असते. या अटीच्या परिपूर्ततेसाठी त्याने सर्वप्रथम प्रकाश निर्माण केले. मानव सोडून इतर सर्व चराचर सृष्टी निर्माण केली. भारतीय तत्त्वज्ञानानुसार ब्रह्मांड रचनेचे सर्वप्रथम रूप द्यौ अर्थात प्रकाश आहे आणि ते ज्योतिर्मय आहे. अशा प्रकारे तिमिरापासून तेजाकडे वाटचाल करून त्याने सर्वप्रथम प्रकाश निर्माण केले. इस्लाम दर्शनप्रणित 'नूर–ए–मुहम्मद' अर्थात मुहम्मदीय प्रकाश पण याशिवाय दुसरे काहीच नाही. प्रतिबिंब प्रतिमेसाठी प्रकाश हा घटक अनिवार्य असतो. या घटकाच्या माध्यमानेच मूळ वस्तूचे प्रतिबिंब दिसते. विद्येच्या प्रांगणातील सर्वप्रथम प्रार्थनेचे बोल पण याच प्रकाशाशी निगडित आहेत – 'तमसोऽ मा ज्योतिर्गमय' अर्थात 'हे प्रभो! अज्ञानाच्या अंधःकारापासून मला ज्ञानप्रकाशाकडे घेऊन चल.'

वर नमूद केल्याप्रमाणे ईश्वराने मानव सोडून समस्त ब्रह्मांड - आकाश, सूर्य, चंद्र, तारे, ग्रह, अंतराळ, पृथ्वी व त्यावरील सजीव सृष्टी व इतर सर्व चराचर निर्माण केले. मग तो त्या सर्वांमध्ये आपले प्रतिबिंब शोधू लागला. तेव्हा त्याला याचा कोठेच पत्ता लागेना. त्याने या सर्वांना आडव्या काठीचे निर्माण केले होते. मग अकस्मात आपला विचार बदलून त्याने उभ्या काठीचा जीव निर्माण केला. तो जीव म्हणजे मानव होय. अशा प्रकारच्या आदिमानवाच्या अस्थी-मांस-पंजराची आकृती निर्माण करून त्याने त्यात स्व-प्राण फुंकून दिले. तत्क्षणी काय हा चमत्कार! त्यात त्याला आपले स्पष्ट प्रतिबिंब आढळून आले. त्या प्रतिबिंबामध्ये त्याला आपले समस्त गुण आढळून आले. याच कारणास्तव मानव हा परमेश्वराची सर्वोत्तम रचना ठरला. म्हणून तो समस्त प्राणिमात्रांचा मुकुटमणीच होय! त्याच्या पिंडामध्ये ब्रह्मांड सामावून गेले. म्हणूनच 'जे ब्रह्मांडी ते पिंडी' असे म्हटले जाते. केवढा हा मानवाचा अगाध महिमा! हे सर्व परमेश्वर - प्रेमाचे फलित आहे.

मात्र मानवास त्याने कर्मस्वातंत्र्य बहाल करून त्याला कठीण अशा सत्त्व परीक्षेसाठी बांधून ठेवले. त्याला 'भक्ती'चे बंध घालून दिले. मोक्षप्राप्ती हे त्याच्यासाठी उद्दिष्ट ठरवून दिले. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी भक्तीरूपी प्रेमाची दोरी बांधून दिली. या दोरीवर त्याला 'तारेवरची कसरत' करावयास लावून बरे-वाईट, यशापयश, पाप-पुण्य अशा दोन बाजू निर्धारित केल्या. यामधील योग्य निवड स्वत: मानवास करण्यास भाग पाडले. तदनुसार स्वर्गाची बक्षिसी व नरकाची शिक्षा निर्धारित करण्यात आल्या.

भगवत् प्रेमामुळेच भक्त हा ईश्वर सान्निध्य आणि त्याच्या दर्शनासाठी कासावीस होतो. तो प्रभू दर्शनासाठी उतावीळ होतो. यामुळे प्रेमच चुंबकीय आकर्षण शक्ती असल्याचे प्रत्ययास येते. प्रेमच परस्पर आकर्षणाची शक्तिशाली अशी प्रचंड ऊर्जा आहे. ईश्वर हा भक्तवत्सल आहे. भक्ती प्रिती आहे. ईश्वर प्रेममय आहे. प्रेमापोटीच त्याने अवतार घेतले आहेत. प्रेम हे प्रेमापासून उत्पन्न होते. प्रेमाच्याच आधारे मानव भवसागर पार करू शकतो. प्रेमामुळेच परमार्थ प्राप्त होतो. प्रेमाच्या मधुर बंधनामध्येच संपूर्ण विश्व बांधले गेले आहे. ईश्वर हा प्रेमाच्या धाग्यामध्ये बांधला गेला आहे. प्रेमामुळेच तो पण आपल्या भक्तांकडे आकर्षिला जातो. आध्यात्मिक प्रेम हे सर्वश्रेष्ठ असते, हे नि:संशय.

आपली भक्ती करण्यासाठीच मानवास निर्माण केले असल्याचे स्वत: परमेश्वराने पवित्र कुराणामध्ये स्पष्ट केले आहे. ते असे - ''मनुष्य आणि जिन्न (अर्थात यक्ष-किन्नर) यांना मी यासाठी निर्मिले, की त्यांनी माझी **भक्ती** करावी.'' ५१:५६. म्हणून ईश्वराच्या दृष्टीने मानव निर्मितीचे हेच प्रयोजन ठरते. त्यामुळेच ईश्वराची भक्ती करणे हे मानवाचे आद्य कर्तव्य ठरते. भक्ती म्हणजे ईश्वराप्रती प्रिती होय - प्रेम होय. भक्ती म्हणजे नामसाधना व नामस्मरण म्हणजे जपसाधना. मानस जपामुळे भावकुसुम विकसित होते, फुलते व त्यामुळे प्रेमाचा विकास होतो आणि भक्तीचे उद्दिष्ट असते ईश्वर-प्रेम-प्राप्ती. शिवाय ईश्वरास पण प्रेम आवडते. अशाप्रकारे मानवी जीवनाची सफलता व यशस्वीता प्रेमावरच अवलंबून असते. म्हणूनच प्रेमाचे साम्राज्य सर्वसमावेशक आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. थोडक्यात भक्ती म्हणजे प्रेम आणि याचा व्यत्यास पण तितकाच खरा आहे - प्रेम म्हणजे भक्तीच होय.

**प्रेम म्हणजे भक्तीच !**

'प्रेम' या शब्दाकडे अखंड स्वरूपात पाहिल्यास त्याची अक्षरे अडीच असल्याचे आपणास आढळून येते. याच अडीच अक्षरांचा महिमान हिन्दी भाषेत असे वर्णिलेले आहे – 'ढाई आखर प्रेम का पढे सो पंडित होय' म्हणजेच प्रेमाची ही अडीच अक्षरे योग्य प्रकारे जाणणारा व आचरणात आणणारा हा खरा परम ज्ञानी असतो; परंतु प्रेम या शब्दांतर्गत जोडाक्षरांची फोड करून पाहिल्यास हीच अडीच अक्षरे चार अक्षरे बनतात. जसे –

प्रेम = प् + र + ई + म. ही चार अक्षरे खालील चार समर्पक शब्दांची आद्याक्षरे ठरतात. जसे –

१) प = पराकाष्ठा, परम

२) र = रति (प्रेम)

३) ई = ईश्वर

४) म = मनुष्य

उपरोक्त आद्याक्षरांच्या शब्दरूपांना विधानामध्ये गोवल्यास पुढील विधान सिद्ध होते व ते भक्तीची एक समर्पक अशी व्याख्याच ठरते! म्हणून ईश्वरामध्ये मनुष्याची पराकाष्ठेची अनुरक्ती राखण्याचे नावच तर भक्ती आहे. किती बरे हा समर्पक व सुंदर योगायोग! कारण नेमकी भक्तीची हीच व्याख्या नारदभक्तिदर्शन, शांडिल्यभक्तिदर्शन आणि भागवत या तिन्ही प्रमाण ग्रंथांमध्ये आढळून येते. त्यांच्या व्याख्या क्रमशः अशा आहेत –

१) 'सा तस्मिन् परमप्रेमरूपा' – नारदभक्तिसूत्र, श्लोक क्र. २

अर्थात ती **भक्ती** निश्चितच या अपरोक्ष परमात्मस्वरूपामध्ये **परमप्रेमरूप** आहे.

२) 'सा परानुरक्तिरीश्वरे' – शांडिल्यभक्तिसूत्र, श्लोक क्र. २

अर्थात परमेश्वरामध्ये अत्यंत अनुरक्ती – **परमप्रेम** म्हणजे **भक्ती** होय.

३) भागवत श्लोक – १, २ आणि ६ प्रणीत व्याख्या पुढीलप्रमाणे आहे –

'परमेश्वरामध्ये निर्हेतुक, निष्काम, एकनिष्ठ आणि अनवरत **प्रेमाचे** नावच **भक्ती** आहे.'

उपरोक्त व्याख्यांतर्गत **अधोरेखित** शब्दांना क्रमशः समोरासमोर ठेवून गणितीय सूत्र बनविल्यास समीकरण स्वरूपात उपरोक्त शीर्षकाची सिद्धता सिद्ध होते. अतएव–

प्रेम = भक्ती

अर्थात प्रेम म्हणजे भक्तीच होय किंवा भक्ती म्हणजे प्रेमच होय, हे सिद्ध होते.

**प्रेमाची रूपे आणि त्यांची दिव्य प्रेमाकडे वाटचाल***

प्रेमाच्या सार्वभौमिक स्वरूपामध्ये मातेचे वात्सल्यप्रेम, पित्याचे वैचारिक प्रेम, पती–पत्नी प्रेम, दाम्पत्य प्रेम, परस्पर हितकारी स्वामी–सेवक प्रेम, मित्रप्रेम, गुरू–शिष्याची निर्मळ दिव्य मैत्री, आत्मा आणि परमात्मामधील पूर्ण प्रेम या सर्व प्रकारच्या प्रेमाचा समावेश होतो. हे सर्व प्रेम दिव्य प्रेमाकडे वाटचाल करीत असतात. त्यांच्या वाटचालीचे स्वरूप आपणास पुढीलप्रमाणे आढळते –

सच्चे प्रेम काय असते याची जाण फारच कमी लोकांना असते. ज्याप्रकारे तिळाच्या प्रत्येक दाण्यामध्ये तेल व्याप्त असते, त्याच प्रकारे सृष्टीच्या कणाकणामध्ये प्रेम व्याप्त असते; परंतु ज्याप्रमाणे संत्र्याच्या स्वादाचे पूर्ण वर्णन करणे कठीण असते, त्याचप्रमाणे प्रेमाची व्याख्या करणे पण अत्यंत कठीण असते. संत्र्याचा स्वाद जाणण्यासाठी त्यास प्रत्यक्ष चाखून पाहावे लागते. प्रेमाच्या बाबतीत पण असेच आहे.

अधिकांश लोक प्रेमाकडे फक्त एक अशा भावनेच्या स्वरूपात जाणतात की जी त्यांच्या हृदयामध्ये - मनामध्ये आपले नातेवाईक, मित्र आणि इतर लोकांप्रती असते. ते यांच्याकडे मोठ्या तीव्रतेने आकर्षित होतात; परंतु प्रेम हे इतकेच नसून त्यापेक्षा आणखी काही अधिक आहे. खऱ्या प्रेमाचे वर्णन त्याचे परिणाम सांगूनच करता येणे शक्य असते.

प्रेमाची तृप्ती ही प्रेमाच्या अनुभूतीमध्ये नसून, ती अनुभूती निर्माण करणाऱ्या आनंदामध्ये असते. प्रेम आनंद देते. प्रेम आपणास या कारणासाठी आवडते की ते आम्हास मदमस्त करणारे आनंद देते. म्हणून प्रेम ही अंतिम उपलब्धी नसून, आनंद अंतिम उपलब्धी आहे. ईश्वर सत्-चित्-आनंद आहे. आत्म्याच्या रूपाने आपण सर्व वेगवेगळे व्यक्तित्वयुक्त सत्-चित्-आनंद आहोत. ''आनंदामुळेच सर्वांचा जन्म होतो, आनंदामुळेच सर्व जिवंत आहेत, आनंदानेच मरून आनंदामध्ये लीन होऊन जातात.'' तैत्तिरीय उपनिषद - ३-६-१. आनंदाशिवाय प्रेम, दया, वीरता, आत्मत्यागसारखे दिव्य भाव अर्थहीन होऊन जातात. आनंदाचा अर्थच आहे, उल्लास, परम सुखाची अभिव्यक्ती.

मनुष्यामध्ये आनंदाची मूळ अनुभूती मेंदूमध्ये स्थित ईश्वरीय चेतनेच्या त्या सूक्ष्म केंद्रामध्ये उत्पन्न होते की, जिला योगीजन सहस्रार चक्र असे म्हणतात; परंतु तरी पण आनंदाच्या वास्तविक भावनेचा अनुभव मेंदूमध्ये नव्हे तर हृदयामध्ये होतो. आनंद मेंदूमध्ये स्थित ईश्वरीय चेतनेच्या दिव्य सिंहासनावरून उतरून हृदयामागे स्थित सूक्ष्म केंद्र अनाहत चक्रामध्ये येतो आणि तेथे प्रकट होतो. अनाहत चक्र भावनांचे स्थळ असते. हा आनंद ईश्वराच्या परम आनंदापासून निघतो - ईश्वराचे सारभूत आणि परम गुण असलेले त्या परम आनंदापासून हृदयाची शारीरिक प्रक्रिया आणि हृदयामध्ये स्थित भावनांच्या सूक्ष्म आध्यात्मिक केंद्र यांच्या दरम्यान एक निश्चित संबंध असतो. हे दोन्ही सोबत मिळून प्रेमाच्या महान भावास - भावनेस व्यक्त करतात - मानवी प्रेमास पण आणि दिव्य प्रेमास पण.

जेव्हा मनुष्याची एखादी इच्छा पूर्ण होते तेव्हा त्यास आनंद होतो. आनंद काही विशिष्ट परिस्थितीमध्ये उत्पन्न होतो; परंतु त्या परिस्थितींच्या मदतीने तो उत्पन्न केला जाऊ शकत नाही. स्वत: आनंद ही आत्म्याचीच नित्य स्वाभाविक अवस्था आहे. प्रेम पण आत्म्याचाच स्वभाव आहे; परंतु प्रेमाचे स्थान आनंदानंतर आहे, कारण की आनंदाशिवाय प्रेमाचे अस्तित्वच नसते. काय तुम्ही आनंद रहित प्रेमाची कल्पना करू शकता? नाही. जेथे प्रेम असेल तेथे आनंद जरूर असेल. जेव्हा आपण त्या प्रेमासोबत येणाऱ्या दु:खाच्या गोष्टीबाबत बोलतो, याच्या बदल्यात प्रेम मिळत नाही, तेव्हा आपण अतृप्त आकांक्षेविषयी बोलत असतो. प्रेमाच्या वास्तविक अनुभवासोबत सदैव आनंद येत असतो. प्राय: सुख म्हणजे आनंद असे समजले जाते. मात्र ही चुकीची धारणा आहे. कारण सुखाचा विलोम - व्यत्यास दु:ख हा आहे; परंतु आनंदास मुळीच विलोम नाही. फार तर आपण आनंदाच्या अभाव अवस्थेस निरानंद अवस्था असे म्हणू शकू.

म्हणजेच आनंदरहित अवस्था ही निरानंद अवस्था असते. म्हणून यास विलोम नाहीच. जसे परमेश्वरास विलोम नाहीच. म्हणूनच आनंदच परमेश्वर आहे, असे आपण निश्चितच म्हणू शकतो.

**प्रेमाचे सार्वभौमिक स्वरूप***

सार्वभौमिक अर्थाच्या दृष्टीने प्रेम सृष्टीमध्ये व्याप्त आकर्षणाची ती दिव्य शक्ती आहे, जी सौहार्द्र - सामंजस्य उत्पन्न करते, एकता उत्पन्न करते, एक बंधनामध्ये बांधते. हिच्या विरोधात विकर्षण शक्ती आहे. जी ईश्वराच्या ब्रह्मचैतन्यापासून सृष्टीचे सर्जन करणारी बहिर्मुखी महाप्राण शक्ती आहे. विकर्षण शक्तीच सर्व रूप आकारांना मायेच्या माध्यमाने प्रकट अवस्थेत ठेवून देते. माया भ्रम उत्पन्न करणारी ती शक्ती आहे जी विभाजन करते, भेद उत्पन्न करते आणि असामंजस्यास जन्म देते. प्रेमाची आकर्षण शक्ती सृष्टीच्या या विकर्षण शक्तीचा प्रतिकार करते, तिचे निवारण करून सृष्टीमध्ये सामंजस्य प्रस्थापित करते आणि शेवटी तिला ईश्वराकडे खेचते. जे लोक प्रेमाच्या आकर्षण शक्तीशी अनुकूल राहतात ते निसर्गाशी आणि सर्व प्राण्यांशी सामंजस्य प्राप्त करतात आणि ईश्वरासोबत परमानंद पुनर्मिलनासाठी आकर्षिले जातात.

जगामध्ये प्रेमासाठी द्वित्व दिसून येते, अर्थात दोन किंवा त्यापेक्षा जास्त रूपांची आवश्यकता असते. प्रेम दोन किंवा त्यापेक्षा अधिक रूपांमध्ये भावनांच्या परस्पर आदान-प्रदानामुळे उफाळून येते. पशू पण एक दुसऱ्यासाठी आणि आपल्या संततीसाठी विशिष्ट प्रकारचे प्रेम अभिव्यक्त करतात. कित्येक प्रजातींमध्ये जेव्हा एक जोडीदार मृत्यू पावतो तेव्हा दुसरा त्याच्यानंतर लवकरच मरून जातो; परंतु पशूंमध्ये हे प्रेम मूल प्रवृत्ती स्वरूपात असते, त्यामध्ये त्यांची आपली म्हणून कोणतीच भूमिका नसते तर मानवाच्या प्रेमाच्या आदान-प्रदानमध्ये त्याचे आपले दृढ आत्मनिश्चय असते.

मनुष्यामध्ये प्रेम अनेक प्रकारे व्यक्त होते. पती-पत्नी, माता-पुत्र-पुत्री, पिता-पुत्र-पुत्री, भाऊ-बहीण, मित्र-मित्र, स्वामी-सेवक, गुरू-शिष्य आणि भक्त-भगवंतामध्ये प्रेम आढळून येते.

प्रेम एक सार्वभौम भावना आहे, ज्या विचारामधून ते प्रवाहित होते, त्या विचाराच्या स्वभावानुसार त्याची अभिव्यक्ती वेगवेगळी असते. म्हणून प्रेम जेव्हा एक पित्याच्या हृदयामधून प्रवाहित होते तेव्हा पितृत्व भाव त्यास पितृप्रेमामध्ये रूपांतरित करते. जेव्हा ते एक मातेच्या हृदयामधून प्रवाहित होते तेव्हा मातृत्व भाव त्यास मातृ-प्रेमामध्ये रूपांतरित करते. जेव्हा ते एक प्रियकराच्या हृदयामधून प्रवाहित होते तेव्हा त्या प्रियकराची भावना सार्वभौमिक प्रेमास एक वेगळ्याच रूपामध्ये प्रस्तुत करते. प्रेम कोणत्या स्वरूपात व्यक्त होईल किंवा त्याची काय विशेषता असेल हे तिला व्यक्त करणाऱ्या स्थूल माध्यमावर अवलंबून नसते; परंतु ज्या चेतनेमधून ते प्रवाहित होते, त्या चेतनेवर निर्भर असते म्हणून एक पिता मातेचे प्रेम पण व्यक्त करू शकतो, एक माता मित्राच्या प्रेमास पण व्यक्त करू शकते, एक प्रियकर दिव्य प्रेम व्यक्त करू शकतो.

व्यक्त होणारे प्रेमाचे हे प्रत्येक रूप त्या सर्वव्यापी महाप्रेमाचेच प्रतिबिंब असते; परंतु ज्या क्षणी ते मानवीय प्रेम स्वरूपात विविध प्रकारे व्यक्त होऊ लागते. त्याच क्षणी त्यामध्ये काही ना काही दोष उत्पन्न होतो. मातेला हे कळत नाही की आपल्या बाळाप्रती एवढे प्रेम का म्हणून आहे, बालकाला हे ठाऊक नसते की मातेप्रती त्याचे एवढे प्रेम का आहे. त्यांना याची कल्पना नसते की त्यांचे एकमेकांवर जे प्रेम आहे ते

कोठून येते. ते प्रेम त्यांच्यामध्ये प्रकट होत असलेली ईश्वरी प्रेमाची अभिव्यक्ती आहे आणि जेव्हा ते प्रेम शुद्ध आणि नि:स्वार्थ असते तेव्हा ते ईश्वराच्या दिव्य प्रेमाचेच एक रूप असते. अशाप्रकारे मानवी प्रेमाचे अन्वेषण केल्यास आपणास दिव्य प्रेमाचे काही ना काही ज्ञान होऊ शकते, कारण की मानवी प्रेमामध्ये आपणास ईश्वराच्या दिव्य प्रेमाची काही ना काही झलक पाहावयास मिळते.

**पित्याचे प्रेम बुद्धिप्रवण असते** – पित्याच्या प्रेमाचे मूळ ज्ञानावर अधिष्ठित असते आणि ते बुद्धीवर आधारलेले असते. पित्याचे प्रेम अंशत: प्रवृत्तिमूलक असते, जसे कौटुंबिक प्रेमाचे सर्व रूप प्रवृत्तिमूलक असतात. म्हणून पिता आपल्या मुलाशी प्रेम केल्याशिवाय राहत नाही.

**मातेचे प्रेम भावप्रवण आणि निर्हेतुक असते** – मातेचे प्रेम अधिक विस्तृत असते. ते बुद्धीवर आधारलेले नसून भावनेवर आधारित असते. सच्चे मातृप्रेम हे निर्हेतुक असते. असे म्हणता येऊ शकेल की ते अधिक आत्मिक असते. म्हणून मानवी प्रेमाच्या अधिकांश रूपांहून ते अधिक महान असते. परमेश्वराने मातेच्या मनामध्ये बाळासाठी निर्हेतुक प्रेम स्थापित केले आहे. हे प्रेम बाळाची योग्यता किंवा त्याचे आचरण याचा विचार करीत नाही. मातेचे निर्हेतुक प्रेम हे कदाचित ईश्वरी प्रेमाच्या परिपूर्णतेच्या सर्वात जवळ पोहोचते. जघन्य अपराध केलेल्या तिच्या मुलास जेव्हा कोणीच क्षमा करू शकत नसेल तर माता त्यास नक्कीच क्षमा करते.

**पती–पत्नीचे दांपत्य प्रेम**

दांपत्य प्रेम आपल्या सर्वोच्च आदर्श अवस्थेमध्ये मानवी प्रेमाची सर्वात महान अभिव्यक्ती बनू शकते. जेव्हा पुरुष आणि स्त्री सच्चे आणि शुद्ध अंत:करणाने एक दुसऱ्यावर प्रेम करतात तेव्हा त्यांच्या तन–मन–आत्म्यामध्ये परस्पर संपूर्ण सामंजस्य प्रस्थापित होते. जेव्हा त्यांचे प्रेम आपल्या सर्वोच्च अवस्थेमध्ये व्यक्त होते तेव्हा त्यांच्यामध्ये संपूर्ण एकता निर्माण होते; परंतु या प्रेमामध्ये सुद्धा काही दोष असते. कामवासनेमुळे हे दूषित होऊ शकते. यामुळे दिव्य प्रेमास ग्रहण लागते. सृष्टीच्या चक्रास निरंतर चालू ठेवण्यासाठी निसर्गाने काम आवेगास अत्यंत बलशाली बनविले आहे. म्हणून पुरुष आणि स्त्रीच्या दरम्यान वैवाहिक संबंधामध्ये शारीरिक संबंधाचे आपले विशिष्ट स्थान अवश्य आहे; परंतु जर दांपत्य संबंधामध्ये हे सर्वोच्च घटक बनले तर मग मात्र प्रेम पूर्णपणे लुप्त होऊन जाते आणि तिच्या जागी वाढतो अधिकार गाजविणे, अति घनिष्टता, मित्रताभाव आणि समंजसपणाचा दुरुपयोग आणि ऱ्हास. देह आकर्षण त्या परिस्थितींपैकी एक तर आहे की ज्यांच्या अंतर्गत प्रेम उत्पन्न होते; परंतु कामक्रीडा म्हणजे प्रेम नव्हे. यौन क्रीडा आणि प्रेम एक दुसऱ्यापासून तेवढेच भिन्न आहेत जेवढे चंद्र आणि सूर्य. स्त्री–पुरुष संबंधामध्ये जेव्हा सच्चे प्रेमाचे रूपांतरणकारी गुण सर्वात वर असतो, फक्त तेव्हाच कामक्रीडा प्रेमास व्यक्त करण्याचे एक साधन बनते. त्यांचे लक्ष शारीरिक संबंधावर अत्याधिक असते. ते आपल्या योग्य मार्गापासून भटकतात आणि कधीच संतोषप्रद वैवाहिक संबंध जपू शकत नाहीत. कामवासना म्हणजे सर्वस्व नव्हे, मात्र ती प्रेमाभिव्यक्तीचे एक साधन मात्र असते, या गोष्टीची जाण असलेले पती–पत्नी फक्त संयमाचे धडे शिकून सच्चे प्रेम काय असते हे ओळखू शकतात. दुर्भाग्यवश या आधुनिक जगामध्ये अधिकांश लोक कामवासना तृप्तीमध्ये अत्यंत लिप्त असल्याकारणाने प्रेम प्राय: नष्ट होऊन जाते.

जे लोक आपल्या जीवनामध्ये स्वाभाविकपणे, जबरदस्तीने नव्हे, संयमाचे पालन करतात ते दांपत्य संबंधामध्ये इतर चिरस्थायी गुणांचा विकास करतात, जसे मित्रता, समजूतदारपणा, सहयोग, परस्पर प्रेम इत्यादी. सच्चे दंपती एक दुसऱ्यास आपल्या मनातील गोष्ट लपवून न ठेवता ती मनमोकळेपणाने दुसऱ्यासमोर मांडतात आणि प्रेमाचे आदान-प्रदान करण्यास उत्सुक असतात. ते एक दुसऱ्यासाठी जगतात. दांपत्य प्रेम सोपे नसते. अति कामवासनेचा राक्षस केव्हा घात करील हे सांगता येत नाही. अति कामक्रीडा स्नायूंना दुर्बल बनविते आणि हृदयास हानी पोहोचविते आणि शेवटी शांती व सुखास नष्ट करते. माणसाने याची जाणीव ठेवावी की आत्म्याची मूल प्रकृती आध्यात्मिक आहे. ज्यांनी आत्म्याचे गुण विकसित केले आहेत ते हे चांगल्या प्रकारे जाणतात की, सच्च्या प्रेमाशी यौन सुखाचे काहीच देणे-घेणे नाही. पुरुष आणि स्त्री हे एक दुसऱ्यासाठी वासना तृप्तीचे साधन आहेत, असे मानणे म्हणजे फक्त सुख विनाशाचे साधन बनेल. हळूहळू थोड्या-थोड्या प्रमाणात मनाची शांती ढळत राहील. देह प्रदर्शनद्वारे पुरुषांचे लक्ष आकर्षित करण्याचा प्रयत्न स्त्रियांनी मुळीच करू नये. त्यांनी आपले शील रक्षण करण्याचा आटोकाट प्रयत्न करावा.

**स्वामी आणि सेवकादरम्यानचे प्रेम**

स्वामी आणि सेवकामधील प्रेमाचे बंधन हे परस्पर हितावर आधारित असते. स्वामी जेवढे जास्त धन आणि दया सेवकास प्रदान करेल, तेवढे जास्त प्रेम सेवक आपल्या स्वामीवर करेल. सेवक जेवढी जास्त सेवा करील, तेवढे अधिक प्रेम स्वामी सेवकाशी करील. हा प्रेमाचा संबंध तर होऊ शकतो; परंतु मूल प्रेरणा एक दुसऱ्याकडून प्राप्त संरक्षणामध्ये निहित असते.

**मित्रता-मानव प्रेमाचे सर्वात भव्य संबंध**

मित्रांमध्ये परस्पर जो संबंध असतो, तो मानव प्रेमाच्या सर्व रूपांमध्ये सर्वात भव्य असतो. मित्र प्रेम शुद्ध असते. कारण की त्यामध्ये कोणतीच विवशता नसते. मनुष्य स्वत: होऊन मुक्तपणे आपल्या मित्रांशी प्रेम करतो, कोणतीच प्रवृत्ती त्याला बाध्य करीत नाही. मित्रत्वाचे प्रेम पुरुष आणि स्त्री यांच्या दरम्यान होऊ शकते, दोन स्त्रियांच्या दरम्यान होऊ शकते, दोन पुरुषांच्या दरम्यान होऊ शकते; परंतु मित्रत्वाच्या त्या प्रेमामध्ये कोणतेच यौन आकर्षण नसते. जर कुणाला मित्रत्वाद्वारे दिव्य प्रेम माहीत करून घ्यायचे असेल तर त्याला ब्रह्मचर्य व्रताचे पालन करत कामवासनेस संपूर्णपणे विसरले पाहिजे, तेव्हा मैत्रीमध्ये दिव्य प्रेम वाढू लागतो. असले दिव्य प्रेम संतांमध्ये आढळले आहे. जे ईश्वराशी सच्चे प्रेम ठेवतात. त्यांच्यामध्ये सुद्धा दिव्य प्रेम आढळते.

प्रेम कसलीच आशा-अपेक्षा ठेवत नाही. ते निरिच्छ असते. प्रेम मागून मिळत नाही. ते केवळ दुसऱ्याच्या अंत:करणापासून प्राप्त होणारे पुरस्कार आहे, अनुपम भेट आहे. दिलेले प्रेम हे सदैवसाठी असावे, यासाठी की तुम्हास आत्म्याच्या पूर्णतेची इच्छा असते. आपल्या प्रियजनाच्या पूर्णतेची कामना करणे आणि त्या व्यक्तीचा विचार मनात येताच शुद्ध आनंदाचे अनुभव करणे हेच दिव्य प्रेम आहे आणि हेच सच्चे मित्रप्रेम आहे.

**गुरू-शिष्याची निर्मळ दिव्य मैत्री**

गुरू-शिष्यामधील संबंध मैत्रीच्या प्रेमाची सर्वात मोठी अभिव्यक्ती आहे. ही अशी निर्मळ दिव्य मैत्री आहे की, ज्यामध्ये दोघांचे एकच उद्दिष्ट असते - अन्य कोणत्याही गोष्टीहून श्रेष्ठ अशी ईश्वराशी प्रेम करण्याची इच्छा शिष्य आपल्या गुरूसमोर आपला आत्मा उघडून ठेवतो. त्या दोघांमध्ये काहीच गुप्त नसते. मैत्रीच्या इतर उदात्त रूपांमध्ये कधी-कधी कुटिलपणा किंवा स्वार्थ यांचा शिरकाव होतो; परंतु गुरू-शिष्य संबंधाची मैत्री संपूर्णपणे दोषरहित आणि निर्मळ असते. गुरू-शिष्य संबंध प्रेमाचे सर्वोच्च रूप आहे. त्यांच्यामधील परस्पर संबंध ज्ञान आणि विवेकावर आधारलेले असते.

**आत्मा आणि परमात्मा यांच्यामधील पूर्ण प्रेम**

सर्वात महान प्रेमाची अनुभूती नाम-स्मरणामध्ये ईश्वराशी संपर्क साधूनच होऊ शकते. आत्मा आणि परमात्मा यांच्यामधील प्रेम पूर्ण आहे. याच प्रेमाची आम्हा तुम्हा सर्वास इच्छा असते. जेव्हा तुम्ही नामस्मरण करीत असता तेव्हा ते प्रेम विकसित होते. लक्षावधी कोट्यवधी रोमांचावर रोमांच आपल्या अंत:करणातून निघतात. आमच्या प्रेमावर जेवढा ईश्वराचा अधिकार आहे तेवढा इतर कुणाचाही नाही आणि त्याला प्राप्त करण्याचा प्रयत्न करणारास तो जे प्रेम देतो, त्या प्रेमाहून अधिक मधुर प्रेम कोणतेच नाही.

तर मग क्षणभंगुर मानवी प्रेम प्राप्त करण्याच्या प्रयत्नामध्ये आपला सर्व वेळ का म्हणून खर्च करावा? दांपत्य प्रेम, पारिवारिक प्रेम, बंधू-बांधवांचे प्रेम - मानव प्रेमाची ही सर्व रूपे एका वळणावर येऊन समाप्त होऊनच जातात. फक्त ईश्वराचे प्रेमच पूर्ण प्रेम आहे. तो ईश्वर तर आहे जो हृदयाच्या आळीमध्ये लपंडावाचा खेळ खेळत आहे आणि याची दाट शक्यता आहे की कधी काळी निकृष्ट मानवी प्रेमाच्या मागे लपलेले त्याचे सर्व तृप्तकारी प्रेमास तुम्ही प्राप्त पण करू शकाल.

म्हणूनच ईश्वराशी प्रेम करा, त्याच्यापासून मिळणाऱ्या दानासाठी नव्हे तर यासाठी की तो तर तुमचाच आहे आणि यासाठी की त्याने तुम्हास आपल्यासारखाच बनविले आहे. तेव्हा तुम्ही त्यास प्राप्त कराल. जर तुम्ही नामस्मरणाच्या खोलवर शिराल तर एक असले प्रेम तुमच्या चेतनेमध्ये उतरेल की ज्याचे वर्णन कोणतीच मानवी जिव्हा करू शकणार नाही. तेव्हा तुम्ही ईश्वराच्या दिव्य प्रेमास ओळखू शकाल आणि ते शुद्ध प्रेम तुम्ही दुसऱ्यांना पण देऊ शकाल.

जो ईश्वराच्या दिव्य प्रेमामध्ये बुडालेला असतो, त्याच्या चेतनेमध्ये काहीच छलकपट नसते, जाति-पंथाची कोणतीच संकीर्णता नसते, कोणत्याच प्रकारच्या सीमा नसतात. जेव्हा तुम्हास त्या दिव्य प्रेमाची अनुभूती येईल, तेव्हा तुम्हास फूल आणि पशुमध्ये काहीच अंतर दिसणार नाही, दोन माणसांमध्ये काहीच भेद दिसणार नाही. समस्त निसर्गाशी तुम्ही संवाद साधू शकाल आणि समस्त मानव जातीशी एक समान प्रेम करू शकाल. ईश्वराच्या समस्त लेकरांची, आपल्या बंधू-भगिनींची, एकाच जातीस ईश्वरामध्येच पाहात तुम्ही मनातल्या मनात म्हणाल : ''ईश्वर माझा पिता आहे. मी त्याच्या विशाल मानव परिवाराचा एक अंग-भाग आहे. मला त्या सर्वांशी प्रेम आहे, कारण की ते सर्व माझेच आहेत. माझे माझी भावंडे चंद्र-सूर्याशी पण प्रेम आहे आणि जीव-जंतूंशी प्रेम आहे, ज्यांना माझ्या पित्याने जन्म दिले आहे आणि त्या सर्वांमध्ये माझ्या पित्याचीच जीवनशक्ती प्रवाहित होत आहे.

सच्चे प्रेम दिव्य असते आणि दिव्य प्रेम आनंद आहे. जेवढ्या अधिक प्रमाणात तुम्ही ज्वलंत उत्कटतेसह ईश्वरास शोधत नामस्मरण कराल, तेवढ्या अधिक प्रमाणात त्या दिव्य प्रेमाची अनुभूती तुमच्या हृदयामध्ये निर्माण होईल. तेव्हा तुम्हास कळून येईल की, ते प्रेम आनंद आहे आणि आनंदच ईश्वर आहे.''

(* श्री श्री परमहंस योगानंद – 'दिव्य प्रेम का विकास कैसे करें' : निवडक भाग, पृ. ७–४५)

### घ) प्रेमाचे सूफ़ीप्रणीत तत्त्वज्ञान*

प्रकटीकरणाच्या आपल्या मार्गामधून जाताना आत्म्यास चार टप्पे ओलांडावे लागतात. १) ज्ञान ('इल्म'), २) प्रेम ('इष्क'), ३) यथार्थ जगत् ('वुजूद') आणि ४) अनुभूती ('शुहूद'). चेतना, विशुद्ध बुद्धीच्या मूळ अवस्थेचे नाव 'इल्म' आहे, प्रकटीकरणाच्या दिशेकडील नंतरच्या पायरीचे नाव आहे 'इष्क'; म्हणून आपल्या सत्त्वामध्ये बुद्धी आणि प्रेम एकसमान आहेत. शैल आणि वृक्ष यासारख्या वस्तूंना बुद्धी नसते म्हणून पादप किंवा उद्‌भिज जीवनामध्ये असलेले किंचित प्रेमाचे अवबोधन सोडल्यास त्यांच्यामध्ये प्रेम नसते; परंतु पशू पक्ष्यांमध्ये बुद्धीचा विकास होतो, म्हणूनच त्यांच्यामध्ये प्रेम प्रकट होताना दिसून येते. 'वुजूद' हे यथार्थ जगत असते. हिचा हेतू प्रेम संपादन करण्याचा असतो, कारण प्रेम करण्यास विषय (प्रेयसी), असल्याशिवाय प्रेम प्रकट होऊ शकत नाही. 'शुहूद' म्हणजे प्रेमानुभूतीचे बोध होय, मग ते कुठल्याही स्वरूपात का असेना.

प्रेम या शब्दाची व्युत्पत्ती संस्कृत 'लोभ' शब्दापासून झाली आहे, याचा अर्थ होतो इच्छा–आकांक्षा, अभिलाषा–कामना, रशियन भाषेमध्ये हाच शब्द 'लुबोव्ह' या स्वरूपात आढळतो. दुसऱ्या शब्दामध्ये प्रेमास्पदाच्या जाणिवेची कामना म्हणजे प्रेम होय. म्हणून 'शुहूद' अर्थात् प्रेमाची जाणीव, हा प्रत्येक जीवात्म्याचा एकमेव हेतू असतो. इच्छा, आकांक्षा, अभिलाषा, कामना, कृपा, अनुग्रह ही सर्व प्रेमाचीच तर विविध रूपे आहेत. प्रेमामध्ये सर्व ज्ञान टिकून असते.

प्रेम म्हणजे परमेश्वरी देणगीपैकी एक गोष्ट नव्हे, तर सर्व परमेश्वरी देणग्यांची ती बेरीज आहे. मनास, आत्म्याची शक्ती प्रतिबिंबित करण्यास समर्थ बनविण्यासाठी प्रेम हे एक सर्वोत्तम साधन आहे. संपूर्ण सृष्टीची निर्मिती प्रेमासाठी आहे. मानव हा त्यासाठी सर्वात समर्थ प्राणी आहे – जीव आहे. प्रस्तर, खनिज, उद्‌भिज, प्राणी (पशू–पक्षी) या सर्वांमध्ये प्रेमाची मात्रा उत्तरोत्तर वाढत जाते. शेवटी प्रेमाची पराकाष्ठा मानवामध्ये आढळून येते. यावरून असे आढळून येते की, सृष्टीचा विकास हा खनिजपासून उद्‌भिज जीवन, उद्‌भिजपासून प्राणी जीवन आणि प्राणीपासून मानवापर्यंत झालेला आहे. या विकास–प्रक्रियेमध्ये प्रत्येक टप्प्यावर प्रेमाचा क्रमिक विकास निदर्शनास येतो. बुद्धिमत्तेमध्ये अग्रगण्य असल्यामुळे मानवी स्वभावामध्ये प्रेम सर्वात जास्त प्रमाणात दिसून येते. प्रेमाचा क्रमिक विकास हा चेतनेच्या उत्तरोत्तर विकास–क्रमाशी निगडित असतो.

सूफ़ींची अशी धारणा आहे की, स्वत:च्या सत्तेस जाणून घेण्याच्या इच्छेपोटी परमेश्वराने समस्त ब्रह्मांड निर्माण केले. आपल्या प्रेमाच्या स्वभावास उद्दीपित करून, जागृत करून आणि आपल्या प्रेमस्पदाची निर्मिती करून त्याने हे विश्व निर्माण केले. सौंदर्य हे त्याचे प्रेमास्पद होय. दरवेश याच अर्थी, 'इष्क अल्लाह, माबूद

अल्लाह' अर्थात् 'ईश्वर प्रेम आहे आणि ईश्वर प्रेयसी आहे.' असे म्हणत ते एकमेकास नमस्कार करतात. एक उर्दू कवी म्हणतो, 'प्रेयसीस भेटण्याच्या तीव्र इच्छेने मला पृथ्वीतलावर आणले आणि प्रेयसीस भेटण्याच्या त्यास इच्छेस माझ्यासोबत स्वर्गाकडे घेऊन जात आहे.'

प्रेम हे सृष्टीचे स्रोत आहे. ते सर्व जीवमात्रांसाठी पौष्टिक आहे. प्रियकराच्या विचार, उच्चार आणि आचारामध्ये नेहमी प्रेम दिसून येऊ शकते, कारण त्याच्या प्रत्येक अभिव्यक्तीमध्ये एक प्रकारची मोहकता असते. ती मोहकता सौंदर्य, सुकुमारता आणि कोमलता दर्शविते. प्रेमामध्ये तपत अंत:करणामध्ये आपल्या संपर्कात आलेल्या प्रत्येकास द्रवित करण्याची एक प्रवृत्ती असते. प्रेम प्रियकरामध्ये अशी मोहकता निर्माण करते की, तो एखाद्याशीच प्रेम करत असताना इतर सर्व त्याच्याशी प्रेम करतात. प्रत्येक जीवात्म्यामध्ये प्रेम अंतर्भूत असते. या पृथ्वीतलावर प्रत्येक जीव हा आपल्यासोबत फक्त प्रेम घेऊन येतो.

प्रेम हे तेजाग्नीसारखे आहे; श्रद्धा ही तिची चमक आहे; तर प्रज्ञा ज्वाला आहे, तिचे धूर म्हणजे मोह-आसक्ती आणि अनासक्ती तिची राख होय. ज्वालेपासून चमक निघते, तशीच स्थिती प्रज्ञेची आहे. ती श्रद्धेपासून निघते. एखाद्या मशालीप्रमाणे जेव्हा प्रेमाग्नीपासून ज्वाला निर्माण होते तेव्हा ती श्रद्धाळूचा मार्ग प्रदीप्त करते आणि समस्त अंधार नाहीसा होतो.

आत्म्यामध्ये जेव्हा जीवनशक्ती सक्रिय असते तेव्हा ते प्रेम असते, जेव्हा ते चित्तामध्ये कार्यप्रवृत्त असते तेव्हा ती भावना असते आणि शरीरामध्ये असताना ते अनुराग असते. म्हणून सर्वात प्रेमळ इसम हा सर्वात जास्त भावुक असतो आणि सर्वात जास्त भावुक हा सर्वात जास्त भाव-प्रवण असतो. हे त्याच्या सर्वात जास्त सचेतन अवस्थेच्या स्तरावर अवलंबून असते. आत्म्यामध्ये असताना प्रेम हा अग्नी असतो, त्याने चित्त उजळल्यावर ती एक ज्वाला असते आणि शरीरामधून व्यक्त झाल्यावर ते धुरासारखे असते.

जेव्हा एकाच गोष्टीवर मोहित मन केंद्रीभूत होते तेव्हा ते **प्रेम** असते. जेव्हा ते अनेक गोष्टींना वेढते तेव्हा ते **स्नेह** असते. जेव्हा ते एखाद्या ढगासारखे असते तेव्हा ते **संमोहन** किंवा **आसक्ती** असते. जेव्हा त्याचा कल सदाचाराकडे असतो तेव्हा ती **श्रद्धा** वा **भक्ती** असते. जेव्हा ते सर्वव्यापी आणि सर्वशक्तिमान अशा परमेश्वराप्रती असते तेव्हा ते **दिव्य प्रेम** म्हणून गणले जाते आणि मग प्रियकर हा पवित्र बनतो; पावन बनतो.

प्रेमापेक्षा कोणतीच जास्त प्रबळ शक्ती नाही. अंत:करणामध्ये प्रेमोदयासह सर्व शक्ती येते. (निर्माण होते.) मनामधील प्रबळ शक्ती ही प्रेमामध्ये मृदू बनते. प्रेमळ हृदयासाठी काहीच अति प्रबळ आणि शक्तिशाली नाही. प्रचंड विध्वंसक शक्ती ज्याप्रमाणे जग पादाक्रांत करते त्याचप्रमाणे प्रेम जीवनामधील सर्व गोष्टी संपादित - हस्तगत करते; परंतु जेव्हा विध्वंसक शक्ती स्फोट घडवून आणते तेव्हा प्रत्येक वस्तू जाळून भस्मसात करते आणि प्रेमाच्या बाबतीत तसेच घडते. जेव्हा ते अति उत्कट असते तेव्हा ते एक विध्वंसक-चक्र बनते आणि परिणामी प्रियकराच्या जीवनामध्ये प्रत्येक गोष्ट सदोष बनते. एखाद्या प्रियकराच्या जीवनामधील निर्माण होणाऱ्या सर्व व्यथा आणि दु:खाचे हेच रहस्य आहे. तरी सुद्धा दोन्ही अवस्थांमध्ये प्रियकर हा लाभार्थी असतो. जर त्याने परिस्थितीवर मात केली तर तो अधिपती बनतो; जर त्याने सर्वस्व गमावले असेल तर तो एक संत बनून जातो.

प्रेम कायद्यातून वरचढ आहे आणि कायदा प्रेमाच्या अधीन आहे. दोघांमध्ये तुलना करता येत नाही; कारण त्यापैकी एकाची निर्मिती ही पारलौकिकापासून आहे तर दुसऱ्याची निर्मिती ही इहलौकिक आहे. प्रेमाला मर्यादा नाही; तर कायदा मर्यादित असतो. म्हणून कायदा प्रेमाची जागा घेऊ शकत नाही.

काळ आणि अंतराळ हे प्रेमाच्या मुठीत असतात. प्रेयसीच्या उपस्थितीमध्ये अनेक मैलांचा सुदीर्घ प्रवास हा काही यार्ड अंतराचाच बनून जातो; तर तिच्या गैरहजेरीमध्ये यार्डसुद्धा कित्येक मैल बनून जातात. वियोगाचा एक दिवस हा एक हजार वर्षांइतका सुदीर्घ वाटतो आणि प्रेयसीच्या उपस्थितीमध्ये एक हजार वर्ष एक दिवससुद्धा वाटत नाही.

जगामध्ये जर काही संरक्षक प्रभाव असेल तर तो प्रेमाशिवाय दुसरा नाही. जीवनाच्या सर्व पैलूंमध्ये जेथे कोठे आपणास संरक्षण आढळते, त्याची प्रेरणा नेहमी प्रेम आहे. एकाग्रता ही प्रेमामधील एक स्वाभाविक गोष्ट आहे. एकाग्रतेच्या बळावर प्रियकर हा प्रेमाचे उद्दिष्ट गाठतो.

(* हज़रत इनायत खान – Spiritual Liberty : The Sufi Message Vol. V. पृष्ठ क्र. १४३–४९ : वेचक अंश)

## २) प्रेम – सूफ़ींचा दृष्टिकोन[७४]

**प्रेम** आणि **ज्ञान** ही सूफ़ी साधना–रथाची दोन चाके आहेत आणि त्यांचा सारथी आहे परमेश्वर. सर्वप्रथम 'प्रेम' या पहिल्या चाकाविषयी पाहू या. त्याचे सूफ़ीप्रणीत स्वरूप पाहू या.

**१) प्रेम :** जवळ जवळ सर्व धर्मांमध्ये परमेश्वराप्रती प्रेमास फार मोठे स्थान दिले गेले आहे. परमेश्वरास प्राप्त करण्याचे जेवढे साधन आणि मार्ग सांगितले गेले आहेत त्यामध्ये प्रेमास फार मोठे स्थान दिले गेले आहे. प्रेमाद्वारे माणसाच्या हृदयामध्ये श्रद्धा आणि विश्वास उत्पन्न होतात. गूढवादी याच प्रेमास घेऊन अग्रेसर होत असतात. याच्याच बळावर परमेश्वरप्राप्तीची आशा बाळगतात. त्यांचा असा विश्वास आहे की, प्रेमाद्वारे सर्व काही शक्य होते. सूफ़ी साधक अबू तालिबने म्हटले आहे की परमेश्वरासंबंधी गूढ उकलले जाऊ शकते आणि त्याचे ज्ञान प्राप्त केले जाऊ शकते.

प्रेम ही एक अशी उत्प्रेरक शक्ती आहे की, जी साधकास आध्यात्मिक मार्गावर घेऊन जाते. ती एक अशी वासना आहे की जी समस्त वासनांना हृदयापासून बाहेर फेकते. सूफ़ी संत अबू यज़ीदने म्हटले आहे की, 'संसाराशी शत्रुत्व करून मी परमेश्वराकडे पळालो, परंतु त्याच्या प्रेमाने माझ्यावर असा कब्जा जमविला की, मी स्वत:चाच शत्रू बनून गेलो.' इतर सूफ़ी साधकांनी पण प्रेम आणि त्याच्या स्वरूपाविषयी बरेच काही म्हटले आहे. त्यांच्या काही कथनांना आम्ही येथे प्रस्तुत करीत आहोत. यावरून सूफ़ींच्या दृष्टिकोनाची कल्पना येते. सूफ़ी साधक अल् शिबलीचे म्हणणे आहे की प्रेम हृदयामध्ये अग्नीसारखे आहे, जे परमेश्वरी इच्छेशिवाय इतर सर्व वस्तूंना जाळून भस्मसात करते. अल्–हुजवीरी म्हणतात की परमेश्वराच्या प्रियकरापाशी बरी–वाईट अशी कोणतीच इच्छा राहात नाही, कारण की जो परमेश्वराचा प्रियकर आहे, त्याच्यासाठी परमेश्वराशिवाय कोणतीच वस्तू अभिप्सित नसते. हुजवीरी यांनी इतरत्र अशा प्रकारे माणसामध्ये परमेश्वराविषयी असलेल्या प्रेमासंबंधी म्हटले आहे की, परमेश्वराप्रती माणसाचे प्रेम असे एक गुज आहे की, जे परमेश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या

पुण्यात्म्याच्या अंत:करणात श्रद्धा आणि आलोक (प्रकाश) स्वरूपात स्वत:स प्रकट करते, म्हणून तो आपल्या प्रेयसीस संतुष्ट करू इच्छितो आणि तिच्या साक्षात्कारासाठी बेचैन आणि अधीर होऊन जातो आणि त्याशिवाय त्याला चैन पडत नाही. नेहमी तिचीच आठवण असते. नित्य तिचेच स्मरण असते आणि तिला सोडून तो सर्व काही विसरून जातो. (सय्यद अब्दुल हसन अली बिन उस्मान हुजवीरी, 'कश्फुल महजूब', पृ. ३०७-३०८)

सूफ़ी साधक जुनैदने प्रेमाची व्याख्या करताना असे सांगितले आहे की, या प्रेमाचा असा अर्थ आहे की, प्रेयसीचे गुण प्रियकरामध्ये येतात (निर्माण होतात). प्रियकराचे आपले स्वत:चे गुण नाहीसे होतात आणि त्यांच्याऐवजी प्रेयसीचे गुण निर्माण होतात. अर्थात प्रियकराची 'अहं' भावना दूर होते आणि तो प्रेयसीमय होऊन जातो.

आपल्या समस्त कामनांसह स्वत:स समर्पण करण्यामध्ये प्रियकरास सुख प्राप्त होते. कोणत्याही वस्तूस आपल्या प्रेयसीसाठी लुटवण्यात तो मागे-पुढे पहात नाही. त्याला असे वाटते की, आपले सर्वस्व त्याग केल्याशिवाय तो तिला प्राप्त करू शकत नाही. अबू अब्दल्ला अल् कुरशी याने म्हटले आहे की सच्च्या (खऱ्या) प्रेमाचा अर्थ असा आहे की तुम्ही ज्या प्रेयसीवर प्रेम करता, तुमच्यापाशी असलेले सर्व काही तिला देऊन टाका - तुमच्याजवळ काहीही शिल्लक न ठेवता. याचा अर्थ प्रेमासाठी फक्त सांसारीक वस्तू आणि कामनांचाच त्याग करणे असा नव्हे, तर संपूर्णपणे त्या परम प्रेयसीस आत्मसमर्पण व सर्वस्व समर्पण करणे होय. असे केल्याशिवाय, 'अहं'कारास नष्ट केल्याशिवाय तो त्या अलौकिक प्रेमाचा अधिकारी बनू शकत नाही.

प्रेयसीस प्राप्त करणे केव्हा आणि कसे शक्य होऊ शकते याचे अत्यंत सुंदर वर्णन प्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ-कवी जलालुद्दीन रूमी यांनी आपल्या 'मसनवी' म्हणजे कथा-काव्यामध्ये दिले आहे.

प्रेयसीच्या दारास कोणी तरी बाहेरून ठोठावले. आतून आवाज आला ''कोण आहे?'', त्याने उत्तर दिले ''मी आहे.'' आतून आवाज आला, ''या घरामध्ये माझ्या आणि तुझ्या या दोहोंसाठी जागा नाही.'' प्रियकर परत गेला. त्याने एकांत सेवन केले, प्रार्थनेमध्ये मग्न राहिला, उपवास केले. एका वर्षानंतर तो पुन्हा परत आला. त्याने पुन्हा दार ठोठावले. आतून आवाज आला, ''कोण आहे?'' प्रियकराने उत्तर दिले, ''तू आहेस'' आणि मग दार उघडले गेले. म्हणून जोपर्यंत माणूस या 'मी' आणि 'तू'च्या बंधनापासून मुक्त (मोकळा) होत नाही तोपर्यंत परम प्रेयसीस प्राप्त करणे शक्य नसते. ही प्रेमाची आळी (गल्ली) अत्यंत अरूंद आहे. यामध्ये एकाच वेळेस दोन प्रवेश करू शकत नाहीत. जोपर्यंत 'अहंकार' आहे तोपर्यंत तिला प्राप्त करणे कठीण आहे आणि जेव्हा प्रेयसी प्राप्त होते तेव्हा 'अहंकार' शिल्लक उरत नाही.

गूढवादी साधक नेहमी परमेश्वर प्राप्तीचे साधन प्रेमास(च) मानतात. परमेश्वरास ते परम प्रेयसी मानतात. त्यांची अशी धारणा आहे की, ती प्रेयसी अर्थात परमेश्वर परम सौंदर्य आहे. त्याची विभूती अनंत आहे. साधकास जेव्हा त्याच्या विभूतीचे, त्याच्या सौंदर्याचे जेव्हा ज्ञान होते तेव्हा तो त्याच्यावर प्रेम केल्याशिवाय राहत नाही. प्रेमाद्वारे त्याला त्याच्या साहचर्या ('उन्स')ची अनुभूती होते. तो त्याच्याशी अभिन्न होतो. (एकरूप होतो). त्याच्या अंत:करणात प्रेयसीच्या प्रेमाशिवाय काहीच नसते. त्याचे सारे अस्तित्व प्रेमावर निर्भर असते. प्रेमच त्याचा एकमात्र आधार असतो. परमेश्वराचे अनंत सौंदर्य स्वाभाविकपणे साधकास आपल्याकडे आकृष्ट करते. सौंदर्याविषयी आकर्षण माणसाचा नैसर्गिक गुण आहे. सुंदर वस्तूंना पाहून तो आनंदित होतो. म्हणून

परमेश्वराचे अनंत, अपार, अपूर्व सौंदर्य आणि तज्जनित प्रेम जेव्हा भक्ताच्या अंत:करणास प्रभावित करतात तेव्हा इतर वासना आणि कामना यांना स्थानच उरत नाही.

सूफ़ी तत्त्वज्ञ आणि आचार्य हुजवीरी याने प्रियकर आणि साधारण उपासक यामधील भेद दर्शवले आहेत. हुजवीरीचे म्हणणे आहे की, जेव्हा एखाद्या माणसाच्या अंत:करणामध्ये परमेश्वर आपल्या विभूतीस प्रकट करतो तेव्हा त्याचे ऐश्वर्यच म्हणजेच 'जलाल' रूपच प्रमुख असते आणि त्या (माणसा)मध्ये भीतीचा (भयाचा) संचार होतो, परंतु जेव्हा परमेश्वराचे सौंदर्य म्हणजेच 'जमाल' रूप प्रमुख असते तेव्हा तो (माणूस) आपलेपणाचा अनुभव करतो. ज्यांच्यामध्ये भयाचा संचार होतो ते यातना भोगतात. आणि ज्यांना आपलेपणाची अनुभूती येते त्यांना आनंद प्राप्त होतो. ....... परमेश्वराचा भक्त त्याच्या अनुग्रहा (कृपे)कडे पाहून त्याच्यावर प्रेम केल्याशिवाय राहू शकत नाही; आणि जेव्हा तो प्रेम करू लागतो तेव्हा तो त्या (परमेश्वरा) सोबत अंतरंग होऊन जातो, कारण की प्रेयसीच्या भयामध्ये पार्थक्य आहे तर तिच्या अंतरंगत्वेमध्ये एकत्व असते. (सय्यद अबुल हसन अली बिन उस्मान हुजवीरी, 'कश्फुल महजूब', पृ. ३७६-३७७)

सुप्रसिद्ध महिला सूफ़ी राबिया बसरी हिने प्रेमाचे दोन प्रकार सांगितले आहेत - १) सकाम प्रेम आणि २) निष्काम प्रेम. राबियाप्रणीत या दोन प्रकारांचे स्पष्टीकरण करताना सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य इमाम गज़ाली यांनी म्हटले आहे की, सकाम प्रेमाशी राबियाचा अभिप्राय त्या प्रेमाशी होता की, ज्यामध्ये तात्कालिक सुख आणि आनंदाच्या उपलब्धीसाठी परमेश्वरावर प्रेम केले जाते आणि त्याचा अनुग्रह (त्याची कृपा) प्राप्त केला जातो. दुसऱ्या प्रकारच्या निष्काम प्रेमाबाबत राबियाचा अभिप्राय होता परमेश्वराच्या सौंदर्या (जमाल)वर मुग्ध होणे. हेच श्रेष्ठ प्रेम आहे. परमेश्वराच्या सौंदर्याचे ज्याला दर्शन होते आणि ज्याला त्याचे ज्ञान प्राप्त होते तो सर्व प्रकारच्या चिंतेतून मुक्त होतो आणि त्याच्या सर्व वासना नाहीशा होतात आणि त्याचे हृदय परमेश्वराच्या प्रकाशाने परिपूर्ण होऊन जाते. या ज्ञानास प्राप्त करणे हेच साधकाचे एकमेव उद्दिष्ट असते. अशा प्रकारच्या ज्ञानी साधकास आगीमध्ये फेकून दिले तरी त्याला त्याची जाणीव असणार नाही, कारण की तो तल्लीन असतो. त्याच्यासमोर जरी स्वर्गाचे सुख ठेवले, तरी तो त्याच्याकडे ढुंकूनही पाहणार नाही, कारण की त्याचे अंत:करण प्रकाशाने भरलेले असते आणि त्याला या अगोदरच जे काही प्राप्त झालेले आहे, त्यानंतर त्याला आणखी प्राप्त करण्यासारखे काहीच शिल्लक उरत नाही. जो इंद्रियजन्य सुखांवर लुब्ध आहे तो परमेश्वराच्या साक्षात्काराद्वारे प्राप्त आनंदास कसे बरे समजू शकेल? याच गोष्टीवर जलालुद्दीन रूमीने भर देत म्हटले आहे की, 'तोच माणूस सर्व प्रकारे स्वतंत्र आहे की ज्याचे परमेश्वराप्रती अशाप्रकारचे अनन्य प्रेम आहे की त्याच्या सर्व इच्छा-आकांक्षा परमेश्वराच्या इच्छेशी एकरूप झालेल्या असतील. इच्छांच्या या एकत्वामध्ये स्वातंत्र्य आणि पारतंत्र्याचे द्वंद होऊन जाते. [R. A. Nicholson, 'The Idea of Personality in Sufism' (1933) पृ. ५६]

हे प्रेम केवळ प्रेमासाठीच असते. प्रेयसीस सतत पाहत राहावे, तिच्या सौंदर्यावर मुग्ध होत राहावे अशी प्रियकराची एकमात्र कामना असते. अशाच एका परमेश्वरवेड्या प्रियकराने काही लोकांच्या प्रश्नांच्या उत्तरादाखल म्हटले होते की, तो प्रेयसीपासून येत आहे आणि प्रेयसीकडे जात पण आहे. प्रेयसीशी मिलनच त्याची सर्वांत मोठी काम्य वस्तू आहे. प्रेयसीचे स्मरणच त्याचा आहार आहे आणि तिला प्राप्त करण्याच्या उत्कट अभिलाषेस पिऊनच तो जीवन कंठीत असतो. प्रेयसीचा पडदा-पटल (हिजाब)च त्याचे परिधान आहे.

त्याचा चेहरा फिका – निस्तेज का झालेला आहे, असे लोकांनी त्याला विचारले आणि त्याने उत्तर दिले, प्रेयसीच्या विरहामुळे. लोक कंटाळून म्हणाले, ''तू कुठवर अशाच प्रकारे, प्रेयसी, प्रेयसी म्हणत जाशील?'' त्याने उत्तर दिले, ''जोपर्यंत प्रेयसीशी मिलन होत नाही.'' अशाप्रकारे या सूफ़ी साधकांसाठी त्या परम प्रेयसीचे प्रेमच सर्वकाही आहे. (आणि) ते निष्काम प्रेम आहे. त्या प्रेमामध्ये प्रेयसीच्या प्रेमाशिवाय इतर वस्तू काम्य नाही. परमेश्वराप्रती हे निष्काम प्रेमच त्यांच्या साधनेची मुख्य वस्तू आहे. प्रेमासाठीच, प्रेमाखातरच प्रेम करणे, खरे प्रेम असते. या प्रेमामध्ये कुठल्याच प्रकारच्या प्रतिदानाची भावना नसते.

सूफ़ी असे मानतात की, जोपर्यंत भगवत कृपा होत नाही तोपर्यंत साधकाच्या अंत:करणामध्ये प्रेम वसत नाही. त्याच्या कृपेमुळेच हे प्रेम साधकासाठी सुलभ बनते. साधक कितीका आटोकाट प्रयत्न करेना (प्रेमाची) ही अमूल्य वस्तू तोपर्यंत प्राप्त होत नाही, जोपर्यंत भगवंताची दया होत नाही. ज्याच्यावर भगवंताची कृपा होईल त्याला ही वस्तू मिळणारच मिळणार. कोणत्याच प्रकारचा अडथळा त्याच्या मार्गामध्ये बाधा ठरू शकत नाही. या प्रेमास शब्दात व्यक्त करता येऊ शकत नाही. ना कोणी याला शुष्क तर्काद्वारे समजू शकतो ना इतरांना समजावू शकतो. संशयाच्या दृष्टीने याची पडताळणी करणारा यास समजू शकत नाही. हे (प्रेम) स्वयंप्रकाशित आहे, आणि जो या प्रकाशास पाहतो तोच खरा ज्ञानी आहे; म्हणून सूफ़ींना तर्क आणि बुद्धीचे डावपेच पसंत नसतात. तर्क आणि बुद्धीद्वारे प्रेमास ग्रहण करण्याचा प्रयत्न करणारांची ते टिंगल उडवतात (करतात).

सूफ़ींचा असा विश्वास आहे की, परमेश्वर हा प्रेमस्वरूप आहे आणि तो त्या माणसांना याचे गूज उलगडून दाखवत नाही, जे हे प्रेम प्राप्त करण्यास लायक नाहीत. ज्याने आपली संपूर्ण कलुषता धुवून स्वच्छ केली नाही आणि ज्याने सांसारिक वस्तूंचे प्रलोभन सोडले नाही अशास हे प्रेम प्राप्त करण्याचा अधिकार नाही. जे भगवंतावर प्रेम करतात त्यांच्यावर भगवंतपण प्रेम करतो. विशुद्ध भावना परमेश्वराचीच पडछाया आहे. म्हणून त्याला प्रेम करण्याचा अधिकार देऊन परमेश्वर जणू स्वत:सच अधिकार देतो. परमेश्वराप्रती त्याच्याच हृदयामध्ये प्रेम निर्माण होते, ज्याच्यावर परमेश्वर खुद्द प्रेम करतो. आपल्या प्रियकराच्या अंत:करणामध्ये तो प्रेमास अमूल्य निधीप्रमाणे स्वत:साठीच राखतो. सूफ़ी म्हणतात की, भगवंतच प्रेम आहे आणि स्वत:च्याच आनंदासाठी त्या (प्रेमा)स माणसाच्या अंत:करणामध्ये उत्पन्न करतो. म्हणून सूफ़ी साधनेच्या प्रारंभी पण प्रेम असते आणि त्याची परिणति पण प्रेमातच होते. सूफ़ी संत बायजीद बिस्तामीचे मत आहे की, ''मला वाटत होते की, मी परमेश्वरावर प्रेम करतो, परंतु लक्षपूर्वक पाहिल्यानंतर मला असे आढळून आले की, मी ईश्वरावर प्रेम करण्याअगोदरच तो माझ्यावर प्रेम करतो.'' या प्रेमास साध्य (प्राप्त) करून प्रेयसी आणि प्रियकर दोन्ही संतुष्ट होतात. प्रेमाद्वारे जेव्हा प्रियकराचे सर्व अंतर्द्वंद, सर्व वासनांचा अंत होतो तेव्हा तो अग्रेसर होतो आणि मग त्याला परमेश्वराचे दर्शन घडते (होते).

परंतु परमेश्वर आणि मनुष्याच्या या प्रेमासंबंधी जी गोष्ट मनुष्यावर लागू होते ती परमेश्वरास लागू होत नाही. सूफ़ींनी परमेश्वराप्रती माणसाच्या प्रेमाविषयी बरेच काही सांगितले आहे, परंतु मनुष्याप्रती असलेल्या परमेश्वराच्या प्रेमाची गोष्ट अत्यंत अल्प प्रमाणात सांगितली आहे. तरी पण एवढे स्पष्ट आहे की माणसा–माणसा दरम्यान जे प्रेममय (रागात्मकी) संबंध असते तशा प्रकारचे संबंध परमेश्वर आणि माणसामधील प्रेमसंबंधामध्ये नसते. मनुष्याप्रती परमेश्वराचे प्रेम हे त्याच्या दयाळुतेमुळे असते, तर मनुष्यासाठी हे आवश्यक

आहे की, त्याने परमेश्वरावर प्रेम करावे. तत्त्वज्ञ सूफ़ी हुजवीरीने म्हटले आहे की, मनुष्याप्रती परमेश्वराचे प्रेम ही त्याची कृपा आणि दया मात्र असते. हुजवीरीचा हा दृष्टिकोन सर्व सूफ़ींना मान्य आहे; परंतु विशेषतः सनातनपंथी सूफ़ी असेच मानतात. इतर असेही सूफ़ी साधक आहेत, की जे परमेश्वर आणि मनुष्याच्या प्रेमामध्ये कोणताच फरक मानत नाहीत. महान सूफ़ी मन्सूर हल्लाजच्या कवितांमध्ये अशाच प्रकारचा आशय आढळतो. 'ज्याप्रमाणे मदिरेमध्ये शुद्ध जल मिसळलेले असते त्याचप्रमाणे तुमचे आणि माझे प्राण एकत्र मिसळलेले आहेत. जर एखादी वस्तू तुम्हास स्पर्श करीत असेल, तर तिला माझा स्पर्श होतो. प्रत्येक परिस्थितीमध्ये जे तू आहेस तेच मी आहे. [R. A. Nicholson, 'The Idea of Personality in Sufism.' पृ. ३०] प्रसिद्ध फ़ारसी सूफ़ी कवी जामी यांच्या कवितेमध्ये पण म्हटले गेले आहे – ''मी तोच आहे ज्याच्यावर मी प्रेम करतो आणि ज्याच्यावर मी प्रेम करतो तो मीच आहे. एकाच शरीरामध्ये निवास करणारे आम्ही दोन आत्मे (प्राण) आहोत. जर तू मला पाहत असशील, तर तू त्याला पाहतोस आणि जर तू त्याला पाहतोस तेव्हा तू आम्हा दोघांना पाहत असशील.''

सूफ़ी परमेश्वरास प्रेयसी मानतात. परमेश्वरच त्यांची प्रियपात्रा अशी प्रेयसी आहे की, जिच्या प्रेमामध्ये ते व्याकुळ बनलेले असतात. सांसारिक भौतिक प्रेमास ते त्या परम प्रेयसी (परमेश्वरा)पर्यंत पोहोचण्याचे साधन मानतात. ते मानवीय प्रेमास अध्यात्मिक प्रेमापर्यंत पोहोचण्याची पायरी मानतात. यौन-भावना स्वाभाविकपणे अत्यंत प्रबळ असते, म्हणून साधक त्या भावनेच्या उद्दाम वेगास संयमित करून त्यास अध्यात्मिक प्रेमामध्ये नियोजित करण्याचा प्रयत्न करतो. असे म्हणतात की, जोपर्यंत मनुष्य सांसारिक-भौतिक प्रेमास ओळखू शकत नाही तोपर्यंत त्याच्यासाठी आदर्श प्रेमापर्यंत पोहोचणे शक्य नसते. प्रसिद्ध फारसी कवी जामी यांच्या एका कवितेमध्ये म्हटले आहे, ''या जगामध्ये तुम्ही शेकडो उपाय करू शकता, परंतु एकमात्र प्रेमच असे आहे जे तुमच्या 'अहंकारा'पासून तुमचे रक्षण करेल. भौतिक प्रेमाशी पण तुम्ही विमुख होऊ नका, कारण परम सत्यापर्यंत पोहोचण्यामध्ये ते तुमचे सहाय्यक सिद्ध होऊ शकते.'' परंतु भौतिक प्रेम मात्र स्वतःच निष्फळ आणि व्यर्थ (बेकार) आहे. साधक सांसारिक-भौतिक सौंदर्याचा आनंद तर अवश्य उपभोगतो; परंतु तो तेथेच थांबत नाही. अनंत सौंदर्याचे ज्ञान (प्राप्त) झाल्यानंतर मनुष्य त्याच्यावर प्रेम केल्याशिवाय राहत नाही.

सूफ़ींचे म्हणणे आहे की, ज्या सौंदर्याचे दर्शन आम्हास इंद्रियांद्वारे होते ते त्याच अनंत सौंदर्याची विभूती आहे. सूफ़ींच्या मतानुसार परमेश्वरच एकमात्र सत्ता आहे. तो परमसत्य, अनंत सौंदर्य आणि परम मंगल (खैर-ए-महज़) आहे. त्याच्याच प्रतिछबीच्या स्वरूपात हे समस्त जग आणि त्याचे प्राणी अभिव्यक्त होत आहेत. वास्तवात जे काही सौंदर्य आहे ते परमेश्वराचे सौंदर्य आहे; म्हणून जेथे कोठे आम्हास सौंदर्य आढळते तेथे आम्ही परमेश्वराच्या सौंदर्यासच पाहत आहोत. त्याशिवाय सौंदर्याची कल्पना केली जाऊ शकत नाही आणि सौंदर्यावर प्रेम करणे मनुष्यासाठी अस्वाभाविक नाही. निसर्गाच्या वस्तूंमध्ये मनुष्याचे मन स्वाभाविकपणेच रमून जाते.

जेव्हा मनुष्य प्रेम करू लागतो तेव्हा तो जणू त्या अनंत सौंदर्याचे रसास्वादन करू लागतो, कारण की जेथे कोठे आपणास सौंदर्याचे दर्शन होते तेथे परमेश्वराचे सौंदर्यच प्रकाशमान असते. सूफ़ी कवी जामीच्या एका कवितेमध्ये म्हटले आहे –

''धन्य आहे (तो) या जगाचा स्वामी ज्याने प्रत्येक अणू-रेणूस आरशासारखे बनवले. त्यामुळे त्याचे सौंदर्य प्रतिबिंबित होते. गुलाबामध्ये प्रकट होणाऱ्या त्या (परमेश्वरा)च्या सौंदर्याने गोवत्सका (बुलबुल पक्षा)स प्रेमवेडे बनवून सोडले. त्याच ज्वालेमुळे दीपक प्रकाशमान होते. जिच्यावर लुब्ध होऊन पतंगा ('परवाना') स्वत:स भस्म करून घेतो. सूर्यकिरणांमुळे प्रकटलेल्या सौंदर्यावर मुग्ध होऊन (पाण्याच्या) लहरींमधून कमळ आपले डोके वर काढते. लैलाच्या कुरळ्या केसांना पाहून तिचा प्रियकर मजनूँचे हृदय आकर्षिले गेले होते कारण तिच्या (लैलाच्या) सुंदर चेहऱ्यामध्ये त्या (परमेश्वरा)च्या सौंदर्याचे किरण उमटले गेले होते. त्या (परमेश्वराच्या सौंदर्या)नेच शीरींच्या ओठांमध्ये तो गोडवा भरलेला होता ज्याने परवेज़चे हृदय आणि फ़रहादच्या जीवनाचे अपहरण केले होते. त्याचेच सौंदर्य सर्वत्र प्रतिभासित होत आहे आणि पृथ्वीवर सुंदर वस्तूंच्या माध्यमाने अशाप्रकारे चमकत आहे, जणू ते पडद्यामधून चाळून येत आहे. यूसुफ़च्या अंगरख्यामध्ये त्याचाच चेहरा प्रकट झालेला होता (की) ज्याने ज़ुलेखाच्या मनास बेचैन करून सोडले होते. जेथे कोठे अवगुंठन-पडदा दिसेल तिच्या पाठीमागे तोच लपलेला असतो. जे अंत:करण प्रेमाने अभिभूत (प्रभावित) होते त्यामध्ये तो आकर्षण भरत असतो. त्याच्यावर प्रेम करूनच अंत:करण सशक्त बनते. त्याच्या अभिलाषेमध्येच आत्म्याचा विजय आहे. या जगामध्ये सुंदर वस्तूंवर प्रेम करणारा (वास्तविक) त्याच्या (परमेश्वरा)वरच प्रेम करतो.'' थोडक्यात, सौंदर्यापासून प्रेम आणि प्रेमापासून मुक्ती (मोक्ष) हे सूफ़ीवादाच्या सिद्धान्ताचे सार आहे. असे म्हणतात की, सीमित आणि मानवीय प्रेमाचा विस्तार क्रमश: वाढत-वाढत संपूर्ण विश्व-ब्रह्मांडास घेरून टाकतो. आणि तशी अवस्था प्राप्त झाल्यानंतर साधक सर्वत्र आत्मा आणि परमात्म्याच्या प्रेमलीलेचे दर्शन करू लागतो. सौंदर्याची सीमित परिधी शेवटी अनंत सौंदर्यापर्यंत पोहोचते. सूफ़ींचे असे मत आहे की, साधारणपणे असे दिसून येते की सांसारिक प्रेमामध्ये प्रेम-मार्गाचा यात्रेकरू प्रेयसीच्या आठवणीमध्ये स्वत:स विसरून जातो, त्याच्याशी संसारामध्ये तेच एकमात्र सत्य उरते; परंतु जेव्हा त्याला हे कळून येते की ज्याच्यासाठी तो वेडा बनलेला आहे त्याचे सौंदर्य तर अनंत सौंदर्याचे प्रतिबिंब मात्र आहे आणि ज्या रूपावर तो आसक्त आहे ते क्षणभंगुर आहे तेव्हा कोठे त्याचा मोह हळूहळू कमी होऊ लागतो आणि तो त्या परम प्रेयसीचे प्रेम प्राप्त करण्यासाठी व्याकूळ होऊन जातो. ज्याअर्थी सांसारिक प्रेमासाठी त्याने पहिल्यापासूनच संसाराच्या - जगाच्या इतर वस्तूंचा त्याग केलेला असतो, त्याअर्थी त्या आध्यात्मिक प्रेमाच्या मार्गावर अग्रेसर होण्यामध्ये त्याला कसलीच अडचण भासत नाही.

सूफ़ींमध्ये आणखी एक आश्चर्यकारक गोष्ट दिसून येते आणि सूफ़ी काव्यामध्ये पदोपदी याचे प्रत्यंतर येते. सूफ़ी म्हणतो की भौतिक प्रेमामध्ये स्त्री-पुरुषाचे प्रेम ही तर साधारणशी गोष्ट आहे, परंतु 'अहंकारा'वर विजय प्राप्त करण्यासाठी सुंदर युवकाप्रती प्रेम असणे अधिक उपयुक्त असते. त्या संदर्भात जो युक्तिवाद सूफ़ी साधक मांडतात त्याचा सारांश असा आहे की, स्त्रीविषयीचे जे प्रेम असते त्यामध्ये स्वार्थ असतो, आणि सुंदर युवकाप्रती जे प्रेम असते त्यामध्ये स्वार्थ नसतो, त्यामध्ये विकार असत नाही. विकारहीन असल्याकारणामुळे ते स्वार्थावर, बुद्धीवर विजय प्राप्त करण्यामध्ये अत्यंत साहाय्यक सिद्ध होते. पुरुषाचे युवकाप्रती प्रेम आणि त्याचे आधारभूत सिद्धान्त वास्तविक ग्रीकांद्वारे प्रतिपादित केले गेले आहेत. ग्रीकांकडूनच ते इस्लाममध्ये आले आहे. फ़ारसी काव्यामध्ये याची प्रचुरता आहे. [E. J. W. Gibb - 'A History of Ottoman Poetry' (1900), पृ. ६४]

सूफ़ी साधक प्रेमाद्वारे सांसारिक माया-मोह त्याग करण्याची भाषा बोलतो, परंतु तो जगातील प्राण्यांविषयी सदय (दयाळू) बनून जातो. साधकाच्या हृदयामध्ये जेव्हा या प्रेमाचा उदय होतो तेव्हा सांसारिक वस्तू त्याला तुच्छ वाटतात, परंतु संसारातील जीवांसाठी त्याचे हृदय-अंतःकरण दया आणि प्रेमाने परिपूर्ण असते. इतरांच्या दुःखाचे निवारण करण्यासाठी तो सर्व प्रकारे प्रयत्नशील असतो आणि त्यासाठी तो सर्व प्रकारच्या कष्टांचे स्वागत करतो. एक छोट्याशा प्राण्यापासून ते मोठ्यापर्यंत सर्वच त्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असतात, कारण सर्वत्र सर्व प्राण्यांमध्ये तो परमेश्वराचेच दर्शन करीत असतो. त्यांना सुखी करून तो परम सुखी बनतो. त्यांच्यासाठी तो सर्व प्रकारचे त्याग करण्यास तयार असतो. सूफ़ी संत बायज़ीद बिस्तामी यांच्याविषयी एक मनोरंजक गोष्ट सांगितली जाते. त्यावरून हे चांगल्या प्रकारे कळून येते की, जीवांविषयी सूफ़ींच्या मनात किती दया असते. एकदा हमदान शहरामध्ये बायजीदने काही वेलदोडे खरेदी केले. जेव्हा ते तेथून बिस्तामला रवाना होऊ लागले तेव्हा त्यांच्यापाशी काही वेलदोडे शिल्लक होते. ते त्यांनी आपल्या झग्यात ठेवले. हमदानपासून शेकडो मैल (किलो मीटर) यात्रा संपवून जेव्हा ते बिस्तामला पोहोचले तेव्हा त्यांना वेलदोड्याच्या गोष्टीची आठवण आली; परंतु जेव्हा त्यांनी आपल्या झग्यातून वेलदोडे बाहेर काढले तेव्हा त्यांना त्यावर काही मुंग्या आढळल्या. त्यांना वाटले की त्या बिचाऱ्या मुंग्यांना त्यांच्या बिळापासून त्यांनी फार लांब आणले आहे म्हणून ते तत्काळ परत फिरले आणि हमदानकडे गेले. अशाच प्रकारे नूरी नावाच्या एका सूफ़ीच्या प्रार्थनेमध्ये इतरांच्या कल्याणाची तीव्र भावना दिसून येते. नूरीने एकदा प्रार्थनेमध्ये म्हटले होते, 'हे परमेश्वरा! आपली अनंत ज्ञानशक्ती आणि इच्छेने निर्माण केलेल्या प्राण्यांना तू नरकामध्ये शिक्षा (दंड) देतोस, जर तुझी इच्छा नरकास माणसांनी भरून देण्याची असेल तर (त्यांच्याऐवजी) ते माझ्यानेच भरून टाकू शकतोस. त्या माणसांना स्वर्गामध्ये पाठवू शकतोस' अशा प्रकारची उदाहरणे दिली जाऊ शकतात की ज्यामुळे सूफ़ींची लोककल्याणाची भावना, प्राण्यांविषयी दया इत्यादींवर प्रकाश पडतो. सूफ़ी संत बायज़ीदने म्हटले आहे की, परमेश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याला तो तीन गुणांनी विभूषित करतो – त्याच्यामध्ये समुद्रासारखी उदारता, सूर्यासारखी पर-दुःख-कातरता आणि पृथ्वीसारखी विनम्रता आढळते. [R. A. Nicholson - 'The Mystics in Islam', पृ. १११]

**२) ज्ञान** – सूफ़ी साधना-रथाचे दुसरे चाक आहे **ज्ञान**. सूफ़ींना प्रेमाप्रमाणे ज्ञानाची पण गरज असते; म्हणून सूफ़ी सिद्धान्तामध्ये प्रेमाप्रमाणे ज्ञानाचे पण महत्त्व आहे. सूफ़ी प्रेमाप्रमाणे ज्ञानावर पण अत्यंत भर देतात. त्यांचे म्हणणे असे आहे की, ज्ञान प्राप्त केल्याशिवाय मनुष्य काहीच करण्यासाठी समर्थ नसतो. परमेश्वरास जाणणे, सृष्टीचे अंतरंग ओळखणे, आकाशांची रहस्ये उलगडणे, साधना-भक्ती पद्धतीची माहिती करून घेणे इत्यादी गोष्टी ज्ञानाशिवाय शक्य नाहीत. एक हदसि अर्थात प्रेषित-वचनाचा दाखला दिला जातो की, ज्ञानप्राप्तीसाठी सुदूरवर्ती चीनला जाण्याचा प्रसंग आला तर, तिकडे अवश्य जा व ज्ञान प्राप्ती करून घ्या. ज्ञानप्राप्ती स्त्री-पुरुष सर्वांना आवश्यक असल्याचे सांगितले गेले आहे.

ज्ञानाचे दोन प्रकार मानले गेले आहेत- (१) इल्म (सांसारिक मानवीय ज्ञान) आणि (२) मारिफ़ (अध्यात्मिक सच्चे ज्ञान). 'मारिफ़' आणि 'इल्म' बिलकूल दोन भिन्न गोष्टी आहेत. साधारण ज्ञानास 'इल्म' म्हणतात आणि परमेश्वरविषयक सूफ़ींच्या रहस्यमय-गूढ ज्ञानास 'मारिफ़' असे म्हणतात. 'इल्म'ची प्राप्ती मनुष्याच्या प्रयत्नाने आणि शिक्षकाच्या मदतीने शक्य होते. तत्त्वज्ञ सूफ़ी आचार्य हुजवीरी यांचे मत आहे की,

'परमेश्वराचे ज्ञान 'इल्मे मारिफ़त' आहे, जिच्या साहाय्याने परमेश्वरास त्याचे प्रेषित आणि संत ओळखतात.' (हुजवीरी, 'कश्फुल महजूब', पृ. १६) प्रख्यात सूफ़ी संत जुन्नूनने सांगितले आहे की, जे काही आम्ही डोळ्यांनी पाहतो ते सांसारिक ज्ञान असते. परंतु जे अंत:करण ओळखते ते सच्चे ज्ञान असते. 'इल्मे–मारिफ़त' मेंदूच्या क्रियात्मक शक्तीचे परिणाम नव्हे, परंतु ते संपूर्णपणे परमेश्वराची इच्छा आणि अनुग्रहावर (कृपेवर) निर्भर असते. 'मारिफ़' वास्तविक भगवत् कृपेनेच प्राप्त होते, तर मनुष्य स्वप्रयत्नाने सांसारिक शिक्षकाच्या मार्गदर्शनाने 'इल्म' प्राप्त करू शकतो. परमेश्वर अनुग्रहपूर्वक अध्यात्मिक ज्ञान ('मारिफ़') त्यालाच प्रदान करतो, जो त्याच्यासाठी सुयोग्य (निर्माण केला गेलेला) असतो. परमेश्वराच्या अनुग्रहाचा तो हा प्रकाश आहे की जो अंत:करणास प्रकाशमान करून टाकतो आणि मनुष्याच्या संपूर्ण शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक शक्तींना देदिप्यमान करून टाकणाऱ्या आपल्या किरणांनी अभिभूत करून टाकतो. या ज्ञानाद्वारेच साधक परमेश्वराचे दर्शन घेतो आणि अशाप्रकारे त्याचा साक्षात्कार मिळवत त्याच्याशी एकरूप होऊन जातो.

निफ़ारी यांनी सांगितले आहे की, परमेश्वराचा शोध घेणारे भक्त तीन प्रकारचे असतात. पहिले – ज्यांना परमेश्वराचे उपासक म्हटले जाते – हे स्वर्गप्राप्तीच्या अभिलाषेने किंवा चमत्कारशक्तीच्या प्राप्तीसाठी ईश्वराची उपासना करतात. दुसरे आहेत – जे धार्मिक तत्त्ववेत्ते आणि शास्त्रीय ज्ञान प्राप्त करणारे पंडित आहेत. ते परमेश्वराच्या ऐश्वर्यामुळेच परमेश्वराचा परिचय प्राप्त करून घेतात. ते विभूतियुक्त परमेश्वराचा शोध घेतात, परंतु त्याला प्राप्त करू न शकल्यामुळे ते त्यास (परमेश्वरास) अज्ञेय असे म्हणतात. त्यांच्या मते, 'आम्ही हे जाणतो की त्या (परमेश्वरा)स आम्ही जाणू शकत नाही आणि हेच आमचे ज्ञान आहे.' आणि तिसरे – आरिफ़ (ब्रह्मज्ञानी) आहेत. ते भावाविष्ट अवस्थेमध्ये परमेश्वरास पाहतात. [R. A. Nicholson, 'The Mystics in Islam', पृ. ७२.]

म्हणून आपणास हे कळून येते की 'मारिफ़' परमेश्वराच्या एकत्वाचा बोध आहे. याच्या आधारे मनुष्य समजून चुकतो की, 'भिन्नत्वा'ची प्रतीती होणे मिथ्या आहे, एक भूलभुलैय्या आहे. हे ज्ञान जेव्हा मनुष्यास होते तेव्हाच तो स्वत:स ओळखू लागतो आणि स्वत:स ओळखणे याचा अर्थ आहे परमेश्वरास ओळखणे. मनुष्य आपल्यामध्येच सृष्टीचे एक छोटेसे (लहानसे) संस्करण आहे. तो त्या सृष्टीचा डोळा आहे की ज्यामध्ये परमेश्वर स्वत:स स्वत: आणि आपल्या लीलांना पाहतो. ही सृष्टी असत्‌शी प्रतिबिंबित होणारी परमेश्वराची गुणावली आणि नामावलींचा समूह आहे. म्हणून या सृष्टीचा छोटासा संस्करण असलेला मनुष्य आणि तो, ज्याने संपूर्ण सृष्टीस आपल्यामध्ये लपवून घेतलेला आहे, त्याने परमेश्वराची गुणावली आणि नामावळींना आपल्यामध्ये ग्रहण केलेले आहे. या ज्ञानास प्राप्त न केल्यामुळे अज्ञानी जीवनभर (आजीवन) भटकत असतो. जोपर्यंत त्याचे अंत:करण अज्ञानाच्या पडद्याने झाकले गेलेले असते, तोपर्यंत मनुष्य आपली वासना आणि इंद्रियांचा गुलाम बनलेला असतो आणि परमेश्वराचा चेहरा त्याला दिसत नाही; परंतु जेव्हा परमेश्वराच्या आकर्षणाची जादू त्याच्यावर प्रभाव टाकू लागते, तेव्हा त्याच्या मनापासून इंद्रियगत विषयांचा तिरोभाव होऊ लागतो आणि शेवटी त्याचे अंत:करण विशुद्ध होऊन जाते आणि त्याला परमेशाशी एकत्वाचा बोध होतो. हे एकत्वाचे बोध त्याच्या अंत:करणास आनंदाने परिपूर्ण करते. त्याच्या समस्त दु:खांचे अवसान होते. म्हणूनच साधक आपल्या संपूर्ण शक्तीनिशी याकडे अग्रेसर होण्यास जागरूक असतो, प्रयत्नशील असतो.

'मारिफ़' (सच्चे ज्ञान) परमेश्वराद्वारेच शक्तीसंपन्न होते, अन्यथा परमेश्वरास परमेश्वराच्या मदतीशिवाय ओळखले जाऊ शकत नाही. असे म्हणतात की जेव्हा परमेश्वराने बुद्धीला निर्माण केले तेव्हा त्याने तिला विचारले की, 'मी कोण आहे?' बुद्धी मौन राहिली. तेव्हा परमेश्वराने आपल्या एकत्वाचा प्रकाश तिच्यावर पाडला. तेव्हा कोठे तिने सांगितले की, ''तू परमेश्वर आहेस.'' म्हणून सूफ़ी 'मारिफ़'ला प्रकाश मानतात. ज्याने ज्योतिस्वरूप ज्योतिर्मय परमेश्वरापासून प्रकाश ग्रहण केला आहे, त्यामुळे त्याचे अंत:करण उजळते आणि मग तो परमेश्वराच्या एकत्वास पाहण्यामध्ये समर्थ होतो. हे ज्ञान परमेश्वराच्या ज्योतीमुळेच ज्योतीयुक्त आहे. म्हणून शेवटी हे परमेश्वराच्या ज्योतीमध्येच विलीन होते, म्हणून या ज्योतीस प्राप्त करण्यासाठी सूफ़ी साधक परमेश्वराची प्रार्थना करतात. 'शेख़ुलशयूख अबू तालिब मुहम्मद बिन अली बिन अतिया हारिसी अल्-मक्की यांच्या 'कूतुल-कुलूब' या ग्रंथामध्ये एक सूफ़ी प्रार्थना आहे, ''हे परमेश्वरा! माझ्या अंत:करणामध्ये प्रकाश दे. आणि माझ्या कब्री (समाधी, थडग्या)मध्ये प्रकाश दे, माझे श्रवण, माझी दृष्टी, माझी भावना, माझे शरीर या सर्वांमध्ये प्रकाश दे. हे प्रभू! माझ्या अंत:करणाच्या ज्योतीस तीव्र कर आणि मला प्रकाश दे. आणि त्या (मना)ला आलोकित, प्रकाशमय कर. याच प्रकाशासाठी प्रेषित मुहम्मद[स.] यांनी प्रार्थना केली होती. ..... कारण की, अशा प्रकारच्या ज्योतीचा अधिकारी नेहमीसाठी नित्य त्या ज्योति-स्वरूपाच्या दृष्टि(क्षेपा)मध्ये असेल.''

मुतज़िला सिद्धान्ताचे समर्थक म्हणतात की, परमेश्वरासंबंधी आध्यात्मिक ज्ञान (मारिफ़त) वास्तवात मस्तिष्क (मेंदू) आणि बुद्धीचा व्यापार (कार्य) आहे, म्हणून बुद्धिमान मनुष्यच या ज्ञानास प्राप्त करण्यामध्ये समर्थ होऊ शकतो. सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरीने या सिद्धान्ताचे खंडन केले आहे आणि या ज्ञानास 'हाली' अर्थात हृदयप्रसूत म्हटले आहे. तो ज्ञानास हृदयाचा-अंत:करणाचा विषय मानतो. अबुल हसन नूरीचे मत आहे की, परमेश्वरास प्राप्त करण्याचा मार्ग परमेश्वराशिवाय दुसरा कोणताच नाही. त्याच्याशिवाय दुसरा कोणीच हा मार्ग दाखवू शकत नाही. आपल्या बुद्धीच्या बळावर मनुष्य त्या परमेश्वरास ओळखू इच्छितो, परंतु एक सीमेपर्यंत पोहोचल्यावर त्याची गती अवरुद्ध होऊन जाते आणि मनुष्यास आपल्या असह्यावस्थेचा बोध (जाणीव) होऊ लागतो. अशा विवशतेच्या वेळी तो परमेश्वरापाशी दयेची भीक मागतो. मग परमेश्वराच्या दयेनेच साधकास त्याची जाणीव होऊन जाते आणि त्याच्या आत्म्यास शांती लाभते (प्राप्त होते). कोणतेच मानवी ज्ञान त्याला मदत करत नाही, कारण की ते ज्ञान परमेश्वराच्या गुणांशीच संबंधित असते आणि परमेश्वर त्या गुणांना त्याच्या ध्यानमग्न साधकांवर प्रकट करतो. ब्रह्मज्ञानी ('आरिफ़')साठी स्वतंत्र जीवन, स्वतंत्र चिंतन नावाची कोणतीच वस्तू शिल्लक राहत नाही. प्रख्यात सूफ़ी साधक ज़ुन्नून मिस्रीचे मत आहे की, परमेश्वर ज्या पद्धतीने परिचालित करतो त्या पद्धतीनेच ते (ब्रह्मज्ञानी) परिचालित होतात. त्यांच्या तोंडातून निघालेले उद्‌गार (शब्द) हे परमेश्वर निसृत शब्द असतात आणि परमेश्वराच्या दृष्टी-शक्तीने ते पाहतात.

परमेश्वराशी 'एकत्व' प्राप्त करणे हेच ब्रह्मज्ञान्याचे ध्येय असते. सुप्रसिद्ध फ़ारसी कवी जामीने एकत्व प्राप्तीचे स्पष्टीकरण करताना दाखवून दिले आहे की, अंत:करणास एकांगी बनविणे अर्थात आपल्या अंत:करणास पवित्र करणे आणि आपल्या मनातून परमेश्वराशिवाय अन्य वस्तूंना दूर हटवणेच 'एकत्व' आहे. मग त्या अंत:करणामध्ये ना आकांक्षा असतील, ना कामना, ना ज्ञान आणि ब्रह्मज्ञान - 'मारिफ़त'च. ज्यांची इच्छा आणि आकांक्षा केली जाते अशा सर्व वस्तूंपासून मुक्त झाले पाहिजे आणि बुद्धीविषयक सर्व वस्तूंना

तिरोहित केले पाहिजे. परमेश्वरच त्यांच्या चिंतनाचा एकमात्र विषय झाला पाहिजे आणि त्याला इतर कोणत्याच वस्तूचे ज्ञान नसले पाहिजे. असे म्हटले जाते की, निफ़ारी यास अशी आकाशवाणी (देव–वाणी) ऐकू आली होती की, 'जर तू स्वत:स एक सत्ता मानत असशील आणि मला आपल्या सत्तेचे कारण मानत नसशील, तर मी आपला चेहरा लपवून घेतो. म्हणजे तुला आपला (स्वत:चा)च चेहरा दिसू लागेल. म्हणून समजून घे की, तुला काय दिसत आहे आणि काय लपलेले (अव्यक्त) आहे.'

सूफ़ी साधक 'मारिफ़' आणि धार्मिक विश्वास यामध्ये फरक करतात. त्यांचे असे मत आहे की, 'मारिफ़' अग्नीप्रमाणे प्रज्वलित होणारी वस्तू आहे, तर धार्मिक विश्वास प्रकाशाप्रमाणे आहे. ज्या व्यक्तीस 'मारिफ़' म्हणजेच अध्यात्मिक ज्ञान प्राप्त झालेले आहे ती व्यक्ती परमेश्वराशी एकरूप (एकमेक) होऊन पाहाते आणि परमेश्वराकडे निवास करत शांती प्राप्त करून घेते. आणि धर्मप्रवण व्यक्ती तिच्या ज्योतीच्या आधारे पाहते आणि परमेश्वराच्या उपासनेसच साध्य मानते. परमज्ञानी ('आरिफ़') असे मानतो की, परमेश्वर ना कोणाला पुरस्कृत करतो, ना कोणाला दंड देतो. सत्य आणि असत्याची कोणतीच वास्तविक सत्ता नाही, ते मिथ्या आहेत. परमज्ञानी परमेश्वराशी थेट संपर्क आणि आंतरिक प्रकाशासच स्वत:साठी क़ायदा मानतात, शास्त्रविधी मानतात. अशा दृष्टीने विचार केल्यास असा निष्कर्ष निघू शकतो की, नैतिक आणि धार्मिक नियम–कायदे परमज्ञानी ('आरिफ़')साठी व्यर्थ आहेत आणि पोथ्यांमध्ये लिहीले गेलेले कायदे, त्यांच्यासाठी निरर्थक ठरतात. अबुल हसन खुरक़ानी याने म्हटले आहे – 'मी असे म्हणत नाही की स्वर्ग आणि नरक यांचे अस्तित्व नाही; परंतु माझे असे मत आहे की ते माझ्यासाठी काहीच नाहीत, कारण परमेश्वराने त्या दोघांची निर्मिती केली आहे आणि मी ज्या जागेवर आहे तेथे कोणत्याच निर्मित वस्तूला स्थान नाही.'

परमज्ञानी ('आरिफ़')चा दृष्टिकोन लक्षात घेता म्हटले जाऊ शकते की त्यांच्यासाठी धर्माची भिन्नता निरर्थक आहे आणि त्यांच्या दृष्टीमध्ये सर्व समान आहेत. इब्न–अल्–अरबीच्या खालील कथनावरून या कोटीच्या सूफ़ी साधकांच्या दृष्टिकोनावर संपूर्ण प्रकाश पडतो. इबन–अल् अरबीचे मत आहे – 'जे सूर्यामध्ये परमेश्वरा (समजून त्या)ची पूजा करतात, ते सूर्यास पाहतात, सजीवांमध्ये त्याची पूजा करणारे एका सजीवास पाहतात. आणि निर्जीव पदार्थामध्ये त्याची पूजा करणारे हे निर्जीव पदार्थास पाहतात. आणि जे त्याला अद्वितीय आणि अतुलनीय समजून त्याची पूजा करतात ते त्याच्या समान अन्य कोणत्याच वस्तूस पाहत नाहीत.' – कोणत्याच एका मताशी एकांत भावाने जड मती बनू नका की, ज्यामध्ये त्याला सोडून इतर सर्वांमध्ये अविश्वास दाखवू लागाल. यामुळे तुम्ही चांगुलपणा प्राप्त करू शकणार नाही. एवढेच नव्हे तर तुम्ही सत्यास पण समजू शकणार नाही. सर्वव्यापी आणि सर्वशक्तीमान परमेश्वरास कोणत्या तरी एका विशेष मतामध्ये बांधले जाऊ शकत नाही, कारण की पवित्र कुराणामध्ये परमेश्वराने म्हटले आहे– ''जिकडे कुठे तुम्ही दृष्टी वळवाल, तिकडे परमेश्वराचाच चेहरा आहे.'' २:११५ ज्याच्यामध्ये ज्याचा विश्वास असतो तो त्यालाच मोठा मानतो. त्याचा देव त्यानेच बनवलेला आहे आणि त्याला मोठे मानून तो आपलीच बढाई मारतो. म्हणून तो इतरांच्या विश्वासाला शंकेच्या दृष्टीने पाहतो. जर त्याला विवेक असता तर त्याने असे केले नसते. त्याची नापसंती ही त्याच्या अज्ञानामुळे आहे. जर त्याने साधक जुनैदचे पुढील मत जाणले असते, तर त्याने इतरांच्या विश्वासामध्ये हस्तक्षेप

केला नसता, परंतु विभिन्न मत-मतांतरांमध्ये परमेश्वराचे दर्शन केले असते. जुनैद म्हणतो- 'पाणी ज्या भांड्यामध्ये ठेवले जाते ते त्या भांड्याचे रूप धारण करते.'

सूफ़ी-मार्गाची शेवटची मजल (मंज़िल) प्रेम आणि मारिफ़ (ब्रह्मज्ञान) आहे. यांच्या मदतीनेच साधकास परमेश्वरदर्शन घडते आणि शेवटी तो त्याच्याशी एकरूप (एकमेक) होऊन जातो. जेव्हा साधक, साधनेद्वारा आपली सर्व कलुषितता, वासना यांना दूर करण्यामध्ये समर्थ होतो आणि शेवटी त्याला आपल्या 'अहंकारा'चेही विस्मरण होते, तेव्हाच परम प्रेयसीशी त्याच्या मीलनाचा मार्ग मोकळा होऊन जातो, त्याची सर्व बाधा, सर्व अडथळे दूर होतात. मग प्रेमाद्वारे जे, सुरुवातीपासून त्याचा आधार होते, तो त्या परम प्रेयसीस प्राप्त करतो. साधक, परमेश्वराचे सान्निध्य प्राप्त केल्यानंतर प्रेम आणि मीलनाच्या प्रकाशामध्ये ऐश्वर्यास पाहतो आणि या जगामध्ये राहत असूनपण पारलौकिक गूढांची उकल करतो. प्रेमच ती वस्तू आहे जिच्याद्वारे तो प्रेयसीच्या मीलनमार्गावर अग्रेसर होतो. प्रेमाद्वारेच त्याला 'मारिफ़' (ब्रह्मज्ञाना)ची प्राप्ती होते, परंतु असे घडत नाही की, 'मारिफ़'च्या प्राप्तीसोबतच प्रेम समाप्त होऊन जावे. प्रेम आणि ज्ञान आपल्या विशुद्ध स्वरूपामध्ये सोबत असतात, तथापि असेही म्हटले जाऊ शकते की, एका शिवाय दुसरे शक्य नाही. हे ज्ञान शुष्क ज्ञान नव्हे- हे ज्ञान परम प्रेयसीच्या मीलनामध्ये साहाय्यक असते. सुप्रसिद्ध सूफ़ी ग्रंथ 'किताबुल लुमा'चे ग्रंथकर्ते अबू नसर सर्राज यांचे असे मत आहे की, परमेश्वरावर खरोखर तोच प्रेम करू शकतो ज्याला विशुद्ध ज्ञान प्राप्त झालेले असते आणि जो खरोखर त्याच्यावर प्रेम करतो, त्यालाच वास्तविक त्याचे ज्ञान प्राप्त झालेले असते.

आध्यात्मिक जीवनास सूफ़ी एक यात्रा (सफर) मानतात आणि परमेश्वर प्राप्तीची इच्छा धारण करणाऱ्या साधकास 'सालिक' असे म्हणतात. साधक परमेश्वराचे ज्ञान ('मारिफ़') प्राप्त करत क्रमशः आपल्या चरम उद्दिष्टापर्यंत (परमेश्वराशी एकरूप - एकमेक होणे) पोहोचतो. या साधनेच्या मार्गावर अग्रेसर होण्यासच सूफ़ी मार्ग ('तरीका') असे म्हणतात. साधक आपल्या वाईटपणाला सोडून, आपल्या आत्म्याच्या कलुषतेस नष्ट करत या मार्गावर अग्रेसर होतो आणि परमेश्वराचे ज्ञान प्राप्त करतो. त्या अवस्थेमध्ये पोहोचल्यानंतर आत्म्याचा लय होऊन जातो. यालाच सूफ़ी 'फ़ना' म्हणजेच 'निर्वाण' असे म्हणतात. ईश्वर साक्षात्कारासाठी मनोलय हे सर्वोत्तम साधन आहे; परंतु यात्रेचा शेवट यानंतर होतो. हा शेवट म्हणजे परमेश्वराशी एकरूप - एकमेक होऊन जाणे होय. ही शांत अवस्था आहे, ज्यामध्ये आत्मा जणू परमेश्वरामध्ये निवास करू लागतो. ही 'बक़ा' (चिरंजीव स्थिती) आहे.

सूफ़ी मार्गाचे अनेक मंज़िल, अवस्था आणि मुक़ामांची गोष्ट सांगितली जाते. मात्र यांच्याबाबतीत सूफ़ींमध्ये मतैक्य नाही. वेगवेगळ्या तऱ्हेने त्यांनी सूफ़ी मार्गाचे वर्णन केले आहे. अनेक सूफ़ी साधक परमेश्वरापर्यंत पोहोचण्याची चार मंजिले (मजले) आणि चार अवस्था मानतात. तर इतर अनेक सूफ़ी साधक असे आहेत की, जे तीनच मंजिले (मजले) मानतात आणि कित्येक बारा मुक़ामात आणि अहवाल मानतात; परंतु या बाबतीत सर्वांचे एकमत आहे की प्रत्येक मजल्याची- मंजिलाची विशिष्टता आणि गुणांना प्राप्त केल्याशिवाय दुसऱ्या मंजिलावर जाणे शक्य नसते. साधक या मंजिलांना आपल्या साधनेद्वारा पार तर करतोच, तरीपण जोपर्यंत भगवत्कृपा होत नाही तोपर्यंत मार्गावर अग्रेसर होणे शक्य नसते. 'अवारिफुल-मारीफ़'मध्ये (शेख शहाबुद्दीन सुहरवर्दी यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ) नोंद आहे की, मनुष्य आणि परमेश्वरादरम्यान जे व्यवधान आहे

तिला दूर करण्यासाठी सूफ़ी साधकास चार मजले (मंजिले) पार करण्याची आवश्यकता असते. सर्वप्रथम इच्छुक साधक परमेश्वरास प्राप्त करण्याची उत्कट अभिलाषेद्वारे अंत:करणास आच्छादणाऱ्या पडद्यांना दूर सारण्याचा प्रयत्न करतो, परंतु परमेश्वरासाठी ज्या प्रेमाची त्याला अनुभूती होते ते तो कोणालाच सांगत नाही. तो ते प्रकट करीत नाही. याचे प्रकटीकरण फक्त भावाविष्ट अवस्थे ('वज्द')मध्ये आवेशस्वरूपात होते. परमेश्वराप्रती असलेल्या आपल्या प्रेमास प्रकट करणे तो एक प्रकारचा अपराध (गुन्हा) समजतो. यानंतर तो त्या मजल्यावर पोहोचतो की जेव्हा तो ('तफरीद') म्हणजे आंतरिक (अंतर्मुखी) असंगतेचा अनुभव करतो. त्या अवस्थेमध्ये तो प्रेमवेडा बनून राहातो. त्याच्यासाठी परमेश्वरप्रेमाशिवाय इतर कोणत्याच वस्तूचे अस्तित्व शिल्लक राहत नाही. 'तजरीद' म्हणजेच बहिर्मुखी नि:संगतेशी त्याचे काहीच देणे-घेणे नसते. त्याची तिसरी मजल (मंज़िल) तेव्हा सुरू होते जेव्हा तो आपल्या अंत:करणाच्या आरशास परमेश्वराच्या विभूतीपुढे ठेवतो आणि त्याच्याच नशेमध्ये तो मस्त-मौला बनून राहतो. चौथ्या आणि शेवटच्या मजलेमध्ये जिव्हा भगवंताच्या नामस्मरणा ('ज़िक्र')मध्ये आणि अंत:करण प्रभू चिंतना ('फ़िक्र') मध्ये व्यस्त असतात. जिव्हा आणि अंत:करण जेव्हा अशा प्रकारे प्रवृत्त असतात तेव्हा आत्मा परमेश्वराच्या विभूती दर्शना ('मुशाहिदा')मध्ये असतो. या अवस्थेमध्ये साधक निर्विकार आणि अस्तित्व-ज्ञान-शून्य होऊन जातो. त्याला अशी जाणीव होते की जणू त्याच्या स्वत:च्या अस्तित्वाचा लोप झाला आहे. अर्थात त्याला आपल्या स्वतंत्र सत्तेचे ज्ञान राहत नाही.

सूफ़ी मार्गासंबंधी सूफ़ींचा असा विश्वास कार्यरत असतो की, परमेश्वर आणि मनुष्यादरम्यान एक फार मोठे व्यवधान असते. या व्यवधानाचे स्पष्टीकरण एका हदीस (प्रेषित वचन) द्वारे असे होऊन जाते की, परमेश्वर हा प्रत्येकी सत्तर हजार प्रकाश आणि अंधाराच्या पडद्यांपाठीमागे असतो आणि परमेश्वराने हे पडदे हटवल्यानंतर जर कोणाला त्याचा चेहरा पाहता आला, तर तो त्याच्यामध्येच रमून जाईल. यांपैकी आतील पडदे प्रकाशाचे आहेत आणि इतर अंधाराचे आहेत. आत्मा जेव्हा परमेश्वराकडे अग्रेसर होतो तेव्हा त्याला सात मजले (टप्पे, मंजिले) पार करावे लागतात. प्रत्येक टप्प्यावरील दहा हजार पडदे दूर होतात. अगोदर अंधाराचे पडदे दूर होतात आणि त्यानंतर प्रकाशाचे. हे पडदे दूर झाल्यानंतर आत्मा आपल्या समस्त इंद्रियगत आणि भौतिक गुणांपासून मुक्त होतो आणि मग त्याला परमेश्वराचा साक्षात्कार होतो.

संभवत: यामुळेच अनेक सूफ़ी-साधक सूफ़ी मार्गाचे सात टप्पे निश्चित करतात. हे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत व त्यांना सूफ़ी साधनामार्गावरील गंतव्यस्थळे म्हणून संबोधता येईल. ही सप्त गंतव्यस्थळे अशी आहेत-

१) उबूदिय्यत (एकनिष्ठ सेवकत्व) - यामध्ये साधक आपल्या अंत:करणास पवित्र करण्याचा प्रयत्न करत असतो, की ज्यामुळे तो पुढे प्रगती करू शकेल. शरीअत म्हणजे धर्मशास्त्राच्या विधी-विधानांनुसार तो स्वत:स परमेश्वराच्या सेवेत गुंतवून घेतो. २) इश्क़ अर्थात परमेश्वराविषयी प्रेम त्याच्या मनात उत्पन्न होते आणि साधक या गंतव्यस्थळावर स्वत:साठी निरासक्ती लावून घेतो. ३) ज़ुहद, अर्थात वैराग्यामध्ये सांसारिक-भौतिक इच्छा-आकांक्षा नष्ट होतात. ४) मारिफ़त अर्थात ब्रह्मज्ञानामध्ये साधक हा परमेश्वराचे गुण, स्वभाव आणि कर्मे यांची नियमितपणे आठवण ठेवतो. ५) वज्द (भावोल्लास अवस्था, सहजानंद) या अवस्थेत ईश्वराच्या 'एकत्वा'चे ध्यान करता करता साधकामध्ये भावाविष्ट अवस्था उत्पन्न होते. ६) हक़ीक़त (वास्तविक

स्वरूप)मध्ये साधकास परमेश्वराच्या वास्तवाचे ज्ञान होते आणि तो परमेश्वरावर संपूर्णपणे अवलंबून राहतो. याला विश्रंभ म्हणजेच 'तबक्कल' असे म्हणतात. ७) वस्ल (संयोग, मीलन)मध्ये साधक हा जणू काही परमेश्वराशी साक्षात्कार करत असतो. 'फ़ना' (संभूती, निर्वाण) आणि 'वक़ा'(असंभूती, चिरंजीवता) या अंतिम अवस्था किंवा गंतव्यस्थळा-अगोदरचा हा टप्पा आहे.

वासनेस पराजित करणारा साधक हा 'मारिफ़त' (ब्रह्मज्ञानी)च्या अवस्थेत पोहोचतो, परंतु मुरीदला (साधकास) 'मरिफ़त'च्या प्राप्तीसाठी काही 'मक़ाम' (सोपान, विश्रामस्थळे) पार पाडावे लागतात. ते एकूण सात आहेत. यांना सूफ़ी साधनेतील 'सप्त सोपान' असे म्हणता येईल. ते क्रमशः असे आहेत –

१) तौबा (अनुताप, पश्चात्ताप), २) ज़ुहद (आत्मसंयम किंवा इंद्रिय-निग्रह), ३) सब्र (धैर्य), ४) रिजा (वैराग्य), ५) तबक्कल (ईश्वरावलंबन किंवा विश्रंभ), ६) फ़ुक्र (निरासक्ती) आणि ७) रजा (संतोष) – हे सात सोपान क्रमशः एक दुसऱ्याचे परिणाम आहेत. ही विश्रामस्थळे (सोपान) वास्तविक सूफ़ींच्या योगिक आणि नैतिक अनुशासनाचे घटक आहेत. या सर्वांची समष्टीगत परिणती 'मुहब्बत' (रती) किंवा इश्क़ (प्रेम)मध्ये होते. हे ईश्वराप्रती 'इश्क़'च सूफ़ी साधकाचे ध्येय असते. परमेश्वराच्या प्रेमात तो आत्मविस्मृत होऊन जातो. 'मारिफ़त'च्या भावावेग स्वरूपास 'इश्क़' (प्रेम) हे नामाभिदान दिले जाते. निरंतर परमेश्वराचे चिंतन आणि विरहामुळे उन्मत्त साधकास 'वस्ल' अर्थात मीलन घडते (लाभते).

'तौबा' या पहिल्या सोपानामध्ये आत्मा हा भौतिक सुखांचा त्याग करून आपल्या उद्दिष्टास जाणून अग्रेसर होतो. यानंतरचे सोपान आहेत फ़ुक्र (निरासक्ती), जुहद (वैराग्य), विरक्ती, आणि तबक़्क़ल (परमेश्वरावर निर्भर असणे, विश्रंभ). या विश्रामस्थळांना पार केल्यानंतर साधक रिजा (संतोष) या विश्रामस्थळावर पोहोचतो. सूफ़ी-मार्गाचे अनेक मजले वा टप्पे पार केल्यानंतर ही अवस्था प्राप्त होते. या अवस्थेमध्ये भक्तास सर्व प्रकारचा संतोष लाभतो, मग भले ही तो सुखामध्ये असो अथवा दुःखामध्ये. तो सर्व काही भगवंताचा प्रसाद समजून स्वखुशीने ग्रहण करतो. त्याला आपल्या अवस्थेविषयी कसलीच तक्रार नसते आणि ना कोणती विशेष प्रसन्नता. संतुष्टीची ही अवस्था एक फार मोठी गोष्ट आहे. 'ज़िक्र-अल-मौत' म्हणजेच मृत्यूची आठवण ही तर आणखीन पुढची मजल आहे. अनेक सूफ़ी साधकांचे असे मत आहे की, ही मजल साधकाच्या प्रारंभिक अवस्थेसाठी आहे आणि सूफ़ी-मार्गावर अत्यंत अग्रेसर असलेल्या सूफ़ी साधकासाठी पण आहे. मृत्यूचे स्मरण साधकास प्रारंभिक अवस्थेमध्ये पाप (कर्म) करण्यापासून वाचवते आणि इतर सांसारिक प्रलोभनांपासून परावृत्त करण्यामध्ये साहाय्यक ठरते. जो उच्च कोटीचा साधक आहे तो असे समजतो की, मृत्यूनंतरच तो परमप्रिय प्रेयसी (परमेश्वरा)शी साक्षात्कार करू शकेल. म्हणून तो मृत्यूची कामना करतो. या मार्गातील सर्वात शेवटचा टप्पा, सूफ़ी साधकांनुसार प्रेम आणि मारिफ़ (ब्रह्मज्ञान)चा आहे.

भारतीय सूफ़ी, सूफ़ी-मार्गाचे चार मजले किंवा सोपान आणि त्या सोपानांच्या चार अवस्था मानतात. सूफ़ीसाधनेमध्ये इहलोकापासून ते परलोकातील परमेश्वर प्राप्तीपर्यंत चार प्रकारच्या लोकांची कल्पना केली गेली आहे. ते चार लोक क्रमशः याप्रमाणे आहेत – १) नासून (मर्त्यलोक), २) मलकूत (देवलोक), ३) जबरूत (ऐश्वर्यलोक) आणि ४) लाहूत (माधुर्यलोक). लाहूत हे साधकाचे अंतिम स्थान आहे. या चार लोकांस समांतर असे चार विधी-विधान आहेत. ते असे- १) शरिअत, २) तरीक़त, ३) मारिफ़त आणि ४) हक़ीक़त.

हे ईश्वरप्राप्तीचे चार सोपान आहेत. शरिअत धर्मपालनाची पहिली पायरी आहे. साधक भौतिक जग आणि जीवनाच्या आधारावरच ही पायरी पार पाडतो. आणि ही नासूतची स्थिती असून, हिला मर्त्य लोक असे म्हणतात. तरीक़त धर्मपरिपालनाची दुसरी अवस्था अर्थात पायरी आहे. ही शरीअतपेक्षा अधिक परिपक्व अवस्था आहे आणि नासूतपासून पुढे मार्गक्रमण करून साधक हा 'मलकूत' अर्थात देवलोक किंवा आत्मा-लोक या स्थितीस प्राप्त करतो. येथे साधकाचे मन अधिक शुद्ध होऊन तो परमेश्वराकडे अधिकाधिक आकर्षिला जातो. साधकाचे तिसरे सोपान आहे मारिफ़त या अवस्थेस पोहोचून तो स्वत:स व जगास ओळखू लागतो आणि त्याला सत्याचे ज्ञान होते. त्याला जबरूत अर्थात आनंदजगत असे म्हणतात. हेच ऐश्वर्यलोक आहे. येथे पोहोचल्यावर साधक सुखाने हुरळून ज़ात नाही. तद्वत दु:खामुळे तो व्यथितपण होत नाही. तो तर सुखदु:खाच्या पलीकडे जाऊन ब्रह्म या अवस्थेपर्यंत पोहोचतो. यालाच ऐश्वर्यलोक असे म्हणतात. हक़ीक़त ही अशी अवस्था असते की, जेथे साधक हा आपल्या साधनेच्या बळावर प्रचंड अशी शक्ती प्राप्त करून स्वत:च सिद्ध बनतो आणि त्याचा आत्मा परमेश्वरामध्ये विलीन होऊन जातो. या अवस्थेस सूफ़ीवादामध्ये लाहूत अर्थात ब्रह्म असे म्हटले जाते. सुप्रसिद्ध सूफ़ी साधक मन्सूर हल्लाजने याच अवस्थेत तल्लीन होऊन तंद्रेमध्ये 'अन ल हक़' अर्थात 'अहं ब्रह्मास्मि' म्हणजेच मीच ब्रह्म आहे अशी जाहीर घोषणा केली होती. लाहूतला माधुर्यलोक असे म्हणतात. लाहूत ही सूफ़ी साधकाची शेवटची मजल (मंजिल) आहे आणि सूफ़ी हिला 'हक़ीक़त' असे म्हणतात. त्यांच्या मते 'हक़ीक़त'चे तात्पर्य परमसत्य असे आहे. [Sir T. P. Hughes, 'A Dictionary of Islam', पृ. ६०९] सूफ़ींचे साध्य हे इश्क़ अथवा मुहब्बत म्हणजे प्रेमापर्यंतच सीमित नाही. त्यांचे साध्य 'फ़ना' हे आहे.

काही सूफ़ींनी तर एकूण नऊ (९) लोकांची कल्पना मांडली आहे. त्यांच्या मते ती यादी अशी आहे - १) आलम-ए-नासून (भूलोक वा इहलोक), २) आलम-ए-मलकूत (देवलोक), ३) आलम-ए-जबरूत (तप:लोक), ४) आलम-ए-लाहूत (माधुर्यलोक), ५) आलम-ए-हाहून (कौमार लोक), ६) आलम-ए-याहून (शक्तीलोक), ७) आलम-ए-माहूत (शिवलोक), ८) नसीरा (विष्णूलोक) आणि शेवटी ९) मेहमूदा (परमसत्यलोक).

सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरी यांच्या मतानुसार सूफ़ी-मार्गाचे तीनच मजले (मंजिले) आहेत. पहिल्या मजल्यास त्यांनी **'मुक़ामात'** असे म्हटले आहे आणि त्याचा असा अभिप्राय घेतला जातो की, साधक हा आपल्या मार्गावर कुठपर्यंत अग्रेसर झाला आहे (त्याची मजल कुठपर्यंत गेलेली आहे.) या मजल्यावर साधकास अनेक कष्ट सहन करावे लागतात आणि एकांत चित्ताने-भावाने येणाऱ्या मजल्याविषयी स्वत:स तयार ठेवावे लागते. यामध्ये परमेश्वर त्याचा मदतगार असतो कारण त्याच्या कृपेविना साधकास थोडेसे पण अग्रेसर होणे शक्य नसते. येथे साधक आपल्या 'अहंकारा'चा त्याग करून त्या गुणांना प्राप्त करतो, की ज्यांच्याद्वारे तो आपल्या शेवटच्या मजल्यापर्यंत पोहोचण्यामध्ये समर्थ सिद्ध होतो. दुसरा मजला **'अहवाल'**चा आहे. ही सूफ़ींची भावाविष्ठ अवस्था अर्थात उल्हास आणि भावातिरेकतेची अवस्था आहे. साधक पहिला मजला पार करून या मजल्यावर पोहोचतो, परंतु कधी-कधी असेही घडते की पहिल्या मजल्यावर असतानाच साधकास दुसऱ्या मजल्याची अनुभूती येते. ही पहिल्या मजल्यापासून भिन्न प्रकारची असते. हा दुसरा मजला

बिलकुल (सर्वस्वी) परमेश्वराच्या कृपेवर निर्भर असतो. यामध्ये साधकाचा अजिबात वाटा नसतो. साधकास अग्रेसर करण्यासाठी त्याच्यावर अनुग्रह (कृपा)करून परमेश्वर त्याला पुरस्कारस्वरूप देतो. शेवटचा तिसरा मजला **'तमकीन'** म्हणजेच चित्त स्थैर्याचा आहे. 'तमकीन'मध्ये साधक परम सत्यास प्राप्त करतो. त्याच्या चरम-उद्दिष्ट-प्राप्तीची यात्रा येथेच संपते. तो परमेश्वराशी एकरूप-एकमेक होऊन जातो. तो पूर्णावस्थेस पोहोचतो. आपल्या सर्व भल्या-वाईट गुणांपासून अतीत होऊन तो परमप्रिय प्रेयसी (परमेश्वरा)मध्ये निवास करू लागतो. प्रेयसी (परमेश्वरा)च्या प्रेम आणि एकत्वाच्या प्रकाशामध्ये तो त्याच्या विभूतीचे दर्शन करू लागतो आणि या शरीराद्वारेच भविष्यातील संसाराचे गूढ उकलतो.

## ३) कुराणोक्त प्रेम-महिमा (प्रेम-विषय)

परमेश्वरास कोण प्रिय आणि अप्रिय होण्यास पात्र आहेत, हे पवित्र कुराण स्पष्ट शब्दात पुढीलप्रमाणे सांगते; मात्र तत्पूर्वी प्रेमाच्या महत्त्वाविषयी थोडेसे -

ज्याप्रमाणे एखाद्या कामाची गरज, तिचा आरंभ आणि शेवट असतो, त्याचप्रमाणे श्रद्धा आणि कुरआन बोधाची इतिश्री (परिणती) ईश प्रेमामध्ये होते. सर्व प्रेषितांच्या शिकवणुकीचा केंद्रबिंदू आणि गट ईशप्रेम व रती होता आणि याचेच नाव अध्यात्मिक किंवा आत्मिक जीवन आहे. पवित्र कुराण याच शिकवणुकीने पुरेपूर भरलेले आहे. तद्वत 'तौरेत' आणि 'इंजील'मध्येसुद्धा याचा प्रतिध्वनी उमटलेला स्पष्टपणे दिसून येतो. प्रेषित ईसा (येशू) यांना विचारण्यात आले की, 'तौरेत'च्या आदेशांमध्ये सर्वश्रेष्ठ आदेश कोणता आहे? त्यांनी उत्तर दिले- संपूर्ण विवेकानिशी मनोमन अंत:करणाच्या तळापासून आत्म्याच्या पावित्र्यासह ईश्वरावर प्रेम करणे होय. हाच सर्वप्रथम आणि सर्वश्रेष्ठ आदेश होय. (मत्ती २२) ज्याप्रमाणे ईशप्रेम अध्यात्माचा प्राण आहे, त्याचप्रमाणे त्या प्रेमाचा आत्मा विशुद्ध ईश्वरनिष्ठा आहे. तोंडाने प्रेमाचा आव आणणे हे प्रेमाच्या विशुद्ध निष्ठेपासून काहीसे वेगळे आहे.

पवित्र कुराणामध्ये ईशप्रेमाचे प्रतिबिंब असे उमटलेले आहे -

''(हे प्रेषित, तू त्यांना) सांग की, 'मी त्यासाठी तुमच्याकडे कोणताही मोबदला मागत नाही. (मला केवळ) प्रेम हवे आहे, आप्तेष्टांच्या प्रेमासारखे.'' - ४२:२३ ''त्याने (ईश्वराने) तुम्हा परस्परांत प्रेम आणि करुणा निर्मिली'' - ३०:२१ ''मी तुझ्यावर माझ्या प्रेमाचे पांघरुण घातले.'' - २०:३९. ''आणि काही लोक असे असतात की ते अल्लाहव्यतिरिक्त इतरांना आपले उपासनेचे विषय म्हणून स्वीकारतात आणि त्यांनी अल्लाहवर जसे प्रेम करायला हवे तसे प्रेम ते त्यांच्यावर करतात; परंतु जे श्रद्धावंत आहेत ते अल्लाहवरील (त्यांच्या) प्रेमाच्या बाबतीत अतिशय दृढ असतात.'' - २:१६५ ''हे श्रद्धावंतांनो! जर तुमच्यापैकी कोणी आपल्या धर्मापासून पराङ्मुख होत असेल (तर खुशाल व्हावे) अल्लाह आणखी कित्येक लोक असे निर्माण करील जे अल्लाहला प्रिय असतील, आणि अल्लाह त्यांना प्रिय असेल. जे सज्जनांसाठी मृदू आणि दुर्जनांसाठी कठोर असतील, जे अल्लाहच्या मार्गात प्रयत्नांची पराकाष्ठा करतील आणि कोणत्याही निर्भर्त्सकांच्या निर्भर्त्सनेला भिणार नाहीत. ही अल्लाहची कृपा आहे. तो ज्याला इच्छितो त्याला प्रदान करतो. अल्लाह सर्वव्यापी आहे आणि (तो) सर्वकाही जाणतो.'' - ५:५४.

प्रेमाच्या संबंधात लोकांचे दोन गट होतात. एक तर ते ज्यांच्यावर परमेश्वर प्रेम करतो; तर दुसरे ते ज्यांचा परमेश्वर तिरस्कार करतो – अशा लोकांना तो पसंत करीत नाही. याचे प्रत्यंकन (प्रत्यंतर) पवित्र कुराणात पुढीलप्रमाणे आहे–

''सद्‌वर्तन करा, निश्चितच सद्‌वर्तन करणाऱ्यांवर अल्लाह प्रेम करतो.'' – २:१९५ ''नि:संशय, पश्चात्ताप करणाऱ्यांवर अल्लाह प्रेम करतो आणि पावित्र्य राखणाऱ्यांवर(ही) तो प्रेम करतो.'' – २:२२२ ''अल्लाहवर जे भरवसा ठेवतात त्यांच्यावर नि:संशय अल्लाह प्रेम करतो.'' – ३:१५९'' जे न्यायपूर्ण व्यवहार करतात, त्यांच्यावर अल्लाह निश्चितच प्रेम करतो.'' – ५:४२ ''जे सदाचरणी आहेत, त्यांच्यावर अल्लाह निश्चितच प्रेम करतो.'' – ९:४ ''अल्लाह स्थिरचित्त लोकांवर प्रेम करतो.'' – ५:४२ ''नि:संशय अल्लाह त्यांच्यावर प्रेम करतो जे त्याच्या मार्गात अशा प्रकारे फळी बांधून (व्यूह रचना करून) लढतात जणू काय ते शिसे पाजलेली भिंत असावेत.'' – ६१:४.

आता दुसरा गट. तो आहे ज्याचा परमेश्वर तिरस्कार करतो. तो तिरस्कार पुढीलप्रमाणे अभिव्यक्त आहे :

''(लक्षात ठेवा की) अल्लाह अवज्ञा करणाऱ्यांवर प्रेम करत नाही.''– ३:३२. ''विश्वास ठेवा की गर्विष्ठ आणि घमेंडखोर लोक अल्लाहला निश्चितच आवडत नाहीत.'' – ४:३६. ''निश्चितच अल्लाह मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्यांवर प्रेम करीत नाही.''–२:१९०. जो विश्वासघातकी (आणि) महापापी आहे, तो अल्लाहला निश्चितच आवडत नाही.'' ४:१०७. ''निश्चितच, अल्लाह वचनभंग करणाऱ्यांवर प्रेम करत नाही.''– ८:५८. – ''निश्चितच अल्लाह कुणा अपहार करणाऱ्या कृतघ्नाला पसंत करीत नसतो.''– २२:३८. ''नि:संशय, अल्लाह गर्विष्ठ व आत्मश्लांघी लोकांवर मुळीच प्रेम करत नाही.''– ३१:१८. ''जे लोक उत्पात माजवतात ते खरोखरच अल्लाहला आवडत नाहीत.''– २८:७७. ''अल्लाह हे पसंत करीत नाही की माणसाने अपशब्दांकरिता तोंड उघडावे; परंतु या व्यतिरिक्त की एखाद्यावर अत्याचार केला गेला असेल.''– ४:१४८ ''अल्लाह मर्यादेचे उल्लंघन करणाऱ्यांना पसंत करीत नाही.''– ६:१४१ ''खचितच तो अहंकाऱ्यांवर प्रेम करत नाही.''– १६:२३ ''जे अपव्यय करतात ते अल्लाहला मुळीच आवडत नाहीत.''– ६:१४१ ''नि:संशय, दुराचारी लोकांवर तो प्रेम करीत नाही.''– ४२:४०

सर्व प्रकारचे जीवन म्हणजे आत्मचैतन्याचा विलास होय. त्यातच अगणित विश्वे अव्यक्त नांदत असतात. जीवन म्हणजे अनंताच्या जाणिवेचा एक तरंग आहे. प्रेम हे सर्व ज्ञानाचा आणि श्रेयसाधनेचा आत्मा आहे. प्रेम म्हणजे देहभानरहित होऊन केलेली ईश्वराची भक्ती होय. प्रेम हेच जीवनाचे मूलतत्त्व व सर्व ध्येयांचे व महत् कृत्यांचे स्फूर्तिस्थान आहे असे इस्लामी थोर तत्त्वज्ञ डॉ. सर मुहम्मद इक़बाल यांचे मत आहे.

### ४) सूफ़ी साधना–प्रकार : दार्शनिक आधार (परिप्रेक्ष)

**प्रास्ताविक** : जेव्हा आपण एखाद्या उच्चतम मूल्यास जीवनाचे उद्दिष्ट निर्धारित करून ते प्राप्त करण्यासाठी आपल्या संपूर्ण शक्तीनिशी अग्रेसर होतो तेव्हा आपणास जीवनाच्या साधना स्वरूपात त्यास स्वीकारावे लागते. भक्त आणि संतांसाठी परमेश्वरप्राप्तीच जीवनाचे परम उद्दिष्ट असते. ते या उद्दिष्टप्राप्तीसाठी प्रयत्नशील असतात. यासाठी ते शारीरिक क्रियांचे नियमन करतात, मनास एकाग्र ठेवण्याचा प्रयत्न करतात,

प्रेमाच्या संबंधांमध्ये अनन्यता आणण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. आणि बुद्धीद्वारे परमतत्त्वाच्या स्वरूपास जाणण्याचा प्रयत्न पण करतात. सूफ़ी संत, साधकांच्या या समस्त प्रयत्नांना जीवन साधनेमध्ये एकत्रितपणे लक्षित केले जाऊ शकते.

भारतामधील प्रचलित साधनापद्धती लक्षात घेऊन जर या प्रयत्नांचे विश्लेषण केले, तर त्यांना तीन प्रकारांमध्ये वर्गीकृत केले जाऊ शकते. ते तीन प्रकार याप्रमाणे होत –

(१) ज्ञान–साधना, (२) प्रेम–साधना, (३) योग–साधना. परमतत्त्व म्हणजेच परमेश्वराच्या स्वरूपास जाणणे आणि त्याच्याशी आपल्या अभिन्नतेची अनुभूती करणे ही ज्ञानक्षेत्राच्या अंतर्गत येणारी आहे. गुरू द्वारा ज्ञान प्राप्त करून जेव्हा साधक तदनुसार आपली जीवनपद्धती बनवतो, तेव्हा तो ज्ञानसाधनेस महत्त्व देत असल्याचे प्रतीत होते. ज्ञानाची ही साधना सर्वांसाठी सुलभ नसते. याच्यासाठी शारीरिक शुद्धता आणि मनाच्या एकाग्रतेची पण आवश्यकता असते. या दोन्ही गोष्टी योग–साधनेद्वारे मनास निर्मळ, स्वच्छ करून निर्विकल्प अवस्थेपर्यंत पोहोचवले जाते आणि या अवस्थेमध्ये परमेश्वराशी भक्त हा आपले अभेद स्थापित करून घेतो, परंतु ही स्थिती शाश्वत नसते. मनामध्ये किंचितसुद्धा विकार उत्पन्न झाल्यास भक्त त्या अवस्थेपासून पतित होऊन जातो आणि तो साधनाच्युत होऊ शकतो; म्हणून प्रेमसाधना ही आवश्यक असते.

प्रेमसाधनेमध्ये भक्त परमेश्वराशी व्यक्तिगत संबंध प्रस्थापित करतो. हा संबंध प्रेममय, रागात्मक संबंध असतो. या संबंधाच्या निर्मितीमध्ये प्रेयसीच्या व्यक्तित्त्वाची महत्ता कारणस्वरूप विद्यमान असते, म्हणून जोपर्यंत हा महत्त्वबोध कायम असतो तोपर्यंत ही प्रेमपद्धती पण स्थायी असते. म्हणूनच भक्त आणि संतांनी योगसाधनेसोबत प्रेमसाधनेसपण महत्त्व दिले आहे. अशाप्रकारे ज्ञानसाधना परमेश्वराच्या स्वरूपास समजण्यासाठी आणि त्याच्याशी अभिन्नता प्रस्थापित करण्याची साधना आहे. योगसाधना परमेश्वराजवळ पोहोचण्यासाठी शारीरिक आणि मानसिक शक्तींना नियोजनबद्ध करण्याची साधना आहे आणि प्रेमसाधना परमेश्वराशी वैयक्तिक रागात्मक म्हणजेच प्रेमाच्या संबंधास अनन्य भावापर्यंत पोहोचवण्याची साधना आहे. या तिन्ही साधना सूफ़ी संतांमध्ये आढळतात. सूफ़ींनी ज्ञानसाधना आणि योगसाधनेपेक्षा प्रेमसाधनेस जास्त महत्त्व दिले.

**१) सूफ़ींची ज्ञानसाधना :** सूफ़ी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानात परमात्म ज्ञानाचे तीन पैलू सांगितले जातात. १) परमेश्वर त्रिकालाबाधित आहे. २) तो सर्वज्ञ आणि सर्वसाक्षी आहे. ३) तोच सर्व लीला करतो. परमेश्वराच्या स्वरूपाचे उपरोक्त पैलू जाणून घेण्यासाठी आणि त्याच्याशी अभिन्नता प्रस्थापित करण्यासाठी ज्ञानसाधनेची गरज असते. ज्ञानार्जनाचे तीन विधी मान्य आहेत – १) गुरूप्रदत्त ज्ञान, २) आप्तज्ञान (शास्त्रीय ज्ञान) आणि ३) अनुभवजन्य ज्ञान. सूफ़ी साधकांनी आप्तज्ञानास महत्त्व न देता गुरूप्रदत्त ज्ञान आणि आत्मानुभूत ज्ञानास महत्त्व दिले आहे.

**क) सूफ़ी साधनेमध्ये गुरुप्रदत्त ज्ञानाचे महत्त्व**

सूफ़ींनी साधनेच्या क्षेत्रामध्ये साधकासाठी चार टप्पे निर्धारित केले आहेत. ते असे – १) 'शरीयत', २) 'तरीक़त', ३) 'हक़ीक़त' आणि ४) 'मारिफ़त.' यामधील 'हक़ीक़त'चा टप्पा ज्ञानक्षेत्राच्या अंतर्गत येतो, कारण की या स्तरावर पोहोचल्यानंतर साधक हा तत्त्वदृष्टीसंपन्न होऊन परमसत्याचे सम्यक् ज्ञान प्राप्त करून

घेतो. म्हणूनच या टप्प्यास ज्ञानकांड असे म्हणतात. 'हक़ीक़त' हा ज्ञानोत्पत्तीचा टप्पा असतो. 'तरीफ़त'मध्ये यशस्वी झाल्यानंतर 'हक़ीक़त' हे परमेश्वरासंबंधी ज्ञान असते.

सूफ़ी साधनेमध्ये गुरूप्रदत्त ज्ञानास फार महत्त्व दिले गेले आहे. सूफ़ी तत्त्वज्ञानामध्ये परमेश्वरास ज्योतिस्वरूप आणि सौंदर्यरूपामध्ये कल्पिले गेले आहे. त्याच्या दिव्य सौंदर्याचा बोध झाल्यानंतर साधक त्यास प्राप्त करण्यासाठी अग्रेसर होतो. परमेश्वरी सत्तेच्या स्वरूपाचे यथार्थ ज्ञान आणि त्याच्याशी आपले अनन्य संबंध याच्या बोधास सूफ़ी जीवनपद्धतीमध्ये ज्ञानसाधना म्हटले जाते. सूफ़ी साधनेमध्ये परमेश्वराची कल्पना नारी (स्त्री) स्वरूपात केली जाते. सूफ़ी मनामध्ये मादन भावनेस मान्यता असल्याकारणाने स्त्रीस्वरूपामध्येच त्या परमेश्वराच्या रूप-गुणांचा बोध केला जाते. ते ईश्वरास (साध्यास) प्रेयसी स्वरूपात आणि साधकास प्रियकर किंवा पति स्वरूपात स्वीकार करतात. गोष्ट अशी आहे की, सूफ़ींमध्ये लौकिक दांपत्यप्रेमाची घनिष्ठताच त्या परम सत्तेच्या अलौकिक प्रेमास प्राप्त करण्याचे माध्यम अथवा सोपान मानले गेले आहे. म्हणूनच 'इश्क़मजाज़ी' म्हणजेच लौकिक प्रेम - भौतिक प्रेमास 'इश्क़ हक़ीक़ी' म्हणजेच अलौकिक प्रेम -आध्यात्मिक प्रेमाची पायरी मानली जाते.

सूफ़ी ज्ञानसाधनेची दुसरी लक्षवेधक गोष्ट ही आहे की, साधारण जीवामध्ये (जीवात्म्यामध्ये) परमेश्वराची इच्छा, प्रेरणा अथवा कृपेशिवाय ज्ञानाचे उद्‌बोधन होत नाही. ईश्वर इच्छील त्यासच आपल्या विषयीचे ज्ञान जागृत करतो. त्याच्याच प्रेरणेने गुरू साधकांपर्यंत पोहोचून साधक आणि त्या (ईश्वरा)च्या दरम्यान मध्यस्थाची भूमिका बजावतो. या सर्व कार्यांपाठीमागे एकमात्र त्याचीच कृपा किंवा इच्छा असते. ज्ञान स्वत:स परमेश्वराद्वारेच ओळखू शकतो. परमेश्वराचे ज्ञान पूर्वगामी आहे आणि तेच आत्मज्ञानाचे कारण आहे.

सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरीचे मत आहे की, ''परमेश्वराचे ज्ञान 'इलाहि-ए-मारिफ़त' आहे. हे सर्वस्वी परमेश्वराची इच्छा आणि अनुग्रहा (कृपे)वर अवलंबून असते. या ज्ञानाच्या आधारे प्रेषित आणि संत परमेश्वरास ओळखतात.'' सूफ़ी साधक जुन्नून मिस्त्री म्हणतो की, जे आपण डोळ्यांनी पाहतो ते सांसारिक ज्ञान आहे; परंतु हृदयाने, अंत:करणाने ओळखता येते तेच सच्चे ज्ञान होय.

ज्ञानसाधना ही परमेश्वराचे स्वरूप ओळखून त्याच्याशी अभिन्नता प्रस्थापित करण्याची साधना आहे, कारण परमेश्वराशी एकत्व प्राप्त करणे हे ज्ञानीचे उद्दिष्ट असते. परमेश्वराच्या कृपेमुळे प्राप्त अध्यात्मिक ज्ञानाच्या ('मरिफ़') बळावर साधक हा परमेश्वराचे दर्शन करतो आणि त्याच्याशी साक्षात्कार घडवत तो परमेश्वराशी एकरूप होऊन जातो.

सूफ़ी मतामध्ये गुरुप्रदत्त आणि अनुभवजन्य ज्ञानास फार महत्त्वपूर्ण मानले गेले आहे. गुरू परोक्ष सत्तेचे अलौकिक सौंदर्य, सामर्थ्य आणि सूक्ष्म स्वरूपाचे वर्णन करून साधकास आपल्याकडे आकर्षित करून घेतो. गुरूच साधकास संसारापासून निर्लिप्त होण्याची प्रेरणा देतो. गुरूप्रदत्त ज्ञानाच्या आधारे साधनोन्मुख सूफ़ी साधक हा साधनामार्गावरील अनेक अडथळे पार करून आपल्या अनुभूतींना समृद्ध करतो.

ईश्वर तत्त्वाचा बोध झाल्यानंतर जेव्हा साधक त्यास आपल्या जीवनपद्धतीमध्ये चरितार्थ करून घेतो, तेव्हा तो सच्चा ज्ञानसाधक बनून जातो. उदाहरणार्थ गुरूंनी सांगितले की ईश्वर एक आहे, तो अतीत आहे, तो सुंदर आणि परम समर्थ आहे आणि तो प्राणिमात्रांमध्ये व्याप्त असून, निर्गुण-निराकार आहे. हे ज्ञान-पक्ष साधनेचे

स्वरूप तेव्हा ग्रहण करेल जेव्हा उक्त ज्ञान व्यावहारिक जीवनाची साधना बनून जाईल. अर्थात जेव्हा आपण ईश्वराच्या एकतेस प्राणिमात्रांमध्ये स्वत: अनुभव करू लागू, त्याची कोमलता फुलांच्या कोमल कळ्यांमध्ये, विकसित (उमललेल्या) फुलांमध्ये, त्याचे हास्य, कोकिळेच्या मंजुळ स्वरामध्ये त्याच्या वाणीचे माधुर्य, निर्मळ ज्योत्स्नेमध्ये त्याचे स्मित (हास्य), प्रत्येक रंगदार आणि चित्ताकर्षक पदार्थामध्ये त्याचीच छटा आणि त्याचेच आकर्षण, विजेचा कडकडाट, वज्रपात, भूकंप, ढगफूटी, महापूर इत्यादींमध्ये त्याचे रौद्र रूप दिसू लागते. सूफ़ी साधक मुहम्मद इब्न वासीने म्हटले होते, 'मी कधीच अशी एकही वस्तू पाहिली नाही की, जिच्यामध्ये मी परमेश्वरास पाहिले नसेल.' (भाषांतरकार : नर्मदेश्वर चतुर्वेदी, 'इस्लाम के सूफ़ी साधक', पृ. ४६.)

सूफ़ी तत्त्वज्ञानाचे गाढे विद्वान आर. ए. निकोल्सन यांनी 'दी मिस्टिक्स ऑफ इस्लाम' या आपल्या सुप्रसिद्ध ग्रंथामध्ये शीराज़ येथील एक दरवेश कवी बाबा कूही यांच्या एका फ़ारसी गीताचा अनुवाद प्रस्तुत केला आहे. हे ज्ञानसाधनेचे एक उपयुक्त आणि उत्कृष्ट उदाहरण आहे. ते म्हणतात – ''मी सर्वत्र कार्यकारणाशी अतीत निर्गुण निर्विकार परमेश्वरासच पाहिले. बाजार काय, देऊळ काय, पर्वत काय, घाटी (खोरे) काय, आपल्या स्नेहामध्ये, सौभाग्यामध्ये, क्लेशामध्ये, पार्श्वमध्ये, प्रार्थना आणि व्रतामध्ये, स्तुती आणि चिंतनामध्ये, प्रेषित आणि धर्मामध्ये त्यालाच (परमेश्वरास) पाहिले आणि सगळीकडे पाहिले. आपल्या अंत:करणाच्या डोळ्यांनी, त्याच्या चेहऱ्याच्या प्रकाशामध्ये सर्वत्र पाहिले. सर्व ठिकाणी तोच आढळून आला. त्या परमेश्वराशिवाय काहीच नाही. मेणबत्तीसारखा मी परमेश्वराच्या विरहामध्ये वितळत होतो, परंतु विरहजन्य प्रकाशामध्ये सर्वत्र तो (परमेश्वर)च दिसत होता.''

परमसत्तेच्या मीलना ('वस्ल')च्या मार्गावर प्रस्थान करणारे मुस्लिम गूढवाद्यांसाठी आध्यात्मिक गुरूला शरण जाणे आवश्यक आहे. कारण की ज्याचा कोणी गुरू नसतो त्याचा गुरू सैतान असतो. आध्यात्मिक गुरू (पीर किंवा शेख)च सूफ़ी तत्त्वज्ञानाचा आंस किंवा कणा आहे. जिच्या चारी दिशांना सूफ़ींची संचालन शक्ती यंत्रवत स्वत: फिरत असते. (डॉ. ताराचंद, 'इन्फ्लुअन्स ऑफ इस्लाम ऑन इंडियन कल्चर', पृ. ८१) सूफ़ी साधक जुन्नून मिस्री यांच्या मतानुसार, एका चांगल्या साधकास ईश्वरापेक्षा अधिक गुरूप्रती विनित असले पाहिजे. आज्ञाधारक असले पाहिजे. निरंतर गुरूचे ध्यान करणे हेच शिष्यासाठी उचित आहे, आणि सतत ध्यान आणि भावात्मक चिंतनाच्या साहाय्याने गुरूलीन होऊन आत्मविलय करावे. प्रत्येक व्यक्ती आणि वस्तूमध्ये गुरूसच पाहावे आणि त्या गुरूस स्वत:स समर्पित करावे. अशाप्रकारे समर्पित झाल्यानंतर गुरू त्या (शिष्या)स आगामी अनेक सोपान पार करवून शेवटी ईश्वरामध्ये स्थित करून देतो.

सूफ़ी साधनेच्या अंतर्गत गुरू महिमेचे जेवढे वर्णन करावे तेवढे थोडेच आहे. गुरूच्या महात्म्याची चर्चा सर्वप्रथम सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरीपासून सुरू होते. भारतीय साधना पद्धतीमध्ये गुरूमहात्म्य अतिप्राचीन आहे. वैदिक काळापासून हिचे सूत्रसंबंध आहे. सूफ़ींचे साधना मार्ग पण भारतीय सिद्ध आणि योगी यांच्या साधनामार्गाप्रमाणेच प्रशस्त होते. निर्गुण संतांवर सूफ़ी गुरूमहिमेचा पण प्रभाव पडलेला आहे.

**निष्कर्ष**

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्ट होते की, सूफ़ी मतामध्ये गुरूप्रदत्त आणि अनुभवजन्य ज्ञानासच महत्त्वपूर्ण समजले गेले आहे. गुरू हा परोक्ष सत्तेचे अलौकिक सौंदर्य, सामर्थ्य आणि सूक्ष्म रूपांचे वर्णन करून साधकास

त्याच्याकडे आकर्षित करतो. गुरूच साधकास संसारापासून विरक्त होण्याची प्रेरणा देतो. गुरूप्रदत्त ज्ञानाच्या आधारे सूफ़ी साधक हा साधनामार्गातील अनेक अडथळे पार करून आपल्या अनुभूतींना समृद्ध करतो.

**ख) सूफ़ी साधनेमध्ये अनुभवजन्य ज्ञानाचे महत्त्व**

सूफ़ी साधनेत अनुभवजन्य ज्ञानाचे महत्त्व या कारणासाठी आहे की, सूफ़ी साधनेचा संपूर्ण विकास हा साधकाच्या आपल्या अनुभवावर निर्भर असतो. सूफ़ी साधकाचे परम लक्ष्य परमेश्वराशी एकरूप होणे हे आहे. तर्क किंवा बुद्धीने परमेश्वराच्या गूढ तत्त्वांचा उलगडा होऊ शकत नाही, याची त्याला पुरेपूर जाणीव असते. यासाठी अनुभवजन्य ज्ञानाचीच आवश्यकता असते. चर्मचक्षू परमेश्वर पाहू शकत नाहीत, त्याला हृदयाची - अंत:करणाची अंतर्दृष्टीच लागते. वास्तविक अनुभव हाच ज्ञानाचा मूळ आधार आहे.

सूफ़ी साधनेचा संपूर्ण विकास साधकाच्या आपल्या अनुभवमात्रेवर निर्भर आहे. सूफ़ी साधनेचा मार्ग तोपर्यंत संपत नाही जोपर्यंत सूफ़ी सर्व सोपानांना (मुक़ामात) पार करत नाही आणि त्यांपैकी प्रत्येक सोपानामध्ये अग्रेसर होण्याअगोदर स्वत:स निपुण बनवले नसेल आणि ही अनुभूती नसेल की परमेश्वराने त्याला कोण-कोणत्या दशा प्रदान करण्याची कृपा केली आहे, फक्त तेव्हाच तो चेतनेच्या त्या उच्च स्तरावर स्थायी स्वरूपात उठतो. याला सूफ़ी लोक 'मारिफ़त' (ब्रह्मज्ञान) आणि 'हक़ीक़त'(सत्य) असे म्हणतात. या स्तरावर साधक (तालिब) परम ज्ञानी (आरिफ़) बनून जातो आणि त्याला याची जाणीव होते की ज्ञान, ज्ञाता आणि ज्ञेय एकच आहेत. [R. A. Nicholson', The Mystics in Islam', पृ. २९.]

**निष्कर्ष**

उपरोक्त विवेचनावरून हे स्पष्टआहे की, सूफ़ी साधकांनी साधनेच्या क्षेत्रामध्ये अनुभवजन्य ज्ञानास सर्वाधिक महत्त्व दिले आहे. वास्तविक अनुभवच ज्ञानाचा मूळ आधार आहे. अन्य स्रोतांपासून प्राप्त ज्ञान अनुभवाच्या कसोटीवर खरे उतरल्यास ग्राह्य होते. साधकासाठी तर संपूर्ण जीवनच निश्चित उद्दिष्ट गाठण्यासाठी संकल्प आणि निष्ठेने केली जाणारी यात्रा आहे. सूफ़ी साधक ही यात्रा विविध सोपान ओलांडून पूर्ण करीत आले आहेत.

**२) सूफ़ींची प्रेम-साधना :** सूफ़ी साधनेमध्ये प्रेमास असाधारण महत्त्व आहे. प्रेमतत्त्वाचे पारखी सूफ़ी साधक ज़ुन्नून मिस्रींनी प्रेमास एका वेगळ्याच पद्धतीने समजावण्याचा प्रयत्न केला आहे. ते विरहवेदनेस साधकाच्या अंत:करणाच्या सच्चेपणाचे चिन्ह मानत आणि म्हणत असत की, ही शुद्धहृदयता (सिद्क़) या पृथ्वीवर परमेश्वराची तलवार आहे, ज्याला ही स्पर्श करते त्याला ती तुकडे-तुकडे करून सोडून देते. (आचार्य परशुराम चतुर्वेदी, 'उत्तरी भारत की संत परंपरा', पृ. ७३.) ज़ुन्नूनने प्रेमाची दार्शनिक व्याख्यापण केली आहे आणि अशा प्रकारे त्याला प्राचीन मादनभाव अथवा प्रणय भावनेपासून उच्च पदावर पोहोचवले. ज़ुन्नूननंतर हुतात्मा सूफ़ी मन्सूर हल्लाजने प्रेमभावनेचा आदर्श जगासमोर ठेवला आणि त्यांनी याला परमेश्वराचे सारतत्त्व किंवा स्वरूप पण मानले आहे. तो म्हणे - 'मी तोच आहे ज्यावर मी प्रेम करतो. ज्याच्यावर प्रेम करतो तो पण मीच आहे. आम्ही एका शरीरामध्ये दोन प्राणवत आहोत. जर तू मला पाहत असशील तर तू त्याला पाहतोस, आणि जर त्याला पाहत असशील तू आम्हा दोघांना पाहतोस.'

सूफ़ींनी ज्या प्रेमभावनेस आत्मसात केले, ती अव्यक्ताप्रती होती. सूफ़ी आपल्या प्रेमाची व्यंजना साधारण नायक-नायिका स्वरूपात करतात. प्रसंग सामान्य प्रेमाचा असतो. संकेत मात्र आध्यात्मिक प्रेमाकडे असतो. मध्ये-मध्ये येणारी गूढ स्थळे परमतत्त्वाचा आभास देतात आणि संपूर्ण सृष्टीस त्याच एका (परमेश्वरा)शी मीलन साध्य करण्यासाठी अत्यंत व्यग्र दर्शवितात. सूफ़ी प्रेमसाधना ही सौंदर्य केंद्रीत आहे.

वास्तविक जेथे सौंदर्य आहे तेथेच प्रेम आहे; आणि जेथे प्रेम आहे तेथेच सौंदर्य पण. सौंदर्य आणि प्रेम दोघे मिळून सुख आणि संतोषास पुष्ट करतात. प्रेमच विरहाचे मूळ आहे. संयोगामधील सुखच वियोगातील दु:ख असते. प्रेमामध्ये जेवढे सुख असते, वियोगामध्ये दु:खाची मात्रा पण त्याच प्रमाणात असते. 'विरह' प्रेमाचे अनिवार्य तत्त्व आहे. विरहामध्ये व्याकुळता, ताप, त्रास इत्यादी स्वाभाविक आहेत. ज्याला प्रेमाचे बाण घायाळ करतात, त्यालाच त्याची वेदना कळते.

**सूफ़ी प्रेम-साधनेमधील मानसिक विकासाच्या अवस्था**

प्रेमी साधकास गूढ सत्तेशी पूर्ण ऐक्याची सहसा अनुभूती नसते. त्याला विभिन्न मन:स्थितीचे टप्पे पार पाडावे लागतात. यांना मानसिक अवस्था असेही म्हणता येईल. या चार अवस्था आहेत. त्या याप्रमाणे - १) जागृतावस्था, २) परिष्करणाची अवस्था, ३) प्रकाशाची अनुभूती अवस्था आणि ४) पूर्ण ऐक्याची अवस्था.

**१) जागृतावस्था** - पहिला टप्पा जागृतावस्थेचा आहे. मानव आत्मा हा शुद्ध आणि चैतन्य आहे. त्याचे भौतिक पदार्थांशी जोडले गेलेले संबंध अस्वाभाविक आहेत. हा आत्मा आपल्या पूर्णत्वाच्या विलयासाठी शुद्ध, चेतन तत्त्वाशी ऐक्य स्थापन करण्याच्या हेतूने व्याकुळ असतो. ज्या वेळेस सद्‌गुरू याचे उद्‌बोधन करतो त्या वेळेस याला संसाराची अ-सारता कळून येते आणि मग तो आत्मा जागृतावस्थेमध्ये येतो.

वास्तविक सांसारिक कल्पनांचा त्याग केल्याशिवाय आणि संपूर्णपणे पवित्र आणि निर्मळ बनल्याशिवाय ती शुद्ध चेतनसत्ता साध्याकडे अग्रेसर होऊ शकत नाही. म्हणून परिष्करणाची आवश्यकता असते.

**२) परिष्करणाची अवस्था :** प्रेम साधनेच्या या दुसऱ्या अवस्थेस परिष्करणाची अवस्था म्हटले जाऊ शकते. सूफ़ी साहित्यामध्ये अनेक प्रकारच्या नियमांचे विधान आहे. सूफ़ीमतासंबंधी सर्वांत प्राचीन आणि सर्वांग पूर्ण ग्रंथ 'किताब अल्-लुमा'चे ग्रंथकर्ते अबू नसर सराज यांनी सूफ़ी साधकाच्या ध्येय मार्गावरील सात विश्रामस्थळे (मुक़ामात) नोंदवले आहेत. ती सात विश्रामस्थळे अशी आहेत - १) तौबा (पश्चात्ताप), २) वरा (संयम), ३) ज़ुहद (वैराग्य), ४) फ़ुक्र (निरासक्ती), ५) सब्र (धैर्य), ६) रजा (संतोष), आणि ७) तवक्कल (विश्रंभ). वास्तविक ही विश्रामस्थळे सूफ़ींच्या नैतिक आणि योगीक अनुशासनाचे घटक असून त्यांच्या दहा दशा किंवा अवस्था निर्दिष्ट केल्या गेल्या आहेत. त्या दश-दशा याप्रमाणे आहेत - १) मुराकबा (मनन, ध्यान), २) क़ुर्ब (सामीप्य), ३) मुहब्बत (प्रेम), ४) ख़ौफ़ (भय), ५) रिजा (आशा), ६) शौक़ (उत्कंठा, औत्सुक्य), ७) उन्स (आत्मीयता, मैत्री), ८) इत्मिनान (शांती), ९) मुहासबा (चिंतन, आत्म-अवलोकन) आणि १०) यक़ीन (दृढ निश्चयात्मकता). [R. A. Nicholson, 'The Mystics in Islam', पृ. २८-२९.]

उपरोक्त विश्रामस्थळे आणि दशांमधून क्रमश: अग्रेसर होत आणि चित्ताचे परिष्करण करत प्रेमी साधकास साध्या (ईश्वरमीलन) पर्यंत पोहोचावे लागते. अर्थात ईश्वरमीलनाचे अंतीम साध्य गाठावे लागते. वास्तविक

उपरोक्त सप्तविश्रामस्थळे (सोपान) सूफींच्या नैतिक आणि योगिक अनुशासनाचे घटक असून त्यांचा उपरोक्त दश-दशांशी मानसशास्त्रीय संबंध आहे. आत्मपरिष्करणाच्या स्थितीमध्ये साधनेच्या क्षेत्रात चार मजले (मंज़िले) असतात. ते असे - १. नासूत (भुव:लोक), २. मलकूत (देवलोक), ३. जबरूत (तप:लोक) आणि ४. लाहूत (सत्यलोक). यांच्याशी निगडित चार विधी-विधान आहेत. ते येणे प्रमाणे - १. शरिअत (कर्मकांड), २. तरीक़त (अध्यात्ममार्ग), ३. हक़ीक़त (तत्त्वोपलब्धी) आणि ४. मारिफ़त (अध्यात्मज्ञान). पहिले विधान हे सैद्धांतिक नियमांच्या परिपालनासाठी आहे; तर दुसरे विधान एक 'तरीक़ा' म्हणजेच पद्धती आत्मसात करून पवित्रता आणि परिष्करणाशी संबंधित आहे. तिसऱ्या विधानामध्ये अडथळ्यांवर मात करून ज्ञान प्राप्त होऊ लागते आणि चौथ्यामध्ये प्रवेश करताच साधक हा 'हक़' (परमसत्य)शी साक्षात्कार साधण्याचा अधिकारी बनतो. हेच आत्मपरिष्करणाचे लक्ष्य आहे.

आत्मपरिष्करणाच्या अवस्थेमध्ये प्रेमी साधक आपल्या साध्यास गाठण्यासाठी प्रयत्नशील असतो. विरहाची मर्मांतक पीडा (दु:ख-कष्ट), त्याला सांसारिक वासनांपासून विभक्त करून एकमात्र प्रेयसीच्या चिंतनामध्ये लीन करते. तो समस्त विश्वामध्ये प्रेयसीची अनुभूती करू लागतो. विरहाच्या या प्रभावामुळे क्रमश: आत्म्याचे परिष्करण होऊ लागते आणि साधक (प्रियकर) साध्य (प्रेयसी-ईश्वर) प्राप्तीसाठी विभिन्न प्रकारच्या अवस्था आणि दशांची साधना करू लागतो. साधक शुद्ध आणि निवृत्तिपर आचरणाच्या साहाय्याने शरीर आणि मनास शुद्ध करत या साधना मार्गावर अग्रेसर होतो.

**३) प्रकाशाच्या अनुभूतीची अवस्था :** प्रेमसाधनेची तिसरी अवस्था ही प्रकाशानुभूतीची मानली जाते. ही एक प्रकारे भावातिरेकाची स्थिती असते. यामध्ये साधकास साध्याची प्रेमानुभूती होते. साक्षात्कारानंतरसुद्धा प्रेयसीच्या मीलनाची संपूर्ण शक्यता नसते. प्रियकराच्या मानसिक दशेमध्ये संकल्प-विकल्पाची शक्यता असते. सच्चा प्रियकर या झलकनंतर प्रेयसीप्रती अत्यंत तीव्र भावावेगाची अनुभूती करतो. तो भावाकुल होतो. त्याची प्रेमनिष्ठा वाढते. तो महान विघ्नांवर विजय प्राप्त करण्यासाठी दृढ संकल्प करतो आणि शेवटी विजय प्राप्त करतो आणि प्रेम साधनेच्या अंतिम सोपानाकडे अग्रेसर होतो.

**४) पूर्ण ऐक्याची अवस्था :** चौथी व शेवटची अवस्था ही पूर्ण ऐक्याची आहे. या अवस्थेमध्ये साधक साध्याशी अभिन्न होऊन जातो. साधक (प्रियकर) साध्या (प्रेयसी)चे मीलन होते (घडते). वास्तविक ही अवस्था परमतत्त्व म्हणजेच परमात्म्यासाठी व्याकुळ जीवात्म्याचे त्याला प्राप्त करून स्वत:स सार्थक वा धन्य करून घेण्यासाठी आहे. हे ऐक्यच प्रेमसाधनेचे अंतिम उद्दिष्ट आहे.

उपरोक्त मन:स्थिती ही सर्वसाधारणपणे गूढवादी प्रियकर साधकांमध्ये दिसून येते. परंतु साधक आणि परिस्थिती-भेदानुसार या अवस्था अधिक पण असू शकतात. साधकाच्या मन:स्थितीच्या चारच अवस्था असतात, असे काही नाही. पूर्ण एकत्वाची मन:स्थिती प्राप्त करेपर्यंत अनेक मानसिक स्थिती असू शकतात. (डॉ. रामचंद्र तिवारी, 'मध्ययुगातील काव्य-साधना', पृ. १२१)

वास्तविक साधकाच्या मन:स्थितीचे अध्ययन अत्यंत कठीण आहे. उपरोक्त विवेचन गूढवादी साधनेमध्ये निरूपित मानसिक विकासाच्या अवस्थांना लक्षात घेऊन केलेले आहे. प्रेयसीकडे उन्मुख होण्याच्या स्थितीपासून ते तिच्या व्यक्तित्वामध्ये लय होण्याच्या स्थितीपर्यंत न जाणो किती मानसिक दशांमधून साधकास जावे लागते.

शेवटी आम्हास या गोष्टीवरच भर द्यायचा आहे की, प्रियकर साधकाच्या केवढ्या का मन:स्थिती असेनात, त्या सर्व 'प्रेमा'च्या केंद्रीय चेतनेशी नियंत्रित असतात.

**निष्कर्ष**

तसे पाहता प्रेम ही एक विश्वव्यापी वस्तू (गोष्ट) आहे. समस्त विश्वामध्ये जेथे कोठे प्रेमास महत्त्व देऊन साधनेच्या स्वरूपात ते स्वीकृत असेल तर त्याच्या स्वरूपाचे निरूपण आणि त्याच्या अनुभूतीचा क्रम जवळजवळ सारखा असेल, परंतु ही सर्वमान्य बाब आहे की, सूफ़ी साधकांनी प्रेमासच आपले सर्व काही आहे (सर्वस्व) असे मानले आहे. प्रेम त्यांचे सर्वस्व आहे. त्यांच्या प्रेमाच्या व्यथेनेच भारतीय जनतेस आपल्याकडे आकृष्ट करून घेतले आहे.

**३) सूफ़ींची योग–साधना**

योगसाधना परमेश्वराच्या जवळ पोहोचण्यासाठी शारीरिक आणि मानसिक शक्तींचे नियोजन करण्याची साधना आहे. योगसाधनेमध्ये मनास निर्मळ बनवून निर्विकल्प अवस्थेपर्यंत घेऊन जातात आणि या अवस्थेमध्ये परमेश्वराशी आपले अभेद प्रस्थापित करून घेतले जाते. योगाचे मूळ 'चित्तवृत्तिनिरोधा'मध्ये आहे. 'योग चित्तवृत्तिनिरोध :' पतंजलि योग सूत्र', परंतु मनाचे निरोध घडवून आणणे हे तितकेसे सोपे नसते. याविषयी 'गीता' म्हणते –''मन हे चंचल, उच्छृंखल, दुराग्रही आणि अत्यंत बलवान असल्यामुळे मनाचा निग्रह करणे हे वायूला नियमित करण्यापेक्षाही अत्यंत कठीण आहे.'' – श्रीमद्‌भगवतगीता – ६:३४

वास्तविक सूफ़ींची मूळ भावना प्रेम ही अंत:करणाची वस्तू आहे. शरीर हे तिच्या पूर्ततेचे साधन किंवा माध्यम आहे. शरीर आणि मनाच्या शक्तींना नियोजित करूनच प्रेममार्गावर पुढील वाटचाल करता येऊ शकते. शरीर आणि मनाच्या शक्तींना नियोजित करण्यासाठी सूफ़ी साधनाक्षेत्रातदेखील योगमार्ग मान्य आणि प्रवर्तित क्रिया आणि विधींचा समावेश करण्यात आला आहे.

सूफ़ी साधक हा सृष्टीमध्ये परमेश्वरास प्रतिबिंबित झालेला पाहत असतो. त्याची साधना ही त्याच परमेश्वरामध्ये लीन (फ़ना–संभूति, निर्वाण) होऊन असंभूति (बक़ा– चिरंतनता) मध्ये प्रवेश करण्यासाठी असते. आपल्या या प्रयत्नास सूफ़ी 'मार्ग' किंवा 'साधना पक्ष' असे म्हणतात. या मार्गामध्ये साधकास क्रमश: पुढील चार विधी–विधानांच्या अवस्थांमधून जावे लागते –

**१) शरिअत (कर्मकांड) :** या अवस्थेमध्ये धर्मग्रंथोक्त विधी–निषेधाज्ञांचे सम्यक परिपालन होते.

**२) तरीक़त (भक्तीकांड) :** यामध्ये बाह्य क्रियाकलापांपासून मुक्त होऊन फक्त हृदयाच्या–मनाच्या विशुद्धतेद्वारे, अंत:करणाच्या पावित्र्याद्वारे परमेश्वराचे चिंतन केले जाते.

**३) मरिफ़त (ज्ञानकांड) :** यामध्ये उपासनेच्या प्रभावामुळे साधकास परमसत्याचे सम्यक ज्ञान आणि तत्त्वदृष्टी संपन्न होते. आणि

**४) हक़ीक़त (सिद्धावस्था) :** या अवस्थेमध्ये कठीण उपवासव्रत अथवा मौन साधनेद्वारे साधकाचा आत्मा परमेश्वरामध्ये विलीन होण्याची क्षमता प्राप्त करून घेतो.

'शरिअत'ला म्हणजेच कर्मकांडास साधनेचे प्रथम आणि अनिवार्य सोपान म्हणून मान्य करण्यात आले आहे.

योग समन्वित सूफ़ी साधनेचे अनुसरण करणाऱ्या साधकास भूक-तहान सहन करावी लागते. एकांतात राहून मौन धारण करावे लागते. मगच त्याला चित्तवृत्ती निरोधामध्ये यश प्राप्त होते. यानंतरच साधक हा 'आरिफ़' (प्रज्ञासंपन्न) या उपाधीस योग्य ठरतो, परंतु शिष्यास (मुरीद) ज्ञानप्राप्तीअगोदर अनेक मानसिक भूमीका पण पार पाडाव्या लागतात. सूफ़ीसाधनेमध्ये यांना 'मुक़ामात' असे म्हणतात. वरील सोपान आणि दशांमधून साधनामार्गामध्ये उत्तरोत्तर अग्रेसर होत साधक हा नासूत (नरलोक), मलकूत (देवलोक), जबरून (ऐश्वर्यलोक) आणि लाहूत (माधुर्यलोक) पर्यंत पोहोचतो. येथे तो परमेश्वरामध्ये लीन होऊन जातो. हेच योगसाधनेचे परम उद्दिष्टआहे. वास्तविक चित्तवृत्तिनिरोधामध्ये साहाय्यक अशी संपूर्ण बाह्य आणि आंतरिक क्रिया सूफ़ी साधनेमध्ये साधन म्हणूनच मान्य आहे. साध्य आहे. (प्रभू) प्रेमाची प्राप्ती. दुसऱ्या शब्दांत, सूफ़ींनी प्रेमसिद्धीसाठी योगसिद्धीस आवश्यक मानले आहे.

**निष्कर्ष**

सूफ़ींनी आपल्या प्रेमप्रधान साधनेमध्ये योगाचा समन्वय साधला आहे. भारतीय योगसाधनेमध्ये 'प्रेम-तत्त्व' नव्हते. सूफ़ी प्रेमसाधनेमध्ये योगाचे विस्तृत आणि सुनियोजित असे आधार नव्हते. सूफ़ींनी भारतात येऊन योगास प्रेमसिद्धीचे आधार बनविले.

## ५) सूफ़ी –प्रेमपंढरीचे वारकरी[७५]

**१) सूफ़ी आणि प्रेम :** सूफ़ींची साधना वास्तविक 'इश्क़' म्हणजेच प्रेमाची साधना आहे. प्रेम म्हणजे देहभावविरहित होऊन केलेली ईश्वराची भक्ती. 'मारिफ़त'च्या भावावेगमय रूपाचेच नाव प्रेम आहे. सूफ़ींचे हे प्रेम परोक्षाप्रती आहे. हे अधिकांशपणे व्यक्तिगत गूढ अनुभूतीवर आधारित असते. ईश्वरप्राप्तीचे जेवढे म्हणून साधन (उपाय) सांगितले गेले आहेत त्यांपैकी प्रेमाचे स्थान सर्वोच्च आहे. सूफ़ी साधक अबू तालिबचे कथन आहे की, प्रेमामुळे परमेश्वरसंबंधीचे गूढ उकलले जाते आणि त्यामुळे त्याच्या स्वरूपाची ओळख होते. दुसरे सूफ़ी साधक अल्-शिबलीच्या कथनानुसार प्रेम अंत:करणामध्ये अग्नीसारखे असते, जो परमेश्वराच्या इच्छेशिवाय इतर सर्व वस्तूंना (गोष्टींना) जाळून भस्म करतो. सूफ़ी मनाची साधनापद्धती प्रेमावरच आधारित आहे. चित्ताशी रतीरूप रागात्मिका वृत्तीच प्रेमाचे रूप धारण करते. समस्त विश्व त्याच प्रेमाची फलनिष्पत्ती आहे. हे दृश्य जग असतच्या दर्पणामध्ये प्रतिबिंबित होणारी परम प्रभूची पडछाया आहे. सृष्टीच्या कणा-कणामध्ये त्याची रूप-श्री विखुरलेली आहे. याच सौंदर्यविभूतीमध्ये सूफ़ी स्वत:स समर्पित करतो. तो परमेश्वराशी रागात्मक संबंध स्थापित करण्यासाठी आणि त्याच्याशी एकरूप होण्याकरिता अत्यंत तीव्रपणे उत्कंठित असतो म्हणून तो प्रेमवेडा असतो.

सूफ़ींच्या दृष्टीमध्ये या दृश्य जगामध्ये व्याप्त एकमात्र तेच सत्य आहे. सूफ़ी तत्त्वज्ञ कवी जामीच्या कथनानुसार तो अद्वितीय, अगोचर, अपरिचित, अपेक्षा-रहित आणि नानात्वाच्या अतीत (असलेला) अल-हक़्क़ (परम सत्य) आहे. तसेच आपले नानात्व आणि अनेकत्वामध्ये संपूर्ण सृष्टीमध्ये स्वत:स व्यक्त करीत आहे. तोच एकमात्र परम सत्ता आहे. बाकी सर्व मृगतृष्णा आहे. समस्त विश्वास मुग्ध करणारे त्याचे सौंदर्य आपल्या पूर्णत्वास प्रकाशित करण्यासाठी हजारो आरशांमध्ये प्रतिभासित होत आहे. सृष्टीच्या रोम-रोमामध्ये,

अणू-रेणूमध्ये तो आपला 'जल्वा' (सौंदर्य) दाखवत आहे. परमेश्वराच्या माधुर्याच्या विभूति रूपसौंदर्यामध्ये अणू-रेणू प्रकाशित होत आहे, चमकत आहे. म्हणून जेथे सौंदर्य (रूप) आहे, तेथेच प्रेयसीचा विलास आहे. तेथेच आपल्या प्रेमास जागृत करावयाचे आहे. नक्षत्र-सूर्य-चंद्र त्याच्याच सौंदर्याकर्षणाने आकर्षित होऊन त्याच्याकडे प्रयाण करीत आहेत. त्याचे विरहबाण सर्व जगास घायाळ करत आहेत. जीवात्मा आणि परमात्मा यामध्ये जे एक फार मोठे व्यवधान निर्माण झाले आहे, त्याचे स्पष्टीकरण सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ इमाम ग़ज़ाली यांनी एक हदीस (प्रेषित-वचन) चा आधार घेऊन केले आहे ते असे- अल्लाह हा प्रकाश आणि अंधाराच्या सत्तर हज़ार पडद्यां(पाठी)मागे आहे. जर त्याने या आवरणांना हटवले आणि कुणास 'दीदार' अर्थात दर्शन घडले तर तो त्यामध्येच गुंतून रमून जाईल. तिचे आंतरिक आवरणे (पडदे) तर प्रकाशाचे आहेत आणि इतर अंधाराचे (आहेत). जीवात्मा परमात्म्याकडे जेव्हा अग्रेसर होतो तेव्हा त्याला सात मजले वर सोपान पार करावे लागतात. प्रत्येक मजल्यावर तो दहा हजार आवरणां (पडद्यां)ना पार करतो. सातव्या मजल्यामध्ये क्रमश: पोहोचून तो आत्मा आपले समस्त इंद्रियगत आणि भौतिक गुणमूलक अस्तित्त्वाशी अतीत होऊन परमेश्वराशी 'वस्ल' म्हणजेच मीलन प्राप्त करतो.

**भौतिक प्रेम –** फ़ारसी गूढवादी तत्त्वज्ञ कवी मौलाना अब्दुर्रहमान जामी म्हणतात की, प्रेमापासून तोंड फिरवू नका, प्रेमापासून विमुख होऊ नका, त्याची उपेक्षा करू नका. भलेही ते भौतिकच का असेना; कारण की ते अध्यात्मिक प्रेमाकडे घेऊन जाणारे असते. ते पुढे म्हणतात की, प्रेम हे असू द्या की ते. तर शेवटी आमच्यासाठी ते त्या नरेशा (वास्तविक प्रेयसी)कडे घेऊन जाणारे मार्गदर्शक असते. त्यानंतर मौलाना जामी यांचेच पुढे असे म्हणणे आहे- परंतु हे अवश्य आहे की, तुम्ही बहिरंगा (भौतिक प्रेमा)मध्येच गुंतून जाऊ नये (कारण की ते एक पुलासारखे आहे) आणि या सेतूवरून लवकर पुढे गेले पाहिजे.

या मताशी जवळजवळ मिळतेजुळते मत दुसरे एक तत्त्वज्ञ कवी मौलाना रूम यांचे आहे. ते म्हणतात, ''रंगरूपामुळे जे प्रेम निर्माण होते; खरे तर ते प्रेमच नसते. परंतु त्याचा शेवट पश्चात्ताप किंवा लज्जा असते; कारण की प्रेम भौतिक वस्तूशी कायम राहू शकत नाही.

प्रेम चिरंजीव आणि चिरंतनाशी म्हणजेच सर्वश्रेष्ठ परमेश्वराशी असावे. कारण की क्षणभंगुर वस्तूंचे प्रेम हे चिरस्थायी नसते. क्षणभंगुर वस्तू नष्टप्राय झाल्यावर त्या पुन्हा परत येत नाहीत. म्हणून त्या चिरंतन प्रेमाचा स्वीकार कर, जो चिरंजीव आहे. तो आत्म्यास टवटवीत करणारी प्रेमाची मदिरा पाजतो (पाजवतो).

जर संयोगाने भौतिक प्रेम विनासायास झाले तर सर्वप्रथम संयम व इंद्रिय-निग्रह करावा म्हणजे धर्मशास्त्रनियमाविरुद्ध कोणतीच गोष्ट घडू नये. इथपर्यंत की जाणून बुजून तिकडे बघू नये. ना त्या प्रेयसीशी बोलावे, ना तिच्या गोष्टी सांगाव्यात, ना मनामध्ये मुद्दाम तिचा विचार करावा, कारण की या सर्व गोष्टी आध्यात्मिक प्रेमाच्या विरोधात आहेत. या प्रतिकूल गोष्टी असताना अध्यात्मिक प्रेम प्राप्त होण्याची आशा कशी बाळगता येईल? दुसरे असे की यापासून लांब अंतर राखावे म्हणजे तिच्यावर चुकूनसुद्धा दृष्टी पडू नये वा ना तिचा आवाज कानी पडावा. कारण की त्यामुळे अंत:करण द्रवित होण्याची फार शक्यता असते. तिसरी गोष्ट ही की एकांतामध्ये वा उघडपणे यावर विचार करावा की, त्या व्यक्तीची पराकाष्ठा, सौंदर्य आणि मुखकांती कुठून आली आणि कुणी प्रदान केली? भौतिक प्रेमाचे चित्ताकर्षण जर असेल तर आध्यात्मिक प्रेमाच्या

आकर्षणाविषयी काय बरे सांगावे? ज्याने या सर्व प्रेयसी बनविल्या त्या प्रियकराचे वैभव कसे बरे असेल? हाच तर अर्थ आहे त्या वचनाचा की, सद्‌गुरू भौतिक प्रेमाचे निराकरण करीत नाही तर त्यामध्ये परिवर्तन घडवून आणतो (अर्थात तो त्या प्रेमास आध्यात्मिक प्रेमाकडे वळवतो) जी व्यक्ती प्रियकर असून सदाचारी असते, संयम पाळते, आपल्या प्रेमाचे प्रदर्शन करीत नाही अशा परिस्थितीत मृत्युमुखी पडते, ती व्यक्ती हुतात्मा आहे आणि परमेश्वराजवळ हुतात्मे फार उच्च स्थानी असतात.

**२) इश्क भावनेची प्रमुखता :** सूफ़ी परमेश्वरास प्रेयसी म्हणून संबोधतात आणि त्याच्या प्रेमा (इश्क़)मध्ये वेडे बनून फिरत असतात. जेव्हा त्यांना प्रेयसीशिवाय इतर काहीच दिसत नसते आणि जेव्हा ते आपल्या प्रेयसी (माशूक़)मध्ये सर्वस्व, अहंकार समर्पित करून तल्लीन होऊन जातात, तेव्हा त्यांना शाश्वत 'बक़ा' अर्थात असंभूतीचा आनंद प्राप्त होतो. सूफ़ी अध्यात्मिक प्रेमाच्या उपलब्धीसाठी भौतिक-सांसारिक प्रेमास पायरी म्हणून स्वीकारतात. ते इंद्रियांद्वारे गृहीत सौंदर्यास त्याच अनंत सौदर्यशाली (परमेश्वराची) एक छटा मानतात आणि इकडे-तिकडे जे काही पाहतात त्यामध्ये, त्यांना आपल्या प्रेयसी (परमेश्वरा)चे सौंदर्य दिसून येते. सूफ़ी साधक स्वत:स पूर्णपणे समर्पण करण्यामध्येच आपली चरम सार्थकता मानतात. आंतरिक प्रेम-निवेदन सूफ़ींच्या आध्यात्मिक जीवनरूपी यात्रे (सफ़र)ची एक आवश्यक शिदोरी आहे. सूफ़ी साधक अबू अब्द अल्लाह अल-कुरेशीचे कथन आहे की (खरे) प्रेम तेच असते की, ज्यामध्ये परमप्रिय प्रेयसी परमेश्वरासाठी आपले सर्वस्व समर्पित करावे लागते आणि त्यानंतर त्याच्यापाशी आपले म्हणून असे काहीच नसते. अशाप्रकारे 'अहंकारा'चे पूर्ण विसर्जन करून चरम उद्दिष्ट प्राप्तीसाठी प्रेमाशिवाय सूफ़ींपाशी एकही साधन असे दिसून येत नाही की जे त्यांना उद्दिष्टांपर्यंत - 'बक़ा' म्हणजेच असंभूतीच्या स्थितीस पोहोचवते.

तसव्वुफ़ म्हणजेच सूफ़ी तत्त्वज्ञानाचा महालच 'इश्क़' म्हणजेच प्रेमाच्या पायावर टिकलेला आहे. श्री. चंद्रबली पांड्येनी योग्यच म्हटले आहे की, वासना, भावना किंवा धारणेच्या प्रतिपादनामध्ये सूफ़ी वाटेल तितके तर्क करू दे; परंतु अंत:करणापासून ते नेहमी प्रेम-पुजारी असून प्रेमास मानणारे - मान देणारे आहेत. प्रेमाच्या सेतूवर चालूनच सूफ़ी भवसागर पार करतात. हेच त्यांचे अमोघ अस्त्र आहे किंवा परम साधन आहे. (श्री. चंद्रबली पांड्ये, 'तसव्वुफ़ अथवा सूफ़ी मत', पृ. ९५) सूफ़ींचा असा दृढ निश्चय आहे की प्रेमच सर्व रसांचे मूळ आहे. 'इश्क़' (प्रेमा)ची सर्वव्यापी इयत्ता आणि महत्ता यावर प्रकाश टाकत एका सूफ़ीचे काव्यात्मक उद्‌गार आहेत -

''जर प्रेम नसते तर विश्वामध्ये (सु)व्यवस्था नसती. प्रेमाशिवाय जीवन निरस आहे. प्रेमास प्राण अर्पण करणे ही पराकाष्ठा आहे. प्रेम बनविते (घडविते), प्रेम जाळते, भस्मसात करते. जगामध्ये जे काही आहे ते सर्व प्रेमाचा 'जल्वा' अर्थात सौंदर्य आहे. आग प्रेमाची उष्णता आहे. हवा प्रेमाची बेचैनी आहे. पाणी प्रेमाची गती आहे. भरती प्रेमाची स्थितप्रज्ञावस्था आहे. मृत्यू प्रेमाची बेहोशी आहे. जीवन प्रेमाची जागरुकता आहे. रात्र प्रेमाची निद्रा आहे. दिवस प्रेमाचे जागे राहणे आहे. मुस्लिम (श्रद्धाळू) प्रेमाचे सौंदर्य आहे. श्रद्धाहीनता प्रेमाचे रौद्ररूप आहे. चांगुलपण प्रेमाची समीपता आहे. अपराध प्रेमाचा दुरावा आहे. मार्ग प्रेमाची उत्कंठा आहे. (श्री. चंद्रबली पांड्ये, 'तसव्वुफ़ अथवा सूफ़ीमत', पृ. ११६.)

सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरी यांनी म्हटले आहे की, परमेश्वराच्या प्रियकरापाशी इच्छा म्हणून कोणतीच बरी-वाईट वस्तू शिल्लक नसते, कारण की जो परमेश्वराचा प्रियकर आहे, त्याच्यासाठी परमेश्वराशिवाय कोणतीच वस्तू अभिप्सित नसते. हे सर्वश्रुत आहे की, प्रख्यात सूफ़ी साधिका राबियाला परमेश्वराशी प्रेम आणि शैतानाशी घृणा करण्यासंबंधी विचारले गेले असता तिने सहज सरळ सांगितले की, परमेश्वराच्या प्रेमाने तिच्या अंतःकरणामध्ये शैतानाची घृणा करण्यासाठी जागाच सोडली नाही. अशा प्रकारे प्रेमाच्या प्रकाशामध्ये सूफ़ी साधक परमेश्वराचे वैभव आणि ऐश्वर्यास पाहात. तो 'मारिफ़' (ब्रह्मज्ञाना)ची प्राप्ती करून घेतो. ज्ञान प्राप्त झाल्यानंतर प्रेम समाप्त होत नाही. तथापि दोन्ही आपल्या विशुद्ध स्वरूपामध्ये कायम असतात. प्रसिद्ध सूफ़ी आचार्य अबू नसर सर्राजचे कथन आहे की, खरोखर परमेश्वरावर तोच प्रेम करू शकतो ज्याला विशुद्ध ज्ञान प्राप्त झाले असेल, आणि खरोखर जो त्याच्यावर प्रेम करतो, त्यानेच वस्तुतः ज्ञान प्राप्त केलेले असते.

**३) सूफ़ींचे चरम उद्दिष्ट :** सूफ़ींचे चरम उद्दिष्ट 'अनलहक़' म्हणजेच 'अहं ब्रह्मास्मि'शी पुन्हा 'एकत्व' प्राप्त करणे आहे. त्यांचा असा विश्वास आहे की, 'वज्द' म्हणजेच भावाविष्ट अवस्था ही एक अशी स्थिती आहे की, ज्यामध्ये आत्मा, परमेश्वराशी मिसळून 'एकत्व' प्राप्त करून घेतो. उमर बिन उस्मान अल-मक्की या सूफ़ी साधकाच्या कथनानुसार या स्थितीस अभिव्यक्त करता येत नाही, कारण की हे परमेश्वर आणि त्यावर सच्ची श्रद्धा धारण करणाऱ्या श्रद्धावंतांमधील एक गूढ आहे. सुप्रसिद्ध फ़ारसी नीती-कवी शेख सादी यांनी याची सहज व्याख्या करताना म्हटले आहे की, ''एका दरवेशास त्याच्या इतर साथीदारांनी उपहास-व्यंग्य करत विचारले की फुलांच्या ताटव्यापासून परतताना त्याने कोणती भेट (वस्तू) आणली? त्या दरवेशाने उत्तर दिले की, त्या गुलाबाच्या ताटव्याजवळ (परमेश्वराचे दर्शन) पोहोचल्यावर त्याची इच्छा झाली की, अनेक गुलाब खोडून (तोडून) सोबत घेऊन (परत) जावे म्हणजे आपल्या मित्रांना भेट म्हणून देता येऊ शकेल; परंतु जेव्हा मी तेथे होतो तेव्हा गुलाबाच्या ताटव्याच्या सुगंधामुळे मी इतका मस्त झालो की, जिच्यावर मी फुलांना बांधू इच्छित होतो, ती पोशाखाची खुंट माझ्या हातातून निसटली. ज्याने परमेश्वरास ओळखले त्याच्या जिव्हेमधील वाचाशक्ती नाहीशी होते. परिणामी तो काहीच बोलू शकत नाही. मौन हीच त्याची भाषा बनते. (प्रा. रामपूजन तिवारी, 'सूफ़ी मन : साधना और साहित्य', पृ. ९३.) अशा प्रकारे भावावेशमयी स्थितीद्वारे साधक परम साध्याचा साक्षात्कार मिळवण्यामध्ये समर्थ होतो. साधक महत्प्रयासाने ही स्थिती अवगत करतो. तदनंतर तो अनुपम उल्लास अवस्थेमध्ये राहात परमेश्वराशी एकत्व भाव ग्रहण करून संसारापासून पूर्णपणे विरक्त होऊन जातो. नंतर पुढील पायऱ्या पार केल्या (ओलांडल्या)नंतर त्याचे उल्लास आणि भावावेगाची घनता स्थिरावते आणि त्यामध्ये समाधीसारखी शांती निर्माण होते. भावोल्लास (वज्द)नंतर प्राप्त होणारी 'वुजूद'ची स्थिती अर्थात परमेश्वराच्या सत्तेमधील स्थितीस सूफ़ी परम प्रभूची कृपापूर्ण देणगी मानतात. साधक परमेश्वराचे नामस्मरण, ध्यान आणि उपासनेमध्ये एक अनुपम सुख आणि उत्कट प्रेमाचा अनुभव करतो. त्याच्या अंतःकरणातील सर्व परिताप अविरत अश्रुपातापासून निघून त्याचे ओझे हलके करतो. कधी तो नामरटासह एकाद्या अदृश्य छबी-श्रीकडे एकटकपणे पाहत स्मित (हास्य) करू लागतो तर कधी जड बनून जातो. उन्मादाच्या या अवस्थेमध्ये पोहोचून ऐहिक व्यापार आणि विषयांपासून तो विरक्त होऊन जातो. आणि

परमेश्वराच्या सत्तेमध्ये या भावनेने मिळून-मिसळून जातो की, त्याचे आपल्या प्रेयसीपासून वेगळे अस्तित्व राहत नाही.

**४) 'फ़ना' आणि 'बक़ा' (संभूती आणि असंभूती) : फ़ना** – सूफ़ी साधक जेव्हा समस्त आसक्ती आणि द्वंद्वांपासून अतीत होऊन परमेश्वरामध्ये स्वत:स लीन करून घेतो आणि त्याच्या अहंकाराचे, चेतनेचे पूर्ण तिरोभाव होऊन जाते, त्या वेळेस तो हर्ष-विषादापलीकडे जातो. त्याच्या समस्त वासना आणि इच्छांचे अवसान होऊन जाते आणि तो आपल्या प्रेयसीशी रमण करत संपूर्णपणे निश्चिंत होऊन जातो. सूफ़ी तत्त्वज्ञानाचे गाढे अभ्यासक आर. ए. निकल्सन यांनी 'फ़ना'ची व्याख्या अशी केली आहे – 'फ़ना' आत्म्याची ती उन्नत स्थिती आहे जिच्या पृष्ठभूमीमध्ये पोहोचून त्याच्या सर्व आकांक्षा आणि आसक्ती मिटून जातात (नाहीशा होतात) आणि अशाप्रकारे आत्मा स्वचिंतनापासून विरक्त होऊन स्वत: परमप्रिय प्रेयसीच्या चिंतनाचे केंद्र बनून जातो आणि प्रियकर आणि प्रेयसीमधील सर्व अंतर दूर होऊन दोघांमध्ये ऐक्यभाव निर्माण होतो. [R. A. Nicholson, 'The Idea of Personality in Sufism' पृ. १८.]

सूफ़ींच्या दृष्टीने आध्यात्मिक जीवन एक यात्रा (सफ़र) आहे आणि अध्यात्ममार्गावर चालत जाऊन प्रेयसीस प्राप्त करण्यासाठी प्रयत्न करण्यास ते 'सालिक' अर्थात साधक असे म्हणतात. साधक आपल्या सर्व दुर्गुणांचा त्याग करत, निष्कलुष आत्म्यासह या मार्गावर प्रयाण करतो आणि परमेश्वराचे ज्ञान प्राप्त करून आपल्या आत्म्याचे (वि)लय करून 'फ़ना'च्या अवस्थेपर्यंत पोहोचतो. परंतु 'फ़ना' हे त्याचे अंतिम उद्दिष्ट नव्हे.

यानंतर एक स्थिती **'बक़ा'**ची पण आहे. या अवस्थेमध्ये पूर्ण शांतचित्ताने त्याचा आत्मा परमेश्वरामध्ये निवास करू लागतो. या अंतिम उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी साधकास वेगवेगळे टप्पे पार करावे लागतात. जस-जसे तो आपल्या परम उद्दिष्टाकडे अग्रेसर होत जातो तसतसे त्याच्या आध्यात्मिक शक्तींचा विकास होत राहतो. सूफ़ी साधक प्रेम आणि मारिफ़ (परमज्ञान) याचा शेवटची मजल या स्वरूपात स्वीकार करतात. याच्याच माध्यमातून साधकाला आपल्या प्रेयसीचे दर्शन होते आणि तो त्याच्यामध्ये अद्वैतभाव स्वरूपात विलीन होऊन जातो. या सूक्ष्म मार्गावर कोणीच आपल्या अहंकारासह चालू शकत नाही. प्रेमाची आळी अत्यंत अरुंद आहे. त्यामध्ये दोन मावतच नाहीत. द्वैतास येथे स्थानच नाही. आपल्या 'अहंकारा'स नष्ट करून आणि परमेश्वरास प्राप्त करण्याच्या इच्छेशिवाय इतर सर्व वासनांना जाळून भस्म केल्यानंतरच साधक हा प्रेम-मार्गाचा पथिक (यात्रेकरू) बनून जातो. प्रसिद्ध तत्त्वज्ञ सूफ़ी हुजवीरी यांनी म्हटले आहे, ''परमेश्वराप्रती माणसाचे प्रेम हा एक असा लोकोत्तर गुण आहे की जो परमेश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्या, पुण्यात्म्याच्या अंत:करणामध्ये श्रद्धा आणि आलोक म्हणजेच प्रकाशरूपामध्ये स्वत:स प्रकट करतो, म्हणून तो आपल्या प्रेयसीस संतुष्ट करण्यासाठी आणि तिला प्राप्त करण्यासाठी उत्कंठित होऊन जातो. नेहमी तिच्या आठवणीत बेचैन असतो. तिला सोडून तो सर्वांना विसरून जातो.'' (प्रा. रामपूजन तिवारी, 'सूफ़ी मत : साधना और साहित्य', पृ. ३१०)

**५) सच्चे प्रेमाचे स्वरूप :** प्रसिद्ध सूफ़ी अब्दल अल-कुरेशीच्या कथनानुसार सच्च्या प्रेमाचा अर्थ आहे की, ''तुम्ही ज्या परमप्रिय प्रेयसीवर प्रेम करता, तुमच्याशी असलेले सर्व काही तिला देऊन टाका (तिला आपले सर्वस्व अर्पण करा), की ज्यामुळे तुमच्याजवळ आपले म्हणून काहीच शिल्लक उरणार नाही.'' म्हणून प्रियकर

हा फक्त सांसारिक वासनांचाच त्याग करीत नाही, प्रत्युत स्वत:स प्रेयसीप्रती सर्वस्व भावाने समर्पित करून घेतो. तशा प्रकारचा त्याग केल्याशिवाय तो त्या अलौकिक प्रेमाचा अधिकारी बनू शकत नाही. सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ कवी जलालुद्दीन रूमीने प्रेयसीस प्राप्त करण्याची स्थिती आणि शक्यतेवर प्रकाश टाकत एका मसनवी (कथा-काव्या)मध्ये नाटकीय कौशल्यासह असे वर्णन केले आहे, ''प्रेयसीच्या दारास कोणीतरी बाहेरून ठोठावले. आतून आवाज़ आला, ''कोण आहे? त्याने उत्तर दिले, ''मी आहे.'' आतून आवाज आला, ''या घरामध्ये माझ्या आणि तुझ्या या दोहोंसाठी जागा नाही.'' प्रियकर परत गेला. त्याने एकांत सेवन केले, प्रार्थनेमध्ये मग्न राहिला, उपवासव्रत केले. एका वर्षानंतर तो पुन्हा परत आला. त्याने पुन्हा दार ठोठावले. आतून आवाज आला, ''कोण आहे?'' प्रियकराने उत्तर दिले ''तू आहेस.'' आणि मग दार उघडले गेले. म्हणून जोपर्यंत मनुष्य आपले अहंकार आणि मी-तूच्या द्वैत बंधनामध्ये बांधला गेला आहे तोपर्यंत त्याचा अद्वैताशी साक्षात्कार होणे अशक्य आहे.

सुप्रसिद्ध सूफ़ी ग्रंथ 'अवारिफ़ुल मआरिफ़'चे ग्रंथकर्ते शेख शहाबुद्दीन सुहरवर्दी यांच्या कथनानुसार मनुष्य आणि परमेश्वराच्या दरम्यान जे व्यवधान आहे, त्याला सारण्यासाठी सूफ़ी साधकाला चार मजले (टप्पे) पार करावे लागतात. सर्वप्रथम साधक हा परमेश्वरास प्राप्त करण्याच्या उत्कट अभिलाषेमुळे अंत:करणावर पडलेले आवरण-पटल दूर सारतो (करतो); परंतु परमेश्वरासाठी ज्या प्रेमाची त्याला अनुभूती होते, तो ते कुणासमोरही प्रकट (व्यक्त) करीत नाही. मात्र ते प्रकट होते भावाविष्ट अवस्थे (वज्द)मध्ये. या व्यतिरिक्त अवस्थेमध्ये आपले प्रेम अभिव्यक्त करणे हे तो पापकर्म समजतो. यानंतर तो 'तफ़रीद' म्हणजेच अंतर्मुखी असंगतेची अनुभूती करून देणाऱ्या स्थितीमध्ये पोहोचून प्रेयसीच्या प्रेमामध्ये वेडा बनून जातो. त्याच्यासाठी परमेश्वराच्या प्रेमाशिवाय इतर कोणत्याच वस्तूचे अस्तित्व शिल्लक राहत नाही. त्याचा 'तजरीद' म्हणजेच बहिर्मुखी नि:संगतेशी कोणताच संबंध उरत नाही. तिसऱ्या टप्प्यावर तो आपल्या अंत:करणाच्या आरशामध्ये 'तस्वीरे यार' म्हणजेच प्रेयसीचे प्रतिबिंब पाहत तिच्याच सौंदर्यरूपाच्या नशेमध्ये गुंग होऊन मस्त बनून राहतो. शेवटच्या टप्प्यात त्याची जिव्हा ईश्वराच्या नाम-स्मरणामध्ये आणि अंत:करण ईश्वराचे ध्यान व चिंतनामध्ये मग्न होते. हे दोन्ही अशाप्रकारे तल्लीन (मग्न) झाल्यानंतर, साधकाचा आत्मा 'मुशाहिदा' म्हणजेच परमेश्वराच्या विभूतीच्या दर्शनामध्ये तल्लीन होऊन जातो आणि तो साधक निर्विकार आणि अस्तित्व ज्ञानशून्य बनून प्रेयसीच्या प्रेमामध्ये आपले सर्वस्व समर्पित करून टाकतो. (प्रा. रामपूजन तिवारी, 'सूफ़ीमत : साधना और साहित्य', पृ. ३२८)

सूफ़ी मताचे सिद्धान्त मुळात शंकराचार्यांच्या अद्वैतवादासारखे आहेत. वेदांती आणि योगी यांच्याप्रमाणे ते पिंडातच ब्रह्मांडाची झलक पाहतात आणि निर्मळ आचरणाने शरीरास पवित्र करून शरीरामध्येच अद्वैतानुभूतीचा आनंद प्राप्त करतात. अशा प्रकारे सूफ़ी साधनेचे चरम लक्ष्य परमेश्वराशी 'एकरूप', 'एकमेक' होणे हे आहे. सर्वेश्वरवादी सूफ़ीच्या दृष्टिकोनातून ब्रह्म (हक़) सर्वत्र व्याप्त आहे आणि जीव (बंदा) त्याच्या सत्ते (ज़ात)चा अंश बनून त्यामध्येच शाश्वत जीवना (बक़ा)साठी इंद्रियजन्य बाह्य अस्तित्वास (नफ़्स) हरवून फ़ना म्हणजेच विलय होऊन जातो. सूफ़ींच्या धारणेनुसार आध्यात्मिक जीवन एक यात्रा (तरीक़ा) असते आणि साधक एक यात्रेकरू (सालिक) असतो. सूफ़ी-साधनेचे चार सोपान आहेत- १. शरियत (कर्मकांड), २. तरीक़त (उपासनाकांड), ३. मारिफ़त (ज्ञानकांड), आणि ४. हक़ीक़त (सिद्धावस्था).

शरीअतच्या विधीपालनामुळे साधकास साधनेचा आनंद प्राप्त होत नाही. तेव्हा तो आपल्या सद्‌गुरूच्या मार्गदर्शनामुळे परमप्रिय प्रेयसीच्या मीलनासाठी चित्तवृत्ती नियंत्रणाचे प्रशिक्षण घेतो आणि वियोगी बनून प्रेममार्गावर अग्रेसर होतो आणि शरीअतचा त्याग करून तरीक़तच्या क्षेत्रामध्ये पदार्पण करतो. येथे तो समस्त धर्मांचा त्याग करून पवित्रतेसह प्रेयसीच्या वियोग भावनेमध्ये झुरू लागतो. चित्तवृत्ती निरोधामुळे साधकामध्ये 'मुआरिफ़' अर्थात प्रज्ञेचा उदय होतो आणि तो आता सालिक म्हणजेच साधकपासून 'आरिफ़' म्हणजेच ब्रह्मज्ञानी, परमज्ञानी बनतो. या स्थितीमध्ये पोहोचल्यावर तो परमेश्वराच्या स्वरूपाचे चिंतन करीत वियोगासच आपले साध्य बनवतो. (निर्धारित करतो) आणि तो प्रेयसीमध्ये संपूर्णपणे लीन होऊन जाण्याच्या मारिफ़त (ज्ञानकांड) आणि हक़ीक़त (सिद्धावस्था)च्या क्षेत्रांमध्ये पोहोचतो.

या स्थितीमध्ये पोहोचल्यानंतर तो कर्मकांडाच्या (शरीअत) बंधनापासून मुक्त होतो. त्याला आता स्वतःहून काहीच प्रयत्न करावे लागत नाहीत. 'हक़ीक़त'मध्ये पदार्पण केल्यानंतर त्याला आपल्या मेहबूब (प्रेयसी)च्या जमाल (सौंदर्या)चे दीदार (दर्शन) होऊ लागते आणि तो हळूहळू त्या सौंदर्यावर मुग्ध होऊन वस्ल (मीलना)च्या क्षेत्रामध्ये दाखल होतो. नंतर शेवटी वस्लपासून फ़ना (निर्वाण, परमपद)च्या दशेपर्यंत पोहोचतो. त्याला या वेळेस या गोष्टीचे भान नसते की, तो आपल्या प्रेयसीहून भिन्न आहे. तो द्वंद्वापासून मुक्त होऊन 'अन-अल-हक़' (मी ईश्वर आहे) असे म्हणत ओरडू लागतो आणि अशाप्रकारे आपले अहं किंवा अस्तित्वाचे विसर्जन करून 'बक़ा'चा आनंद लुटतो. वास्तविक फ़ना आणि बक़ाच्या स्थितीमध्ये अत्यंत सूक्ष्म अंतर (भेद) आहे. परमेश्वराच्या दृष्टीमध्ये जे 'बक़ा' आहे तेच जीवाच्या दृष्टीमध्ये 'फ़ना' मानले जाते. या अंतिम स्थितीपर्यंत पोहोचण्यासाठी साधकास काही मजलां (मंज़िल)ची गरज असते. ते मजले असे आहेत- (१) नासूत (जागृतावस्था, नरलोक), (२) मलकूत (स्वप्नावस्था, देवलोक), (३) जबरूत (सुषुप्ति, ऐश्वर्यलोक) आणि (४) लाहूत (तुरीय अवस्था, माधुर्यलोक). काही सूफ़ींनी आणखी एक लोक हाहूत (तुरीयातीत अवस्था, सत्यलोक)ची पण कल्पना केली आहे. 'मोमिन अर्थात श्रद्धावंत शरीअतचे पालन करून नासूतमध्ये विहार करतो. मुरीद (शिष्य, संकल्पी) तरीक़चे सेवन करून मलकूत मध्ये विचरतो. सालिक मारिफ़तचे स्वागत करून जबरूत मध्ये विराम-विश्राम करतो आणि आरिफ़ हा हक़ीक़तचे चिंतन करून लाहूतमध्ये तल्लीन होऊन जातो. हीच (तर) सूफ़ींची पराकाष्ठा आहे आणि तसव्वुफ़ (सूफ़ी तत्त्वज्ञाना)ची परागती आहे.' (श्री. चंद्रबली पांड्ये, 'तसव्वुफ़ या सूफ़ीमत', पृ. ९४)

सुप्रसिद्ध पाश्चात्य सूफ़ी विद्वान निकलसनच्या मतानुसार सूफ़ींची कोणती तरी एक विशिष्टअशी साधनापद्धती नाही. ते विभिन्न पद्धतींच्या साहाय्याने ईश्वराच्या समीप पोहोचण्याचा प्रयत्न करतात. साधकास यात्रा सुरू करण्याअगोदर चित्तवृत्तीनिरोध करून अंतःकरण रूह (आत्मा)चा विकास केला पाहिजे. शुद्ध स्वानुभूतिमूलक मारिफ़तच्या ज्ञानास प्राप्त केले पाहिजे. ग्रांथिक ज्ञानाची येथे उपेक्षा असते. मरिफ़तच्या भावावेगमय रूपाचे नावच प्रेम आहे. याला प्राप्त करण्यासाठी प्रत्येक सूफ़ी व्यग्र असतो. आपल्या उद्दिष्टांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रत्येक साधकासाठी भावातिरकतेस ग्रहण करावे लागते आणि अंतःकरणास शुद्ध करण्यासाठी त्याला सात मुक़ामात म्हणजेच विश्रामस्थळे किंवा गंतव्यस्थळे पार करावी लागतात. ही सप्त विश्रामस्थळे किंवा गंतव्यस्थळे क्रमशः आहेत - (१) प्रायश्चित्त, (२) अकिंचनता, (३) संतोष, (४) अपरिग्रह,

(५) विश्रंभ, (६) धैर्य आणि (७) निरोध (आर. ए. निकलसन, 'मिस्टिक्स ऑफ इस्लाम'- पृ. ६९, ११२, ४५)

भारतीय दृष्टिकोनातून सूफ़ी मताची प्रेमसाधना, अद्वैतवाद आणि विशिष्टाद्वैत-वादप्रणीत प्रेममय भक्तीच आहे. वैष्णव भक्तीपासून सूफ़ींची केवळ कर्मकांड विहीनता आहे. त्यांचे उद्दिष्ट ज़िक्र म्हणजेच जप आणि तसव्वुफ़ अर्थात ईश्वरानुभूती आहे. तसे पाहता गूढवाद विठ्ठल संप्रदायाचे संत नामदेव यांच्या काव्यामध्ये आढळतो; परंतु त्यामध्ये भक्तीच्या बळावर ब्रह्मानुभूतीचा आनंद आणि उल्हास आहे. प्रेमाचा प्याला प्राशन करणाऱ्या, 'ख़ुमार'चे वर्णन नाही. सूफ़ीमतामध्ये अमूर्त ब्रह्मास व्यक्तित्व संपन्न गुणांनी युक्त करून निष्ठापरक मानसिक भक्तीमध्ये प्रेम आणि मादकतेची स्पष्ट व्यंजना आहे. सुप्रसिद्ध हिंदी साहित्यिक आणि विद्वान डॉ. रामकुमार वर्मा यांचे कथन यथार्थ वाटते. ''भक्तीमध्ये प्रेमाची मस्ती आणि मादकता सूफ़ीमतापासूनच आलेली आहे असे ज्ञात होते.'' (डॉ. रामकुमार वर्मा, 'अनुशीलन', पृ. १०१.)

सूफ़ी साहित्यामध्ये आत्मा-परमात्म्याच्या प्रेमाची व्यंजना प्रियकर (आशिक़) आणि प्रेयसी (माशूक़) स्वरूपात केली गेली आहे. आणि विरह-मिलनाची अनुभूती, प्रेमाची तळप आणि व्याकुळतेचे सजीव आणि मर्मस्पर्शी चित्रण सूफ़ी साहित्याची मधुर देणगी आहे. सूफ़ींची धारणा आहे की, जीवात्मा परमात्म्याच्या वियोगामध्ये व्याकुळ होऊन त्याच्याच प्राप्तीसाठी निरंतर सावधान, जागरूक आणि सचेष्ट असतो. सूफ़ींच्या महत्त्वपूर्ण अशा वियोगाच्या दशांचे सूफ़ियाना शैलीमध्ये चित्रण करताना पं० चंद्रबली पांड्ये यांनी म्हटले आहे की, ''जीवास आपल्या प्रेयसीचा पत्ता तिच्याच कृपेमुळे लागतो. तो केव्हा तरी तिच्या सोबत होता, तिच्याशी प्रतिज्ञाबद्ध झाला होता म्हणून तिला ओळखण्यामध्ये फार काही वेळ नाही लागला. तिची ओळख तर झाली, परंतु (प्रत्यक्ष) ती सापडली नाही. तिच्याच शोधात तर सूफ़ी निघाले आहेत. शोधत-शोधत जेव्हा ते थकून झोपून जातात तेव्हा त्यांची प्रेयसी हळूच त्यांच्याजवळ येते आणि संजीवन-रस शिंपडून त्यांना उठवते, सचेतन करते, परंतु त्यांना या उद्‌बोधनापासून समाधान लाभत नाही. त्यांचा विरह आणखीन तीव्र होतो. आगीस आहुती मिळते. मग तर जेथे कोठे त्यांची दृष्टी जाते, तेथे प्रेयसीचाच रंग दिसून येतो; परंतु तो रंगारी (प्रेयसी) त्यांच्या हाती लागत नाही. शेवटी कोणी तरी त्यांना सांगून चुकतो की जिच्यामागे तुम्ही जीव द्यायला आलात, तो इतरत्र नाहीच, तुमच्याच अंतःकरणामध्ये आहे. जेथे कोठे तुम्ही पाहता, त्याचीच झलक तेथे तुम्हास दिसून येते, परंतु तो नेहमी परोक्षच असतो; कारण जेव्हा तुम्ही नसता, तेव्हा ती होऊन जाते आणि जेव्हा ती होते तेव्हा तुम्ही नसता. ..... बस! अहंकार मिटला की (स्वतः) ईश्वरच बनून जाता.'' (श्री. चंद्रबली पांड्ये, 'तसव्वुफ़ अथवा सूफ़ी मत', पृ. १२२)

सूफ़ींच्या मानस-सागरामध्ये भलेही विविध भाव-भावनांच्या किती का लाटा उसळेनात, त्या येतील-जातील; परंतु सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत त्यांना प्रेम-सलिलमध्येच निमग्न राहावे लागते. त्यांच्या चारी बाजूस जिथपर्यंत त्यांची दृष्टी जाते (पोहोचते) तिथपर्यंत प्रेमाचा महासागर (पारावार) उसळताना त्यांना दिसून येतो. म्हणून साधक सर्वप्रकारचे जलावर्त, वात्याचक्र आणि विपरित जल-प्रवाहास साहसाने झेलत प्रेयसीच्या मार्गाकडे अग्रेसर होतो. तेथे त्याची प्रेयसी त्याच तीव्रतेने आणि व्याकुळतेने त्याची वाट पाहत असते. या दुर्लभ प्रेमाची प्राप्ती ही भगवंताच्या कृपेवरच अवलंबून असते. जोपर्यंत भगवंताची कृपा होत नाही तोपर्यंत

साधकाच्या अंत:करणामध्ये प्रेमाचे अंकुर फुटतच नाहीत. साधक लाख प्रयत्न करो, भगवतकृपेशिवाय प्रेम प्राप्त करणे अशक्य असते. सूफ़ींचे हे प्रेम, पूर्ण निष्काम भावयुक्त प्रेम, केवळ प्रेमासाठीच असते. त्याची एकमात्र लालसा प्रेयसीचे रूप सुधा-पानाशिवाय काहीच नसते. प्रेमासाठीच प्रेम करणे हा सूफ़ी साधनेचा आदर्श आहे. सूफ़ींच्या प्रेमाचा आदर्श हा कोणत्याच प्रकारच्या पारिश्रामिकाचा गरजवंत नसतो. विशुद्ध आत्मा परमेश्वराचीच प्रतिछबी आहे. म्हणून त्याला प्रेम करण्याचा अधिकार बहाल करून परमेश्वर जणू स्वत:सच अधिकार देतो. सूफ़ी साधक बायज़ीद बिस्तामीने म्हटले पण आहे की, ''मला वाटत होते की मीच परमेश्वरावर प्रेम करतो, परंतु विचार केल्यावर मला असे आढळले की, मी प्रेम करण्याअगोदरपासूनच तो माझ्यावर प्रेम करत होता.'' याच मताशी समांतर मत नोंदवताना फ़ारसी तत्त्वज्ञ आचार्य जामी यांनी म्हटले आहे, ''मी तोच आहे ज्याच्यावर मी प्रेम करतो आणि ज्याच्यावर प्रेम करतो तो मीच आहे. एकाच शरीरामध्ये निवास करणारे आम्ही दोन आत्मे आहोत. जर तू मला पाहतोस तर तू त्याला पाहतोस आणि जर तू त्याला पाहत असशील तर तू आम्हा दोघांना पाहत असतोस.'' (प्रा. रामपूजन तिवारी, 'सूफ़ीमत : साधना और साहित्य', पृ. ३१६) मानवीय सीमित प्रेमाचा विस्तार होत-होत आपल्या विराटतेमध्ये ब्रह्मांडास घेरून टाकतो आणि मग तेव्हा साधक सर्वत्र ब्रह्मास व्याप्त समजून त्याच्याकडे आत्म्याच्या पारस्परिक प्रणय-लीलेचे दर्शन करू लागतो. अशा प्रकारे सूफ़ींच्या सौंदर्य-बोधाच्या सीमित परीघाचे पर्यवसान शेवटी अनंत सौंदर्याच्या असीम भाव-भूमीपर्यंत होऊन जाते.

**६) भक्तीमध्ये प्रेम :** भक्तीमध्ये प्रेमाचा समावेश होणे हे स्वभावत: सिद्ध आहे. भक्तीची व्याख्या करताना देवर्षी नारद यांनी तिला 'परम प्रेम रूपा' आणि 'अमृत स्वरूपा' असे म्हटले आहे. अर्थात ज्ञान, कर्म, योग आदि साधनांच्या आश्रयाविना आणि संपूर्णपणे स्पृहाशून्य बनून चित्तवृत्तीचे अनन्य भावाने केवळ भगवंतामध्ये लागून जाणे भक्ती आहे. भगवंतामधील अनन्य प्रेमच वास्तविक अमृत आहे. ते सर्वांहून मधुर आहे आणि ज्याला हे प्रेमामृत प्राप्त होते तो त्याचे प्राशन करून अमर बनून जातो. संतांनी त्या अलभ्य प्रेम-रसाचे आकंठ प्राशन केले होते आणि या रसाविषयी पण काय म्हणावे? ज्याचा 'खुमार' (नशा, मद) कधीच समाप्त होत नाही.

नारदांनी पण म्हटले आहे, भगवंतावर अनन्य प्रेम असणेच भक्ती आहे. ती अमृतस्वरूपा आहे. हिला प्राप्त करून मनुष्य सिद्ध बनून जातो, अमर होऊन जातो आणि तृप्त होऊन जातो. प्रेमस्वरूपा भक्ती प्राप्त झाल्यानंतर मनुष्यास इतर कोणतीच वस्तू प्राप्त करण्याची इच्छा राहत नाही. प्रेमाचे स्वरूप अनिर्वचनीय आहे. मुक्याच्या स्वादाप्रमाणे प्रेमाच्या स्वादास तो फक्त सांकेतिक पद्धतीने थोडेसे (किंचित) व्यक्त करू शकतो. प्रेमरसाच्या गोडव्याचा तो (भक्त) मनातल्या मनात अनुभव करूनसुद्धा मूक व्यक्तीसारखा तिला अभिव्यक्त करण्यामध्ये स्वत:स असमर्थ जाणतो. नारदांनी अशा प्रेमास प्रतिक्षण वृद्धिंगत होणारा, कल्पनारहित (निष्काम), विच्छेदरहित, सूक्ष्माहून सूक्ष्मतर आणि अनुभवस्वरूप म्हटले आहे. प्रेमामध्ये कोठेच अंत नसतो. प्रियकर निरंतर स्वत:मध्ये प्रेम कमी असल्याचा अनुभव करीत असतो. त्याचा प्रत्येक स्वाभाविक प्रयत्न प्रेमास वृद्धिंगत करण्याचा असतो. या विच्छेदरहित प्रेमाच्या सतत वृद्धीचा क्रम कधीच तुटत नाही. ते अंत:करणाच्या गुप्त गुहेमध्ये विराजमान असल्याकारणाने सूक्ष्माहून सूक्ष्मतर असते आणि फक्त अनुभवामध्येच सामावते. या प्रेमास

प्राप्त करून प्रियकर प्रेमासच पाहतो, प्रेमासच ऐकतो, प्रेमाचेच वर्णन आणि प्रेमाचेच चिंतन करतो. (नारद भक्ती सूत्र-५५.) अशाप्रकारे परम प्रेमाच्या दिव्यरसामध्ये आकंठ बुडलेला प्रेमानंदमय प्रियकर सर्वत्र आपल्या प्रेमपूर्ण रसमय प्रेयसीसच पाहतो.

भगवंताशी असलेल्या शांत, दास्य, सख्य, वात्सल्य आणि दांपत्य या संबंधापैकी शेवटच्या (दांपत्य) संबंधाला विशेष मनोरम आणि महत्त्वपूर्ण मानले गेले आहे. याला कांतारती किंवा मधुरभावाची उपासना या नावाने पण ओळखले जाते. पं. चंद्रबली पांड्येंनीपण या मताची पुष्टी करताना म्हटले आहे की, उपासनेमध्ये जेवढे भाव असतात, त्या सर्वांचा एकमात्र स्रोत रतीच असते. (पं. चंद्रबली पांड्ये, 'तसव्वुफ़ अथवा सूफ़ीमत', पृ. ११४) भक्तीच्या क्षेत्रामध्ये केवळ एकच स्थायी भाव स्वीकारला गेला आहे- भगवद्विषयक रती (प्रेम). यास उपरोक्त संबंधाच्या आधारे पाच प्रकारांमध्ये व्यक्त केले आहे - शांता, प्रीता, प्रेयसी, अनुकंपा आणि कांता. जड (भौतिक) जगाचा विषय असल्याकारणाने यांपैकी शांतारती सर्वश्रेष्ठ आहे आणि शेवटची रती कांताविषयक असून श्रृंगार नाव ग्रहण केल्यामुळे सर्वात निकृष्ट मानली गेली आहे; परंतु छाया दर्पण याच्या आधारे जी वस्तू वर असते, ती खाली पडून जाते आणि जी खाली असते, ती वर दिसते. तंतोतंत हीच अवस्था रतीची झाली आहे. भौतिक (जड) जगामध्ये जी (वस्तू) सर्वात खाली आहे, तीच भगवद्विषयक झाल्यानंतर सर्वात वरची होऊन जाते. याच कारणामुळे जड जगामध्ये निकृष्टअसलेले श्रृंगार रस, वास्तविक भगवद्विषयक श्रृंगार झाल्यानंतर मधुर रस बनून जाते. (डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, 'मध्यकालीन धर्मसाधना', पृ. २५२-५३) जडविषयक अनुरागास 'काम' म्हणतात, तर भगवद्विषयक अनुरागास 'प्रेम' असे म्हणतात. श्री. रूप गोस्वामी यांनी आपले प्रसिद्ध ग्रंथ 'भक्तिरसामृतसिंधु'मध्ये प्रेमाची स्वतंत्र ओळख सांगताना म्हटले आहे की, ज्या भावाद्वारे आमचा अंतरात्मा स्निग्ध, कोमल आणि निर्मळ बनतो आणि ज्याच्यावर ममत्वाची गहन छाप पण बसलेली असेल, तर त्याच्याच प्रगाढ रूपास प्रेम या नावाने ओळखले जाते.

प्रेमास भक्तीचे चरमोत्कर्ष रूप सिद्ध करत 'चैतन्य-चरितामृत'च्या लेखकाने पण म्हटले आहे की, ''भक्तीच्या साधनेच्या अभ्यासाद्वारे रती अथवा अनुरागाचा भाव उदय पावतो. हेच सघन बनल्यानंतर 'प्रेम' या नावाने ओळखले जाते. 'उज्वल नील-मणी'च्या मतानुसार ज्याप्रमाणे बीज क्रमशः ऊस, रस, गुळ, खडीसाखर, साखर यांमध्ये परिणत होऊन अधिक निर्मळ आणि स्वादमय बनते त्याचप्रमाणे रतीचा भाव पण क्रमश: परिपक्व बनत स्नेह, मान, प्रणय, राग, अनुराग आणि भाव यामध्ये पर्यवसित होऊन जातो. ------- विश्वात्मरूप ईश्वराकडे केंद्रित असल्यामुळे हे विश्व-प्रेमाचे पण रूप ग्रहण करून घेते आणि असा प्रियकर स्वभावत: निर्वैरी आणि निष्काम बनून जातो.'' (पं. परशुराम चतुर्वेदी, 'मध्यकालीन प्रेम साधना', पृ. १८०) प्रेमाच्या क्षेत्रामध्ये वियोगाचे आपले एक विशेष स्थान असते; कारण याच स्थितीमध्ये (अवस्थेमध्ये) तर 'प्रेमराशी भवन्ति' सारखी स्थिती येते. (निर्माण होते.) नारदांनी तर भगवंताचे अल्पसे विस्मरण झाल्यावर परम व्याकुळ होण्यासच भक्ती मानले आहे. (नारद भक्ती सूत्र, १९)

सूफ़ींच्या मतानुसार प्रेयसी (परमेश्वर) सर्वांच्या अंत:करणामध्ये समान भावाने व्याप्त असते, परंतु तिच्याशी भेट होऊ लागली नाही-पृथ्वी आणि आकाश सुरुवातीस एकजूट होते. कळत नाही की यांना वेगळे का म्हणून करण्यात आले. आज पण त्या वियोगाच्या व्याकुळ वेदनेमुळे संपूर्ण निसर्ग घायाळ आहे. प्रेमाचा

फार मोठा गरिमा आणि महिमा आहे. प्रेमाचा समुद्र एवढा अथांग आहे, ज्याला कोणतेच आर-पार नाही. त्याच्या खोलीचा कोणी अंदाज घेऊ शकत नाही. जो कोणी या प्रेमाच्या समुद्रामध्ये पडतो तो श्रेष्ठ शुभ्र हंसासारखा शुद्धात्मा बनून जातो आणि तोच त्याला पार करू शकतो. म्हणूनच म्हटले गेले आहे की, मनुष्य प्रेमामुळेच स्वर्गलाभ करतो. नाहीतर तो एक मूठभर मातीच आहे. प्रेमामध्येच विरह आणि रस आहे, मधू आणि अमृत आहे. म्हणूनच देवर्षी नारदांनी 'परमप्रेमरूपा अमृत स्वरूपा' भक्तीस प्राप्त करणाराकरिता म्हटले आहे, ''यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो भवति, अमृतो भवति, तृप्तो भवति।'' (नारद भक्तीसूत्र - ४)

**७) प्रेम आणि भक्ती तुलना :** प्रेम प्रियकरास भस्म करते, तर भक्ती प्रेयसीस भस्म करते. प्रेम प्रेयसीच्या सुखाची कामना करते. भक्ती प्रेयसीपासून आशीर्वादाची अपेक्षा ठेवते. प्रेम प्रेयसीचे ओझे आपल्या खांद्यावर घेण्याची आकांक्षा करते, तर भक्ती प्रेयसीवर आपला भार टाकते. प्रेम प्रदान करते, तर भक्ती याचना करते. प्रेम भव्य, उदात्त आणि मूक असते. ते बाह्य अभिव्यक्तिशून्य असते. भक्ती स्वत:चे बाह्य आविष्करण करते. प्रेमास, प्रेम करण्यासाठी प्रेमास्पद प्रेयसीच्या उपस्थितीची गरज नसते. प्रेयसीसाठी आपले प्रेम व्यक्त करण्याकरिता भक्तीस प्रेयसीच्या उपस्थितीची गरज असते. [Meher Baca - 'The Path of Love', पृ. १०६-१०७.]

**८) प्रेमाची अनुभूती आणि सीमा :** डॉ. हज़ारीप्रसाद द्विवेदी यांनी म्हटले आहे की, ''आत्मा ज्या रसाचा अनुभव करतो, तोच सर्वश्रेष्ठ भक्ती-रस आहे. नाना स्वभावाचे भक्त नाना प्रकारे याचे आस्वादन करतात. मधुररस त्याचेच सर्वश्रेष्ठ स्वरूप आहे.'' (डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी, 'मध्यकालीन धर्म साधना', पृ. २५६) या रसाची अनुभूती अभिव्यक्त्यातीत आहे. हे गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांनी अत्यंत रोचक पद्धतीने सांगितले आहे. जेव्हा आपण सुंदरहून सुंदर कवितेच्या रसाची चिरफाड करतो तेव्हा ती कविता काही असंगत शब्दांचे समूहच वाटते. जे हिच्या रसास ओळखतात तेच या शब्दमाळेला ओवणाऱ्या सूयांचे महत्त्व जाणतात. देवर्षी नारद यांनी अत्यंत विचारपूर्वक प्रेमाचे स्वरूप विशद करताना त्यास 'मूकास्वादनवत्' आणि 'अनिर्वचनीय' म्हटले आहे. या सृष्टीचा मूळ आधार प्रेमच आहे. अवघा संसार प्रेमाच्या बंधनामध्ये बांधला गेला आहे. असा कोण आहे बरे जो प्रेमबाणाने घायाळ झाला नसेल आणि (प्रेम) वेडा बनून चरख्याप्रमाणे चक्राकार फिरला नसेल?

त्रिभुवनामध्ये प्रेमाशिवाय इतर कोणतीच सुंदर वस्तू नाही. प्रेमाचीच ही अप्रतिम विशेषता आहे की याचा खेळ कोणत्याही प्रकारे खेळला तरी यामध्ये पराजय किंवा हानीची शक्यताच नसते. जसे तीळ फुलांसोबत पेरले गेल्यानंतरसुद्धा सुगंधित तेलाच्या रूपाने प्रकट होतो, वियोगाच्या अग्नीमध्ये जळताना जे प्रेमामृताचा स्वाद प्राप्त करतात, ते मृत्यूच्या असह्य यंत्रणेस पण हसत-खेळत सहन करण्यासाठी सदैव तयार असतात.

सत्यद्रष्टा महान लेखक खलील जिब्रान याने आपला प्रसिद्ध ग्रंथ 'दि प्रॉफेट'मध्ये प्रेमाच्या 'वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि' स्वरूपावर प्रकाश टाकताना म्हटले आहे की, ''प्रेम ज्याप्रमाणे तुम्हास मुकुट घालते, त्याचप्रमाणे सुळावर पण चढवेल. ज्याप्रमाणे ते तुमच्या विकासासाठी आहे, तसेच तुमची काट-छाट करण्यासाठीपण आहे. ज्याप्रमाणे ते तुमच्या उंचीपर्यंत चढून सूर्याच्या किरणांमध्ये कंपन पावणाऱ्या तुमच्या कोमलतम अंकुराची देखरेख करते, त्याचप्रमाणे ते तुमच्या नीचतम अवस्थेपर्यंत उतरून, जमिनीमध्ये फार

खोलवर गाडले गेलेल्या असलेल्या तुमच्या मुळास झटकून टाकते. भुईमुगाच्या टरफलाप्रमाणे ते तुम्हास आपल्या आतमध्ये सामावून घेते, तुम्हास नागडे करण्यासाठी कुटते, (फोडते), गव्हाचा भुसा दूर करण्यासाठी तुमची चाळणी करते, तुम्हास दळून पीठ बनवते. मऊ बनेपर्यंत तुम्हास मळते, आणि मग तुम्हास पवित्र अग्नीवर शेकते की जेणेकरून तुम्ही प्रभूच्या पावन थाळीसाठी पवित्र भाकर (चपाती) बनून जावे. प्रेम तुमच्याशी या सर्व लीला यासाठी करते की तुम्हास आपल्या अंतरात्म्याचे गूज ओळखता यावे आणि त्याच ज्ञानाच्या आधारे जगजीवनाच्या हृदयाचे एक अंग बनून जावे.'' (खलील जिब्रान, 'दि प्रोफेट', पृ. २१-२२) या प्रेमापासून एक असा अनुपम गोडवा निर्माण होतो की, त्याच्यापुढे भौतिक सौंदर्याचे बाह्यप्रेम आंतरिक (आध्यात्मिक) सौंदर्याच्या प्रेमात परिवर्तित होऊन जावे.

'इश्क़ मजाज़ी' (भौतिक प्रेम)चे पर्यवसान 'इश्क़ हक़ीक़ी' (आध्यात्मिक प्रेम)मध्ये झाल्यावर साधक अंतर्जगताच्या भाव-भूमिवर पोहोचून ईश्वरीय सौंदर्याची झलक पाहू लागतो, आणि तल्लीनावस्थेमध्ये प्रियकर स्वत: प्रेमरूप बनून जातो. फ़ारसी तत्त्वज्ञ कवी अब्दुर्रहमान जामी यांनी हे मजले-टप्पे पार केले होते. म्हणूनच त्यांनी लिहिले आहे की, माझ्या हृदयरूपी सतारीवर प्रेमाने एक असा राग आळवला की ज्याच्या परिणामास्वरूप मी आपाद-मस्तक प्रेम आणि प्रेमातच बुडून गेलो आहे. प्रेममार्गाच्या असिधाराव्रताचा उल्लेख करत सुप्रसिद्ध हिंदी प्रेमाख्यान कवी मलिक मुहम्मद जायसीने पण म्हटले आहे - ''प्रेमाच्या स्वादाचा अनुभव त्यालाच येतो ज्याने आपल्या मस्तकास शरीरापासून वेगळे केलेले असते. प्रेमाच्या उत्तुंग शिखराकडे पायाने चालून जाता येत नाही, त्यासाठी डोक्याने चालून त्याच्या बळावरच पोहोचावे लागते. हा वास्तविक सुळाचा मार्ग आहे. यावर एक तर चोर चढू शकतो किंवा हुतात्मा मन्सूर.'' (आचार्य रामचंद्र शुक्ल, 'जायसी ग्रंथावली', पृ. ५८.)

ज्याप्रमाणे पाण्याचे थेंब समुद्रामध्ये मिसळल्यानंतर शोधल्यावरसुद्धा त्याचा पत्ता लागू शकत नाही त्याचप्रमाणे प्रियकर आत्मविस्मृत होऊन प्रेमामध्ये एकजीव होऊन जातो. प्रियकर आणि प्रेयसीमध्ये पूर्णैक्य भाव निर्माण होतो. कवी जायसीने प्रेमास एक नित्य, सुंदर, एकरस आणि ऐकांतिक आनंदप्रद वस्तू मानले आहे. प्रेमाची मनोवृत्ती इतकी तीव्र स्वरूपाची असते की, त्यामुळे प्रियकराचे संपूर्ण जीवन एकनिष्ठतेच्या साच्यामध्ये ढळले जाते आणि अष्टौप्रहर तो प्रेमाच्या नशेमध्ये चूर असतो. प्रेमाचा पेला प्राशन करताच त्याच्या साऱ्या जीवनाचा कायापालट होतो. शेवटी कवींद्र रवींद्रनाथ ठाकूर यांचे प्रेमसाधनाविषयक काही विचार मांडणे अप्रस्तुत ठरणार नाही.

''आमच्या आत्म्याचा विश्वात्म्याशी वियोग झाला आहे; परंतु ही ताटातूट प्रेमाची ताटातूट आहे. म्हणून आमच्या आत्म्यामध्ये ती शक्ती असते की जी असत्य, दु:ख आणि पापावर विजय प्राप्त करते आणि यांना नवीन शक्ती आणि सौंदर्यपूर्ण स्वरूपांमध्ये बदलत असते.

अस्तित्वमय प्रत्येक वस्तूचे प्रयोजन प्रेमामध्येच पूर्ण होते. म्हणून प्रेम केवळ भावना नव्हे, हे सत्य आहे. हा तो आनंद आहे जो प्रत्येक वस्तूच्या निर्मितीचा मूळ स्रोत आहे. हे पूर्ण चेतनेचे ते स्वच्छ श्वेतकिरण आहेत, जे ब्रह्मापासून निर्माण झालेले आहेत. आपल्या चेतनेची उंची प्रेमाच्या उंच स्तरापर्यंत वाढवून आणि समस्त

विश्वभर याच प्रेमाप्त चेतनेचा विस्तार करूनच आम्ही ब्रह्मविहार किंवा असीम आनंदामध्ये एकात्मकता प्राप्त करू शकतो.

प्रेमामध्ये जीवनाच्या सर्व विरोधी शक्ती स्वत:स नष्ट करून एक होऊन जातात. केवळ प्रेमच एक असे क्षेत्र आहे जेथे एकत्व आणि द्वित्व म्हणजेच अद्वैत आणि द्वैत विरोधस्वरूप नसतात. प्रेम स्वत: एकाच वेळेस अनेक आणि एक स्वरूपात असते. प्रेम ही भगवंताना हलवणारी शक्ती आहे.

सृष्टीच्या या आश्चर्यकारक उत्सवामध्ये आत्मदानाच्या या ईश्वरीय महायज्ञामध्ये प्रियकरास नेहमी आत्माहुति द्यावी लागते. या आत्मदहनामुळेच तो प्रेम प्राप्त करतो. प्रेमच हा असा यज्ञ आहे की ज्यामध्ये आदान आणि प्रदान इतक्या समवायी तऱ्हेने संबद्ध असतात, प्रेमामध्ये ससीम आणि असीम एक होऊन जातात. आनंदाची प्रचिती तेव्हाच होते जेव्हा आम्ही आपल्या आत्म्याचा संसाराशी (जगाशी) आणि संसाराच्या (जगाच्या) आत्म्याचा विराटाच्या आत्म्याशी एकत्व अनुभव करतो.'' (रवींद्रनाथ ठाकूर, अनुवादक : सत्यकाम विद्यालंकार, 'साधना', पृ. ८४, ८६, ९२, ९४)

**९) सूफ़ींची प्रेम-पद्धती :** पूर्ववर्ती विवेचनानुसार, चित्ताची एक वासनात्मक वृत्ती रती असते. ही रतीच भिन्न-भिन्न संबंधानुसार प्रेमाचे रूप धारण करते. प्रेमाचे सूत्रपात स्थूल लौकिक माध्यमापासून हळू हळू सूक्ष्माति-सूक्ष्मतर आध्यात्मिक स्तरांमधून जात-जात सूक्ष्मतम परमेश्वराकडे उन्मुख होते. सूफ़ींची प्रेमपद्धती अशाच प्रकारची असते. त्यांच्या अनुसार विश्व-प्रेम पण परमात्मा प्रेमाचेच रूप आहे, कारण त्या अनंत सौंदर्यशालीने आपले सौंदर्य आणि प्रेम निसर्गाच्या कणा-कणामध्ये विखुरलेले आहे. सर्वत्र त्याच्या प्रेमाचा महासमुद्र उसळी घेत आहे. त्यामध्ये निमग्न होऊनच सच्च्या आनंदाची उपलब्धी होऊ शकते; परंतु त्या उपलब्धीमध्ये सांसारिक संबंध आणि आसक्ती अडथळे निर्माण करतात आणि जीव, आत्म्यास पथभ्रष्ट करून त्या अमृत तत्त्वापासून वंचित करतात. अशा स्थितीमध्ये साधकाच्या मनामध्ये प्रभूप्रती परम विरहाची व्याकुळता उत्पन्न होते. सूफ़ी 'प्रेमास' भगवंताचे रूप मानतात.

**१०) प्रेम-सम्राटाची चार सिंहासने :** प्रेम सम्राटाची चार सिंहासने आहेत. १. लाहूत (सत्यलोक), २. जबरूत (तप:लोक), ३. मलकूत (देवलोक) आणि ४. नासूत (भुव:लोक). लाहूतचा अभिप्राय सिर्र (मर्म) म्हणजेच नूर (प्रकाशा)शी आहे. जबरूतचा अभिप्राय रूह (आत्मा)शी आहे. मलकूतशी दिल (चित्त वा अंत:करणा)चा आहे, तर नासूतचा अभिप्राय शरीराशी आहे. म्हणून शरीर हे अंत:करणाच्या सेवेमध्ये असते, आणि अंत:करण प्रेमामध्ये आत्म्याच्या सेवेत असते, आणि आत्मा सान्निध्यामध्ये मर्माच्या सेवेत असतो आणि मर्म हे परमेश्वराशी ऐक्यामध्ये तत्पर असते. अनेकतेविहीन असलेले एकत्व अति विशिष्ट साधकांचा टप्पा असतो, तर अनेकतेमध्ये एकता असलेला टप्पा हा विशिष्टांचा असतो आणि एकताविहीन अनेकता ही सर्वसाधारण लोकांची मजल असते. अतएव अतिविशिष्ट साधकांची मजल ही परम शांतीची असते; तर विशिष्टांची आश्चर्यकारकतेची असते आणि सर्वसाधारण मूर्खतेमध्येच समाधानी असतात. इल्मुलयक़ीन म्हणजेच ज्ञानजन्य निश्चिती ही ज्ञानसाधकांची असते. ऐनुलयक़ीन अर्थात चर्मचक्षू निश्चिती ही मध्यम अवस्थेच्या साधकांची असते, तर हक़्क़ुलयकीन म्हणजेच निर्भेळ सत्याची निश्चिती ही परमैक्य ईशप्रेमी साधकांची असते, आणि परमैक्यांना मृत्यू नसतो, कारण ते ईश्वरासोबत जिवंत असतात.

थोडक्यात सूफ़ीसाठी प्रेम हेच कर्म, प्रेम हाच धर्म आणि प्रेम हेच त्यांचे मर्म आहे. सूफ़ींचे तत्त्वज्ञान म्हणजे साक्षात 'प्रेममंदिर'! सौंदर्यापासून प्रेम आणि प्रेमापासून मुक्ती–मोक्ष, हेच सूफ़ीवादाच्या सिद्धान्ताचे सार!

प्रेमाच्या विव्हलतेचा एक क्षण, मग तो भौतिकच का असेना, हा सहस्रवर्षांच्या उपासनेबरोबरचा असतो. जे सच्चे प्रेमी असतात त्यांनाच याची जाण असते. त्यांनाच प्रेमाची चव कळते. प्रेम किती उदात्त (वस्तू) आहे! कारण प्रेमाशिवाय सर्वकाही उजाड आहे. याची सार्थकता एका कवीच्या पुढील कडव्यात दिसून येते –

*जिस दिलमें कि इश्क़ की बुनियाद न हो*
*गर खान–ए–खुदा हो तो आबाद न हो।।*

म्हणजेच ज्या अंत:करणामध्ये प्रेमाचा पाया नसेल, ते अंत:करण भरभराटीस येत नाही. ते संपन्न असत नाही, मग ते ईश्वराचे प्रार्थनास्थळ का असेना!

## ६) सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य, तत्त्वज्ञ कवी आणि सूफ़ी साधक यांचे प्रेमाविषयी दृष्टिकोन

### १) प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरी यांचा प्रेमाविषयी दृष्टिकोन –

प्रेषित मुहम्मद[स.] म्हणाले, मी जिब्राईलला म्हणताना ऐकले की, ईश्वर म्हणाला, ''जो माझ्या कोणत्याही मित्रांचा (वलींचा/संतांचा) तिरस्कार करतो, तो माझ्याविरुद्ध युद्ध जाहीर करतो. माझा श्रद्धाळू सेवक ज्याला मृत्यू आवडत नाही– त्याचा आत्मा काढायला मी अडखळतो. त्याला इजा पोहोचवणे मला आवडत नाही, परंतु त्याची त्यापासून सुटका नाही. मी ज्याची सक्ती केली आहे, ती कार्ये करून माझ्या कृपेची अभिलाषा धरणाऱ्यांपेक्षा असे काही साधन नसताना जेव्हा माझी अभिलाषा केली जाते, ती मला अधिक आनंददायी वाटते. माझी कृपा लाभण्यासाठी माझा सेवक सातत्याने सक्तीच्या व्यतिरिक्त प्रार्थना करतो जोपर्यंत मी त्याच्यावर प्रेम करत नाही; जेव्हा मी त्याच्यावर प्रेम करतो तेव्हा त्याचे कान बनतो, डोळे बनतो, त्याचे हात बनतो व त्याला मदत करणारा बनतो.

मुहब्बत (प्रेम) हा शब्द 'हिब्बत'पासून निर्माण झाला आहे. वाळवंटात ज्या बिया पडतात, त्यांना हिब्बत अथवा 'हुब्ब' असेही म्हणतात. हुब्ब म्हणजे प्रेमजीवनाचा स्रोत. बी जसे वृक्षाचा स्रोत असते, बियांवर जशी ऊन, पाऊस, थंडीची भिन्नप्रकारची प्रक्रिया होऊन बी आपले उगवणे, रोप होणे, फुलणे, फळ देणे सोडत नाही, तसेच प्रेमाचे असते. प्रेम हृदयात उगवते. तेव्हा उपस्थितीने, अनुपस्थितीने, आनंदाने, दु:खाने, विभक्त होण्याने–मीलनाने कशानेच ते दूषित होत नाही. इतर व्युत्पत्तिशास्त्रज्ञांच्या मतान्वये–मुहब्बत 'हब्ब' पासून निर्माण झाला. हब्ब म्हणजे स्थिर पाण्याने भरलेला खुजा (चंबू, सुरई) आहे. अशा पुरेपूर भरलेल्या खुज्यात ज्याप्रमाणे थोडी जागाही शिल्लक नसते, तसेच ज्याचे प्रेम हृदयात भरल्यानंतर दुसऱ्या कुणाच्या प्रेमाची शक्यताच नसते. शिबलींच्या मते, ''प्रेयसीशिवाय अन्य कुणाचा मागमूसही प्रेम हृदयात शिल्लक ठेवत नाही.'' डोळे आणि हृदय प्रेमात स्पर्धक असतात व एकमेकांचा हेवादावा करतात.

*माझ्या हृदयाला हेवा वाटतो डोळ्यांचा,*
*त्यांच्या पाहण्याच्या आनंदामुळे*
*आणि डोळे हेवा करतात हृदयाचा,*
*त्याच्या ध्यानाच्या आनंदामुळे!*

माणसामाणसांमध्ये असलेले प्रेम आणि माणसाला ईश्वरासंबंधी वाटणारे प्रेम यात फरक असतो. ईश्वरावरचे प्रेम म्हणजे त्याचे आकलन आणि ते साध्य करण्याचा प्रयत्न करणे आहे. माणसामाणसांमधील प्रेम हे शारीरिक आहे. प्रेमाचे दोन प्रकार आहेत – (१) दोन समानांमधील (श्रेष्ठता-कनिष्ठता श्रेणीप्रमाणे) (२) दोन असामानांमधील. पहिल्या प्रकारातील प्रेम वासनेच्या इच्छेने उद्दीपित होऊन प्रेयसीशी (जी साध्य आहे) समागम करून फलद्रूप होते. दुसरे असमानांमधील असते. त्यात उच्च दर्जाच्या साध्याच्या, गुणवैशिष्ट्यांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न केलेला असतो. काही न बोलता ऐकले जाते आणि डोळ्यांशिवाय पाहिले जाते.

ईश्वरावर प्रेम करण्याचे दोन मार्ग आहेत – (१) ईश्वराच्या कृपेसाठी व त्याच्यापासून होणाऱ्या फायद्यासाठी लोक ईश्वरावर प्रेम करतात. (२) दुसऱ्या मार्गावरील साधक ईश्वरापासून मिळणाऱ्या फायद्यांना पडदा समजतात. या दुसऱ्या पथावरील लोक पहिल्या पथावरील लोकांपेक्षा अधिक श्रेष्ठ असतात. सुमनून अल् मुहिब्ब यांच्या मते, सर्व अवस्थांमध्ये व स्थानकांमध्ये प्रेम अनिवार्य असते. साधक प्रत्येक अवस्थेत विलय करत जातो; केवळ प्रेमाचा विलय होत नाही. सुमनून यांच्या मताशी सर्व सूफ़ी सहमत आहेत, पण दैवी प्रेम ते लपवून ठेवू इच्छितात. या प्रेमाला त्यांनी 'शुद्धता' हे नाव दिले. प्रियकराला सूफ़ी म्हटले. प्रियकराची इच्छा प्रेयसीच्या (ईश्वराच्या) इच्छेत विलीन करण्यास निष्कांचनता वा निरासक्ती हे नाव दिले. प्रियकराला 'फ़क़ीर' (निरासक्त) हे आणखी एक नाव दिले.

अम्र बिन उस्मान मक्की या थोर सूफ़ींनी 'किताब-ए-मुहब्बत' हे पुस्तक लिहिले. ते विश्लेषण करतात की, शरीर बनवण्याच्या सात हज़ार वर्षांपूर्वी ईश्वराने दिल तयार केले. त्याला त्याच्या जवळच्या स्थानकात त्याने स्थान दिले. 'दिल'च्या अगोदर सात हज़ार वर्षे ईश्वराने 'जान' तयार केली. तिलाही त्याने जवळचे स्थान दिले. जानच्या अगोदर सात हजार वर्षे हृदये तयार केली. त्यांना मात्र त्याच्याशी जुळवून ठेवलीत. प्रत्येक दिवशी तीनशेसाठ वेळा ईश्वराने आपल्या सौंदर्याचे दर्शन या हृदयांना दिले आणि तीनशेसाठ वेळा रोज आपले कृपाकटाक्ष हृदयांवर टाकले. 'जान'ला प्रेमाचा शब्द ऐकवला. आपल्या जवळीकीची मेहेरबानी तीनशेसाठ वेळा 'दिल'ला बहाल केली. हे सर्व झाल्यावर त्यांना भौतिक जगत दाखवण्यात आले, तेव्हा त्यांच्यासारखा त्यांना कुणीच न आढळल्याने त्यांना गर्व झाला. म्हणून हृदयाला ईश्वराने 'जान'मध्ये बंदिस्त केले. जानला दिलमध्ये आणि दिलला शरीरामध्ये बंदिस्त केले. 'अक़्ल'ला ईश्वराने त्यांच्यात मिसळवले.

काही सूफ़ी म्हणतात, ईश्वराप्रति खूप प्रेम करण्यास परवानगी असते, तर काहींच्या मते नसते. माणूस ईश्वरापासून तुटतो, ईश्वर माणसापासून तुटत नाही, म्हणून माणूस ईश्वरावर अतिप्रेम करू शकतो. (डॉ. अलीम वकील, 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी', पृ. २३५-२३७)

**२) प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ कवी जलालुद्दीन रूमी प्रणीत प्रेममहिमा –**

मौलाना जलालुद्दीन मुहम्मद बल्खी रूमी यांचा जन्म ३० सप्टेंबर १२०७ मध्ये बल्ख येथे झाला. त्यांना 'खुदावंदगार' पण म्हणत. एका परंपरेनुसार त्यांना अबू बक्र यांचे वंशज मानले जाते; तर दुसऱ्या परंपरेनुसार त्यांना हजरत अली यांचे वंशज मानले जाते. त्यांच्या वडलांचे नाव मुहम्मद बहाउद्दीन होते. त्यांचे नाव फ़ारसी कवी आणि सूफ़ी साधकांमध्ये मोठ्या आदराने घेतले जाते. मौलाना रूमी कवी तर होतेच, पण कवीपेक्षा साधक अधिक होते. त्यांनी फ़ारसी भाषेमध्ये आपली सुप्रसिद्ध 'मसनवी' (कथा-काव्य) लिहिली. त्यांच्या

'मसनवी'स फ़ारसी भाषेमधील 'कुरआन' म्हणून मानले जाते. रूमीच्या 'मसनवी'स मसनवींची मसनवी असे म्हणतात. सूफ़ी साधकांमध्ये त्यांच्या 'मसनवी'बद्दल फार आदर आहे. त्यामध्ये इस्लामी गूढवादी विचारधारेच्या वेगवेगळ्या पैलूंवर विचार करण्यात आला आहे. एवढे मात्र खरे की, रूमी प्रथम साधक होते, कवी नंतर.

रूमीच्या काव्याचे प्रमुख वैशिष्ट्य हे आहे की, सर्वत्र त्यांची आध्यात्मिकता ही त्यांच्या कलात्मकतेपेक्षा सरस आहे. तिचे अध्यात्म-संगीत वाचकांना आकर्षित करते. ते मनास हेलावून सोडते. तिचे संगीत जणू आपल्या मधुर स्वरांकडे खेचत वाचकांना परम-सौंदर्य, परमप्रिय प्रेयसी (ईश्वर)समोर उन्मुख करते. परमप्रिय प्रेयसी (परमात्मा)च्या सौंदर्य वर्णनाशी आत्म्याचे त्याच्याशी प्रस्थापित मीलन अत्यंत मर्मस्पर्शी आहे. तेथे 'तू' आणि 'मी' या दोघांचा निकटतम संबंध स्थापित होऊन जातो.

रूमीसाठी जग-संसार हे सर्वस्वी असत्य आहे. एकमात्र सत्य तो परमात्मा-परमेश्वर आहे. त्याच प्रेयसीच्या प्रेमाच्या शोधामध्ये कवी आहे. त्या प्रेयसीस तो ओळखतो. त्याच्यासाठी इहलोक-परलोक, धर्म सर्वकाही तीच प्रेयसी परमेश्वर आहे. रूमीने आपल्या एका कवीतेमध्ये म्हटले आहे -

''हे मुसलमानांनो! मी काय करू? मी तर स्वत:स ओळखू शकत नाही. मी ना ईसाई (ख्रिश्चन) आहे, ना यहूदी (ज्यू), ना गबर आहे आणि ना मुसलमान. मी ना पौर्वात्य आहे , ना पाश्चिमात्य, ना जमिनीचा आणि ना समुद्राचा. मी निसर्गाच्या टांगसाळीचा पण नाही आणि ना परिवेष्टन करणाऱ्या आकाशांचा. ना मी पृथ्वीचा आहे, ना आपचा, ना तेजा (अग्नी-पावका)चा, ना वायू (पवना)चा, मी ना तेजोलोकाचा आहे आणि ना मातीचा, ना अस्तित्वाचा ना सत्तेचा. मी ना भारतीय आहे ना चीनी, ना बल्गेरियाचा आणि ना सक्सीनचा. ना मी इराक़ी साम्राज्याचा आहे आणि ना खुरासान देशाचा. मी ना इहलोकाचा आहे ना परलोकाचा. ना मी स्वर्गाचा आहे, ना नरकाचा... ना येथे शरीर आहे आणि ना आत्मा. कारण की, मी प्रेयसी (परमेश्वर)च्या आत्म्याचा आहे. मी गुणांना सारले (दूर हटवले) आहे; कारण मला माहीत आहे की दोन्ही जग एकच आहेत. मी त्याच एकाच्या शोधात आहे. तोच एक मला माहीत आहे. त्यालाच पाहतो, त्यालाच हाका मारतो आहे. तो आदि, तो अंत आहे. तो बाहेर आहे, तो आत आहे. ..... ''

कवी स्वत:मधील प्रियकराच्या पैलूचा उलगडा करून पुढे म्हणतो -

''हे मुसलमानांनो! या जगामध्ये जर कोणी (सच्चा) प्रियकर असेल तर तो मी आहे. जर कोणी श्रद्धावंत असेल, अथवा श्रद्धाहीन असेल अथवा ईसाई (ख्रिश्चन) संत असेल तर तो मी आहे. मदिरेची तळछाट, मधुबाला, गायक (गवई), वीणा, संगीत, प्रेयसी, दीपक, मदिरा, मदिरेची मस्ती सर्व काही मीच आहे. जगामधील बहात्तर धर्म आणि संप्रदाय वास्तविक नाहीतच. मी परमेश्वराची शपथ घेऊन सांगतो की प्रत्येक धर्म आणि प्रत्येक संप्रदाय मी आहे. पृथ्वी, आप, तेज आणि वायू हे काय आहेत (ते) तुम्ही ओळखता का? पृथ्वी, आप, तेज, आणि वायूच नाही, परंतु शरीर आणि आत्मापण मीच आहे. सत्य-असत्य, चांगले-वाईट, आराम आणि त्रास सुरुवातीपासून शेवटपर्यंत मीच आहे. मीच ज्ञान, विद्या, निरासक्ती, पुण्य आणि श्रद्धा आहे. तुम्ही हे निश्चितपणे जाणून असा की प्रखर ज्वालांसहित नरकाग्नी आणि होय, स्वर्ग, नंदनकानन आणि स्वर्गीय अप्सरा (पण) मीच तर आहे. जेवढे म्हणून पृथ्वी आणि आकाशांमध्ये जे काही आहे- देवदूत, अप्सरा, यक्ष (किन्नर) आणि मानव ते सर्व मीच (तर) आहे.''

**क) रूमी प्रणीत प्रेम–महिमा –**

मौलाना रूमीपाशी प्रेम आणि रतीस असाधारण महत्त्व व श्रेष्ठता प्राप्त आहे, कारण की ते मानवाचे वास्तविक मूळ रत्न आहे. हेच प्रेम पुढील 'हदीस क़ुद्सी' (पवित्र वचन)च्या आधारे समस्त ब्रह्मांड निर्मितीचे कारणस्वरूप आहे. ती 'हदीस' अशी आहे – ''मी एक लपलेला–गुप्त खजिना होतो. मला वाटले की मी ओळखले जावे म्हणून मी ब्रह्मांड निर्माण केले. त्यामुळेच माझी ओळख व्हावी.'' म्हणजेच परमेश्वराची सत्ता, परमज्ञानाच्या अभावी परोक्षाहून परोक्ष आणि गुप्त खजिना आहे. जिच्या वास्तवाची जाणीव कोणालाच नसते. म्हणूनच ईश्वरी सत्तेने बाहेर आपले रूप–सौंदर्य आणि पराकाष्ठा पाहण्यासाठी आतून बाहेर आदि प्रारूप (अखंड समरूपता) अर्थात 'अयान–ए–साबिता'च्या आरशांना सुशोभित केले आणि त्यांमध्ये आपले प्रतिबिंब प्रकट केले. प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरी म्हणतात की, ''इश्क़ अज़ मवाहिब अस्त न अज़ मकासिब'' म्हणजेच प्रेम परमेश्वराची देणगी आहे. या अनुपम देणगीमध्ये परिश्रम आणि स्वामित्वाचा हस्तक्षेप नसतो. प्रेम आणि रती मानवी स्वभावाचे वैशिष्ट्य आहे. ती अनादि भाग्यलिपिकाची अनुपम देणगी आहे, प्रभूची कृपा आहे. प्रेम जेव्हा मानवी स्वभावामध्ये आपल्या पराकाष्ठेस पोहोचते, तेव्हा मानव हा आपल्या अस्तित्वाचे गूज जाणतो. भाग्यवान आणि पवित्र आत्मे आपल्या अंतर्दृष्टीने निरपेक्ष वास्तव आणि निरपेक्ष सौंदर्याचे दर्शन करतात आणि हेच निरपेक्ष सौंदर्य त्यास पराकाष्ठेच्या सीमेपर्यंत पोहोचवते आणि ''आम्ही मानवास सर्वोत्तम–सुंदरतम स्वरूपामध्ये घडविले (निर्मिले) आहे'' या टप्प्यावर पोहोचविते. एवढेच नव्हे तर, उत्तुंगता आणि हुद्दा–पदाच्या शेवटच्या सीमा त्याच्या पायावर लोळण घेतात. तो आकाशांच्या पाहुणचारांमध्ये याच प्रेमाद्वारे आपल्या पार्थिव शरीरास सहभागी करतो.

सूफ़ी या प्रेमास असाधारण महत्त्व देतात कारण त्याशिवाय त्याच्या आंतरिक पराकाष्ठांची परिपूर्णता होऊच शकत नाही. सूफ़ी आचार्य शाह तुराब अली क़लंदर अल्वी काकोरवी यांच्या मतानुसार –

*''इश्क़ अव्वल, इश्क़ आखिर, इश्क़ ज़ाहिर और बतून*
*इश्क़ ही से तू बनाए हर दर व दीवार है ।।''*

म्हणजेच प्रेम आदि आहे, प्रेमच अंत आहे, प्रेम प्रकट आहे आणि अप्रकट पण. प्रेमाच्याच आधारे तू प्रेम–मंदिराची द्वारे आणि भिंती बनवतोस.

मौलाना रूमचा संपूर्ण 'दीवान' (समस्त काव्य ग्रंथावली) याच उमंग व उत्साह भावोल्हास, परमानंद, तल्लीनता, बेशुद्धी, प्रसन्नता, मस्ती यांची चित्रावली आहे. म्हणूनच ते जागोजागी या प्रेमाचे महत्त्व आणि त्याच्या प्रदर्शनाची प्रचिती (आणून) देतात आणि सिद्ध करतात की, प्रेम सर्व आंतर–बाह्य रोगांचे (रामबाण) औषध आहे. याच प्रेमामुळे तर पार्थिव शरीर हे आकाशांच्या पाहुणचारांमध्ये आत्मविस्मृत झाले. ''प्रेम चेहरा आणि डोळ्यांमध्ये फुलाच्या कळीपेक्षा (पाकळीपेक्षा) अधिक ताजे व टवटवीत असते. त्याचे प्रेम ग्रहण करा, जो चिरंतन आहे आणि जो आम्हा सर्वांना शक्तिवर्धक मदिरेने तृप्त करणारा आहे.''

हे वास्तव आहे की सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आकाशांना दृश्य उत्तुंगता (उंची) प्रदान केली आहे, समुद्रांना विशालता आणि अथांग खोली दिली; परंतु त्या प्रेमामुळे त्याने मानवास खरोखर वास्तविक उंची (उच्चता–

श्रेष्ठता) दिली आहे. त्याने त्याच्या अंत:करणास (प्रेमाचे) ते अमूल्य रत्न दिले आहे की, ज्याच्यापासून आकाश आणि पृथ्वी वंचित आहेत.

प्रेम हे विवेकबुद्धीपेक्षा कसे श्रेष्ठतर आणि महत्त्वपूर्ण आहे हे रूमींनी वेगवेगळ्या पद्धतीने सिद्ध करून दाखविले आहे. ते म्हणतात, ''आपल्या विवेक-बुद्धीच्या पर्वतास फार उंच समजू नका. तिला रसातळास पोहोचवण्यासाठी एक लाटच पुरेशी आहे.'' प्रेम त्यांचे (रूमींचे) जीवन, त्यांचा जिवलग मित्र, मर्मज्ञ, आरंभ आणि शेवट सर्वकाही आहे. माझा अंतरात्मा आतून आवाज देतो की, हे प्रेममार्गाच्या महाआळशी! तू मला दुसऱ्यांदा प्राप्त करून घे.''

रूमी प्रेमाच्या लाभासंदर्भात लिहितात, ''तू ईश्वराच्या प्रेमामुळे कधीच तोट्यात असणार नाहीस. जेव्हा तू आपादमस्तक प्राण बनून जाशील तेव्हा तू निष्प्राण कसा बरे राहशील! तू प्रथम आकाशापासून पृथ्वीवर आला होतास. शेवटी तू पृथ्वीपासून आकाशावर जाशील.'' बुद्धीस सहा दिशांव्यतिरिक्त काहीच माहीत नाही. त्याशिवाय जाणण्याच्या प्रयत्नात ती थकून जाते; परंतु प्रेमाने या सहा दिशांव्यतिरिक्त अनेक दिशांमध्ये प्रवास केला आहे.

मौलाना रूमींनी आपल्या असंख्य ग़ज़लां (भावगीते)मध्ये आणि मसनवीमध्ये अनेक ठिकाणी प्रेमाचे अनेक चमत्कार, तिच्या विविध दिशा आणि दशांच्या विविध स्तरांचे रहस्योद्घाटन केले आहे. प्रेमामध्ये संपूर्ण निर्वाणानंतर (फ़ना) अस्तित्वशून्य अवस्थेस पार केल्यानंतर शाश्वततेची अवस्था (बक़ा) प्राप्त करणे शक्य असते. ''माझा धर्म व श्रद्धा पण प्रेमामध्ये बुडून जिवंत राहणे आहे. हे सप्राण बाह्यजीवन माझ्यासाठी शरमेची गोष्ट (बाब) आहे. जर तुम्ही अस्तित्व आणि अस्तित्वहीनता म्हणजेच जीवन आणि मृत्यूस पार कराल तर अनंत जीवन तुम्हास सप्राण करून टाकील.'' प्रेमाअगोदर अंत:करणामध्ये संयमासाठी जागा होती, परंतु ज्या क्षणी प्रेमाने पदार्पण केले त्याचक्षणी संयमाने निरोप घेतला आणि त्याच्या जागी आगीच्या ज्वाळा उफाळू लागल्या.

सुप्रसिद्ध फ़ारसी कवी शेख सादी म्हणतात की, असे अंत:करण जे प्रियकर पण असेल आणि पुन्हा संयमी पण असेल (असे होणे) फार कठीण आहे, कारण प्रेम आणि संयम यांच्यामध्ये हजारो मैलांचे (किलोमीटर) अंतर आहे (असते).

प्रेमाचा प्रभाव कसा व किती असतो यासंबंधी कवी रूमी यांनी प्रेषित यूसुफ़ यांच्याविषयी असलेल्या ज़ुलेखाच्या प्रेमाचे सविस्तर वर्णन प्रस्तुत केले आहे आणि त्या अनुषंगाने स्त्रीची मानसिकता आणि त्या पाठीमागे असलेले काही गूज, तिची इच्छा आणि तिचे आंधळे प्रेम याविषयी पण प्रभावोत्पादक चर्चा केली आहे. आणि भौतिकता ही आध्यात्मिकतेची पायरी असते या गोष्टींचे विवेचन प्रेषित यूसुफ़ आणि ज़ुलेखा यांच्या प्रेमकथेद्वारे प्रभावशाली रीतीने स्पष्ट केले आहे.

प्रेम प्रौढांसाठी मध तर बालकांसाठी दूध असते. प्रेम हे प्रत्येक नौकेचे शेवटचे वजन (शेवटी लादण्याचा माल) असते. जेव्हा हे नौकेवर (म्हणजेच माणसाच्या शरीरात) पोहोचते तेव्हा ते संपूर्णपणे नौकेस पाण्यात बुडवते. प्रसन्नतेच्या वेळी हे क्रोधाशिवाय प्रत्येक क्षणी निर्भयपणे कत्तल होण्याच्या सवयीचा बनवते. ही तर प्रसन्नतेच्या वेळेची स्थिती आहे. जेव्हा ते क्रोधामध्ये असते, तेव्हा काय सांगावे, काय घडत असते; परंतु

प्रियकर प्रत्येक वेळेस म्हणजेच नेहमी प्राणार्पण करण्यास तत्पर असतो. प्रियकरांचे कत्तल करून घेणे हे त्यांच्या हजार वेळा जिवंत राहण्यापेक्षा जास्त श्रेयस्कर असते. प्रेमाच्या या गुलामीवर कित्येक राज्ये बळी गेलेली आहेत.

जुलेखाच्या प्रेमाचे स्वरूप विशद करताना कवी रूमी म्हणतो की, जुलेखाने काळ्या दाण्यापासून ते ऊदअगरपर्यंत प्रत्येक वस्तूचे नाव यूसुफ़ ठेवले होते. त्यांचे नाव सर्व वस्तूंच्या नावामध्ये लपलेले होते; कारण जुलेखा यूसुफ़ची प्रेमवेडी बनून प्रतीकांचीच भाषा बोलू लागते. काही भेद जाणणारे लोकच याचे गूज जाणत. जसे– जेव्हा ती म्हणते की मेण आगीमुळे मऊ बनून गेले तर याचा असा अर्थ असा होई की प्रियकर यूसुफ़ तिच्यावर मेहेरबान झाले. ती म्हणते की पाहा चंद्रोदय झाला, तर याचा अर्थ होई की, प्रियकर यूसुफ़ आले. वेताची शाखा हिरवी झाली याचा मतितार्थ होई की, मीलनाची (संभोगाची) आशा वाढली, जर ती म्हणते की, पाण्यावर पुष्कळ लाटा उसळी मारत आहेत तर त्याचा अभिप्राय होई की, आशेच्या समुद्रामध्ये तरंग म्हणजेच उमंग, उत्साह भरलेला आहे. जर ती म्हणते की पाहा, काळे दाणे फार जळू लागले आहेत, तेव्हा त्याचा आशय असतो दोन परस्परविरोधी प्रियकर ईर्षेमध्ये–हेव्यामध्ये जळत आहेत. जर ती म्हणते की, पत्ते फार हलत आहेत आणि टाळ्या पिटत नाचू–बागडू लागले आहेत, तर त्याचा अभिप्राय होतो जगातील प्रत्येक सुंदर युवक प्रियकर यूसुफ़वर आसक्त व मोहित आहे. जर ती म्हणते की फुलाने आज गोवत्सका (बुलबुल पक्षा)ला गुप्त गोष्ट सांगितली आणि बादशहाने शहबाज़ या शिकारी पक्षाचे रहस्य उलगडले, या विधानाचा आशय होतो की आज एकांतवासामध्ये संवाद झाला आणि प्रियकर यूसुफ़ने माझी दशा सांगितली. ती जर असे म्हणते की पाहा, भाग्य कसे उजळले! तर त्याचा अभिप्राय होतो आज प्रियकराचे दर्शन शक्य झाले. जर ती म्हणते की सामान झाडून–झटकून घ्या तर असा अर्थ होतो की, (माझ्या) गुप्त गोष्टी जाणणारे जवळचे नातलग सोडून सर्व लोकांना माझ्यापासून दूर करा. पुन्हा जर ती म्हणते की, पखालीने पाणी आणले; तर याचा अर्थ होतो की, संयोगा (मीलना)च्या तृप्ततेची वेळ आली आहे. आणि जर ती म्हणते की सूर्योदय झाला तेव्हा अभिप्राय होतो मीलनाची आशा निर्माण झाली. जर ती म्हणते की काल रात्री त्यांनी भंडारा केला तेव्हा आशय होतो की संयोगास उपयोगी अशा बाबी शक्य झाल्या. जर ती म्हणते की, भाकरी फिकट आहे तर अभिप्राय होतो की, मीलनाच्या बाबी अनुकूल नाहीत. पुन्हा जर ती म्हणते की आकाश उलटे फिरत आहे तेव्हा अर्थ होतो की, संयोगाची युक्ती निष्फळ झाली, त्याचा उलटा परिणाम झाला. जर ती म्हणते की, माझे डोके दुखू लागले आहे तर अर्थ हा आहे की, यूसुफ़चा वियोग उत्तरोत्तर वाढत आहे. पुन्हा जर ती म्हणते की, माझे डोके दुखणे थांबले तर अर्थ होतो की, वियोगाऐवजी संयोगाची परिस्थिती (संधी) दृष्टिगोचर होत आहे. रहस्यदर्शी तिच्या या संकेताहूनच ओळखत की तिने काय म्हटले, कारण त्यांच्या दरम्यान परके लोक होते. जर ती कोणत्याही वस्तूची प्रशंसा करे, तर त्याचा अभिप्राय यूसुफ़शी संयोग असा होई. जर ती नावे ठेवत असेल तर अभिप्राय ताटातूट आणि वियोग असा होई. अशा शेकडो सांकेतिक शब्दांचा अभिप्राय फक्त प्रियकर यूसुफ़च असे. जेव्हा ती भुकेलेली असते तेव्हा ती त्यांचेच नाव घेई. म्हणजेच यूसुफ़चे नामस्मरण हे तिचे खाद्यान्न बनून जाई आणि त्यामुळे ती संतुष्ट, तृप्त आणि मस्त बनून जाई. जुलेखाची तहान पण यूसुफ़च्या नामस्मरणाने निघून जाई, आणि त्याच्या गोड नावामुळे तिचा अंतरात्मा पण संतुष्ट–तृप्त होत असे. जर तिला दुःख पोहोचत असेल

तर (यूसुफ़च्या) श्रेष्ठ नावामुळे ते नष्ट होई आणि तिला आराम मिळे. हिवाळ्याच्या ऋतुमध्ये तेच नाव तिचे थंडीपासून रक्षण करण्याचे साधन बने आणि शरीरामध्ये उबदारपणा निर्माण होई. सारांश, प्रियकराचे नाव प्रेमामध्ये हे सर्व काही करते. त्याच्या नावामध्ये एवढी (प्रचंड) शक्ती असते.

मौलाना रूमी यांचे संपूर्ण व्यक्तिमत्त्व प्रेमाच्या समुद्रामध्ये उडी मारणारे आहे. म्हणून तर त्यांच्या रचनांमध्ये सौंदर्य व प्रेमाचे व्यापार, त्यांचे रहस्य, या सर्वांमध्ये अशी अनुपमता आहे की त्यांमध्ये ते बिलकुल अद्वितीय आहेत. त्यांचे संपूर्ण काव्य मंत्रमुग्ध करणारे आहे. प्रेमाच्या वैशिष्ट्यांसंबंधी ते म्हणतात की, ‘‘प्रेमाच्या अशा कितीतरी छटा आहेत की, त्यांचे वर्णन करण्यास शब्द अपुरे पडतात (शब्दच नाहीत).

तो आत्मा (म्हणजेच ती व्यक्ती) की ज्याचे आचरण किंवा व्यवहार आध्यात्मिक प्रेमाचे नसेल, त्याचे नसणेच अधिक चांगले आहे, कारण की त्याचे अस्तित्व म्हणजे बदनामीशिवाय दुसरे काहीच नसते. प्रेमामध्ये मस्त आणि आत्मविस्मृत होऊन जा कारण की, जे काही आहे (ते) प्रेम आहे. मित्रासाठी जर काही करण्याची इच्छा असेल तर फक्त प्रेम करा, कारण प्रेमाचा कारभार त्याच्यावर ओझे नसते. लोक विचारतात की प्रेम काय आहे? त्यांना सांगा, आपल्या स्वामित्वाचा-सत्तेचा पूर्णपणे त्याग करणे. जो आपल्या सत्तेपासून मुक्त नसतो त्याची कोणतीच सत्ता नसते. प्रियकर एक बादशाह असतो त्याच्यावर इहलोक व परलोक दोन्ही ‘कुर्बान’! (दोन्ही जगांचा त्याग). परंतु त्या बादशहाचा दानाकडे मुळीच ओढा नसतो. प्रेम आणि प्रेमव्यवहार अनंत काळपर्यंत राहणारे आहेत. त्याच्याशिवाय दुसऱ्या कशामध्ये मन लावू नका, कारण त्याच्याशिवाय प्रत्येक वस्तू क्षणभंगुर आहे. वसंतऋतुमध्ये निर्माण होणाऱ्या वस्तू शरदऋतूमध्ये नष्ट होतात; परंतु प्रेम-वाटिकेसाठी कुठल्याच नव-वसंताची गरज नसते. (याला पण शरद नाही) वसंतऋतूने पोसलेल्या फुलाचा काटा हा त्याचा साथी असतो आणि द्राक्षांपसून बनवलेली मदिरा नशा आणणारी (निर्माण करणारी) असते. या मार्गामध्ये प्रतीक्षा करणारे आणि दृश्य पाहणारे प्रेक्षक बनू नका, यासाठी की ईश्वर शपथ! प्रतीक्षेपेक्षा वाईट कोणताच मृत्यू नसतो. जर तुमचे अंत:करण झोपलेले असेल तर त्याच्यावर प्रेमाचा मारा करा की जेणेकरून ते जागे होईल. जर तुम्हास हे माहीत नसेल तर पक्की गाठ बांधून ठेवा. आपल्या भौतिकतेच्या अश्वावर आरूढ (स्वार) होऊन भीतीने गर्भगळीत होऊ नका; परंतु हळू पायी चला, कारण सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा त्या माणसास पंख अर्पण करतो जो आपल्या इच्छा, वासना आणि हावेच्या अश्वास सोडून देतो. शंका आणि चिंता यांपासून मुक्त व्हा की जेणे करून तुमचे मन आरशासारखे स्वच्छ निर्मळ बनून जावे, की त्यावर कोणतेच ओरखडे नाहीत. जेव्हा तुमचे मन सर्व वासनामय इच्छा आकांक्षारहित, स्वच्छ व निर्मळ होते; तेव्हा त्यामध्ये सर्व वास्तव उघडले जाईल. कारण की स्वच्छ मन आणि स्वच्छ चेहरा कोणासमोरही अपमानित होत नाही.

प्रियकरांवर प्राण उत्सर्ग होवो! प्रेम किती उत्तम भावना, मनोवृत्ती आहे! मुला (वत्सा) प्रेमपुजारी बनून जा. त्याच्याशिवाय सर्व गोष्टी व्यर्थ व निरर्थक आहेत. मी प्रेमाच्या मदिरेने चिंब आहे. प्रेमाचा अग्नी माझा बिछाना आहे. माझ्या आगीमध्ये पाय ठेवा. कुठपर्यंत या पाखंडतेमध्ये राहाल? आकाशापासून ते पृथ्वीतलापर्यंत प्रेमाची अग्निमय साखळी लटकलेली आहे. जर तुम्ही सत्य जाणणारे आणि नव्याचे पुजारी असाल, तर या साखळीस रोखून धरा. प्रेम काय आहे हे विचारू नका. प्रेम एक उन्माद आहे, एक वेडेपण आहे. हा माणसास साखळीमध्ये बांधून टाकतो; परंतु ही ती साखळी नव्हे जी मूर्खास बांधण्यासाठी उपयोगात आणली जाते. मुला! प्रेमपुजारी

बनून जा. प्रेम भारीच वस्तू आहे. प्रियकरांच्या प्राणांची शपथ! (खरोखर) तुम्ही सच्चे व निर्मळ आहात. एकदा का तुम्ही प्रेममार्गावर चाललात आणि निर्वाणा (फ़ना)च्या काननामध्ये पोहोचलात, की तुमचा शत्रू कोण बरे होऊ शकेल? तुमच्याएवढी शक्ती कुणामध्ये आहे? तुम्ही तर अशी आग आहात की जी जाळते, भाजते आणि खाक करते. माझ्या प्राणास आपला गुलाम बनव. माझ्या भोग-विलासास जिवंत कर, मस्त कर, जन्म दे आणि दुसऱ्यांदा निर्मितीचे वैभव दाखव. थोडा वेळ शांत बैस. शांततेमध्ये गोंधळ घाल. बोलण्याच्या वेळेस तू मौन आहेस आणि मौनाच्या वेळेस तू बोलणारा आहेस. अंत:करणपूर्वकतेशिवाय बोलणे म्हणजे सामरीच्या वासरासारखे आहे. (जे कृत्रिमपणे हंबरण्याचा आवाज काढत असे). हे योग्य-बरोबर नव्हे. सरळमार्गावर चला. तुम्ही बुद्धिमान आहात.

प्रेमकृपा, पराकाष्ठा आणि ज्ञान म्हणजे ग्रंथ आणि त्यांची पाने याचे नाव नव्हे. लोकांचे सारे तर्क-वितर्क हे प्रियकरांचे मार्गदर्शक नसतात. प्रेम असा वृक्ष आहे की ज्याच्या शाखा अनादिमध्ये आणि मुळे अनंताशी निगडित आहेत. हा वृक्ष ना ईश्वरी राजसिंहासनास टेकलेला आहे ना पृथ्वीवर त्याचे कोणतेच मूळ आहे. आम्ही बुद्धीस पदच्युत केले आणि वासनामय इच्छांना प्रतिबंध केले, ते यासाठी की प्रेमाचे माहात्म्य आणि रूद्रावतार ही बुद्धी आणि तिच्या स्वभावास योग्य (लायक) नाहीत. ते यापेक्षा श्रेष्ठ आहेत. जर तुम्ही प्रियकर असाल तर हे प्रेम तुमची मूर्ती आहे. जेव्हा तुम्ही स्वत: प्रेयसी होऊन जाल तेव्हा प्रियकराचे अस्तित्व नष्ट होते. मनुष्य हा नेहमी भय आणि आशेच्या हिंदोळ्यावर झुलत असतो. जेव्हा हिंदोळा हटून जाईल तेव्हा खाली पडण्याशिवाय गत्यंतर नाही. इतर लोक मृत्यूच्या भीतीमुळे सवलत मागतात, परंतु प्रियकर म्हणतात, नाही, नाही मृत्यू लवकर यावा की जेणेकरून त्यांना प्रेयसीशी परिपूर्ण आणि चिरंतन संयोग प्राप्त व्हावा. आकाश प्रियकराच्या अंत:करणाच्या धुराने निर्माण केले आहे, त्या धुराच्या स्वामीचा जयजयकार असो!

प्रेम आणि तिच्या लवाजम्याची स्तुती कवी रूमी पुढीलप्रमाणे करतात -

प्रेम हा एक अत्यंत स्वाभिमानी असा नरेश (बादशहा) आहे, जो तुझ्या अंत:करणाच्या घटास 'उपाधी'पासून म्हणजेच ईश्वरावाचून इतर सर्वांना बाहेर घालून स्वच्छ ठेवतो. प्रेम उत्तुंग भरारी घेणारा पक्षी आहे ज्याने संपूर्ण जगास आपल्या परिवृत्तामध्ये सामावून घेतले आहे. मित्रा! जर तू समजू शकशील तर मी तुला प्रेमाची दहा स्थानके (मक़ामात) किंवा गंतव्य स्थळे दाखवून देईन. ती गंतव्यस्थळे अशी आहेत- पहीले स्थानक आहे शिष्टाचार, दुसरे भय व आशा आणि पाणावलेले नेत्र (डोळे), तिसरे धर्मपरायणता, चौथे संयम (धैर्य), पाचवे (बोधी) बोध, सहावे वदान्यता (दानशीलता) आणि सातव्यास ज्ञान जाणावे. आठव्या गंतव्यस्थळास विनय आणि नम्रता जाणावे आणि नववे ब्रह्मज्ञान आहे. दहावे मी स्पष्ट-स्पष्ट शब्दांत सांगतो की जर तू स्वत:स योग्य प्रकारे ओळखलेस तर तू सत्याचा (ईश्वराचा) ब्रह्मज्ञानी झाला म्हणून समज. वत्सा! जर तू या गोष्टींची पक्की खूणगाठ बांधून घेतलीस तर तू सावध असा प्रियकर होऊन गेलास म्हणून समज.

प्रेमाच्या संदर्भात साधक कवी रूमी यांनी विवेक आणि प्रेम यांमधील एक सुंदर संवाद पण अभिव्यक्त केला आहे. तो असा - रक्ताच्या पटावरणांदरम्यान प्रेमाची अनेक उद्याने आहेत. प्रियकरांना ईश्वरीसत्तेशी काम असते. विवेकबुद्धी म्हणते की सहा दिशा (पुढे-मागे, वर-खाली, डावीकडे-उजवीकडे) आहेत. त्याबाहेर कोणतेच मार्ग नाहीत. प्रेम म्हणते की मी अनेकदा त्यांमधून गेलो आहे. विवेकबुद्धी म्हणते की पुढे जाऊ नकोस. निर्वाणा (फ़ना)मध्ये फक्त काटेच आहेत. प्रेम म्हणते की ते काटे तुझ्या आतमध्ये आहेत. विवेकबुद्धीने एक

बाजार पाहिला आणि खरेदी सुरू केली. प्रेमाने त्या बाजाराव्यतिरिक्त त्यापलीकडील अनेक बाज़ार पाहिलेत. हुतात्मा महात्मा मन्सूरसारख्या अनेक लोकांनी प्रेमावर भरवसा ठेवला आणि उपासनेचे व्यासपीठ (मिंबर) सोडून फासावर चढणे पसंत केले. मदिरेचे तळछाट पिणाऱ्या प्रियकरांना यामध्येच आनंद होतो. हतभागी, दुर्बुद्धी-बुद्धिमान या दृश्य स्वरूपास नाकारतात. स्तब्ध होऊन बसा आणि अस्तित्वाच्या काट्यास अंत:करणाच्या पायापासून काढून टाक की, जेणेकरून तू आपल्या अंतर्मनामध्ये उद्यान-वाटिकेस पाहावेस. (म्हणजेच परमेश्वराचे दर्शन घडावे.)

प्रेमाने माझी रात्रीची झोप उडवून दिली आहे. ते खरोखर निद्रानाश करणारे आहे. विवेकबुद्धी आणि प्राणाच्या तुच्छतेमुळे त्यांना ते (प्रेम) अर्ध्या भाकरीच्या बदल्यात पण विकत घेत नाही. प्रेम एक रक्तपिपासू हिंस्र असा काळा सिंह आहे जो प्रियकरांच्या काळजाच्या रक्ताशिवाय काहीच खात-पित नाही. ते प्रथम आपल्या जाळ्यामध्ये तुला फसवून तुला मोठ्या प्रेमाने आलिंगन देते आणि जेव्हा तू त्या जाळ्यात अडकतोस तेव्हा तू फसून जातोस. मग ते लांबूनच तुझा तमाशा पाहते. ते एक मोठे जुल्मी शासक, निर्दयी कोतवाल आहे. ते आपल्या पंज्यामध्ये जखडून निष्पाप प्रियकराचे रक्त पिळते. एका क्षणामध्ये हजार पेले प्राशन करते आणि तोडून टाकते. आणि हजार पेल्यांना (पोशाखांना) एका क्षणात शिवते आणि चिंध्या-चिंध्या करून सोडते. हज़ारो डोळ्यांना रडविते आणि जोरजोराने खूप हसते. हज़ारो दु:खी लोकांना गतप्राण करून टाकते आणि त्यांना एक म्हणून मोजते. काफ़ पर्वतामध्ये राहणारा मोठा पक्षी 'सीमुर्ग'ने जरी मोठ्या आनंदाने उंच भरारी घेतली तरी जेव्हा तो प्रेमाचे जाळे पहातो तेव्हा तो त्याच्यावर तुटून पडतो आणि मग कधीच उडत नाही. कोणी व्यक्ती धूर्तता व कपट आणि मूर्खतेमुळे प्रेमाच्या बंधनापासून ना सुटका प्राप्त करू शकते ना कोणी बुद्धिमान तिच्या जाळ्यामधून बाहेर पडू शकते. जी कोणी व्यक्ती प्रेमपाशामध्ये बांधली जाते ती ढगांच्या वर्षावाप्रमाणे हुंदके देत-देत रडते आणि जी या (प्रेमा)पासून लांब असते ती बर्फाप्रमाणे घट्ट बनते. जर माझे वचन प्रेमाच्या उन्मादाने पुरेपूर भरलेले नसेल, तर प्रेम जो मार्ग पत्करते, तो मी तुम्हास दाखवला असता. तुम्हाला हे पण सांगितले असते की ते सिंहास कशाप्रकारे अटक करते आणि 'शिकार'ची (सावजाची) शिकार करते. गप्प बसा - त्याच्याविषयी कोणतीच तक्रार करू नका, कारण की ते आमच्याबरोबर उभे राहून सर्व काही पाहत आहे.

जेव्हापासून तुझ्याशी ताटातूट झाली आहे तेव्हापासून मला साश्रू नयनांशिवाय कोणीच पाहिले नाही. मी तुला कोठेही, कोणत्याही स्थितीमध्ये विसरलो नाही. परमेश्वराखातर तू पण मला विसरू नकोस. प्रेमाशिवाय माझा कोणीच सखा (मित्र) नाही. ना सुरुवात, ना शेवट, ना प्रथम. आतून माझे प्राण ओरडते की हे प्रेममार्गाच्या आळशी! मला दुसऱ्यांदा स्वीकारून घे.

हे जे तू यूसुफ़ आहेस, मी याकूब आहे. तू माझ्या शरीराचे आरोग्य आहेस आणि मी अयूब आहे. माझी काय हैसियत आहे? तू सर्वांचा प्रियकर आहेस. मी टाळी वाजवतो (आणि) तू नृत्य कर.

**ख) रूमी प्रणीत काही प्रेमछटा**

मौलाना रूमींनी जवळ-जवळ दोन हजार रूबाया (चौपाया) लिहिल्या आहेत. त्यांच्यामध्ये त्यांचे उच्च विचार आणि काही रुबयांमध्ये प्रेम-छटा यांचा प्रतिध्वनी आणि प्रतिबिंब उमटले आहे. ते असे -

जर तू माझ्याजवळ असशील तर मी आनंदामुळे झोपणार नाही आणि तू नसताना तुझ्या (विरहाच्या) दु:खामुळे मी झोपणार नाही (झोप लागणार नाही). हे पाक परमेश्वरा! दोन्ही परिस्थितीमध्ये मी जागा असतो. माझ्या दोन्ही जागृत अवस्थांमध्ये थोडा फरक आहे.

सुरुवातीस तू मला हजार दया व कृपेने नवाजलेस आणि शेवटी हजार क्रोधाने (रागाने) भयभीत केलेस. आपल्या प्रेमाच्या सामन्यासाठी मला पळवलेस. मग मी त्यात विलीन (फ़ना) झालो तेव्हा तू मला वियोगामध्ये बांधून दूर (लांब) फेकून दिलेस.

खरी गोष्ट ही आहे की प्रेम हे आपादमस्तक चांगुलपण असते. व्यवधान यामुळे आहे की स्वभाव वाईट आहे. तू आपल्या वासनेचे नाव प्रेम (असे) ठेवलेस. वासना आणि प्रेम यांच्या दरम्यान फार मोठे अंतर आहे.

मी मित्राच्या मैत्रीमुळे हर्षभरीत होऊन जातो. हर्षभरीत यासाठी होतो की, माझा प्रियकर हा अतिशय सुंदर आहे. प्रेयसी ही प्रियकराच्या इच्छेवर आपले जीवन कंठित नसते. खरी प्रेयसी ती आहे जी प्रियकराच्या इच्छेवर जिवंत असते.

प्रेमाच्या वेदी (वधस्तंभा)वर केवळ भल्यांचाच बळी दिला जातो. अशक्त आणि वाईटाचा बळी दिला जात नाही. जर तू सच्चा प्रियकर असशील तर तू बलिदान देण्यापासून पळ काढू नकोस. ज्याचा बळी दिला जात नाही तो मुडदाच (प्रेतच) असतो.

प्रेमाच्या दवामुळे माणसाची राख माती बनली. मग जगामध्ये शेकडो बंडाळ्या झाल्या व गोंगाट माजला. आत्म्याच्या नशेवर शेकडो घाव घातले. त्यामधून एक थेंब निघाला. याचे नाव चित्त वा अंत:करण (ठेवले गेले) आहे.

हे शासका (बादशहा)चे प्रेम आहे, त्याचा ध्वज नव्हे. सत्या (परमेश्वरा)चे कुरआन (पवित्र ग्रंथ) आहे, परंतु त्याचे कोणतेच श्लोक प्रकट नाही. प्रत्येक प्रियकर हा त्या शिकारीचा जखमी आहे (घायाळ आहे.) रक्त वहात आहे, परंतु जखम दिसत नाही.

प्रियकरांच्या अंत:करणाच्या तापामध्ये स्फुलिंगे असतात. ह्रदयहीनांच्या अंत:करणाचे दु:ख प्रभावशाली असते. काय तू ऐकले नाहीस की दग्ध अंत:करणाची हाय ही सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या दरबारापर्यंत पोहोचण्याची क्षमता राखते.

मित्राच्या (प्रियकराच्या) अमृतापासून कोणताच आजारी शिल्लक राहिला नाही. मित्राच्या संयोगाच्या वाटिकेमध्ये (एक) काटा पण शिल्लक उरला नाही. असे म्हणतात की, मनास मनापासूनच दिलासा मिळतो. जेथे मुळी भिंतच नाही तेथे खिडकी (गवाक्ष) कशी असणार?

तुझ्या प्रेमामुळे सर्व नद्यांमध्ये महापूर आला आहे. मेघ तुझ्या पायात मोती पसरवतात. तुझ्या प्रेमामुळेच तर वीज जमीनीवर कोसळते. याच कारणामुळे धूर आकाशाकडे निघत आहे.

तू परमेश्वराच्या प्रेमामध्ये कधीच तोट्यात नसशील. निष्प्राण कसा असशील की जेव्हा तू आपादमस्तक प्राण बनून जाशील. अगोदर तू आकाशापासून पृथ्वीवर आला होतास आणि शेवटी तू पृथ्वीपासून आकाशावर जाशील.

कवी रूमी यांनी प्रियकर आणि प्रेयसीमधील संवाद 'मी-तू' या स्वरूपात मांडले आहेत ते याप्रमाणे -

मी म्हटले, माझे नेत्र, त्याने म्हटले, त्याच्या मार्गामध्ये अंथर. मी म्हटले, माझे यकृत, त्याने म्हटले

त्याच्या उसास्यामुळे जिवंत ठेव. मी म्हटले, माझे अंत:करण, त्याने म्हटले, अंत:करणामध्ये काय आहे? मी म्हटले, तुझे दु:ख, त्याने म्हटले, त्याला सांभाळून ठेव.

मी म्हटले, माझे नेत्र, त्याने म्हटले, त्यास 'जीहून', समुद्रासारखे निळे बनवीन. मी म्हटले, माझे चित्त, त्याने म्हटले, त्यास रक्ताने भरून टाकीन. मी म्हटले, माझे शरीर, त्याने म्हटले, काही दिवस जगामध्ये निंदित करीन आणि मग त्याला निष्कासित करून टाकीन.

तुझ्या प्रेमामध्ये ब्रह्मज्ञानास आम्ही अपराध समजतो. प्रेम काय आहे आणि ब्रह्मज्ञान काय आहे हे आम्ही जाणत नाही. त्याचे (प्रेमाचे) एक प्राप्त करणे दोन्ही जगांच्या अपराधानंतर साध्य होते. हे अस्तित्व, हा जीव तो नाही ज्यास आम्ही जाणतो.

काल प्रियकर कृपा करून, मेहरबानी करून माझ्यापाशी आला. मी रात्रीस म्हणालो (की) माझे रहस्य उलगडू नको. रात्र म्हणाली थोडे मागे-पुढे व्हा. सूर्य तर तुमच्यापाशी आहे, मी सकाळ कुठून बरे आणू!

प्रेयसीच्या प्रेमामध्ये आकाशासारखे फिरत आहेत. ईश्वरच अधिक चांगले जाणतो की, या प्रेमामध्ये आम्ही कोणत्या स्थितीत आहोत? आम्हाला आश्चर्य वाटते की बुद्धिमान लोक हुशार का असतात. त्यांना मात्र आश्चर्य या गोष्टीचे आहे की, आम्ही वेडे का आहोत!

तू मला स्वीकारलेस. मी ईश्वराच्या दरबारापासून बहिष्कृत होण्यास भीतो. तुझ्या समोर वाईट नजर (दृष्ट) लागण्यापासून भीतो. तुझ्या प्रेमभास्कराचा अस्त होण्यापासून, ईश्वर शपथ! मी आपल्या छायेस भीतो.

कधी आम्ही मीलना (संयोग)च्या इच्छेमध्ये चिंताक्रांत होतो आणि कधी वियोगाच्या थकव्यामुळे आगीमध्ये जळतो. जेव्हा माझ्या-तुझ्या दरम्यानचा मी आणि तूचा पटावरण (पडदा) उठून जातो, तेव्हा त्या वेळेस मी आणि तू, मी-तूपासून मुक्त होऊन जातो.

मी तुझ्या प्रेमास आकाशाच्या उंचीवर पोहोचवीन. तुझ्या जुल्मास आपल्या दु:खी अंत:करणावर सहन करीन. तू पृथ्वीवर जेथे कोठे आपले पाय ठेवशील (रोवशील) तेथे मी शांतपणे जाईन आणि तेथे मी आपले नेत्र (डोळे) ठेवीन.

हे तू (जो) या ऐहिक जीवनासच जीवन म्हणून समजत आहेस तुझ्यावर धिक्कार असो! की तू अशाप्रकारे जिवंत आहेस. प्रेमाशिवाय राहू नकोस की जेणेकरून तू मृत न व्हावेस. प्रेमात मरून जा, की जेणेकरून तू चिरंजीवी बनशील.

### ३) प्रख्यात सूफ़ी साधक शेख शर्फुद्दीन अहमद यहिया मनेरी यांचे प्रेमाविषयी मत

प्रियकराची वैशिष्ट्ये नमूद करताना सूफ़ी साधक शेख शर्फुद्दीन अहमद यहिया मनेरी म्हणतात की, प्रियकरास भय वाटत नाही, ना त्याला कोणत्याच आशेची लालसा असते. तो निर्भय आणि निरिच्छ असतो. कारण की भय आणि आशेचा संबंध भूतकाळ आणि भविष्यकाळाशी असतो आणि प्रियकर तर प्रेमाच्या समुद्राच्या तळाशी बुडलेला आहे. त्याला भूतकाळ आणि भविष्यकाळाशी काय बरे कर्तव्य? प्रियकराने कुठल्याही प्रकारे आपल्या प्रेयसीसाठी स्वत:स लायक बनवावे. जर तो प्रेयसीच्या प्रेमास लायक बनला तर प्रेयसीशी त्याची इच्छापूर्ती झाली म्हणून समजा, आणि जर तिच्या कोपास लायक बनलात तर त्याच्याशी प्रेयसीची इच्छा पूर्ण होईल आणि त्या इच्छेविषयी काय बरे सांगावे की, जी प्रियकराकडून पूर्ण होते. सच्ची प्रेयसी ती असते जी आपल्या इच्छांना प्रियकराच्या इच्छेवर ओवाळते.

''मी आहे आणि तू आहेस'' या तर इहलोकाच्या गोष्टी आहेत. प्रियकराच्या जगामध्ये 'मी आणि तू' नसतात.

प्रेम-भावनेचा पायाच दर्शनावर आधारित आहे. जेव्हा दृष्टी पडली, तेव्हा प्रेम निर्माण झाले म्हणून समजावे. 'Love at first sight' प्रथमदर्शनी प्रेम! प्रियकर हा उगीचच आपल्या सुंदर चेहऱ्याचा प्रकाश प्रदर्शित करीत नाही. फूल तोपर्यंत हातास लागत नाही जोपर्यंत काटा रूतणार नाही.

प्रियकर हा आपल्या मनोकामना पूर्तीसाठी प्रयत्नशील असतो. मात्र त्याला संयोगाची मैत्री मुळीच हाती लागत नाही. प्रियकराने आपले साहस-धाडस हे आपल्या प्रेयसीच्या मनोकामना पूर्ण करण्यामध्ये खर्च करावे. काहींचे असे मत आहे की जो प्रियकर स्वत:साठी चाहतो किंवा स्वत:स प्रियकरासाठी चाहतो तो सद्भावक नसतो, कारण की दोन्ही परिस्थितीमध्ये त्याचा अहंकार त्याच्या डोळ्यासमोर असतो; आणि ज्याचा अहंकार आपल्या दृष्टीक्षेपात आहे त्याला निष्कपट प्रेमाच्या जगाची कल्पना कशी असेल? निष्कपट प्रेमाच्या जगात त्याचे प्रेम त्याच्यासाठी आदरभावामुळे आहे आणि तो स्वत:स संपूर्णपणे नेस्तनाबूद जाणतो.

ब्रह्मांडाचा प्रत्येक कण अणू-रेणू हा आपल्या निर्मात्या परमेश्वराचा इच्छुक आणि प्रियकर असतो. एक कवी म्हणतो, ''हवेमध्ये जेवढे कण आहेत ते सर्व तुझे प्रियकर आहेत आणि ते परमेश्वराच्या प्रेमाच्या प्रकाशाने भरलेले आहेत. प्रकट आणि अप्रकट असे समस्त कण- इहलोक आणि परलोक या दोन्ही जगांमध्ये प्रेमाचा एक थेंब (कण) आहे. मूळ फ़ारसी काव्यचरण असे आहे -

*ज़र्रा ज़र्रा आशिक़ानत दर हवा*
*पुर शुदा अज़ पर्तौ इश्क़ ख़ुदा ।।*
*जुम्ला ज़र्रात पैदा व निहाँ*
*नुक़्तए इश्क़ अंद दर हर दो जहाँ ।।*

साधक शेख शर्फुद्दीन मनेरी यांनी धार्मिक श्रद्धेच्या आधारावर प्रेमाचे स्वरूप असे व्यक्त केले - ''जोपर्यंत तुम्ही श्रद्धाहीन बनत नाही तोपर्यंत प्रेम तुमचा खरीददार नसते, आणि जोपर्यंत तुम्ही नास्तिक होत नाही तोपर्यंत क़लंदरी (अवधूत) तुमचे काम नव्हे.''

प्रियकराशी प्रेयसीचे मान-अभिमान आणि हाव-भाव या संदर्भात साधक शेख मनेरी यांनी असे अभिव्यक्त केले की, प्रेमाच्या संदर्भात हे श्रद्धाहीन (ऐ काफ़िर), हे वि-भक्त (ऐ-मुश्रिका), हे मूर्तिपूजक (ऐ बुत परस्त), हे जनेऊधारक (ऐ ज़ुन्नारदार), हे कुत्रे तू माझ्या लायकीचा नाहीस- हे सर्व अपशब्द - ति (प्रेयसी परमेश्वरा)च्या कृपेमुळे आहेत. प्रेमजगतामध्ये याला मान-अभिमान आणि हाव-भाव आणि प्रियकराशी प्रेयसीचे चमत्कार असे म्हणतात. प्रियकरांच्या या संप्रदायास असे शब्द ऐकण्यामध्ये शब्दातीत असा आनंद प्राप्त होतो. 'ज्याने प्रेम चाखलेच नाही, त्याला काय कळणार?'

प्रियकराची प्रत्येक कृती ही प्रेयसीच्या कृतीच्या अनुकूल असावी. हे फार मोठे भाग्य समजावे की, प्रियकराने स्वत:स प्रेयसीमध्ये आत्मविलीन व्हावे. जे काही म्हणावे ते प्रेयसीच्या जिव्हेने बोलावे आणि जे काही ऐकावे ते प्रेयसीच्या कानाने ऐकावे. त्याचे प्रत्येक कार्य व आचरण हे प्रेयसीचे कार्य व आचरण असावे.'' तुमच्याकडून जी काही कृती घडते, स्वत:स त्यादरम्यान पाहू नका. ती परमश्रेष्ठ परमेश्वराची कृती आहे, यावर विश्वास ठेवा.''

प्रेमाच्या जगात काय-काय घडते हे प्रेषित यूसुफ़ आणि प्रेषित याक़ूब यांच्या दरम्यान घडलेल्या प्रसंगावरून चांगल्या प्रकारे कळून येते. ज्याला परमेश्वराचे दर्शन प्राप्त होत नाही त्याला त्याच्या निशाण्यांवरच संतोष प्राप्त होतो आणि हे त्या परिस्थितीमध्ये घडते की प्रेयसी ही पडद्याआड असेल. जर प्रेयसी ही पडद्याविना असेल आणि अशा स्थितीत समोर असेल तेव्हा निशाण्यांवर दृष्टिक्षेप करणे जोर-जुलूम असते (बनते) ''जेव्हा यूसुफ़चे प्रत्यक्ष दर्शन प्राप्त होत आहे तेव्हा येथे नातेसंबंधास वाव नाही.''

प्रेमी लोक हे चांगल्याप्रकारे जाणतात की, प्रेमाच्या विश्वामध्ये काय-काय बेतते. जेव्हा प्रेषित यूसुफ़ प्रेषित याक़ूबच्या दृष्टिआड झाले तेव्हा त्यांच्या डोळ्यांची दृष्टी गेली. जेव्हा यूसुफ़ नज़रेआड गेले तेव्हा यूसुफ़चे भाऊबंदपण दिसू लागेनासे झाले आणि जेव्हा प्रेषित यूसुफ़ यांच्या अंगरख्याचा वास आला तेव्हा त्यांची दृष्टी पुन्हा आली. ''ज्याच्यापाशी हरवलेला यूसुफ़ नाही, यद्यपि त्याच्यापाशी श्रद्धा आहे, तरी पण ती श्रद्धा परिपूर्ण नव्हे.''

एका स्वजनाचे कथन आहे - ''कर्मकांडाच्या (शरीअत) बाबतीत सावध राहा आणि परमेश्वराचे वेडे बनून रहा. प्रेमाशी परिचित राहा आणि विवेकबुद्धीशी अपरिचित.''

ख़्वाजा यहिया मआज़ राज़ी यांचे पण कथन आहे, ''मी जनसमूहामध्ये म्हणतो, हे माझ्या परमेश्वरा! एकांतात म्हणतो, हे माझ्या प्रियकरा (परममित्रा) आणि एकत्वेत (वहदत) म्हणतो, ''हे माझ्या'' हे कथन प्रत्येक दृष्टीने ठीक (योग्य) आहे. प्रत्येक दृष्टीने पसंत आहे आणि ग्राह्य आहे.

प्रेम मर्यादा पार करण्याचे नाव आहे. प्रेम ईश्वराच्या प्रेमामध्ये भक्ताचे-दासाचे मर्यादा पार करणे आहे. हे सत्य आहे. मर्यादा पार करणे हे भक्ता (दासा)कडून आहे. भक्ताने जेव्हा ईश्वरास आपला साथी बनवले तेव्हा तो दासत्वाची मर्यादा ओलांडून प्रियकराच्या स्थळामध्ये पोहोचतो, आणि जेव्हा परमेश्वराने दासास आपला मित्र मानले तेव्हा दास हा दासत्वाची मर्यादा ओलांडून प्रेयसीत्वाच्या स्थळामध्ये पोहोचतो.

सर्व तज्ज्ञांमध्ये हे सर्वमान्य आहे की त्रोटक अक्षरांचा (हुरूफ़-ए-मुक़त्तआत) संकेत प्रेमाकडेच आहे. मौलाना हमीदुद्दीन नागोरी यांनी अस्मा-उल्-हुस्ना (ईश्वराची पवित्र नामे)मध्ये हेच भाष्य प्रस्तुत केले आहे.

प्रेयसी ती असते जी आपल्या प्रियकराच्या प्रिय इच्छेस आपल्या प्रिय इच्छेपेक्षा श्रेष्ठ मानते. श्रेष्ठता आणि विवशतेच्या सुसज्जतेशिवाय प्रेम सुलभ होत नसते. प्रेयसीसाठी श्रेष्ठता आणि विवशता आहे; तर प्रियकरासाठी अपमान आणि भय. प्रेयसी स्वतःच आपल्या ज्ञानापर्यंत पोहोचवते. ती आपली ओळख स्वतःच देते.

बुद्धी आणि प्रेमामध्ये फरक आहे. जेथे प्रेम असते तेथे बुद्धी नसते. बुद्धीच्या कार्यपद्धतीमध्ये दोन गोष्टी असतात- (१) अशक्य आणि (२) शक्य. प्रेमाच्या पद्धतीमध्ये विभाजनच नसते. येथे सर्व शक्य असते आणि हीच ती गोष्ट आहे की, प्रियकर एकनिष्ठता ग्रहण करतात. त्यांच्याकडे निश्चलता असते. प्रियकरांपाशी देणे-घेणे, मनाई-स्वीकार (होकार-नकार), ग्राह्य-अग्राह्य, 'वफ़ा' व 'जफ़ा' (प्रतिज्ञापालन व जुलूम) सर्व एकच असतात, एकसमान असतात. प्रियकर निर्दयी असतात. याची कारणमीमांसा नसते. विजयी योद्ध्यांची तलवार श्रद्धाहीनांशी तो मामला करीत नाही जी प्रेमाची आग मजनूँशी करते.

२३

## प्रकरण – २३

# जपविज्ञान

### १) जप : भारतीय दार्शनिक दृष्टिकोन[७६]

वैदिक, पौराणिक, स्मार्त, तांत्रिक, बौद्ध, जैन या सर्व साधनांमध्ये जपाचे महत्त्व आणि आवश्यकता याची मुक्तकंठाने घोषणा करण्यात आली आहे. सूफ़ी साधक आणि फ़क़ीरांमध्ये आणि ईसाई (ख्रिश्चन) कॅथॉलिक संप्रदायाच्या भक्तांमध्ये जप ही प्रथा प्राचीन काळापासून प्रचलित आहे. योग्यांनी जपाच्या महत्त्वाविषयी गुणगान केले आहे. ते म्हणतात की, जप हे क्रियायोगाच्या अंतर्गत स्वाध्यायाचा एक प्रकार-विशेष मात्र आहे. चांगल्याप्रकारे विधिपूर्वक अनुष्ठान झाल्यानंतर त्यामुळे परमेश्वराचा प्रकाश आणि इष्टदेवाचा साक्षात्कार होतो आणि शिवाय इतर अनेक आनुषंगिक फलांची प्राप्ती होते. ज्या नादानुसंधानाच्या महिमेस हटयोगी, राजयोगी, मंत्रयोगी आणि लययोगी यांनी समान रूपाने घोषणा केली आहे, त्यास जपाच्याच एका विशिष्ट अवस्थेचे नामांतर म्हणणे अनुचित ठरणार नाही. प्राचीन व्याकरणकार याचे वाग्योग स्वरूपात वर्णन करीत असत आणि मुमूक्षू लोकांसाठी यालाच राजमार्ग मानून ते याची सर्वोपयोगिता स्वीकार करीत. मध्ययुगामधील संत-महात्मा 'सुरतयोग' नावाच्या ज्या योगमार्गाचे अनुसरण करीत होते, ते वाग्योगाचेच दुसरे प्रकारमात्र आहे. योगाची कठीण प्रक्रिया, यज्ञाचा जटिल विधी, ज्ञानमार्गाची विचारबहुल गंभीर भावना आणि भावभक्तीचे सरस उल्हास सर्व साधकांसाठी सुलभ नव्हते (नाही). परंतु जप सर्वांसाठी सुलभ, अल्पप्रयाससाध्य आहे. जप जर योग्यप्रकारे केला गेला तर त्यामुळे कर्म, ज्ञान, भक्ती, योग या सर्व साधनांचे फळ सहजच प्राप्त होऊन जाते. एवढेच नव्हे तर, सविशेष भावाची पूर्णता आणि सर्व विशेषांचे उपशम अर्थात ब्रह्माच्या महान आणि परमरूप नादाच्या आश्रयवश जापकासाठी ('ज़ाकिर') जेवढे सुगम होते तेवढे अन्य साधकांसाठी सुगम नसते.

शास्त्रामध्ये लिहिले आहे – शब्दब्रह्मामध्ये निष्णात झाल्यानंतर परब्रह्माची उपलब्धी होते. जर शब्दातीत परमपदाचे साक्षात्कार करायचे असेल तर शब्दाचा आश्रय घेऊनच शब्दराज्याचा वेध घेतला पाहिजे. समग्र विश्व शब्दापासूनच उद्‌भूत आहे आणि शब्दामध्ये विधृत आहे. काही शास्त्र-वचनांमुळे ज्ञात होते की, शब्दच सृष्टीचे मूळ आहे. जर सृष्टीपासून बाहेर जायचे आहे तर शब्दच एकमात्र अवलंबन (आधार) आहे; म्हणूनच जपसाधनेमध्ये शब्दाचा अवलंब करूनच शब्दातीत परब्रह्मपदामध्ये जाण्याचा उपदेश दिला गेला आहे.

वैखरी, मध्यमा, पश्यंती आणि पराच्या भेदामुळे चार प्रकारच्या वाणींचे वर्णन शास्त्रांमध्ये आढळते. वैखरी वाणी शब्दाचे निम्नतम स्तर रूपाने प्रसिद्ध आहे. याचा आधार घेऊन क्रमश: परावाक् पर्यंत अग्रेसर होण्याची

आणि नंतर तिला पण ओलांडण्याची आवश्यकता असते. वैखरी इंद्रियगोचर समग्र स्थूल विश्वामध्ये आणि स्थूल देहामध्ये अनंत प्रकारे त्या त्या स्थानानुसार कार्य करत असते. ''वैखरी विश्वनिग्रहा आहे.'' जर हिचे अतिक्रम होऊ शकले नाही तर मनुष्य स्थायी स्वरूपात बहिर्मुखवृत्तीचा त्याग करून आंतरवृत्ती ग्रहण करू शकत नाही.

आत्मे स्वरूपत: पूर्ण प्रकाशात्मक परमेश्वररूप, स्वतंत्र आणि भोक्ते आहेत, तरी पण स्वेच्छापूर्वक जीवभाव ग्रहण करण्यासोबतच त्यांचे स्वातंत्र्य आणि भोक्तृत्व लुप्तप्राय होऊन जाते. आत्म्यामध्ये अखिल शक्तींच्या अभेदामुळे समन्वय आहे, म्हणून आत्म्याचा पूर्ण अहंभाव स्वभावसिद्ध आहे. 'अ' पासून ते 'ह' पर्यंतचे सर्व वर्ण (अक्षर) अथवा शक्तींचा परस्पर आणि आत्म्याशी अभिन्नरूपात अखंड भावामध्ये स्फुरित होणेच आत्म्याची पूर्ण अहंता आहे. याचेच नामांतर चैतन्य, विमर्श, स्वातंत्र्य अथवा ऐश्वर्य आहे. या सर्व अकारादि वर्णां (अक्षरां)चे वाच्य, अनुत्तरादि विमर्श आत्म्याचे स्वविमर्शाचेच स्वरूपभूत आहेत. अखंड स्थितीमध्ये ते सर्व एक आणि अभिन्नरूपामध्येच प्रकाशित होतात. परंतु आत्म्याच्या स्वेच्छापूर्वक सृष्टीमध्ये उन्मुख होण्याने त्याचे स्वरूपाश्रित स्वविमर्शाच्या लेशरूपामध्ये अनुत्तरादिचे वाचक पूर्वोक्त अकारादि वर्ण उद्‌भावित होतात. अद्वैतस्थितीमध्ये ज्या सर्व शक्ती अभिन्नरूपात आंतरशब्द अथवा स्वभावरूपात विद्यमान असतात, ते आपल्या स्वरूपामध्ये अक्षुण्ण असूनसुद्धा सृष्टीच्या उन्मेष दशेमध्ये जणू अंशत: विभक्तरूपाने क्रमश: ब्राह्मी आदी अष्टवर्गशक्ती आणि अ, आ आदी पन्नास रूद्रशक्तींमध्ये अवतीर्ण होतात. नंतर त्या सर्व शक्तींपासून पद आणि वाक्यसमूह रूपामध्ये असंख्य क्षुद्र शक्ती आविर्भूत होतात. अकार आदी, आत्म्याचे आपले विमर्शस्वरूप आणि स्वत:शी अभिन्न असून पण अज्ञानावस्थेमध्ये आपल्या आत्म्याहून भिन्न रूपामध्ये प्रतीत असल्याकारणाने कला (शक्ती) किंवा अंश या नावानी ओळखले जातात. याच मातृकाशक्ती आहेत. यांच्याद्वारे आत्म्याचे स्वकीय ऐश्वर्य तर विभव (शंकराचार्यांनी दक्षिणामूर्ती स्तोत्रामध्ये महाविभूती नावाने ज्याचा उल्लेख केला आहे.) विलुप्तप्राय होऊन जाते. कला (शक्ती) आत्मस्वरूपापासून उत्पन्न होऊन आत्म्याच्या ऐक्यभावास लपवितात, तेव्हा शिवरूपी आत्मे जीव अथवा पशुरूपामध्ये आविर्भूत होतात. हेच त्यांचे स्वरूपसंकोच अथवा अणुभावप्राप्ती आहे. तेव्हा ही अणुरूपी प्रमाता पूर्ववर्णित अष्टवर्गीय ब्राह्मी आदि शक्ती, अकारादी रूद्रशक्ती आणि त्यांच्यापासून उत्पन्न पद-वाक्यादिमय असंख्य क्षुद्र शक्तींचे खेळणे बनून जाते. मातृका अणुजीवाच्या प्रत्येक संवेदनेमध्येच अंत:-परामर्शनद्वारे स्थूल-सूक्ष्म शब्दानुवेध करतात आणि वर्ग, वर्गी आदी देवतासमूहाच्या अधिष्ठानाद्वारे चित्तामध्ये काम, क्रोध, लोभ, मोह, राग, द्वेषादी भाव अथवा वृत्तींना उद्‌भावित करतात. अशा प्रकारे आत्म्याचे असंकुचित स्वातंत्र्यमय चिद्‌घनस्वरूप आच्छन्न होऊन जाते आणि देहात्मभाव, पारतंत्र्य आणि पाशबंधनाचे सूत्रपात होते.

मातृकांचा हा लयविक्षेपकारक प्रभाव वैखरी वाक्‌मध्ये अत्यंत प्रस्फुट असतो. चित्-उन्मेषाच्या अभाववश साधारण मनुष्य वैखरीभूमीमध्ये आबद्ध असतात. याचे उल्लंघन करून मध्यमेमध्ये प्रवेश करू शकत नाहीत. वैखरी वाक्‌चे कार्यक्षेत्र स्थूल असूनसुद्धा त्याचा प्रभाव अशुद्ध मनोमय स्तर, सूक्ष्म भूत आणि लिंग शरीरामध्ये पण दिसून येतो. काळाच्या आवर्तनामुळे पर्यायक्रमाने स्थूल आणि सूक्ष्म भावांचा उदय आणि अस्त होत राहतो. पहिल्यांदा स्थूलाकडून सूक्ष्माकडे गती होते. दुसऱ्या वेळेस सूक्ष्मापासून स्थूलामध्ये प्रत्यागमन होते, तद्‌नंतर स्थूलापासून पुन्हा सूक्ष्माकडे प्रवाह प्रवाहित होतो. अशाप्रकारे निरंतर स्थूल आणि सूक्ष्माचे आवर्तन होत

असते. जागृती, स्वप्न आणि सुषुप्तिचे आवर्तन या महाआवर्तनाचेच एक लेश-मात्र आहे. गतीचे हे आवर्तन वैखरी भूमिका वैशिष्ट्य आहे. मलिन वासनेमुळे गतीची वक्रता संपन्न झाल्यामुळे निम्नभूमीमध्ये आवर्तन स्वाभाविक आहे. त्याच्यापासून सुटका करून घेण्याचा एकमात्र उपाय गुप्तमार्गाच्या अवलंबनाद्वारे सरळ गतीच्या मदतीने वरच्या बाजूस (चे) क्रमिक आरोहण आहे. मध्यमा-क्षेत्रापासूनच याचा आरंभ होतो.

मध्यमा भूमीस मंत्रमयी म्हटले जाते, कारण की मंत्रमय स्वरूपामध्येच वाक स्वत:स प्रकट करते. मनाचे शोधन आणि त्याच्यामुळे विज्ञानाचे दार उघडण्याच्या सामर्थ्याची प्राप्ती क्रमश: याच स्थानामध्ये होते. मनुष्यकंठापासून वैखरी वाक् उत्थित होते. तिच्या मुळात मानसिक चिंतन (चेतन आणि अचेतन दोन्ही क्षेत्रांमध्ये) आणि मनोगत भाव जोडलेला असतो. योगी लोक शब्द, अर्थ आणि ज्ञानाच्या सांकर्याची जी गोष्ट सांगतात ती या वैखरी भूमीच्या शब्दास अनुलक्षूनच म्हणतात, असे जाणले पाहिजे. स्मृति-परिशुद्धीद्वारे सांकर्याचा परित्याग वैखरी भूमीपासून मध्यमा भूमीमध्ये प्रवेशाचे आनुषंगिक परिणाममात्र आहे. वाक्सोबत प्राणशक्ती आणि मन:शक्ती अविनाभूत स्वरूपाने विद्यमान असतात आणि प्राणसूत्रास धरून पृथ्वी,आप, तेज, वायु आणि आकाश या पंचमहाभूतांचा पण संबंध आहे. याशिवाय चित्ताचा संबंध तर आहेच; परंतु वैखरीस्तरावर हा चिदंश अच्छन्नप्राय असतो. साधारणपणे याचा आभास दिसत नाही. म्हणून तर तेव्हा हे असूनही नसल्यासारखे असते. म्हणून या भूमीमध्ये मनोमय, प्राणमय आणि अन्नमय या तीन निम्नवर्ती कोषांकडे आकर्षण असते. मन आणि प्राण क्रियामुक्त स्थूल देहाप्रती आकर्षण याचेच नामांतर आहे. म्हणूनच या भूमीमध्ये देहात्मबोध प्रबळ असतो. विषयांप्रती आसक्तीच्या तीव्रतेमुळे विवेक, वैराग्य इत्यादी कोमल भाव दबलेले असतात. मध्यमा-क्षेत्रामध्ये नादमय चिद्रश्मी नित्य विराजमान असतात. या सर्व रश्मी स्वरूपात: वैखरीभूमीमध्ये दृष्टिगोचर नसतात. वैखरीमध्ये हे सर्व अवतीर्ण झाल्यावर नाना प्रकारचे वर्ण पण इंद्रियगोचर उज्ज्वल प्रकाश स्वरूपामध्ये प्रतिभासमान होतात. त्यांच्याशी चिद्नुसंधान नसते. म्हणूनच सूक्ष्मतम चैतन्याचे मिश्रित अनुभव, वैखरीपासून उत्तीर्ण होऊन जोपर्यंत मध्यमामध्ये पोहाचले जात नाही तोपर्यंत येत नाहीत.

म्हणून कोणत्या का उपायाने होईना, वैखरीपासून भूमीवर उत्थान अत्यंत आवश्यक आहे. या उत्थानव्यापारामध्ये एकीकडे गुरूशक्ती आणि दुसरीकडे आपले प्रयत्न अपरिहार्य आहेत. या क्रमिक विकासाच्या कार्यामध्ये जपसाधन परम साहाय्यक आहे. ईश्वर-प्रणिधान किंवा भजन, निष्काम कर्मयोग आणि भौतिक देह व चित्त संस्कारमूलक आत्मशोधन या उत्थानकार्यामध्ये यथाशक्य मदत करतात. साधकाची दृष्टी याच भूमीमध्ये प्रत्यावर्तित होऊन अंतर्मुखी होऊ लागते. वैखरी भूमीमध्ये लक्ष (उद्दिष्ट) बाहेरच्या बाजूस आणि खालच्या बाजूकडे (तळाकडे) असते. अर्थात मूलाधाराकडे असते; परंतु मध्यमाभूमीमध्ये ते लक्ष परिवर्तित होऊन जाते, तेव्हा लक्ष बाहेरच्या बाजूस अथवा खालच्या तळाकडे न जाता आत(मध्ये) किंवा वरच्या बाजूस आकृष्ट होते. मूलाधारऐवजी सहस्रारकडे अथवा गुरूधामकडे किंवा अखंड नित्य सत्तेकडे लक्ष प्रस्थापित होते. विषयासक्तीशून्य चित्त तेव्हा शुद्ध होऊन जाते. मानवादी अन्य उपायांनी पण मध्यमाभूमीवर उत्थान होऊ शकते, परंतु जपसाधनेची सुकरता अन्य साधनांपेक्षा अधिक आहे. मध्यमा शब्दाचा अर्थ आहे- जे दोन प्रांतां(क्षेत्रां)च्या किनाऱ्यांशी मध्यवर्ती आहे, ते आहे मध्यमा. तिच्या एका किनाऱ्यावर दिव्य पश्यंती वाक् आहे आणि दुसऱ्या किनाऱ्यावर पाशव वैखरी वाक् आहे. या दोहोंच्या मध्यावर संयोजक सेतूस्वरूप मध्यमा वाक्

क्रियाशील आहे. म्हणून जर पशुभावापासून दिव्य भावामध्ये जायचे असेल तर या मध्यपथरूपी सेतूचा आश्रय घेणे आवश्यक आहे.

या अगोदर सांगितले गेले आहे की, वैखरी वाक् अथवा लौकिक शब्दामध्ये चैतन्याची रश्मी प्रच्छन्न (अस्फुट) असते, परंतु मध्यमा वाक्मध्ये ती प्रच्छन्न असत नाही, परंतु प्रस्फुट असते. या सर्व रश्मी नादरूपी सूत्राचे अवलंब करून अनंत आकाशांमध्ये व्याप्त असतात; म्हणून मूळामध्ये सर्व बीजात्मक असतात आणि बीज बिंदूरूपी केंद्रामध्ये नित्य अवस्थित आहे. वैखरी वाक् जसे व्यक्त आहे तशी मध्यमा व्यक्त आहे असे म्हणता येणार नाही, परंतु व्यक्तता मध्यमेमध्ये आहे (जरूर) – व्यक्त (मात्र) अव्यक्ततेसोबतच. यामुळेच अर्थात मध्यवर्ती असल्याकारणाने मध्यमेस व्यक्त आणि अव्यक्त अशी उभयात्मक म्हटले जाते.

मंत्र चिद्रश्मिमय असतात. वैखरी भूमीमध्ये चिद्भाव गुप्त असल्यामुळे आणि वाणी असंस्कृत असल्यामुळे वैखरी वर्णाच्या मंत्रमयतेचा स्वीकार होत नाही; परंतु स्वरूपतः त्याची मंत्रात्मकता नसताना पण मंत्रमय चिद्रश्मिची वाचक असल्यामुळे वैखरी वर्णापासून उद्भूत सर्व स्थूल विद्यांनापण 'मंत्र' ही संज्ञा दिली जाते. या प्रसंगी मीमांसक लोकांच्या मंत्रात्मक देवतावादाची आठवण होते.

मध्यमाच्या पलीकडे पश्यंती किंवा दिव्य वाक् असते (आहे). एका परीने हे अव्यक्त असते. या वाणीमुळे सर्व देवता प्रकाशित होतात. ह्या सर्व देवता सर्वज्ञ आहेत आणि समग्र विश्वाच्या कार्यामध्ये आपापल्या अधिकारानुसार व्याप्त राहतात. फक्त देवतांचे प्रकाशनच पश्यंती वाक्चे कार्य नसते– विष्णुच्या परमपदापर्यंत पश्यंती वाक्मुळेच दृष्टिगोचर होतात. सूरिगण जे परम पदाचे निरंतर दर्शन करतात ते याच भूमीपासूनच करतात असे समजावे. वास्तविक पश्यंती वाक्मध्येच कारणस्थ चैतन्याची स्फूर्ति होते– हेच देवतेचे स्वरूप आहे. प्राचीन काळी मंत्रसाक्षात्कारामुळे जे ऋषित्व प्राप्त व्हायचे, ते याच पश्यंती भूमीच्या लाभाचे फळ आहे. हीच आत्म्याची अमृता कला अर्थात  शक्ती आहे. पश्यंतीचे स्वरूप दिसल्यानंतर अधिकाराची निवृत्ती होऊन जाते. एका दृष्टीने पाहिल्यास पश्यंतीनंतर वाक्च्या आणखी उच्चतर अवस्थेची कल्पना नसते. म्हणूनच प्राचीन आचार्यांपैकी अनेक लोकांनी वाक्च्या विविध (त्रयीवाक्) रूपाचे वर्णन केले आहे. तरी पश्यंतीची पण एक परावस्था आहे. याचा अंगीकार केला पाहिजे. म्हणूनच कुणी कुणी नामतः परावाक्चे स्वीकार न करून सुद्धा ''तस्याः वाचः परं पदम्'' असे म्हणून प्रकारांतराने तिचा स्वीकार करण्यास बाध्य झाले आहेत.

हे परावाक् चिन्मय आणि परम अव्यक्त आहे. या भूमीत व्यष्टिदेवतेचा प्रकाश नसतो. समष्टी देवता अथवा ईश्वर चैतन्यामध्ये समस्त वाक् परिसमाप्त झाले आहे. हे वाक् सृष्टीच्या ऊर्ध्वतम शिखरापासून ते निम्नतम भूमीपर्यंत समान रूपाने व्याप्त आहे. हे ऊर्ध्व सहस्राच्या सर्वोच्च अग्रभूमीपासून उत्थित होऊन मूलाधारापर्यंत व्याप्त आहे. जसे हे सांगितले जाऊ शकते तसेच हे मूलाधारचे निम्नस्थित महाकारण समुद्रामध्ये प्रकाशमान अधः सहस्रारपासून उठून ऊर्ध्व सहस्रारचे द्वादश दलामध्ये वाग्भवकूटपर्यंत व्याप्त आहे, हे पण सांगितले जाऊ शकते. काहींनी असे म्हटलेही आहे. वास्तविक पक्षामध्ये ऊर्ध्व सहस्रारच्या भिन्न-भिन्न स्तरांमध्ये या तीन वाणींचा उद्भव आहे. त्यापैकी एकीचा (मध्यमाचा) विस्तार खालच्या बाजूस हृदयापर्यंत आहे. दुसरीचा (पश्यंतीचा) नाभी (बेंबी) किंवा तिच्या थोड्या खालपर्यंत आहे आणि तिसरीचा (पराचा) मूलाधारा पर्यंत विस्तार आहे. खाली–वर सर्व देशव्यापी सत् रूप चैतन्यच परावाक्चे तात्पर्य आहे. याचेच नाव नित्य अक्षर आहे.

या अवस्थेनंतर मग शब्दाची गती नाही. मध्यमा वाक्‌पासून या अक्षरब्रह्मापर्यंत योग्याची गती शब्दब्रह्माच्या अंतर्गत आहे. अक्षर-ब्रह्म-भेद झाल्यावरच परब्रह्माचे द्वार उघडले जाते. परब्रह्म शब्दातीत आहे. म्हणूनच शास्त्रकारांनी म्हटले आहे - ''शब्दब्रह्माणि निष्णात: परं ब्रह्माधिगच्छति।''

जितक्या लांब (दूर)वर शब्दाचा विकास आहे तितक्या लांबपर्यंत आकाशाची कल्पना असते. जो नित्य अक्षर अथवा सत् आहे त्याचेच नाव परमाकाश आहे. याचे विभिन्न प्रस्थान आणि वैदिक मंत्र इत्यादीमध्ये पण परमव्योम या नावाने निर्देश आहे. जी शब्दातीत अवस्था असते, तेथे आकाश नसते. तेथे शिव आणि शक्ती ही दोन तत्त्वे युग्म स्वरूपात विराजमान असतात. युगलभाव, यामलभाव अथवा युगनद्धभाव शिव-शक्तीच्या या अविनाभावाचीच सूचना देतात. समना आणि उन्मना या दोन्ही शक्ती ब्रह्मशक्ती आहेत. समना शक्तीतत्त्वाच्या आश्रयाने परब्रह्माच्या इच्छेनुसार सृष्टीचा विस्तार करते, तर उन्मना ही शिवतत्त्वाचा आश्रय ग्रहण करून परब्रह्माची विमर्शहीन दिशेकडे उन्मुख होते. शिव आणि शक्ती अभिन्न आहेत, म्हणून यापैकी एकास सोडून कोणतेच अवस्थान होऊ शकत नाही. यानंतर मात्र कोणतेच तत्त्व नाही- तत्त्वातीत अद्वैत स्थिती आहे.

परंतु या अद्वैतामध्येपण दिशांचा पत्ता लागतो. त्यापैकी एक आहे आनंद सच्चिदानंदाची दिशा, जी विश्वातीत असून, ही सूक्ष्मतम ध्यानगम्य असल्याकारणाने आरोप या दृष्टीने किंचित वर्णनीय आहे. आणि दुसरी (दिशा) आहे सर्वप्रकारे निर्विकल्प आणि ध्यानसमाधीची अगोचर (दिशा). प्रथम अवस्थेमध्ये स्वशक्ती परिस्फुट आहे आणि द्वितीय अवस्थेमध्ये ती अस्फुट अथवा अव्यक्त आहे, परंतु ती नाही असे म्हणता येणार नाही. वास्तविक या दोन्ही दिशा अभिन्न आहेत. तेथे निष्कल आणि सकलमध्ये पण भेद कल्पनेस अवकाश नसतो. हेच परमाद्वैताचे रहस्य आहे. एकाच अखंड स्वरूपामध्ये विश्व आणि विश्वातीत, अमात्र आणि अनंतमात्र (मांडूक्यसारिका, १/२९). निष्कल आणि सकल, निष्क्रिय आणि अनंतक्रिय, अक्षर आणि क्षर स्वयंप्रकाश अद्वयरूपामध्ये विराजमान असतात. काळ तेथे काळातीताशी एक होऊन प्रकाशमान असतो.

**जप विवेचन**

परमपदामध्ये प्रवेश करून स्वभावाची धारा प्राप्त करण्यासाठी **जप** हा एक अन्यतम श्रेष्ठ उपाय आहे. जपाचे नाना भेद आहेत. त्यांपैकी बाह्य आणि आंतर हे दोन मुख्य आहेत. शास्त्रांमध्ये **वैखरी-जप** म्हणून ज्याचा निर्देश आहे, तेच **बाह्यजप** होय. ही प्रारंभिक क्रिया आहे. **आंतरजप** यापेक्षा श्रेष्ठ आणि सूक्ष्म आहे. बाह्योपासनेहून जशी आंतरउपासना श्रेष्ठ आहे, तद्वत बाह्यजपाहून आंतरजप पण श्रेष्ठ आहे. विधिपूर्वक नाना प्रकारच्या वर्णांचे उच्चारणच बाह्यजपाचे लक्षण आहे- याचा आचार्यांनी विकल्पात्मक संजल्प नावाने उल्लेख केला आहे. जे परमपथाचे आणि परमपदाचे अभिलाषी (इच्छुक) आहेत त्यांच्यासाठी क्रमश: बाह्यजपापासून विमुख होऊन आंतरजपाकडे वळणे आवश्यक असते.

प्रथम आरंभ वैखरीपासूनच होतो. कर्तृत्वाभिमान धारण करूनच संकल्पपूर्वक कर्मामध्ये प्रवृत्त झाले पाहिजे. कंठजपच वैखरी जपाचे स्थूल लक्षण आहे. वाचिक, उपांशु आणि मानसिक - हे तीन प्रकारचे जपच वैखरीचे अवांतर भेद आहेत. या तिन्ही प्रकारांमध्ये जप करण्याचा भाव असतो. मानसकर्म हे जसे कर्म आहे तसेच मानसजप पण वास्तविक वैखीरशिवाय आणखी काहीच नाही. मानसजप करण्याच्या मुळात आणि कर्ता स्वरूपात 'अहं'भाव अक्षुण्ण असतो. अर्थात 'मी जप करीत आहे', **'जप करणे'** हा भाव स्फुट अथवा अस्फुट

स्वरूपात विद्यमान असतो. यानंतर हळूहळू दुसऱ्या अवस्थेचा उदय होतो. तेहा कंठ-रोध होतो, प्रयत्नाने जप करणे तेव्हा शक्य नसते. क्रियाशील नाड्या काही अंशामध्ये निरूत्तर होऊन जातात. तेव्हा जप आपोआपच आतमध्ये चालत असतो. याचे नाव **'जप होणे'** असे आहे. हे स्वभावाचे जप आहेत. याचे तीन भेद (प्रकार) आहेत. पहिल्या प्रकारामध्ये हृदया (अंत:करणा)मध्ये जप होतो, त्यानंतर द्वितीय अवस्थेमध्ये नाभी अर्थात बेंबीमध्ये होतो आणि शेवटी मूलाधारामध्ये होतो. हृदयजपासच मध्यमा-मार्गामध्ये प्रवेश समजले पाहिजे. त्या अवस्थेमध्ये नाद आपोआप चालू लागतो. मध्यमामध्ये प्रवेश होईपर्यंत केवळ बाह्य जपाने नादश्रुती होत नाही. बाह्यजपामध्ये मंत्राक्षरांचे वेगवेगळे उच्चारण असते, म्हणून तो विकल्पमय असतो. म्हणून तो स्वतंत्र मंत्र नाही. मध्यमाभूमीमध्ये जेव्हा नादासोबत मंत्र स्वाभाविकपणे ध्वनित होऊन जातो तेव्हाच त्याला आंतरजप म्हणून ओळखावे. आपल्या विषयांशी इंद्रियांचा संचार थांबवून आंतरिक नादाचा उच्चार केला पाहिजे. परमभावाकडे जी पुन्हा पुन्हा भावना असते तीच आंतरजप अर्थात नादाची प्रकट अवस्था आहे.

हृदयकमलाच्या मधोमध जे आकाश दिसते, उपनिषदांमध्ये याचे हृदयाकाश म्हणून वर्णन केले गेले आहे. त्या हृदयाकाशामध्ये म्हणजेच त्या अनाहत प्रदेशामध्ये नेहमीच भगवतीचे आनंदमय स्वरूप नादरूपामध्ये परिवर्तित होऊन चहुकडे पसरतो. आपले मन सर्वसाधारणपणे बहिर्मुख असते म्हणून नादची कल्पना येत नाही. (त्याचा पत्ता लागत नाही), परंतु गुरूकृपेमुळे जेव्हा मन अंतर्मुख बनते तेव्हा स्पष्टपणे त्याचा परिचय प्राप्त होतो. त्याच्या प्रभावामुळे मग डोळ्यांमधून अश्रू प्रवाहित होऊ लागतात, संपूर्ण शरीरभर रोमांच उभे राहते आणि इतर सात्त्विक भावांचा आविर्भाव होतो.

शुद्ध विद्याभूमीमध्ये स्थित विश्वेश्वररूपी श्रीगुरू मुख-निसृत वाणी मध्यमा वाणी स्वरूपात प्रकट होते. सहस्रकमलदलाच्या हृदयापर्यंत या वाणीच्या विस्ताराची अनुभूती होते. या वाणीच्या प्रभावामुळे मायेचे आवरण क्रमश: हटत असते आणि साधकाचे आपले स्वरूप सद्विद्यायुक्त बनून पुरुष आणि प्रकृतीच्या एक अभिन्न ज्ञानाच्या अंतर्गत रूपामध्ये बोध (निर्माण) करू लागते. नऊ नादांपैकी याला प्रथम नाद समजले पाहिजे.

महर्षी पतंजलि यांच्या निर्देशानुसार मंत्र-जपासोबत मंत्रार्थाची भावना पण आवश्यक असते. भावना आणि जप हे परस्पर अच्छेद्य स्वरूपात जोडलेले आहेत. आगमरहस्यवेत्ते विद्वान म्हणतात की, जपासोबत मंत्राच्या अवयवसमूहामध्ये सहा शून्य, पाच अवस्था आणि सात विषुवांची भावना केली पाहिजे. सहा शुन्यांपैकी पाचांचे वर्णवैचित्र्यमय आपापले पृथक मंडलाकार रूप आहे, परंतु सातवे अनुत्तर किंवा महाशून्य आहे. पहिल्या पाच शून्यांना निराकार आहेत, असे म्हणवत नाही, कारण की जोपर्यंत मनाचे स्पंदन असते, तोपर्यंत कोणत्या ना कोणत्या प्रकारचे अतिसूक्ष्म आकाराचा संबंध असतोच. परंतु सहावे शून्य मनापासून अतीत असल्या कारणाने वास्तविक निराकार, महाशून्य आहे. प्रणव अथवा बीजमंत्राचे प्रथम तीन अवयव जागृती, स्वप्न आणि सुषुप्तीचे द्योतक आहेत. त्यांच्यानंतर जे जे सूक्ष्मतर अवयव आहेत, त्यांमध्ये सर्वच्या सर्व वास्तविक तुरीय आणि तुरीयातीत अवस्थेच्याच अंतर्गत आहेत. या सर्व अवयवांची नावे अशी आहेत - बिंदु, अर्धचंद्र, रोधिनी, नाद, नादांत, शक्ती, व्यापिनी, समना आणि उन्मना. प्रथम तीन अवयवांशी हे नऊ अवयव मिळवल्यास (जोडल्यास) बारा अवयव होतात. यांपैकी प्रत्येक द्वितीय अवयवासच शून्यरूप मानले पहिजे. याचे अत्यंत गंभीर रहस्य आहे, परंतु येथे त्याचे विवेचन अनावश्यक आहे. अशाप्रकारे दुसरे, चौथे, सहावे,

आठवे, दहावे आणि बारावे- हे सहा अवयव शून्यपदवाच्य आहेत. त्यांपैकी प्रथम पाच अवांतर शून्य आहेत आणि सहावे महाशून्य आहे. पाच निम्नवर्ती शुन्यांमध्ये क्रमविकास आणि क्रमलयाची अनुभूती केली जाते, जिच्या साधनमार्गामध्ये प्रविष्ट व्यक्तीच गुरूकृपेमुळे थोडीबहुत धारणा करू शकते.

ज्या अवस्थेमध्ये दहा इंद्रियांद्वारे जागतिक व्यापार संपन्न होते तिला जागृत अवस्था असे म्हणतात. वास्तविक प्रकाश याचे कारण आहे, म्हणून प्रकाशाचीच जागृत स्वरूपात कल्पना करण्याचे विधान (प्रथा) आहे. ज्या अवस्थेमध्ये आंतरिक चार प्रकारच्या साधनांद्वारे व्यवहाराची निष्पत्ती होते, तिचे नाव स्वप्नावस्था आहे. स्वप्नामध्ये विद्यमान अंत:करणवृत्तीचा लय झाल्यावर सर्व इंद्रियांचे उपशम ज्या अवस्थेमध्ये उदित होते तिचे नाव सुषुप्ती आहे. सुषुप्तिभावनेचे स्थान भ्रूमध्यामध्ये स्थित बिंदूमध्ये आहे. या बिंदूस हृल्लेखाचा ऊर्ध्वबिंदू समजले पाहिजे. स्वात्मचैतन्याच्या अभिव्यक्ती हेतू नादाचा अविर्भावच तुरीयाचे स्वरूप आहे. अर्धचंद्र, रोधिनी आणि नाद या तीन मंत्रावयवांमध्ये याची कल्पना केली पाहिजे. तुरीयातीत अवस्था परमानंद स्वरूप आहे. ही जरी मन आणि वाणीपासून अतीत आहे तथापि मन आणि वाणीचा आभास देहामध्ये अवास्थिती काळात अधिकारानुसार कुणा-कुणाचे राहूनच जातो. नादांतापासून शक्ती, व्यापिनी आणि समनानंतर उन्मनापर्यंत तुरीयातीत अवस्था व्याप्त असते. उन्मनानंतर पुन्हा कोणत्याच प्रकारची अवस्था नाही.

मात्राहीन अथवा अमात्र शिवस्वरूप आत्म्यामुळे चित्कलेचा आभास बिंदू अथवा विशुद्ध सत्त्वरूप आरशामध्ये पडून त्यामध्ये अवस्थित स्थिरीकृत मात्रेस आघात पोहोचवतो. जर मात्रा त्या आभासास धारण करू शकत असेल तर तो साधक अथवा योगीच्या योगानुभूतीच्या भूमीस्वरूपात गणला जातो – एक मात्रा विभक्त होऊन अर्ध मात्रेमध्ये परिगणित होते. एक मात्रा आणि अर्ध मात्रेचे संधिस्थान अत्यंत गुह्य आहे. स्थूल विश्वाची अनुभूती मनाच्या ज्या मात्रेमुळे होते तिला एक मात्रा म्हणून स्वीकारले जाते. स्थूल लौकिक अनुभूतीचे आरंभ त्या एक मात्रेने होते. मात्रेचे अधिक्य जाड्यबुद्धीमुळे होते. मनाचे सर्वचे सर्व क्षेत्र चेतन अथवा बोधमय नसते, त्यामध्ये अवचेतनाचा अंश पण असतो. आपल्या स्मृतीमध्ये जे नाव किंवा शब्दराशी संचित असते, ते आपल्या अनुभवाचेच परिणाम असते. हा अनुभव स्थूलविशेषामध्ये मनाच्या एकाग्रतेमुळे उदित होतो. भलेही ती एकाग्रता आंशिक असो, की पूर्ण असो. म्हणून त्या शब्दाच्या आठवणीसोबत शब्दाचा अर्थ अथवा रूप चित्तक्षेत्रामध्ये जागृत होते. वाचकाच्या स्मरणामुळे वाच्याची स्फूर्ती होऊन जाते. साधकाचे कर्तव्य आहे- साधनेचा उद्देश आहे- आपल्या मनास एकाग्र करणे अथवा केंद्रामध्ये स्थापित करणे अर्थात एक मात्रेत स्थित ठेवणे. समाधीच्या अभ्यासाचा वास्तविक उद्देश पण हाच आहे. साधारणपणे मन एका मात्रेमध्ये राहत नाही. विक्षिप्त आणि क्षिप्तावस्थेमध्ये चंचलतेवश मात्रेचे बाहुल्य होऊन जाते. मूढ अवस्थेची गोष्ट येथे करण्याची गरज नाही. मन उत्थित होऊन जर एकमात्रामध्ये स्थित होत असेल तर वरून त्यामध्ये गुरूकृपारूपी चिद्रश्मिचे संपात होते. त्या करणामुळे एक मात्र स्वस्थानी एक मात्रा स्वरूपामध्ये अक्षुण्ण राहून पण विश्वाच्या ऊर्ध्वामध्ये अर्ध मात्रा इत्यादी रूपामध्ये परिगणित होते.

येथून सीमाहीन अनंताकडे गतीची सूचना प्राप्त होते. दिव्य अनुभूतीचा आरंभ होतो. चिद्-रश्मिच्या संपाताच्या वृद्धीनुसार मात्रांचे भग्नांश वाढत जाते. अर्थात मात्रा क्रमशः न्यूनपासून न्यूनतर होत जाते आणि प्रतिफलित चैतन्य क्रमश: अधिकतर उज्ज्वल आणि स्पष्ट होत असते. ज्या स्थानी चिद्रश्मिचे संपात होते त्यास

एक मात्रा आणि अर्ध मात्रेची संधी समजले पाहिजे. वरून एका मात्रेमध्ये त्या रश्मीचे पडल्यामुळे वरून एक मात्रा तुटण्यास आरंभ होतो, परंतु खालची एक मात्रा अक्षुण्णच राहते. ही एक मात्राच समस्त स्थूल विश्वाचा मध्यबिंदू आहे. लौकिक विशाल जगत् या एक मात्रामध्ये उपसंहृत होते आणि येथूनच प्रबुद्ध होऊन दाही दिशांमध्ये स्तर-स्तरावर पसरून जाते. या मात्रेस एका दृष्टीने सुषुप्तीची तुल्यधर्मा म्हटले जाऊ शकते. त्याच दृष्टीने अर्धमात्रादि तुरीय आणि अतितुर्य अवस्थेच्या आभासाचे ज्ञापक मानले जाऊ शकतात. मनाची मात्रा जेवढी विस्तृत होते तेवढेच मनाचे अंश क्षुद्रतर (न्यूनतर) होत जाते, तेवढेच चिदालोक उज्ज्वलतर होत जाते. अर्धमात्रादीमध्ये प्रतिफलित जे चैतन्य आहे, तेच मंत्र आहे. जे चित्त त्याचे आधार आहे त्यास पण मंत्र असे म्हणतात.

बिंदूच मात्रेपासून मात्राहीनतेकडे जाण्याचे द्वार आहे. तेथे ज्ञाता, ज्ञेय आणि ज्ञान एकाकार होऊन जातात आणि निरालंबभावाचा आरंभ होतो. सोबतच मात्राभंगामुळे अर्धमात्राचा उदय होतो. याच भूमीपासून ईश्वरभावाची पूर्वसूचना प्राप्त होते, असे म्हटले जाऊ शकते. ही ज्योतिर्मय एकाकारताच शून्य आहे. येथे भेदबोध एकदम हटत नाही, क्रमशः हटतो. हे वास्तवात द्वितीय शून्य असून पण जागतिक अवस्थेवर हेच प्रथम शून्य आहे. बिंदूपासून सहस्रारमध्ये चढण्याच्या मार्गामध्ये कपालप्रदेशामध्ये जे सोमरस दिसते, तेच अर्धचंद्र आहे. याच्या आतमध्ये त्रिविध वर्णमाला (सौम्य, सौर आणि आग्नेय) चिद्बीज रूपापासून सहस्रारच्या प्रत्येक दलामध्ये प्रकाशित होते. कपाळाच्या वर आणि ब्रह्मरंध्राखाली त्रिकोणामध्ये रोधिनी अवस्थित आहे. ही 'ब्रह्मादि'कारण पंचकास अर्थात ब्रह्मा, विष्णू, रूद्र, ईश्वर आणि सदाशिव नामक पाच जगत्पतींना ऊर्ध्वगतीपासून निवृत्त करते, म्हणून हिचे नाव 'रोधिनी' आहे. कुणी कुणी हीला निरोधिका पण म्हणतात. रोधिनीपर्यंतच बिंदूचे आवरण आहे. याचे पण शून्यरूपामध्ये चिंतन केले पाहिजे. येथे दिक् आणि कालचे पार्थक्य प्रतीत होत नाही. याशिवाय निम्नवर्ती मन आणि प्राणाचा अनुभव पण येथे उरत नाही (राहत नाही). यानंतर ब्रह्मरंध्राच्या मुखामध्ये नादस्थान आहे. मंत्रमहेश्वररूपी महापुरुषांनी हे परीवृत्त आहे. नादांतर्गत भुवनपंचकाची मध्यवर्ती शक्ती 'उर्ध्वगा' नावाने प्रसिद्ध आहे. येथूनच शुद्ध चिद्बोधचे सूत्रपात होते. ब्रह्मरंध्रामध्ये नादांत आहे. याची पण शून्यरूपाने कल्पना केली पाहिजे. नाद अथवा चिद्‌ला येथे सद्रुपामुळे प्ररूढ म्हटले जाऊ शकते. ब्रह्मरंध्र सुषुम्नाच्या वर आहे. ब्रह्मरंध्राच्यावर शक्तीचे स्थान आहे. हीच ऊर्ध्व कुंडलिनी प्रसुप्त सर्पाकार आणि ऊर्जाचक्र (सहस्त्रदल) समप्रभ आहे. अन् उन्मिषित समग्र विश्व हिच्याच गर्भामध्ये स्थित आहे – म्हणूनच ते विश्वाधार आहे. सर्व तत्त्वे आणि भुवन याच्याच आश्रयाने विद्यमान आहेत. या ठिकाणी एका अव्यक्त आनंदाचा अनुभव होतो.

यानंतर व्यापिनीचा अधिकार आहे. वास्तविक शक्तीच्या केंद्रामध्ये स्थित कलाच व्यापिनी या नावाने परिचित आहे, परंतु शक्तीपासून व्यापिनी वेगळी आहे. पृथ्वीपर्यंत सर्व शक्तीतत्त्वाचाच प्रपंच आहे. एकापरीने पाहिल्यास शक्तीतत्त्वच अनाश्रितभुवन आहे. यामध्ये व्यापिनीच्या मध्यभागी शिवतत्त्व अवस्थित आहे. अनाश्रित भुवनाच्या चारी बाजूस व्यापिनी, व्योमालिका, अनंता आणि अनाथा नामक शक्ती अवस्थित असतात आणि मध्यभागी अनाश्रिता शक्ती विराजमान असते. व्यापिनीची पण शून्यरूपाने कल्पना केली पाहिजे, हे सांगण्याची गरज नाही. काहींनी व्यापिनीलाच महाशून्य स्वरूपात ग्रहण केले आहे. वास्तविक हे

महाशून्य नाही, यानंतर पण शून्य आहे. येथे साकार आणि निराकारचा भेद तिरोहित असतो. येथील अनुभूती एका अद्वय आत्मानुभूतीची अंगीभूत आहे. व्यापिनीच्या नंतर व्यापिनी पदावस्थित अनाश्रित भुवनाच्या वर समता आहे. हे ब्रह्मबिळाच्या बाहेर आणि अतीत मनाचे स्थान आहे. येथे मन नाही, 'अथ'च मन आहे. नादांतामुळेच या अतीत मनाची सूचना मिळते. सूक्ष्म समष्टी मन नादामध्येच परिसमाप्त होते. त्यानंतरच अतिमानस आहे. समनाच सर्व कारणांची कर्तृभूत महेश्वराची पराशक्ती आहे. परमेश्वर सृष्टी आदि याच प्रकारच्या कृत्यांचा, समतामध्ये आरूढ होऊनच संपादन करतात. समनाची दुसरी दिशा उन्मना आहे- ही अतीत मनाची पण अतीत आहे.आत्म्याचे विकल्परहित केवल स्वरूपामध्ये अवस्थानचे बोध याच ठिकाणी होते. हे अमेय आणि अनिर्देश्य आहे. नऊ नादांमधील हाच नववा नाद आहे. बिंदूमध्ये ज्या नाद-समूहांची सूचना होते (मिळते), उन्मनामध्ये त्या शेष उरतात. हेच यथार्थ महासूत्र आहे. याच्यानंतर मग शब्दब्रह्म नाही - अथवा शब्दब्रह्मच परब्रह्म किंवा अद्वैत आत्मस्वरूपामध्ये स्वयंप्रकाश होतो.

सात विषुवांची प्रचलित नावे अशी आहेत - (१) प्राणविषुव, (२) मंत्रविषुव, (३) नाडीविषुव, (४) प्रशांतविषुव, (५) शक्तीविषुव, (६) कालविषुव, (७) तत्त्वविषुव. प्राण, आत्मा आणि मनाच्या परस्पर योगास प्राणविषुव म्हणतात. अभिव्यज्यमान नादाची जापकाद्वारे आपल्या आत्म्याच्या रूपामध्ये कल्पना करणे मंत्राविषुवचे तात्पर्य आहे. मूल मंत्राद्वारे सहा चक्र आणि बारा ग्रंथींचे क्रमशः भेद झाल्यानंतर मध्यनाडीमध्ये नाद-स्पर्श होतो. मूलाधारपासून ब्रह्मरंध्रपर्यंत बीजशिखरवर्ती नादाचे उच्चार झाल्यावर नाडीविषुवरूप स्पर्शाचा उद्‌भव होतो. नादांतपर्यंत मंत्रावयवांच्या शक्तीमध्ये लयभावना प्रशांतविषुव या नावाने ओळखली जाते. शक्तिमध्यस्थित नादाचे समनापर्यंत चिंतन शक्तीविषुव म्हटले जाते. इथपर्यंत काळाचा खेळ असतो. कारण, समनापर्यंतच काळाची सीमा आहे. वास्तविक नाद हा काळाच्या सीमेच्यावर पण आहे. कालातीत उन्मनापर्यंत नादाच्या चिंतनास कालविषुव म्हणतात. उन्मनामध्ये काळ नाही, परंतु ते पण परमतत्त्व नाही. कालविषुवनंतर तत्त्वविषुवचा अंगीकार होतो. नादच तत्त्वाचे-अभिव्यंजक आहे, परंतु जोपर्यंत नादाचा वास्तविक अंत होत नाही, तोपर्यंत तत्त्वबोध होत नाही. नादान्त तर लांबची गोष्ट आहे. शक्तीमध्ये अथवा समनामध्येपण नादचा अंत होत नाही. शाक्तयोगी उन्मनामध्येपण नादच्या अंताचा अंगीकार करीत नाहीत. उन्मनाच्या वर- उन्मनाचे भेद करण्यासोबतच - नाद लीन होऊन जातो. म्हणून तत्त्वविषुवासच चैतन्याच्या अभिव्यक्तीचे स्थान म्हणणे युक्तिसंगत आहे.

यानंतर परमपद आहे. हे सहा शून्य, पाच अवस्था आणि सात विषुवांच्या कोलाहलापलीकडे, विश्वाची परम विश्रांतिभूमी आणि परमानंद स्वरूप आहे. हीच परम शिवाची अवस्था आहे. तांत्रिक योगामधील निष्णात परमयोगी म्हणतात की, उन्मनापर्यंत सर्व मंत्रावयवांचे १०८१७ वेळा उच्चारण झाल्यावर नादाचा अंत आणि तत्त्वज्ञानाचा उदय होतो. तदूनंतर परमपदाची प्राप्ती होते. मंत्र जपासोबत मंत्रार्थाची भावना (कल्पना) होऊ शकत नाही. शास्त्रांमध्ये विविधप्रकारच्या मंत्रांचे विवरण प्राप्त होते. त्यामध्ये भावार्थ, संप्रदायार्थ, निगर्भार्थ, कौलिकार्थ, रहस्यार्थ आणि महातत्त्वार्थ असे अनेक प्रधान आहेत. काही काही मतांमध्ये १६ प्रकारच्या अर्थांचे विवरण पण दिसून येते. मंत्राच्या अवयवभूत अक्षरांचा अर्थच भावार्थ आहे. सर्व कारणंकारण पूर्ण परमेश्वरच सर्व मंत्रांचे गुरू आहेत. त्यांच्या मुखापासून आपल्या मंत्राचा उद्‌भव आणि त्याचे अवतरणक्रम अथवा परंपरेचे

ज्ञानच मंत्राचा संप्रदायार्थ ज्ञान आहे. परमेश्वर, गुरू आणि निजआत्म्याचा ऐक्यानुसंधानच निगर्भार्थ आहे. परमेश्वर निष्कल निरवयव आहे, गुरू पण तोच आहे. निष्कल परमेश्वराचा जे निज आत्मरूपापासून साक्षात्कार करतात तेच गुरू आहेत. म्हणून गुरू आणि परमेश्वर अभिन्न आहेत. चक्रदेवता, विद्या, गुरू आणि साधकाचे ऐक्यानुसंधानच कौलिकार्थ आहे. मूलाधारस्थ कुंडलिनीरूपा विद्याच साधकाच्या स्वात्मा आहे. अशाप्रकारच्या भावनेचे-कल्पनेचे नाव रहस्यार्थ आहे. निष्कल अणूपासून अणुतर आणि महानपासून महत्तर, निर्लक्ष्य, भावातीत, व्योमातीत, परमतत्त्वासोबत प्रकाशानंदरूपापासून विश्वातील आणि विश्वमय निजगुरू प्रबोधित निर्मळ स्वभाव, स्वकीय आत्म्याचा ऐक्यानुप्रवेश महातत्त्वार्थ आहे. या सर्व अर्थांच्या विज्ञानापासून पाशात्मक विकल्पजाल चांगल्याप्रकारे निवृत्त होऊन जाते.

या देहरूपी विश्वामध्ये अधः आणि ऊर्ध्व रूपामध्ये तीन स्तर आहेत. पहिले स्थूल अथवा सकल आहे, दुसरे सूक्ष्म अथवा स-कल निष्कल आहे आणि तिसरे कारण अथवा निष्कल आहे. पहिले स्तर अकुलपासून आज्ञाचक्रापर्यंत विस्तृत आहे. सुषन्मा नाडीच्या मुळात असलेले ऊर्ध्वमुख रक्तवर्ण सहस्त्रदल कमलच अकुल पदाचा अर्थ आहेत. सुषम्नाच्या शिखरावर स्थित अधोमुख श्वेतवर्ण सहस्रदलपण एका दृष्टीने तेच आहे.

दोन्हींच्या अंतरामध्ये सुषम्नाच्या मध्यभागी वेगवेगळ्या प्रकारचे आधार कमळ ग्रथित असतात. दुसऱ्या (सकल-निष्कल)चा विस्तार आज्ञाच्या वरच्या बिंदूपासून उन्मनापर्यंत आहे.

तिसरे महाबिंदू आहे, जे उन्मनापलीकडे आणि देशकालद्वारे अपरिच्छिन्न आहे. या त्रिभूमिक देहरूप विश्वामध्ये जे अधिष्ठाता बनून विराजमान असतात, ते पूर्ण ब्रह्मरूपी आत्मा आहेत. ते विश्वात्मक असूनपण विश्वातीत आहेत आणि विश्वातीत असूनपण विश्वात्मक आहेत. जपसाधनेची परमसिद्धी या आत्मस्वरूपामध्ये स्थिती-लाभाशिवाय आणखी काहीच नाही.

### २) भक्तीचा राजमार्ग : ईश्वराचे नामस्मरण – वैशिष्ट्य, स्वरूप आणि महत्त्व

### क) भारतीय संतप्रणीत विवेचन

परमात्मप्राप्तीचा सर्वोत्तम व सुलभ उपाय (नामस्मरणामधील) मंत्रजपच होय. भक्तीचे सर्वोत्तम अंग नाममंत्रच आहे असे संतांचे सांगणे आहे. मंत्र्याच्या बळाने सच्चिदानंद प्रभूचे आकर्षण होते व तो प्रभू भक्तांच्या अधीन होऊन जातो. नामास कर्मसाद्गुण्य नाही. श्रद्धेवाचूनही नाम फलते, कारण ती त्याची वस्तुशक्ती आहे.

कर्ममार्गास नामस्मरणाची जोड हवीच. नामस्मरणानेही चित्तशुद्धी होते. आत्मिक समाधान लाभते. ज्ञान श्रेष्ठ असले तरी भक्तीविना तो पंगू आहे. भक्तीत भक्त भगवंतापासून विभक्त नसतो. ही भक्ती रामनामानेच साधते. नामच ओंकारस्वरूप असल्याने नामयोग म्हणजेच भक्तीयोग व ज्ञानयोग समजावे.

'माझ्या विठोबाचे वर्म आहे दूरी' असे साधुसंतांनी निक्षून सांगितले व विठोबाचे, रामकृष्णाचे हे वर्म हटकून साध्य होण्याचा त्यांनी एक नवा, सोपा, खात्रीचा असा मार्ग सांगितला तो नामस्मरणाचा. हा नवा नामस्मरणाचा मार्ग तसे पाहता पुराणांशीही संबंधित आहे. भागवतादी पुराणांतून नामस्मरणाचा वा नामजपाचा पुरस्कार केलेला आढळतो. नामभक्ती अथवा नामजप हा नवविधा भक्तीपैकी (१) श्रवण, २) कीर्तन,

३) स्मरण, ४) पादसेवन, ५) अर्चन, ६) वंदन, ७) दास्य, ८) सख्य आणि ९) आत्मनिवेदन) तिसरा महत्त्वाचा प्रकार होय. नामस्मरणाने भगवंताचे रूप-गुण आठवून त्यांचे प्रेम भोगावे, हा नामस्मरणाचा मुख्य गाभा होय. चित्त अथवा मन ज्याचा सतत ध्यास घेते, ज्याच्यावर प्रेमाचा वर्षाव करते, कालांतराने ते तदाकार बनते. अशी तल्लीनता अनुभवण्यात अपार आनंद आहे.

नामस्मरण हा एक भक्तीचा सर्वश्रेष्ठ प्रकार सर्वच संतांनी मानला आहे. जीवास तृप्ती मिळते ती संतपुरस्कृत अशा भक्तीच्याच मार्गाने. नाम हे पवित्र आणि कल्पतरूहून उदार असते. जेथे विषयविरक्ती झाली तेथेच भक्तीस सुरुवात होते. भक्तीत भगवंताची, श्रीहरीची सेवा अपेक्षित आहे. भज्-सेवायाम् या धातूवरून भक्ती हा शब्द तयार झाला आहे. शांडिल्य, नारद, व्यास इत्यादींनी भक्तिशास्त्राचे सूत्रबद्ध विवेचन केले असून या भक्तीत परमात्म्याविषयी प्रेम अनुस्यूत आहे. 'सा परानुरक्तिरीश्वरे' ईश्वराच्या ठिकाणी परम अनुराग म्हणजे भक्ती, असे शांडिल्यांनी म्हटले आहे. 'सा त्वस्मिन् परमप्रेमस्वरूपा।' परमात्म्याच्या ठिकाणी परम प्रेम म्हणजे भक्ती, असे नारदांनी म्हटले आहे. 'अहैतुक्यप्रतिहता ययाऽत्मा सम्प्रसीदती।' भक्ती कामनारहित व अखंड असली की भक्ताला परमात्म्याची प्राप्ती होऊन तो आनंदित होतो असे भागवत पुराण सांगते. सर्वच शास्त्रकारांनी भक्तीतील प्रेमभावनेला महत्त्व दिले आहे.

अशा या नवविधा भक्तीचे उपरोक्त नऊ प्रकार भागवत पुराणकारांनी दिले आहेत. यात स्मरण अथवा नामजप अथवा नामस्मरण हा नव्या युगातील सर्वश्रेष्ठ प्रकार संतांनी मानला. परमेश्वरप्राप्तीची इतर सर्व साधने दूर सारून सर्व संतश्रेष्ठांनी भक्तिमार्गाची वाट उजळून काढली. या भक्तिमार्गात त्यांनी नामस्मरणास सर्वोत्तम मानले. या नामस्मरणाचे मानसशास्त्र पुढे विकसित झाले असले तरी बाह्यदृष्टीने पाहताना असे दिसते की, नामस्मरण हे दुराचारी माणसासही तारते, हा या मार्गाचा एक महत्त्वाचा विशेष आहे. दुराचारी मनुष्य अनुतापाच्या म्हणजे पश्चात्तापाच्या तीर्थात न्हाऊन नामस्मरणाच्या मार्गाने परमेश्वरास शरण गेला की, त्याचे कल्याण होते. 'आचारहीनं न पुनन्ति वेदा:।' आचारहीन माणसास वेद पावन करीत नाहीत. वेदबाह्य लोकांनाही परमेश्वरप्राप्तीचा मार्ग नामस्मरण प्राप्त करून देते. नारद पुराणात म्हटले आहे की वेदमार्गाच्या बाहेर असल्याने ज्यांची मन:शुद्धी झालेली नाही अशा पापकर्मीयांचा उद्धार फक्त नामच करते. पंचरात्रात म्हटले आहे, शहाण्या माणसाप्रमाणे 'विष्णवे नम:' असे म्हणण्याऐवजी मूर्ख मनुष्य 'विष्णाय नम:' असे म्हणतो; परंतु दोघांचा उद्देश एकच म्हणजे प्रभुस्मरण असल्याने दोघांना फळ सारखेच मिळते. म्हणजे दुराचारी, पतित वा हीन यातीच्या माणसास नामस्मरण हा एक मोठाच आधार मिळाला. भगवद्गीतेच्या नवव्या अध्यायातही म्हटले आहे की, मोठा दुराचारी का असेना, पण जर तो मला अनन्यभावाने भजत असेल तर तोही साधूच समजावा, कारण त्याच्या बुद्धीचा निश्चय चांगला असतो. एकदा बुद्धी निश्चयाने परमात्म्याकडे वळली की त्याची प्रवृत्ती दुराचाराकडे वळत नाही. ज्ञानेश्वरांनी यावर भाष्य करताना निर्वाळा दिला आहे की, 'यालागी दुष्कृती जऱ्ही जाहाला। तरी अनुतापतीर्थी न्हाला । न्हाउनि मजआंत आला। सर्वभावें। तरी आता पवित्र तयाचे कुळ। अभिजात्य तोंचि निर्मळ। जन्मलेयाचें फळ। तयासीच जोडलें।। - ९.४२०.२१

नाममंत्र म्हणताना उच्चारात दोष झाला तरी फळात अंतर पडत नाही. नामस्मरणात भावास महत्त्व आहे. उच्चारास नाही. वाल्याकोळी 'मरा मरा' म्हणतच 'राम राम' या अवस्थेस येऊन पोचला. इतर मंत्रतंत्र व प्रेमाने

केलेले भगवंताचे नामस्मरण यातील भेद सांगताना तुकाराममहाराजांनी नामजपाची वा नामस्मरणाची सारी वैशिष्ट्ये आपल्या एका अभंगात फार मार्मिकरीतीने वर्णन केली आहेत. ती अशी– काही मंत्रांत उच्चाराची थोडी चूक झाली तरी वेड लागण्याची पाळी येते; पण श्रीहरीचे नाम कसेही वेडेवाकडे गायिले तरी भावना शुद्ध असेल तर त्याचा उपयोग होतो. इतर मंत्र अशुद्ध म्हटले तर ते बाधक होतात, पण नाम अर्धवट झोपेत अथवा स्नान न करता घेतले तरी चालते. या नामस्मरणास वा नामजपास वेळेचे, रागाचे ज्ञान लागत नाही. इतर गायनात यासंबंधी चूक झाली तर घात होतो, पण 'नाम' मात्र सदासर्वकाळ शुभकारक आहे. इतर मंत्रविधानात विधिनिषेध आहेत, पण 'नाम' मात्र सर्व जातिजमातींना पावन करणारे आहे. इतर जपतपादी साधने जीवास धोका देतात, तर नामाने बिनधोक कार्यसिद्धी होते. नामस्मरणाने गणिकेचाही उद्धार होतो.

नामस्मरणाने चित्त शुद्ध होते, मन एकाग्र होते. नामाची गंमत अशी आहे की, नामात मनाला उलटे केले जाते. ('म–न' हे 'ना–म' बनते.) प्रभूचे नाम हे प्रभुरूपच असल्याने त्यालाही शक्ती आलेली आहे. नामाला देशकालाचे, सोवळ्या, ओवळ्याचे, शुचित्व, अशुद्धित्वाचे बंधन नसते. वैश्वानरसंहितेत म्हटले आहे की, रामनामाच्या संकीर्तनाला देशकालाच्या व शौचाशौच्याच्या मर्यादा नाहीत. रामरामच्या जपाने (नामस्मरणाने) मनुष्यास मुक्ती मिळते. नारद पुराणातही असेच नाममहात्म्य सांगताना म्हटले आहे की, यज्ञ, दान, स्नान, जप यांना कालशुद्धीची आवश्यकता असते; पण राजा, विष्णूच्या नामस्मरणाला मात्र काळाचे कोणतेही बंधन नाही. नामाच्या या गुणामुळेच ते सर्वांना सुलभ व सोपे आणि हटकून गुण देणारे रसायन बनले आहे.

म्हणूनच प्राकृत भाषांतील सर्व संतांनी नामजपाला वा नामस्मरणाला विशेष महत्त्व दिले आहे. निवृत्तीनाथांपासून तुकाराम–निळोबापर्यंत सर्वच मराठी संतांनी नामस्मरणाचा पुरस्कार केला आहे. निवृत्तीनाथांनी नामावाचून इतर सर्व मार्गांना 'काबाडभार' म्हटले आहे. 'रामनामांकित नित्य नाम वाचे। दहन पापाचे एका नामे।।' नामामुळे प्रत्यक्ष श्रीहरीच जिभेवर व हृदयात विराजतो असे त्यांनी सांगीतले आहे. 'रामनाम हरी सर्वकाळ वसे। तेथेचि विलसे हरिराजा।।' असा त्यांचाही स्वानुभव आहे. 'नाममंत्र सार नित्य निरंतर। येणेचि संसार तरे जाणा।। संसार सुफळ हरी उच्चारिता। येऱ्हवी मरता अधोगती।।' इत्यादी वचनांतून निवृत्तिनाथ नामाचे महात्म्य विशद करताना दिसतात. पंढरीच्या बाजारात नामाची देवघेव करून सर्वजण कसे तल्लीन झाले याचे वर्णन करताना ते लिहितात,

*पुंडलिक पेठे वैष्णवांचा हाट। करीती बोभाट हरिनामे।।*
*देवमुनी सर्व ब्रह्मादिक पेठे। पंढरीचे पेठे प्रेमपिसे।।*
*निवृत्ती निघाला ज्ञानदेव सोपान। खेचर तल्लीन विठ्ठल नामे।।*

निवृत्तिनाथांच्या बंधूंचा–ज्ञानेश्वरांचा–हरिपाठ म्हणजे नामस्मरणावरील एक थोर उपनिषदच आहे. 'हरि मुखे म्हणा, हरि मुखे म्हणा' असा त्यांचा आग्रह आहे. 'योगयागविधी येणे नोहे सिद्धी' असे सांगून ज्ञानेश्वर म्हणतात, 'योगी लोकांना समाधीच्यावेळी सतरावी जीवनकला प्राप्त होऊन जे सुख होते तेच नामामृताच्या पानाने होते'. पुढे त्यांनी स्पष्ट केले आहे की, 'हरि उच्चारणी अनंत पापराशी। जातील लयासी क्षणमात्रे।।' श्रीहरीचा, नामाचा विशेष महीमा गाताना ज्ञानदेव म्हणतात की, श्रीहरीचा नामपाठ मुखाने केला की, सारा देहच पवित्र होऊन जातो. नामाशिवाय इतर मार्ग खात्रीचे नाहीत, असेही म्हणतात. 'मनोमार्गे गेला तो तेथे मुकला।

हरिपाठी स्थिरावला तोचि धन्य ।। असे त्यांचे सांगणे आहे. 'काळवेळ नाम उच्चारिता नाही' असेही त्यांचे सांगणे आहे. म्हणून 'राम कृष्ण गोविंद' असा नामाचा नित्यजप करावा, असे ज्ञानदेवांचे मार्गदर्शन आहे. श्रीहरीचे नाम आठवताच हृदयीच श्रीहरी प्रकटून पुढे उभा राहून अमृताने न्हालेला सोन्याचा दिवस उगवतो, असा त्यांचा अनुभव आहे. हरिनाम हीच वैकुंठाची वाट आहे असे त्यांना वाटते. रामकृष्ण हरीचा जप करणे हेच एक व्रत, हाच एक नियम, हेच एक तप, क्रिया-कर्म-धर्म असे त्यांनी म्हटले आहे. अष्टांगयोगाने उगाच शरीर का शिणवावे? यापेक्षा 'आठविता विसरले आपुलिया गोता। हरिनामे त्वरिता मोक्षा जाला।।' 'नाममाला घे पवित्र। अंति हेच शास्त्र। राम हा महामंत्र। सर्व बाधा निवारी।।', 'समाधीचे साधन। ते रामनामचिंतन। कोटि तपाचिया राशी। जोडती रामनामापाशी।।' देवावीण शून्य मुख। नाम न घेता नाही सुख।।', 'सकळ धर्मांचे कारण । नामस्मरण हरिकीर्तन ।।' इत्यादी वचनांतून ज्ञानेश्वर नामस्मरणाची महती गातात.

रामनामाच्या जपामुळे हृदयस्थ श्रीहरी जागा होतो. इतकेच नव्हे तर सर्व चराचरात तोच भरलेला असल्याची अनुभूती येते. 'हरि येथे रे हरी तेथे रे। हरिवाचून न दिसे रिते रे ।।' अशी व्यापक अनुभूती जपामुळेच येते. या नामस्मरणाचे महत्त्व इतर संतांनी अशाच निष्ठेने गायिले आहे. नामदेव तर नामाचे देव. त्यांनी तर नाममार्गाचा मोठ्या तळमळीने पुरस्कार केला आहे. नाम आठवताच कामधेनू तुमच्या दाराशी येईल असे त्यांनी सांगितले आहे. नामस्मरणामुळे देवच भक्ताच्या आधीन होतो, तोच आपल्या भक्ताचे स्मरण करू लागतो असे त्यांनी स्पष्ट केले आहे. नाम व परमेश्वराचे रूप यातील अभेद वर्णन करताना नामदेवराय म्हणतात, 'नाम तोचि रूप, रूप तोचि नाम। नामरूपा भिन्न नाही नाही।।' नाम हे केवळ परब्रह्म असून तेच ओंकाराचे मूळ आहे. ध्रुव, प्रल्हाद, बळी, अंबरिष इत्यादी नामामुळेच तरले. नाम घेताच श्रीहरी जवळ येतो; वैकुंठ जवळ येते; असे सांगून इतर साधनामार्गांपेक्षा नामस्मरणच श्रेष्ठ असे पटवून देताना नामदेवराय म्हणतात, ''साधनात सोपे नाम हे केवळ। यावीण सकळ सीण वाया।।'

नामाचे महात्म्य याप्रमाणे जनाबाई, चोखामेळा, नरहरी सोनार, गोरा कुंभार इत्यादी संतांनी आपापल्या अनुभवानुसार गायिले आहे. 'गाता, विठोबाची कीर्ती। महापातके जळती।', 'एक नाम अवघे सार। वरकड अवघे ते असार।' 'नाम विठोबाचे थोर। तरला कोळी आणि कुंभार।।' अशा वचनांतून जनाबाई नाममहिमा गाते. 'योग याग तप जप अनुष्ठान। तीर्थव्रत दान नाम जपता ।।' असा स्वानुभव चोखा मेळा सांगतो. 'अवघ्या साधनांचे सार। रामकृष्ण हा उच्चार।।' इत्यादी वचनांतून चोखोबांची नामनिष्ठा व्यक्त होते. नरहरी सोनारांनी नामाचे महत्त्व गाताना म्हटले आहे,

*नाम फुकाचे फुकाचे। देवा पंढरीरायाचे।।*
*नाम अमृत हे सार। हृदयी जपा निरंतर।।*
*नाम संतांचे माहेर। प्रेमसुखाचे आगर।।*
*नाम सर्वांमध्ये सार। नरहरी जपे निरंतर।।*

सेनामहाराजांनीही नामाबद्दल असाच आदर प्रकट केला आहे. 'नाम घेता विठोबाचे। पर्वत जळती पापांचे।।' अशा वचनांतून सेनामहाराज नाममाहात्म्य वर्णन करतात.

मराठी संतांची परंपरा अशारीतीने नामसंकीर्तनावर जोपासलेली आहे. एकनाथ-तुकाराम संतांनीही अशाच प्रकारे नामाची महती परोपरीने वर्णन केली आहे. 'नामपाठ सार वेदांचे ते मूळ। शास्त्राचे ते फळ नामपाठ।।' असा निर्णय एकनाथांनी दिला आहे. नाम पवित्र आहे, नित्य त्याचे स्मरण करावे, असाच सर्व संतांचा उपदेश आहे. 'नाम घेता उठाउठी। होय संसाराची तुटी। प्रेम तेथे वास करी। मुखी उच्चारिती हरी।।', 'नाम घेता नलगे मोल। नाममंत्र नाही खोल।।' अशा शेकडों वचनांतून तुकाराम महाराज नामस्मरणाची महती स्वानुभवावरून गातात. नामस्मरणाचा मार्ग सोपा आहे, सरळ आहे, बिनधोक आहे असे सांगताना तुकोबांनी प्रतिज्ञेवर म्हटले आहे-

*नामसंकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची।।*
*न लगती सयास जावे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण।।*
*ठायीच बैसोनि करा एकचित्त। आवडी अनंत आळवावा।।*
*रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा। मंत्र हा जपावा सर्वकाळ।।*

नामस्मरणाची महती अशी मनापासून गाणाऱ्या संतश्रेष्ठांच्या परंपरेतील एक श्रेष्ठ नामयोगी म्हणजे ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज होत. त्यांनी आपल्या प्रवचनांमधून व अभंगादी स्फुटसाहित्यातून नामाचे माहात्म्य परोपरीने गायिले आहे. गोंदवलेकरांची नामभक्ती अगदी वरील संतपरंपरेत शोभणारी आहे. 'राम राम वाचे बोला। आत्मसुखामाजी डोला।।' असा त्यांनी निर्वाळा दिला आहे. चांगला गळा आहे, सूर आहे पण प्रेम नसेल तर 'देव अंतरला दूर' असे महाराजांनी एका ठिकाणी म्हटले आहे. देवाचे प्रेम मिळवण्यासाठी तालासुराची आवश्यकता नाही. 'देव भावाचा भांबावला। धावुनि भक्तापाशी आला।।' देवाची ही करुणा केवळ नामस्मरणाने अनुभवता येते. म्हणून या नामास लहान साध्य मानू नये. रामनामाचा एकदा शिक्का जिवावर पडला की, मग ब्रह्मादिकांनाही धाक पडतो, परंतु हे नाम निष्काम बुद्धीने घ्यावयास हवे. महाराज एका अभंगात म्हणतात-

*जेथे नाम अखंडित। तेथे वेद मूर्तिमंत।।*
*जेथे नामाचा हा चाळा। तेथिला पापे होति धुराळा।।*
*निष्काम नाम घेता। तोचि जाणावा ब्रह्मवेत्ता।।*
*दीनदास म्हणे नामरूपी चित्त। तोचि जाणावा जीवनमुक्त।।*

रामनामाची गोडी एकदा चित्तास लागली की, मग इतर विषयांची आवड उरत नाही. 'रामनाम जेथे वसे। विषय काम तेथे नसे।' असे महाराजांनी सांगितले आहे. सर्व साधनांचे साधन, अनुष्ठानांचे अनुष्ठान, सारांचे सार म्हणजे रामनाम होय. या रामनामाशिवाय कोणी कितीही मोठा असला तरी तो करंटाच मानावा. 'रामनामावाचुनी शहाणा। तोचि यमाचा पाहुणा।।' असे महाराजांनी म्हटले आहे. रामनामाची गोडी लागली की, वृत्ती स्थिरावते. मी व ईश्वर एकच असल्याची साक्ष पटते. कामक्रोधाचा विटाळ होत नाही. अहंकार दूर होऊन 'नेत्री वसे रघुवीर।' मुखातून निंदा अथवा स्तुती येत नाही. या रामनामाच्या सुखापुढे ब्रह्मज्ञानही वेडावून जाते. त्याची महती उरत नाही. अशारीतीने विकार दूर झाले ते नामस्मरणाने, अहंकार गेला तो नामस्मरणाने. वेदशास्त्रही नामाशिवाय फिके आहे. ज्याच्या श्वासात रामनाम तोच एक ब्रह्मवेत्ता जाणावा. सर्व ऋषीमुनी

नामावरच स्थिरावले, कारण यज्ञायागादी क्रियाकर्मांपेक्षा नाम श्रेष्ठ आहे. नामस्मरण हा या जगातील खऱ्या सुखाचा मार्ग आहे. अठरा अध्यायांच्या गीतेचे सार काय? तर 'मुखी घ्यावे नामस्मरण.' चारही वेदांचे सार काय? तर 'आम्हा आधी हरिनाम।' भागवतधर्माचे मर्म कोणते? तर 'नामी उभे परब्रह्म' योग्यांचे अमृतपान का श्रेष्ठ? तर 'नामी स्थिरावले मन।' अशारीतीने आपल्या रसाळ अभंगातून महाराजांनी परोपरीने रामनामाची महती गायली आहे.

नामस्मरणाच्या शास्त्रामध्ये नाम हे प्रमुख अंग असते. नाम हे परमात्मस्वरूप असते हा महाराजांचा सिद्धान्त आहे. त्यांच्या मते नाम हे जसे साधन तसे साध्यही आहे. देवाचे देवपण त्याच्या नामात आहे. परमात्म्याचे रूप व त्याचे नाम यांच्यात भिन्नता नाही. 'नाम तेचि रूप, रूप तेचि नाम। नामरूप भिन्न नाही नाही ।।' या नामदेवरायांच्या वचनाप्रमाणे नाव हे रूपाच्या आधीही आहे व नंतरही उरते. नामरूपाला व्यापून असते. अशाप्रकारे रूप व नाम यांच्यात अभेद असल्यामुळे नामस्मरण म्हणजे भगवंताशी एकरूपता आहे. हे नामस्मरण कोणत्याही भौतिक लाभासाठी नसावे. सकाम नामस्मरणामुळे प्रगतीत बाधा येते. नामस्मरण फलद्रूप होण्यासाठी महाराजांनी खालील गोष्टींची जरूरी असल्याचे सांगितले आहे– १) सदाचरण, २) शुद्ध अंतःकरण, ३) निष्काम नामस्मरण, ४) संतांचे आशीर्वाद व कृपादृष्टी आणि ५) भगवद्कृपा.

नामस्मरण हे कोणताही हेतू डोळ्यासमोर ठेवून करू नये यावर महाराजांचा कटाक्ष आहे. नामाकरता नाम, देवाकरता देव, हे नामसाधनेचे सूत्र आहे. 'देवाचिया चाडे देव आळवावा' या वृत्तीने नामस्मरण केले तर ते फलद्रूप होते. यासंबंधी महाराज म्हणतात, 'नाम हे स्वतः उपाधिरहित असल्याने ते जर आपण सकाम बुद्धीने घेतले तर कार्यभागही साधत नाही व आपले कल्याणही होत नाही. सकाम नाम घेणे हे अतिशय वाईट. नाम हे नामासाठीच घ्यावे. त्याचा संबंध दुसऱ्या गोष्टींशी येऊ नये. 'मुक्तीवरील भक्ती जाण। अखंड मुखी नारायण।' आपण फक्त तीन गोष्टींकडे कटाक्षाने लक्ष द्यावे. १) आचरण अगदी शुद्ध ठेवावे, २) नामाला कधीही सोडू नये, ३) माझा सांभाळ करणारे कोणीतरी आहेत ही जाणीव ठेवावी. अशाप्रकारच्या नामस्मरणाने मानवी जीवन आनंदमय बनते.

अशा या नामाचे सामर्थ्य वर्णन करताना महाराज म्हणतात, 'नामाने देहबुद्धी कमी होते, म्हणून प्रारब्धाचे भोग भोगीत असतानादेखील नामात राहणारा मनुष्य आनंदात असतो. नामाच्या आनंदापुढे त्याला प्रारब्धाची किंमत राहात नाही. नामाचे सामर्थ्य फार विलक्षण आहे. पूर्वी झालेले अपराध नाम नाहीसे करते. वाया गेलेल्या माणसाला नाम तारते. नाम हा सर्व प्रार्थनांचा, सेवेचा, पूजेचा राजा आहे. नामाने आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य लाभल्याने त्याची कृपा होण्यास वेळ लागत नाही. किंबहुना ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते. सर्व काळी, सर्व ठिकाणी, सर्व अवस्थांमध्ये कोणालाही करता येण्यासारखे नाम हेच एक साधन आहे. अखंड नामात जगणे यालाच **पराभक्ती** म्हणतात. जो नामात अखंड गुंतला त्यालाच संत म्हणतात. नामात प्रेम येणे ही संतांची खरी खूणच आहे. प्रारब्धाच्या भोगांना न कंटाळता, भगवंताने ज्या स्थितीत आपल्याला ठेवले असेल त्यात समाधान मानावे. नामाने पापी माणसे पुण्यवान बनतात. नामाने कलीची सत्ता नाहीशी होते. ज्याच्या अंतःकरणात नाम असेल तेथे भगवंताला यावे लागल्याने त्याच्या शरीरात सत्त्वगुणांची वाढ होते व तो पुण्यवान बनतो.' नामाचा अनुभव नामाव्यतिरिक्त दुसऱ्या कशातही पाहू नये. नाम

मुखी येते हाच नामाचा अनुभव. उपासना कोणतीही असली तरी नामाशिवाय ती पचनी पडत नाही. भगवंताच्या नामाचा नाद लागला तर दु:खाची जाणीव कमी होते.

गोंदवलेकर महाराजांचे नामप्रेम हे असे अनन्यसाधारण महत्त्वाचे आहे. नामाने भगवंत जवळ येतो, नित्य सान्निध्यात राहतो. नाम सर्वात सोपे असे साधन आहे. नाम निर्हेतुकपणे घ्यावे, नामाने सर्व पातके दूर होतात, नामस्मरणाने जीवास स्वानंदाचा अनुभव येतो; असे महाराजांच्या शिकवणीचे सार आहे. नामस्मरणाची उर्मीच भगवंताकडून होत असल्याने नाम हे परमात्मस्वरूप आहे. म्हणून सांसारिक जीवाने भगवंताजवळ नामप्रेमच मागावे व नित्य रामनामात रंगून जावे. हीच एक साधना महाराज सांगतात– 'तुम्ही भगवंताजवळ नामप्रेम मागा. दुसरे काहीच मागू नका' असे त्यांचे नेहमी म्हणणे असे. त्यांचे नाममहात्म्य मन भगवंताकडेच लावायला सांगते. भगवंत भेटला, आता दुसरे काही नको. अशी वृत्ती बनायला हवी. यासाठी नामासाठी नाम, भगवंताच्या प्रेमासाठी नाम, असा महाराजांच्या शिकवणुकीचा सारांश आहे. (डॉ. प्र. न. जोशी 'ब्रह्मचैतन्य श्रीगोंदवलेकर महाराज : चरित्र व शिकवण', पृ. १०५ –२०)

'गुप्तस्य श्रेष्ठा प्रगटस्य भ्रष्टा' हा संत श्रेष्ठांचा स्थायीभाव असतो. लौकिकामध्ये प्रसिद्ध असणारे कधीच सिद्ध नसतात व पारमार्थिक दृष्टीने जे सिद्ध असतात ते कधीही प्रसिद्ध नसतात. देहाला पुण्यपावन बनवण्यास निरंतर नामस्मरण आवश्यक आहे. म्हणून 'नाम स्मरे निरंतर। तेची जाणावे पुण्य शरीर।।'

जप किती वेळा केला या पेक्षा, जपात किती लक्ष होते याला जास्त महत्त्व आहे आणि जपात किती लक्ष होते यापेक्षाही जप करताना अलक्ष्याकडे किती लक्ष होते याला जास्तच महत्त्व आहे. या प्रकारचे नामस्मरण केल्याने अंत:करणात स्वरूपाची जागृती होऊन आत्मानुभव प्राप्त होतो. यालाच **साक्षात्कार** म्हणतात. अखंड नामस्मरणाने जीव आणि शिवामध्ये असणारी देहाची शिवण सैल होण्यास मदत होते. असा हा मुक्तीचा विचार आहे. यालाच नाममंत्र किंवा आत्मभान पण म्हणता येईल.

### १) नाम, नामजप आणि नामाचा अनुभव

**नाम** म्हणजे भगवंताचे नाव. नाम हा जीव आणि शिव यांच्यामधला दुवा आहे. नाम हे साधनही आहे आणि साध्यही आहे. नाम सगुण आहे आणि निर्गुणही आहे. नाम हा सत्संगाचा पाया आहे आणि कळसही आहे. नाम म्हणजे आपली कृती आणि भगवंत यांना जोडणारी साखळीच आहे. जसे आपले आपलेपण आपल्या नावात आहे, तसे देवाचे देवपण, त्याच्या नामात आहे. प्रत्येकजण आपल्या नावाला जपतो ना? नावाला जितकी किंमत आहे, तितकी कशास नाही.

भगवंताचे नाम हे बॅटरीसारखे आहे. आपल्याला पाहिजे तेव्हा ते प्रकाश देते. ते आपल्या खिशामध्ये, म्हणजे हृदयामध्ये राहू शकते, तिने आपले अंग भाजत नाही, तसे नामाने आपल्याला वैराग्याचे कष्ट होत नाहीत आणि कुठेही बरोबर नेता येते.

भगवंताचे नाम स्वत:सिद्ध आणि परिपूर्ण आहे. पाणी हे जसे शरीराचे 'जीवन' आहे, तसे नाम हे मनाचे जीवन बनले पाहिजे. नाम इतके खोल गेले पाहिजे की, प्राणाबरोबर बाहेर पडावे. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे.

नाम सतत घेत राहावे. देहाच्या कणाकणांतून नामाचा ध्वनी केव्हाही यावा इतके नाम घ्यावे. सुरुवातीला रामनाम असे मुरले की, पुन्हा जास्त लक्ष द्यावे लागत नाही. आपोआप देहाचे सर्व कण नामजप करतात. 'मी कर्ता आहे' असे वाटते, तोपर्यंत नाम घ्यावे. नाम सोडावेसे वाटत नाही तोपर्यंत ते घ्यावे. नामात रंगून जाईपर्यंत नाम घ्यावे. रंगला की नाम सुटणार नाही. श्वासोच्छ्वास थांबला म्हणजे मरण येते. त्याचप्रमाणे नामाशिवाय जगणे हे मेल्यासारखे आहे असे वाटले पाहिजे. नाम घेऊन कधी पुरे होऊ शकत नाही. नाम कितीही घेतले, तरी अतृप्ती वाटली पाहिजे. इतकी त्या नामाची गोडी वाटावी.

नाम कसेही घेतले तरी ते आपले काम करतेच करते. नाम कसेही घेतले तरी घेणाऱ्याची ते योग्य दिशेने प्रगती करून त्याला योग्य मार्गावर आणून सोडील म्हणून कसेही करून नाम घ्यावे व उगीच वरवर नामस्मरण न करता शक्यतो अट्टाहासाने आणि अंत:करणपूर्वक घ्यावे. कोणताही खाण्याचा किंवा पिण्याचा पदार्थ भगवंताचे नाव घेतल्याशिवाय खायचा नाही, असा नेम ठेवला, तर नाम आपोआप होते. नाम प्रत्येक कृतीच्या आणि व्यवहाराच्या आधी, मध्ये आणि शेवटीही घ्यावे. आधी नाम मग कृती किंवा व्यवहार. आधी नाम, मग अन्न, पाणी, विषयभोग, बारीकसारीक व्यवहारसुद्धा नामाशी जोडून सर्व जीवन नामाने भरून टाकावे, नाममय करून टाकावे.

नाम घेतले की विकल्प उठतात. जास्त आस्थेने नाव घेण्याचा निश्चय करावा. मनोराज्य करू नये. विचार येतील तसे जातील. तिकडे लक्ष देऊ नये. चित्त एकाग्र होण्याकरताच नामस्मरणाची गरज आहे. चित्ताची एकाग्रता ही फार पुढची पायरी आहे. चित्त चंचल आहे. त्याला कुठेतरी स्थिर करून ठेवल्याशिवाय भागत नाही, म्हणून ते नामात गुंतवून ठेवावे. नामस्मरण करीत असताना ते नाम आपल्या कानांनी ऐकावे, म्हणजे एकाग्रता व्हायला मदत होईल. दुसरी गोष्ट अशी की, ज्याची आपल्याला आवड असते त्यात आपल्याला एकाग्र होता येते. एकाग्रतेच्या संभ्रमात न पडता साधे सोपे नाम घ्यावे, म्हणजे आपोआप नामस्मरणात एकाग्रता येईल.

नाम हे हृदयाच्या पलीकडे आणि सूक्ष्म असल्यामुळे त्याला उत्पत्ती आणि विनाश, वाढ आणि घट इत्यादी कोणतेही विकार नाहीत. नाम हे सत्स्वरूप आहे. नाम हे रूपापेक्षा व्यापक आहे. नाम हे स्वत:सिद्ध आहे. नाम व अपूर्णत्व या गोष्टी एकत्र संभवतच नाहीत. आधी विचार, मग उच्चार हा सिद्धान्त आहे. प्रत्येक नामोच्चाराचे वेळी मन जरी दुसरीकडे गेले तरी सूक्ष्मरूपाने भगवंताचा विचार येतो तेव्हाच नामोच्चार होतो. अशा नामोच्चाराच्या अभ्यासातून पुढे साधकास नामस्मरण जमू लागेल. भगवंत आणि त्याचे नाम एकमेकांशी चिकटलेले असल्याने नामोच्चार नुसता झाला तरी परमार्थाची वाटचाल थोडी तरी होत असेल, याची खात्री बाळगावी. जेवढा रिकामा वेळ मिळेल, तेवढा सर्व नामस्मरणात घालवण्याचा प्रयत्न करावा.

भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे. एक प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी. भगवंताची तळमळ लागेपर्यंत नामाची जरूरी आहे. नंतर भगवंतावाचून आपल्याला दुसरा आधार नाही, म्हणून नाम घ्यायला पाहिजे आणि शेवटी भगवंताच्या दर्शनानंतर नाम सवयीने आपोआप येते.

नामाचा अनुभव आणि त्याच्या प्रचीतीची अपेक्षा ठेवणे चूक आहे. फळाबद्दल श्रद्धा ठेवावी पण अनुभवाच्या मागे न लागता नाम घ्यावे. नाम मुखी येणे, हाच नामाचा अनुभव. अखंड नामस्मरण टिकले की

पुरा अनुभव आला म्हणून समजावे. मुख्य म्हणजे झाड लावल्यानंतर ते किती वाढले आहे, हे कुणी काही रोज उकरून पाहत नाही, त्याप्रमाणे अनुभवाच्या प्रचीतीच्या मागे लागू नये, त्यामुळे प्रगती खुंटते.

विस्तवाजवळ तूप ठेवले की ते विरघळते. तसे नामची शेगडी ठेवली की अभिमान वितळलाच पाहिजे. हाच नामाचा अनुभव होय. तसेच वृत्ती शांत होणे हा नामाचा अनुभव आहे. अनुभवाच्या मागे लागून एखादा अनुभव आला तरी उपासना खुंटते. केळीला घड आला की ती खुंटते म्हणून साधकाने अनुभवाच्या मागे जाऊ नये. खरा अनुभव आपले दोष दिसायला लागून सुधारणा होणे हा होय. त्याने निर्भयता येते हा दुसरा अनुभव व भगवंताचे प्रेम हा तिसरा अनुभव व हेच खरे महत्त्वाचे अनुभव आहेत.

### २) नामस्मरण : पायऱ्या आणि साधना

नामस्मरणाची पहिली पायरी म्हणजे सुस्थितीतले वरवरचे स्मरण. दुसरी परमात्म्याशिवाय आपले कोणी नाही ही जाणीव होऊन, संकटसमयी त्याचे स्मरण. आणि तिसरी हीच जाणीव दृढ होऊन पुढे अखंड होणारं नामस्मरण.

आपण नेहमीच नित्यनेमात असावे, पण तसे होत नाही. जो अखंड नामस्मरणात असतो तो नेहमीच नित्यनेमात असतो. गुरू सांगेल तोच नित्यनेम होय. त्याला शरण जाणे, रोज थोडेसे वाचन, त्यानंतर मनन, मननानंतर त्याप्रमाणे आचरण आणि शेवटी गुरूस अनन्य शरण हा साधकाचा साधनक्रम आहे आणि हाच त्याचा नित्यनेम होय. परमेश्वराची ज्यामुळे आठवण होईल असे जे करणे त्याला नित्यनेम म्हणतात.

नित्यनेम करणे म्हणजेच सर्वकाळ नित्यात राहणे. जो कधीही बदलत नाही तो नित्य. म्हणून नित्य म्हणजे भगवंत होय. नियम करणे याचा अर्थ नियमन करणे, निग्रह करणे, वश करून घेणे, स्वाधीन ठेवणे हा होय. आपले मन भगवंताच्या स्वाधीन करणे, त्याच्या ठिकाणी ते नेहमी ठेवणे, याचे नाव नित्यनियम किंवा नित्यनेम होय.

साधन हे वयावर अवलंबून नाही. नाम हे घरबसल्या अंतरंग बदलण्याचा अनुभव आणून देते. आपण आपल्या जिभेला नामाचा चाळाच लावून घ्यावा. पहिल्या-पहिल्याने विसरेल, पण सवयीने आपोआप आठवेल आणि मग भगवंताच्या अस्तित्वाची जाणीव होईल. साधनात थोडी बळजबरी पाहिजेच. नियम थोडा असावा, पण तो सांभाळावा. नामाबद्दलची तळमळ कमी व्हायला बाहेरच्या कितीतरी गोष्टी कारण आहेत. रोजचा प्रपंच आहे, व्यवहार आहे, मागच्या आठवणी आहेत, पुढची काळजी आहे. अशात आपले नामस्मरण हट्टाने चालू ठेवले पाहिजे. नामात गोडी उत्पन्न व्हायला नामच घेतले पाहिजे.

नामाचा अर्थ जरी आपल्याला कळला नाही तरी तो भगवंताला कळतो म्हणून नामाचा अर्थ आणि महत्त्व कळो वा न कळो, नाम घेत राहावे. आपल्या जीवनात परमेश्वरावाचून नडते असे जोपर्यंत आपल्याला वाटत नाही, तोपर्यंत आपले नामस्मरण खरे नव्हे. परमेश्वर आपल्या जीवनाचा आधार, त्याशिवाय आपण जगूच शकत नाही, अशी वृत्ती बाणल्यावर होणारे नामस्मरण तेच खरे नामस्मरण.

वास्तविक, आम्ही दररोज जगतो आणि मरतो. एकदा निजला आणि पुन्हा जागा नाही झाला की तेच मरण! झोप हे एक प्रकारचे मरणच आहे. एवढ्याकरिता झोपी जाताना नामस्मरण करीत करीत झोपी जावे.

म्हणजे उठतानाही नामस्मरणातच जाग येईल. अशा रितीने सदोदित नामस्मरण केले तरच अंतकाळी मुखी नाम येईल. अंतकाळी अगदी शेवटी सुटणारी वस्तू म्हणजे भगवंताचे नाम पाहिजे. नामातच शेवटचा श्वास गेला पाहिजे. नाम घेत असताना स्वत:चा विसर पडणे, म्हणजे नामसमाधी होय. ही सर्वोत्कृष्ट समाधी आहे. नाम श्वासाबरोबर सांभाळावे. शिवाय नामाचा प्रेमाशी संबंध कसा वाढेल हे पाहायाला पाहिजे. प्रेमाने नाम घेण्याने जे समाधान लाभेल, ते श्वासात नाम घेण्याने मिळणार नाही, तेव्हा नामात प्रेम कशाने येईल हे पाहायला पाहिजे. कामाच्या व्यापात नामस्मरण करण्याचा अगदीच सोपा उपाय म्हणजे कोणताही खाण्याचा किंवा पिण्याचा पदार्थ भगवंताचे नाम घेतल्याशिवाय तोंडात टाकायचा नाही, असा नेम ठेवला तर आपोआप नाम येते. दुसरे, विषयांचे स्मरण विसरण्यासाठी भगवंताच्या स्मरणात राहिले पाहिजे आणि याला उपाय म्हणजे नामस्मरण.

सर्व साधनांत नामसाधना श्रेष्ठ आहे. इतर साधने भिंतीवरून चढून घरात उडी मारण्याप्रमाणे आहेत, तर किल्लीने कुलूप काढून सरळ खोलीत जाणे जे नामाचे साधन आहे. नामाने थोडासा उशीर लागेल, पण जे साधेल ते कायमचे साधेल, कारण नामाने मुळापासून सुधारणा होते. खरे पाहिले तर भगवंताचे नाम त्याच्याच कृपेने आपल्या मुखात येते. म्हणजे त्याचे नाव तोच घेत असतो. 'जेथे माझे नाम, तेथे मी पुरुषोत्तम.' या वचनावर विश्वास ठेवून नाम घ्यावे आणि त्यातच त्याला पाहावे. यासच **श्रद्धा** म्हणतात. नाम उपाधिरहित असते, हा त्याचा विशेष गुणधर्म आहे. श्रद्धेविना आशा कोमेजते आणि प्रेम अंतर्धान होते व समस्त तेज निस्तेज बनते.

नामस्मरणासाठी आळस हा मोठा शत्रू आहे. भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. तो भगवंत हवा असे वाटणे, हे खरोखरच भाग्याचे लक्षण आहे. आम्हाला नामात प्रेम येत नाही याचे कारण अगदी उघड आहे. ते असे की, आपले प्रेम आधीच दुसरीकडे पूर्णपणे गुंतलेले आहे. त्यात कमी करण्याची आपली तयारी नसते. आपले अर्धेअधिक प्रेम देहावर असते, उरलेल्यातले अर्धे बायकामुले, स्नेहीसोबती यांच्यात गुंतलेले असते आणि उरलेसुरलेले उपजीविका, मानलौकिक, आवडीचे छंद अशा गोष्टींना वाहिलेले असते. यात कुठेतरी कानाकोपऱ्यात आपण नाम ठेवणार. मग त्यात प्रेम कसे वाढणार?

प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे, तसे नामाच्या सहवासाने त्याचे प्रेम आपोआप येईल. नाम घेणे हा माझा धर्म आहे, ते माझे आद्यकर्तव्य आहे, त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे. नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे, किंबहुना मी नामाकरताच जन्माला आलो आहे आणि तद्रुपच होऊन जाईन, इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे. मग प्रेम आले नाही, ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की आम्ही नाम खऱ्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे नाम घेण्याच्या निश्चयाने ते जसे येईल तसे घेत राहणे. रिकामा सगळा वेळ भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करावा, आणि नाम घेत असताना भगवंताला अनन्य शरण जाऊन 'तुझ्या नामाचे प्रेम मला दे.' अशी काकुळतीने प्रार्थना करा म्हणजे नामाचे प्रेम आपोआप वाढेल.

नामात प्रेम यायला एक, गुरूंना ते आवडते म्हणून घ्यावे किंवा दुसरे, नामातच माझे कल्याण आहे, या भावनेने ते घ्यावे. नामावाचून चैन पडेनासे झाले की, प्रेमाचा उगम झाला असे समजावे. नामाचे प्रेम, नामातूनच

उत्पन्न होते. अग्निहोत्राचा अग्नी त्याच लाकडातून निघत असतो. त्याला बाहेरच्या विस्तवाची अपेक्षा असत नाही. तद्वत नामाच्या प्रेमाचे आहे.

नामातच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असते, ते वर दिसत नाही पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते, तसे भगवंताचे नाम आपण घेतले की, त्याचे प्रेम आपोआप वर येते. नाम अगदी मनापासून घ्यावे आणि 'भगवंता, मी तुझा आहे आणि तुझ्याकरिता नाम घेतो आहे' असे म्हणावे. असे आर्ततेने भगवंताचे नाम घ्यावे. नामात कसलीही अपेक्षा असू नये म्हणजे हळूहळू नामात प्रेम येईल.

बहुतेक लोक प्रारब्ध टळावे म्हणून नाम घेतात. प्रारब्धाचे भोग आजपर्यंत कोणासही चुकले नाहीत. मग कसे करावे? इथे असे लक्षात ठेवावे की, प्रारब्धाची गती फक्त देहापुरतीच असते; म्हणून ज्याची देह-बुद्धी कमी झाली तो देहाच्या सुख-दुःखाने सुखी वा दुःखी होत नाही. नामाने देहबुद्धी कमी होते, म्हणून नामात राहणारा मनुष्य प्रारब्धाचे भोग भोगीत असतानादेखील आनंदात असतो. नामाच्या आनंदापुढे त्याला प्रारब्धाची किंमत राहत नाही. विषयाकरिता नाम खर्च करू नये. नामाकरीताच नाम घ्यावे. नाम कधीच वाया जात नाही.

षडरिपुंवर सत्ता गाजवण्यासाठी सतत नामस्मरण करावे. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या षडरिपुंना क्षीण करण्याचे सामर्थ्य नामस्मरणामध्ये आहे. त्या सहा शत्रूंचा जन्म वासनेत असतो. वासना म्हणजे इच्छा, हवे-नकोपण, ही त्यांची आई आणि मीपणा किंवा अहंकार, हा त्यांचा बाप. अशा या आईबापांची ही सहा बाळे काय धुडगूस घालतील आणि अनर्थ माजवतील त्याला मिती नाही. ती मोठ्या मोठ्यांनाही सोडत नाहीत. त्यांना रसातळाला नेतात. नामस्मरणाने वासना नष्ट होते आणि नामस्मरणानेच सद्‌गुरूकृपा होऊन अहंकार मारला जातो. मग त्यांची ही सहा दिवटी बाळे पोरकी होतात आणि त्यांच्यावर आपल्याला हुकमत चालवता येते. त्यांच्या हुकमतीत आपण असलो तर सतत असंतुष्टता, असमाधान राहते उलट त्यांना आपल्या कह्यात ठेवता आले तर सदैव समाधान, आनंद असतो म्हणून सतत नामस्मरण करावे.

### ३) नामस्मरणाची संक्षिप्त पद्धत

अखंड जपाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वैखरीपासून सुरुवात करून मध्यमा, पश्यन्ती व परा याही वाणींनी जप करण्याचा अभ्यास करावा लागत असतो. याला 'चार वाणीतील नाम' असे म्हणतात. भगवंताने जो मूळ संकल्प केला तो ओंकार (ॐ कार). सृष्टीचे ते आदिबीज आहे. त्याला शब्दब्रह्म म्हणतात. ती परावाणी असून संतांचे ते नाम होय. ईश्वराच्या संकल्पाने सृष्टी निर्माण झाली. सृष्टीमधील प्रत्येक वस्तूमध्ये सूक्ष्म स्पंदनरूपाने ओंकार असतो. त्याला अनाहत नाद म्हणतात. ते नादब्रह्म होय. माणसाच्या हृदयात ते पश्यन्ती रूपाने प्रगटते. ते केवळ अर्थरूप असते. तो अर्थ आपल्या आतमध्ये ज्या शब्दांत चालतो त्या वाणीला मध्यमा म्हणतात आणि वैखरी सर्वज्ञातच आहे. नाम घेता घेता साधक अनाहतापर्यंत पोचला की त्याची वृत्ती पूर्णपणे अंतर्मुख होते. नंतरचे नाम आपोआप घडते. तेथे अनावर होते.

ओठ व जीभ यांची हालचाल करून म्हणजेच 'वैखरीने' नामस्मरण करणे, बहुतेकांना सोपे, सोयीचे व लाभदायक असते. वैखरीने नामघोष करण्याला अंगात शक्ती लागते; ती सर्व परिस्थितीत टिकतेच असे नाही. तसेच साधकाला व्यवहारही सांभाळावा लागतो आणि त्यासाठी त्याला इतर बोलावे लागते. व्यक्तिशः किंवा

समूहाने वैखरीने नामोच्चार करायला अशा तऱ्हेच्या मर्यादा असतात, म्हणून अखंड जपाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मध्यमा, पश्यन्ती व परा याही वाणींनी जप करण्याचा अभ्यास करावा लागत असतो. हळूहळू पुढे सवयीने, तोंड बंद असून आतल्या आत जीभ थोडी हलून नामस्मरण होऊ लागते. अभ्यास आणखी वाढला म्हणजे नाम मध्यमेत येऊ लागते. जड व सूक्ष्म यांच्या मधली म्हणून ही 'मध्यमा' वाणी. या स्थितीत ओठ व जीभ ह्यांची हालचाल नसते, तर वाणीचे मेंदूतले जे केंद्र तेथे नामाचे सूक्ष्म स्पंदन चालू असते. तेथून या नामाला शारीरिक शक्ती आवश्यक राहत नाही व बाह्य परिस्थितीशी संबंध कमी होऊ लागतो. शरीराच्या सामान्य हालचालींनीही बाधा कमी होऊ लागते. वैखरीने वा मध्यमेत नाम चालत असता आपण ते कानांनी ऐकण्याचा प्रयत्न करीत राहावे, याने एकाग्रता साधण्यास मदत होते. अभ्यास नेटाने चालू राहिला म्हणजे नाम यानंतर 'पशन्ती'मध्ये हृदयस्थानी, अनुसंधानरूपाने चालते व अखेर ते नाभिस्थानी परावाणीने केवल स्फूर्तिरूपाने चालू लागते. मग बोलणे, देहाची हालचाल, स्थिती, व्याधी वा बाह्यपरिस्थिती या कशाचाही व्यत्यय न होता नाम अखंड चालू राहते.

**४) नामस्मरणाचे प्रकार ***

नामस्मरण म्हणजे नामाने नामीचे अनुसंधान करणे. नामोच्चारणेच्या धारेला **जप** अशी संज्ञा आहे. शास्त्रांत या जपाचे प्रकार वाचिक, उपांशू व मानस असे तीन सांगितले आहेत. त्यांची फळेही निरनिराळी आहेत. सद्गुरू वामनराव पै यांनी 'ज्ञानेशाचा संदेश' या ग्रंथात नामस्मरणाचे अकरा प्रकार सांगितले आहेत.

पहिला प्रकार : नामाचे उच्चारण करणे व ते लक्षपूर्वक ऐकणे. दुसरा प्रकार : उच्चार करीत असताना उपास्य मूर्ती चरणांपासून मस्तकापर्यंत व तेथून चरणापर्यंत पुन:पुन्हा पाहत राहणे. तिसरा प्रकार : नाम नामी अभेद भगवंत व भगवन्नाम हे दोन्ही एकच आहे, या बोधात नामस्मरण करणे. चौथा प्रकार : टाहो फोडून नामाचा उच्चार करणे. पाचवा प्रकार : श्वासोच्छ्वासी नामस्मरण, सहावा प्रकार : श्वासावर लक्ष देवून नामस्मरण करणे. सातवा प्रकार : जिभेला वेग देऊन नामस्मरण. आठवा प्रकार : स्वरूपाच्या स्मरणात नामाचा उच्चार करणे. नववा प्रकार : मूर्ती भगवंत या भावात नामस्मरण करणे, दहावा प्रकार : सद्गुरूची मूर्ती मन:चक्षुपुढे ठेवून नामस्मरण, अकरावा प्रकार : माळेवर जप करणे. असे अनेक प्रकार आहेत.

**१) वाचिक जप :** साधारण आपण व्यवहारात बोलतो, तितक्या मोठ्याने म्हणजे लोकांस ऐकू जाईल अशा स्वराने जो जप केला जातो, त्यास 'वाचिक' म्हणतात. त्याचे फळ इहलोकाची सुखप्राप्ती. वाचिक जपाने म्हणजे वाणीने स्पष्ट उच्चार करण्याने गतीविशिष्ट व ज्ञानविशिष्ट ज्ञानतंतुकंप सुरू होऊन, हृदयाकाशात असलेल्या वायूत कंपाकार निर्माण होतात.

**२) उपांशु जप :** उपांशु जप म्हणजे आपला शब्द आपल्याच कानांवर पडेल इतका हळू उच्चारावयाचा. याचे फळ– स्वर्गप्राप्ती. उपांशु जपाने म्हणजे फक्त ओठ व जीभ हालून होणाऱ्या उच्चारांनी त्या ज्ञानतंतुकंपाला नियमिताकार निर्माण होतो. त्यापुढे नेत्रेंद्रियातील 'लेनालीज'मध्ये ते कंप जाऊन तेथे प्रकाशाकाराचे देवताबीज निर्माण होऊन मानसिक जप व्हावा लागतो.

**३) मानस जप :** मानस जप म्हणजे ओठ किंवा जीभही न हालवता फक्त मनानेच शब्दोच्चार करणे. ह्या जपाचे फळ – मोक्षप्राप्ती. तसेच वाचिक जपापेक्षा उपांशु शतपटीने व मानस सहस्त्रपटीने फलदायक, असे शास्त्रांत सांगितले आहे. या जपात कोणी वाचिक, उपांशु, मानस, ध्यान व अनय असे पाच प्रकार सांगतात. मानसिक जपाने म्हणजे ओठ, जीभ वगैरे न हालवता केवळ मनोमय स्पष्ट उच्चाराने व तो उच्चार आपल्या अंत:श्रवणावर येईल अशा रीतीचा जप केल्याने त्या मंत्रोच्चार देवतेचा देहाकार कंपाकारस्वरूपातून ईथरच्या लहरीच्या स्वरूपातून स्थूल तेजाकार होऊन, त्या जड तेजातून केवळ चैतन्यस्वरूपी मानस तेजाकार स्वरूपाचा– स्वर्गीय तेजाकार स्वरूपाचा बनतो. 'देवता हिरण्यमया:' प्रमाणेच देवतास्वरूप नुसते बनल्याने कार्य घडत नाही. 'स्थूल' व 'सूक्ष्म' देहापर्यंतच या क्रिया पोचतात. यापुढे त्या देवतेत सामर्थ्य क्रियाकारी चैतन्यशक्ती भरावी म्हणून 'ध्यान' जपाची आवश्यकता लागते.

उपांशू व मानस यांच्या मध्यभागी **ध्वान** नावाचा एक प्रकारही सापडतो. उपांशू जपात ओठ व जीभ हालून उघड्या ओठांमधून शब्दोच्चाराचा वायू फुसफुसल्याप्रमाणे बाहेर निघतो; पण असा वायू बाहेर निघताना, ओठ उघडे ठेवून अगर झाकून फक्त जीभ हलवून जो शब्दोच्चार केला जातो, त्यास म्हणजे नादरहित ध्वनीस **'ध्वान'** असे म्हणतात. उपांशू जप कर्णगोचर असतो; पण ध्वान जप फक्त मनोगोचर असतो. त्याच्या योगे एकाग्रता अधिक होते. हा जप फार वेळ करता येणार नाही. हा साधला म्हणजे 'मानस'जप करण्याची योग्यता येते.

मानस जपात जपाची अक्षरे जीभ हलवल्याशिवाय फक्त मनानेच उच्चारावयाची असतात. मानस जपाचा अभ्यास बराच काळ झाला म्हणजे **'ध्यान–जप'** व तो पचनी पडला म्हणजे **'अनन्य जप'** करता येतो.

**४) ध्यान जप :** मनोमय प्रकाशात,ज्या मंत्राचा आपण जप करतो त्या मंत्रार्थाने सूचित जो देवतेचा स्वरूपाकार, त्या स्वरूपाकाराच्या तेजात, ध्यानाने त्याच्या जितक्या अद्वितीय सामर्थ्याची भावना आपण ठेवू तितकेच सामर्थ्य त्यात जागृत होते. यावेळी हा आपला जप आपल्या 'कारण' देहापर्यंत पोचतो. याप्रमाणे त्या तेजाच्या देवतेच्या देहात चैतन्य भरून ती जागृत होऊन सामर्थ्यवान झाली तर ती आपल्या सामर्थ्याने आपल्या इच्छेप्रमाणे कार्य करील यात शंका नाही; परंतु आपल्या इच्छेशी, मनाशी, आपल्या सर्व देहाशी तिचा संबंध कायमचा जडावा यासाठी 'अनन्य' जपाची आवश्यकता लागते.

**५) अनन्य जप :** अनन्य जप म्हणजे ही तेज:स्वरूपी देवता निराळी व मी जप करणारा निराळा ही भावना नाहीशी होऊन ज्या देवतेचा जप मी तोंडाने करीत आहे व जी देवता मी मनाने तेजोरूप पाहत आहे ती देवता व मी हे निराळे नसून एकच आहोत, हे पटण्यासाठी व अनुभवास येण्यासाठी काही काल ते ध्यान आपल्या हृदयात आपण करीत असता त्या देवतेच्या हृदयातही आपले स्वरूप प्रथम तेजाकार पाहत पुढे आपले स्वरूप त्या देवतेच्या स्वरूपाचे व सामर्थ्याचेच भावीत शेवटी आपण व देवता भिन्न नसून एकच आहोत– याला 'अहंग्रहोपासना' असेही नाव आहे. असे एकरूप ध्यान करू लागणे याला **'अनन्य जप'** म्हणतात. या जपाने आपल्या 'महाकारण' देहापर्यंत सर्व देहात मंत्रदेवता सामर्थ्याची जागृती होते. ही या क्रमाने होणारी जागृती पद्धतशीर मंत्रजपाचे कार्य पूर्ण करते. ती **'प्रेयस'** संसारातील अभ्युदय, उन्नतीप्राप्ती करून तर देतेच; पण जर ती पूर्ण व सर्वोच्च सामर्थ्य जागृतिकर भावनेची असेल, तिच्यात जर परिपूर्ण सामर्थ्य जागृत केले असेल, तर ती

**'श्रेयस'** म्हणजे मोक्षही देते. नाहीतर जेवढ्या सामर्थ्य जागृतीची भावना केली असेल, तेवढे सामर्थ्य देऊन ती शेवटी आपल्या लोकापर्यंतच घेऊन जाते. म्हणून जप करणारांनी प्रेयसची (प्रापंचिक अभ्युदयाची) इच्छाही न करता प्रेयस देऊन श्रेयस्‌ची म्हणजे मोक्षाची सहज प्राप्ती होईल अशा श्रेष्ठ नामरूपाकार देवतेचाच जप करावा. या जपाशिवाय, साकार पूर्णतेशिवाय निराकार अचिंत्य परप्राप्तीची योग्यताच येत नाही.

'वाचिक' जप झाल्याशिवाय 'उपांशू' होत नाही. वाचिकपेक्षा उपांशु १०० पट श्रेष्ठ आहे. उपांशू झाल्याशिवाय 'मानसिक' जपाची योग्यता येत नाही. मानसिक जप १००० पट श्रेष्ठ आहे. मानसिक झाल्याशिवाय 'ध्यान' जपाची योग्यता येत नाही. तो १०,००० पट श्रेष्ठ आहे. ध्यानजप झाल्याशिवाय 'अनन्य' जपाची योग्यता येत नाही. तो ध्यान जपापेक्षा १००,००० पट श्रेष्ठ आहे. एकलक्षपट अधिक सामर्थ्यसंचय करणारा आहे.

याप्रमाणे जप करणाराला स्वप्नातच काय, पण प्रत्यक्ष बाह्यसृष्टीतही देवतेच्या दर्शनसाक्षात्काराचा अनुभव मिळतो. असा हा नामजप श्रेष्ठ असून,

*'याच देहीं याच डोळा। भोगीन मुक्तीचा सोहळा।।'*

याप्रमाणे मनुष्याला येथेच ईश्वर करणारा, ईश्वरी- सामर्थ्यपूर्ण करणारा आहे. (*रामचंद्र कृष्णा कामत, 'नामचिंतामणी', पृ. ४३१-३३)

याशिवाय नामस्मरणाचा आणखी एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे **'अजपाजप'** होय.

**६) अजपाजप :** भगवंताचे नाम सहजपणे येणे, याचेच नाव 'अजपाजप' होय. अजपाजप करायचा नसतो, तो होत असतो. संत अजपाजपात असतात. शरीरामध्ये विनासायास रक्त सारखे फिरते-प्रवाहित होते ना? तसा अजपाजप चालतो. सबंध शरीरभर हा जप चालतो. याला 'सोऽ हम्‌ साधना' पण म्हणतात.

नामजपाचा प्रमुख उद्देश हाच आहे की, नामाच्या माध्यमाने मनाचा घनिष्ठ संपर्क प्रभूशी प्रस्थापित झाला पाहिजे. नामजपाची पूर्णाहुति तर **'अजपाजप'**मध्ये होते, जेथे जप केल्याशिवायच जपाची साधना स्वत: चालत असते. बहिर्मुख मनास अंतर्मुख राखण्यासाठी आत्मचिंतनाचे सर्वात शक्तिशाली माध्यम **'अजपाजप'** आहे. श्वासोच्छ्वासाच्या क्रियेवर मनास एकाग्र केल्याने, मन वशमध्ये होते. अनुभवी योग्यांनी आजजाजपला **'सहज जप'** असे म्हटले आहे. त्यांच्या मतानुसार मनुष्य दररोज २१,६०० वेळा श्वास घेतो. यांमधील प्रत्येक श्वासामध्ये अद्वैतभावनाच **अजपाजप** आहे. अजपाजपचा योगी ब्रह्मभावनेशिवाय आपला एक पण श्वास व्यर्थ जाऊ देत नाही. या जपामध्ये मंत्रावृत्ती केली जाते. अभ्यासाने मंत्रावृत्ती दृढ झाल्यावर प्रत्येक श्वास हा ब्रह्मभावनेमध्ये परिवर्तीत होऊन जप-कार्यामध्ये लागलेला असतो (मग्न असतो). एक अनुभवी महात्म्याचे अजपाजपविषयी असे उद्‌गार आहेत- ''राम करतो आमुचे जप, आम्ही बसतो आराम.''

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांनी आपल्या 'दासबोधा'मध्ये सतराव्या दशकातील पाचव्या समासात 'अजपाजप उपासने'संबंधी जे निरूपण केले आहे ते सारांशरूपाने पुढे व्यक्त करण्यात आले आहे.

अजपा किंवा श्वासोच्छ्वासासह निरंतर निघणाऱ्या सोऽहं शब्दाच्या जपाची संख्या एकवीस हजार सहाशे अशी निश्चित करण्यात आली आहे. विचारपूर्वक पाहिल्यास सर्व गोष्टी सुलभ आहेत. मुख आणि नासिकेमध्ये प्राण (श्वास) असते आणि त्यांच्यामधूनच तो अखंड स्वरूपात आत-बाहेर येत-जात असतो. याचा सूक्ष्मपणे

विचार केला गेला पाहिजे. तसे पाहिल्यास ते एकच स्वर वाटते, परंतु त्याच्यामध्ये तार, मन्द्र आणि घोर हे तीन भेद (प्रकार) आहेत आणि अजपाचा विचार या घोरहून अधिक सूक्ष्म आहे. सा रे ग म प ध नि या सप्त स्वरांचा उच्चारण तरी करून बघा; आणि यांपैकी एखाद्यास पहिला स्वर मानून वरच्या बाजूस निघा. पराचे स्थान नाभि (बेंबी)च्या वर आणि पश्यन्तीचे स्थान हृदयापासून खाली (अर्थात हृदय आणि नाभिच्या दरम्यान) स्वरांचे उत्पन्न होण्याचे जे स्थान आहे, तेथूनच तो अजपाजपचा स्वर निघतो. यासाठी एकांतामध्ये निश्चिंत होऊन बसले पाहिजे. या सर्व गोष्टींना चांगल्या प्रकारे समजून अखंड स्वरूपात श्वास (आत) घेतले आणि (बाहेर) सोडले पाहिजे. असे म्हणतात की, नाकाने श्वास घेताना 'हं' सारखा ध्वनी होतो. यासाठी एकांतामध्ये मौन धारण करून बसले पाहिजे. त्या वेळेस जरा सावधानपूर्वक पाहिल्यास असे वाटते की, श्वासाबरोबर 'सोहं सोहं' शब्द निघत असतो. न उच्चारताच जो शब्द (ऐकू येतो) निघतो, त्यास सहज वा स्वाभाविक समजले पाहिजे. अशा शब्दांची अनुभूती तर होते, परंतु त्यांच्यामध्ये नाद अजिबात नसतो आणि जो या शब्दांचा पण त्याग करतो, त्याला उत्तम मौनी जाणावे. एकांतात स्तब्ध बसून या गोष्टीवर लक्ष द्यावे की कोणता शब्द निघत आहे, तर असे दिसून येईल की, 'सोहं सोहं' शब्द ऐकू येत आहे. नाकाने श्वास घेतल्यावर 'सो' आणि श्वास सोडल्यावर 'हं' शब्द निघतो आणि अशाप्रकारे निरंतर 'सोहं सोहं' शब्द ऐकू येऊ लागतो. ही 'सो ऽ हम साधना' होय.

सूफ़ींची अशी धारणा आहे की, अजपाजपच्या माध्यमाने आत्मा हा परमात्म्यापर्यंत पोहचतो. (सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख्वाजा बंदा नवाज़ – 'मेअराजुल आशिक़ीन', भक्तांची उत्कर्ष यात्रा)

### ५) नामस्मरणाचे अनुभव

उत्तर भारतातील रामचरण नामक सुप्रसिद्ध साधूने आपल्या 'शब्दप्रकाश' नामक हिंदी छोट्या ग्रंथात आपले नामस्मरणाचे अनुभव सांगितले आहेत. त्याचा सारांश असा की, रामनामाच्या अखंड स्मरणाने म्हणजे वैखरी वाणीच्या सतत उच्चाराने मध्यमा वाणी आपोआप उघडते, मध्यमेचे म्हणजे कंठात (जिव्हा हलवल्यावाचून) नामजप आपोआप चालतो. मध्यमेचे अनुष्ठान पूर्ण झाले म्हणजे पश्यंती वाणी उघडून हृदयात जप आपोआपच सुरू होतो; ते अनुष्ठान पूर्ण झाले म्हणजे परावाणी उघडते. नाभीत जप स्फुरू लागतो. नंतर शरीरातील सर्व नाड्यांमधून, रोमारोमांतून जप सुरू होतो, सुषुम्नेचे द्वार खुले होते व अष्टांगयोग्यासही जेथे जाणे अत्यंत प्रयासाचे आहे, त्या शिखानाडीतील सहस्रदल कमलात या नामयोग्याची गती होते. म्हणजे तिकडील अनुभव त्यास चाखावयास मिळतो. हा केवळ रामनामाच्या अखंड उच्चाराचा परिणाम होय.

वैखरी वाणीच्या जपापेक्षा मध्यमेचा, मध्यमेपक्षा पश्यंतीचा व पश्यंतीपेक्षा परेचा जप कोटिकोटी पद्धतीने अधिक फलदायी आहे असे परमहंस श्रीपद्नाभस्वामी म्हणतात.

## ख) ज़िक्र (नामस्मरण) : इस्लामी दृष्टिकोन (धारणा)

इस्लाम धर्मामध्ये 'ज़िक्र' हा शब्द नामस्मरण, जप याअर्थी वापरला जातो. 'ज़िक्र' म्हणजे आठवण. ईश्वराची आठवण ठेवणे, त्याचे स्मरण करणे म्हणजेच 'ज़िक्र' होय. सर्वसाधारण भाषेमध्ये 'ज़िक्र' चा अर्थ आहे

– एखाद्या वस्तूची आठवण करणे किंवा एखाद्या विसरलेल्या गोष्टीची पुन्हा आठवण होणे किंवा ते आठवणीमध्ये साठवून ठेवणे. म्हणून बेसावधगिरीमुळे किंवा विस्मृतीमुळे जर माणूस एखादी वस्तू हरवून बसला असेल किंवा एखादे कार्य लक्षात ठेवण्याचा विचार त्याच्या मनातून निघून गेला असेल तर पुन्हा त्यासाठी कार्यप्रवृत्त होण्यास किंवा त्यासाठी तत्पर होण्यास 'ज़िक्र' म्हणजेच स्मरण असे म्हणतात. याच आधारावर त्या गोष्टींनापण 'ज़िक्र' अर्थात स्मरण म्हटले गेले आहे जे माणसास त्याने विसरलेल्या गोष्टींना पुन्हा आठवण करून देतात आणि विसरलेल्या कार्याकडे लक्ष केंद्रित करतात. जसे पवित्र धर्मग्रंथ कुरआन आणि इतर धर्मग्रंथ जसे तौरात, इंजील, परमेश्वराच्या आठवणीसाठी 'नमाज़' (भक्ती, उपासना).

नामस्मरणाचे विवेचन अनेक प्रेषितवचनां (हदीस)मध्ये आलेले आहे. तसेच पवित्र कुराणामध्ये पण जागोजागी याचा महिमा आढळतो. यासंबंधी हदीस व कुराणोक्त विवेचन पुढीलप्रमाणे आहे.

**१) हदीसप्रणीत विवेचन –** ईश्वरी कोप व शिक्षेपासून वाचवण्याचे साधन प्रभू नामस्मरणाशिवाय दुसरे कोणतेच नाही. परमेश्वराचे खूप नामस्मरण करणारे स्त्री–पुरुष अग्रेसर होतात. नामस्मरण करणारी मंडळी जेव्हा आणि जिथे बसते तेव्हा देवदूत त्यांना घेरतात. ईश्वरीकृपेची छाया त्यांच्यावर पसरते आणि परमेश्वर त्यांचा उल्लेख करू लागतो. सतत प्रभुनामस्मरणाचे प्रशंसक राहिले पाहिजे. पुनरुत्थानाच्या दिवशी सर्वात श्रेष्ठ व उच्चदर्जावर नामस्मरण करणारे लोक राहतील. परमेश्वराचे नामस्मरण करणारे आणि न करणारे त्यांचे दृष्टान्त जीवित आणि मृतासारखे आहे. मी आपल्या दासाच्या धारणेनुसार आपले व्यवहार ठेवतो. जेव्हा तो माझे स्मरण करतो तेव्हा मी ज्ञानाच्या दृष्टीने त्याच्याजवळ असतो. जर त्याने माझे स्मरण मनात केले असेल तर मी पण आपल्या मनामध्ये त्याचे स्मरण करीन. सभेमध्ये आठवण करेल तर मी पण त्यापेक्षा चांगल्या सभेमध्ये त्याची आठवण करीन. तो मजकडे जर एक वीतभर सरसावेल तर मी हाताएवढे पुढे येतो. तो हाताच्या पुढे आला असेल तर मी दोन हाताएवढे त्याच्याजवळ येतो. तो चालत येत असेल तर मी त्याच्याकडे धावत जातो. स्वर्गोद्यानांमधून जात असाल तर तेथे काही तरी खात जा. प्रेषिताच्या सहचरांनी त्यांना विचारले की स्वर्गोद्यान कोणते आहेत? ते म्हणाले की नामस्मरण करणारी मंडळी. ईश्वर म्हणतो की तो दास माझा संपूर्णपणे गुलाम आहे जो मरेपर्यंत माझे स्मरण करतो. प्रत्येक पदार्थास चमकवून सोडणारी कोणती ना कोणती वस्तू विद्यमान असते आणि अंत:करणास चकचकीत करणारी गोष्ट म्हणजे सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे नामस्मरण होय. प्रत्येक वस्तूसाठी चमक निर्माण करणारी धार असते. अंत:करणास चमकवून सोडणारी (गोष्ट) म्हणजे प्रभुनामस्मरण. या परमेश्वराच्या शिक्षेपासून वाचवण्यासाठी– मुक्ती देण्यासाठी प्रभुनामस्मरणाशिवाय इतर कोणतीच वस्तू नाही. अंत:करण दोन गोष्टींनी कलुषित बनते– बेसावधगिरी आणि अपराध आणि दोनच वस्तूंनी ते स्वच्छ बनते आणि ते म्हणजे क्षमायाचना आणि प्रभुनामस्मरण. जिवंत आणि मृत माणसामध्ये फक्त नामस्मरणाचेच अंतर असते. जर तो नामस्मरण करीत असेल तर तो जिवंत आहे, असे समजावे. नाही तर मृत जाणावे.

**२) कुरआनप्रणीत विवेचन –** नमाज़ म्हणजेच भक्तीसाठी आवश्यक असलेली समस्त कर्मकांडे ही नामस्मरणाच्या कायम , नित्य आणि दृढ प्रस्थापनेसाठी प्रचलित करण्यात आली आहेत. म्हणजे जणू सर्व सत्कर्मांचे विमोचन आणि प्रचलनाचा मूळ हेतू हा प्रभुनामस्मरण (साध्य)करणे हा आहे. अल्लाहचे कथन आहे, '' नमाज़ (भक्ती)च्या बाबतीत नियमितता बाळगा. सूर्य ढळल्यापासून तर रात्रीचा काळोख होईपर्यंत (निर्धारित

वेळेवर) नमाज़ पढा (भक्ती करा), तसेच पहाटेच्या वेळी नमाज़मध्ये (कुराणाचे) पठण करण्याविषयी काळजी घ्या. कारण पहाटेच्या वेळी जेव्हा कुराणाचे पठण केले जाते, तेव्हा साक्षी राहण्यासाठी (देवदूत विशेष हजेरी लावतात.) आणि रात्रीच्या वेळी उठा आणि रात्रीच्या शेवटच्या भागात 'तहज्जुद' (मध्यरात्री नंतरची अतिरिक्त नमाज़) ही अतिरिक्त नमाज़ पढा. (जरी ही नमाज़ दिवसातील इतर पाच नमाज़ाप्रमाणे बंधनकारक नसली तरी) तुमच्याकडून नियत कर्तव्यापेक्षा अधिक काही केल्यासारखे असेल.'' १७:७८-७९ जे लोक परमेश्वराला स्मरून धर्माचरणात आयुष्य घालवत नाहीत ते खरोखरीच कोणत्याही स्थितीत सुखी, समाधानी व आनंदात राहू शकत नाहीत. याविषयी कुराण असे नमूद करते, ''ज्या मनुष्याने माझ्या स्मरणावाचून तोंड फिरविले, त्याचे आयुष्यक्रमण अडचणीचे होईल. (दु:खाने भरलेले असेल), आणि पुनरुत्थाच्या दिवशीही आम्ही त्याला आंधळा (करून) उठवू .'' २०:१२४

''काय श्रद्धावंतांच्या बाबतीत ती वेळ येऊन ठेपलेली नाही की त्यांची मने अल्लाहच्या नामस्मरणासाठी व (त्यांच्या प्रत) अवतीर्ण झालेल्या सत्यासाठी विनम्र व्हावीत? आणि त्यांनी त्या लोकांसारखे होऊ नये ज्यांना त्यांच्यापूर्वी ग्रंथ देण्यात आला होता आणि त्यांच्यासाठी अवधी लांबवण्यात आला होता, परंतु त्यांची अंत:करणे कठोर झाली होती व त्यांच्यापैकी अनेक लोक आज्ञाभंजक (पापी) आहेत.'' ५७:१६

सूर्योदयापूर्वी व (तसेच) सूर्यास्तापूर्वी आपल्या पालनकर्त्याच्या स्तुतिबरोबर (त्याच्या) पावित्र्याचेही गुणगान कर, आणि (तसेच) रात्रीच्या घटिकांमध्ये व दिवसाच्या उत्तरार्धात (म्हणजे दुपारच्या 'ज़ोहर'च्या वेळीही) (त्याचे) पवित्रतेचे गुणगान कर, की कदाचित (या उपासनेचे प्रतिफल संपादून) तुला (खराखुरा) आनंद लाभेल.'' २०:१३०. ''आपल्या लोकांना नमाज़ पढण्याची आज्ञा कर आणि (स्वत: देखील) त्यावर अचल राहा (नित्य नमाज़ पढ).'' २०:१३२ याचा अभिप्राय असा की, माझ्या नामस्मरणाप्रीत्यर्थ नमाज़ क़ायम करा. यावरून असा अन्वयार्थ निघतो की, नमाज़ तेव्हा संपन्न व्हावी, जेव्हा परमेश्वर माणसाची आठवण काढतो. यावरून असे दिसते की, माणसाने परमेश्वराचे नामस्मरण करण्यापूर्वी सर्वश्रेष्ठ परमेश्वर माणसाची आठवण करतो.'' या ग्रंथात तुझ्याकडे जे प्रकट करण्यात आले आहे त्याचे पठण कर व नित्य प्रार्थना (नमाज़) कर. प्रार्थना निर्लज्जतेपासून आणि दुष्कृत्यापासून निश्चितच परावृत्त करते आणि अल्लाहचे नामस्मरण हे सर्वश्रेष्ठ सत्कृत्य (सदाचार) आहे.'' २९:४५

नामस्मरणाशी निगडित उपरोक्त श्लोकाची विविध भाष्ये पुढीलप्रमाणे आहेत -

अब्दुल्ला बिन अब्बास, सलमान, अबी दर्दा आणि इब्न मसऊद यांच्या भाष्यानुसार नमाज़मध्ये उपासक हा ईश्वराचे नामस्मरण करतो आणि जो त्याचे स्मरण करतो, परमेश्वर त्याचे स्मरण करतो. उपासकाचे 'अल्लाहु अल्लाहु' असे नामजप करण्यापेक्षा स्वत: परमेश्वराचे तुमचे (भक्ताचे) स्मरण करावे हे किती पटीने श्रेष्ठ आहे.

दुसरे भाष्यकार फ़ज़ील बिन मर्ज़ूक़ यांचे असे मत आहे की, भक्ताचे नामस्मरणापेक्षा सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे भक्ताचे स्मरण करणे हे कोणत्याही नामस्मरणापेक्षा सर्वोत्तम व सर्वश्रेष्ठ आहे.

इब्न ज़ैद आणि क़तादा यांचा असा अभिप्राय आहे की, परमेश्वराचे नामस्मरण करणे हे इतर सर्व वस्तूंचे स्मरण करण्यापेक्षा श्रेयस्कर आहे, अधिक चांगले आहे.

सलमान यांना विचारण्यात आले की सर्व कर्मांमध्ये कोणते कर्म सर्वश्रेष्ठ आहे? त्यांनी उत्तर दिले की काय तुम्ही कुरआन मध्ये वाचले नाही की, ''परमेश्वराचे नामस्मरण हे सर्वोत्तम आहे.'' २९:४५ अबी दर्दा यांनी प्रस्तुत केलेली उपरोक्त हदीस (प्रेषित वचन) पण याच्या पुष्ट्यर्थ नमूद केली जाऊ शकते.

शेख़ुल इस्लाम अबुल अब्बास (इमाम इब्न तैमिया) यांच्या मतान्वये, नमाज़ (भक्ती)चे दोन मोठे हेतू आहेत. हे दोन्ही एकापेक्षा एक वरचढ आहेत. प्रथम हे की नमाज़ निर्लज्जता आणि दुष्कृत्यांपासून निश्चितच परावृत्त करते आणि हे प्रभुनामस्मरणावर निर्भर आहे. दुसरे असे की तिच्यामध्ये नामस्मरणासारखी सर्वश्रेष्ठ गोष्ट समाविष्ट आहे जी निर्लज्जतेसारख्या निषिद्ध गोष्टीहून पण श्रेष्ठ आहे.

सर्वश्रेष्ठ कर्माविषयी विचारणा केल्यानंतर इब्न अब्बास यांनी असे सांगितले की, सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे नामस्मरण हे सर्वश्रेष्ठ आहे. काबाची परिक्रमा, सफ़ा आणि मर्वा या दोन टेकड्यांदरम्यान सप्त आवागमन, शैतानांना खडे मारणे, हज्ज अर्थात महायात्रेचे सर्व विधी नामस्मरणाच्या संस्थापनेसाठीच सुरू करण्यात आले आहेत. (अबू दाऊद, तिर्मिज़ी, हस्न सही)

प्रभुनामस्मरण न करणारांची काय दुर्दशा होते याची झलक पुढील श्लोकांमध्ये आढळून येते- ''तू अशा माणसाचे म्हणणे ऐकू नकोस ज्याच्या हृदयास आम्ही आमचे स्मरण कारण्यापासून गाफील केलेले आहे आणि जो आपल्या तुच्छ कामनांच्या मागे लागलेला आहे.'' १८:२८ ''त्या लोकांसारखे बनू नका, जे अल्लाहला विसरले, परिणामी अल्लाहनेही असे करून टाकले की त्यांना स्वत:चाच विसर पडला. हेच ते लोक होत जे आज्ञाभंग करणारे (अपराधी) आहेत.'' ५९:१९ ''त्या लोकांचा खेद वाटतो ज्यांची अंत:करणे अल्लाहच्या नामस्मरणाच्या बाबतीत कठोर झालेली आहेत. ते उघड उघड वाट चुकलेले (लोक) आहेत.'' ३९:२२ अल्लाहची संदेशवचने ऐकून किंवा वाचून जे आपल्या विधात्याचे भय बाळगतात त्यांच्या त्वचेवर रोमांच उभे राहतात व त्यांची गात्रे आणि अंत:करणे अल्लाहच्या नामस्मरणासाठी मृदू होतात.'' ३९:२३ आणि जो कोणी कृपावंत (ईश्वराच्या) नामस्मरणाकडे पाठ फिरवतो, त्याच्यासाठी आम्ही शैतानाला नियुक्त करतो, जो त्याचा साथीदार बनतो.'' ४३:३६. ''शैतानाने त्याच्यावर प्रभुत्व मिळवलेले आहे, आणि त्यांना अल्लाहच्या नामस्मरणाचा विसर पडलेला आहे. ते शैतानाच्या गटाचे लोक आहेत. नि:संशय, शैतानाचाच गट हानी पावणारा आहे.'' ५८:१९. ''खरे तर हेच (सत्य नाकारणारे नास्तिक) लोक स्वत: कृपावंत (अल्लाह)चे नामस्मरण करण्यास (तिरस्कारपूर्वक) नकार देतात.'' २१:३६ ''हे श्रद्धावंत लोकहो! तुमची संपत्ती व तुमची संतती अल्लाहच्या नामस्मरणापासून तुम्हाला बेसावध न ठेवो, आणि जे कोणी असे करतील ते (निश्चितच) हानी पावणारे आहेत.'' ६३:९ ''जे (लोक) श्रद्धा बाळगतात व सत्कर्मे करतात, आणि अल्लाहचे नेहमी जिवंत भाव बाळगून नामस्मरण करतात आणि त्यांच्यावर (केवळ) अन्याय झाला तरच बदला घेतात.'' २६:२२७ ''नि:संशय, मी अल्लाह आहे; माझ्याशिवाय दुसरा कोणीच ईश्वर नाही. म्हणून माझीच उपासना कर आणि माझ्या नामस्मरणासाठी नमाज़ पढ. (प्रार्थना-भक्ती कर.)'' २०:१४

प्रेषित मूसा आणि प्रेषित हारून या बंधुद्वयांची नामस्मरणाची उत्कट इच्छा पुढील श्लोकामध्ये प्रतिबिंबित झालेली आहे - ''आम्ही (उभयता एकत्रित होऊन) तुझे अधिकाधिक गुणगान करावे आणि तुझे अतोनात नामस्मरण करावे. तुला आमच्या अवस्थेची पूर्ण जाण आहे.'' २०:३३-३५ परमेश्वराचा पण आदेश आहे -

''माझ्या नामस्मरणाबाबतीत हयगय (आळस) करू नका'' २०:४२ वा ''माझ्या स्मरणापासून कधीही बेसावध राहू नका.'' २०:४२ ''हे श्रद्धावंत लोकहो, अल्लाहचे खूप नामस्मरण करत रहा.'' ३३:४१ ''हे श्रद्धावंत लोकहो! जेव्हा तुम्ही (नास्तिकांचे) कोणा सैन्याशी भिडून जाल, तेव्हा खंबीर उभे राहा व परमेश्वराचे अतोनात स्मरण करा; की (अखेर) तुम्ही कदाचित् (आपल्या मनोरथात) सफल व्हाल.'' ८:४५ ''मग जेव्हा तुम्ही आपले (हज्जचे-महायात्रेचे) विधी पूर्ण करून चुकाल, तेव्हा तुम्ही (शेखीने) जसे आपल्या वाडवडीलांचे स्मरण करत होता (ते सोडून देऊन) तसेच, किंबहुना त्याहुनही जास्तच (पूज्यबुद्धीने) तुम्ही परमेश्वराचे स्मरणात लागा.'' २:२०० ''तर (श्रद्धावंतांनो!) तुम्ही सकाळी आणि संध्याकाळी अल्लाहच्या असीम महानतेचे गुणगान अर्थात नामस्मरण करा.'' ३०:१७

''दिवसाच्या दोन्ही टोकांच्या वेळी (म्हणजे सकाळ सांज) आणि रात्रीच्या पूर्वार्धात नमाज़ पढा. (प्रार्थना करा) सत्कृत्ये, दुष्कृत्यांचे निश्चितच उच्चाटन करतात. जे लोक (परमेश्वर नाम)स्मरण करणारे होते त्यांच्या ठायी हा (आमचा आदेश एक तऱ्हेची) आठवणूक होय आणि (हे पैगंबरा, भक्ती परिश्रम राजीखुषीने) सहन कर; कारण की परमेश्वर सुकृत्ये करणारांचे फल वाया जाऊ देत नसतो.'' ११:११४-१५. ''जे श्रद्धा ठेवतात,आणि ज्यांच्या ईश्वरनामाने समाधान होते, (आणि) होय! जाणून असा! ईश्वरस्मरणाने अंत:करणास समाधान होतच असते.'' १३:२८ ''अल्लाहचे अतोनात, नामस्मरण करणारे पुरुष व (त्याचे) नामस्मरण करणाऱ्या स्त्रिया या सर्वांसाठी अल्लाहने क्षमा व महान पुण्यफल तयार ठेवलेले आहे.'' ३३:३५

''खरोखर, तुमच्यापैकी प्रत्येकासाठी अल्लाहच्या पैगंबरामध्ये सद्‌गुणांचा आदर्श नमुना आहे. (आदर्श) त्यांच्यासाठी जे अल्लाह आणि अंतिम दिवसाच्या बाबतीत आशा (भय) बाळगून असतात आणि जे अल्लाहचे खूप नेहमी स्मरण करीत असतात.'' ३३:२१ (जेथे असाल तेथे) अल्लाहचे अतोनात नामस्मरण करा की कदाचित तुम्ही कृतार्थ व्हाल.'' ६२:१० ''पण जो (या जगात) स्वत:ला (मनाने) शुद्ध बनवतो (शुचिर्भूत ठेवून) तोच यापुढील जगात यशस्वी ठरतो आणि जो आपल्या विधात्याचे नामस्मरण करतो व प्रार्थना करतो (नमाज़ पढतो)'' ८७:१४-१५ ''ईशस्मरणाने अंत:समाधान लाभते, हे ध्यानी असू द्या.'' १३:२८ ''तुझ्या प्रभूचे नामस्मरण कर, आणि एकाग्रतेने त्याच्याकडे वळ.'' ७३:८

''आपल्या प्रभूला मनात स्मरत राहा; नम्रतेने, भीतीने आणि हळू आवाजात, सकाळी, संध्याकाळी आणि निष्काळजी होऊ नकोस. खरोखर जे तुझ्या प्रभुसन्निध आहेत, ते त्याची भक्ती न करण्याचा उद्धटपणा करीत नाहीत. ते त्याच्या पवित्र नामाचा जप करीत असतात आणि त्याला प्रणिपात करीत असतात.'' ७:२०५-२०६ ''माझे स्मरण करा, आणि मीही तुमचे स्मरण ठेवीन आणि माझ्याप्रती कृतज्ञ राहा व माझ्याशी कृतघ्न होऊ नका.'' २ :१५२ ''जे उठता-बसता आणि पहुडले असता प्रत्येक स्थितीत ईश्वराचे स्मरण करतात आणि पृथ्वी व आकाशांच्या रचनेत मनन व चिंतन करतात.'' ३:१९१

सारांश, नामस्मरणाचा महिमा शेख़ुल इस्लाम इब्न तैमिया यांच्या एका वचनातच असे सांगता येईल की, नामस्मरण हा श्रद्धावंतांचा स्वर्ग आहे. भक्ती (उपासना) व नामस्मरण हे साक्षात जुळे आहेत.

### ३) नामस्मरणाचे महत्त्व व वैशिष्ट्य

प्रभुनामस्मरणाने कुप्रेरणा नाहीशा होतात. नामस्मरणाने सर्वश्रेष्ठ परमेश्वर प्रसन्न होतो. मनातील सर्व दु:ख

व चिंता आणि काळजी यांचे निराकरण होते. चित्तामध्ये उल्लास, प्रसन्नता आणि आनंद निर्माण होतो. नामस्मरणाने देह आणि आत्म्यास बळ प्राप्त होते. अंत:करण प्रकाशमान होते (बनते), चेहऱ्यावर तजेलपणा येतो, टवटवी निर्माण होते. ईश्वराप्रती प्रेम निर्माण होते. ईश्वरप्रेम हा इस्लामचा आत्मा आहे. जप हा जापकास भय आणि दहशत, रुची, विचार आणि चिंतन याची वेशभूषा नेसवतो. याने माणूस वाईट कर्मांपासून परावृत्त होतो. याने चित्त परिष्काराची पात्रता निर्माण होते. इथपर्यंत की जप, जापकास भक्त्युत्कर्षाच्या दारामध्ये दाखल करूनच मग थांबतो. नामस्मरण जापकास ईश्वराकडे प्रवृत्त करते. दुष्कृत्ये आणि पापाचाराविषयी पश्चात्तापाची सुबुद्धी निर्माण होते. जापक हा सर्वश्रेष्ठ परमेश्वरासच आपला प्रतिपालक, कार्यसाधक मानतो.

दोन गोष्टींमुळे मानवाचे मन दूषित बनते. एक बेसावधगिरी आणि दुसरे अपराध. आणि दोनच गोष्टींमुळे ते प्रकाशमान बनते, उजळते. ते म्हणजे क्षमायाचना आणि  प्रभुनामस्मरण. बेसावध आणि वासनेचे गुलाम असलेली व्यक्ती ही मनानेसुद्धा आंधळी बनते,आणि दूरदृष्टीपासून पण ती अंध बनते. कारण, ''नव्हे! वस्तुस्थिती ही आहे की, त्यांच्या दुष्कृत्यांचा, त्यांच्या हृदयावर गंज चढलेला आहे.'' ८३:१४ नामस्मरण चित्तास उजळून सोडते.

नामस्मरण ईश्वरसान्निध्यास कारणीभूत ठरते. ज्याप्रमाणात बेसावधगिरी जास्त असेल त्या प्रमाणात ईश्वरापासून अंतर अधिक असेल. नामस्मरणामुळे माणसाची ब्रह्मज्ञानाची मोठमोठी दारे उघडली जातात. नामजपामुळे साधकाच्या मनामध्ये ईश्वराचे महात्म्य आणि त्याची प्रतिष्ठा याचा शिक्का पक्का बसतो. ईश्वराचे नामस्मरण केल्यामुळे आकाशांमध्ये स्वत: ईश्वर जापकाची आठवण ठेवतो. यास्तव ईश्वराचे वचन आहे - ''तुम्ही माझे नामस्मरण करा; तर मी पण तुमचे स्मरण करीन.'' प्रेषित  वचन आहे की जो मनामध्ये माझे स्मरण करतो मी मनात त्याची आठवण ठेवतो,आणि जो एखाद्या सभे-मंडळीमध्ये माझे स्मरण करील तर मी त्याचे स्मरण अशा मंडळींमध्ये करीन की, जी त्याहून अधिक चांगली असेल (म्हणजेच देवदूतांच्या मंडळीमध्ये).

शेख़ुल इस्लाम इब्न तैमिया यांचे कथन आहे की, ज्याप्रमाणे माशाचा पाण्याशी संबंध असतो त्याचप्रमाणे अंत:करणासाठी नामस्मरण असते. पाण्याशिवाय माशाची काय अवस्था होते हे सर्वविदितच आहे. नामस्मरण अंत:करण आणि आत्मा या दोहोंचे खाद्य आहे. ईश्वराचे नामस्मरण समस्त अपराध आणि अपकर्मे यांना नाहीसे करते. ते ईश्वरी कोपापासून मुक्त होण्याचे साधन आहे.

समस्त उपासनांमध्ये नामस्मरण हे सर्वात सोपे व श्रेष्ठ आहे. प्रभूनामस्मरण हे स्वर्गामधील वृक्ष आहे. नामस्मरणामुळे ईश्वर माणसाचे कधीच विस्मरण करीत नाही. नामस्मरणच अशी गोष्ट आहे की जे जापकासाठी इहलोकी प्रकाश असते, थडग्यामध्ये पण प्रकाश आणि परलोकी पण प्रकाशाचे कारण बनेल. ते सन्मार्गाच्या सेतूवर पुढे-पुढे चालत असेल.'' (पुनरुत्थानाच्या त्या दिवशी) पृथ्वी आपल्या विधात्याच्या प्रकाशाने उजळून निघेल (चमकू लागेल).'' ३९:६९

नामस्मरण सुप्त चित्तास जागृत करते. ते ब्रह्मज्ञानाचे वृक्ष आहे. ते ईश्वर सामिप्याचे साधन आहे. नामस्मरण आपल्या उपास्याशी तर उपास्य (ईश्वर) नामस्मरणाशी जोडलेला असतो. म्हणजेच सामिप्य व संतत्व, समर्थन व प्रेम आणि देवानुग्रह व सहायतेच्या दृष्टीने परमेश्वर हा माणसापासून लांब नाही, परंतु तो त्याच्या सोबतीस असतो. जसे की परमेश्वराचे कथन आहे -

“निश्चितच अल्लाह त्यांच्याबरोबर आहे, जे त्याची जाण ठेवून जीवन व्यतीत करीत आहेत.” १६:१२८

“अल्लाह त्यांच्या सोबत आहे जे (प्रतिकूल परिस्थितीत) अढळ सहनशीलता बाळगतात.” २:२४९

“(लक्षात ठेवा) अल्लाह निश्चितपणे श्रद्धावंतांच्या सोबत आहे.” ८:१९

“दु:ख करू नकोस, कारण अल्लाह आपल्याबरोबर आहे.” ९:४०

उपरोक्त स्वरात स्वर मिसळून हदीस कुदसी पण म्हणून जाते – “जोपर्यंत माणूस माझ्या नामस्मरणामध्ये प्रशंसा करीत (प्रशंसक) असतो आणि त्याचे ओठ हलत असतात तोपर्यंत मी त्याच्यापाशी (जवळ) असतो.”

नामस्मरण कृतज्ञतेच्या शिखरावर असते, जे दान आणि संघर्षापेक्षा श्रेष्ठ असते. जापक समस्त संयमी लोकांपेक्षा प्रतिष्ठित असतो. अंत:करणाच्या कठोरतेचा उपाय नामस्मरण आहे. ते मनाचे, अंत:करणाचे औषध आहे. ते परमेश्वराच्या कृपा आणि देवदूतांच्या कृपासाधनांचे साधन आहे. निरंतर नामस्मरण सर्वश्रेष्ठ सत्कर्म आहे; आणि समस्त सत्कर्मे नामस्मरणास कायम करण्यासाठी आणि त्याच्या प्रस्थापनेसाठी प्रचलित करण्यात आली आहेत. नामस्मरण ईश्वरच्या साधनेचे सर्वात मोठा आधार आहे. त्याने सर्व अडचणी सहजपणे सुटतात. त्याने सर्व संकटे दूर होऊन जातात. त्याने प्रबळ शक्ती प्राप्त होते. अधिक प्रमाणात नामस्मरण केल्यामुळे माणूस दंभापासून मुक्त होतो; कारण दांभिक ईश्वराचे फारच कमी नामस्मरण करतात. या संदर्भात परमेश्वराचे कथन आहे– “ते (ढोंगी लोक) अल्लाहचे स्मरण करतात, पण फारच कमी.” ४:१४२

हे माझ्या सेवकांनो! तुम्ही माझे स्मरण करा; तर मी तुमची आठवण ठेवीन, आणि माझ्या देणग्यांविषयी कृतज्ञ असा, कृतघ्न बनू नका. जे सेवक अल्लाहचे स्मरण ठेवतात, अल्लाह प्रेषित नूहच्या वादळामध्ये म्हणजेच महान संकटामध्ये तुमचे स्मरण ठेवील, म्हणजेच तुमचे तारण करील. परमेश्वर त्या दासांचे ऐन संकटामध्ये कृपा व दयेसह स्मरण करतो. म्हणजेच संकटांपासून त्यांचा उद्धार करतो. नामस्मरणाविषयी इस्लामी दृष्टिकोनाचे हे सार आहे आणि हेच तर खरे साफल्य होय.

### ४) नामस्मरणाचे प्रकार

इस्लामी धारणेनुसार, नामस्मरणाचे तीन प्रकार होतात. प्रथम ज़िक्र लिसानी म्हणजेच तोंडाने अर्थात जिव्हेने प्रभुनामस्मरण करणे, द्वितीय ज़िक्र जिस्मानी म्हणजेच सत्कर्मे आणि सदाचरणाच्या साहाय्याने ईश्वराची आठवण करणे आणि शेवटी तिसरे ज़िक्र क़ल्बी म्हणजेच मन:पूर्वक ईश्वराचे नामस्मरण करणे हे होय.

**१) ज़िक्र लिसानी (वाचिक नामस्मरण) –** प्रेषीत मुहम्मद[स.] म्हणतात की, सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वचन आहे की, माझा सेवक मजविषयी जसे विचार राखत असेल, मजविषयी जसे त्याचे अनुमान असेल तशा प्रकारचा व्यवहार मी त्याच्याशी करीन. म्हणजेच जे अल्लाहकडून दया आणि क्षमेची अपेक्षा ठेवत असतील तर त्यांना माफी दिली जाईल. आणि जे ईश्वराशी विमुख असतील, त्यांचा शेवट वाईट असेल. मग पुन्हा परमेश्वर म्हणतो की, जो सेवक (भक्त) माझे मौनपणे आणि गुप्तपणे स्मरण करील, मी पण त्याचे गुप्तपणे स्मरण करीन आणि समूह व सभेमध्ये (मंडळींमध्ये) बसून जो माझे स्मरण करील, तर मी पण देवदूतांचे समूह आणि सभेमध्ये त्याचे स्मरण करीन. हा समूह आणि ही मंडळी (तुमच्या) त्या मंडळींपेक्षा महान आणि अधिक चांगली असतील. जो सेवक सत्कर्म आणि सद्‌विचाराने थोडेसे माझ्याकडे वळतो– ध्यान देतो– स्मरण करतो; मी

त्याच्याकडे अधिक कृपादृष्टीने पाहतो आणि जर तो आणखीन जास्त माझ्याकडे येईल, तर त्याच्यापेक्षा दुप्पट हिश्श्याने त्याच्याकडे कृपादृष्टीने पाहातो. जो मजकडे थोडे-थोडे, हळूहळू चालत येतो, मी त्याच्याकडे भरभर कृपा करून लक्ष देतो - हदीस कुदुसी. तुम्ही माझे थोडेसे स्मरण करा मी तुमची अत्यंत आठवण ठेवीन. तुम्ही जगामध्ये माझे स्मरण करा, मी तुमचे प्रलयदिवशी - पुनरुत्थानामध्ये (परलोकी) स्मरण करीन. तुम्ही माझे स्मरण करा, मी तुमचे स्मरण करीन. तुम्ही माझ्या कृपेसाठी स्मरण करा; तर मी संकटकाळी तुमची आठवण ठेवीन. 'किताबुल फ़र्ज़'मध्ये अशी नोंद आहे की, जेव्हा माशाने प्रेषित यूनुस यांना गिळंकृत करून जलमार्गाने रसातळ गाठले तेव्हा तेथे त्यांच्या कानी ईशस्तवनाचा ध्वनि ऐकू आला. त्यांनी विचारले, परमेश्वरा! हा कसला ध्वनी आहे? परमेश्वर म्हणाला, रसातळामध्ये जे खडे (दगड-गोटे) आहेत ते आमचे स्तवन करीत आहेत. हा आवाज - ध्वनी त्यांचा आहे. भला माणूस तो असतो जो दुसऱ्याच्या चांगल्या गोष्टी अनुसरतो, अंमलात आणतो. या तत्त्वानुसार प्रेषित यूनुस पण ईशस्तवन करू लागले - ''ला इलाह इल्ला अन्न सुब्हानक इन्नी कुन्तु मिनज़्ज़ालिमीन''- अर्थात ''(हे परमेश्वरा!) तुझ्यावाचून अन्य (कोणी) उपास्य नाही, तू परमपवित्र आहेस; मी खरोखरच दुराचरणी लोकांपैकी एक होतो.'' २१:८७ प्रेषित यूनुस यांच्या तोंडातून उपरोक्त स्तवनाचे बोल बाहेर निघण्याचाच अवकाश की तिकडे तात्काळ ते बंधनमुक्त झाले. परमेश्वराने माशास आदेश दिले की, यूनुस यांना आपल्या पोटातून बाहेर काढ. त्या माशाने, समुद्रकिनाऱ्यावर येऊन यूनुस यांना बाहेर ओकून टाकले. तत्काळ त्यांच्यावर भोपळ्याच्या वेलीने सावली केली. सर्वश्रेष्ठ परमेश्वर म्हणतो- जर प्रेषित यूनुस माझे नामस्मरण न करते तर आम्ही त्यांना प्रलयदिवसापर्यंत माशाच्याच पोटात कैद केले असते. प्रेषित यूनुस यांनी आमचे नामस्मरण केले. आम्ही त्यांना कैदेतून मुक्त केले आणि त्यांना मुक्ती दिली.

कनआन प्रांतामध्ये प्रेषित याकूब यांचा एक मित्र होता. फार दिवसांनी तो स्वदेशात आला. तो प्रेषित याकूब यांना भेटला. त्यांना आंधळे झाल्याचे पाहून तो आश्चर्यचकित झाला. त्याने प्रेषित याकूब यांना विचारले, आपण नेत्रहीन कसे झालात, आणि आपली कंबर का बरे वाकली? त्यांनी उत्तर दिले की सुपुत्र यूसुफ़ याच्या अति वियोगामुळे दृष्टी गेली आणि वियोगाच्या दुःखाने माझ्या कमरेस वाकवून टाकले. ते असे म्हणत असतानाच देवदूत जिब्रईल उपस्थित झाले आणि म्हणाले की, परमप्रतिष्ठित परमेश्वर म्हणतो की माझे गाऱ्हाणे तुम्ही इतरांसमोर कुठवर मांडत राहणार? हे ऐकून प्रेषित याकूब स्तब्ध राहिले आणि पुढे त्यांनी याविषयी ब्रही काढले नाही. काही दिवसांनी देवदूत जिब्रईल त्यांच्याकडे आले आणि म्हणाले की, याकूब! तुम्ही ईश्वरापाशी अतोनात याचना करा. तेव्हा त्यांनी याचना केली- परमेश्वरा! या वृद्धावर कृपा कर आणि माझ्या बागेतील फुलांना, क्षणभर का होईना, सुगंधित करून टाक. ''या कसीरूल ख़ैर, या दायमुलमारूफ़'' अर्थात ''हे कल्याणकारी, हे सर्वज्ञ.'' 'वही' अर्थात प्रज्ञान आले की, हे याकूब! आज तू अशी ग्राह्य उपासना केलीस की जर तुझी संतती मृत्युमुखी झाली असती तरी आम्ही त्यांना जिवंत केले असते आणि तुमच्याशी त्यांची भेट घालून दिली असती. आज कृपायाचना केली लगेच दुसऱ्या दिवशी त्यांचे सुपुत्र यूसुफ़चा अंगरखा मिस्र (इजिप्त)हून कनआन येथे पोहोचला. त्या अंगरख्याचा गंध हुंगताच कंबर (कटि) सरळ झाली. डोळ्यांना दृष्टी आली. ''तुम्ही माझे स्मरण करा, मी तुमचे स्मरण करीन.'' ही महाकृपा वाचिक नामस्मरणाची होती.

**२) ज़िक्र जिस्मानी (शारीरिक नामस्मरण) –** दुसऱ्या प्रकारचे प्रभुनामस्मरण ते आहे की, ईश्वर प्रसन्न होईल अशा गोष्टी आणि कर्मे मानवाच्या पायांपासून, हातांनी, डोळ्यांनी, कानांने, व्यवहाराने आणि धन–संपत्तीने घडल्या पाहिजेत. म्हणजेच मानवाच्या शारीरिक अवयवांपासून सत्कर्मे घडली पाहिजेत. तुम्ही आपले आचरण त्याच्या नामस्मरणासाठी करा; तर तो तुमच्यासाठी स्वर्ग राखून ठेवेल. तुम्ही आपल्या विधात्यांमध्ये (माझे) स्मरण करा; तर मी तुमच्या थडग्यांमध्ये तुमची योग्य ती आठवण ठेवीन. परमेश्वराच्या गोष्टी परमेश्वरच जाणो! जो माणूस परमेश्वरासमोर (हिशोब देण्यास्तव) घाबरला आणि घाबरून आपल्या वासनेची इच्छा सोडून बसला; तो स्वर्गामध्येच जाणार. तुम्ही आपल्या संपन्न अवस्थेमध्ये माझी आठवण करा, तर मी तंगी व संकटामध्ये तुमची आठवण ठेवीन. तुम्ही माझे स्मरण करा पृथ्वीतलावर, तर मी तुमचे स्मरण ठेवीन आकाशांमध्ये. तुम्ही माझी साधना आणि उपासना करा; तर मी प्रत्येक वस्तूस तुमच्या अधीन होण्याचा आदेश देईन. तुम्ही माझे विस्मरण होऊ देऊ नका; तर मी तुमची सर्वप्रकारे आठवण ठेवीन. तुम्ही मला द्याल तर मी तुम्हाला देईल. एका प्रेषित वचना (हदीस)मध्ये असे आहे की कृपाळू परमेश्वर श्रद्धावंतांची कर्मे सांभाळून त्यांना प्रतिदान करतो. नमाज़ (भक्ती), रोज़ा (उपासना) इत्यादींचे प्रतिफळ स्वर्ग आहे. (मात्र) श्रद्धेचे प्रतिदान हे फक्त प्रभुदर्शन आहे. उपकाराचा बदला उपकार, परंतु श्रद्धेचे प्रतिदान प्रभुदर्शन.

**३) ज़िक्र क़ल्बी (मानसिक नामस्मरण) –** तिसऱ्या प्रकारचे नामस्मरण हे अंत:करणाने किंवा अंत:करणामध्ये केले गेलेले प्रभुनामस्मरण होय. याला वाटल्यास ईश्वराची परिकल्पना म्हणा, ईश्वरप्रेम म्हणा, ईश्वराची ओढ म्हणा आणि ईश्वराशी संबंध म्हणा. काहीही म्हणा. हे एक फार मोठे नामस्मरण आहे. याच्या तोडीचे दुसरे कोणतेच नामस्मरण नाही आणि हे अतिविशिष्ट अशा भक्तांच्या नशिबी असते. त्यांची (तर) अशी अवस्था असते की त्यांचे कोणतेच श्वास ईश्वराच्या मर्जीविरुद्ध निघत नाहीत. एक पाऊल पण दुसरीकडे पडत नाही. सर्व उपासनांचे सार याच्यामध्ये दडलेले आहे. त्यांचा कोणताच श्वास प्रभुनामस्मरणाशिवाय बाहेर पडत नाही. तुम्ही आमचे चाहते व्हा, मी तुमचा चाहता होईन. तुम्ही आपले मन (चित्त) माझ्याकडे वळवा; तर मी माझे चित्त तुमच्याकडे वळवीन. तुम्ही माझे प्रेम आपल्या अंत:करणामध्ये जिवंत आणि सुरक्षित ठेवा, (तर) मी तुमच्या प्रिय वस्तूस समुद्रातळी जिवंत व सुरक्षित ठेवीन.

## ग) नामस्मरण : सूफ़ींच्या दृष्टिक्षेपात

**(१) 'ज़िक्र'चा अर्थ –** अल्लाहचे मनाने (मन:पूर्वक) स्मरण करणे. सूफ़ी साधकांची एक तलवार आहे की, जिच्या साहाय्याने ते आपल्या शत्रूंशी लढतात (सामना करतात) आणि त्यांच्यावर येऊ घातलेल्या आपत्तीस दूर करतात आणि शिवाय हे की, जे कोणते संकट सेवका (भक्ता)च्या जवळ येते तेव्हा ते आपल्या मनामध्ये ईश्वराकडे आकृष्ट होतात (वळतात) मग काय अप्रिय गोष्टी त्यांच्यापासून दूर होऊन जातात. सूफ़ीवादाच्या पारिभाषिक शब्दावलीमध्ये, आपल्या सर्वांगाला किंवा शरीराच्या कोणत्या तरी एका भागावर विचार एकवटून– एकाग्र करून ईश्वराची आठवण करण्याचे नाव **'ज़िक्र'** म्हणजेच नामस्मरण आहे. ते दोन प्रकारे संपन्न केले जाऊ शकते. एक सस्वर तर दुसरे मौन(पणे).

ईशस्मरणासाठी सूफ़ी काही विशिष्ट शब्दांचा प्रयोग जप-माळ (ताबीह) स्वरूपात करतात. त्यांपैकी काही पुढीलप्रमाणे आहेत-

**१) तस्बीह (स्तोम) :** 'सुब्हानल्लाह' 'सुब्हानल्लाह' (परमपवित्र परमेश्वर)च्या वारंवार उच्चारणास म्हणतात.

**२) तहलील (उपाधि-हान) :** 'ला इलाह इल्लल्लाह' (अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही)च्या उच्चारणास म्हणतात.

**३) तह्मीद (ईशस्तवन) :** 'अल-हम्दु लिल्लाह' (सुस्तुत्य परमेश्वर)च्या उच्चारणास म्हणतात.

**४) तक्बीर (ईशप्रशस्ती) :** 'अल्लाहु अक्बर' (सर्वश्रेष्ठ परमेश्वर)च्या उच्चारणास म्हणतात.

उपरोक्त जपमाळ नमाज़ (उपासने)नंतर आणि इतर वेळी पण म्हटली जाते. नामस्मरण (जप)साठी हे शब्द या (गोष्टी)ची आठवण करून देण्यासाठी असतात की साधकाने आपल्या प्रेयसीचे (म्हणजेच अल्लाहचे) स्मरण अधिकाधिक प्रमाणात करावे. याच गोष्टीची ताकीद तर कुरआनने वारंवार केली आहे.

''ते लोक प्रत्येक स्थितीमध्ये (मनाने आणि मुखानेपण) अल्लाहचे स्मरण करतात. उभे (असताना) पण बसून पण, पहुडले असताना पण.'' ३:१९१

मागे सांगितल्याप्रमाणे प्रेषित मुहम्मद यांचे निवेदन आहे की प्रत्येक वस्तूस चमकवून सोडणारे, चकाकी आणणारा एक घटक असतो आणि अंत:करणास चमकवून सोडणारे अल्लाहचे नाम-स्मरण (ज़िक्र) असते.

कुरआनमध्ये (नमूद) आहे की, ''अल्लाहचे नाम-स्मरण हे सर्वोत्कृष्ट सत्कृत्य आहे.'' २९:४५

वास्तविक ज़िक्र'चा अर्थ स्मरण करणे असा आहे. परमेश्वराच्या नामाचे स्मरणच सूफ़ींचा 'ज़िक्र' आहे. 'ज़िक्र'शी त्यांचे तात्पर्य असे आहे की परमेश्वराच्या स्मरणाद्वारे एक अशी अवस्था प्राप्त व्हावी की ज्यामध्ये साधकाचे मन समस्त जागतिक कार्यांपासून हटून परमेश्वराच्या स्मरणामध्ये लागून राहावे आणि त्याच्याशिवाय त्याला कोणत्याच वस्तूचे भान (ज्ञान) राहू नये. कुरआनमध्ये वारंवार असे आलेले आहे की, ''श्रद्धावंत लोकांनो! 'अल्लाहचे नेहमी स्मरण करा' (म्हणजे प्रत्येक प्रसंगी अल्लाहची आठवण तुम्हाला यायला हवी).'' ३३:४१ सुरुवातीस 'ज़िक्र'शी हेच अभिप्रेत होते; परंतु सूफ़ींनी आपापल्या परीने वेगवेगळे अर्थ काढले आहेत. म्हणून पुढे जाऊन 'ज़िक्र' हा शब्द एका विशिष्टअर्थाने प्रयोगात येऊ लागला आणि त्यामध्ये अनेक प्रकारच्या क्रियांचा पण समावेश झाला. या क्रियांचा एकमात्र उद्देश हाच मानला गेला की त्यांच्याद्वारे 'वज्द' म्हणजेच भावोल्लासाची अवस्था निर्माण होऊन जावी. अनेक सूफ़ी यास भावाविष्टअवस्था पण म्हणतात; परंतु इतर अनेकांचे असे म्हणणे आहे की, वज्दच्या नंतरच 'हाल' (भावाविष्ट अवस्थे)ची अवस्था येते. 'हाल'च्या अवस्थेमध्ये साधकाच्या मनामध्ये अल्लाहशिवाय इतर कोणताच विचार येत नाही. हे आपण जाणतोच की, सूफ़ी साधनेमध्ये भावाविष्ट अवस्थेचे स्थान केवळ महत्त्वाचे नसून ते त्यांचे एक आवश्यक उपकरण आहे.

**२) 'ज़िक्र'चे मुख्य प्रकार : नामस्मरणाचे मुख्य प्रकार –** सूफ़ी म्हणतात की अल्लाहचे नामस्मरण हे जीवनाच्या प्रत्येक अंगामध्ये होत असावे. नामस्मरणाची शैली सूफ़ी संप्रदायांमध्ये वेगवेगळी आहे. तसे ढोबळ स्वरूपात 'ज़िक्र' अर्थात नामस्मरणाचे दोन प्रकार आहेत – १) ज़िक्र जली (सस्वर नामस्मरण) आणि २) ज़िक्र ख़फ़ी (मौन नामस्मरण)

उपरोक्तपैकी एकामध्ये साधक मोठमोठ्याने अल्लाहच्या नामाचे उच्चारण करतो. जोर-जोराने मोठ्या आवाजामध्ये ईश्वराचे नाम घेण्याचा उद्देश हा आहे की, परमेश्वराच्या नामाशिवाय इतर कोणते विचार साधकाच्या मनामध्ये निर्माण होऊ नयेत. याला 'ज़िक्र जली' म्हणजेच सस्वर नामस्मरण म्हणतात. जोर-जोराने नाम घेण्याव्यतिरिक्त इतरपण अनेक शारीरिक क्रिया याच्याशी संबंधित आहेत. दुसरा प्रकार ठीक याचे उलट आहे. याला 'ज़िक्र ख़फ़ी' म्हणजेच मौन नामस्मरण म्हणतात. यामध्ये साधक स्तब्ध, शांत भाव स्वरूपात मनातल्या मनामध्ये परमेश्वराचे स्मरण करीत असतो. 'ज़िक्र ख़फ़ी'च्या आविर्भावासंबंधी असे म्हटले जाते की, शत्रुच्या तावडीतून वाचण्यासाठी प्रेषित मुहम्मद आणि त्यांचे श्वसुर व प्रथम ख़लीफ़ा (उत्तराधिकारी) एका गुफेमध्ये लपले होते. तेथेच प्रेषितांनी म्हटले होते की, 'दु:खी होऊ नकोस, परमेश्वर आपल्यासोबत आहे' याच वचनापासून 'ज़िक्र ख़फ़ी'ची उत्पत्ती मानली जाते. नक़्शबंदी संप्रदायाच्या फ़क़ीरांमध्ये 'ज़िक्र ख़फ़ी'चा प्रचार आहे. आणि चिश्ती व क़ादिरी संप्रदायामध्ये 'ज़िक्र जली'चे अनेक साधक असे पण आहेत की जे डोळे मिटून कोणत्याच प्रकारचा ध्वनी न काढता आपल्या श्वासोच्छ्वासावर ध्यान लावून बसलेले असतात. जेव्हा श्वास बाहेर निघतो तेव्हा त्याला असे वाटते की, जणू तो 'ला इलाह' म्हणत आहे आणि जेव्हा श्वास आत जातो तेव्हा जणू तो 'इल्लल्लाह' म्हणत आहे. काही साधकांचे असे मत आहे की जाणते वा अजाणतेपणे प्रत्येक मनुष्य आपले श्वास आत जाणे आणि बाहेर येण्याबरोबर अल्लाह या शब्दाचा उच्चारण करतो. त्यांचे असे म्हणणे आहे की, श्वास आत येण्याबरोबरच 'अल्' शब्द आपोआप उच्चारित होतो आणि 'लाह' शब्द श्वासाचे बाहेर जाण्याबरोबर. त्यांचे असे मत आहे की ही स्वाभाविक प्रक्रिया आहे. आणि श्वासाचे येण्या-जाण्या सोबतच या शब्दांचे उच्चारण होत राहते. 'तसबीह' म्हणजेच जपमाळेचा उपयोग पण सूफ़ींमध्ये आहे. तिच्याद्वारे ते जाणू इच्छितात की किती वेळा त्यांनी परमेश्वराचे नाव घेतले आहे. काही साधकांचे असे मत आहे की, माणसाच्या हृदयाचे दोन दरवाजे आहेत. यांपैकी एक तर विषय-वासनेनेयुक्त या संसाराचे आहे, तर दुसरे आध्यात्मिक आहे. त्यांच्या मतानुसार 'ज़िक्र जली' पाहिल्यासाठी आहे; तर 'ज़िक्र ख़फ़ी' दुसऱ्यपासाठी.

'ज़िक्र'च्या क्रियांचे संपादन एकटे वैयक्तिकरीत्या केले जाऊ शकते आणि सामूहिक-सांघिक स्वरूपात पण. या संदर्भात एक हदीस (प्रेषित-वचना)चा हवाला दिला जातो की, ज्यामध्ये म्हटले गेले आहे की परमेश्वराचे स्मरण करणारे एखादे दल किंवा गट आपले स्थान ग्रहण करतात की नाही, इतक्यात त्या मंडळींस देवदूत घेरतात आणि परमेश्वराची दया त्या मंडळींवर पसरून जाते आणि परमेश्वर त्या लोकांचे स्मरण त्या व्यक्तीसोबतच करतो की जिला परमेश्वराचे सान्निध्य प्राप्त झालेले आहे.

**१) ज़िक्र जली (सस्वर नामस्मरण) –** ज़िक्र जलीमध्ये साधक जोर-जोराने अल्लाहचे नामस्मरण करीत असतो. जोर-जोराने मोठ्या आवाजात नाम घेण्याचा उद्देश हा की अल्लाहच्या नामाशिवाय इतर विचार साधकाच्या मनामध्ये येऊ नयेत. ज़िक्र जलीमध्ये 'ज़र्ब' म्हणजेच उच्चारण-आघाताद्वारे नामस्मरणाची पद्धती सर्वसाधारणपणे प्रचलित आहे. सूफ़ींनी याच्या अनेक पद्धती सांगितल्या आहेत.

ज़िक्रजलीच्या क्रियांविषयी दिल्लीचे शाह वलीउल्लाह यांनी आपले पुस्तक 'क़ौलुल जमील'मध्ये याप्रमाणे लिहिलेले आहे –

साधक सहज बसतो आणि जोराने (मोठ्याने) 'अल्लाह' शब्दाचे उच्चारण करतो. प्रथम आपल्या ध्वनीस डाव्या बाजू (पार्श्व)कडे ओढतो आणि नंतर आपल्या कंठापासून. यानंतर प्रार्थनेच्या मुद्रेमध्ये (उपविश्यासन अवस्थेमध्ये) बसून पूर्वीपेक्षा जास्त उच्च स्वरामध्ये तो 'अल्लाह' शब्दाची पुनरावृत्ती करतो. या वेळेस तो उजव्या गुडघ्यापासून प्रथमत: ध्वनीस ओढतो आणि यानंतर आपल्या डाव्या बाजूस (पार्श्वकडे). नंतर आपल्या पायांना दुमडून आणखी जास्त उच्च स्वरामध्ये तो 'अल्लाह' शब्दाचे उच्चारण करतो. प्रथमत: उजव्या गुडघ्यापासून, यानंतर डाव्या बाजू (पार्श्व)पासून त्याचा ध्वनी या वेळेस येतो. याच मुद्रेमध्ये बसून तो आणखीन जोराने 'अल्लाह' शब्द उच्चारतो (म्हणतो) आणि यावेळेस त्याच्या ध्वनीचा क्रम असा असतो – प्रथम डाव्या गुडघ्यापासून, नंतर उजव्या गुडघ्यापासून, यानंतर डाव्या पार्श्वपासून आणि शेवटी समोरून. ध्वनीचा स्वर उत्तरोत्तर वाढतच जातो. यानंतर मक्का दिशेकडे म्हणजेच पश्चिम दिशेकडे आपले तोंड वळवून प्रार्थनेच्या मुद्रेमध्ये बसतो आणि आपले डोळे मिटतो (बंद करतो). ध्वनीस बेंबीपासून ओढून डाव्या खांद्याकडे घेऊन येतो आणि 'ला' शब्दाचे उच्चारण करतो; मग तो 'इलाह' म्हणतो. जणू तो आपला ध्वनी मेंदूपासून ओढतो आणि शेवटी डाव्या पार्श्वपासून जसे ओढतो आणि संपूर्ण शक्तीसह 'इल्लल्लाहु' म्हणतो. यांपैकी एकानंतर दुसऱ्या पायरीचे वर्णन आहे. त्यांपैकी प्रत्येकास 'ज़र्ब' म्हणजेच ध्वनी-आघात असे म्हणतात. हे आघात (ज़र्ब) शेकडो वेळेस पुनरावृत्त केले जातात.

**२) ज़िक्र ख़फ़ी (मौन नामस्मरण) किंवा (अजपा-जाप)**

'ज़िक्र ख़फ़ी'मध्ये साधक अत्यंत हळू-हळू अथवा मनातल्या मनामध्ये शब्दांचे उच्चारण करतो. लहानशा आघाताची आवश्यकता असेल, तर ते पण केले जाते. साधक डोळे बंद करतो आणि जिव्हेस मौन ठेवतो, कार्यप्रवृत्त करत नाही आणि यानंतर तो जणू आपल्या अंत:करणाच्या (हृदयाच्या) जिव्हेने म्हणतो –

(१) ''अल्लाहु समीयून'' म्हणजेच परमेश्वर जो ऐकतो,

(२) '' अल्लाहु बसीरून'' म्हणजेच परमेश्वर जो पाहतो,

(३) ''अल्लाहु आलिमुन'' म्हणजेच परमेश्वर जो जाणतो.

पहिल्या जपास साधक बेंबीपासून हृदयापर्यंत घेऊन जातो, दुसऱ्यास हृदयापासून मेंदूपर्यंत आणि तिसऱ्यास मेंदूपासून ते अंतराळापर्यंत, आणि मग त्याच क्रमाने मागे फिरतो. अशाच प्रकारे हा जप वारंवार केला जातो. तो हळव्या स्वरामध्ये 'अल्लाह' म्हणतो. प्रथम (अगोदर) उजव्या गुडघ्यापासून आणि नंतर डाव्या पार्श्वपासून. प्रत्येक वेळेस जेव्हा तो श्वास सोडतो तेव्हा तो 'ला इलाहा' म्हणतो आणि जेव्हा श्वास ओढतो तेव्हा 'इल्लल्लाहु' म्हणतो. हे तिसरे ज़र्ब (आघात) अत्यंत कष्टसाध्य, प्रयत्नसाध्य असते आणि याची शेकडो, हजारो वेळेस उजळणी-पुनरावृत्ती केली जाते. हे जप अत्यंत महत्त्वाचे आणि पवित्र मानले जाते.

'ज़िक्र ख़फ़ी'* करणारे साधकांचे चार प्रकार सांगण्यात येतात आणि परिस्थितीनुसार सूफ़ी या चारी जापकांच्या जपास 'ज़िक्र'च्या वेगवेगळ्या पद्धती मानतात. हे चार अशा प्रकारे आहेत- १) सामान्य व्यस्त साधक, २) सामान्य मुक्त वा स-अवकाश साधक, ३) अधिकारी व्यस्त साधक आणि ४) अधिकारी मुक्त वा स-अवकाश साधक.

१) सामान्य व्यस्त साधकसाठी या बाबी अनिवार्य ठरवण्यात आलेल्या आहेत की त्याने शरिअत म्हणजेच कर्मकांडाच्या जुजबी गोष्टी जाणून घेतल्या पाहिजेत. प्रात:काळी उठण्याचा प्रयत्न करावा, 'तहज्जूद' (मध्यरात्रीनंतरची नमाज़) पढावे. त्या वेळी मुख्यत्वेकरून आणि इतर सर्व नमाज़नंतर सामान्यपणे 'सुब्हानल्लाह' शंभर वेळा आणि 'ला इला-ह-इल्लल्लाह' शंभर वेळा आणि 'अल्लाहु अकबर' शंभर वेळा आणि झोपण्याच्या वेळेस 'अस्तग़्फ़िरूल्लाह' शंभर वेळा म्हणावे. प्रत्येक वेळेस उठता-बसता 'दरूद-शरीफ़' म्हणत राहावे. 'कुरआन' पठण शक्य असेल, तर ते पण नित्य केले पाहिजे.

२) सामान्य मुक्त वा स-अवकाश साधकास, सामान्य व्यस्त साधकाची पद्धती तर अवलंबवावीच लागेल. याशिवाय त्याने जादा सवड काढून 'कुरआन' पठण करावे. अधिकाधिक नमाज़ पढत राहावे. 'दरूद शरीफ़' म्हणत रहावे आणि 'अस्तग़्फ़िरुल्लाह' वारंवार म्हणावे, हीच त्याची 'तस्बीह' (स्तोम) आहे.

३) अधिकारी व्यस्त साधकासाठी 'ज़िक्र'ला आपली दिन-चर्या बनविण्याच्या उद्देश्यासाठी हे आवश्यक आहे की त्याने भोजनासाठी थोडावेळ जरूर ठेवावा. त्याने पोटभरून जेवू नये. भुकेवर नियंत्रण असावे. भूक नसताना त्याने बारा हजारापासून ते चोवीस हजारापर्यंत, जेवढे पण शक्य असेल, एकांतात किंवा एकटे बसून 'इस्मे ज़ात' (महानाममंत्र) अर्थात 'अल्लाह-अल्लाह' हळू आवाजात हृदयामध्ये एकाग्रता निर्माण करण्यासाठी वाचावे (म्हणत रहावे). ही एकाग्रताच त्याच्या साधनेस सार्थक बनवते.

४) अधिकारी मुक्त किंवा स-अवकाश साधकाने 'ज़िक्र'साठी जास्तीत जास्त वेळ द्यावा. 'ज़िक्र'ची त्याची पद्धती अशी असावी की त्याने 'ला इला-ह इल्लल्लाहु' दोनशे वेळा म्हणावे. 'इल्लल्लाहु' चारशे वेळा आणि 'अल्लाहु-अल्लाहु' सहाशे वेळा म्हणावे आणि फक्त 'अल्लाहु' शंभर वेळा म्हणावे. या आहेत तेरा 'तस्बीही', परंतु सूफ़ी साहित्यामध्ये याला 'बारा तस्बीह' असे नाव दिले गेले आहे. (* मौलाना अश्रफ़ अली थानवी, 'शरिअत और तरीक़त', पृ. २९२-९३)

या 'बारा तस्बीह'चे जे विवरण सूफ़ी साधकांनी दिलेले आहे, ते काहीसे असे आहे की, 'तहज्जुद'च्या नामाज़नंतर पश्चात्ताप व्यक्त करून आणि क्षमायाचना करून विनम्रपणे हात वर उठवून पुढील कृपायाचना मन:पूर्वक करावी.

''अल्लाहुम-म तहि्हर क़ल्बी अन ग़ैरि-क व नव्विर क़ल्बी बिनूरी मअ-रफ़ति-क या अल्लाहु, या अल्लाहु, या अल्लाहु.''

अर्थात ''हे अल्लाह! इतरास प्रवेश करण्यापासून माझ्या हृदयास शुद्ध ठेव आणि आपल्या ब्रह्मज्ञानाने, प्रकाशाने माझ्या हृदयास ज्योतिर्मय बनवून टाक, हे अल्लाह, हे अल्लाह, हे अल्लाह!''

ही कृपायाचना तीन किंवा सात वेळेस करावी आणि अकरा वेळा 'अस्तग़्फ़ार' आणि अकरा वेळेस 'दरूद शरीफ़' म्हणून पालथे बसावे, कंबर ताठ ठेवावी आणि मन:पूर्वक काहीशा उंच आवाजाने ज़िक्र (नामस्मरण) सुरू करावे. प्रथम सुरुवातीस 'अऊज़ु बिल्लाही मिन श्शैतानिर्रजीम' (धिकृत शैतानापासून मी अल्लाहची शरण घेतो) म्हणावे. मग 'बिस्मिल्लाहिर्हिमानिर्रहीम' (अल्लाहच्या नावाने जो कृपाशील व दयाळू आहे [मी आरंभ करतो].) म्हणावे आणि संपूर्ण निष्ठा आणि एकाग्रतेसह तीन वेळा 'ला इलाह इल्लल्लाह' (अल्लाहाशिवाय कोणीच उपास्य नाही) आणि एका वेळेस 'अश्हदुअल्ला इला-ह इल्लल्लाह'(मी ग्वाही देतो की

अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही.) म्हणून डोक्यास अंत:करणाकडे-मनाकडे झुकवावे आणि 'ला' या शब्दास संपूर्ण ताकदीने हृदयाच्या आतमधून ओढावे आणि 'इलाह'स उजव्या खांद्यावर घेऊन जाऊन डोक्याच्या मागच्या बाजूस झुकवून विचार करावा की, उपाधिरहिता (ग़ैरअल्लाह)स मनापासून काढून पाठीमागे टाकून दिले (आहे), श्वास सोडून शब्द 'इल्लल्लाहा'स जोराने आणि सक्तीने अंत:करणावर आघात ('ज़र्ब') करावे आणि विचार करावा की अल्लाहचे प्रेम आणि प्रकाशास हृदयामध्ये प्रविष्ट केले आहे. ही क्रिया दोनशेवेळा करावी आणि 'ज़िक्र' अर्थात नामस्मरणामध्ये नऊ वेळा 'ला इलाह इल्लल्लाह' आणि दहाव्या वेळेस 'मुहम्मदुर्रसूलुल्लाह' म्हणावे. यानंतर पूर्वोक्त पद्धतीप्रमाणे तीन वेळा 'कल्मए तय्यब' (विशुद्ध वाणी) आणि एकेक वेळा 'कल्म-ए-शहादत' (साक्ष्य वाणी) म्हणावे; परंतु नवशिक्षिताने 'ला इलाह' या सूत्रांशामध्ये 'ला माबूद', मध्यम श्रेणीतले साधक 'ला मक़सूद' आणि अनुभवी साधकाने 'ला मौजूद'कडे लक्ष द्यावे. यानंतर क्षण दोन क्षण चिंतनमग्न बनून विचार करावा की अल्लाहचे 'फ़ैज़' अर्थात कृपा त्याच्या वक्ष:स्थळामध्ये अवतारित होत आहे. (मौलाना अश्रफ़ अली थानवी, 'शरिअत और तरीक़त', पृ. २९४)

या ज़िक्र अर्थात नामस्मरणास आणखी पुढे न्यावे. गुडघ्यांना तोडून बसावे, कंबर ताठ ठेवावी आणि डोक्यास उजव्या खांद्यावर घेऊन जाऊन शब्द 'इल्लल्लह'स जोर आणि सक्तीने मनावर-अंत:करणावर ज़र्ब (अघात) करावे. हे चार वेळेला निरंतर करावे. मग पहिल्यासारखेच तीन वेळा 'ला-इला-ह इल्लल्लाहु' आणि एका वेळेस अशहदुअल-ला इला-ह इल्लल्लाह' म्हणावे आणि मग काही वेळे करता 'मुराक़बा' अर्थात मनन करावे. ध्यानमग्न असावे.

ज़िक्र म्हणजेच नामस्मरणाच्या या पद्धती सूफ़ींमध्ये नंतर प्रचलित झाल्या. परिणामी सूफ़ी संप्रदायांमध्ये या पद्धती भिन्न-भिन्न झाल्या. मात्र उद्देश सर्वांचा एकच राहिला, तो हा की अशाप्रकारे हृदयास, शुद्ध करता येणे शक्य झाले आणि हृदयाची-अंत:करणाची शुद्धी ईश-प्रेमास सुदृढ बनवण्यास सहायक होईल. ज़िक्रचा आणखी एक उद्देश पण आहे याकडे मौलाना अश्रफ़ अली थानवी यांनी लक्ष वेधले आहे. तो हा की, साधकासाठी जर ज़िक्र मूळ कार्य बनले, तर जे काम त्याच्यामध्ये बाधक असेल त्याची भीती त्याच्या मनामध्ये बसेल आणि वाईट गोष्टी आणि पापकर्मे हे सर्व नामस्मरणामध्ये बाधा निर्माण करणारे आहेत, म्हणून या सर्वांची घृणा उत्पन्न होईल. मग हळूहळू व्यर्थ गोष्टींची पण घृणा निर्माण होऊन जाईल.

जपसंख्या लक्षात ठेवण्यासाठी 'तस्बीह' अर्थात जपमाळेची निर्मिती झाली. ही पूर्वी नव्हती. प्रेषित मुहम्मद आणि नंतरच्या काळी गुठळी आणि बियांचा प्रयोग नामस्मरणाची संख्या लक्षात ठेवण्यासाठी केला ज़ात असे. 'तस्बीह' (माला) वापरण्याची प्रथा नंतर सुरू झाली आणि या उद्देशाने की तस्बीह म्हणजेच गुण-गान लक्षात ठेवण्यासाठी ही फारच उपयोगी सिद्ध होते. याचे वास्तव यापेक्षा अधिक काहीच नाही.

इस्लाममध्ये एक महदवी संप्रदाय आहे. या संप्रदायाचे संस्थापक सय्यद मुहम्मद महदी 'माऊद'(आश्वासित) बिन सय्यद अब्दुल्ला हे आहेत. त्यांनी 'ज़िक्र ख़फ़ी'स असाधारण महत्त्व दिले आहे. त्यांनी अवलंबलेली 'ज़िक्र ख़फ़ी'ची पद्धती पुढीलप्रमाणे आहे -

उपासनेच्या संदर्भात महदवी संप्रदायामध्ये 'ज़िक्र'ला असाधारण महत्त्व आहे. सायंकाळपासून सूर्यास्ताच्या दरम्यान व पहाटेपासून सूर्योदयाच्या दरम्यान कुराणोक्त 'ज़िक्र'मध्ये अर्थात नामस्मरणामध्ये बसण्याच्या

आदेशाचे तंतोतंत पालन या संप्रदायाचे उपासक न चुकता करतात. 'ज़िक्र ख़फ़ी' म्हणजेच मौन नामस्मरण अत्यंत महत्त्वाचे मानले गेले आहे. महदी माऊद यांनी ब्रह्मसूत्रांशामध्ये ('कल्मा') प्रादेशिक दखनी भाषेचे अंश जोडले आहे. त्यांनी 'ज़िक्र ख़फ़ी'च्या पद्धतीचे शिक्षण अशाप्रकारे दिले आहे - आपल्या प्रभूचे स्मरण ठेव, त्याचे नामस्मरण कर इथपर्यंत की तू स्वतः आत्मविस्मृत होऊन जावेस. उपाधि-हान ला (ईश्वरेतरास) विसरून जाशील. या मौन जपाचे त्यांनी स्वरूप-वर्णन असे विशद केले आहे- ''इल्लल्लाह तूँ है, ला इला-हूँ (हौं) नही'' म्हणजेच उपास्य ईश्वर तूच आहेस, ईश्वराशिवाय मी नाहीच. (येथे 'हूँ', 'मी' या अर्थी गुजराथी भाषेचा शब्द आहे. ब्रज भाषेमध्ये 'मी' साठी ''हौं'' या शब्दाचा वापर होतो. अरबी लिपीच्या लिखाणामध्ये हा शब्द 'हूँ' आणि 'हौं' या दोन्ही तऱ्हेने ग्राह्य होतो.) भावार्थ हा की, ईश्वराचेच अस्तित्व खरे आहे, मानवाचे अस्तित्व नसल्यासारखेच आहे.

उपरोक्त 'ज़िक्र ख़फ़ी'चे वास्तव हे आहे की, 'इल्लल्लाह तूँ है' म्हणजेच अल्लाह तुझीच सत्ता आहे, तुझ्याशिवाय कोणीच नाही. 'ला-इला-ह हूँ (हौं) नहीं' हे साधका! तू असा विचार केला होतास की मी (ईश्वर) सत्तेपासून नाही. हे तुझे तर्क आहे. पाहा तरी खरे की ईश्वरी सत्तेचे सातही गुण तुझ्यामध्ये विद्यमान आहेत. ते दैवी सात गुण आहेत- (१) जीवन, (२)ज्ञान, (३) शक्ती, (४) संकल्प, (५) श्रवण, (६) दृष्टी आणि (७) वाणी. हे सर्व प्रतिबिंब स्वरूपात तुझ्यामध्ये व्यक्त आहेत. नव्हे, परंतु तू स्वतःच ऐन व्यक्ती आहेस. समस्त ब्रह्मांड तुझे प्रतिबिंब आहे. समुद्र आणि लाटा यांना तू वेगळे समजू नकोस. ज्वाला आणि अग्नी यांना वेगळे मानू नकोस. विचारपूर्वक पाहा की 'कल्म-ए-तय्यब' अर्थात विशुद्ध वाणीचे अभिप्राय काय आहे 'ला इला-ह हूँ (हौं) नहीं. म्हणजे माझी सत्ता ही 'ला इलाह' अर्थात 'अल्लाह शिवाय राखते (असते) हेच अव्यक्त कोषागार (कंज-ए-मख़फ़ी) आहे आणि 'इल्लल्लाह'शी अभिप्राय प्रथम तन्मात्रा आहे. या श्रेणीचे प्राप्तव्य 'ला इला-ह इल्ला अना' आहे. म्हणजेच माझ्याशिवाय कोणीच आराध्य नाही आणि कुरआनचे श्लोक हे ओळखून (जाणून) असा की परमेश्वराशिवाय कोणीच उपास्य नाही.'' माझ्या एकेश्वरवादीतेची ग्वाही देते की, वास्तवामध्ये तोच साधक आहे. या 'ज़िक्र ख़फ़ी' अर्थात अजपा-जपच्या माध्यमाने आत्मा हा परमात्म्यास जाऊन मिसळतो-मिळतो.

**३) 'ज़िक्र' - नामस्मरणाचे काही गौण प्रकार :**

**१) ज़िक्र नफ़ी व अस्बात : विधी-निषेध नामस्मरण -** समस्त नामस्मरणांमध्ये साधनामार्गाच्या मार्तंडांनी ज़िक्र इस्म ज़ात अर्थात महानाम मंत्र (अल्लाह) आणि ज़िक्र नफ़ी व अस्बात म्हणजेच विधीनिषेध नामस्मरणा (ला-इला-ह- इल्लल्लाह)स विशेषत्वाने स्वीकारले आहे. 'ला-इला-ह इल्लल्लाह' स यासाठी स्वीकारण्यात आले आहे की, हदीस नबवी (प्रेषित-वचन) पण यालाच सर्वश्रेष्ठ ज़िक्र- नामस्मरण मानते. सर्व पवित्र वाणीमधील हे ब्रह्मसूत्रांश एक रत्न आहे. हे परमेश्वराचे प्राण आहे, आणि अंतर्मुखी असंगतेचे ('तफ़रिद') प्रकाश आहे. याच्या भावार्थासाठी संपूर्ण पवित्र-कुराण स्पष्ट प्रमाण आहे. हे समस्त असत्य उपास्याचे खंडनच नव्हे तर निषेध करते; आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे समर्थनच नव्हे, तर त्याचे सत्यत्व प्रमाणित करते. हे फक्त असत्याचे निषेध करीत नाही, तर नष्टप्राय क्षणभंगुर उद्दिष्टांचे पण नकार करते; आणि एका इष्ट सत्याशी संबंध प्रस्थापित करते.

याला 'ज़िक्र' फ़ना व बक़ा' अर्थात संभूती–असंभूती जप पण म्हणतात. या नामस्मरणाची पद्धती अशी आहे– अक्षर 'ला' पासून डाव्या जानुखाली सुरुवात करावी; आणि उजव्या जानुच्या वरपर्यंत पोहोचवावे, आणि तेथून सूत्रांश 'इलाह'स उजव्या खांद्यापर्यंत पोहोचवावे. आणि तेथून सूत्रांश 'इल्लल्लाह'चा चित्ताच्या – अंत:करणाच्या वातावरणावर बलपूर्वक अत्यंत जोराने आघात करावा – प्रहार करावा. या नामस्मरणास चार आघाती पण म्हणतात. प्रथम आघात उजवीकडे, दुसरा डावीकडे, तिसरा डोक्यावरच्या भागावर आणि चौथा चित्तावर–अंत:करणावर लावावा.

**२) ज़िक्र इस्मे–ज़ात : महानाम मंत्रजप –** 'अल्लाह' (परात्पर परब्रह्म) 'इस्मे ज़ात' आहे. महानाम मंत्र जपास यासाठी स्वीकारण्यात आले आहे की सर्व शुभ–नामे ('अस्मा–ए–हुस्ना') ही गुणवाचक विशेषण द्योतक नावे आहेत. ही त्याच्या गुणांची निदर्शक असतात; तर 'अल्लाह' असे इस्म ज़ात आहे की जे त्याच्या सत्तेने समस्त गुण आणि पराकाष्ठांना आपल्या स्वत:मध्ये सामावून घेतलेले आहे. या एक संक्षिप्त नावाने सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे नामस्मरण करणे म्हणजे साक्षात समस्त नाम–रूपांसह त्याचे स्मरण करण्यासारखे आहे. याशिवाय संख्येच्या दृष्टीने प्रचुर नामस्मरण जितक्या सहजतेने 'अल्लाह'च्या नामस्मरणाने शक्य आहे तितक्या सहजतेने इतर कोणत्याच नामाने शक्य नाही.

सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे ते बरकतीचे आणि सर्वश्रेष्ठ नाम की ज्याच्या वशिल्याने (माध्यमाने) अल्लाहपाशी जी कृपायाचना केली जाते – मग भलेही ती ऐहिक असो वा पारमार्थिक – तत्काळ स्वीकृत केली जाते, त्या कृपायाचनेस **'इस्मे आज़म'** असे म्हणतात.

प्रेषित यूनुस यांच्या कृपायाचनेस 'इस्मे आज़म'चा दर्जा देण्यात आला आहे. त्यांची ती कृपायाचना अशी आहे – "( हे अल्लाह!) तुझ्याशिवाय अन्य कोणताही ईश्वर नाही. तू पवित्र आहेस. मी खरोखरच दुराचरणी लोकांपैकी एक होतो." २१: ८७ ("ला इलाह इल्ला अन्त सुब्हानक इन्नी कुन्तु मिनज़्ज़ालिमीन" २१: ८७)

या 'ज़िक्र'च्या अनेक पद्धती आहेत. त्यांपैकी दोन सर्वात सोप्या पद्धती अशा आहेत –

एक : मनोकामना पूर्तीच्या हेतूने बारा दिवस बारा हजार वेळेस वाचन करावे आणि जर शक्य नसेल तर बाराशे वेळा वाचावे. सुरुवातीस व शेवटी काही वेळा दारूद म्हणजेच अंतरासत्तीचे वाचन करावे.

दोन : इस्मे आज़म 'अल्लाह', एक लाख पंचवीस हजार वेळा म्हणावे. सारांश, याच्या प्रभाव–शक्तीविषयी मुळीच शंका नाही.

**३) 'दो ज़र्बी' ज़िक्र : द्वि–कंठी वा द्वि–आघाती नामस्मरण :** या नामस्मरणाची पद्धत अशी आहे– 'ला इलाह'पासून सुरू करावे आणि 'ला इलाह'स चित्ताच्या मुखापासून अशाप्रकारे निसृत करावे की उपाधि–हान म्हणजेच ईश्वरेतराशिवाय यास मनापासून निष्क्रमित करावे आणि डोके व मानेस उजवीकडे अशाप्रकारे वळवावे की, वक्ष:स्थळा (छाती) पर्यंत एक चक्र होऊन जाईल. नंतर डोके व मानेस डावीकडे वळवून चित्ताच्या मुखाकडे न्यावे व त्यावर जेथून सुरुवात केली होती तेथे 'इल्लल्लाह'चे आघात करावे, की जेणेकरून ईश्वरी प्रकाशपुंजापैकी एक प्रकाश अंत:करणामध्ये प्रवेश करावा, आणि दोन्ही चक्रांमध्ये डोळे आणि मानेची हालचाल प्रकट व्हावी. पहिल्या चक्रामध्ये अशी कल्पना करावी की जगाच्या लालसेच मनामधून ओढून बाहेर घालत आहे, आणि दुसऱ्या चक्रामध्ये जगास अंत:करणामधून बाहेर काढून त्याजागी सर्वश्रेष्ठ परमेश्वराची

प्रतिष्ठापना करीत आहे, आणि 'इल्लल्लाह'च्या आघातासह आवाजास मोठे करावे, अशाप्रकारे की तो अंत:करणापासून निघून अंत:करणामध्येच समाविष्ट होत आहे.

**४) ज़िक्र अब्दाल : बदल घडवणारे ईश्वरनिष्ठ भक्तांचे नामस्मरण :** सुप्रसिद्ध सूफ़ी संत व आचार्य ख़्वाजा बंदा नवाज़ यांच्या मते, या नामस्मरणामध्ये फार मोठा प्रभाव आहे, कारण की जापकासोबत अब्दाल पण नामस्मरणामध्ये सम्मिलित होतात. या 'ज़िक्र'ची पद्धत अशी आहे– 'ला इला–ह' म्हणत दोन्ही हातांना वरच्या बाजूस उंच उठवावे, जणू की ते प्रकाशपुंजास धरत आहेत, आणि मग हातांना तोंडापाशी आणून 'इल्लल्लाह'चे आघात करावे, जणू की परमेश्वरच्या प्रकाशपुंजास तोंडामध्ये ठेवून घेतले आहे. या नामस्मरणामध्ये पहिल्या आघातासोबत हबकून पुढे पण सरसावले पाहिजे, आणि दुसऱ्या आघाताच्या वेळी आपल्या जागेवर बसावे.

**५) ज़िक्र कश्फ़े अर्वाह : आत्म्याच्या विमोचनाचे नामस्मरण :** या नामस्मरणामुळे प्रत्येक आत्म्याच्या स्थितीचे उन्मोचन होते. मग भलेही कोणत्या व्यक्तीचा तो आत्मा असेल वा त्याची समाधी कोठेही का असेना. ही पद्धत अशी आहे की, नमाज़मध्ये बैठक असते तशीच बैठक घेऊन एकवीस वेळेस ''या रब्ब'' म्हणावे. नंतर आकाशाकडे तोंड करून ''या रूह'' म्हणावे, मग अंत:करणावर आघात लावावे (मारावे), ''या रूह, या रूह'' म्हणत आत्म्याशी भेट होईल, मनास वाटेल ते विचारावे.

**६) ज़िक्र कश्फ़े कूबूर : परलोकवासियांचे नामस्मरण :** ज्या समाधिस्त व्यक्तीची अवस्था जाणून घ्यायची असेल त्या व्यक्तीच्या समाधीजवळ मृताच्या चेहऱ्यासमोर बसावे आणि आकाशाकडे तोंड करून 'या नूर' म्हणावे. नंतर 'अक्शिफ़ुवयी' म्हणून चित्तावर आघात करावे, नंतर तिसरे आघात 'इन हाला' म्हणून समाधीवर करावे. आत्मा समोर येईल आणि सर्व क्षेम ज्ञात होईल. जेव्हा या नामस्मरणाचा चांगला अभ्यास होऊन जातो तेव्हा समाधीपाशी जाण्याची गरज भासणार नाही. आपल्या घरातच बसूनपण कैलासवासीयांच्या आत्म्याचे उन्मोचन होऊ शकते.

**७) ज़िक्र 'आयतलकुर्सी' : महाश्लोकासन नामस्मरण :** नामस्मरणी महाश्लोक असा आहे – 'अल्लाहु –ला– इलाह इल्ला हुव अलहय्युल् क़य्यूम.' अर्थात अल्लाह, (असा परमपवित्र होय की) त्याच्याशिवाय अन्य कोणी उपास्य (देव) नाही; तो चिरंजीव (व) आत्मनिर्भर आहे.'' २:२५५ या नामस्मरणाची पद्धत अशी आहे – सर्वप्रथम 'अल्लाह'चा आघात हृदयावर – अंत:करणावर करून त्रैलोक्यांसाठी असलेल्या संदेहाचे निषेध करून 'ला इलाह'मध्ये डोक्यास डावीकडून उजवीकडे वळवून 'इल्लास' मेंदूमध्ये घेऊन जावे आणि परम विशुद्ध सत्ता 'हुव'चा आघात चित्तावर करावा. आणि 'अलहय्यु'चा आघात उजवीकडे आणि 'अल् क़य्यूमु'चा आघात डावीकडे करावा. अशाच प्रकारे दररोज एक हजार वेळा आवृत्ती करावी. काही दिवसांनंतर ईश्वरकृपेने दैवी परिणाम दिसू लागेल.

**८) ज़िक्र कडका हैदरी : वाचिक नामस्मरण :** ''अल्लाहु अक्बरू, अल्लाहु अक्बरू ला इलाह इल्लल्लाहु व अल्लाहु अक्बरू, अल्लाह अक्बरू, व लिल्लाहिलहम्दु'' हे ज़िक्र कडका हैदरी आहे. त्याची पद्धत अशी आहे की नमाज़मध्ये बसतात त्याप्रमाणे बैठक घेऊन दोन्ही हातांना आपल्या दोन्ही गुडघ्यांवर ठेवावे आणि 'अल्लाहु अक्बरू'चा आघात उजवीकडे आणि पुन्हा 'अल्लाहु अक्बरू'चा आघात डावीकडे करून

'ला'स बेंबीपासून उच्चारित करावे. तीन आघातांसह डाव्या व उजव्या बाजूस उजव्या खांद्यावर आणून 'इलाह'चा आघात मेंदूमध्ये आणि 'इल्लल्लाहु'चा आघात हृदयावर सावधानचित्ताने लावावा आणि 'अल्लाहु अक्‌बरू 'चा आघात उजव्या खांद्यावर व 'अल्लाहु अक्‌बरू'चा आघात डाव्या खांद्यावर लावून व 'लिल्लाहिलहम्दु'चा आघात मेंदूमध्ये लावावा. असे वारंवार करत राहावे, जेणेकरून जापकास आत्मविस्मरण होऊन जावे.

**९) ज़िक्र पासे अन्‌फ़ास : सूफ़ी – योगाभ्यास –** हे ब्रह्मज्ञानियांचे नामस्मरण आहे. 'ला इला-ह इल्लल्लाहु' हे या ज़िक्रचे बोल आहेत. 'ला इला-ह'स जोराने वरच्या श्वासासह ओढून मेंदूमध्ये घेऊन जावे. जेव्हा श्वास कोंडलेले असेल तेव्हा 'इल्लल्लाहु' उच्चारणासह श्वास हळू सोडावा व दृष्टी बेंबीवर खिळवावी. हळू श्वास सोडण्यास 'विश्राम' ('आरामगी') म्हणतात. जेव्हा वरच्या श्वासाशी प्राणवायू मिसळून एकरूप होऊन जातो तेव्हा त्यास 'दोन समुद्रांचा संगम' ('मज्मा अल्-बहरीन') असे म्हणतात. हे अमृताचे स्थळ आहे. त्या वेळेस जापकास आकाश-भरारी आणि पृथ्वी विहार घडतो आणि त्याला दिव्य प्रणवरूप ज्ञान ('इल्म लदुन्नी') प्राप्त होते.

ज़िक्र पासे अन्‌फ़ासमध्ये कोणताच श्वास अल्लाहच्या नामस्मरणाविना ना आत जातो ना बाहेर निघतो. हे नामस्मरण नकार आणि स्वीकार या दोहोंशी संयुक्त आहे आणि वास्तव  हे आहे की, या नामस्मरणाच्या वशिल्याने परमेश्वराच्या दरबारापर्यंत पोचणे भक्तास शक्य होते. सारांश, या नामस्मरणामध्ये प्रत्येक श्वासासोबत 'अल्लाह' या शब्दाचे उच्चारण होते.

**४) नामस्मरणाचे व्यावहारिक रूप- नामस्मरणाच्या सराव पद्धती :**

आतापर्यंत आम्ही 'ज़िक्र'च्या सैद्धान्तिक रूपाचीच चर्चा करीत होतो, परंतु जोपर्यंत आपण याच्या व्यावहारिक रूपास जाणत नाही तोपर्यंत याची संपूर्ण ओळख आपणास होणार नाही. पुढे आम्ही सूफ़ींच्या वेगवेगळ्या संप्रदायांमध्ये प्रचलित 'ज़िक्र'च्या क्रियांचे वर्णन देत आहोत; कारण सूफ़ी-संप्रदायांमध्ये ज़िक्रच्या वेगवेगळ्या क्रिया आढळून येतात.

'ज़िक्र'च्या वेगवेगळ्या क्रिया वेगवेगळ्या मुर्शदां (सद्‌गुरू)च्या अनुभूतींवर आधारित आहेत. ज़िक्रच्या या क्रियांचा प्रचार प्राय: सर्व मुस्लिम देशांमध्ये आहे. फ़क़ीरां (निरासक्त)च्या वेगवेगळ्या संप्रदायांमध्ये ज़िक्रचे प्रचलन आहे, परंतु नेहमी हे काही आवश्यक नाही की वेगवेगळ्या संप्रदायांच्या ज़िक्रच्या क्रिया वेगवेगळ्या आपल्या पद्धतींच्याच असतील आणि त्यांचे आपले वेगळे वैशिष्ट्य असेल. अनेकदा एकच क्रिया थोड्याफार फरकाने वेगवेगळ्या संप्रदायांमध्ये आढळण्याची शक्यता आहे. तसे पाहता मुस्लिम देशांमध्ये सर्वत्रच या क्रिया आढळतात तरी पण मिस्र (इजिप्त)मध्ये यांचा जास्त प्रचार आहे.

परमेश्वराच्या नामाची वारंवार आवृत्ती करण्याच्या या क्रियेची उत्पत्ती प्रेषित मुहम्मद यांच्या पासूनच मानली जाऊ शकते. प्रार्थनेच्या वेळी अथवा संकटसमयी क़ुरआनच्या वेगवेगळ्या श्लोकांचे ते जोरजोराने वाचन करीत (म्हणत) असत. याला ते फार महत्त्व देत असत. असे म्हणतात की, एकदा प्रेषितांचे जामात अली यांनी प्रेषितांना विचारले की, परमेश्वरप्राप्तीचा सोपा उपाय काय आहे आणि कशा प्रकारे सहजपणे त्याची उपासना

केली जाऊ शकते? प्रेषितांनी सांगितले की, त्या (प्रभू)चे स्मरणच वास्तविक उपासना आहे आणि त्यांनी आपले डोळे मिटून जोराने तीनदा 'ला इला-ह इल्लल्लाह' म्हटले आणि अलीनी त्यांचे अनुसरण केले.

अशाच प्रकारे एकदा अली हे प्रेषितांसोबत होते. प्रेषितांनी गुडघे टेकले, अलीने पण तसेच केले. प्रेषितांनी 'ला इला-ह इल्लल्लाह' तीनदा म्हटले. पहिल्यांदा त्यांनी आपले तोंड (चेहरा) उजव्या खांद्याकडे वळवून म्हटले, दुसऱ्यांदा आपल्या तोंडास आपल्या छातीवर झुकवले आणि तिसऱ्यांदा डाव्या खांद्याकडे वळवले. त्यांचे डोळे बंद होते आणि आवाज मोठा होता.

सर्वप्रथम आम्ही रिफ़ाई संप्रदायाच्या दरवेशांमध्ये प्रचलित 'ज़िक्र'च्या क्रियांचे वर्णन देत आहोत-

रिफ़ाइयांच्या 'ज़िक्र'मध्ये एका पाठोपाठ एक, पाच दृश्ये दिसून येतात आणि त्यासाठी तीन तासांहून अधिक वेळ लागू शकतो. प्रथम हृदयामध्ये 'ज़िक्र'मध्ये सामिल होणारे सर्व दरवेश आपल्या शेख़ (प्रमुख सद्‌गुरू)ची वंदना करतात. तो वेदीसमोर बसलेला असतो. यानंतर चार जुने (वयस्कर) साधक उठून शेख़जवळ जातात. परस्पर एक दुसऱ्याचे आलिंगन करून त्यांपैकी दोन (साधक) शेख़च्या उजवीकडे आणि दोन डावीकडे स्थान ग्रहण करतात. इतर दरवेश त्यांच्यापासून थोड्या लांब अंतरावर हटून त्यांच्यासमोर, अर्धवृत्ताकारामध्ये अंथरलेल्या मेंढीच्या चामड्यावर बसतात. बसल्यानंतर दरवेश, तकबीर (म्हणजेच 'अल्लाहु अक्‌बर') आणि फ़ातिहा (मंगलाचरण पाठ) म्हणतात. याच्या समाप्तीनंतर शेख़ 'ला-इलाह इल्लल्लाह'चे उच्चारण अविराम गतीने म्हणू लागतो, आणि इतर त्यांच्या सुरात सुर मिसळून 'अल्लाह' म्हणू लागतात आणि सोबत एक दुसऱ्याशी दुसरीकडे डोलणे सुरू करतात आणि आपल्या हातांना कधी चेहऱ्यावर तर कधी छातीवर, कधी पोटावर आणि कधी गुडघ्यांवर ठेवत जातात. यानंतर दुसरे दृश्य सुरू होते. शेख़च्या उजवीकडे बसलेला एक माणूस 'हम्द-ए-मुहम्मदी' (पैगंबराची वंदना)चा पाठ (वाचन) करू लागतो. इतर 'अल्लाह' शब्दाचीच पुनरावृत्ती करत असतात. आणि पुढे-मागे झुलू लागतात. पंधरा मिनिटानंतर ते उठून उभे राहतात आणि डावीकडून उजवीकडे आणि उजवीकडून डावीकडे हलू लागतात. यामध्ये उजव्या पायास स्थिर ठेवतात आणि डाव्या (पायाचेच) संचलन (हालचाल) करतात. जर शरीरास उजवीकडे झुकवतात तर डाव्या पायास डावीकडे घेऊन जातील आणि जर शरीरास डावीकडे झुकवतात तर तेव्हा ते डाव्या पायास उजवीकडे घेऊन जातील. या (क्रिये) सोबतच ते 'या अल्लाह' आणि 'या हू' शब्दांचे फार मोठ्या आवाजात उच्चार करतात. त्या वेळी काही (दरवेश) उसासे भरतात, काहींच्या डोळ्यांमधून अश्रुधारा वाहू लागतात, काही ढसढसा रडू लागतात आणि कित्येकांचे शरीर घामाघूम होऊन जाते. त्या वेळी त्यांची डोळे मिटलेले (बंद) असतात, चेहरा पिवळा पडलेला (झालेला) असतो. काही मिनिटे थांबल्यानंतर तिसरे दृश्य समोर येते. यामध्ये त्यांचे अंग-संचलन इत्यादी क्रिया आणखीन वेगामध्ये घडू लागतात. आणखीन जास्त क्षिप्रता आणण्यासाठी त्यांपैकी एक मध्येच येऊन आपल्या दृष्टान्ताने इतर सर्वांना आणखी अधिक वेग निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करतो. नंतर थोडेसे थांबल्यानंतर चौथे दृश्य सुरू होते. सर्व दरवेश आपल्या डोक्यातील पगडी काढून फेकून (टाकून) देतात आणि एक वृत्त अर्थात वर्तुळ बनवून उभे राहतात. आणि त्या खोलीच्या चारीकडे तीव्र वेगाने (चक्राकार) फिरू लागतात आणि मध्ये-मध्ये पाय आदळत जातात आणि सर्व एकाच वेळेस उड्या मारतात व नृत्य सुरू करतात. हे नृत्य जोराने 'या अल्लाह' आणि 'या हू' च्या निरंतर उच्चारासह चाललेले असते. अत्यंत मोठ्या स्वरांमध्ये

ते ओरडत राहतात. त्यांच्याजवळ बसलेले आणि इतर त्यांना आणखी जास्त तीव्रतेने नाचण्यासाठी स्वतः जोराने नाचून प्रोत्साहन देत असतात. ते अशा प्रकारे नाचत-नाचत अशा अवस्थेमध्ये पोहोचतात की जणू ते वेड्यांसारखे शेख़च्या हाती असलेल्या आगीत तप्त केलेले लोखंडाच्या सळ्यांना अग्रेसर होऊन घेऊ लागतात. कधी ते त्यांना चाटतात; तर कधी प्रेमाने चुंबन घेतात, कधी दातांमध्ये धरतात आणि शेवटी त्या (सळीस) तोंडामध्ये धरून थंड करतात. ज्यांना या लाल तप्त सळ्या प्राप्त होत नाहीत ते भिंतींना टांगलेल्या थंड सळ्या घेतात आणि आपले हात, पाय आणि शरीरामध्ये घुसवतात. चौथ्या दृश्याच्या शेवटी-शेवटी दोन दरवेश या सळ्यांना शेख़च्या हाती सूपुर्द करतात. जळणाऱ्या तप्त आगीमध्ये ते अगोदरच तप्त होत असतात.

त्या खडतर क्रियेमध्ये कोणाच्याच चेहऱ्यावर आठ्या किंवा वेदनेचे चिन्ह दिसत नाहीत. शेवटी शेख़ प्रत्येकाजवळ जातो. त्यांच्या घावेवर फुंकर घालतो आणि आपली थुंकी त्यावर चोळतो आणि त्या (जखमेवर) मंत्र फुंकतो आणि म्हणतो की ते लवकरच बरे होतील. असे म्हणतात की चोवीस तासानंतर घावेचे कोणतेच चिन्ह बाकी राहात नाही.

स्त्रिया पण साधना करू शकतात. म्हणून त्यांना दृष्टीमध्ये ठेवून 'ज़िक्र'साठी जागा आणि वेळ निर्धारित केली जाते. टाइटसनचे असे मत आहे की भारतात त्याच्या पत्नीने बिजनौर जिल्ह्याच्या कोणा एके ठिकाणी एकाच्या अंत:पुरामध्ये अशाप्रकारच्या लोकांना 'ज़िक्र'साठी एकत्र जमल्याचे पाहिले होते. भारतात साधारणपणे 'ज़िक्र'साठी गुरुवारच्या रात्री लोक एकत्र जमतात.

नक़्शबंदी संप्रदायवाले सद्गुरू मुरीद म्हणजे शिष्यास 'ज़िक्र'च्या बाबतीत संपूर्ण पूर्वसूचना देतात. गुरुसोबत बसून त्याला गुरुंचे अनुसरण करावे लागते. असे म्हणतात की, साधकाने आपले डोळे मिटवले पाहिजेत, तोंड बंद ठेवले पाहिजे, जिभेस ओठांनी दाबून ठेवले पाहिजे. असे म्हणतात की, हृदयाचा आकार सुरू वृक्षाच्या गुच्छेप्रमाणे निमुळत्या (टोकदार) आकृतीसारखा असतो. साधकास 'ज़िक्र'चे जप करीत हृदयावर- अंत:करणावर ध्यान लावले पाहिजे. 'ला'स वरच्या बाजूस, 'इलाह'स उजवीकडे आणि संपूर्ण 'ला इला-ह इल्लल्लाह'स हृदयाच्या टोकदार बिंदूवर केंद्रित केले पाहिजे. असे केल्यामुळे जग (संसार) आणि त्याचे प्रलोभन साधकाच्या मनापासून निघून जातात, आणि तो परमेश्वराच्या विभूतीचे दर्शन करतो आणि नंतर तो त्या (परमेश्वरा)शी एकत्त्वतेचा अनुभव (बोध घेतो) करतो. एके ठिकाणी पुन्हा असे सांगितले गेले आहे की, 'ज़िक्र'मध्ये साधक आपले डोळे आणि ओठ बंद करून आपल्या श्वासोच्छ्वासावर ध्यान लावून बसतो. जेव्हा तो श्वास सोडतो तेव्हा तो असा विचार करतो की, तो 'ला इला-ह' म्हणतो; आणि जेव्हा श्वास आत ओढतो तेव्हा तो 'इल्लल्लाह' म्हणतो. काही दरवेशांचे असे म्हणणे आहे की मनुष्य जाणते-अजाणतेपणी अल्लाहचे नाव घेत असतो. जेव्हा तो श्वास आत घेतो तेव्हा 'अल' म्हणतो आणि जेव्हा श्वास सोडतो तेव्हा 'लाह' म्हणतो. त्यांच्या मतानुसार ही स्वाभाविक प्रक्रिया आहे.

**ज़िक्र क़ल्बी (हृदयस्थ जप) आणि त्याची सराव पद्धती[७७] :** नक़्शबंदी संप्रदायाचे सूफ़ी आचार्य शेख़ मुहम्मद अमीन अल्-कुर्दी अल्-शाफ़ई अल्-नक़्शबंदी यांनी आपला ग्रंथ 'तन्वीर अल्-कुलूब'('चित्त प्रकाश')मध्ये ज़िक्र क़ल्बी म्हणजेच हृदयस्थ नामस्मरणाच्या क्रियापद्धतीचे सविस्तर वर्णन दिले आहे. तेच येथे देण्यात येत आहे.

ज़िक्र क़ल्बी कशारीतीने (प्रकारे) करावे याविषयी दिलेली माहितीशी संबंधित या ग्रंथाचा विभाग हा सर्वात जास्त दुर्लभ असा आहे. हे ज़िक्र दोन विभागात विभागलेले आहे, प्रथम सत्त्व नाम (अल्लाह)शी निगडित आहे; तर द्वितीय नकार स्वरूपी (ला-इला-ह) आणि होकार स्वरूपी (इल्लल्लाह) असे संपूर्ण सूत्र आहे. हे ब्रह्मसूत्र इस्लामी श्रद्धा-स्वीकृतीचे पहिले कलम आहे. (''अल्लाहशिवाय दुसरा कोणताच ईश्वर नाही.'') यामध्ये पूर्व तयारीचे अकरा सराव म्हणजे टप्पे समाविष्ट आहेत. ते याप्रमाणे -

१) सर्वप्रथम आचमन (वज़ू) करा.

२) दोन जानु-नमनी (दोन रकात) प्रार्थना करा.

३) एका एकांत जागी (ठिकाणी) 'क़िब्ला' (मक्का) म्हणजेच पश्चिमेकडे तोंड करा.

४) प्रार्थनेत (नमाज़मध्ये) बैठक घेतात, त्याप्रमाणे पाय दुमडून उकिडवे बसावे (बसकण मारावी) - वज्रासनी बैठक करावी.

५) आपल्या सर्व पापांची क्षमायाचना करावी. ईश्वरासमोर आपली सर्व दुष्कृत्ये एकाच वेळी एकत्रितपणे मांडावीत.

६) मंगलाचरण-पाठ ('फ़ातिहा') एकदा मुखोद्गत (तोंडपाठ) म्हणावे आणि पवित्र कुराणातील 'इख़्लास' हा अध्याय तीनदा म्हणून प्रेषित मुहम्मद यांचा आत्मा आणि समस्त नक़्शबंदी शेख़ (सद्गुरू) यांच्या आत्म्यांना अर्पण करावे.

७) डोळे बंद करा, ओठ घट्ट बांधा, टाळूवर आपली जीभ दाबा. आपली विनम्रता परिपूर्ण करण्यासाठी आणि सर्व दृश्य बाधांचे निरसन करण्यासाठी हे आवश्यक आहे.

८) 'समाधि-योग-सराव' करा; म्हणजेच कल्पना करा की तुमचा मृत्यू आला आहे, आणि म्हणून तुम्हास मृत्यू-स्नान घातले गेले आहे, गुंडाळण्याच्या चादरीमध्ये तुमचे मृत शरीर झाकलेले आहे, आणि ते थडग्यामध्ये पुरण्यासाठी ठेवलेले आहे आणि सर्व शोक-संतप्त लोक तुम्हास निर्णयाच्या दिवसाच्या सत्त्वपरीक्षेसाठी एकटे सोडून निघून गेलेले आहेत.

९) 'सन्मार्ग सराव' संपन्न करा. गैरहजर असताना पण आपल्या सद्गुरूची प्रतिमा मनामध्ये ठेवून नवशिक्या (शिष्या)ने आपल्या अंत:करणास शेख़ अर्थात आपल्या सद्गुरूच्या अंत:करणाकडे रूजू करावे. सद्गुरूंमध्ये विलीन (फ़ना) होत असल्याची कल्पना करून त्यांचे आशीर्वाद घ्यावेत.

१०) सर्व शारीरिक संवेदना एकवटवा, सर्व कार्यमग्नता आणि अंत:करणाच्या स्वच्छंदी संवेदना यांना बाहेर घालवा आणि आपले संवेदन-ज्ञान ईश्वराकडे वळवा आणि म्हणा ''हे परमेश्वरा! मी तुझ्या शोधात आहे आणि तुझे समाधान हीच माझी इच्छा.'' मग मनामध्ये सत्त्वनाम 'अल्लाह'चा जप करा. परमेश्वर हजर आहे. तो तुमच्यावर देखरेख ठेवून आहे आणि तुम्हास घेरून आहे याचे स्मरण ठेवावे.

११) नामस्मरणाच्या 'दैवी शिक्षे'ची म्हणजे 'प्रभावा'ची ('वारिद' म्हणजे आध्यात्मिक अनुषंगी घटना) वाट पाहा. हे संपल्यानंतर थोड्यावेळाने आपले डोळे उघडा.

लेखक शेख मुहम्मद अमीन हे मानसिक इंद्रियांचे एक संक्षिप्त वर्णन प्रस्तुत करतात.

१) 'क़ल्ब' (हृदय, चित्त) हे डाव्या बाजूकडील स्तनाग्राखाली दोन बोटे रूंदीवर (म्हणजेच अंतरावर) आहे. याचा आकार एक देवदार – शंक्वाकृती सारखा आहे. हे प्रेषित आदम यांच्या पायाखाली (पदनिष्ठ) म्हणजेच आध्यात्मिक नियंत्रणाखाली आहे. याचा प्रकाशवर्ण पिवळा आहे.

२) 'रूह' (आत्मा) हे वक्ष:स्थळा (छाती)कडे उजव्या स्तनाग्राखाली दोन बोटे अंतरावर आहे. हे प्रेषित नूह व इब्राहीम यांच्या पायाखाली म्हणजेच आध्यात्मिक नियंत्रणाखाली आहे. याचा प्रकाशवर्ण लाल आहे.

३) 'सिर्र' (अंतरतम विवेक किंवा मर्म) हे वक्ष:स्थळाकडे डाव्या स्तनाग्रावर दोन बोटे अंतरावर आहे. हे प्रेषित मूसा यांच्या पायाखाली म्हणजेच आध्यात्मिक नियंत्रणाखाली आहे. याचा प्रकाशवर्ण शुभ्र–धवल – पांढरा आहे.

४) 'ख़फ़ी' (अव्यक्त, मौन) हे छातीच्या उजव्या स्तनाग्रावर दोन बोटे अंतरावर आहे. हे प्रेषित ईसा (येशू) यांच्या पायाखाली अर्थात आध्यात्मिक नियंत्रणाखाली आहे. याचा प्रकाश वर्ण कृष्ण म्हणजेच काळा आहे.

५) 'अख़्फ़ा' (परम अव्यक्त, गुह्य) हे छातीच्या मधोमध आहे. हे प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या पायाखाली अर्थात अध्यात्मिक नियंत्रणाखाली आहे. याचा प्रकाश वर्ण हरित–हिरवा आहे.

या सर्व खुलाशानंतर शेख़ मुहम्मद अमीन हे 'ला इला–ह इल्लल्लाह' या 'ज़िक्र' अर्थात नाम–स्मरणाच्या सूत्राचे जाप कसे करावे याची माहिती पुढे देतात. ती माहिती अशी आहे –

**'जिक्र कल्बी' (हृदयस्थ जप) ची सराव पद्धती[७७]**

तोंडामध्ये वरच्या बाजूस (टाळूवर) जिभेस घट्ट स्थिर ठेवा. एक गहन (खोल) श्वास घेतल्यानंतर, त्यास रोखून धरावे आणि शब्द 'ला'पासून जपास सुरुवात करावी. (ते श्वास) बेंबीखालून येत असल्याची कल्पना करावी. 'क़ल्ब', 'रूह', 'सिर्र', 'ख़फ़ी' आणि 'अख़्फ़ा' या मानसिक इंद्रियांमार्फत ते विस्तारित होऊ द्या आणि शेवटी तिला मेंदूच्या पहिल्या भागामध्ये स्थित असलेल्या 'सुज्ञ आत्म्या'पर्यंत ('अल्–नफ़्स अल्–नातिक़')वर ओढा. काल्पनिकरीत्या मेंदूपासून 'इला–ह' या अरबी शब्दांतर्गत 'अ' समोच्चारी असलेले 'हम्ज़ा' चिन्ह घेऊन हे अनुसरा आणि मग तिला उजव्या खांद्याच्या हाडापर्यंत खाली पोहोचून संपू द्या. नंतर खाली 'रूह'पर्यंत ओढा. आता कल्पना करा की तुम्ही 'इल्ल ल्लाह'चा 'हम्ज़ा' खांद्याच्या हाडापासून घेत आहात. वक्ष:स्थळा (छाती) च्या मध्यभागाच्या काठापर्यंत तिला खाली घसरू द्या व ही घसरण 'क़ल्ब' पाशी संपू द्या. हृदयाच्या या टोकदार बिंदूवर अशी कल्पना करावी की कोंडलेल्या श्वासाच्या सर्व शक्तीनिशी अंत:करणाच्या–हृदयाच्या केंद्रावर दाब देत 'ऐश्वर्य–वैभव शब्दा'वर आघात केले जात आहेत. सर्व शरीरभर याचे परिणाम दिसू लागतील आणि उष्णतेची अनुभूती येईल. या उष्णतेमुळे शरीरामधील सर्व भ्रष्ट कण भस्मसात होतील; तर ऐश्वर्याच्या प्रकाशामुळे शुद्ध कण उज्ज्वल होतील. या प्रक्रियेची एकवीस वेळा पुनरावृत्ती करावी. ही प्रक्रिया आपोआप घडू न देता, जपाच्या (ब्रह्म)सूत्राचे अर्थ विचारपूर्वक लक्षात ठेवून करावी. प्रयत्नांती जापकास 'ज़िक्र क़ल्बी' अर्थात हृदयस्थ जपाच्या परिणामाची अनुभूती येईल. ब्रह्मांडाचा एक अंश आणि एक मानव असल्याची चेतना तो हरवून बसतो आणि दैवी सत्तत्त्वेच्या आकर्षणामध्ये तो संपूर्णपणे विलय पावतो, 'फ़ना' होऊन जातो.

**'ज़िक्र जली' (सस्वर नाम-स्मरण)ची सराव पद्धत :**

इजिप्तमधील सादिया सूफ़ी संप्रदायामध्ये प्रचलित सस्वर नाम-स्मरणाची सरावपद्धत पुढीलप्रमाणे आहे. (E. W. Lane, Manners and Customs of the Modern Egyptians', p.p. 172-4 या ग्रंथामधून उद्धृत.)

सादिया सूफ़ींचे शेख़ु लमशायख़ म्हणजेच प्रमुख सद्गुरू आपल्या नतमस्तक भक्तांमध्ये अश्वारूढ होऊन शेख़ अल्-बक्री यांच्या उद्यानामधील घरात प्रवेश करतात. त्यांच्या सोबत काही दरवेश असतात. शेख़ घोड्यावरून खाली उतरतात. घरामधील प्रशस्त एकांत जागेतील एका भिंतीच्या कोनाड्यामध्ये पसरून ठेवलेल्या तक्तपोशीवर अंथरलेल्या एका उपासने-वस्त्रावर बसतात. ते पाठ वाकवून आणि साश्रू नयनांनी, अधोमुखी मुद्रेमध्ये सतत पुटपुटत बसलेले असतात. त्यांच्या सोबत इतर आठ इसम बसलेले असतात. जवळपास वीसच्या संख्येने असलेले त्यांच्यासोबत घरात प्रवेश केलेले दरवेश हे त्यांच्यासाठी अंथरलेल्या चटईवर एक अर्धवृत्ताकार आकृती (स्वरूपा)मध्ये अदबीने उभे असतात आणि त्यांच्या भोवती अंदाजे पन्नास ते साठ इतर इसम असतात. अंदाजे दोन यार्ड अंतर पुढे सरसावून सहा दरवेश त्या अर्धवर्तुळाकारापासून सद्गुरूकडील दिशेस येतात आणि एक नामस्मरण ('ज़िक्र') सुरू करतात. ते सर्वच्या सर्व एकाच वेळेस, ''अल्लाहू ह्यी! ('ईश्वर चिरंजीव आहे!) उद्घोषू लागतात. प्रत्येक उद्घोषाच्या वेळी, त्यांच्यापैकी प्रमुख असलेला हा आपल्या डाव्या हातात असलेल्या एक आखुड चामडी पट्टा 'बाज़' ने (फटका) मारीत असतो. हे ते काही मिनिटे करतात. एक हब्शी गुलाम मग भ्रमिष्ट ('मल्बूस') बनतो आणि त्या वेडाच्या भरात तो दरवेशांमध्ये घुसतो. तो आपले हात इकडे-तिकडे हालवितो आणि उद्गारत असतो, ''अल्लाह ला ला ला ला लाह !'' एक इसम त्याला धरतो आणि लवकरच तो बरा होतो. अगोदर वर्णन केल्याप्रमाणे दरवेश पूर्णपणे अर्धवर्तुळाकार उभे असतात, मग ते एक दुसरा 'ज़िक्र' म्हणजेच नामस्मरण सुरू करतात. एक सोडून एक प्रत्येक जापक ('ज़ाकिर') उद्गारत असतो, 'अल्लाहू ह्यी! ('ईश्वर चिरंजीव आहे!) तर इतर 'या ह्यी!'(हे तू चिरंजीवी!)आणि सर्वजण प्रत्येक उद्गारासोबत एकदा उजवीकडे आणि एकदा डावीकडे झुकत असतात. अशी क्रिया ते अंदाजे दहा मिनिटांपर्यंत करतात. नंतर अंदाजे तेवढ्याच वेळेस, त्याच पद्धतीने आणि तशाच हालचालींनी, ते उद्गारतात, 'दायिम' ('चिरंतन, चिरंजिवी!') आणि 'या दायिम!' ('हे चिरस्थायी!) या नामस्मरणानंतर, एक इसम पवित्र कुराणामधील एखादे अंश वाचण्यास सुरुवात करतो; परंतु 'ज़िक्र' अद्याप सुरूच असते आणि ते साधारणपणे एक पाव तासभर चालू असते. तेथे उपस्थित दरवेशांपैकी अधिकांश दरवेश शेख़च्या हाताचे चुंबन घेतात आणि मग तो वरच्या शयनगृहामध्ये निजावयास जातो. [ A.J. Arcerry - 'Sufism' - pp. - 91-92 ]

**३) ज़िक्र (नामस्मरण) : सूफ़ीप्रणीत तत्त्वज्ञान :**

वाचेने, श्रवणाने, नयनाने (डोळ्यांनी) आणि मनानेही श्रीहरी (परमेश्वर) चिंतणे म्हणजे नामस्मरण (ज़िक्र) होय. नामस्मरण हे नामसंकीर्तन आहे. ईश्वरप्राप्तीचे रोकडे साधन म्हणून संतांनी नामसंकीर्तनाचा महिमा गायिला. नामस्मरण हे वैखरीने नव्हे, तर मनाने किंवा मौनाने करायचे आहे. नामस्मरणात अनात्म्याचे संस्कार पुसून आत्म्याचे संस्कार दृढ केले जातात.

नामस्मरणाने वाचा शुद्ध होते. मन निर्मळ होते व ते विशालही होते. मनापासून भक्ती, परमेश्वरावर नितांत श्रद्धा आणि सदाचरण एवढेच पथ्य आपण पाळले की हातून सदैव चांगली कर्मे घडतात. मन परमेश्वराकडे ओढ घेते आणि त्याच्यावरील प्रेमामुळे आपोआपच मनाला अपार शांती लाभते आणि खरे सुख म्हणजे मनाची खरी शांती होय, जी केवळ नामस्मरणाने मिळते.

अकृत्रिम भावाने भगवंताचे अनुसंधान म्हणजे भक्ती होय. चैतन्याच्या अंगभूत असणाऱ्या सहज प्रीतीचे नाव म्हणजे भक्ती. भक्ती निर्धारपूर्वक हवी. ईश्वरनामाचे नित्य स्मरण करणे हाच सुलभ भक्तिमार्ग आहे. व्यापक ईश्वरी शक्तीचे ध्यानचिंतन, भजन, पूजन, नित्यनामस्मरणासाठी भक्तीदेखील निर्धारपूर्वक, प्रयत्नपूर्वक करावी लागते. मुखाने ईश्वरनाम, कानाने गुणकीर्ती, डोळ्यांनी प्रभुदर्शनसुख, पावले सन्मार्गाची आणि हात सत्कार्यात गुंतलेले अशी आचरणपद्धती अनुसरणारी ही भक्ती होय. उपास्याचे जमेल तसे, जमेल तितके अधिकाधिक नामस्मरण करणे, एवढाच सुलभ भक्तिमार्ग आहे. नाम घेता घेता नीतिमान वर्तन असावे. नामस्मरण किती व केव्हा करावे? किती करावे; तर सदैव करावे. केव्हा करावे; तर नित्य करावे. नामस्मरण प्रेमपूर्वक आणि श्रद्धापूर्वक करावे.

जो देवापासून कधीही विभक्त नसतो त्याला भक्त म्हणतात. जो मनुष्य सदैव देवाशी अनुसंधान ठेवतो, हृदयात परमेश्वराचेच चिंतन करतो त्याच्या हृदयात देवाच्या कृपेची अनुभूती येते.

स्मरणाची आसक्ती मनाने, कंठाने आणि वाणीने सिद्ध होते; म्हणून मन, कंठ आणि वाणीद्वारे स्मरणाचे तीन भाग होतात. त्या अनुषंगाने प्रभुनामस्मरण तीन प्रकारांमध्ये केले जाते ते म्हणजे –

१) जेव्हा वाणीद्वारे प्रभू (ईश्वरा)चे नाम उच्च स्वरामध्ये वारंवार घेतले जाते, तेव्हा त्यास **कीर्तन** म्हणतात. २) कंठाच्याच संयोगाने जेव्हा प्रभुनाम वाणीद्वारे हळूहळू अनेक वेळा घेतले (म्हटले) जाते, तेव्हा त्यास **जप** म्हणतात. ३) मनातल्या मनामध्ये ईश्वराचे नाम वारंवार घेण्याच्या प्रक्रियेस **(नाम) स्मरण** असे म्हणतात.

'ज़िक्र' म्हणजे चित्स्वरूप प्रभू–नाम–स्मरण. ही मानवजातीस मिळालेली सर्वात मोठी नैसर्गिक देणगी आहे. ही लयबद्ध–समगतीक श्वासाची यंत्रणा आहे. श्वास आपल्यापरीने स्वतः मानवी अनुभूतीस समृद्ध करतो. पुनरावृत्ती उपचेतन आणि ध्यानमग्न बनते. तुम्ही भौतिक विचारापासून अतीत होऊन जाता. कोणतीही अपेक्षा न बाळगता तुम्ही हे कार्य संपूर्ण समर्पण भावनेने करता. कालप्रवाहाबरोबर वाहत जाऊन तुम्ही हे करता.

फक्त प्रयत्न करून पाहा आणि कशाचीही अपेक्षा न बाळगता अभावरूपाचा, असत्–स्वरूपाचा पुन्हा शोध घ्या आणि त्या रूपाची घोरता पहा. तुम्ही प्रत्येक गोष्टीपासून मुक्त व्हा. मन शांत होऊ द्या. हजारो गोष्टी येतात आणि नाहीशा होतात. जीवात्मा त्यांचे आगमन निरीक्षीत असतो. त्या गोष्टी वाढतात, विकसित होतात आणि आपल्या मुळाकडे परततात. मुळाकडे परतणे म्हणजेच शांतता. हा निसर्गाचा मार्ग आहे.

ज़िक्र हे शरीर आणि मनाच्या आंतरिक संरचना आणि शक्तींना जाणण्याचे, आपले आंतरिक संवेदनाचे पुनर्जीवन आहे. ते आतापर्यंत आपले अचेतन खंडाचे शोध, संपूर्णता, आणि आंतरिक विकास यांची एक नवीन जाणीवेमध्ये एक प्रकारचे स्वागत आहे. ते जातीय स्वरूप धारण केलेले आधुनिक जीवनाचे अनेक शारीरिक आणि मानसिक समस्यांना बाधक ठरण्यास फक्त मदतच करत नाही तर ते आमचा स्वतःचा मानसिक विकास आणि आत्मा व परमात्म्याशी विनियोजनामध्ये आधार देते. प्रत्येक रंगा (वर्णा)प्रमाणे प्रत्येक ध्वनीचा एक गहन प्रभाव असतो आणि पुनरावृत्तीमुळे हे शक्य असते.

ज़िक्रचा शब्दश: अर्थ आहे 'अल्लाह'चे एक किंवा काही नामांचे पाठांतर. 'अल्लाह' हे परमेश्वराचे विशेषनाम आहे. 'ला इलाह इल्लिलाह' – परमेश्वराशिवाय इतर कोणीच ईश्वर नाही. पाठांतर हे विवेकास जोडते, मनास अंत:करणाशी जोडते. दृश्य अस्तित्वाच्या पडद्यामागे असलेल्या गुह्यांचे आकलन करण्यास ते मदत करते. अल्लाहच्या गुणांच्या माध्यमाने आम्ही सृष्टीस जाणतो. अल्लाहच्या नामोच्चारांमुळे जापक हा समाध्यवस्था स्वरूपामध्ये प्रवेश करतो. अशा अवस्थेमध्ये आत्मा हा स्वत:स विसरतो, परंतु अवर्णनीय दृश्यांची बक्षिसी आत्म्यास लाभते. ते म्हणजे एकेश्वरवादी श्रद्धेचे सुदृढीकरण. त्याच्याशिवाय कुणाचेच अस्तित्व नाही. त्याच्याशिवाय कुणीच दिसत नाही. त्याच्याशिवाय कोणीच ईश्वर नाही. अल्लाह हा मानवाशी 'कुरआन'च्या माध्यमातून बोलतो. तो मानवास आपल्याशी बोलण्याचे आव्हान करतो.

आपले सान्निध्य प्राप्त करण्यास सांगतो. नामस्मरणाच्या माध्यमाने आपले गुणगान करण्यास सांगतो. ''माझे स्मरण करा आणि मीही तुमचे स्मरण ठेवीन, आणि माझ्याप्रती कृतज्ञ राहा व माझ्याशी कृतघ्न होऊ नका.'' २:१५२ नैसर्गिक दारिद्र्य हे संपत्तीचे एक स्रोत बनते आणि अगतिकता ही शक्तीचे स्रोत बनते. उपरोक्त श्लोकाचा उत्तरार्ध म्हणतो – 'माझ्याप्रती कृतज्ञ राहा व माझ्याशी कृतघ्न होऊ नका.'

सारस्वरूपात 'कुरआन' हे आपल्या सृष्टीशी सुसंवाद आहे. ते मानवाशी संभाषण आहे आणि ज़िक्र हा मानवाचा त्यास प्रतिसाद आहे. हज़रत अली म्हणतात, 'नमाज़' अर्थात उपासना-भक्ती त्याच्याशी वार्तालाप करण्याचा आमचा (मानवाचा) मार्ग आहे; तर 'कुरआन' त्या परमेश्वराचा आमच्याशी बोलण्याचा एक मार्ग आहे. 'कुरआन' पठण हा त्याच्यापर्यंत पोहोचण्याचा सर्वात जास्त हमखास मार्ग आहे. केव्हाही, कोठेही त्याचे नामस्मरण करा. म्हणून ''उभे असताना, बसलेले असताना आणि आपल्या कुशीवर पहुडलेले असताना अल्लाहचे स्मरण करा.'' ३:१९१

ज़िक्रसाठी कसलेच बंधन नाही. सूफ़ी यास 'सुकून-ए- कल्ब' म्हणजेच मन:शांती असे म्हणतात. परमेश्वराच्या नामामध्ये संपूर्णपणे रंगून जावून आत्मविस्मृत होऊन जाणे, हा ज़िक्रचा सर्वोच्च स्तर आहे. थोडक्यात नामस्मरण म्हणजे जीवात्म्याचा प्राण आणि मनाची शांती होय. [Muzaffar Ali, 'HU : The Zikr', The Times of India, 'The Speaking Tree', Pune, March 4 , 2012. Page 4]

'अज़कार' हे 'ज़िक्र' या शब्दाचे अनेकवचनी (अरबी) रूप आहे, आणि ज़िक्रचा अर्थ होतो कुणाची तरी आठवण करणे. ईश्वराच्या आठवणीस 'नामस्मरण' म्हणतात. आठवण करण्याचे पाच प्रकार आहेत – (१) लिसानी अर्थात वाचिक, (२) क़ल्बी अर्थात हृदयस्थ, (३) रूही अर्थात आत्मिक, (४) सिर्री अर्थात मर्म आणि (५) ख़फ़ी अर्थात मौन. एका ब्रह्मज्ञानी (आरिफ़)चे मत आहे – ''ज़िक्रिल लिसानी लक़लक़तु- ज़िक्रुल क़ल्बी वसवसतु- ज़िक्रुर्रूही मुशाहिदतु – ज़िक्रुला सिर्री मुआइनतु- ज़िक्रुलख़फ़ी मुग़ायिबतु'' म्हणजे वाचिक नामस्मरण कडका, हृदयस्थ वा मानसिक नामस्मरण विचाराने व कल्पनेने, आत्मिक जप (नामस्मरण) अवलोकनाने व दर्शनाने, मर्म जप निरीक्षणाने व अनुभूतीने आणि मौन नामस्मरण म्हणजे निर्वाणावस्था प्राप्त करणे अर्थात संभूति होय. परमेश्वर म्हणतो – तुम्ही माझे स्मरण करा म्हणजे मी तुमची आठवण ठेवीन आणि आपल्या प्रभूचे अतोनात नामस्मरण करा आणि सकाळ-संध्याकाळ त्याचे गुणगान, पावित्र्यगान करा आणि जेव्हा केव्हा विसर पडेल तेव्हा तू आपल्या प्रभूस आठव; म्हणजे जेव्हा 'प्रभू इच्छील' असे म्हणण्याचे विसरून

जाल तेव्हा तुम्हाला याची आठवण करून देण्यात येते आणि जो माणूस (जी व्यक्ती) परमेश्वराचे स्मरण करीत नाही त्याचे इहलोक व परलोक बिघडले म्हणून समजा. पुन्हा परमेश्वर म्हणतो– आणि जो माझ्या स्मरणापासून विमुख होऊन जाईल, त्यास आम्ही प्रलय दिवशी आंधळा बनवून उठवू. नामस्मरणानेच अंत:करणे समाधान पावतात.'' १३:२८

*ज़िक्र कुन ज़िक्र ता तुरा जान अस्त*
*साफ़ी-ए-दिल ज़ ज़िक्र-ए-यज़दान अस्त ।।*

अर्थात जोपर्यंत तुझ्या देहामध्ये प्राण आहे तोपर्यंत नामस्मरण कर नामस्मरण! कारण अंत:करणाची विशुद्धता ही प्रभुनामस्मरणाने होते.

महाप्रेषित (रसूल) मुहम्मद[स.] यांचे कथन आहे की जे लोक ईश्वराची आठवण करण्यासाठी आणि त्याचे नामस्मरण करण्यासाठी बसतात, त्यांच्या सभोवती चारी बाजूस देवदूत घेरतात आणि परमेश्वराची दया त्यांना लपवून घेते आणि त्यांच्यावर मन:शांती अवतरित होते आणि परमेश्वर त्याच्या सन्निध असलेले देवदूत आणि संदेष्ट्यांच्या आत्म्यांपाशी त्यांचा उल्लेख करतो. त्यांची आठवण काढतो. बेसावधगिरीवरचा उपाय नामस्मरणाशिवाय दुसरा काहीच नाही. जोपर्यंत मनुष्य उपाधीमध्ये म्हणजेच ईश्वरास सोडून इतर गोष्टींमध्ये व्यस्त असतो तोपर्यंत तो परमेश्वरापासून बेसावध असतो आणि हीच बेसावधगिरी दैवी शिक्षेस पात्र असते. परमेश्वराकडे उन्मुख न होणे हा एकप्रकारचा मानसिक आजारच आहे. हा आजार तीन प्रकारचा असतो. (१) वासनेचे किल्मिष, म्हणजेच वासना अनायास माणसास उन्मार्गाकडे सतत ओढीत असते. इथपर्यंत की नमाज़ (भक्ती)मध्ये पण ती शांत बसलेली नसते. उपासकाचे अवधान विचलित करीत असते. (२) शंकाकुशंका या पण अनायास मनामध्ये अकारण निर्माण होतात. (३) मनाची दृष्टी बाह्य भौतिक जगावर खिळलेली असते. परिणामी मन स्थिर राहत नाही, ते समाधान पावत नाही; म्हणून सर्वात चांगला उपाय हा आहे की, मनामध्ये वासनांचे किल्मिष गोंधळ घालत असताना सत्ता नाम 'अल्लाह'स प्रकट करावे. त्याचे स्मरण मनात करावे. शंकाकुशंकांच्या वेळी त्यांचे निरसन करण्यासाठी मातृका-गुण-नामांचे मनामध्ये दृढीकरण करून त्यांना कायम ठेवून, अंत:करणाच्या दृष्टीस, ईश्वराचे दर्पण असलेले सद्गुरूच्या सौंदर्यास उघडे ठेवावे. मातृका-गुण सात आहेत. (१) जीवन, (२) ज्ञान, (३) संकल्प, (४) सामर्थ्य (शक्ती), (५) श्रवण, (६) दृक् (दृष्टी) आणि (७) बोलणारा (वक्ता).

एक छोटाश्या (लहान) खोलीमध्ये पाठ सरळ ठेवून, पश्चिमेकडे तोंड करून बसावे आणि डोळे मिटून मन:पूर्वक अत्यंत शालीनतेने व नम्रतेने प्रभुनामस्मरणामध्ये व्यस्त-मग्न व्हावे. इतके मग्न व व्यस्त असावे की, नामस्मरणाच्या उष्णतेचा प्रभाव शरीराची त्वचा, मांस, रक्त आणि धमन्या या सर्वांवर पडावे. त्यावेळेस आत्मशक्तीद्वारे अव्यक्त गोष्टी प्रकट होऊ लागतात. प्रकाशपुंजाचे डोळे उघडतात आणि अंत:करणावरील अज्ञानाची आवरणे सारली जातात. केवळ जिव्हेच्या नामोच्चाराने काहीच साध्य होत नाही.

ईश्वराचे महाप्रेषित व संदेष्टे म्हणतात की, श्रेयस्कर नामस्मरणांपैकी ''ला इला-ह इल्लल्लाह'' हे एक आहे. ज्याने मन:पूर्वक ''ला इला-ह इल्लल्लाह'' म्हटले त्याचा स्वर्गामध्ये प्रवेश हे निश्चित! या ब्रह्मसूत्रा (कल्मा)ची चार नित्य कर्मे (फ़र्ज़) आहेत – प्रथम आयुष्यभर एकदा तरी म्हणणे. दुसरे शुद्ध स्वरूपात म्हणणे,

तिसरे ब्रह्मसूत्राचे अर्थ लक्षात ठेवणे आणि चौथे याच्या अर्थावर मरण पत्करणे; आणि हे पण स्मरण ठेवावे की, 'ज़िक्र' अर्थात नामस्मरण पाच प्रकारांनी होते - १) जिव्हा, २) हृदय-अंत:करण, ३) आत्मा, ४) मर्म आणि ५) मौन वा गुह्य. यांना क्रमशः १) नासूत (भुव:लोक), २) मलकूत (देवलोक) ३) जबरूत (तप:लोक), ४) लाहूत (सत्यलोक) आणि ५) बाहूत (शिवलोक) पण म्हणतात. प्रथम नामस्मरण शरीअतची वाणी **नासूती** (धर्मशास्त्र-कर्मकांड भू-लोक्य) ''ला इला-ह इल्लल्लाहु मुहम्मदुर्रसूल्लल्ला हि'' वाचेने-जिव्हेने म्हणणे प्रमाण (सनद) आहे. दुसरे नामस्मरण तरीक़तची वाणी **मलकूती** ''ला इला-ह इल्लल्लाहु '' मनाने (मन:पूर्वक) म्हणणे सनद आहे. तिसरे नामस्मरण हक़ीक़तची वाणी **जबरूती** 'अल्लाहु' आत्म्याने म्हणणे सनद आहे. चौथे नामस्मरण **लाहूती**ची वाणी 'हुव' मर्माने म्हणणे सनद आहे. तर पाचवे नामस्मरण मारिफ़तची वाणी **हाहूती** (वा **बाहूती**) 'अना' (अहं) मौन स्वरूपात गुह्यपणे म्हणणे सनद आहे. शेवटी सहावे सत्याचे परमसत्य परब्रह्म (हक़ीक़तुलहक़) ख़फ़ी उल अख़्फ़ा अर्थात परम गुह्य नामस्मरण- मौनाति मौन जप आहे. यामध्ये म्हणणे, ऐकणे काहीच नाही. परमेश्वर म्हणतो- ''मग नमाज़ (उपासना, भक्ती) पढल्यानंतर ईश्वराचे (नाम)स्मरण करा. उभे असताना, उठता, बसता आणि पहुडले असताना.'' ३:१९१

प्रभु-नामस्मरणा (ज़िक्र ए-इलाही)मध्ये म्हणजेच (विधी-निषेध) नामस्मरणामध्ये (ज़िक्रनफ़ी व अस्बात) निषेध अवस्थेमध्ये डोळे मिटावेत आणि विधीच्या टप्प्यावर डोळे उघडे ठेवावेत. विधी वाणी स्मरणाच्या वेळेस प्रभु प्रकाशाची कल्पना (विचार) करावी आणि 'हमा उस्त' म्हणजेच सर्व काही तो (परमेश्वर)च आहे याची दृढ धारणा असावी.

उपरोक्त तात्त्विक-दार्शनिक विवेचनानुसार 'ज़िक्र' अर्थात नामस्मरणाचे पाच प्रकार होतात. ते कोष्टक स्वरूपात असे दाखवता येतील -

*** ज़िक्र (नामस्मरणा)चे पंच प्रकार ***

| | १. नामस्मरण प्रकार | २. मानसिक अवयव | ३. स्वरूप-विशेष | ४. संबंधित लोक |
|---|---|---|---|---|
| १. | ज़बानी<br>वाचिक | जबान<br>जिव्हा, वाणी | लक़लक़ा<br>सस्वर-स्मरण | नासूत<br>भुव:लोक |
| २. | क़ल्बी<br>मानसिक | क़ल्ब<br>हृदय-चित्त | वसवसा<br>दुष्प्रेरणा, वासनेचे किल्मिष | मलकूत<br>देवलोक |
| ३. | रूही<br>आत्मिक | रूह<br>आत्मा | मुशाहिदा<br>दर्शन | जबरूत<br>तप:लोक |
| ४. | सिर्री<br>मर्म | सिर्र<br>विवेक, मर्म | मुआइना<br>निरीक्षण | लाहूत<br>सत्यलोक |
| ५. | ख़फ़ी<br>मौन<br>अजपा जाप | ख़फ़ी<br>अंतर्मन, अंतरतम | मुग़ाइबा<br>अंतर्धान | बाहूत (हाहूत)<br>शिवलोक |

प्रेम-क्षेत्रामधील प्रेयसी, प्रेम आणि प्रियकर - या प्रेमाच्या त्रिकोणाच्या दृष्टान्ताच्या आधारे 'ज़िक्र'चे उपरोक्त पाच प्रकारांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे देता येईल -

जेव्हा एखादा सुदूरवर्ती प्रियकर लांबच्या प्रवासामध्ये असलेल्या आपल्या प्रेयसीचा जप करतो, तिची सारखी आठवण करून तिचे नाव रटत असतो, तेव्हा त्यास 'ज़बानी लक़लक़ा' म्हणजे वाचिक सस्वर जप म्हणतात. जेव्हा तिच्या आगमनाची वार्ता ऐकून तो मनामध्ये विचार करतो तेव्हा त्यास 'क़ल्बी वसवसा' म्हणजे मनामध्ये निर्मित वासनेचे किल्मिष असे म्हणतात. जेव्हा तो तिला जवळून पाहतो तेव्हा त्यास 'रूही मुशाहिदा' म्हणजेच आत्मिक दर्शन म्हणतात. जेव्हा तो प्रियकर तिच्याशी सु-संवाद साधतो तेव्हा त्यास 'सिर्री मुआइना' अर्थात विवेकमय मार्मिक निरीक्षण असे म्हणतात. मीलना(संयोग)मध्ये होणाऱ्या सर्वस्व विस्मृतीस आणि आत्म-विलया (फ़ना)स 'ज़िक्र ख़फ़ी' अर्थात मौन अंतरतम असे म्हणतात.

'वाक़िफ़' अर्थात अभ्यस्त अभिज्ञ, समर्पणकर्ता हा देहाने 'नासूत' म्हणजे भूलोकामध्ये प्रवेश करतो. 'वासिफ़' अर्थात प्रशंसक हा मनाने, अंत:करणाने 'मलकूत' म्हणजे देवलोकामध्ये प्रवेश करतो. 'आरिफ़' अर्थात ब्रह्मज्ञानी हा आत्म्याने 'जबरूत' म्हणजे तप:लोकमध्ये प्रवेश करतो. 'आशिक़' अर्थात प्रेमी, प्रियकर हा प्रकाश-तेजाने 'लाहूत' म्हणजे सत्यलोकामध्ये प्रवेश करतो; तर 'माशूक़' अर्थात प्रेयसी (देव, भगवंत) 'हाहूत' म्हणजे शिवलोकामध्ये अंतर्धान पावते (होते).

गुलबर्गा (कलबुर्गी) येथील सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख़्वाजा बंदानवाज़ गेसूदराज़ यांनी आपले ग्रंथ 'मेअराजुल आशिक़ीन' (भक्तांचे उत्कर्ष सोपान) मध्ये उपरोक्त पंच नामस्मरणांचा संबंध पंचदेहांशी निगडित असल्याचे दाखवून दिले आहे. ते याप्रमाणे -

ज्ञानाच्या डोळ्याने एकेश्वरास पाहिले पहिजे. प्रेमाच्या कानांनी त्याचे ऐकावे. प्रेमाच्या नाकाने हुंगले पाहिजे (वास घेतला पाहिजे). (नाम)स्मरणाच्या जिव्हेने त्याच्याविषयी बोलावे. यालाच रहस्यात्मक - गूढ अनुभव अथवा 'इल्हाम' (आकाशवाणी) असे म्हणतात. वासनेस प्रतिबंध करून वरील गोष्टींच्या साहाय्याने सामाधिस्थ झाले पाहिजे आणि सद्‌गुरूंच्या एकेश्वरवादी ज्ञानास ग्रहण केले पाहिजे. एकेश्वर ज्ञानाच्या समुद्रामध्ये उडी मारली पाहिजे. ज़िक्र ख़फ़ी (अजपा जाप)च्या महालामध्ये अद्वैताची झोप घेतली पाहिजे. या स्थितीचे वर्णन 'हदीस क़ुद्‌सी'मध्ये असे आहे - माझा असा एक वेळ अल्लाहसोबत असतो की त्या वेळेस मला ना कोणत्या देवदूताचे ध्यान असते ना कोणा संदेष्टा महाप्रेषिताविषयी विचार असतो.

प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या 'मेअराज' अर्थात दिव्य आरोहण, दिव्य यात्रा, गगन यात्रेचे वर्णन नामस्मरणा(ज़िक्र)च्या माध्यमाने करताना त्यांनी 'मेअराजला' पाच महालांची कसोटी मानले आहे. 'शरीअत' (धर्मशास्त्र, कर्मकांड)चे स्थान 'वाजिबुल वजूद' अर्थात स्थूलदेह असून या नासूती-भूलोकाचे नामस्मरण 'ज़िक्र जली' म्हणजे सस्वर वाचिकजप आहे. अर्थात शरीअत नौकेसमान आहे. 'तरीक़त' (साधनामार्ग)चे स्थान 'मुमकिनुल वजूद' अर्थात लिंग देह असून मलकूती देवलोकाचे नामस्मरण 'ज़िक्र क़ल्बी' म्हणजे मानसिक वा हृदयस्थ जप आहे. अर्थात तरीक़त समुद्रासारखे आहे. 'हक़ीक़त' (वास्तव-सत्यमार्ग)चे स्थान 'मुमतनुल वजूद' अर्थात कारण देह असून जबरूनी तप:लोकाचे नामस्मरण 'ज़िक्र रूही' म्हणजे आत्मिक जप आहे. 'मारिफ़त' (ज्ञानकांड)चे स्थान 'आरिफ़ुल वजूद' अर्थात महाकारण देह असून लाहूती सत्यलोकाचे नामस्मरण

'ज़िक्र सिर्री' म्हणजे मर्मजप आहे. पाचवे 'वहद्तुलवजूद' अर्थात सूक्ष्म देह असून हाहूती – शिवलोकाचे नामस्मरण 'ज़िक्र ख़फ़ी' म्हणजे मौनजप किंवा अजपा जाप आहे.

मानवी देहामध्ये दोन क्रम सुरू असतात. त्यापैकी एक तर प्रकट बाह्य श्वास आणि श्वास-प्रवाह वा प्राण-वृत्तीचा क्रम आहे, जे प्रत्येक क्षण चालू आहे, तर दुसरे आहे विचारांचा प्रवाह. हा क्रम पण कोणत्याच वेळेस मानवापासून विभक्त नसतो. हे दोन्ही श्वास-प्रवाह आणि विचार-प्रवाह प्रत्येक क्षण मनुष्याचे देह आणि प्राणाशी निगडित आहेत. या दोहोंचा पण आपसात एक गुप्त आणि अव्यक्त संबंध आहे. हे विदितच आहे की श्वासामध्ये विचारांची फार मोठी भूमिका असते. इतकेच नव्हे तर श्वास आणि श्वास-प्रवाह हे विचारप्रवाहाचे द्वार आहे. म्हणून साधक आणि सदाचारी लोकांनी नामस्मरणासाठी श्वासरोध अर्थात योगाभ्यास आणि प्राणायामाच्या पद्धती प्रचलित केल्या आहेत. याचे ज्ञान व विज्ञान हे आहे की मनाचा वा अंत:करणाचा (चित्ताचा) हा एक विशेष गुण आहे की, ते प्रत्येक वेळेस, प्रत्येक क्षणी काही-ना-काही तरी विचारामध्ये असते किंवा सार्थक बोलत असते. दुसऱ्या शब्दांत सांगायचे झाल्यास मन कोणत्या ना कोणत्या तरी वस्तूचे स्मरण करीत असते. हे स्मरणाचे गुण त्याची निर्मिती आणि स्वभावामध्ये यासाठी कायमस्वरूपी विद्यमान असते की, मनुष्याची निर्मिती आणि त्याच्या स्वभावाचा आधार (पाया) त्या नामस्मरणांच्या खाणीवर म्हणजेच अल्लाहच्या विशुद्ध सत्ता नामावर (आधारलेला) आहे.

मनुष्याचे प्रत्येक वेळेस कोणत्या ना कोणत्या गोष्टीविषयी विचार करीत राहणे, कोणत्या ना कोणत्या गोष्टीचे स्मरण मनामध्ये चालू राहणे हे या गोष्टीचे दृढ प्रमाण आहे की मानवाच्या अंतरंगाचे वास्तव, मूळ स्वभाव आणि वास्तविक प्रकृतिच प्रभुनामस्मरण आहे. सर्व प्रकारच्या नामस्मरणांची ही खाण आहे. प्रत्युत 'अल्लाह' या नामाची सत्ता ब्रह्मांडामधील समस्त पदार्थांचे-वस्तूंचे मूळ आणि बीज आहे. परमेश्वराचे वचन आहे – ''जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीवर आहे, ते सर्व अल्लाहने तुमच्या सेवेत कार्यरत केलेले आहे.'' ३१:२० आकाशांतील व पृथ्वीवरील सर्व निर्मिती त्याचीच आहे. कारण की सर्वच अल्लाहच्या नामाने प्रकटलेले आहे. ते सर्व अल्लाहच्या नावे आहे आणि त्याचे अधीन होणे पण त्याच्याच नावाने आहे. उपरोक्त महाश्लोकाचे भाष्य करताना इब्न अब्बास यांनी असे स्पष्ट केले आहे की, प्रत्येक वस्तू-गोष्टीमध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या नामांपैकी एक नाम असते आणि प्रत्येक वस्तूचे नामाभिधान हे परम विशुद्ध अल्लाहच्या सत्तानामा (इस्म-ए-ज़ात)पासून प्राप्त आहे. एक हदीस (प्रेषित वचना)मध्ये असे नमूद आहे की, आत्मा जेव्हा प्रेषित आदम यांच्या अस्तित्वामध्ये दाखल (प्रविष्ट) झाला आणि तो त्याच्या मेंदूमध्ये स्थिर झाला तेव्हा आदम उद्‌गारले 'या अल्लाहु' ('हे परमेश्वरा!'). जेव्हा अल्लाहच्या सत्तानामाच्या प्रकाशाने आदमचा मेंदू उजळून गेला आणि जेव्हा त्यांनी जगाच्या सूर्याकडे पाहिजे तेव्हा त्यांना एक शिंक आली. तेव्हा ते उद्‌गारले, 'अल् हम्दु लिल्लाहि' (सर्व स्तुती परमेश्वरास असो!) आणि 'मी त्यामध्ये आपला आत्मा फुंकला' परमेश्वराच्या या वचनावरून प्रमाणित व सिद्ध होते की, प्रेषित आदम यांच्या अस्तित्वामध्ये आत्मा वायूसोबत फुंकला गेला. उपरोक्त विवेचनावरून हे ज्ञातच नव्हे तर प्रमाणित व सिद्ध होते की आत्म्याचा प्रभुनामस्मरणाशी आणि शिवाय नामस्मरणाच्या समस्त स्वरूपाशी आणि ब्रह्मांडाच्या सर्व वस्तू-गोष्टींशी म्हणजेच विचारांशी, श्वास आणि श्वास-प्रवाहाशी केवढा घनिष्ट संबंध आहे, अपितू असे माहीत पडते की हे तीन्ही एकच वस्तू (गोष्ट) आहेत.

मानवी मनाच्या विचारांशी त्याचे प्राण आणि श्वासाचा अत्यंत घनिष्ठ संबंध आहे. सदाचारी माणसाचे मन एक उद्यानासारखे असते. श्वास आणि प्राण उष:कालीन शीतल वायूसमान जेव्हा माणसापासून निघतात तेव्हा ते नामस्मरणाच्या सुगंधापासून बाहेर येतात आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वेताळ देवदूत त्याला स्वर्गीय पोशाकामध्ये गुंडाळून परमेश्वराच्या दरबारामध्ये त्या जापकातर्फे एक अत्यंत मौल्यवान भेट म्हणून प्रस्तुत करतात, आणि ते नामस्मरणयुक्त प्राण त्या जापकासाठी सत्कर्माच्या अमूल्य रत्नासमान परलोक आणि दया व कृपेच्या कोषागारामध्ये ठेवून देतात. जापकाचे जे प्राण आणि श्वास परत येते ते सर्वश्रेष्ठ परमेश्वराची दया व कृपेने पुरेपूर भरलेले असते, आणि हे प्राण('दान') सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून जणू त्या नामस्मरणाच्या भेटीच्या उत्तरादाखल पारितोषिक असते. त्यामुळे जापकाच्या चित्तावर (मनावर) परमेश्वराच्या कृपेचा वर्षाव होतो आणि जापकाचे मन उल्लासाने भरले जाते.

याउलट पाखंडी, दंभी, ढोंगी, वि-भक्त (मुश्रिक) आणि श्रद्धाहीन माणसाचे श्वास जेव्हा त्यांच्या मृत वासनामय मनापासून निघते तेव्हा ते जणू शैतानी, वासनायुक्त विषारी वायूचा एक बॉंबगोळाच असते, जे इब्लीस आणि शैतानाच्या इहलौकिक आणि पारलौकिक तोट्याच्या खजिन्यामध्ये जमा होऊन जाते आणि तेथून ते लालसा, इर्षा, अहंकार, वासना इत्यादी समस्त वाईट प्रभावांना घेऊन येते. असले श्वास जेव्हा ज्या मनामध्ये (जाऊन) धडकते तेव्हा ते त्यास विषारी आणि मृत बनवून सोडते आणि त्याला आजारी पाडून मारून टाकते. सारांश, मनुष्य ज्या वेळी श्वास घेतो तेव्हा तो श्वास मनुष्याचे मन, मेंदू आणि आत्म्याचा गंध आणि गुण घेऊन बाहेर निघतो (येतो). लक्षात ठेवा की, मानवी श्वास आणि प्राणामुळे त्याचे विचार आणि मनाचे गुण माहीत पडतात आणि त्यांची अनुभूती येते, म्हणून मनुष्य जेव्हा जिव्हेने नामस्मरण करतो किंवा बाह्य इंद्रियांनी उपासना व साधना करतो, परंतु त्या वेळी त्याचे मन उपाधीच्या विचारांमध्ये गुंतलेले असेल तर ते नामस्मरण आणि ती उपासना (भक्ती) परमेश्वरासाठी काहीच नसते. त्याचे मूल्य शून्य असते. कारण की सर्वश्रेष्ठ अल्लाहची नजर ही मानवी मनावर खिळलेली असते; त्याची जिव्हा आणि बाह्य शरीरावर व कर्मांवर नसते. प्रेषित वचन पण आहे- सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा ना तुमच्या बाह्य स्वरूपास पाहतो, ना तुमच्या कर्मांना, परंतु तो तुमच्या मनांना व तुमच्या संकल्पांना पाहतो.

यावरून स्पष्ट होते की परमेश्वराच्या नामस्मरणामध्ये मूळ मामला मनाचा असतो. बाह्यस्वरूप आणि वाचिक नामस्मरण काही खरे नव्हे. अनेक लोक रात्रभर नामस्मरण करतात, परंतु त्यांचे मन नामस्मरणापासून बेसावध असते. काही असे मुरब्बी जापक असतात की जे (नामस्मरणामध्ये) जिव्हा मुळीच हलवत नाहीत; परंतु त्यांच्या मनाचे चक्र हे ईश्वराच्या नामस्मरणामध्ये निरंतर गतिशील-मग्न असते. ईशप्रेमी आणि ईशब्रह्मज्ञानी यांचा प्रत्येक श्वास जणू ईश्वराच्या प्रेमाने भरलेला एक आंतरिक संदेश आणि आत्मिक आदेशपत्र असते. हे विद्युत्गती प्रमाणे वेगाने ईश्वराच्या दरबारामध्ये पोहोचते. याचप्रमाणे जापक-ईश्वर, उपासक-उपास्य, प्रियकर-प्रेयसी यांच्या दरम्यान ''तुम्ही माझ्या स्मरणात राहा म्हणजे मी तुमच्या स्मरणात राहीन'' आणि ''जो ज्याच्याशी प्रेम करतो त्याच्याशीच प्रेम केले जाते'' याची विद्युत्धारा प्रवाहित राहते (असते). मनुष्याने मन:पूर्वक हजारोवेळा ईश्वराच्या नामस्मरणामध्ये, सोबत प्रेषिताच्या आठवणीमध्ये विशुद्ध ब्रह्मसूत्रा ('कल्म-ए-तय्यब')चे पारायण करीत राहावे. त्या परमेश्वराच्या आठवणीमध्ये मनास व्यस्त ठेवावे की जेणेकरून उपाधीची आठवण पण येऊ नये.

मनुष्याने साधना, उपासना, नामस्मरण आणि चिंतना-मननामध्ये मनाच्या प्राप्तव्यास अनिवार्य अवश्य जाणावे. आपले प्राण व श्वासावर लक्ष ठेवावे की कोणतेच प्राण व श्वास ईश्वरनामाशिवाय बाहेर निघता कामा नये. जो श्वास ईश्वराची कल्पना व विचारासह निघतो तो एक अमूल्य मोती स्वरूपामध्ये ईश्वरी दरबारामध्ये पोहोचतो की ज्याचे मूल्य इहलोक व परलोक या दोन्ही जगांच्या प्रत्येक देणगीहून अधिक आहे.

मनुष्य हा फक्त एक श्वासाचाच धनी आहे, मालक आहे. जो श्वास निघून जातो तो हातातून निसटतो. तो कधीच शरीरामध्ये परत येत नाही. यासाठी की श्वास हे गणतीचे (मर्यादित) आहेत, आणि जो श्वास नंतर येणार आहे त्याविषयी सर्वश्रेष्ठ परमेश्वरच जाणतो की तो येईल की न येईल. सारांश, माजी श्वास आणि भावी श्वास हे आधीन आणि विश्वासाच्या पलीकडील आहेत. मनुष्य फक्त एकाच श्वासाचा मालक आहे, आणि ते म्हणजे वर्तमानात सुरू असलेले श्वास. जर हे श्वास ईश्वराविषयी विशेष विचार आणि निष्कपट प्रेमाने भरलेले, नामस्मरणामध्ये व्यतीत झाले तर समजावे की त्याचे सोने झाले. याने दोन्ही जगांची संपत्ती प्राप्त होऊ शकते. जर हे श्वास बेसावधगिरीमध्ये व्यतीत झाले म्हणजेच वासना, शैतानी, दुष्प्रेरणा, ऐहिक लालसा, भौतिक विचारांमध्ये गुरफटले गेले, तर समजावे की, हे श्वास नव्हते की जे हवेमध्ये उडून गेले. ते परलोकामध्ये निरंतर शिक्षेचा डोंगर बनून कोसळेल. मानसिक व आत्मिक जापक आणि विशुद्ध ब्रह्मसूत्र अर्थात 'कल्म-ए-तय्यब'चा एकनिष्ठ माणूसच श्वास आणि प्राणाचे महत्त्व ओळखतो.

श्वासाचे-प्राणाचे महत्त्व परलोकामध्ये कळून येते. मृत्यूनंतर माणसास या गोष्टीची जाणीव नसते की, त्याने आपल्या पाठीमागे आपले प्रियजन, पत्नी, मुले-मुली, भाऊ, बहीण आणि मित्र-परिवार, धन-संपत्ती, घर-दार इत्यादी सोडून दिलेले असते. त्याला जेव्हा त्याची जाणीव होते की, परलोकाच्या बाजारामध्ये फक्त नामस्मरण, साधना आणि उपासनेच्या सच्च्या-खऱ्या नाण्याशिवाय कोणीच मदतीस येत नाही, तेव्हा त्याला या गोष्टीचे खेद व दुःख होते की हाय खेद! जगामध्ये मौज-मस्ती आणि गफलतीमध्ये हातात असलेले सोनेरी मूल्यवान क्षण गमवून बसलो! श्वास-प्रवाहाच्या एक-एक तारेमध्ये जीवनाच्या उद्दिष्टाचे मूळ रत्न गोवलेले होते. शतशः खेद! रात्रंदिवसाच्या चोवीस तासामध्ये २१,६०० श्वास प्राप्त होते, आणि प्रत्येक श्वासामध्ये परमेश्वराचे दर्शनसान्निध्य आणि ऐक्य-संयोगाच्या अनेक संधी उपलब्ध होत्या. आता त्यापैकी एकपण परत हाती येणार नाही. सारांश, हे प्रिय जीवन आणि त्याच्या मूल्यवान सोनेरी श्वासांची कदर व महत्त्व मृत्यूनंतर माहीत होणार. हदीस (प्रेषितवचन) आहे की, प्रत्येक श्वास आणि प्राण हे मोजकेच आहेत. जर ते ईश्वराच्या आठवणीमध्ये म्हणजेच नामस्मरणामध्ये व्यतीत होत नसतील तर ते मृत आहेत. म्हणून हे जे काही श्वास तुमच्या जीवनामध्ये तुम्हास प्राप्त आहेत, त्यांना सुवर्णसंधी माना. जर यांपैकी एकही श्वास प्रभुनामस्मरणामध्ये व्यतीत झाला असेल, तर ते ऐहिक वैभवापेक्षा श्रेष्ठ आहे. सुप्रसिद्ध फ़ारसी कवी ख़ाक़ानी म्हणतात की, तीस वर्षाच्या संशोधनानंतर कवी ख़ाक़ानीस हे वास्तव समजले की, एक क्षण (का होईना) परमेश्वरासोबत असणे हे प्रेषित सुलेमान यांच्या विस्तीर्ण साम्राज्याहून अधिक चांगले आहे.

सच्च्या साधकाने हे लक्षात ठेवावे की माणूस ज्या परिस्थितीमध्ये मरतो त्याच अवस्थेमध्ये तो थडग्यामध्ये जिवंत होतो. एक हदीस आहे - जर तो (माणूस) आपल्या जीवनामध्ये आपले प्रत्येक श्वास व प्राण प्रभुनामस्मरणामध्ये व्यतीत करत असेल म्हणजेच विशुद्ध ब्रह्मसूत्रा (कल्म-ए-तय्यब)च्या सत्यापनामध्ये व्यतीत

करत असेल ('अल्लाहा शिवाय इतर कोणीच उपास्य नाही'– 'ला इला–ह–इल्लल्लाह' हे कल्म–ए–तय्यब आहे.) तर, त्याचे शेवटचे श्वासपण म्हणजेच प्राणोत्क्रमण 'कल्म–ए–तय्यब' वर होईल. हाच श्वास त्याच्यापाशी सर्वप्रथम येऊन थडग्यामध्ये त्याला जागे करतो व याला प्रलय दिवसापर्यंत जिवंत ठेवतो. तेव्हा एका श्वासाची किंमत परलोकामध्ये माहीत होते.

हे लक्षात असावे की, अनादि काळी विश्वंभराने समस्त आत्म्यांना मुहम्मदी ज्योतीच्या प्रकाशापासून एक शब्द 'कुन' म्हणजे 'भव'च्या साहाय्याने 'फ़यकून' अर्थात 'ते निर्माण झाले'च्या माध्यमाने एका क्षणभरामध्ये निर्माण केले आणि मुहम्मदी ज्योतीस आपला उच्च आत्मा प्रदान केला. यानंतर सर्व आत्म्यांना मुहम्मदी आत्म्यासमोर उभे करून आपल्या प्रभुत्वाचे प्रदर्शन केले व म्हटले, 'अलस्तु बि राब्बिकुम' म्हणजेच 'काय मी तुमचा प्रभू नाही?' आणि मुहम्मदी आत्म्यास 'ख़लक़्ल इन्सान फ़ी अहसनि तक़्वीम' म्हणजेच मानवास सर्वोत्तम स्वरूपामध्ये घडवले – या अनुसार मुहम्मदी ज्योतिपासून उजळून टाकले. तेव्हा समस्त आत्मे मुहम्मदी आत्म्याचे वास्तविक सौंदर्याच्या दृष्टिक्षेपामध्ये सामावले गेले (आले). एक हदीस आहे की, समस्त सौंदर्य हे परमेश्वराच्या सौंदर्याच्या तेजामुळे आहे. त्या वेळेस सर्व आत्मे परमेश्वराचे तेज (प्रकाश) अर्थात मुहम्मदी आत्म्यावर मन:पूर्वक भाळून त्याचे 'प्रेमवेडे' बनले, आणि अंत:करणपूर्वक 'क़ालूबले' म्हणजेच 'होय' म्हणून स्वीकृती दिली. अर्थात स्नेही (मुहम्मद[स.])च्या आठवणीमध्ये आणि अल्लाहच्या नामस्मरणामध्ये व्यस्त झाले तेव्हा ईश्वराने म्हटले की, तुम्ही माझ्या स्नेहीचे वेडे झालात, परंतु वास्तवात तुम्ही माझे वेडे झालात. माझे स्नेही (मुहम्मद[स.])ची साधना, त्याचे अनुसरण व त्याच्या विषयी प्रेम वास्तवात माझ्याविषयीचे प्रेम आहे. माझ्या स्नेह्याची आठवण ही माझे नामस्मरण आहे, यासाठी की ते माझ्या प्रकाशापासून आहेत आणि मी त्यांचे स्मरण करतो आणि ते माझे नाम–स्मरण करतात, आणि तुम्ही पण माझे नामस्मरण करा आणि मी तुमचे स्मरण करीन. देवदूत प्रेषित मुहम्मद[स.] – ईश्वराचे स्नेही – यांच्यासाठी शांतिनिवेदन ('सलाम') करतात आणि त्यांची अंतरासत्ती ('दरूद') करतात. स्वत: परमेश्वर पण त्यांची अंतरासत्ती करतो. तर मग तुम्ही लोक पण प्रेषितांच्या आत्म्यासाठी शांतिनिवेदन करा व त्यांची अंतरासत्ती ('दरूद') पण करा. 'माझी आठवण ठेवा, तर मी पण तुमची आठवण ठेवीन.'

'रब' या शब्दाचे अर्थ धनी–मालक, उपजीविका देणारा, पालन–पोषण करणारा असे आहेत. आत्म्याच्या आध्यात्मिक जगामध्ये आत्मिक नामस्मरणापासून प्रकाशास खाद्य पोहोचते, आणि भौतिक जगामध्ये सस्वर आणि हृदयस्थ नामस्मरणापासून आत्म्यास खाद्य पोहोचते. परमेश्वराने जेव्हा आकाशांचा व पृथ्वीचा प्रभू होऊ इच्छिले तेव्हा त्यांना अठरा हजार विश्वांना वेगवेगळ्या तत्त्वांपासून निर्माण करून अंतराय–मध्यस्थ मानवास पंचतत्त्वांपासून घडवले आणि पंचमहाभुतांचे पंचवीस (२५) गुण म्हणजेच पंच कर्मेंद्रिये, पंच ज्ञानेंद्रिये, पाच वासना, पाच आत्मे आणि पंचदेहामध्ये मानवी आत्म्यास घालून परीक्षागृहा (जगाची भट्टी)मध्ये वितळवून पाहून पारख करण्याचे ठरवले. म्हणजेच आत्मिकदर्शन आत्म्याच्या जगाचे स्थान 'तुम्ही माझे स्मरण कराल तर मी तुमचे स्मरण करीन' यापासून भौतिक जगाच्या स्मरणापासून स्मरणीय होऊ इच्छिले. स्वत:स ज्ञात होऊ इच्छिले.

हदीस क़ुद्सी (पवित्र प्रेषित वचन) आहे; 'मी एक गुप्त खजिना होतो. मग मी या गोष्टीस पसंत केले की, मी ओळखले जावे, म्हणून मी सृष्टीस निर्माण केले.' म्हणून आत्मांना 'सर्वोत्तम स्वरूपात' ('.फ़ी अहसनि तक़्वीम') उतरवून (निर्माण करून) 'रसातळामध्ये' ('अस्फ़ल साफ़िलीन') उतरविले (ढकलले), आणि त्यांच्या उज्ज्वल प्रकाशमय म्हणजे उत्तम स्वभावामध्ये पाशविक (शैतानी) तंतू, वासनेचा अंधार, दुष्टता आणि क्षणभंगुर जगाचे आकर्षण हे सर्व मिसळले; आणि सामिप्य व संयोग आणि प्रभुदर्शनाच्या स्वर्गापासून बाहेर काढून वियोग आणि हेटाळणीच्या भौतिक जंगलामध्ये आणून उतरविले. म्हणजेच आत्म्याच्या जगाच्या मुक्त अशा आत्मा-विहंगांना स्वर्गाच्या उद्यानामधून काढून पार्थिव देहांच्या पिंजऱ्यामध्ये बंदिस्त करून टाकले आणि त्याची दोरी वासना व शैतानी दुष्प्रेरणांच्या लुब्धक भ्रमजालाच्या हाती सोपविली. एक हदीस अशी आहे – 'जग एक मांसाचा गोळा (तुकडा) आहे. त्याची आकांक्षा बाळगणारे हे श्वान (कुत्रे) आहेत.' या हदीसानुसार मनुष्यास भौतिक लालसेने सृष्टीरचनेच्या वेळी केलेल्या या कायद्यास – ''काय मी तुमचा प्रभू नाही? होय आहेस.'' आणि त्याच्या स्मरणास – ''तुम्ही माझे स्मरण करा, तर मी तुमचे स्मरण करीन'' – एकदम विसरून टाकले. आणखी एक हदीस अशी आहे – 'प्रेषित आदम व त्यांची धर्मपत्नी हव्वा यांना (स्वर्गामधून) पृथ्वीतलावर उतरवले तेव्हा त्यांच्या मेंदूमध्ये जगाची दुर्गंध घुसली, आणि स्वर्गाची सुगंधी हवा निघून जाऊ लागली. परिणामी चाळीस दिवसापर्यंत ते जगाच्या दुर्गंधीमुळे बेहोश पडून राहिले. म्हणून मनुष्याचा अनादी व स्वाभाविक प्रकाशाचा दीपक (दिवा) म्हणजे प्रभुनामस्मरण (चा दिवा) पार्थिव प्रेम आणि वासनांची अंधुकता व शैतानी काळोखामध्ये लपून गेला.

आज या जगाचा काळोख आणि अंध:कारमय रात्रीमध्ये मनुष्याचा साथी आणि मित्र फक्त प्रभुनामस्मरण(च) आहे. सच्चा परमेश्वराचे ज्ञान आणि प्रेम आणि चिरसंबंधांसाठी प्रभुनामस्मरणाशिवाय कोणतेच साधन (स्रोत) नाही. म्हणजेच स्रष्टा आणि सृष्टी, अन्नदाता आणि अन्न-ग्रहीता, शिव आणि जीव, अनादि आणि नवनिर्मित, प्रभू आणि भक्त, जापक आणि सेव्य (ईश्वर) यांच्या दरम्यान प्रभुनामस्मरणाशिवाय आणखी कोणताच संबंध आणि कारण नाही. ''तुम्ही माझे स्मरण करा, तर मी तुमचे स्मरण करीन.'' हेच अंतस्तमवाद दूरध्वनी आणि आध्यात्मिक विद्युत्तार आहे. यानेच प्रियकर-प्रेयसी, जापक-ईश्वरास आपसात मिळवून टाकले. त्यांची एकजूट केली. परमेश्वराचे वचन आहे- ''आणि परमेश्वराची दोरी घट्ट धरा.'' याचा अभिप्राय त्या दोरीशी आहे की जिचे एक टोक ब्रह्मांडाचा सृष्टिकर्ता-निर्मात्यापाशी आकाशीच दिव्य राजसिंहासनामध्ये आहे; तर दुसरे टोक जीवात्म्यांशी त्यांच्या अंत:करणामध्ये पृथ्वीतलावर आहे. ज्याने या दोरीस घट्ट धरून ठेवले-मजबूत पकडले, तो महानतम निर्माता अल्लाहच्या प्रकाशमय दरबारातील राजसिंहासनापर्यंत पोहोचला म्हणून समजावे. आणि जो कोणी 'माझ्या स्मरणात लागून राहा'पासून वंचित राहिला तो पार्थिव अंधारामध्ये पडून नष्ट झाला म्हणून समजावे.

विस्मृतीस प्रत्याव्हान करण्यासाठी तुटलेल्या संबंधाचे नूतनीकरण करणे गरजेचे असते. म्हणून ईश्वरास विसरलेल्या माणसास त्याची आठवण करून देण्यासाठी प्रभु नाम-स्मरण हे सर्वोत्तम साधन आहे.'' ''तुम्ही माझ्या स्मरणात लागून राहा''चा असा पण अभिप्राय आहे की, जेव्हा भक्त हा जिव्हेने ईश्वराचे स्मरण करतो तेव्हा ईश्वरपण आपल्या भक्ताच्या भाषेमध्ये जापकाचा जप करतो आणि तो परमेश्वराच्या दासांमध्ये प्रिय-ग्राह्य

होऊन जातो, आणि जेव्हा तो आपल्या मनातल्या मनात मोठ्या प्रेमाने ईश्वराचे स्मरण करतो तेव्हा ईश्वर पण आपल्या मनात भक्ताचे स्मरण करतो म्हणजे तो जापकावर प्रेम करतो, आणि प्रेम जेव्हा पराकोटीस पोहोचते तेव्हा भेटीची तळमळ तीव्र होते (बनते). शेवटी एक तर प्रियकर आपल्या सोबतीस भेटतो किंवा सोबतीस आपल्या जवळ बोलावून घेतो.

**परमेश्वर आपल्या भक्तांची आठवण ठेवतो (भक्तांस स्मरतो)–मात्र सशर्त–विनिमय–सिद्धान्त स्वरूपात**

परस्पर देवाण–घेवाणच्या तत्त्वाच्या आधारावर परमेश्वर हा भक्तांची आठवण ठेवत असतो व त्यांचे स्मरण करीत असतो. या संदर्भात ईश्वर–वाणी अशी आहे–

''म्हणून तुम्ही माझ्या स्मरणात लागून राहा, म्हणजे मीही तुमचे स्मरण ठेवीन; आणि माझे आभार मानीत राहा व माझ्याप्रति कृतघ्न होऊ नका.'' २:१५२ ''परमेश्वराचे अतोनात स्मरण करीत जा आणि सकाळ–संध्याकाळ त्याची पवित्रता वर्णीत असा. ३३:४१–४२ ''परमेश्वराचे अतोनात स्मरण करीत राहा; की कदाचित् तुम्ही कृतार्थ व्हाल.'' ६२:१० ''जे श्रद्धा ठेवतात, आणि ज्यांच्या मनास अल्लाहच्या स्मरणानेच समाधान लाभते (होय!) जाणून असा! अल्लाच्या स्मरणानेच मनाला समाधान लाभते.'' १३:२८

नामस्मरणाच्या बाबतीत परमेश्वर विनिमय सिद्धान्तामध्ये आस्था ठेवत असल्याचे पुढील विवेचनावरून दिसून येईल –

परमेश्वर आपल्या भक्तांना आपल्या नाम–जपाचा, नाम–स्मरणाचा आदेश अशा प्रकारे देतो– तुम्ही प्रेमाने व आत्मियतेने माझे स्मरण कराल तर मी सान्निध्याने व सामिप्याने तुमचे स्मरण करीन. तुम्ही अनुतप्त होऊन–पश्चात्तापदग्ध होऊन माझे स्मरण कराल तर मी तुमच्या अपराधांच्या क्षमेने तुमचे स्मरण करीन. जर तुम्ही कृपायाचनेने माझे स्मरण कराल तर मी कृपादृष्टीने तुमचे स्मरण करीन. तुम्ही याचनेने स्मरण कराल तर मी तुमचे माझ्या दयेने स्मरण करीन. माझ्या स्मरणात गाफ़िल न व्हाल (रहाल), तर मीही तुमचे सदोदित स्मरण ठेवीन. जर तुम्ही काकुळतीने माझे स्मरण कराल तर मी तुमची लाभदायक अशी आठवण ठेवीन. तुम्ही अपराधत्यागाने माझे स्मरण कराल तर मी गौरवाने व भोळेपणाने तुमचे स्मरण करीन. तुम्ही प्रेमाने मला आठवाल तर मी मोक्षाने (मुक्तीने) तुमचे स्मरण ठेवीन. तुम्ही मन:पूर्वक माझे स्मरण कराल तर मी, तुमच्या अपराधाचे ओझे कमी करण्याची आठवण ठेवीन. तुम्ही न विसरता माझे स्मरण कराल तर मी श्रद्धाळू भक्तजनांबरोबर तुमचे स्मरण करीन. जर श्रद्धेने माझे स्मरण कराल तर तुम्हांस मी आनंदलोक बहाल करीन. जर तुम्ही धर्म्यआचरणाने माझे स्मरण कराल तर मी क्षमेने तुमचे स्मरण ठेवीन. जर तुम्ही मन:पूर्वक माझी आठवण ठेवाल तर मी तुमची अज्ञानपटले सारीन. तुम्ही केवळ नामस्मरणाने मला आठवाल तर मीही फक्त नामस्मरणाने तुमची आठवण ठेवीन. तुम्ही नम्रतेने माझे स्मरण कराल तर मी मोठ्या गौरवाने तुम्हांस आठवेन. जर तुम्ही मोठ्या शालीनतेने मला आठवाल तर मी तुमचे अपराध क्षमा करीन. जर तुम्ही उत्कटतेने माझे स्मरण कराल तर मी तुमच्या अपराधांचा ऱ्हास करीन. जर तुम्ही विशुद्ध चित्तशुद्धीने माझे स्मरण कराल, तर मी विशुद्ध सत्कर्माने तुमची आठवण ठेवीन. जर तुम्ही प्रामाणिकपणे मला आठवाल तर मी मोठ्या नर्मीने तुमची आठवण ठेवीन. जर तुम्ही माझ्या सर्वश्रेष्ठतेच्या उद्‌घोषाने ('अल्लाहु अक्‌बर') माझे स्मरण कराल तर मी नरकापासून तुम्हांस मुक्त

करीन. जर माझ्यासाठी तुम्ही जुलूम जबरदस्तीचा त्याग कराल तर मी तुमचा सांभाळकर्ता राहीन आणि तुम्हांस प्रामाणिक मानीन. जर तुम्ही अपराध सोडून द्याल, तर मी तुमची आठवण आशीर्वादकारक ठेवीन. जर तुम्ही माझ्या सेवेत प्रयत्नशील राहाल, तर मी तुमच्यावर माझी कृपा परिपूर्ण करीन. जेथे जेथे पण तुम्ही माझे नाम–स्मरण कराल तेथे तेथे मी पण तुमचे स्मरण ठेवीत जाईन. सारांश, ''जर तुम्ही माझे नामस्मरण कराल तर मीपण तुमचे स्मरण करीन.'' गीता पण या सिद्धान्ताची पुष्टी करते. जसे : ''सर्वजण मला सारखेच आहेत, परंतु जो कोणी भक्तिभावाने माझी सेवा करतो तो माझा मित्र आहे, माझ्या ठायी स्थित आहे आणि मीसुद्धा त्याचा मित्र आहे.'' ९:२९ म्हणून शेवटी असे सांगण्यात आले आहे की, ''आपले मन, सदैव माझे चिंतन करण्यामध्ये युक्त कर, माझा भक्त हो, मला नमस्कार कर आणि माझे पूजन कर. माझ्यामध्ये पूर्णपणे रममाण झाल्याने तू निश्चितच मला प्राप्त होशील.'' ९:३४

ईश्वराचे विस्मरण करणे हे सगळ्यात मोठे अपराध आहे. अंतःस्थ (मौन) नामजपाची कल्पना नसल्यामुळे देवदूत ती आकाशात घेऊन जाऊ शकत नाहीत. अंतःस्थ (मौन) नामजप जीवात्मा व परमात्मा या दोहोंच्या दरम्यान एक गोपनीय बाब आहे.

तसे पाहता अल्लाह प्रत्येक स्थितीमध्ये अल्लाहच आहे. तो जीवात्म्याच्या स्वरूपापासून अलिप्त आहे. तो अनुपम आहे. तो एकमेवाद्वितीय आहे. तो निर्गुण निराकार आहे. तो देशकालामध्ये बद्ध नाही, परंतु त्याने आपले प्रिय सेवक (भक्त) म्हणजे प्रेषित, संत–महात्मे यांच्या माध्यमाने आपल्या खाणा–खुणा, निशाण्या, वशीला आणि पत्ता असे सांगितले आहे– ''आम्ही त्याच्या कंठातील शिरेपेक्षाही त्याच्या अधिक जवळ असतो.'' ५०:१६ म्हणजेच सर्वश्रेष्ठ परमेश्वर माणसाच्या सत्तेपेक्षाही जवळ आहे आणि पुन्हा ईश्वर म्हणतो – ''तुम्ही माझे स्मरण करा. मी तुमचे स्मरण करतो.'' अर्थात जो माणूस मला भेटू इच्छितो तो माझ्या नामस्मरणाच्या माध्यमाने मला भेटू शकतो. ज्यावेळेस जापक परमेश्वरास आठवतो त्या वेळेस त्याच्या नामस्मरणाची विद्युत्‌धारा 'ज़ातुल्ला' म्हणजेच परमेश्वराच्या सत्तेपर्यंत (नामापर्यंत) धाव घेते, आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वर पण अनिवार्यपणे त्या नामस्मरणाचे उत्तर देतो. तेव्हा त्या नामस्मरणाची विद्युत्‌धारा 'सिफ़ातुल्ला' (परमेश्वरी गुण) म्हणजेच जापकापर्यंत (उलट) धाव घेते. एक विद्युत्‌तार सौंदर्यगुणाची 'सिफ़तुल्ला' आहे, तर दुसरी रूद्र गुणाची 'ज़ातुल्ला' आहे. याच दोन तारांच्या सामर्थ्याने अठरा हजार विश्वांमध्ये तेजस्वी, आत्मिक आणि शारीरिक जीव (सजीव) आत्मिक आणि तेजस्वी बनले आहेत.

सारांश, सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे ज्ञान, सामिप्य आणि सान्निध्याचे माध्यम व वशिला फक्त नामस्मरण आहे. समस्त नामस्मरणांमध्ये सर्वश्रेष्ठ नामस्मरण आणि सर्व नामस्मरणांचे सार आणि समष्टी प्रथम विशुद्ध ब्रह्मसूत्र हे आहे. अर्थात अव्वल कल्मा तय्यब – 'ला इला–ह इल्लल्लाह' हे आहे.

हे वास्तविक 'इस्म अल्लाह ज़ात' म्हणजेच अल्लाहच्या सत्तेचे नाम आणि 'इस्मे आज़म' म्हणजे महानतम नाम ('अल्लाह') आहे. ''तोच आदि, अंत, व्यक्त, अव्यक्त आणि सर्व वस्तूंचा ज्ञाता आहे.'' ५७:३ मनःपूर्वक सत्यापनासह 'पासे अन् फ़ास' (सूफ़ी योगाभ्यास) नामस्मरणासच ''तुम्ही माझे स्मरण करा, तर मी तुमचे स्मरण करीन'' असे म्हटले आहे.

* काश्मीरचे एक सुप्रसिद्ध सूफ़ी संत सय्यद अली हमदानी यांनी आपल्या शिकवणीमध्ये नामस्मरणाचे तत्त्वज्ञान संक्षिप्तपणे मांडले आहे. ते येथे नमूद करण्यात येत आहे –

'ज़िक्र'चा शाब्दिक अर्थ आहे 'आठवण' किंवा 'स्मरण.' मुख्यत्वेकरून सूफ़ी हा शब्द ईशनामस्मरण किंवा ईशस्तवन या अर्थी वापरतात. सय्यद अली हमदानी यांच्या मते 'ज़िक्र' ईश्वराचे उपाधि-रहित सचेतन नामस्मरण आहे. त्यांच्या मते सर्वोत्तम आणि सर्वोत्कृष्ट 'ज़िक्र' 'ला-इला-ह इल्लल्लाह' ('अल्लाशिवाय कोणीच इतर उपास्य नाही') हा आहे. त्यांचे असे मत आहे की सदरहू 'ज़िक्र' नकारात्मक आणि सकारात्मक तत्त्वांनी युक्त असे हे एक अध्यात्मिक औषध आहे. 'ला-इला-ह' हे या 'ज़िक्र'चे नकारात्मक घटक-तत्त्व आहे. हे आत्म्यास अहंकार, हाव, द्वेष, मत्सर, पाखंड, दंभ या मलिनतेपासून स्वच्छ राखते. यांपैकी प्रत्येक दुर्गुण हा आत्म्यासाठी एक साखळी आहे आणि मनाचा-चित्ताचा आजार आहे, असे हमदानी यांचे मत आहे. 'ला-इला-ह' हे उपरोक्त साखळी तोडते आणि अंत:करणास-मनास शुद्ध करते. विशुद्ध अंत:करण हे परमेश्वराचे निवासस्थान असते.

सकारात्मक तत्त्वांश 'इल्लल्लाह'ची स्वीकृती अंत:करणास निरोगी बनवते, आणि दुष्टतेपासून, दुष्टवाईट विचारांपासून त्याचे संरक्षण करते. ते धर्मनिष्ठेस आत्म्याकडे वळवते. एकेश्वरवादाच्या प्रखर प्रकाशाची चकाकी ('नूर-ए-वहदत') बहुदेववादाच्या अंधारास नाहीसे करते. मानव आणि पर्यायाने मानवी आत्मा, हा ईश्वराचा उपप्रभारी उत्तराधिकारी आहे. दैवी सौंदर्यामध्ये दृढ आस्था असलेल्या सिंहासनावर तो शासक व्यक्त (प्रकट) होतो. त्या सौंदर्याच्या मार्गदर्शनाच्या प्रकाशाने जापकाचे समस्त शरीर उजळते.

जेव्हा नामस्मरण जापकाच्या अंत:करणावर संपूर्ण प्रभुत्व प्रस्थापित करते तेव्हा, जापकाचे काल्पनिक अस्तित्वाचे मागमूस 'वजूद' (सत्तत्त्व)च्या सूर्य-किरणांमधून शोधण्यास सुरू करते. (जापकाच्या) आस्तित्वाच्या संकटाची धूळ ('ज़ाकिर' आणि 'ज़िकिर'ची) नष्ट होते. जापकाच्या व्यक्तित्वामध्ये 'मज़कूर' अर्थात परमेश्वराचे सौंदर्य व्यक्त होते आणि दिव्य अभिवचनाची परिपूर्तता होते. ''तुम्ही जर मला पाहाल तर मी तुमच्याकडे पाहीन.'' सूफ़ीस अभिप्रेत असलेला हा ('ज़िक्र'चा) सर्वोच्च टप्पा आहे. येथे नामस्मरण ('ज़िक्र') पुसले जाते, नाहीसे होते आणि जापकाच्या आस्तित्वामध्ये 'मज़कूर' म्हणजेच परमेश्वराचे सौंदर्य अभिव्यक्त होते.

'रिसाल-ए-ज़िक्रिया' या आपल्या ग्रंथामध्ये सय्यद अली हमदानी 'ज़िक्र-ए-जहर' म्हणजेच सस्वर नामजप साफ फेटाळतात, आणि 'ज़िक्र-ए-ख़फ़ी' अर्थात मौन नामस्मरणाचा जोरदार पुरस्कार करतात. पवित्र कुराणातील काही विशिष्ट श्लोक आणि हदीस (प्रेषित वचन)मधील आज्ञा यांच्या आधारे त्यांनी 'ज़िक्र-ए-ख़फ़ी'चे समर्थन केले आहे, आणि त्यास ईश्वर नामस्मरणाची एक श्रेष्ठ पद्धती मानले आहे. ती अधिक विनयशील असून, अत्यंत सुयोग्य पद्धतीने ईश्वराच्या भक्तास त्याच्याकडे घेऊन जाते. आपल्या मताच्या समर्थनार्थ आणि पुष्ट्यर्थ हमदानी यांनी पवित्र कुराणातील पुढील श्लोक उद्‌धृत केले आहेत ते याप्रमाणे –

''जेव्हा माझे भक्त (सेवक) तुम्हाला माझ्याबद्दल विचारतील तर (त्यांना सांगा की) मी तर सदैव निकट आहे. धावा करणारा जेव्हा माझा धावा करतो तेव्हा मी त्याच्या हाकेला प्रतिसाद देतो. तेव्हा त्याने माझ्या प्रतिसादाचा शोध घ्यावा, माझ्यावर श्रद्धा ठेवावी जेणेकरून ते सदाचरणी बनतील. (सन्मार्गावर येतील).''

२:२८६ ''श्रद्धावंतांनो! पैगंबराशी मोठ्या आवाजात बोलू नका, ज्याप्रमाणे तुम्ही एकमेकांशी मोठमोठ्याने बोलत असता. अन्यथा तुमची सर्व सत्कृत्ये वाया जातील आणि तुम्हाला त्याची जाणीवही असणार नाही. जे लोक अल्लाहच्या पैगंबरासमोर धिम्या आवाजात बोलतात, हेच ते लोक आहेत, ज्यांची मने अल्लाहने अजमावून त्यांची (कवाडे) सदाचरणासाठी खुली केलेली आहेत. त्यांच्यासाठी क्षमा हे फार मोठे बक्षीस आहे.'' ४९:२-३ ''तुम्ही जिथे-कुठे असता, तो (अल्लाह) तुमच्याबरोबर असतो; आणि जे काही तुम्ही करत असता, त्यावर तो नजर ठेवून असतो.'' ५७:४ ''तुम्ही माझ्या स्मरणात लागून राहा, म्हणजे मीही तुमचे स्मरण ठेवीन.'' २:१५२ ''अतिशय लीनतेने आणि गुप्तपणे (आत्म्याच्या आवाजाने) आपल्या विधात्यासमोर विनवणी करा. निश्चितच मर्यादांचे उल्लंघन करणारे लोक त्याला प्रिय नाहीत.'' ७:५५ शेवटी, 'मानवाचे चित्त-अंत:करण हे परमेश्वराचे निवासस्थान आहे.' या विधानावर सय्यद अली हमदानी यांचा ठाम विश्वास आहे. (* Prof. Abdul Qaiyum Rafiqi, 'Sufism in Kashmir', pp. 64-65.)

### ४) 'ज़िक्र'चे आनुषांगिक घटक : 'मुराक़बा' (ध्यान, मनन, चिंतन) व 'विर्द'-'अवराद' (नामोच्चारण वा जप)

सूफ़ींच्या उपासनाविधींमध्ये इस्लामपुरस्कृत दैनंदिन पंचोपासना (दररोजची पाच वेळची नमाज़) व्यतिरिक्त 'ज़िक्र' अर्थात नामस्मरण या व्यविरिक्त 'मुराकबा' म्हणजे ध्यान, मनन, चिंतन, 'विर्द' वा 'अवराद' म्हणजे नामोच्चारण वा जप किंवा पवित्र कुराणातील वेचक श्लोकांची पाठ-आवृत्ती, 'शुग़ल' किंवा 'अशग़ाल' म्हणजे सिद्धीक्रिया किंवा जाप, 'लतायफ़' म्हणजे षट्चक्र, 'दायरा' किंवा 'दवायर' म्हणजे कुंडली, 'समाअ' म्हणजे संकीर्तनश्रवण, 'रक्स' म्हणजे नृत्य आणि क़व्वाली म्हणजे सूफ़ी भक्ती संगीतश्रवणाचा मुख्यत्वेकरून समावेश होतो. यांच्या विवेचनापूर्वी प्रथम उपरोक्त काही घटकांसंबंधी भारतीय विचारप्रणाली जाणून घेऊ या.

### क) भारतीय विचारधारा

### १) ध्यान*

चित्ताच्या म्हणजे मनाच्या निरंतर अंतर्मुखतेस **'ध्यान'** असे म्हणतात. आपले मन आत्मसत्तेवर हालचाल करते. आपल्या देह, मन, बुद्धीचे सर्व व्यापार आत्म्याच्या सत्तेवर चालतात. तो मात्र अंतर्यामी असतो. त्याला जाणायचे तर सर्व इंद्रिये मनासहित बंद करायला लागतात. त्यासाठी ध्यान करायचे आहे. ध्यानात मनाची बाहेर धावण्याची प्रवृत्ती मोडून ती आत वळवणे अपेक्षित आहे. ध्यानात चित्ताची ध्येय वस्तूशी तन्मयता झाल्याने एकाच एक प्रत्ययाचे चित्तात अखंड स्फुरण होते. ध्यानावस्थेची जाणीवही त्याचबरोबर असते. चित्ताची बाहेर जाणारी धाव अडवण्यासाठी चित्ताकडे साक्षित्वाने पाहणे गरजेचे आहे. प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहायचे नाही, तर डोळे मिटून शांत बसून समजून घ्यायचे. विचार उठतो आहे, आता त्याला प्रतिसाद द्यायचा नाही, त्याच्या पाठोपाठ फिरायचे नाही, त्याचा पाठलाग करायचा नाही. फक्त एवढेच लक्षात घ्यायचे की, हा विचार आहे आणि तो सोडून दिला पाहिजे. असे केले तर विचार कमी होतात. दोन विचारांमधील अंतर लक्षात येते. हे अंतर अती दीर्घ होते, तेव्हा मनाचे अमन होते. अशा वेळी ज्या आत्मतत्त्वापासून मन उद्भवले, त्या आत्मतत्त्वापाशी साधक जाऊन पोचतो जेथून चित्त सुरू होते तेथपर्यंत ते येते.

ज्या ठिकाणी चित्त निर्माण झाले, त्याच ठिकाणी जर ते थांबेल तर ते परमात्मस्वरूप होते आणि साधकाला आत्मबोध होतो. हा बोध इंद्रियांमुळे होत नाही, मनामुळे होत नाही, बुद्धीमुळे होत नाही तर सर्व इंद्रिये, मन, बुद्धीचे तर्क थांबल्यावर उर्वरित 'केवळ मी'सह त्याला शुद्ध स्वरूपाचा बोध होतो. हा आपलाच बोध आहे, आपलाच आनंद आहे. फक्त आपण मिळविण्याचा प्रश्न आहे.

आपल्या अंतर्यामी जे आहे, तेच मिळवायचे आहे. त्यासाठी ध्यानसाधना आहे. सकाळची प्रसन्न, शांत, स्तब्ध वेळ ध्यानासाठी अतिशय योग्य आहे, असे स्वामी माधवनाथ म्हणायचे. कारण, निसर्गदेखील या वेळेत ध्यानासाठी आपल्याला साहाय्यभूत असतो. निश्चयाने बसावे, की आजच मिळवेन, पुढचा क्षण नाहीच आहे. आहे ते आताच, या क्षणाला! मनाला आजच थांबवेन, मनाला उठू देणार नाही, मन उठलेच तर त्याकडे साक्षित्वाने पाहीन, अशी भूमिका ठेवून बसावे. मनाचे अमन झाल्यावर कालांतराने साक्षीभावही गळून पडतो. वृत्ती नाही, विचार नाही; त्यामुळे त्याच्या सापेक्ष असणारा साक्षी अथवा द्रष्टाही नाही. त्यावेळेस द्रष्ट्याला स्वरूपबोध प्राप्त होतो. अशी स्वरूपस्थिती प्राप्त करून घेण्याचा ध्यान हा प्रशस्त मार्ग आहे. ध्यानामध्ये देहमन बुद्धीचा निरास झाल्यावर उरलेल्या 'शुद्ध मी'ला स्वरूपबोध प्राप्त होतो. एक क्षण जरी ईश्वराचे मन:पूर्वक ध्यान केले, तरी परमेश्वराचे स्वरूप प्रतीत होते. अंतर्निष्ठ ध्यान कळले पाहिजे. अंत:करणात सर्वोत्तमाचे ध्यान लागलेले असावे. ईश्वराचे ध्यान हेच खरे ध्यान होय.

अध्यात्मभावनेनेच मंत्रयोगातील ध्यानाची प्रगटता झाली आहे. आपापल्या इष्ट देवाच्या रूपाला मनाने जाणणे ह्यास **'ध्यान'** म्हणतात. ध्यानच मनुष्याच्या बंधनाला व मोक्षाला कारण आहे. जसजसा मनुष्य आत्मसाध्य करील, तसतशी त्याला समाधीची प्राप्ती होईल. आत्मा केवळ ध्यानाच्याचद्वारा वशीभूत होतो. ह्या प्रकारे करून ज्या मनुष्याचे मन जेथे प्रसक्त होते, तेथे त्याला समाधी प्राप्त होते. नदीचे पाणी ज्याप्रमाणे समुद्रात गेले असता समुद्रजलाशी अभिन्न होऊन जाते, त्याप्रमाणेच मनुष्याचा आत्मा ध्यानाच्या परिणामाने 'तद्भाव' प्राप्त करून घेऊन परमात्म्याशी अभिन्न होऊन जातो. योगसिद्धीनंतर जपसिद्धीबरोबरच ध्यानसिद्धी होते व ध्यानसिद्धीने समाधी प्राप्त होते.

मंत्रोच्चार आणि नामाने नामीचे अनुसंधान या बाबी ध्यानाशी घनिष्ट संबंधित आहेत. म्हणून यांचा समावेश ध्यान–प्रक्रियेत केल्यास काहीच वावगे नाही. जपाचे म्हणजे मंत्रोच्चाराचे सहा प्रकार सांगितले जातात. ते असे – (१) वाचिक जप, (२) उपांशु जप, (३) ध्वान जप, (४) मानस जप, (५) मंत्रध्यान जप आणि (६) अनन्य जप. यापैकी मानस जपात सामर्थ्य क्रियाकारी चैतन्यशक्ती भरावी म्हणून 'ध्यान' जपाची आवश्यकता लागते. नामस्मरित ईश्वर आणि जापक भिन्न नसून एकच आहेत असे एकास 'ध्यान' करू लागणे याला 'अनन्यजप' म्हणतात.

उपरोक्त मंत्रोच्चार प्रकारांत वाचिक, उपांशु, ध्यान व मानस हे फक्त उच्चारच होतात. उच्चार हे वाचेचे कार्य व स्मरण हे मनाचे कार्य होय. वाचेपेक्षा मानसतत्त्व श्रेष्ठ आहे, म्हणून मानस जप हा पूर्ववर्ती तीन जपांपेक्षा सहस्रपटीने योग्य आहे आणि हेच मंत्रयोगामध्ये अभिप्रेत आहे. नुसत्या शब्दांच्या उच्चारापेक्षा त्याच्या अर्थाची भावनाच श्रेष्ठ आहे. अर्थभावना तयार करण्याकरताच शब्दांची योजना असते. ही अर्थभावना मनात अथवा बुद्धीत भरून घेऊनच मंत्राचा जप करणे अत्यंत श्रेष्ठ आहे.

'गाय' हा शब्द म्हणजे **'नाम'** व त्याने बोधित होणारी वस्तू जी गाय ती **'नामी'** होय. नामाने नामी डोळ्यापुढे उभा राहणे याचे नाव **नामस्मरण** होय. यालाच नामाने **नामीचे अनुसंधान** म्हणतात. उत्तम, मध्यम, मंद व अतिमंद अधिकाऱ्यांकरता – नामीच्या अनुसंधानाचे चार प्रकार पुढे सांगितले आहेत. त्याचा मुमुक्षूंनी व साधकांनी मनाशी चांगला विचार करून आपल्यास सुलभ वाटेल ती धारणा धरावी व नामजप करू लागावे.

१) निर्गुणध्यान,

२) सगुणध्यान (यात मूर्तिचिंतन, लीला चिंतन, गुणचिंतन, वाक्यचिंतन व विक्षेपनिरसन असे भेद आहेत),

३) नामनामी – अभेदा चिंतन, आणि

४) नामध्वनीचे अनुसंधान

असे ते चार प्रकार होत. त्यांचे –

**१) निर्गुणध्यान** – निर्गुणध्यान म्हणजे अंत:करणाधिष्ठान चैतन्य व ब्रह्मांडाधिष्ठान चैतन्य यांचे ऐक्यचिंतन. 'यो बुद्धेः परतस्तु सः' किंवा 'धियो यो नः प्रचोदयात्' यातील तात्पर्य हेच. 'स्वस्वरूपानुसंधान' किंवा 'प्रत्यागात्मानुसंधान' यालाच म्हणतात. हे ऐक्यचिंतन म्हणजे घटाकाशमठाकाश ऐक्याप्रमाणे समजावे. गंगासागरवत किंवा कीरभृंगऐक्यवत ऐक्य नव्हे. अनंत ब्रह्मांडाला व्यापून असणारे जे चैतन्य ते व त्याच्याच जो भाग आपल्या शरीरातही आहे तो, दोन्ही एकरूप आहेत. हे चिंतन–हे अनुसंधान–यालाच 'सोऽहं' चे 'अहं ब्रह्मास्मि' वृत्तीचे चिंतन म्हणतात, ते चालवावे. अगदी प्राकृत भाषेत (सोपे करून) सांगावयाचे म्हणजे – देह मी नव्हे, इंद्रिये मी नव्हे, प्राण, मन, बुद्धी, चित्त, अहंकार इत्यादी मी नव्हे. या सर्वांचा साक्षी म्हणजे या सर्वांस प्रकाशित करणारे जे चैतन्य ते मी. याप्रमाणे नामोच्चारणाबरोबर चैतन्याचे अनुसंधान करणे, याला निर्गुणध्यान म्हणतात. हाच तात्काळ झेप घालून फळ मिळवून देणारा 'विहंगम' मार्ग होय. तात्पर्य, नाम उच्चारल्याबरोबर एकदम वृत्ती आत्माकार–ब्रह्माकार झाली पाहिजे. एवढी धारणा धरवत नसेल त्याने सगुण ध्यान करावे.

**२) सगुणध्यान** – जितके म्हणून अवतार आहेत ते सर्व एका परमात्म्याचे आहेत. तो एकाच नामाने बांधलेला नाही. त्याला सहस्र नामे आहेत. त्यांपैकीच 'राम' हे एक आहे, असे जाणून, म्हणजे राम हे नाम कृष्णाचेच समजून रामनामाने कृष्णाचे ध्यान करण्यास हरकत नाही. प्रथम थोडे दिवस हे जड जाईल, पण तसा अभ्यास चालविला म्हणजे भेदवृत्ती मावळून त्या नामाची व त्या रूपाची सांगड पडते. श्रीतुकाराममहाराजांना स्वप्नात गुरूकडून 'रामकृष्णहरि' हा मंत्र मिळाला. (स्वप्नात गुरूकडून मंत्रोपदेश होतो याबद्दल उपनिषदात व योगवासिष्ठातही प्रमाणे सापडतात. स्वप्नामध्ये जीव 'तैजस' स्वरूप असतो व महात्मे आणि देवता त्यांची शरीरे तैजसरूप असतात; म्हणून जीवाला बहुधा स्वप्नरूप विशिष्ट अवस्थेमध्येच देवांची दर्शने होतात.)

'रामकृष्णहरि' मंत्राने श्रीतुकाराममहाराज श्रीविठ्ठलाची उपासना करीत होते, हे प्रसिद्धच आहे. या मंत्राचा जप त्यांनी रात्रंदिवस अगदी तीव्रसंवेगाने चालवला. नामयोगाचा खडतर अभ्यास त्यांनी चालवला असता पंधरा दिवसात त्यांना निर्गुण साक्षात्कार झाला.

*पंधरा दिवसांमाजी साक्षात्कार झाला। विठोबा सावळा निराकार।।*

असे ते स्वत: सांगतात. (निराकार विठोबाचे दर्शन म्हणजे सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव.) तुकोबारायांच्या या गोष्टीवरून साधकांनी हे एक तत्त्वही लक्षात घ्यावे की, तीव्र संवेगानेच त्वरित सिद्धी प्राप्त होते.

'रामकृष्णहरि' मंत्राने कोणी श्रीकृष्ण, श्रीराम, श्रीदत्त, इत्यादी मूर्तींचीही उपासना करतात. कोणी निर्गुण उपासनेचे अधिकारी ह्याच मंत्राने, जाग्रत-स्वप्न-सुषुप्ती ह्या अवस्थात्रयाच्या साक्षीने म्हणजे बुद्धिसाक्षिचैतन्याचे अनुचिंतन चालवतात- चैतन्याकडे वृत्ती फिरवून तदाकारतेचा अभ्यास करतात. 'रामकृष्णहरि' या मंत्राने कोणी प्रणवाची (ॐकाराची)ही उपासना करतात. राम, कृष्ण, हरि हे तीन शब्द अकार, उकार व मकार या अर्थी घेतात. 'रामकृष्णहरि' या मंत्राने कोणी भूर्-भुवर्-स्वर् ह्या त्रिलोकीचे अधिष्ठान चिंतनपूर्वक ध्यान करून चित्ताची व्यापकता वाढवतात. कोणी 'राम-कृष्ण-हरि' या मंत्रानेच 'अहं-ब्रह्म-अस्मि', 'तत्-त्वम्-असि', 'अयं-आत्मा-ब्रह्म' इत्यादी महावाक्यांच्या अर्थाचे अनुसंधान करतात. तात्पर्य, साधकांनी आपल्या बुद्धीच्या मगदुराप्रमाणे-चित्ताच्या व बुद्धीच्या आकलन शक्तीप्रमाणे- ध्यान करून नाममंत्राचा अखंड जप करावा. म्हणजे सिद्धी ही ठेवलेलीच, त्यात संशय धरू नये.

याप्रमाणे धारणा करणे कठीण वाटल्यास नामस्मरण करीत असता उपास्य देवतेच्या 'लीलांचे चिंतन' करावे. रामविजय, हरीविजय, दत्तप्रबोध, गुरूचरित्र इत्यादी ग्रंथांतून आपण ज्या अवतारलीला ऐकल्या किंवा वाचल्या आहेत त्यांचे चिंतन चालवावे, तसेच प्रभूच्या भक्तवात्सल्यादि परम कल्याण-'गुणांचे चिंतन' सद्‌गदित अंत:करणाने करावे. संस्कृतज्ञेतरांनी संतांच्या मराठी वाक्यांचे - उदाहरणार्थ

*म्हणौनि जग परौतें। सारूनि पाहिजे माते।*
*तैसा नाहे उखितें। आघवें मीचि।।*

अशी स्वरूपप्रतिपादक, अथवा

*प्रेमसुख देईं प्रेमसुख देईं। प्रेमेंवीण नाही समाधान।।*

अशी करुणापर (प्रार्थनात्मक) वचने निवडून त्यांचे नामस्मरणाबरोबर चिंतन चालवावे. 'भामती'कारांनी म्हटल्याप्रमाणे ही 'शाब्दज्ञानसंततिरूपा उपासना' होय.

आता विक्षेपनिरसनासंबंधाने सांगावयाचे झाल्यास, मन अनावर होऊन बुद्धीला अतिशय त्रास वाटू लागेल, तर त्या सत्साधकाने श्वासावर लक्ष ठेवून नामस्मरण चालवावे. शालिग्रामावर विष्णुभावना करतात तसे श्वासवायुवर भगवद्‌भावना करावी. श्रीसमर्थ रामदासप्रणीत दासबोधामधील अजपाजप उपासना व वरील उपासना जवळजवळ एकच आहेत.

**३) नामनामी अभेद चिंतन :** नामस्मरणाबरोबर सगुणध्यानाचा प्रकारही बुद्धीला जड वाटेल त्याने 'नामनामी अभेदाचिंतन' करून नामस्मरण चालवावे. नाम हेच नामी म्हणजे परमात्मा आहे, अशी कल्पना (भावना) करावी. खालील वचनांचा विचार करावा.

*''नाम आणि मुरारि। दोन नसती।।'' - वामन पंडित*
*''---- तुका म्हणे नाम। चैतन्य-निजधाम।।----''*
*''क्षण एक पुरे हो भक्तध्यानाला। जपरूपचि श्रीराम सगळा।*
*भिन्न न भाविजे देव-दासांला। आत्मारामचि मंत्रमंत्रार्थु।।''*

(श्रीरामदासपंथ क्रम सार, समास-७)

हरिनामे ही हरिरूप आहेत अशा धारणेने नामस्मरण चालवावे. ही धारणा सर्वकाळ राहाणे शक्य नाही, तरी प्रतिदिवशी तास-अर्धातास अथवा काही माळा होईपर्यंत एकांतात बसून या धारणेने नामस्मरण करावे व भगवंताच्या सान्निध्यसुखात रमावे. (बाकीच्या वेळी सदोदित नुसता वाचिक जप चालला तरी पुरे.) याप्रमाणे-

१) नामाने नामीच्या निर्गुण स्वरूपाचे (कूटस्थ साक्षीचैतन्याचे) ध्यान (चिंतन), ते होत नसल्यास -

२) सगुणरूपाचे ध्यान (मूर्तिचिंतन, लीलाचिंतन, गुणचिंतन वगैरेसह), व हे साधत नसल्यास -

३) 'नामचि नामी' असे ध्यान चालवावे- म्हणजेच नाम हेच नामी म्हणजे परमात्मा आहे अशी कल्पना (भावना) करावी. व हे ही घडत नसल्यास म्हणजे अगदी मंद अधिकाऱ्याने -

४) नामध्वनीवरच लक्ष ठेवून नामस्मरण चालवावे. वाल्मिकीला नामीच्या स्वरूपाची कल्पना नसताना त्याने नामस्मरण केले व तेही उलट्या प्रकारे! पण त्यास केवढी सिद्धी प्राप्त झाली हे सर्वांस माहीत आहेच. तात्पर्य, नामाची ही वस्तूशक्ती म्हणजे स्वभावसामर्थ्य होय. नामाची शक्ती अचिंत्य आहे. 'नामाची शक्ती रामालाही माहीत नाही. रामाने एका अयोध्येचाच उद्धार केला, पण त्याच्या नामाने त्रैलोक्याचा उद्धार केला व करीत आहे.' असे श्रीतुलसीदास म्हणतात. असे हे प्रभूचे मंगल नाम सर्वकाळ, सर्व कार्यात अखंड उच्चारीत असावे. त्वरित सिद्धी पाहिजे असेल त्यांनी हे वैखरीचे नामानुष्ठान करावे. तात्पर्य, कशाही तऱ्हेने असो, अंतःकरणपूर्वक नामस्मरण करावे.

**४) नामध्वनीचे अनुसंधान** - मुख्यतः ध्यानरहित जपापेक्षा ध्यानयुक्त जपच श्रेष्ठ असे जाणून, तसे करण्याचा प्रयत्न करावा; परंतु हे नेहमी साधणे कठीण; याकरता जपाने वाणीस श्रम झालेसे वाटले की, मनाने फक्त ध्यान करावे व ध्यानाने मन श्रमी झालेले वाटले की, वाणीने जपास सुरुवात करावी. याप्रमाणे जप व ध्यानाने युक्त झालेल्या साधकाचा योग लवकर सिद्ध होतो.

'नामनामी-अभेद बुद्धीने' नामस्मरण अथवा 'नामध्वनीवर लक्ष ठेवून' नामस्मरण करणे हे कोणासही सुलभच जाईल अशी आशा आहे. 'एका हाती क्रिया व दुसऱ्या हाती फल' अशाप्रकारचा हा 'मोठा यज्ञ' करून 'साक्षात्कार' मिळवावा. कल्याणेच्छूंनी आळस करू नये; पण पुष्कळसे करून काही प्रत्यय आला नाही म्हणून घाबरूनही जाऊ नये व चिकाटी सोडू नये. सर्व सुखाचा सागर, निरतिशय आनंदाचा व ज्ञानाचा आणि निरतिशय शाश्वत शांतीचा महोदधि परमात्मा जवळच म्हणजे आपल्या हृदयातच आहे याची जाणीव ठेवावी.

सारांश, हिंसादिदोषरहित, तसेच विधिनिषेध, सोवळे-ओवळे, काल-अकाल इत्यादींचा निर्बंध नसणारे, महापापांचा नाश करून सर्व इष्टार्थ देऊ शकणारे असे मृत्युलोकात कामधेनू, कल्पतरू अथवा चिंतामणी जर काही असेल तर ते भगवन्नामच आहे हे निःसंशय समजावे व तत्परायण व्हावे.

(* रामचंद्र कृष्ण कामत, 'नामचिंतामणी', पृ. ४३४-५१)

## २) वैखरीची नामानुष्ठान पद्धत

त्वरित सिद्धी पाहिजे असेल त्यांनी वैखरीचे नामानुष्ठान कसे करावे, याबद्दल श्रीजठारकृत 'स्वानंदसाम्राज्य' ग्रंथात जे सांगितले आहे, ते अगदी अनुभवाचे व फारच महत्त्वाचे असल्यामुळे ते सत्साधकांकरता पुढे दिले आहे -

''भगवन्नामश्रवण, कीर्तन, भजन व जप यांमध्ये सर्व वर्णांचा, किंबहुना मनुष्यमात्राचा अधिकार असून वेळी-अवेळी, शुचि-अशुचि काळी, कार्याकार्यांत, हवा तेव्हा उच्चार चालविला तरी तो कल्याणकारक व पुण्यजनक आहे, परंतु सद्यः सिद्धीचा अनुभव आणि प्रतिदिवशी आपली उन्नती होत आहे की नाही अथवा कालच्यापेक्षा अंत:करणाची स्थिती आज किती बदलली आहे, अशाप्रकारची प्रत्यक्ष प्रतीती घेण्याची ज्या मुमुक्षूची उत्कट इच्छा असेल, त्यानेतर वाणी, श्रोत्र व बुद्धीची अविरल धारा, हीच चालविली पाहिजेत (-'एकांतस्थळी सुखासनी बसून, हातात माला धारण करून, मुखाने भगवन्नामाचा (ध्वनियुक्त) उच्चार करावा व मालेने जपसंख्या धरावी. नामाचा ध्वनी आपल्या कर्णगोचर होईल (म्हणजे समीप कोणी बसल्यास त्याला ऐकू जाईल) इतकाच उंच व स्पष्ट असावा. जपकाळी नेत्रमीलन करावे किंवा भगवत्प्रतिमा समोर असावी. नेत्र, कर्ण, जपमाला आणि शब्दोच्चार या सर्वांची अविरल संघाताने धारा चालली पाहिजे. ..... बुद्धीचे व्यापार बंद होण्याकरता, शब्दधारेत श्रवणाची धारा कडक निग्रहाने गुंतवून साधकाने खबरदार राहिले पाहिजे.') तेव्हाच साक्ष पटेल. भाविक मुमुक्षूस अनुभूती पटणे ही काही मोठी गोष्ट नव्हे; पण नाही. अभाविक, नास्तिक, पाखंडी, धर्मभ्रष्ट कसाही मनुष्य असो - प्रतिज्ञेने सांगतो की, नेत्र मिटून श्रवण, वाणी व बुद्धी अशा तिघांच्या अविरल अखंड धारेने नित्य तीन घटिका (७२ मिनिटे) असे एक मंडळ (म्हणजे चाळीस दिवस) साधन करून अनुभव पाहावा. आरंभ केल्याच्या सातव्या दिवसापासून मनोधर्माच्या लहरी पालटण्यास आरंभ होऊन, मंडळ समाप्तीस सर्व लक्षणे अगदी पालटून अंत:करणात मध्यरात्री काळोखाच्याजागी मध्यान्हप्रकाश होईल! ज्या कोणास अनुभव पाहणे असेल त्याने आसन घालून बसावे. एका हाती क्रिया व दुसऱ्या हाती फलसिद्धी घ्यावी. भगवन्नामाची, साधनाची व साधकांची कुत्सितबुद्धीने कोणी व्यर्थ निंदा करून आपल्या दुष्कृत्य संचयात अधिकाधिक भर घालून अधोगतीस जाऊ नये.'' यापेक्षा जास्त काय सांगावे?''

या गोष्टी बोलण्याच्या नव्हेत, करण्याच्या आहेत. 'नामसंकीर्तन' म्हणजे मोठ्याने नामघोष करणे. उच्च स्वराने व अट्टाहासाने नामस्मरण करावे, म्हणजे श्रीहरी लवकर धावून येईल असेही संतांनी सांगितले आहे. खूप जोराने नामघोष करून प्रभूला आळवावे. देवालयातील सामुदायिक नामसप्ताहाचा हेतू हाच आहे. सर्वांबरोबर ओरडून मनापासून नामघोष चालवत असता अंत:करणात प्रेमानंदाचा उद्भव होतो.

**३) श्वासांत नामस्मरण व श्वासातील नामजपाचे प्रकार**

**क) श्वासात नामस्मरण -** दुसऱ्यासही ऐकू जाईल असा वर्णोच्चार स्पष्ट करून नाम जपण्याचा अभ्यास आरंभी पुष्कळसा झाला म्हणजे ओठ झाकून तोंडात जीभ हलवीत जप करू लागावे. हा अभ्यास बरेच दिवस करून मग जिभेचीही हालचाल बंद करून फक्त मनाने जप करू लागावे. प्रत्येक श्वासाबरोबर जप चालावा.

*नका धरूं कांहीं आस। राम जपा श्वासोश्वास।।*
*नाम श्वासोश्वासीं वसे। तेथे ब्रह्म उभे असे।। ------*
*ब्रह्मा विष्णु महेश। नामीं लक्ष्य श्वासोश्वास।।*

- श्रीब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर

या अभ्यासाने दिव्य प्रकाशदर्शन तसेच अनाहत नादाचे श्रवण घडते. लययोगात 'नादानुसंधान' श्रेष्ठ मानले आहे. नामस्मरणाने तेच साधते. खालच्या सूचनाही लक्षात घ्याव्यात -

*मनही मनमें जाप करि, दर्पण उज्ज्वल होय।*
*दर्शन होवै राम का, तिमिर जाल सब खोय।।*
*श्वासा लेवै नामबिना, सो जीवन धिक्कार।*
*श्वासश्वासमें राम जप, यही धारणा धार।।*
*'होठ कंठ जाले नहि, जिभ्या रटै ना नाम।*
*राम हमारा जप करै, हम बैठे आराम।।* .....

हा श्वासांतील जप तालबद्ध करावा. जपाची गती (वेग) एकसारखी ठेवावी, कमी जास्ती करू नये. याचा अर्थ – श्वास आत घेताना जितके मणि ओढले होते, तितकेच मणि बाहेर सोडतानाही ओढावे. या योगाने श्वासही तालबद्ध होतो. (हा आरोग्यासही चांगला.)

**ख) श्वासातील नामजपाचे प्रकार –** सूक्ष्मबुद्धी पुरुषांना श्वासातील नाम–स्मरणापासून आनंद होईल.

(१) ओठ झाकून जिभेच्या अत्यंत अल्प चालनाने 'ध्वान' नामक जप चालवत असता श्वासांच्या गतीवर लक्ष ठेवणे हा एक प्रकार. ओठांमधून शब्दोच्चाराचा वायू फुसफुसण्याप्रमाणे बाहेर निघताना, ओठ उघडे ठेवून अगर झाकून फक्त जीभ हलवून जो शब्दोच्चार केला जातो, त्यास म्हणजे नादरहित ध्वनीस 'ध्वान' असे म्हणतात.

(२) दुसरा प्रकार म्हणजे श्वासामध्ये 'मानस' जप करणे. श्वासावर लक्ष राखून मनानेच नाममंत्रातील अक्षरांचा स्पष्ट उच्चार करणे.

(३) तिसरा प्रकार श्वासाच्या आतबाहेर जाण्यायेण्याने जो सूक्ष्म ध्वनी होतो, तो ध्वनीच आपला नाममंत्र आहे अशी भावना (कल्पना) करणे. आपल्या श्वासावर व नाममंत्रावर तन्मयता असावी. अभ्यासाने ही साधते. (श्वास व उच्छ्वास यावर धरितां 'सो' व सोडितां 'हं' याप्रमाणे 'सोऽहं' शब्दाची भावना प्रसिद्धच आहे.) यासंबंधी सूफ़ी पद्धतीमध्येसुद्धा विलक्षण साम्य आढळते. सुप्रसिद्ध सूफ़ी साधक व आचार्य शेख नज्मुद्दीन कुब्रा यांनी आपले 'रिसाला क़वातिहुल जमाल' या ग्रंथामध्ये असे नमूद केले आहे की, मानवां (प्राण्यां)च्या प्राणांमध्ये निरंतर नामस्मरण चाललेला असतो, कारण श्वास घेणे आणि सोडण्याच्या वेळेस वर्णाक्षर 'ह' चा ध्वनि अनायास निघतो. तो संकेत परमेश्वराच्या परोक्ष तदत्त्वतेकडे असतो. हेच वर्णाक्षर 'ह' अल्लाह या नामामध्ये अनुस्यूत आहे. म्हणून ज्ञानी मुमुक्षूने या वर्णाक्षराच्या उच्चारणाच्या वेळेस सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या सत्तेच्या तत्त्वाचा आदर राखला पाहिजे; की जेणेकरून अल्लाहशी सामिप्यामध्ये त्रुटी निर्माण होऊ नये. अशाप्रकारे मानवाकडून निरंतर नामस्मरण आपोआप चाललेले असते. याची जाण मनुष्याने ठेवून सदैव प्रभुनामस्मरणात मग्न असले पाहिजे.

(४) याशिवाय चौथा प्रकार म्हणजे वायूवर भगवद्भावना करून ध्वान अथवा मानसजप करणे. सारांश, व्यायामपटू मनुष्य आपल्या शरीराचे स्नायू कमावतो, त्याचप्रमाणे साधकाने आपली भावना अथवा वृत्ती कमावली पाहिजे. सगळे आपल्या वृत्तीच्या अभ्यासावर अवलंबून आहे.

### ४) नामोच्चारण व नामस्मरण

नाम सर्वांसाठी तारक आहे. नामास कर्मसादगुण्य नाही; श्रद्धेवाचूनही नाम फलते; कारण ती त्याची वस्तुशक्ती आहे. नाम कसल्याही अशुचिकाली बिलकुल हरकत नाही. ज्ञान्यालाही ज्ञानपरिकार्य नामस्मरणाची आवश्यकता आहे; मग अज्ञान्याची काय कथा? गुरूपदेशाशिवायही नामस्मरण केल्यास ते व्यर्थ जात नाही, त्यायोगे भगवत् प्रसाद व सद्गुरू लाभ होतो.

*"नाम ब्रह्म नाम ब्रह्म । येणें पुरती सकळ काम ।।"*

(भगन्नामे ही भगवंताचे ध्वनिरूप अवतार, अर्थात नाम व नामी एक आहेत.)

भगवंताचा महिमा व गुण जसे अनंत, तसा त्याच्या नामाचा महिमा व गुणही अनंतच आहेत. वेद व शेषरुद्रादिकही ते वर्णू शकणार नाहीत. फार काय, प्रत्यक्ष भगवानही आपल्या नामाचा महिमा जाणू शकत नाही.

*"तुझ्या नामाचा महिमा । तुज न कळे मेघश्यामा ।।"* – तुकाराम

तेथे आपल्यासारख्या पामराचा काय पाड? तथापि 'तुझिया सत्तेने तुझे गुण गाऊ' या संतवचनाप्रमाणे, त्या प्रभूच्या सत्तेचा आश्रय करून ही नामसेवा चालविली पाहिजे.

'नाम' हे रूपाचे निदर्शक आहे; म्हणून नाम उच्चारल्याबरोबर डोळ्यांपुढे (अंतश्चक्षूंपुढे) नामाचे 'रूप' उभे राहिले पाहिजे. 'आंबा' म्हटल्याबरोबर डोळ्यांपुढे आंबा राहतो, बेडूक राहत नाही व 'बेडूक' म्हटल्याबरोबर बेडूक दिसतो, भोपळा दिसत नाही व 'भोपळा' म्हटल्याबरोबर 'मोटार' काही भासत नाही. तात्पर्य, ज्याचे नाम घ्यावे त्याचे रूप दिसावे (लक्षात यावे) तरच ते 'नामस्मरण', नसल्यास 'नामोच्चारण' होईल.

*"नाम घेता हे वैखरी । चित्त धावे विषयावरी ।।*
*कैसें होता हे स्मरण । स्मरणामाजी विस्मरण ।।*
*नामरूपां नाहीं मेळ । अवघा वाचेचा गोंधळ ।।"*

असे होऊन काय उपयोग आहे? तर

*"नवल स्मरणाची ठेव । स्मरणामाजी प्रगटे देव ।।*
*एका जनार्दनी नाम । नामीं प्रगटे आत्माराम ।।"*

असे झाले पाहिजे.

आपण परमात्म्यापासून प्रक्रिया होऊन निर्माण झालो आहोत, त्यामुळे त्याची आठवण सतत करणे याहून कृतज्ञतेचे दुसरे कार्य नाही. मन:शांती मिळविण्याचा एकमेव आणि सोपा मार्ग म्हणजे नामस्मरण. नामस्मरण करताना आपल्या मनात फक्त परमात्मा असतो, त्यामुळे चित्त स्थिर असते. कोणतेही वाईट किंवा प्रतिकूल विचार मनात नसतात. आपण परमानंदाच्या अवस्थेत जाऊन पोहोचतो. आपण हाताने काम करत असतो तेव्हा मन व बुद्धी आपल्या प्रभूकडे असते. थोडक्यात, नामस्मरण म्हणजे शांतीचा निर्मळ झरा!

वाचेने नाम व मनाने स्मरण चालले पाहिजे. स्मरण म्हणजे वाच्य वस्तूचे ध्यान. असे झाले तरच फलसिद्धी त्वरित घडेल. हेच नामस्मरणाचे तत्त्व आहे. आता नामाबरोबर नामीचे ध्यान घडले नाही तर ते अगदीच व्यर्थ जाते असे समजू नये.

*"नसे तरी मनीं नसो । परी वाचे तरी वसो ।।"*

असे श्री तुकाराम महाराज म्हणतात, पण ही कनिष्ठ पायरी आहे, हे ध्यानात ठेवावे; कारण तेच दुसऱ्या एका अभंगात सांगतात –

*"नाम उच्चारिता कंठी । पुढे उभा जगजेठी ।।*
*ऐसे धरूनिया ध्यान । मने करावे चिंतन ।।"* इत्यादी.

याचे कारण असे की, 'अधिकारि भेदाच्छास्त्रभेद:' या वचनाप्रमाणे अधिकारभेदानुसार म्हणजे उपदेशभेद असतो. तेव्हा नामीच्या ध्यानासहित नामाचे स्मरण चालले म्हणजे त्वरित व अधिक फलदायक होते हे निश्चयाने जाणावे व तसे करण्याचा प्रयत्न करावा. जागृतीत नामस्मरण इतके झाले पाहिजे की, स्वप्नात देखील त्याचा ठसा उमटला पाहिजे. स्वप्नात नामस्मरण चालू लागले म्हणजे मग 'नको जपमाळा कांही' (–एकनाथ) या वचनाप्रमाणे जपमाळेची व संख्येची गरज नाही. 'सर्वकाळ' – 'अखंड' नामप्रवाह सुरू होण्यासाठी जपमाळा व संख्या यांचा फार उपयोग होतो. अखंडता लागल्यानंतर मग त्यांची गरज नाही. मुख्य तात्पर्य अखंडतेचे आहे. ईश्वर स्मरण मन:पूत वंदनाने मन:शुद्धी होते, तर उष:पानाने अंत:शुद्धी होते.

**नामोच्चारणाचे प्रकार –** नामस्मरण म्हणजे नामाने नामीचे अनुसंधान करणे; ते कसे करावे याची माहिती असली पाहिजे. नामोच्चारणेच्या धारेला जप अशी संज्ञा आहे. शास्त्रात या जपाचे प्रकार वाचिक, उपांशु व मानस असे तीन सांगितले आहेत, त्यांची फळेही निरनिराळी आहेत.

**१) वाचिक जप –** साधारण आपण व्यवहारात बोलतो तितक्या मोठ्या म्हणजे लोकांस ऐकू जाईल अशा स्वराने जो जप केला जातो, त्यास 'वाचिक' म्हणतात. त्याचे फळ – इहलोकाची सुखप्राप्ती.

**२) उपांशु जप –** उपांशु जप म्हणजे आपला शब्द आपल्याच कानात पडेल इतका हळू उच्चारावयाचा. याचे फळ – स्वर्गप्राप्ती.

**३) मानस जप –** मानस जप म्हणजे ओठ किंवा जीभही न हलविता फक्त मनानेच शब्दोच्चार करणे. या जपाचे फळ – मोक्षप्राप्ती.

तसेच वाचिक जपापेक्षा उपांशु शतपटीने व मानस सहस्रपटीने फलदायक, असे शास्त्रात सांगितले आहे. या जपात कोणी वाचिक, उपांशु, मानस, ध्यान व अनन्य असे पाच प्रकार सांगतात.

### ५) जप

योगशास्त्रात म्हटले आहे – 'मननामुळे त्राण म्हणजे रक्षण करतो, म्हणून त्यास मंत्र असे म्हणतात. जपानेच सिद्धी, जपानेच सिद्धी, जपानेच सिद्धी यात संशय नाही! जपाची पद्धती थोडक्यात अशी – प्रापंचिक विषयांपासून मनाला हटवून मंत्राच्या अर्थाचे मनन करीत करीत व उच्चारणामध्ये फार त्वरा किंवा फार सावकाशपणा न करता मध्यमा वृत्तीने जप करावा. मंत्राचे वारंवार आवर्तन करणे यास 'जप' म्हणतात. हा जप तीन प्रकारचा असतो. मानस, उपांशू व वाचिक. ज्या मंत्राचा ध्वनी जप करणाऱ्यालाही ऐकू येऊ शकत नाही तो 'मानसिक' जप होय; जो जप करणाऱ्याला मात्र ऐकू येतो तो 'उपांशू' होय व जो मंत्र वाणीने उच्चारला जातो व दुसऱ्यालाही ऐकू येतो तो 'वाचिक' जप होय. वाचिक जपापेक्षा उपांशू जप श्रेष्ठ व उपांशू

जपापेक्षा मानस जप श्रेष्ठ होय. याचे आणखी एका ठिकाणी पुढे लिहिल्याप्रमाणे लक्षण सांगितले आहे – 'जप मोठ्याने करू नये. एकांतात, निरलसपणाने, स्वस्थ चित्ताने, मुकाट्याने म्हणजे ओठ झाकून अथवा मनानेच चिंतन करावे. नाना प्रकारच्या स्थूल विधियज्ञांपेक्षा जपयज्ञ दसपटीने श्रेष्ठ आहे. त्यातही उपांशू जप शतपटीने व मानसजप सहस्रपटीने श्रेष्ठ आहे. उपांशू जप म्हणजे दोन्ही ओठ हळूहळू हलवीत, मंत्राचा हलक्या स्वराने म्हणजे दुसऱ्यास ऐकू न जाईल अशा स्वराने ओठातल्या ओठात जप करणे.'

उपासनेमध्ये स्थूलाकडून सूक्ष्माकडेच प्रगती असते. स्तोत्रपाठ, मंत्राचा जप आणि ध्यान यातून अद्वैतभावाकडे साधकाची प्रगती होत असते. जप आणि ध्यानामध्ये साधक आपले मन ईश्वराकडे लावतो.

वाचिक व मानसिक जपाचे लक्षण उघडच आहे. प्रथम वाचिक, नंतर उपांशू व नंतर मानसिक असा हळूहळू अभ्यास करावा.

शीख धर्मामध्ये सुद्धा नाम जपास अत्यंत महत्त्व दिले गेले आहे. त्यांच्या 'श्री गुरूग्रंथ साहिब' या पवित्र ग्रंथामध्ये 'नाम-सुमिरन' अर्थात नामस्मरण वा जपाच्या महत्त्वाविषयी पुढीलप्रमाणे नोंद आढळते –

नामजपाचे तीन भेद आहेत. १) साधारण, २) अजपा आणि ३) लिव (त्यांच्या) गुरूंच्या मतान्वये साधारण जप, ही जपाची प्रारंभिक श्रेणी आहे. उच्च कोटीचे संत याला 'पोपटपंची' असे नाव ठेवत स्थूलतेमुळे व्यर्थ समजतात; परंतु तन-मनाच्या संतापास दूर करण्यासाठी याचे महत्त्व निर्विवाद आहे. या जपामध्ये प्रावीण्य मिळविल्यानंतर अजपा जप सुरू होतो. हा जप श्वास-प्रश्वासाच्या क्रमाने आपोआप चाललेला असतो. त्याला परमेश्वर प्राप्तीचे द्वितीय सोपान मानले जाते. लिव जपामध्ये तन-मन आणि वाणी एकनिष्ठ होऊन जातात. या तिन्हींच्या तादात्म्य भावनेसह जप चालत असतो. यामध्ये मनुष्याचे व्यष्टिगत आंतरिक भाव ब्रह्मांडाच्या समष्टीगत आंतरिक भावामध्ये विलीन होऊन जातो आणि ती मग्नता एवढी प्रगाढ बनते की, त्याचा ना क्रम तुटतो ना क्रिया भंग पावते. यामध्ये साधकाच्या समस्त क्रिया सहजपणे संपन्न होतात. यामध्ये फक्त अनुभूती शिल्लक राहते. म्हणून लिव जपाची चरम सीमा आहे. ('श्री गुरूग्रंथ साहिब' – पृ. १०२४) लाखो – करोडोमध्ये लिव जपाची जापक व्यक्ती एखाद दुसरीच असते. याचे निरूपण एका रूपकाद्वारे गुरूनानकांनी असे केले आहे – शरीरास कागद, मनास दऊत आणि जिव्हेस लेखणी बनवून हरी-गुण-गानाचे सुलेखन करणारा लेखक धन्य आहे, कारण तो हृदयामध्ये सत्य धारण करून निरंतर हे लिव जप करत असतो.

नाम जपाचा प्रमुख उद्देश हाच आहे की, नामाच्या माध्यमाने मनाचा घनिष्ठ संपर्क प्रभूशी असावा. नाम जपाची पूर्णाहुती तर अजपा जपामध्ये होते की जेथे जप केल्याशिवायच जपाची साधना आपोआप चाललेली असते.

### ६) योगसाधना

**१) योग शब्दाची व्याख्या –** भारतीय दर्शनशास्त्रामध्ये योगास निर्विवाद महत्त्व प्रदान करण्यात आले आहे आणि अर्थ, धर्म, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थामध्ये शेवटच्या मोक्ष या पुरुषार्थास प्राप्त करण्याचे हे एक अमोघ साधन म्हणून स्वीकारले गेले आहे. जोपर्यंत साधक हा शरीर, इंद्रिये आणि इंद्रियांचा स्वामी

मन यावर संपूर्ण आधिपत्य प्राप्त करीत नाही तोपर्यंत दु:ख निवृत्ती अथवा मोक्षाची संभावना (शक्यता) व्यर्थ आहे. जीव आणि ब्रह्माचे संपूर्ण मीलन अर्थात विजातीय स्वजातीय आणि स्वगत भेदापासून शून्य बनून जीव आणि ब्रह्म अथवा आत्मा आणि परमात्म्याचे अद्वैत साक्षात्कारच योग आहे. ज्या अवस्थेमध्ये भगवंताची सत्ता, चैतन्य आणि आनंद तत्त्व स्वत: साधकाची वाणी, भावना आणि कार्य व्यापारामध्ये स्फुरित होऊ लागते. त्याच दुर्लभ स्थितीचे नाव आहे 'योग'. योग म्हणजे शरीर, मन व भावना यांच्यात संतुलन साधणे होय.

**२) योगचे विभिन्न अर्थ –** १) आत्म तत्त्वाचे साक्षात्कार अथवा आत्मा परमात्म्याची अद्वैतानुभूतीच योग आहे.

२) देहात्म बुद्धीचा त्याग करून आत्मभावापन्न अथवा विदेह होणे हे योग आहे. योगेनान्ते तनुत्यजाम्।

३) दोन परस्पर विरोधी द्वद्वांपासून (सुख-दु:ख, पाप-पुण्य, शत्रू-मित्र, शीतोष्ण) वर उठून (अलिप्त होऊन) समत्व बुद्धी प्राप्त करण्यास पण योग म्हणतात. जसे – समत्व योग उच्चते. (गीता.)

४) कर्मांच्या बंधनास विच्छिन्न करण्यासाठी त्यांच्या प्रती संपूर्ण तटस्थ भाव धारण करून मुक्तावस्था प्राप्त करण्याच्या उपायास पण योग म्हटले गेले आहे. योग: कर्मसु कौशलम् ।

५) मनाच्या शक्तीची वाढ आणि विकासासाठी आणि आत्मसंयम जनित आध्यात्मिक पूर्णता प्राप्तीसाठी करण्यात येणाऱ्या प्रक्रियेस योग (किंवा राज योग) म्हणतात. महर्षी पतंजली यांच्या मतानुसार चित्तवृत्तींना रोखून स्वरूप – प्रतिष्ठ होणे म्हणजे योग आहे. ''योगश्चित्तवृत्ती निरोध: । तदा द्रष्टु: स्वरूपेऽवस्थानम् ।।'' – पातंजल योगदर्शन ।।२-३।। अर्थात जेव्हा चित्तवृत्तीचे निरोध होऊन जाते त्या वेळेस द्रष्ट्या (आत्म्या)ची आपल्या स्वरूपामध्ये स्थिती होऊन जाते. अर्थात तो कैवल्यावस्थेत पोहोचतो.

६) योगचे सर्वसंमत अर्थ आहे चैतन्याच्या विविध स्तरांचे खुले होणे आणि योगाचे उद्दिष्ट प्राय: आत्म्याच्या विज्ञानमय स्थितीवर पडलेल्या आवरणास हटविणे (सारणे), चित्रास जास्तीत जास्त चिन्मय बनविणे आणि विश्व जीवनाच्या चकाकीत प्राण स्वरूपास आपल्यामध्ये अनुभूती करणे असे असते. शांत जीवनामध्ये अनंत जीवनास भरणे आणि शांत चिन्मय सत्तेस अनंताची वृत्ती, शक्ती आणि ज्ञाप्तीमध्ये मिसळून देणेच आहे.

**३) योगची आवश्यकता –** अंत:करणावर पडलेल्या अनेक पूर्वजन्मांचे संस्कार जनित आवरण सारून ज्ञानाच्या भिन्न-भिन्न स्तरांना उघडण्यासाठी योगची आवश्यकता जरूर ठरते. अंत:करणावरील मळास दूर करण्याचा व्यावहारिक उपाय योग प्रस्तुत करते. इतर दर्शनां (तत्त्वज्ञानां) मध्ये आपल्याला अध्यात्म जगताची सैद्धांतिक चर्चा आढळते; परंतु 'योग दर्शना'मध्ये आपण त्यांनाच व्यावहारिक स्वरूपामध्ये डोळ्यांनी पाहतो. योग परम (आत्म) सत्त्याची प्रत्यक्ष अनुभूती बुद्धी आणि तर्काद्वारे न मानता बुद्धीची संपूर्ण क्रिया बंद झाल्यानंतर मानते (स्वीकार करते). म्हणून योग, साधकासाठी आत्मसाक्षात्काराचे क्रियात्मक उपाय प्रस्तुत करते. वैदिक, अवैदिक (बौद्ध, जैनादी) सर्वच मत आणि दर्शनशास्त्रांनी त्याला एकमताने स्वीकारले आहे. योग मार्गामध्ये मलिन जीवनसत्त्व ईश्वर उपाधिरूप प्रकृष्टसत्त्वाच्या संपर्काने शोधित होते. रज आणि तम गुणरहित होऊन जाते. शेवटी ईश्वरोपाधिरूप शुद्ध सत्त्वासारखे होऊन जाते.

**४. योगची विशेषता** – योग हीच अशी एक विद्या आहे की ज्यामध्ये वादविवादास थारा नाही. हे सर्वसंमत अविरोधी सिद्धान्त आहे की योगच सर्वोत्तम मोक्षोपाय आहे. भवतापतापित जीवांना सर्व संतापहर भगवंतापर्यंत पोहोचविण्यामध्ये योग, भक्ती आणि ज्ञान हे प्रमुख सहायक आहेत. प्राचीन ऋषींच्या प्रातिभ ज्ञानाच्या उत्पत्तीमध्ये योगच प्रधान (मुख्य) कारण होते. (पं. बलदेव उपाध्याय – 'भारतीय दर्शन', पृ. ३४६.) चित्तवृत्तिनिरोधाच्या अभ्यासाने दुःखाची आत्यंतिक निवृत्ती व परमानंदाची प्राप्ती ही मनुष्याच्या पदरी पडते आणि हेच मनुष्य जन्माचे अंतिम ध्येय आहे. मन:शांतीसाठी योग व ध्यानसाधनेचा उत्तम उपयोग होतो, हे आता तर पाश्चात्य तज्ज्ञही कबुली करीत आहेत. योग म्हणजे फक्त योगासने नसून शरीर-मत-आत्मा यांना बळकट करणारे स्वास्थ्य व आध्यात्मिक विज्ञान आहे.

**५. योगमत : तत्त्वज्ञान** – भारतीय तत्त्वज्ञानात योगाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. कारण की बहुतेक सर्वच तत्त्वज्ञांच्या मते तत्त्वज्ञानाने जी परमश्रेष्ठ अशी मुक्ती किंवा मोक्षाची अवस्था प्राप्त होते ती अवस्था प्रत्यक्षात आणण्यासाठी ज्या मार्गाने जावे लागते आणि जी साधना करावी लागते तिचे यथोचित वर्णन योगशास्त्रात करण्यात आले आहे. तत्त्वज्ञानातील अनेक समस्यांच्या बाबतीत एकमेकांशी अगदी विरोधी असणाऱ्या मनात (उदा. न्याय आणि मीमांसा, वेदांत आणि बौद्ध इत्यादी) योगाचे महत्त्व एकमुखाने मान्य करण्यात आले आहे.

योगमत हे आस्तिक, म्हणजे वेदांना प्रमाण मानणारे आहे. त्याचा उगम श्वेताश्वतर उपनिषद, कठोपनिषद इत्यादी श्रुतींमधून झाला असावा व योगमतातील कल्पना प्राचीन काळापासून भारतवर्षात प्रचलित होत्या असे दिसते. उदा. 'योग' हा शब्द अत्यंत प्राचीन अशा वेदवाङ्मयात वापरलेला आढळतो. तेथे त्याचा अर्थ 'जोडणे' असा केलेला आहे. योगाची परंपरा हिरण्यगर्भापासून (म्हणजे सृष्टीच्या आरंभापासून) मानण्याचा प्रघात असला तरी त्यातील तथ्यांची सुसूत्र बांधणी करून त्यांना एकत्र ग्रथित करण्याचे कार्य मात्र त्या मानाने अलीकडील असून ते इसवी सन पूर्व दुसऱ्या शतकात पतंजली मुनींनी 'योगसूत्र' या ग्रंथाच्या रचनेने केले. मोक्षप्राप्तीसाठी आचरण्याचा श्रेष्ठ मार्ग म्हणून योगमतास सर्वांची मान्यता आहे.

योगमतानुसार सृष्टीत जड आणि चेतन अशी दोन मूलतत्त्वे मानलेली आहेत व शिवाय सर्वज्ञ, त्रिकालाबाधित अशा ईश्वराचीही सत्ता मानली आहे. चेतन तत्त्व म्हणजे पुरुष किंवा आत्मा – आत्म्याची अनेकता वास्तविक मानली आहे. प्रत्येक आत्मा स्वतंत्र, नित्य, शुद्ध व दृशीमात्र असतो. जडतत्त्व म्हणजे प्रकृती किंवा प्रधान. ती सत्त्व, रज आणि तम अशी त्रिगुणात्मक असते. प्रकृतीचे अस्तित्व पुरुषासाठीच केवळ असते. प्रकृतीच्या संबंधात पुरुषास द्रष्टा, स्वामी किंवा भोक्ता असे म्हणतात; परंतु तो भोक्ता असला तरी कर्ता मात्र मुळीच नव्हे, कारण कर्तृत्वशक्ती (म्हणजे परिणामशीलता) हा त्रिगुणात्मक सत्तेवर अवलंबित असलेला धर्म आहे. पुरुष निर्गुण असल्यामुळे तो सर्वस्वी अपरिणामी असतो. त्याचे वास्तविक स्वरूप 'केवल' म्हणजे इतर कोणत्याही पदार्थांशी सर्वस्वी असंबंधित असे असते.

**त्रिगुणांच्या चार अवस्था** – प्रकृती पुरुष संयोगजन्य संसाराच्या चार अवस्था योगात मानिल्या आहेत. त्यातील पहिली अवस्था म्हणजे **'अलिंग'**. तीमध्ये त्रिगुण साम्यावस्थेत असतात. सत्त्व, रज आणि

तम हे तीन गुण अनुक्रमे सुख, दु:ख, मोहात्मक असतात. त्यांना अनुक्रमे प्रकाश, क्रिया आणि स्थितीशील म्हटले जाते. ते अनादि व नित्य असून नेहमी एकत्र राहणारे आहेत. मात्र त्यापैकी एकाचा अभिभव होऊन दुसऱ्यांची अधिकता होऊ शकते. त्यामुळे मूळच्या फक्त तीनच गुणातून सृष्टीतील विविधता निर्माण होऊ शकते. पाटांतून दिले जाणारे पाणी एकच असले तरी वेगळाल्या पिकांना ते दिल्याने जशी फळे, फुले, रंग, रस यांची विविधता निर्माण होते तद्वतच हेही आहे. त्रिगुणांची दुसरी अवस्था **'लिंगमात्र'** ही होय. तिलाच 'महतत्त्व' किंवा बुद्धी असे म्हणतात. तीत सत्त्वगुण वर्धित होऊन तमोगुण अभिभूत झालेला असतो. **'अविशेष'** या त्यापुढील अवस्थेत अस्मिता किंवा अहंकार आणि शब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध अशा पाच **तन्मात्रा** अशी एकूण सहातत्त्वे समाविष्ट असतात. त्यापुढील चौथ्या अवस्थेस **'विशेष'** असे नाव असून त्यात पाच ज्ञानेंद्रिये, पाच कर्मेंद्रिये, पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश अशी पाच महाभूते आणि मन अशा एकूणा सोळा तत्त्वांचा समावेशा असतो. ही त्रिगुणांची चार गुणपर्वे होत.

**योगशास्त्रातील परिणामवादानुसार सृष्टीक्रम –** हा सृष्टीक्रम 'परिणामवाद' या सिद्धान्तानुसार चालतो. त्यानुसार कोणत्याही प्रक्रियेत कारण आणि कार्य अशा अवस्था भेदात कार्याचा आविष्कार होतो. स्थूल सृष्टीतील परिणामांचे तीन प्रकार आहेत. त्यांना अनुक्रमे धर्म, लक्षण आणि अवस्था परिणाम म्हणतात. व्यक्तदशेत असताना कोणतीही वस्तू नवी असते, ती पुढे जीर्ण होत जाते, किंवा शरीरास बाल्य, तारुण्य, जरा या अवस्था प्राप्त होतात, त्यांना 'अवस्था परिणाम' म्हणतात. या तीन परिणामांसारखेच चित्ताचे जे परिणाम होतात, त्यांना अनुक्रमे 'निरोध', 'समाधी' आणि 'एकाग्रता परिणाम' म्हणतात. परिणाम पावणे हा गुणाचा स्वभाव असल्याने व सृष्टीतील प्रत्येक पदार्थ त्रिगुणात्मक असल्याने, परिणामक्रम हा सृष्टीत प्रतिक्षण चालू असतो.

या परिणामक्रमातील सर्व अनुभव दु:खमूलक मानले जातात. दु:खांचे तीन प्रकार मानतात. त्यांना अनुक्रमे 'परिणाम दु:ख', 'तापदु:ख' आणि 'संस्कारदु:ख' म्हणतात. अविद्यादि क्लेशांचा नाश झाल्याशिवाय दु:खांचा आत्यंतिक परिहार होऊ शकत नसल्याने, अविद्येचा नाश व विवेकख्यातीचा उदय, यासाठी योगशास्त्र मुख्यत: प्रवृत्त झाले आहे. चित्तांतील क्लेशरूपी मल धुऊन काढून, शुद्ध झालेल्या चित्तातील वृत्तींना उपशांत करून चित्तवृत्ती निरोधरूप अवस्था येणे हेच योगमताचे सार म्हणून सांगता येईल. अशा रीतीने योगमतात मानवाच्या दु:खाचा आत्यंतिक परिहार होऊन त्याला प्राप्त होणाऱ्या चित्तवृत्तीनिरोधरूप कैवल्यावस्थेविषयी करण्यात आलेला विचार बहुतांशी इतर मतांच्या आदरास प्राप्त झाला आहे.

**६) पातंजलयोग सूत्र –** योगाची प्राचीनता नि:संदिग्ध आहे. याचे वैज्ञानिक विश्लेषण भारतीय मनीषींनी मानव कल्याणासाठी अति प्राचीन काळीच केले होते. वैदिक साहित्य – ऋग्वेद संहिता, अथर्ववेद, यजुर्वेद आणि सामवेदमध्ये प्राण विद्येच्या महत्त्वाचे प्रतिपादन अनेक ठिकाणी केले गेले आहे.

ऐतरेय आरण्यकामध्ये प्राणविद्येचे उत्कृष्ट विवेचन दीर्घतमा ऋषीद्वारे केले गेले आहे. उपनिषदांपैकी कठ, श्वेताश्वतर, बृहदारण्यक इत्यादींमध्ये योगाच्या विशिष्ट प्रणाली आणि नाड्यांची विशद चर्चा केली गेली आहे. छांदोग्यामध्ये प्राणाची सर्वश्रेष्ठता प्रतिपादित केली गेली आहे. योगेश्वर श्रीकृष्णद्वारा श्रीमद्

भगवद्गीतेमध्ये अनेक ठिकाणी असे सांगितले गेले आहे की, योगसाधनेसाठी मनास राग द्वेषशून्य, पवित्र आणि स्थिर राखले पाहिजे. याशिवाय मन आत्मोन्मुख होऊच शकत नाही. सर्व भूतांमध्ये व्याप्त मला एकास सर्वत्र वर्तमान (हजर) समजून जो माझे भजन करतो तो व्यवहारामध्ये गुंतलेला असून पण ही योगी असतो. सर्वत्र परमेश्वर (भरलेला) आहे, अशी भावनाच म्हणजे योग नव्हे; परंतु त्या भावनेस आचरणामध्ये परिवर्तित करणे म्हणजे सच्चा योग आहे. (वास्तविक योग आहे) श्रीमद्भागवतमध्ये भक्तीसोबतच अष्टांगयोगाचे प्रचुर वर्णन आढळते. त्यात ध्यान-योगाचे विशद वर्णन आणि यमनियमादीची चर्चा आढळून येते.

शंकर उपाख्य आदिनाथ हा योगाचा प्रवर्तक असून त्याने ही विद्या पार्वतीस शिकविली. त्याचवेळी मत्स्येंद्रनाथाने या विद्येचे ग्रहण करून तिचा प्रसार केला. संस्कृत वाङ्मयात 'योग' या शब्दाचे दोन अर्थ आढळतात. १) कर्मयोग व २) ध्यानयोग किंवा समाधी.

'योग: कर्मसु कौशलम्' अशी गीतेत व्याख्या दिली आहे तर 'प्रवृत्ति लक्षणे योग:' असे महाभारतात म्हटले आहे. ऋषिवर्य पतंजली यांनी योगाची व्याख्या 'योगाश्चित्तवृत्तिनिरोध:' अशी केली आहे.

मूळ पातंजलदर्शन चार पादां (चरणां) मध्ये विभाजित आहे. त्यांनी समाधिपाद यात ५१, साधनपाद प्रकरणात ५५, विभूतिपाद प्रकरणात ५५ आणि कैवल्यपाद प्रकरणात ३४ याप्रमाणे एकूण १९५ सूत्रांमध्ये भारतीयांच्या संपूर्ण योगशास्त्राचा उलगडा केलेला आहे. जिम्मर या विद्वानांच्या मते ही सूत्रे आपली आश्चर्यजनक गंभीरता, स्पष्टता, संक्षिप्तता, सारगर्भिता आणि अभिव्यक्तीची स्थिती - स्थापकता या दृष्टीने अद्भुत अशी आहेत. (जिम्मर - 'भारतीय दर्शन', पृ. २८२) पतंजलींच्या ग्रंथामध्ये एक विशेष गोष्ट ही आहे की, त्यामध्ये आत्मविजयाच्या पद्धतीचे वर्णन कोणतेच ईश्वरवाद, तत्त्वज्ञान आणि आत्मविद्या यांच्या सिद्धान्ताविना केले गेले आहे. त्यांच्या पद्धतीचा आधार मानव-मन आणि चेतनेच्या मूक स्वभावाचे अध्ययन आहे. श्री. रा. स. भागवत यांचे पातंजलयोग सूत्रांविषयी असे मते आहे - ''व्यवस्थितपणे लिहिलेला 'पातंजल योगसूत्रे' हा एकच राजयोगाचा ग्रंथ आहे. म्हणूनच त्याला आधारग्रंथ किंवा आकरग्रंथ म्हणता येईल. ईश्वरासमान होणे, त्याच्याशी मिळून जाणे, त्याचे कार्य व त्याचे मनोगत हे आपले आहे, असे समजून ईश्वरकार्य करीत राहणे, हे राजयोगाचे ध्येय आहे.'' (श्री. रंगनाथ रामचंद्र दिवाकर - 'महायोगी', पृ. २१०.)

**७) पातंजलप्रणीत योगशास्त्र : अष्टांगयोग** - महर्षी पतंजलींनी योग दर्शनात निबद्ध केलेल्या योगास अष्टांगयोग असे म्हणतात. त्यातील कित्येक अंगांचे वर्णन, वर निर्दिष्ट केल्याप्रमाणे, उपनिषदे, योगवासिष्ठ, योगियाज्ञवल्क्यस्मृती, गीता इत्यादी ग्रंथांतही आढळते. पातंजलयोग सूत्रांतील २९ व्या सूत्राप्रमाणे योगाची आठ अंगे आहेत. १) यम, २) नियम, ३) आसन, ४) प्राणायाम, ५) प्रत्याहार, ६) धारणा, ७) ध्यान व ८) समाधी. ही आठ अंगे असून यातील पहिली पाच अंगे शरीराच्या अंतर्बाह्य आत्यंतिक शुद्धतेकरिता असून पुढील तीन म्हणजे धारणा, ध्यान व समाधी ही आंतरिक व मानसिक सिद्धतेने प्राप्त होणारी आहेत.

यमचा अर्थ आहे अचल धर्म आणि नियमचा अर्थ आहे चल धर्म. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह हे **१) यम** आणि शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान हे. **२) नियम** यांच्या परिपालनाने व्यक्तींचे आचरण नीतिशास्त्र आणि धर्मशास्त्र या दोहोंच्याही दृष्टीने शुद्ध होते. त्यामुळे चित्तांतील मल दूर होतात. **३) आसनांच्या** अभ्यासाने शारीरिक व मानसिक स्थिरता लाभते व रागद्वेषादि द्वंद्वांनी चित्त विचलित होत नाही. **४) प्राणायाम** हे मानवाच्या बौद्धिक उत्कर्षाचे एक अमोघ साधन असून, शरीरशास्त्र व मानसशास्त्र यांच्या दृष्टीने ते योगाचे महत्त्वपूर्ण अंग आहे. त्यात श्वास प्रश्वासाचे नियमन केले जाते. त्याने चित्ताच्या सात्त्विक प्रकाशात (म्हणजे वास्तविक ज्ञानास) आवरण घालणारे रजस्तमोमल क्षीण होतात व चित्तास स्थिरीकरणाची पात्रता लाभते. प्राणायामांत आपण श्वासाचे निरोधन करतो. प्राणायामाच्या बहुतेक सर्व क्रिया सिद्धासन किंवा पद्मासन या आसनावर करावयाच्या असतात हे प्रथमतः लक्षात ठेवावे. दीर्घ श्वसन म्हणजे प्राणायामाचा पायाच होय. या दीर्घ श्वसनामुळेच माणसातील योगकल्पित कुंडलिनीची शक्ती वाढत राहते, अशी कल्पना योगी सांगतात. प्राणायामात कपालभाती, सूर्यभेदन, उज्जायी, शीतकारी, शीतली, भस्त्रिका, भ्रमरी, मूर्च्छा व प्लाविनी असे प्रकार सांगता येतात. यातील कपालभाती षट्क्रियांमध्ये मोडली जाते. प्राण हा पंचवायुमय आहे. मनुष्याच्या शरीरात चैतन्य खेळविणारे एकंदर पाच वायू शरीरभर असतात. या वायूंचा योग्य प्रमाणात संचय व पुरवठा असेल तर मनुष्य सदैव बलवान राहील. त्यातील पहिला वायू म्हणजे **प्राणवायू.** हा नाकापासून हृदयापर्यंत असतो. दुसरा वायू **समान** हा हृदयापासून नाभीपर्यंत असतो. तिसरा **अपान** वायू. हा  नाभीपासून तळपायापर्यंत असतो. चौथा वायू **उदान**. हा कंठापासून मस्तकापर्यंत असतो. याची गती ऊर्ध्व असून त्याच्या जोरामुळेच मेंदूला रक्त मिळते. पाचवा वायू **व्यान** हा सर्व शरीरभर असून याच वायूमुळे सांध्यांची व स्नायूंची हालचाल होत असते. **५) प्रत्याहार** म्हणजे चित्ताचा विषयाशी होणारा संपर्क थांबवून त्यायोगे इंद्रियांना चित्तानुगामी करणे. त्याने इंद्रिये पूर्णपणे स्वाधीन होतात. दुसऱ्या शब्दात प्रत्याहार म्हणजे सर्व इंद्रियांनी आपापल्या भोगेच्छांचा त्याग करणे. हे इंद्रियांना अभ्यासपूर्वक शिकवावे लागते. एक प्रकारचे वैराग्यशील मन प्राप्त करून घेणे म्हणजेच प्रत्याहार.

योगाची वरील पाच अंगे हे त्याचे बहिरंग होय. ध्यान आणि समाधी ही अंतरंगे होत. **६) धारणा** म्हणजे मन कोणत्याही जरूरीच्या विषयावर म्हणजे परमेश्वर शक्तीवर स्थिर करण्यास शिकणे. धारणेत चित्ताला एखाद्या बाह्य वा अभ्यंतर, स्थूल वा सूक्ष्म विषयावर याला 'देश' असे म्हणतात – बांधून ठेवले जाते. त्या स्थितीत विषयाच्या प्रत्ययाचा एकरस अखंड प्रवाह जेव्हा चित्तात आरूढ होऊ लागतो, तेव्हा तिला 'ध्यानावस्था' म्हणतात. **७) ध्यान** म्हणजे ज्यासंबंधी धारणा ठेवली त्यावर अनेकवार मनन करणे. ध्यानावस्थेमध्ये जेव्हा केवळ अर्थाचेच (म्हणजे ध्येय विषयाचे) भान उरते व ध्यान करीत असल्याची जाणीव नष्ट होते, तेव्हा तिला **समाधी** ही अवस्था म्हणतात. अर्थात **८) समाधी** म्हणजे तद्रूपता! समोर घेतलेल्या विषयांशी तदाकार होऊन जाण्याची पात्रता आणणे. 'जेव्हा ध्येयाचे बाह्य स्वरूप सोडून अंतःस्वरूपात मात्र मन तदाकार होऊन राहते, तेव्हा त्या स्थितीस समाधी असे म्हणतात.' – विवेकानंद. 'ज्या ठिकाणी मन नीट ठेवता येते, अशी (मनाची) स्थिति म्हणजे समाधी. हा केवळ स्थूल असा अर्थ आहे. ज्यामध्ये देशालंबन सुटून अर्थमात्राचाच एकाकार प्रत्यय, 'अनुभव राहणे' हा समाधी होय. समाधी या

शब्दाचा अर्थ असा आहे की, योगात येणारे जे विक्षेप म्हणजे अडथळे, ते सर्व दूर होऊन ज्यात चित्ताची एकाग्रता होते ती **समाधी** होय. ही सबीज समाधी किंवा समापत्ती होय. निर्बीज समाधीत चित्त आलंबनशून्य होऊन सर्व वृत्तींचा निरोध होतो. धारणा, ध्यान व समाधी ही मन:संयमासाठीच असून त्यायोगे मानव परमेश्वरस्वरूप म्हणजे शक्तिशाली व रक्षणकर्ता बनतो.

**८) योगवैशिष्ट्य** – समाधी व योग हे दोन्ही सारखेच आहेत. समाधी म्हणजे मनाची अचंचल किंवा एकाग्र अवस्था. योग हे पाच प्रकारचे आहे. १) क्रियायोग, २) भक्तियोग, ३) ज्ञानयोग, ४) हठयोग व ५) राजयोग. हठयोग सिद्धीकरिता आसने, मुद्रा, बंध आणि प्राणायाम हे प्रमुख मार्ग होत.

योगाचा विचार करताना आणखीही एक अर्थ संभवतो व तो म्हणजे जीवात्मा व परमात्मा यांचा संयोग. जीवात्मा म्हणजे मनुष्याच्या देहामध्ये चैतन्यरूपाने दिसणारा जीव म्हणजे प्राण व अखिल सृष्टीचे चैतन्य म्हणून असणारा अत्यंत थोडा व श्रेष्ठ सामर्थ्यवान असा आत्मा (शक्ती वा ईश्वर) या दोहींचा संयोग करताना मानवी देहाच्या हालचालींना प्रेरणा देणाऱ्या मनाचा प्रथम विचार करावा लागतो.

चित्तवृत्तिविरोध म्हणजे मनाच्या विकारावरील ताबा मिळविणे होय. ही गाठण्यासाठी योगशास्त्रामध्ये आसने, धौती, बंध, मुद्रा, प्राणायाम असे विधी आहेत. आसनांमुळे शरीराचे रूधिराभिसरण, सांधे, स्नायू व नाड्या यातील भागात शुद्धी उत्पन्न होते. धौती हा प्रकार बऱ्याच अंशी अंत:शुद्धीकरिता उपयुक्त आहे. बंध, मुद्रा, प्राणायाम या गोष्टींनी शरीर पूर्णपणे मनाच्या ताब्यात आणण्यास वेगवेगळा उपयोग होऊ शकेल.

कुठलीच हालचाल न करता निश्चल (हलत-चलत विरहित) आरामशीर बसण्याचे (बैठकीचे) नाव आसन आहे. – 'स्थिरसुखमासनम्।' २।४६. घेरंड संहितेच्या आधारे कमीत कमी चौऱ्याऐंशी (८४) आसने श्रेष्ठ आहेत; परंतु शिव-संहितेच्या आधारे फक्त चार प्रकारचे आसन – सिद्धासन, पद्मासन, उग्रासन आणि स्वस्तिकासनच योग्यांच्या योगकार्यासाठी आवश्यक आहेत. ('शिव-संहिता' – तृतीय पटल, श्लोक १००) आसन – सिद्धी प्राणायामाचे प्रमुख आधार आहे. आसनांमुळे आळस नष्ट होऊन प्राणवायूचे निरोध करण्याची शक्ती प्राप्त होते. भूक-तहान, राग-द्वेष, शीत-उष्ण इत्यादी ऊर्मींचे दमन करण्याची शक्ती प्राप्त होते.

आसनांची सिद्धी झाल्यानंतर श्वासोच्छ्वासाच्या गती विच्छेदाचे नाव प्राणायाम आहे. शरीरामध्ये प्राणवायूचे प्रवेश करणे हे श्वास आहे, तर त्याचे बाहेर निघणे हे उच्छ्वास आहे. या दोहोंची क्रिया जीव (प्राण) असेतोपर्यंत सदैव चाललेली असते. नासिकारंध्रामधून श्वास आत घेण्यास **पूरक** म्हणतात. तिला आतमध्ये उशिरापर्यंत धरून ठेवण्यास **कुंभक** म्हणतात, तर आत थांबवून ठेवलेल्या वायूस हळूहळू बाहेर काढण्यास **रेचक** प्राणायाम म्हणतात. दीर्घकालीन प्राणायामाच्या अभ्यासानेच लवकर योगसिद्धी प्राप्त होते. प्राणायामाच्या अगोदर नाडी – शुद्ध करण्याचे विधान आहे.

**९) घेरंड – संहिता – षट्कर्म** – योगीश्वर घेरंड मुनीद्वारा प्रणीत हा योगशास्त्राचा लघुग्रंथ आहे. हा सप्त उपदेशांमध्ये विभाजित आहे. प्रथम उपदेशामध्ये मंगलाचरणानंतर षट्कर्मांचे वर्णन आहे. घेरंड ऋषींच्या मतानुसार योगाभ्यासकास सप्त साधन करणे आवश्यक आहे, जसे देहशुद्धी, दृढता, स्थैर्य, धैर्य, लाघव, प्रत्यक्ष (डोळ्यांनी पाहणे, कानांनी ऐकणे) आणि निर्लिप्त.

**१) षट्कर्म** – शोधन सहा कर्मांमुळे होते. आसनांमुळे दृढता, मुद्रांमुळे स्थिरता, प्रत्याहारमुळे धैर्य आणि प्राणायामामुळे लाघव निर्माण होते. त्या सातही साधनांमध्ये प्रथम शोधन सहा कर्मांमुळे होते. यांना **षट्कर्म** म्हणतात. हे षट्कर्म असे आहेत – **१) धौती** – शरीराची आंतरिक शुद्धी, दात, हृदय, नाभी (बेंबी) इत्यादींना निर्मळ बनविणे. **२) बस्ती** – जल बस्ती आणि स्थल बस्ती बेंबीपर्यंत पाण्यात बसून किंवा जमिनीवर पाठीशी पडून उत्कट आसनाने गुदा भागास आकुंचित आणि प्रसरित करणे. **३) नैती** – वीतभर बारीक धाग्यास नासिकारंध्रामध्ये पुरवून (घालून) मुखमार्गाने बाहेर काढणे. **४) लौलिकी** – अत्यंत वेगाने पोटास दोन्हीकडे हलविणे. **५) त्राटक** – अनिमिष दृष्टीने जोपर्यंत अश्रुपात होत नाही. तोपर्यंत कोणत्या तरी लहान वस्तूकडे एकटक पाहणे. **६) कपालभाती** – डाव्या नाकपुडीने हवेस ओढून उजव्या नाकपुडीमधून बाहेर काढणे.

**२) आसन** – दुसऱ्या उपदेशामध्ये बत्तीस आसनांच्या क्रिया विधीचे सविस्तर वर्णन आहे.

**३) मुद्रा** – तिसऱ्या उपदेशामध्ये विभिन्न मुद्रांचे वर्णन आहे. महामुद्रा, नभोमुद्रा, उड्डियान, जालंधर, मूलबंध, महाबंध, महावेध, खेचरी, विपरीतकटी, योनिमुद्रा, वज्राणी, शक्तिधारिणी, ताडागी, मांडवी, शांभवी आणि पंचधारिणी मुद्रांचे वेगवेगळे वर्णन आहे. यापैकी खेचरी आणि शांभवी मुद्रा यांची माहिती पुढे देण्यात येत आहे.

**क) खेचरी मुद्रा** – प्रसिद्ध खेचरी मुद्रा अशी आहे. जिभेखाली जिभेचे मूळ आणि जीभ या दोहोस जी नाडी जोडते, तिला कापा आणि नेहमी जिभेचा पुढचा भाग आणि जीभ यांना चालवत ठेवावे आणि जिभेस मस्का (लोणी) लावावे आणि लोखंडाच्या चिमट्याने तिला ओढावे. (या) अभ्यासाने जीभ एवढी लांब होऊन जाते की ती त्रिकुटीचा स्पर्श करू लागते. नंतर त्याच जिभेस क्रमाने टाळूमध्ये घेऊन जाऊन कपाळ कुहरा (टाळूचे मध्य विवरा) मध्ये वरच्या बाजूस उलटून घुसवावे आणि पुन्हा दोन्ही भुवयांच्या मध्यभागी पाहावे. हीच खेचरी मुद्रा होय. खेचरी मुद्रा सिद्ध व्यक्ती, भूक-तहान आणि आळसापासून मुक्त होऊन वृद्धावस्था आणि मृत्यूस जिंकतो. अग्नी अशा व्यक्तीस जाळू शकत नाही आणि पर्वत व पाणी त्याला शुष्क – आर्द्र करू शकत नाहीत. त्याला सर्पदंशाचे भय पण राहत नाही. (घेरंड संहिता, तृतीयोपदेश, २६-२७)

**ख) शांभवी मुद्रा** – त्रिकुटीमध्ये दृष्टीस स्थिर करून तेथेच आत्मारामास पाहणे शांभवी मुद्रा आहे. ही मुद्रा कुलवधूसारखी प्रयत्नपूर्वक ठेवली जाणारी परम गोपनीय बाब आहे. (घेरंड संहिता, तृतीयोपदेशे – ५९-६०)

**४) प्रत्याहार** – चतुर्थोपदशेमधये ऋषिमुनी घेरंड यांनी प्रत्याहार – विधीचे वर्णन केले आहे. ज्या विषयामध्ये मन चंचल होऊन भ्रमण करीत असेल तर त्या विषयापासून मनास परावृत्त करून आपल्या वशामध्ये केले पाहिजे. साधकास यश-अपयश, गोड-कटू वचन, सुगंध-दुर्गंध आणि स्वादजन्य षड्रसांच्या मोहापासून मनास परावृत्त करून द्वंद्वांचे मोह सोडून आपल्या वशामध्ये केले पाहिजे.

**५) प्राणायाम** – घेरंड मुनींनी आठ प्रकारचे कुंभक प्राणायाम सांगितले आहेत. जसे – सहित, सूर्यभेद, उज्जायी, शीतली, भस्त्रिका, भ्रामरी, मूर्च्छा आणि केवली. यांच्या क्रिया-विधीवर सविस्तर प्रकाश टाकले आहे. अधम प्राणायामामध्ये साधकास घाम सुटतो. मध्यममध्ये पाठ कंपन पाऊ लागते आणि उत्तम

प्राणायामामध्ये योग्याचे शरीर पृथ्वीपासून वेगळे होऊन वर उचलले जाते. प्राणायाम साधनेने आकाशामध्ये उडण्याची शक्ती निर्माण होते. देह आणि प्राण पवनाचे रोग नष्ट होऊन जातात. उन्मनी स्थिती निर्माण झाल्याने मन आनंदित होऊन जाते.

**प्राणायामाचे प्रयोजन** – प्राणायामात सबीज व निर्बीज असे दोन प्रकार पडतात. हा जप – प्राणायाम असून बीजमंत्राच्या आधाराने प्राणायामाच्या चारही वृत्तींवर नियंत्रण आणले जाते. याचा मुख्य हेतू केवळ नियंत्रण नसून, नियंत्रणाद्वारे भक्तिभाव निर्मिती होय.

मानवी शरीरामध्ये नाड्यांचे जाळे पसरलेले असते. त्यांचे उगमस्थान, हृदय व नाभीमधून असल्याने तेथे स्नान–शुद्धी क्रिया करावी लागते. पाठीचा कणा सरळ, उंच व उन्नत ठेवावा लागतो. त्यांचा संबंध अकरा चक्रांच्या स्थानाशी संबंधित आहे. शरीर, इंद्रिये, मन, बुद्धी, अस्मिता, चित्त, विवेक आणि धर्मेंद्रिय या सर्वांवर तसेच अन्नमय, प्राणमय, मनोमय, विज्ञानमय, आनंदमय, चित्तमय व आत्ममय या सप्त कोशांवर नियंत्रण या चक्रांद्वारे होत असते.

पंचमहाभूत म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश तसेच काळ आणि अंतरिका यांच्याशी प्रातिनिधिक संबंध या चक्रांमुळे प्रस्थापित केला जातो. शरीरातील पंचवायू हे आपापल्या स्थानी प्रतिष्ठित असतात आणि शरीरकार्य साधीत असतात. प्राणायाम साधनेतून या पंचप्राणांचे भरण, पोषण आणि शोधन होत जाते. ते जसजसे शुद्ध होत जाते तसतशी नाडी शुद्धी होत जाते. ओज आणि तेज यांचे वितरण या नाड्यांद्वारे होत जाते. या ओज आणि तेज पुरीत प्राणशक्ती चक्रांमधील गुप्त व सुप्त शक्तीला प्रेरित करीत उद्दीपित करते. त्यांच्यात प्रभुत्व व दिव्यत्व ठासून भरतात. आध्यात्मिकतेकडे झुकणाऱ्या या प्राणायामाचे बीज प्राणायामात रूपांतर होते. त्यास बीज प्राणायाम म्हणतात. त्यातही सबीज व निर्बीज असे दोन प्रकार पडतात. हा जप – प्राणायाम असून, बीजमंत्राच्या आधाराने प्राणायामाच्या चारही वृत्तींवर नियंत्रण आणले जाते. याचा मुख्य हेतू भक्तिभावनिर्मिती होय. सबीज प्राणायाम आणि निर्बीज प्राणायाम यांचा उंबरठ्यावर प्राण जय मिळविला असता पंचप्राण आपापल्या शक्ती सामर्थ्यानुसार सिद्धी प्रदान करतात. या सिद्धीमध्ये न अडकता, कैवल्यमार्गावरून प्रवास करणे, झाल्यास प्राणायाम यज्ञ हा जप यज्ञासहित करावा लागतो.

'ॐ' या एकाक्षरी मंत्रापासून परिचित असलेल्या 'ॐ नम: शिवाय', 'ॐ नमो नारायण', 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' किंवा चोवीस अक्षरी गायत्री मंत्र यांची अर्थासहित जपसाधना करीत प्राणवृत्तीवर विजय मिळविण्याचा प्रयत्न या बीज प्राणायामात असतो. सर्व वृत्तींना मागे सारीत, श्वसन क्रिया साधन, श्वसन आणि मंत्र जपाची एक कालिकता साधत करावयाचा हा सबीज प्राणायाम होय. या उलट निर्बीज प्राणायामात श्वसन हे तालबद्ध व लयबद्ध ठेवीत, मन, बुद्धी व अहंकार यांना शांत, निर्विचारी ठेवत, शुद्ध अंत:करणाने करायचा प्राणायाम होय. या निर्बीज प्राणायामात अंतरात्मरूपी अंतरिक्षाला भिडता येते. निर्बीज प्राणायामात श्वसनक्रियेपलीकडील स्तब्धता अर्थात स्तंभवृत्ती असते. आत्मा परमात्म्याचा हा प्राणसंवाद येथे होतो.

क) उपरोक्त कुंभक विधींपैकी पुढे **भस्त्रिका कुंभक विधीची** माहिती देण्यात येत आहे. प्रसिद्ध भस्त्रिका कुंभक विधीसंबंधी घेरंड ऋषींचे असे मत आहे की ज्याप्रमाणे लोहाराचा भाता वारंवार वायू सोडत असतो त्याचप्रमाणे हवेस दोन्ही नाकपुड्यांमध्ये ओढून हळूहळू पोटात भरावे. असे वीस वेळा करून कुंभक

करावे आणि पुन्हा हळूहळू हवेस तसेच बाहेर काढावे. भस्त्रिका कुंभक विधीमुळे साधकास नित्य आरोग्य लाभ होतो.

**ख) केवली कुंभक विधी –** श्वासाचा वायू जेव्हा आतून बाहेर निघतो तेव्हा 'हं' या अक्षराचा ध्वनी उत्पन्न होतो. जेव्हा श्वास आतमध्ये जातो तेव्हा 'स:' शब्द निर्माण होतो. हे दोन्ही रात्रं–दिवसामध्ये २१,६०० वेळा येत जात असतात. तांत्रिकांनी 'हं' ला शिव आणि 'स:'ला शक्ती नाव दिले आहे. त्यामुळे याला अजपानाम गायत्री म्हटले गेले आहे. याचे जाप सर्व सजीव करतात. उपस्थ, हृदयकमल आणि दोन्ही नाकपुड्यांमध्ये अजपाचे आपोआप गमन–निर्गमन चाललेले असते. मनुष्याने आजीवन उपरोक्त संख्यानुसार अजपा जाप करत राहावे. जर अजपाची संख्या दुप्पट करून केवली कुंभक विधी केली गेली तर मन उन्मनी अवस्थेस पोचते. केवली कुंभकामध्ये सिद्ध बनल्यानंतर साधक योगविद्यामध्ये निष्णात होऊन जातो.

**६) ध्यानयोग –** ध्यानयोग तीन प्रकारचे मानले गेले आहे. १) स्थूल, २) सूक्ष्म आणि ३) ज्योतिर्ध्यान. स्थूल ध्यानामध्ये (साधक) मनोहर अशा हिरव्या पल्लवांचे कल्पवृक्षाचे ध्यान करतो, ब्रह्मरंध्र स्थितीचा साधक सहस्रदल कमळाची कल्पना करतो. नादबिंदुमय (साधक) मनोहर सिंहासनावर आसीन हंसाच्या जोडीस पाहतो. ज्योतिधर्मामध्ये (साधक) कुंडलिनी शक्तीचे ध्यान करून प्रज्ज्वलित त्रिकुटीमध्ये आपली दृष्टी स्थिर करतो. स्थूल ध्यानापेक्षा शंभरपट ज्योतिर्ध्यान आणि ज्योतिर्ध्यानापेक्षाा लाख पट सूक्ष्मध्यान असतो. यामध्ये जेव्हा साधकाची कुंडलिनी जाग्रत होते तेव्हा तो चक्षुगोलकापासून निघून आत्म्याशी संपृक्त अशा राजमार्गामध्ये विहार करू लागतो.

**७) समाधीयोग –** याच्या पलीकडे कोणताच योग नाही. गुरूची कृपा, भक्ती आणि अनुग्रहामुळे सौभाग्यवशच साधकास याची प्राप्ती होते. यामध्ये साधक 'अहं ब्रह्मास्मि' ची विचारणा करीत शोकादीपासून स्वत:स निर्लिप्त मानून सच्चिदानंद स्वरूप बनून नित्य मुक्त स्वभावाचा बनून जातो. समाधी योगाचे दोन प्रकार आहेत – ध्यानयोग समाधी आणि नादयोग समाधी.

**१०) शिव – संहिता : षट्चक्र–भेदन क्रिया –** 'शिवसंहिता' हे योगाचे उपयोगी ग्रंथ देवाधिदेव शिवरचित मानले जाते. यामध्ये एकूण पाच पटल आहेत. योगाचे हे उपदेश पार्वतीस संबोधून दिले आहेत.

'षटचक्रा'ची संक्षिप्त ओळख याप्रमाणे आहे –

१) **मूलाधार चक्र –** या चक्राच्या उत्थानामुळे मुक्तीचे व मरणोत्तर जीवनाचे ज्ञान मनुष्याला होते.

२) **स्वाधीष्ठान चक्र –** या चक्राच्या जागृतीमुळे चैन, राग, आधाशीपणा, फसवेगिरी, गर्व, हेवा इत्यादी दहा विकारांपासून उत्पन्न होणारा जो मीपणा किंवा अहंकार त्यापासून मनुष्य दूर राहू शकतो.

३) **मणिपूर चक्र –** नाश व उत्पत्ती करण्याचे सामर्थ्य या चक्रापासून लाभते.

४) **अनाहत चक्र –** याच्या साहाय्याने मनुष्याला परकायाप्रवेश, अदृश्य होणे, आकाशगमन इत्यादी साधते. यायोगे मनुष्यनिर्मित वस्तूंवरील संपूर्ण ताबा मिळतो.

५) **विशुद्ध चक्र –** अंतरात्म्याची खरी जाणीव या चक्राच्या आधाराने होते.

६) **आज्ञाचक्र (ज्ञान चक्र) –** यामुळे मनुष्याला त्रिलोकाच्या व्यवहारांतील ज्ञान प्राप्त होते. अद्वैतवादी मनुष्य वृत्तीने एकाकार होतो.

**वरील सहा चक्रांची जागृती सुषुम्ना नळींतून कुंडलिनी वर जात असताना होते.**

योगिराज शिव पार्वतीस संबोधून म्हणतात की, हे प्रिये! सिद्धासनासारखे कोणतेच आसन नाही. कुंभकासमान कोणतेच बळ नाही. खेचरीसारखी कोणतीच मुद्रा नाही आणि नादासमान कोणतेच लय पण नाही. उपस्थाच्या मुळामध्ये कुंडलिनी शक्ती अधिष्ठित आहे. ही साडेतीन वलयामध्ये नाडींच्या समूहामध्ये घेरली गेलेली आपल्या शेपटीस तोंडामध्ये घालून सुषुम्नाच्या छिद्रास घेरलेली आहे. ही कुंडलिनी शक्ती सर्पिणीच्या स्वरूपात झोपलेली आहे आणि आपल्या तेजाने उद्दीपित आहे. ही वाग्देवतास्वरूप आहे. तिच्या प्रभावामुळेच जीवांची वाक्‌शक्ती प्रवृत्त होते. स्वर्ण - प्रभातुल्य ही कुंडलिनीच सत्त्व, रज आणि तम या तिन्ही गुणांना प्रकट करणारी विष्णूची शक्ती आहे.

कुंडलिनीचे अधिष्ठित स्थान योनीमंडलामध्ये काम-बीज विद्यमान आहे. हे बीज क्रियाशक्ती आणि विज्ञानशक्ती सोबत शरीरामध्ये फिरत असते. ते कधी ऊर्ध्वगामी असते तर कधी लिंगातर्गत सलिलामध्ये प्रवेश करते. यालाच (१) **मूलाधार पद्म** म्हणतात. यामध्ये व, श, ष, स या चार वर्णाक्षरांनी युक्त चार पाते चमकत आहेत. याचे ध्यान करणारा योगी त्रिकालज्ञ बनून जातो आणि त्याच्यासमोर यापूर्वी अज्ञात असलेले सर्व शास्त्रांची गुपिते उघडली जातात. तो प्रफुल्लचित्त आणि संतुष्ट असतो.

लिंग मुळामध्ये स्थित कांतिवात सहा पानांनी सुशोभित (२) **स्वाधिष्ठान चक्र** लाल रंगाचा आहे. त्याच्या सहा शाखां (दलां) वर ब, भ, म, य, र, ल हे सहा वर्णाक्षर विराजमान आहेत. यामध्ये राकिणी शक्ती निवास करते. या पद्माचे ध्यान करणारे साधकाची सेवा करण्यासाठी मुग्धचित्त कामतुल्य - कामिनी लालायित असतात. तो निरोगी आणि निर्भय असतो.

बेंबीच्या मुळामध्ये दहा पानांनी सुशोभित सोनेरी रंगाचा **(३) मणिपूर चक्र** आहे. यामध्ये लाकिनी शक्तीचे निवास आहे. याच्या दहा शाखांमध्ये (दलांमध्ये) ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ हे दहा वर्णाक्षर चमकत आहेत. याची सिद्धी करणाऱ्या साधकास पातालसिद्धी प्राप्त होते. त्याला देवतांचे साक्षात दर्शन घडू लागते.

हृदयाच्या स्थानामध्ये स्थित गडद लाल रंगाचा बारा पाने असलेला (४) **अनाहत चक्र** आहे. याच्या बारा पानांवर क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ आणि ट, ठ हे बारा वर्णाक्षर अंकित आहेत आणि यामध्ये काकिनी शक्तीचे निवास आहे. या चक्राच्या सिद्ध पुरुषापाशी अप्सरा कामातुर होऊन येऊ लागतात. हा दूर श्रवा, गगनविहारी आणि खेचरी - भूचरी शक्तींनिशी संपन्न होऊन जातो.

तप्त सोन्याच्या रंगसारखा कंठामध्ये स्थित सोळा पानांचा (५) **विशुद्ध चक्र** आहे. याच्यावर शाकिनी शक्ती विराजमान आहे आणि त्याच्या पानांवर क्रमशः अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ, ए, ऐ, ओ, औ, अं, अः हे सोळा स्वर सुशोभित आहेत. विशुद्ध चक्राच्या भेदनामध्ये सफल साधकास योगीश्वर म्हणून संबोधले जाते. तो आपल्या क्रोधाने त्रिलोकास कंपित करण्याची शक्ती राखतो. त्याचे शरीर वज्रासारखे दृढ आणि मन अंतर्मुख असते. पृथ्वीतलावरील निघून गेलेली हजारो वर्षे त्याला क्षणभरासारखी वाटतात.

दोन्ही भुवयांमध्ये स्थित दोन दळाचा हाकिनी शक्तीयुक्त ह आणि क्ष या दोन वर्णाक्षरांनी अंकित (६) **आज्ञा-चक्र** आहे. याचे ध्यान केल्यामुळे परम सिद्धी प्राप्त होते.

षटचक्र भेदन स्थितीनंतर बहिर्मुख मनास अंतर्मुख बनविण्यासाठी आत्मचिंतनाचा सर्वात शक्तिशाली माध्यम अजपाजप आहे.

**११) नाथ-पंथी योगसाधना**

**क) नाथ पंथामध्ये काया-साधना –** नाथपंथामध्ये प्रयुक्त योगमार्ग विशुद्ध साधनेचा मार्ग आहे. या पंथाची मुख्य साधना-पद्धती हठयोगाशी संबंधित आहे. तत्त्ववादापेक्षा प्रक्रियामध्ये याची विशेष आस्था आहे. नाथ-पंथींनी आपल्या साधनेस व्यावहारिक बनविण्यावर अधिक भर दिला आहे. ते आपल्या सिद्धांतांची सार्थकता याच इहलौकिक जीवनामध्ये अनुभव करण्यामध्ये मानतात. त्यांचे एकमात्र उद्दिष्ट भवबंधनांपासून मुक्त होऊन शिवत्वाची प्राप्ती करणे आहे. नाथ पंथींच्या दृष्टीने हे शिवत्व किंवा परमतत्त्व 'केवल' स्वरूप आहे. हे भाव अभावापासून अतीत आहे. हे अगम्य, अगोचर आहे. या 'केवलावस्थे' पर्यंत पोहोचणे जीवाचे परमसाध्य आहे. या साध्यापर्यंत पोहोचण्यासाठी नाथ पंथ व्यावहारिक विधी प्रस्तुत करतो.

योग – साधनेमध्ये प्रवृत्त होण्याअगोदर सर्वप्रथम साधकाची दृष्टी त्याच्या शरीरावर जाते, कारण की शरीराची नश्वरता जीवाच्या समस्त साधनेस नष्ट करते. मृत्यूवर विजय प्राप्त करून साधकास मृत्युंजयी बनविणेच योगाचा प्रमुख उद्देश आहे. अनेक यौगिक साधनांमध्ये शरीरास अनेक प्रकारच्या यातनांनी त्रास देत मुक्ती प्राप्तीसाठी प्रयत्न केला जातो; परंतु नाथपंथींनी 'शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्' चा मार्ग अनुसरून मध्यम मार्गाचा अवलंब केला आहे. हे शरीर वास्तविक सत्यस्वरूप आत्म्याचे निवास स्थान आहे, म्हणून याचा सदुपयोग केला पाहिजे.

जर साधकाचे शरीर कृश असेल आणि त्याचे नेत्र निर्मळ कांतिमय असतील तर समजावे की गुरूशी त्याची भेट झाली आहे. काया शुद्धीची मुख्य ओळख हीच आहे. यासाठी शास्त्रांमध्ये धौति, बस्ती, नैति, लौलिकी, त्राटक आणि कपालभाति या षटकर्मांचे विधान सांगितले गेले आहे. मनाच्या स्थैर्यासाठी आसनांचा प्रयोग पण योग्यासाठी अनिवार्य आहे.

**ख) नाथ पंथाची त्रिविध साधना – १) बिंदू – साधना (इंद्रिय – निग्रह) :** या योग साधनेमधये बिंदू रक्षणाकडे खास ध्यान (लक्ष) दिले जाते. शरीराच्या दृढतेसाठी बिंदू वा वीर्याची (रेत) धारणा अत्यंत आवश्यक आहे. कारण की बिंदू नाशामुळे शरीरावर काळा (मृत्यू) चा प्रभाव लवकर पडू लागतो आणि योगी आपल्या साधनेमध्ये असफल (अयशस्वी) सिद्ध होतो. म्हणूनच नाथपंथींनी योग्यासाठी ऊर्ध्वरेता असणे ही आवश्यक (अनिवार्य) अशी अट मानली आहे.

बिंदूच योग आहे, बिंदूच भोग आहे, बिंदूच चौसष्ठ रोगांचे हरण करतो. या बिंदूचे गुज जाणणारा विरळाच! बिंदूचे गूढ जाणणारा साक्षात ब्रह्मस्वरूप असतो. योनी मुखामध्ये जो बिंदूची रक्षा करतो आणि अग्नीवर पारा सुरक्षित ठेवतो, तो आमचा सद्गुरू आहे. योग्याची ही सत्त्वपरीक्षा आहे. (गोरखनाथ – 'गोरखबानी' – पृसबदी १४८, १४२) माझ्यापासून कोणीच वाचू शकत नाही. असे काळा (मृत्यू) चे आव्हान आहे. उभे, बसता, निजता, उठता, जागे असता कोणत्याच अवस्थेमध्ये का असेना – मी तुम्हास मारू शकतो. तुम्हाला धरण्यासाठी मी तिन्ही लोकांमध्ये योनीस्वरूप जाळे पसरवले आहे. तुम्ही कुठे जाल?

स्त्रीसोबत राहणाऱ्या पुरुषाची अवस्था नदीच्या काठावर असलेल्या वृक्षासारखी असते. त्याचे आयुष्य फार कमी असते. माया नारी मनास मोहीत करते आणि रात्रीच्या वेळेस शुक्र-स्खलनद्वारे अमृत सरोवर शोषून घेते. मनामध्ये मनसिज जन्म घेता क्षणीच मेरू शिखर म्हणजे सुषुम्नाचे ऊर्ध्व मुख ब्रह्मरंध्रापासून अमृत खाली पडतो. त्यामुळे शरीराचा नाश होतो.

नाथ पंथामध्ये प्रचलित असलेल्या साधनांमध्ये प्रथम इंद्रिय-निग्रह अर्थात बिंदू रक्षणाची साधना होती. या अगोदर सांगितल्याप्रमाणे बिंदूधारणा किंवा ऊर्ध्व रेता बनल्याने आसनामध्ये दृढ राहण्याची क्षमता उत्पन्न होते आणि साधक आपल्या साधनेमध्ये उत्तरोत्तर सफलता प्राप्त करत चाललेला असतो. याच कारणामुळे नाथ पंथींनी साधनेचे मूळ स्वरूप बिंदू धारणेवर विशेष जोर दिले आहे.

इंद्रिय-निग्रहाचे प्रयोजन फक्त बिंदूरक्षणच नव्हे तर समस्त इंद्रिये आणि त्यांच्या विषयांशी आहे; परंतु समस्त इंद्रियांमध्ये जननेंद्रियच प्रबळ आहे. म्हणूनच नाथपंथी गुरूंनी यावर अपेक्षाकृत अधिक भर दिले आहे. त्याचप्रमाणे गुरू गोरखनाथ यांचे पण कथन आहे की, इंद्रियांना त्यांच्या विषयापासून हटवा. नेत्रांच्या समोर (पुढे) पाहण्याच्या शक्तीस, कानांच्या समोर ऐकण्याच्या शक्तीस आणि नाकापुढील वायूस लपवा. असे केल्याने मग फक्त निर्वाणपद बाकी राहते. (गोरखनाथ – 'गोरखबानी' सबदी ७५)

**२) प्राणसाधना –** इंद्रिय निग्रहाच्या साधनेमध्ये पूर्ण यशस्वी झाल्यानंतर साधक हा प्राणसाधनेमध्ये अग्रेसर होतो. सहस्रार चक्रामध्ये असलेले अमृत प्राप्त करण्यामध्ये प्राणसाधनेचे महत्त्व पूर्ण सहयोग असते. तसे पाहता मनुष्याचे जीवनच श्वास क्रियेवर टिकलेले आहे. जोपर्यंत देहामध्ये प्राण आहे तोपर्यंतच मानवाचे देह कंचन कलेवर आहे. अन्यथा लोष्टवत् श्वास क्रियेचे थांबणे वास्तविक मानवाची सर्वात मोठी विवशता आहे आणि आहे काळा (मृत्यू) चा प्रबळ आघात – फटका. परंतु जर आम्ही श्वास – क्रिया थांबल्यावर सुद्धा जिवंत राहू शकू तर आमच्यावर काळाच्या प्रबळ प्रहाराचा प्रभाव पडू शकणार नाही. म्हणूनच प्राणविजयाच्या कामनेसह योगी प्राण-साधनेमध्ये प्रवृत्त होतो. शरीरामध्ये प्राणवायूचे नियमित संचालन आणि कुंभक, पूरक आणि रेचक या क्रिया प्राण साधनेच्या अंतर्गत येतात.

पूर्ण प्राण – विजय 'केवल' कुंभकामुळे प्राप्त होते, कारण यात श्वास क्रिया संपूर्णपणे अवरुद्ध होऊन जाते. यासाठी पूरक आणि रेचकाची गरज भासत नाही. केवळ कुंभकामध्ये सूर्य आणि चंद्राचे योग झाल्यामुळे प्राण सुषुम्नामध्ये प्रवेश करते आणि साधक अजरामर बनून अमृतपान करीत असतो. गुरू गोरखनाथने पण म्हटलेच आहे की, ''हे अवधूत! शरीराच्या नऊ दारांना बंद करून वायूच्या येण्याजाण्याच्या मार्गास थांबून धरा. यामुळे चौसष्ट सांध्यांमध्ये वायूचा संचार होऊ लागेल. यामुळे निश्चितच कायाकल्प होऊन जाईल आणि साधक सिद्ध बनेल. त्याची सावली नसते.'' (गोरखनाथ – 'गोरखबानी' सबदी ५०) वायूचा संचार रोखण्यासाठी शरीरामध्ये पसरलेले सहस्र नाडी – जाल आणि शरीराच्या रोम-रोममध्ये भस्म धारण करणे विहित मानले आहे. प्राणायामद्वारे प्राणास धरून त्याला वश करून घ्यावे. त्यामुळे उन्मनी अवस्था सिद्ध होते. अनाहत नादाची तुतारी वाजू लागते आणि ब्रह्मरंध्रामध्ये सूर्य किंवा चंद्रमाशिवाय ब्रह्माचे प्रकाश चमकू लागते. अशा प्रकारे सूर्य-चंद्राच्या संयोगाने जेव्हा नादामध्ये बिंदू समाविष्ट होतो आणि अनाहत नादाची तुतारी वाजू लागते तेव्हा ब्रह्मरंध्रामध्ये अमृताचा झरा वाहू लागतो.

**३) मन–साधना** – मनास, शरीराचे केंद्रित चेतन स्वरूप मानले गेले आहे. शरीराची विभिन्न बाह्य इंद्रिये मनाच्या संकेतावरच आपले कार्य संपादन करतात. मनच मनुष्याचे बंधन आणि मोक्षास कारणीभूत आहे. मनाच्या अधीन झाल्यावर अनायासे सर्व इंद्रिये अंतर्मुखी होऊन जातात. म्हणून नाथपंथींची शेवटची परंतु विशिष्ट साधना, मनाची साधना आहे. संसाराच्या विभिन्न व्यापारांपासून (कचाट्यापासून) मनास बळेच ओढून अंत:करणाकडे उन्मुख करून देणेच नाथ–पंथी योग्याचे प्रमुख कर्तव्य आहे.

गोरखनाथांनी मनमारणावर विशेष जोर (भर) दिले आहे. त्यांनी शरीरधारी जीव हत्येचा निषेध केला आहे. बुद्धीरूपी शेतात चरत असलेल्या पंचभौतिक मनरूपी मृगाची शिकार करण्याचा ते आदेश देतात. मनास शरीराबाहेर जाऊ देऊ नये, म्हणजे त्याच्या बहिर्मुख वृत्तीस थांबवले पाहिजे. रात्रंदिवस त्याला अंतुर्मख ठेवावे. शारीरिक मुद्रा काहीच कामाची नाही, मनाची मुद्रा केली पाहिजे. शरीराच्या छिद्रांना लपविल्यामुळे योग सिद्ध होत नाही. मनास झाकल्यामुळे योग सिद्ध होतो, कारण की चित्तवृत्तीने निरोधच तर योग आहे.

अशाप्रकारे इंद्रिय निग्रहामुळे आसनाची दृढता आणि बिंदू स्थैर्य तथा प्राण साधनेमुळे प्राणायाम आणि मन–साधनेमुळे प्रत्याहार सिद्ध झाल्यानंतर साधकामध्ये नाडी संशोधन आणि कुंडलिनी जागरणाची अद्‌भुत क्षमता उत्पन्न होते. वीर्य स्खलनाच्या दोन अवस्था आहेत. यांना पारिभाषिक शब्दावलीमध्ये 'प्रलयकाल' आणि 'विषकाल' असे म्हटले जाते. या दोन्ही अवस्थेमध्ये प्राप्त होणारे आनंद घातक असते. तिसरी अवस्था नाना भाव विनिर्मुक्त सहजानंदची अवस्था आहे. यामध्ये (वीर्य) बिंदू ऊर्ध्वमुख होऊन वर उठतो, तेव्हाही सहज समाधी प्राप्त होते. (डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी – 'नाथ संप्रदाय', पृ. १२५)

### १२) नाथ–पंथी योगप्रणित शरीरशास्त्र*

माणसाच्या शरीर रचनेची ओळख गोरखनाथ करून देतात. माणसाच्या डोक्यात सात दारे असतात. धडाखाली दोन असतात. खेरीज कवटीच्या मध्यभागी एक दार असते. त्यातून आत्मा मुक्त होत असतो. ब्रह्म, विष्णू, रुद्र, ईश आणि सदाशिवास यापैकी एकेक केंद्र सोपवलेले असते. दोन श्वास, सहा चक्र, तीन नाडी आणि कुंडलिनी व शिव यांच्याशी शरीर संबंधित असते. शरीर दहा वायूंनी व्यापलेले आहे. यापैकी योग्यास पाच वायू महत्त्वाचे असतात. त्यापैकी दोन अजून जास्त महत्त्वाचे व त्यापैकी 'प्राण' श्वासोच्छ्वासासाठी अनिवार्य असतो. प्राण, वायू आणि मरूत म्हणजे फक्त श्वास नाही तर जोर, सामर्थ्य आणि कृतिशून्यतेचा व मृत्यूचा अभाव आहे. प्राण म्हणजे जीव, असे समीकरण आपण मानतो.

**१) प्राण** – म्हणजे श्वास. त्याची जागा हृदय आहे. मुख, नासिका, नाभी, कुंड आणि पायाच्या अंगठ्यात त्याचा आढळ आहे. हठयोगात त्यावर नियंत्रण अत्यावश्यक असते. उपनिषदात फक्त प्राणालाच महत्त्व आहे.

**२) अपान** – धडाखाली वायू. त्याचे वास्तव्य गुदद्वाराशी असते. मलमूत्र विसर्जनासाठी हा भाग कार्य करतो. लिंग, उरू, गुडघे, ओटीपोट, कंबर, नाभी यांच्या संबंधित कार्य हा वायू करतो.

**३) समान** – (समवायू) नाभीस्थानी हा वायू असून तो पचनाचे कार्य करतो. हा सर्व अवयवांमध्ये असून शरीर कोरडे ठेवण्याचे कार्य करतो.

**४) उदान** – घशाच्या मधोमध असतो. बोलण्याच्या कामी उपयुक्त तसेच याच्या साह्याने शरीर वाढवता येते.

**५) व्यान** – संपूर्ण शरीरभर पसरलेला असतो. कान, ओठ, घसा, नाक, मुख, कपाल आणि मणिबंधात असतो.

आणखी काही वायू असतात. ते पुढीलप्रमाणे सांगितले जातात.

**६) नाग** – ढेकर निर्माण करतो.

**७) कूर्म** – पापणी लववण्यासाठी उपयोग होतो.

**८) क्रकरा** – शिंक येण्यासाठी, भूक लागण्यासाठी

**९) देवदत्त** – जांभई देण्यासाठी

**१०) धनंजय** – मृत्यूनंतरही शरीरात राहणारा वायू

फुफ्फुस आणि पोट यामधील स्नायू सर्वाधिक महत्त्वाचा असतो. हे स्नायू प्राण आणि अपान नाभीत जोडलेले असतात. मानवी शरीराच्या मध्यभागी नाभी असते. प्राण अपानास नाभीपर्यंत वर ओढतो. प्राण व अपान एकमेकास त्यांच्याकडे ओढत असतात. योगी जेव्हा 'हा' चा उच्चार करतो, तेव्हा अपान प्राणास ढकलतो आणि 'सा'चा उच्चार झाल्यावर प्राण अपानास ढकलतो. ही श्वासोच्छ्वासाची प्रक्रिया आहे. हे जीवाचे बाहेर फेकणे आणि आत ओढणे आहे. जीवास अंतर्दृष्टी नसल्याने वाटते की, ही आपलीच प्रक्रिया आहे. प्राणाचे अंतिम बाहेर फेकले जाणे, म्हणजे जीवाचेही बाहेर फेकले जाणे आहे. याचाच अर्थ 'मृत्यू' असा आहे. म्हणून हा + सा = हासा. हा अजप गायत्री मंत्र बनतो व योगी रोज २१,६०० वेळा त्याचा जप करतो. योगामध्ये प्राण आणि अपान एकमेकांशी जोडायचे असतात. हे कसे करावे, हे योग्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचे असते. जग, मृत्यूपासून योगी मुक्त होतो. योग्यास इतर बाबींची माहिती असणे गरजेचे असते. त्याला नाड्यांचे, सहा केंद्रे आणि सोळा आधारांचे ज्ञान हवे. नाड्या सूक्ष्म असतात आणि सामर्थ्याकडे नेणाऱ्या असतात. त्यांची संस्था दोन लाख किंवा तीन लाख असू शकते, तर काही विद्वानांच्या मते, त्या बहात्तर हजार असतात. यापैकी केवळ बहात्तर अति महत्त्वाच्या आहेत. कंडा त्यांचे स्रोत आहे. इडा, पिंगला, सुषुम्ना, गांधारी, हस्तिजिव्हा, पुसा, यशस्विनी, अलंबुसा, कुहुस, शंखिणी या नावांनी दहा नाड्या ओळखल्या जातात. इडा डाव्या नाकपुडीत, पिंगला उजव्या नाकपुडीत, सुषुम्ना कवटीच्या रंध्रात, गांधारी डाव्या डोळ्यात, हस्तजिव्हा उजव्या डोळ्यात, पुसा उजव्या कानात, यशस्वीनी डाव्या कानात, अलंबुसा मुखात, कुहुस लिंगात आणि शंखिणी गुदद्वारात थांबते.

इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन नाड्या प्राणाचे मार्ग म्हणून कार्य करतात. प्राणायाम करून कुंडलिनी जागृत करण्यात त्यांचे योगदान आहे. तिसरी प्रधान असून पहिल्या दोन गौण आहेत. प्राण पिंगला तिसऱ्या नाडीतून भ्रमण करतो. त्याला अनेक ब्रह्मरंध्रांतून जावे लागते. **इडा** – चंद्र किंवा गंगा म्हणून **पिंगला** – सूर्य, मिहर किंवा यमुना म्हणून आणि **सुषुम्ना** – अग्नी किंवा सरस्वती म्हणून ओळखली जाते. इडा स्त्रीलिंगी तर पिंगला पुल्लिंगी असून त्या मृत्यूच्या निदर्शक आहेत. सुषुम्ना मृत्यूस खाऊन टाकणारी

नाडी आहे. इडा पृथ्वीमाता आहे. सुषुम्नेस ब्रह्मनाडी, शून्यपादवी, ब्रह्मरंध्र, महापथ, श्मशान, शांभवी, मध्यमार्ग, शक्तिमार्ग असेही म्हणतात. पाठीच्या कण्याशी तिचे तादात्म्य दर्शवले जाते. मूलाधारापासून ती निघते आणि कवटीखालपर्यंत मोकळ्या जागेत जाते. स्त्री–पुरुष मीलनातील आनंद जिथे उद्‌भवतो ती ही जागा आहे. लिंग संरचनेच्या डाव्या व उजव्या बाजूकडे इडा व पिंगला आलटून पालटून जातात. मळ सूत्राकार सुषुम्नेस ते प्रत्येक चक्रात फिरत जातात. भुवयांच्या खोबणीकडे त्यांचे प्रयाण सुरू होते. तेथे सुषुम्नेशी दुमडलेली गाठ तयार होते. डाव्या व उजव्या नाकपुड्यांकडे हा प्रवास असतो. कंडामध्येही सुषुम्नेशी अशीच गाठ तयार होते. इडा चंद्राच्या रंगासम फिकट, पिंगला चमकणाऱ्या लाल रंगाची आणि सुषुम्ना सूर्यासारखी प्रखर रंगाची असते. इडा व पिंगलाच्या मध्यभागी सुषुम्ना असते. तो कुंडलिनीचा मार्ग आहे. सुषुम्नेचे जे अधोमुखी दार आहे. त्याला ब्रह्मद्वार म्हटले जाते. सुषुम्ना इतर नाड्यांतून तिप्पट असून तिचा अंतर्भाग सूक्ष्म पण कठीण असतो. तिच्यातून अमृत स्रवते. मुद्रा आसने आणि कुंभकांच्या साह्याने नाड्या शुद्ध ठेवता येतात. प्राणायामही नाडी शुद्धीचे एक साधन आहे. चरबी वाढलेल्यांसाठी, कफप्रवृत्तीच्या लोकांसाठी षट्कर्मणी सांगितली जाते.

नाडीशुद्धतेने शरीरकांती झळाळते, शरीर कृश होते, आरोग्य संपदा लाभते, भूक लागते, दैवी आवाज ऐकू येतात, प्राणायाम परिणामकारकतेने करता येते. कुंडलिनी जागृत करण्यास मदत होते. मानवी शरीरातून शून्य चक्र, सहस्रदल चक्र, आज्ञाचक्र (द्विदल षटचक्र), सोळा दलांचे विशुद्ध चक्र, बारा दलांचे अनाहत चक्र, दहा दलांचे मणिपूर चक्र, सहा पानांचे अधिष्ठान चक्र, चार दलांचे मूलाधार चक्र व अग्निचक्र असते. ती सुषुम्नेची स्थानके असतात. त्यांच्यातून कुंडलिनी प्रवास करते व प्रत्येक स्थानक शिव आणि शक्तीच्या मीलनाचे केंद्र बनते. खेरीज एका त्रिकोणात योनी व लिंगाचे प्रतीक असते किंवा अक्षर आणि बिंदू किंवा वर्तुळ आणि चंद्रकोर असते. कमल दलांनी वर्णन केलेले असते. याला बिंदूसह बीज असे म्हणतात. प्रतीकात्मक रंगांचा आणि जनावरांचा उपयोग केला जातो. हठयोगात योग्यांसाठी कमलदले वैशिष्ट्यपूर्ण असतात. शेवटच्या कमलदलाचा अपवाद सोडला, तर इतरांना पीठ म्हटले जाते. ते शक्तीचे आसन असते. (डॉ. अलीम वकील – 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफी', पृ. ३१६–१८)

मानवी शरीरात सहा केंद्रे कमळाच्या पाकळ्यांच्या स्वरूपात दर्शविले जातात.

१) **मूलाधारचक्र** हे शिवणीच्या खाली चार पाकळ्यांच्या रूपाने मानले जाते.

२) **स्वाधिष्ठानचक्र** हे जननेंद्रियांच्यावर सहा पाकळ्यांमध्ये

३) **मणिपूरचक्र** हे नाभीस्थानाचे दशदल कमळ

४) **अनाहतचक्र** हे हृदयस्थानी बारा पाकळ्यांचे कमळ

५) **विशुद्धचक्र** – कंठस्थानी सोळा पाकळ्यांचे कमळ

६) **आज्ञाचक्र** हे भूमध्यस्थानी दोन्ही भुवयांच्यामध्ये दोन पाकळ्यांचे कमळ, तर सातवे

७) **सहस्रारचक्र** टाळूस्थानी सहस्र पाकळ्यांचे कमळ मानले जाते. सहा चक्रांचा भेद करून कुंडलिनीशक्ती या चक्रात स्थिर राहते.

### १३) योगसाधना : कुंडलिनीचा प्रवास*

योग्यांच्या साधनेमध्ये कुंडलिनीस ज्या चक्रांमधून प्रवास करावा लागतो ते पाहणे सयुक्तिक होईल.

**१) मूलाधारचक्र** – याला आधार, गुदाध्र, गुदस्थान, भूमंडळ, मूलचक्र असेही म्हणतात. सुषुम्नेशी हे जोडलेले असते. यात कमळाची चार दले असतात. त्यांचा रंग लाल असतो. चार पाकळ्यांवर व, श, ष, स सोनेरी अक्षरात लिहिलेले असते. ही अक्षरे ध्यानासाठी आहेत. कमळाच्या मध्यभागी पिवळा चौकोन असतो. त्याभोवती चकाकणारे आठ भाले असतात. हे चिन्ह पृथ्वीचे आहे. या भाल्यांची टोके स्त्रियांच्या वक्षस्थळांसारखी असतात. चौकोनाच्या मध्यभागी लाल त्रिकोण असतो. हा शीर्षावर उभा असतो. हे योनीचे प्रतीक असून त्याला कामरूप अशी संज्ञा दिली जाते. हे अग्निस्थळ म्हणूनही ओळखले जाते. ते सोन्यासारखे चकाकते. त्यामुळे कामभावना निर्माण होते. योनीत निसर्गत: लिंग उभे असते. त्याला हिऱ्यासारखी प्रकाश देणारी तबकडी असते. त्याला आठ वेढे देऊन विजेप्रमाणे चमकणारी कुंडलिनी असते. लिंगाचा उघडणारा भाग आपल्या मुखाने तिने बंद केलेला असतो. या ठिकाणी ब्रह्मद्वार असते. ती अमृत प्राशन करते आणि शब्दांचा स्रोत बनते. बहरलेल्या सोळा वर्षांच्या सुंदरीचे जसे ध्यान केले जाते, तसे कुंडलिनीचे ध्यान करायचे असते. त्रिकोणावर बीज असते. ते चक्राचे आकर्षण आहे. पिवळ्या 'ल' अक्षरात बीजमंत्र आहे. हा मंत्र पृथ्वी व इंद्राचा आहे. बीजावर इंद्राचा ऐरावत असतो. अक्षराच्या बिंदूवर चार मस्तकांचा व चार हातांचा ब्रह्मा आहे. तो एक कोटी सूर्यांसारखा तळपतो. तो हंसावर स्वार झालेला आहे. ब्रह्माशेजारी शक्ती डाकिणी आहे. ते कालीचे भयानक रूप आहे. ती नरभक्षिका असून लहान मुलांवर तिची वाईट नजर असते. त्यांचे काळीज ती खाते. तिच्याजवळ भाला, दंड, तलवार, मदिरेचा पेला आणि मानवी कवटी असते.

**२) स्वाधिष्ठान चक्र** – याला जलमंडलही म्हणतात. याचे स्थान पुरुष लिंग आहे. यात सहा कमलदले असून त्याचा रंग लाल व कडांवर नारिंगी होत जातो. ब, भ, म, य, र, ल ही अक्षरे सोनेरी रंगात कमल दलांवर लिहिलेली असतात. या चक्रात शरद ऋतूत असणाऱ्या चंद्रासारखा चंद्र असतो. तो अर्धा असतो. त्या चंद्रात वरुणाचा जलयुक्त प्रदेश असतो. चंद्राच्या प्रत्येक बाजूस आठ दलांचे एकेक कमळ असते. याचे केंद्रीय बीज पांढऱ्या अक्षरातील 'व'असते. वरुणाचा बीजमंत्र मकरावर आहे. मकर 'काम' भावनेचे वाहन आहे. बिंदूमध्ये चार हातांचा, तेजस्वी, निळ्या रंगाचा, पिवळ्या रंगाचा वेष परिधान केलेला, स्वस्तिक धारण केलेला, हार घातलेला, तेजस्वी हिरा धारण केलेला विष्णू आहे. त्याच्या हातात चक्र आहे, शंख आहे, दंड आहे व कमळ आहे. तो गरुडावर विराजमान आहे. त्याच्या शेजारी कालीची दैत्य सेविका आहे. या शाकिनीचा रंग निळा असून तिने हातात त्रिशूल, कमळ, डमरू आणि फरशी घेतली आहे. ती जीभ दाखवते आहे व तिच्या एका नाकपुडीतून रक्त येत आहे, असे तिचे वर्णन केले आहे. ती इच्छा पूर्ण करते. 'श्वा' मधून प्राण वर येतो, तेव्हा या परलिंगात तो विसावतो.

वर चर्चित दोन्ही चक्रांमध्ये इच्छावासनेचे प्रतीक योनीस्थान असते. पुरुष मूळ लिंगापासून प्रत्येक दोन-दोन बोटांच्या अंतरावर हे स्थान असते. यालाच शिव-शक्तीचे आनंद उपभोगण्याचे स्थानही म्हणतात. या सर्व वर्णनावरून असा अर्थ काढता येईल की, मानवी शरीरात अर्धनारी नटेश्वराचे अवशेष आहेत.

**३) मणिपूर चक्र –** याचे स्थान नाभी आहे. इथल्या कमळास दहा निळी दले आहेत. याची अक्षरे, ड, ढ, ण, त, थ, द, ध, न, प, फ ही आहेत. अग्नी आणि सूर्याचे हे स्थान आहे. याच्या मंडलात लाल त्रिकोण आहे. त्याच्या बाजूंवर तीन स्वस्तिके आहेत. याचा बीजमंत्र लाल रंगातील 'र' आहे. याचे केंद्र रजसचे (मासिक चक्राचे) स्थान आहे, तसेच सूर्यस्थान आहे. हे चक्र चंद्रातून स्रवणारे अमृत शोधून घेते. उगवत्या सूर्याप्रमाणे चमकणाऱ्या मेंढ्यावर बीज असते. त्रिकोणावर महारुद्र असतो. तो लाल रंगाचा त्रिनेत्र असतो. पण त्याने राख फासलेली असते आणि वरदानासाठी, अभयासाठी हात वर केलेले असतात; परंतु तो सृजक संहारक असतो. त्याच्या एका हातात शस्त्र असते, तर दुसऱ्या हातात रुद्राक्षमाला असेही त्याचे चित्र आहे. तो बैलावर बसलेला असतो. त्याच्या शेजारी लाकिनी शक्ती असते. तिच्या हातात अग्नी – अस्त्र असते. एका हातात वज्र, उरलेले दोन हातांनी रुद्रासारखे उंचावते. तोंडातून चरबी आणि रक्त ओघळल्याने तिचे स्तन रक्ताने व चरबीने माखलेले आहेत.

**४) अनाहत चक्र –** हृदयाचे कमळ अनाहत म्हणून ओळखले जाते. हे स्थान जीवात्म्याचे आहे. कोणत्याही दोन वस्तू एकमेकांवर न आदळता हा नाद तयार होतो. त्याचे घटकद्रव्य हवा आहे. सोनेरी रंगाची बारा अक्षरे बारा कमलदलांवर असतात. ही अक्षरे म्हणजे क, ख, ग, घ, ङ, च, छ, ज, झ, ञ, ट, ठ आहेत. याचे मंडल चमकदार लाल रंगाचे असते. यामध्ये धुरकट रंगाचा व सोनेरी रंगाचा दुहेरी त्रिकोण असतो. सोनेरी त्रिकोणात लिंग असते. त्याच्या शीर्षभागी पांढऱ्या रंगाची चंद्रकोर असते. याचा बीजमंत्र 'काळा य' हे असते. मंडलातच परंतु दुहेरी त्रिकोणावर आशीर्वाद व अभय देण्याच्या मुद्रेने ईश्वर बसलेला असतो. त्याला तीन डोळे असतात. त्याच्या समवेत काकिनी शक्ती असते. तिचे दोन हात ईश्वराप्रमाणेच असतात. उरलेल्या दोन हातात एक फासा असतो व मानवी कवटी असते. ती लाल कमळावर बसते आणि काळविटाच्या कातड्याचे वस्त्र पांघरते. अनाहतखाली आठ कमलदले असतात. कमल कल्पतरूप्रमाणे इच्छा पूर्ण करते.

**५) विशुद्ध चक्र –** हे चक्र कंठात असते. यालाच कंठदेश, चंद्रस्थान, जालंधरपीठ, भारतीस्थान असेही म्हणतात. जिथे खेचरी मुद्रेचा प्रयोग होतो तिथे व्योम चक्र, नभोमंडल असते. उदान (उडान) चे हे वास्तवस्थान आहे. याचे घटकद्रव्य निरभ्र आकाश आहे. या कमळात सोळा दले आहेत. त्यांचा रंग धुळकट जांभळा असतो. त्यावर तांबड्या रंगात अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ॠ, ऌ, ॡ , ए, ऐ, ओ, औ, अं, अः हे सोळा स्वर लिहिलेले आहेत. दलाच्या मंडलात निळे आकाश आहे. त्यात स्फटिकाप्रमाणे पांढरा त्रिकोण आहे. त्यात वर्तुळाकार चंद्र आहे, ज्यात पांढरा हत्ती दिसतो. 'ह' हा निरभ्र आकाशाचा बीजमंत्र आहे. बीज सदाशिव आहे. त्याचे अर्धे शरीर सोन्याचे तर अर्धे चांदीचे आहे. तो बैलावर बसला असून त्याला पाच मुखे आहेत, तीन डोळे आहेत, राख लावलेली आहे. त्याने सिंहाचे कातडे पांघरलेले असून त्याच्या गळ्यात सर्प आहे. हातांमध्ये त्रिशूळ, कुऱ्हाड, वज्र, अग्नी, घंटा, फासे, भाले आहेत. आता त्याच्याबरोबर गौरी दिसते. ती शिवाचे अर्धे शरीर आहे. तिला सुंदर दहा हात आहेत. तिला पाच चेहरे व तीन-तीन डोळे आहेत. तिच्याजवळ फासा, भाला, ग्रंथ असून तिचे हावभाव शुभसूचक आहेत.

**अजना – उड्डियान –** दोन्ही भुवयांच्या पाठीमागे दोन पांढरी कमलदले आहेत. त्यावर ह, क्ष ही अक्षरे दिसतात. त्यांना कलांची बीजे म्हटले जाते. चंद्राचा एक सोळांश भाग शिव धारण करतो. बुद्धी, अहंकार, मानस, इंद्रिय व्यवहार यांचे हे चक्र आसन असते. हे हालचालींवर नियंत्रण करते. यात अखंड आनंद आहे. या कमळाचे मंडल पांढरे असते. त्यात पांढऱ्या रंगाचा त्रिकोण असतो. त्यात पांढऱ्या रंगाचे इतर लिंग असते. इथे परमशिव आहे. या चक्राचा बीजमंत्र 'उ' ओम असतो. हा अंतरात्मा शुद्ध असतो आणि बुद्धी ही ज्योतिसमान असते. त्यावर चंद्रकला, त्यावर 'म' (मकार), त्यावर पुन्हा अर्धा चंद्र असतो. या कमळाची देवता हाकिनी असते. तिला चंद्रासमान उजळ सहा चेहरे असतात. तिला सहा हात असतात. चार हातात ग्रंथ, कवटी, डमरू, जपमाळ असून दोन हात शुभसूचक म्हणून वर उचललेले असतात.

**६) निर्वाणचक्र (आज्ञाचक्र)–** कुंडलिनी जागृत होऊन तिने कवटीच्या मध्यभागी असलेल्या रंध्रापर्यंत प्रवास केला की, ते निर्वाणचक्र असते. हा आनंदाचा परमोच्च बिंदू असतो. सुषुम्नेच्या अंतिम टोकावर हे चक्र असते. या कमळास सहस्र दले असतात. याला **सहस्रार** म्हणतात. त्यात वीस हजार अक्षरे असतात. कमळात पूर्ण चंद्र असतो. त्यात त्रिकोण असतो. त्यात शून्य असते. हा सूक्ष्म बिंदू असतो. परम बिंदू म्हणजे ईश्वर. ब्रह्माचा येथे निवास असतो. बिंदूवर संकिनी देवी असते, जी सृजन करते, संपोषण करते व विनाश करते. या ठिकाणी अंतिम मीलन होते. या अवस्थेला **उन्मनी** म्हणतात. भौतिक जगाशी नाते तुटून प्रचंड आनंदाची अनुभूती होते. शिव भ्रांतिमुक्त, निर्वाण शक्तियुक्त स्थितीत उभा असतो. सहस्रारमध्ये तीन बिंदू असतात. 'हं' पुल्लिंगी तर उरलेले दोन 'सा' स्त्रीलिंगी आहेत. ते प्रकृतीनिदर्शक आहेत. हे दोन बिंदू विसर्ग (:) तयार करतात. त्यामुळे हे मीलन हंसाह (हंसाः) असे तयार होते. शिवाचे अर्धे शरीर नादाशी एकरूप होते. त्यांच्या खाली चक्रामध्ये सृजन करणाऱ्या मीलनाची अनेक रूपे आहेत. कुंडलिनीचा ऊर्ध्व प्रवास विलयाची पातळी गाठणारा आहे.

डॉ. वसंत रेळेंनी या पक्रियेचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे. ते म्हणतात, ''जेव्हा योगी आपली स्वयंचलित मस्तिष्कव्यवस्था विकसित करतो, तेव्हा तिच्यात इतका मग्न होतो की, सुषुम्ना नाडीची शारीरिक कार्ये, बाह्य जगाशी असणाऱ्या संबंधांचे ज्ञान अस्तित्वातच राहत नाही. तो स्वतः सृष्टीत पसरून त्याच्याशी एक होतो. जेव्हा कुल कुंडलिनी जागृत होते किंवा कृतिशील होते, तेव्हा विविध चक्रांमधून ती आपला मार्ग तयार करते व त्यांनाही कार्यरत होण्यास उद्युक्त करते. जशी ती टप्प्याटप्प्याने पुढे जाते तसतसे मन उघडत जाते. ती मेंदूपर्यंत पोहोचली की, योग्याला साक्षात्कार होऊन त्याला आश्चर्यजनक सामर्थ्य प्राप्त होत असते. योगी पूर्णतः आपल्या शरीरापासून, मनापासून बंधमुक्त होऊन त्याचा आत्मा सर्व दृष्टीने स्वतंत्र होतो. योगी जेव्हा कुंडलिनीचे नियंत्रण कुशलतेने करतो तेव्हा त्याचा आत्मा ब्रह्मरंध्रातून जेथे तो बंदिस्त असतो, तेथून बाहेर पडतो. त्याला हालचाल करायला मेंदूभोवती अधिक जागा शोधतो. तसेच कण्यात ज्याला आकाश म्हणतात ती जागा सोडतो आणि अमर्याद बुद्धीत विलीन होतो, जेथे त्याचा उगम झाला होता. योगी निर्विकल्प समाधीत ज्याची त्याने खूप इच्छा केली. त्याच्याशी तादात्म्य पावतो आणि त्याला नैसर्गिक शक्ती प्राप्त होतात. म्हणून मी कुंडलिनी योगाची अशी व्याख्या करीन की, **कुंडलिनी योग** म्हणजे शारीरिक व मानसिक अभ्यासाचे असे स्वरूप की, ज्याच्या साह्याने व्यक्ती तिच्या मस्तिष्क व्यवस्थेवर

अशा प्रकारे नियंत्रण ठेवते की, ती अनंताशी समन्वयित होते.'' (*डॉ. अलीम वकील – 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी', पृ. ३१८–२३)

**कुंडलिनीची ओळख**

मनुष्य प्राणी सुखी जीवनासाठी एकीकडे धन ऐश्वर्याच्या प्राप्तीमध्ये प्रयत्नशील असतो तर दुसरीकडे आपले अंतर्निहित दैवी अनुदान अंतर्चेतनेस जागृत करून अपार शक्तीस अर्जित करण्यासाठी वेगवेगळे उपाय शोधू लागतो. कुंडलिनी शक्ती त्याचाच परिणाम आहे. ही अपार शक्ती सिद्धी आणि मुक्ती प्रदान करण्यास सक्षम असते. ही शक्ती अशक्यास शक्य करू शकते. लौकिकास अलौकिकाशी जोडू शकते. प्राचीन मुनी याच शक्तीच्या बळावर आपल्या हृदयाच्या ठोक्यास (कंपनास) नियंत्रित करून जमिनीवर किंवा पाण्यामध्ये दीर्घ समाधी घेत असत. ऋग्वेदामध्ये हिला वाक आणि तंत्रामध्ये वागेश्वरी म्हणतात. पाश्चात्य जगामध्ये हिला 'सर्प शक्ती' असे म्हणतात. काही लोक हिला विद्युत शक्ती किंवा वैश्विक विद्युच्छक्ती असे म्हणतात. ही शक्ती सर्पाकार किंवा चक्राकार चालते. यामध्ये अग्नीची ऊर्जा आणि प्रकाश असतो आणि ही ज्या तत्त्वामधून प्रयाण करते (वाहते) त्यास आपल्या गुणांनी युक्त करते.

माणसाच्या शरीरामध्ये असलेल्या तीन लाख पन्नास हजार (३,५०,०००) नाड्यांमधून प्रवाहित होणारी कुंडलिनी (शक्ती) ही शरीर, मन आणि आत्म्यास अद्‌भुत शक्ती प्रदान करते. आपल्या मानवी शरीरामध्ये १) सुषुम्ना, २) इडा, ३) पिंगला, ४) गांधारी, ५) हस्तिजिव्हा, ६) कुहु, ७) सरस्वती, ८) पूषा, ९) शंखिनी, १०) पयस्विनी, ११) कारुणी, १२) अलंबुजा, १३) विश्वोदरी आणि १४) यशस्विनी (यशस्विनी) या चौदा प्रमुख नाड्या आहेत. या सर्वांमधून कुंडलिनीचे प्रवाहित होणे अत्यंत महत्त्वपूर्ण असते. योग्यास यम, नियम, सत्य, संयम, संतोष, ब्रह्मचर्य अपरिग्रहाचे पालन केले पाहिजे.

मानवी शरीरामध्ये शक्तीचे सहा मुख्य केंद्र मानले गेले आहेत. (कोठे कोठे आठ मानले गेले आहेत.) १) मूलाधार, २) स्वाधिष्ठान, ३) मणिपूर, ४) अनाहत, ५) विशुद्ध आणि ६) आज्ञा चक्र इतरत्र सूर्य चक्र आणि चंद्र चक्राचे पण वर्णन आहे. हे मणिपूर चक्राच्या वर आहेत.

कुंभक प्राणायाम द्वारे मूलाधार स्थित अग्नीची वृद्धी (वाढ) होते. या अग्नीच्या वृद्धीमुळे कुंडलिनी जागृत केली जाते. ही सुषुम्ना नाडीमधून जात सर्व चक्रांना वेढते आणि त्यांच्या शक्तीस ग्रहण करत शेवटी सहस्रारमधये प्रवेश करून ऊर्ध्व कुंडलिनीपासून मुक्त (स्वतंत्र) होते. त्या वेळेस मेंदूमध्ये प्रकाशाची अनुभूती होते. मनोनिरोध पण कुंडलिनीस जागृत करण्यामध्ये सहाय्यक सिद्ध होते. इष्टमंत्राच्या जापामुळे मनोनिरोध होते (बनते). निर्जनमध्ये त्राटक नेत्र ज्योती पण वाढते.

मूलाधार चक्रामध्ये कुंडलिनी सुषुम्न अवस्थेमध्ये असते. ही अग्नी स्वरूपा आहे. योगिक उपायाने या अग्नीस प्रज्वलित केले जाते. जागृत कुंडलिनी मेरूदंडामध्ये स्थित सुषुम्ना मार्गे इडा (सूर्य) आणि पिंगला (चंद्र) च्या मदतीने वरच्या बाजूस प्रवाहित होऊ लागते आणि क्रमश: स्वाधिष्ठान, मणिपूर, सूर्य, चंद्र, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञा चक्रास जागृत करत आणि अनुप्राणित करून सदाशिवाशी एकाकार होऊन जाते.

विभिन्न चक्रांमध्ये जागृत होण्याचे फायदे आहेत. मूलाधारामुळे स्थिर धन संपत्ती, समृद्धी, साहस आणि बल प्राप्त होते. स्वाधिष्ठान चक्रामुळे प्रत्येक काम सफल होते आणि विकार नष्ट होतात. मणिपूर चक्रामुळे नवशक्ती आणि आत्मरक्षेच्या क्षमतेमध्ये वाढ होते. याचबरोबर स्वाधिष्ठान चक्र पण जागृत झाल्यामुळे मनोविकार नष्ट होऊन अज्ञानामध्येच मनुष्य ईश्वराशी साक्षात्कार करू शकतो. अनाहत चक्राच्या आधारे अंतर्दृष्टी प्राप्त होते आणि परामनोवैज्ञानिक शक्ती प्रवाहित होऊ लागतात.

विशुद्ध चक्र ज्याला विज्ञान जगतामध्ये कंठ-मणी किंवा गलग्रंथीचा चत्मकार मानला जातो. वास्तविक विशुद्ध चक्राची जागृतीच आहे. यामुळे दिव्यश्रुती प्राप्त होते. आज्ञा चक्र हे पोषग्रंथी किंवा शीर्षस्थ ग्रंथी आणि शंकुरूप ग्रंथींमध्ये दोन भागांमध्ये स्थित आहे. जेव्हा कुंडलिनी येथे प्रवेश करते तेव्हा एक धनात्मक आणि दुसरी ऋणात्मक गतीनिशी तीव्रपणे फिरू लागते. दोहोंची तारतम्यता एका चंद्राची सृष्टी करते. याचे जागृत होण्यामुळे मानवाचे तिसरे नेत्र उघडले जाते, विशुद्ध आकाश अद्‌भुत प्रकाशाने चमकू लागते. यामुळे प्राप्त होणाऱ्या दिव्य दृष्टीमुळे मनुष्य अमरत्व प्राप्तीकडे आगेकूच करतो. कुंडलिनीच्या याच शेवटच्या त्यागाच्या मदतीने अष्टसिद्धी प्राप्त केली जाऊ शकते. १) अणिमा (शरीरास हलके करणे), २) महिमा (शरीरास वाढविणे), ३) लघिमा (शरीरास लहान करणे), ४) गरिमा (गौरवशाली बनविणे), ५) ईशित्व (सर्वांना मोहवश करणे), ६) वशित्व (सर्वांना वश करणे), ७) प्राप्ती (अप्राप्ताचे प्राप्त करणे) आणि ८) प्रकंप (मान प्रतिष्ठा प्राप्त करणे) या अष्टसिद्धी आहेत.

आज्ञाचक्राच्या वर ब्रह्मरंध्र किंवा सहस्रार आहे. याचे स्थान मेंदूच्या अग्रभागाच्या विवरामध्ये आहे. यामध्ये पद्‌माचे सहस्रदल दिसून येतात. शेवटी कुंडलिनी यालाच प्रज्ज्वलित करते. ही साधनेची अंतिम सीमा होय. या शक्तीच्या जागृतीनंतर आत्मा आणि शरीरावर मनुष्याचा पूर्ण अधिकार होऊन जातो. तेव्हा तो इच्छेनुसार आत्म्यास देहाच्या बाहेर किंवा देहाच्या आत ठेवण्यास स्वतंत्र असतो. त्या स्वतंत्र विहारास उपनिषदामध्ये 'कामचार' म्हटले गेले आहे. देवी कुंडलिनी सदाशिवासी एकाकार होऊन जाते. हीच सर्वज्ञता किंवा सिद्धी होय. कुंडलिनी जागृती सर्वसाधारण मनुष्याच्या आवाक्यातील गोष्ट नव्हे.

**१४) हठयोग**

मन आणि इंद्रियांचे सहज निरोधच हठयोग मार्ग आहे. नाथपंथामध्ये हठयोगाचे महत्त्व विशेष आहे. या योगात प्राण व अपान यांना प्राणायामाने ताब्यात घेण्याचे कार्य असते. हठयोगाची उत्तमावस्था म्हणजे राजयोग व प्रथमावस्था म्हणजे मंत्रयोग. मंत्र, हठ, राज, ध्यान इत्यादी एकंदर १८ योग आहेत. राजयोग म्हणजे सहज समाध्यवस्था होय. तिच्या प्राप्तीस्तव प्रथम हठयोगाचा अभ्यास करावा लागतो. नाथपंथी साधना पद्धतीस हठयोगाची संज्ञा दिली जाते.

ज्ञानाच्या भूमिका हठयोगाने प्राप्त होतात. ज्ञानाच्या सात भूमिका योग वसिष्ठात दिलेल्या आहेत. ते याप्रमाणे - १) समुदाह्रता, २) तनुमानसा, ३) सत्त्वापत्ती, ४) संसक्तिनामिका, ५) पदार्थभाविनी, ६) शुभेच्छा आणि ७) तुर्यगा. तुर्यगा अवस्थेत मनुष्य जीवमुक्त होतो.

अणिमा, गरिमा, महिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशत्व आणि वशित्व या आठ सिद्धी हठयोगाने मिळतात. अत्याहार, प्रयास, फार बोलणे, जनसंग, चंचलता हे सर्व टाकून उत्साह, साहस, धैर्य, तत्त्वज्ञान,

निश्चय, जनसंगपरित्याग या अंगांच्या अभ्यासाने ते हठयोगाची सिद्धी लवकर प्राप्त होते. हठाची अंगे चार आहेत. १) आसन, २) कुंभक, ३) मुद्राकरण आणि ४) नादानुसंधान. आसने ८४ असून त्यामुळे शरीरास स्थैर्य, आरोग्य व चपलपणा प्राप्त होतो. निरनिराळे रोग आसनामुळे जातात. शरीर प्रतिकारक्षम बनते.

ब्रह्मरंध्रात प्राण जर २० सेकंद स्थिर राहील तर त्यास प्रत्याहार, दोन तास (घंटे) स्थिर राहिल्यास धारणा, २४ तास स्थिर राहिल्यास ध्यान आणि १२ दिवस कुंभक राहिल्यास समाधी अशी नावे आहेत.

युक्त प्राणायामाने सर्व रोग नाहीसे होतात, तर अयुक्त प्राणायामाने नसलेले उद्‌भवतात, हे लक्षात ठेवावे. मुद्रांचा अभ्यास केल्याने आठ सिद्धी लाभतात. मन आत्म्याशी एकरूप होणे म्हणजे समाधी. समाधी म्हणजे मनाची अचंचल किंवा एकाग्र अवस्था. सर्व ज्ञेय वस्तूंचा त्याग करून व शरीरात ऐकू येणाऱ्या नादांचा लय करून जिवाशिवाच्या विलयाने समाधी लागते. हे हठयोगाचे शेवटचे ध्येय आहे. समाधिस्थ योगी मृत्यूपासून दूर असतो. हठयोगाच्या विविध क्रिया-प्रतिक्रियांमध्ये प्राणायामाचे स्थान फार वरचे आहेत. शक्तिप्रकटनाचे एकमेव कार्य प्राणायामाच्याद्वारे करता येते.

शास्त्रीय प्राणायामाचा अभ्यास म्हणजे श्वास आत घेणे याला **पूरक** म्हणतात. नंतर निरोध म्हणजे **कुंभक**, नंतर **रेचक** म्हणजे श्वास बाहेर सोडणे. पुन्हा निरोध म्हणजे कुंभक (श्वास बाहेर किंवा आत न घेणे) अशा चार क्रिया होत. या क्रिया विविध पद्धतींनी करून दोन्ही कुंभकांची कालमर्यादा वाढविणे. ही कालमर्यादा क्रमाने वाढवावयाची असते. ही कालमर्यादा जितकी वाढेल तितका प्राणायामाचा अभ्यास वाढला व अशा अभ्यासू माणसाच्या शक्ती वाढल्याचेही त्याच्या व इतरांच्या अनुभवास येते. हठयोगाच्या विविध क्रिया-प्रतिक्रियांमध्ये प्राणायामाचे स्थान फारच वरचे आहे.

**१५) योगाचे चार प्रकार**

१) हठयोग, २) मंत्रयोग, ३) लययोग आणि ४) राजयोग असे योगाचे चार प्रकार आहेत.

**१) हठयोग** – हठयोगाचे आद्य उपदेशक आदिनाथ शिव मानले जातात. इंद्रियनिग्रह, प्राणसाधना आणि मनसाधना, या तिन्हींच्या सम्मिलित रूपास नाथ-पंथामध्ये 'त्रिविधसाधना' म्हणून संबोधले जाते. इंद्रिय निग्रहामुळे आसन, प्राणसाधनेमुळे प्राणायाम आणि मनसाधनेमुळे प्रत्याहारची साधना सफल होते. यानंतर साधकामध्ये नाडी साधन आणि कुंडलिनी जागरणाच्या शक्तीचा आविर्भाव होतो. नाथ-पंथींच्या साधना पद्धतीस हठयोगाची संज्ञा दिली जाते.

हठयोगासाठी यम-नियमाचे पालन आवश्यक आहे. हठयोगाच्या साधनेचे चरम लक्ष्य आहे राजयोगाची उपलब्धी. हठयोगाचे चार भाग (अंग) आहेत – १. आसन, २. प्राणायाम, ३. मुद्रा आणि ४. नादानुसंधान. शेवटचा भाग लय योगांतर्गत येतो. सिद्ध सिद्धान्त पद्धतीमध्ये 'ह' चा अर्थ सूर्य आणि 'ठ' चा अर्थ चंद्र होतो असे सांगण्यात आले आहे. अशा प्रकारे सूर्य आणि चंद्राच्या योगासच हठयोग म्हणतात. ब्रह्मानंद यांच्या मतानुसार 'सूर्या'चे तात्पर्य प्राणवायूशी आहे तर 'चंद्रा'चे तात्पर्य अपानवायूशी. या दोन्हींचा योग अर्थात प्राणायामाने वायूचे निरोध करणेच हठयोग आहे. दुसरी व्याख्या अशी आहे की, सूर्य इडा नाडीस म्हणतात आणि चंद्र म्हणजे पिंगला नाडी. म्हणून इडा आणि पिंगला नाड्यांना थांबवून सुषुम्ना मार्गे प्राणवायू संचरित करण्यास पण हठयोग म्हणतात.

**२) मंत्रयोग –** मंत्रयोगामध्ये श्वासोच्चारण करताना 'ह' आणि 'स' वर्णाक्षरांचे निस्सरण होते. कुंडलिनी जागरणाच्या वेळेस हेच मंत्र सुषुम्नेमध्ये 'सोऽहं' मध्ये रूपांतरित होऊन जाते आणि योगी परमतत्त्वाशी अभेदावस्था अनुभव करू लागतो. चित्तवृत्तींच्या निरोधासाठी हठयोगाच्या कष्टसाध्य क्रिया निम्नकोटीच्या मानल्या गेल्या आहेत. विशिष्ट युक्तीसह प्राणायामची साधना करत मंत्र किंवा नाम-जपाद्वारे मनास हळूहळू स्थिर करण्याच्या क्रियेस **मंत्रयोग** म्हणतात. जपासोबत प्राण आणि मनाचे निरोध सहजपणे होऊन जाते आणि चित्त वासना सुखाचे तिरस्कार करून समाधिजन्य सहज सुखाचा आनंद उपभोग करू लागते. म्हणून याला **सहजयोग** पण म्हणतात.

**३) लययोग –** 'हठयोग-प्रदीपिका' मध्ये लययोगाविषयी लिहिले आहे, ''लयोविषय विस्मृति:'' अर्थात विषयांची विस्मृती लय आहे. लययोगाच्या साधनेमध्ये त्रिकुटीमध्ये मनास केंद्रित करणे आवश्यक आहे.

**४) राजयोग –** मानसिक वृत्तींच्या निरोधाचे समस्त अंतर्मुखी प्रक्रियांचा समाहार राजयोग मध्ये होतो. योगाच्या या उच्चतम सोपानावर पोहोचल्यानंतर कोणत्याच प्रकारचे बाह्य क्रियाकलापाची आवश्यकता राहत नाही. योगाच्या अनेक पद्धतीत हा योग राजासारखा शोभतो. म्हणून याला राजयोग अशी संज्ञा आहे. शरीरांतर्गत अणुमय मनावर ताबा ठेवून त्याचा शुद्ध व चिरसंकल्परूप ज्ञानमय, विभुमय मनाशी योग आणावयाचा हे राजयोगाचे ध्येय असून त्यासाठी साधकाला या योग सोपानाच्या आठ पायऱ्या चढाव्या लागतात. म्हणून याला 'अष्टांगयोग' असेही एक नाव आहे. राजयोगशास्त्राचा आधारग्रंथ म्हणजे भगवान पतंजलीची योगसूत्रे हा होय. 'अष्टांगयोगा'च्या आठ पायऱ्या अशा आहेत - १) यम, २) नियम, ३) आसन, ४) प्राणायाम, ५) प्रत्याहार, ६) धारणा, ७) ध्यान आणि ८) समाधी.

प्राणायामाच्या अभ्यासासाठी स्थिर किंवा दृढचित्त होऊन बसण्याच्या क्रियेस **आसन** असे नाव आहे. आसन मुख्यत्वे चार आहेत - सिद्धासन, पद्मासन, सिंहासन आणि सद्रासन. यापैकी सिंहासनाचे विशेष महत्त्व आहे. कारण याला बहात्तर हजार नाड्यांचे शोधन करणारे आणि मोक्ष-कपाटाचे भेदन करणारे असे मानण्यात येते. आसनाद्वारे स्थिर चित्त झाल्यावर मनास स्थिर करण्यासाठी वायू निरोध अर्थात प्राणायाम आवश्यक आहे. याचे तीन घटक (अंग) आहेत. १) पूरक, २) रेचक आणि ३) कुंभक. आसनामध्ये स्थितप्रज्ञ होऊन प्राणवायूस हळूहळू आत ओढण्यास **पूरक** म्हणतात आणि काही क्षण आत कोंडून धरून ठेवण्यास **कुंभक** म्हणतात, तर नंतर पुन्हा हळूहळू प्राणवायूस शरीराबाहेर काढण्यास **रेचक** म्हणतात. शरीरामध्ये बहात्तर नाड्या असल्याचे मानले गेले आहे; परंतु त्यापैकी तीन सर्वप्रमुख आहेत - १) इडा, २) पिंगला आणि ३) सुषुम्ना. यापैकी पहिली आणि दुसरी संसारी आणि तिसरी आध्यात्मिक नाडी आहे. प्राणसंचाराची क्रिया संसारी नाड्यांमुळे होते आणि सुषुम्ना ही नाडी प्राय: सुप्त पडलेली असते. इडा डावीकडची तर पिंगला ही उजवीकडची नाडी आहे. या दोहोंच्या मध्ये सुषुम्ना आहे. यामधूनच कुंडलिनी शक्ती वरच्या बाजूस प्रवाहित होते. प्राणायामाचा मुख्य हेतू प्राणवायूस सुषुम्नामध्ये प्रवेश करविण्याचे आहे. तेव्हाच प्राण स्थिर होते. त्यानंतर मन पण स्थिर होऊन सूक्ष्म परमतत्त्वाकडे उन्मुख होते. प्राणवायूस

सुषुम्नामध्ये प्रवेश करविण्यासाठी कुंडलिनीस जागृत करावे लागते. नाथ सिद्धांच्या मते महाकुंडलिनी नावाची एक शक्ती आहे. ही समस्त सृष्टीमध्ये विख्यात आहे. व्यष्टी (व्यक्ती) मध्ये व्यक्त झाल्यावर याच शक्तीस कुंडलिनी म्हणतात. ''पाठीमध्ये असलेले मेरूदंड जे सरळ जाऊन पायु आणि उपस्थाच्या मध्यभागी जाऊन मिळते, तेथे एक स्वयंभू लिंग आहे, जे एक त्रिकोण चक्रामध्ये अवास्थित आहे. याला **अग्निचक्र** म्हणतात. याच त्रिकोण किंवा अग्निचक्रामध्ये असलेल्या स्वयंभू लिंगास साडेतीन वलयांमध्ये गुंडाळून सर्पिणीसारखी कुंडलिनी अवस्थित आहे.'' (डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी - 'कबीर', पाचवे संशोधित संस्करण १९५५, पृ. ४४). सुषुम्नाच्या मार्गामध्ये कमल पुष्पवत् षट्चक्र क्रमश: अशा प्रकारे आहे - मूलाधार (चार दले), स्वाधिष्ठान (सहा दले), मणिपूर (दहा दले), अनाहत (बारा दले), विशुद्ध (सोळा दले), आज्ञा (दोन दल - पाकळ्या) या चक्रांचे शरीरामधील स्थान क्रमश: गुदाउपस्थकाचे मध्यभाग मेट्र, नाभिदेश, हृदय, कंठ आणि त्रिकुटीवर आहे. कुंडलिनी या षट्चक्रांचे वेध घेत शेवटी सहस्रदल कमळामध्ये पोहोचते. येथेच शून्य चक्र आहे. येथे जीवात्म्यास पोहोचविणे योग्याचे चरम लक्ष्य असते.

कुंडलिनी जेव्हा जागृत होऊन वर उठते तेव्हा तिच्यामुळे स्फोट होतो. याला 'नाद' म्हणतात. हा नाद वास्तविक अखिल ब्रह्मांडामध्ये व्याप्त अनहद नादाचे व्यष्टीमध्ये व्यक्त रूप आहे. प्राणवायू जेव्हा सुषुम्ना मार्गामधून षट्चक्रांचे वेध घेत टाळूच्या मुळापासून डोक्यापर्यंत असलेले सहस्रारच्या ब्रह्मरंध्राकडे उन्मुख होतो, तेव्हा शरीरामध्ये अनेक विचित्र आवाज (ध्वनी) ऐकू येऊ लागतात. प्राण स्थिर राहून शून्य मार्गाने निरंतर त्या अनहद नादाचे श्रवण करतो. सुरुवातीस शरीरामध्ये मेघगर्जनेचा आवाज ऐकू येतो. त्यानंतर मर्दल, शंख, घंटा - यांचा मंद आवाज ऐकू येतो. शेवटी किंकिणी, मुरळी, वीणा आणि भ्रमर - गुंजनाचा मधुर ध्वनी साधक ऐकू लागतो. आज्ञाचक्राचा वेध घेतल्यानंतर मन, प्राण आणि नाद या तिन्हींचा लय होऊन जातो. ज्याप्रमाणे मकरंद पात करणारे भ्रमर, गंधाकडे मुळीच लक्ष देत नाही, त्याचप्रकारे योग्याचे नादामध्ये आसक्त चित्त नादमध्येच रमून जातो. त्याचे मन निर्विषय होऊन जाते. ज्ञाता-ज्ञेयाचे अंतर समाप्त झाल्यानंतर निर्विकल्प समाधिमध्ये तल्लीन योगी, सहज आत्मसुखाचे अनुभव करू लागतो. योगसिद्धीमध्ये मुद्रांचे महत्त्व पण काही कमी नाही. मुद्रेचे प्रमुख उद्देश्य शक्तीस निम्न गामी विपरीत दिशापासून हटवून वरच्या बाजूस ओढून घेणे आहे. मुद्रा - अभ्यासानेच कुंडलिनी जागरण होते. मुद्रा दहा सांगितल्या गेल्या आहेत; परंतु यापैकी खेचरी मुद्रा प्रमुख आहे. खेचरी मुद्रेमध्ये दृष्टीस त्रिकुटीमध्ये स्थिर करून, योगी जिभेस उलटे करून तालु-विवरामध्ये प्रविष्ट करवितो. यालाच 'गो-मांस-भक्षण' असे म्हणतात. कारण 'गो' चा अर्थ आहे जिव्हा आणि तिला उलटून तालु प्रदेशामध्ये प्रविष्ट करविण्यास 'गो-मांस भक्षण' म्हणतात. मोठी साधना आणि अथक अभ्यासानंतर साधक या मुद्रेमध्ये यशस्वी होतो. जर योगी याला क्षणभर सुद्धा प्राप्त करू शकला तर तो समस्त सांसारिक विष - व्याधींपासून मुक्त होऊन शुद्ध-बुद्ध निर्मल स्वभाव होऊन जातो. ब्रह्मरंध्राचे सहस्रदल कमळाच्या मुळामध्ये जे योनी नामक त्रिकोणाच्या आकाराचे शक्ती केंद्र आहे, त्यामध्ये चंद्रमाचे निवास असल्याचे सांगतात. येथे निरंतर अमृताचा स्राव होत असतो. येथे 'अमर-वारूणी' आहे. याचे प्राशन करून योगी जरा-मरणाच्या अवस्थांपासून अतीत होऊन अमर बनून जातो.

### १६) सिद्धी वा सिद्धी-क्रिया

महर्षी पतंजली यांचे मूळ पातंजल दर्शन चार चरणां (पादां) मध्ये विभाजित आहे. यापैकी कैवल्यपाद नामक चतुर्थ चरणाच्या प्रारंभी जन्म, औषधी, मंत्र, तप आणि समाधिमुळे निर्माण होणाऱ्या पाच प्रकारच्या सिद्धींची चर्चा केली गेली आहे. पूर्व जन्माच्या संस्कारामुळे काही लोक विशेष सिद्धी जन्मापासूनच धारण करतात. या **'जन्मजा' सिद्धी** आहेत. कपिल, वेद व्यास, शुकदेव इत्यादी असेच महर्षी होते. रसायनादी औषधांच्या सेवनामुळे मनुष्य आपल्या शरीराचे कल्प करून अपूर्व शक्तिशाली बनतो. याला **'ओषधिजा' सिद्धी** म्हणतात. विलक्षण शक्ती प्राप्त करण्यासाठी एखाद्या मंत्राच्या अनुष्ठानाने शक्तीचे प्रादुर्भाव होणे म्हणजे **'मंत्रजा' सिद्धी** होय. तपस्येमुळे प्राप्त होणारी **'तपजा' सिद्धी** असते आणि धारणा, ध्यान व समाधीच्या अभ्यासाने शरीर, इंद्रिये आणि चित्तामध्ये जो अपूर्व शक्तींचा विकास होतो त्यास **'समाधिजा' सिद्धी** असे म्हणतात. यामुळेच कैवल्य प्राप्ती शक्य आहे. बाकीच्या सिद्धी भलेही लोकप्रतिष्ठा मिळवून देत असतील, तरी पण कैवल्याची प्राप्ती करून देण्यामध्ये त्या असमर्थ असतात. अशा या पंचसिद्धी आहेत.

**सिद्धी प्राप्तीचे लक्षण**

षट्चक्र भेदन स्थितीनंतर बहिर्मुख मनास अंतर्मुख बनविण्यासाठी आत्मचिंतनाचे सर्वात शक्तिशाली माध्यम आहे. अजपाजप. अनुभवी योग्यांनी याला सहज जप म्हटले आहे. त्यांच्या मतानुसार मनुष्य दररोज २१,६०० वेळा श्वास घेतो. यापैकी प्रत्येक श्वासामधील अद्वैतभावनाच अजपाजप आहे. प्रत्येक श्वास ब्रह्मभावनामध्ये परिवर्तित होऊन जप कार्यामध्ये व्यस्त असते.

रात्रंदिवस प्राणवायूच्या संचलनाने 'सोऽहम् हंसा'चा जाप श्वासाद्वारे चाललेले असते. त्या पवन मंत्राचे मूळ ॐकार आहे. त्यानेच सर्व सृष्टी निर्माण झाली आहे. तेच संपूर्ण जगामध्ये व्याप्त आहे. तेच प्रत्येक शरीरामध्ये प्रवाहित होत आहे. जेव्हा श्वास-क्रियाच जप-क्रिया होऊन जाते. तेव्हा अनाहत नाद स्वतःच उत्पन्न होते आणि सुषुम्नामध्ये सूर्योदय होतो आणि रोम-रोमामध्ये तुतारी वाजू लागते आणि ब्रह्मरंध्रामध्ये ज्योती प्रकाशित होऊन जाते.

अशाप्रकारे विषयांमध्ये विखुरलेले मन प्रत्याहाराच्या द्वारे एकवटून अंतर्मुख झाल्यानंतर कायिक (देहिक) मनापासून वर उचलले जाते आणि उन्मन दशेमध्ये येऊन ब्रह्मरूप माळेमध्ये ओवले जाऊन जीव-पुष्प विकसित होतो. सिद्धीच्या प्रज्वलनामुळे धूर निर्माण होऊ लागते. हे धूर प्राणच आहे. जसे धूर हे अग्नीच्या अस्तित्वास सिद्ध करते तसेच प्राणांचे वर उठून ब्रह्मरंध्रामध्ये स्थित होणे हे सिद्धी प्राप्तीचे लक्षण आहे. योग्याची शेवटची अवस्था 'निष्पत्ति'ची आहे. याला प्राप्त करून योगी भेदभाव विवर्जित समदृष्टीयुक्त बनून जातो. सिद्धींच्या लोभाशी असंपृक्त, काळाच्या प्रभावापासून मुक्त, असा निष्पत्ती प्राप्त योगी सर्वांसाठी वंदनीय असतो.

योगिक मताप्रमाणे ज्ञानतंतूंचे दोन नळ आहेत. त्यास इडा व पिंगला असे म्हणतात. या दोन नळांना जोडून सुषुम्ना ही पोकळ नळी आहे. ही नळी पृष्ठवंश रज्जूतून गेलेली असते. या पोकळ नळीच्या खालच्या टोकाला **कुंडलिनी चक्र** असते व ते वेटोळे घालून बसलेले असते. विविध मार्गांनी शारीरिक पूर्ण शुद्धता प्राप्त झाल्यावर हे कुंडलिनी चक्राचे वेटोळे मोकळे होऊन ती सुषुम्ना नळीतून वर जाऊ लागते. ती पूर्ण वर

पोचली की योग्याला **सिद्धी** व अलौकिक शक्ती ही प्राप्त होतात. कुंडलिनीची जागृती म्हणजेच वीर्यरसयुक्त शक्तीवर मनुष्याचा ताबा येणे होय.

धारणा, ध्यान आणि समाधी या तिन्ही अवस्था एकविषयक होतात.तेव्हा त्या तिहींना मिळून 'संयम' हे नाव दिले जाते. संयमाच्या अभ्यासाने चित्तात समाधी प्रज्ञेचा उदय होतो. या प्रज्ञेच्या साहाय्याने स्थूल वा सूक्ष्म विषयांवर चित्ताची एकाग्रता झाल्याने त्या त्या विषयांसंबंधी पूर्ण ज्ञान प्राप्त होते. या ज्ञानाला दिक्कालाच्या मर्यादा नसतात. अशा ज्ञानाने अनेक प्रकारच्या सिद्धी प्राप्त होतात, असे यौगिक मानसशास्त्रात मानले आहे. सारांश, योगसाधना जेवढी प्रखर असेल, तेवढ्या प्रमाणात सिद्धी प्राप्त होतात.

**ख) सूफ़ी विचारधारा**

**१) 'मुराक़बा' (ध्यान, मनन, चिंतन)**

**अ) 'मुराक़बा' – व्युत्पत्तीमूलक आणि पारिभाषिक अर्थ**

'मुराक़बा'चा व्युत्पत्तीशास्त्रदृष्ट्या अर्थ आहे ''उंटाच्या मानेवर स्वार होऊन प्रेयसीकडे प्रयाण करणे'' असा आहे आणि साधनेच्या क्षेत्रामधील पारिभाषिक स्वरूपात 'मित्राच्या उपस्थितीमध्ये मान तुकविणे आणि मित्रास आपल्या दृष्टीमध्ये ठेवणे' असा अर्थ आहे. (ख़्वाजा सय्यद मुहम्मद गेसूदराज़ – 'रिसाला मुराक़बा' – पृ. २)

सूफ़ी आचार्य इमाम कुशेरी म्हणतात की परमेश्वरास आपली सर्व हकीकत माहीत आहे याची माणसास जाणीव होण्याचे नाव 'मुराक़बा' आहे आणि या जाणिवेची नित्यता व निरंतरताच माणसाचा 'मुराक़बा' अर्थात त्याचे चिंतन व मनन आहे आणि हे ध्यान किंवा चिंतन–मनन प्रत्येक गोष्टीचे मूळ आहे. 'मुराक़बा' हा अरबी शब्द 'रक़ीब' या अरबी शब्दापासून बनलेला आहे आणि 'रक़ीब' या शब्दाचा अर्थ आहे देखरेख ठेवणारा, निगा राखणारा. या अर्थाच्या अनुषंगाने 'मुराक़बा' उपाधीवर म्हणजेच भगवंतावाचून इतर सर्वांवर पहारा ठेवणे आहे. जसे की कोण्या एका सूफ़ी कवीने म्हटले आहे –

*''पासबा–ए–दिल शव अंदर कुल्ल–ए–हाल ।*
*ता नबाशद हेच दुज्द आंजा मजाल ।।*
*हर ख़याल–ए–गैर–ए–हक़ रा दुज्द दाँ ।*
*ईं रियाज़त सालिकाँ रा फ़र्ज़ दाँ ।।''*

अर्थात सर्व परिस्थितीत चित्त सुरक्षित ठेव, की जेणेकरून कोणताच चोर तेथे येण्यास धजावणार नाही. भगवंतावाचून इतर प्रत्येक विचारास चोर जाण (म्हणून समज) साधकाने ही साधना अनिवार्य जाणावे.

श्रद्धावंताची अशी दृढ धारणा असते की, सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा त्याचा रक्षणकर्ता आहे. तो त्याच्या प्रत्येक स्थितीस जाणून आहे. तो ज्ञाता असून त्याला प्रत्येक गोष्टीची खबर असते. तो साक्षीदार आणि मित्र (सखा) आहे. सूफ़ी हा आपले साहस आणि अधिक ध्यान या गोष्टीवर खर्च करतो की, या जाणिवेस आणि दृढ विश्वासास (धारणेस) नित्य नूतन ठेवावे. याचेच नाव 'मुराक़बा' अर्थात ध्यान, मनन – चिंतन आहे.

सूफ़ी आचार्य इमाम कुशेरी जिब्रीलची हदीस (वाणी) उद्धृत करून लिहितात – प्रेषित मुहम्मद स. यांनी जे म्हटले आहे की, जर तुम्ही सर्वश्रेष्ठ परमेश्वरास पाहू शकत नसाल तर हे निश्चितच लक्षात असू द्या की, तो तुम्हास नक्कीच पाहतो. हे कथन 'मुराक़बा'कडे संकेत करते. कारण की 'मुराक़बा'चा आशय हा आहे की, माणसास याची जाणीव असावी की सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा त्याची संपूर्ण स्थिती जाणून आहे आणि ही जाणीव व बोध नेहमी ताजे असावे. म्हणून याचेच नाव 'मुराक़बा-ए-रब' अर्थात परमेश्वराचे चिंतन आहे.

**आ) 'मुराक़बा'चे मानसशास्त्र व तत्त्वज्ञान**

*''जी ढूंढता है फिर वही फ़ुर्सत कि रात-दिन*
*बैठे रहें तसव्वुर-ए-जानाँ किये हुए ।।''* – **मिर्जा ग़ालिब**

उर्दू महाकवी ग़ालिब याने ज्या विचारास काव्यबद्ध केले आहे ते प्रेमाचे मानसशास्त्र आणि प्रियकराची आकांक्षा, इच्छा, अभियाचना आहे. सूफ़ीवादाचा पारिभाषिक 'मुराक़बा' याच अभियाचनेच्या समाधानाचे साधन प्रस्तुत करते.

याच कारणामुळे दिल्लीकर शाह वलीउल्ला या सूफ़ी आचार्यांनी 'मुराक़बा'चे जे स्वरूप स्पष्ट केले आहे ते महाकवी ग़ालिब यांच्या उपरोक्त काव्य चरणाचे भाष्य वाटते. विचारामध्ये भावसाम्य झाले आहे आणि दोघे एकाच मानसिकतेस व्यक्त करीत आहेत. शाह वलीउल्ला यांच्या निवेदनाचा सार हा आहे की, साधकाने सर्वश्रेष्ठ परमेश्वरावर आपले अधिक ध्यान केंद्रीभूत करावे आणि त्याच्याच कल्पनेमध्ये गुंग होऊन जावे.

'मुराक़बा' चा समष्टिगत अभिप्राय हा आहे की, साधकाने आपल्या ज्ञान-शक्तीस, बोधास संपूर्णपणे सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या नाम (जात) – रूपा (सिफ़ात) च्या कल्पनेमध्ये एकवटवावे.

'मुराक़बा' अर्थात ध्यान हे कल्पनेचे एक अभ्यास आहे, सराव आहे. जी व्यक्ती या सरावास आत्मसात करते तिला समाधान लाभल्याशिवाय राहत नाही. जेव्हा तिच्या कल्पनेच्या सरावामध्ये वाढ होते तेव्हा तिच्या प्रत्येक ऐहिक आणि पारमार्थिक कार्यामध्ये त्याची कल्पनाशक्ती उपयोगी पडते आणि मानसिक समाधान प्राप्त होते. मानसिक समाधान ही फार मोठी गोष्ट आहे. अनेक गर्भश्रीमंत लोक मानसिक समाधानाविना चिंतामग्न असतात. त्यांना नेहमी काळजी पछाडत असते; परंतु नामस्मरण आणि ध्यान, मनन, चिंतना ('मुराक़बा') मुळे मन:शांती प्राप्त होते, यात मुळीच शंका नाही.

**इ) 'मुराक़बा'चा मूळ हेतू**

'मुराक़बा'मध्ये सर्वात प्रथम या गोष्टीचे विचार राखले पाहिजे की, माणसाने उपाधी म्हणजेच भगवंतावाचून इतर प्रत्येक विचारापासून निश्चिंत व समाधानी असावे (रहावे). यानंतर साधकाने या विचारास आपले ध्येय बनवावे आणि त्याच्याचकडे आपले संपूर्ण ध्यान प्रवृत्त, आकृष्ट करावे व याची पुरेपूर खात्री बाळगून अशी दृढधारणा ठेवावी की, सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा त्याला आणि त्याच्या व्यतिरिक्त सर्वच्या सर्व गोष्टींना – वस्तूंना खालून, वरून, उजवीकडून, डावीकडून, आतून, बाहेरून, सारांश प्रत्येक बाजूने – दिशेने घेरून आहे. कारण ''अल्लाहचे ज्ञान प्रत्येक वस्तूला व्यापून आहे.'' ६५ : १२. ''अल्लाह एकमेव आहे, सर्वांवर प्रभुत्व संपन्न, आकाशांचा, पृथ्वीचा आणि त्यांच्यातील सर्व वस्तूंचा तो स्वामी आहे.'' –

३८ : ६५-६६. ''सर्व वस्तुमात्रांना अल्लाहने व्यापले आहे.'' - ४ : १२६. आणि यद्यपि परमपवित्र परमेश्वर दिशांच्या बंधनापासून मुक्त आहे; परंतु या उपरांत साधकास पाहिजे की त्या परम पवित्र सत्तेस 'मुराक़बा' म्हणजेच ध्यानामध्ये, मननामध्ये, चिंतनामध्ये आपल्या समोर अशा रीतीने पाहावे की जणू वातावरणामध्ये हवेचा नित्य प्रवाह असतो किंवा ज्याप्रमाणे पर्वताच्या कंदरेमधून पाण्याचा प्रवाह निरंतर वाहतो आहे. सारांश, ईश्वरी सत्तेच्या सर्वसमावेशकतेस त्याने आपल्या अंत:करणाच्या चक्षूंनी, प्रतिभेच्या नेत्रांनी आपल्यासमोर अशाप्रकारे आकृतीबद्ध करावे की, त्याला सर्व दिशांमध्ये - सर्वत्र सर्वश्रेष्ठ परमेश्वराचाच प्रकाश चकाकत असलेले दिसून यावे आणि त्याने मन:पूर्वक या गोष्टीवर ठाम विश्वास ठेवावे की दिक्कालामध्ये दिसणारे ईश्वरी प्रकाशाचे वैभव-दर्शन त्याचे आटोकाट प्रयत्न आणि चिंतनाचा आविष्कार नव्हे. त्याची फलनिष्पत्ती नव्हे, प्रत्युत त्याच्या प्रयत्नाविना हा प्रकाश स्वयं-प्रकट आहे. 'मुराक़बा' अर्थात मनन आणि चिंतनामध्ये सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्रकाशास अशाप्रकारे चमकताना पाहणेच 'मुराक़बा'चा मूळ हेतू आहे.

**ई) 'मुराक़बा'चे टप्पे**

आपली सत्ता आणि जगाच्या सर्व वस्तूंना नाश पावत असल्याचे साधकाने पाहणे आणि समस्त ब्रह्मांडावर ईश्वरी प्रकाश व्याप्त असल्याची कल्पना कायम करणे, ही गोष्ट 'मुराक़बा'च्या प्राथमिक टप्प्यापैकी आहे. यानंतरचा टप्पा हा आहे की, सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्रकाशाचे या अनुभूत परिकल्पनेमधून या प्रकाशाने व्याप्त वस्तूंच्या अस्तित्वास निष्कासित करून आणि दिशांच्या विचारास संपूर्णपणे काढून सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या प्रकाशास वस्तू आणि दिशांच्या त्रुटी व दोषांपासून सर्वथा मुक्त आणि विशुद्ध स्वरूपात साधकाने पाहावे. अर्थात पहिल्या टप्प्यामध्ये आपली सत्ता आणि समस्त वस्तूंवर प्रत्येक दिशेने ईश्वरी प्रकाश व्याप्त असल्याच्या कल्पनेस कायम करणे आहे आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये आपल्या अस्तित्वासह प्रत्येक वस्तू आणि प्रत्येक दिशाच्या अनुभूतीस समाप्त करून परमेश्वराच्या प्रकाशास या सर्वांच्या त्रुटी आणि दोषांपासून मुक्त पाहणे आहे.

परमेश्वरी प्रकाशाच्या या कल्पनेशी सूफ़ी संतांची मूळ गरज ही आहे की, चित्ताची दृष्टी नित्य सर्वश्रेष्ठ परमेश्वरावर खिळून राहावी आणि हेच 'मुराक़बा'चे उद्दिष्ट आहे. म्हणून याला उपस्थिती किंवा सम्मुखतेचे (हुज़ूरी) लक्षण म्हटले गेले आहे. (अबू तालिब अल्-मक्की- 'कूत-अल्-कुलूब' - पृ. १३३) आणि सूफ़ीवादमध्ये 'हुज़ूरी' म्हणजे सम्मुखतेचे अर्थ आहे. आपल्या अनिवार्य गुणांची जाणीव नाहीशी होणे - आपल्या गुणांची विस्मृती कारण की माणूस हा जेव्हा ईश्वरासमोर असतो तेव्हा तो जगासच नव्हे तर आपल्या अस्तित्वाची जाणीव पण विसरून जातो. (इमाम कुशेरी - 'रिसाला कुशेरिया' - पृ. ४७). सूफ़ीवादमध्ये ईश्वरासम्मुख असण्याचे हेच तात्पर्य आहे. सूफ़ी आचार्य इमाम कुशेरी म्हणतात की, जो जगाशी जेवढे जास्त अलिप्त असेल तो तेवढेच जास्त ईश्वराजवळ असेल, इथपर्यंत की ''आणि जर तो संपूर्णपणे आत्मविस्मृत होत असेल तर त्याची सन्मुखताही निर्वाणासमान असेल.'' (इमाम कुशेरी - 'रिसाला कुशेरी', पृ. ४७)

ही अवस्था काही लोकांसाठी अल्पकालीन असते तर काहीसाठी कायमची – चिरस्थायी असते. याचे स्थाायित्व (नित्यता) म्हणजे ईश्वर मीलनाचे प्रमाण होय. सूफ़ी संत बायज़ीद बुस्तामी यांच्याविषयी असे सांगतात की, त्यांच्याकडे दुसरे सूफ़ी संत ज़ुन्नून मिस्री यांनी त्यांची ख्यालीखुशालीची चौकशी करण्यासाठी एका व्यक्तीस पाठविले. जेव्हा तो त्यांच्याजवळ पोहोचला आणि खुद्द त्यांनाच त्यांच्या ख्याली-खुशालीविषयी चौकशी केली तेव्हा त्यांनी उत्तर दिले की, ''कोण अबू यज़ीद? कोठे आहे अबू यज़ीद? मी स्वत: त्याच्या शोधात आहे.'' ती व्यक्ती त्यांना वेडा समजून परत आली आणि जुन्नून मिस्री यांना सर्व हकीगत सांगितली. हे ऐकून ते रडू लागले आणि म्हणाले – ''माझा बंधू, अबू यज़ीद ईश्वराकडे जाणारांमध्ये सामील झाला.'' (हुजवीरी – 'कश्फ़ुल महजूब', पृ. २२३)

प्रभू प्रकाशामधील व्यस्तता, ज्याचा अभिप्राय 'मुराक़बा'शी आहे, याच उद्दिष्टाकडे घेऊन जाते आणि साधकास ईश्वरेतराविषयी बेसावध करून ईश्वरासमोर उभे करते. सूफ़ीवादमध्ये नामस्मरण आणि मनन-चिंतन ('मुराक़बा') याच उद्देशाने करविले जाते आणि हेच तिचे अपेक्षित उद्दिष्ट आहे. विद्वान जरीरी यांचे मत आहे की, जो माणूस सर्वश्रेष्ठ ईश्वर आणि स्वत:मध्ये धर्मपरायणता आणि चिंतन – मननाचा संबंध दृढ करीत नाही तो ईश्वरीय प्रेरणा आणि दिव्य दर्शनापर्यंत पोहोचणार नाही. संत वास्ती यांना नामस्मरणाविषयी विचारले गेले असता ते म्हणाले, बेसावधगिरीच्या मैदानापासून निघून दिव्य दर्शनाच्या वातावरणामध्ये प्रवेश करण्याचे नाव आहे. नामस्मरण ('ज़िक्र') (इमाम कुशेरी- 'रिसाला कुशेरिया', पृ. १३२)

सारांश, हे की अथक प्रयास आणि चित्त परिष्काराच्या पद्धतींनी अंत:करणास ज्या वास्तवापर्यंत पोहोचण्यासाठी तयार केले गेले होते. नामस्मरण आणि मनन-चिंतन ('मुराक़बा') त्यास तेथे पोहोचवितात. सूफ़ी तत्त्वज्ञ आणि आचार्य इमाम ग़ज़ाली निवेदन करतात की, ''जर कोणी साधना सुरू करून अंत:करणास भय, वासना आणि दुर्गुणांपासून शुद्ध करून घेईल आणि एकांतात बसून डोळे मिटवील आणि इंद्रियांना शिथिल करून अकार्यक्षम बनवील आणि चित्तास आध्यात्मिक जगाकडे वळवील आणि नेहमी अंत:करणपूर्वक 'अल्लाह, अल्लाह'चे जप करीत असेल, इथपर्यंत की तो स्वत:शीच आत्मविस्मृत होऊन जावे, तर यद्यपि तो जाग्रत अवस्थेमध्ये का असेना; परंतु त्याच्यासाठी (ईश्वराचे) दार उघडले जाते.'' (हुज्जतुल इस्लाम इमाम ग़ज़ाली – 'कीमियाए सआदत' – पृ. १३)

### ड) 'मुराक़बा' अर्थात चिंतन – मननाचे स्वरूप

'मुराक़बा' चा अर्थ आहे, 'ध्यान'. यामध्ये प्रथम जिक्र अर्थात नामस्मरणाची क्रिया संपन्न होते आणि त्यानंतर पवित्र कुराणाचे काही वेचक श्लोकांचे स्मरण करत साधक ध्यानमग्न होतो. ध्यान म्हणजे चित्ताची निरंतर अंतर्मुखता. 'मुराक़बा' (ध्यान) परमेश्वराकडे उन्मुख होण्यास म्हणतात. म्हणजेच तो (ईश्वर) हजर असून सर्व काही पाहत असल्याची कल्पना करणे. 'मुराक़बा' अर्थात ध्यान, मनन, चिंतनास ऐन 'जिक्र' म्हणजेच नामस्मरण म्हणतात. इतकेच नव्हे तर त्यास 'जिक्र' पेक्षा श्रेष्ठ मानले गेले आहे. म्हणून 'मुराक़बा' नामस्मरणानंतर सुरू करतात. 'मुराक़बा'मध्ये प्रथम जी जिक्र म्हणजे नाम स्मरणाची क्रिया होते त्यामध्ये साधक खालील वाक्यांचा (विधानांचा) उच्चारण करतो.

१) ‘अल्लाहू हाज़िरी’ अर्थात परमेश्वर माझ्यासोबत हजर आहे.

२) ‘अल्लाहू नाज़िरी’ अर्थात परमेश्वर मला पाहत आहे.

३) ‘अल्लाहू शाहिदी’ अर्थात परमेश्वर माझा साक्षी आहे.

४) ‘अल्लाहू मोअई’ अर्थात परमेश्वर माझ्या सोबत आहे.

या ‘ज़िक्र’ म्हणजेच नाम स्मरणानंतर साधक पवित्र कुराणाचे काही वेचक श्लोकांवर चिंतन आणि मनन करतो. त्यापैकी काही हे आहेत –

१) ‘‘तो आदि आहे व तोच अंत (आहे), आणि तो दृष्ट आहे व तोच अदृष्ट आहे व तो सर्व गोष्टी चांगल्या जाणतो.’’ ५७ : ३

२) ‘‘तुम्ही कोठेही असा तो तुमच्याबरोबर असतो आणि तुम्ही जे काही करीत असता ते सर्व अल्लाह पाहत असतो.’’ – ५७ : ४

३) ‘‘आम्ही (ईश्वर) त्याच्या (मनुष्याच्या) कंठातील शिरेपेक्षाही त्याच्या अधिक जवळ असतो.’’ – ५० : १६

४) ‘‘तुम्ही जिकडे कुठे वळाल तिकडेच परमेश्वराचा चेहरा आहे.’’

५) ‘‘पृथ्वीवर (तसेच आकाशात) जे जे आहे ते सर्व संपुष्टात येणार आहे आणि भव्यतेने व महानतेने परिपूर्ण असे तुझ्या पालनकर्त्याचे स्वत्व नेहमीसाठी कायम राहणार.’’ – ५५ : २६

६) ‘‘अल्लाह प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवून आहे.’’ – ३३ : ५२

७) ‘‘अल्लाह त्यांची (सर्व) रहस्ये आणि त्यांच्या (सर्व) गुप्त वार्ता जाणतो आणि अल्लाह (मानवासाठी अदृश्य असलेल्या) सर्व गोष्टींना जाणतो.’’ – ९ : ७८

८) ‘‘जे काही आकाशात आहे व जे काही पृथ्वीवर आहे, ते सर्व तो (अल्लाह) जाणतो. तसेच तो तुम्ही जे लपविता व जे प्रकट करता तेही जाणतो. कारण अल्लाहलाचं (लोकांच्या) मनात काय – काय आहे, याचे पूर्ण ज्ञान असते.’’ – ६४ : ४

९) ‘‘नि:संशय, तुझा विधाता सदैव लक्ष ठेवून आहे.’’ – ८९ : १४

१०) ‘‘तो (सर्वशक्तिमान) प्रत्येक मनुष्याच्या (प्रत्येक) कृत्यावर नजर (लक्ष) ठेवून आहे.’’ – १३ : ३३

११) ‘‘जे उठता, बसता आणि पहुडले असता प्रत्येक स्थितीत ईश्वराचे स्मरण करतात आणि पृथ्वी व आकाशांच्या रचनेत मनन व चिंतन करतात.’’–३:१९१

अशा प्रकारे ‘मुराक़बा’ मध्ये कौराणिक श्लोकांचे तेच अंश उपयोगात आणले जातात की ज्यामुळे परमेश्वराची सोबत आणि त्याच्याशी सामिप्याची ओढ निर्माण व्हावी आणि सर्वव्यापकता, त्याचे सर्व द्रष्टेपण, त्याची सर्वज्ञता आणि त्याची सर्वत्र उपस्थिती याची कल्पना साधकामध्ये निर्माण व्हावी. हे अंश तर परमेश्वराच्या अस्तित्वाविषयी होकारार्थी आहेत; परंतु याचबरोबर अस्तित्वहीनतेविषयी म्हणजेच क्षणभंगुरतेचा परोक्ष निर्देश करणारे उपरोक्त श्लोक क्रमांक ५ पण आहे. याविषयी पण साधकाने चिंतन – मनन केले पाहिजे. याचा ‘मुराक़बा’ म्हणजेच चिंतनाची पद्धत अशी आहे की, साधकाने स्वत:विषयी कण–कण होऊन विखुरलेले असल्याची भावना–कल्पना करावी. यास हवा उडवून घेत जात (प्रवाहित होत)

आहे. आकाशाविषयी असे विचार करावे की, त्याचे तुकडे-तुकडे झाले आहेत. प्रत्येक वस्तूची रचना व स्वरूप बिघडून गेले आहे आणि यासोबतच अशी कल्पना करावी की, सर्वश्रेष्ठ परमेश्वरच बाकी असून त्याचेच अस्तित्व विद्यमान आहे आणि इतर सर्व वस्तू संपुष्टात आल्या आहेत.

'मुराक़बा' (मनन - चिंतना) विषयी त्याचे महत्त्व प्रतिपादित करणारी काही प्रेषित वचने ('हदीस') पण आहेत. त्यापैकी प्रमुख 'हदीस' पुढीलप्रमाणे आहेत -

१) सर्वप्रथम 'एहसान' म्हणजेच भक्तीच्या उत्कर्षासंबंधी जी 'हदीस' आहे ती आमचे लक्ष वेधते. त्या 'हदीस'चे शब्द आहेत - ''उपासना (भक्ती) अशा प्रकारे संपन्न कर की जणू तू परमेश्वरास पाहत आहेस आणि जर तू त्याला पाहू शकत नसशील तर परमेश्वर तुला नक्कीच पाहत आहे.''

२) ''तू जेथे कोठे असशील (तेथे) परमेश्वरास भीत जा. जर दुष्कर्म घडले तर तात्काळ सत्कर्म कर, की त्यामुळे ते दुष्कर्म नष्ट होईल आणि लोकांसमोर सौजन्याने ये.'' या हदीसमध्ये 'मुराक़बा' कडेच संकेत आहे. कारण की प्रत्येक प्रसंगी ईश्वराचे भय बाळगणे आणि त्याच्या आज्ञांविषयी विचार करणे, हे 'मुराक़बा' अर्थात मनन-चिंतन आहे.

३) इब्न अब्बास म्हणतात की, मी एक दिवशी प्रेषित मुहम्मद स. यांच्यासोबत होतो. ते मला म्हणाले, ''हे पुत्रा! अल्लाहच (कडे) लक्ष ठेव, तर तो तुझ्याकडे लक्ष ठेवील. अल्लाहचे जप कर (नामस्मरण कर) तर तू अल्लाहस समोर पाहशील.''

### ऊ) 'मुराक़बा' (मनन-चिंतना) विषयी सूफ़ी तत्त्वज्ञ आणि आचार्यांची मते

**१) इमाम ग़ज़ाली** - इमाम ग़ज़ाली म्हणतात की, एका इसमाने इब्न अल-मुबारक यांना 'मुराक़बा'च्या अर्थाविषयी विचारले तेव्हा त्यांनी सांगितले की, 'तू नेहमीसाठी असे होऊन जा की जणू तू परम वैभवशाली परमेश्वरास पाहत आहेस.'

**२) अब्दुल वाहिद बिन जैद** - यांनी म्हटले आहे, 'ज्याअर्थी माझा स्वामी माझा रक्षणकर्ता आणि पहारेकरी आहे त्याअर्थी मला अन्य कुणाचीच पर्वा नाही.'

**३) इब्न अता सिकंदरी** - यांचे वचन आहे - 'सर्वोत्तम साधना निरंतर परमेश्वराचे मनन आणि चिंतन आहे.'

निरंतर ध्यान हे ईश्वराकडे निरंतर तत्पर असलेल्या मताचे लक्षण आहे. आपल्या जीवनामध्ये सूफ़ींना हेच ध्येय साध्य करावेसे वाटते. उर्दूचे एक फार मोठे कवी ख़्वाजा मीर 'दर्द' यांनी याला 'तत्पर मत' म्हणून संबोधले आहे. असले 'तत्पर मत' एक क्षणभर सुद्धा सर्वश्रेष्ठ परमेश्वरापासून बेसावध असत नाही आणि त्यांनी अशाच मताची आकांक्षा बाळगली आहे.

*''ख़ल्क़े दर जुस्त व जूए माल व जाहे*
*जमे बतलाश दिलबर व दिलख़ू अहे*
*हरकस बख़याल आरज़ूए दारद*
*माईम व तमन्नाए दिल आगाहे ।।''*

**४) सहल बिन तुस्तरी** – माणसाचे हे जाणून घेणे की तो जेथे कुठे असेल परमेश्वर त्याला पाहत आहे, यापेक्षा इतर कोणत्याच गोष्टीने अंत:करण शिष्ट व उत्तम तऱ्हेने सुशोभित होत नाही. हे त्याच्यासाठी आहे की, ज्याने आपल्या प्रभूस आपल्या दृष्टीसमोर ठेवले असेल आणि आपल्या वासनेचा हिशोब घेतला असेल आणि आपल्या परलोकासाठी शिदोरी जमा केली असेल. याच अर्थी एका अरब कवीने किती छान म्हटले आहे की, 'ज्या दिवशी तू एकांतवासामध्ये असशील त्या दिवशी असे म्हणूनकोस की मी एकांतवासामध्ये आहे; परंतु म्हण की माझ्याकडे एक पाहणारा आहे. अल्लाहस एक क्षणभर सुद्धा बेसावध समजू नकोस. ना अशी समज करून घे की जी गोष्ट तू लपवीत आहेस ती गुप्त आहे, गोपनीय आहे. काय तू हे पाहत नाहीस की आजचा दिवस किती भर्रकन जात आहे! आणि उद्याचा दिवस पाहणाऱ्यासाठी जवळच आहे.

**५) सुलेमान बिन अली** – यांनी कुणाला तरी सांगितले होते की, 'जर तू एकांतवासामध्ये अपराध केलेला असशील आणि तुझा या गोष्टीवर पूर्ण विश्वास असेल की अल्लाह तुला पाहतो आहे, तर तू खरोखरच एक मोठ्या कार्याचे धाडस केलेस आणि जर तुला ही शंका असेल की तो तुला पाहत नाही तर मग तू श्रद्धाहीन बनलास!

**६) अली बिन उस्मान हुजवीरी 'दाता गंजबख्श'** – प्रेषित मुहम्मद यांच्या एका उक्तीचा भावार्थ असा आहे की, ईश्वराची प्रार्थना अशी करा, जणू काही तुम्ही त्याला पाहत आहात आणि तुम्ही त्याला पाहत नसला तरी तो तुम्हाला पाहत आहे. प्रेषित दाऊद यांना ईश्वर म्हणाला, "तुला माहीत आहे माझ्याबद्दलचे ज्ञान म्हणजे काय?" ईश्वराच्या ध्यानामध्ये असणाऱ्या हृदयाचे जीवन आहे. हे ध्यान सार्वजनिक, खासगी ठिकाणचे असो आणि कशा पद्धतीने असो. पूर्ण श्रद्धेमुळे समाधी लागते किंवा प्रेमामुळे इतका आनंद होतो की, साधक मग्न होतो आणि त्याला त्याच्या प्रियतमेशिवाय काही दिसत नाही. शिबलींना ध्यानात ईश्वर सोडून बाकी काही दिसत नसे. ईश्वर सोडून इतरांच्या कच्छपी लागणाऱ्यांचा विनाश ठरलेलाच. आपण आपल्या डोळ्यांनी भौतिक वस्तू पाहतो, आध्यात्मिक नजरेने त्याला कर्ता दिसतो. कर्त्याच्या प्रेमात एखाद्यास कर्त्याखेरीज काहीच दिसत नाही. अबू यज़ीद बुस्तामी चौऱ्याहत्तर वर्षांचे असतानाही आपण चार वर्षांचे आहोत असे सांगत, कारण सुरुवातीच्या सत्तर वर्षापर्यंत त्यांच्यामध्ये व ईश्वरामध्ये पडदा होता. प्रेषित मुहम्मद यांच्या अनुयायांमध्ये एकमत आहे की, ईश्वराचे दर्शन होऊ शकते व ध्यानामुळे हे शक्य आहे. (डॉ. अलीम वकील – "एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी" पृ. २४०-४१)

### ए) 'मुराक़बा' वैशिष्ट्य विवेचन

'मुराक़बा' या अरबी शब्दामध्ये लक्ष आणि संरक्षणचे अर्थ सम्मिलित आहे. सूफ़ीवादमध्ये याचा असा अर्थ आहे की, माणसास नेहमी आपल्या सर्व गतिविधींमध्ये या गोष्टीची जाणीव असावी की, अल्लाह त्यास पाहत आहे आणि त्याचे कोणतेच कार्य आणि हालचाल त्याच्या लक्षाबाहेर नाही.

सामान्यपणे लोक मान झुकवून आणि डोळे मिटवून (बंद करून) बसण्यास 'मुराक़बा' (ध्यान) समजतात, पण हे चुकीचे आहे. हे खरे नाही. 'मुराक़बा' अंत:करणाची एक क्रिया आहे, जी नेहमी सुरू

असते आणि सुरू राहिली पाहिजे. (उरूज क़ादरी – 'इस्लामी तसव्वुफ' – पृ. २४६) पवित्र कुराणमध्ये आहे – ''अल्लाह सर्व गोष्टींवर लक्ष ठेवून आहे'' ३३ : ५२

शेखुल इस्लाम इमाम ग़ज़ाली यांनी या श्लोकाव्यतिरिक्त एक श्लोक आणखी दिले आहे – ''खरोखरच अल्लाहचे तुमच्यावर लक्ष आहे.'' ४ : १

उपरोक्त श्लोकांवरून असे दिसून येते की, अल्लाहचे ज्ञान, नेत्र कटाक्षांची चोरी आणि मनामधील संकल्प इरादे, विचार आणि भावना या सर्वांवर व्याप्त आहे आणि दुसरीकडे असे माहीत होते की, अल्लाहचे सदाचारी दास आपल्या अमानती (ठेवी) आणि ग्वाही विचारपूर्वक लक्ष ठेवतात व त्यांचे प्रामाणिकपणे रक्षण करतात.

सूफ़ींनी 'मुराक़बा' स फार महत्त्व दिले आहे. जुरैरी म्हणतात की, सूफ़ीचा मामला दोन मूळ गोष्टींवर आधारित आहे. एक हे की तुम्ही स्वत:साठी ही गोष्ट बंधनकारक ठरवून घ्या की, आपली सर्व कर्मे आणि गतिविधींमध्ये अशी जाण ठेवा की हे सर्व अल्लाह पाहत आहे आणि दुसरे हे की तुमचे प्रत्यक्ष कर्म आणि स्थितीवर 'शरीअत' अर्थात कर्मकांडाचे ज्ञान व्याप्त आहे म्हणजेच ते 'शरीअत' कर्मकांडाच्या तराजूमध्ये तोलले गेलेले असावेत. (इमाम कुशेरी – 'रिसाला कुशैरिया' सटीक, भाग ३, पृ. १९७)

प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य इमाम ग़ज़ाली यांनी 'मुराक़बा' म्हणजेच ध्यानाच्या सहा अवस्था सांगितल्या आहेत. १) 'मुशारता' अर्थात परामर्श, २) 'मुराक़बा' म्हणजे योग, समाधी वा अवधान, ३) 'मुहासबा' अर्थात अवलोकन वा लेखा परीक्षण, ४) 'मुआकबा' म्हणजे दंडित करणे, ५) 'मुजाहदा' म्हणजे तपस्या किंवा इंद्रियनिग्रह आणि शेवटी ६) 'मुआतबा' अर्थात आश्वस्तता.

१) 'मुशारता' ही ध्यानाची पहिली अवस्था आहे. दर दिवशी सकाळी उठल्यानंतर काही काळ एकटेच बसून आपल्या मनास अशी समज द्या की अमुक काम करावे, अमुक काम करू नये.

२)'मुराक़बा' ही दुसरी अवस्था आहे. लक्ष ढळू देऊ नये आणि कुकर्मांपासून सुरक्षित राहण्याची दक्षतेविषयी पण करावे. केलेला निश्चय किती प्रमाणात व्यवहारात उतरविले गेले आहे याकडे लक्ष द्यावे.

३) 'मुहासबा' ही तिसरी अवस्था आहे. ही हिशोब घेण्याची अवस्था आहे. ही नियोजित कर्म पडताळणीची अवस्था आहे. जे काही केले गेले आहे त्याची पडताळणी व्हावी की संबंधित कृती – कर्म योग्य दिशेने झाले की नाही.

४) 'मुआकबा' ही चौथी अवस्था आहे. याचे स्वरूप असे आहे की, जर पडताळणीमध्ये असे आढळले की, कर्मामध्ये मनाकडून कोताई – कसूर झाले आहे तर त्यास शिक्षा केल्याशिवाय सोडू नये. कारण त्यास शिक्षा दिली गेली नाही तर ते अवज्ञा करीतच राहील, आज्ञापालनाची जबाबदारी निभावणार नाही.

५) 'मुजाहदा' ही पाचवी अवस्था आहे. जर मनाची चोरी सापडली तर त्यास शिक्षा जरूर द्यावी; परंतु यदाकदाचित ही शिक्षा असह्य असेल किंवा सांगितलेली आज्ञा मन पाळत नसेल तर कठीण असे इंद्रिय निग्रह करावे, जसे जर सांघिक उपासना सोडली असेल किंवा अतिरिक्त उपासना संपन्न केली नसेल तर रात्रभर झोपू नये, जागे राहावे.

६) ‘मुआतबा’ ही शेवटची अवस्था आहे. शत्रुत्वावर उतरलेल्या मनास नियंत्रणामध्ये ठेवत जावे. त्याची निंदा करत राहावे, की जेणेकरून तो प्रगतीपथावर राहून निश्चिंत बनून जाईल.

(इमाम ग़ज़ाली - ‘खुलासा (सार) ‘एह्याउल उलूम’ - पृ. ३३३ - ३३४)

वर्तमान युगाचे प्रसिद्ध सूफ़ी साधक मौलाना अशरफ अली थानवी यांनी ‘मुराक़बा’ अर्थात ध्यान, मनन, चिंतनाच्या सन्निध असलेल्या दोन अवस्थांचा निर्देश केला आहे. पैकी एक अवस्था ‘मुराक़बा’ अगोदरची आहे तर दुसरी त्यानंतरची. ‘मुराक़बा’ पूर्व अवस्थेचे नाव ‘मुशारता’ म्हणजेच परामर्श आहे तर ‘मुराक़बा’ पश्चात अवस्थेचे नाव ‘मुहासबा’ म्हणजेच परीक्षण असे आहे. (मौलाना अशरफ अली थानवी - ‘शरीअत और तरीकत’ पृ. ३०३) यांचे विवेचन वर आलेच आहे.

विभिन्न परिस्थिती आणि कर्मांसाठी ‘मुराक़बा’ अर्थात ध्यानसाधना असते. त्याआधारे ‘मुराक़बा’चे विभिन्न प्रकार पडतात. सत्कर्म करण्याची गोष्ट असो की, दुष्कर्मापासून परावृत्त होण्याचे प्रयत्न असोत, लौकिक स्वार्थाची गोष्ट असो की, पारलौकिक लाभाची, या सर्व परिस्थितीमध्ये ‘मुराक़बा’ अर्थात ध्यानसाधना करणे जरूरीचे असते. शिवाय ‘मुराक़बा’ या गोष्टीसाठी पण असतो की, साधकाच्या दृष्टीमध्ये साक्षात परमेश्वराचे प्रकाश चमकू लागावे, प्रभू दर्शन घडावे आणि तसेच ‘मुराक़बा’ हा उपासनेचा पण असतो की जेणेकरून साधकाचे परमेश्वरामध्ये निर्वाण (‘फ़ना’) होऊन जावे.

चिंतन-मनन पण एक प्रकारचा ‘मुराक़बा’ म्हणजे ध्यानच आहे. चिंतन किंवा मननचा अर्थ आहे एखादे कार्य वा कर्म, लिखाण, संवाद (वार्तालाप) आणि वाणी (बोलण्या) मध्ये किंवा विषयी विचार करणे, गंभीरतापूर्वक लक्ष देणे आणि त्यावर चिंतन करणे. सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य इमाम मुहम्मद ग़ज़ाली असे मत व्यक्त करतात की, मनामध्ये दोन ज्ञानास एकत्रित करून त्यांच्या संयोगाने तिसरे ज्ञान प्राप्त करणे म्हणजे चिंतन किंवा मनन होय.

अल्लाहच्या सृष्टीविषयी चिंतन-मनन केले पाहिजे, परमेश्वराचे नाम किंवा सत्तेमध्ये सत्तेविषयी चिंतन किंवा मनन करू नये. म्हणून प्रेषित जामात अली यांची अशी शिकवण होती की, “हे सुपुत्रा! तुझ्याविषयी तुझे लक्ष ध्यानच तुझ्यासाठी पुरेसे आहे, कारण की, कोणतीच गोष्ट तुझ्यापासून वेगळी नाही आणि तुझे दु:ख तुझ्यामध्ये आहे आणि तू हे जाणत नाहीस की, तुझे औषध तुझ्यामध्ये आहे आणि तू (हे) पाहत नाहीस. तुझे असे विचार आहे - अनुमान आहे की तू एक लहान देह (शरीर) आहेस, यद्यपि तुझ्यामध्ये एक महान विश्व भरलेले आहे. ‘जे ब्रह्मांडी ते पिंडी’ आणि तू ती ग्रंथमातृका आहेस. म्हणून आपल्या अक्षरांनी अंत:करणाची गोष्ट जाणतोस.

चिंतन-मनन (‘तफ़क्कुरात’) दिव्य प्रकाशाची चावी आहे आणि ईश्वरीय दिव्य दृष्टीचे प्रकट स्थान व प्रारंभस्थान आहे. ते ब्रह्मज्ञान-विद्यांची उन्नत अवस्था आहे आणि याशिवाय अल्लाहचे महाप्रेषित मुहम्मद[स.] यांनी पण चिंतन - मननाच्या श्रेष्ठतेविषयी हिरीरीने म्हटले आहे. म्हणून जेव्हा त्यांच्यावर पुढील श्लोक अवतरित झाल्यावर - “नि:संशय, आकाशांच्या व पृथ्वीच्या निर्मितीत व रात्रंदिवसाच्या अनुक्रमात, बुद्धिमानां (च्या समजण्या) करिता (ईश्वर सामर्थ्याच्या बऱ्याच) निशाण्या (संकेत) होत.” ३ : १९० - ते म्हणाले की, नाश आहे त्याचा जो या (श्लोका)चे वाचन करतो, पण चिंतन मात्र करीत नाही. एक हदीस

(प्रेषित वचन) पण आहे - आपल्या डोळ्यांना उपासनेमध्ये त्यांचे श्रेय द्या. तेव्हा एकाने विचारले की, उपासनेमध्ये डोळ्यांची काय भूमिका आहे? (काय सहभाग आहे?) प्रेषितांनी उत्तर दिले की, ईश्वराच्या वाणी - वचनांमध्ये नजर फिरविणे व त्यासंबंधी चिंतन-मनन करणे. ईश्वरी वचनांवरून धडा शिकणे व बोध घेणे ही डोळ्यांची भूमिका आहे. उपासनेमध्ये प्रेषित ईसा (येशू ख्रिस्त) यांना एकाने विचारले की, जगामध्ये तुमचा कोणी प्रतिस्पर्धी आहे? त्यांनी उत्तर दिले, होय, आहे. ज्याचे बोलणे म्हणजे नामस्मरण असेल, ज्याचे मौन म्हणजे चिंतन असेल आणि ज्याची दृष्टी म्हणजे शिकवण असेल, बोध असेल तो माझा प्रतिस्पर्धी होय. सूफ़ी संत इमाम हसन बस्री यांचे वचन आहे की, ज्याच्या वाणीमध्ये (बोलण्यामध्ये) बुद्धिमत्ता नसेल ते निरर्थक असेल, आणि ज्याचे मौन हे चिंतन नसेल तर ते प्रमाद आहे आणि ज्याची दृष्टी धडा किंवा शिकवण नसेल ते अधार्मिक आहे. अबू सुलेमान नावाचे दुसरे एक सूफ़ी संत म्हणतात की, जगासाठी चिंतन करणे, परलोकासाठी अडथळा आहे आणि ईश्वरनिष्ठांसाठी यातना किंवा दु:ख आहे. परलोकाचे ध्यान करणे, बुद्धिमत्तेचा वारसा आहे आणि अंत:करणास जिवंत ठेवणे असे आहे आणि हसन बस्री पुन्हा म्हणतात की, बुद्धिमान लोक नेहमी नामस्मरणामुळे चिंतन आणि मननाशी अभ्यस्त होऊन जातात आणि चिंतन-मननापासून पुन्हा नामस्मरणाकडे वळतात, इथपर्यंत की शेवटी त्यांचे अंत:करण सवाक् होते - बोलू लागते आणि बुद्धिमत्तेस वाचा फुटते. सूफ़ी संत जुनैद बगदादी म्हणतात की, सर्वात प्रतिष्ठित आणि सर्वश्रेष्ठ (ईश्वर) मंडळी भक्तांचा समूह ती आहे की जी एकेश्वरवादाच्या मैदानामध्ये चिंतन व मननासह बसून ब्रह्मज्ञानाची हवा खात असेल आणि ऐक्याच्या समुद्रापासून प्रेमाचे प्याले प्राशन करीत असेल आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वरावर सुविचारासह दृष्टीक्षेप करील. ज्याच्या नशिबी या गोष्टी असतील तो माणूस महाभाग्यवान आणि खुशाल आहे.

'मुराक़बा'चा अर्थ (आशय) आहे एक दुसऱ्यास पाहणे आणि आपल्या मानसिक ध्यानास आपल्या प्रिय पात्राकडे म्हणजे मित्राकडे वळविणे आहे. 'रक़ीब' परमेश्वराच्या पवित्र नामांपैकी एक ईश्वरी नाव आहे. काही असे म्हणतात की, 'शुग़ल' म्हणजे सिद्धी - क्रिया किंवा योग-कर्म आणि 'मुराक़बा' अर्थात ध्यान, मनन, चिंतन यामध्ये काहीच फरक नाही. या कारणास्तव की दोन्हींमध्ये कल्पना आणि विचार कार्यरत असतात. सूफ़ींचा 'मुराक़बा'शी हा अभिप्राय आहे की, एक प्रकारच्या ब्रह्मज्ञानाचे प्राप्त अशी एक मानसिक अवस्था असते की, ज्यामुळे इंद्रिये कर्म प्रवृत्त होतात आणि काही कर्मे मनामध्ये निर्माण होतात. ही अवस्था दोन प्रकारची असते. एक तर ही की मनातील विचारांवर लक्ष ठेवणे आणि त्या विचारांकडे कटाक्ष करून त्यांच्याकडे प्रवृत्त होणे आणि नेहमी त्याच्यावरच लक्ष ठेवणे. दुसरी अवस्था ही की ईश्वराच्या शुभनामांपैकी एखाद्या नामावर (नामाविषयी) लक्ष खिळवून त्याचा अर्थ, अभिप्राय किंवा एखादे शब्द आणि कौराणिक श्लोक अथवा सुविचाराचे अभिप्राय यांच्याविषयी मनामध्ये सखोल विचार आणि गहन चिंतन-मनन करून तीच अवस्था त्या चिंतकाच्या मनामध्ये निर्माण व्हावी की जेणेकरून की तो स्वत: आज्ञावर्ती - आज्ञाकारी बनून जाईल आणि त्याला स्वत:ची जाणीव उरणार नाही. ध्यान अर्थात 'मुराक़बा' मनावर निर्भर अवलंबित असते आणि ध्यानाची फलनिष्पत्ती ही असते की, आपल्या प्रेमपात्राच्या कल्पनेमध्ये चिंतकाने इतके तन्मय होऊन जावे की त्याला इतर कोणाचीच जाणीव नसावी. सूफ़ी आचार्य इब्न मुबारक

यांनी एका इसमास 'राकिबउल्लाह' म्हणून संबोधले. तेव्हा त्याने त्यांना याचा अर्थ विचारले. मुबारक म्हणाले, तू परमेश्वरास प्रत्यक्ष पाहत असलेल्या अवस्थेमध्ये नित्य राहा. 'हदीस शरीफ' मध्ये सुद्धा म्हटले आहे (ही 'हदीस' मागे दोनदा-तीनदा आलेली आहेच) ''सर्वश्रेष्ठ परमेश्वराची उपासना भक्ती अशा प्रकारे कर की जणू तू त्याला पाहत आहेस. मग जर तुला ही गोष्ट शक्य नसेल की तू त्याला पाहू शकणार नाहीस तर मग तो तुला निश्चितच पाहत असतो. या 'हदीस' मध्ये पहिला टप्पा अनुभूतीचा वा निरीक्षणाचा ('मुशाहदा') आहे तर दुसरा टप्पा मननाचा ('मुराक़बा') चा आहे. 'काय तू याचे निरीक्षण केले नाहीस की तुझ्या परमेश्वराने सावलीस कसे पसरविले?' 'तू हे जाणत नाहीस की, अल्लाह तुला पाहतो आहे. अवश्य अल्लाह तुम्हास पाहतो.' म्हणून भक्ताने नेहमी याची जाणीव ठेवावी की परमेश्वर मला पाहत आहे आणि मी परमेश्वरास आणि जर त्याला नेहमी पाहणे शक्य नसेल तर उपासना किंवा भक्तीमध्ये त्याला जरूर पाहण्याचा प्रयत्न करावे. याचक भक्त जेव्हा 'नमाज' (भक्ती) आणि 'जिक्र' (नामस्मरणा) पासून मुक्त होतो तेव्हा त्याने मनना ('मुराक़बा') मध्ये मग्न होऊन जावे जेणेकरून त्याला एकेश्वरवादामधील ('तौहीद') निर्वाण ('फ़ना') प्राप्त व्हावे.

**काही 'मुराक़बात' अर्थात मनने**

१) काय त्यांनी हे जाणले नाही की अल्लाह त्यांना पाहत आहे.

२) अल्लाह आकाशांचा व पृथ्वीचा प्रकाश आहे - २४:३५

३) आणि तो प्रत्येक वस्तूस व्याप्त आहे. ३६:८३, ६५-१२

४) आणि तो तुमच्या प्राणांमध्ये (आत्म्यांमध्ये) आहे, काय तुम्ही पाहत नाही?

५) पृथ्वीतलावरील सर्व काही नष्ट होणार आहे आणि बाकी कायम राहील तुझ्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे वैभव आणि माहात्म्य.

६) आणि तो तुमच्यासोबत आहे, जिथे कुठे तुम्ही असता. ५७:४

७) तर तुम्ही जिकडे तोंड वळवाल तिकडेच अल्लाहचा चेहरा आहे. (आढळेल)

८) तोच आदि आहे, तोच अंत (शेवटी) आहे, तोच व्यक्त आहे, तोच अव्यक्त आहे. ५७:३ म्हणजे म्हणजे आद्यन्त प्रकट-अप्रकट कोणीच नाही. फक्त तोच (ईश्वर) आहे.

**ऐ) 'मुराक़बा' : मननाचे वास्तव***

अनेक लोक असे समजतात की आध्यात्मिक - आत्म्याच्या जगाकडे अंत:करणाचे दार फक्त निद्रेच्या अवस्थेमध्ये उघडले जाते आणि ते मृत्यूनंतरच उघडले जाते. ही गोष्ट काही खरी नाही. जर एखादा ईश्वरनिष्ठ भक्त जागृत अवस्थेमध्ये साधनेमध्ये मग्न होत असेल, इंद्रिय-निग्रह करत असेल आणि मनामध्ये राग-द्वेष, इच्छा-आकांक्षांना थारा देत नसेल आणि दुर्गुणांपासून मनास शुद्ध ठेवत असेल आणि यानंतर एकांत स्थळी वज्रासनामध्ये डोळे मिटवून शांतचित्ताने बसेल आणि पंचकर्मेंद्रियांना कार्य परावृत्त करेल आणि अंत:करणास आत्म्यांच्या जगाशी समानुभूती कायम करेल तेव्हा त्याच्या मनामध्ये - चित्तामध्ये - अंत:करणामध्ये अल्लाहशिवाय काहीच उरणार नाही. अशा (तल्लीन) अवस्थेमध्ये त्याची वाचा नि:शब्द अर्थात मौन बनेल आणि मन अवाक् बनून ब्रह्मसूत्राच्या विशुद्ध वाणी म्हणजेच 'कल्म-ए-तय्यब' ('ला इलाह इल्लल्लाह'

अर्थात अल्लाह–परमेश्वराशिवाय कोणीच उपास्य नाही.) चा जाप सुरू करेल आणि यामध्ये अशा प्रकारे गर्क – तल्लीन होऊन जाईल की त्याला स्वत:ची आणि समस्त जगाची जाणीवच राहणार नाही आणि जे काही पाहण्याचे त्याचे उद्दिष्ट असेल त्याची त्याने कल्पना करावी. विचार जेव्हा एकीकडे होऊन जाते तेव्हा ज्याची त्याने कल्पना केली होती ते सर्व त्याच्या दृष्टीसमोर येते. लोक जे काही स्वप्नामध्ये पाहतात त्याला जागृत अवस्थेमध्ये पाहण्यास 'मुराक़बा' म्हणजे ध्यान, मनन, चिंतन असे म्हणतात. स्वप्नामध्ये बेसावधगिरीची अवस्था असते. म्हणून दृश्ये स्पष्ट दिसत नाहीत आणि बरीचशी दृश्ये जागल्यानंतर आठवत नाहीत; परंतु 'मुराक़बा' म्हणजे ध्यान, मनन, चिंतनामध्ये श्वासावर लक्ष आणि पाऊलावर दृष्टी असल्यामुळे प्रत्येक जग स्पष्टपणे दिसते. म्हणजे भूलोक, देवलोक, तप:लोक, सत्यलोक, कौमारलोक, शक्तिलोक, शिवलोक, विष्णूलोक आणि परमसत्यलोक हे सर्व स्पष्ट दिसू लातात. ज्या साधकावर हे मार्ग उघडले जाते त्यास याचा लाभ मिळाल्याशिवाय राहणार नाही. म्हणजे चित्रविचित्र मजल आणि स्थळांचा तो विहार करील. मोठ्यात मोठी अशी कार्ये त्याच्याकडून घडून येतील की जी अशक्य कोटीतील असतील. मात्र परम स्तुत्य असतील. एक 'हदीस' (प्रेषित वचन) आहे – ''मला पृथ्वी (जग) दाखविण्यात आली मग मी पूर्व व पश्चिमेस पाहिले'' परमेश्वराचे वचन आहे – ''आणि अशा प्रकारे आम्ही इब्राहिमला (सन्मार्गाची समज लाभावी) आणि त्याने दृढविश्वास ठेवणाऱ्या लोकांपैकी व्हावे म्हणून त्याला आकाशांमध्ये व पृथ्वीवर (असलेल्या) आमच्या राज्याचे दर्शन घडवीत होतो.'' – ६:७५ (*मुहम्मद अब्दुल कादिरशाह रहमानी पीर मंगलोरी – 'असरार रहमानी' – पृ. ५७)

**ओ) 'मुराक़बा'चे प्रकार**

**१) उपासना विधींविषयी चिंतन–मनन –** वर्तमान युगाचे सूफ़ी साधक मौलाना अशरफ अली थानवी यांनी ईश–प्रेम व उपासना विधींविषयी चिंतन–मननासंबंधी आपले विचार पुढीलप्रमाणे मांडले आहेत–

ईश–प्रेमा (इश्क–ए–इलाही) च्या चिंतनामध्ये साधकाने या (बाबी) कडे लक्ष द्यावे की अल्लाहचे माझ्याशी प्रेम आहे आणि तो मला पसंत करतो.

नमाज (भक्ती–उपासने) मध्ये पण चिंतन–मनन असते. याच्या अनेक तऱ्हा आहेत. एक हे की अल्लाह मला पाहत आहे. दुसरे हे की मी अल्लाहस पाहत आहे, तिसरे हे की पठित श्लोकांच्या अर्थाकडे लक्ष असावे, चौथे हे की, प्रत्येक शब्दाचे विचारपूर्वक उच्चार करावे, पाचवे हे की असे समजावे की, ही माझ्या आयुष्याची शेवटची उपासना (नमाज) आहे, कदाचित आयुष्य समाप्त होईल.

पवित्र कुरआनाच्या वाचनाच्या वेळी पण 'मुराक़बा' म्हणजेच चिंतन–मनन केले जाऊ शकते. अर्थात जेव्हा चिंतन–मनन करण्याचा निश्चय होईल तेव्हा काही वेळ अगोदर याचा विचार करावा की, मी अल्लाहसमोर बसलेलो आहे. जसे शिष्य गुरूसमोर बसून आपले पाठ (वाचन) ऐकवितो त्याच पद्धतीने अल्लाहस ऐकवित आहे.

उदर–निर्वाहासंबंधी पण चिंतन–मनन केले पाहिजे ते असे की, अल्लाहने माझ्यावर महाकृपा केली आहे, नाही तर मी फारच अयोग्य असून माझ्यामध्ये कोणतेच गुण नाहीत.

**२) अंतेवासी आणि सत्यनिष्ठांचे चिंतन–मनन ('मुराक़बा')** – कुरआन आणि प्रेषित वचनांचे सूक्ष्म निरीक्षण केल्यानंतर असे आढळून येते की, 'मुराक़बा' म्हणजे चिंतन–मननाचे वास्तव फक्त एवढेच आहे की आमचे परमेश्वरा ('रकीब') कडे लक्ष असावे आणि आमचे ध्यान त्याच्याकडे एकवटले जावे.

अंतेवासी आणि सत्यनिष्ठांच्या चिंतन–मननामध्ये चित्त–मन–अंत:करण सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे सौंदर्य, वैभव आणि महात्म्यामध्ये गर्क – तल्लीन होऊन जावे. त्याच्या आतंकाने चित्त भयकंपित होऊन जावे, अंत:करण भंग होऊन जावे. परिणामी ईश्वरेतराकडे पाहण्यास अवधीच असू नये. हे चिंतन–मनन अंत:करणापुरते मर्यादित असते. याचा शरीराच्या अवयवावर असा परिणाम होतो की, वैध गोष्टींकडे प्रवृत्त होण्यास ते प्रतिबंधित होऊन जातात. अशा परिस्थितीत त्याज्य गोष्टींचा उल्लेखा पण नको. साधकाचा तर स्वत:चा संकल्प असतो ना त्याची योजना!

**३) ''उजव्या हाताकडे असलेले लोकां'' ('असहाबुल यमीन') चे चिंतन–मनन** – हे ते लोक आहेत जे अल्लाह द्रष्टा असल्याविषयी दृढविश्वास ठेवतात; परंतु परमेश्वराच्या रौद्र रूपामुळे ते उन्मत्त व गाफील झालेले नाहीत. त्यांची अंत:करणे समतोल आहेत. ते आपली कर्मे आणि स्थितींवर नजर ठेवू शकतात; परंतु कर्मांच्या सरावा उपरांत त्यांची अंत:करणे चिंतन–मननापासून रिकामे नाहीत. त्यांच्यावर 'ईश–लज्जा' एवढी जबरदस्त असते की, ते अपराधापाशी फिरकत नाहीत आणि परमेश्वरास आपल्या सन्निध पावतात, त्यास आपल्या स्थितीचा जाणकार समजतात, आणि हेच चिंतन–मनन त्यांना भौतिक लालसेकडे मुग्ध – मोहित करत नाही. याच श्रद्धावंतांना सूफ़ींच्या पारिभाषिक शब्दामध्ये प्रेमी जन किंवा प्रेमवेडे या नावाने ओळखले जाते. पुढील काव्य चरण यांच्याच स्थितीचे प्रतिबिंब उपस्थित करते –

*''अीं हम: तमतराक़्–ए–कुन फ़यकून !*
*ज़र्रा नीस्त पेश–ए–अहल–ए–जुनून !''*

अर्थात हे सर्व काही नादब्रह्माचे वैभव आहे. (याच) प्रेमवेडे लोकांसमोर हे कणभरसुद्धा नाही.

**४) ईश्वर – उपस्थिती ('हुज़ूरियत') चे चिंतन–मनन** – माणसाने आपल्या सत्तेस व स्वत्त्वास नित्य उपस्थित अजर–अमर अशा सर्वश्रेष्ठ परमेश्वरासम्मुख असल्याचे चिंतन करावे आणि ईश्वरास हजर जाणावे, जसे की या प्रमाणाचे अभिप्राय आहे की (अपराध करणारा) तो इसम हे जाणत नाही की, परमेश्वर पाहत आहे.

**५) आत्मिक वा आत्म्यासंबंधी चिंतन** – 'मुराकबा कल्बी' – 'तोच परमेश्वर आहे जो आकाशांमध्ये आहे आणि पृथ्वीवर आहे' येथे 'आकाश'चा अभिप्राय चित्ताशी – अंत:करणाशी आहे आणि 'पृथ्वी'चा क्षणभंगूर देहाशी अशा प्रकारे प्रत्येक वेळेस असे समजावे (मानावे) की परमेश्वराचे अस्तित्व मनामध्ये अंत:करणामध्ये आहे आणि अस्थिपंजर देह मनामध्ये आहे.

**६) सामिप्याचे चिंतन : 'मुराकबा कुर्बत'** – नेहमी परमेश्वरास आपल्या जवळ असल्याचे मानावे. जसे की, ''आम्ही (ईश्वर) त्याच्या (मनुष्याच्या) कंठातील शिरेपेक्षाही त्याच्या अधिक जवळ असतो.'' ५०:१६ यावरून माहीत होऊन जाते. प्रेषित जामात 'अमीरूल मोमिनीन' अली बिन अबी तालिब यांनी म्हटले आहे की, सर्वश्रेष्ठ परमेश्वर हा प्रत्येक वस्तू (गोष्टी) सोबत असतो, त्या वस्तूमध्ये एकस्वरूपात

नसतो. म्हणजे सामिप्याने अर्थात शारीरिक सामिप्य नव्हे की एकमेकात मिसळून जावेत. ईश्वर हा प्रत्येक वस्तूपासून अलिप्त आहे. ना शारीरिक अर्थामध्ये की वाद निर्माण होण्याचा विचार उत्पन्न व्हावा. सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे सामिप्य हे प्रमाण - वाक्याने सिद्ध आहे; परंतु हे सामिप्य मानवी बुद्धीच्या आकलनापलीकडील आहे. आमची या गोष्टीवर श्रद्धा आहे की, हे सामिप्य दिक्-काल-श्रेणीबद्ध नव्हे, अपितु ते आलिंगन व आत्म्याचे परकाया प्रवेश व एकत्वाशिवाय सत्तात्मक सामिप्य आहे. एका ब्रह्मज्ञानीचे खालील काव्य-चरण हे उपरोक्त कुरआनी प्रमाण-वाक्याचे सुंदर निरूपण आहे -

*'' 'नहनु अकरबु' अज़ किताब-ए-हक़ बख़्वाँ ।*
*निस्बत-ए-खुद रा बहक्क नेको दाँ ।।''*

अर्थात 'कंठातील शिरपेक्षा अधिक जवळ असल्याचे' तू ईश्वरी ग्रंथ म्हणजेच 'पवित्र कुराणा'मध्ये वाच. स्वत: सदाचारी लोकांसोबत असल्याचे तू सत्य जाण.

**७) सोबत असल्याचे चिंतन : 'मुराक़बा मायत'** - सर्वश्रेष्ठ परमेश्वरास नित्य आपल्या सोबत असल्याचे जाणावे. 'तुम्ही जेथे कुठे असाल तेथे परमेश्वर तुमच्या सोबत असतो.' हे याच चिंतनाकडे संकेत आहे. हे श्लोक जाती (परमसत्ता) सोबतचे दृढ प्रमाण आहे आणि सुस्पष्ट सिद्ध आहे.

**८) अस्तित्व-चिंतन : 'मुराक़बा वजूद'** - 'तुम्ही जिकडे वळाल तिकडे अल्लाहचा चेहरा आहे.' या श्लोकाचे भाष्य सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख़्वाजा बंदानवाज गेसूदराज़ असे करतात - 'तुम्ही कोठेही असा मग त्या जागी ईश्वराची सत्ता अस्तित्वात असते. सहानुभूती राखणारा तल्लीन होऊन जातो.' या 'मुराक़बा'स इतर सूफ़ींनी 'निरपेक्ष दर्शना'चे चिंतन म्हणजे 'मुराक़बा रोयत-ए-मुतलक' असे म्हटले आहे.

**९) सद्‌गुरू चिंतन : 'मुराक़बा पीर'**- याचा अभिप्राय हा आहे की साधना ही सद्‌गुरूंच्या चिंतना-मननामध्ये असावी. 'प्रेषिताचे अनुसरण म्हणजे अल्लाहचेच अनुसरण होय.' याच्याकडे संकेत आहे. सूफ़ी संत ऐनुलकुज्जात हमदानी यांचे कथन आहे की शिष्य हा सद्‌गुरूंच्या अंत:करणामध्ये ईश्वरास पाहतो, तर सद्‌गुरू हा शिष्याच्या अंत:करणामध्ये स्वत:स पाहतो.

**१०) हातम असम यांचे चिंतन-मनन : 'मुराक़बा हातम असम'** - स्वर्गास उजवीकडे, नरकास डावीकडे असल्याची कल्पना करणे आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वरास हिशोब घेणारा आहे, याची कल्पना करणे व तसे ठाम विश्वास बाळगणे. हे चिंतन-मनन उत्तम आहे यात मुळीच शंका नाही. मात्र हा 'मुराक़बा' म्हणजे ध्यान नसून, एका परम भक्ताची विनयशील आतुरता आहे, व्याकुळता आहे.

(**सूचना** - सविस्तर स्पष्टीकरणासाठी कृपया प्रकरण २१ भक्तिशास्त्राचे उपविभाग '१२ (अ) सूफ़ींची सर्वोत्कृष्ट व इतरजनांसाठी एक आदर्श नमाज-पद्धती' या शीर्षकाखालील विवेचन पाहावे. पृ. ८३९ )

**११) अंतराळ किंवा शून्य चिंतन-मनन : 'मुराक़बा खला'** - कोणत्याच अस्तित्वाचे मनामध्ये उपस्थित असल्याचे समजू नये. मनास शून्यावस्थेमध्ये न्यावे. हेच चिंतन-मनन 'केवल तदत्त्वा'चे म्हणजेच 'हुवय्यत-ए-सर्फा'चे आहे आणि 'ला इलाह इल्लल्लाह्' चा याच्याकडेच संकेत आहे. या चिंतन-मननाने हेतू साध्य होण्याच्या दृष्टीने फार प्रगती होते.

**औ) पवित्र कुराण प्रणीत मानवास चिंतनासाठी आव्हान (प्रवृत्त) करणारे काही श्लोक –** उपरोक्त 'मुराक़बा' अर्थात चिंतन-मननाचे प्रकार हे सच्चे साधकांसाठी आहेत; परंतु पवित्र कुराणामध्ये जागोजागी सर्वसामान्य माणासासाठी चिंतनास प्रवृत्त करणारे असे अनेक श्लोक आढळतात. यास्तव लक्षपूर्वक ध्यान, मन:पूर्वक चिंतन आणि गहन मनन करण्यासाठी ईश्वर मानवास प्रेरित करतो व ते अमलात आणण्यास प्रवृत्त करतो. याविषयी सचेत करतो. याबाबतीत परमेश्वराची आव्हाने पवित्र कुराणात पुढीलप्रमाणे प्रतिबिंबित झालेली आहेत. यापैकी काही –

१) ''तुम्ही हे (चिंतनपूर्वक) पाहत नाही का? की, सर्व (प्राणिमात्र) जे आकाशात आहेत किंवा पृथ्वीवर आहेत, अल्लाहच्या असीम महानतेचे गान गात असतात. तसेच आपले पंख पसरवून पक्षीदेखील त्यापैकी प्रत्येकाला आपापल्या प्रार्थनेची व स्तुतीगान करण्याची पद्धत माहीत आहे आणि अल्लाहला ते जे काही करतात, याचे पूर्ण ज्ञान आहे. कारण अल्लाहचीच सत्ता आहे, आकाशात आणि पृथ्वीवर आणि सर्वांना त्याच्याकडेच परत जायचे आहे. तुम्ही हे (चिंतनपूर्वक) पाहिले नाही का? अल्लाह ढगांना हाकून नेत असतो. मग त्यांना एकत्र करतो, मग त्यांचे थरावर थर रचतो आणि मग तुम्हाला त्यातून पाऊस पडताना दिसतो. तो अल्लाह आहे, जो रात्र आणि दिवस यांना एका पाठोपाठ आणत असतो. खरोखर यात बोध आहे, त्या लोकांसाठी जे बोध ग्रहण करण्यासाठी डोळ्यांचा वापर करतात.'' २४:४१-४४

२) ''तुम्ही पाहत नाही की कशाप्रकारे तुमचा पालनकर्ता सावली पसरवितो. त्यानेच सूर्याला वाटाड्या बनविले आहे. तोच सावलीला आवळतो. त्यानेच रात्रीला पोशाख व झोपेला मृत्यू-शांती आणि दिवसाला जिवंत होण्यासाठी घटका बनविली आहे. तोच आकाशातून पाणी वर्षवितो व मृत भूमीला जिवंत करतो.'' – २५:४५-४९

''त्यानेच आकाशात बुरूज उभारले, त्यात एक दिव्य व एक चकाकणारा चंद्र प्रकाशित केला आहे.'' २५:६१-६२ ''तोच आकाशाचा व पृथ्वीचा आणि त्यांच्यामधील सर्व वस्तूंचा पालनकर्ता आहे.'' २५:६१-६२. ''तोच आकाशाचा व पृथ्वीचा आणि त्यांच्यामधील सर्व वस्तूंचा पालनकर्ता आहे.'' २६:२३-२८ ''त्याच्याशिवाय इतर कोण आहे ज्याने आकाशांना व पृथ्वीला निर्माण केले, तुमच्यासाठी पाऊस पाडला, प्रियदर्शिनी बागा उगवल्या, नद्या प्रवाहित केल्या? इतर कोण आहे जो अस्वस्थ झालेल्यांची प्रार्थना ऐकतो? कोण आहे जो खुष्की व समुद्राच्या अंध:कारात मार्ग दाखवितो.'' २७:६०-६५ ''पृथ्वी व आकाशांना कोणी निर्माण केले आहे? चंद्र व सूर्याला कोणी वशीभूत केले आहे?'' २९:६१-६३

३) ''(इहलोकानंतरचे परलोकाचे जीवन नाकारणारे) उंटाकडे कधी चिंतनपूर्वक पाहत नाहीत का की, त्यास कसे निर्माण करण्यात आलेले आहे? आणि आकाशाकडे की, त्यास कशा प्रकारे उंच स्थापित करण्यात आले? आणि पर्वतांकडे की त्यांना कसे उभे करण्यात आले? आणि पृथ्वीकडे तिला कसे पसरविले गेले? ८८:१७:२०.

४) ''आकाश आणि पृथ्वी यांच्या निर्मितीमध्ये आणि रात्र व दिवस यांच्या आलटून पालटून येण्यामध्ये, समजूतदार लोकांसाठी संदेश स्पष्ट करणाऱ्या खुणा आहेत. जे अल्लाहचे स्मरण करतात. उठता,

बसता आणि पहुडलेले असताना (या सर्व स्थितीत) ते आकाश आणि पृथ्वीच्या निर्मिती संबंधाने चिंतन करत असतात. (आणि त्या सखोल चिंतनाद्वारे) त्यांच्या तोंडून असे उद्गार बाहेर पडतात, 'हे आमच्या पालनकर्त्या? तू हे (उद्देशाविना) व्यर्थ निर्माण केलेले नाहीस, असीम आहे तुझी महानता!'' ३:१९०-९१

५) ''याची जाण ठेवा की, अल्लाह मनुष्य आणि त्याच्या हृदयाच्या दरम्यान उभा आहे. (म्हणजे मानवाच्या सर्व इच्छा-आकांक्षा यांचे त्याला पूर्ण ज्ञान आहे.)'' ८:२४

६) ''(पैगंबर!) त्यांना सांगा, (अल्लाह म्हणतो), ''हे माझ्या श्रद्धावंत भक्तांनो! आपल्या विधात्याची जाण ठेवून (जीवन व्यतीत करा.) जे लोक या जगात सत्कर्मे करतील, त्यांच्यासाठी चांगला मोबदला आहे आणि (लक्षात असू द्या) अल्लाहची भूमी फार विशाल आहे आणि जे सहनशीलता बाळगणारे आहेत, त्यांना अमाप मोबदला प्रदान केला जाईल.'' ३९:१०

७) ''त्यालाच प्रत्येक गोष्टीचे परिपूर्ण ज्ञान आहे आणि ते जे काही करत आहेत ते सर्व अल्लाह पाहत आहे.'' २:२९,९६

८) ''याची जाणीव ठेवा की, अल्लाह तुमच्या मनातील सर्व गोष्टींना जाणून आहे आणि म्हणून त्याचे भय बाळगा आणि याची जाणीव ठेवा की, अल्लाह अतिशय क्षमाशील व संयमी आहे.'' २:२३५

९) ''निश्चितच अल्लाहपासून कोणतीही गोष्ट लपलेली नाही, ना पृथ्वीवर, ना आकाशात.'' ३:५

१०) ''तोच आहे अल्लाह, पृथ्वीवर आणि आकाशात, (तो) सर्व जाणतो जे तुम्ही गुप्त ठेवता आणि तेही सर्व, जे तुम्ही प्रकट करता आणि जे (चांगले-वाईट) तुम्ही कमविता, (तेही) तो जाणून आहे.'' ६:३

११) ''तुम्ही लोकांनी या गोष्टीचे कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन केलेले नाही का? जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीवर आहे, त्यांना अल्लाहने तुमच्या सेवेत कार्यरत केलेले आहे? आणि त्याने दृश्य आणि अदृश्य, आपले सर्व प्रकारचे कृपाप्रसाद (ज्यांची - ज्यांची तुम्हाला गरज होती), परिपूर्णरित्या तुम्हाला प्रदान केलेले आहेत.'' ३१:२०

१२) ''पण तुम्ही लोक फारच अल्प कृतज्ञता व्यक्त करता. (याची जाणीव असू द्या.)'' ३२:९

१३) ''माणसाने आपल्या अन्नाकडे पाहावे, (ते त्याला कसे उपलब्ध करून दिले जाते, त्यावर त्याने चिंतन करावे.)'' ८०:२४

१४) ''हे मानवा! आपल्या कृपावंत पालनकर्त्याविषयी तुझी कोणत्या गोष्टीने फसवणूक केली आहे?'' ८२:६

१५) ''आकाशात व पृथ्वीवर कितीतरी (संदेश असलेल्या) खुणा (पसरलेल्या) आहेत. ज्यांच्याजवळून ते लोक जात असतात, पण त्यांच्याकडे अजिबात लक्ष देत नाहीत.'' - १२ : १०५

१६) ''तो कोण आहे, ज्याने आकाश व पृथ्वी यांची निर्मिती केली आणि तुमच्यासाठी आकाशातून (ढगांद्वारे जीवनदायी) पाण्याचा वर्षाव केला आणि त्या पाण्यामुळे नयनरम्य बागा फुलविल्या. (तर सांगा), अल्लाहशिवाय दुसरा कोणी उपास्य असू शकतो का? (जो हे सर्व करू शकतो.) वस्तुतः हे लोक (तर्कशुद्ध मार्गापासून) भरकटलेले लोक आहेत. तो कोण आहे, ज्याने पृथ्वीवर जीवनदायी व्यवस्था स्थापित केली?

आणि कोणी त्यात नद्यांना प्रवाहित केले? तसेच कोणी (पृथ्वीवर) पर्वतांना उभे केले आणि (गोड व खाऱ्या) दोन समुद्रांच्या दरम्यान अडसर निर्माण केले? अल्लाहशिवाय दुसरा कोणी उपास्य असू शकतो का? तो कोण आहे, जो असहायाच्या हाकेला प्रतिसाद देतो, जेव्हा तो त्याचा धावा करतो आणि त्याचे दु:ख दूर करतो आणि कोण तुम्हाला पृथ्वीवर तिचे वारस बनवितो. अल्लाहशिवाय दुसरा कोणी उपास्य आहे का? पण तुम्ही लोक अगदी क्वचितच बोध ग्रहण करता.'' २७ : ६० – ६२

१७) ''तुम्ही या गोष्टीचे चिंतनपूर्वक कधी अवलोकन केले नाही की, अल्लाह दिवसाला लहान करून रात्र काही अंशी मोठी करतो, आणि (कधी) रात्र लहान करून दिवसाला मोठा करतो आणि त्यानेच सूर्य व चंद्र यांना (आपल्या नियमानुसार) कामाला लावून ठेवले आहे. त्यांच्यापैकी प्रत्येक निर्धारित अवधीनुसार आपले मार्गक्रमण करीत असतो आणि तुम्ही जे काही करीत असता ते अल्लाहला चांगले माहीत आहे. (या सर्व खुणा, या गोष्टीचे प्रमाण आहेत की) अल्लाह अंतिम सत्य आहे. त्याला सोडून लोक ज्यांचा धावा करतात ते असत्याशिवाय अन्य काही नाही. नि:संदेह केवळ अल्लाह सर्वोच्च आहे, असीम महान आहे. तुम्ही लोकांनी या गोष्टीचे (चिंतनपूर्वक) कधी निरीक्षण केले नाही का की, नौका समुद्रात अल्लाहच्या कृपेने संचार करीत असतात? हे सर्व यासाठी आहे की, तो तुम्हाला त्याच्या (सामर्थ्याच्या) खुणा दाखवू इच्छितो. खरोखर यात संदेश आहेत, संयम बाळगणाऱ्या व आभार व्यक्त करणाऱ्या लोकांसाठी.'' ३१ : २९ – ३१

१८) ''त्यांनी या गोष्टीचे अवलोकन केले नाही का की, अल्लाह इच्छितो त्यास विपुल प्रमाणात उपजीविका प्रदान करतो आणि इच्छितो त्यास कमी प्रमाणात उपजीविका प्रदान करतो. खरोखर, यात संदेश आहेत, त्या लोकांसाठी जे श्रद्धा बाळगणारे आहेत.'' ३० : ३७

१९) ''(लोकांनो!) तुम्ही या गोष्टीचे कधी (चिंतनपूर्वक) निरीक्षण केले नाही का की, अल्लाहने आकाशातून पाण्याचा वर्षाव केला आणि त्यापासून आम्ही विविध रंगाची फळे निर्माण केली आणि पर्वतांमध्येही वेगवेगळ्या छटांचे पांढरे व लाल काळ्या गडद रंगाचे खडक असतात. अशाच प्रकारे माणसे, प्राणी आणि गुरेढोरे यांचे रंगही नाना तऱ्हेचे आहेत. त्याच्या सर्व भक्तांपैकी केवळ ते लोक (खऱ्या अर्थाने) अल्लाहप्रति भीतीयुक्त आदर बाळगतात. जे ज्ञानी आहेत. खरोखर अल्लाह सर्व शक्तिमान (असूनही) फार क्षमाशील आहे.'' ३५ : २७–२८

२०) ''श्रद्धावंतांसाठी आकाशात आणि पृथ्वीवर (संदेश सूचक) खुणा आहेत, यात मुळीच शंका नाही आणि तुमच्या स्वत:च्या निर्मितीमध्ये आणि त्या सर्व प्राण्यांमध्ये जे त्याने पृथ्वीवर पसरविलेले आहेत (त्याच्या सामर्थ्याच्या) खुणा आहेत, त्या लोकांसाठी जे दृढविश्वास ठेवणारे आहेत. तसेच रात्र व दिवस यांच्या एकामागून एक येण्यामध्ये आणि अल्लाहने खाली पाठवलेल्या जीवनदायी (पाण्यामध्ये व पाठवणाऱ्याच्या प्रक्रियेमध्ये) आणि त्याद्वारे मृतप्राय झालेल्या जमिनीला जिवंत करण्यामध्ये आणि वाऱ्यांच्या दिशा बदलण्यामध्ये (म्हणजेच निसर्ग पातळीवर होत असलेल्या प्रत्येक घटनेमध्ये) (संदेश असलेल्या खुणा) त्या लोकांसाठी आहेत, जे बुद्धीचा वापर करतात. हे अल्लाहचे संदेश आहेत, जे आम्ही तुम्हाला सत्य प्रस्तुत करण्याच्या उद्देशाने ऐकवीत आहोत.'' ४५ : ३–६

२१) ''त्यांनी त्यांच्यावर असलेल्या आकाशाचे कधी (चिंतनपूर्वक) अवलोकन केले नाही का? आम्ही कशाप्रकारे त्यास निर्माण करून सजवले आणि पूर्णपणे दोषमुक्त (बनवले) आणि आम्ही पृथ्वीला पसरवून तिचा विस्तार केला आणि तिच्यावर पर्वतांना भक्कमरित्या उभे केले आणि तिच्यावर सर्व प्रकारच्या सुंदर वस्तू उगविल्या आहेत. यात (अल्लाहकडे) वळणाऱ्या प्रत्येक भक्तासाठी धडे व बोध प्राप्त करण्याची साधने आहेत.'' ५० : ६-८

२२) ''(लोकांनो!) तुम्ही जे पाणी पीत असता, त्याबद्दल तुम्ही कधी चिंतन केले आहे का? तुम्ही त्याचा ढगांद्वारे वर्षाव करता की, आम्ही आहोत त्याचा वर्षाव करणारे? आम्ही इच्छिल्यास त्यास खारट (व कडू) बनवू शकतो. तर मग तुम्ही आमच्याप्रति आभार का व्यक्त करीत नाही? तसेच जो अग्नी तुम्ही पेटविता, त्याविषयी तुम्ही कधी विचार केला आहात का? इंधनासाठी वापरल्या जाणाऱ्या वृक्षांना निर्माण करणारे तुम्ही आहात की, आम्ही आहोत? आम्ही तिला तुमच्यासाठी बोध प्राप्त करण्याचे माध्यम आणि वाटसरूंसाठी लाभदायी गोष्ट बनविले आहे. (लोकांनो!) तुम्ही आपल्या महान पालनकर्त्याच्या नावाने स्तुतिगान करा.'' ५६ : ६८-७४

२३) ''तुम्ही जिथे कुठे असता, तो (ईश्वर) तुमच्याबरोबर असतो आणि जे काही तुम्ही करत असता त्यावर तो नजर ठेवून असतो. आकाशात व पृथ्वीवर त्याचीच सत्ता आहे. तोच मनातील सर्व गोष्टी जाणतो.'' ५७ : ४-५

२४) ''(सत्य नाकारणाऱ्या लोकांनी) या गोष्टीचे कधी निरीक्षण केले नाही का की, अल्लाहने जे काही निर्माण केलेले आहे, त्यांच्या छाया उजवीकडे किंवा डावीकडे, वाकून (कशाप्रकारे) अल्लाहसमोर पूर्ण नम्र भावाने नतमस्तक होत आहेत. कारण आकाशातील प्रत्येक वस्तू किंवा पृथ्वीवरील सर्व प्राणिमात्र अल्लाहसमोरच नतमस्तक होत असतात. तसेच देवदूत देखील (त्याच्याच समोर) नतमस्तक आहेत आणि ते (कधीही) अहंकारपूर्वक वर्तन करीत नाहीत. ते आपल्यावर (नजर ठेवून) असलेल्या आपल्या पालनकर्त्याचे (नेहमी) भय बाळगून असतात आणि केवळ तेच करतात ज्याची त्यांना आज्ञा दिली जाते.'' १६:४८-५०

२५) ''तुम्हाला या गोष्टीची जाणीव नाही का की जे काही आकाशात आहे आणि जे काही पृथ्वीवर आहे ते सर्व अल्लाहसमोर नतमस्तक असतात. (म्हणजे अल्लाहच्या आज्ञेत अढळपणे बांधलेले असतात.) तसेच सूर्य आणि चंद्र व तारे आणि पर्वत, वृक्ष, पशू आणि लोकांपैकी अनेक (हे सर्व त्याला नमन करीत असतात.) पण (लोकांपैकी) बरेच असेही आहेत जे शिक्षेस पात्र ठरलेले आहेत.'' २२ : १८

२६) ''(पैगंबर ! त्यांना) विचारा, 'पृथ्वी आणि जे काही त्यात आहे, ते कोणाचे आहे? तुम्हाला (त्या प्रश्नाचे) उत्तर माहीत असेल तर मला सांगाच.' ते उत्तर देतील, 'अल्लाहचे' (त्यांना) सांगा, 'तर मग तुम्ही का चिंतन करत नाही?' (त्यांना) विचारा, 'कोण आहे मालक सात आकाशांचा? आणि समस्त विश्वाचे सत्ता केंद्र कोणाच्या मालकीचे आहे? ते म्हणतील, 'सर्व काही अल्लाहचेच आहे.' (त्यांना) सांगा, 'मग तुम्ही त्याची जाणीव ठेवून (जीवन व्यतीत करणार नाही) का? (लोकांना) सांगा, सर्व वस्तूंवर कोणाला

सर्वाधिकार प्राप्त आहे? आणि तो कोण आहे, जो सर्वांना संरक्षण प्रदान करतो? आणि त्याच्या विरुद्ध जाऊन कोणीही कोणाचेही रक्षण करू शकत नाही. तुम्हाला माहीत असेल तर मला सांगा. ते उत्तर देतील, 'हे सर्व सामर्थ्य केवळ अल्लाहलाच प्राप्त आहे.' (त्यांना) सांगा, 'तर मग (ईश्वरनिष्ठ जीवन अंगीकारण्याच्या बाबतीत) तुमची फसगत कशी होते'?'' २३:८४-८९

२७) ''त्या (परमेश्वरा) च्या चमत्कारांपैकी हे आहे की, त्याने तुम्हाला मातीपासून (म्हणजेच मातीतील रासायनिक घटकांपासून) निर्माण केले आहे आणि तुम्ही परिपूर्ण मनुषय बनून पृथ्वीवर चोहीकडे पसरून जाता (व तुमच्या संख्येत अनेक पटीने वाढ आणि वाढ होत असते.) आणि त्याच्या निशाण्यांपैकी हे आहे की, त्याने तुमच्यासाठी तुमच्याच जातीच्या सहचारिण्या निर्माण केल्या. ते यासाठी की, त्यांच्याद्वारे तुम्हाला मन:शांती लाभावी आणि त्याने तुमच्या स्वभावात एकमेकांप्रती प्रेम आणि करुणेची भावना ठेवून दिली. खरोखर यात अनेक संदेशसूचक खुणा आहेत, त्या लोकांसाठी जे चिंतन करीत असतात. त्याच्या (संदेशसूचक) खुणांपैकी (बऱ्याच गोष्टी आहेत जसे) आकाश व पृथ्वी यांची निर्मिती तुमच्या (विविध) भाषा आणि तुमच्या रंगाच्या बाबतीत विभिन्नता, खरोखर यात संदेश आहेत त्या लोकांसाठी जे ज्ञानी आहेत आणि त्याच्या खुणांपैकीच आहे. तुमचे रात्री व दिवसा झोपणे आणि (झोपेनंतर ताजेतवाने होऊन) तुम्ही (आपल्या उपजीविकेसाठी) त्याच्या कृपेच्या शोधात प्रयत्नरत होता. (या सर्व क्रियांमध्ये) खरोखर, अनेक संदेश आहेत, त्या लोकांसाठी जे आपल्या कानांचा (तसेच इतर ज्ञानेंद्रियाचा) उपयोग बोध ग्रहण करण्यासाठी करतात. त्याच्या (संदेशसूचक) खुणांपैकी हेही आहे की, तो तुम्हाला वीज चमकताना दाखवतो, (ज्याद्वारे तुमच्यात) भीती व आशा या दोन्ही गोष्टी जागृत होतात आणि तो आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो आणि त्याद्वारे जमिनीला तिच्या मृतावस्थेतून जिवंत करतो. खरोखर यात संदेश आहेत, त्या लोकांसाठी जे आपल्या बुद्धीचा वापर करतात आणि त्याच्या निशाण्यांपैकी (एक निशाणी ही देखील आहे) की आकाश आणि पृथ्वी हे त्याच्या आज्ञेचे (दृढतापूर्वक) स्थिर आहेत, (व पूर्ण संतुलनासह कार्य करीत आहेत.)'' ३० : २०-२५

### २) 'लतायफ़ सित्ता' (षट्‌चक्र सिद्धान्त वा कुंडलिनी चक्र सिद्धान्त)

### क) सामान्य परिचय -

सूफ़ी साधनेमध्ये 'लतायफ़' (एकवचनी रूप 'लतीफा') आणि 'दवाइर' (एकवचनी रूप 'दायरा') चा पण उल्लेख सापडतो. हे योगशास्त्रामधील चक्र आणि कुंडलिनीसारखे आहेत. या गोष्टी साधनेच्या विकसित रूपाचे घटक आहेत. सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या सुरुवातीच्या कालखंडामध्ये या गोष्टी नव्हत्या. यांचा समावेश नंतर झालेला आहे.

असे सांगितले जाते की, 'लतायफ़ सित्ता' या सिद्धान्ताचे प्रवर्तक शेख अहमद सर हिंदी हे आहेत. हे नक्शबंदी संप्रदायाचे आहेत. ते इसवी सन अकराव्या शतकात होऊन गेलेत. लतायफ़चा सिद्धांत जवळपास कुंडलिनी चक्र सिद्धान्तासारखा आहे. शेख अहमद यांनी मानवी शरीरामध्ये सहा अवस्थांचा उल्लेख केला आहे. हे एक दुसऱ्यास घेरलेले आहेत. हे सहा असे आहेत.

### लतायफ़ सित्ता : सूफ़ी सिद्धान्तप्रणीत षट्चक्रे

| क्र. | शरीरावयव | शरीरातील स्थान | वर्ण (रंग) | प्रेषित अधीनता |
|---|---|---|---|---|
| १) | नफ्स (प्राण वा वासना) | याचे स्थान नाभीखाली आहे. | नील | × (मात्र शैतान) |
| २) | कल्ब (हृदय वा अंतःकरण) | छातीच्या डावीकडे अवस्थित आहे. | पीत | आदम |
| ३) | रूह (आत्मा) | छातीच्या उजवीकडे स्थित आहे. | हरित | नूह आणि इब्राहीम |
| ४) | सिर्र (मर्म) | कल्ब आणि रूहच्या मध्यभागी | धवल, श्वेत | मूसा |
| ५) | खफी (गुह्य, अंतर्मन) | याचे स्थान ललाट (कपाळ) आहे. | कृष्ण | ईसा (येशू ख्रिस्त) |
| ६) | अख्फा (ब्रह्मंड) | मेंदूमध्ये स्थित आहे. | हरित | मुहम्मद |

काहींच्या मतानुसार अख्फा छातीच्या मध्यभागी स्थित आहे आणि सिर्रचे स्थान कल्ब आणि अख्फाच्या मध्ये आहे आणि खफीचे स्थान रूह आणि अख्फामध्ये आहे. यांचे रंग आणि प्रत्येक स्थानाच्या प्रेषिताची पण कल्पना केली गेली आहे. जसे कल्बचे रंग पिवळे आहे आणि ते प्रेषित आदम यांच्या पायाखाली स्थित आहे. सिर्र पांढरा, खफी काळा आणि अख्फा हिरव्या रंगाचा आहे आणि हे क्रमशः मूसा, ईसा (येशू) आणि मुहम्मद[स.] यांच्या पायांखाली अवस्थित आहेत.

काही लोकांचे असे म्हणणे आहे की, नफ्स निळ्या रंगाचे आहे. सूफ़ी साधकांचे म्हणणे आहे की जेव्हा नफ्स संपूर्णपणे अदृश्य होऊन जाते तेव्हा उज्ज्वल रंगाचे आधिपत्य प्रस्थापित होते. साधक ज्या अवस्थेस पोहोचतो तो त्या रंगाचे शिरस्राण धारण करतो आणि त्या रंगास पाहून त्या साधकाच्या आध्यात्मिक यात्रेच्या टप्प्याची कल्पना येते. साधारणपणे रूहचा रंग हिरवा होतो. असे म्हणतात की, जसजसे सालिक (साधक) वरच्या अवस्थेस अग्रेसर होतो तसतसे तो वेगवेगळ्या रंगांना पाहतो. जेव्हा संपूर्णपणे वर्णहीनतेची अवस्था येते (निर्माण होते), ती त्याचा शेवटचा टप्पा असते. अर्थात कोणतेच रंग राहत नाही. (दिसत नाही). साधक त्या वेळेस 'फना' अर्थात निर्वाण किंवा व्यष्टी नाशच्या अवस्थेस पोहोचतो. याला सूफ़ी 'आलम-ए-हैरत' म्हणजे आश्चर्य जगत असे म्हणतात.

सूफ़ी साधकासाठी परमेश्वराच्या निरंतर नामस्मरणाद्वारे या लतीफां (चक्रां) ना जागृत करणे आवश्यक असते. 'जिक्र' (नामस्मरण) 'मुराक़बा' (ध्यान, मनन, चिंतन) आणि शुगल (योग-क्रिया) यांच्या क्रियांद्वारे सूफ़ी एकानंतर एक लतीफे (चक्रा)स जागृत करण्यामध्ये समर्थ बनतो आणि शेवटी त्याला परम ज्योतीचे दर्शन घडते.

सूफ़ींमध्ये षट्चक्र सिद्धांताचे - लतायफ़ सित्ताचे प्रचलन आहे, हे आताच आपण पाहिले. सूफ़ी समजतात की या लतीफांना परमेश्वराच्या सतत नामस्मरणद्वारे जागृत करणे साधकासाठी आवश्यक असते. आपल्या साधनेमधील प्रगतीच्या टप्प्यानुसार सूफ़ीस वेगवेगळ्या रंगाचे दर्शन होते. 'सित्ता' सहास म्हणतात. म्हणून साधकास सहा लतीफांना जागृत करावे लागते. योगशास्त्रामध्ये सहा चक्रे आणि कुंडलिनीचे वर्णन

आहे. मानवी शरीरामध्ये सहा चक्रांचे स्थान निर्दिष्ट करण्यात आले आहे. साधक नाना प्रकारच्या साधनांनी चक्रांचे भेदन करतो आणि कुंडलिनी शक्तीस जागृत करतो.

योगच्या षट्चक्रांचे स्थान, रंग आणि देवता सांगितले गेले आहेत. हे खालीलप्रमाणे आहेत. (डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी - 'नाथ संप्रदाय' पृ. १२८)

**भारतीय तत्त्वज्ञानप्रणीत षट्चक्र**

| क्र. | चक्रांचे नाव | स्थान | रंग | देवता |
|---|---|---|---|---|
| १) | मूलाधार | पाठीच्या कणाच्या खालच्या भागामध्ये पायु आणि पुष्क मुळामध्ये | पीत | ब्रह्मा |
| २) | स्वाधिष्ठान | मेरूदंडामध्ये मेंदूच्या वर | श्वेत | विष्णू |
| ३) | मणिपूर | मेरूदंडामध्ये नाभिजवळ | लाल(तांबडे) | रुद्र |
| ४) | अनाहत | हृदयाजवळ | धूम्र | ईश |
| ५) | विशुदारव्य | कंठाजवळ | श्वेत | सदाशिव |
| ६) | आज्ञा | भुवयांमध्ये | × | शंभू |

योगच्या प्राणायाम, ध्यान इत्यादीशी सूफ़ींच्या 'जिक्र' अर्थात नामस्मरणाच्या क्रियांशी पुष्कळसे साम्य आहे. 'जिक्र'च्या क्रियांचे वर्णन करताना आपण पाहिले आहे की, कशा प्रकारे साधकास ध्यानस्थ होऊन बसावे लागते आणि कशा तऱ्हेने त्याला 'ला इला-ह इल्लल्लाह'चा जप करावे लागते आणि कशा प्रकारे हृदयाच्या टोकदार बिंदूवर ध्यान केंद्रित करावे लागते. या क्रियेचे परिणाम पण सांगण्यात आले आहे की, सांसारिक प्रलोभनाकडे आता साधक आकृष्ट होत नाही आणि त्याला परमेश्वराच्या विभूतीचे दर्शन घडते. आम्ही हे पण पाहिले की, कशा प्रकारे मनुष्य जाणतेपणे अथवा अजाणतेपणे जेव्हा श्वास घेतो तेव्हा तो 'अल्' म्हणतो आणि उच्छ्वासाच्या वेळेस 'ला ह' म्हणतो. सूफ़ींचा असा विश्वास आहे की, हे स्वाभाविकपणे घडते. याची तुलना योगशिखोपनिषद्च्या मंत्रयोग प्रकरणाशी केली जाऊ शकते. योगशिखोपनिषद्च्या "मंत्रयोगामध्ये म्हटले गेले आहे की, माणसाच्या श्वास-उच्छ्वासमध्येच 'ह' आणि 'स' वर्णाक्षर उच्चारित केले जातात. 'ह'कार सोबत प्राणवायू बाहेर येतो आणि 'स' कार सोबत तो आत जातो. अशाप्रकारे माणूस सहजपणे 'हं-स:' या मंत्राचा जप करत असतो. ..... हठयोगामुळे जडिमा (आळस) नष्ट होतो आणि आत्मा परमात्म्याचा अभेद सिद्ध होतो. यानंतर तो लययोग सुरू होतो की ज्यामध्ये पवन (वायू) स्थिर होऊन जातो आणि आत्मानंदाचे सुख प्राप्त होते." (डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी - 'नाथ-संप्रदाय' - पृ. १२८-२९) यात मुळीच शंका नाही की सूफ़ींनी भारतापासून प्राणायाम इत्यादी क्रिया शिकल्या. प्राणायाम विधी (पद्धती) ची माहिती सूफ़ींना इसवी सन नवव्या शतकामध्येच होती. (R. A. Nicholson - 'The Mystics of Islam' - pp. 49) आणि नंतर तर त्यांच्यामध्ये याचे प्रचलन अधिकाधिक झाले.

**षट्चक्र भेदन प्रक्रिया – पद्धत**

मानवी शरीरामध्ये सात योग चक्र मानले गेले आहेत. प्रथम गुदापासून थोडे वर आणि गुप्तांगापासून खालच्या बाजूस असलेल्यास मूलाधार म्हणतात. दुसरे चक्र नाभिमध्ये आहे. तिसरे हृदयामध्ये छातीच्या मध्यभागी आणि चौथे कंठामध्ये आहे. पाचवे चक्र टाळू (तालु) स्थानी म्हणजे जिव्हामूलेच्यावर आणि सहावे चक्र भ्रूमध्या (भ्रुकुटी) मध्ये आहे. शेवटचे (सातवे) योगचक्र सहस्रार म्हणजे मेंदूच्या मध्यभागी आहे. या सातही चक्रांवर एका पाठोपाठ एक करून ध्यान लावायचे असते; परंतु सहजपणे ध्यान लागत नाही. म्हणून नाकाने एकदम श्वास ओढून नंतर तोंडाने 'ॐ' ('ओम') चा ध्वनी उच्चारून त्या गंभीर ध्वनी सोबत मनास एक-एक चक्रावर केंद्रित केले पाहिजे. एका श्वासाने एक चक्रावर ध्यान लावले पाहिजे. प्रथम सहजासन किंवा पद्मासन लावून आसनावर बसावे. नंतर ध्यानमुद्रा करून आणि डोळे मिटवून ॐचे नाद करावे. प्रथम श्वासांमध्ये मूलाधार चक्रावर ध्यान केंद्रित करावे. ॐ चा ध्वनी उच्चारण करताना श्वास आपोआप बाहेर फेकले जाईल. (आपोआप उच्छ्वासित होईल.) मग दुसऱ्यांदा श्वास घेऊन ॐच्या ध्वनीसोबत दुसरे नाभी चक्रावर ध्यान द्यावे. अशा तऱ्हेने तिसऱ्या वेळेस हृदय, चौथ्या वेळेस कंठ, पाचव्या वेळेस तालु, सहाव्या वेळेस भ्रूमध्य (भ्रुकुटी) आणि सातव्या वेळेस सहस्रारवर ध्यान केंद्रित करून ध्यानमग्न अवस्थेत बसावे. सहस्रारमध्ये पोहोचल्यानंतर अधिक वेळ तेथेच ध्यान केले पाहिजे.

यामुळे सातही योगचक्रे उघडली जाऊन कुंडलिनीचा मार्ग आपोआप उघडला जातो आणि एखाद्या योग्य वेळी ध्यानासोबत कुंडलिनी जागृत होऊन जाते. प्रत्येक योगचक्रामध्ये एक एक लोक अथवा अतिंद्रिय दिव्य अवस्था आहे. याचे ज्ञान साधकास अभ्यासाद्वारे आपोआप होऊन जाते. ध्यान अथवा समाधीसाठी षटचक्रभेदन आवश्यक असते. साधक परमयोगी बनून परमात्म्याच्या स्थितीपर्यंत पोहोचू शकतो. प्रथम सहा चक्रांवर ध्यान करून सातव्या शेवटच्या चक्रावर स्थिर होण्याच्या प्रक्रियेत 'चक्रभेदन' असे म्हणतात.

उपरोक्त विवेचनामध्ये एक-दोन आसनांचा उल्लेख (आलेला) आहे. म्हणून येथेच आसनाविषयी संक्षिप्त परिचय करून घेतल्यास वावगे होणार नाही. (विषयांतर होणार नाही.)

**आसन व आसनाचे प्रमुख प्रकार : संक्षिप्त परिचय**

माणसात १) बद्ध, २) मुमुक्षू, ३) साधक व ४) सिद्ध अशा चार कोटी असतात.

१) **'बद्ध'** म्हणजे केवळ प्रापंचिक, फक्त इहलोकाचाच – देह – इंद्रियासंबंधी सुखाचाच विचार करणारे लोक; २) **'मुमुक्षू'** म्हणजे या संसारात कितीही सुखे भोगली तरीही ती दुःखमिश्रित व दुःख परिणामी आहेत, हे जग नश्वर आहे, जीवाला जन्मानंतर मरण येते, म्हणून या जन्ममरणाच्या परंपरेतून कशी सुटका होईल म्हणजे मोक्ष केव्हा व कसा मिळेल अशी इच्छा करणारा; ३) **'साधक'** म्हणजे सतसद्गुरूंचा आश्रय करून त्यांनी सांगितलेले साधन करीत असणारा आणि ४) **'सिद्ध'** म्हणजे साधन उत्तम रीतीने – तीव्रसंवेगाने करून साध्य प्राप्त करून घेतलेला.

आसन अनेक प्रकारचे आहेत. आसनामुळे शरीरस्वास्थ्याचा अवश्य लाभ होतो. सोबत ते साधनेसाठी पण अत्यंत उपयुक्त आहे. आसन हे फक्त व्यायाम किंवा क्रीडा कौशल्य नव्हे तर मन आणि शरीराच्या शुद्ध नैसर्गिक अवस्थेसाठी आवश्यक आहे. 'आसन' या शब्दाची फोड केल्यास त्याच्या वास्तविक अर्थाचा

उलगडा सहजपणे होतो. 'सन' म्हणजे पलीकडे घेऊन जाणे आणि 'आयन' म्हणजे ज्यामुळे साधक हा परा अवस्थेत पोहोचू शकतो ते शरीर योग. ध्यान आणि षट्चक्रभेदनासाठी पद्मासन चांगले आहे. म्हणून सर्वप्रथम त्याची संक्षिप्त ओळख करून घेऊ.

१) **पद्मासन** – भूमी स्थित आसनावर बसून प्रथम डाव्या टांगेवर उजवी टांग उठवून (वर) ठेवावी. तद्नंतर डावी टांग उजव्या टांगेवर ठेवावी आणि खांदे थोडे वर उचलून मेरूदंडास सरळ ठेवावे. हनुवटीस थोडेसे मागे ओढून हातांचे पंजे दोन्ही जांघांवर ध्यानमुद्रा करून ठेवावेत. समस्त शरीर स्वस्थ आणि लवचीक असावे. शरीरावर कोणत्याच प्रकारचे ताण नसावे. यास **पद्मासन** असे म्हणतात. हे आसन प्रथम १-२ मिनिटे करावे. अभ्यासाने याची वेळ वाढविता येऊ शकते. ध्यान आणि समाधीसाठी पद्मासन सर्वश्रेष्ठ आहे. फक्त पद्मासनामध्ये एक घटिका दररोज बसल्याने ध्यान आणि समाधी लागू शकते. पद्मासनामुळे कुंडलिनी जागृती आपोआप होऊ शकते.

२) **शवासन किंवा योगनिद्रा** – हे शरीर, मन आणि बुद्धीसाठी उपयोगी साधना आहे. यासच म्हणजे योगनिद्रेस अनेक जण **शवासन** म्हणतात; परंतु योगनिद्रेस शवासन म्हणजे योग्य नव्हे. **शवासन** त्यास म्हणतात की जे केल्यामुळे साधक आपले शरीर सोडून (शरीराचा त्याग करून) अंतराळामध्ये प्रवेश करतो. (जातो) आणि खाली पडलेल्या आपल्या मृत शरीरास म्हणजेच शवास पाहू शकतो. **योगनिद्रेमध्ये** योगी आपल्या शरीराबाहेर पडत नाही; परंतु त्याचे शरीर निद्रिस्त असते आणि साधक जीवात्मा हा शरीरामध्ये असून सुद्धा संपूर्णपणे जागृत असतो. ही जागृत निद्रा अवयव ध्यानद्वारे साध्य होते. यासाठी एखाद्या चटईवर तोंड वर करून झोपावे. (लेटून जावे.) पायांच्या टाचा चिटकून; परंतु बोटे एकमेकांपासून अंतर राखणारी (चिटकून नसावेत) असावेत. हातांच्या मुठी वर वळलेल्या; परंतु जांघांना चिटकून ठेवाव्यात. डोके सरळ किंवा उजवीकडे अथवा डावीकडे वळलेले ठेवू शकता. समस्त शरीर ढिले (शिथिल) ठेवावे आणि डोळे मिटून पुढे सांगितल्याप्रमाणे एक एक अवयवावर ध्यान देऊन त्यानंतर दाखविल्या गेलेल्या दुसऱ्या अवयवावर ध्यान केंद्रित केले पाहिजे. उशीसाठी काहीच घेऊ नये. श्वासोच्छ्वासावर लक्ष देऊ नये. ध्यान फक्त सांगितलेल्या अवयवावरच असले पाहिजे. अशा प्रकारे अवयव ध्यानामुळे योगनिद्रा सिद्ध होते की ज्यामध्ये साधक जीवात्मा हा संपूर्णपणे जागृत असतो; परंतु साधकाचे शरीर संपूर्णपणे निद्रावस्थेमध्ये असते. अनेक साधक या योगनिद्रेमध्ये आपले घोरणे पण ऐकू शकतात. योगनिद्रा ही योग्यांची निद्रा (झोप) आहे. या साधनेद्वारे साधकाची निद्रा, त्याचा आहार आणि त्याच्या आगंतुक इच्छा हळूहळू कमी होऊ लागतात; परंतु त्यामुळे त्याचे शरीर व मनावर कोणत्याच प्रकारचा वाईट परिणाम होत नाही, अपितु त्यामुळे शरीर, मन आणि बुद्धी अधिक शांत आणि सामर्थ्यशील बनतात.

**योगनिद्रेचे अवयवध्यान क्रम** – डोळे मिटून अवयवावर पुढीलप्रमाणे ध्यान करावे. प्रथम उजव्या पायाचा अंगठा ध्यानासाठी घ्यावे. दोन-तीन क्षण उजव्या अंगठ्याचे ध्यान केल्यानंतर त्याला लागून असलेल्या तर्जनी बोटाकडे ध्यान लावावे. प्रत्येक अवयवावर दोन-तीन क्षण ध्यान करावे. तर्जनीनंतर मध्यमा, अनामिका आणि शेवटी कनिष्ठिका या सर्वांवर ध्यान करावे. त्यानंतर तळपाय (पदतल) आणि मग टाच ध्यानासाठी घ्यावे. टाचेनंतर उजव्या पायाचा घोटा, पोटरी, गुडघा, जांघ आणि कंबरेचे ध्यान करावे.

उजव्या पायानंतर डावा पाय घ्यावे. प्रथम डाव्या पायाचा अंगठा, तर्जनी, मध्यमा, अनामिका आणि कनिष्ठिका ध्यानासाठी घ्यावे. त्यानंतर तळपाय, टाच, घोटा, पोटरी, गुडघा, जांघ आणि कंबर ध्यानासाठी क्रमशः घ्यावे. डाव्या पायानंतर उजव्या हाताचे अवयव ध्यानासाठी घ्यावे. प्रथम उजव्या हाताचा अंगठा, तदनंतर तर्जनी, मध्यमा, अनामिका आणि कनिष्ठिका घ्यावे. यानंतर उजव्या हाताने तळहात, मनगट, प्रकोष्ट, कोपर, बाहू आणि खांदा ध्यानासाठी घ्यावे. उजव्या हातानंतर डाव्या हाताच्या अंगठ्यापासून ते क्रमशः खांद्यापर्यंत सर्व अवयव ध्यानासाठी घ्यावेत. त्यानंतर गुदापासून थोडे वर असलेले मूलाधार चक्रावर ध्यान द्यावे. नंतर नाभी (बेंबी), उदर (पोट), हृदय, उजवी छाती, डावी छाती आणि कंठावर ध्यान द्यावे. कंठानंतर हनुवटी, मुख (तोंड), नासिका, उजवे गाल (कपाळ), डावे गाल, उजवे कान, डावे कान, उजवे नेत्र, डावे नेत्र आणि भ्रूमध्यावर ध्यान द्यावे. भ्रूमध्यावर विशेष ध्यान द्यावे. कारण भ्रूमध्यामुळेच अनेकानेक दिव्य अनुभूती येतात. जन्म-मृत्यूचे आवागमनद्वार हेच आहे. यामुळे संयम प्राप्त झाल्यावर साधक हा इच्छामरणी बनू शकतो.

भ्रूमध्यानंतर कपाल आणि कपालनंतर डोक्याचे मध्य सहस्रार यावर ध्यान देऊन त्याच अवस्थेमध्ये अधिक वेळ राहून जावे. अशाप्रकारे अवयव ध्यान केल्यामुळे आपोआप योगनिद्रा सिद्ध होऊन जाते. यामध्ये साधकाचे जड शरीर निद्राधीन असते. त्याचा जीवात्मा नव्हे. ही प्रत्यक्ष अनुभूती आहे. केवळ कल्पनाविलास नव्हे. योगनिद्राद्वारे संपूर्ण शरीर अवयव ध्यानामुळे पूर्णपणे निरोगी आणि स्वस्थ राहते. निद्रा, आहाराची मात्रा आणि इच्छा कमी होऊन जातात आणि मन एक अति शांत परंतु बलशाली अवस्थेमध्ये नेहमी राहते. मधुमेह, रक्तचाप, हृदयविकार, निद्रानाश, अधिक निद्रा (अति निद्रा), अस्वस्थता, क्रोध, भीती इत्यादी अनैसर्गिक अवस्था अथवा रोग हळूहळू नाहीसे होतात. याच साधनेमध्ये अवयवावर ध्यान देऊन ध्यानाद्वारे प्राणशक्तीस दीर्घ बनविण्याच्या अभ्यासाने शवासन साधना सिद्ध होते. या साधनेने साधक आपल्या शरीराबाहेर पडून वाटेल त्या जागी लिंग शरीराद्वारे भ्रमण करून प्रत्यक्ष अनुभूती घेऊ शकतो; परंतु ही साधना अत्यंत कठीण आहे. ही सुयोग्य गुरूकडूनच आत्मसात करावी लागते. ही असामान्य साधना सामान्यांसाठी नाही.

अशाप्रकारे आसन, ध्यान आणि योगनिद्रा केल्यामुळे माणूस हळूहळू उन्नत बनून सुशील, सुस्वभावी, सुसंस्कारित आणि यच्चयावत प्राणिमात्रांच्या बाबतीत दयाभाव ठेवणारा असा बनतो. धर्मांच्या संकीर्ण भिंती ओलांडून तो विश्वव्यापक वृत्तीचा बनतो. हिंदू, मुसलमान, शीख आणि ख्रिश्चन या भेदभावापलीकडे तो असतो. सर्वांच्या सुखदुःखामध्ये तो स्वतःचे सुखदुःख पाहतो. मग तो द्वेष, स्वार्थ, हिंसाचार यांच्या आहारी जात नाही. तो ज्या राष्ट्रामध्ये असेल त्या राष्ट्राची भाषा आणि संस्कृती ही आपलीच आहेत, असे मानतो. तो कुटुंबासाठी त्याग करणारा आदर्श कुटुंबप्रमुख, गावाच्या उत्कर्षासाठी त्याग करणारा आदर्श ग्रामस्थ, देशासाठी त्याग करणारा आदर्श देशभक्त आणि शेवटी आत्मध्यानासाठी जगात राहूनही जगापासून अलिप्त असतो. सर्व धर्मांचा, तत्त्वांचा आणि संस्कारांचा आदर्श हेच तर सर्वधर्म समभाव आहे. ही साम्यावस्था या सुलभ साधनेच्या अभ्यासाने आपोआप निर्माण होते. अशा साम्यावस्थेची व्यक्ती ही ना हिंदू असते, ना मुसलमान, ना शीख आणि ना ख्रिश्चन असते. अशी व्यक्ती एक सच्चा मानव असते. ती असाधारण मानव

बनून एक आदर्श जीवन व्यतीत करते. मग तिचे देश, वेश, भाषा, आर्थिक विचार आणि कथित संप्रदाय कोणते का असेना!

**ख) लतायफ़ सित्ता : कार्य प्रणाली**

ध्यान, चिंतन, मनन या स्वरूपात 'लतायफ़ सित्ता' अर्थात षटचक्रांचे प्रचलन सूफ़ी साधनेत, नक्शबंदी संप्रदायामध्ये आहे. या षट्चक्रांमधील चढता क्रम क्रमश: असा आहे – १) नफ्स, २) कल्ब, ३) रूह, ४) सिर्र, ५) ख़फी आणि ६) अख़्फा, परंतु नक्शबंदी संप्रदायामध्ये याची सुरुवात 'नफ्स'पासून न करता 'कल्ब'पासून करतात आणि सर्वात शेवटी 'नफ्स' या चक्राची कार्यप्रणाली विचारात घेतात. म्हणून या कार्यप्रणालीचे विवेचन सर्वप्रथम 'कल्ब'पासून सुरू होते.

**१) लतीफा कल्ब : हृदय चक्र** – याची पद्धत अशी आहे की, डोळे मिटून, जिव्हा टाळूस स्पर्श करून अंत:करणास सर्वश्रेष्ठ ईश्वराकडे ध्यानस्थ करून सद्‌गुरूच्या चेहऱ्यास समोरासमोर कल्पित करून चित्ताच्या अंत:करणाच्या जिव्हेने 'अल्लाह, अल्लाह' (हे ईश्वरा! हे ईश्वरा!) असे नामस्मरण करावे.

**अभिप्राय, मथितार्थ** – हृदय, चित्त, मन म्हणजेच 'कल्ब' हे इहलोक व परलोकाच्या दरम्यान एक मध्य जगत, अडकण अर्थात 'बर्जख' आहे.

जेव्हा साधक हृदय चक्रापासून नामस्मरण करतो तेव्हा अंत:करण शुद्ध बनून त्यावर तंद्रेचा प्रभाव सुरू होतो आणि तो इहलोकापासून (आलम-ए-नासूत) देवलाकामध्ये आपले पाय ठेवतो. (पदार्पण करतो.) आत्मा आणि देहाच्या दरम्यान चित्त एक सूक्ष्म पदार्थ आहे आणि हे मानवाचे एक गुप्त समग्र वास्तव आहे. याला देवलोक (आलम-ए-मलकूत) पण म्हणतात. याच दृष्टांताच्या आधारे साधक उत्कर्षाचे आपले सर्व टप्पे ओलांडून नामस्मरणाचे यथेष्ट परिणाम (फल) साध्य करतो.

या टप्प्यावर ईश्वराच्या सत्तेच्या पवित्र श्रेणीपासून आपल्या सद्‌गुरूच्या माध्यमाने कृपा प्राप्त केली जाते. या कृपेचा लाभ अंत:करणास होतो. या चक्रामध्ये एकाग्र बनून विचाराची दृष्टी अंत:करणावर आणि अंत:करणाची दृष्टी सर्वश्रेष्ठ परमेश्वरावर ठेवून कृपेचे उपार्जन करावे.

षट्चक्रे आध्यात्मिक जगाचे – 'आलम-ए-अम्र'चे उच्च परमधाम (अर्श) पर्यंत पोहोचते करणारे सिद्धान्त आहेत. अंत:करण जेव्हा आपल्या मुळाकडे प्रवृत्त आकृष्ट होते तेव्हा ते वरच्या बाजूस प्रवृत्त होते. या चक्राचे प्रकाशाचे रंग पिवळे जर्द आहे. सर्वात प्रथम साधकासाठी सच्ची आकांक्षा आवश्यक आहे. ही आकांक्षा बेसावधगिरीस टाळून सावधगिरी बाळगल्यास निर्माण होते.

**२) लतीफा रूह : आत्माचक्र** – जेव्हा शिरेची हालचाल हृदयामध्ये निर्माण होते. तेव्हा आत्म्याच्या चक्रानिशी नामस्मरण करावे. याचे प्रमाण दोन हिस्सा आत्म्या (रूह) शी आणि एक हिस्सा हृदया (कल्ब) शी असावे. याचे स्थान दोन बोट अंतरावर छातीखालील उजव्या बाजूस आहे.

**अभिप्राय मथितार्थ** – जेव्हा साधक हृदयाच्या – चित्ताच्या अवस्थेस चांगल्या प्रकारे जाणतो तेव्हा आत्म्याच्या चक्राकडे त्यास उन्मुख करतात. आत्म्याचे चक्र पण आध्यात्मिक लोकाशी संबंधित असते आणि येथे साधक सादृश्य जगापासून आत्म्याच्या जगामध्ये पदार्पण करतो आणि तो परमेश्वराच्या नामरूपाचा जाणकार बनतो.

आत्म्याच्या चक्राशी अभिप्राय त्या वास्तवाशी आहे की जे सादृश्य मानवास चालना देणारे आहे. ही मुहम्मदी आत्म्याची कृपेची पडछाया आहे. यालाच 'आलम-ए-जबरूत' म्हणजे तप:लोक म्हणतात. ही ती सूक्ष्म तंद्रा आहे. जी साधकामध्ये काही वेळेस भौतिक, सादृश्य देहाशिवाय अचानक निर्माण होते. साधकावर या तंद्रेचा प्रबळ प्रभाव झाल्यास त्याला तप:लोकाची स्थितीदृश्य स्वरूपात समोर दिसते. ही मानवी आत्म्याची कार्यप्रणाली आहे. यास्तव ईश्वराचे भक्त या देणगीने उपकृत होतात. ते भौतिक जगात आमच्यासोबत असतात; परंतु आत्म्याच्या जगाच्या अवस्था त्यांच्यावर नेहमी उघडलेल्या असतात. जरी आत्मा अद्वितीय - अनुपम जगाशी निगडित असतो. वास्तविक अनुपमाचे वास्तव परमेश्वरासम्मुख समान वा तुल्य परिवृत्तामध्ये दाखल आहे. जणू तुल्य जग आणि अनुपम ईश्वरादरम्यान एक मध्य जग आहे. आत्मा दोन्हीकडचा रंग धारण करतो आणि यामध्ये दोन्ही दृष्टीने ही बाब सत्य आहे, खरी आहे. या चक्राच्या प्रकाशाचे रंग हिरवे आहे.

**३) लतीफा सिर्र : मर्म चक्र** - जेव्हा आत्म्याच्या चक्रामध्ये गती निर्माण होते तेव्हा मर्म चक्राने जप वा नामस्मरण करावे. याचे स्थान छातीमध्ये डावीकडे वक्ष:स्थळाच्या मध्यभागी आहे.

**अभिप्राय, मथितार्थ** - मर्म चक्राशी अभिप्राय त्या गूढाशी आहे जे मानवी आत्म्याचे प्रारंभ स्थळ आहे, प्रकट स्थान आहे. याला 'आलम-ए-लाहूत' म्हणजे सत्य लोक पण म्हणतात. सत्यलोकाशी अभिप्राय मुहम्मदी आत्म्याशी आहे. ही एक सूक्ष्मतर तंद्रा आहे जेथे साधकास अचेतन अवस्थेमध्ये त्याच्या हृदयामध्ये (मनामध्ये) अशा विचारधारा निर्माण होतात, ज्या हृदयचक्र आणि आत्माचक्रामध्ये निर्माण होणाऱ्या अनुभूतींपेक्षा स्पष्ट तर असतात. याचा अंदाजा तोच साधक करू शकतो की ज्याच्यावर असे प्रसंग घडतात आणि येथे ईश्वरी प्रेमामुळे ब्रह्मज्ञान प्राप्त होते. या चक्राच्या प्रकाशाचे रंग श्वेत, धवल, पांढरे आहे.

**४) लतीफा खफी : गुह्य वा अंतर्मन चक्र** - मर्म चक्रानंतर मौन जप व गुह्य नामस्मरण करावे. याचे स्थान छातीच्या मध्यभागी उजवीकडे दोन बोट अंतरावर आहे.

**अभिप्राय, मथितार्थ** - गुह्य वा अंतर्मन चक्राशी अभिप्राय मुहम्मदी प्रकाशाशी आहे. याला 'आलम-ए-हाहूत' अर्थात कौमार लोक म्हणतात. साधकामध्ये जेव्हा या चक्राच्या आनंदाची अनुभूती निर्माण होते तेव्हा ईश्वरी सत्तेच्या अवलोकनाच्या आधारे तो ईश्वराच्या एकत्त्वतेमध्ये विलीन होतो. या चक्राच्या प्रकाशाचे रंग कृष्ण (काळे) आहे.

**५) लतीफा अखफा : ब्रह्मंड चक्र** - गुह्य चक्रानंतर ब्रह्मंडाशी नामस्मरण करावे. याचे स्थान मेंदूचा मध्यभाग आहे. ही पाच चक्रे आध्यात्मिक जगताची आहेत. ही 'भव' वा 'नाद' अर्थात 'कुन' या दैवी (ईश्वरी) आज्ञेने निर्माण झालेली आहेत. यांचे स्थान परमधाम वा ईश्वरी सिंहासना ('अर्श') वर आहे. यांची पडछाया मानवी देहामध्ये आहे. जेव्हा नामस्मरणाच्या आधिक्याने हे विशुद्ध बनतात (होतात) तेव्हा ते आपल्या मुळाकडे प्रवृत्त होतात.

**अभिप्राय, मथितार्थ** - ब्रह्मंड च्रकाशी अभिप्राय विशुद्ध परम सत्ता तदत्त्वाच्या श्रेणीशी (जात-ए-बुहत, मर्तब-ए-हूय्यत) आहे. याच 'जात' अर्थात सत्तेच्या गुणवर्णनामध्ये 'सुब्बूहन् कुद्दूसन' म्हणजेच

अत्यंत पवित्र (व) अत्यंत विशुद्ध असे म्हटले गेले आहे. यालाच 'तो अल्लाह निरपेक्ष व निस्पृह आहे' अर्थात 'अल्लाहुस्समद' असे म्हटले गेले आहे. याशिवाय त्याला 'वरा-उल-वरा' म्हणजेच 'परमशून्य' व पुन्हा 'परब्रह्म मंडल' असेही म्हटले जाते आणि हीच सत्ता गुण आणि तन्मात्रांहून मुक्त असून ती त्यांच्या बंधनात मुळीच नाही. ही ती अत्यंत विशुद्ध सत्ता आहे की जिच्याबाबतीत परमेश्वराचे विधान आहे - 'अला इन्नह् बिकुल्लि शैइम-मुहीतुन' अर्थात 'लक्षात ठेवा, त्याने प्रत्येक गोष्टीस वेढून ठेवलेले आहे. म्हणजेच तो प्रत्येक वस्तूस जाणतो.' ४१:५४ या चक्राच्या प्रकाशाचे रंग हरित म्हणजे हिरवे आहे.

**६) लतीफा नफ्स (नफ्सी) : प्राणचक्र वा वासनाचक्र -** ब्रह्मंड चक्रानंतर प्राणचक्राशी नामस्मरण करावे. याचे स्थान माथ्याचा मध्यभाग आहे.

**अभिप्राय, मथितार्थ -** वासना माणसास नेहमी अहंकार आणि पाखंडाकडे प्रवृत्त करीत असते. याला पवित्र कुराणामध्ये 'नफ्स अम्मारा' म्हणजेच दुष्टात्मा म्हणून संबोधन केलेले आहे. या स्थानी तिचे निग्रह व परिष्कार करून तिची दुष्टता दूर करण्यासाठी प्रयत्न केले जाते. जेणेकरून तिने आपली दुष्टता सोडून द्यावी. याला इंद्रिय निग्रह किंवा चित्तशुद्धी असेही म्हणतात. यानंतरच वासना नैतिफ सद्‌गुणांनी सुशोभित होते आणि हीच चित्तशुद्धी आहे. या चक्राच्या प्रकाशाचे रंग, इंद्रिय निग्रहानंतर तंद्राहीनता आहे.

**विशेष सूचना -** या चक्रांचे रंग आणि प्रकाशपुंज साधनेचे अंग (विभाग) नाहीत. हे फक्त एकाग्रतेमध्ये सहाय्यक असतात.

**ग) लतायफ़ सित्ता : आध्यात्मिक पैलू (तात्त्विक ओळख)**

प्रत्येक धार्मिक म्हणजे आध्यात्मिक परंपरा ही दोन प्रवाहामध्ये प्रवाहित होते - १) इंद्रियानुभवातीत दिव्यत्वास समजण्यासाठी प्रयत्नशील असणे, मात्र ही बाब इंद्रियातीत असल्यामुळे ती भिन्न आणि अगम्य वाटते आणि दुसरी


२) परमसत्ता सान्निध्यात असल्याचे पाहणे आणि म्हणून ते जवळ जाण्यायोग्य आणि आवाक्यात, आटोक्यात असल्याचे वाटणे.

प्रत्येक आध्यात्मिक परंपरेमध्ये द्रष्टे गुढवाद्यांची भूमिका दिव्यत्वापर्यंत पोहोचण्यासाठी संदर्भ आणि पद्धती शोधून देण्याची राहिली आहे.

इस्लामी परंपरेमध्ये गूढवादी सूफ़ींना परमेश्वराशी संभाषण करण्याची एक मोठी गरज भासली. त्यांना पुढील कौराणिक श्लोकांपासून या संदर्भात स्फूर्ती आणि प्रेरणा मिळाली - '(मानवाच्या) कंठातील शीरेपेक्षाही ईश्वर (आम्ही) त्याच्या अधिक निकट आहे (आहोत)' - ५० : १६ आणि 'तर तुम्ही जिकडे तोंड वळवाल तिकडेच अल्लाहचा चेहरा आहे.' आपल्या दृढ धारणेचा स्रोत पुढील प्रेषित वचना (हदीत) मध्ये शोधतात. 'तुम्ही ईश्वराची अशी भक्ती करावी की तुम्ही त्याला पाहत आहात आणि जर तुम्ही त्याला पाहू शकत नसाल तर निश्चितच तो तुम्हास पाहतो.'

सूफ़ी साधनेच्या वर्तुळामध्ये 'हकीकत' (सत्य) हे केंद्रस्थानी असते. तिचा परिघ 'शरिया' म्हणजे अवतरित विधी - विधानांनी घेरलेले आहे आणि 'तरीकत' म्हणजे साधना - मार्ग हा त्रिज्यास्वरूप असून तो एकीकडे गूढ अव्यक्त, अदृश्य असे केंद्र आणि दुसरीकडे दृश्य परिघास जोडणारा दुवा असतो.

ही बाब पुढील आकृतीवरून स्पष्ट होईल.




१. मारिफत (ब्रह्मज्ञान)
२. महब्बह (प्रेम)
३. मखफह (भय)
४. तौबा (पश्चात्ताप)
५. जहद (निरासक्ती) →
६. सब्र (संयम)
७. शुकर (कृतज्ञता)
८. रियाजत
(दमन, इंद्रियनिग्रह)
९. तवक्कल (विश्रंभ)
१०. जिक्र (मुराकबा व फिक्र) (नामस्मरण, ध्यान, चिंतन, मनन)

शरिया : शरीअत (कर्मकांड, दैवी विधी – विधान)

सूफ़ी साधना मार्गावरील 'हक़ीकत' या उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी सूफ़ी साधकास शरीअत अर्थात कर्मकांडाचे आटोकाट पालन करावे लागते. त्याच्या साधनेतील टप्प्यांचा क्रम हा उपरोक्त आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे १) ब्रह्मज्ञान, २) प्रेम, ३) भय, ४) पश्चात्ताप, ५) निरासक्ती, ६) संयम, ७) कृतज्ञता, ८) वासना–दमन वा इंद्रिय–निग्रह, ९) विश्रंभ व शेवटी १०) नामस्मरण. उपासना विधींपैकी नाम–स्मरण हे सर्वश्रेष्ठ असल्याचे स्वतः परमेश्वराने आपले दिव्य ग्रंथ 'कुरआन'मध्ये व्यक्त केले आहे. ध्यान, चिंतन व मनन या गोष्टी नामस्मरणास अनुषंगून आहेत आणि 'लतायफ़ सित्ता' मध्ये यांचीच प्रमुख भूमिका आहे. त्यामुळे यांची तात्त्विक ओळख असणे गरजेचे आहे.

साधना मार्गामध्ये ('तरीकत') प्रगतीपथावर असताना, गूढ अदृश्य केंद्राकडे म्हणजे परमेश्वराकडे प्रयाण करताना सूफ़ींचा शरीर हा प्रवासात नसतो तर त्यांचा आत्मा हा प्रवासात असतो. 'रूह' अर्थात आत्म्याचे आपले स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व आहे. 'रूह', 'अम्र रब्बी' म्हणजे आत्मा हा प्रभूचा आदेश आहे. तो संपूर्णपणे प्रभूचा आहे. 'तरीकत' म्हणजे साधनेचा मार्ग आक्रमण करीत असताना सूफ़ीस चित्ताच्या – आत्म्याच्या स्थानकांमधून जावे लागते. ती स्थानके भक्तीचे टप्पे आणि ईश्वर सामिप्याची मात्रा यांचे निदर्शक आहेत. ही स्थानके खालीलप्रमाणे आहेत व ते षट्चक्रांशी समांतर अशी आहेत.

**१) 'मक़ाम अन्नफ़्स' : वासने (प्राणा) चे सोपान –** हा मानवी म्हणजे साधकाच्या जीवनामधील प्रथम अटळ टप्पा आहे. विकासाच्या सर्वात प्रारंभिक अवस्थेमध्ये अन्न, पाणी, स्नेह, प्रेम इत्यादी पाशवी इच्छापूर्तीसाठी शरीर आसुसलेले असते. ही ईश्वर प्रदत्त अशी एक आवश्यक अट आहे. शिशु आणि लहान मुलांमध्ये निर्णयशक्ती नसते. म्हणून त्यांना बरे–वाईटामधील फरक कळत नाही. अहंमन्यतेच्या अवस्थेमध्ये

विवेकशक्ती आणि निर्णयशक्ती अद्याप विकसित झालेली नसते. यांचा विकास नंतर होतो. पुष्कळसे लोक अहंमन्यतेचा त्याग केल्याशिवाय प्रौढत्वास आणि वृद्धत्वास पोहोचतात.

**२) 'मक़ाम–अल–क़ल्ब' : चित्तस्थान, मनोभूमी –** जेव्हा एखादा माणूस नफ्स म्हणजे वासनेवर नियंत्रण मिळविण्यात यशस्वी होतो म्हणजे आपली इच्छा शक्ती वाढवितो तेव्हा त्याला जबाबदारीची जाणीव होऊ लागते. त्याची विचारशक्ती प्रबळ बनते. त्याच्यामध्ये सभ्यता, दया व करुणेचा भाव निर्माण होतो. या गुणांमुळे त्याला वासनेची योग्य जाणीव होते. यानंतर साधक जेव्हा 'मक़ाम–अल–कल्ब' म्हणजे चित्तस्थानावर पोहोचतो, तेव्हा तो म्हणू लागतो, ''मी जगामध्ये फक्त सत्कर्मे करू इच्छितो. मी सर्व प्रकारचे स्वभाव पसंत करतो. मी प्रत्येकाला आपलेसे करतो, ओ हो! किती सुंदर जीवन आहे! या टप्प्यावर सकारात्मक पैलू असताना पण हा अद्याप आत्म्याचा प्रगतीचा फक्त दुसरा टप्पा आहे.''

**३) 'मक़ाम अर्रूह' : विशुद्ध आत्म्याचे स्थळ –** सद्‌गुरूच्या सुयोग्य मार्गदर्शनाशिवाय 'मक़ाम–अल–कल्ब' पासून उच्चतर टप्प्याची उत्क्रांती चालू ठेवणे कठीण असणे. गुरूच्या मार्गदर्शनाखाली शिष्य 'मक़ाम अर्रूह' कडे प्रयाण करू शकेल. गुरूनिर्दिष्ट विभिन्न सराव पद्धतींना आत्मसात करून प्रेम, दया, करुणा, इतरांचा विचार आणि आदर, आत्मसंयम, स्वशिस्त या गुणांच्या आधारे तो परिपूर्णतेचा कळस गाठण्यास समर्थ होऊ शकेल. या टप्प्यावर पोहोचलेला साधक हा इतरांच्या दृष्टीमध्ये एक मोठी प्रेमळ आणि धर्मनिष्ठ व्यक्ती म्हणून नजरेस येते. या टप्प्यावर एक प्रकारची उत्कंठा निर्माण होते. यामुळे आत्म्याचे सखोल शुद्धीकरण होते. परिणामी प्रेषित मुहम्मद यांनी म्हटल्याप्रमाणे ''पानगळीमध्ये वृक्षाचे पत्ते जसे झडून खाली पडतात तद्वत पापे गळून पडतात.'' या उत्कंठेमुळे आत्म्यावर जमलेले पाप–मळाचे थर जळून भस्मसात होतात.

**४) 'मक़ाम अस्सिर्र' : मर्मस्थळ वा अंत:करणाचा टप्पा –** दैवी गुह्ये वा मर्मांच्या टप्प्यावर भाग्यवानच त्या यंत्रणेस समजू शकतात की ज्यामुळे समस्त विश्व अडकले आहे. त्यांनी सुस्पष्ट ऐकण्याच्या शक्ती विकसित केल्या आहेत. ते इतरांच्या मनातील विचार जाणू शकतात. त्यांच्याकडे इंद्रियातीत जगापासून माहिती घेऊन देवदूत येतात.


**५) 'मक़ाम–अल्–कुर्ब' : सान्निध्यस्थळ –** या टप्प्यावर साधक हा खरोखर सर्वश्रेष्ठ परमेश्वराजवळील दृश्य पाहण्याचा आनंद उपभोगतो. म्हणजेच 'अर्श' अर्थात परमधाम, ईश्वराचे राजसिंहासन असलेले सर्वोच्च स्वर्गाचे दर्शन त्याला घडते. त्याला इहलोकाचा फायदा तर मिळतोच; परंतु त्याला परलोकाचे पण ओझरते दर्शन घडते. यामध्ये इतर सृष्ट रूपे असतात. ते नित्य आनंदाच्या स्थितीमध्ये असतात. त्यांना ना झोपेची चिंता असते, ना अन्नाची काळजी किंवा ना कपड्यांची. ते दिव्य उन्मादामध्ये मस्त पहुडलेले आणि ईश्वराशी एकरूप झालेले असतात.

**६) 'मक़ाम–अल–वस्ल' : मीलनभूमी वा तादात्म्य स्थळ –** या टप्प्यावर ईश्वर हा भक्ताची प्रेयसी असतो आणि भक्त हा ईश्वराचा प्रियकर असतो. ईश्वर आणि भक्त हे दोघे दिव्य एकत्वामध्ये नित्य विवाह बंधनात असतात. इतर टप्प्यांप्रमाणे हा टप्पा प्रयत्नसाध्य नसतो. हे सर्वस्वी ईश्वरी कृपेवर अवलंबून असते. हे ईश्वराधीन असून त्याच्या निर्णयावर अवलंबून आहे. ही त्याची निवड आहे. तो ज्यास इच्छितो

त्यास निवडतो. अशा ईश्वरप्रेमी भक्तांना 'वली' म्हणून संबोधण्यात येते. 'वली' हे ईश्वराचे सोबती, सखा, परम मित्र आणि प्रेमी जन असतात.

उपरोक्त विवेचनावरून असा निष्कर्ष काढला जाऊ शकतो की, दिव्य ग्रंथ वाचनामुळे कोणी धर्मपंडित, धर्ममार्तंड होऊ शकत नाही किंवा त्यामुळे मोक्षप्राप्ती पण होणार नाही. धर्मग्रंथ स्वत: आग्रहाने असे प्रतिपादन करतात व माणसास बजावतात की, पारंपरिक वाचनाने जीवनाचे वास्तविक ध्येय साध्य होणार नाही. त्याला ध्यान, चिंतन, मनन यांची जोड पाहिजे की जेणेकरून माणूस कर्मप्रवृत्त होईल आणि त्याला सत्कर्मांमध्ये गोडवा आढळेल. सत्कर्मेच माणसास मुक्ती मार्गाकडे नेतात.

**घ) दायर–ए–इमकान : कुंडल–वृत्त**




देह चक्राची 'लतीफा कालिब'ची – अत्यंत प्रगती झाल्यानंतर 'विलायत सुगरा' म्हणजे लघु संतत्त्व आणि कुंडल वृत्ता ('दायर–ए–इमकान') चे विहार आणि साधनेचा प्रारंभ होतो. नक्शबंदिया मुजद्दिया साधनेमध्ये 'आलम–ए–अम्र' म्हणजे आज्ञा जगत, वा आध्यात्मिक जग आणि भौतिक जगास 'दायर–ए–इमकान' म्हणजे कुंडल वृत्त म्हणून मानले गेले आहे. विशुद्ध सत्ता ही परब्रह्म मंडल वा शून्य स्थान आहे. पाच चक्रे आध्यात्मिक जगाची आहेत. ती पाच चक्रे आहेत – १) चित्तचक्र, २) आत्माचक्र, ३) मर्मचक्र, ४) अंतर्मन वा गुह्य चक्र आणि ५) ब्रह्मांड चक्र तर प्राणचक्र किंवा वासनाचक्र व (पृथ्वी, आप, तेज आणि वायू ही) चार महाभूते यांचे चक्र ही दोन चक्रे भौतिक जगाशी निगडित आहेत. सूफी तत्त्वज्ञानामध्ये आकाशास महाभूत म्हणून मान्यता नाही. आज्ञाचे जग किंवा आध्यात्मिक जग हे सुप्रतिष्ठित परमधाम किंवा सुप्रतिष्ठित दिव्य राजसिंहासनावर एकमेव एकल शब्द 'कुन' अर्थात 'भव' या नादाने निर्माण झाले तर भौतिक

जग हे हळूहळू सहा दिवसांमध्ये परमधामाच्या खाली निर्माण झाले. या दोहोंच्या समष्टीस 'दायर-ए-इमकान' म्हणजे कुंडल वृत्त असे म्हणतात. सुप्रतिष्ठित परमधाम ('अर्श-ए-मजीद') या दोन्ही जगांचा मध्यवर्ती भाग किंवा विभाजक रेषा आहे.

ही स्वाभाविक आवश्यकता आहे की जेव्हा मानव हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडे प्रवृत्त होतो तेव्हा त्याचे मन – अंत:करण वरच्या बाजूस प्रवृत्त होते आणि डोळे आकाशाकडे लागलेले असतात. परमेश्वराची दया, कृपा, क्रौर्य, क्रोध वरूनच येत असतात. असा त्याचा समज आहे. त्याच्या या कृतीमध्ये हे गूज निहित आहे की परमेश्वराने मनुष्याचे साहस आणि संकल्पास आकाश आणि परम धाम ('अर्श') कडे वळविले आहे. प्रत्येक माणसाची बुद्धी जेव्हा परमेश्वराकडे वळते तेव्हा तो अंत:करण आणि परमधामाकडे आकर्षित होतो. यद्यपि विचारपूर्वक आणि धर्मशास्त्रदृष्टीने पाहता परमेश्वर हा दिशा आणि स्थानाच्या बंधनापासून मुक्त आहे. तो तर परब्रह्म मंडल किंवा अरूप स्थल अथवा शून्य स्थान ('वरा-उल-वरा') आहे. वास्तविक महान परमधाम ('अर्श अजीम') सर्वश्रेष्ठ परमेश्वराचे स्थळ नव्हे, की तो तेथेच आसीन (आसनस्थ) असेल, परंतु सुप्रतिष्ठित परमधाम तर केवळ ईश्वराज्ञा प्रकटन आणि दिव्य प्रकाश विकीरणचे स्थळ आहे.

नक्शबंदी संप्रदायाचे महान संतांनी कुंडल-वृत्ताचे असे स्पष्टीकरण दिले आहे की, प्रभू नामस्मरणामुळे सर्व चक्रे प्रकाशित झाल्यानंतर त्या सर्व चक्रांचे प्रकाशपुंज एकत्रित मिळून मिसळून एका वर्तुळाचे आकार ग्रहण करतात, याला सूफ़ी पारिभाषिक शब्दामध्ये 'दायर-ए-इमकान' अर्थात कुंडल वृत्त असे म्हटले जाते.

या कुंडल वृत्तामध्ये सर्वप्रथम वरच्या बाजूस एक आकर्षण अनुभूत होते. यानंतर मनामध्ये संकल्प निर्माण होतात. हे साधकास विनष्ट आणि अंतर्धान करतात. ही अवस्था नवागत साधकाची असते. असेच संकल्प निरंतर येत राहतात, इथपर्यंत की ही निरंतरता अभंग राहते. या संकल्पांना अस्तित्व शून्य ('वजूद अदम') म्हणतात. यालाच 'फ़ना' अर्थात निर्वाण म्हणून ओळखले जाते; परंतु येथे चक्रांमध्ये तऱ्हेतऱ्हेचे प्रकाशपुंज दिसू लागतात. थोडेसे पण विनाश प्राप्त होत नाही. यद्यपि ईश्वर सान्निध्य अनुपम व अगम्य आहे; परंतु मुजद्दद अल्लफ़ सानी या सूफ़ी संतांनी यास वेगवेगळ्या वर्तुळांनी दाखवून दिले आहे. 'वर्तुळ' वा 'वृत्त' या शब्दास प्रत्येक स्थळासाठी उपयोगात आणणे यासाठी पण उचित मानण्यात आले आहे की, ज्याप्रमाणे वर्तुळास कोणतेच कोन आणि दिशा नसते. त्याचप्रमाणे ईश्वर सान्निध्याच्या प्रत्येक स्थळामध्ये कोणतीच दिशा आणि कोणतीच हद्द-सीमा नसते, नाही तर ईश्वर सान्निध्यासाठी वर्तुळांशी साम्यच काय? या वर्तुळांमध्ये सर्वात प्रथम कुंडल-वृत्त आहे. ज्या साधकास ईश्वरीय प्रेरणा ('कश्फ़') प्राप्त आहे. त्याला सादृश्य जगामध्ये जे काही दिसते ते वर्तुळाच्या आकृती स्वरूपातच दिसते. म्हणून समस्त विश्व ईश्वरीय प्रेरणेच्या दृष्टीमध्ये वर्तुळ स्वरूपातच आहे. महान परमधाम पण यामध्येच प्रेरित होते. कुंडल वृत्ताच्या वरील कंसामध्ये आज्ञा किंवा आध्यात्मिक जगाची चक्रे म्हणजे चित्त वा अंत:करण, आत्मा, मर्म, अंतर्मन वा गुह्य आणि ब्रह्मंड आणि खालच्या कंसामध्ये भौतिक जगाची चक्रे म्हणजे प्राण किंवा वासना आणि समस्त देह (पृथ्वी, तेज, आप आणि वायू) दृष्टीगोचर होतात.

या कुंडल वृत्तामध्ये अवकाशीय विहार घडतो. अवकाशीय विहार ('सौर आफ़ाक़ी') त्याला म्हणतात की, आपल्यापासून बाहेर प्रकाशपुंज, प्रभू प्रभा दिसून यावेत आणि त्यामध्ये रंगीबेरंगी असंख्य मनोहर आणि

वेगवेगळ्या प्रकारच्या चित्ताकर्षक आकृती दिसू लागतात. साधकास हे आवश्यक आहे की, त्याने तिकडे आकर्षित होऊ नये, लक्ष देऊ नये. या सर्वांचे निषेध करीत जावे. हीच विलक्षणता आणि विचित्रता अनेकतेचा हेतू असते आणि बेरंगी (वर्णहीनता) एकत्त्वतेचा ('वहदत') हेतू असतो.

जेव्हा चित्ताची एकाग्रता आणि दृढता प्राप्त होऊन जाते आणि कोणतीच शंकाकुशंका चार तासपर्यंत येत नसेल तर हेच लक्षण कुंडल वृत्ताच्या विहाराच्या समाप्तीचे मानले गेले आहे.

**ङ) शुग़्ल किंवा अश्ग़ाल : सिद्धीक्रिया किंवा योगक्रिया अथवा ध्यास : प्रकार**

'अशग़ाल' हे 'शुग़्ल' या अरबी शब्दाचे अनेकवचनी रूप आहे. 'शुग़्ल' याचे अर्थ आहेत क्रियामध्ये वा वाणीमध्ये वा ध्वनीमध्ये किंवा विचारामध्ये व्यस्त राहणे आणि ध्यान देणे. 'शुग़्ल'चे चार प्रकार आहेत. १) हाताची (हस्तकलात्मक किंवा हस्तकौशल्य), २) जिव्हेची (मौखिक), ३) कानांची (श्राव्य) आणि ४) डोळ्यांची (दृक् किंवा पाहण्याची) क्रिया. १) शुग़्ल-ए-दस्ती जसे – शिल्प; २) शुग़्ल-ए-लिसानी – जसे कुराण पठण (वाचन), प्रवचन, प्रभू नामस्मरण; ३) शुग़्ल-ए-समई जसे – आवाजाकडे किंवा हालचालीच्या दिशेकडे लक्ष देणे. निरासक्त संत महात्मे प्राय: अशाच प्रकारच्या क्रिया करतात. उदाहरणार्थ शग्ल-ए-सोत-ए-सरमदी (अनहद नाद), शुग़्ल-ए-मन्सूरी, शाल-ए-कल्बी इत्यादी आणि ४) शुग़्ल-ए-नजरी व बसरी जसे, दृष्टीमध्ये एवढे प्रभाव असावे की जर एखाद्या वस्तूवर दृष्टीक्षेप करायचे असेल तर सदरहू विचार होता क्षणीच तिच्यावर प्रभाव पडणे सुरू व्हावे. याला 'इल्म मकनातीसी' म्हणजे चुंबकीय विद्या किंवा ज्ञान म्हटले जाते. निरासक्त संत-महात्म्यांमध्ये अशा प्रकारचे अश्गाल अर्थात क्रिया प्रचलित आहेत. उदाहरणार्थ, शुग़्ल-ए-आफ्ताबी, शुग़्ल-ए-मक़ामन् मेहमूद (त्रिकुटी ध्यान) आणि शुग़्ल-ए-सुलतानन् नसीरा (अनहद नाद) व शुग़्ल-ए-रूही इत्यादी. या चार प्रकारच्या क्रियांमध्ये मानसिक ध्यानाचा सहभाग असतो. निरासक्त संतांच्या दृष्टीमध्ये या अश्गाल म्हणजे योग-क्रियांचा प्रारंभ आणि शेवट 'मुराकबा' म्हणजे ध्यान, चिंतन व मनन असते. शुग़्लचा संबंध जिव्हेशी नसून कल्पनेशी असतो, शब्दांऐवजी अर्थाकडे लक्ष देण्याशी असतो.

'अश्ग़ाल' म्हणजे योगक्रियांपैकी सर्वोत्तम आणि सार तत्त्व असलेली (सूफ़ींची योगक्रिया) शुग़्ल-ए-'कुन फ़यकून' आहे. ''इज़ा अराद शैअन् अंय्यकूल लह कुन् फ़यकून'' अर्थात ''नि:संशय जेव्हा तो (ईश्वर एखादी वस्तू घडवू इच्छितो.) तेव्हा त्याची आज्ञा केवळ अशी असते की तो त्या वस्तूला म्हणतो, 'हो' आणि ती होण्यास सुरू होते.'' ३६ : ८२

ही ब्रह्मांडामध्ये सगळ्यात जास्त वेगाने घडणारी क्रिया आहे. आशय हा की योगक्रियेचा प्रभाव तीव्र असतो. 'कुन' म्हणजे 'हो' हा परमेश्वराच्या इच्छाशक्ती प्रेरित आज्ञेचा परिणाम असतो.

'अश्ग़ाल' सिद्धी प्राप्तीच्या सोयीस्कर युक्त्यांचे नाव आहे. विखुरलेल्या अनेक विचारांमुळे – चिंतनामुळे अशांत मना-चित्तास एकाग्र करून अल्लाहकडे उन्मुख केले जावे (वळविले जावे), जेणेकरून त्याचेच जप-तप प्रत्येक क्षण होऊ लागावे, हेच याचे उद्देश आहे.

एकाग्रता निर्माण करण्यासाठी हे शुग़्ल प्राचीन काळापासूनच प्रचलित आहे. जसे 'नमाज' (भक्ती) मध्ये ध्यान विचलित होऊ नये म्हणून समोर 'आडकाठी' ('सुतरा') ठेवली जाते. मग नमाजी (भक्ता)ची

दृष्टी त्याच 'सुतच्च्या'वर स्थिर होऊन जाते. तात्पर्य हे की, जेवढे म्हणून अश्गाल आहेत. ते एकाग्रता निर्माण करण्यासाठी आहेत, हे अभिप्रेत नाही. ही सर्व साधने आहेत. म्हणूनच नंतरच्या सूफ़ींनी इतर धर्म, तांत्रिक इत्यादीपासून पण काही गोष्टी घेतलेल्या आहेत (आत्मसात केल्या आहेत), जसे – प्राणायाम इत्यादी.

**१) शुग़्ल–ए–अनहद (सीमातीत नाद–क्रिया), सरमदी (अनश्वरता) व सुलतानुल अज़्कार (राज जप)**

अश्ग़ाल तर पुष्कळ आहेत; परंतु यामध्ये सर्वाधिक लाभप्रद आणि सरळ सोपे 'शुग़्ल–ए–अनहद'च आहे. (मौलाना अशरफ अली थानवी – 'शरीअत और तरीकत' पृ. २९९) याला 'शुग़्ल–ए–सरमदी' (अनश्वरता क्रिया) आणि 'सुलतानुल अज्कार' (राज जप) पण म्हणतात.

प्रथम उत्तराधिकारी ('ख़लीफ़ा') अबू बक्र यांच्यासंबंधी उल्लेख आहे की, अल्लाहचे रसूल अर्थात महाप्रेषितांनी त्यांना या कृपायाचनेची शिकवण दिली आणि या कृपायाचनेमध्ये हे पण आहे की, परमेश्वर मला 'कुरआन मजीद' आणि (तिचे) ज्ञान प्रदान करून तिला माझे रक्तमांस आणि कान–डोळ्यांशी एकरूप करून सोडावे.

या हदीसमध्ये 'कुरआन'च्या सर्व अंग–प्रत्यंगांशी एकरूप होण्याची कृपायाचना आहे. हदीसमध्ये आहे – नि:संदेह, अल्लाह ध्यानविरहित मनाची कृपायाचना स्वीकारत नाही. (मौलाना अशरफ़ अली थानवी – 'शरीअत और तरीक़त' पृ. ३००)

या हदीसामुळे ही गोष्ट लक्षात येते की, जोपर्यंत अंग–प्रत्यंगाने, साधक संपूर्णपणे ध्यानमग्न होऊन जात नाही, तोपर्यंत ती कृपायाचना स्वीकारली जात नाही, ग्राह्य होत नाही. येथूनच सूफ़ी असा निष्कर्ष काढतात की साधकाने त्या टोकापर्यंत सीमेपर्यंत ध्यानमग्न होऊन जावे की शरीराच्या प्रत्येक रोम–रोम पासून अल्लाहचे नाम उच्चारले जावे. शुग़्ल सरमदी साधकास या टोकापर्यंत पोहोचवून देण्यासाठी आहे.

'ज़ियाउल कुलूब' मध्ये लिहिलेले आहे की, आपादमस्तक आपल्या अस्तित्वाच्या म्हणजे शरीराच्या एक–एक रोमापासून संपूर्ण साहसासह आकृष्ट व्हावे, अर्थात याची जाणीव व्हावी की, श्वासोच्छ्वास क्रियेमध्ये प्रत्येक केसाच्या मुळापासून 'अल्लाहू–हू'चा नाद निघत आहे. म्हणजे प्रत्येक केस म्हणत आहे की 'तोच परमेशवर आहे, तोच की.'

शुग़्ले सरमदी करण्यासाठी सर्वात चांगली वेळ रात्रीचे अंतिम प्रहर आहे. सर्वप्रथम बारा 'तस्बीह' (स्तोम) पूर्ण करावेत म्हणजेच बारा वेळेस 'सुब्हानल्लाह' म्हणावे. मग ही योगक्रिया सुरू करावी. डोळे मिटवावेत आणि कानास तर्जनीने अल्पसे जास्त जोराने बंद करावे. यामुळे कानांमध्ये एक आवाज (ध्वनी) निर्माण होतो. या आवाजामध्ये हृदयास–चित्तास आकृष्ट करावे. हा स्तोम हवेच्या कंपनामुळे ध्वनीत होईल. यामुळे मनास एकाग्र करण्यामध्ये मदत होईल. नंतर या एकाग्रतेस आपल्या अभीष्टाकडे वळवावे. हेच शुग़्ल–ए–अनहद, शुग़्ल–ए–सरमदी किंवा सुलतानुल अज्कार या नावांनी ओळखले जाते.

**२) शुग़्ल–ए–इस्म–ए–ज़ात (मूल सत्ता नाम योगक्रिया)**

परमेश्वराचे मूळ नाव 'अल्लाह' आहे. शुग़्ल–ए–इस्म–ए–ज़ात याच मूल नामावर आधारित आहे. सूफ़ींनी या शुग़्लची पद्धत अशी सांगितली आहे की प्रथम कागदाच्या एका तुकड्यावर लाल (तांबड्या)

किंवा निळ्या रंगामध्ये हृदयाची आकृती काढून त्यावर सोने किंवा चांदीच्या पाण्याने 'अल्लाह' हे शब्द अरबीमध्ये लिहावे आणि नेहमी त्याच्यावर दृष्टी खिळवावी, जेणेकरून परमेश्वराच्या त्या नामाचे चिन्ह हृदयावर अंकित होऊन जावे.

याचे दुसरे एक स्वरूप असे आहे की, असे विचार करावे - अशी कल्पना करावी की, हृदयाच्या पानावर 'अल्लाह' हा अरबी शब्द अंकित (कोरलेला) आहे. नंतर नेहमी त्याकडे आकृष्ट राहावे, जेणेकरून सर्व इंद्रिये त्याच्या अवतीभोवती फिरू लागावीत. (मौलाना अशरफ अली थानवी - 'शरीअत और तरीकत' - पृ. ३०१)

**३) हब्स-ए-बसर (दृष्टी अवरोध)**

इस्लामचे प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या बाबतीत असे म्हणतात की, त्यांची दृष्टी ही त्यांच्या बोटांपलीकडे जात नसे.

एकदा अनस या व्यक्तीस उपदेश करताना ते म्हणाले, हे अनस! आपल्या दृष्टीस नमन-स्थळाजवळ, प्रणिपात स्थळावर ठेवा. याच आदेशाच्या आधारावर सूफ़ी साधकांनी दृष्टीमध्ये अवरोध निर्माण करण्यास पण साधनेचे एक अंग म्हणून स्वीकारले. याचा अभिप्राय हा आहे की, त्यामुळे हृदयामध्ये मना-चित्तामध्ये एकाग्रता निर्माण व्हावी आणि दृष्टीच्या माध्यमाने ती (एकाग्रता) विखुरली जाऊ नये. यामुळे बराच फायदा होतो, असा सूफ़ी साधकांचा अनुभव आहे.

**४) हब्स-ए-दम (प्राणायाम)**

अश्गाल म्हणजे योगक्रियांमध्ये हब्स-ए-दम अर्थात प्राणायामास पण फार महत्त्व दिले गेले आहे. प्रेषित मुहम्मद[स.] यांच्या नमाज (प्रार्थने) संबंधी असे म्हणतात की, नमाज संपन्न करीत असताना त्यांच्या छातीमधून, भांड्यामध्ये भात शिजताना जसा आवाज येतो, तसा ध्वनी निघत असे, म्हणजे (ते) इतके रडत असत.

या प्रसंगाच्या आधारे पण साधकांच्या अनुभवांनी पण ही गोष्ट सिद्ध होते की, रडताना आणि रडू आवरताना अशी स्थिती निर्माण होते की, श्वास थांबतो आणि असे वाटते की, जीव घुटमळत आहे. हेच हब्स-ए-दम आहे.

**५) शुग़्ल-ए-मक़ामन् मेहमूदा व सुल्तानन् नसीरा : (प्रतिष्ठित स्थळ व वर्चस्व शक्ती योगक्रिया) त्रिकुटी ध्यान, अनहद, ध्यास**

सत्याची प्रतिष्ठापना करण्यासाठी ही योगक्रिया ('शुग़्ल') आहे. याचा उल्लेख पवित्र कुराणामध्ये असा आहे - ''अकिमिस्सलात लिदुलूकिश्शम्सि इला ग़सक़िल्लैलि व कुरआनल् फ़ज्रि कान मश्हूदन् व मिनल्लैलि फतहजद बिह नाफिलतल्लक असा अय्यबूअसक रब्बुक मक़ामम्-महमूदन् व कुर्रब्बि अदखिलनी मुद्ख़ल सिदकिंव्व अखरिजनी मुखरज सिदकिंव्वजअल ली मिल्लदुन्क सुल्तानन् नसीरन.'' १७ : ७८-८०. म्हणजे ''नमाजच्या बाबतीत नियमितता बाळगा, सूर्य ढळल्यापासून तर रात्रीचा काळोख होईपर्यंत (निर्धारित वेळेवर 'जोहर', 'असर', 'मगरिब' व इषा या) नमाजी (उपासना, भक्ती) पढा, तसेच पहाटेच्या वेळी (नमाजामध्ये) (कुराणाचे) पठण करण्याविषयी (काळजी घ्या), कारण पहाटेच्या वेळी

जेव्हा कुराणाचे पठण केले जाते, तेव्हा साक्षी राहण्यासाठी (देवदूत) विशेष हजेरी लावतात आणि रात्रीच्या एका शेवटच्या भागात उठून 'तहज्जुद' ही अतिरिक्त नमाजही पढा (जरी ही नमाज दिवसातील पाच अनिवार्य नमाजाप्रमाणे बंधनकारक नसली तरी) हे तुमच्याकडून नियत कर्तव्यापेक्षा अधिक काही केल्यासारखे असेल. नवल नव्हे की, तुमचा पालनकर्ता (पुनरूत्थानाचे दिवशी) तुम्हाला प्रतिष्ठित प्रशंसनीय स्थळी पोहोचवील आणि ही प्रार्थना कर की, हे माझ्या विधात्या, माझे आगमन हे सत्याचे आगमन होऊ दे आणि माझे निर्गमन हे सत्याचे निर्गमन होऊ दे आणि तू आपल्याकडून मला (शत्रूंवर) साहाय्यपूर्वक वर्चस्व दे आणि (लोकास) सांगून टाका की, सत्य ते आले आणि असत्य ते नाहीसे झाले (आणि) अर्थात असत्य ते नष्ट होण्यासाठीच असते.'' १७:७८-८० (८१)

'मक़ामन् मेहमूदा' आणि 'सुल्तानन् नसीरा' याचे भाष्य पवित्र कुराणाच्या काही भाष्यकारांनी पुढीलप्रमाणे केले आहे – प्रतिष्ठित स्थळ, प्रशंसनीय स्थान हे 'मुकाम-ए-महमूद' याचे शब्दश: अर्थ आहेत आणि 'सहीह् हदीस' म्हणजे ज्याचे सत्त्वशील लोकांकडून परंपरागत निवेदन होत आले आहे असे प्रेषित वचनावरून सिद्ध होते की, ज्या पदाचे परमेश्वराकडून पैगंबर साहेबास अभिवचन मिळाले आहे ते पद परमेश्वरासमीप पाप्यांची शिफारस करण्याचे होय. म्हणजे पुनरुत्थान होईल तेव्हा लोक उद्विग्न होऊन व आपल्या हातून झालेल्या पापांचे कसे काय होईल याची त्यांना तळमळ वाटून, पूर्वीच्या सर्व प्रेषितांकडून शिफारस करवू इच्छितील. पण प्रेषित म्हणजे सर्व मनुष्येच होऊन गेली आहेत, मग ते दाऊद असोत, मूसा असोत की ईसा (येशू ख्रिस्त) असोत, प्रत्येकाचे हातून मानवी प्रवृत्यनुसार काही ना काही दोष होऊन गेला आहे. म्हणून मुहम्मद[स.] पूर्वीचे पैगंबर आपापले दोष आठवून शिफारस करण्याचे धाडस करू शकणार नाहीत. सरते शेवटी ही मोहीम आमचे कलियुगाचे पैगंबर हजरत मुहम्मद साहेब (परमेश्वर त्यांना धन्यवाद व शांती देवो!) हेच सर करतील आणि परमेश्वराकडून त्यांना सकळ लोकांच्या शिफारसीची सदर परवानगी मिळेल आणि परमेश्वराच्या भूतदयेचा अशाप्रकारे प्रादुर्भाव होईल की, ते सर्वांची शिफारस करतील व परमेश्वराच्या सेवेत त्यांची शिफारस मान्य होईल.

'मक़ाम महमूद' अल्लाह (परमेश्वर) आहे आणि प्रेषितांचे मुहम्मद[स.] चे वास्तव्य सत्य आहे आणि सांकेतिक भाषेमध्ये याचे नाव 'मक़ाम महमूद' आहे आणि सूफ़ींचे असे मत आहे की, मक़ामम महमूदन ते सान्निधय, सामिप्य आणि ती मैत्री विशेष अशी आहे की, ज्या त्यांना 'मेराज' म्हणजे दिव्य आरोहणामध्ये प्राप्त झाल्या होत्या आणि सुल्तानन् नसीरा त्या सत्ता-शक्ती-झुंझीचे गूढ आहे. जे परमेश्वराच्या महाप्रेषितावर उघड झाले होते. शिवाय ही एक योगक्रिया अर्थात शुग़ल आहे. जे पूर्ववर्ती धर्मप्रजेस ('उम्मत'ला) भेट स्वरूप देण्यात आली आहे की जेणेकरून त्यांना ही पण दिव्य आरोहणाची माहिती होऊन जावी. आरोहणाहून परतल्यावर ते लोकांसमोर पुन्हा तन्मात्रा आणि वास्तव स्वरूपात उपस्थित झाले आणि ईश्वरी आदेश जारी झाला की ही काही आश्चर्याची गोष्ट नव्हे. हे आमचे बक्षीस आहे.

मुहम्मद स. सत्य सांगत आहेत. त्यांनी जे काही पाहिले ते ठीक पाहिले. यामध्ये मुळीच संशय नाही. त्यांचे आज्ञाधारक बना (व्हा). त्यांच्यासमोर अदबीने रहा, जोराने बोलू नका. त्यांच्याशी प्रतिज्ञाबद्ध व्हा. त्यांचा हात म्हणजे ऐन परमेश्वराचाच हात होय. या विवेचनाशी तात्पर्य हे आहे की, 'मक़ामम् महमूदा' व

'सुल्तान नसीरा' हे एक शुग़्ल म्हणजे योग कर्म आहे जे दिव्य आरोहणाच्या रात्री मुहम्मदी धर्म प्रजेसाठी महाप्रेषितांना प्रदान करण्यात आले. जी व्यक्ती हे योग कर्म करते तिला पुनरुत्थानाची जाणीव आणि दिव्यारोहणाची कैफत चांगल्याप्रकारे माहीत होऊन जाते आणि ती व्यक्ती सर्वांगयोग ('फना फिल्लाह' होते) बनते.

'सुल्तानन नसीरा'चा अर्थ सहाय्यकारी वर्चस्व, सहाय्यकारी शक्ती असा आहे. परमेश्वराच्या कृपाशक्तीच्या बळावर शत्रूंवर निश्चितच सहज विजय मिळविता येतो. ही नित्य प्रमाणित खरी गोष्ट आहे. यामध्ये शंकेस मुळीच वाव नाही.

सत्य म्हणजे इस्लाम हा सद्धर्म आणि असत्य म्हणजे मनःकल्पित (कपोलकल्पित) उपासनेचे मार्ग. अर्थात ही मिथ्या उपासना विचाराअंती असत्यच सिद्ध होते. विचारशील प्रज्ञावंत लोकास अशा बुद्धिशून्य व बलहीन – तकलादू ईश्वरेतर उपास्यांचा वीट येतो.

आता आपण या शुग़्लचे सूफ़ी प्रणीत भाष्य पाहू या –

उपरोक्त कौराणिक अवतरणामध्ये विचारास प्रवृत्त करणारे असे चार ठिकाण आहेत. ते म्हणजे –

१) 'मक़ामम् – महमूदन्' म्हणजे परम सत्य स्थळ, परम वास्तव्य.

२) 'अदख़ाल सिद्क़' म्हणजे सत्यमय प्रवेश, आगमन अर्थात प्रकाशमान मदीना शहर,

३) 'अख़राज सिद्क़' म्हणजे सत्य निर्गमन, सत्य स्थलांतर अर्थात महान मक्का शहर,

४) 'सुल्तानन् नसीरा' म्हणजे विष्णू लोक अर्थात सहाय्यकारी वर्चस्व, सहाय्यकारी शक्ती.

मानवाने आपल्या आचार-विचारांत नेहमी सत्याचीच कास धरली पाहिजे. कारण 'सत्य अवतरले, असत्य नष्ट झाले. असत्य हे नष्ट होणारच आहे, होण्यासाठीच आहे' याची प्रचिती येण्यासाठी सत्य हाच परमधर्म आहे. याची खात्री बाळगण्यासाठी हे शुग़्ल ही योग क्रिया सूफ़ींमध्ये प्रचलित आहे. सत्याची प्रतिष्ठा पणास लावून ती जपण्यासाठी हे शुग़्ल आहे. कारण 'सत्यच परमेश्वर आहे' या अनुभूतीचे स्मरण हे शुग़्ल करून देते.

**६) संत कबीर प्रणीत शुग़्ल (योगक्रिया) वा (ध्यास)**

खालील काव्य चरणांमध्ये संत कबीर प्रणीत योगक्रियाचे प्रतिबिंब उमटले आहे–

*"देख रे देख तुझ में तेरा धनी दम को रोक दीदार पावे*
*दम को रोक और मूल को बंद कर, चाँद सूरज घर एक आवे ।।*
*नाभि के साँस से मंतर जप करे और कँवर की कली पर भँवर छावे*
*कहें कबीरा गम की पीडयाँ सुन के सेज कोई संथ जावे ।।"*

उपरोक्त काव्य चरणांमध्ये व्यक्त योगक्रियाचे स्पष्टीकरण सूफ़ी संत गौस अली शाह पानीपती यांनी आपले ग्रंथ 'तजकर-ए-गौसिया' पृ. १७८ वर आपले प्रिय शिष्य मौलाना गुल हसन यांना असे दिले आहे – सूर्य तर नाकाची उजवी नाकपुडी आहे आणि चंद्र डावी नाकपुडी आणि मूळशी तात्पर्य आहे. मलद्वार अर्थात गुदा. लक्षात असू द्या की ज्याप्रमाणे घोड्याची लगाम त्याच्या तोंडामध्ये असल्यासच तो (घोडा) जसा सरळ चालीने चालतो त्याचप्रमाणे जेव्हा नाकाच्या दोन्ही नाकपुड्यांमधून श्वास एकसारखे चालत

असेल तेव्हा चित्त-मन पण समाधानी होऊनजाते आणि अंत:करणामधील दुर्वासना, दुष्प्रेरणा आणि शंका-कु-शंका संपूर्णपणे दूर होऊन जातात. यानंतर त्यांनी दोन्ही बाजूंना समान ठेवण्याची पद्धत (युक्ती) दाखवून दिली. तेव्हा तात्काळ दोन्ही नाकपुड्यांमधील श्वास समान बनले आणि वास्तविक चित्त समाधान पावले. मन समाधानी झाले आणि एक विचित्र अनुभूती निर्माण झाली. याच संदर्भात कबीर सुपुत्र कमाल यांनी पण म्हटले आहे -

*"आँख, नाक, मुंह ढाँप के नाम निरंजन ले*
*अंदर के पट जद खुलें जद बाहर के पट दे ।।"*

**योगिक विवेचन** - आपल्या स्वत:मध्येच (स्वत:च्या आत्म्यात) आपल्या स्वामीस म्हणजे परमेश्वरास अशा रीतीने पाहा की श्वास आणि गुदास बंद करा की जेणेकरून दोन्ही नाकपुड्यांमधून श्वास एकसारखे समान चालावे आणि श्वासात नाभि कमळापासून ओढून मन-कमळावर अशा रीतीने आघात करावे की जसे फुलावर भ्रमर गुंजन करतो. याची परिणती ईश्वरीय सत्तेच्या प्रकटनामध्ये होऊन जावी. हा साधन मार्ग आहे आणि एकेश्वरवादाच्या मैदानामध्ये प्रवेश करणे हे शूरवीर मर्दांचे काम आहे.

**७) शुग़्ल-ए-नसीरन् महमूदा : त्रिकुटी योगक्रिया**

*"सन्मुख करो दीदार महल में प्यारा है ।*
*त्रिवेणी के घाट में मंझधारा है ।।"*

त्रिवेणी त्या स्थळास म्हणतात जेथे तीन नद्या मिळतात आणि येथे अभिप्राय आहे मेंदूशी म्हणजे ज्या वेळेस मानव ही योगक्रिया (शुग़्ल) करतो तेव्हा मेंदूमध्ये ब्रह्मंड म्हणजे 'अख़्फ़ा' असल्याची जाणीव होते. तीन नेत्र (डोळे) एकाच ठिकाणी एकत्रित जमा होतात. त्यापैकी दोन भौतिक डोळे आहेत तर तिसरे नेत्र म्हणजे अंत:करणाचा डोळा. या शुग़्लचे नाव 'त्रिकुटी' आहे आणि यालाच 'नसीरन महमूदा' पण म्हणतात. याची पद्धती अशी आहे की, प्रथम दोन्ही डोळ्यांची नजर त्रिवेणी शिखेवर कायम करावी. काही दिवसानंतर डोळ्यांचे बुब्बुळ मेंदूकडे सरकेल आणि अंत:करणाची दृष्टी पण तिकडेच प्रवृत्त होईल. जेव्हा हे तिन्ही डोळे मेंदूमध्ये एकत्रित एकवटले जातात तेव्हा आत्म्यास उत्कर्ष प्राप्त होतो. या उत्कर्षाचा शेवट तीन प्रकारे होतो. जर साधक हा अल्पमती असेल आणि गुरू हा अपरिपक्व किंवा अननुभवी असेल तर मेंदूचा पडदा फाटला जातो आणि प्राणोत्क्रमण होते आणि जर साधक हा स्वत: समर्थ असेल तर तो परमहंस म्हणजे 'मजजूब' बनेल आणि जर सद्‌गुरू परिपूर्ण असेल तर आत्मा त्या उत्कर्षापासून प्रकट होईल आणि दिव्य प्रकाशपुंजाने संपूर्ण शरीर चमकू लागेल आणि ते प्रकाशमान होऊन जाईल; परंतु या सरावामध्ये भोजन-आहार हलके-फुलके असावे जसे दूध, भात आणि गाईचे लोणी पण जरूर सेवन करावे. सुरुवातीस डोळ्यांना थोडासा ताण पडतो. हळूहळू याचा सराव, अभ्यास वाढविला जातो.

**८) शुग़्ल-ए-सिफ़ात सबअ: : दैवी सप्तगुण चिंतनाविषयी योगक्रिया वा ध्यास**

कपोलकल्पित शोधाने सामर्थ्याच्या घरट्यास सत्तामूलक आणि क्रिया-गुणांसह सुशोभित केले जेणेकरून घरट्याचा पुरेपूर सुगावा लागावे आणि पुरेपूर निरीक्षण करून त्याला प्राप्त केले. (आपले) प्रपितामह म्हणतात -

*"आन पादशाह-ए-आज़म दानिस्ता बूद महक्कम*
*पोशीदा व लक़ आदम नागाह बर दर आमद ।।"*

म्हणजे त्या महान शासकास स्पष्टपणे माहीत होते. लपलेला मानव अकस्मात मिशा साफ केलेल्या अवस्थेमध्ये प्रकट झाला.

ही विचित्र गोष्ट आहे की, त्यामध्ये अव्यक्त आणि व्यक्त (गोष्टी) टिकणाऱ्या (चिर) आहेत.

*"आन शाहिद लाहूत कि दार किस्वत-ए-इन्सान अस्त*
*इन्सान स्त हर्मां शख़्स ज़ इन्सानश तलब कुन ।।"*

अर्थात मानवाच्या पोशाखामध्ये असलेले ते प्रकट सत्य लोक मानव (च) आहे. त्या माणसापासून समस्त व्यक्तीची आकांक्षा ठेव.

विश्व हे पुरेपूर मानव आहे आणि मानव एक घोर अंध:कार आहे. त्यामध्ये अमृत दडलेले आहे. त्यास ज्याने प्राप्त केले ते छिप्या स्वरूपातच प्राप्त केले. ही बाब दृष्टे - दृष्टा स्वरूपात आहे. कारण "दृष्टी त्याला पाहू शकत नाही, परंतु तो त्या दृष्टीचा दृष्टा आहे आणि तो सूक्ष्मदर्शी व बहुश्रुत आहे." ६:१०३

*"स्याही गर बदानी नूर-ए-ज़ात स्त*
*बतारीकी दर आब-ए-हयात स्त ।।*
*जहान इन्सान व इन्सान शुद जहानी*
*अर्जी पाकीज़ा तर नतवान बयानी ।।"*

म्हणजे जर तू (सौंदर्यमध्ये) काळा डाग पाहशील तर ते परम सत्तेचे प्रकाश असते. कारण अंधारामध्ये (च) अमृत असते. विश्व हे मानव आहे आणि मानव (हा) एक जग बनला. याच्यापेक्षा जास्त चांगले विवेचन होऊ शकत नाही.

हे समुद्राच्या पाणबुड्या! मूल्यवान मोती हाती लागण्याची जर तुझी इच्छा असेल तर तू दृश्याच्या समुद्रात आपल्या दृष्टीपथात आणू नकोस. एक स्वच्छ आरसा (काच) आहे ज्याची चमक तुला दिसते आहे. 'वरदान प्राप्त जैतूनचा वृक्ष' २४ : ३५ याचा संकेत मानवी देहाकडे आहे. याला समजून घे आणि आपल्या सौंदर्यावर दृष्टी टाक आणि दृष्टी स्वरूपात "(मग) प्रकाशच प्रकाश" २४:३५ पहा. संकेत हा आहे-

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ق | ق | ج | ك | ع | ب | س |
| اور | اور | ق | لی ی م | ل ی م | ص ی ر | س ی ع |


## ९) शुग़ल-ए-आलम ख़फ़ी : आंतरिक जगाच्या चिंतनाविषयी योगक्रिया वा ध्यास

हे अंतर्ज्ञानी लोकांनो तुम्हास हे ठाऊक असू द्या की, प्रत्येक वस्तूस आंतरबाह्य स्वरूप असते. "तो आदि, अंत, व्यक्त, अव्यक्त आणि सर्व वस्तूंचा ज्ञाता आहे." ५७:३ अव्यक्त एक अस्तित्व आहे आणि व्यक्त नाना स्वरूपात दिसते - अस्तित्वात असते. म्हणून हे उचित आहे की व्यक्त रूपाचे अपेक्षाकृत अव्यक्त रूपापेक्षा अवलोकन करा. त्याविषयी चिंतन करा. अस्तित्व प्रकट स्वरूपास प्रभुत्वाच्या अस्तित्वाने प्रकाशमान करते. "त्या (अल्लाह) च्या अस्तित्वाखेरीज प्रत्येक वस्तू नश्वर आहे." २८:२८

आणि निरपेक्ष अस्तित्वाव्यतिरिक्त दुसरे कोणतेच अस्तित्व व्यक्त होत नाही आणि ही अवस्था तेव्हाच प्राप्त होते जेव्हा साधक 'शुग़्ल-ए-खफी' म्हणजेच आंतरिक जगाच्या चिंतनामध्ये लुप्त होऊन जातो. संकेत हा आहे - ت

**१०) शुग़्ल-ए-मब्दा व मआद : सृजन-संहार (जन्म-मृत्यू) च्या चिंतनाविषयी योगक्रिया (ध्यास)**

प्रेम सम्राटाने जेव्हा इच्छिले की, ''गुप्त कोषास प्रकट करावे.'' याला संपूर्णपणे व्यक्त करण्याची त्याची जेव्हा इच्छा झाली तेव्हा यथाशक्य (सुसंगत) क्रम आणि अवतरणाच्या आधारे ''नि:संशय, तुमचा विधाता अल्लाहच आहे. ज्याने सहा कालावधीत आकाश व पृथ्वी निर्माण केली.'' १०:३ या श्रेणींना आरंभ व शेवट प्रदान करून ''तोच आहे (अल्लाह) ज्याने पृथ्वीला तुमच्यासाठी बिछाना बनवले.'' २०:५३ चा बिछाना मैत्रीच्या फरशीवर अंथरले आणि विशुद्ध परमसत्तेमध्ये जे एक चित्ताकर्षक उद्यान आहे (त्यामध्ये) प्रेमाचे बीज रूजविले आणि आपल्या प्रकाशझोताने त्यास सर्वांग परिपूर्ण बनविले. जर साधक या श्रेणींची पराकाष्ठा प्राप्त करू इच्छित असेल तर त्याने सृजन-संहाराच्या चिंतनामध्ये मग्न होऊन जावे. संकेत हा आहे-



**११) शुग़्ल (ध्यास) : उगम व आद्य स्वरूप**

ख्वाजा मीर मुहम्मद नक्शबंद यांच्या अनुयायांना नक्शबंदी म्हणतात. मूळ पुरुषाचे वडील जरीचे भरतकाम करीत. त्यावरून हे नाव पडलेले आहे. अबू बकरचा एक वंशज शेख अहमद सिरहंदी यांच्यामुळे भारतात ही परंपरा आली. नक्शबंदी मौन धारण करून ध्यानस्थ बसतात, प्रभु चिंतन करतात. परंपरागत इस्लाम धर्माचे काटकोरपणे पालन करतात. गाणे आणि संगीत वर्ज्य मानतात. पेटलेला दिवा हाती घेऊन परमेश्वर व प्रेषित यांच्या सन्मानार्थ गाणी म्हणत फिरतात. सिंधमध्ये नवागत भक्त स्नान व प्रार्थनेनंतर आनंददायक ईश्वर स्तोत्रे (जिक्र) हजार वेळा म्हणतो. त्याचप्रमाणे तो 'इल्लल्लाह अल्लाह' एकूण मिळून चार हजार वेळा म्हणतो, यात प्रत्येक शंभरानंतर 'महंमदन रसूलल्लाह' म्हणतो. जेव्हा त्याच्या मनात क्षुद्र विचार येतात त्यावेळेला 'या फाईल' म्हणजे ईश्वर सत्य प्रतिनिधी आहे असे म्हणतो.

यानंतर त्याला ध्यान (तसव्वूर) शिकवतात. दुसऱ्या टप्प्यात 'या अल्लाह' आणि 'याहू' हे शब्द चाळीस दिवस शिकवितात. तिसऱ्या टप्प्यात तो आपल्या गुरूचे चिंतन करतो. नाकाने श्वास घेताना 'अल्लाह' आणि श्वास सोडताना 'हू' असे म्हणतो. या तीन टप्प्यांवर सिद्ध होत जाणारा जो उपासनाविधी त्याला 'शुग़्ल' असे म्हणतात.

**च) शुग़्ल अर्थात सूफ़ी योगक्रियाची पद्धती : एक उदाहरण**

येथे कादरिया संप्रदायामध्ये प्रचलित एक योगक्रियाचे उदाहरण प्रस्तुत करण्यात येत आहे. ती पद्धत पुढीलप्रमाणे आहे -

साधकाने पश्चिमेकडे ('किब्ला रूख') तोंड करून दोन्ही गुडघे टेकून अदबीने बसावे आणि डोळे मिटवून जिभेस टाळूला स्पर्श करून 'अल्लाहु समीऊन' (परमेश्वर ऐकणारा आहे) ची अंत:करणपूर्वक कल्पना करावी आणि एक चमकदार रेषा नाभिपासून काढून छातीच्या मध्यभागापर्यंत (जे 'लतीफा सिर्र' अर्थात मर्म चक्राचे स्थळ आहे) पोहोचवावे आणि ''अल्लाहु बसीरून'' (परमेश्वर पाहणारा आहे.) ला छातीपासून काढून मेंदूपर्यंत पोहोचवावे आणि ''अल्लाहु अलीमुन'' (परमेश्वर जाणणारा आहे.) यास डोक्यामधील मेंदूच्या स्थानापासून काढून (उच्चारून) 'अर्श' परमधामपासून मेंदूपर्यंत आणि ''अल्लाहु बसीरून''ला मेंदूपासून छातीपर्यंत आणावे आणि ''अल्लाहु समीऊन''ला छातीपासून नाभिपर्यंत आणावे या चक्रानंतर पुन्हा बेंबीपासून सुरू करून क्रमश: वर-खाली या पद्धतीने व्यस्त राहावे.

**छ) हफ़्त शुग़्ल बहफ़्त हुरूफ़ : सप्ताक्षरी सप्त योग कर्म वा ध्यास**

अरबी भाषेच्या वर्णमालेमधील प्रथम सात वर्णाक्षरांनी सदरहू योगकर्म क्रिया केली जाते. अरबीची प्रथम सात वर्णाक्षरे आहेत - ا ب ت ث ج ح خ ही योगक्रिया करताना वर्णाक्षरे उलट्या क्रमाने घ्यावी लागतात. त्यामुळे योगक्रिया चढत्या क्रमाने साध्य होते.

१) خ ख़ = हे अल्लाह (परमेश्वरा!)! तू आपले प्रतिनिधित्व आणि प्रेमाचे सन्मान्य वस्त्र मला प्रदान कर.

२) ح ह = हे अल्लाह! माझे प्रेम तुझ्या प्रेमात असू दे.

३) ج ज = हे अल्लाह! तू आपली शोभा आणि सौंदर्यामध्ये मला कांती अर्पण कर.

४) ث स = हे अल्लाह! तू आपल्या दृढ प्रेमामध्ये मला स्थिरचित्त ठेव.

५) ت त = हे अल्लाह! तू आपल्या (दयेच्या) देणग्या मला भरपूर प्रमाणात दे.

६) ب ब = हे अल्लाह! तू आपली खुशाली दर्शन आणि ब्रह्मज्ञानामध्ये प्रकाशित कर.

७) ا अ = हे अल्लाह! तू आपल्या एकत्वतेच्या सत्तेमध्ये मला विलीन करून टाक. जेणेकरून मी तुझ्यामध्ये शाश्वतता प्राप्त करू शकेन.

**ज) अध्यात्ममार्गाचे सप्त प्रचरण : सप्तचक्र (सात लतीफ़े)**

साधक चालत असलेला अध्यात्ममार्ग हा सात पाऊलांचा आहे. मानवाची पण सात चक्रे आहेत. या सात चक्रानुसार सात पाऊले आहेत. पैकी दोन पाऊले भौतिक जगामध्ये (आलम-ए-ख़ल्क़) आहेत. यांचा संबंध शरीर आणि वासनेशी असतो. बाकीची पाच पाऊले आध्यात्मिक जगा(आलम-ए-अम्र)शी निगडित आहेत. यांचा संबंध चित्त-अंत:करण (कल्ब), आत्मा (रूह), मर्म (सिर्र), गुह्य (ख़फ़ी) आणि ब्रह्मंड (अख़्फ़ा) शी असतो. प्रत्येक पाऊलामध्ये दहा हजार पटले-पडदे असतात. प्रत्येक पाऊलागणिक ही पटले (पडदे) उघडली जातात. हे पडदे प्रकाशाचे किंवा अंध:काराचे असतात. 'नि:संशय, परमेश्वर आणि माणसाच्या दरम्यान सत्तर हजार पडदे प्रकाश आणि अंध:काराचे आहेत.' - मिश्कात शरीफ़.

जेव्हा प्रथम पाऊल आध्यात्मिक जगामध्ये पडते तेव्हा कर्मांचा प्रकाश प्रकट होतो. दुसऱ्या पावलामध्ये गुणांच्या प्रकाशाचा उदय होतो तर तिसऱ्या पावलामध्ये सत्तेच्या प्रकाशाची सुरुवात होते. नंतर प्रकाश भेदानुसार साधक प्रगती साधत अग्रेसर होतो. ही बाब ब्रह्मज्ञानी लोकांपासून लपलेली नाही आणि या सात पावलांपैकी प्रत्येक पाऊलामध्ये साधक हा स्वत:पासून लांब आणि परमेश्वराच्या अधिक जवळ जवळ जात

असतो. इथपर्यंत की शेवटी ही सात पावले पार केल्यानंतर ईश्वर सान्निध्य पण परिपूर्ण होऊन जाते. आता तो 'फ़ना' अर्थात असंभूति व 'बका' म्हणजे संभूति अवस्थेत पोहोचतो आणि शेवटी साधकास विशेष संतत्त्व (विलायत -ए-खासा) पदापर्यंत पोहोचविले जाते.

नक्शबंदी सूफ़ी संप्रदायाच्या साधनेच्या अभ्यासात एकूण अकरा (११) कर्मे करावी लागतात. या एकादश कर्मांपैकी 'याद कर्द' म्हणजे जपलीन अवस्था ही 'तरीकत' म्हणजे साधना मार्ग श्रेणीची आहे तर 'याददाश्त' अर्थात स्मृत्याव्हान ही 'हकीकत' म्हणजे मुक्तिकांडशी निगडित आहे. शील - संकोच साधनामार्ग (तरीकत) मध्ये असते. नित्य अल्लाहचे नामस्मरण करीत राहणे, त्याच्या नामाचा जप करणे, विधि-निषेधांचे काटेकोर पालन करणे, नामजप अंत:करणपूर्वक करणे या सर्व बाबी 'याद कर्द' मध्ये समाविष्ट आहेत. बेसावधगिरीच्या निराकरणाचे नाव प्रभुनामस्मरण आहे. ईश्वरी कृपेची इच्छा व आकांक्षा बाळगणारांनी नेहमी परमेश्वराच्या नामस्मरणात राहिले पाहिजे. 'याददाश्त'मध्ये साधकाने आपल्या उद्दिष्टाची नेहमी आठवण ठेवली पाहिजे. ईश्वरप्राप्तीसाठी संपूर्ण आवड आणि रसिकतेसह त्याची आठवण मनामध्ये नेहमी ठेवली पाहिजे. सूफ़ी संत ख्वाजा अब्दुल खालिक गज्दवानी यांच्या मते 'याददाश्त' म्हणजे स्मृत्याव्हानाच्यावर (च्या श्रेणीस) विचार असते. म्हणजे केवळ संदेह, भ्रम, अनुमान, कुधारणा नव्हे. कोणतीच गोष्ट नव्हे, कोणताच दर्जा नाही. ईश्वराशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाल्यावर साधका (भक्ता)च्या मनामधून प्रत्येक गोष्ट नाहीशी होते. ईश्वराशिवाय कोणत्याच वस्तूची जाणीव शिल्लक राहत नाही. अशा स्थितीस 'फ़ना' म्हणजे असंभूति किंवा निर्वाण असे म्हणतात. दुसरे एक सूफ़ी संत ख्वाजा अबीदुल्ला अहरार यांनी नक्शबंदी एकादश सूत्रांपैकी चार घटकांचे अत्यंत संक्षिप्त परंतु सुंदर स्पष्टीकरण दिले आहे. ते असे - 'यादकर्द'चा अभिप्राय हा आहे की, साधकाने नामस्मरणामध्ये इतके मग्न होऊन जावे की, त्याला प्रभुदर्शन घडावे आणि 'बाजगश्त' अर्थात प्रत्यागमनशी अभिप्राय हा आहे की, साधकाने प्रेमनिवेदना (मुनाजात) सह परमेश्वराकडे रूजू होणे, वळणे, परत फिरणे. 'निगहदाश्त' म्हणजे संरक्षणासाठी तत्परता. साधका (भक्ता) ने आपल्या मनामध्ये कुविचार आणि दुष्प्रेरणा यांचा शिरकाव होऊ नये म्हणून दक्षता घ्यावी. ऐहिक विचार त्याच्या मनात घर करू नयेत. त्याचे मन आरशाप्रमाणे स्वच्छ असावे. त्याने क्षणभर सुद्धा गाफिल राहू नये. 'याददाश्त'म्हणजे स्मृत्याव्हानचा अभिप्राय साधकाच्या तत्परतेची मजबुती असा आहे. मानवाच्या वास्तविकतेकडे शब्दातीत आणि अर्थातीत अशी प्रभुकृपा चिरस्थायी व दृढ ठेवण्याचे - राखण्याचे नाव 'याददाश्त' असे आहे. यादकर्द आणि निगहदाश्तमध्ये साधक स्वप्रयत्नाने आपल्या प्रभूकडे उन्मुख होतो, तर याददाश्तमध्ये अंत:करण स्वत:च प्रयत्नाशिवाय परमेश्वराच्या नामस्मरणात गुंतून जातो व त्याच्याकडे आकृष्ट होतो. याददाश्त संपूर्ण संभूती (फ़ना) नंतर प्राप्त होत असते.

भौतिक सुख-स्वाद आणि त्याच्याशी निगडित लोकांच्या दृष्टीने दोन प्रकारचे असते. १) आत्मिक आणि २) शारीरिक वा दैहिक. शरीरास सुखदायक असणारी गोष्ट ही आत्म्यास तापदायक ठरते. जिच्यामुळे शरीरास कष्ट पोहोचतो. त्यामुळे आत्म्यास सुखसंतोष प्राप्त होतो. या दृष्टीने (पाहता) आत्मा आणि शरीर हे एक दुसऱ्याचे वैरी आहेत. ऐहिक जगामध्ये आत्म्याचे अवतरण झाले आहे. तो शरीरामध्ये बंदिस्त होऊन शारीरिक त्रासांमध्ये गुरफटलेला आहे. तो शरीराच्या अधीन आहे. शारीरिक सुखोपभोगामध्ये तो पण

सहभागी होतो. शरीरास कष्ट पोहोचल्यास त्याला पण यातना होतात. हा दर्जा सर्वसाधारण लोकांच्या श्रद्धेचा आहे. पवित्र कुराणामध्ये सांगितले गेले आहे – ''आम्ही मानवाला उत्तम आकार देऊन (उत्कृष्ट निर्मितीच्या रूपाने) निर्माण केले. पण त्याच्या (अन्यायी वर्तनामुळे) आम्ही त्यास नीचातील नीचतम (म्हणजे रसातळास) अवस्थेत परत आणले.'' ९५:४–५ अशाच लोकांच्या संदर्भात हे सत्य प्रमाणित होते.

''मी जिन्न आणि माणसे यांना यासाठीच निर्माण केलेले आहे की त्यांनी माझी भक्ती – उपासना करावी.'' ५१ : ५६. हे अत्यंत (बिलकुल) सुस्पष्ट आहे आणि उपासना (भक्ती) तिरस्कार, अपमान आणि भग्नतेचे श्रुत लेख आहे तर मानवाच्या निर्मितीचे उद्दिष्ट, हेतू त्याची विनम्रता आणि असहायता आहे. विशेषकरून धर्मनिष्ठांचा जन्म आणि जनसाधारण – जनतेसाठी जग आहेच बंदीशाळा – कारागृह. आणि कारागृहामध्ये ऐशआरामाची अपेक्षा करणे ही गोष्ट बुद्धीला – विचाराला सोडूनच आहे.

**झ) विर्द (अवराद) : नित्याराधन, जाप वा नामोच्चार चक्रे वा नामपाठ वा नामजप**

परमेश्वराच्या (अल्लाहच्या) नावास नाम (इस्म) म्हणतात. त्याची असंख्य नावे आहेत. त्याची सर्व नावे सुंदरच सुंदर आहेत. भगवंताची नामे ही भगवंताची ध्वनिरूप अवतार असतात. म्हणजेच नाम व नामी एक असतात. नाम सर्वासाठी तारक असल्यामुळे त्याच्या वारंवार उच्चारणामुळे श्रद्धेवाचूनही नाम फलते. नामाचे हे महत्त्व लक्षात घेऊन कादरिया सूफ़ी संप्रदायामध्ये पंच नित्याराधन वा जाप नित्य नेमाने केली जाते. याला 'पंच अवराद-ए-कादरिया गौसिया' असे नाव आहे. हा विर्द दैनंदिन पाच अनिवार्य नमाजनंतर केला जातो. नामपाठ म्हणजे नामस्मरण व सगुण ध्यान म्हणजे ईश्वराचे चिंतन.

**१) प्रात:काळ (फ़जर) च्या नमाजनंतरचा विर्द (नामपाठ)**

''या हय्यु या क़य्यूमु ला इलाह इल्ला अन्त सुबहान-क इन्नी कुंतु मिन्नजालिमीन'' एकशे अकरा वेळा किंवा तीनशे साठ वेळा म्हणावे.

**२) दुपार (ज़ुहर) च्या नमाज नंतरचा विर्द (नामपाठ)**

''या हय्यु या कय्यूमु बिरहमतिक अस्तगीसु'' – एकशे अकरा वेळा किंवा तीनशे साठ वेळा म्हणावे.

**३) सायंकाळ (असर) च्या नमाजनंतरचा विर्द (नामपाठ)**

''फसहिल्ल या इलाही कुल्ल साबित् बिहुर्मति सय्यदिलअब्रार सहिल्ल'' एकशे अकरा वेळा किंवा तीनशे साठ वेळा म्हणावे आणि ''हस्बन् अल्लाहु नेमलवकील नेमलमौला व नेमन्नसीर'' एकशे अकरा वेळा किंवा तीनशे साठ वेळा म्हणावे.

**४) सूर्यास्तानंतर (मग़्रिब) च्या नमाजनंतरचा विर्द (नामपाठ)**

दहा वेळेस हे इंद्रिय-निग्रह वा संयम म्हणावे – ''अल्लाहु अस्समदी मिन् इंदिक् मदरी व अलैक मोतमिदी'' नंतर हे श्लोक एकशे अकरा वेळा म्हणावे – ''रब्ब इन्नी मस्सनिल ज्जर्रू व अन्त अर्रहमुर्राहिमीन''

**५) रात्री (इशा) च्या नमाजनंतरच्या विर्द (नामपाठ)**

''या शेख अब्दुल कादर जीलानी शैयुँ लिल्लाहि'' एकशे अकरा वेळा किंवा तीनशे साठ वेळा म्हणून या श्लोकाची – ''व उफाव्विजु अम्री इलल्लाहि इन्न अल्लाह बसीरू बिलइबादि'' एकशे अकरा वेळा तोंडी

आवृत्ती करावी आणि प्रत्येक विर्द (जाप) च्या अगोदर व शेवटी एकशे अकरा वेळेस 'दरूद शरीफ' म्हणावे.

कादरी सूफ़ी संप्रदायाचे अध्वर्यू अब्दुल कादिर जीलानी यांनी सप्त आचरण पद्धती ('अतवारे सबा') पण सांगितल्या आहेत. नामाचे किती वेळा उच्चारण करायचे असते. यात हे सांगितले गेले आहे. फक्त एवढेच नव्हे तर रंग आणि प्रार्थना पण सांगितली गेली आहे. जसे –

१) 'ला इला–ह इल्लल्लाह' (अल्लाहशिवाय कोणीच उपास्य नाही.) याचा रंग निळा असल्याचे सांगितले गेले आहे.

२) 'अल्लाह' जो इस्मे जलील आहे (अल्लाह याचे नाव सौंदर्यसूचक आहे.) याचा रंग पिवळा आहे. ७८,५८६ वेळा याचे स्मरण केले जाते. अब्दुल कादिर यांचे म्हणणे आहे की त्यांनी स्वत: आपल्या साधनेत हा रंग पाहिलेला आहे.

३) इस्मे 'हू' (त्या [परमेश्वरा]चे नाव) याचा रंग लाल (तांबडा) आहे. ४४,६३० वेळा म्हणावे.

४) इस्मे 'हई' (अमर जो आहे त्याचे नाव) याचा रंग पांढरा आहे. २०,०९२ वेळा म्हणावे.

५) वाहिद (परमेश्वर, जो एक आहे) याचा रंग हिरवा आहे. ९३,४२० वेळा म्हणावे.

६) अजीज (प्रबळ अथवा प्रिय परमेश्वर) याचा रंग काळा आहे. ७४,६४४ वेळा म्हणावे.

७) वदूद (प्रेम करणारा परमेश्वर) हा निर्वर्ण (रंगहीन) आहे. ३०,२०२ वेळा म्हणावे.

परमेश्वराच्या शुभनामांचे गुणधर्म गुणकारी असल्यामुळे त्यांचाही पण जाप म्हणजे 'विर्द' करण्याची प्रथा प्रचलित आहे. परमेश्वराच्या शुभनामांपैकी त्याचे 'अल्लाह' हे शुभनाम सर्वश्रेष्ठ आहे. जगामध्ये अल्लाहसाठी प्रचलित असलेली सर्व नावे सुंदर आणि पवित्र अशीच आहेत. ''अल्लाहची (सर्वच) सुंदर नावे होत. त्याच्या सुंदर नावानीच त्याची आळवणी करा.'' ७:१८०. ''अतिसुंदर नावे त्याची (अल्लाहची) च आहेत. आकाश आणि भूमी आणि त्यातील सर्व त्याच्या पावित्र्याचा जयजयकार आणि जप करतात. तो सर्वजित सर्वविद आहे.'' ५९ : २३–२४

अल्लाहच्या शुभनामांपैकी फक्त 'अल्लाह' या सर्वश्रेष्ठ नामाच्या 'विर्द' म्हणजे जापविषयी माहिती देण्यात येत आहे –

'अल्लाहु' या शुभनामाचे 'अबजद' पद्धती किंवा वर्णांकशास्त्रानुसार मूल्यभारांक ६६ इतके भरते. हे ईश्वराचे सत्तावाचक नाम आहे. हे सर्वगुणसंपन्न असे व्यापक आणि अति विशाल असे नाव आहे. यामध्ये गुणांची पराकाष्ठा आहे. काही विद्वानांच्या मते हेच 'इस्म–ए–आज़म' म्हणजे महामंत्र आहे. पवित्र कुराणामध्ये 'अल्लाह' हे नाम २,३६० वेळा आले आहे. हे संपूर्ण नामांचे शासक नाम आहे. सर्व नामांवर याचे वर्चस्व आहे, श्रेष्ठत्व आहे. हे सत्ता नाम व्यापक आहे. सर्व गुणवाचक नामे याच्याशीच निगडित आहेत. जो कोणी या नावाचे स्मरण दररोज हजार वेळा करीत असेल तर त्याचा विश्वास निश्चितपणे दृढ होईल आणि जो कोणी नमाज म्हणजे उपासनेनंतर शंभर वेळा याचे 'विर्द' अर्थात जाप करेल त्याचे मन उघडले जाईल आणि तो ईश्वरीय प्रेरणेचा अधिकारी बनेल.

२४



प्रकरण २४

# समाअ (संकीर्तन - श्रवण, सूफ़ी संगीत श्रवण)

(क)

**१) संगीत - उदभव, वैशिष्ट्य आणि महत्त्व - भारतीय दृष्टिकोन**

सुरूवातीस संगीताचा उदभव वेदांचे निर्माते ब्रह्माद्वारे झाला. ब्रह्माने ही कला शिवला दिली आणि शिवद्वारे सरस्वतीस प्राप्त झाली. सरस्वतीस यासाठीच 'वीणा-पुस्तक-धारिणी' संबोधून संगीत आणि साहित्याची अधिष्ठात्री म्हणून मानले गेले. सरस्वतीकडून संगीत कलेचे ज्ञान नारदास प्राप्त झाले. नारदांनी स्वर्गामधील गंधर्व, किन्नर आणि अप्सरा यांना संगीत शिकविले. तेथूनच भरत, नारद आणि हनुमान इत्यादी ऋषि संगीत कलेमध्ये पारंगत होऊन भूलोकी म्हणजे पृथ्वीवर संगीत कलेच्या प्रचारार्थ अवतीर्ण झाले.

असे म्हणतात की संगीताच्या सप्त स्वरांची उत्पत्ती ही पशु-पक्ष्यांपासून झालेली आहे. मोरापासून षड्ज, चातकापासून ऋषभ, बकऱ्यापासून गांधार, कावळ्यापासून मध्यम, कोकिळेपासून पंचम, बेडकापासून धैवत आणि हत्तीपासून निषाद स्वराची उत्पत्ती झाली आहे. कुत्र्यांचे भुंकणे, गाईचे हंबरणे, सिंहाची गर्जना इत्यादी मानवेतर पशु-पक्षी आपल्या ठरावीक नैसर्गिक आवाजामध्येत ध्वनी काढतात. त्यात त्यांना मुळीच बदल करता येत नाही. मात्र परमेश्वराने मानवी कंठास विविध ध्वनी-निर्मितीची अप्रतिम देणगी दिली आहे. त्यामुळे तो इतर पशु-पक्षांच्या आवाजाची हुबेहूब नक्कल करू शकतो. हे परमेश्वराचे मानवासाठी एक वरदानच आहे.

एका फ़ारसी विद्वानाचे असे मत आहे की एकदा प्रेषित मूसा डोंगर-पर्वतावर रपेट घेत निसर्ग सौंदर्य निरीक्षित (पहात) होते. इतक्यात त्यांना परोक्षपासून एक आवाज ऐकू आला. ती ईश्वरवाणी - आकाशवाणी होती - 'हे मूसा! तू आपली काठी या दगडावर आपट.' हा आवाज ऐकून प्रेषित मूसांनी आपली काठी त्या दगडावर जोराने आपटली. तेव्हा त्या दगडाचे सात तुकडे झाले आणि प्रत्येकामधून एक-एक पाण्याचा झरा स्वतंत्रपणे वाहू लागला. त्याच जलधारेच्या आवाजापासून प्रेषित मूसा यांनी सात स्वरांची रचना केली. हे सप्त स्वर आहेत - 'सा रे ग म प ध नि'

दुसऱ्या एका फ़ारसी विद्वानाचे कथन आहे की पर्वतरांगांमध्ये 'मूसीक़ार' नावाचा एक पक्षी राहतो. याच्या चोंचीला बासरीसारखे सात छिद्रे असतात. त्याच सात छिद्रांमधून सात स्वर निर्माण झाले.

संगीत स्वर, लय आणि तालावर आधारित असते. कोणताही ध्वनी-आवाज एक विशिष्ट आंदोलन-संख्याचा असल्यास कर्णप्रिय वाटतो. नादाचे लघुत्त्व आणि दीर्घता त्याच्या तीव्रतेवर अवलंबून असते. 'नाद' या शब्दामधील 'नकार' प्राण-वाचक (वायु-वाचक) आणि 'दकार' अग्नि-वाचक आहे. म्हणून जो वायू

आणि अग्नीच्या योगा (संबंधा)मुळे उत्पन्न होतो, त्यासच 'नाद' असे म्हणतात. नादाचे दोन प्रकार मानले गेले आहेत – 'आहत' आणि अनाहत. हे दोन्ही पिंडामध्ये –देहामध्ये प्रकट होतात. जो संघर्षाशिवाय (घर्षणाशिवाय) स्वयंभू स्वरूपात उत्पन्न होतो, त्यास 'अनाहतनाद' म्हणतात. या अनाहत नादाची उपासना आमचे प्राचीन ऋषि–मुनि करत. हा नाद मुक्ति–दायक असतो. जो कानांनी ऐकू येतो आणि जो दोन वस्तूंच्या घर्षणाने निर्माण होतो, त्यास 'आहत नाद' असे म्हणतात. हा आहत नादच संगीतासाठी उपयोगी असतो, मात्र 'अनाहत नाद' म्हणजे दैवी संगीत व स्वर माधुर्य, मधुर सारंगी सृष्टिकर्त्याची.

मनुष्याचे संपूर्ण संगीत अस्तित्वाच्या रागांनी उत्पन्न झाले आहे. मनुष्याची सर्व वाद्ये अस्तित्वाच्या नकलेमुळे निर्माण झाली आहेत. पक्षी गातात, निर्झर गातात, हवा गाते, आकाशामध्ये मेघ गर्जन करतात. या सर्वांमुळे मनुष्याचे नाद उत्पन्न झाले आहेत. सर्व राग निर्माण झालेत. यांच्यापासूनच सर्व वाद्ये निर्माण झालीत.

जन्माला आल्यावर पहिल्यांदा वाणीचा अविष्कार केवळ रडण्यातून प्रकट होतो. व्यक्तीला आत्मबोध व परमेश्वराशी त्याचे असलेले एकत्व स्वत:च्या अंतरंगात कळू शकते. पण बाहेरच्या विश्वात अनेक रूपांनी प्रकट झालेल्या याच परमेश्वराशी एकरूपता, संवाद व संपर्क साधण्यासाठी प्राणिमात्रांना मिळालेली यंत्रणा म्हणजे बोलण्याची सोय. हाच नाद, हेच स्पंदन संपूर्ण विश्वात भरलेले असते. म्हणून नादातून (वा वेदवाणीतून) सर्व विश्वाची उत्पत्ती झाली असे समजले जाते.

अखिल ब्रह्मांडामध्ये व्याप्त अनाहत नादचे व्यष्टिमध्ये व्यक्त रूप नाद आहे अर्थात् जो नाद अनाहत स्वरूपात संपूर्ण विश्वामध्ये समाविष्ट आहे त्याचीच अभिव्यक्ती जेव्हा एका व्यक्तीमध्ये होते तेव्हा त्यास 'नाद' असे म्हणतात. बद्ध जीव त्या नाद–श्रवणाशी वंचित असतो. नाद मुळात एक असून पण औपाधिक संबंधामुळे सात स्तरांमध्ये विभक्त आहे. शास्त्रामध्ये ज्याला प्रणव अथवा ॐकार (ओंकार) म्हणतात, तेच उपाधि–रहित शब्द–तत्त्व आहे.

शब्द–तत्त्वाचा महिमा सांगताना 'ज्ञान–तिलक' मध्ये सांगितले गेले आहे की शब्दच कुलूप (टाळे) आहे. याने ब्रह्मास कोंडून टाकले आहे आणि शब्दच ती चावी आहे की जिच्यामुळे ते कुलूप (टाळे) उघडले जाते आणि परमेश्वराचे साक्षात दर्शन घडते. जसे काट्याने काटा काढला जातो आणि चावीने कुलूप उघडले जाते तसेच (त्याप्रमाणेच) शब्दापासून शब्द पण उघडला जातो. अशाप्रकारे शब्दाद्वारे मनामध्ये प्रकाश निर्माण होतो.

इंद्रियांचा स्वामी मन आहे, मनाचा प्राण, प्राणाचा लय आणि लयाचा नाद. मन आणि प्राणाची लय लागल्यानंतर एक अभूतपूर्व आनंदाची उपलब्धी होते. – (हठयोगी–प्रदीपिका ' ४/२९–३०)

कोणतेची नाद आमच्या कानात कशा प्रकारे प्रभावित करते, हे सर्व संगीताचे मानसशास्त्राच्या श्रेणीमध्ये येते. कोणताही ध्वनी एक विशिष्ट आंदोलन – संख्याचा असल्यासच कर्णप्रिय वाटतो – कानास गोड लागतो आणि आंदोलन–संख्येमध्ये कमी–जास्त झाल्यास कर्णकटू पण होऊन जातो. पाश्चात्य विद्वानांचे असे मत आहे की वेग–वेगळे ध्वनी जेव्हा कानापर्यंत येऊन पोहोचतात तेव्हा त्यांना समजण्यासाठी वेगवेगळ्या अंतरालांची आवश्यकता असते.

नादाचे लहान-मोठेपण तीव्रतेवर अवलंबून असते. याचा प्रभाव जेव्हा मेंदू आणि हृदयावर पडतो तेव्हा प्रथम रक्त-क्रिया प्रभावित होते आणि त्यानंतर मानसिक अनुभूती स्वरूपात त्याचे रूपांतर होते. नादाचा कालावधी, त्याची विपुलता (घनता), त्याची स्पष्टता किंवा उज्ज्वलता, त्याची दिशा, त्याचा प्रकार, त्याची गती व कंपन आणि तारता इत्यादी सर्वांचा प्रभाव प्राणीमात्रावर पडतो. मनुष्याचे चिंतन, त्याची कल्पना आणि प्रेरणा संगीताच्या याच वैज्ञानिक तत्त्वांमुळे प्रभावित होत असते.

मनुष्याद्वारे संगीताची सृष्टी दोन प्रकारे होते - एक प्रेरणेच्या आधारावर तर दुसरी त्याच्या संचित ज्ञानाच्या आधारावर. प्रेरणेद्वारा व्यक्त संगीत, श्रोत्यास लवकर आकर्षित करते आणि संचित ज्ञानाच्या आधारावर अभिव्यक्त संगीत यंत्रवत वा यांत्रिक असल्यामुळे मधुर तर लागते (वाटते), परंतु हृदयास भिडत नाही. याच कारणामुळे जेव्हा आपण एखाद्या लोकसंगीताची धुन ऐकतो तेव्हा त्याचे साधे-सरळ काही स्वरांची धुन मनास स्पर्श करते. अनेक वेळा ऐकून पण मन तृप्त होत नाही. त्याची अवीट गोडी चाखावीशी वाटते. तर नियमांच्या परिघामध्ये बंदिस्त शास्त्रीय संगीताच्या बंदिशी ऐकून तोंडातून वाह-वाह तर निघतो, परंतु तो टिकत नाही.

उत्कृष्ट संगीतामध्ये श्रोत्यास तन्मय करण्याची क्षमता असते. जे मानवाच्या चित्ताचे रंजन करते, त्यालाच विद्वानांनी 'राग' असे म्हटले आहे. 'योगाचित्तवृत्तिनिरोधः तदाद्रष्टुः स्वरूपेवस्थानम्' अर्थात् चित्त-वृत्तींचा जेव्हा निरोध होतो, तेव्हा द्रष्टा (अनुभव करणारा अहम् ) आपल्या स्वरूपामध्ये लीन (एकाकार) होऊन जातो.

जोपर्यंत संगीतामुळे श्रोत्याच्या हृदयामधील सुप्त भाव जागृत होत नाहीत तोपर्यंत त्याच्यावर संगीताचा प्रभाव पडणार नाही. म्हणून हे आवश्यक आहे की श्रोता हा सहृदय (दर्दी) असावा. समस्त रस-साहित्यामध्ये कलाजन्य आनंदाच्या अनुभूतीसाठी श्रोत्याचे सहृदय असणे आवश्यक मानले गेले आहे. असे झाल्यावरच श्रोता आणि संगीतकार नाद ब्रह्मामध्ये अवगाहन करू शकतात.

वैदिक भक्ति-पद्धतीमध्ये सामवेदच्या गीतिका औ होई, हुम्मा इत्यादी स्वरांमध्ये गाईले जात असत. यांना स्तोम असे म्हणतात. हे तेरा प्रकारचे आहेत - १) 'हाउ (हाअु)' (मनुष्याचे वाचक), २) 'हाइ' (वायुलोक), ३) 'अथ' (चंद्रलोक), ४) 'इह' (आत्मा), ५) 'ई' (अग्निरूप), ६) 'ऊ' (सूर्यरूप), ७) 'ए' (आवाहनबोधक), ८) 'औहोमि' (विश्वेदेव), ९) 'हिं' (प्रजापतिस्वरूप), १०) 'स्वर' (प्राणरूप), ११) 'या' (अन्नरूप), १२) 'वाक्' (विराटरूप) आणि १३) 'हुं' (ब्रह्मरूप). (१-१३-१,२,३) हे स्वर कोठे मंद्र, कोठे उच्च आणि कोठे सम असतात. विशेष ध्वनींमध्ये आवेष्टित गीत मनास आकर्षित करून घेते. गीताशी एकरूप झालेले मन आपले पलायन अर्थात् चंचलता सोडून एकतानतेमध्ये रमून जाते. चित्ताच्या वृत्ती आपोआप निरूद्ध होऊन जातात आणि अशाप्रकारे त्यांचे मन एका जागी केंद्रित झाल्यामुळे अद्‌भुत शांती प्राप्त होते. जगाचे जंजाळ जोपर्यंत कष्टप्रद असतात, जोपर्यंत मन त्याच्यामध्ये गुंतलेले असते. जेव्हा मन या जाळ्यापासून मुक्त होते, तेव्हा मग दुःख कुठले? दुःख-दाहापासून वाचलेले मनच शांतीचा हेतू आहे. सामवेद याच उद्देशाने समस्त वेदांचा रस गणला जातो. कारण की मनास सरस संगीताच्या लहरींमध्ये बुडवून रस-रूप ब्रह्माशी तद्रूप करतो. यामुळेच याला भक्तिकांडाचा वेद पण म्हणतात आणि भक्तिकांडाचा पण आनंदमय कोषाशी संबंध असतो, हे सर्वज्ञात आहेच.

## २) संगीताचा दार्शनिक महिमा

संगीताचे दुसरे नाव संजीवनी आहे. संगीताच्या मागे ईश्वर चालतो. ज्या अंत:करणाच्या समुद्रास संगीताची हवा उसळविते त्याने शैतान पण भयभीत होऊन जातो. जर मनुष्यामध्ये ऐकण्याची क्षमता-योग्यता असेल तर प्रत्येक वस्तूमध्ये संगीत आहे. ज्या मनुष्याच्या आत्म्यामध्ये संगीत नाही, त्याच्यावर विश्वास ठेवू नका. समस्त कलांमध्ये संगीतकलेचा कषायांवर अधिकतम प्रभाव पडतो. संगीत प्रेषितांची कला आहे. हीच तर ती कला आहे जी आत्म्याच्या अशांतीस शांत करते. भावावेशमध्ये हृदय-अंत:करण संगीतामुळे उत्तेजित होते, ईश्वराच्या शोधासाठी व्याकुळ बनते. जो ईश्वरभावाच्या बुद्धीसाठी संगीत ऐकतो, त्याला तर त्यामुळे फायदाच होतो, परंतु जे संगीत इंद्रियांच्या तृप्तीसाठी ऐकले जाते अशा संगीतामुळे ईश्वर-विरोधी भाव आणि विषय-वासना प्रेमाचीच वाढ होते.

## ३) मिस्त्र (इजिप्त), अरब आणि इराण या मुस्लिम राष्ट्रांमधील संगीत*

**क) मिस्त्र (इजिप्त) चे संगीत –** मिस्त्रची संस्कृती अत्यंत प्राचीन आहे. इ.स.पूर्व अठराव्या शतकामध्ये जेव्हा इजिप्तने आग्नेय आशियावर अधिपत्य प्रस्थापित केले तेव्हा स्थानीय नृपतिगणांनी मैत्री स्थापनेच्या प्रतीकस्वरूप त्यांना अनेक वाद्ययंत्रे आणि स्त्री-कलाकार भेट म्हणून दिले. त्या वेळेपासूनच इजिप्तच्या संगीतामध्ये परिवर्तन सुरू झाले आणि भारतीय संगीताशी त्याचे आदान-प्रदान सुरू झाले. सर सौरींद्र मोहन यांच्या मतानुसार सातव्या शतकामध्ये जेव्हा अरबांनी इजिप्तवर विजय प्राप्त केले तेव्हापासून तेथे अरबी संगीत आणि इस्लाम धर्म यांचा प्रवेश झाला. वर्तमान काळातील तेथील संगीतास अरबी छटा दिसून येते.

इजिप्तचे धर्माचार्य संगीताच्या उन्नतीसाठी नेहमी अग्रगण्य राहिले आहेत. विभिन्न शोभायात्रा, धर्मानुष्ठान, क्रीडा इत्यादीमध्ये संगीताचे अनुष्ठान आवश्यक मानले गेले. तेथील नाईल नदीच्या नावाड्यांच्या गाणी उल्लेखनीय आहेत. हे गीत एकलगीत आणि समूहगीत या दोन्ही स्वरूपात असतात. इजिप्तच्या पुरूष संगीततज्ज्ञांना 'अलातीये' आणि स्त्री संगीततज्ज्ञांना 'अवालिम' म्हणतात. मशिदीमधील प्रार्थन ख्रिश्चन प्रार्थनेसारखी लय आणि स्वरामध्ये असते.

प्राचीन सांस्कृतिक वारसा आणि परंपरागत संगीत आणि नृत्यामुळे, इजिप्तचे संगीत यूरोप आणि अमेरिकामध्ये पण प्रसिद्ध आहे. येथील संगीतामध्ये मादकता आणि उपासनायुक्त भाव प्रचुर प्रमाणात असते.

**ख. अरबांचे संगीत –** मुस्लिम राष्ट्र आणि मुस्लिम जातींचे संगीत अरबस्तान, उत्तर आफ्रिका आणि इराणपर्यंत प्रचलित (फैलावलेले) आहे. अरब संगीताच्या शास्त्रीय ग्रंथांमध्ये नवव्या शतकाचे अल्-किंदी, अल-फ़राबी, अविसेन्ना (११वे शतक), सैफुद्दीन (१३वे शतक) आणि अब्दुल क़ादिर (१५वे शतक) हे उल्लेखनीय आहेत. ग्रंथांमध्ये उद आणि तंबूरच्या पडद्यांच्या आधारे मुक़ामची चर्चा करून मुक़ाम पद्धतीस स्पष्ट केले गेले आहे. अल-फ़राबीवर प्राचीन ग्रीक शास्त्राचा प्रभाव होता.

पवित्र कुराणामध्ये संगीताच्या विरोधात काहीच निर्देश नाहीत, परंतु मलाही (मदिरा, नारी आणि संगीत) पासून अलिप्त राहण्यासाठी मुस्लिम कट्टरपांथियांनी संगीत ऐकण्यास मनाई (निषिद्ध) केली. अशा प्रकारे इस्लामच्या चार सनातनपंथी शाखा - इनफ़ी, मालिकी, शाफ़ई आणि हंबली - यांनी संगीताकडे पाठ

फिरविली. येथूनच संगीताविषयी विवाद निर्माण झाले. तुबाइस (मृत्यू इ.स. ७१०) हा मुस्लिमामधील पहिला पुरूष संगीतकार होऊन गेला. त्याने फ़ारसी धुनांची नक्कल करून चांगलेच यश प्राप्त केले. तो हिजाज़च्या गुलामांमध्ये लोकप्रिय झाला. यानंतर याज़िद (मृत्यू इ.स. ६८३) व अल्वाजिद (मृत्यू इ.स. ७१५)यांच्या छत्रछायेखाली संगीताची वाढ झाली. त्याकाळी इब्न सुराइज, इब्न मिसजा आणि माबद नावांचे संगीतकार अत्यंत प्रसिद्ध होते. अल इस्फ़हानी (मृत्यू इ.स. ९६७) याने पन्नास वर्षांच्या दीर्घ साधनेनंतर 'अल-अग़नी अल-कबीर' नावाचे गीतांचे एक बृहत् ग्रंथ तयार केले. याचे २१ भाग होते. या ग्रंथामध्ये दहाव्या शतकापर्यंतच्या अरबी संगीताचा इतिहास आणि गीतांचा समावेश आहे.

**अरबी संगीताचा विकास**

इस्लामचा प्रचार व प्रसार होण्यापूर्वी अरबांमध्ये व अरबस्थानमध्ये भक्ति-संगीत, लौकिक संगीत आणि लोक-संगीताच्या माध्यमाने ते आपली देवी-देवतांची पूजा गायन आणि नृत्याद्वारे करीत. त्यांच्या इतिहासामध्ये धार्मिक संगीतापेक्षा लौकिक संगीतासंबंधी अधिक माहिती मिळते. त्यामध्ये स्त्री-गायिका (कैनात) आणि दासी (मुग़न्निया) यांचे विशेष स्थान होते. त्या काळी राजदरबारामध्ये, अरबी बद्दु यांचे पडाव (ठाणे) आणि मदिरालयांमध्ये पुष्कळ गायक, गायिका आणि नर्तिका उपलब्ध होत असत.

उमय्यद (इ.स. ६६१-७५०) आणि अब्बासी (इ.स. ७५०-९०९) खलीफ़ांच्या काळामध्ये सीरिया आणि इराक ही राष्ट्रे ललित कलांची केंद्रे होती. त्यांनी संगीतास प्रोत्साहन फार दिले. सीरियाच्या दमिश्क या शहरी त्यांनी आपले दरबार स्थापिले. तेथे त्यांनी असंख्य गायक, वादक आणि नर्तक ठेवले. त्या काळचा सर्वात प्रसिद्ध संगीततज्ज्ञ होता अबू उस्मान बिन मिसजाह. इब्न मिसजाह हा अब्दुल्ला बिन ज़ुबैरच्या शासन काळातील प्रख्यात गायक होता. याला अरबी शास्त्रीय संगीताचा पिता म्हणतात, कारण की हा अरबी संगीतास संहिताबद्ध करणारा पहिला संगीततज्ज्ञ होता. हा एक उच्चकोटिचा गायक आणि वीणावादक होता. दबीस मुग़न्नी, सैय्यद बिन मिसजाह, इब्न आयशा अलमदनी, अबू यहिया, हब्बाबा, सफ़रूल आलमीन हे सर्व उमय्यद ख़लीफ़ा काळचे प्रसिद्ध संगीतकार होते.

अब्बासी वंशाच्या शासनकाळामध्ये संगीताचा प्रचार वरचेवर वाढत गेला. हा काळ अरबी संगीताचा स्वर्ण-युग म्हणून ओळखला जातो. या काळच्या संगीतज्ञांमध्ये इब्राहीम अल-मूसीली (मृत्यू इ.स. ८०४), इब्राहीम अल -महदी (इ.स. ७७८-८३८), इसहाक़ अल-मूसीली, आणि वीणावादक जलजाल (मृत्यू इ.स. ७८१) यांची नावे उल्लेखनीय आहेत. इसहाक़ अल-मूसीली हा आपल्या काळचा सर्वश्रेष्ठ संगीतज्ज्ञ आणि संगीत-शास्त्री होता. त्याने संगीतावर अठरा ग्रंथ लिहिले. त्याचा शिष्य इब्न अल-मुनज्जिम याने संगीत-शास्त्रावर 'रिसाला फ़िल मूसीक़ी' नावाचे अत्यंत महत्त्वपूर्ण पुस्तक लिहिले.

**अरब संगीत-शास्त्री**

अरब संगीत-शास्त्रींमध्ये अल-किंदी (इ.स. ७८०-८७३) हा एक अत्यंत प्रसिद्ध असा विद्वान होता. त्याने संगीतावर अनेक पुस्तके लिहिली. त्यापैकी 'रिसाला मूसीक़ी फ़िल तरतीब व तालीफ़', 'किताब तरतीबुल नग़म' ही उल्लेखनीय आहेत. अबू नसर फ़ाराबी (मृत्यू इ.स. ८५०) हे इस्लामचे सर्वश्रेष्ठ तत्त्ववेत्ते आणि संगीत-शास्त्री गणले जातात. त्यांचे अरब संगीतावरील 'किताब अल-मोसीक़ी अल-कबीर' हे पुस्तक

अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. यामध्ये ध्वनि-स्वरांतर, स्वर-सप्तक, संगीत -शैली आणि वाद्ययंत्राशी संबंधित सविस्तर विवेचन आढळते. इब्न-सीना (जन्म इ.स. ९८० -मृत्यू इ.स. १०३७) हे अकराव्या शतकाचे अत्यंत प्रभावशाली विद्वान होते. 'किताब अल-शफ़ा' आणि 'अलनजात' या नावाच्या त्यांच्या दोन ग्रंथांमध्ये अरबी संगीताचे शास्त्र-पक्ष आणि कला-पक्ष यावर प्रकाश टाकला गेला आहे. काही विद्वानांच्या मते शहनाई आणि मिरचंग (तोंडाने वाजविले जाणारे वाघ) यांनीच शोधून काढले आहेत. बाराव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये शफ़ीउद्दीन अब्दुल मोमिन अल-बग़दादी (मृत्यू इ.स. १२९) यांनी अरबी संगीत-प्रणालीस सुव्यवस्थित रूप दिले. त्यांना आपल्या काळचे संगीतज्ञांचे मार्गदर्शक मानले जाते. त्यांनी अरबी संगीत-प्रणालीचे नव्या पद्धतीने निरूपण केले. हे संगीतासाठी त्यांचे फार मोठे योगदान आहे. संगीताच्या इतिहासामध्ये शफ़ीउद्दीन यांनी अविष्कृत केलेल्या स्केलला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. यांनीच सर्वप्रथम अरबी संगीतास लिपिबद्ध करण्याची प्रणाली विकसित केली. ही लिपी वर्णानुक्रमिक आणि संख्यात्मक होती. यांनी दोन तारांचे 'नुजह' आणि 'मुग़नी' नावांची दोन वाघयंत्रे शोधून काढली.

**अरबी वाद्ययंत्रे**

प्राचीन काळापासूनच अरबी संगीत गायन-प्रधान होते, परंतु इस्लामच्या प्रसारानंतर तेथे इराणी, तुर्की, यूनानी, मुग़ल आणि खुरासानी संगीतज्ञ यांचे त्यांच्या विभिन्न वाद्ययंत्रासह आगमन झाले. अशा प्रकारे अरबी लोकांचा कल वाद्य-संगीताकडे वाढला. तत्कालीन प्रचलित शैली नौबामध्ये गायनासोबत वादनास पण प्राधान्य प्राप्त झाले. यामध्ये मोठ्या प्रमाणात वाद्ययंत्रे वापरली जात. नौबामध्ये गाण्याच्या प्रत्येक भागाच्या शेवटी साजिंद्यांना वाद्य वाजविण्याची पूर्ण मोकळिक दिली जात असे. या क्रिये (कृती)स 'तरीक़ा' असे म्हटले जाई. काही विद्वानांनी याचे 'तक़सीम' या नावाचे वर्णन केले आहे.

अरबी संगीतामध्ये पुढील वाद्ययंत्रे वापरली जात. सर्वात जुने वाद्य म्हणजे बारबत होय. याला 'उद'पण म्हणत. याशिवाय तुंबुर किंवा तंबूर, कानून, रबाब, सुरनै किंवा मिज़मार ही अरबी वाद्ययंत्रे होत.

**ग) इराणचे संगीत**

सातव्या शतकामध्ये मुसलमानांनी फ़ारस म्हणजे इराणवर विजय प्राप्त केले. यानंतर भारतामध्ये पण इस्लामी संस्कृतीचा प्रसार होत गेला आणि अशाप्रकारे इराण आणि भारताच्या संगीतामध्ये देवाण-घेवाण सुरू झाली. चंग, उद, इसर, सितारा-कितारा, संतिर, तार, रबाब, कमंगेह आणि गज़ानी वाजविल्या जाणाऱ्या यंत्राची नावे उल्लेखनीय आहेत. 'Journey to Persia' नामक ग्रंथामध्ये इराणच्या शवयात्रा संगीतानुष्ठानाचे सुंदर वर्णन आढळते. या अनुष्ठानास करबलाचे लोकसंगीत किंवा ताज़िया म्हटले जाते. हे करबला येथील युद्धामध्ये हसन-हुसैन यांच्या हौतात्म्यावर आधारित आहे. विवाह संगीत आणि प्रेमपरककाव्य संगीताचे पण इराणमध्ये अत्यंत प्रसार झालेला होता. ग़ज़ल गायन तर याच संस्कृतीची देणगी आहे.

कुरआनप्रणीत मतानुसार जरी संगीत निषिद्ध वा त्याज्य असले तरी पण सूफ़ी भक्तिपरक संगीतास ग्राह्य मानतात. ते ईश्वरीय प्रेमाशी निगडित काव्य रचना गात असत, वाजवित असत. मुस्लिम राष्ट्रांमध्ये पण सूफ़ींच्या संगीत-प्रेमावर कोणतेच प्रतिबंध लादले गेले नव्हते.

अजमेर येथील सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख़्वाजा मुइनुद्दीन चिश्ती यांच्या आश्रमामध्ये यांच्या आश्रयात अनेक कव्वाल गायक होते. हे भारतीय भाषेमध्ये सूफ़ी भावनांनी युक्त असे गीत गात असत व भारतीय जनतेस आकृष्ट करीत असत.

मुस्लिम विद्वान संगीतास गणिताची एक शाखा मानतात. त्यांचे आपले एक वेगळे संगीत-शास्त्र आहे. त्यांच्या या शास्त्राने भारतीय संगीतास एवढे प्रभावित केले की ते आपल्या वैदिक परंपरेपासून विच्छिन्न झाले. सूफ़ींच्या समन्वयवादी प्रवृत्तीमुळे प्रसिद्ध कवी व संगीतज्ञ अमीर खुसरो हे शेख़ निज़ामुद्दीन चिश्ती यांचे परम कृपा-पात्र होते. मुस्लिम सुलतानांचा आश्रय बऱ्याच प्रमाणात त्यांना प्राप्त झाला. त्यांनी भारतीय आणि इराणी कलाकारांची चर्चा-सत्रे आयोजित केली. त्यांमध्ये मोठ्या प्रमाणात विचार-विनिमय होत असे. परिणामस्वरूप मुस्लिम संगीत सिद्धांतांस भारतीय पेहराव नेसविले गेले आणि 'इंद्रप्रस्थ मत' नावाच्या एक नवीन संप्रदायाचे सूत्रपात झाले. इंद्रप्रस्थ मतास राजाश्रय पण मिळाले आणि सूफ़ी कलाकारांमुळे याचा प्रसार जनतेमध्ये झाला. इंद्रप्रस्थाच्या प्रभावामुळे भारतामध्ये सप्तकाची जागा अष्टकाने घेतली. (* वसंत - 'संगीत विशारद' पृ. ४२४-३१)

### ४) संगीताचा प्रभाव आणि त्याची महती

**वैदिक संगीत –** भारतात वैदिक संगीत पहिले संगीत म्हणून उदयास आले. यज्ञाजवळ सामूहिक पद्धतीने सामगायन करणारा एक वर्ग होता त्यात मुख्य गायक प्रस्तोता व उपगायकांबरोबर वीणा, वेणू व ताल वाद्यवादकांचा समूह सामगायन सादर करत असे. अशीच परंपरा पाश्चात्य संस्कृतीत दिसून येते. चर्चमध्ये समूहाने गायन करणे हे रोमन संस्कृतीचे महत्त्वाचे अंग होते. भारतीय संगीतामध्ये प्रांतानुसार वैविध्य आहे. 'आचार-विचार-उच्चार' या त्रिसूत्रीवर हे संगीत आधारित आहे. तसेच संगीत व संस्कृती यांचाही संबंध असतो. संगीताला आशयाची जोड दिली जाते. संगीत कोणत्याही प्रकारचे असो, त्यातील आशय श्रोत्यांपर्यंत पोचणे आवश्यक ठरते.

**लोकसंगीत –** सामान्य लोकांच्या भावभावनांना वाट मोकळी करून देणारे संगीत म्हणजे लोकसंगीत, कमी वाद्ये, प्रसंगी वाद्यविरहित, कमीतकमी स्वरांचा वापर लोकसंगीतात असतो. लोकसंगीत हे एकल नसून सामूहिक असते. महाराष्ट्रात लावणी, पोवाडा, गुजरातमध्ये गरबा, राजस्थानात मांड, बंगालमध्ये बिहू अशा विविध स्वरतालांनी नटलेले संगीत आपल्या समृद्ध संस्कृतीची साक्ष पटवते.

**शास्त्रीय संगीत –** भारतीय शास्त्रीय संगीताचे वेगळेपण रागदारी संगीतात आहे. 'रंजयते इति राग:' अशी रागाची परिभाषा आहे. स्वरांच्या निरनिराळ्या समूहातून रंजकता निर्माण करणे म्हणजे राग संगीत. उत्स्फूर्त कल्पना विलास हा मनोवेधक तर असतोच, पण तो सर्जनशीलदेखील आहे. अनेकांच्या प्रतिभेतून ५०० ते ६०० रागांची निर्मिती झाली असून एक राग अनेक वेळेला गायला तरी त्यात नित्यनवीनता जाणवते. भारतीय संगीतातील ताल संकल्पना देखील अशीच सर्जक आणि प्रतिभाशाली आहे.

**भक्ति संगीत –** भक्तिसंगीताचा संबंध त्या त्या देशातील धर्म-संस्कृतीशी जोडला गेला आहे. महाराष्ट्रात संतांचे अभंग सहज-सोप्या चालींतून तळागाळापर्यंत पोचले ते याच संगीताद्वारा. मध्ययुगात अष्टछाप कवीनी अनेक पदे रचून उत्तर भारतात समृद्ध संगीताची परंपरा निर्माण केली. त्यातूनच पुढे ध्रुपद,

धमार असे संगीत प्रकार उदयाला आहे. हेच कार्य नानकजींच्या शब्दकीर्तनातून घडले. सूफींचे भक्ति संगीत 'क़व्वाली' या काव्यप्रकारातून अभिव्यक्त झाले.

**संगीताचा प्रभाव –** संगीतापासून फक्त आनंदानुभूतीच होते असे नव्हे. ध्वनी मानसिक स्थितीचे घोतक असतात. शिवाय ते आमच्या मनोभावनांना पण प्रभावित करतात. संगीत आमच्या आत्म्यामध्ये भक्तिमय अनुभूती निर्माण करते. भक्ति पण एक प्रकारचा आवेग आहे. ती आमच्या आत्म्यास प्रभावित करते.

संगीतामध्ये एक प्रकारची गती असते आणि आमच्या क्रिया पण गत्यात्मक असतात. दोहोंमध्ये सादृश असल्याकारणानेच ध्वनिमय राग-रागिणी आमच्या आत्म्यास प्रभावित करतात. नैसर्गिक गती आम्हास आनंदित करते. बालके (शिशु) जन्मापासूनच याच्यामुळे प्रभावित होतात. राग आणि लयामध्ये प्रभावित करण्याची शक्ती त्यांच्या नियमितते मुळेच निर्माण होते. कारण असंतुलनामध्ये संतुलन, अव्यवस्थेमध्ये व्यवस्था आणि असांमजस्यामध्ये सामंजस्य निर्माण करण्यापेक्षा नियमितता किंवा संयमामुळे आपण अधिक प्रभावित होतो. स्वर आणि लयाच्या संयम आणि सामंजस्यच आम्हासा प्रभावित करतात.

**ध्वनी श्रवणाचे महत्त्व –** शब्दांशिवाय संगीत म्हणजे मनाला मागे सोडणे. मनाला मागे सोडणे म्हणजे साधना. साधनेने तुम्ही तुमच्या स्त्रोतापाशी पोचता, आणि ध्वनि हाच सर्व गोष्टींचा स्त्रोत आहे.

शिकण्यासाठी मौन बाळगणे सर्वाधिक महत्त्वाचे आहे. जो अंतर्मनातून मौन बाळगतो, तोच शिकू शकतो. कारण तो ऐकत असतो. श्रवण ही शिकण्याची महत्त्वाची पायरी आहे. ऐकणे आणि श्रवण करणे या दोन्ही वेगवेगळ्या गोष्टी आहेत. ऐकणे आणि श्रवण यामध्ये म्हणूनच थोडा फरक आहे. श्रवणाशी लक्ष आणि अवधान निगडित असते, तर ऐकण्यामध्ये यांचा अभाव असतो. श्रवणामध्ये ध्यानाकडे अग्रेसरता असते. म्हणून ते परिणामकारकही असते.

शिष्टाचाराचा भाग म्हणून एखादी व्यक्ती ऐकण्याचा देखावाही करू शकते. त्यामुळे तिला श्रोता म्हटले जाते. श्रवण ही त्यापुढील पायरी असल्यामुळे आध्यात्मिक मार्गवरही श्रवणाला महत्त्व आहे. जैनांनी योग्य ऐकणाऱ्याला श्रोता असे संबोधता श्रावक असे म्हटले आहे. केवळ ऐकून शिकतो, त्याला श्रावक असे म्हणतात. अशा व्यक्तीचे हृदय शांत आणि खुले हवे. अशा शांत हृदयात शब्दांच्या माध्यमातून ज्ञान प्रवेश करते. जणू एखाघा माध्यमातून ज्ञान प्रवेश करते. जणू एखाघा खुल्या खिडकीतून ताजी हवा आत येते. संपूर्णपणे मौन बाळगल्यावर जीवनाची रहस्ये उलगडतात.

प्रत्येकाच्या मनात रहस्ये दडलेली असतात. त्यामुळे त्याच्या मनावर ओझे असते. जगात ऐकण्याची कला शिकवली जात नाही. खोलवर ऐकणारा मिळाल्यास सांगणाऱ्याच्या सुप्त मनातील गोष्टी बाहेर पडतात. त्यामुळे मन स्वच्छ होते आणि ताप उतरल्यानंतर जसा अनुभव येतो, तसे वाटते. श्रवण करण्याची कला आत्मसात करायची असल्यास सर्वप्रथम शांत राहिले पाहिजे आणि नंतर स्वतःच श्रवण करण्याची सवय लावून घेतली पाहिजे.

**संगीताची महती –** प्रख्यात संगीतज्ञांनी संगीताविषयी व्यक्ते केलेली मते ही संगीताची महती विशद करण्यास पुरेशी आहेत. म्हणून ''संगीतापासून मिळणारा आनंद उच्च कोटीचा आहे. तो तृप्ती – आनंद आहे. रागसंगीतातून हा आनंद मिळवित येतो.'' – कुमार गंधर्व

''भाव हा स्वरांमध्ये असतो. सुख-दुःख, आनंद, खेद हे त्या त्या सुरांना अंगभूतच असतात. निसर्गातील निखळ, उत्तम उत्तम स्वर आपल्या पूर्वजांनी एकत्र केले.'' - किशोरी अमोणकर

''संगीत हा भावना व्यक्त करण्याचा एक सोपा मार्ग आहे.'' - लिओ टॉलस्टॉय

''खर तर संगीत हे एक असे गोड औषध आहे, की जे एरवी अगदी सहज किंवा आजारी पडल्यावरही घेता येतं. या औषधाची चव दिर्घ काळ आनंद देणारी असते.'' - ए.आर रहमान

''संगीत दोन आत्म्यांमधील अनंत अवकाश भरून काढते.'' - रवींद्रनाथ टागोर

''हे मला अंत:प्रेरणेने समजलं ..... आणि संगीत हाच माझ्या अंत:प्रेरणाचे स्रोत आहे. माझ्या शोधांना संगीतविषयक दृष्टी कारण आहे.'' - अल्बर्ट आइन्स्टाईन.

## (ख)

### १) 'समाअ' (संकीर्तन श्रवण, सूफ़ी संगीत श्रवण) - काही सैद्धांतिक बाबी

सूफ़ी साधनेत भावावस्थेस असाधारण महत्त्व आहे. ही अवस्था केवळ ज़िक्र (नामस्मरण), मुराक़बा (मनन, चिंतन) इत्यादीनेच उत्पन्न होते असे नव्हे, तर ही नृत्य, संगीत इत्यादीने पण उत्पन्न होते. नृत्य, गायन, वादनाचे सम्मिलित नाव 'समाअ' (गातउन्माद किंवा संगीत-सभा) या नावाने ओळखले जाते. 'समाअ'चा वास्तविक शाब्दिक अर्थ आहे 'ऐकणे'. तसे पाहता 'समाअ' मधील 'ऐकणे' आणि सर्वसाधारण बोलीभाषेमधील 'ऐकणे' यामध्ये थोडा फरक आहे. 'समाअ' सभेतील ऐकणे याचा अर्थ आहे, ऐकणारा हा जे काही ऐकत आहे त्यामध्ये तल्लीन होऊन जाणे, असा आहे. परंतु सूफ़ी एका विशिष्ट अर्थाने 'समअ' या शब्दाचा प्रयोग करतात. सूफ़ींच्या मते याचा अर्थ संगीत, गायनाचे सस्वर स्वरातील पाठ असा आहे. यात एकटा गायक किंवा श्रोत्यांसह सर्व मिळून यांच्या सामूहिक प्रभावाद्वारे भावावस्थेची उत्पत्ती होते. हा अर्थ कालांतराने हळूहळू विकसित झाला. भक्तिसाहित्यातील 'भक्ति संगीत श्रवण' सारखाच हा प्रकार आहे. 'समाअ' हा शब्द पवित्र कुराणात आढळत नाही, परंतु प्राचीन अरबी भाषेत संगीत आणि गायन या अर्थी हा शब्द प्रचलित होता. गायन-वादन-नृत्य या तीन्ही कलांचा संगम म्हणजेच 'समाअ' अर्थात संगीत होय.

सूफ़ींची अशी धारणा आहे की परमेश्वराने जगामधील सर्व पशुपक्षांना आपापल्या बोलीत त्याची स्तुती, स्तवन करण्याची शक्ती दिली आहे. अशा प्रकारे सृष्टीमध्ये जेवढे ध्वनी आहेत, ते सर्व स्तुतिगायनाचे रूप धारण करतात. म्हणून परमेश्वराने ज्याचा अंतरात्मा जागृत केला आहे आणि ज्याला आध्यात्मिक (दिव्य) दृष्टी दिली आहे तो सर्वत्र परमेश्वराचाच ध्वनी ऐकतो. म्हणून बांगी (मुअज़्ज़िन) ची लयबद्ध अज़ान (प्रार्थनेसाठी केलेले आवाहन) ऐकून, सुरीले सुमधुर संगीत ऐकून किंवा पक्ष्यांचे सुरीले गाणे ऐकून भावप्रवण सूफ़ी हा भावावस्थेत जातो.

'समाअ' चे प्रचलन सूफ़ींमध्ये सुरूवातीपासूनच होते आणि ते उत्तरोत्तर वाढत गेले. कर्मठपंथी इस्लाममध्ये संगीत निषिद्ध आहे. म्हणून कर्मठपंथी मुसलमान याची निंदा करतात. ते संगीताला निंद्य समजतात. त्यांच्या मतानुसार संगीत धर्मसम्मत नाही. परंतु इतर लोक संगीतास केवळ उचित मानत नाहीत तर त्याला त्यांनी साधनेचा एक घटक मानले आहे. सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य हुजवीरी यांनी आपले ग्रंथ 'कश्फुल

महजूब'मध्ये या दोन्ही मतांचा उल्लेख केला आहे आणि या बाबतीत त्यांनी मध्यममार्ग पसंत केला आहे. त्यांच्या मते स्वत: 'समअ' मध्ये काही दोष नाही, परंतु त्याचा उपयोग आपण कशातऱ्हेने करतो यावर सर्व काही अवलंबून आहे. जर 'समाअ'मुळे भावावस्था प्राप्त होत असेल तर फार उत्तम आणि खरोखर हेच अपेक्षित आहे आणि जर ते फक्त मनोरंजनासाठी असेल तर त्याचा त्याग करावा. पुढे हळूहळू 'समअ' मध्ये वाद्यांची पण भर पडत गेली.

भारतात सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख़्वाजा मुईनुद्दीन चिश्ती संजरी अजमेरी समर्थित चिश्ती संप्रदायामध्ये संगीताला खूप प्राधान्य देण्यात आले. साधक हा संगीत ऐकत ऐकत भावावस्थेत पोहोचतो. ख़्वाजा मुईनुद्दीन यांचे असे मत आहे की संगीत आत्म्याचे भोजन आहे, खाद्य आहे म्हणून संगीत आणि गाणे ऐकण्यास त्यांनी निषिद्ध न ठरवता, उलट ते आवश्यक मानले आहे. गाण्यामुळे चित्त संपूर्णपणे शुद्ध होते आणि आत्मा प्रसन्न होतो.

सस्वर नामस्मरणा (जली ज़िक्र)चे परिवर्धित रूप म्हणजे संगीत. इस्लाममध्ये संगीत निषिद्ध असताना पण सूफ़ींनी संगीतास अंतर्दृष्टी उघडण्याचे साधन मानले आहे. सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य इमाम ग़ज़ाली यांच्या मतानुसार संगीत ऐकण्याची परिणती ही ह्रदयाच्या पवित्रेत होते आणि चित्तशुद्धीमुळे दिव्य प्रकाश प्राप्त होतो, कारण की संगीताच्या प्रभावामुळे ह्रदय हे सचेष्ट होऊन जाते आणि ध्यान निर्मितीसाठी, चिंतनासाठी बळ प्राप्त होते. सूफ़ींचे असे ठाम मत आहे की संगीत ('समअ') परमेश्वराच्या गुणगानासाठी –स्तवनासाठी एक अद्वितीय साधन आहे. सांसारिक सौंदर्य हे पारमार्थिक सौंदर्यासाठी सेतुप्रमाणे आहे (असते). लावण्यमयी निसर्गाचे प्रत्येक दृश्य हे आपल्या अपूर्व वैभवामध्ये त्याच अपार सौंदर्याचे दिग्दर्शन करते. म्हणून सौंदर्याप्रति आकर्षण व त्याची स्तुती ही आवश्यक ठरते आणि ती प्रशंसा कीर्तनामुळे निर्माण होणारी भावुकता यासाठी उद्‌बोधक ठरते. याच कारणास्तव सूफ़ीला आपल्यासोबत निसर्ग–राणी पण आपल्या सौंदर्य–स्त्रोताचे गुणगान करीत असल्यासारखे वाटते.

सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य शेख़ अबू नसर सर्राज, अबुल क़ासिम अल कुशेरी आणि अबुल हसन अली अल हुजवीरी यांनी नवदीक्षित शिष्यासाठी 'समाअ' हितकर नसल्याचे प्रतिपादन केले आहे. कारण 'समाअ' मुळे ते दुराचरणी बनण्याचा धोका असतो, परंतु याउलट अग्रगामी शिष्याकरिता शुभ संगीत हा त्याच्या आत्मजागृतीसाठी प्रेरक ठरतो. जेव्हा क़व्वाल किंवा अन्य गायक श्रोतृमंडळीमध्ये विविध वाद्यांसह प्रभुगान – ईशस्तवन करतात तेव्हा एक प्रकारचा उत्साह निर्माण होतो. पुष्कळजण 'हाल' (ईश्वरी तंद्रा किंवा तन्मयते)च्या अवस्थेत गुंग होऊन जातात आणि त्यांना देववाणी ('इलहाम') प्राप्त होऊ लागते. याच अवस्थेमध्ये 'वज्द' (सहजानंद)ची प्राप्ती होते. ही सूफ़ी संत जुनेदच्या मतानुसार ईश्वरप्रणीत प्रकाशाची एक अवस्था आहे. संगीतामुळे उत्पन्न सहजानंदाच्या बाबतीत ज़ुन्नून मिस्री यांनी म्हटले होते की हा परमेश्वराला शोधण्यासाठी ह्रदयास प्रेरित करणारा एक दैवी दूत आहे आणि जो याला आध्यात्मिक स्वरूपात ऐकतो, तो परमेश्राला प्राप्त करतो. सर्राजने पण हेच सांगितलेले आहे की संगीत ऐकल्यानंतर जो अनुभव प्राप्त होतो, 'वज्द' अर्थात् सहजानंद त्याचेच प्रकटन आहे आणि सौंदर्याकडे संगीत मला खेचून नेते आणि मला आडोशात प्रभुनामस्मरण करण्यास योग्य बनविते.

संगीताच्या वैधतेसंदर्भात प्रसिद्ध सूफ़ी संत शिबली यांचे असे मत आहे की '' 'समाअ' (संगीतश्रवण)चा बहिरंग हा उपद्रव असतो तर त्याचे अंतरंग सदुपदेश असते. ज्याने संकेताचे आकलन केले, त्याने सदुपदेशाकरिता जे काही ऐकले असेल ते वैध आहे. परंतु ज्याने त्यापासून काहीच मिळविले नाही त्याने जणू काही उपद्रवास आमंत्रण देऊन आपल्यावर विनाकारण संकट ओढवून घेतले.'' संगीतश्रवणास म्हणजेच 'समाअ'स चित्ताच्या एकाग्रतेचे साधन ग्राह्य धरून हुजवीरी यांनी मोठ्या मजेशीर रीतीने एका कवीचे विचार उधृत करताना असे लिहिले आहे की प्रत्येक पदार्थ किंवा गोष्टीचा आपापला काही हिस्सा असतो. उदाहरणार्थ – मना (दिल)चा हिस्सा प्रेम, अंत:करणा (बातीन)चा हिस्सा दर्शन (मुशाहदा), आत्म्या (रूह)चा हिस्सा मीलन (वस्ल) आणि शरीराचा (जिस्म) हिस्सा सेवा (खिदमत). त्या कवीने ही बाब किती उत्तम तऱ्हेने मांडली आहे, हे पाहण्यासारखे आहे. ''दोस्ता (मित्रा) ! मला मदिरा पाज आणि म्हण की ही मदिरा आहे. सर्वांदेखत पाजणे अशक्य नसताना तू पुन्हा लपून–छपून तरी कशाला पाजतोस !'' सदरहू कथनाचे हुजवीरीप्रणीत भाष्य असे आहे – ''मधुबाले ! मला मधुपात्र दे म्हणजे माझे डोळे त्याला पाहतील, माझे हात त्याला धरतील (स्पर्श करतील) माझी जीभ त्याची चव घेईल आणि माझे नाक त्याला हुंगील (त्याचे वास घेईल), परंतु माझी बाकी असलेली एक संवेदना (श्रवणशक्ती) दुर्भागी राहून जाईल. तर मग तिला पण तरी दुर्भागी कशाला राहू देतेस ! मग निदान म्हण तरी की ही मदिरा आहे, म्हणजे हे ऐकून कान पण दुर्भागी नसतील आणि त्यांना पण आपला हिस्सा मिळून जाईल. अर्थात् ते ऐकतील आणि अशाप्रकारे माझ्या सर्वच्या सर्व संवेदना त्यातच रममाण होऊन आनंद उपभोगतील.'' (डॉ. मुहम्मद आज़म – 'सूफ़ी तत्त्वज्ञान – स्वरूप आणि चिंतन' पृ. १४४–१४७)

हुजवीरी यांच्या मते 'समाअ' अर्थात् सुमधुर कीर्तन श्रवण करण्याचे सर्वोत्तम रूप कुराणी महाश्लोक पाठ हे आहे. परंतु त्यांनी सुमधुर गीत श्रवणास अनुचित ठरविले नाही. ते स्वत: 'समाअ' ऐकत. आपल्या या कृतीच्या समर्थनार्थ त्यांनी प्रेषित मुहम्मद स. आणि त्यांच्या सहचरांचे दाखले दिले आहेत. त्यांनी 'समाअ' च्या काही अटी निर्धारित केल्या आहेत. उदाहरणार्थ, शिष्टतेच्या अटीनुसार जोपर्यंत आवश्यकता नसेल तोपर्यंत 'समाअ'चे आयोजन करू नये व ते ऐकू नये आणि त्याची सवय लावून घेऊ नये आणि दीर्घ कालांतराने त्याचे आयोजन करावे, म्हणजे तिच्या महत्त्वतेत खोट पडू नये. म्हणजे 'अति परिचयात अवज्ञा' सारखी अवस्था होऊ नये. आयोजन केल्यानंतर आयोजकाची उपस्थिती अनिवार्य आहे. 'समाअ'च्या महफ़िलीमध्ये श्रोता म्हणून सर्वसाधारण लोकांचा मज्जाव असावा. 'क़व्वाल' (गायक) प्रतिष्ठित असावा. त्याचे मन संसारात गुंतलेले नसावे. खेळ मनोरंजनाशी घृणा करणारा असावा. जर क़व्वाल मधुर आवाजात गात असेल तर त्याला प्रोत्साहानात्मक शाब्बासी देऊ नका. जर साधारणपणे गात असेल तर त्याची टीका करू नका. मनाला दु:खी करणारे काव्य–कडवक गात असेल तर त्याला म्हणू नका की उत्तम काव्य–चरण गाऊन दाखव. मनात त्याच्याबद्दल राग बाळगू नका.

ख़्वाजा निज़ामुद्दीन औलियापण 'समाअ'च्या विरोधात नव्हते. त्यांनी काही अटींसह 'समअ'स मान्यता दिली आहे. जसे –

**१) गवई (गायक)** – गवई म्हणजेच 'क़व्वाल' परंतु कव्वाल हा प्रौढ पुरूष असावा, स्त्री किंवा सुंदर नवयुवक असू नये.

**२) गीत** – याचे अर्थ वाणी किंवा काव्य-गीत आहे. काव्य विशुद्ध किंवा पवित्र असावे.

**३) श्रोता** – याचा अर्थ आहे ऐकणारी मंडळी. श्रोत्याचे कर्तव्य आहे की त्याने ईश्वरासाठी ऐकावे आणि त्याचे अंतःकरण प्रभुनामस्मरणात व्यस्त असावे.

**४) संगीत वाद्ये** – चंग, रबाब वगैरे संगीत वाद्ये असू नयेत. जेव्हा वरील अटींची परिपूर्तता होत असेल तर 'समाअ' वैध होईल.

(डॉ. मुहम्मद आज़म –'सूफ़ी तत्त्वज्ञान – स्वरूप आणि चिंतन' पृ. ३०–३१)

**२) 'समाअ' – इस्लामी (धार्मिक) दृष्टिकोन**

**क) 'ग़िना' (संगीताचे राग) आणि 'समाअ' (संगीत-श्रवण) – अर्थ, आशय**

'ग़िना' आणि 'समाअ' यांची व्याख्या करणे अत्यावश्यक आहे. 'ग़िना' हे मंजुळ स्वरामध्ये गायलेले गीत असते, तर 'समाअ' हे काव्याचे सुश्राव्य वाचन (पाठ) असते. 'ग़िना' दोन प्रकारचे असते. एक तर संगीत वाद्यांच्या साहाय्याने गायले जाते, तर दुसरे या वाद्यांशिवाय गायले जाते.

गाण्यांचा प्रभाव मनावर होतो हे स्वाभाविक आहे, आणि यामुळेच ईश्वर प्रेमाखातर 'समाअ' ऐकणारे प्रभावित होतात आणि 'वज्द' (परमानंद)च्या सर्वोच्च अवस्थेत पोहोचतात, आणि जे आपल्या वासना पूर्तीसाठी 'समाअ' ऐकतात ते मार्गभ्रष्ट होतात, सन्मार्गापासून चळतात. म्हणून तत्त्ववेत्ते, विद्वान, धर्माचार्य आणि सूफ़ी संत-महात्मे यांची 'समाअ' विषयी विविध मते आहेत.

धर्माचार्यांचे असे मत आहे की 'समाअ'चे आयोजन मनोरंजनासाठी होत असल्यामुळे त्यांनी 'समाअ' ऐकण्यास कधीच परवानगी दिली नाही. तथापि प्रभु नामस्मरणामध्ये नित्य मग्न असणारे सूफ़ी संत-महात्मे म्हणत –'' 'समाअ' हे केवळ उचित नव्हे तर ती परमेश्वराकडून प्राप्त होणारी एक महान उदार देणगी आहे.''

आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की इस्लाम हा निसर्गाचा – स्वाभाविक धर्म आहे. मग अशा परिस्थितीत स्वाभाविक-नैसर्गिक गोष्टींना इस्लाम कसे बरे निषिद्ध ठरवेल? अल्लाहने आपल्या स्वभाव गुणधर्मानुसार मानवी स्वभावाची जडण-घडण केली आहे. निसर्ग हा कोणत्याच सजीव प्राण्यास त्यास अनुपयोगी शक्ती प्रदान करीत नाही. जर एखाद्यास 'समाअ' आवडत नसेल तर ते त्याच्या वैयक्तिक स्वभावामुळे होय आणि हा त्याचा विशेषाधिकार आहे. 'समाअ' वर अश्रद्धेचा ('कुफ्र') एखादा धर्मादेशा ('फ़त्वा')चा वट हुकूम लागू करणे, म्हणूनच अयोग्य आहे. यामुळे मुस्लिम भ्रातृत्वांमध्ये बेकी निर्माण होते. प्रत्येक गोष्टीस दोन पैलू असतात, आणि म्हणून प्रत्येकाने त्याकडे वस्तुनिष्ठतया पाहिले पाहिजे.

काही लोकांना गोड पदार्थ आवडतात, तर काहींना खारट. म्हणून त्यांनी आपसात एक दुसऱ्यास नावे ठेवू नयेत. हे लक्षात ठेवले पाहिजे की एखादा मनुष्य हा आपला स्वभाव, सवय आणि गोडीनुसार – आवडीनुसार खात असतो. हल्ली 'समाअ'च्या विरोधात बरेचसे लोक आढळून येतात आणि ते 'समाअ' निषिद्ध असल्याचे सिद्ध करण्याचा आटोकाट प्रयत्न करतात. त्यांचा मुख्य हेतू 'समाअ'स विरोध करण्याचा असतो. असले लोक हे काही हदीस (प्रेषित-वचन) आणि कौराणिक श्लोकांचे अध्ययन करून त्याआधारे यासंबंधी अयोग्य

धर्माज्ञा देत बसतात. अशा लोकांच्या बाबतीत प्रसिद्ध सूफ़ी आचार्य इमाम रब्बानी अल्फ सानी यांनी म्हटले आहे की काही अर्धवट लोक काही हदीस शिकतात आणि असा विचार करतात की शरीअत अर्थात कर्मकांड फक्त याच माहिती – ज्ञानावर आधारित आहे. अशा अर्धवट कूपमंडुकवृत्ती लोकांसाठी, खालील काव्य-चरण अत्यंत समर्पक आहे –

*''चूँ आ किर्मी दर संग-ए-निहाँ अस्त*
*ज़मीन व आसमाँ अू रा हमा अस्त''*

म्हणजेच दगडाखाली असलेल्या त्या किड्यास असे वाटते की हे दगडच फक्त विश्व आहे.

**ख) 'समाअ'चे वास्तव**

आता 'समाअ'च्या काही अज्ञात पैलूंवर प्रकाश टाकण्यात येत आहे. हे सर्वज्ञात आहे की इस्लाम हा धर्म मानवी स्वभावावर आधारभूत आहे. तद्वत, मानवाच्या सर्व शारीरिक अवयवांच्या वेगवेगळ्या इच्छा-आकांक्षा असतात. उदाहरणार्थ, नाकास सुगंध आवडतो, जिव्हेस खमंग पदार्थ आवडतात, नेत्र सुंदर वस्तूंना पाहून तृप्त होतात आणि मंजुळ संगीत कानास गोड लागते म्हणून जर डोळ्यांना सुंदर वस्तू पाहण्याची परवानगी आहे आणि नाकास सुगंध हुंगण्यास मुभा आहे, तर मग कानास मंजुळ ध्वनी व सुमधुर संगीत ऐकण्यास का बरे मज्जाव असावा?

अहमद अबू दाऊद (प्रणीत हदीस)मध्ये असे कथन आहे की प्रेषित मुहम्मद स. यांनी सल्ला दिला, उपदेश केला की पवित्र कुरआनचे स्वरमाधुर्यासह वाचन करावे. तसेच अबू हुरैरा यांनी 'इब्ने माजा'मध्ये असे निवेदन केले आहे की जेव्हा नबी (संदेष्टा) यांनी कुरआनाचे पठण मंजुळपणे केले तेव्हा अल्लाहने ते (लक्षपूर्वक) ऐकले.

'सही: मुस्लिम' मध्ये अनस यांच्या माध्यमाने असे सांगितले गेले आहे की एकदा प्रेषित मुहम्मद स. हे आपल्या पत्नींसोबत प्रवास करीत होते. सोबत त्यांचा सेवक अंजशा हा पण एका उंटावर स्वार होऊन मंजुळ स्वरमाधुर्यामध्ये गात चालला होता. ते मंजुळ स्वर ऐकून उंट अत्यंत आनंदित होऊन भरभर चालू लागला. त्याने आपले वेग वाढविले. यामुळे त्यांच्या पत्नी काहीशा अस्वस्थ झाल्या. हे हेरून (पाहून) त्यांनी सेवक अंजशा यास माल लादलेल्या ओझ्यामुळे उंट जसा हळू चालतो तशा वेगाने आपल्या उंटास हाकण्याचा आदेश दिला. यावरून असे अनुमान काढता येणे शक्य आहे की जर मंजुळ स्वरामुळे – संगीतामुळे एखादा पशु उन्मत्त होऊ शकतो तर मानवी आत्म्याची पण तीच गत होऊ शकणार. कारण आत्म्याचा 'समाअ' शी अत्यंत प्रबळ असे नाते आहे.

असे म्हणतात की सुमधुर संगीत हे आत्म्याचे खाद्य (भोजन) असते. उर्दूचे सुप्रसिद्ध कवी जिगर मुरादाबादी यांनी म्हटले आहे-

*''नग़्मा वही है नग़्मा कि जिसको*
*रूह सुने और रूह सुनाए''*

म्हणजे खरे गाणे तेच की जे आत्मा ऐकतो आणि ऐकवितो.

आत्मा हा संगीत आणि सूर-तालांपासून एक वेगळी वस्तू नव्हे, हे कुणीही नाकारू शकणार नाही. प्रत्येक श्रोतृ-शक्ती असलेल्या सजीव प्राण्यास संगीत आणि सूर प्रभावित करतात. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे रडणाऱ्या बाळास शांत करण्यासाठी माता एखादे मधुर गाणे गाते आणि अंगाई करून ती त्यास निजविते. अल्लाह सजीव प्राण्यांना कोणतीच निरूपयोगी शक्ती कधीच बहाल करीत नाही. विषारी सापसुद्धा संगीताच्या शक्तीपुढे मात खातो. सापास पावा वाजवून वश केले जाऊ शकते. एखादा माणूस सुमधुर संगीत ऐकून जसा परमोच्च पदाच्या तंद्रेमध्ये पोहोचू शकतो तशाच प्रकारची सापाची ही अवस्था असते.

अरबस्तानच्या वाळवंटामधील बुद्दू टोळीचे लोक रात्रीच्या वेळेस आपल्या उंटांना भरभर चालण्यासाठी एक खास सुरांमध्ये गातात. त्यांचे सूर अंधाराचे भय उंटांपासून घालवितात. परिणामी उंटांना वाळवंटामध्ये सहजपणे दुडदुड चालणे शक्य होते. गवळी व मेंढपाळ आपल्या गाई-म्हशी आणि सांडण्यांचे दुधाची धार काढताना विशेष सुरांमध्ये गातात. यामुळे नेहमी जनावर शांत होते आणि दुधाची धार काढणे सोईस्कर होते. म्हणून त्यांच्या आंचळीमधून दुधाच्या धारा सहजपणे निघतात.

कबूतरासारख्या पक्ष्यांची शिकार करताना, पक्ष्यांचे लक्ष वेधण्यासाठी शिकारी मंजुळ स्वरांमध्ये गातात. परिणामी मंत्रमुग्ध होऊन पक्षी सहजपणे शिकाऱ्याच्या हाती लागतात. संगीताचा मानवावर फार खोल परिणाम होतो, इतका की त्याची हृदयक्रिया वाढते. हे ज्ञात आहे की यामुळे परमोच्च अवस्था गाठली जाते. 'समाअ' मन:पूर्वक ऐकल्यानंतर माणूस सहजानंदमध्ये पोहोचतो. अशा अवस्थेमध्ये काही लोकांचा मृत्यू घडतो. सुप्रसिद्ध सूफी संत कुत्बुद्दीन काकी यांचा मृत्यू 'समाअ' मध्ये क़व्वालचे पुढील काव्य-चरण ऐकून झाला -

*''कुश्तगान खंजर-ए-तसलीम रा*
*हर ज़माँ अज़ ग़ैब जाँ दीगर अस्त.''*

अर्थात् सुपूर्द करण्याच्या खंजिरीने अनेकजण मरतात, परंतु प्रत्येक युगामध्ये परोक्षापासून कूच करणारा मात्र विरळाच असतो.

उपरोक्त कल्पनेस पूरक असे एका कवीचे एक सुंदर काव्य-चरण आहे -

*''ख़ुश्क तार व ख़ुश्क चोब व ख़ुश्क पोस्त*
*अज़ कुजा मी आयद ईं आवाज़-ए-दोस्त''*

म्हणजेच अल्लाहने निसर्गामध्ये साठवलेले सुमधुर मंजुळ ध्वनी आपण रबाब (या संगीत वाद्यामध्ये) मध्ये ऐकू शकतो.

जर अचेतन वस्तू असे सुमधुर कर्णप्रिय ध्वनी काढू शकतात, तर ईश्वर निर्मित सुंदर आवाज ऐकण्यास अनुज्ञेय आहे. असे असताना संगीताला एवढा विरोध का, हे कळत नाही. प्रत्येकाच्या सद्‌भिरूचिवर हे अवलंबून आहे. म्हणून 'समाअ'ची आवड नसलेल्या एखाद्या व्यक्तीस 'समाअ'चा अभिप्राय व त्याचे महत्त्व कळणे अवघड जाते.

*''शुतुर रा च: शोर व तुर्ब दर सरमस्त*
*अगर आदमी न बाशद ख़र अस्त ।।''*

अर्थात् एखादा उंटसुद्धा मंजुळ स्वर ऐकून प्रभावित होतो. पशूपेक्षा अधिक बुद्धिमान असलेला माणूस जर मंजुळ, मधुर सुरांनी प्रभावित होत नसेल तर तो एक गाढव आहे.

जादा काम करून घेण्यासाठी शेतकरी आपल्या जनावरांना मधुर गाणे ऐकवून प्रभावित करतात. इराक़मधील खुरासान प्रांतामध्ये हरिणाची शिकार करण्यासाठी एक अद्वितीय पद्धती अवलंबिली जाते. ते पत्र्यांचे किनारे हळुवारपणे एकमेकास घासतात. त्यामुळे एक विशिष्ट ध्वनी निर्माण होतो. हा ध्वनी हरिणांना शांत व स्तब्ध करण्यास प्रभावी ठरतो. परिणामी हरिण एकाच ठिकाणी थांबतात. कारण पत्र्यांच्या आवाजामुळे हरिणांच्या चंचल स्वभावावर परिणाम होतो. मग शिकारी सहजपणे त्यांना धरतात व आपल्या ताब्यात घेतात. भारतामध्ये जंगलामध्ये शिकारी मंजुळ गीत गातात. या गीतांचा आवाज ऐकून, हरिण सुस्त व बधिर होऊन जातात आणि त्यांना गुंगी घेरते. मग शिकारी सहजपणे त्यांना धरतात.

सूफ़ी तत्त्वज्ञ आचार्य अली बिन उस्मान हुजवीरी हे 'कश्फुल महजूब' या आपल्या ग्रंथात नमूद करतात की जेव्हा प्रेषिद दाऊद यांना संदेष्टत्त्व ('नबूवत') देण्यात आले तेव्हा त्यांना एक मधुर कंठाची देणगी पण देण्यात आली, आणि त्यांचे ओठ एक प्रकारचे संगीत वाद्य बनले. जेव्हा ते गात तेव्हा पशू, पक्षी जंगलामधून तो ध्वनी ऐकण्यासाठी एकत्र जमत, पर्वत थरथरत आणि नदीमधील पाण्याचा प्रवाह थांबत असे 'अन्सार' नावाच्या एका पुस्तकामध्ये असे नमूद आहे की जेव्हा प्रेषित दाऊद गात तेव्हा कित्येक महिने पशू आपले चरणे थांबरत. याशिवाय बालके स्तनपानासाठी सारखे (सतत) रडत नसत. संपूर्ण 'ज़बूर' हा पवित्र ग्रंथ भावपूर्ण गीतांमध्ये अवतरित झाले आहे, आणि प्रत्येक भावगीतासाठी वेगळे सूर-लय संकेतित केले गेले आहेत. जेव्हा प्रेषित दाऊद मंजुळ आवाजामध्ये 'ज़बूर'चे वाचन करीत, तेव्हा त्यांच्या ध्वनी-शक्तीचा प्रभाव इतका प्रबळ असे की झाडांची पाने कोमेजून जात, कठीण दगड मेणासारखे मऊ बनत आणि पर्वत थरथरत. सुदूरवर्ती लोक पण त्यांचा आवाज (ध्वनी) ऐकत.

'कश्फुल महजूब' मध्ये दाता गंज बख़्श म्हणतात की जर 'समाअ' ऐकणारा एखादा माणूस म्हणत असेल की त्याच्यावर 'समाअ'चा काहीच परिणाम होत नाही, तर तो माणूस एक तर खोटारडा असावा, किंवा वेडा असावा अथवा एक पाखंडी असावा. हे लक्षात असावे की सजीव प्राण्यांवर प्रकाशाचा पण एक परिणाम होतो. उदाहरणार्थ, पतंग (कृमि) हा प्रकाशाकडे आकर्षित होतो. ते प्रकाशाच्या सौंदर्यावर इतके मुग्ध होऊन जाते की ते मेणबत्तीच्या ज्वालेकडे कूच करते आणि सरतेशेरटी जळून भस्मसात होते. ज्वालेचे आकर्षण आणि तिच्या प्रेमापोटी ते मरून जाते- प्राणार्पण करते. ही वृत्ती इतर उडणाऱ्या कृमि-कीटकांमध्ये नसते. हे किडे प्रकाशाच्या सौंदर्यावर मोहित होत नसतात.

शेख़ मुहम्मद बिन अहमद मग़रबी (ट्यूनिशिया) लिहितात की जो कोणी गीतांना वर्जित मानतो त्याच्यामध्ये मानव प्राण्यात स्वाभाविकपणे असलेले जीवनाचे खरे सत्त्व नाही म्हणून समजावे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने सर्व मानवप्राण्यांच्या स्वभावातच प्रेमाची प्रेरणा भरून दिली आहे एका हदीसान्वये, प्रत्येक माणसाचा जन्म हा इस्लामच्या स्वभावानुसार झालेला आहे. म्हणून 'इस्लाम' (ईश्वरनिष्ठा) आणि 'ईमान' (श्रद्धा) ईश्वरप्रेमाच्या नामांमध्ये अंतर्भूत (समाविष्ट) आहेत. निसर्गाच्या प्रत्येक पैलूचा एक नमुना असतो. हा नमुना अति सूक्ष्म आणि अति विशाल अशा तत्त्वांमध्ये स्पष्टपणे प्रकट आहे.

*''अणु मूलबिंदूभोवती समकेंद्रित असतात,*
*बाळाचे जीवन माता-पित्याभोवती केंद्रित असते,*
*ग्रह वाटोळा (गोलाकार) फिरतात आणि एका विशिष्ट नमुन्यात परिभ्रमण करतात.''*

हे चक्राकार किंवा गिरकांडी फिरणे हा अल्लाहचा दैवी नमुना आहे. मानवाचे जीवन पण याच नमुन्याचे स्वरूप धारण केले पाहिजे. सर्वश्रेष्ठ परमेश्वराप्रती प्रेमाचे हे प्रमाण आहे. याच प्रेमाखातर सूफ़ी संत 'समाअ' ऐकतात. ते त्यांना हर्षभरित करते आणि आनंदाने नाचण्यास प्रवृत्त करते. जेव्हा एखादा ईश्वर प्रेरित इसम एक गोड आवाज आणि शब्द ऐकतो तेव्हा ''अलस्तु बिरब्बिकुम'' (काय मी तुमचा प्रभू नाही?) या दैवी वचनाची त्याला आठवण होते. मग त्याचा आत्मा पुन्हा टवटवीत बनतो आणि मनामध्ये खोलवर असलेला त्याचा प्रेमाग्नी पुन्हा भडकतो आणि त्यामुळे त्याच्या संपूर्ण शरीरामध्ये एक आवेश आणि गीत निर्माण होते. ईश्वराप्रती प्रेमाग्नी हा प्रत्येकाच्या अंत:करणामध्ये भरलेला असतो. विज्ञान आणि रसायन शास्त्राच्या अभ्यासामुळे आम्हाला हे ज्ञात होते की लोखंड आणि प्रस्तरां (दगडां)मध्ये एक प्रकारचा अग्नी किंवा ऊर्जा सहजच (उपजतच) असते. त्याचप्रमाणे, हा अग्नी किंवा ऊर्जावाद मानवी अंत:करणामध्ये नैसर्गिकपणे असतो. निज़ामुद्दीन औलिया यांनी ''अलस्तु बिरब्बिकुम''चा ध्वनी पूर्वी हिंदी भाषेमध्ये ऐकला तेव्हा ते पूर्वी हिंदी भाषेमध्ये 'समाअ' ऐकणे अधिक पसंत करीत असत. ज्यांच्या हृदयामध्ये अल्लाहप्रती प्रेम आहे फक्त अशाच लोकांसाठी 'समाअ' अनुज्ञेय आहे. प्रेषित मुहम्मद स. पण गाणे ऐकत आणि ते म्हणत –

*''अस्समाउ मुबाह कन क़ल्बहु हय्यन अनि हुनिया मय्यन''*

अर्थात् ऐहिक गोष्टींपासू निर्लिप्त आणि प्रभुप्रेमाने जिवंत असलेले अंत:करण धारण करणारे लोकांसाठी 'समाअ' अनुज्ञेय आहे.

**ग) प्रेषित मुहम्मद स. त्यांचे उप-प्रभारी आणि सहचर यांची 'समाअ'विषयी मते**

जेव्हा प्रेषित मुहम्मद स. यांनी मक्केहून मदीनेकडे स्थलांतर केले तेव्हा त्यांचे गाण्यांनी स्वागत करण्यात आले. बनी नज्जार या कुटुंबाने हर्षभरित होऊन डफ वाजविले. या कृतीस प्रेषितांनी आक्षेप घेतला नाही. 'सही बुख़ारी' मध्ये नमूद आहे की रूबीह बिन्त-ए-मावाज़ बिन अफ्रा विवाहित झाले तेव्हा प्रेषित मुहम्मद स. त्याच्या घरी आले आणि त्याच्याजवळ बसले. त्यावेळी काही मुली डफ वाजवू लागल्या आणि आपल्या पूर्वजांच्या स्तुतीमध्ये गाणे गाऊ लागल्या. अकस्मात एक मुलगी गाऊ लागली – 'आमच्या मध्ये भविष्याची रहस्ये जाणणारा एक नबी उपस्थित आहे.' हे ऐकून, प्रेषितांनी तिच्या या गाण्याविषयी हरकत घेतली आणि तिला आपले पूर्वीचे गाणे म्हणण्याचा – गाण्याचा सल्ला दिला.

'इब्न-ए-माजा'मध्ये इब्न-ए-अब्बास हे कथन करतात की प्रेषितांची धर्मपत्नी आयेशा यांच्या नातलगांपैकी एका मुलीचे अन्सार कुटुंबापैकी एका मुलाशी लग्न झाले. त्यावेळी जेव्हा प्रेषित घरात दाखल झाले तेव्हा त्यांनी विचारणा केली की वधूस पतीच्या घरी खाना केले की नाही. तेव्हा आयेशा यांनी होकारार्थी उत्तर दिले. मग प्रेषितांनी विचारले की वधूसोबत एखादा गवई पाठविले की नाही? आयेशा यांनी नकारार्थी उत्तर दिले. मग प्रेषित मुहम्मद स. म्हणाले, ''अन्सारी लोकांना गाणे प्रिय आहे. त्यांना गाणी आवडतात. तुम्ही वधूसोबत एखादा गायक का पाठविला नाही? तो गाणे म्हणाला असता.

'सही बुख़ारी'मध्ये इब्न-ए-हबान चे कथन आहे की आयेशा यांच्या छत्रछायेखाली असलेल्या एका मुलीचे अन्सारी कुटुंबामध्ये लग्न लावण्यात आले. प्रेषितांनी विचारले, अन्सार लोकांना खुष करण्यासाठी, वधूसोबत एखादा गायक गेला की नाही? असे सांगतात की एकदा प्रेषित मुहम्मद स. एका प्रवासास निघाले. एका कुरेश मुलीने अशी प्रतिज्ञा केली की जेव्हा प्रेषित हे सकुशल परत येतील तेव्हा मी डफ वाजवीन. जेव्हा प्रेषित सकुशल परतले तेव्हा आयेशा यांनी प्रेषितास त्या मुलीच्या शपथेविषयी सांगितले. तेव्हा प्रेषित म्हणाले, 'त्या मुलीस डफ वाजवायास सांग. जर डफ वाजविणे हे एक पापकर्म असते तर मग प्रेषितांनी त्याची परवानगी कशी बरी दिली असते ! यावरून असे दिसून येते की प्रेषितांनी त्या मुलीस आपली शपथ मागे घेण्यास न सांगता, डफ वाजविण्याची परवानगी दिली. म्हणून डफ वाजविणे हा काही गुन्हा नाही, ते निश्चित.

सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य इमाम ग़ज़ाली यांनी एक 'रिसाला' (पुस्तिका) लिहून असे सिद्ध केले आहे की 'समाअ' हे उचित ('ज़ायज़') आहे – 'हदीस शरीफ़' अन्वये ते म्हणतात की प्रेषित मुहम्मद स. सुद्धा डफच्या मदतीने गायले जाणारी गाणी ऐकत असत. आता असा प्रश्न उपस्थित होतो की, जर प्रेषित स्वत: या क्रियेमध्ये सहभागी होत असतील तर 'समाअ' वर्जित, निषिद्ध ('हराम') कसे बरे होऊ शकेल? प्रेषिताचे आचरण हे निश्चितपणे अनुसरणीय असते. इमाम ग़ज़ाली आपले ग्रंथ 'अहिया उल् अुलूम' मध्ये नोंद करतात की जर वासना उत्तेजित करणारे असेल तर 'ग़िना' (गीत, भावगीत) हे अनुज्ञेय नसते. ईश्वराप्रती प्रेम निर्माण करणारे 'ग़िना' ही एक दैवी कृती असते.

हनफ़ी विचारधारेनुसार जर भक्ताच्या अंत:करणामध्ये विनम्रता निर्माण करणारे असेल तर असले संगीत हे निषिद्ध, वर्जित असू शकणार नाही. मागेच निवेदन करण्यात आले आहे की संगीत मानवाच्या मनामध्ये ईश्वरप्रेमाचा अग्नी प्रदीप्त करतो. म्हणून 'समाअ' अंत:करणामध्ये विनम्र भाव निर्माण करण्यामध्ये एका उत्प्रेकाचे काम करते. ते ईश्वराचे भय आणि त्याच्या मीलनाची इच्छा निर्माण करते. जर 'समाअ' ची ही वैशिष्ट्ये असतील तर मानवी जीवनामध्ये तिच्या अनुज्ञेयतेविषयी शंका असण्याचे कारणच नाही.

उपरोक्त उदाहरणांवरून हे स्पष्ट आहे की सत्य शोधकांसाठी 'समाअ' अनुज्ञेय असल्याचे स्विकारावे लागेल. जे लोक 'समाअ' निषिद्ध वा वर्जित असल्याचे मानतात ते प्रेषितांच्या विरोधात गणले जातात आणि या उलट मतामुळे ते अपराधच करीत असतात.

अब्दुल हक़ मुहदिस देहलवी आपले ग्रंथ 'मदारज-ए-नबूवत'मध्ये प्रेषितांच्या ज्या सहचरांनी 'समाअ' ऐकले आहे त्यांची नावे दिली आहेत. ते याप्रमाणे –

हज़रत (श्रीमान) उमर,
हज़रत अली,
हज़रत अमीर मुआविया,
हज़रत अब्दुल्ला बिन जाफ़र,
हज़रत अबू मसूद अन्सारी,
हज़रत सईद इब्न-ए-मुसैद,
हज़रत सईद बिन जाबिर,

हज़रत अब्दुल्ला उमर,
हज़रत अब्दुल्ला बिन ज़ुबैर,
हज़रत उमर बिन आस, आणि
हज़रत हुसैन बिन साबित.

**घ) इस्लामी नेते आणि विद्वानांची मते**

इमाम आज़म अबू हनीफ़ा यांच्या घराशेजारी उमर नावाचा एक इसम रहात होता. तो एक गायक होता. तो दररोज गात असे. इमाम आज़म आपल्या घरात त्याची गाणी ऐकत असत. उमरच्या गाण्याविषयी त्यांचा विरोध नव्हता.

इमाम शाफ़ई पण गाणी ऐकत आणि ते म्हणत असत की मी हे पाहिले आहे की 'समाअ'च्या सरावाच्या विरोधात हिजाजमध्ये कोणतेच विद्वान नव्हते.

इमाम अहमद बिन हंबल पण आपले सुपुत्र सालेह यांच्या घरी गायले जाणारी गाणी ऐकत असत.

इमाम मालिक हे फक्त गाणीच ऐकत नसत तर डफ वाजवीत असत. त्यांना पाण्याच्या सुरांवर गाण्याची आवड होती. ते इतर संगीत वाद्येपण वाजवीत. ते म्हणत की संगीत ऐकण्याची मुभा आहे. संगीत विधिसम्मत आहे.

उपरोक्त चारही इमामांच्या कृतीवरून असा निष्कर्ष काढण्यास मुळीच हरकत नाही की 'समाअ' अनुज्ञेय आहे.

इमाम कुरेशी म्हणतात की 'समाअ' अंत:करणास नम्र बनविते आणि माणूस व्यथेमध्ये भोगविलास करीत नाही. प्रत्युत, तो व्यथा आणि दु:खापासून वरचढ होऊन जातो.

सुप्रसिद्ध सूफ़ी संत ज़ुन्नून मिस्री, जुनैद बग़दादी आणि मंसूर हल्लाज या सर्वांचे असे मत आहे की 'समाअ' प्रियकर आणि प्रेयसीमध्ये उन्माद निर्माण करते.

''हाज़ा जुनूनुल आशिक़ीन'' म्हणजेच ते एखाद्या प्रियकराचे प्रेम असते.

प्रसिद्ध सूफ़ी संत बायज़ीद बिस्तामी, जुनैद बग़दादी, शिबली, मारूफ़ कर्ख़ी, अबू नस्सर, अबू सईद अबिल ख़ैर आणि अब्दुल्ला ख़फ़ीफ़ हे सर्व 'समाअ' ऐकत व उन्मादामध्ये – सहजानंदामध्ये जात असत.

सुप्रसिद्ध सूफ़ी संत व आचार्य ग़ौसुल आज़म अब्दुल क़ादर जीलानी दस्तगीर हे 'समाअ'च्या विरोधात नव्हते. एक रात्री ख़्वाजा मुईनुद्दीन चिश्ती हे अब्दुल क़ादर जीलानी यांच्याकडे पाहुणे म्हणून गेले होते. तेव्हा त्यांनी पाहुण्यासाठी क़व्वालीचे आयोजन केले. कव्वालची कव्वाली ऐकून ख़्वाजा मुईनुद्दीन चिश्ती हे सहजानंदमध्ये डुंबून गेले. त्यांच्या सहजानंद ('वज्द') च्या प्रभावामुळे –शक्तीमुळे जमीन कंप पाऊ नये म्हणून यजमान अब्दुल क़ादर जीलानी हातात काठी घेऊन बाहेर उभे होते.

सुहरवर्दी संप्रदायामध्ये 'समाअ'चे प्रचलन नसतानासुद्धा शेख़ शहाबुद्दीन सुहरवर्दी यांच्याकडे आलेल्या पाहुण्यास जर 'समाअ' ऐकण्याची इच्छा झाली तर त्या पाहुण्यासाठी 'समाअ' चे आयोजन केले जाई आणि ते स्वत: पवित्र कुराण पाठामध्ये व्यस्त होत असत. तसेच शेख़ मख़दूम बहाउद्दीन ज़करिया मुल्तानी सुहरवर्दी

पण 'समाअ' ऐकत नसत, परंतु जेव्हा-केव्हा ख़्वाजा कुत्बुद्दीन बख़्तियार काकी त्यांच्याकडे येत तेव्हा तेव्हा ते त्यांच्यासाठी 'समाअ' चे आयोजन करीत असत. शहाबुद्दीन सुहरवर्दी यांनी आपले विख्यात ग्रंथ 'अवारिफ़-उल-मारिफ़'मध्ये 'समाअ' वर एक सविस्तर प्रकरण लिहिले आहे. त्यात ते नमूद करतात की 'समाअ' मध्ये सहभागी होणाऱ्या लोकांना अत्यंत दयाळू व कृपाळू असलेल्या सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून दया व कृपेचा लाभ होतो.

प्रसिद्ध सूफ़ी ख्वाजा बहाउद्दीन नक्शबंदी 'समाअ' च्या संदर्भात म्हणतात -

*''मन न: अीन कार कुनम न: इन्कार मी कुनम''*

म्हणजेच मी ना 'समाअ' ऐकतो ना तो नापसंत करतो.

**च) चिश्ती सूफ़ी संतांची मते**

चिश्ती संप्रदायाच्या संतांची अशी धारणा आहे की 'समाअ' ची परिणती ही अल्लाहचे मानवजातीवर दया आणि कृपेचे सत्र उघडे ठेवण्यामध्ये होते. हज़रत अली, ख़्वाजा यूसुफ चिश्ती, ख्वाजा मौदूद चिश्ती, ख़्वाजा उस्मान हारूनी, ख़्वाजा-ए-ख़्वाजगान मोइनुद्दीन हसत चिश्ती अजमेरी, ख़्वाजा कुत्बुद्दीन बख़्तियार काकी, बाबा फ़रीदुद्दीत गंज-ए-शकर, ख़्वाजा बंदानवाज़ गेसूदराज़, शेख़ याहया मदनी, ख़्वाजा सुलेमान तौंसवी, ख़्वाजा मेहर अली शाह, शाह अब्दुल कुद्दुस गंगोही, ख़्वाजा हबीब अली शाह हैदराबादी, ख़्वाजा सयदना फ़क़ीर मोहम्मद शाह अहमदनगरी आणि शाह वली अल्लाह अशी चिश्ती सूफ़ी संतांची मालिका आहे. यापैकी काहींची 'समाअ'विषयी मते खाली नोंदविण्यात येत आहेत -

प्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य इमाम ग़ज़ाली यांनी 'कीमिया-ए-सआदत' नामक आपल्या ग्रंथामध्ये लिहिले आहे की जेव्हा प्रेषित मुहम्मद स. यांनी हज़रत अली विषयी ''तू मजपासून असून मी तुझ्यापासून आहे,'' असे उदगार काढले तेव्हा अली हे ऐकून अत्यंत आनंदित झाले. ते हर्षातिरेकामुळे, लगक्संमारंभामध्ये तत्कालीन अरब समाजात प्रचलित असलेल्या प्रथेप्रमाणे ते जमीनीवर आपल्या पायांनी हळू थापटी मारू लागले. हा एक प्रकार नृत्याचाच अप्रत्यक्ष प्रकार होता. यावरून असे वाटते की, जे 'रक्स' म्हणजे नृत्य हे निषिद्ध वा वर्जित आहे, असे म्हणतात ते चूक करत आहेत.

ख़्वाजा हसन बस्री यांना 'समाअ'ची अत्यंत आवड होती. ते म्हणत की 'वज्द' म्हणजे सहजानंद, उन्माद हे एक गूढ आहे. ते म्हणतात की 'वज्द'मुळे चित्त वा अंत:करण हेलावून जाते. ते पुढे असे म्हणतात की जे 'समाअ' ईश्वराखातर ऐकतात ते धर्मनिष्ठा किंवा परमार्थतेच्या उच्च स्तरास जाऊन पोहोचतात, परंतु इतर जे आपल्या वासनापूर्तीची इच्छा ठेवतात ते एक तर जादूगार तरी बनतात किंवा अग्निपूजक बनतात. हज़रत मम्शाद उल-दिनोरी हे आपल्या सद्गुरूच्या पुण्यातिथीस 'समाअ'चा कार्यक्रम आयोजित करीत. 'अवारिफ़-उल-मआरिफ़' या ग्रंथामध्ये नमूद आहे की एकदा ख़्वाजा दिनोरी यांना प्रेषित मुहम्मद[स.] यांचे स्वप्न-दर्शन झाले. तेव्हा त्यांनी प्रेषितांना विचारले, 'हे ईश्वराचे महाप्रेषित ! तुम्ही 'समाअ' ऐकण्यास नकार दिला होता का?'' या प्रश्नाचे उत्तर प्रेषितांनी नकारार्थी दिले आणि म्हणाले, 'माझी अशी इच्छा आहे की लोकांनी 'समाअ'चा आरंभ पवित्र कुरआनच्या श्लोक-पाठाने करावे व शेवट पण कुरआनी श्लोक पाठाने करावे. अबू इसहाक़ चिश्ती हे 'समाअ' कटाक्षाने ऐकत. तत्कालीन विद्वान व लोकांमध्ये धर्मनिष्ठेची भावना निर्माण होई.

या महफ़िलीमध्ये जर एखादा आजारी इसम उपस्थित असेल तर त्याचे आजारपण आश्चर्यकारकरित्या नाहीसे होई (बरे होई). ते सधन लोकांना 'समाअ'च्या महफिलीमध्ये हजर होण्यास मज्जाव करीत. एकदा भयंकर दुष्काळामध्ये राजाने त्यांना पावसासाठी प्रार्थन करण्याची विनंती केली. ही त्यांनी या अटीवर मान्य केली की त्यांच्या या प्रार्थना सभेमध्ये राजाने उपस्थित राहू नये. कारण त्यामुळे ईश्वरी कृपा पृथ्वीतलावर अवतरित होणार नाही. राजास त्यांचा हा मुद्दा पटला व त्याने त्यांची ही अट मान्य केली. यानंतर प्रार्थना सभेसाठी कव्वालांना पाचारण करण्यात आले. 'समाअ' सुरू करण्याअगोदर, त्यांनी लोकांना अशी विनंती केली की सहभागी होणाऱ्या लोकांनी आणि कव्वालांनी तीन दिवस 'तय'चा उपवास व्रत ठेवावे. कव्वालांना असेही निदेश देण्यात आले की त्यांनी आपल्या पापक्षालनासाठी प्रायश्चित्त करावे, आणि मगच 'समाअ'स सुरूवात करावी. जेव्हा 'समाअ' सुरू झाले तेव्हा अबू इसहाक़ चिश्ती हे 'वज्द' म्हणजे सहजानंदच्या अवस्थेमध्ये पोहोचले आणि रडू लागले. त्यावेळेस ईश्वरी कृपा धरतीवर अवतरली आणि पाऊस पडण्यास सुरू झाला.

ख़्वाजा उस्मान हारूनी यांना 'समाअ' प्रिय होता. 'समाअ' मध्ये लोकांच्या लक्षात आले की ते जोराने रडत असत. काही विद्वानांनी याची तक्रार राजाकडे नेली. जेव्हा हे त्यांना कळले, तेव्हा त्यांनी पुढील शब्द उद्‍गारले – '' 'समाअ' हे सर्वश्रेष्ठ ईश्वराच्या गुह्यांपैकी एक आहे. 'समाअ'च्या वेळी मानव आणि ईश्वरदरम्यान असलेला पडदा हटविला (सारला) जातो. कोणतीच शक्ती मला 'समाअ' ऐकण्यापासून परावृत्त करू शकत नाही. मी सर्वश्रेष्ठ परमेश्वराजवळ अशी प्रार्थना केली आहे की माझे शिष्य न्याय दिनापर्यंत 'समाअ' ऐकत राहतील.'' ख़्वाजा मुइनुद्दीन चिश्ती अजमेरी यांनी भारतात 'समाअ'चे प्रचलन सुरू केले. ते नेहमी 'समाअ' ऐकत. ख़्वाजा कुत्बुद्दीन बख़्तियार काकी हे 'समाअ'चे अतिशय उत्साही चाहते होते. 'समाअ'मध्ये ते नेणीव अवस्थेत असत, मात्र नमाजाच्या वेळेस त्यांची जाणीव जागृत होई. ते 'समाअ'मध्ये सलग चार दिवसपर्यंत 'रक़्स' (नृत्य)च्या अवस्थेमध्ये होते आणि नंतर त्यांनी आपली इहलोकाची यात्रा संपविली. बाबा फ़रीदुद्दीन गंज-ए-शकर यांना 'समाअ'च्या विरोधकांनी 'समाअ'विषयी त्यांचे मत विचारले असता त्यांनी उत्तर दिले –

*''यके ख़ाक व ख़ाकस्तर शुदे दीगर हनोज़ दर इख़्तलाफ़ अस्त.''*

म्हणजेच एक गट तर धूळ बनून भस्मसात झाला आहे, परंतु दुसरे अजून साशंक आहेत. उर्दूचे सुप्रसिद्ध तत्त्वज्ञ महाकवी डॉ. मुहम्मद इक़्बाल यांनी हाच आशय सुंदर रीतिने खालील काव्य-चरणामध्ये मांडलेला आहे–

*''रगों में गर्दिश-ए-ख़ूँ है अगर तू किया हासिल*
*हयात-ए-सोज़-ए-जिगर के सिवा कुछ और नहीं ।।''*

अर्थात् फक्त शरीरास जिवंत ठेवण्यासाठी जर रक्ताभिसरण होत असेल तर ते रक्त निरूपयोगी आहे. जिवंत राहण्यासाठी हृदयाचे सत्त्वच– ठोकेच जोराने धडधडले पाहिजे.

सयद ख़्वाजा हबीब अली शाह हैदराबादी म्हणतात की अल्लाहचा प्रियकर हा त्याच्या प्रेमामध्ये जळू इच्छितो, परंतु हे पोथीनिष्ठ पंडित, दिखाऊ विद्वान अनुज्ञप्त ('हलाल') आणि वर्जित ('हराम') यांच्यामधील रस्सीखेचामध्ये गुंतलेले आहेत. त्यांनी पुढील काव्यचरण पण अभिव्यक्त केले आहे –

*"कुफ़्र काफ़िर रा व दीन दीनदार रा*
*ज़र्र: ए-दर्द-ए-दिल अत्तार रा"*

म्हणजे एका श्रद्धाहीनासाठी अश्रद्धा ही पुरेशी आहे, परंतु कवी अत्तारसाठी अंत:करणामधील एक मामुली वेदना त्याच्या श्रद्धेसाठी पुरेशी आहे.

अहमदनगरचे सूफ़ी ख़्वाजा सयदना फ़क़ीर मुहम्मद शाह, अहमदनगरी यांनी निवेदन केले आहे की चिश्तिया संप्रदायामध्ये 'समाअ'मधील ढोलाची एक थाप म्हणजे साधनेमदील एक पडावाची (टप्प्याची) प्रगती साधण्यासारखे आहे. ते आणखीन म्हणतात की मृदंगाचा मधुर ध्वनी हा सूफ़ीच्या आध्यात्मिक स्थानकास वर उचलू शकतो. ते पुढे असेही म्हणतात की एखादा साधक हा 'पास अनफ़ास' नामस्मरणाची म्हणजेच प्राणायामची आध्यात्मिक शक्ती विकसित करू शकतो. ते पुढील काव्य-चरणामधील एक सुंदर दृष्टांताकडे लक्ष वेधतात-

*"मिज़्राब-ए-इश्क़ से रग-ए-जान बोलती है*
*तार-ए-नफ़्स से काम लिया है सितार का"*

म्हणजे सितारीचे तार हे प्रेमाच्या तारेसारखे असतात. सितारीचे तार संगीत निर्माण करतात, तर प्रेमाचे तार अल्लाहचे नाम-स्मरण निर्माण करतात.

नाम-स्मरणामध्ये व्यस्त असलेल्याचा श्वासोच्छ्वास आणि सितारीवरील जोरजोराने वाजविले जाणारे ध्वनी याची तुलना कवीने केली आहे. सितारीमधून निघणारे सुमधुर ध्वनी ऐकून संगीतकार-गायक मंत्रमुग्ध होऊन जातात. तद्वतच नामस्मरणामध्ये निघणारा सूफ़ीचा श्वासोच्छ्वास नामस्मरणाच्या ध्वनीशी मिसळून सूफ़ीच्या भावना या एक उच्च परमानंदच्या अवस्थेत पोहोचतात. सितारीचे तार आणि नामस्मरणामधील श्वासोच्छ्वास हे दोन्ही एकसारखेच असतात. म्हणून उपरोक्त दोन्ही क्रियांमध्ये तालबद्धता आणि गोडवा असतो. जेव्हा एखादा असे लय-ताल आणि गोडव्याची अनुभूती घेतो तेव्हा तो मदमस्त होऊन जातो. ज्याप्रमाणे संगीत संगीतकारास मदमस्त करते त्याचप्रमाणे नामस्मरणातील श्वासोच्छ्वासाची प्रक्रिया आणि नामस्मरणाचा ध्वनी या मार्गे सूफ़ी मदमस्त बनतो. कवीने 'तार-ए-नफ़्स'ची सुंदर तुलना सितारीच्या एका तारेशी केली आहे. कवीने दाखवून दिले आहे की सूफ़ींची सर्व कर्मे ही अल्लाहच्या प्रेमाखातर असतात, त्याच्या सत्तेकरिता असतात. त्याचे हे प्रेम नामस्मरणाच्या माध्यमाने व्यक्त होत असेल किंवा 'समाअ'द्वारे प्रकट होत असेल.

ख़्वाजा सयद फ़क़ीर मुहम्मद शाह यांनी विविध गटांच्या लोकांसाठी 'समाअ' कसे अनुज्ञेय आहे व कसे वर्जित आहे याची रूपरेषा प्रस्तुत केली आहे. उदाहरणार्थ, विवाहित महिलेची स्तुती ही फक्त तिच्या नवऱ्यासच अनुज्ञेय आहे. म्हणून तिचा पती हा तिच्या सौंदर्याची स्तुती करू शकतो. तिचे केस, तिचे डोळे आणि तिचे मुख या सर्वांचे सौंदर्यवर्णन करणे त्याच्यासाठी अनुज्ञेय आहे. तर दुसरीकडे एखाद्या अविवाहित महिलेच्या शारीरिक सौंदर्याचे वर्णन करणे टाळावे. ज्याप्रमाणे एका विवाहित पुरूषास आपल्या पत्नीच्या सौंदर्याची स्तुती करण्यास मुभा आहे, परंतु इतर महिलेच्या सौंदर्याची स्तुती करण्यास त्याला परवानगी नाही, त्याचप्रमाणे अनुज्ञेय असलेल्यांना 'समाअ' ऐकण्याची परवानगी आहे, मात्र इतरांना त्याची मुभा नाही.

**छ) समापन**

'समाअ'चे विरोधक हे त्यास निषिद्ध, वर्जित मानतात. त्यांच्या समर्पक प्रत्युत्तरासाठी मौला ज़ैनोद्दीन यांचा दृष्टांत अत्यंत योग्य असा आहे –

सूफ़ी तत्त्वज्ञ मौलाना रूमी हे 'समाअ'स 'हलाल'म्हणजे अनुज्ञप्त म्हणून कसे परवानगी देऊ शकतील, याविषयी मौलाना ज़ैनोद्दीन यांच्या मनामध्ये शंका निर्माण झाली. दुसऱ्या दिवशी जेव्हा ते मौलाना रूमी यांना भेटले तेव्हा त्यांनी ज़ैनोद्दीन यांना सांगितले की शरीअत (कर्मकांड) मध्ये एक 'मस्ला' (समस्या) आहे की जेव्हा माणूस हा भुकेमुळे मरणासन्न अवस्थेस पोहोचतो तेव्हा भूक शमवून जिवंत राहण्यासाठी त्याच्याकरिता निषिद्ध वस्तू अनुज्ञप्त होतात.

अशाच प्रकारची अवस्था 'औलिया' – संतांच्या बाबतीत निर्माण होते जेव्हा ते (आध्यात्मिक दृष्टीने) भुकेले असतात. त्यांची भूक-तहान भागविण्यासाठी, 'समाअ' हे सूफ़ींसाठी अन्नासारखे असते व ते त्यांच्यासाठी 'हलाल' – अनुज्ञप्त असते. म्हणून 'समाअ' सूफ़ींसाटी आत्म्याचे खाद्य असते. साधक जेव्हा जोरदार प्रयत्न करून थकून जातात तेव्हा 'समाअ' ऐकून ते पुन्हा टवटवीत बनतात आणि मोठ्या उत्साहाने ते प्रयत्नशील बनतात.

खरोखर 'समाअ' सर्वश्रेष्ठ परमेश्वराप्रती एक गहन प्रेम असते. ही उदार देणगी सर्वांना दिली जात नाही. म्हणून सूफ़ी परमेश्वराच्या प्रेमाविषयी अनभिज्ञ लोकांना 'समाअ'मध्ये सामील करून घेत नाहीत. ज्यांना ईश्वराप्रती प्रेमाची देणगी बहाल करण्यात आली आहे. त्यांच्यासाठी प्रभू-प्रेम हे अग्नीवर तेल शिंपडण्यासारखे आहे. एकनिष्ठ साधक नेहमी ईश्वरापाशी अशाच प्रखर प्रेमाची मागणी करतात. आलंकारिक शब्दांमध्ये, हे प्रेम अशा एका पक्षासारखे आहे जे पवित्र लोकांनी दिलेले अन्न-दाणे भराभर गिळते. हा पक्षी आपले घरटे प्रियकराच्या अंत:करणाशिवाय इतरत्र कुठेच बांधत नाही. एक कवी म्हणतो – सूर आणि गाण्यामध्ये फार मोठी शक्ती असते. ते रूक्ष हृदयामध्ये प्रेमाचा ओलावा निर्माण करतात, आजारी माणसास बरे करतात, जादूच्या दुष्परिणामांस नष्ट करतात.''

प्रस्तरां (दगडां)मध्ये सुप्त ऊर्जा असते. त्याचप्रमाणे मनातील गुप्त गोष्टी या 'समाअ'मुळे उघडकीस येतात. 'समाअ'चा ध्वनी कानांमधून हृदयामध्ये प्रवेश करतो. जुन्या काळी, जेव्हा जेव्हा लोकांवर संकट कोसळे (आपत्ती येई) तेव्हा तेव्हा प्रार्थना आणि कृपायाचना यांच्या मदतीने संकट टळून जाई. ते आपल्या चित्ताग्रतेस प्रबळ बनविण्यासाठी संगीत वाद्यांची पण मदत घेत. प्रेषित दाऊद आपल्या चित्ताची एकाग्रता वाढविण्यासाठी अत्यंत मंजुळ स्वरामध्ये आपले धर्मग्रंथ 'ज़बूर'ची गीते गात असत.

इतर अनेक धार्मिक संप्रदाय-पंथ आपल्या प्रार्थनेमध्ये संगीताचा वापर करतात. ख्रिस्ती लोक चर्चमधील आपल्या प्रार्थनेत संगीताचा उपयोग करतात. हिंदू धर्मामध्ये आरती आणि भजनांना साधनेचे घटक-अंग मानले जाते. ते आरती आणि भजनाच्या वेळेस संगीत-वाद्ये वाजवितात. मुस्लिमांना पवित्र कुरआन मधुर आवाजामध्ये वाचण्यास सांगितले जाते.

**ज) 'समाअ'चे प्रकार**

'समाअ'ची चार प्रकारांमध्ये पुढीलप्रमाणे विभागणी केली गेली आहे.

१) हलाल (अनुज्ञप्त)

२) हराम (निषिद्ध, वर्जित)

३) मक्रूह (अनिष्ट, अवांछनीय)

४) मुबाह (विधिसम्मत)

**१) हलाल – अनुज्ञप्त, वैध –** जर विचार संपूर्णपणे सत्य आणि वास्तवाशी निगडित असतील तर 'समाअ' वैध वा अनुज्ञप्त (हलाल) आहे.

**२) हराम – निषिद्ध, वर्जित –** जर विचार ऐहिक गोष्टींशी निगडित असतील तर 'समाअ' निषिद्ध वा वर्जित (हराम) आहे. हल्ली 'समाअ'मध्ये अनेक वाद्ययंत्रे वाजविली जातात. काही लोक ठेक्यावर नाचतात. ही शैतानी कृत्ये असल्यामुळे 'समाअ' वर्जित ठरविण्यात आले आहे.

**३) मक्रूह – अनिष्ट, अवांछनीय –** 'समाअ'मध्ये जर विचार हे वास्तव आणि ऐहिकता यांच्या दरम्यानचे असतील तर 'समाअ' अनिष्ट वा अवांछनीय (मक्रूह) आहे.

**४) मुबाह – विधिसम्मत –** जर विचार हे संपूर्णपणे वास्तवाशी निगडित असतील तर 'समाअ' विधिसम्मत (मुबाह) आहे.

**झ) 'समाअ'चे नियम आणि शिष्टाचार**

**१) 'समाअ'चे नियम**

१) 'समाअ'ची सुरूवात आणि शेवट पवित्र कुरआनच्या श्लोक-पठणाने झाले पाहिजे.

२) 'समाअ'चे आयोजन वारंवार करू नये. कारण हे सर्वज्ञातच आहे – 'अति परिचयात अवज्ञा'

३) 'समाअ'च्या महफ़िलीमध्ये एखाद्या सद्‌गुरूची उपस्थिति अनिवार्य असते.

४) 'वज्द' अर्थात् सहजानंद अवस्थेमध्ये असलेल्यांवर एक सूक्ष्मनिरीक्षक असावा. सहजानंद अवस्थेमध्ये असलेल्या लोकांकडे दुर्लक्ष होऊ नये.

५) प्रत्येकाने आचमन ('वज़ू') करून उपस्थित रहावे.

६) 'वज्द' म्हणजे सहजानंदच्या तल्लीन अवस्थेमध्ये जर एखाद्याने आपला अंगरखा किंवा आपले वस्त्र फेकून दिले असेल तर ते तेथे कोठे तरी न टाकता, क़व्वाल (गायका)ला प्रदान करावे.

७) ऊद अर्थात् धूप जाळून सुगंध दरवळत रहावे.

**२) वेळ (समय)**

१) 'नमाज़' अर्थात् उपासना, भक्ती किंवा साधनेच्या वेळांवर 'समाअ'चे अतिक्रमण होऊ देऊ नये.

२) 'समाअ'साठी असा एक योग्य वेळ निवडावा की जेणेकरून सहभागी लोकांचे लक्ष एकवटलेले आणि त्यांची एकाग्रचित्तता कायम राहू शकेल. त्यांचे अवधान भंग पावणार नाही.

३) श्रोत्यांच्या भावना 'समाअ'साठी प्रामाणिक असाव्यात.

### ३) स्थळ

१) 'समाअ'चे आयोजन एका निवांत जागी करावे. यामुळे 'समाअ'च्या महफ़िलीमध्ये उपस्थित सर्व श्रोत्यांची एकाग्रचित्तता प्रबळ बनेल.

२) गजबजलेल्या बाजारांसारख्या जागांवर 'समाअ' संपन्न करू नये.

३) 'समाअ'च्या प्रत्यक्ष जागेपासून म्हणजेच व्यासपीठापासून महिलावर्ग आणि मुलांची बैठक व्यवस्था वेगळी असणे श्रेयस्कर असते.

### ४) सोबती (श्रोतृ –वर्ग)

१) 'समाअ'विषयी श्रोत्यांची श्रद्धा प्रामाणिक असावी.

२) श्रोतृ–वर्ग शिष्यगण असणे हे कधीही श्रेयस्कर असते.

३) 'समाअ'च्या महफ़िलीमध्ये संशयखोर लोकांना प्रवेश देऊ नये.

४) उपासनेसारख्या भक्तिभावाने 'समाअ'चे श्रवण करावे.

५) आशीर्वादासाठी पैसे किंवा भेटवस्तू क़व्वाल (गायका)ला सद्‌गुरूंच्या माध्यमाने द्यावेत.

६) क़व्वालला विशिष्ट क़व्वाली म्हणण्याचा अनुरोध किंवा आग्रह करू नये.

७) 'समाअ'मध्ये कव्वालाकडून झालेल्या चुकांकडे त्याचे लक्ष वेधू नये.

८) 'समाअ'च्या वेळेस धूम्रपान आणि मदिरापान निषिद्ध आहे.

९) सर्व प्रकारच्या शिष्टाचाराप्रती 'समाअ'च्या वेळेस, निष्ठा असणे अत्यंत आवश्यक आहे.

### ३) 'समाअ' – सूफ़ी दृष्टिकोन[७९]

### १) गोड आवाजाचा महिमा

चित्ताकर्षक आवाजामध्ये एक प्रकारची मोहिनी असते. प्रत्येक गंभीर स्वभावाच्या माणसामध्ये परमेश्वराने उपजत (निसर्गत:) असा स्वभाव निर्माण केले आहे की जो चित्ताकर्षक ध्वनी आणि मधुर गीत ऐकून हर्षभरित व प्रसन्नचित्त होऊन मस्त होऊन जातो. बेहोश करणाऱ्या ध्वनीमध्ये जनावरांसाठी पण चुंबकीय आकर्षण आणि गुंग करणारी शक्ती असते. बालके पण ते ऐकून मतिगुंग होऊन जातात. तसे पाहता आवाजाचा माणसाशी फार जवळचा संबंध आहे. परस्परसंबंध निर्माण करणे आणि ते कायम राखणे, अध्ययन–अध्यापनाचे अनुष्ठान–संचालन, विचार–विनिमय आणि अशाच प्रकारचे सर्व कार्यांसाठी स्पष्ट व गुप्त संकेत पुरेसे मानले गेले नाहीत, अपितु सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या कृपेच्या पराकाष्ठेने ध्वनीस निर्माण केले की जेणेकरून लाभाची इच्छा आणि ध्येयाच्या पराकाष्ठेपर्यंत पोहोचण्यासाठी मानवास त्यामुळे मदत आणि फायदा प्राप्त होईल. अशा प्रकारे आवाज़ (ध्वनी) माणसाची अत्यंत मोठी अशी गरज पूर्ण करणारी गोष्ट सिद्ध होते. मानवास आवाज ईश्वरी कृपेची देणगी – इनाम म्हणून प्रदान करण्यात आले आहे, आणि मानवास असे आढळून आले की त्याचा स्वभावच जणू या आवाजाच्या आंतर–बाह्य पराकाष्ठेचे चित्र आहे. म्हणून स्वाभाविकपणे आवाजावर त्याचे प्रेम आहे. त्याचे भय आणि त्रास व त्राण यामुळे नाहीसा होतो. त्याच्या प्रगतीचे मार्ग यामुळे निर्माण होऊन ते खुले झाले आणि प्रगतीचे ते मार्ग आक्रमण करण्यास आवाजामुळे

त्याला मदत झाली. जेव्हा या आवाजामध्ये सुंदर युक्त्या समाविष्ट झाल्या, चित्ताकर्षकता वाढली, उन्मत्त करणाऱ्या वाद्य-यंत्रांची साथ मिळाली तेव्हा माणसाचे स्वाभाविक प्रेम उचंबळून आले, स्वाद निर्माण होऊ लागला, मस्ती वाढू लागली आणि अचेतना घेरू लागली. पवित्र कुराणामध्ये, या संदर्भात एक श्लोक आहे - ''तो (आपण) निर्माण केलेल्या सृष्टीमध्ये इच्छितो त्याची भर घालतो.'' - ३५ :१ भाष्यकारांनी या श्लोकाचे भाष्य करताना असे निवेदन केले आहे की या ''भर'' चा संकेत गोड आवाजाकडे आहे. हे मानवाच्या शारीरिक रचनेमध्ये एक प्रकारची वाढ किंवा भर आहे.

सर्वप्रथम मस्ती जी मानवाच्या आत्म्यावर चढली ती ''अलस्तु बिरब्बिकुम'' म्हणजेच ''मी तुमचा विधाता नाही काय ?'' ७:१७२ या चित्ताकर्षक गाण्यास ऐकून चढली. आणि सर्वात शेवटी जी मस्ती यामध्ये निर्माण होईल ती त्या शेवटच्या ''प्राण फुंकणे'' ''नफ़्ख़-ए-सूर'' ऐकून होईल. याचा सप्राण ध्वनी, जीवनदायी आवाज मृतांमध्ये प्राण (जीवन) भरून देईल. याला ऐकून मृत जिवंत होऊन उठतील आणि नाचत (नृत्य करीत) आपल्या परमेश्वरासमोर हजर होतील. आवाज़ामध्ये दोन्ही चमत्कार आहेत - जिवंतांना मृत करणे आणि मृतांना जिवंत करणे. प्रथम ''फुंकलेला प्राण'' - '''नफ़्ख़-ए-सूर'' जिवंतांना मृत करेल, तर दुसरा ''फुंकलेला प्राण'' हा मृतांना जिवंत करेल. यावरून हे स्पष्ट होते की गोड आवाजात किमया असते. गोड गळा सुंदर चेहऱ्याहून अधिक चांगला. कारण सुंदर चेहरा म्हणजे वासनेची रूची, तर गोड गळा हा साक्षात् आत्म्याचे भोजन (खाद्य) असतो. सर्वश्रेष्ठ परमेश्वराने प्रेषित दाऊद यांना चित्तप्रसन्न मधुर ध्वनी आणि गोड आवाजाच्या गळ्याचा चमत्कार प्रदान केले होते. जेव्हा ते ''ज़बूर'' या आपल्या धर्मग्रंथांमधील गीतांचा दाऊदी कौशल्याने म्हणजेच गोड गळ्याने पाठ-वाचन करीत तेव्हा श्रोतृ मंडळीमधील काही प्राणार्पण करीत आणि सभेच्या शेवटी तेथून प्रेतयात्रा निघे. सूफींच्या बाबतीत अशाच प्रकारचे काही प्रसंग प्रसिद्ध आहेत. 'समाअ'च्या महफ़िलीमध्ये एखादे सुंदर कडवे किंवा आलंकारिक काव्य-चरण ऐकून त्याच्या प्रभावामुळे काहींनी प्राणार्पण केले आहे. सुप्रसिद्ध सूफ़ी संत कुत्बुद्दीन बख़्तियार काकी यांच्या प्रयाणाचा (निधनाचा) प्रसंग तर सर्वज्ञातच आहे. 'समाअ'च्या तन्मयतेमध्ये त्यांनी एक प्रभावशाली काव्य-चरण ऐकून ईश्वरेच्छेसमोर सहर्ष प्राणार्पण केले. परंतु ईश्वरी चमत्कार पाहण्यासारखा आहे. ईश्वरी प्रभुत्वाधिकाराविषयी काय सांगावे ! एक निराळ्या वैभवामध्ये ते पुन्हा जिवंत झाले ! उत्कर्ष व अवतरणाचा त्यांनी केवढा मोठा दर्जा प्राप्त केला होता ! कारण अनेक दिवसांपर्यंत आश्चर्यचकित करणारा तो प्रसंग नजरेसमोर असे की पहिले कडवे ऐकून ते प्राणार्पण करीत, आणि दुसऱ्या कडव्यावर ते नव्याने पुनर्जिवीत होऊन व्याकुळ होत असत. जर त्या काळचे 'समाअ'मधील सहभागी लोक जीवन-मृत्यूचा हा अप्रतिम खेळ पाहून हतप्रभ (हतप्रज्ञ) झाले नसते आणि क़व्वालांना पहिल्या कडव्याच्या शेवटी आणि दुसऱ्या कडव्याच्या सुरूवातीअगोदर थांबविले गेले नसते तर जसे की शेवटी त्यांनी विवश होऊन केले तर प्रेमाच्या एका हुतात्म्याच्या जीवन-मरणाचा हा खेळ जग प्रलयकाळापर्यंत पाहात राहिले असते. सुप्रसिद्ध सूफ़ी कवी अमीर खुस्रो यांनी आपल्या एक ग़ज़ल (भावगीत)मध्ये या प्रसंगाकडे संकेत करीत म्हटले आहे -

*''जाँ बरीं यक बैत दाद अस्त आँ बुज़ुर्ग*
*आरे ईं गौहर ज़ काने दीगर अस्त ।।*

*कुश्तगान-ए-खंजर-ए-तस्लीम रा*
*हर ज़माँ अज़ ग़ैब जाने दीगर अस्त ।।''*

हदीस शरीफ़ (पवित्र प्रेषित वचन)मध्ये आलेले आहे – ''इन्न मिन शिशअरिल हिकमतु'' म्हणजे खरोखर काही काव्यचरणांमध्ये तत्त्वज्ञान असते. प्रत्येक वस्तुमध्ये सौंदर्य असते. एखाद्या काव्यचरणामध्ये तत्त्वज्ञानाचे असणे हे त्या काव्यचरणाचे सौंदर्य असते. शिवाय शब्द-रचना, शब्द-प्रयोग आणि शैलीमध्ये पण जर कोमलता आणि सूक्ष्मता असेल तर त्या सौंदर्याची शोभा द्विगुणित होते. त्याचप्रमाणे आवाजामध्ये चित्ताकर्षक असणे हे त्या आवाजाचे सौंदर्य असते. जेव्हा या चित्ताकर्षक आवाजामध्ये नैसर्गिक किंवा संगीत-शास्त्राच्या नियमांमुळे यथोचित समतोलाची प्रगती साध्य झाल्यास (तेव्हा) हे सौंदर्य वाढते. जेव्हा हे दोन्ही सौंदर्य म्हणजे वाणी अर्थात् शब्द सौंदर्य आणि आवाजाचा गोडवा आपसात मिसळून जातात, जेव्हा या दोहोंमध्ये पारस्परिक रचनेची सूक्ष्मता निर्माण होते. जेव्हा यांपैकी एक दुसऱ्यास सहाय्यक होतो, तेव्हा त्याचा एकत्रित प्रभाव गुणग्राहक श्रोत्यांवर पडतो. याचा अंदाज रसिक, दर्दी श्रोताच बांधू (करू) शकतो.

*''क़द्र-ए-ईं मय न: शनासी बख़ुदा ता न: चशी''*

अर्थात् तू जोपर्यंत न चाखशील तोपर्यंत तू या मदिरेची चव, परमेश्वराची शपथ ! किंचितमात्र जाणू शकणार नाहीस. त्याची कदर तुला कळणार नाही.

शाह वलीउल्ला मुहद्दिस देहलवी यांनी आपले सद्गुरू आणि पिताश्री शाह अब्दुर्रहीम यांचे काही अलौकिक अनुभव आपले ग्रंथ ''अन्फ़ासुल आरिफ़ीन'' मध्ये नमूद केले आहेत. एका जागी शाह अब्दुर्रहीम यांचे ख़्वाजा कुत्बुद्दीन बख़्तियार काकी यांच्या समाधीजवळ उपस्थित होण्याचा उल्लेख आहे. त्यावेळेस तो आगळा संवाद समाधिस्थ काकी आणि शाह अब्दुर्रहीम यांच्या दरम्यान घडला तो येथे देणे मनोरंजक ठरेल. संवाद खालीलप्रमाणे होता –

समाधिस्थ काकी यांनी विचारले – कवितेसंबंधी तुमचे काय मत आहे?

मी (शाह अब्दुर्रहीम) म्हणालो – ''कलामु हसनु हसनु व क़बीहु क़बीहु'' अर्थात् सुंदर (प्रिय) वाणी सुंदर (प्रिय) असते, तर अप्रिय वाणी अप्रिय असते.

समाधिस्थ उत्तरले – फान छान ! गोड आवाजासंबंधी तुमचे काय मत आहे?

मी (शाह अब्दुर्रहीम) म्हणालो – ''ज़ालिक फ़ज़्लुल्लाहि यूती: मन यशाउ'' अर्थात् ही प्रभूची कृपा आहे, त्यास वाटेल त्याला देतो.

समाधिस्थ उत्तरले – फार छान ! जेव्हा (हे) दोन्ही एकवटले असतील तेव्हा त्यासंबंधी तुमचे काय म्हणणे आहे?

मी (शाह अब्दुर्रहीम) म्हणालो – ''नूरून् अला नूरिन् यहदिल्लाहु लिनूरिह मंय्यशाउ'' अर्थात् (मग) प्रकाशच प्रकाश (आहे). अल्लाह इच्छितो त्यास आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवितो.

समाधिस्थ म्हणाले – फार उत्तम ! जे काही आम्ही करीत होतो ते यापेक्षा जास्त काही नाही. तुम्ही पण कधी-कधी एखाद दोन कडवे ऐकत रहा.

## २) सूफ़ींचा ‘समाअ’

केवळ गाणे ऐकणे किंवा काव्य-चरण ऐकणे किंवा संगीताच्या पराकाष्ठेमुळे आत्मानंद प्राप्त करणे यास सूफ़ींच्या पारिभाषिक शब्दावलीमध्ये ‘समाअ’ म्हणून ओळखले जात नाही, अपितु त्यांच्या मते ‘समाअ’ची मजलिस’ (सभा)त्यास म्हणतात की जेव्हा पवित्राचरणी लोक आत्मिक आनंदामध्ये स्थिरचित्त असतात आणि वासनामय सवयीपासून अलिप्त असतात आणि सत्यनिष्ठा आणि पावित्र्यासह ईश्वराच्या आकांक्षेमध्ये अभिरूची व रसिकता ठेवून एकाग्रचित्त असतात आणि तत्संबंधी यथोचित नियमांचे अधीन राहून आनंदातिरेक अवस्थे अर्थात् तंद्रेमध्ये डोलणारे असे हे लोक असतात. ते यथोचित वाणी, सुंदर आवाज आणि सुमधुर, चित्ताकर्षक कंठ ऐकतात. ते आद्योपान्त (सुरूवातीपासून शेवटपर्यंत) सर्वश्रेष्ठ परमेश्वरासोबत राहण्याचा मन:पूर्वक निश्चय करतात. याव्यतिरिक्त त्यांची कोणतीच गरज नसते. अशा जनसमूहास (संमेलनास) ‘समाअ’ची संज्ञा दिली जाते. ज्या ’समाअ’मध्ये उपरोक्त घटक नसतात, असा ‘समाअ’ सूफ़ींपाशी ‘समाअ’मुळीच नसतो. औपचारिक आणि दिखाऊ संमेलनास वास्तविक सूफ़ीवादामध्ये कोणतेच स्थान नाही.

## ३) ‘समाअ’च्या अटी

‘समाअ’साठी तीन गोष्टींचे असणे अत्यंत आवश्यक असते. यांच्याच दुरूस्तीवर सूफ़ींच्या ‘समाअ’चे औचित्य, अभिप्राय आणि प्रभाव निर्भर असते. त्या तीन गोष्टी आहेत - १) वेळ, २) स्थळ आणि ३) श्रोता-गण.

**१) वेळ (काळ)**- ‘समाअ’ ऐकण्यासाठी मनाची तयारी असलेल्या वेळेची तजवीज करावी, मनामध्ये विचाराची समग्रता असावी, ‘समाअ’च शौक़ अनावर झालेला असावा, सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या संपर्कात एकांतात बसण्यासाठी मन प्रवृत्त असावे. याशिवाय इतर हेतूचा अडथळा येता कामा नये. इतरांसाठी वचनपूर्तीची ती वेळ नसावी किंवा विचाराच्या समग्रतेमध्ये उद्विग्नता निर्माण करणाऱ्या इतर कामाचा वेळ नसावा.

**२) स्थळ** - ‘समाअ’ साठी स्थळ असे असावे किंवा अशा जागेची निवड करावी की जेथे चित्ताग्रता निर्माण करणारे किंवा त्यामध्ये वाढ करणारे साधन उपलब्ध असतील. ती सार्वजनिक जागा नसावी. बाजार नसावा. मेळे, तमाशे आणि सहली साठीचे मैदान नसावे. इतर असली जागा असू नये की आपल्यामुळे इतरांना किंवा दुसऱ्यामुळे आपल्याला त्रास होईल. असले स्थळ असू नये की ‘समाअ’चे श्रोते आपल्या नैसर्गिक गरजा पूर्ण करू शकत नसतील किंवा सभेमध्ये यथोचित व्यवस्था कायम राखू शकत नसतील किंवा असभ्य, अशिष्ट लोकांच्या संपर्कापासून स्वत:स अलिप्त व सुरक्षित राखू शकत नसतील, ते त्यांच्या आवाक्यापलीकडील असेल. एकांत जागा असावी. सूफ़ींचे आश्रम असावे किंवा एखादे घर असावे की जे खास अशासारख्या साधनेसाठी राखीव असावे.

**३) श्रोता-वर्ग** - ‘समाअ’मधील श्रोते समविचारी आणि समान अभिरूची असणारे (राखणारे) असावेत. ते ‘समाअ’साठी योग्य असेच असावेत. ते त्यासाठी पात्र असावेत. ते वासनांच्या प्रभावापासून मुक्त असावेत. ते दुर्गुणांपासून मुक्त असावेत. ते हावरटपणा आणि वासनेचे गुलाम नसावेत. ‘समाअ’चे विरोधी नसावेत. आक्षेप आणि दोष काढण्याच्या निमित्ताने मैफिलीमध्ये आलेले नसावेत. सांसारिक नसावेत. पाखंडी

नसावेत, घमेंडखोर नसावेत. आत्म्याचे आणि कुळाभिमानाचे भूत आपल्या डोक्यामध्ये घेऊन आलेले नसावेत. खेळ-तमाशा म्हणून 'समाअ'च्या मैफ़िलीमध्ये सहभागी नसावेत. मनास प्रसन्न करण्यासाठी (संगीताचे) राग ऐकण्याच्या हेतून आलेले नसावेत, अपितु 'समाअ'स साधना समजून ईश्वराकडे उन्मुख होण्याच्या संकल्पाने आचमनासह ('बा वज़ू') हजर झालेले असावेत आणि शेवटपर्यंत आचमनासह उपस्थित असावेत. सभ्यपणे बसावे. आपसात गुजगोष्टी करू नयेत. थट्टा मस्करी आणि हास्यापासून परावृत्त असावेत. आपले लक्ष इकडे-तिकडे करून दुसऱ्यांचे ध्यान विचलित करू नये. जेव्हा 'समाअ'स योग्य असे श्रोते एका ठिकाणी एकत्रित जमा होऊन 'समाअ'मध्ये सहभागी होतात तेव्हा काहींच्या अंत:करणांचे प्रकाश-पुंज इतर काहींमध्ये प्रतिबिंबित होतात. समविचार आणि एकजिनसीपणाच्या या समूहापासून प्रकाश, आनंद आणि पावित्र्यामध्ये वाढ होते आणि सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या विशेष कृपेचे यावेळी अवतरण होते. कृपायाचना स्विकृतीसाठी हा अत्यंत अमूल्य असा वेळ असतो.

'श्रोतृ-वर्ग'साठी सूफ़ी तत्त्वज्ञानामध्ये 'अख़्वान' हा पारिभाषिक शब्द वापरला जातो. 'अख़्वान'चा अर्थ आहे बंधु-गण. बंधु अनेक प्रकारचे असतात. भ्रातृत्वाची एक साखळी (शृंखला) ती आहे की ज्यामध्ये समस्त मानव-जात ही एक प्र-पितामह प्रेषित आदम यांची संतती या नात्याने जोडली गेली आहे. हे सर्वसाधारण भ्रातृत्व आहे. विशेष भ्रातृत्व म्हणजे इस्लामी बंधुत्व होय. यामध्ये प्रत्येक ब्रह्मवाणी-समर्थक ('कल्मागो') समाविष्ट आहे. प्रत्येक मुसलमान हा 'ब्रह्मवाणी-वाचक' या नात्याने दुसऱ्या मुसलमानाचा बंधु आहे. परंतु येथे म्हणजे 'समाअ'च्या संदर्भात सोबतसाठी ज्या भ्रातृत्वाची गरज आहे ती इस्लामी भ्रातृत्व-भावनेपेक्षा अति विशिष्ट अशी आहे. हा तो बंधुभाव आहे की ज्याचा उल्लेख पुढील कौराणिक श्लोकामध्ये परमेश्वराने केले आहे -

''आणि (जगात एकमेकांकडून) त्यांच्या मनात काही द्वेषभावना राहिली असेल तर तीही आम्ही काढून टाकू, (आणि हे) एकमेकांच्या समोरासमोर (अशा प्रसन्नवदनाने) आसनांवर (वसलेले) असतील (जणू की) भाऊ भाऊच. त्यांना स्वर्गात कोणाही तऱ्हेचे कष्ट पोहोचणार नाहीत व हे (कधी) स्वर्गातून निष्कासित केले जाणार नाहीत.'' - १५:४७-४८

हे स्वर्गाचे निवासी यांचे (सद्) गुण आहेत. सूफ़ी संप्रदायांमध्ये दीक्षित असलेले सर्व आपसामध्ये समविचारी असतात. त्यांच्यांमध्ये सुद्धा हेच गुण चरितार्थ होतात.

शेख़ुल तरीक़त अबुल फ़तह शहाबुद्दीन अहमद बिन मुहम्मद ग़ज़ाली, जे हुज्जतुल इस्लाम अबू हामिद इमाम ग़ज़ाली यांचे बंधु होते, ते उपरोक्त पवित्र श्लोकाच्या भाष्याच्या संदर्भात नमूद करतात की - (मूळ अरबी भाषेत उपरोक्त श्लोक पुढील प्रमाणे आहे)

''व नज़ऽ मोकफ़ी ..... इख़्वानन् अला सुरूरिम् -मुतक़ाबिलीन. ला यमस्सुहुम् फ़ीहा नसबुंव्व मा हुम् मिन्हा बिमुख़्रजीन'' १५:४७-४८

''या श्लोकाचा अभिप्राय म्हणजे ब्रह्मज्ञानी लोक होत. 'नज़ऽना' ('नज़अना') चा अर्थ आहे आम्ही काढून टाकले. 'मा फ़ी सुदूरि'चा अभिप्राय ब्रह्मज्ञानी लोक, द्रष्टा लोक आणि कोमल (द्रवीभूत) हृदयाचे आनंद लोक असा आहे. 'मिन् ग़िल्लि'शी अभिप्राय सांसारिक सुखाची इच्छा करणे आणि मानवी वासना शमविणे

(तृप्त करणे) असा आहे. 'इरख़्वान' हा शब्द जो या श्लोकामध्ये प्रयुक्त आहे याचा अभिप्राय असा आहे की ते लोक ज्ञान-प्रकाश, साधना आणि ब्रह्मज्ञान प्राप्त करण्यामध्ये एकेमेकांशी सोबत आहेत, ते यासाठी की बंधूंचा जन्म एकाच ठिकाणापासून (योनीपासून) होतो. 'अला सुरूरि'चा अर्थ या श्लोकामध्ये नामिका दशा व स्थळे (अवस्था, टप्पे) असा आहे. 'मुतक़ाबिलीन'चा अभिप्राय हा आहे की ज्यांच्या बुद्धिचा आदेश त्यांच्यावर प्रभुत्वशाली आहे. त्यांच्या तुलनेमध्ये ते लोक आहेत की ज्यांच्यावर त्यांच्या मनाचा ('कल्ब') आदेश प्रबळ आहे. नंतर त्यांच्या तुलनेत ते लोक आहेत की ज्यांच्यावर त्यांच्या आत्म्या ('रूह')चा आदेश प्रबळ आहे, आणि त्यांच्या तुलनेमध्ये ते लोक आहेत की ज्यांच्यावर त्यांच्या मर्मा ('सिर्र')चा आदेश प्रबळ आहे. 'ला यमस्सुहुम् फ़ीहा नसब' चा अभिप्राय हा आहे की ते दैवी प्रेरणा, साधना आणि ब्रह्मज्ञानाच्या उद्यानामधून निघतील. या कारणास्तव की जेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आपल्या भक्तांना कमाल दर्जावर पोहोचविले आणि अस्तित्वाच्या श्रेणींचे ज्ञान प्रदान केले तेव्हा तो हे त्यांच्यापासून मुळीच हिसकावून घेणार नाही. कारण की तो दाता आणि दयाळू आहे. जेव्हा तो देतो तेव्हा तो त्यामध्ये वाढ करतो आणि परत घेत नाही.''

उपरोक्त भाष्यामध्ये 'इख़्वानन्' या शब्दाच्या विवेचनाच्या संदर्भात बंधू ('भाऊभाऊच') चा अभिप्राय म्हणजे ते लोक आहेत की जे प्रभु-प्रकाश, साधना (भक्ती) आणि ब्रह्मज्ञान प्राप्त करण्यामध्ये एकमेकांसोबत सहभागी असतात. 'समाअ'च्या वेळेस, 'समाअ' चे श्रोते अशाच प्रकारच्या बंधुत्वाच्या सोबतीची अपेक्षा बाळगून असतात आणि गैर-जिन्नस लोकांच्या सोबतीमुळे त्यांना सक्त इजा पोहोचते.

बंधुत्वामध्ये 'क़व्वाल' (गायक)चा पण समावेश होतो. कारण की ते पण सहभागी असतात, प्रत्युत त्यांच्यात उपस्थितीसाठी 'समाअ'च्या मैफिलीचे आयोजन असते. म्हणून त्यांच्यामध्ये उपरोक्त गुण असणे श्रेयस्कर आणि प्राथमिक दर्जाचे असते. आवश्यकता या गोष्टीची असते की 'क़व्वाल' (गायक) हा 'दरवेश' - स्वभावाचा असावा. तो विरक्त, इंद्रिय-निग्रह आणि संयमी असावा. तो उपवास-व्रती आणि नित्यनेमाने उपासना करणारा असावा, जापक आणि योग-कर्मी असावा. संसार-लोलुप नसावा, वाईट आचाराचा नसावा, बदमाश, लुच्चा नसावा. त्याने मैफ़िलीमध्ये आचमन करून यावे आणि त्याने आचमनाच्या स्थितीमध्ये (शुद्ध) असावे. निदान कमीत-कमी दरवेशांच्या मजलिस (सभे)मध्ये निर्मोही होऊन यावे. कमी-जास्त पारिश्रमिकाकडे कटाक्षाने पाहू नये. गायकांनी जर दरवेशांना खुश ठेवले तर परमेश्वर त्यांना भुकेले ठेवणार नाही आणि त्यांची कोणतीही गरज पूर्ण झाल्याशिवाय राहणार नाही.

**४) सद्‌गुरूंची अनुमती** - लोकांसाठी विशेषतः साधनेमधील नवागतच नव्हे तर काहीसे अनुभवी शिष्यांसाठी स्वतःमध्ये 'समाअ' ऐकण्याची पात्रता आहे किंवा नाही हे ठरविणे अत्यंत अवघड असते. 'समाअ' प्रत्येक व्यक्तीसाठी लाभदयक नसते. ज्यांच्यामध्ये वाईट विचार चांगल्या विचारांवर वरचढ असतात त्यांच्यासाठी 'समाअ' घातक असतो आणि ज्यांच्यामध्ये चांगले विचार, वाईट विचारांवर प्रबळ असतात त्यांच्यासाठी 'समाअ'अत्यंत फायदेशीर असतो. याशिवाय काहींचा स्वभाव उपद्रवी असतो. ते मद्यपीच्या नशेपेक्षा अधिक घातक असते. अशांसाठी 'समाअ' लाभदायक सिद्ध होतो. काहींचा स्वभाव शांतिप्रिय असतो. ते विद्रोहपासून अलिप्त असतात. जे अफ़ू सेवनाच्या अधीन गेलेले असतात व नेहमी अफ़ूच्या

नशेमध्ये असतात, त्यांच्यासाठी 'समाअ' घातक सिद्ध होतो. कुणासाठी 'समाअ' लाभदायक आहे आणि कुणासाठी घातक आहे, याचे योग्य निर्णय सद्‌गुरूंशिवाय अन्य कोणीच करू शकत नाही. म्हणून 'समाअ'मध्ये सहभागी होण्यासाठी सद्‌गुरूंची परवानगी असणे अत्यंत आवश्यक आहे. आणि हीच पहिली मुख्य अट आहे. लोकांमध्ये हा गैरसमज पसरलेला आहे की चिश्ती संप्रदायामध्ये 'समाअ' सार्वजनिक आहे. वाटेल त्याने गाणे ऐकावे. चिश्ती सांप्रदियाकांना जरी 'समाअ' विषयी अधिक प्रेम आहे आणि त्यांच्या बाबतीत असे म्हणतात की लोकांनी 'समाअ' भरपूर प्रमाणात ऐकावे, तरी पण त्यांच्यामध्ये सुद्धा नवागत शिष्यासाठी सद्‌गुरूंची परवानगी असणे ही पहिली अट आहे, याच्याशिवाय 'समाअ' ऐकणे त्यांच्यासाठी उचित नाही.

**४) 'समाअ'संबंधी मतभेद**

'समाअ'च्या बाबतीत सूफ़ी आणि विद्वानांमध्ये सतत मतभेद राहिलेले आहेत. विद्वानांमध्ये पण आपसात बरेच मतभेद आहेत. काहींनी वर्जित, निषिद्ध मानले, तर काहींनी विधिसम्मत. काहींनी विशिष्ट परिस्थितीमध्ये उचित मानले तर काहींनी अनुचित. थोडक्यात, काही 'समाअ'चे समर्थक आहेत तर काही विरोधक. अगोदर समर्थकांची भूमिका जाणून घेऊ या.

गाणे आणि संगीत वर्जित आहे, या संबंधी अनुमोदनस्वरूपात कोणतीच प्रबळ ('सही') किंवा दुर्बळ ('ज़ईल') हदीस (प्रेषित-वचन) ठोस स्वरूपात उपलब्ध नाही. ज्या हदीसांना प्रमाणस्वरूपात दाखल करण्यात येते त्यांचा मूळ आधारच नाही आणि त्यांपैकी काही तर कपोलकल्पित आहेत. इमाम अबू हनीफ़ा, इमाम मालिक, इमाम शाफ़ई, इमाम अहमद बिन हंबल आणि इतर धर्माचार्यांनी त्यांना विश्वासार्ह मानले नाही. या हदीसी काही शेवटच्या वार्ताकारांनी नोंदविल्या आहेत. त्यांना प्रमाणभूत आणि अप्रमाणभूत हदीसांमधील फरक समजून घेण्याचे कौशल प्राप्त नव्हते. इब्न अरबी मालिकी यांनी या अविश्वसनीय हदीसांचे खंडन करताना लिहिले आहे की गाणे निषिद्ध असल्याच्या संदर्भात एकपण हदीस सिद्ध नाही. इब्न ताहिर यांचे पण असेच मत आहे, परंतु काही शाफ़ई श्रेष्ठतम विद्वानांचे असे कथन आहे की अशा प्रकारच्या हदीसी फक्त नकारणाऱ्यांच्याच ('मुनकिरीन') म्हणजेच नास्तिकांच्याच पुस्तकांमध्ये आढळून येतात. इमाम इब्राहीम बिन साद हे एक फार मोठे विद्वान वार्ताकार ('मुहद्दिस') होऊन गेले आहेत. इमाम शाफ़ई आणि इमाम बुख़ारी सारखे महा प्रतिष्ठित आचार्यां (अयमा)चे गुरू होण्याचा अभिमान यांना प्राप्त होता. ते आपले शिष्य आणि विद्यार्थ्यांना संतुष्ट करण्यासाठी आणि त्यांच्या अंत:करणांना नम्र बनविण्यासाठी हदीसी ऐकविण्याअगोदर 'समाअ' ऐकवित असत आणि त्यांच्यासमोर डफ वाजवित असत.

हुज्जतुल इस्लाम इमाम अबू हामिद ग़ज़ाली यांचे बंधु शहाबुद्दीन अहमद बिन मुहम्मद ग़ज़ाली यांनी एक पुस्तिका लिहीली आहे. तिचे नाव (शीर्षक) आहे –

''बवरिकुल असमाइ फ़ी तकफ़ीरि मनय्यु हर्मुस्समाअ'' या पुस्तिकेत ते सिद्ध करतात की ज्याने 'समाअ'स वर्जित वा निषिद्ध मानले त्याने महाप्रेषित (मुहम्मद स.) यांच्या कृती (कर्मा)स वर्जित वा निषिद्ध मानले, आणि ज्याने महाप्रेषितांवर दुष्कर्म करण्याचे आरोप लावले (ठेवले) तो सर्वानुमते श्रद्धाहीन (नास्तिक) ठरतो. उपरोक्त पुस्तिकेच्या शेवटी निष्कर्ष स्वरूपात लेखकाचे विधान आहे की ज्याने असे म्हटले की गाणे

ऐकणे किंवा नृत्य पाहणे वर्ज्य-निषिद्ध आहे तर असे खात्रीपूर्वक समजावे की त्याने महाप्रेषितांच्या कृतीस वर्ज्य ठरविले आणि तो सर्वानुमते नास्तिक (श्रद्धाहीन) आहे.

जेव्हा परमेश्वराचे महाप्रेषित मुहम्मद स., त्यांचे सहचर, अनुयायी आणि अनुयायी अधीनस्थ, संत-महात्मे, ऋषि-मुनि लोक आणि भली माणसे या सर्वांनी 'समाअ'चे श्रवण केले आहे तेव्हा द्रष्टे लोक आणि समंजस वर्गाच्या लोकांमध्ये जो मतभेद दिसून येतो याचा एवढाच अभिप्राय होऊ शकतो की त्यांचा अशाप्रकारच्या 'समाअ'विषयी मतभेद आहे की ज्यामध्ये एखादा अप्रज्वलित पैलू असेल किंवा ज्यामध्ये मनाई असलेल्या अनिष्ट बाबी दाखल झाल्या असतील किंवा 'समाअ'ने एखादे हानिकारक स्वरूप धारण केले असेल. उदाहरणार्थ 'समाअ'साठी निर्धारित अटींची यथोचित पालन होत नसेल. ते नियम आणि त्या अटींचे योग्य पालन झाल्याशिवाय भक्त-उपासक पण 'समाअ' श्रवणास उचित समजत नाहीत. तर मग सांप्रत प्रचलित निकृष्ट, वाईट स्वरूपास पाहून जर विद्वान त्यास मना करीत असतील तर यामध्ये त्यांचा काय दोष? हे सत्य आहे की योग्य मर्यादांशी तडजोड करणे ना विद्वानांना मान्य आहे ना सूफ़ी मान्यवरांना. 'समाअ' हे स्वत: निषिद्ध नाही. परंतु जेव्हा वर्जित गोष्टींमध्ये लिप्त होऊन जातो तेव्हा तो निषिद्ध बनतो. आक्षेपार्ह आहेत त्या निषिद्ध बाबी, स्वत: 'समाअ' नव्हे. उदाहरणार्थ प्रेमच घ्या. प्रेम हे स्वत: एक सर्वश्रेष्ठ स्पृहणीय वस्तू (गोष्ट) आहे. परंतु तिच्याभोवती अनुज्ञप्ती, मनाई आणि मुभाचे चक्र फिरत असते. जर प्रेम हे परमेश्वर आणि त्याचे महाप्रेषित यांच्याशी निगडित असेल तर ते अत्यंत स्तुत्य आहे. जर ते आपली धर्मपत्नी किंवा इतर उचित व्यक्तीशी निगडित असेल तर ते विधिसम्मत - मुभा आहे, आणि जर ते धर्मशास्त्र-निषिद्ध गोष्टीशी असेल तर ते वर्ज्य आहे. प्रत्येक वस्तू-गोष्टीमध्ये एक पैलू लाभदायक असतो, तर दुसरा हानिकारक. परंतु हानिकारक पैलूच्या भीतिमुळे लाभदायक पैलूस आपल्या हातातून निसटून देणे, ही गोष्ट कोणताच बुद्धिमान पसंत करणार नाही. नमाज़ (उपासना,भक्ती)चेच उदाहरण घ्या. नमाज़ (भक्ती) ही एवढी महान साधना आहे की तिला श्रद्धावंतांचे उत्कर्ष म्हणून गणले (मानले) गेले आहे. परंतु नमाज़च्या पण दोन अवस्था-पैलू आहेत. एक अवस्था वा पैलू तो आहे की ज्याच्यासंबंधी सर्वश्रेष्ठ परमेश्वराने म्हटले आहे -

''नि:संशय त्या श्रद्धावंतांना यश प्राप्त होते, जे आपल्या प्रार्थनेत (नमाज़ात) विनम्रता अंगिकारतात.'' २३:१-२

आणि दुसरा पैलू असा आहे -

''मग विनाश आहे त्या नमाज़ पढणाऱ्या (दांभिकां)स की जे नमाज़ात हयगय करतात.'' १०७: ४-५

याचा अभिप्राय असा नव्हे की नमाज़ स्वत: आपल्या जातीने दोन प्रकारांमध्ये विभाजित आहे. नमाज़ तर एकच आहे, परंतु नमाज़ी (उपासक, भक्त) दोन प्रकारांमध्ये विभक्त आहेत. एक ते आहेत जे मोक्ष प्राप्त करतात, तर दुसरे ते आहेत की ज्यांच्याविषयी खेद आहे, हाय आहे. परंतु काय या आधारावर काही नमाज़ पढणाऱ्यांवर खेद आहे म्हणून नमाज़ पढणेच सोडून देणे श्रेयस्कर मानले जाऊ शकते काय? किंवा नमाज़च्या अनिवार्यतेमध्ये काही बाधा येऊ शकते?

सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ इमाम ग़ज़ाली यांनी आपले ग्रंथ 'इहया-उल-उलूम' (ज्ञानसागराचे पुनरूत्थान)मध्ये 'समाअ', 'समाअ'चे प्रकार-वाद्ययंत्रे आणि 'समाअ'च्या नियम व अटींशी संबंधित अत्यंत

सविस्तर व सप्रमण विवेचन प्रस्तुत केले आहे. 'समाअ' या विषयावर अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. अनेक पुस्तिका व लेख पण लिहिले गेले आहेत. काही लेख एकतर्फ़ी आहेत, तर काही शोधपूर्ण. संशोधनपरक ग्रंथांचे वा लेखांचे सूक्ष्म अवलोकन केल्यास असे स्पष्ट होते की इस्लामी धर्मप्रजेचे महान विद्वान आणि संशोधक हे स्वत: 'समाअ' विधिसम्मत असण्यासंबंधी एकमत आहेत.

आता 'समाअ'च्या विरोधकांची बाजू समजून घेऊ या. क़ादरिया आणि नक़्शबंदिया संप्रदायामध्ये 'समाअ'स उचित मानले गेले नाही. ना अब्दुल क़ादर जीलानी ग़ौस पाक महबूब सुबहानी आणि ना ख़्वाजा बहाउद्दीन नक़्शबंदी यांनी 'समाअ' ऐकले आहे.

सूफ़ी अहमद बिन मसरूक़ म्हणतात की साधकाने 'समाअ'च्या मैफिलीमध्ये संमिलित होऊ नये, याव्यतिरिक्त की अशी व्यक्ती जी आंतर-बाह्य सुदृढ अशी विद्वान आचार्य असेल आणि आमच्यासारख्या सामान्य लोकांनी 'समाअ' ऐकणे उचित नाही. कारण आमचे मन परमेश्वराच्या भक्तीमध्ये लागलेले नसते. मनास बळेच नामस्मरणाकडे ध्यानाकर्षित करावे लागते. जर आम्ही प्रचलित क़व्वाली ऐकण्यास विधिसम्मत जाणले तर अशी भिती आहे की आमची वासना तृप्त होऊन जाईल. आजकालच्या 'समाअ'मध्ये वाद्ययंत्रे उपयोगात आणली जातात. या कारणामुळे अशाप्रकारचे 'समाअ'चे औचित्यच राहिले नाही. यासंबंधी बाबा फ़रीद गंजशकर यांनी आपले ग्रंथ 'फ़वाद-उल-फ़वाद' (अंत:करणाचे अंत:करण) मध्ये असे लिहिले आहे की वाद्ययंत्रे वर्जित आहेत.

'कश्फुल महजूब'चे ग्रंथकर्ते व प्रख्यात सूफ़ी आचार्य व तत्त्वज्ञ अली बिन उस्मान जल्लाबी हुजवीरी 'दातागंजबख़्श' यांनी शेख़ अबुल अब्बास अस्क़ानी यांच्याकडून असे ऐकले आहे की एके दिवशी त्यांचे अशा एक लोक-समुदायाजवळून जाणे झाले की त्यापैकी काही लोक 'समाअ'मध्ये व्यस्त होते. त्यांनी पाहिले की काही दैवते-किन्नर हे त्यांच्या दरम्यान नाचत बागडत होते, (अस्क़ानी यांनी म्हटले की), 'मी त्या लोकांची ही अवस्था पाहून आश्चर्यचकित झालो' ते त्यांच्याकडे पहात होते आणि त्यांना पाहून गरम होऊन जात होते.

दुसरा एक गट असाही पण आहे की ना ते 'समाअ'चे आयोजन करतात ना अशा मैफ़िलीमध्ये बसणे पसंत करतात. कारण भक्त लोक वासनेचे शिकार होऊन सुस्त बनून जावेत आणि उगीचच पथभ्रष्टतेचा धोका मोल घेणे आणि त्यांच्या अनुसरणामध्ये 'समाअ'च्या फंदात पडून जावेत अशी त्यांची इच्छा नसते. आपली चूक कळून आल्यावर पश्चात्तापाचा विचारच त्यांच्या मनातून निघून जावे, आणि वासनेची पकड त्यांच्यावर मज़बूत होऊन ते विवश, असहाय होऊन जावेत, असेही त्यांना वाटत नाही. हीच गोष्ट त्यांचे संकल्प उद्ध्वस्त करू शकते, आणि त्यांना संकटांच्या खोल दरीमध्ये ढकलून देते आणि भांडण-तंटे व उपद्रवामध्ये बुडवून टाकते.

आणि सूफ़ी संत जुनैदच्या बाबतीत असे म्हणतात की ते जरीरी यांना म्हणाले -जेव्हा ते 'हाल'च्या सुरूवातीच्या अवस्थेमध्ये होते - की सद्धर्म-संरक्षणाची जर तुमची इच्छा असेल आणि आपल्या पश्चात्तापाशी न्याय करण्याचे तुम्ही इच्छुक असाल, तर तुम्ही 'समाअ'चे नाकारणारे बनून जात, जशी

हल्लीच्या सूफ़ींची पद्धती आहे (ते 'समाअ' ऐकतात) आणि तुम्ही स्वत:स त्यासाठी सक्षम – योग्य समजू नका, की जेणेकरून वृद्धापकाळामध्ये (त्याची सवय लागल्यामुळे) तुम्ही स्वत: पथभ्रष्ट होऊन न जावे.

काही इतर असे म्हणतात की 'समाअ'चे श्रोते दोन गटामध्ये विभागले जातात. एक गटाचे श्रोते असे असतात की ते मनोरंजनामध्ये लिप्त असतात (यांना छांदिष्ट लोक म्हणणे योग्य होईल). यांपैकी पहिल्या गटाचे लोक ऐन उपद्रवाच्या आहारी गेलेले आहेत (शिवाय दुर्दैव हे की) ते उपद्रवाला भीत पण नाहीत. तर निष्ठावंत भक्त हे तपस्या, उपासना आणि यमनियमामध्ये मग्न असतात. ते आपल्या अंत:करणास जगापासून अलिप्त ठेवतात आणि आपले अंतरंग त्यांच्यापासून विमुख ठेवल्याकारणाने दंगे-उपद्रवापासून स्वत:स वाचवून घेतात आणि अशाप्रकारे खरोखर ते त्यापासून सुरक्षित असतात. याचसाठी तर ते 'समाअ'चा त्याग करणे श्रेयस्कर समजतात. ते आपल्या मनोनुकूल इतर कामांमध्ये स्वत:स गुंतवून घेतात.

काही असे म्हणतात की महाप्रेषित मुहम्मद स. यांनी म्हटले आहे की आपल्याशी संबंधित नसलेल्या गोष्टीकडे कानाडोळा करणे हे एखाद्या माणसाच्या सर्वोत्तम इस्लामचे घोतक आहे. आणि म्हणूनच 'समाअ'स अनावश्यक समजून आम्ही त्याचा त्याग करतो, कारण अप्रासंगिक गोष्टींमध्ये गुंतवून घेणे हा वेळेचा अपव्यय आहे, आणि प्रियकर व प्रेयसीसाठी वेळ हा अमूल्य असतो.

इतर निवडक समंजस लोक असा युक्तिवाद करतात की 'समाअ' ऐकणे म्हणजे गप्पाष्टकच होय, आणि त्याचा आनंद म्हणजे इच्छापूर्तीची परिणती, आणि हा निव्वळ एक पोरखेळ होय. समोरासमोर समक्ष असल्यानंतर गप्पाष्टकांना काय किंमत? ईश्वर चिंतन हेच समर्पक कृत्य (कर्म) होय.

सर्वसाधारणपणे असे पाहण्यात येते की समविचारी लोकांमध्ये मैत्री-भाव असतो, तर विषम-स्वभावी लोकांमध्ये परावृत्त होण्याचा कल असतो. कधी-कधी तर उपरोक्त दोन प्रवृत्तींमध्ये आपसात वैरभाव पण असतो. ही झाली सर्वसामान्य लोकांनी गोष्ट. मात्र जे लोक महान असतात, संत-प्रवृत्तीचे असतात त्यांची वृत्ती संकुचित कदापि नसते. त्यांचे हृदय नेहमी विशाल असते. ते मानापमानास क:पदार्थ समजतात. शत्रुपक्षाचे आदर राखणे, त्यांचा सन्मान करणे हे त्यांचे ब्रीद असते. 'समाअ'स विरोध दर्शविणाऱ्या खालील दोन प्रसंगांवरून याचे प्रत्यंतर आल्याशिवाय राहात नाही. ते दोन प्रसंग पुढीलप्रमाणे आहेत –

**पहिला प्रसंग –** शाह अबुल मआली यांच्या एक उत्तराधिकाऱ्या ('ख़लीफा') ने हज्ज महायात्रेस जाण्याचा संकल्प केला. तेव्हा त्यांनी मदीना येथे महाप्रेषित मुहम्मद स. यांचे समाधि दर्शन घेताना आपला सादर 'सलाम' निवेदन करण्याविषयी सांगितले. मदीने येथे पोहोचल्यानंतर महाप्रेषितांचे समाधि दर्शन घेताना खलीफ़ाने शाहसाहेब यांचा सलाम पोहोचते केले. त्या 'सलाम'च्या उत्तरादाखल ''आपल्या उन्मार्गी ('बिदअती') गुरूस पण आमचा सलाम पोहोचते करणे.'' अशी वाणी झाली. महाप्रेषितांनी शाहसाहब यांना 'उन्मार्गी' यासाठी म्हटले की ते कधी-कधी दोन-चार काव्य-चरण मधुर गाणी स्वरूपात ऐकत असत. ('इस्लाम'मध्ये मधुर गाणे ऐकणे निषिद्ध आहे.) जेव्हा ख़लीफ़ा परत आले तेव्हा शाहसाहब यांनी त्यांना विचारले की काय तुम्ही आमचे 'सलाम' पोहोचते केले? उत्तरादाखल ख़लीफ़ा म्हणाले की महाप्रेषितांनी पण तुम्हाला 'सलाम' पोहोचविण्याचे आदेश दिले आहे. हे ऐकून शाहसाहब म्हणाले, नाही, तसे नाही. महाप्रेषितांनी जसे सांगितले आहे (तसे) त्या शब्दांमध्ये मला सांगा. ख़लीफ़ा म्हणाले, तुम्हाला तर ठाऊक

आहेच मी आणखी काय सांगणार? नव्हे, बाबा! मी तेच शब्द ऐकू इच्छितो जे महाप्रेषितांच्या तोंडामधून निघालेत. जे तुम्ही तेथे ऐकलात, तेच ऐकण्यामध्ये तर मजा आहे. हा मजा काही औरच असतो !

ख़लीफ़ा म्हणाले – प्रेषितांचा आदेश आहे की 'आपल्या उन्मार्गी ('बिदअती') गुरूस पण आमचा सलाम पोहोचते करणे.' माझ्या तोंडून हे शब्द ऐकताक्षणीच शाहसाहब वर तंद्रेची अवस्था घेरली गेली आणि त्या तंद्रामय अवस्थेमध्ये त्यांच्या तोंडून फारसी महाकवी हाफ़िज़ शीराज़ी यांचे पुढील कडवे (काव्य-चरण) निघे आणि ते म्हणत असताना भावोल्लासामध्ये मगक होऊन जात. ते परमानंदच्या सहजानंद स्थितीमध्ये पोहोचत. ते पुढील कडवे गुणगुणत –

*''बदम गुफ़्ती व ख़ूर्संदम अफ़ाक अल्ला निको गुफ़्ती*
*जवाब-ए-तल्ख़ फ़ी ज़ेबद लब-ए-लाल शकर ख़ारा ।।''*

अर्थात् तुम्ही मला वाईट म्हणालात आणि मी प्रसन्न झालो. सर्वश्रेष्ठ परमेश्वर तुम्हास योग्य प्रतिफळ (बक्षिस) देओ की तुम्ही योग्य तेच म्हणालात. सक्त-सडेतोड उत्तर हे सुंदर ओठांनाच शोभते.

**दुसरा प्रसंग** – हज़रत (श्रीमान) निज़ामुद्दीन औलिया महबूब इलाही यांच्या काळामध्ये सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश हे फार आज़ारी पडले. ते अंथरूणावर खिळून होते. जगण्याची शाश्वती नव्हती. ही बातमी समजल्याबरोबर त्यांच्या आजारपणाची विचारपूस करण्यासाठी निज़ामुद्दीन औलिया सरन्यायाधीशांच्या घरी गेले. सरन्यायाधीश कट्टर इस्लामचे पुरस्कर्ते होते. त्यांना 'उन्मार्ग' म्हणजेच 'बिदअत' मुळीच पसंत नव्हते. ते 'बिदसती' लोकांची मानहानी करीत, त्यांच्याशी घृणा करीत. निज़ामुद्दीन औलिया हे 'समाअ'चे खंदे पुरस्कर्ते होते. ते 'समाअ' नेहमी ऐकत. 'समाअ' त्यांना प्रिय होता. मात्र कट्टर इस्लामच्या दृष्टिकोनात 'समाअ' वर्जित आहे, निषिद्ध आहे. दोघांचे दृष्टिकोन या संदर्भात परस्पराविरोधी होते. सरन्यायाधीशाच्या रक्षकाने निज़ामुद्दीन औलिया त्यांना भेटण्यासाठी आले आहेत, याची पूर्वसूचना त्यांना दिली. सरन्यायाधीशांनी त्यांना परवानगी तर नाकारलीच, प्रत्युत (उलट) काही खडे बोल निज़ामुद्दीन औलिया यांना ऐकविले. हा प्रसंग पुढील प्रमाणे आहे –

भेटण्यास आलेल्या निज़ामुद्दीन औलिया यांना आपल्या रक्षका (द्वारपाल) द्वारे असे सांगून पाठविले – 'मी शेवटची घटका मोजीत आहे. अशा क्षणी मी एखाद्या उन्मार्गी – 'बिदअती'चा चेहरा पाहू इच्छित नाही.' अशी होती सरन्यायाधीशांची धार्मिक कट्टरता ! आता महबूब इलाही यांची मानापमान पचविण्याची अहंकारशून्य वृत्ती पहा. सरन्याधीशांचे उपरोक्त उत्तर ऐकून महबूब इलाही यांनी असा निरोप पाठविला की 'मी आपल्या दाराच्या उंबरठ्यावर समस्त उन्मार्गांपासून – 'बिदअतां'पासून प्रायश्चित्त करतो' जेव्हा हे वचन सरन्यायाधिशांच्या कानी पडले तेव्हा ते एकदम बेचैन झाले, व्याकुळ झाले आणि आपल्या डोक्यावरील न्यायदानाचे प्रतिनिधित्व करणारा फेटा उतरवून आपल्या सेवकाच्या हाती दिले आणि ते म्हणाले याला दिराणखान्यात अंथरून पायघड्यासाठी महबूब इलाही यांना त्याच्यावर चालवत मोठ्या सन्मानाने घेऊन या. सेवक विनम्र स्वरात सरन्यायाधीशांना म्हणाला की मान्यवर, आपण आताच तर म्हणाला होता की तुम्ही त्या (महबूब इलाही) चे तोंड पाहणे पसंत करणार नाही. मग आता हा क्रांतिकारी बदल कसा बरे घडून आला ! सरन्यायाधीश म्हणाले, 'मी फक्त महबूब इलाही यांचा चेहरा, त्यांचे 'समाअ' ऐकण्यामुळे, पाहू इच्छित

नव्हतो. जेऱ्हा त्यांनी याबाबतीत पश्चात्ताप व्यक्त केले आहे तेव्हा त्यांच्या तुलनेमध्ये त्यांच्याहून श्रेष्ठ कोण बरे प्रतिष्ठित होऊ शकेल ! कारण सदगुणी व निष्कलुष लोकांचा पश्चात्ताप हा सर्वोत्तम व सर्वश्रेष्ठ असतो.

तिकडे महबूब इलाही यांनी पण सरन्यायाधिशांनी पाठविलेल्या न्यायाचे प्रतीक असलेल्या फेट्यास अत्यंत आदरपूर्वक चुंबन घेऊन आपल्या डोक्यावर अदबीने ठेवून सन्मानपूर्वक सरन्यायाधीशापाशी पोहोचले.

या संदर्भात अब्दुर्रज़्ज़ाक असर शाहआबादी यांचे खाली दिलेले कडवे अत्यंत समर्पक वाटते. यास्तव ते उधृत करण्यात येत आहे–

*''जब तक हो मारिफ़त पे शरीअत को फ़ौक़ियत*
*समझो क़सम खुदा की, खुदा है तुम्हारे पास ।।''*

अर्थात् जोपर्यंत कर्मकांडाचे ज्ञानकांडावर वर्चस्व आहे, तोपर्यंत ईश्वर शपथ ! हे जाणून असा की परमेश्वर तुमच्या जवळ(च) आहे.

[ * अबूल हसनात सय्यद अब्दुल्ला शाहसाहब – 'मवाइज़ हस्नन' पृ. २२९–३० ]

थोरांची किती महान, अगाध थोरवी असते, याचे प्रत्यंतर उपरोक्त प्रसंग वाचल्यावर आल्याशिवाय राहात नाही. तसेच एखाद्या सिद्धांताविषयी असलेले मतभेद हे प्रतिष्ठेचे प्रश्न न मानता एक दुसऱ्याचा अत्यंत आदर व मान–सन्मान कसे राखावे याचे एक अनुपम व आदर्श उदाहरण आणि एक अत्युत्तम नमुना म्हणून वरील प्रसंगाकडे पहाता येईल. संतांचे मन–हृदय किती विशाल असते, याचे प्रत्यंतर उपरोक्त प्रसंगावरून आल्याशिवाय राहात नाही. मानापमान पचविण्याची त्यांच्यात जबरदस्त शक्ती असते, हेही दिसून येते.

### ५) चिश्तिया सूफ़ी संतांची 'समाअ'मध्ये अभिरूची आणि रसिकता

चिश्तिया सूफ़ी संतांसाठी 'समाअ' म्हणजे त्यांचा जीव की प्राण ! कारण ते संगितोपासक आहेत. ख़्वाजा हसन बस्री यांना 'समाअ' अत्यंत प्रिय होता. जेव्हा ते ऐकत तेव्हा ते भावोल्लासामध्ये –सहजानंदमध्ये जात, आणि म्हणत की – '' 'वज्द' सहजानंद एक रहस्य, गुह्य आहे. जेव्हा तो मनात निर्माण होतो तेव्हा तो त्यास विचलित करून सोडतो.'' आणि पुन्हा पुढे म्हणतात ''जो सच्च्या मनाने 'समाअ' ऐकतो तो परमेश्वरास प्राप्त होतो आणि जो वासनेने ऐकतो तो नास्तिक होऊन जातो.''

सूफ़ी अबू इसहाक़ चिश्ती मोठ्या प्रमाणात 'समाअ' ऐकत. तत्कालीन पंडितांपैकी कोणासही यांच्यावर आक्षेप घेण्यास धाडस करता येत नसे. जो माणूस एक वेळ यांच्या 'समाअ'च्या सभे (मजलिस)मध्ये हजर होत असे तो अपराध–पापांपासून परावृत्त होत असे. आजाऱ्याचा आज़ार किती का गंभीर असेना त्याचा आजार तत्काळ बरा होऊन जात असे. सांसारिक लोकांना आपल्या मजलिसमध्ये ते येऊ देत नसत, परंतु संयोगवश जर एखादा सांसारिक माणूस त्यांच्या मैफिलमध्ये आलाच तर तो संसार त्यागी बनूनच उठत असे. जेव्हा हे 'समाअ' मध्ये असताना त्यांची अभिरूची आणि भावोल्लासामध्ये प्रगती होई तेव्हा ते उभे होऊन नृत्य करू लागत. त्यावेळेस असा भास होई की दारे आणि भिंती नृत्यामध्ये आहेत. यांच्या सहजानंदच्या प्रभावामुळे श्रोते पण भावोल्लासमध्ये येत. एकदा अवर्षणाची तक्रार घेऊन तत्कालीन सुलतान आपल्या सेवेत

उपस्थित झाला. त्यांनी क़व्वालांना बोलावून घेतले. सुलतानाने 'समाअ'मध्ये उपस्थित राहण्यासाठी परवानगी मागितली असता त्यांनी ती नाकारली. कारण त्याच्या उपस्थितीमुळे दैवी कृपा अवतरित न होण्याची भिती होती. सुलतान आणि त्याचे उत्तराधिकारी निघून गेले. 'समाअ' सुरू झाला. हसहाक़ चिश्तीवर तंद्रा निर्माण झाली. सहजानंद निर्माण झाले. इकडे त्यांचे रडणे सुरू झाले तर लगेच तिकडे पाऊस सुरू झाला.

दुसऱ्या दिवशी आभार प्रदर्शनासाठी बादशाह उपस्थित झाला. ते रडले आणि म्हणाले – ''मला माहित नाही की मजकडून काय चूक झाली. कारण की बादशाह मजकडे वारंवार येत आहे.'' उत्तराधिकारी लज्जित झाला आणि रडत आपल्या घरी परत गेला. जेव्हा त्यांच्याकडे 'समाअ'ची मजलिस (सभा) आयोजित करण्याचे नियोजन होई तेव्हा तीन दिवस अगोदर श्रोते आणि क़व्वालांना सूचना दिली जाई की त्यांनी एक दिवसाआडचे उपवासव्रत ठेवावे आणि 'समाअ' सुरू होण्याअगोदर क़व्वालांकडून पश्चात्ताप व्यक्त करवून घेतले जाई.

ख़्वाजा अबू अहमद अब्दाल चिश्ती हे ज्या वेळेस 'समाअ'मध्ये असत, तेव्हा ज्याच्यावर त्यांची नज़र (दृष्टी) पडे तो चमत्कारांचा धनी बूनन जायचा. श्रद्धाहीनावर नज़र पडल्यास तो श्रद्धावंत बनून जाई. एखाद्या रूग्णावर नज़र पडल्यास तो तत्काळ निरोगी होत असे. 'समाअ'च्या अवस्थेमध्ये यांच्या झग्यामधून उज्ज्वल चमक प्रकट होई. ही चमक आकाशापर्यंत पोहोचे आणि संपूर्ण शहरास हे कळून जाई की हे संत 'समाअ'मध्ये आहेत. ते म्हणत की – जो विजय 'समाअ'च्या दारी प्राप्त होतो तो इतर कोणत्याच शुग़्ल अर्थात् योगक्रियामध्ये प्राप्त होत नही. शंभव वर्षाच्या कठोर तपस्येमुळे पण हा दर्जा प्राप्त होत नाही. 'समाअ' एक गुप्त मर्म आहे. याची ऐकण्याची ताकद सर्वसाधारण लोकांमध्ये नसते. जर मी त्याची गुपिते उघड केली तर जगाचे सर्व लोक 'समाअ'मध्ये व्यस्त होऊन जातील आणि परम दयाळू व कृपाळू परमेश्वरापासून या देणगीशिवाय दुसऱ्या कशाचीच मागणी करणार नाहीत. सरी अल सक़ती हे प्राय: येत आणि यांच्या 'समाअ'च्या मजलिसमध्ये भाग घेत.

ख़्वाजा अबू युसुफ़ चिश्ती यांच्या झग्यापासून पण प्रकाश प्रदीप्त होत असे. याच्या ज्वाला आकाशापर्यंत पोहोचत आणि लोक त्याचे निरीक्षण करीत. यांच्या मजलिसीमध्ये अबू बकर शिबली प्राय: येत आणि 'समाअ' ऐकत. यांचे वचन आहे –

''जी गोष्ट मी 'समाअ'मध्ये प्राप्त केली ती शंभर वर्षाच्या उपासनेमुळेसुद्धा प्राप्त होऊ शकत नाही.'' एका इसमाने आपल्याला विचारले की जर 'समाअ'मध्ये एवढी मोठी सुप्त शक्ती आहे तर मग सूफ़ी महान संत जुनैद बग़दादी यांनी त्याविषयी पश्चात्ताप का व्यक्त केले. तेव्हा ते म्हणाले, ''त्यांचे उत्तराधिकारी शिबली हे माझ्या मजलिस–मैफ़िलमध्ये नेहमी हजर राहून 'समाअ' ऐकतात. जुनैद यांनी 'समाअ'साठी भ्रातृ–वर्ग म्हणजेच श्रोता–गण मिळाले नाहीत म्हणून त्यांनी त्यासाठी पश्चात्ताप केले. 'समाअ'साठी ज्यास श्रोता मिळत नाहीत त्याने त्यासाठी पश्चात्ताप व्यक्त करणेच योग्य असते. परमेश्वर शपथ ! जर जुनैद माझ्या 'समाअ'च्या मजलिस (सभा)मध्ये हजर असते तर त्यांनी पश्चात्ताप मुळीच केले नसते.''

ख़्वाजा अबू यूसुफ़ चिश्ती यांच्या 'समाअ'च्या मजलिसमध्ये निरासक्त, विद्वान, पवित्राचारी आणि संत मंडळीशिवाय अन्य कोणीच सहभागी होत नसत. दरवेशांचा पहारा असे. ते सांसारिकांना आत सोडीत नसत.

जर चुकून गुपचुपणे आल्यास, तो ब्रह्मीभूत, ब्रह्मलीन होऊन जाई. ते स्वत: म्हणत की, दुराचारी, व्यभिचारी व दुश्चरित्र लोक पण माझ्या 'समाअ'च्या मजलिसमध्ये हजर होऊन कृपेचा लाभ घेत, आशीर्वाद प्राप्त करीत. अशी अवस्था असताना, इतरांविषयी काय सांगावे ! आज़ारी लोक पण बरे होऊन जात.

ख़्वाजा मौदूद चिश्ती यांच्याविषयी एके दिवशी 'समाअ'मध्ये असा प्रसंग अकस्मात घडला. ते अकस्मात लोकांच्या नजरेआड झाले. नंतर एक वयस्कर श्रोत्यांने याबाबतीत त्यांना विचारले – ''हा काय गौडबंगाल आहे?'' त्यांनी उत्तर दिले ''जोपर्यंत आदेश येत नाही तोपर्यंत (याचे) उत्तर देणार नाही.'' दुसऱ्या दिवशी ते वयस्कर गृहस्थ पुन्हा हजर झाले. तेव्हा ते उत्तरले –

''सर्वश्रेष्ठ परमेश्वराचा एक दर्जा ('मुक़ाम') आहे. 'समाअ'च्या माध्यमाशिवाय कोणताच साधक त्या टप्प्यापर्यंत पोहोचू शकत नाही. 'समाअ'चा प्रमुख जेव्हा या टप्प्यास पोहोचतो तेव्हा तो लोकांच्या नजरेआड लपून जातो. लोक समजतात की ते नज़रेआड झालेत. परंतु ते हज़र(च) असतात. प्रियकर त्यास आपल्याकडे आकर्षित करून घेतो आणि आपले कपडे त्याला नेसवून आपल्या प्रकाशामध्ये लपवून घेतो. हे एखाद्या ताऱ्याचे सूर्यप्रकाशामध्ये लुप्त होण्यासारखी आहे. अशा परिस्थितीमध्ये त्याला सर्वश्रेष्ठ परमेश्वर किंवा पराकाष्ठेचा अधिकारी दरवेश, जो ब्रह्मज्ञानाच्या पराकोटीच्या दर्जास पोहोचला आहे, यांच्याशिवाय दुसरा कोणीच पाहू शकत नाही.''

ख़्वाजा मौदूद चिश्ती हे सर्वसाधारणपणे आपले दोन्ही डोळे उघड हवेच्या दिशेत ठेवत. ते कधी रडत तर कधी हसत. त्यांचा चेहरा कधी पिवळा पडे तर कधी लाल होऊन जाई.

ख़्वाजा उस्मान हारूनी यांना 'समाअ'चा बेहद 'शौक़' होता, बेहद रूची होती ते मोठ्या प्रमाणात 'समाअ' ऐकत. 'समाअ'च्या स्थितीमध्ये ते इतक्या ताकदीने ओरडत आणि रडत की लोक आश्चर्यचकित राहत. काही विद्वानांनी यांच्या 'समाअ'विषयी बादशहाकडे तक्रार पण केली. जेव्हा ही गोष्ट त्यांच्या कानी आली तेव्हा ते 'जोश' – आवेशमध्ये येऊन म्हणाले –

'' 'समाअ' अल्लाहच्या रहस्यांपैकी एक रहस्य आहे. 'समाअ'च्या अवस्थेमध्ये मानव आणि ईश्वरादरम्यानचे असलेले पडदे बिलकुल सारले (अनावरण) जातात. 'समाअ' मुळीच मुळीच स्थगित होणार नाही. मला 'समाअ'पासून रोकण्यास कोणामध्ये सामर्थ्य आहे? मी सर्वश्रेष्ठ परमेश्वरापाशी कृपायाचना केली आहे की प्रलय दिवसा ('कयामत') पर्यंत माझे शिष्य आणि माझी संतती 'समाअ' ऐकत राहतील आणि 'समाअ'वर कोणाचेच प्रभुत्व असणार नाही.'' हे सात-सात दिवसापर्यंत एकसारखे 'समाअ' ऐकत राहत.

महान ख़्वाजा, ख़्वाजा मुईनुद्दीन हसन चिश्ती संजरी अजमेरी यांना 'समाअ'चा अत्यंत 'शौक़' होता. ते 'समाअ'चे अत्यंत रसिक होते. समकालीन विद्वान आणि धर्माचार्यांचा यांच्या 'समाअ'विषयी काहीच आक्षेप नव्हता. प्राय: निस्पृह पंडित आणि महान संत यांच्या 'समाअ'च्या मजलिसमध्ये हजर राहात आणि यांची कृपा व बर्कतीमुळे ते माला-माल (अत्यंत संपन्न) होऊन जात.

सुप्रसिद्ध सूफ़ी संत बाबा फ़रीदुद्दीन शकरगंज यांच्यासमोर 'समाअ'च्या बाबतीत विद्वानांमध्ये मतभेद असल्याची बाब मांडण्यात आली तेव्हा ते म्हणाले – ''परमेश्वर परमपवित्र आहे ! ('सुबहान अल्लाह !') त्यांपैकी एक गट जळून भस्मसात झाला, तर दुसरा अजून मतभेदामध्ये गुरफटलेला आहे.'' मूळ फ़ारसी

भाषेमधील त्यांचे वचन असे आहे -

''सुबहान अल्लाह ! यके सोख़्त व ख़ाकस्तर शुद व दीगरे हनोज़ दर इख़्तलाफ़ अस्त.'' आपल्या निधनाच्या काही दिवस अगोदर त्यांनी सुलतानुल मशायख़ निज़ामुद्दीन औलिया यांना असे सांगितले होते की, ''मी सद्गुरूंशी सद्धर्माविषयी जी इच्छा व्यक्त केली होती ती पूर्ण केली गेली. नंतर मला पश्चात्ताप झाला की 'समाअ'च्या अवस्थेमध्ये मृत्यू घडावा याचे मागणे मी का म्हणून केले नाही.''

सुलतातुल मशायख़ निज़ामुद्दीन औलिया महबूब इलाही यांना अमीर खुस्त्रोसारखा सच्छिष्य परमेश्वराने दिले होते. यांना 'समाअ' किती प्रिय होता हे सांगण्याची गरज नही. 'समाअ'च्या अवस्थेमध्ये महबूब इलाही रडत असत. यद्यपि यांच्या मजालिसमध्ये (सभेमध्ये) संगीताची वाद्ययंत्रे वाजविणे आणि टाळ्या पिटणे (वाजविणे)ची परवानगी नव्हती. तुग़लक़ शाहच्या कारकिर्दीत विद्वानांनी यांच्याशी वाद-विवाद रचला. त्यात विद्वानांना पराभव पत्करावा लागला. मौलाना फ़ख्रुद्दीन ज़र्रावी हे त्यांचे सर्वात प्रमुख उत्तराधिकारी म्हणजे ख़लीफ़ा होते. ज़र्रावी हे 'सियर-उल-औलीया'चे ग्रंथकर्ते सय्यद मुहम्मद किरमानी यांचे गुरू होते. यांनी 'समाअ' विधिसम्मत असल्याबद्दल आणि त्यांनी वर्जित -निषिद्ध आहे, असे म्हणणाऱ्यांचे विचार खोडून काढण्या-संदर्भात 'अस्लल उसूल' नावाची एक पुस्तिका लिहीली आहे. यामध्ये ते लिहितात - 'आमच्या सद्गुरूंचा 'समाअ' संगीताच्या वाद्ययंत्राशिवाय असतो.'

चिश्तिया संप्रदायाच्या साब्रिया शाखेचे महात्मा 'समाअ'च्या समस्यांमध्ये फार रस दाखवित असत. कुत्ब-ए-आलम शेख़ अब्दुल कुद्दूस गंगोही हे 'समाअ'चे सांप्रत साब्रिया पद्धतीचे मार्गदर्शक आणि प्रचारक-प्रसारक मानले जातात. ते एक फार मोठे विद्वान आणि 'समाअ'चे खंदे पुरस्कर्ते होते.

''पनाह-ए-आलमीन शेख़ अब्दुल कुद्दूस गंगोही हे पराकोटीचे ऐहिक आणि आध्यात्मिक ज्ञानी होते. ते संगीताच्या वाद्ययंत्रासह सुमधुर 'समाअ'मध्ये विपुल रस घेत. यांच्या ग्रंथांपैकी 'शरह-ए-अवारिफ़' नावाचा एक ग्रंथ आहे. यामध्ये 'समाअ' विधिसम्मत कसा आहे यांच्या समर्थनार्थ त्यांनी एक नितांत दीर्घ विवेचन प्रस्तुत केले आहे. यांच्या सुपुत्रांनी पण 'समाअ'च्या वैधतेविषयी मोठ्या जोमाने वेगळे लेखन केले आहे.'' असा अभिप्राय प्रसिद्ध सूफ़ी विद्वान काज़ी सनाउल्ला पानीपती यांनी नोंदविले आहे.

### ६) 'समाअ'मध्ये घडणाऱ्या मानसिक घटना (अवस्था) ('वारदात')

'समाअ'च्या वेळेस तीन शुभकारक गोष्टी निर्माण होतात. त्या ऊर्ध्व जगापासून श्रोत्यांवर अवतरित होतात. त्या आहेत - १) अन्वार म्हणजे प्रकाश-पुंज, २) अहवाल म्हणजे वृत्तांत आणि ३) आसार म्हणजे प्रभाव.

१) अन्वार (प्रकाश-पुंज) देवलोकापासून (आलम-ए-मलकूत) उत्पन्न होऊन आत्म्यांवर अवतरित होतात.
२) अहवाल (वृत्तांत) तप: लोकापासून (आलम-ए-जबरूत) वेगळे होऊन चित्तांवर प्रकट होतात.
३) आसार (प्रभाव) इहलोक, भौतिक जगापासून (आलम-ए-मुल्क) निर्माण होऊन शरीराच्या सर्व अवयवांना प्रभावित करतात.

आपल्या प्रभावाच्या दृष्टीने 'समाअ' दोन विभागांमध्ये विभागला जातो – १) हाजिम म्हणजे प्रभावशाली आणि २) मतकल्लुफ़ अर्थात् शिष्ट, किंवा उत्स्फूर्त

१) हाजिम म्हणजे प्रभावशाली 'समाअ' हा अशी असामान्य, असाधारण उत्तेजना आणि राग–जोश निर्माण करतो की ते वर्णनातीत असते.

२) मतकल्लुफ़ म्हणजे उत्स्फूर्त वा शिष्ट 'समाअ'चा वैभव हा आहे की त्याच्या श्रोत्याचे मन आपोआप विवशपणे प्रियकराकडे उचंबळते किंवा सद्गुरू व सन्मार्गदर्शक किंवा प्रेषित मुहम्मद स. यांच्याकडे प्रवृत्त होते किंवा सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या पावित्र्याकडे धाव घेते.

'समाअ'मध्ये ज्या अवस्था निर्माण होतात त्यांना चार प्रकारांमध्ये विभाजित केले जाऊ शकते.

१) स्वाधीनता (प्रभुत्व) आणि चेतना या दोहोंचा अभाव (नसणे).

२) स्वाधीनता (प्रभुत्व) आणि चेतना या दोहोंचे अस्तित्व (असणे).

या दोन्ही अवस्था वाईट व त्याज्य आहेत.

३) स्वाधीनते (प्रभुत्वा)चे अस्तित्व आणि चेतनेचा अभाव. (ही अवस्था पण पसंत नाही.)

४) स्वाधीनते (प्रभुत्वा)चा अभाव आणि चेतनेचे अस्तित्व (असणे).

ही (चौथी) अवस्था प्रशंसनीय, पसंत असणारी आणि श्रेयस्कर आहे. सहजानंद ('वज्द') मध्ये तल्लीन असणारा भक्त हालचालीमध्ये हतप्रभ असतो, परंतु क़व्वालची वाणी समजण्याची चेतना त्याच्यामध्ये विद्यमान असते आणि अशा तन्मय अवस्थेमध्ये आपले कपडे फाडून त्याच्या चिंधड्या करून ते क़व्वालांना देण्या इतपत शुद्ध (समज) त्याच्यामध्ये असते.

**७) 'वज्द' (सहजानंद), 'तवाजिद' (भावमग्नता, आत्म–विस्मरण), 'वजूद' (निर्वेद)**

कोणतेच संकल्प आणि प्रयत्नाशिवाय एखाद्या मन:स्थितीचे अंत:करणावर पडणाऱ्या प्रभावास 'वज्द' म्हणजे भावोल्लास वा सहजानंद असे नाव आहे. सांसारिक कर्मांमध्ये वासनेस विरोध करून विवेकाच्या साथीने लाभ उठवत ज्याप्रमाणे मानव जीवनामध्ये सुख प्राप्त करतो त्याचप्रमाणे आत्मिक आणि आध्यात्मिक कार्यांमध्ये पण वासनेस विरोध आणि विधी–निषेध आज्ञांचे अनुसरण करून जे (दैवी) प्रसाद प्राप्त होतात त्यांपासून जी सुखानुभूती अकस्मात अंत:करणामध्ये निर्माण होते, त्यास 'वज्द' अर्थात् भावोल्लास किंवा सहजानंद असे म्हणतात. बेछूट (स्वाधीन) आणि बळेच (संकोचाने) 'वज्द' म्हणजे सहजानंदची तितिक्षा (आस धरणे) करण्याचे नाव 'तवाजिद' अर्थात् भाव–मग्नता किंवा आत्म–विस्मरण आहे. हे विशेष गरजेपोटी निर्माण होते. उदाहरणार्थ, नीच किंवा तुच्छ लोकांमध्ये काही विशेष मनोदशा निर्माण करण्यासाठी 'तवाजिद'ची अपेक्षा असते. आणि कधी खालील आदेशाचे परिपालन करण्यासाठी 'तवाजिद' अंमलात आणले जाते. तो आदेश असा आहे – ''रडा. जर रडणे जमले नाही, तर रडल्यासारखे करा. (आपल्या चेहऱ्यावर रडण्याचा भाव दाखवा.)'' जणू 'वज्द'– भावोल्लासचा अभिप्राय माहित नसेल तर 'वज्द' सारखीच अवस्था बनवा आणि त्याचप्रमाणे स्वत:स 'वज्द'चे अपेक्षी असल्याचे आभास निर्माण करा, परंतु दिखावा आणि पाखंडच्या निमित्ताने (गरजेने) 'तवाजिद'चा आभास निर्माण करणे कुठल्याही परिस्थितीमध्ये निंद्य (वाईट) आहे.

सुप्रसिद्ध सूफ़ी संत ख़्वाजा निज़ामुद्दीन औलिया हे हकीगत सांगतात की अल्लाहच्या नव्याणव (९९) नामांपैकी ''अल्-वज्द'' एक नाम आहे. 'वज्द' या शब्दाचा अर्थ अल्लाह असा आहे. सर्वसाधारणपणे असे पाहण्यात येते की 'समाअ'मध्ये अधिकांश श्रोते हे 'वज्द'मध्ये लिप्त होतात. पवित्र कुराणाचे गोड, मधुर सस्वर वाचन आणि काव्यातील तालबद्धता यांच्या एकीकरणामुळे श्रोते प्रेरित होतात.

अंत:करणाच्या दृक-श्राव्य-शक्तीचे नाव 'वज्द' आहे. म्हणजेच भावोल्लास किंवा परमानंद आहे. ज्याचे परमानंद - 'वज्द' क्षीण असेल तो 'तवाजिद' करेल - भावमग्न होईल. अंतर्मनात नसलेली गोष्ट बाहेर पडण्याचे नाव 'तवाजिद' आहे, परंतु जी व्यक्ती 'तवाजिद'मध्ये प्रबळ असते ती स्थिर, अचल व दृढ असते. असे म्हणतात की 'वज्द' परमानंद लवकर निर्माण होते आणि लवकर निघून जाते, तर ब्रह्मज्ञान अखंड व कायम असते, ते घटणारे नसते. काही असे म्हणतात की 'वज्द' अर्थात् परमानंद हे परमेश्वराकडून प्रगतीस सहाय्यक आणि एक सुवार्ता असते. 'वज्द' आत्म्याची आरडाओरड आहे. ते आत्म्याचे आक्रोश आहे. आध्यात्मिक जग हे सौंदर्य- राशी असल्यामुळे सुमधुर गाण्याने आत्मा आनंदमग्न होऊन जातो.

'वज्द'चा आशय, अर्थ प्राप्त करणे असा आहे आणि 'वजूद'शी येथे अभिप्राय हा आहे की वास्तवाच्या प्रकटीकरणामध्ये भक्ताने बिलकुल (संपूर्णपणे) विलीन होऊन जावे. त्याने आपले व्यष्टि-नाश ('फ़ना') करावे.

भावमग्न व्यक्ती (साहब-ए-तवाजिद) ही समुद्राचे अवलोकन करण्यासारखी आहे.

सहजानंद व्यक्ती (साहब-ए-वज्द) ही समुद्रावर स्वार (आरूढ) झाल्यासारखी आहे.

निर्वेद व्यक्ती (साहब-ए-वजूद) ही समुद्रामध्ये सखोल बुडल्यासारखी आहे.

निर्वेद व्यक्ती ही दोन स्थितींमध्ये आपली कुशी बदलत असते - कधी तल्लीनतेमध्ये तर कधी सचेतन अवस्थेमध्ये. तल्लीनते-तन्मयतेमध्ये प्रभुदर्शनामध्ये बिलकुल निर्वाण ('फ़ना') अवस्थेमध्ये असते. इंद्रियानुभूती, समज, बोध, ज्ञान आणि विवेक यांच्याशी काहीच संबंध उरत नाही. सचेतन अवस्थेमध्ये अशी निर्वेद व्यक्ती जे काही ऐकते आणि पाहते ते सर्वश्रेष्ठ परमेश्वराच्या वशील्यानेच -माध्यमानेच ऐकते आणि पाहते. प्रथम अवस्था ही सर्वांगयोगाची किंवा ब्रह्मलीनतेची ('फ़नाफ़िल्ला') आहे, तर दुसरी ही सहज समाध्यवस्थेची ('बक़ा बिल्लाह') आहे.

### ८) सहजानंद ('वज्द') आणि संकीर्तन श्रवण ('समाअ')ची मादकता (कैफ़ियत')

'इक़्तबास-उल-अन्वार'चे ग्रंथकर्ते यांनी सहजानंद आणि संकीर्तन श्रवण विषयी अत्यंत सविस्तर व्याख्या आणि विवेचन केले आहे. त्याचा निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहे -

१) जर माणूस हा कोमल-हृदय आणि सदाचारी असेल तर संगीत श्रवणामुळे त्याचे मन अत्यंत मृदू होऊन जाते यद्यपि साधनेच्या क्रियांमुळे त्याचे अंतरंग परिष्कृत झाले नसले तरी, आणि त्याने आपले आध्यात्मिक किंवा भौतिक-ऐहिक उद्दिष्ट ठेवले नसले तरी तो रडू लागतो आणि आक्रोश करू लागतो. हे सर्व काही प्रत्येक माणसामध्येच नव्हे तर पशूच्या मनामध्ये सुद्धा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने मृदुलता ठेवल्यामुळेच घडते.

२) नवोदिक सूफ़ी सुदूरता आणि प्रेम-पात्राचे वियोग आणि अमिट क्लेशाच्या प्रचुरतेमुळे उत्तेजित होतो आणि मनस्ताप करून घेतो आणि तडफडतो आणि ओरडतो आणि त्याला त्याची जाणीव होत नाही की ही व्याकुळता कसली आहे आणि ती कोठून येते. तो प्रकट आनंद आणि रसिकतेची दादशी पण परिचित नसतो, परंतु दु:खाने तडफडत असतो आणि जोराने ओरडत असतो. ज्याप्रमाणे सरसर हवेमुळे वृक्ष डोलू लागतो किंवा रूग्ण हा भयंकर दु:खाने कण्हत बेकाबू होतो आणि विवश होऊन तडफडत असतो त्याचप्रमाणे सूफ़ीमध्ये पण विवशपणे कंपन निर्माण होतो आणि त्याची बेचैनी दिसून येते. म्हणून बाबा फ़रीदुद्दीन गंज शकर म्हणतात –

*''रक़्स तलब अस्त व रक़्स तरब अस्त. जुज़ ईं हर दो शोर व शग़ब अस्त''*

अर्थात् नृत्य म्हणजे तितिक्षा आणि नृत्य म्हणजे हर्षोल्लास. या दोहांविना कोलाहल व गोंधळ असतो.

*''अगर तू यार न दारी चरा तलब न कुनी*
*अगर बयार रसीदी चरा तरब न कुनी ।।''*

म्हणजे जर तुझा साथी नसेल तर तू त्याची इच्छा का बाळगत नाहीस? जर तुला साथी भेटला तर तू हर्षोल्लास का व्यक्त करीत नाहीस?

अशी अवस्था आहे नवोदिक सूफ़ीची. येथे व्यथा, दु:ख आणि बेचैनी – व्याकुळता याशिवाय ना प्रकाश-पुंज आहे ना गुह्य गोष्टी.

३) सूफ़ी साधक द्रष्टा लोकांमध्ये एक मनोदशा उत्पन्न होते. जेव्हा तो (सूफ़ी) अंतर्दृष्टीने वास्तविक प्रेम-पात्राचे सौंदर्य व शौभाश्री पाहतो आणि अनादि काळाचे सौंदर्याचे उद्दिष्ट पाहताच बेखुद आणि विवश बनून आपल्या मित्रा (परमेश्वरा)कडे मुग्ध व आसक्त होऊन जातो. अति उत्साहामध्ये बेहोश आणि उन्मत्त होऊन जातो. पराकोटीची व्याकुळता आक्रोश आणि दर्शन-सुखामध्ये गढून रडू लागतो आणि नि:श्वास व रोदन यामध्ये व्यस्त होतो. मग प्रियकर कधी हसतो, तर कधी रडतो, यघपि सर्वसामान्य लोकांच्या डोक्यात ते माधुर्य आणि तो सुख-आनंद यांचा गंध पण पोहोचत नाही, मात्र हेच सूफ़ीस वर-खाली करते. या पदा(अवस्थे)चा सर्वश्रेष्ठ दर्जा असतो. ही अवस्था केवळ वियोगाचीच नव्हे, तर वियोग व संयोगाची असते.

४) साधकास कधी-कधी सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून असा वेळ नशीबात असतो की वास्तविक प्रियकराचे सौंदर्य, क्रौर्याचे प्रकाश-पुंज अवतरित झाल्याकारणाने त्याला अशी अनुभूती होते की त्याचे असणे व नसणे नाश पावत आहे. त्याची बोध-वृत्ती नाहीशी होते. तो स्वत:स आपल्यामध्ये तन्मय व गाफील होऊन स्वत:स शोधू लागतो, परंतु त्याला पत्ता लागत नाही. मग त्याच्यावर आतंक पसरतो आणि आपल्या पथभ्रष्टतेशी भयभीत होतो, भिती बाळगतो, रडतो, ओरडतो, आक्रोश करतो.

*''हमी तर्सम के: 'हाफ़िज़' मह्व गर्दद*
*च: शोर अस्त ईं के: दर सर दारम इमशब''*

अर्थात् मला भय आहे की कवी हाफ़िज़ हा ध्यानमग्नतेमध्ये आत्मविस्मृत झाला आहे. आज रात्री माझ्या डोक्यात हा कसला गोंगाट भरलेला आहे !

पूर्णत्वास पोहोचलेल्या सौंदर्याच्या उत्कंठेची आग एवढी भडकते की मेण आणि ज्वालेचे दृष्टांत डोळ्यासमोर उभे राहते. जणू मेण ज्वालेशी आलिंगन देण्याच्या लालसेमध्ये वाढत जाते व विरघळत जाते,

संपूर्ण ज्वालेस पाहण्याची इच्छा ठेवते, परंतु ज्वालेच्या एका कोपऱ्यापेक्षा जास्त काही त्याची मजल पोहोचत नाही. अधिक मात्रेपर्यंत पोहोचण्याच्या इच्छेमुळे मेण हे बळेच व अनिच्छेने विरघळत जाते आणि त्याचे अहम आणि अस्तित्व विनष्ट होत जाते, परंतु त्याची इच्छापूर्ती होत नाही. ज्वालेच्या सौंदर्याचे संपूर्ण निरीक्षण होणे शक्य नसते. जळणे, तप्त होणे आणि उत्कंठा व बेचैनी आणि विरघळणे व आत्मविस्मृत होणे याशिवाय मेणाच्या हाती काहीच लागत नाही. शेवटी परिणाम हाच निघतो की मेण नाहीसे होते, बाकी उरते ज्वाला. अग्नीचा गुणधर्म धारण करून स्वत: अग्नी बनून जाण्याचा आस्वाद समस्त आस्वादांहून उच्चतर आहे आणि प्रत्येक व्यक्ती ही आपापले साहस-सामर्थ्य, आपापले पात्रतेनुसार या पराकाष्ठेस ग्रहण करते.

५) अंतर्ज्ञानी सूफ़ींसाठी कधी अशी स्थिती सादर होते की ध्यानमग्नतेमध्ये परिपूर्ण आत्मविस्मृती प्राप्त होऊन, संपूर्ण संबंधांना विच्छेद करून निरपेक्ष आत्म-विस्मृत होण्याच्या अभिलाषेमुळे पराकोटीची आतुरता निर्माण होते. ही इच्छा पूर्ण होत नाही, असे पाहून तो आक्रोश आणि विनवणी करतो. पुनरूत्थानस्वरूप ही स्थिती अकस्मात निर्माण होते. ''अल आन कमा कान'' अर्थात् माझ्याशिवाय त्याच्यापाशी इतर कोणीच नसतोच्या मन:शांतिमध्ये थोडा वेळ त्याला आराम मिळतो आणि ''ली मा अल्लाहि वक्तन'' म्हणजे अल्लाहसोबत एक असा वेळ असतो चा नगदी वेळ काही काळ त्याच्या मुठीस गरम करतो की नाही इतक्यात एकाएकी ''कुल्ल यौमिन् हुव फ़ी शानिन् '' अर्थात् प्रत्येक क्षणी तो आपल्या वेगवेगळ्या वैभवात प्रकटतोच्या आलटापालटीमध्ये ती स्थिती अचानक जात राहते (कमी होत जाते). प्रियकर हा एकाच स्थितीमध्ये स्थिर नसतो. तो बेचैन असतो. कधी बहिरंगापासून अंतरंगामध्ये तर कधी अंतरंगापासून बहिरंगामध्ये ढकलला जातो. या चक्रामध्ये तो गुरफटतो. त्यावेळेस प्रियकरावर जे काही बेतते त्यास ना कोणतीच वाणी व्यक्त करू शकते ना कोणतेच संकेत आपली भूमिका वटवू शकते. कारण की ही स्थिती ना संयोगाची आहे ना वियोगाची, परंतु त्याला 'संयोगाचे वियोग' पण म्हटले जाऊ शकते आणि 'वियोगाचे संयोग'पण.

६) ऐन भावोल्लास आणि संकीर्तन श्रवणामध्ये कधी असे पण घडते की भौतिक देहास साधकाच्या अंत:करणास होणारे सुख आणि आस्वादाची मुळीच वास्तविक अनुभूती होत नाही. कारण की साधक भौतिक जगापासून, इहलोकापासून स्थानांतरित होऊन आंतरिक-आध्यात्मिक जगामध्ये विहार करण्यात तत्पर असतो. त्या सुखाची आणि आस्वादाची जाणीव फक्त वास्तविक अंत:करणास असते, मृत्तिकानिर्मित दैहिक मनास याची बिलकुल जाण नसते. कारण ''अज़ दिल ता गिल हज़ार फ़र्सग अस्त'' म्हणजे मनापासून ते मातीपर्यंतचे अंतर हे चार हजार किलोमीटर लांबीचे असते. वास्तविक मना-अंत:करणामध्ये ज्या आंतरिक घडामोडी घडत असतात त्याची मृत्तिका - मनास काडीमात्र कल्पना नसते. बास ! पुन्हा हे होते की हर्षोल्लास येतो परंतु तत्संबंधी जो आनंद आणि गुपितांचे ज्ञान असते त्याचे वर्णन करण्याची शक्ती या भौतिक जिव्हेमध्ये नसते आणि ना या जगामध्ये अशी कोणतीच वस्तू नज़रेस पडत नाही की त्या अनुभूतीशी तुलना करून समजून देण्याचा प्रयत्न केला जाऊ शकेल. अशी अवर्णनीय व अकथनीय असामान्य अवस्था निर्माण होते.

७) काही वेळेस असे पण होते की सहजानंद, संकीर्तन आणि नृत्याच्या स्थितीमध्ये सूफ़ीची चेतना आहे तशी कायम राहते आणि जगाच्या कणांपैकी एक एक कणाशी परिचित असतो त्याची जाणीव असते, परंतु आपल्या अस्तित्वास तो विसरलेला असतो. म्हणजे स्वत:शी तो आत्म-विस्मृत होतो आणि आपल्या

अस्तित्वाची थोडीशी सुद्धा त्याला जाणीव नसते. स्वत:स अशा प्रकारे विसरून जाणे आणि विश्वाच्या कणा-कणाची जाणीव असणे ही गोष्ट परमेश्वराच्या विचित्र-चमत्कारिक बाबींपैकी एक आहे. वास्तव हे आहे की साधक ज्या वेळेस आत्मविस्मृती आणि संपूर्ण तन्मयतेमध्ये बुडून जातो त्यावेळस 'बक़ा बिल्लाह' म्हणजे सहज समाध्यवस्था त्याला प्राप्त होते आणि त्याची चेतना परत येते. अशा स्थितीमध्ये तो जे काही पाहतो आणि ऐकतो ते सर्वश्रेष्ठ परमेश्वराकडून (तर्फे) पाहतो आणि ऐकतो. आपल्या गुणांचा नाश करून तो परमेश्वराच्या गुणांमध्ये शेष राहतो. यद्यपि तो आपल्या जातीने-सत्तेने या चेतनेपासून पण अचेतन असतो आणि स्वत: दरम्यानपासून निघून जातो. बास ! अल्लाहच अल्लाह बाक़ी राहतो. अल्लाहच पुरेसा आहे, बाक़ी उत्कंठा, लालसा आणि लोभ !

## ९) 'कश्फुल महजूब' ग्रंथोक्त 'समाअ'चे विवेचन – सार

सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य दाता गंज बख़्श अली बिन उस्मान जल्लाबी हुजवीरी यांनी 'कुश्फुल महजूब' या सूफ़ी तत्त्वज्ञानपरक ग्रंथामध्ये 'समाअ'चे सविस्तर विवेचन प्रस्तुत केले आहे. यासंबंधी त्यांचे मत सार-स्वरूपात येथे मांडण्यात येत आहे-

ईश्वराने प्रेषितांच्या माध्यमातून आपला संदेश, आज्ञा लोकांपर्यंत पाठवल्या. या प्रक्रियेत सांगणे आणि ऐकणे या दोन कृती सर्वाधिक महत्त्वाच्या आहेत. दृकपेक्षा श्राव्याला सुन्नीपंथीय मुस्लिम लोक अधिक प्राधान्य देतात. हुजवीरी म्हणतात, ''काही सूफ़ी ईश्वराचा शब्द ऐकण्यापेक्षा त्याला पाहणे अधिक पसंत करतात.'' पण ईश्वराच्या दिसण्याविषयी माहिती आपण अगोदर ऐकली. स्वर्गात ईश्वराचे दर्शन होईल, हे आपण प्रथम ऐकले. ऐकण्यात सर्वोत्तम आहे ईश्वराचा शब्द, म्हणजे कुरआन. प्रार्थनेच्या वेळी प्रेषित मुहम्मद स. जेव्हा कुरआनचे पठण करीत, त्यावेळी कुरेश कबिल्यातील त्यांचा कट्टर विरोधक उत्बा हा अबू जहलला म्हणाला, ''मला खात्री आहे की, हे शब्द मानवनिर्मित नाहीत.'' कुरआन पठणाच्या प्रेषितांच्या अनुयायांवर आणि सूफ़ी संतांवर कमालीचा परिणाम झाला. मुसलमानांना कुरआन ऐकण्याची आज्ञा ईश्वराने केली आहे.

कविता, काव्य ऐकण्यावर दोन परस्परविरोधी मते आहेत. पहिले मत असे की, हदीसमध्ये कविता-काव्य ऐकण्यास बंदी नाही. प्रेषितांनी कविता-काव्य ऐकले होते. दुसरा गट या मताचे खंडण करतो. प्रेषितांना हा प्रश्न विचारण्यात आला – कविता-काव्य चांगले की वाईट? यावर त्यांनी उत्तर दिले, ''त्यापैकी जे चांगले असेल, ते चांगले आणि वाईट असेल, ते वाईट.''

ज्या वस्तूला पाहणे किंवा स्पर्श करणे वाईट असेल, त्यावर कविता-काव्य करणे व ते ऐकणेही वाईट आहे. जर या सर्व सुंदर वस्तूंवरील काव्य हे वैध असेल, तर त्यांना पाहणे, स्पर्श करणेसुद्धा वैध होते ! जर एखाद्या खऱ्या सूफ़ीने म्हटले की – कुणाच्या डोळ्यांत, गालात, तिळात आणि कुरळ्या केसांत मी ईश्वर शोधतो, आणि तेच एखाद्या ढोंगी सूफ़ीनेही म्हटले, तर ते आक्षेपार्ह आहे.

प्रेषित मुहम्मद स. म्हणत, ज्यांना आपला आवाज सुंदर करायचा आहे, त्याने मोठ्या आवाजामध्ये कुरआन पठण करावे. त्यांचे वचन आहे की, ''ज्यांना प्रेषित दाऊदजा आवाज ऐकायचा आहे, त्याने अबू मूसा अल अशरींचा आवाज ऐकावा.'' आवाजात सौम्यता आणि गोडवा मूलत: आहे. आवाजात सूक्ष्मताही

आहे, जी आत्म्याच्या सूक्ष्मतेला भिडते. भावनेला चेतवणारा आवाज नसावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते. ऐकावे कसे, याचे नियम आहेत. ऐकणाऱ्यांचे दोन वर्ग असतात – १) आध्यात्मिक अर्थ घेऊन ऐकणारे, २) भौतिक दृष्टिकोनातून ऐकणारे. दोहोंचे बरे-वाईट परिणाम आहेत. गोड आवाजाने माणसातील द्रव्य उल्लसित होते, ते जर चांगले असेल, हा उल्लास चांगला सिद्ध होतो, जर विपरीत असेल, तर वाईट ऐकण्याने खूप प्रभाव पडतो. गोड आवाजात दैवी शक्ती आहे. जे आध्यात्मिक ऐकतात, ते ईश्वरसमीप जातात. कनिष्ठ आत्म्याला संतुष्ट करणारा आवाज अधोगतीस नेतो आणि ऐकणाऱ्यात व ईश्वरात पडदा निर्माण करतो.

काही सूफ़ी गुरूंनी मत व्यक्त केले आहे की, ईश्वरावर ज्याने पूर्ण लक्ष केंद्रित केले आहे, त्याला श्रवण करण्याची गरज नसते. लक्ष केंद्रित करण्यासाठी श्रवणाची गरज सूफ़ी पंथावर नव्याने आलेल्यांना असते. श्रवणात सूफ़ींना दर्जा असतो. चमकणारा सूर्य एकच असतो, पण त्याचा परिणाम वेगवेगळ्या वस्तूंवर त्यांच्या स्वभावधर्मानुसार होत असतो. जेव्हा आध्यात्मिक परिणाम व्हावयास सुरूवात होते, तेव्हा मानवी शरीर ते स्वीकारायला तयार होत नाही. हा परिणाम हळूहळू व्हावयास हवा.

गाण्याला इस्लाममध्ये विरोध असल्याची अनेक उदाहरणे सांगितली जातात. हस्सान बिन साबित यांच्या मोलकरणीस प्रेषित मुहम्मद स. यांनी गाणी न म्हणण्यास बजावले, तर उमर यांनी गाणी म्हणणाऱ्या अनुयायास फटक्यांची शिक्षा दिली. मुआविया यांच्याकडे गाणी म्हणणाऱ्या मुली होत्या, त्याला अलींनी आक्षेप घेतला होता. गाण्यांमधून इब्लिसने पथभ्रष्ट केल्याची उदाहरणे आहेत.

गाण्यात दोन प्रकारे तल्लीन होतात. पहिला प्रकार 'वज्द' व दुसरा प्रकार 'वुजूद' आहे. वज्दचा अर्थ दुःख आणि वुजूद म्हणजे शोध होय. इच्छित बाब – प्रेयसी– न मिळण्याने होणारे दुःख म्हणजे वज्द. हे दुःख खासगी कारणामुळे नाही, ईश्वराच्या स्मरणाने होणारे आहे. दुःखाचे स्वरूप कळण्यापलीकडे आहे. खरे म्हणजे हे दुःख एक रहस्य आहे. 'वजूद' म्हणजे प्रेयसीने प्रियकरावर केलेली कृपा आहे. हुजवीरीप्रमाणे 'वज्द' प्रेमामुळे होणारी वेदना आहे. वुजूद म्हणजे वेदनेचे निराकरण आहे.

वज्दच्या सामर्थ्याहून ज्ञानाचे सामर्थ्य जास्त आहे. 'वज्द'मधील साधकाची परिस्थिती धोकादायक असते. ज्ञानी साधकाची परिस्थिती सुरक्षित असते. वज्दमध्ये साधकाला बऱ्या-वाईटाची जाणीव राहत नाही व वेडा जसा धार्मिक कायघांपासून मुक्त होतो, तसा 'वेडा' साधक कायद्यापासून मुक्त होतो. अबू यज़ीद म्हणायचे, मोठ्य मनाचा मुस्लिमेतर लोभी मुस्लिमापेक्षा अधिक चांगला आहे ! शिवली या थोर संतांबद्दल जुनैद बग़दादी म्हणायचे, ''शिबली भान हरपलेल्या स्थितीत असतात. या स्थितीच्या ते बाहेर आले की, ते इमाम बनतील व समाजाला त्यांचा खूप फायदा होईल.''

नृत्य हा प्रकार सूफ़ींमध्ये आढळत असला, तरी हुजवीरींनुसार इस्लाममध्ये आणि सूफ़ींमध्ये त्याला कुठेही आधार नाही. बेभान अवस्थेतील सूफ़ी नृत्य करीत आहेत, असा भास होतो. एवढ्या कारणावरून सूफ़ी तत्त्वज्ञानात नृत्यास संमती आहे, असा निष्कर्ष काढला गेला. बेभान अवस्थेतील हालचालींना नृत्य म्हणणे चुकीचे आहे. नृत्याच्या दरम्यान अंगावरचे कपडे फाडण्याची पद्धत आहे. आलिम (ज्ञानी)लोक अशा पद्धतीला आक्षेप घेतात. पण आपला झगा फाडून तो पुन्हा शिवण्यात त्यांना खूप आनंद आहे. अनेकदा

फाडलेला झगा नृत्यात भाग घेणाऱ्यांमध्ये वाटून दिला जातो. काही वेळा झगा न फाडताही फेकून दिला जातो. तो गाणे म्हणणाऱ्याला दिला जातो किंवा गुरू ठरवतील तसे केले जाते.

गाणे उत्स्फूर्तपणे आले, तर उत्तम. गाण्याचा उपयोग नेहमी करायचा नसतो. गाण्याच्या वेळी गुरूंची उपस्थिती हवीच. जिथे गाणे आहे तिथे सर्वसामान्य लोकांना प्रवेश देऊ नये. गायक सन्माननीय व्यक्ती हवी. भौतिक गोष्टींपासून सहभागी मुक्त हवेत. मनोरंजन हा हेतू नसला पाहिजे. कृत्रिमता बाजूस ठेवली पाहिजे. दैवी प्रभाव समजण्याची आणि सहन करण्याची पात्रता असायला पाहिजे. गाणे म्हणणाऱ्याला कोणत्याही सूचना करायच्या नसतात. हुजवीरींनी सल्ला दिला आहे की, तरूणांना समामध्ये सहभागी करून घेऊ नये. हे कार्यक्रम धोकादायक असल्याचे कारण असे की, दरवेशांचा 'समाअ' पाहण्यासाठी सज्जातून अनेक स्त्रिया जमतात. त्यांच्याकडे तरूणांचे लक्ष जाण्याची खूप शक्यता असते.

(* डॉ. अलीम वकील ''एका पथावरील दोन पंथात भक्ती आणि सूफ़ी' पृ. २५५-५८)

## १०) 'सियर-उल-औलिया' ग्रंथोक्त 'समाअ'चे विवेचन-सार

प्रख्यात सूफ़ी आचार्य सय्यद अहमद बिन मुबारक किरमानी यांनी 'सियर-उल-औलिया' नामक आपल्या प्रसिद्ध ग्रंथामध्ये सूफ़ी संतांचे चरित्र निवेदनाच्या दरम्यान 'समाअ'वर सविस्तर प्रकाश टाकलेला आहे. 'सियरूल औलिया' या ग्रंथामध्ये सूफ़ी संतांचे जीवन-चरित्र आहे. याचे लेखक सय्यद मुहम्मद बिन मुबारक किरमानी हे सुलतानुल मशायख़ (संत-श्रेष्ठ) ख़्वाजा निज़ामुद्दीन औलिया यांचे उत्तराधिकारी (ख़लीफ़ा) होते. त्यांच्या उपरोक्त ग्रंथोक्त 'समाअ' विवेचनाची. सार रूप मांडणी येथे करण्यात येत आहे.

'समाअ' हे सूफ़ींचे गूढ नृत्य असते. ते रूपक स्वरूपात ग्रहांच्या समतोल गतीचे द्योतक असते. जेव्हा सर्वश्रेष्ठ परमेश्वराने आत्म्यांना विचारले - ''काय मी तुमचा प्रभू नाही? ('अलस्तु बिरब्बिकुम') तेव्हा आत्मे हर्षभरित होऊन नाचल्याचे, पवित्र कुराणामध्ये उल्लेख आहे. परमेश्वराची वाणी प्रत्यक्ष ऐकल्यानंतर कोणता भक्त बरे हर्षोल्लासाने नाचणार नाही !

**१) 'समाअ'चे प्रकार -** प्रभावनिर्मितीच्या दृष्टीने 'समाअ'चे दोन प्रकार आहेत. १) हाजम आणि २) ग़ैर हाजम. १) 'हाजम' अर्थात् तत्काळ प्रभावोत्पादक 'समाअ'मध्ये सुरूवातीसच एकदम प्रभाव पडतो. श्रोते व गायक डोलू लागतात. याचे भाष्य करता येऊ शकत नाही. २) 'ग़ैर हाजम' अर्थात प्रभावी 'समाअ' जेव्हा आपले प्रभाव टाकतो तेव्हा गायक हा श्रोत्यास परमेश्वर अथवा त्याच्या सद्‌गुरूकडे इंगीत करतो किंवा त्याच्या मनात असलेल्या एखाद्या ठिकाणापासून आपले प्रभाव टाकतो.

सुप्रसिद्ध इस्लामी तत्त्वज्ञ फ़राबी यांनी 'समाअ'चे तीन प्रकार सांगितले आहेत -

१) 'मनहमक' म्हणजे हास्यास्पद किंवा हास्योस्पादक,

२) 'मबकी' म्हणजे करूणा व रूदन उत्पन्न करणारे, आणि

३) 'मुग़मी' म्हणजे नेणीव निर्माणकारी.

असे म्हणतात की एक दिवशी तत्त्वज्ञ फ़ाराबी हे ख़लीफ़ाच्या दरबारामध्ये तोकड्या पोषाखामध्ये घृणास्पद चेहरा घेऊन हजर झाले. अशा विचित्र पेहरावामध्ये त्यांनी 'समाअ' सुरू केले. चंग धरून वाजवू

लागले. सुरूवातीस चंग वाजविले असता सारेजण हसू लागले. नंतर त्यांनी अशा प्रकारे वाजविले की सर्वजण रडू लागले. आणि नंतर अशा पद्धतीने वाजविले की सर्वजण बेशुद्ध झाले. सर्वांना बेशुद्ध करून त्याने एका ठिकाणी आपण कोण होतो हे लिहिले आणि मग तो परत गेला. त्याने लिहिले होते, ''फ़राबी येथे आला होता.'' नंतर तो लपला. शुद्धीवर आल्यानंतर लोकांनी उपरोक्त लिखाण पाहिले. तेव्हा त्यांना कळून चुकले की हा (आलेला इसम) तत्त्वज्ञ फ़राबी होता. (सय्यद मुहम्मद बिन मुबारक किरमानी – 'सियरूल औलिया' – पृ. ५१९–२०)

एका जाणकाराचे असे मत आहे की 'समाअ' आणि 'रक़्स' म्हणजेच सूफ़ी भक्तिसंगीत आणि नृत्य म्हणजे 'मानव तप्त तव्यावर आत्म-विस्मृत होऊन उड्या मारत असतो.'

''ना मी तुला भिणार आणि ना तुझ्या प्रेमास. मी आपले प्राण तुझ्या (वियोगाच्या) व्यथेमध्ये बर्बाद करून (लुटवीन). मी माझ्या अंतःकरणामध्ये व्यथा घेऊन माती खाली जाईन, नंतर थडग्यामधून प्रेमाने उन्मत्त होऊन आपले डोके ताठ करून उठीन.'' (काव्य-चरणाचा अनुवाद)

''चंद्रमासारख्या सुंदर प्रेयसींच्या ओठावर ओठ ठेवणे, तिच्या अस्तव्यस्त झुलूपाचा (लटांचा, गेसूंचा) संकल्प करणे हे आज तरी सर्व काही ठीक आहे, परंतु उद्या पुनरूत्थानाच्या दिवशी हे काय ठीक नव्हे, कारण त्या दिवशी स्वतःस वाळलेल्या गवतासारखे आगीत भक्ष्य व्हावे लागेल.'' (रूबाई-चौपाईचा अनुवाद)

'समाअ'मध्ये क़व्वाल हा अशा प्रकारची अनेक काव्योद्धरणे प्रसंगानुसार गाऊन दाखवीत असतो. ती सर्वच्या सर्व प्रसंगोचित असतात.

**२) 'समाअ'मधील 'हाल' (तंद्रा)** – याविषयीचे विवेचन वर उपघटक ''(६)'समाअ'मध्ये घडणाऱ्या मानसिक घटना ('वारदात')'' या शीर्षकांतर्गत आलेले आहेच. तथापि पुनरावृत्तीचा धोका मोल घेऊन इथे यासंबंधी सुलतानुल मशायख़ (संत-शिरोमणी) ख़्वाजा निज़ामुद्दीन औलिया प्रणीत विचार व्यक्त करण्यात येत आहे.

संत-शिरोमणि ख़्वाजा निज़ामुद्दीन औलिया 'समाअ' तीन प्रकार असल्याचे म्हणत. १) अन्वार (प्रकाश-पुंज), २) अहवाल (वृत्तांत) आणि ३. आसार (प्रभाव) आणि हे तीन ठिकाणाहून प्रकट होतात. ते तीन ठिकाण आहेत – १) आलम-ए-मलकूत (देवलोक), २) आलम-ए-जबरूत (तपःलोक) आणि ३) आलम-ए-मुल्क (इहलोक). 'समाअ'च्या अवस्थेमध्ये आत्म्यांवर ('अर्वाह') आलम-ए-जबरूत अर्थात् तपःलोकापासून त्यांच्यात हालचाल ('हरकत') व्यक्त होते. यास 'आसार' म्हणजे प्रभाव असे म्हणतात. हे आलम-ए-मुल्क अर्थात् इहलोकामध्ये निर्माण होतात. संत-शिरोमणि असे सांगत की एकदा प्रेषित मुहम्मद स. एका धर्मयुद्धा ('ग़ज़्व')हून परतले तेव्हा त्यांनी पृच्छा केली की डफ वाजविणारा कोणी आहे काय? श्रद्धावंतांची माता आयशा यांनी डफ उचलला आणि त्या वाजवू लागल्या. याचा मतिथार्थ हा आहे की संगीत श्रवण ('समाअ') हा विजयोत्सव साजरा करण्याचा एक मार्ग आहे, एक पद्धत आहे.

ते म्हणत की 'समाअ' चार प्रकारचा असतो. १) हलाल (अनुज्ञप्त, वैध), २) हराम (वर्जित), ३) मक्रूह (अवांछनीय) आणि जायज़ (उचित). जर भावोल्लासमग्न व्यक्तीचा ओढा परमेश्वराकडे असेल तर ते 'जायज़' अर्थात उचित आहे, आणि जर त्याचा अधिक ओढा भौतिक गोष्टींकडे असेल तर ते 'मक्रूह' म्हणजे

अवांछनीय आहे, जर त्याचा ओढा सर्वस्वी ऐहिक गोष्टींकडे असेल तर ते 'हराम' म्हणजे वर्जित, निषिद्ध आहे, आणि त्याचा ओढा संपूर्णपणे – सर्वस्वी ईश्वराकडे असेल तर ते 'हलाल' अर्थात वैध, अनुज्ञप्त आहे.

म्हणून श्राव्य 'समाअ' हा वैध, निषिद्ध, उचित आणि अवांछनीय यापैकी कोणता आहे याची जाण श्रोत्यास असणे आवश्यक आहे. ते म्हणतात की 'समाअ'च्या औचित्यासाठी अनेक बाबींची आवश्यकता असते. जसे – 'मस्मा' अर्थात् गायक, गवई हा प्रौढ असावा, बालक किंवा अज्ञान नसावा आणि स्त्री पण असू नये. 'मस्तमा' म्हणजे श्रोता हे पण प्रभु–नामस्मरण करणारे असावेत. 'मस्मा' म्हणजे गाणे, गीत हे पण अश्लील आणि थिल्लर असू नये. आला–ए–समाअ म्हणजे वाद्ये (मज़ामीर) आहेत चंग व रबाब इत्यादी आणि यासारखी (इतर) वाद्ये नसावीत. अशा अटी पूर्ण करणारा 'समाअ' हा 'हलाल' म्हणजे वैध असतो. जर आवाज़ – संगीताचा ध्वनी उचित (मौज़ूँ) असेल, तर ते वर्जित वा निषिद्ध का बरे असावे?

**३) 'समाअ'चा प्रभाव** – संत – शिरोमणी म्हणत की 'समाअ'ना बिलकुल (अजिबात) वैध आहे ना बिलकुल वर्जित वा निषिद्ध आहे. परंतु असे म्हणतात की एका ज्येष्ठ नागरिकाने त्यांना विचारले की 'समाअ' काय असतो? त्यांनी उत्तर दिले की 'समाअ' चा श्रोता कोण (कोणत्या प्रकारचा) आहे, यावर हे अवलंबून आहे. ते म्हणाले संतश्रेष्ठ फ़रीदुद्दीन गंज शकर यांच्यासमोर विद्वानांमध्ये मतभेत असलेला हा मुद्दा उपस्थित करण्यात आला की 'समाअ' हा निषिद्ध आहे की वैध. ते उत्तरले की सुबहान अल्लाह ! (परमेश्वर परम पवित्र आहे !) एक जळून गेला आणि जळून राख झाला आणि दुसरा अघाप मतभेदामध्येच गुरफटलेला आहे. दोघांमधील फरक तर पहा.

सुप्रसिद्ध फ़ारसी कवी शेख सादीने म्हटले आहे –

''दृढनिश्चयी लोकांमध्ये आग लागली आणि ते त्यामध्ये जळून गेले, आणि वाईट स्वभावाचे लोक पण खिन्न आहेत, उदास आहेत.''

शिवाय संतश्रेष्ठ फ़रीदुद्दीन गंज शकर यांचे मत उधृत आहे की 'समाअ' एक असा सुयोग्य आवाज आहे की जो ऐकणाऱ्या–श्रोत्यांचे मन हेलावून सोडतो आणि प्रियकरांच्या अंत:करणामध्ये प्रेमाग्नी भडकवितो. ते म्हणत की संतांचा एक गट 'समाअ'स यासाठी उचित मानतात की ते विवश असतात, जर ते वशवर्ती असतील – जागरूक असतील तर तो समाअ निष्प्रभ होईल.

मौलाना अल्लामा अबू बरी फ़ख़्रुद्दीन ज़रादी हे संतशिरोमणि निज़ामुद्दीन औलिया यांचे उत्तराधिकारी – 'ख़लीफ़ा' होते. ते आपल्या एका पुस्तिकेत 'समाअ'चे उचित असण्यासंबंधी इमाम ग़ज़ाली यांचे मत उधृत करून लिहितात की 'समाअ'मध्ये सर्वप्रथम गोष्ट ही श्रोत्याची समज असते म्हणजेच 'समाअ'चा अर्थ श्रोत्यांच्या अंत:करणामध्ये उतरला पाहिजे. ही याची फलनिष्पत्ती आहे. भावोल्लासमुळे शरीराच्या अवयवांमध्ये कंप निर्माण होतो. याच्याही पण विविध अवस्था आहेत. हे श्रोत्याच्या अवस्थेवर अवलंबून असतात, निर्भर असतात.

**४) श्रोत्यांच्या चार अवस्था –** १) श्रोत्याची पहिली अवस्था ही आहे की तो एकाकी स्वभावाचा असावा 'समाअ'पासून सुमधुर गीताच्या आस्वादाशिवाय किंवा आनंदाशिवाय इतर कशाचीही अपेक्षा त्याला असू नये, परंतु यामध्ये अन्य (इतर) प्राण्यांचा पण समावेश आहे.

२) दुसरे हे की श्रोत्याने (त्या) गाण्याची निर्मितीचा नियत किंवा अनियत अर्थ ग्रहण करावे. हा 'समाअ' कामुक नवयुवकांचा असतो आणि हे त्यांपैकी आहे की याच्या दुष्टतेबद्दल आणि वाईटपणाबद्दल अधिक काही सांगता येऊ शकत नाही.

३) तिसरे हे की 'समाअ'च्या श्रोत्याने आपल्या मन:स्थितीनुसार समजून घ्यावे. मनोदशेमधील बदल हा परमेश्वराप्रीत्यर्थ असावआ. हा 'समाअ' आहे शिष्यांचा, विशेषत: नवशिष्यांचा कारण की शिष्यांना शेवटी गरज आपल्या अभिलाषेशी, कामनेशी असते आणि यांची मनोकामना असते परमेश्वराच्या सत्तेस ओळखणे आणि परमेश्वराच्या सत्तेपर्यंत पोहोचणे. म्हणून साधना मार्गामध्ये त्यांच्यामध्ये विविध अवस्था निर्माण होतात. उदाहरणार्थ, स्विकार व नकार, वियोग व संयोग, लोभ आणि नवीन उमेद.

४) चौथे हे की श्रोत्याचा समा ऐन ईश्वर ('हक')च होऊन जावे. इथपर्यंत की 'समाअ'च्या स्थितीमध्ये साक्षात प्रभु-दर्शनामध्ये त्याने असावे. त्या स्त्रियांसारखी त्याची अवस्था व्हावी की ज्यांनी प्रेषित यूसुफ़ यांचे अप्रतिम सौंदर्य पाहून बेभान होऊन आपल्या हाताची बोटे कापून घेतली होती आणि याची त्यांना मुळीच खबर नव्हती. या टप्प्याचे धनी यांनी निर्वाण, कैवल्यावस्था व्यष्टि-नाशाचा अवस्था पार केलेल्या असतात. हा टप्पा आहे त्या सुयोग्य पोहोचलेल्या लोकांचा जे प्रभूस येऊन मिळतात.

**५) 'समाअ'च्या अटी व नियम –** संतशिरोमणि निज़ामुद्दीन औलिया म्हणत की 'समाअ'च्या काही अटी आहेत – वेळ निश्चिंत असावा आणि कोणत्याही प्रकारचा संभ्रम नसावा. जागा पण मनमोहक असावी की पाहताच चित्त प्रसन्न होऊन जावे. श्रोत्यांची धारणापण एकसमान असावी. म्हणजेच 'समाअ'मध्ये सुयोग्य अभिरूची ठेवणारे श्रोते असावेत. ते म्हणतात की 'समाअ'च्या मैफिलीमध्ये बसताना सुगंध अर्थात् अत्तर वापरावे. स्वच्छ कपडे नेसावेत. मौलाना फ़ख्रुद्दीन जरादी हे आपल्या पुस्तिकेत लिहितात – दुसरा नियम (शिष्टाचार) हा आहे की 'समाअ' मन:पूर्वक ऐकावे. इतर श्रोत्यांकडे कमी लक्ष घावे, कानाडोळा करावे. स्वेच्छेने मान झुकवून अदबीने बसावे. जसे की विचारमग्न अवस्थेमध्ये साधक बसलेला असतो. त्याचे अंत:करण नृत्य आणि इतर सर्व हालचाली आणि उद्देशांशी तडजोड करणारे नसावे. यथाशक्य मैफिलीमधून उठू नये आणि रडू आले तर जोराने रडू नये. ही ती जागा आहे जेथे त्याच्यामध्ये इंद्रिय-निग्रहाचे सामर्थ्य असावयास हवे. नृत्य किंवा स्थितप्रज्ञावस्थेच्या शिष्टाचाराशी समानता राखावी. म्हणजेच उपस्थितांपैकी एखादा श्रोता खऱ्या भावोल्लासामध्ये उभा होत असेल तर भावोल्लास व्यक्त करण्याच्या हेतूने त्याचे पण अनुसरण करावे.

**६) 'समाअ'चे वास्तविक स्वरूप –** 'सियरूल औलिया'चे ग्रंथकर्ते सय्यद मुहम्मद बिन मुबारक किरमानी यांनी मौलाना फ़ख्रुद्दीन ज़रादी यांचे 'रिसाला समाअ' नावाची पुस्तिका वाचली आहे. या ग्रंथाविषयी आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना ते लिहितात की काही वेळेस माझी अशी अवस्था व्हायची की जी सर्वश्रेष्ठ प्रभूचे आज्ञापालन आणि माझ्या दरम्यान असायची. श्रद्धेच्या प्रकाशाचा उजेड व अपराधाचा काळोख आणि अंधार इत्यादी पण जे भक्ताच्या अवस्थेसाठी घातक आणि हानिकारक असते. म्हणून ''सुसह्य'' (''तहमील'') शब्दांवर त्याचाच अधिकार असतो ज्याची बुद्धी शब्दांच्या बाह्य अर्थाच्या आधारे त्यांच्या अंतस्त अर्थांना समजू शकते. विशेषत: ईश्वराचे दैवी आदेश योग्य त्या अर्थांमध्ये समजू शकतो. शेवटी

काव्यचरणांचे अर्थ शब्द हे ''उपमामूलक शब्द'' (''तश्बीही अल्फ़ाज'') असतात. त्यांचा अभिप्राय त्याच्याशी यथायोग्य गोष्टीशी असतो, यद्यपि त्यांचे बाह्य अर्थ वेगवेगळे असतात. शेवटी सर्वसाधारण लोकांसाठी ते वास्तवाच्या अधिक जवळ आणि मनावर अधिक प्रभाव टाकणारे सिद्ध होतात. कारण की ते तुमचे विचार आणि अनुमान यामध्ये नसलेली गोष्ट ते तुम्हास दाखवितात. जणू परोक्ष हा प्रत्यक्षाच्या पोशाखामध्येच आहे आणि याच कारणास्तव सर्वश्रेष्ठ परमेश्वराने पवित्र कुराण आणि इतर दिव्य ग्रंथांमध्ये या दृश्यांचा फार अधिक प्रमाणात उपयोग केला आहे आणि हीच स्थिती महाप्रेषित मुहम्मद स. आणि इतर संदेष्ट्यांची आहे.

''आम्ही असे दृष्टांत लोकांसमोर ठेवतो की जे त्यांच्यासाठी आज्ञास्वरूपात असतात, परंतु ज्ञानी लोकांशिवाय इतर (हे) समजू शकत नाहीत.''

(सय्यद मुहम्मद बिन मुबारक किरमानी – 'सियरूप औलिया' पृ. ५११-१४)

''प्रेमाच्या राज्यात नावे ठेवण्यास परवानगी नाही. जो कोणी साहसी द्रष्टा असेल तो कशाला बरे नावे ठेवील? प्रत्येक अपराध्यास प्रेम-व्यवहार शोभत नाही. प्रेमी जनांचे लक्षण दुरूनच दिसतात. 'निज़ामी' यथाशक्य सदाचारी बन (धर्मनिष्ठ हो), कारण सदाचाराचा प्रकाश अंत:करणासाठी दीपक आहे.''

(ख़्वाजा निज़ामुद्दीन औलिया यांच्या एक 'क़सीदा'चा स्वैर अनुवाद.)

### ४) 'समाअ' ख़्वाजा बंदा नवाज़प्रणीत दार्शनिक विवेचन[८०]

### 'समाअ' (भक्ति-संगीत) – सूफ़ी तत्त्वज्ञान

### अ) सूफ़ी मतभेद (वादंग)

'समाअ' हा अरबी क्रियापद 'समीअ'पासून व्युत्पन्न झालेला शब्द आहे. याचा अर्थ 'ऐकणे' किंवा 'श्रवण' असा आहे. हा शब्द पवित्र कुरआनमध्ये आढळत नाही, परंतु प्राचीन अरबी भाषेमध्ये संगीत-वादन किंवा संगीत-सभा या अर्थी 'समाअ' हा शब्द प्रचलित असल्याचे वाटते. याचा उल्लेख सुप्रसिद्ध विद्वान इमाम हाफ़िज़ जमालुद्दीन अबुल फ़रज अब्दुर्रहमान इब्न अल्-जोज़ी अल्-बग़दादी यांच्या ''तल्बीस इब्लीस'' (शैतानी षडयंत्र) या ग्रंथामध्ये सापडतो. (पृ. २९१-९२) इस्लाम-पूर्व युगामध्ये सुद्धा संगीतकारांचा एक व्यावसायिक वर्ग असल्याचे आपणास आढळते. सनातनी इस्लाममध्ये संगीत बिलकुल वर्जित असल्याचे सर्वमान्य असतानासुद्धा ख़लीफ़ांच्या शासनकाळामध्ये या वर्गास फार मान-सन्मान होता. शिवाय, ख़लीफ़ांच्या शाही दरबारांमध्ये गायकांना राजाश्रय प्राप्त होता. [H. G. Farmer - 'Music : The Legacy of Islam' - pp 358, 362]

'समाअ' (संगीत)च्या वैधतेविषयी (संबंधात) इस्लाममध्ये फार मोठे वादंग-मतभेद आहे. नवव्या ईस्वी शतकाच्या उत्तरार्धात किंवा दहाव्या ईस्वी शतकाच्या पूर्वार्धात जेव्हा सूफ़ी संप्रदायांमध्ये 'समाअ'स एक आध्यात्मिक सराव स्वरूपात स्वीकृती मिळाली तेव्हा या समस्येस फार मोठे महत्त्व प्राप्त झाले. भावोल्लास किंवा सहजानंदाच्या माध्यमाने दैवी प्रकटीकरणाचे संगीत-श्रवण हे एक माध्यम मानले गेले. अशा प्रकारे, सूफ़ीवादामध्ये धार्मिक भावना आणि भावोल्लास – सहजानंद निर्माण करण्याच्या हेतूने संगीत ऐकणे, त्याचे

श्रवण करणे, गाणे म्हणणे, सुरावर लयबद्ध प्रार्थना किंवा गाणे म्हणणे आणि प्रमाणबद्ध-मोजके पाठांतर म्हणजे 'समाअ' असा पारिभाषिक अर्थ प्राप्त झाला आणि याशिवाय गोड-सुमधुर गळा किंवा वाद्य-यंत्राच्या मदतीने गाणे म्हणण्यास 'समाअ' असे नामाभिधान प्राप्त झाले.

एक अनुष्ठान किंवा कर्मकांड या दृष्टीने 'समाअ' सूफ़ींमध्ये फार लोकप्रिय झाला. परिणामस्वरूप त्याच्या वैधतेसंबंधी विविध मते समोर आली. शेवटी 'समाअ' विषयी वेगवेगळे पैलू चर्चेमध्ये आले – सहजानंदाच्या अवस्थेमध्ये कपडे फाडणे, नाचणे (नृत्य करणे) आणि अशाच प्रकारे इतर क्रिया. रॉबसन. जे. यानी आपले आंग्ल भाषेत भाषांतरित ग्रंथ 'Tracts on Listening to Music' (मूळ ग्रंथ इब्न अली अल् दुनियाकृत ''दहम्म अल् –मलाही'' हा आहे) मध्ये असे संकेतित केलेले आहे की मतभेदाचे मूळ या तथ्यामध्ये दडलेले वाटते की संगीताचा संबंध सर्वसाधारणपणे दारू, अनीति, धर्मादेशांची अवहेलना आणि इतर दुर्गुणांशी जोडले गेलेले आहे. सुप्रसिद्ध सूफ़ी आचार्य हुजवीरी (मृत्यू इ.स. १०७२) यांना पण असे वाटले की 'समाअ'मुळेच धर्म अनिवार्य ठरले आणि 'समाअ' एक प्रकारचे मनोरंजन, करमणूक ठरल्यामुळे ते सर्व अनीतिचे मूळ ठरले.

सुरूवातीच्या स्त्रोतांपासून असे स्पष्ट दिसते की काही सूफ़ींना 'समाअ' हा एक सूफ़ी अनुशासन – शिस्तीचा भाग असण्याऐवजी तो एक करमणुकीचा साधन जास्त प्रमाणात आहे असेच वाटले होते. माहितीच्या अभावी अशा सूफ़ींची नावे देणे हे अशक्य आहे, परंतु सनातनी सूफ़ींकडून याबाबतीत आक्षेप घेतल्याचे आणि त्यांच्याकडून तंबी दिली गेली असल्याचे आपणास दिसते. उदाहरणार्थ, हुजवीरी त्यांना ''मूर्ख महत्त्वाकांक्षी'' म्हणून संबोधतात आणि इतरत्र त्यांनी 'समाअ'स आपला धर्म बनविल्यामुळे, नावे ठेवली आहेत. येथे अबू बक्र अल –कलाबाज़ी या सूफ़ींचा उल्लेख करता येईल. 'समाअ' विषयी ते फारसे आग्रही वाटत नाहीत. ते म्हणतात की, 'समाअ' हा आध्यात्मिक – आत्मिक क्षणाच्या थकल्यानंतरचा एक विसावा असतो, आणि ज्यांना आध्यात्मिक अवस्थांची अनुभूती असते त्यांच्यासाठी एक करमणूक-मनोरंजन असतो, त्याचप्रमाणे जे इतर ऐहिक गोष्टींमध्ये व्यस्त असतात त्यांच्यासाठी विवेकास जागरूक करण्याचा एक साधन असतो.

याशिवाय, स्वतः विधीज्ञ आणि सूफ़ींनी याच्या धोक्यांची कल्पना देऊन सुद्धा सामान्य लोक अशा संमेलनामध्ये भाग घेतात. परिणामी, विधीज्ञ आणि कायदेपंडितांनी सूफ़ींवर आपले पक्के निशाण साधले. लोकांमध्ये संगीत-श्रवणाची गोडी निर्माण करण्यामध्ये सूफ़ींचा काही अंशी हात होता, हे खरे आहे, परंतु हे लक्षात ठेवले पाहिजे की स्वतः अरबांमध्ये (अरब लोकांमध्ये) संगीत ही एक उन्नत कला म्हणून अगोदरपासून प्रचलित होती.

तथापि रॉबसन यांनी निर्दिष्ट केल्याप्रमाणे, सूफ़ींनी 'समाअ'चे मनोरंजन किंवा कलास्वरूपातील विरोधक आणि समर्थक यांच्यामधील मध्यम मार्गाची भूमिका पत्करली. सूफ़ींना त्या स्वरूपात रस नव्हता. अधिक विषयासक्त आनंद उपभोगण्यासाठी 'समाअ'चा उपयोग करून घेणाऱ्या प्रवृत्तीस दोष देण्यास सूफ़ी प्रवृत्त झाले. परंतु सर्व प्रकारचे संगीत निषिद्ध आहे, असे मानणाऱ्या लोकांशी ते अत्यंत उत्साहाने झगडले, कारण जर संगीताचा समुचित उपयोग करण्यात येत असेल तर, ते माणसाच्या मनात हेलावून सोडून त्याला आध्यात्मिक उच्च पातळीपर्यंत पोहोचविण्यापर्यंतची शक्ती त्यामध्ये असते, अशी त्यांती धारणा होती. एका

दृष्टीने सूफ़ींची मान्यता न्याय होती. ते एका कोंडीमध्ये सापडले होते - पवित्र कुराणोक्त नसलेले 'समाअ'चे आयोजन कसे समर्पक आहे, हे त्यांना दाखवून द्यावे लागत असे, तरी पण, सूफ़ींसाठी त्याचे आध्यात्मिक मूल्य इतके मोठे होते की ते त्यांच्याकडून त्याज्य होऊ शकत नव्हते. तथापि, सर्वसाधारण लोक आणि अननुभवी नवशिक्यांना 'समाअ'पासून त्यांना परावृत्त पण करावे लागायचे.

अशाप्रकारे 'समाअ' हे विधिसम्मत आहे की अनुज्ञप्त आहे याविषयी विधीज्ञ आणि सूफ़ींमध्ये वादविवाद सुरू झाले. आपल्या युक्तिवादांच्या समर्थनार्थ दोन्ही गटांना कुरआन, अहादीस (प्रेषित-वचने) आणि सुन्नाः (प्रेषित आचरण) यांचा आधार घ्यावे लागले. कुरआनमध्ये प्रत्यक्षपणे संगीताच्या विरोधात काहीच सांगितले गेले नाही, तर प्रेषित-वचनांमध्ये दोन्ही बाजूं (समर्थन आणि विरोधा)मध्ये मते नोंदविलेली आढळतात. या मतभेदाचा एक रोचक पैलू असा आहे की एकाच कुरआनी श्लोक किंवा प्रेषित-वचनाचे स्पष्टीकरण दोन्ही गट (पक्ष) आपापल्या परीने वेगळ्या तऱ्हेने करतात. उदाहरणार्थ इब्न अल्-जोज़ी अल्-बग़दादी (मृत्यू इ.स. १२००) हे 'समाअ'चे समर्थन आणि खंडन करता येऊ शकणारी अशी सूफ़ी नेहमी नमूद करीत असलेली काही प्रेषित-वचने नोंदविली आहेत. अहमद अल्-ग़ज़ाली (मृत्यू इ.स. ११२४ वा ११२६) यांनी आपले ग्रंत ''बवारिक़ अल्-इल्मा''मध्ये कायदेपंडितांनी नमूद केलेल्या कुरआनी श्लोकांचे आणि प्रेषित-वचनांचे खंडन केले आहे. त्याच वेळेस त्यांनी आपल्या समकालीन कायदेपंडितांवर प्रखर टीका पण केली आहे.

कुरआन आणि प्रेषितवचनांचे दाखले याशिवाय या गटांनी 'समाअ'चे आयोजन वैध आहे किंवा वर्जित आहे हे त्यांना प्रेषितां (मुहम्मद स.) कडून आपल्या स्वप्नात समजल्याचे दिले आहेत. मिंमशद अल्-दीनोरी (मृत्यू इ.स.९१२) यांनी आपल्या स्वप्नामध्ये प्रेषितांनी 'समाअ'स मान्यता दिल्याचे सांगून, तो सुरू करण्याअगोदर व त्याच्या शेवटी कुरआन पठण करण्याचा सल्ला पण दिला आहे. एका गूढ समाध्यवस्थेमध्ये प्रेषितांनी 'समाअ'ची परवानगी मागितली असता ती दिल्याचे बंदा नवाज़ गेसू दराज़ यांनी पण सांगितले आहे. याउलट अबुल क़ासिम अल्-कुशेरी (मृत्यू इ.स. १०७४) यांनी एका सूफ़ीस प्रेषितांना 'समाअ' अमान्य असल्याचे स्वप्नात समजले, या घटनेचा उल्लेख केला आहे.

'समाअ'चा शैताना(इब्लीस)शी संबंध असल्याचे वारंवार सांगितले जाते. अबू अल्-हारिस अल्-बुनानी (मृत्यू इ.स. ९०९) यांनी इब्लीसने नृत्य-संगीताच्या मैफिलीमध्ये सहभाग होण्याविषयीचे निमंत्रण दिले होते. ही घटना हुजवीरी उधृत करतात. शेवटी इब्लीसने अल्-बुनानी यांना असे म्हटल्याचे सांगितले जाते की, ''मी सदाचारी लोकांना पथभ्रष्ट करतो आणि त्यांना चूक करावयास भाग पाडतो.'' यानंतर अल्-बुनानी यांनी 'समाअ'मध्ये कधीच भाग घेतला नाही. शहाबुद्दीन उमर अल्-सुहरवर्दी (मृत्यू इ.स. १२३४) यांनी अल्-जुनैद अल्-बग़दादी (मृत्यू इ.स. ९१०) यांच्या एका स्वप्नाविषयीच्या अशाच प्रकारचे एक उपाख्यान नमूद करताना म्हटले आहे की, इब्लीस हा सूफ़ीमध्ये दोन प्रसंगी मिसळून जातो - एक तर 'समाअ'च्या प्रसंगी (वक़्त अल्-समाअ) आणि दुसरे नजरेसमोर (इन्द अल्-नज़र).

'समाअ'मध्ये सहभाग घेऊ न इच्छिणारे असे सूफ़ी पण आपणास आढळून येतात. ते समर्थक आणि विरोधक यांच्या दरम्यान एक तटस्थ भूमिका घेतात. अबू नस्र अल्-सर्राज (मृत्यू इ.स. ९८८) हे त्यांच्या भूमिकेची कारणे देतात. अल-जुनैद, सरी अल-सक़ती (मृत्यू इ.स. ८६७) आणि जुन्नून अल-मिस्री (मृत्यू

इ.स. ८६०) सारखे सुप्रसिद्ध सूफ़ी संत 'समाअ'मध्ये भाग घेत असताना, तुम्ही 'समाअ' का नाकारता, याचे कारण अबू अल्-हसन बिन सलीम यांना विचारले असता त्यांनी उत्तर दिले, ''मी त्यास अमान्य कसे करीन?'' मुह्यी अल्-दीन इब्न अल्-अरबी (मृत्यू इ.स. १२४०) यांनी जरी 'समाअ'चे संपूर्णपणे निषेध केले नसले तरी त्याचे समर्थन केले नाही.

## (१) बाह्य पैलू

### क) सर्वसाधारण आणि नवखे लोकांचा 'समाअ'

संगीताच्या प्रभावाची सूफ़ींना कल्पना होती. आध्यात्मिक प्रशिक्षण आणि अनुशासन नसलेल्या लोकांसाठी ते अत्यंत हानिकारक पण होऊ शकेल, याची पण त्यांना कल्पना होती. कुरआनोद्‌भव नसलेले एक कर्मकांड अंगिकारणे, आणि त्यामध्ये लिप्त होण्यास सामान्य लोकांना परवानगी देणे, याबाबतीत धार्मिक कायदेपंडितांनी सूफ़ींवर हल्ला केला. म्हणून सर्वसाधारणपणे सामान्य जनतेस यापासून परावृत्त करण्याची गरज सूफ़ींना भासली. अशा प्रकारे 'समाअ'च्या वैधानिक पैलूविषयी चर्चा सुरू झाली.

सर्वसाधारणपणे, 'समाअ'चे तीन प्रकारे वर्गीकरण करण्यात आले आहे. उदाहरणार्थ, अबू तालिब अल्-मक्की यांनी याचे वर्गीकरण वर्जित वा निषिद्ध (हराम), अनुज्ञप्त वा वैध (हलाल) आणि संदेहास्पद (शुबः) जे आपली इच्छा, कामना आणि वासनापूर्तीसाठी 'समाअ'मध्ये भाग घेतात, त्यांच्यासाठी तो 'निषिद्ध' आहे. जे आध्यात्मिक प्रबोधन प्राप्त करू इच्छितात, त्यांच्यासाठी तो ''वैध'' आहे, जर तो आपली धर्मपत्नी किंवा एखादी दासी-कन्याकडून ऐकविला जात असेल तर त्याच्यामध्ये मनोरंजनाचा पैलू असल्यामुळे ''संदेहास्पद'' आहे.

अबू अली अल-दक़्क़ाक़ (मृत्यू इ.स. १०१५) यांच्या मते 'समाअ' सर्वसाधारण लोकां (अल्-अवाम)साठी निषिद्ध यासाठी आहे की त्यांचा आत्मा हा विषयासक्त असतो, तो तपोनिष्ठांसाठी याकारणास्तव अनुज्ञेय असतो की त्यांची आध्यात्मिक धडपड ही वास्तविक असते, आणि जागरूक-सचेतन अंत:करण असल्यामुळे तो सूफ़ींसाठी विधीसम्मत आहे.

याशिवाय 'समाअ'चे वैध असण्यासंबंधी (वैधतेविषयी) नियम आणि अटी निर्धारित करण्यात आल्या आहेत. 'समाअ'चे आयोजन करण्यासंबंधी जुनैद यांनी तीन अटी सांगितल्या आहेत – १. वेळ (ज़मान), २. स्थळ-जागा (मकान) आणि ३. बंधु अर्थात् श्रोतृ-वर्ग (इख़्वान) अहमद अल्-ग़ज़ाली आणि त्यांचे बंधु मुहम्मद अल्-ग़ज़ाली (मृत्यू इ.स. ११११) हे दोघे त्यांच्याशी सहमत होते.

मुहम्मद अल-ग़ज़ाली हे वेळ, स्थळ व श्रोतृवर्गाविषयी सविस्तर प्रतिपादन करतात. **१) वेळ** – जेवणाच्या वेळी, प्रार्थनेची वेळ असताना किंवा इतर कामांत गुंतले असताना 'समाअ'चे आयोजन करू नये. **२) स्थळ** – जागा अवांछनीय किंवा अंध:कारमय असू नये. ते एखादे अन्यायी, दुष्ट माणसाचे घर असू नये किंवा एखादा सार्वजनिक रस्ता असू नये. (राहगुजर) **३) बांधव अर्थात् श्रोतृ-वर्ग** – सहभागी होणारे लोक हे संगीत श्रवणास योग्य असणे आवश्यक असते (अहल-ए-समाअ). इहलोलुप लोकांचा जमाव नसावा. स्त्रिया असू नयेत. 'समाअ'ची टीका करणारे लोक नसावेत. त्याची अनुभूती घेण्यास उत्सुक असे लोक असावेत.

सूफ़ींसमोर उपस्थित झालेली दुसरी ठळक समस्या म्हणजे नवागतांना 'समाअ'मध्ये सहभाग घेण्याची परवानगी द्यावी की नाही. अननुभवी असल्यामुळे आणि ऐहिक इच्छा-आकांक्षा कार्यरत असल्यामुळे, सूफ़ी वर्तुळामध्ये दीक्षित असून सुद्धा, नवागतांसंबंधी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. याबाबतीत वेगवेगळी मते दिसून येतात.

जुनैद यांचा असा विश्वास असल्याचे सांगितले जाते की जेव्हा एखादा नवागतास 'समाअ' प्रिय असल्याचे तुम्हास दिसल्यास, तुम्ही हे समजून घ्यावे की त्याच्यामध्ये आळसाचा अंश अद्याप बाकी आहे. 'समाअ' हा नवागतांपेक्षा निष्णात लोकांचा सराव असल्याचे कुशेरी हे अधिक भर देतात. अबू तालिब अल्-मक्की हे हुजवीरी यांच्या मताशी सहमत होऊन असे मत मांडतात की 'समाअ'चा संगीत जलसा ऐकण्यास नवागतांना परवानगी न देणेच श्रेयस्कर आहे... अशा संगीत-सभा अतिशय घातक आणि नीतिभ्रष्ट असतात.. मुहम्मद अल्-ग़ज़ाली यांच्या मते ''अंत:करणाची अवस्था'' (अहवाल-ए-दिल) प्राप्त न केलेल्या एखाद्या शिष्यास 'समाअ'मध्ये हजर राहण्यास मुळीच परवानगी देऊ नये. शहाबुद्दीन उमर अल-सुहरवर्दी हे पण नवदीक्षित शिष्यासाठी 'समाअ'मधील उपस्थितीस फेटाळून लावतात.

दुसरीकडे काही सूफ़ी नवागतांना 'समाअ' ऐकण्यास काहीच हरकत नसल्याचे काही सूफ़ींचे मत असल्याचे आपणास आढळते. अबू सईद इब्न अबी अल्-ख़ैर (मृत्यू इ.स. १०४९) हे त्यापैकी एक होत, आणि दुसरे शेख़ याच्या अतिरेकास आक्षेप घेतात. अबुल नसर अल-सर्राज यांनी काही अटींच्या अधीन राहून नवागतांना 'समाअ' ऐकण्याची परवानगी असावी असे आपले मत मांडले आहे. नवागतांवर नियंत्रण राखण्यासाठी 'समाअ'मध्ये सद्गुरूंची उपस्थिती अनिवार्य असल्याचे ते म्हणतात. अहमद अल-ग़ज़ाली पण याबाबतीत अत्यंत उदार होते. नवागतांना 'समाअ' ऐकण्यास प्रोत्साहित करावे अशा मताचे ते होते.

तरी देखील, असे म्हणावेसे वाटते की जरी सूफ़ींना 'समाअ' प्रिय होता, तरी पण जे या अनुष्ठानास फार सहजपणे घेतात किंवा फक्त मनोरंजनासाठीच हे अनुष्ठान आहे, अशी त्यांची धारणा असते अशा लोकांना समज देऊन त्यांच्याविषयी आक्षेप घेण्यात आले आहेत.

**ख) संगीत वाद्ये**

संगीत-वाघे वाजविण्याचा प्रकार हा नेहमी मतभेदाचा मुद्दा राहिलेला आहे. सर्वसाधारणपणे सर्व वाद्ये वर्ज्य आहेत, निषिद्ध आहेत, असे इस्लामच्या विधितत्त्वज्ञांचे मत आहे. त्यांनी फक्त डफ व खंजरी वाजविण्यास आक्षेप घेतला नाही. हे पण विवादास्पद आहे.

तरी देखील 'समाअ'च्या मैफिलीमध्ये डफचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जाई. उदाहरणार्थ अहमद अल्-ग़ज़ाली यांनी डफ सोडून, इतर सर्व लक्ष विकेंद्रित करणारी वाद्ये, निषिद्द मानली आहेत. इतरत्र, ते म्हणतात की धातुचे पत्रे नसलेले डफास पूर्णपणे मोकळीक आहे. परंतु याच्या समर्थनार्थ किंवा विरोधात कोणताच पुरावा नसल्यामुळे, ते पण अनुज्ञेय आहे. त्यांनी फ़ारसी पावा-बासरी वाजविण्यास पण परवानगी दिली आहे. इब्न अल्-दुनिया (मृत्यू इ.स. ८९४) डफसहित सर्व वाद्ययंत्रे निषिद्ध मानली आहेत. हुजवीरी लिहितात की जर करमणुकीचा हेतू नसेल तर सर्व वाद्ययंत्रे 'समाअ'मध्ये अनुज्ञेय-वैध आहेत, याबाबतीत धर्माचार्य सहमत आहेत. भारतामध्ये, शेख निज़ामुद्दीन औलिया यांनी कोणत्याच वाद्यास परवानगी दिली

नाही. त्यांचा असा विश्वास होता की ''आस्वाद'' आणि ''वेदनेच्या रसिका (साहब-ए-ज़ौक़ व दर्द) साठी वाद्ये ही आनंद, सुख देणारी साधने नसतात.

**ग) काव्य**

दुसरा विवादास्पद विषय म्हणजे काव्याचे गुणगुणणे वा लयबद्ध गाणे - काव्यापेक्षा कुराआनाचे पठण श्रेयस्कर नव्हे काय? स्वर माधुर्ययुक्त काव्य, मंजुळ गायनासह काव्याचे सूफ़ींसाठी आपले महत्त्व आहेच. विशुद्ध संगीत पसंत करण्यात येत नसे. म्हणून काव्य-चरणांचे भाष्य आवश्यक मानले गेले. ते कुरआन किंवा काव्य किंवा दोन्ही असे.

हुजवीरी विचारार्थ पुढे मांडतात, ''चित्तास सर्वोत्तम श्रवण आणि ऐकण्यात सर्वोत्तम आहे ईश्वराचा शब्द'' ते पण काव्य अनुज्ञेय असल्याचे म्हणतात. ते पुढे म्हणतात, ''नीति, कळकळीचे उपदेश, ईश्वरी संकेतांपासून काढलेले निष्कर्ष, सत्याचे साक्षी असलेले चिंतन-मनन गद्यामधील हे सर्व जसे विधिसम्मत आहेत, तद्वत काव्यामध्ये सुद्धा वैध आहेत. अबुल नसर अल सर्राज यांना पण संगीताचा सुरांसह काव्याचे मंजुळ गायन आक्षेपार्ह वाटत नाही. अबू तालिब अल-मक्की धार्मिक प्रवृत्तीच्या ग़ज़ला (भाव-गीते) ऐकण्यास ''शंकास्पद'' श्रेणीमध्ये टाकतात. यूसुफ इब्न अल-हुसैन अल-राज़ी (मृत्यू इ.स. ९१६) यांचे एक उपाख्यान नेहमी सांगितले जाते की अबू अल-हुसैन अल-दर्राज (मृत्यू इ.स. ९३२) यांनी एक काव्य-चरण ऐकविल्या नंतर ते प्रभावित होऊन कसे रडले, मात्र तासनतास कुरआन पठणामुळे ते इतके प्रभावित होत नसत. याशिवाय मिमशद अल-दिनोरी यांनी प्रेषित मुहम्मद स. यांनी केलेला उपदेश असे ध्वनित करतो की, 'समाअ'मध्ये पूर्वी 'कुरआन' पठण होत नसे.

अहमद अल-ग़ज़ाली म्हणतात की जर क़व्वाल (गायक) हा काव्यामध्ये गाल, तीळ आणि बांधा-शरीरयष्टी यांचे वर्णन करीत असेल तर ते प्रेषितांचे गाल, तीळ आणि शरीरयष्टीशी उपयोजित केले पाहिजे. उमर अल-सुहरवर्दी हे 'समाअ'चे एक माध्यम म्हणून अशाप्रकारचे काव्य नाकारतात. कुठल्याही परिस्थितीत 'समाअ'चे एक माध्यम म्हणून काव्यास मान्यता मिळालेली होती आणि कदाचित ते सर्वात जास्त लोकप्रिय असावे. परिणामी, कुरआन आणि काव्य दोन्हींच्या वाचनाची (पठणाची) परिपाटी निर्माण झाली.

## (२) गूढ, गोपनीय पैलू

**क) 'समाअ'चे अभिप्राय**

सूफ़ींसाठी 'समाअ' एक प्रकारचे मनोरंजन नव्हतेच, तर तिच्या पाठीमागे एक प्रकारचा गंभीर हेतू होता. ट्रि-मिंगहॅम यांच्या मते ''सूफ़ी साधनेमध्ये त्याला असाधारण महत्त्व होते.'' तो सूफ़ींना एकतानतेकडे प्रवृत्त करणारा एक आध्यात्मिक अनुशासन होता, अनंताकडे सर्वंकषपणे मेळ बसण्याची एक साधना होती. हुजवीरी निवेदन करतात, '' 'समाअ' अर्थात संगीत-श्रवण म्हणजे ईश्वराशी उपस्थितीशी निगडित एक प्रकारची शक्ती होय, कारण प्रेमाला सर्वस्व हवे असते, जोपर्यंत प्रियकराचे प्रेयसीशी संपूर्णपणे मीलन साध्य होत नाही तोपर्यंत त्यास अपुरे, अर्धवट जाणावे. दुसऱ्या शब्दात 'समाअ' म्हणजे एक प्रकारची भक्तीच होय. तो ईश्वराप्रती एक प्रकारचे भावनिक सामिष्य आणि आसक्ती उत्तेजित करतो.'' मुहम्मद अल-ग़ज़ाली यांना असे

वाटते की ज्याचे अंत:करणच ईश्वर प्रेमाच्या बळावर मात केले जाते, अशा व्यक्तीसाठी 'समाअ' महत्त्वपूर्ण (मुहिम्म) असतो, कारण त्यामुळे प्रेमाग्नी भडकला जातो. 'समाअ'विषयी विचारणा केल्यावर अबू अली अल-रूदबारी (मृत्यू इ.स. ९३३) म्हणाले, प्रेयसीचे दर्शन करण्यासाठी (मुशाहदा:) 'समाअ'हे गूढांचे अनावरण असते. गेसूदराज़ निवेदन करतात, 'समाअ' एक प्रकारचे प्रेम करणे असते (इश्क़बाजी), जर तुम्ही कुणाशी प्रेम केले असेल तर, आणि तुम्हा दोघांमध्ये प्रेमाचे विविध चाळे झाले असतील तर, मग 'समाअ' तुमचे (प्रेम) प्रकरण आहे --- तोच इसम बागेमध्ये प्रवेश करतो, जो निसर्गाचे सौंदर्य पाहू इच्छितो अथवा दरवळलेले सुगंध हुंगू इच्छितो.''

**ख) 'समाअ'चा हेतू**

भाव-समाधिक (वज्द) साध्य करणे हा 'समाअ'चा हेतू असल्याचे वाटते. निकोलसन असे मानतात की सूफ़ींना लवकरच असे आढळून आले की हर्षोल्लास किंवा भाव-समाधि कृत्रिमपणे उत्पन्न केली जाऊ शकते, फक्त विचाराची एकाग्रता, नाम-स्मरण आणि स्व-संमोहनाच्या इतर निर्धोक पद्धतीनींच नव्हे तर संगीत, नृत्य आणि गायन यांनी सुद्धा ती उत्पन्न केले जाऊ शकते. 'समाअ'मध्ये ही भाव-समाधि दिव्य-दृष्टी किंवा प्रकटीकरणांशी आनुषंगिकपणे उत्पन्न होते, हे लक्षात घ्यावे लागेल.

**ग) 'समाअ' आणि दृढ प्रतिज्ञा (मीसाक़)**

सूफ़ीवदामध्ये 'मीसाक़' म्हणजे दृढ प्रतिज्ञेची एक महत्त्वपूर्ण भूमिका आहे. आदिकालापासून अस्तित्वात असलेल्या त्या घटनेकडे याचा निर्देश आहे, जेव्हा परमेश्वराने मानवजातीस आजमावण्यासाठी त्यास विचारले होते, ''काय मी तुमचा प्रभू नाही?'' त्यांनी उत्तर दिले, ''होय.'' खऱ्या अर्थाने एकेश्वरवादाची (तौहीद) जाणीव असण्यामध्ये 'मीसाक़'चे गूढ अर्थ दडलेले आहे. दुसऱ्या शब्दामध्ये हा तो असा एक टप्पा आहे की ज्यामध्ये उपासक आणि उपास्य दरम्यान कोणीच तृतीय पुरूष (इसम) नसतो. 'प्रथमत: आपल्या अस्तित्वपूर्ण अवस्थेमध्ये जसा होता त्याच अवस्थेमध्ये गूढवाद्याचे परतणे, असा त्याचा अभिप्राय आहे.

'समाअ'च्या बाबतीत, हा प्रसंग, आपली एक अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावितो. अधिकांश सुप्रसिद्ध सूफ़ींच्या मते, मानवाच्या अंत:करणामध्ये मुळातच एक 'गूढ-गुह्य' किंवा एक 'सार' असते, आणि 'समाअ' त्या सारला किंवा गुह्यास ढवळून उद्दीप्त करतो, आणि अशा प्रकारे भाव-समाधि निर्माण होते. अंत:करणामध्ये ठेवून दिलेले गुह्य किंरा सार - तत्त्व म्हणजेच 'मीसाक़' होय. अबू मुहम्मद अल-रूयम (मृत्यू इ.स. ९१५) म्हणतात, ''जेव्हा परमेश्वर लोकांना म्हणाला, 'काय मी तुमचा प्रभू नव्हे?' तेव्हा त्यांनी प्रथम नाम-स्मरण (ज़िक्र) ऐकले -- म्हणून जेव्हा ते 'नाम-स्मरण' (ज़िक्र) ऐकतात, तेव्हा त्यांच्या मनाची गुह्ये प्रकट होतात आणि ते आनंदमग्न होऊन जातात. .....''

कुशैरी, जुनैद, अहमद अल-ग़ज़ाली, ऐन अल-कुज़ात अल-हमदानी आणि शेख़ फ़रीदुद्दीन गंज-ए-शकर (मृत्यू इ.स. १२६५) या सर्व प्रसिद्ध सूफ़ी संतांनी 'मीसाक़'ला मानवाच्या भाव-समाधि अनुभूतीस्वरूप मानले आहे. शेख फ़रीदुद्दीन गंज-ए-शकर म्हणतात की 'समाअ'मध्ये बेहोशी ही दृढ प्रतिज्ञेमुळे निर्माण होते. जेव्हा मानव हा प्रतिज्ञाबद्ध झाला तेव्हा भाव-समाधिच्या अनुभूतिमुळे प्रत्येकजण बेहोश झाला. स्वाभाविकपणे, 'मीसाक़'ची कुरआनी संकल्पना ही मानवाचे 'समाअ'मध्ये प्रथम सहभाग घेण्यामध्ये परिणत

होते आणि हीच त्याची प्रथम भाव-समाधि होय. म्हणून सूफ़ींसाठी 'वज्द' (भाव-समाधि) आणि 'समाअ' (संकीर्तन श्रवण) हे दोन्ही अविच्छेद्य आहेत. त्यांच्यासाठी 'वज्द' हा 'समाअ'च असतो.

**घ) 'समाअ' भाव-समाधि (वज्द) स्वरूपात**

**भाव-समाधि म्हणजे काय?**

या संदर्भात हा एक रोचक प्रश्न आहे. कारण सूफ़ीवादामधे, भावसमाधिची अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका आहे. येथे तिचा आशय 'समाअ'चे ''सत्त्व'' असा घेता येईल. परंतु उपरोक्त प्रश्नाची उत्तरे शोधताना आपणास मुख्य खरी अडचण भासते, कारण सूफ़ी भाव-समाधिविषयी क्वचित विचार करतात.

उदाहरणार्थ, हुजवीरी यांना असे वाटते की भाव-समाधिस शब्दांमध्ये व्यक्त करता येऊ शकत नाही. ते म्हणतात, ''अनुभूतीशिवाय ज्ञान नसते.'' या विषयासंबंधी सर्वप्रथम चर्चा करणारे भाव-समाधिवर, अबू सईद इब्न अल-अराबी (मृत्यू इ.स. ९५२) यांनी प्रबंध लिहिला आहे. याचा सविस्तर संदर्भ अबू नसर सर्राज यांनी दिला आहे. यांचेही पण तसेच मत आहे. ते म्हणतात ''भाव-समाधिचे सार तत्त्व आणि इतर गूढ अवस्था दुर्बोध असतात, आणि यांचे वर्णन वाचे (वाणी) पेक्षा मौनाने अधिक चांगल्या प्रकारे करता येते.'' अम्र बिन उस्मान अल-मक्की (मृत्यू इ.स. ९०३) म्हणतात, ''भाव-समाधिचा 'कसेपणा' (कैफ़ीया) अभिव्यक्त करता येऊ शकत नाही, कारण ते अल्लाहचे गूढ आहे. ते त्याच्या विश्वासू श्रद्धावंतांमध्येच निवास करते (असते.)''

दुसरीकडे काही सूफ़ी संतांनी याचे वर्णन करण्याचे प्रयत्न केले आहेत आणि त्यांचे वर्णन भाव-समाधिचे एक ठळक चित्र प्रस्तुत करते. कलाबाज़ी लिहितात, ''भाव-समाधि हे अंत:करणाशी दोन हात करणारे एक इंद्रिय - संवेदन असते. ते एक तर भय किंवा दु:ख किंवा भावी जीवनाच्या काही वस्तुस्थितीचे दर्शन अथवा मानव आणि ईश्वर यांच्यामधील दैवी प्रकटनाची काही अवस्था यापैकी काहीही असेल.'' ते लिहितात की हे अंत:करणाचे दृक-श्राव्य असते. अबू अल-हसन अल-नूरी (मृत्यू इ.स. ९०७) म्हणतात की अंत:करणामध्ये तीव्र इच्छास्वरूपात उदय पावून भडकणारी एक ज्वाला म्हणजे भाव-समाधि होय.

**च) भाव समाधिचा उगम**

सर्व सूफ़ी प्राय: याबाबतीत एकमत आहेत की भाव समाधिचा कारण किंवा उगम ईश्वर आहे. ते तिला त्यांना वश करणारे एक ''अभ्यागमन किंवा प्रवसन'' (वारिद) म्हणतात. अशा प्रकारे ती ब्रह्मानंदाच्या अनुभूतीस कारणीभूत ठरते. उमर अल-सुहरवर्दी म्हणतात, ''भाव-समाधि ही ईश्वरापासून येणारी एक अभ्यागमन प्रवसन (वारिद) असते. ते पुढे म्हणतात की ती आत्म्याची (रूह) पुकार (सुराख़) असते. अबुल हसन अल-नूरी पण याच मताचे आहेत की भाव-समाधि ही एक अभ्यागमन, प्रवसन असते. दुसरे एक सूफ़ीचे मत कलाबाज़ी नोंदविताना म्हणतात की भाव-समाधि ही ईश्वर चिंतन अवस्थेमधील गूढवाद्याचे उन्नत अवस्थेचे द्योतक असे ईश्वराकडील सुवार्ता असते. जुनैद, बहुतकरून असे विचार करतात की हे अभ्यागमन, प्रवसन ईश्वरी कृपा असते. जुनैद यांनी असे म्हटल्याचे सांगितले जाते की तीन प्रसंगी सूफ़ींवर ईश्वराची कृपा अवतरित होत असते - १) ते भोजन करीत असताना, २) ते बोलत असताना आणि ३) ते 'समाअ' मध्ये असताना. अहमद अल-ग़ज़ाली, भाव-समाधिच्या या अनुभूतींना ''अदृश्य-अव्यक्त अभ्यागमन'' (अल-वारिदात अल-ग़ैबिया:) असे म्हणतात. हिच्यामुळे अंत:करणे (कुलूब) आणि आत्मे (अर्वाह) यांचे संगोपन होते.

### छ) भाव–समाधि (वज्द) आणि कृत्रिम भाव–समाधि (तवाजुद)

'समाअ'साठी हे दोन्ही शब्द एकसमान महत्त्वाचे आहेत, आणि हे दोन्ही कसे निगडित आहेत आणि या दोहोंमध्ये काय फरक आहे हे आपण पाहणार आहोत. 'वज्द' ही 'समाअ'ची समाप्ती, शेवट आहे, तर 'तवाजुद' ही तिची सुरूवात आहे. हे असे मांडता येईल.

'तवाजुद' हा 'वज्द' निर्माण करण्याचा कृत्रिम मार्ग आहे. दुसऱ्या शब्दांमध्ये सूफ़ींच्या परिभाषेमध्ये सांगायचे झाल्यास 'वज्द' हे एक अभ्यागमन, प्रवसन आहे. ते माणसास स्वतःच स्वतःच्या कवेमध्ये घेते, ताब्यात घेते, तर 'वज्द'ची अनुभूती प्राप्त करण्यासाठी माणसाने अंगीकारलेली 'तवाजुद' एक प्रक्रिया असते. ती त्याला ''प्रवसनते'' भेटते. हे त्याच्या प्रयत्नाच्या फलस्वरूप असते. अबू नसर अल–सर्राज यांच्या स्पष्टीकरणावरून हा संबंध आणि फरक स्पष्ट होतो. एक अज्ञात सूफ़ीने 'वज्द'चे दोन प्रकार सांगितले आहेत – १) ताब्यात घेणारी भाव–समाधि ('वज्दमिल्क') आणि २) सामना करणारी भाव–समाधि (वज्द लिक़ाइन). ज्याच्या ताब्यात 'वज्द' नसते (लम यामिल्क) त्याने तिचा सामना केला पाहिजे. (लक़ू) दुसऱ्या सूफ़ीने या दोन प्रकारांचे स्पष्टीकरण असे केले आहे – ताब्यात घेणारी भाव–समाधि, ती समाधि असते जी तुम्हास शोधून आपल्या ताब्यात घेते, तर सामना करणारी भाव–समाधि ती असते जी तुम्हास सापडते. दुसऱ्या शब्दांमध्ये पहिला प्रकार म्हणजे खरी भाव–समाधि (वज्द) असते, तर दुसऱ्या प्रकारची समाधि ही कृत्रिम भाव–समाधि असते.

उपरोक्त सूफ़ीच्या मते 'तवाजुद' हा 'वज्द'चा एक भाग बनतो, या अर्थी की जर एखादा माणूस 'वज्द'च्या अधीन किंवा ताब्यात नसेल तर तो 'तवाजुद' वर अवलंबून असतो. तरी देखील, असे म्हणता येईल की सूफ़ींनी 'तवाजुद' चे महत्त्व नेहमी जाणले नाही, कदाचित या कारणामुळे की त्यामध्ये आनंद आणि संतोषाचे अंश–तत्त्व अंतर्भूत होते. उलट, त्यांना असे वाटले की आत्म–नियंत्रण हा एक आवश्यक घटक आहे.

हुजवीरी यांच्यामते ''तालबद्ध नृत्य'' आणि ''हातवाऱ्यांची पद्धत'' ही संपूर्णपणे अवैधानिक आहे. त्यांचा असा विश्वास आहे की निपुण वा दक्ष हे शांतचित्त असतात तर नवशिके हे प्रक्षुब्ध होऊन जातात, कारण त्यांची शरीरे यासाठी प्रतिकूल असतात. जेव्हा ही व्याकुळता निरंतर होत असते तेव्हा नवशिक्या पण ते मुकाट्याने ग्रहण करतो. अबू नसर अल–सर्राज म्हणतात की भाव–समाधि जर अनैच्छिक असेल, तर ती ऐहिक लालसांपासून संपूर्णपणे अलिप्त असलेल्या दरवेशांसाठी अनुचित नव्हे. तथापि कोणीही, भाव समाध्यवस्थेमधील अनेक लोकांना पाहून त्यांच्यासोबत स्वतःमध्ये भाव–समाधि निर्माण करण्याचा प्रयत्न करू नये. कलाबाज़ी यांना वाटते की, जर एखाद्या माणसाची भाव–समाधि दुर्बल असेल तर तो कृत्रिम भावसमाधि (तवाजुद) प्रदर्शित करतो (असे जाणावे)…. तथापि, जर त्याची भाव–समाधि प्रबळ असेल तर तो स्वतःस नियंत्रणामध्ये ठेवतो आणि तो निष्क्रिय असतो. मुहम्मद अल–ग़ज़ाली आणि उमर अल–सुहरवर्दी हे पण आपल्या पूर्वसूरींशी सहमत असून असे मत मांडतात की निपुण किंवा दक्ष हा स्थिर, स्थितप्रज्ञ असतो आणि त्याचे अभ्यागमनांवर (वारिदात)नियंत्रण असते. सुहरवर्दी यांचा असा विश्वास आहे की 'समाअ'मध्ये आत्म–नियंत्रण आवश्यक असते. शारीरिकदृष्ट्या नियंत्रण ठेवणे अशक्यप्राय होऊन जाते तेव्हा तर आत्म–नियंत्रणाची

नितांत गरज भासते. परंतु इमाम अल-ग़ज़ाली म्हणतात की अशी शक्ती अभावानेच आढळते. नज्मुद्दीन अल-कुब्रा (मृत्यू इ.स. १२२१) हे आपले मत मांडताना म्हणतात की, 'शेख़' अर्थात् सद्गुरूस कोणीच जबरदस्तीने पकडू शकत नाही. उलट, अवस्था (अहवाल) ना तो ताब्यात ठेवतो.

जुनैद आणि अबू अल-हसन अल-नूरी हे नेहमी 'समाअ'मध्ये स्वत:स आत्मनियंत्रित अवस्थेमध्ये ठेवत असल्याचे सांगितले जाते, तर इतर श्रोते हे भाव-समाधिमध्ये नाचू लागत. सरी अल-सक्ती हे भावसमाधिमध्ये तल्लीन असताना तलवारीच्या वाराची प्रतिक्रिया त्यांच्या चेहऱ्यावर थोडीशी पण उमटत नसे.

**ज) नृत्य ('रक़्स')**

जरी नृत्य (रक़्स) हे भाव-समाधि व्यक्त करण्याचे एक अति आद्य स्वरूप होते, तरी पण सूफ़ींना नृत्य नेहमीच पसंत नसे. येथे आम्ही लक्ष वेधू इच्छितो की नृत्याचे दोन ठळक पैलू दिसून येतात. प्रथमत: नृत्य हे 'तवाजुद'च्या एक प्रकार स्वरूपात म्हणजेच भाव-समाधि उत्पन्न करण्यामध्ये त्याचे एकमात्र शिल्लक अवशेष आज मौलविया संप्रदायामध्ये आढळते. (हा संप्रदाय सुप्रसिद्ध फ़ारसी कवी जलालुद्दीन रूमी (मृत्यू इ.स. १२७२) यांच्या नावे प्रचलित आहे. कारण त्यांना ''मौलवी' रूमी म्हणत असत.) हे ''गिरकांडी नृत्य करणारे'' दरवेश म्हणून मुख्यत्वेकरून ओळखले जातात. नृत्याच्या या प्रकारास चांगल्या नजरेने पाहिले जात नाही.

दुसरा पैलू म्हणजे नृत्याचा तो प्रकार होय की ज्यामध्ये भाव-समाधि अभिव्यक्त होते. दुसऱ्या शब्दांमध्ये हे तीव्र भाव समाध्यवस्थेमध्ये एखाद्या व्यक्तीचे नर्तन करणे असते. शहाबुद्दीन याह्या अल-सुहरवर्दी (शेख़ अल-इश्राक़ मृत्यू इ.स. ११९१) हे लिहितात की नृत्यामध्ये प्रत्येकास भाव समाध्यवस्था प्राप्त होतेच असे नाही. उलट, नृत्य हा भाव-समाधिचा परिणाम असतो. हुजवीरी नृत्याचे मुळीच समर्थन करीत नाहीत. या दुसऱ्या प्रकारास नृत्याऐवजी ''अनावर हालचाल'' म्हणणे ते अधिक पसंत करतात. ते म्हणतात यद्यपि या ''हालचाली'' नृत्यासारख्या असतात. विधीविधानानुसार सर्व प्रकारचे पदलालित्य, पदन्यास हे विधी आणि विवेकाच्या दृष्टीने वाईट आहे --- ती उत्तेजना (इज़्तिराब) ना नृत्य आहे, ना पदलालित्य ना शारीरिक लडिवाळपणा, परंतु तो आत्म्याचा एक भ्रमनिरास आहे. उमर अल-सुहरवर्दी हे आत्म-नियंत्रण आणि अनुशासनामध्ये विश्वास ठेवतात. जोपर्यंत नियंत्रण करणे अशक्य असेल. इतरत्र, ते नृत्याचे विभाजन ''विधिसम्मत'' (मुबाह) आणि जर नर्तकाचा हेतू (निय:) चांगला असेल तर साधना-उपासना (इबाद:) अशा दोन प्रकारांमध्ये करतात. अबू सईद इब्न अबी अल-ख़ैर यांना असे वाटते की नृत्य हे तरूणांमधून वासना उधळून लावते (नाहीशी करते). अहमद अल-ग़ज़ाली हे त्यांच्याशी सहमत आहेत. इब्न अरबी हे भाव-प्रवण नृत्य किंवा कृत्रिम उन्मादक नृत्याचे विरोधी होते.

लांडग्यांनी बकरींच्या कळपावर हल्ला केल्यानंतर बकऱ्या भयभीत होऊन उड्या मारून पळत सुटतात तशीच अवस्था सूफ़ींची 'समाअ'मध्ये होते. येथे बकरींचे पळण्याचे रूपांतर सूफ़ींच्या नृत्यामध्ये होते. क़ुशैरी यांनी जहम अल-दुक़्क़ी यांचा प्रसंग निवेदन करून सांगतात की दुक़्क़ी यांनी एक झाड मुळासकट उपटून भावसमाध्यवस्थेमध्ये त्याच्याभोवती घिरट्या घालण्यास सुरूवात केली. हे पण एक प्रकारच्या नृत्याचे निदर्शक आहे. इब्राहीम ख़व्वास यांच्याविषयी असे उपाख्यान आहे की 'तवाजुद'मध्ये ते नाचत असत. अबू

सईद म्हणतात की जर एक तरूण दरवेश टाळी वाजवीत असेल तर त्याच्या हाताचा लोभ नष्ट होऊन जाईल आणि जर तो आपले पाय झटकत असेल तर त्याच्या पायांची लालसा कमी होऊन जाईल. मुहम्मद अल-ग़ज़ाली म्हणतात की नृत्य (रक़्स) हे वर्जित, निषिद्ध नाही ('कीमियाए सआदत' पृ. ३८७) अल-हमदानी लिहितात की ते आपल्या पिताश्रीसोबत नृत्य करीत होते. त्यांनी पाहिले की अहमद अल-ग़ज़ाली पण त्यांच्यासोबत सहभागी झाले होते.

तथापि, आम्हास विदित होते की जुनैद, अल-शिब्ली (मृत्यू इ.स. ९४६) मारूफ़ अल-कर्ख़ी (मृत्यू इ.स. ८१५-१६), अब्द अल्लाह इब्न ख़फ़ीफ़ (मृत्यू इ.स. ९८२) अबू सईद इब्न अबी अल्-ख़ैर, मन्सूर अल्-हल्लाज (मृत्यू इ.स. ९२२) ऐन अल-कुज़ात अल-हम्दानी (मृत्यू इ.स. ११३१) सारखे सुप्रसिद्ध सूफ़ी शेख आणि इतर सर्व 'समाअ'मध्ये नाचले आहेत.

**झ) वस्त्र फाडून तुकडे करणे**

या समस्येसंबंधी सूफ़ी आधार (प्रमाण) अल-रूयम यांनी अत्यंत स्पष्ट पद्धतीने स्पष्ट केले आहे. ते निवेदन करतात की 'समाअ'मध्ये लोक वास्तव (अल मानी) पाहतात. जेव्हा पडदा उचलला जातो तेव्हा त्यांचा आनंद रूदनामध्ये परिवर्तित होऊन जातो. याच कारणामुळे तर काही आपली वस्त्रे (कपडे) फाडतात तर इतर रडतात किंवा किंचाळतात. कुशैरी असा विचार करतात की 'समाअ'मध्ये प्रत्येक अवयवाचा हिस्सा असतो. हातावर जे अवतरित होते, त्यामुळे हात वस्त्र फाडण्यास तत्पर होऊन जातो किंवा स्वत: आपल्या तोंडावर मारून घेतो.

हुजवीरी म्हणतात की याला सूफ़ीवादामध्ये काहीच आधार नाही, परंतु तीत परिस्थितींमध्ये तसे करण्यास अनुज्ञेय असेल - १) भाव समाध्यवस्थेमध्ये जेव्हा दरवेश आपले स्वत:चे कपडे फाडतो, २) एखादे आध्यात्मिक संचालक म्हणजे सद्‌गुरूच्या आदेशानुसार त्याचे बरेचसे सहकारी जेव्हा तसे करीत असतील आणि ३) भावसमाध्यवस्थेच्या तंद्रेमध्ये ते तसे करीत असतील तर. याउलट उमर अल-सुहरवर्दी यांचा युक्तिवाद असा आहे की, कोणत्याही प्रकारच्या ''हालचाली''स (अल-हरकात) प्रत्येकाने नियंत्रणामध्ये ठेवले पाहिजे. त्यांनी किंचाळणे (अल-ज़क़ात) पण काबूत ठेवले पाहिजे. हे आवश्यक आहे की त्याने आपले वस्त्र फाडू नये. असे म्हणता येईल की सर्वसाधारणपणे अशी संमती आहे की प्रत्येकाने वस्त्र फाडण्यापासून स्वत:स नियंत्रित ठेवावे, परंतु गाढ समाध्यवस्थेमध्ये हे अनुज्ञेय आहे.

**आ) भारतीय सूफ़ींमधील मतभेद (वादंग)**

'समाअ'शी निगडित वादंगाविषयी भारतवर्ष पण अपवाद नाही, परंतु या मतभेदाचे स्वरूप काहीसे वेगळे असल्याचे आपणास, पुढील विवेचनावरून आढळून येईल.

भारतीय उपखंडामध्ये एक सूफ़ी सराव या नात्याने 'समाअ'चा उल्लेख सर्वप्रथम हुजवीरी यांनी केल्याचे, आपणास मानता येईल. हे सर्वज्ञातच आहे की हुजवीरी यांनी भारतीय उपखंडामध्ये प्रवास करून लाहोर येथे स्थायिक झाले होते. तेथेच त्यांचा दफनविधी झाला असून त्यांचा येथे खूप आदर करण्यात येतो. आणि भारतामध्ये त्यांनी 'समाअ' ऐकला नसल्याचे कोणतेच प्रमाण उपलब्ध नाही. म्हणून त्यांनी 'समाअ'चा सराव केला असल्याची फार मोठी शक्यता वाटते. त्यांनीच भारतामध्ये त्याची सुरूवात केली असल्याची शक्यता

वाटते. शिवाय हरिणांची शिकार करण्यामध्ये (भारतातील प्रथेचा) संगीताच्या प्रभावाचा उपयोग करण्याच्या पद्धतीची त्यांची नोंद ही 'समाअ'मध्ये त्यांची अभिरूची असल्याचे निदर्शक आहे. हुजवीरी लिहितात की हरिणांची शिकार करण्यासाठी शिकारी संगीताचा कसा उपयोग करून घेत आणि संगीत-श्रवणामुळे हरिण कसे मंत्रमुग्ध होऊन एकाच ठिकाणी स्तब्ध उभे राहिल्यानंतर शिकारी त्यांना कसे धरत असत, याचे वर्णन केले आहे ('क़श्फ़ुल महजूब' पृ. ४००)

तथापि शेख़ मुईनुद्दीन चिश्ती (मृत्यू इ.स. १२३६) हे इ.स. ११९३ मध्ये भारतामध्ये स्थलांतरित झाले. त्यांनी 'समाअ'ची संमेलने आयोजित केल्याचे सांगण्यात येते. असे म्हणतात की ते प्रत्येक दिवशी संध्याकाळी संगीत-श्रवण करीत. अशा प्रकारे चिश्ती संप्रदायाच्या प्रस्थापनेनंतर भारतामध्ये 'समाअ' ऐकण्याच्या इतिहासाची सुरूवात होते, स्वाभाविकपणे मतभेद निर्माण होतातच. शेख़ मुईनुद्दीन चिश्ती यांच्या व्यतिरिक्त, त्यांच्या सर्व आध्यात्मिक शिष्यांना 'समाअ' प्रिय होता. बऱ्याच आधुनिक विद्वानांचे असे मत आहे की, चिश्ती संप्रदायाच्या सूफ़ी आश्रमांमध्ये (जमाअत ख़ाना) 'समाअ' हे एक अत्यंत महत्त्वपूर्ण अनुष्ठान होते.

मध्ययुगाच्या प्रारंभी भारतामध्ये प्रस्थापित झालेला दुसरा सूफ़ी संप्रदाय म्हणजे सुहरवर्दी सूफ़ी संप्रदाय होय. भारतामध्ये स्थानिक होऊन कार्यरत असलेल्या महत्त्वपूर्ण सुहरवर्दी सूफ़ी संतांमध्ये शेख़ बहाउद्दीन ज़करिया (मृत्यू इ.स. १२६२), क़ाज़ी हमीदुद्दीन नागोरी (मृत्यू इ.स.१२४५), शेख़ नूरूद्दीन मुबारक ग़ज़नवी (मृत्यू इ.स. १२४९) आणि शेख़ जलालुद्दीन तब्रीज़ी (इ.स. १२४४) यांची गणना होते. हे सर्व शेख़ शहाबुद्दीन उमर अल-सुहरवर्दी यांचे शिष्य होते. आमच्या अभ्यासामध्ये या संप्रदायाच्या इतिहासास वाव नाही. फक्त 'समाअ'शी निगडित बाबीचा येथे संबंध आहे. यद्यपि (जरी) अधिकांश आधुनिक विद्वान बारकाईने आपले निरीक्षण नोंदवित असे म्हटले आहे की 'समाअ'चा त्यांनी धिःकार केलेला आहे, म्हणून भारतातील सूफ़ी संप्रदायामध्ये 'समाअ'चे प्रचलन होते की नाही, हे सांगणे अवघड आहे. तरी पण 'समाअ' त्यांच्यामध्ये निषिद्ध असल्याचे निष्कर्ष सुसंगत वाटत नाही.

शेख़ बहाउद्दीन ज़करिया हे भारतामधील सुहरवर्दीया सूफ़ी संप्रदायाचे संस्थापक मानले जातात. 'फ़वायद अल-फ़ुआद' या ग्रंथामध्ये असा उल्लेख आहे की शेख़ बहाउद्दीन यांनी 'समाअ' ऐकला होता आणि जेव्हा त्यांना अब्द अल्लाह रूमी यांच्याकडून असे कळाले की शेख़ शहाबुद्दीन उमर अल-सुहरवर्दी हे 'समाअ'ची मैफ़िल संचलित करीत तेव्हा ते भाव समाध्यवस्थेमध्ये निमग्न झाले. अज़ीज़ अहमद या विद्वानांना असे वाटते की बहाउद्दीन ज़करिया यांचे भाव समाध्यवस्थेमध्ये नृत्य करणे हे प्रक्षिप्त आहे, कारण सुहरवर्दी सूफ़ी संतांना संगीताचा तिटकारा होता. 'फ़वायद अल-फ़ुआद' या ग्रंथामध्ये असे अनुस्यूत आहे की शेख़ बहाउद्दीन यांनी या प्रसंगा-घटने अगोदर संगीत-श्रवण केले नाही, कारण शेख़ अल-सुहरवर्दी यांना संगीत नावडते होते अशी त्यांची भावना होती, परंतु त्यांना चुकीची माहिती देण्यात आली होती, हे त्यांना अब्द अल्लाह रूमी यांच्याकडून कळाले. शहाबुद्दीन उमर अल-सुहरवर्दी यांना परमेश्वराने 'समाअ'च्या आस्वाद (ज़ौक़ा) शिवाय इतर सर्व आशिर्वाद दिले होते. क़ाज़ी हमीदुद्दीन नागोरी यांना 'समाअ' फार आवडत असे. हे पण अनुस्यूत आहे की शेख़ बहाउद्दीन हे 'समाअ'चे आयोजन करण्याच्या संधीची वाट पाहात होते. दुसरे प्रमुख सुहरवर्दी

सूफ़ी, क़ाज़ी हमीदुद्दीन नागोरी हे भारतामध्ये 'समाअ'ची भक्कम प्रतिष्ठापना करण्यामध्ये अग्रेसर होते. कुठल्याही परिस्थितीत, जर भारतीय सुहरवर्दी सूफ़ी 'समाअ'चे आयोजन करीतच असत, तरी पण (क़ाज़ी हमीदुद्दीन नागोरी यांचा अपवाद वगळून) चिश्ती संप्रदायाप्रमाणे यांच्या आश्रमातील (ख़ानक़ाह) अभ्यासक्रमाचे 'समाअ' हे ठळक वैशिष्ट्य नव्हते.

असे सांगतात की सुल्तान इल्ततमिश (इ.स. १२११-१२३६) याच्या कारकिर्दीमध्ये शेख़ कुत्बुद्दीन बख़्तियार काकी (मृत्यू इ.स. १२३६) आणि क़ाज़ी हमीदुद्दीन नागोरी यांच्या प्रयत्नांमुळे 'समाअ'चा प्रचार व प्रसार झाला. दिल्लीचा क़ाज़ी मिन्हाज अल-सिराज जुझ्जानी (मृत्यू इ.स. १२५९) याने 'समाअ'स कायदेशीरपणा प्राप्त करून दिला.

दिल्ली सल्तनत (सुल्तानांच्या शासनकाळ) मध्ये (इ.स. १२०६ ते १५५५) विद्वनमंडळी आणि सूफ़ींच्या दरम्यान विरोध मुख्यत्वेकरून 'समाअ'च्या प्रश्नासंबंधी होता. भारतीय विद्वानांनी प्राचीन परंपरेप्रमाणे प्रबंध आणि ग्रंथांच्या आधारे 'समाअ' विषयी नापसंती दाखविण्याऐवजी सुल्तानांसमोर बैठका (महज़र) बोलावून 'समाअ'च्या आयोजनावर बंदी घालण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सुल्तानांना 'समाअ'चे आयोजन करण्यास मना करण्याचे हुकूम सोडण्यासाठी प्रयत्न केले; परंतु ते कधीच यशस्वी झाले नाहीत.

या विरोधाचे मुख्य कारण, निदान सुरुवातीच्या टप्प्यावर, भारताच्या नवीन वातावरणामध्ये निव्वळ धार्मिक हटवाद असल्याचे दिसून येते. सामान्य, मुसलमानांना 'समाअ' मध्ये सहभाग घेण्यासाठी प्रतिबंधित करण्याचाच विद्वानांचा हेतू नसून, 'समाअ' हा सूफ़ींचा नवनिर्माण असल्यामुळे आणि शरीय: अर्थात धार्मिक कायद्यानुसार संगीत हे संपूर्णपणे निषिद्ध असल्यामुळे फक्त मुसलमानांसाठी नव्हे तर सूफ़ींसाठी पण म्हणून त्यांचा यास विरोध होता. शिवाय सुल्तान इल्ततमिशसमोर, काजी हमीदुद्दीन नागोरी आणि शेख कुत्बुद्दीन बख्तियार काकी यांच्या विरोधात बोलाविलेल्या बैठकी (महज़र) मध्ये काजीनी असा निर्णय दिल्याचे सांगण्यात येते की, 'समाअ' सूफ़ींसाठी (अहल-ए-हाल) अनुज्ञेय असून कर्मकांडी लोकांसाठी (अहल-ए-क़ाल) वर्जित, निषिद्ध आहे. काजींच्या दृष्टिकोनातून 'अहल-ए-काल' म्हणजे कर्मठ वा कर्मकांडवादी लोक हे विद्वान लोक होत.

'समाअ'संबंधी बैठका (महज़र) बोलाविण्यामागे दुसरे कारण शाही दरबारांमध्ये होत असलेले संगीताविषयी प्रेम व महत्त्व, हे असू शकेल. विद्वानांनी असा विचार केला की, सरकारी हुकूमांच्या आधारे अप्रत्यक्षपणे सूफ़ींच्या 'समाअ'चे महत्त्व कमी करता येऊ शकेल.

थोडक्यात, एकीकडे 'शरीया:' अर्थात कर्मकांड वा अनुष्ठानास सुरक्षित ठेवण्याच्या आपल्या अति उत्साहात 'समाअ'संगीत सभांचे समूळ उन्मूलन करण्याचे अयशस्वी प्रयत्न धर्मतत्त्वज्ञांनी केले तर दुसरीकडे सूफ़ींनी याची यशस्वीपणे प्रस्थापना केली. गैर मुस्लिम वातावरणामध्ये आपल्या संप्रदायाच्या प्रसारासाठी कदाचित हे एक साधन होते. प्रसिद्ध विद्वान अजीज अहमद आपले मत असे नोंदवितात की कुठल्याही ताण-तणावाच्या मालिकेशिवाय कदाचित संगीत हीच एकमेव कला असावी की जी मुस्लिम आणि हिंदू कलात्मक परंपरांना जोडणारी एक दुवा असावी. जात, पात, धर्म यांचा भेदभाव न बाळगता, सूफ़ींच्या आश्रमांनी सर्व प्रकारच्या लोकांना आपल्याकडे आकर्षित करून घेतले आणि 'समाअ' हे एक संभाव्य आकर्षण होते.

त्यांच्या 'समाअ'च्या मैफिलींमध्ये हिंदी भाषेतील कवने गाण्यात येऊ लागली. सर्व श्रोत्यांना समजण्यास हे सोपे जाई. या गोष्टीची नोंद घेणे रोचक ठरेल की, विद्वानांच्या विरोधाचा रोख हा नेहमी चिश्ती सूफ़ींकडे राहिला आहे.

अजोधनच्या एका काजीने मुल्तानच्या विद्वानांना, शेख फरीदुद्दीन गंज शकर यांचा 'समाअ' अवैध असल्याचे घोषित करण्याचे सांगितले. विद्वानांनी यास नकार दिला. 'समाअ'संबंधी विद्वानांमध्ये मतभेद असल्याचे जेव्हा शेख फरीदुद्दीन गंज शकर यांच्या निदर्शनात आणून देण्यात आले तेव्हा त्यांनी असे सांगितल्याचे म्हणतात, ''महिमा असो त्या परमेश्वराचा! 'समाअ' मध्ये जे जळून (सोख्त) खाक झालेत. (खाकिस्तर) आणि इतर अद्याप त्याविषयी वादविवादामध्येच गुंग आहेत, या दोहोंमधील फरक तर पहा!''

सुल्तान गियासुद्दीन तुगलक (इ.स. १३२०-१३२५) च्या शासन काळामध्ये सर्वात महत्त्वपूर्ण 'महज़र' अर्थात बैठक ही शेख निजामुद्दीन औलिया यांच्या 'समाअ'च्या विरोधासंबंधी बोलावलेली होती. २५३ विद्वानांच्या बैठकीसमोर या चिश्ती शेख यांना हजर राहण्याचे सांगण्यात आले. असे सांगण्यात येते की, आपल्या 'समाअ'च्या समर्थनार्थ शेख यांनी प्रस्तुत केलेले प्रेषित वचन (हदीस) स्वीकारण्यात आले नाही. दरम्यान शेख बहाउद्दीन जकरिया यांचे एक वंशज, एक सुहरवर्दी सूफ़ी इल्म अल-दीन तेथे पोहोचले आणि सांगितले की, त्यांनी आपल्या परदेश प्रवासाच्या दरम्यान संगीत ऐकण्यास अनुज्ञेय असल्याची साक्ष मिळाली आहे. अशाप्रकारे सुल्तानाने सूफ़ींसाठी 'समाअ' वैध असल्याचे हुकूम सोडले; परंतु समाजाच्या इतरेजनांसाठी ते निषिद्ध असल्याचे घोषित केले; परंतु शेख निजामुद्दीन औलिया यांच्या मते धर्मशास्त्रानुसार जे काही निषिद्ध, वर्ज्य असेल ते कोणाच्याही हुकूमान्वये वैध ठरू शकत नाही. त्याचप्रमाणे ना वैध हे हुकूम सोडून वर्जित वा निषिद्ध बनते.

सुल्तान फिरोज शाह तुगलक (इ.स. १३५१-१३८८) यांच्या कारकिर्दीमध्ये, काही विद्वान पंडितांनी अशी खबर पोहोचविली की 'समाअ'च्या मैफिलीमध्ये गेसूदराज़ यांच्यासमोर श्रोते नतमस्तक होतात. त्यानंतर सुल्तानाने चिश्ती सूफ़ीस एकांतामध्ये (खल्वत) 'समाअ' ऐकण्याविषयी आपला निरोप पाठविले. 'सियर-ए-मुहम्मदी' या ग्रंथामध्ये असे नमूद आहे की, तेव्हापासून गेसूदराज़ यांनी एका कक्षाच्या आतमधून इतर श्रोत्यांपासून आडपडदा टाकून, 'समाअ' ऐकण्यास सुरुवात केली.

नि:संशय, चिश्ती सूफ़ी हे 'समाअ' संबंधी अत्यंत उदारमतवादी होते. तरी पण त्यांना सुहरवर्दी संप्रदायाप्रमाणे सनातनी संप्रदायाचे मानले जाई. त्यांनी सर्वसाधारण लोक किंवा नवशिक्यांसाठी 'समाअ' निषिद्ध असल्याचे घोषित केले नाही. शेख निजामुद्दीन औलिया यांच्या काळामध्येच 'समाअ'च्या अटी व नियम निर्धारित करण्यात आल्या आहेत. आम्हास असे वाटते की, सुरुवातीच्या काळामधील चिश्ती शेखांचा उदारमतवादी दृष्टिकोन हा तत्कालीन वातावरणाशी सुसंगत असाच होता. त्यांना भारतीय परिसराशी फक्त अनुकूलन साध्य करायचे नसून मुस्लिमेतरांमध्ये आपला (इस्लाम) धर्म अधिक परिणामकारी आणि ग्राह्य स्वरूपात मांडायचा होता. 'समाअ'मध्ये त्यांना ते आव्हान सापडले.

जरी सुहरवर्दी सूफ़ींनी चिश्ती सूफ़ींप्रमाणे 'समाअ'स ग्रहण केले नसले तरी कदाचित ते 'सर्वसाधारणपणे उदासीन बेफिकीर' असल्याचे वाटतात, मात्र अधिकांश आधुनिक विद्वानांच्या मतान्वये त्यांनी संपूर्णपणे 'समाअ' नाकारले नाही.

## इ) गेसूदराज़प्रणीत 'समाअ' : विवेचन

गेसूदराज़ यांच्या काळापर्यंत 'समाअ'च्या प्रथेने एक अत्यंत विकसित रूप धारण केले; परंतु या अनुष्ठानावर अत्यंत विपुल लेखन करून या परंपरेस आणि सिद्धांतास एक सुव्यवस्थित आकार देणाऱ्यांपैकी ते एक होते. केवळ 'समाअ' वर लिहिले गेलेल्या सुरुवातीच्या दोन ग्रंथांचा येथे उल्लेख करता येईल. (१) ''उसूलल समाअ'' हा शेख निजामुद्दीन औलिया यांचे एक शिष्य फखुद्दीन जर्रादी (मृत्यू इ.स. १३४७) यांनी अरबी भाषेमध्ये लिहिलेला आहे. (२) ''रिसालाह-ए-समाअ'' हा शेख मुईनुद्दीन चिश्ती यांचे एक शिष्य शेख हमीदुद्दीन सुवाली नागोरी (मृत्यू इ.स. १२४४) यांनी फारसी भाषेमध्ये लिहिलेला आहे. याशिवाय 'समाअ' विषयी चिश्ती दृष्टिकोन असलेले ''फ़वाइद अल-फुआद'' ''ख़ैर अल-मजालिस'' आणि ''सियर अल-औलिया'' सारखे ग्रंथ आणि इतर उपयोगी सामग्री आढळून येते. दोन सुप्रसिद्ध रचनांकडे दुर्लक्ष करता येऊ शकत नाही, या कारणास्तव की त्यांचे लेखक हे गेसूदराज़ यांच्या समकालीन होते. संभवतः इ.स. १३७८ मध्ये लिहिले गेलेले मसूद बक्क यांचा ''मिरात अल-आरिफीन'' या ग्रंथाचे तेरावे प्रकरण 'समाअ' वर आहे. आणि अश्रफ जहाँगीर समनानी यांचे संवाद असलेले 'लतायफ़-ए-अश्रफ़ी' यांचे विसावे प्रकरण हे 'समाअ' वर आहे. शेख फरीदुद्दीन यांनी असे म्हटल्याचे सांगण्यात येते की, 'समाअ' श्रोत्यांचे हृदय हेलावून सोडतो आणि उत्कंठितांच्या वक्षःस्थळामध्ये उत्कंठेचा अग्नी पेटवून देतो.

### (१) बाह्य पैलू

चिश्ती सूफ़ींसाठी 'समाअ' हा उपासनेचा एक सर्वसाधारण प्रकार नव्हता; परंतु तो ईश्वराकडे नेणारा एक 'विशिष्ट मार्ग' होता. गेसूदराज़ लिहितात की, 'समाअ' हा प्रेयसीपर्यंत अर्थात ईश्वरापर्यंत पोहोचण्याचा एक मार्ग होता. उपासना (नमाज), उपवास व्रत (रोजा) आणि कुरआन पठण हे ईश्वराकडे घेऊन जातात, त्याचप्रमाणे 'समाअ' हा त्या ईश्वराच्या अधिक समीप - जवळ घेऊन जातो. अबू अली अल-दक्काक (मृत्यू इ.स. १०१४ वा १०१५ वा १०२१) हे असे म्हटल्याचे सांगतात की, 'समाअ' हा ईश्वराकडे घेऊन जाणारा सर्वात जवळचा मार्ग आहे. गेसूदराज़ यांना तसे असल्याचे यासाठी वाटते की, विचार-विमर्श (जमा) आणि विवेकाचे (तवज्जुः) ऐक्य हे महापरम सौभाग्य (जामए सादाता) असते आणि हे मुख्यत्वेकरून 'समाअ' मध्ये शक्य आहे. गेसूदराज़ यांना हा आध्यात्मिक दर्जा प्राप्त झाल्याचे दावा करतात, किंवा त्यांच्याच शब्दांमध्ये ''माझ्या कार्यामधील यश (फतेह-ए-कार-ए-मत) हे मुख्यत्वेकरून माझे कुरआन पठण (तिलावत-ए-कुरआन) आणि 'समाअ'मुळे आहे.''

येथे हे निदर्शनास आणून देण्याचे धाडस करता येईल की, उपासनेच्या दोन जोड्या असल्याचे वाटते : (क) उपासना (नमाज) आणि कुरआन पठण (तिलावत); (ख) कुरआन पठण आणि 'समाअ'. पहिल्याचा संभवतः संबंध हा तपस्वी - तपोनिष्ठांशी (जुह्हाद) असतो तर भय (ख़ौफ़) आणि आशा (रजा) यावर भाष्य करताना गेसूदराज़ म्हणतात की, एखाद्या माणसास वाटत असेल की भय आणि आशा म्हणजे नरकाचे भय किंवा स्वर्गाची आशा असते तर त्याचे हे म्हणणे सरासर चुकीचे आहे. जो 'भितो' (ख़ायफ़) आणि जो आशा करतो (राजी) अशासाठी उपासना आणि कुराण पठण अधिक समर्पक असतात. त्यांच्यासाठी दुसरी जोडी (युग्म) अधिक महत्त्वपूर्ण आहे, कारण ते अधिक फलदायी असल्याचे वाटते. शेख निजामुद्दीन

औलिया पण याच जोडी (युग्मा)चे समर्थक होते, कारण त्यांचे असे मत होते की, तीन प्रकारच्या 'सौभाग्यांचा' (सादात) लाभ एखाद्या रहस्यदर्शी साधकास होतो आणि तो होतो 'समाअ' आणि कुरआन पठणामध्ये. शेख निजामुद्दीन औलिया लिहितात की, 'समाअ' आणि 'तिलावत' यांच्या माध्यमाने तीन प्रकारचे सौभाग्य अवतरतात - 'प्रकाशपुंज' (अन्वार), 'अवस्था' (अहवाल) आणि 'फलनिष्पत्ती' (आसार). हे तीन वेगवेगळ्या जगतांशी निगडित आहेत आणि तीन विशिष्ट वस्तूंवर अवतरित होतात. प्रथमतः आध्यात्मिक जगता (आलम-ए-मलकूत) पासून प्रकाशपुंज आत्म्यां (अर्वाह) वर प्रकट होतो. द्वितीयतः, अंतःकरणावर अवतरित होणाऱ्या या अवस्था (अहवाल) असतात. त्या विवेकातील जगता (आलम-ए-जबरूत) पासून अवतरित होतात. तृतीयतः 'रडणे', 'किंचाळणे', 'हावभाव करणे' आणि 'हालचाल करणे' श्रोत्यांच्या या अवस्थांना फलनिष्पत्ती (आसार) असे म्हणतात. या 'भौतिक' जगापासून अवतरित होऊन मानवाच्या अवयवां (जवारिह) ना प्रभावित करतात आणि ती आंदोलित होऊन जातात.

हे लक्षात घ्यावे लागेल की जरी गेसूदराज़ हे सर्वसाधारणपणे उपासना (भक्ती) आणि 'शरीअः'चे फार भोक्ते होते, तरी पण ते 'समाअ'च्या विरोधात टीका करीत असल्याचे वाटत नाहीत. याबाबतीत त्यांची तुलना अहमद अल-गजाली यांच्याशी करता येते. त्यांनी 'बवारिक अल्-इल्मा' या ग्रंथामध्ये असेच मत प्रकट केले आहे. गेसूदराज़ यांना मान्य आणि उपासनेपेक्षा 'समाअ'स अधिक प्राधान्य असलेले, शेख मौदूद चिश्ती (मृत्यू इ.स. ११३२) यांचे खालील अवतरण पाहण्यासारखे आहे. 'समाअ' हे उपासने (नमाज) पेक्षा अधिक चांगले आहे काय, असे विचारले गेल्यानंतर शेख मौदूद चिश्ती यांनी उत्तर दिले, ''एखादा इसम हा सर्व नियमांचे काटेकोर पालन करून आपली उपासना (नमाज) करतो, तरी पण त्याला याची खात्री नसते की त्याची उपासना मान्य झाली आहे किंवा नाही, कारण ईश्वर ती स्वीकारेल किंवा नाकारेल. आमच्यासाठी 'समाअ' हा कृपाळू व दयाळू परमेश्वरास 'आकर्षित' करून घेण्याचे (जद्‌हबह) करण्याचे एक साधन आहे. उपासना मान्य होण्याविषयी (कबूल) शंका असते,तर 'समाअ' हे निश्चितपणे मान्य होत असते. (ऐन कुबूल)'' गेसूदराज़ लिहितात की, 'समाअ'स निरर्थक समजू नये, कारण 'नामस्मरण' (ज़िक्र), चिंतन-मनन (मुराक़बा) आणि उपासना (सलात) यांच्यामुळे जी फलनिष्पत्ती होते ती 'समाअ' मध्ये 'नगदी क्षण' स्वरूपात (नक़्द-ए-वक़्त) असते. (गेसूदराज़ - 'अस्मार अल् - अस्रार'- पृ. १०३)

गेसूदराज़ यांचे सदरहू मत अहमद अल-गजाली यांच्या या मताशी तुलनीय आहे की, जो 'समाअ'चे श्रवण करतो तो उच्च पदास पोहोचतो आणि दैवी कृपा प्राप्त करतो जे हजारो प्रयत्नांनी साध्य होत नाही आणि ही सगळ्यात परिपूर्ण अशी आध्यात्मिक अनुभूती असते. ('बवारिक' पृ. १६६) सिमनानी यांना सुद्धा असे वाटते की, नियमांचे काटेकोर पालन केल्यास 'समाअ' हा श्रोत्यास एका क्षणामध्ये (बयक दम) त्या उंचीस पोहोचवितो की जी अनेक वर्षांचे आटोकाट प्रयत्न (मुजाहदा) आणि आध्यात्मिक (धार्मिक) सरावांनी सुद्धा गाठता येऊ शकत नाही. ('मा ला बुद्द')

**क) 'समाअ'ची अनुज्ञेयता - वैधता**

गेसूदराज़ यांनी विधीवेत्त्यांच्या 'समाअ'विषयी असलेल्या हट्टी व ताठर दृष्टिकोनाची कडाडून टीका केली आहे. त्यांनी त्यांना महिला वर्गाच्या श्रेणीमध्ये टाकले आहे. 'समाअ'मध्ये महिलावर्गाकडे कटाक्ष

टाकायचे नसते. ते त्यांना 'पळपुटे, भित्रे' (ना मर्दान) म्हणून संबोधतात. ते लिहितात की जरी विधीवेत्त्यांनी 'समाअ'स निषिद्ध गणले आहे. त्यांचे युक्तिवाद व्यथा – दुःख (दर्द), तितिक्षा (तलब), जळून भस्म होणे (सोज़ी) आणि अशाच प्रकारच्या मनोदशांसमोर टिकत नाहीत. ते हा मार्ग ओलांडत नाहीत आणि म्हणून ते यास समजूही शकत नाहीत. शिवाय, त्यांचा क्षेत्र हा ऐहिक-भौतिक घटनांशी मर्यादित आहे. ''काय विचित्र (अजब) मनुष्य आहे हा (विधीवेत्ता)! किती विचित्र आहे हा इसम! ते उत्तेजना (इज़्तिराब), रोदन, क्रंदन (गिर्याः), व्यथा (अंदोह) आणि खेद-दुःख (हुज़्न) यांना खेळकरपणे सहज घेतात'' असे गेसूदराज़ म्हणतात.

ते 'समाअ'चे विभाजन चार प्रकारांमध्ये करतात, वैध दृष्टिकोनातून वैध वा अनुज्ञेय (हलाल), निषिद्ध वा वर्जित (हराम), अनिष्ट वा अवांछनीय (मक्रूह) आणि विधीसम्मत व मुभा (मुबाह), जेव्हा श्रोत्यांचे विचार संपूर्णपणे सत्तत्त्व आणि परम सत्याशी निगडित असतात, तेव्हा 'समाअ', 'हलाल' असतो, जर त्यांचे विचार ऐहिकतेमध्ये गुरफटलेले असतील तर तो 'हराम' आहे, जर त्यांचे विचार सत्तत्त्व आणि ऐहिकता यांच्या दरम्यानचे असतील तर तो 'मक्रूह' आहे आणि जर त्यांचे विचार अधिकांशपणे सत्तत्त्वेकडे झुकलेले असतील तर तो 'मुबाह' आहे.

**ख) नियम आणि अधिनियम**

जरी गेसूदराज़ हे कधी-कधी उदारमतवादी वाटत आणि कधी-कधी पुराणमतवादी सूफ़ींचे पारंपरिक मते अतिक्रमित करीत, तरीसुद्धा त्यांना या प्रथेच्या नियम व अटींविषयी बरेच काही सांगायचे आहे. कोणत्या परिस्थितींमध्ये 'समाअ'चे आयोजन करायचे असते, निःसंशय, तशा परिस्थितीत आयोजित त्यांचा 'समाअ' श्रोतृवर्गास संगीत श्रवणाच्या माध्यमातून एक अप्रतिम उपासनेकडे खेचत असे. याविषयी मत-प्रदर्शन करताना विधीवेत्त्यांना दोनदा विचार करणे भाग पडे.

गेसूदराज़ हे 'समाअ'चे खंदे पुरस्कर्ते होते हे उघडच आहे. त्यांच्यासाठी ती एक सर्वसाधारण उपासना नव्हे. त्याच्यामध्ये माणसास आत्मविस्मृत बनविण्याची महान 'शक्ती' आहे. गोड गळा हा मनामध्ये अगोदरच असलेल्या वृत्तीस चेतवितो, त्याच्यामध्ये कसलीच भर घालीत नाही. 'आदाब अल-मुरीदीन' या ग्रंथामधील सदरहू विधानाचे भाष्य करताना गेसूदराज़ लिहितात की माणसाच्या पोकळ मनास (खाली दहनी) सुद्धा गोड गळा हलवून सोडतो, याचा त्यांनी स्वानुभव घेतला आहे. त्यांच्यासाठी 'समाअ'ची ही असामान्य भूमिका आहे.

बसणे, पाहणे, मनन करणे, आत्मनियंत्रण अशासारख्या बाह्याचारासंबंधी जरी ते अतिनियमनिष्ठ होते, तरी ते प्रतिष्ठित सूफ़ींच्या तुलनेत फार उदारमतवादी होते. त्यांची अशी एक उदारमतवादिता यामध्ये आहे की, त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी 'समाअ' स निषिद्ध मानले नाही. ते इतरत्र म्हणतात की, श्रोता हा (मुस्तमी) हा एक बुद्धिमान – समजदार इसम (साहब-ए-फ़िरासत) असावा, म्हणजे सुयोग्य श्रोता आणि इतर यांच्यामध्ये फरक करता येऊ शकेल. प्रेमामध्ये व्यथेची अनुभूती (बा दर्द) घेतलेले सुयोग्य श्रोते आणि जे ऐहिक लालसेमध्ये (हवा परस्त) व्यर्थ गुंतलेले (खुदनुमा) यांच्यामधील फरक समजून यावे. 'समाअ'साठी लोकांना निमंत्रित करताना योग्य अशा श्रोत्यांचीच निवड करावी. कारण ज्या 'समाअ'मध्ये

ऐकण्यासाठी सर्व प्रकारचे लोक (हर जिन्स) एका ठिकाणी जमा होतात, त्यामध्ये 'आस्वादक' (ज़ौक़) सूफ़ीस असा 'समाअ' अमोघ किंवा प्रभावोत्पादक वाटत नाही.

इतरत्र ते लिहितात की, निपुण, प्रवीण लोकांसाठी (मुंतहियात) 'समाअ' 'इष्ट' आहे, आरंभकांसाठी (मुब्तदियान) आणि साधारण लोकांसाठी तो 'अनुज्ञेय' आहे, मात्र सर्वसाधारण लोकांसाठी 'अनिष्ट' आहे.

गेसूदराज़ 'समाअ' मध्ये भाग घेण्यास आरंभकांना किंवा नवागतांना प्रतिबंध (मज्जाव) करीत नाहीत. सिमनानी यांना असे वाटते की, सत्यनिष्ठ (अहल-ए-हक) लोकांचा 'समाअ' हा नवागत आणि साधारण लोकांसाठी एक गुणकारी औषध असते; परंतु त्यांना असे वाटते की, नवागतांना 'समाअ' ऐकण्यास वरचेवर अनुज्ञा देऊ नये. वरील वर्गीकरणावरून सुद्धा हे स्पष्ट, उघड आहे. जर एखाद्या शिष्यास 'समाअ' आवडत असेल तर त्याच्यामध्ये आळसाचा अवशेष बाकी आहे असे समजावे. जुनैद यांच्या या विधानावर भाष्य करताना ते म्हणतात की, एखाद्या नवख्यासाठी जुनैद यांनी 'समाअ' निषिद्ध ठरविले नाही. उलट या विधानाचा गर्भित अर्थ असा आहे की, एखादा नवखा सुद्धा त्यामध्ये भाग घेऊ शकतो. त्यांचे जुनैदच्या उपरोक्त विधानावरील भाष्य तर्कसंगत वाटत नाही, कारण विधान निश्चितपणे नवागतास - नवख्यास 'समाअ'मध्ये सहभागी होण्यास मज्जाव करते. एकीकडे ते जुनैद यांच्याशी असहमत होऊ इच्छित नाहीत, तर दुसरीकडे नवख्यांनी 'समाअ'मध्ये सहभागी व्हावे असे त्यांना वाटते.

ते पुढे म्हणतात की, 'समाअ'च्या विलक्षण शक्तीमुळे ऐहिक वासना शुद्ध होण्यासाठी नवखा हा 'समाअ'चे श्रवण करतो. ज्याप्रमाणे साबण (साबुन) मळके वस्त्र स्वच्छ करते. त्याचप्रमाणे 'समाअ' नवख्याचे मलिन मन स्वच्छ-शुद्ध करतो. गेसूदराज़ असा विचार करतात की, शिष्यास (मुरीद) 'समाअ' ऐकल्याशिवाय गत्यंतर नाही. हे रोचक आहे की जेव्हा अबू अल-नजीब नवख्यासाठी गज़ला आणि वर्णनात्मक काव्य (अल्-अवसाफ़) ऐकण्याचा समावेश अवांछनीय अनिष्ट श्रेणीमध्ये करतात, तेव्हा गेसूदराज़ तटस्थ राहतात. ते विधानाचा फक्त अर्थ सांगतात. असले काव्य नवख्याने आपल्या गुरूशी संबंधित दाखवावे.

**ग) वेळ (ज़मान), स्थळ (मकान) आणि बंधुगण - श्रोतृमंडळी (इख़्वान)**

'समाअ'च्या आयोजनापूर्वी वेळ, स्थळ आणि बांधव वर्गाच्या निवडीच्या अटी निर्धारण करणारे पहिले गृहस्थ जुनैद बगदादी हे असल्याचे वाटते. तेव्हापासून अधिकांश सूफ़ींनी या अटींचे परिपालन करीत असल्याचे दिसते. गेसूदराज़ हे स्वत: या बाबतीत विशेष दक्ष होते. जरी त्यांनी स्पष्टपणे यांचा उल्लेख केला असला नसेल, तरी पण त्या अनुस्युत आहेत. शिवाय, त्यांच्या चरित्र लेखकांनी 'समाअ'साठी 'ज़मान', 'मकान' आणि 'इख़्वान' आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

वेळेच्या बाबतीत गेसूदराज़ दिवसापेक्षा रात्रीस पसंत करतात. कार्यक्रमासाठी रात्र उजळली पाहिजे. ते म्हणतात की रात्रीच्या वेळी आपल्या अवस्थांना (हाली) लपविण्यास (इस्तितार) श्रोता समर्थ असतो; परंतु अभ्यागत (आयंदा व खुंदा) असणारे माणसाने त्याचे आयोजन दिवसा करणे हे श्रेयस्कर असते. या भेटी प्रत्यक्षत: वेळेचा व्यत्यय असतो. (परेशानी-ए-वक्त) आणि जर या व्यत्यया उपरांत एखादा आपली एकाग्रचित्तता साधत असेल तर याच्यापेक्षा अधिक चांगले काहीच असू शकणार नाही. सर्व धार्मिक आणि

सामाजिक कर्तव्ये पार पाडल्यानंतर 'समाअ'चे श्रवण करावे, असे सामानी हे प्रतिपादित करतात. कोणत्याच प्रकारचे ऐहिक किंवा धार्मिक चित्तविक्षेपा (ध्यान-भंग) मुळे 'समाअ'साठी परम आवश्यक असलेली निरंतर एकाग्रचित्तता भंग पाऊ (पावू) नये.

स्थळाच्या (जागेच्या) बाबतीत गेसूदराज़ लिहितात की, 'समाअ'साठी जागा ही सुरक्षित (महफूज) असावी, तिच्या अवतीभोवती भिंतीचे कुंपण असावे, तिला छत असावे. ती खुली जागा असू नये. त्यामुळे वाऱ्याचा त्रास होऊ नये किंवा प्रतिध्वनी निर्माण होऊ नये. ते यासाठी की ध्वनी हा वाऱ्यामुळे गुंजतो. खरे तर संगीताचा हा ध्वनी श्रोत्यांच्या चित्ता (दिला)वर जाऊन (नुज़ूल) धडकला (महल्ल) पाहिजे. ते पुढे स्पष्ट करतात की, जागा अत्तराच्या सुगंधाने दरवळली पाहिजे (मुरव्वह) आणि ती गोंगाटापासून मुक्त (ख़ाली) असावी. चंदन आणि तैलस्फटिक जाळावे, सुगंधी फुले ठेवावीत, कारण सुगंध हे आत्म्या (रूह) चे खाद्य-भोजन असते. जेव्हा आत्म्यास आहार पोहोचतो. तेव्हा तो सशक्त बनतो आणि 'समाअ'चा 'आस्वाद' (ज़ौक़) वाढतो. गेसूदराज़ हजर असलेले 'समाअ'च्या समारंभामध्ये दीप प्रज्ज्वलित केले जात आणि धूप व चंदन यांच्या सुगंधित धुरामुळे संपूर्ण वातावरण उत्साहवर्धक होऊन जाई. सार्वजनिक सभा किंवा लग्न समारंभांमध्ये 'समाअ' आयोजनाचे समर्थक गेसूदराज़ नव्हते. मशिदींमध्ये सुद्धा त्याच्या आयोजनाच्या विरोधात ते होते. शिवाय, श्रोत्यांनी ना मक्का (क़िब्ला) च्या दिशेने म्हणजेच पश्चिमेकडे ना तोंड करून बसावे ना तिकडे आपली पाठ करावी. (म्हणजेच दक्षिणोत्तर बसावे.)

बांधव किंवा श्रोत्यांसंबंधी गेसूदराज़ स्पष्ट करतात की, श्रोते एकाच सद्‌गुरूचे शिष्य असावेत किंवा एकाच संप्रदाया (यक ख़ानवादाः) चे असावेत. 'समाअ'मध्ये मज्जाव असणारांमध्ये अपराधी (मुन्किर), प्रभावशून्य शिष्य (मुतअल्लिमी बेसोज़), रूक्ष विधीवेत्ता, (मतफ़विकही बेसाज़), क्रूरधनी-गुरू (उस्तादी बेदर्द), अपवित्र विद्वान (दानिशमंदी बे-सफ़ा) पथभ्रष्ट (गुमराह), राजवंशी (अब्ना-ए-मु-लूक), इहलोलुप लोक (अबीब-ए-दुनिया) आणि स्त्रिया (औरत यांना दार किंवा खिडकीमधून झाकण्यास सुद्धा परवानगी देऊ नये.) यांचा समावेश होतो.

**घ) 'समाअ'ची वाद्ये**

वाद्यासंबंधी गेसूदराज़ हे अत्यंत उदार होते. सूफींचा सनातनी इस्लाम आणि पारंपरिक मतांपेक्षा ते 'समाअ' मध्ये संगीत वाद्ये वाजविण्याच्या संपूर्ण विरोधात नव्हते, यद्यपि ते डफ किंवा खंजिरीशिवाय इतर कोणतेच वाद्य आपल्यासोबत ठेवत नसत. या अनुष्ठानामध्ये त्याच्याशिवाय ते काहीच वाजवत नसत. असे म्हणतात की, सुरुवातीच्या काळामध्ये गेसूदराज़ यांनी वाद्यांमध्ये कोणताच भेदभाव केला नव्हता. एकदा ते आपल्या दोन सोबत्यांसह जास्तीत जास्त वाद्ये एकत्रित जमा करून 'समाअ'चे आयोजन केले असल्याचे म्हणतात. जेव्हा त्यांचे सद्‌गुरू शेख नसीरूद्दीन महमूद यांना ही गोष्ट कळाली तेव्हा त्यांनी गेसूदराज़ यांना अशा प्रकारचा 'समाअ' आयोजन करण्यास मनाई केली. तेव्हापासून गेसूदराज़ यांनी कोणतेच वाद्य वाजविण्याची अपेक्षा ठेवली नाही; परंतु एखादा जर वाजवत असेल तर ते त्यास आक्षेप घेत नसत.

ते निवेदन करतात की, शैतानाने वाद्य यंत्रांचा शोध लावला; परंतु ते असा युक्तिवाद करतात की, जरी विधीवेत्त्यांनी वाद्ये निषिद्ध केली आहेत, तरी पण त्यांचे महत्त्व 'दर्दी लोक'च (अहल-ए-दिल) जाणतात.

म्हणून या मतभेदासंबंधी मौन बाळगलेलेच बरे. तथापि, त्यांना असे वाटते की, विशेष करून सूफ़ी सद्गुरूने वर्जित वाद्यांपासून चार हात लांब असावे, हे श्रेयस्कर असते.

**च) काव्य**

गेसूदराज़ यांना काव्य प्रिय होते. त्यांच्या फ़ारसी भाषेतील कृतींवरच हे तथ्य स्पष्ट आहे. त्यांनी 'समाअ' मध्ये गाल, तीळ इत्यादींचे काव्यमय वर्णन अनुज्ञेय ठरविले; परंतु येथे महत्त्वाची बाब ही आहे की, अशा काव्य चरणांशी 'तहमील'च्या प्रक्रियेचे उपयोजन (कसे करावे), श्रोत्याने आपल्या सद्गुरूशी परस्पर संबंध जोडले पाहिजे.

सामानी हे लिहितात की, 'समाअ' मध्ये प्राय: फारसी गज़ल (भावगीत) आणि काव्य चरणे गायली जात. कारण गेसूदराज़ फारसी काव्य (कवने) अधिक पसंत करीत. असे सांगतात की, गेसूदराज़ म्हणतात, ''हिंदवी (हिंदी) कवने ही प्राय: मुलायम, मधुर आणि अंत:स्पर्शी असतात. सुरेल स्वरमालिका पण मृदू असते, मुलायम असते. याने विनम्रता आणि समर्पण वृत्ती निर्माण होते; परंतु हे केवळ फारसी काव्याच्या सुमधुर आणि नाजूक स्वरामध्ये शक्य आहे. याने गवईच्या अंत:करणामध्ये उसळणाऱ्या भावभावनांना न्याय दिला जातो. इतरत्र, ते म्हणतात की एखाद्याच्या मनाचा कल (मायल) हा हिंदवी काव्यापेक्षा फारसी आणि अरबी काव्याकडे अधिक असतो.''

**छ) मार्गदर्शक तत्त्वे**

'समाअ' मध्ये सहभागी होण्यासंबंधी गेसूदराज़ यांनी अनेक नियम आणि अटी सांगितल्या आहेत. या प्रथेच्या प्रगत स्वरूपाशी निगडित काहींचा येथे आम्ही उल्लेख करू. बाह्य गोष्टींमध्ये सुद्धा 'एकत्त्वते'चे (जमा) निदर्शक अशा फार सुंदर मुद्यांचे विवेचन त्यांनी केले आहे.

प्रत्येकाने स्वत:स स्वच्छ ठेवावे, आचमन (वज़ू) करावे आणि पांढरे कपडे नेसून 'समाअ' मध्ये सहभागी व्हावे.

'समाअ' मध्ये चिंतन – मननामध्ये मग्न असावे. (मुराक़बा) आणि आपले ध्येय (मक़सूद) समोर असल्याचे जाणावे – कल्पना करावी.

अबूल नजीब अल्–सुहरवर्दी यांचे अनुसरण करून बंदा नवाज गेसूदराज़ सांगतात की, संमेलनामध्ये 'समाअ' सुरू होण्याअगोदर व समाप्तीनंतर दोन्ही वेळेस कुराण पठण केलेच पाहिजे. सुमधुर वाचकाच्या अभावी, निदान 'फ़ातिहा' म्हणजे मंगलाचरण पाठ म्हटले गेले पाहिजे. ही कार्यप्रणाली अवलंबणे यासाठी आवश्यक आहे की, याचा मध्य भागाचा (वस्त) पहिला अंश हा प्रारंभाशी – सुरुवातीशी संबंधित आहे आणि मध्यभागाचा शेवटचा अंश हा शेवटाशी – समाप्तीशी निगडित आहे. जेव्हा 'समाअ' संमेलनाच्या सुरुवातीस व शेवटी कुरआन पठण केले जाते, तेव्हा त्या दरम्यान जे काही घडते (अनुभवास येते) ते सर्व कुरआन–श्रवण बनून जाते. याच कारणास्तव तर प्रेषित मुहम्मद[स.] यांनी मिमशद अल्–दिनोरी यांना 'समाअ' च्या प्रारंभी व शेवटी कुरआन पठण करण्याचा आदेश दिला होता.

प्रत्येकाने डोळे उघडून लक्षपूर्वक श्रवण करावे. त्याने एक तर कव्वाला (गवई) कडे पाहावे किंवा आपली दृष्टी समोर लावावी.

'समाअ' मध्ये प्रत्येकाने चिंतन (मुराक़बा) करावे आणि मौन जप (ज़िक्र-ए-ख़फ़ी) करावे, कारण चिंतन-मननामुळे आत्मा उंचावतो आणि मौन जपामुळे त्याचे परिणाम लवकर दिसून येतात. 'समाअ' मध्ये 'इल्ल अल्लाह' (म्हणजेच सस्वर जप अर्थात ज़िक्र-ए-जली)चा 'जप' (ज़िक्र) करू नये. जसे कुब्रविया: संप्रदायाचे सूफ़ी करतात कारण त्यामुळे तो 'समाअ'न होता 'ज़िक्र' अर्थात नामस्मरण बनून जाईल.

तहान लागली असतानासुद्धा 'समाअ' मध्ये पाणी पिणे योग्य नव्हे. सद्गुरूच्या (पीर) उपस्थितीमध्ये 'हालचाल' (जुंबिश) दर्शविणे हे एखाद्या शिष्याचे लक्षण नव्हे, त्याने सद्गुरूकडे लक्ष एकवटणे जास्त बरे.

कवनांची समर्पकता किंवा असमर्पकता, अथवा काव्य किंवा संगीताच्या तांत्रिक बाबींकडे जास्त लक्ष देऊ नये.

आपल्या अवस्थेशी अनुरूप असे एखादे विशिष्ट काव्य चरण किंवा संगीताची धून यासाठी कव्वालाकडे अनुरोध करू नये किंवा प्रेरित करू नये. कारण काव्य चरणे किंवा संगीताचे राग यांचे वेचे 'अव्यक्ता'कडून (ग़ैब) असते आणि जे काही 'अव्यक्ता'कडून (येत) असते ते निर्दोष, निष्कलंक (बेऐब) असते.

'समाअ' मध्ये नाचणे आणि गाणे हे सूफ़ीचे काम नव्हे.

जर कव्वाल (गायक) हा सूफ़ीपैकी (क़ौम) असेल तर परमभाग्य (ज़हे) समजावे; परंतु कव्वाल ही एखादी महिला कधीच असू नये. गायक हा स्वच्छ (बा तहारत), शुचिता राखणारा असावा नाही तर त्याला संमेलनातून बाहेर घालवावे (पाठवावे).

भावसमाध्यवस्थेमध्ये असलेल्या कव्वालास एकटे सोडून देऊ नये. त्याच्या हालचालींशी प्रत्येकाने जुळवून घेतले पाहिजे (मुवाफ़क़त). अशा अवस्थेमध्ये जर तो आपले वस्त्र फाडून तुकडे करीत असेल किंवा ते आपल्या शरीरावरून काढून टाकून देत (फेकत) असेल तर गायकास देऊन टाकावे.

रात्रंदिवस 'समाअ' मध्ये सहभागी होऊन कोणीही 'समाअ'स आपला धंदा किंवा व्यवसाय (पेशा) बनवू नये, कारण 'समाअ'मध्ये वाजवीपेक्षा जास्त सहभाग घेतल्यामुळे दांभिकता निर्माण होते, ढोंगीपणा येतो.

'समाअ'नंतर प्रत्येकाने आपले मन (दिल) मोकळे करावे. दुसरीकडे लक्ष देऊ नये. त्याने संपूर्णपणे आपले 'एकमेव ध्येया' (मक्सूद-ए-तमाम) कडे आपले लक्ष केंद्रित करावे, कारण त्यामध्ये 'विवृती' किंवा 'विजय' (फ़ुतूह) असतो.

**ज) कृत्रिम भावसमाधी (तवाजुद) आणि अनुरूपता (मुवाफ़क़त)**

'मुवाफ़क़त' म्हणजे 'अनुरूपता' (वाफ़क़ अर्थात जुळणे, सदृश होणे). तांत्रिकदृष्ट्या फरक हा आहे की, 'तवाजुद' हे बळेच वा कृत्रिमपणे भावसमाधी निर्माण करणे आहे किंवा भावोल्लासाचा (वज्द) आव आणणे आहे तर 'मुवाफ़क़त' हा 'तवाजुद'चा एक प्रकार आहे. म्हणजेच 'वज्द' अर्थात भावोल्लासमध्ये हालचाल करणारे इतरांची अवस्था पाहून एखाद्या इसमाने तत्सम विशिष्ट हालचालींचे अनुसरण करणे हे आहे.

गेसूदराज़ तवाजुद नाकारत नाहीत. 'अल्-रिसाला अल्-कुशैरिया' या ग्रंथामधील हा उतारा की ''कृत्रिम आचरण निहित (समाविष्ट) असल्याकारणाने तवाजुद ही प्रशंसनीय बाब नाही.'' (या विधानाशी)

ते सहमत नाहीत. उलट त्यांना असे वाटते की, वज्द आणि विज्दान अनुभवण्यासाठीच तवाजुदचे उपयोजन होते, म्हणून त्यास 'कृत्रिम आचरण' म्हणून संबोधू नये. जर वज्दची अनुभूती घेण्याचा हेतू असेल तर ते अनुज्ञेय आणि स्तुत्य आहे. सात दिवसांच्या एकांतवासानंतर (ख़ल्वत) कुब्रविया: संप्रदायामध्ये शिष्यास 'समाअ' ऐकावयास लावतात. कुब्रविय: सूफ़ींच्या या प्रथेची ते टीका करतात. स्वत:स खुश करण्यासाठी हे एक प्रकारचे 'कृत्रिम आचरण' आहे, असे गेसूदराज़ यांना वाटते. अशा प्रकारे ते बळेच स्वत:स आनंदामध्ये ढकलून घेतात. हा सूफ़ींचा 'समाअ' होऊ शकत नाही.

नंतर 'समाअ'मध्ये जुनैद यांच्या 'शांतचित्त अवस्थे'वर भाष्य करताना गेसूदराज़ म्हणतात की, आपल्या सोबत्यांच्या या प्रश्नाचे उत्तर देताना की तवाजुदमध्ये त्यांच्या अवस्थेवर प्रभाव पडतो की नाही (तेव्हा) जुनैद यांनी तवाजुद नाकारले नाही. गेसूदराज़ पुढे म्हणतात की, तवाजुद ही एक चांगली गोष्ट (मुस्तहसिन) आहे. जुनैद यांच्या उपाख्यानाद्वारे काही पैलूंवर प्रकाश पडतो. प्रथमत: सूफ़ींसाठी तवाजुद हे प्रशंसनीय (ममदूह) आणि ग्राह्य (मक़बूल) आहे. द्वितीयत: जर एखादा सुप्रतिष्ठित (मुहूतशमी) आणि सन्मान्य (मुहतर्रमी) सूफ़ी 'समाअ'चा संचालक असेल तर त्यांच्या उपस्थितीत एखाद्याने हालचाल (जुंबद) करणे किंवा डोलणे, हे गैर अयोग्य असते. तृतीयत: 'समाअ'मध्ये सूफ़ी हे बेहोश (बेख़बर) होऊन जातात असे नव्हे तर त्यांना आपल्या स्वत:ची जाणीव (बा खुद) असते.

मुवाफ़क़त संबंधी ही अनुरूपता निर्माण होण्यासाठी गेसूदराज़ दोन अटींचा उल्लेख करतात. पहिली ही होय की अगोदरच भावसमाध्यवस्थेमध्ये असलेल्याकडे पाहून, इतरांनी अशा अवस्थेमध्ये त्याला एकट्यास सोडून न देण्याच्या हेतूने, इतरेजन त्याचे अनुसरण करून अनुरूपता साधतात. हे यासाठी केले जाते की गायकाच्या अंतर्मनाचे एकत्त्वतेचे (जमीयत) कारण बनून जावे (म्हणजेच अशा अनुरूपतेमुळे, त्याच्याशी अनुरूप नसलेल्या श्रोत्यांमुळे गायकाचे लक्ष विचलित होऊन जाऊ नये.) दुसरी अवस्था ही 'अवस्था आणि आस्वाद धारण करणाऱ्याशी' अनुरूपता साध्य करणे आहे की जेणेकरून त्याची 'अवस्था' आणि त्याचा 'आस्वाद'च्या प्रसादाचा काही हिस्सा (नसीबा:) त्यांना पण प्राप्त होऊन जावे. पहिल्याच्या बाबतीत गायकास 'एकटेच न सोडून देण्याच्या हेतूने' अनुरूपता निर्माण केली जाते, तर दुसरीमध्ये हे 'अनुसारका'साठी असते.

पूर्वीच्या सूफ़ींनी प्राय: नाकारलेले 'तवाजुद'ला गेसूदराज़ यांनी का बरे नापसंत केले नाही? त्यांच्यासाठी तवाजुद हे भावसमाधी निर्माण करण्याची एक कृत्रिम पद्धतीच नसून ती त्यांच्यासाठी आंतरिक अभिप्राय-सार्थकता होती. हा 'समाअ'मधील एखाद्या सूफ़ीचा प्राथमिक टप्पा आहे.

**झ) आत्मसंयम (आत्मनियंत्रण)**

गेसूदराज़ यांनी तवाजुदची संकल्पना टाकून दिली नाही, हे लक्षात घेणे रोचक आहे; परंतु 'समाअ'मध्ये आत्मसंयमावर त्यांनी अधिक भर दिला आहे. एकीकडे ते प्रस्थापित मताच्या पलीकडे जातात तर दुसरीकडे ते त्याच्या हद्दीत राहण्याचा प्रयत्न करतात.

ते म्हणतात की, 'समाअ'मध्ये जर आत्मचेतना न गमवता एखादा शुद्धीवर असेल तर ही गोष्ट प्रशंसनीय आहे. जर एखादा श्रोता असा दावा करीत असेल की तो आपल्या 'हालचालींशी' बेख़बर आहे तर खरोखर

तो 'समाअ'शीच बेख़बर आहे, त्याला 'समाअ'ची मुळीच जाणीव नाही. 'समाअ'मध्ये आत्मसंयम न करण्याचे जुनैद यांनी आदेश दिले असतानासुद्धा एका तरुण सोबत्याने, हा आदेश न ऐकता आत्मसंयम साधण्याच्या प्रयत्नामध्ये स्वतःचा मृत्यू ओढवून घेतला. या घटनेशी संबंधित आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना गेसूदराज़ उद्गारतात, ''वाहवा! जुनैदसारख्या त्या सद्गुरूची! कारण त्यांना अवस्थांची जाणीव होती आणि आपली अवस्था ('हाल'- तंद्रा) प्रदर्शित करण्यापासून त्या तरुणास त्यांनी योग्यपणे प्रतिबंधित केले होते. वाहवा! आहे त्या तरुण शिष्याची की ज्याने मृत्यू येईपर्यंत स्वतःचे आत्मसंयमन केले.'' गेसूदराज़ इतरत्र म्हणतात की, अवस्थेचे प्रदर्शन हे 'साधन', 'सहयोग' (मुसादत) नसून ते एक पाखंड, ढोंग आहे. अवस्थेच्या अधीन असताना प्रत्येकाने स्वतःस नियंत्रणामध्ये ठेवणे अपेक्षित असते. अशा स्थितीमध्ये त्यास उभे राहण्यास भाग पाडते (आणि नृत्यास प्रवृत्त करते); परंतु त्याच वेळेस वश करणारी अवस्था (हाली) आणि प्रभाव टाकणाऱ्या कृती (हरकात व सकनात) यांना मागे न लोटण्याची खबरदारी घ्यावी लागेल.

## (२) गूढ, गोपनीय पैलू

### क) 'समाअ'चे अभिप्राय आणि समापन

गेसूदराज़ यांचा 'समाअ'विषयी काय अभिप्राय आहे? गेसूदराज़सारख्या एका सुप्रसिद्ध सूफ़ीस असे विचारणे हा एक रोचक प्रश्न आहे. गेसूदराज़ यांच्यासाठी 'समाअ' ही एक सर्वसाधारण साधना नव्हती; परंतु तो त्यांच्यासाठी एक असामान्य 'शक्ती' धारक आध्यात्मिक जगाकडे खेचून नेणारा एक अमोघ साधन आहे. 'समाअ' हे अव्यक्ताचे एक अभ्यागमन प्रवसन असते, असे पारंपरिक मत गेसूदराज़ व्यक्त करतात. जर काही हिस्सा (नसीब) असेल तर एखाद्यास अशी अनेक अभ्यागमनांची अनुभूती प्राप्त होते. 'समाअ'मध्ये ध्वनी संवेदना (सही कुवा) विरहित अशी एक विशिष्ट शक्ती (कुव्वती) प्रदर्शित होते. ही शक्ती म्हणजे 'अभ्यागमन प्रवसन' होय. अभ्यागमन त्याला स्वतःस वशीभूत करते आणि त्याला उत्तेजित करून टाकते (दर तसर्रूफ-ए-खुद आवुर्दः) बंदानवाज गेसूदराज़ म्हणतात की, सूफ़ींचे रडणे हे सत्यापासून 'अभ्यागतामुळे' असते.

या अभ्यागमनाशी संबंधित 'समाअ'चे वर्गीकरण गेसूदराज़ तीन प्रकारांमध्ये करतात. अभिधावक किंवा आक्रमक (हाजिम), हे 'समाअ'च्या सुरुवातीसच आश्चर्य कारकपणे वशीभूत करून घेते. लोक हिच्या प्रभावाखाली अनियंत्रित बनतात, ते स्वैर होऊन जातात, कारण ते त्यामुळे जवळजवळ वेडे (दीवान : वार) बनून जातात. 'समाअ'चा दुसरा प्रकार तो असतो की, एखादे अभ्यागमन हे एखाद्या इसमास आपल्या वशात घेते आणि त्याला परिपूर्ण अवस्थेमध्ये पोहोचविल्याशिवाय सोडून देत नाही. याशिवाय तो इसम पण 'एक उपलब्धी' (ग़नीमत) स्वरूपात ते स्वेच्छेने स्वीकारतो. तिसरा प्रकार हा तो असतो की आपल्या सहकाऱ्यांशी (अस्हाब) अनुरूपता (बा मुवाफ़क़त) निर्माण केल्यामुळे त्याद्वारे अवतरित होते.

शेख निजामुद्दीन औलिया 'समाअ'चे दोन प्रकार मानतात : हाजिम आणि गैर-हाजिम काव्यचरण किंवा गायकाचा मधुर कंठ ऐकताक्षणीच 'समाअ'च्या सुरुवातीस माणसास (श्रोत्यास) व्याकुळ करणारा 'समाअ'

हा ‘हाजिम’ असतो तर ‘समाअ’ ऐकल्यानंतर श्रोता हा प्रभावित होऊन त्याचा संबंध हा ईश्वर वा सद्‌गुरू किंवा त्याच्या मनाला येईल त्याच्याशी जोडतो. अशा ‘समाअ’स ‘गैर-हाजिम’ म्हणतात.

अमीर खुर्द – ‘सियर अल्-औलिया’ पृ. ५०० आणि अमीर हसन सिज़्झी – ‘फ़वायद अल्-फुआद’- पृ. ११३-१४.

गेसूदराज़ येथे संभवत: तवाजुदकडे संकेत करतात. कारण नंतर ते म्हणतात की, तवाजुदच्या माध्यमाने भाव समाध्यवस्था निर्माण करण्यासाठी ही अनुरूपता असते आणि अनुकरणाच्या (तवाफुक़) माध्यमाने प्रत्यक्ष ही अनुरूपता (विफ़ाक़) साध्य केली जाते.

गेसूदराज़, जुन्नून मिस्री यांच्या खालील विधानाचे तपशीलवार विवेचन करतात. मिस्री यांच्या मते, ‘समाअ’ हे एक दैवी अभ्यागमन असते (वारिद अल-हक्क). हे अंत:करणांना सत्याकडे (हक़्क़) ओढते – जो कोणी सत्याच्या माध्यमाने (बा हक़्क़) हे ऐकतो तो ईश्वरास (तहक़्क़ क़) पोहोचतो, तर जो कोणी आपल्या वासनेच्या माध्यमाने ऐकतो तो पाखंडामध्ये गुरफटला जातो (तज़ंदक़). गेसूदराज़ लिहितात की, ‘हक़’ या शब्दाचे विशिष्ट अर्थ आहेत. श्रोता हा सत्य – ईश्वराच्या (हक़) गुणांशी (सिफ़ान) निगडित (मुत्तासिफ़) असतो आणि म्हणून तो (आपोआप) एक वाकबगार, निपुण (मुहक़्क़िक़ व मुतहक़्क़ि क़) बनतो. या सत्यामुळे तो जे काही ऐकतो ते सत्य असते आणि तो ईश्वरापर्यंत पोहोचतो. दुसरा प्रकार हा तो आहे की, ज्यामध्ये श्रोता हा असा विचार करतो की तो सत्याच्या माध्यमाने ऐकत आहे. (हा श्रोता, सत्याच्या गुणांशी निगडित असल्यामुळे अगोदरच निपुण आहे.); परंतु वास्तविक त्याला ‘स्व’ (खुदी) चीआणि वासनेची (नफ़्स-ए-नफ़्सानीयत) जाणीव आहे. ही वासना त्याला पाखंडा (जंदक़:) कडे घेऊन जाते.

### ख) संगीत

गेसूदराज़ यांच्या विचाराच्या महत्त्वपूर्ण पैलू म्हणजे त्यांची संगीत कलेविषयी मान्यता होय. याबाबतीत ते संभवत: पारंपरिक विचारांच्या मर्यादा ओलांडतात. ते ‘समाअ’मध्ये प्रयुक्त काव्यचरणांच्या स्पष्टीकरणावर व्याख्यांवर भर देतात. त्यांच्या प्रत्यक्ष संगीतावरील चर्चेवरून असे स्पष्ट दिसते की ते संगीताचे मोठे जाणकार पण होते. ते विशुद्ध स्वरमाधुर्यास काव्यापेक्षा उच्चतर मानत असावेत असे म्हणणे अवघड आहे. मंजुळ गायनाचा काय चमत्कारपूर्ण प्रभाव असू शकतो, यामध्ये त्यांचा विश्वास होता, असा तर्क करण्यास काहीच हरकत नाही. दुसऱ्या शब्दांमध्ये, गाण्याचा गोडवा आणि काव्यामुळे भाव समाध्यवस्थेची अनुभूती एखाद्या माणसास घेता येऊ शकते.

ते लिहितात की, गाण्याचा गोडवा (माधुर्य) (नग़्मा:) आणि काव्यचरणांच्या अर्थगौरवामुळे (हमल-ए-बैती) यांच्या संयुक्त परिणामास्वरूप ‘समाअ’मध्ये आनंदाची (ज़ौक़) अनुभूती निर्माण होते. स्वरमाधुर्यामुळे निर्माण होणाऱ्या आनंदापुढे काव्यचरणांच्या व्याख्येची गरज भासत नाही; परंतु तरी पण मनामध्ये (दर बातिन) एक प्रकारची विमल भावना (दिक़्क़ती) निर्माण होते. त्या विमलभावनेस प्रतिसाद देत, मधुर गळा (कंठ) (हुस्न-ए-सौत) हा गायकाची भान हरवतो आणि तदनुकूल तो ‘हलू’ लागतो.

(जुंबिशी) आणि 'डोलू' लागतो. (इज़्तिराबी), तो रडतो (गिर्या:) अथवा ओरडतो - आक्रोश करतो (नारा:) गेसूदराज़ हे विशुद्ध स्वर माधुर्यामुळे माणूस का उत्तेजित होऊन जातो याचे विवेचन करतात. ''आत्म्या (रूह) प्रमाणे प्रत्येक सुंदर वस्तू ही उच्चतर जगापासून (आलम-ए उल्वी) निर्माण होते.'' हे आपले सद्गुरू शेख नसीरूद्दीन महमूद यांचे अवतरण ते उद्धृत करतात. स्वरमाधुर्याचे सौंदर्य हा ईश्वरी संकल्प (निवाडा) असल्यामुळे त्याच्या उगमाचा पत्ता नसतो. जेव्हा आत्मा हा मंजुळ गायन ऐकतो तेव्हा तो तृप्त होतो आणि विमल भावना अनुभवतो.

हे खचितच, निश्चित आहे की संगीत हे काव्यापेक्षा उच्चतर जगाची वस्तू आहे. शिवाय, 'समाअ' हा काव्य आणि मंजुळ गायन यांचे एक संमिश्रण असतो. कदाचित गेसूदराज़ यांना संभवत: असे म्हणायचे असेल की कधी-कधी भाव समाध्यवस्था ही फक्त संगीताच्या परिणामस्वरूप असेल, कारण संगीताचा संबंध हा आत्म्याच्या जगाशी असतो. मात्र ईश्वराचा संबंध हा प्रत्येक वस्तूशी असतो. प्रत्येक निर्मितीमध्ये ईश्वराचे एक विशिष्ट गुण अभिव्यक्त होते; परंतु ज्याअर्थी मानव (इन्सान) हा अस्तित्वात असलेल्या प्रत्येक वस्तूचे आकलन (मुरक्कब) करतो, त्याअर्थी तो ईश्वराच्या समस्त गुणांनिशी निर्माण करण्यात आला आहे. शिवाय, ईश्वरी कृपा सर्वांवर अवतरित होते.

हुजवीरी म्हणतात की, आत्मा हा अत्यंत सूक्ष्म असतो आणि ध्वनीमध्ये सूक्ष्मता असते आणि ध्वनी जेव्हा ऐकले जातात तेव्हा आत्मा हा आपल्याशी एकरूप असलेल्याकडे झुकतो. (सय्यद अली बिन उस्मान अल-हुजवीरी - 'कश्फुल महजूब' पृ. ३९९) येथे ग्रंहांचे समन्वय आणि संगीताविषयी पायथॅगोरसच्या सिद्धांताची आठवण होते.

### ग) संगीत (तह्मिल)शी निगडित गर्भित अर्थाशी संबंधित प्रक्रिया

सर्वसाधारणपणे पूर्वोक्त नियम व अटींव्यतिरिक्त 'समाअ'मध्ये सहभागी होण्याविषयीचा निकष ऐहिक लालसेच्या प्रेमामध्ये गुंतलेल्या माणसाच्या अंत:करणाची निष्कपटता किंवा प्रेमामधील त्याची व्यथा-वेदना हा आहे. अलाउद्दौला सिमनानी यांना असे वाटते की, 'समाअ' हे एक औषध आहे. - 'मा ला बुद्द' 'समाअ'मध्ये सहभागी श्रोत्यास विशुद्ध बनविणारे वास्तवाशी (हक़ीक़त) निगडित असे रूपकामध्ये (मजाज़) महत्त्व आहे. गेसूदराज़ यांना असे वाटते की, वास्तव (हक़ीक़त) हे एक रामबाण औषध (अक्सीर) आहे. आपल्या स्पर्शाने ते कुठल्याही वस्तूस शुद्ध सोन्याचे (ज़रे ख़ालिस) बनवून टाकते. गेसूदराज़ यांना 'समाअ'ची भूमिका वास्तवाची (हक़ीक़त) वाटते. ते म्हणतात की, 'समाअ' श्रवणाच्या वेळेस, सूफ़ींमध्ये काही असे आहेत की जे आपल्या कटाक्षास मुक्त ठेवतात. (नज़रबाज़) ते तरुण नवयुवकांकडे (अमारिद) आणि सुंदर चेहऱ्यांकडे (सुरत-ए ज़ेबा) पाहतात. वास्तवाचे जाणकार लोक (मर्दान-ए-हक़ीक़त) यास 'समाअ' म्हणत नाहीत. अशा सूफ़ींची वेदना (दर्द) आणि व्यथा (सोज़) यास ते महत्त्व देत नाहीत, कारण असले लोक हे रूप-पूजक (सुरत पास्त) असतात; परंतु यापैकी काही सूफ़ी रूपकास (मजाज) वास्तवाच्या (हक़ीक़त) रंगामध्ये रंगवून किमयाचा (कीमियागरी) उपयोग करतात. त्यांना 'हक़ीक़त' सोन्यामध्ये बदलून टाकते; परंतु प्रत्येक प्रियकराची (सौदाइ) नौका या टप्प्यावर पोहोचत नाही.

गेसूदराज़ म्हणतात की, जेव्हा काव्यचरणांचा अर्थ स्पष्ट नसतो – म्हणजेच जर त्यांचा संबंध गूढ टप्प्यांशी (मक़ाम) किंवा बाह्य अवस्थांशी (हाल) नसेल तेव्हा श्रोता 'तह्मील'च्या प्रक्रियेद्वारे ते ऐकेल. उदाहरणार्थ, 'तह्मील'ची पद्धत ही एक समष्टीस (कुल्ली) दुसऱ्या समष्टीशी जोडणे, एक अवस्था (हाल) दुसऱ्या अवस्थेशी निगडित करणे, एक उपाख्यान (हिकायत) दुसऱ्या उपाख्यानाशी संबंधित करणे – अशी असते. दुसऱ्या शब्दांमध्ये एक समष्टी किंवा अवस्था अथवा उपाख्यान यांना भौतिक – 'मजाज़' मानून, दुसऱ्यास वास्तव किंवा आध्यात्मिक (हक़ीक़त) स्वरूपात आपण मानू शकू. गेसूदराज़ म्हणतात की, 'तह्मील'चे दोन प्रकार आहेत.

प्रथम नुकताच वर खुलासा केल्याप्रमाणे आहे तर दुसरा हा प्रत्येकाच्या 'हमल' स्थितीशी निगडित आहे. म्हणजेच आपल्या मुलाच्या निधनामुळे व्यथित इसम हा जेव्हा एखादे कडवे (काव्यचरण) ऐकतो, तेव्हा तो 'हमल'ला आपल्या स्थितीशी निगडित करतो आणि अशा प्रकारे तो प्रक्षुब्ध होतो. गेसूदराज़ यांना असे वाटते की, 'तह्मील'च्या दोन पद्धतींमध्ये एक संबंध (मुनासबती) आहे, यद्यपि हा कशा प्रकारचा संबंध आहे हे त्याला सांगता येत नाही. कुठल्याही परिस्थितीत, श्रोत्याच्या अवस्थे (हाल) पुढे या प्रक्रियेचा परिणाम दिसून येतो आणि त्याला 'आस्वाद'(ज़ौक़) आणि भाव समाध्यवस्था (वज्दात) यांची अनुभूती होते. परिणामी असा एक इसम प्रक्षुब्ध होतो किंवा रडतो किंवा भाव समाध्यवस्थेमध्ये गरागरा फिरू लागतो. नखरेलपणा (करिश्मा:) गर्व-अभिमान (नाज़), गाल (खाल), तीळ (ख़ाल), वियोग (फ़िराक़), मीलन (विसाल) आणि अशाच इतर गोष्टींसंबंधी वर्णन असलेली काव्यचरणे यांच्याशी सूफ़ी ही कार्यप्रणाली अवलंबतात, भलेही ती अरबी, फारसी किंवा हिंदी भाषेमधील का असेनात.

### घ) विविध प्रकारच्या नृत्यांचे प्रतीकात्मक अर्थ

प्रतीकात्मक अर्थांचे विवेचन करण्याअगोदर आपण गेसूदराज़ हे नृत्याची कशी व्याख्या करतात ते पाहू या. नृत्याविषयी त्यांची संकल्पना ही हुजवीरी यांच्या संकल्पनेसारखी आहे. हुजवीरी म्हणतात की भावविभोर किंवा समाधिमग्न हालचाली आणि सराव हे नृत्यासारख्या वाटतात. (हुजवीरी – 'कश्फुल महजूब' – पृ. ४१६) शेख निज़ामुद्दीन औलिया यास 'रक्स' म्हणजेच नृत्य म्हणत नाहीत; परंतु यास 'हालचाली' (पदन्यास) किंवा 'कृती' असे म्हणतात. जरी ते म्हणतात की, या हालचाली भौतिक जगाशी संबंधित असतात, तरी पण त्यांना 'महाभाग्य' म्हणतात. गेसूदराज़ 'रक्स' अर्थात नृत्याची व्याख्या करताना म्हणतात की, 'समाअ'मध्ये निर्माण होणाऱ्या उत्तेजना (इज़्तिराब)चे नाव 'रक्स' म्हणजे नृत्य आहे. ते ज्यास 'रक्स' म्हणतात, हुजवीरी यांना असे वाटते की, ते 'रक्स'शी मिळते-जुळते आहे. ते त्यांना 'हालचाली' (पदन्यास) म्हणणे जास्त पसंत करतात.

गेसूदराज़ पुढे म्हणतात की, उत्तेजना ही तालबद्ध, लयबद्ध (बावज़्न) असेल किंवा नसेलही असेही होण्याची शक्यता असते की, संगीतामधील निष्णात असा एखादा सूफ़ी संगीतामधील आघात (जर्ब) आणि तालबद्धता (वज़्न) ही अभ्यागमनाच्या प्रवसनाच्या अकस्मात उत्तेजनेमुळे विसरून जातो. कुठल्याही नियमाचे आधार नसताना, अभ्यागमनामुळे शरीराची अचानक झालेली निश्चेष्टतेमुळे सूफ़ी

(क़व्वाल) हा गोल घिरट्या मारू लागतो. (गश्तनी), धावत-पळत सुटतो (दुईदनी) आणि इकडे-तिकडे धावतो (पायदानी).

गेसूदराज़ समाधिमग्न नृत्याचे विविध प्रकारांची गणना करून त्यांचे विवेचन करतात. अहमद-अल्-ग़ज़ाली नृत्याचे रोचक विवेचन प्रस्तुत करतात. ''अस्तित्वात असलेल्या वस्तूंच्या (दायरतल मौजुदात) चक्रासभोवती आत्म्याचे चक्राकार फिरणे हे नृत्याचे एक निदर्शक आहे.'' (अहमद अल्-ग़ज़ाली - 'बवारिक् अल्-इल्मा' पृ. १५९) गेसूदराज़ म्हणतात की, चक्राकार नृत्य करणे म्हणजे अस्तित्व चक्राचे वर्तुळाकार फिरणे होय. (आसिया-ए-वुजूद) (बंदा नवाज गेसूदराज़ - 'ख़ातिमाह-ए-आदाब' पृ. २९) त्यापैकी काहींचे येथे आपण विवेचन करूया. गेसूदराज़ लिहितात की, जर एखादा इसम भावसमाध्यवस्थेमध्ये गोल फिरत असेल तर त्याचा गुढार्थ असा आहे की तो जगाभोवती फेरे मारत आहे. (अत्वार-ए-आलम) आपल्या ध्येयाच्या (मक़्सूद) शोधात. तो परमेश्वर स्वत:स कोणत्या मार्गाने किंवा कोणत्या दारामधून स्वत:स प्रकट करील, याची मुळीच कल्पना नाही. याचा असाही अर्थ होऊ शकेल की, त्याची कोणतीच युक्ती किंवा उपाय कामास येत नसल्यामुळे तो असहाय आहे, त्यामुळे तो आश्चर्यामध्ये (हैरान) गुरफटला जातो. 'अस्मार अल-अस्रार'च्या भाष्यामध्ये असे आहे की, पहिले विवेचन हे 'सालिक मजज़ूब'च्या अवस्थेशी संबंधित आहे तर असहायतेची अवस्था ही 'मजज़ूब सालिक'ची आहे.

जर कोणी उडी मारत असेल किंवा घोड्यासारखा भरधाव दौडत असेल (मी जहद), तर त्याची सदरहू कृती ही याचे निदर्शक आहे की त्याचा आत्मा (रूह) हा उच्चतर जगाकडे (आलम-ए-उल्व), परंतु त्याच्या पायात बेडी असलेली त्याची वासना त्याला मागे पृथ्वीतळावर (जमीन) खेचते (ओढते). भाष्यानुसार समालोचनानुसार ही अवस्था 'सालिक मजज़ूब'कडून अभिव्यक्त होणारी आहे. शेखुल इश्राक म्हणतात की, एखादा माणूस नाचतो कारण त्याचा आत्मा वर जाऊ इच्छितो. आत्मा हा पिंजऱ्यामध्ये बंद एक पक्ष्यासारखा असतो. तो पिंजऱ्याच्या बंदीवासामधून मुक्त होऊ इच्छितो. शेख शहाबुद्दीन सुहरवर्दी यांचीही पण अशीच कल्पना आहे की 'समाअ' मधील उत्तेजना ही 'रूह' अर्थात आत्मा आणि 'नफ्स' म्हणजे वासना यांच्या दरम्यान असते. 'समाअ'मधील व्याकुळतेमुळे आत्मा आणि वासना यांच्यामध्ये रस्सीखेचचा डाव चाललेला असतो. त्यामध्ये आत्मा हा वर ओढतो, तर वासना ही खाली खेचते.

दुसरा एखादा इसम हा जमिनीवर आपले पाय आपटेल. हे या गोष्टीचे निदर्शक आहे की, उपाधीस म्हणजेच भगवंता (ईश्वरा) वाचून इतर सर्वांस संपूर्णपणे आपल्या पायाखाली तुडवून त्यांना नेस्तनाबूद करून टाकीत आहे. भाष्यकार म्हणतात की, ही अवस्था 'मजज़ूब सालिक'ची आहे.

नृत्याचा आणखी एक प्रकार तो आहे की, एखादा इसम हा आपले दोन्ही हात डोक्यावर वर उंचावतो. त्यांना वर्तुळाकार फिरवितो, त्यांना पिळवटतो आणि मग त्यांना खाली घेतो. याचा अभिप्राय असा होतो की, त्याने आपल्या वक्ष:स्थळामध्ये 'देवलोक' (मलकूत), 'तपलोक' (जबरूत) आणि सत्यलोक (लाहूत) यांना पिळवटले आहे. एखादा माणूस भावसमाध्यवस्थेमध्ये 'हुव' (तो (परमेश्वर)) म्हणेल याचा अर्थ असा होतो की, तो माणूस 'हुवीयत' (तद-त्त्व) चे 'हुव' शिवाय इतर काहीच म्हणत (उच्चारत) नाही. दुसरा एखादा माणूस 'हु ह हि'उच्चारेल. याचा अभिप्राय असा असेल की त्याचे मूळ (अस्ल) हे

'बिंदू'(नुक़्ता) आहे. जर या बिंदूच्या साह्याने वर्तुळ काढण्यात आले तर रूप–आकार निर्माण होईल. जेव्हा हा आकार स्वरयुक्त बनेल तेव्हा ते फक्त 'हु ह हि' च बनू शकेल. गेसूदराज़ म्हणतात की, तर मग द्रष्टा 'साधक' हा खरोखर 'समाअ'मध्ये असेल आणि तो तितकाच त्या बिंदूमध्ये असेल. त्या 'बिंदू'मध्ये एकत्त्व (वहदत) वर येते, 'अहंता' (मीपणा) (अन्नीयन) गुप्त स्थानी जाते, अस्तित्वाच्या पोशाखाभोवती (रख्त–ए–वुजूद) द्वैत (दूई) जमा होते; परंतु तद–त्त्व (हुवीयत) आपल्या जागी (कायम) असते, कारण 'एकामध्ये एक' (यकी दर यकी) शिवाय तेथे दुसरे काहीच नसते.

असे गृहित धरता येईल की, 'समाअ'मध्ये 'हु ह हि' चे उच्चारण करणे हे एखादा सूफ़ी सर्वोच्च टप्पा गाठल्याचे निदर्शक आहे. हा तो टप्पा आहे की, जेथे एकेश्वरवादाची (तौहीद) अवाचिकता (मौन) आणि एकत्त्वता (वहदत) एकाच ठिकाणी (ख़ाना:) आसनस्थ असतात आणि ऐक्यामधील (जमा) पार्थक्य (तफ़्रीक़) आणि ऐक्यामधील ऐक्य (जमा अल्–जमा) अर्थात परम ऐक्य ते हरवून बसलेले असतात, कारण परमेश्वर हा स्वतः प्रस्थापित झालेला असतो. एखादा द्रष्टा गाठू शकणारा सर्वोच्च टप्पा म्हणजे 'जमा–अल्–जमा' होय. परमेश्वर हा 'अतीतात अतीत' असल्याची मानवामधील चेतनेचे हे द्योतक आहे. येथे द्रष्टा हा 'तोच परमसत्य आहे' (हुवल हक्क़) असे उच्चारतो. 'मी परम सत्य आहे'(अनल हक्क़) असे उच्चारित नाही. हा 'तद–त्त्वा' (हुवीय्यत) चा भावार्थ आहे. याचे वर्णन हदीसमध्ये असे आहे – ''जो ईश्वरास ओळखतो तो मूक बनून जातो.'' म्हणून तर हा 'बिंदू'चा (नुक्ता) टप्पा आहे. हीच सुरुवात आणि हाच शेवट आहे. शेवटचा टप्पा हा अत्यंत साभिप्राय आहे. कारण गेसूदराज़ यांच्या सूफ़ीवादाची सर्वसाधारण संकल्पना विदित करतो : एका बिंदूच्या मदतीने काढलेल्या वर्तुळास ना सुरुवात असते ना शेवट असतो.

### च) 'समाअ'मध्ये 'एकत्त्वा' (जमा) ची अवस्था

अगोदरच सांगितल्याप्रमाणे गेसूदराज़ यांना असे वाटते की, 'समाअ' हा ईशवराकडे घेऊन जाणारा सर्वात गुणकारी मार्ग आहे, कारण 'एकत्त्व' (जमा) आणि विवेक हे दोन्ही मुख्यत्वेकरून यामध्येच शक्य आहेत. येथे आम्ही 'जमा'विषयी त्यांचा खरा अभिप्राय काय होता आणि 'समाअ'च्या माध्यमाने हे 'एकत्त्व' कसे मूर्त रूप धारण करते, याचे विवेचन करणार आहोत.

'समाअ'च्या स्थळाविषयी त्यांचा आग्रह पण लक्षात घ्यावे लागेल. ती खुली जागा असू नये. कारण गायकाचा आवाज आणि ध्वनी हे श्रोत्यांच्या अंत:करणाला भिडले पाहिजेत. याशिवाय वेळ आणि श्रोतृ–बांधवांसंबंधी असे म्हणता येईल की 'समाअ' रात्रीच्या वेळी आयोजित करणे अगत्याचे आहे आणि श्रोते हे एकाच सद्गुरूचे शिष्य असावेत. एका दृष्टीने पाहता हे सर्व मुद्दे नियम आणि अटीसारख्या बाह्य बाबी पण 'एकत्त्वा'च्या प्रकाराकडे अंगुलीनिर्देश करतात. हे पाहणे रोचक आहे की, गेसूदराज़ हे मानवाचे आंतरिक घटक आणि 'समाअ'मध्ये त्यांची अभिरूची यांचे विश्लेषण कशा पद्धतीने करतात. त्यांचे विश्लेषण संगीत आणि मंजुळ गायन यांचे गूढ मूल्य पण स्पष्ट करते.

गेसूदराज़ म्हणतात की, मानव हा पंचतत्त्वांनी बनलेला आहे. '' 'समाअ'मध्ये अंत:करणे, चित्त आणि आत्म्यांसाठी पेय (शुर्ब) असते.'' या अवतरणाचे समालोचन करताना गेसूदराज़ लिहितात की, मानवामध्ये

पाच गोष्टी असतात. 'रूह' (आत्मा), 'कल्ब' (अंत:करण), 'अक़्ल' (विवेक), 'तबा' (प्रकृती, स्वभाव) आणि 'नफ़्स' (वासना). ('तर्जमाह-ए-आदाब' पृ. २७१) 'समाअ'मध्ये प्रकृती किंवा स्वभाव (तबा) वेळूची (मुसीकार) सरळता (रास्ती) किंवा वक्रता (कज़ी) यामध्ये व्यस्त असते. वासना (नफ़्स) काव्याची सरलता किंवा वक्रता पाहते, विवेक (अक्ल) काव्यामधील गुप्त शहाणपण याचा विचार करतो. अंत:करण किंवा मन (दिल) शोधित वा मनोवांछित (हमल-ए-मत्लूब) पाहण्यामध्ये मग्न असते आणि आत्मा (रूह) हा गोड आवाज किंवा मंजुळ स्वरांसोबत विहार करीत असतो. गेसूदराज़ निवेदन करतात की, 'नफ़्स' नृत्याचे आधारभूत नियम आणि सुमधुर ध्वनीमध्ये स्वत: मग्न होऊन जातो. आत्मा हा सुमधुर मंजुळ ध्वनींनी आनंदमग्न होऊन जातो. (शहाबुद्दीन सुहरवर्दी - 'अवारिफुल मआरिफ़' पृ. १९४-९५) गेसूदराज़ म्हणतात की जेव्हा या पाच गोष्टी 'जमा' एकत्रित (जमा) होतात तेव्हा 'समाअ' मध्ये शांती (करार) आणि सौख्य (आरामी) यांचा लाभ होतो, कारण या पाच पैकी कोणतीही एक दुरवस्थापासून दुरावत (खस्म) नाही. ते म्हणतात की, याच कारणास्तव लोक 'समाअ'मध्ये गुरफटलेले (गिरफ्तार) असतात. ते पुढे स्पष्ट करतात की, जेव्हा लोक उपासनेमध्ये व्यस्त असतात, तेव्हा आस्वाद (ज़ौक़) वासने (नफ्स) चा असतो; परंतु अंत:करण (कल्ब), आत्मा (रूह), स्वभाव (तबा) आणि संवेदने (हिस्स) हे सर्व त्या वासनेच्या अनुभूतीसाठी अडथळे (मुज़ाहिम) ठरतात. जर लोक नामस्मरणामध्ये (ज़िक्र) व्यस्त असतील तर त्यामुळे अंत:करण वा मन (दिल) आनंद (हज़्ज़) अनुभवतो. तेव्हा इतर त्याच्यासाठी अडथळे ठरतात. उपरोक्त पांचीच्या एकत्त्वामध्ये महत्त्व असल्याचे वाटते. अशी 'अवस्था' क्वचितच प्राप्त होते. 'अस्मार अल--अस्रार' या ग्रंथाच्या भाष्यकाराने रोचक आलोचना दिली आहे. हे पाच (तबा, नफ़्स, अक़्ल, दिल आणि रूह) अंत:करण वा मनाचे ताब्यात असतात. जेव्हा अंत:करण वा मन पण इतरांसोबत विचारमग्न असते, तेव्हा ते इतरांवर स्वार (ग़ल्बा:) होते आणि सर्वांना एकाचमध्ये (यकी) जोडते. मग ते परिपूर्ण बनते. असे क्वचित घडते आणि हे दुर्मिळ आहे की, आपापले खाद्य (गिज़ा) शोधणारे हे एकतेमध्ये गुंफले जातात. (जमा शवंद) एक 'सालिक मजज़ूब'चा मार्ग आहे, तर दुसरा हा 'मजज़ूब सालिक'चा. ध्वन्यर्थ हा आहे की, पाच गोष्टींपैकी प्रत्येक हा 'समाअ'मधील आपापल्या आवडीमध्ये गुंतून 'सालिक मजज़ूब'चा एक मार्ग असतो, असे आहे त्याअर्थी त्यांची परिपूर्णता आणि ऐक्य ही वेगळी आहेत आणि तो म्हणजे 'मजज़ूब सालिक'चा मार्ग हे पण शक्य आहे की, एक मार्ग हा उन्माद-कैफ़च्या (सुक्र) अवस्थेचा असेल तर दुसरा हा मन:शांतीचा असेल (सहव) कारण अगोदरच विवेचन केल्याप्रमाणे पाच गोष्टींच्या एकत्रीकरणाची फलनिष्पत्ती ही शांती (करार) आणि सौख्यामध्ये (आराम) असते. याशिवाय 'समाअ' मधील पदलालित्य आणि नृत्य हे उन्मादामुळे घडून येते तर मन:शांतीच्या अवस्थेमध्ये सूफ़ी हा शांत असतो.

'समाअ'च्या अभिप्रायाविषयी बोलताना गेसूदराज़ सांगतात की, 'समाअ'ची सर्वोत्तम अवस्था आणि श्रोत्यांच्या अवस्थांची (अह्वाल) सर्वात गाढ स्थिती तेव्हा असते जेव्हा अल्लाहशी सोबत असण्याच्या अवस्थेमध्ये (माअ) अंत:करण प्रफुल्लित - आनंदित होते, कारण त्यांच्या दरम्यान ना काव्यचरणांचा अर्थ असतो ना (प्रत्यक्ष) काव्यचरणे. ईश्वरासोबत अंत:करण प्रसन्न असते आणि आपले उद्दिष्ट साध्य केल्यामुळे समाधानी. ही 'एकत्त्वा'ची अवस्था आहे.

क्वचितच प्राप्त होणाऱ्या 'जमा'च्या अवस्थेशिवाय, गेसूदराज़ लिहितात की, 'समाअ'च्या श्रोत्यांच्या विविध अवस्था (अहवाल) असतात. 'समाअ'मध्ये सूफ़ीचा टप्पा (मक़ाम) ओळखला जाऊ शकतो. त्याला प्रभावित करणाऱ्या काव्यचरणांवरून हे ओळखता येते. उदाहरणार्थ जर वैराग्याशी निगडित एखाद्या काव्यचरणामुळे सूफ़ी उत्तेजित होत असेल तर याचा अर्थ असा होतो की, तो वैराग्याच्या टप्प्यावर आहे; परंतु ते म्हणतात की, एखादा इसम हा हळूहळू आपल्या अवस्थेवर स्वार होतो आणि मग तो त्याचा मालक बनतो. तो अभ्यागमनावर प्रभुत्व मिळवितो, मग ते इत:पर त्याच्यावर स्वार होऊ शकत नाही. कलाबाजी म्हणतात की आत्मिक – आध्यात्मिक अवस्था एखाद्यास आत्मसंयमाची शक्ती प्रदान करते. असा इसम हा 'निवासी' (मुतमक्कीन) म्हणून गणला जातो. म्हणून असे म्हटले जाते की, 'निवासी'मध्ये 'समाअ'विषयी आस्वाद कमी असतो. त्याच वेळेस रडणे आणि व्याकुळ होणे पण त्याच्यामध्ये कमी होऊन जातात. नवखे आणि मध्यमवर्गींच्या तुलनेने दुसऱ्या शब्दांमध्ये एखादा 'निवासी' हा एकत्त्व (जमा) अथवा मन:शांती (सह्व) प्राप्त केलेला असतो.

### छ) 'समाअ' – एक सूफ़ी साधनामार्ग

हा भाग महत्त्वाचा आहे कारण याचा संबंध गेसूदराज़ यांच्या तीन तांत्रिक शब्द 'तवाजुद', 'वज्द' आणि 'वुजूद' यावरील विवेचनाशी संबंधित आहे. याशिवाय आमचे विवेचन 'समाअ'मध्ये प्राप्त होणारे टप्पे (मक़ामात) आणि त्यांचा सूफ़ीवादाच्या महत्त्वपूर्ण पैलूंशी असलेले संबंध दाखवून देईल, जसे 'सूक्ष्म अगम्य चक्रे' (लतायफ़) आणि यासारखे इतर ट्रिमिंगहॅम यांनी दाखवून दिल्याप्रमाणे फार कमी सूफ़ींनी, काव्य गायनामुळे भावसमाध्यवस्था निर्माण करण्याव्यतिरिक्त 'समाअ' मध्ये खरोखर काय समाविष्ट आहे, याचे विवेचन केले आहे. येथे आम्हास गेसूदराज़ यांच्या विचारामधील 'समाअ'च्या प्रमुख गूढ पैलूंविषयी चर्चा करण्याविषयी एक संधी आहे. म्हणूनच आम्ही या विभागात 'समाअ' एक सूफ़ी साधनामार्ग असे शीर्षक दिले आहे.

'तवाजुद', 'वज्द' आणि 'वुजूद' या पारिभाषिक शब्दांचे सविस्तर प्रतिपादन करताना गेसूदराज़ लिहितात की, वस्तुत: भावसमाधी (वज्द)साठी तवाजुद ही याचना आहे. ती प्राप्तव्य, शोध (याफ़्तन) आहे. भाव समाधीपूर्वी प्रत्येकास यातना सोसाव्या लागतात आणि त्यांना असे वाटते की, सूफ़ीचा 'आस्वाद' (ज़ौक़) आणि त्याची 'उत्कंठा' (शौक़) हे पण प्रत्यक्ष 'वज्द' बनून जातील. यात गेसूदराज़ 'वज्द' आणि 'विज्दान' असे म्हणतात; परंतु जेव्हा एखादा 'विज्दान' बनतो तेव्हा 'वुजूद' (शोध, प्राप्तव्य) असते (ऐन-ए वुजूद)

सर्वात रोचक मुद्दा हा आहे की, गेसूदराज़ त्या इसमाचे नामनिर्देश 'वुजूद' असे करतात, ज्याने वुजूदचा टप्पा गाठला आहे. ते लिहितात की, 'वुजूद' असा एक इसम असतो. (वुजूद इबारत अज़ शख़्सी आत्त) की जो (साक्षात) 'वुजूद'च असतो. (ऐन-ए वुजूद) अशा इसमास इतर सर्वांची जाणीव नसते. परमधाम (अर्श) आणि पादपीठ (कुर्सी) यांची पण त्यास जाणीव नसते. कारण तो ईश्वरासोबत असतो. (बा खुदा) आणि म्हणून तो प्रेमसंबंध (घनिष्ठता) आणि भयाची अवस्था धारण करत नाही. 'आरिफ़ुल वुजूद' अथवा

महाकारण देह हे ईश्वराचे मार्गदर्शन असते. कारण ''अल्लाह इच्छितो त्यास आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवितो.'' २४:३५ 'वुजूद'शी ईश्वरा (खुदा)च्या ओळखीचा एक सबळ तात्पर्य येथे आहे.

'तवाजुद' आणि 'वज्द' यामधील फरकाच्या बाबतीत गेसूदराज़ हे अबू अली अल-दक़्क़ाक आणि अल्-कुशैरी यांच्याशी सहमत आहेत. 'वज्द' साध्य करण्यासाठी 'तवाजुद' हे कृत्रिम आचरण आहे, तर 'अदृश्य ईश्वरा'पासून (ग़ैब) येणारे अभ्यागमन वा प्रवसन (वारिदी) म्हणजे 'वज्द' होय. हे निवडीशिवाय अंत:करणा (दिला) वर प्रकट होते. ते पुन्हा सहमत होतात की प्रेमाच्या उत्कर्षानंतर 'वुजूद' प्राप्त होते आणि तो साधक 'वज्द'च्या टप्प्यापासून वर चढतो. गेसूदराज़ पुन्हा स्पष्ट करतात की, 'वुजूद' हा असा एक टप्पा आहे की, ज्यामध्ये माणूस 'वुजूद'च बनून जातो. (ऐन-ए वुजूद). त्याचे 'वुजूद' हेच त्याचे प्रत्यक्ष ध्येय बनून जाते. (ऐन-ए मक़्सूद) आणि सर्वात शेवटी त्याच्या ध्येयाचा 'वुजूद' हाच 'त्याचाच वुजूद' (ऐन-ए वुजूदी ईन) बनतो. येथे असे गृहीत धरण्यात आले आहे की, गेसूदराज़ हे 'वुजूद'च्या टप्प्याचे तीन दर्जांविषयी बोलत आहेत, या विषयाकडे आपण वळणार आहोत.

अल्-कुशैरी यांच्या मते, यांच्याशी गेसूदराज़ हे सहमत आहेत, 'तवाजुद' हा आरंभ असतो. (बिदाय:) तर 'वुजूद' हा समापन (निहाय:) आणि 'वज्द' हा मध्यभागी असतो (वासित). याचा संबंध 'तवाजुद' आणि 'वुजूद' या दोघांशी असतो. अल-कुशैरी हे अल-दक़्क़ाक़ यांचे मत उद्धृत करताना सांगतात की, 'तवाजुद' माणसास (अल-अब्द) वेढणे, घेरणे (इस्तीआब) बाध्य करते आणि 'वज्द' त्याच्या तल्लीनतेस बाध्य (इस्तिग्राक) करते आणि 'वुजूद' त्याच्या विलयास, निर्वाणास (इस्तिहलाक) बाध्य करते. या टप्प्यांचे आणखी पुढे विवेचन करताना अल-दक़्क़ाक़ म्हणतात की हे तीन टप्पे जणू सागरास (समुद्रास) पाहणे, त्याच्यावर नौकाविहार करणे आणि त्याच्यामध्ये बुडून जाणे यासारखे आहेत. गेसूदराज़ या उद्धरणाचे स्पष्टीकरण करताना लिहितात की, 'तवाजुद' हे माणसास नेहमी जखडून ठेवते, जेव्हा त्याचे आचरण कृत्रिम असते. (तकल्लुफ मी कुजद), 'वज्द' म्हणजे माणूस मग्न असल्याचे त्यास आढळते. (याफ्तन), 'वुजूद' मग त्याच्या निर्वाणाचे कारण (मअूजिब) बनते - म्हणजेच तो स्वत:पासून प्रयाण करतो अर्थात निर्वाण करतो - परंतु 'वुजूद' मधून तो बाकी (बाक़ी) राहतो. अशा प्रकारे, तो माणूस 'सत्याची अपेक्षा' बनतो. (इस्तीफा-ए हक़्क़). समुद्राच्या रूपकाच्या दुसऱ्या विभागाशी गेसूदराज़ अल-दक़्क़ाक़ यांच्याशी मतभेद व्यक्त करतात. ते म्हणतात, 'तवाजुद' हे समुद्रकिनारी (काठी) उभे असलेल्या एका माणसासारखे आहे. कारण त्यामध्ये बुडणे हे त्याचे दैवलिखित आहे. 'वज्द' हे समुद्रामध्ये उडी मारून त्याच्याशी परिचित (आइना) होण्यासारखे आहे. 'वुजूद' हे त्याचे समुद्रामध्ये बुडून नाहीसे होण्यासारखे आहे, शेवटी परिणामी 'प्रत्यक्ष समुद्र' (ऐन-ए दरिया) साक्षात समुद्र बनण्यासारखे आहे.

गेसूदराज़ यांचे उपरोक्त समुद्राच्या रूपकासंबंधी भाष्य त्यांच्या सर्वसाधारण सूफ़ी संकल्पनांसाठी महत्त्वपूर्ण आहे. 'नियत वा पूर्व निर्दिष्ट' (साख़्ता) हा शब्द येथे संकेत शब्द आहे. आपल्या अस्तित्वाअगोदर असलेले एक माणूस आणि समुद्र यांच्या दरम्यान असलेले (परंतु) निसटलेले दुवा याकडे ते निर्देश करते. शेवटी परिणाम म्हणजे त्याचे 'साक्षात समुद्रमय' होऊन जाणे आहे. हीच 'सत्याची अपेक्षा' होती. अगोदरच आपण पहिल्याप्रमाणे, गेसूदराज़ यांचा सूफ़ीवाद हा एक वर्तुळ किंवा जेथून सुरुवात होते तेथेच शेवट

होण्याची एक प्रक्रिया यासारखा आहे. त्यास आपण सूक्ष्म देह (वहदत अल्-वुजूद) अर्थात 'अस्तित्व ऐक्य' चा एक प्रकार म्हणू शकू. निःसंशय, ते सावधान आहेत की मधला भाग हा नेहमी सुरुवातीचा भाग आणि शेवटच्या भागाशी जोडले गेलेला असतो.

यासंबंधी दुसरी एक समुद्राची उपमा अत्यंत रोचक आहे. गेसूदराज़ लिहितात की, जेव्हा समुद्र हा अशांत असतो, खवळलेला असतो, तेव्हा त्यास 'लाटा' (मौज) म्हणतात, जेव्हा तो हवेमध्ये वर उचलतो, तेव्हा त्यास 'बाष्प' (बुखार) म्हणतात, जेव्हा बाष्प (वाफ) वातावरणामध्ये सघन बनते, तेव्हा त्यास 'ढग' (सहाब) असे म्हणतात, जेव्हा ते थेंब - थेंब स्वरूपात गळू लागतात, तेव्हा ते 'पाऊस' बनते, जेव्हा तो वाहतो तेव्हा तो 'प्रवाह, ओढा' बनतो आणि जेव्हा ओढा (नदी) समुद्रास मिळून एकरूप होतो तेव्हा तो प्रत्यक्ष समुद्र-साक्षात समुद्र बनतो (म्हणजेच, ते आपल्या मूळ स्वरूपाकडे परतते). वस्तुतः पाऊस हा समुद्राच्या पाण्यापासून बनतो आणि समुद्र हा पाण्याने बनतो. (पाण्याच्या विशाल आणि अगाध साठ्यामुळे) हा प्रतीकवाद ईश्वराचे वेगवेगळ्या स्वरूपामधील प्रकटीकरण दर्शविते. भाष्यकाराने निर्दिष्ट केल्याप्रमाणे ईश्वराचे विविध गुण (सिफ़ात), नानाविध नामे (अस्मा) आणि असंख्य कार्ये (अफआल) यांचा पण निर्देश होतो. येथे मुद्दा हा आहे की, 'समुद्र' हा 'समुद्रच' राहतो आणि तो बाष्प, ढग, पाऊस इत्यादी विविध नावांमुळे मुळीच प्रभावित होत नाही, ना या नामांमुळे त्याच्यामध्ये काहीच भर पडत नाही. जरी ते 'समुद्रा'मुळे (समुद्रापासून बनलेले) आहेत, परंतु ते समुद्र नाहीत.

आपल्या विवेचनाच्या मागे वळता, कुशैरी टप्प्यांची एक उतरंडचा उल्लेख करतात : 'संकल्प वा दृढनिश्चय' (कुसूद), 'प्रवेश' (वुरूद), 'साक्ष्यांकन' (शुहूद) 'गवेषणा (शोध)' (वुजूद) आणि 'अवसान' (खुमूद) हे टप्पे स्पष्ट करताना गेसूदराज़ लिहितात की, येथे अडचण ही आहे की, कुशैरी यांनी या अगोदर 'ख़ुमूद'चा टप्पा 'वुजूद'च्या टप्प्याअगोदर दर्शविला आहे; परंतु येथे नेमके याउलट आहे. ते स्वतः या समस्येचे निराकरण करू लागतात. ते म्हणतात की, या अगोदर दर्शविल्याप्रमाणे 'वुजूद'च्या अगोदर येणारे 'खुमूद' हे 'खुमूद-ए बशरीयात' होते. (मानवत्त्वाचे अवसान, आपल्या सोईसाठी याला आपण 'खुमूद क्र. १' म्हणू या.) 'वुजूद'च्या साक्ष्यांकनाचा हा परिणाम होय. ('शुहूद-ए वुजूद' या 'वुजूद'ला आपण 'वुजूद' क्र. १ म्हणू या आणि हा 'शुहूद' 'शुहूद क्र.१') येथे 'खुमूद' (ज्याला आपण 'खुमूद क्र.२ म्हणू या.') हे 'वुजूद' क्र. १ नंतर आहे आणि हे (म्हणजेच खुमूद क्र. २) पण 'शुहूद' (शुहूद क्र. २) आहे. याचे कारण 'शुहूद' हे 'खुमूद-ए बशरीयात' आहे. (म्हणजेच 'खुमूद क्र. १'). गेसूदराज़ पुढे म्हणत जातात की, एक दुसरे 'वुजूद' (क्र. २) आहे. हे 'खुमूद' (क्र. २) नंतर आहे. हे 'वुजूद' क्र.२ ते म्हणतात. एका द्रष्ट्याचे 'निरस्तित्वाचे अस्तित्व' ('बूद-ए नाबूद') आहे. या टप्प्यावर, त्याच्या सेवेमध्ये दोन अवस्था असतात. मनाची शांत वृत्ती (सह्व) आणि लोप किंवा विनाश (मह्व). 'सह्व' हे 'स्वच्या माध्यमाने स्वपासून स्वकडे परतणे' (अज़ खुद-ब-खुद बा खुद आयद) आहे तर 'मह्व' हे 'स्वच्या माध्यमाने स्वपासून स्वकडे विलुप्त होणे' (अज़ खुद ब खुद बा खुद रवद) आहे. जेव्हा एक अवस्था लुप्त होते तेव्हा दुसरी हमखासपणे उपस्थित होते. गेसूदराज़ म्हणतात, वस्तुतः 'सह्व' हे 'मह्व'च्या मुळाशी असते तर 'मह्व' हे 'सह्व'च्या मुळाशी असते.

गेसूदराज़ हे प्रत्यक्षपणे दोन ‘वुजूद’ दोन ‘खुमूद’ आणि दोन ‘शुहूद’बद्दल बोलतात. ‘वुजूद’ आणि ‘खुमूद’ हे क्रमश: एका पाठोपाठ येतात. पैकी एक दुसऱ्यापेक्षा दर्जामध्ये उच्चतर असतो. म्हणजेच ‘वुजूद’ क्र. १ हे ‘खुमूद’ क्र. १ नंतर येते (हे प्रत्यक्षपणे ‘मानवत्त्वाचे अवसान’ आहे, ‘खुमूद-ए-बशरीयत’ ‘वुजूद’ क्र. १ हा टप्पा ‘खुमूद’ क्र. १ पेक्षा उच्चतर आहे. ‘खुमूद’ क्र. २ हा टप्पा ‘वुजूद’ क्र. १ पेक्षा उच्चतर आहे. यानंतर सर्वोच्च टप्पा ‘वुजूद’ क्र. २ चा आहे. ‘वुजूद’ क्र. २ हा टप्पा ‘शाश्वतते’च्या (बक़ा) समकक्ष आहे. कारण माणसामध्ये जेव्हा ‘सह्व’ आणि ‘मह्व’च्या अवस्था कार्यरत होतात तेव्हा तो स्वत:च संपूर्णपणे ‘वुजूद’ बनून जातो. येथे ‘वुजूद’ क्र. २ हे ‘खुमूद’ क्र. २ च्या मुळाशी असते. हे सुद्धा अनुस्यूत आहे. दुसऱ्या शब्दांमध्ये ‘खुमूद’ क्र. २ चा टप्पा गाठलेला एखादा द्रष्टा हा ‘वुजूद’ क्र. २ आपोआप ग्रहण करतो, कारण ‘खुमूद’ क्र. २ आणि ‘वुजूद’ क्र. २ हे एकमेकापासून अविभाज्य आहेत, जसे ‘सह्व’ आणि ‘मह्व’च्या अवस्था आहेत.

दोन ‘शुहूद’च्या बाबतीत प्रतिपादन करण्याचा एकमेव संभाव्य मार्ग हा आहे की, ते दोन ‘खुमूद’ सोबत असतात. म्हणजेच ‘शुहूद’ आणि ‘खुमूद’ हे परस्पर कारण कार्य स्वरूप असतात. पहिल्या अवस्थेमध्ये (पहिल्याच्या बाबतीत) ‘खुमूद’ क्र. १ (म्हणजेच खुमूद-ए बशरीयत) हे ‘शुहूद’ क्र. १ चा परिणाम (म्हणजेच ‘शुहूद-ए वुजूद’) आहे तर दुसऱ्याच्या बाबतीत, ‘शुहूद’ क्र. २ हा ‘खुमूद’ क्र. १ चा परिणाम आहे. गेसूदराज़ यांच्या मते ‘शुहूद’ क्र. २ हे (वस्तुत:) ‘खुमूद’ क्र. २ आहे. येथे दोन ‘शुहूद’मधील भेदाचे मर्म फक्त हे असेल की, ‘शुहूद’ क्र. १ हा ‘वुजूद’ क्र. १ चा पुरावा आहे तर ‘शुहूद’ क्र. २ हा निश्चितपणे काहीसा ‘वुजूद’ क्र. १ पेक्षा उच्चतर असल्याचा पुरावा आहे. शिवाय, ‘खुमूद’ क्र. १ हे जे काही प्रत्यक्ष करते त्यापैकीच काहीतरी ‘शुहूद’ क्र. १ हे आहे – म्हणजेच द्रष्ट्यामधील मानवत्त्व हा नाहीसा होतो – विलुप्त होतो, तर ‘शुहूद’ क्र. २ हे आहे – म्हणजेच द्रष्ट्यामधील मानवत्त्व हा नाहीसा होतो – विलुप्त होतो तर ‘शुहूद’ क्र. २ हा म्हणून, एखाद्या द्रष्ट्याचे अधिक विशुद्ध आणि परिष्कृत स्वरूपात काहीसा एक पुरावा आहे. पुढील सारणी, गेसूदराज़ हे कुशैरी यांच्यापेक्षा प्रत्यक्षपणे अधिक पुढे जात असल्याचे, दर्शवतील आणि संभवत: कुशैरी यांना अपेक्षित असलेल्या अर्थांपेक्षा अधिक सार काढत असल्याचे दिसून येईल.

**१) कुशैरी प्रणीत सारणी**

| | | | |
|---|---|---|---|
| ख़ुमूद | } | | |
| ↑ | | | |
| वुजूद | } = | सह्व आणि मह्व | **वुजूद** |
| ↑ | | | |
| शुहूद | = | ख़ुमूद-ए बशरीयत | |
| ↑ | | | |
| वुरूद | = | वज्द | |
| ↑ | | | |
| कुसूद | = | तवाजुद | |

**२) गेसूदराज़प्रणीत सारणी**

वुजूद (क्र. २) - द्रष्टा हा आपोआप हे 'वुजूद' होतो
↑ - 'सहव' आणि 'महव'या अवस्था यामध्ये सक्रिय बनतात. हा 'बक़ा'चा टप्पा आहे.

ख़ुमूद (क्र. २) - यास 'शुहूद' (क्र. २) पण म्हणतात. हा 'खुमूद' (क्र.१)
↑ च्या मानवत्त्वाचा परिणाम आहे, उच्चतर 'ख़ुमूद'

वुजूद (क्र. १)
↑

शुहूद (क्र. १) - (म्हणजेच 'शुहूद-ए वुजूद') - परिणाम: अवसान
↑ (बशरीयतचे 'खुमूद क्र. १') मानवत्त्वाचे अवसान

वुरूद
↑

. कुसूद

आता आपण पूर्वी चर्चिलेल्या 'वुजूद'च्या तीन दर्जांकडे पुन्हा वळू या. म्हणजेच आम्ही निवेदन केले होते की, 'शख्स ऐन-ए वुजूद शवद, वुजूद-ए वू ऐन-ए मक़्सूद शुद आणि मक़्सूद ऐन-ए वुजूद-ए इन शुद' हे 'वुजूद'च्या टप्प्याचे तीन दर्जे आहेत.

हे तीन दर्जे 'शुहूद' क्र. १, 'वुजूद' क्र. १ आणि 'खुमूद' क्र. २ यांच्याशी मेळ खातात.

| | | |
|---|---|---|
| 'ख़ुमूद' क्र. २ | = | मक़्सूद ऐन-ए वुजूद-ए ईन शुद |
| 'वुजूद' क्र. १ | = | वुजूद-ए अू ऐन-ए मक़्सूद शुद |
| 'शुहूद' क्र. १ | = | शख्स ऐन-ए वुजूद शवद |
| 'वुरूद' | = | वज्द |
| 'कुसूद' | = | तवाजुद |

दुसऱ्या शब्दांमध्ये 'शुहूद'क्र. १, वुजूद क्र. १ आणि 'ख़ुमूद' क्र. २ (यामध्ये अपरिहार्यपणे 'वुजूद' क्र. २ चा समावेश होतो.) या तीन संक्रमण मात्रा 'वुजूद'च्या टप्प्यावरील एखाद्या द्रष्ट्या साधकामध्ये आढळतात. हा टप्पा 'तवाजुद' आणि 'वज्द' मधून निघून गाठला जातो. हा मुद्दा गेसूदराज़ मांडू इच्छितात. दुसरे ठळक आणि कदाचित सर्वात जास्त रोचक पैलू हा 'वुजूद'च्या व्याख्येचा आहे. ते याची व्याख्या 'जाणीव' वा 'देहभान' (शुअूर) स्वरूपात करतात. असे गृहीत धरले जाते की, ही व्याख्या 'वुजूद' क्र. २ ची आहे. 'हक़ीक़त अल-हक़्क़'च्या सर्वोच्च टप्प्यावरील द्रष्ट्यामधील हा एक विशेष प्रकारचा 'अहंकार' किंवा 'शुद्धी' आहे. चेतना आहे. परमेश्वर हा 'परात्पर शून्य स्थल' (वरा अल्-वरा) असल्याचे 'चेतना' आणि 'सावधगिरीची अवस्था' सूचित करते.

'समाअ' मध्ये प्राप्त टप्पे हे 'शरीअत', 'तरीकत', 'हक़ीक़त', 'हक़्क़ अल् हक़ीक़त' आणि 'हक़ीक़त अल्-हक़्क़' यांच्याशी मेळ खातात (जुळतात) आणि म्हणून 'नफ्स', 'कल्ब', 'रूह', 'सिर्र' आणि 'ख़फ़ी' या सूक्ष्म द्रव्यां (लतायफ़) शी संबंधित असतात.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| हक़ीक़त अल्-हक़्क़ | = | ख़फ़ी = | ख़ुमूद | } | वुजूद |
| हक़्क़ अल् - हक़ीक़त | = | सिर्र = | वुजूद | | |
| हक़ीक़त | = | रूह = | शुहूद | | |
| तरीक़त | = | क़ल्ब = | वुरूद | | = वज्द |
| शरीअत | = | नफ़्स = | कुसूद | | = तवाजुद |

## (५) सूफ़ी भक्तिसंगीत

### क) सूफ़ी भक्तिसंगीताचे तत्त्वज्ञान

संगीत कलेसाठी जरी रियाझ आवश्यक असला तरी संगीत म्हणजे केवळ रियाझ नाही. मानवाच्या शारीरिक शक्तीच्या मर्यादांमुळे जरी कलाकारास रियाझमुळे थकवा जाणवत असला तरी संगीताशी तल्लीनता साधल्यामुळे तो जाणवत नाही. कारण संगीत टवटवी आणतो, उल्लास निर्माण करतो. जर ते सूफ़ी काव्य असेल तर मग सांगणे नकोच. ते तुमच्या आत्म्याला स्पर्श करते. तुमच्या अस्तित्वाच्या गाभ्यास जाऊन भिडते, मग भलेही तुम्ही एखादा कलाकार असाल किंवा एखादा श्रोता.

सुप्रसिद्ध सूफ़ी संगीत गायिका आबिदा परवीन यांच्या संगीताविषयी मतामध्ये सूफ़ी भक्तिसंगीताच्या तत्त्वज्ञानाची पडछाया दिसून येते. त्या म्हणतात, ''माझा कार्यक्रम सुरू होण्याच्या खूप अगोदर, जर्मनीमध्ये एका दिवाणखान्यात मी रियाझ करीत बसले असताना संगीताच्या दर्दी प्रेक्षकांनी संपूर्ण दिवाणखाना खचाखच भरलेला होता. सूफ़ी संगीत अत्यंत भावनाशील असल्यामुळे एवढी गर्दी शक्य झाली असावी. सूफ़ी संगीत इतके भावनापूर्ण असते की ते तुमचे अंत:करण आणि तुमचा आत्मा यास जोराने आपल्याकडे ओढून घेते, आकर्षित करते. पवित्र कुराणामध्ये असे आहे की, प्रत्येक मनुष्यामध्ये ईश्वराने स्वत:स आत्म्याच्या स्वरूपामध्ये समाविष्ट ईश्वराने करून घेतले आहे आणि म्हणून जसे सूफ़ी गायक गातात, तसे तुम्ही ईश्वराविषयी गात असाल तर ते तुम्हास ईश्वराकडे मागे खेचते.'' आत्म्यापाशी कर्म, ज्ञान आणि प्रेम ही अशी साधने आहेत, की जी त्या (आत्म्या) स परमेश्वराशी भेट घालून देतात. त्यांचा असा विश्वास आहे की, ध्वनीने जगाची सुरुवात झाली. ईश्वर हा ध्वनीच्या माध्यमाने प्रकटतो. ध्वनी हा आमच्या (मानवा)साठी त्याची अप्रतिम देणगी आहे आणि आध्यात्मिक संगीत, हा आपल्या आध्यात्मिक वातावरणामध्ये आम्हास भावविभोर किंवा समाधीमग्न करतो. व्यथा आणि वेदना या संगीतामध्ये प्राण फुंकतात. संगीत हा सर्वोत्तमास आविष्कृत करतो. आपल्या संगीत कलेस न्याय देण्यासाठी सूफ़ी गायकास वियोग व्यथेची भावना चेतवावी लागते.

सूफ़ी देवकुल, सर्वदेव मंदिर अति विशाल आहे. हल्लीच्या काळी प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ कवी जलालुद्दीन रूमी यांचे सूफ़ी काव्य पाश्चात्य जगामध्ये अत्यंत लोकप्रिय झाले आहे. सूफ़ी गायकीमध्ये गुरू

परंपरेस असाधारण महत्त्व आहे. आबिदा परवीन यांना आपल्या गुरूंची सूफ़ी वाणी 'कलाम' फार प्रिय आहे. मुर्शद साईं नजीब सुल्तान बाहू हे त्यांचे गुरू आहेत. जर तुम्हास सद्गुरू लाभले तर तुमच्यासारखा भाग्यवान कोणीच नाही. त्यांचा आशीर्वाद सदोदित तुमच्या पाठीशी असतो. सर्व जिज्ञासू हे अत्यानंद आणि भावसमाधीची अनुभूती प्राप्त करण्यासाठी प्रयत्नशील असतात आणि एखादा गायक हा आपली संगीतकला प्रदर्शित करताना किंवा तिच्या पूर्वाभ्यासामध्ये भावसमाधीची अनुभूती घेऊ शकतो; परंतु यासाठी सद्गुरूंची प्रेरणा आवश्यक असते, असे आबिदा परवीन यांना वाटते. आपल्या सद्गुरूंशी नित्य संबंध हीच मुळी भावसमाधीची एक अवस्था होऊ शकते. त्यामुळे सर्जनात्मकतेचे नवीन मार्ग उघडले जातात. संगीताच्या साधनेमध्ये स्वत: आत्मविस्मृत होऊन भावसमाध्यवस्था प्राप्त करणे हेच एक फार मोठे आव्हान असते. (Abida Parveen - 'For Love of God' - The Times of India - 'The Speaking Tree', Sunday March 4, 2012, Page - 8) Pune Edition.

### ख) सूफ़ी भक्तिसंगीत : सामान्य स्वरूप व तिचे योगदान

११ व्या १२ व्या शतकात मध्य आशियात उदयास आलेला सूफ़ी पंथ, बहरला मात्र भारतात. भारतातील संमिश्र सांस्कृतिक पर्यावरणाचा मध्य आशियातील प्रतिभावंतांवर मोठा प्रभाव पडला. येथील विद्या, कला, तत्त्वज्ञानाची उसनवारी करता-करता त्यांनी त्यात स्वत:च्या ज्ञानाची व प्रतिभेची भर घालून भारतीय विद्या, कला, व तत्त्वज्ञान समृद्धही केले. इतकेच नव्हे तर भारतीय संस्कृतीच्या संमिश्र वारशाचे ते वाहकही बनले. यात सूफ़ींचे उल्लेखनीय असे योगदान आहे. संगीत हा सूफ़ींसाठी एक वारसा आहे.

संगीत म्हणजे केवळ रियाझ नाही. ती शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा या सर्वांची साधना आहे - अखंड चालणारी! संगीत हा तर सूफ़ी साधक, उपासकांचा जीव की प्राण. त्यातूनच 'सुफियाना ढंग' (शैली) हा नवीन संगीत प्रकार उदयास आला व लोकप्रिय झाला. दिल्लीतील प्रख्यात सूफ़ी संत निजामुद्दीन औलिया यांचे परमशिष्य अमीर खुसरो हे अतिशय प्रतिभासंपन्न कवी व संतीतज्ञ होते. साहित्य व संगीताच्या क्षेत्रातील त्यांची कामगिरी ऐतिहासिक अशी आहे. गजल आणि कव्वाली हे काव्यप्रकार, संगीतातील अनेक राग-रागिण्या आणि तबला व सितार ही वाद्ये इत्यादी गोष्टींचे जनकत्व अमीर खुसरोंकडे जाते.

माणसाला सर्वांचा विसर पडला तरी स्वत:चा कधीच विसर पडला नाही व आत्मविस्मृती शिवाय परमेश्वराचे दर्शन घडत नाही. यावर बहुतांशी धर्मियांचे एकमत आहे. आत्मविस्मृतीसाठी योग, साधनेचा अवलंब केला जातो. सूफ़ी संतही योगसाधना करीत; परंतु सामान्य साधकांसाठी संगीत हे आत्मविस्मृती (बेखुदी) चे सुलभ असे साधन आहे, असे सूफ़ी मानतात. त्यामुळेच सूफ़ी संतांच्या दर्ग्यात साधक बेधुंद व तल्लीन होऊन भक्तिरचना गातात, या भक्तिरचना 'सूफियाना कलाम' म्हणून ओळखल्या जातात. हजरत अमीर खुसरो, बाबा बुल्लेशाह यांच्या अजरामर रचना आजही पंजाब व उत्तर भारतात गायिल्या जातात. सूफियाना कलामच्या आर्जवातून लोकांना ईश्वरभक्तीचा मार्ग गवसला. एकेकाळी दर्गा व मजारपर्यंत (समाधीपर्यंत) मर्यादित असलेले सूफ़ी संगीत आज जागतिक पातळीवर जाऊन पोहोचले आहे. मार्च २००५ मध्ये सूफ़ी संगीतकारांचा तिसरा आंतरराष्ट्रीय संगीत समारोह दिल्लीत संपन्न झाला. नुसरत फतेह अली खान

व आबिदा परवीन हे सर्वांत लोकप्रिय सूफ़ी गायक-गायिका आहेत. भारतातही कैलास खेर, सुनिधी चौहान, हंसराज हंस, हिमेश रेशमिया आदी नव्या पिढीतील गायक-गायिका सूफ़ी संगीताची परंपरा जोपासत आहेत.

संगीत हे ईश्वरप्राप्तीचे साधन तर प्रेम हा ईश्वरप्राप्तीचा मार्ग आहे. परिणामी सूफ़ी संत कवींनी अनेक प्रेमाख्यानांची रचना केली व त्याद्वारे प्रेमाची महती विशद केली. त्यासाठी त्यांनी गूढवादी प्रतीकात्मक शैलीचा वापर केला आहे. त्यामुळे या प्रेमाख्यानातील प्रेमी व प्रेमिकांच्या मानवी व्यक्तिरेखा, प्रत्यक्षात आत्मा (रूह) व परमात्मा (हक़) यांची प्रतीके आहेत. आत्म्याला परमात्म्याचा साक्षात्कार होणे यास सूफ़ी 'हक़ीक़त' असे म्हणतात. हक़ीक़त ही अवस्था प्राप्त होण्यासाठी सच्च्या प्रेमाची अर्थात नि:सीम भक्तीची आवश्यकता असते. त्यामुळेच 'रूह' (आत्मा) ला हक़ (परमात्म्या) शी जाऊन मिळण्याचा एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे इश्क़ अर्थात प्रेम! ही सूफ़ी संतांची महत्त्वाची शिकवण होती. प्रेम हे परमेश्वराचेच प्रतिरूप आहे. 'इश्क़-ए-मजाज़ी' (व्यक्तिमात्रावरील भौतिक प्रेम) व 'इश्क़-ए-हक़ीक़ी' (पारमार्थिक प्रेम) प्रेमाचे असे दोन प्रकार सूफ़ी मानतात. व्यक्तिमात्रावरील प्रेम (इश्क़-ए-मजाज़ी) पण सूफ़ी महत्त्वाचे मानतात. कारण ती पारमार्थिक प्रेमाची (इश्क़-ए-हक़ीक़ी) पहिली पायरी आहे. यातून सामाजिक व धार्मिक सद्भावाचे वातावरण निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सूफ़ींनी केले. हाच वारसा पुढे हिंदी साहित्यामध्ये नानक, मीरा, कबीर, रसखान, रहीम आदी संत कवींनी चालविला. उदाहरणार्थ -

*''हेरी मैं तो प्रेमदीवानी, मेरा दर्द न जाने कोय ।'' - मीरा*

*''ढाई आखर प्रेम का, पढे सो पंडित होय ।'' - कबीर*

*''रहीमन धागा प्रेम का, मत तोडो चटकाई ।*
*टूटे सो न जूरी फिरै, जुरी तो गाँठ परी जाई ।।'' - रहीम*

किंवा अगदी अलीकडच्या काळातील 'ताल' या चित्रपटातील गीतकार आनंद बक्षी यांच्या -

*''मैं प्रेम का प्याला पी आया,*
*एक पल में सदियाँ जी आया,*
*सारी मधुशाला पी आया,*
*एक पल में सदियाँ जी आया ।''*

या काव्यपंक्तीवरही सूफ़ी मताचा स्पष्ट प्रभाव दिसतो. सांस्कृतिक विविधता असलेल्या भारतीय समाजात बंधुभाव, सलोखा राखण्यासाठी सूफ़ींनी केलेले कार्य त्यांचे सामाजिक शहाणपणच अधोरेखित करते व धार्मिक उन्मादामुळे सामाजिक शहाणपण हरवलेल्या आजच्या समाजाला ते शोधण्यासाठी दीपकासमान मार्गदर्शन करू शकते.

सूफ़ींना जातिभेद, धर्मभेद, वर्णभेद, वर्गभेद असे कोणतेही भेद मान्य नव्हते. त्यामुळेच सूफ़ी संत हे मुसलमान असूनही त्यांना मुस्लिमेतर समाजातीलही मोठा शिष्यवर्ग लाभला. इब्न-अल्-अरबी हा प्रख्यात सूफ़ी तत्त्वज्ञ व आचार्य म्हणतो, ''योग साधना करणारा साधक कोणत्याही जाती, धर्म अथवा रंगाचा असला तरी श्रद्धा आणि अविरत चिंतनाच्या साहाय्याने तो आपले अंतिम ध्येय गाठू शकतो.'' जातिभेद, वर्णभेद व कर्मकांडाने ग्रस्त हिंदू समाजास, सूफ़ी संताचे व तत्त्वज्ञाचे हे सहज उद्‌गार दिलासादायक व

आकर्षित करणारे ठरले नाहीत तरच नवल! त्यामुळेच ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती व निजामुद्दीन औलिया या सूफ़ी संतांचे दर्गे सर्वधर्म समभावाची प्रतीके बनली.

केवळ हिंदूच नव्हे तर तत्कालीन भारतीय इस्लामी समाजातही इराणी, तुराणी, दुराणी, अफगाणी, हबशी अशी मोठी सांस्कृतिक विविधता होती. आपला पंथ या सर्वांना मार्गदर्शक ठरावा या सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवून सूफ़ी संतांनी अनेक इस्लामविरोधी मतांचाही पुरस्कार केला. त्यापायी त्यांना धर्मवेड्या मुस्लिम शासकांचा छळही सोसावा लागला. तथापि –

*''दे मस्त फ़क़ीरी कि शाहों की भी पर्वा न हो ।*
*मैं भी किसी का शाह न बनूँ, मेरा भी कोई शाह न हो ।।''*

अशा मस्त फ़क़ीरी बाण्याने त्यांनी राज्यकर्त्यांचा रोषही सहन केला. त्यामुळेच मध्ययुगीन भारताच्या इतिहासाची पाने चाळताना इस्लामी राजवटीस असलेली सूफ़ींच्या सहिष्णुतेची लोभस किनार लक्ष वेधून घेते. भारतात सुल्तानांनी भौगोलिक प्रदेशावर राज्य केले, तर सूफ़ी संतांनी लोकांच्या मनावर, हृदयांवर राज्य केले.

इब्न सीना, इब्न–अल–अरबी, इमाम ग़ज़ाली, शेख सादी अशा चिंतकांच्या चिंतन गंधाने गंधभरीत सूफ़ी दर्शनाचे, आत्मोन्नतीस महत्त्व, कर्मकांड व मूर्तिपूजेस विरोध, सदाचार, गुरूची थोरवी, बंधुभाव हे सार होय.

(सुभाषचंद्र सोनार – ''समता संघर्षात सूफ़ी पंथाचे योगदान'' मासिक 'सत्यशोधक संघटक' नोव्हेंबर २००५, पृ. ३७–३८.)

'सूफ़ी समाअ' मध्ये गुरू परंपरेस असाधारण महत्त्व असल्याचे या अगोदरच विदित करण्यात आले आहे. सूफ़ी चळवळीमध्ये मौलाना जलालुद्दीन रूमी म्हणजे एक मूर्तिमंत चित्रच होय. त्यांचे काव्य म्हणजे अभिजात अध्यात्मच होय. सॉक्रेटीस आणि प्लुटो, हजरत निजामुद्दीन औलिया आणि अमीर खुसरो, श्रीरामकृष्ण परमहंस आणि स्वामी विवेकानंद यांच्याप्रमाणेच शम्स तब्रीज़ी आणि रूमी यांच्या दरम्यान गुरू–शिष्याची महान परंपरा आढळून येते. गुरूशिवाय शिष्य हा परिपूर्ण होऊच शकत नाही. सॉक्रेटीसचा संदेश प्लेटोने जगभर पसरविले. त्याचप्रमाणे स्वामी विवेकानंदांनी श्रीरामकृष्ण परमहंस यांची शिकवण बंगालबाहेर प्रसारित केली. मौलाना रूमी एक महान विद्वान – पंडित होते; परंतु निव्वळ विद्वत्ता कामाची नसते. शम्स तब्रीज़ी यांच्याशी भेटीमुळे त्यांच्या जीवनामध्ये एक आध्यात्मिक आयाम जोडले गेले.

सद्‌गुरूमध्ये दोन गुण आढळतात. त्याने 'श्रुतियम् ब्रह्मनिष्ठम्' असले पाहिजे. 'श्रुतियम' म्हणजे एक दिव्य ग्रंथ निष्णात अर्थात 'कुरआन शरीफ'चा विद्वान अथवा वेद किंवा वेदांताचा पंडित; परंतु एवढेच पुरेसे नाही. 'ब्रह्मनिष्ठम्' म्हणजे धर्मसिद्ध किंवा अध्यात्म ज्ञानी. जेव्हा हे दोन गुण एखाद्या व्यक्तीमध्ये सोबतच आढळून येतात तेव्हा ती व्यक्ती एक महान जगद्‌गुरू म्हणून ओळखली जाते. सूफ़ी तत्त्वज्ञानाच्या विस्मयकारक इतिहासामध्ये याचे प्रतिनिधिक स्वरूप आढळून येते.

सूफ़ी साहित्य आणि कोनिया व तुर्कस्थानच्या इतर भागामधील दरवेशांची नृत्ये ही खरोखर आध्यात्मिक अशीच आहेत. त्यांच्याकडे पाहिल्यास आपल्याकडील 'रासलीला' म्हणजे काय आहे, त्याचे

खरे स्वरूप उघडकीस येते. 'रासलीला' म्हणजे खरोखर एक गडबड गोंधळ किंवा गोंगाटाशिवाय दुसरे काहीच नाही, असे वाटते; परंतु दरवेश परिपूर्ण शांततेमध्ये व शांतचित्ताने स्वत:भोवती गरगर फिरत असतात; एक हात वर तर दुसरा खाली ठेवून. ही त्यांची आंतरबाह्य आणि आध्यात्मिक व भौतिक अशी तंद्रेमधील गिरकांडी घेणे असते. मानववाद, प्रेम आणि समज यांच्या आयामामध्ये प्रवेश करताच भेदाची वळणे नाहीशी होतात. हे सुस्पष्ट आहे की, जर ईश्वर हा अनेक रूपे धारण करू शकतो, या गोष्टीची जाणीव असेल तर शेवटी तो वेगवेगळ्या लोकांसाठी वेगवेगळा असू शकणार नाही.

इस्लाममध्ये अल्लाहची ९९ परम शुभ व सुंदर नावे मान्य करण्यात आली आहेत. ती अल्लाहची ९९ गुण निदर्शक अशी आहेत तर भारतीय तत्त्वज्ञानामध्ये ब्रह्माची ९९ रूपे मानण्यात आली आहेत. ही ईश्वराची ९९ रूपे आहेत तर इस्लाममध्ये ९९ शुभ-नामे आहेत - निराकाराच्या उपासनेपासून साकार (सगुण)च्या उपासनेकडे हे जणू प्रयाण आहे.

'एकम् सत्य विप्र बहुधा वदंति' - अनेकत्ववादाची ही संपूर्ण संकल्पना आहे. 'सत्य एक आहे. (मात्र) ज्ञानी त्यास अनेक नावांनी ओळखतात.' कवी रूमी म्हणतो, 'मी दोन लोक (इहलोक - परलोक) मुळीच मानत नाही. मी एकच जाणतो, एकच शोधतो, मी फक्त एकच जाणतो, मला एकच आढळते आणि मी एकाचेच गुणगान करतो.' ते म्हणजे अद्वैत. शंकराचार्यांच्या तत्त्वज्ञानाचा मूळ आधार हाच आहे. गुरू 'शेख' यांच्याप्रती संपूर्ण निष्ठेसह आज सूफ़ीवाद काय करू शकतो? अपरिवर्तनवाद व धर्मांधतेच्या वाढत्या लाटेस तो थोपवून धरू शकतो. यासाठी आपणास प्रेम, समन्वय, जाणीव आणि मानवतावाद या सर्वांची मिळू एक संयुक्त प्रतिकाराची नितांत गरज आहे आणि सूफ़ीवाद आपणास हा मार्ग दाखवू शकतो.

### ग) सूफ़ी भक्तिसंगीत : 'क़व्वाली'

आध्यात्मिक जगामध्ये संगीत एक अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. ते आपल्या मनमोहक कंपनाने श्रोत्यांना बांधून ठेवते. प्रत्येक धर्मामध्ये काही ना काही संगीत किंवा ध्वनीचा सूर किंवा गाणे असते - मग ते प्रतिध्वनित 'नमाज' असेल किंवा पवित्र 'ॐ' असेल किंवा शास्त्रीय रागांमधील 'गुरूबानी' असेल. संगीत हा ईश्वराचे नामस्मरण करण्याचा एक अन्य मार्ग आहे. सर्वसामान्य साधनांनी प्राप्त न होणारे अंतर्ज्ञान ओळखण्यासाठी आणि एखादे गूढ आध्यात्मिक संदेश पोहोचविण्यासाठी सूफ़ीवादामध्ये 'क़व्वाली' हे एक माध्यम म्हणून उपयोगात आणले जाते.

सूफ़ी भक्तिसंगीत मुख्यत्वेकरून 'क़व्वाली' स्वरूपात अभिव्यक्त होते. 'क़व्वाली' हा शब्द 'कौल' या शब्दापासून बनलेला आहे. 'कौल'चा अर्थ आहे वाणी व पुढे भावार्थाने 'वचन' असा अर्थ विकसित झाला. ही सुमधुर वाणी ईशस्तवन स्वरूपात आविष्कृत होते. या सुमधुर वाणीने गायक (क़व्वाल) अत्यंत तल्लीन होऊन जातो व श्रोत्यांस पण भावसमाधीच्या अवस्थेपर्यंत पोहोचवितो. 'क़व्वाली' म्हणजे साक्षात ईशवाणीच होय.

### प्रेमळ नामस्मरण

इस्लाममध्ये, अल्लाहचे प्रेमळ नामस्मरण हे 'जिक्र'मध्ये परमेश्वराच्या उपस्थितीची आठवण असते मग ती मौन स्वरूपात तरी असेल किंवा सस्वर स्वरूपात या नामस्मरणाचे वाचिक स्वरूपाचे एक विस्तार

म्हणून ‘क़व्वाली’कडे पाहता येईल. संगीत साधनामध्ये ‘कलाम’ अर्थात वाणी वा शब्द प्रस्तुत करून आंतरिक सत्याची अनुभूतीस ‘क़व्वाली’ अधिकजवळ आणून सोडते. बुल्लेशाह म्हणतात, ‘‘तुमची भक्ती निष्प्रेम–प्रेमरहित आहे. त्यामुळे तुमचे दंडवत–प्रणिपात व्यर्थ आहे. प्रेमच मला सशक्तपणे बोलण्यास बाध्य करते.’’

**सूफ़ी भक्तिसंगीत**

‘कव्वाली’ हा सूफ़ी भक्तिसंगीताचा एक प्रकार आहे. याचे आयोजन प्रामुख्याने एखादी सूफ़ी दर्गाह किंवा समाधी स्थळाजवळ होते. ‘कव्वाली’चे प्रमुख विषय असतात प्रेम, भक्ती आणि वियोगावस्था समाप्त करून भगवंताच्या किंवा अल्लाहच्या भेटीची तीव्र, उत्कट इच्छा. एखादा क़व्वाल म्हणजेच सूफ़ी गायक असे गातो –

*‘‘वह जहन्नुम भी मुझे दे तो करूँ शुक्र अदा*
*कोई अपना ही समझकर तो देता है सज़ा ।।’’*

म्हणजेच त्या परमेश्वराने मला नरक यातनेची भेट दिली तरी मी त्याच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करतो. कारण तो (भक्तास) आपलाच समजून तर शिक्षा देत असतो.

‘क़व्वाली’चे काव्य आपल्या आशयामध्ये आध्यात्मिक असल्याचे ध्वन्यर्थाने आध्याहृत असते. यामध्ये बहुधा समूहगीत स्वरूपात, गाण्यावर लक्ष केंद्रित करून त्या गाण्याच्या माध्यमातून ईश्वरचिंतनाचे एक साधन म्हणून संगीताचा उपयोग केला जातो. श्रोते पण या मैफिलीमध्ये सहभागी होऊन जावेत, अशी अपेक्षा असते.

**प्रेमामध्ये उन्मत्त**

‘क़व्वाली’ मध्ये समूह, गीत गाण्यास सुरुवात करतो आणि गहन अर्थ विशद करण्यासाठी, शब्दांच्या लयीमध्ये बदल करून पुनरावृत्ती केली जाते. हे एक प्रकारचे ध्रुपद असते. श्रोत्यांसोबत पुनरावृत्ती होत असते, ती सुरूच असते आणि गायकासोबत (कव्वालबरोबर) श्रोते पण मदमस्त होऊन जातात. ही ‘आध्यात्मिक मस्ती’ असते. यास तंद्रा किंवा आत्मिक वा आध्यात्मिक प्रबोधन पण म्हणता येईल. ‘क़व्वाली’ ही एक निष्क्रिय जाणीव नसते; परंतु ती संगीताच्या माध्यमाने ईश्वराच्या उपस्थितीस आव्हान करण्याची एक सक्रिय जाणीव असते.

‘क़व्वाली’ बहुधा आलापाने सुरू होते. तिला लय, ताल नसते. सुयोग्य वातावरण निर्मितीसाठी आलापाचा उपयोग होतो. ‘क़व्वाल’ मग ‘क़व्वाली’च्या मुख्य भागाकडे वळतो. तो मध्यम गतीमध्ये गातो. गाण्याची गती हळूहळू वाढत जाऊन ती पराकोटीच्या एक आवेश, उत्तेजनाच्या अवस्थेपर्यंत पोहोचते. प्रेम आणि भक्तीच्या माध्यमाने, एखाद्या माणसाच्या आध्यात्मिक जागृतीसाठी ती एक गूढ प्रवासासारखी असते. ती एखाद्या इसमाची ईश्वर–प्रेम प्रकट करते आणि आत्म्यास विशुद्ध बनविते. प्रख्यात सूफ़ी संत आणि कवी जलालुद्दीन रूमी म्हणतात की, आध्यात्मिक संगीताच्या प्रवासाच्या माध्यमाने अंत:करण आणि आत्मा हे प्रत्यक्षपणे परमेश्वराशी संभाषण साधू शकतात. कवीचे शब्द आहेत –

*“मी मृत होतो, तरी पण जिवंत होतो.*
*मी एक अश्रूचा थेंब होतो तरी पण एक सुहास्य बनलो.*
*मी प्रेमाच्या महासागरामध्ये घुसलो आणि शाश्वत सुख-आनंदापर्यंत पोहोचलो.”*

(The Times of India - 'The Speaking Tree' - Pune, September 18, 2011. A Tribute to AMIR KHUSRO on his 707th Urs that concluded on Sunday, 18th September, 2011. "High on Music" by Masha Hassan.)

## (ग) रक़्स (नृत्य)

### १) नृत्याचा उगम : भारतीय मत

भारतीय परंपरेमध्ये भगवान शंकर हे नृत्याचे आदि प्रवर्तक मानले जातात. असे म्हणतात की, ते नित्य प्रति संध्याकाळी मस्तीमध्ये फिरत नृत्य करतात. शिवशंकर यांच्या पदाघातामुळे पृथ्वी आणि हस्त संचालनामुळे नक्षत्र मंडळ गतिमान होते. म्हणूनच म्हटले गेले आहे की, ‘नृत्यमयं जगत्’ अर्थात हे संपूर्ण जग नृत्यमय आहे. भगवान शंकर यांनी आपले प्रिय शिष्य तंडु यास भरत मुनी यांना नृत्य शिकविण्याची आज्ञा दिली. अशाप्रकारे तंडुने शिकविलेल्या नृत्यास भगवान शंकर यांचे प्रसिद्ध नृत्य ‘तांडव’ नृत्य म्हणून ओळखले जाते.

पार्वतीद्वारा निर्मित ‘लास्य नृत्य’ पृथ्वीवर अवतरित झाले. हे नृत्य सुकोमल अंगहारयुक्त आहे. वीर, रौद्र, अद्भुत, बीभत्स इत्यादी रसांनी युक्त उद्धत नृत्य ‘तांडव’ आणि शृंगार प्रधान वृत्तींनी आवेष्टित नृत्य ‘लास्य’ समस्त सृष्टीमध्ये प्रचलित झाले.

एकाकी (सोलो) नृत्य आणि समूह नृत्य असे नृत्याचे दोन प्रमुख प्रकार सांगता येतील. मंच नृत्यामध्ये अवधीनुसार एक प्रकारची निरंतरता ठेवावी लागते. गायक, वादक आणि नर्तक या सर्वांना क्रमाच्या तारतम्याकडे लक्ष ठेवावे लागते.

नृत्यामध्ये पदाघात आणि हस्त संचालन महत्त्वपूर्ण असतात. मुद्रा - आविष्कार पण महत्त्वाचे असते. सारांश हस्त-पद-लालित्य आणि मुख-मुद्रा हे नृत्याचे अविभाज्य घटक असतात.

### २) ‘रक़्स’ (नृत्य) : सूफ़ी संकल्पना

संगीत, वाद्यादीमुळे सहजानंद उत्पन्न झाल्यावर सूफ़ी साधक एकटे अथवा समूहाने नाचू लागतात. यालाच ‘रक़्स’ म्हणजे नृत्य असे म्हणतात. ‘समाअ’ मधील गान उन्मादाच्या वेळी सूफ़ीमध्ये जी आतुरता आणि व्याकुळता निर्माण होते आणि त्यामुळे त्याचे स्थैर्य भंग होऊन तो काही हालचाली करू लागतो. यालाच ‘रक़्स’ अर्थात नृत्य असे म्हणतात. हुजवीरी यांच्या मतानुसार नृत्य ना धर्मानुमोदित आहे ना सूफ़ींनी त्याला महत्त्व दिले आहे; परंतु सहजानंद अवस्थेत जेव्हा हृदय अंत:करण आनंदातिरेकामुळे धडधडू लागते. तेव्हा औचित्य आणि अनौचित्यतेचा प्रश्नच उरत नाही. त्यावेळी साधक हा ना नृत्य करीत असतो ना पदलालित्य, परंतु त्याचा ‘अहं’ भाव लुप्त होत असतो. लोक त्याला नृत्य मानतात. ही त्यांची फार मोठी

चूक आहे. खरे तर ही शब्दातीत अशी अवस्था असते. अशा अवस्थेत सूफ़ी एक तर शरीरावरील आपले वस्त्र तरी काढून फेकून देईल किंवा त्यांचे तुकडे तुकडे करून सोडेल म्हणजे फाडून टाकील अशा वस्त्राचे काय करायचे, यावर हुजवीरी यांनी प्रकाश टाकला आहे. ते वस्त्र एक तर दरवेशाच्या कामी येते किंवा ते गायकास (गवईला) अर्थात 'क़व्वाल'ला मिळून जाते अथवा शेख म्हणजेच सद्‌गुरू ज्याला देतील त्याला ते मिळून जाते.

प्रख्यात सूफ़ी आचार्य हुजवीरींच्या मते 'शरीअत' (कर्मकांड) आणि 'हक़ीक़त' (साधनाकांड) मध्ये 'रक़्स' अर्थात नृत्यास मुळीच मान्यता नाही. कारण की सर्व सुज्ञ मंडळींचे असे मत आहे की, 'रक़्स' (नृत्य) जर सुव्यवस्थितपणे होत असेल तर ते मनोरंजन किंवा खेळ तमाशाशिवाय दुसरे तिसरे काहीच नसेल आणि जर ते बेढब तऱ्हेने होत असेल तर ते मनोरंजनाहून निकृष्ट असे एक अशिष्ट, असभ्य आणि व्यर्थ अशी कृती असेल. म्हणून संतमंडळींपैकी कुणीच नृत्याचे समर्थन केले नाही. पदलालित्य करणे म्हणजेच नृत्य करणे हे 'शरीअत' (कर्मकांड) आणि विवेक या दोन्ही दृष्टिकोनातून एक वाईट कृत्य आहे, मग भलेही ते सादर करणारे अज्ञ जन (लोक) का असेनात.

पवित्र कुराणानुसार नृत्याचा आविष्कार प्रेषित दाऊद यांच्याशी जोडला जातो. परमेश्वराने त्यांना सुमधुर कंठाची देणगी दिली होती. जेव्हा ते आपले सूर आळवीत असत. तेव्हा चराचर सृष्टी मंत्रमुग्ध होत असे. जेव्हा प्रेषित दाऊदवर मन:शांती आकाशातून अवतरित झाली तेव्हा ते अत्यानंदाने नाचू लागले. 'समाअ'च्या मैफिलीमध्ये नर्तकास एकटे सोडू नये. दोन-चार प्रेक्षकांनी त्याचे अनुसरण केले पाहिजे. नर्तक जर तोल जाऊन खाली जमिनीवर पडत असेल तर त्याला आधार द्यावा आणि खाली पडण्यापासून वाचवावे आणि जर तो जोराने खाली पडला असेल तर त्याला एकट्याला असे पडू देऊ नये. त्याला आदरपूर्वक उठवावे. उन्माद अवस्थेमध्ये जर सूफ़ी आपले अंगवस्त्र काढून कव्वालला देत असेल तर श्रोत्यांनी त्याला दुसरे वस्त्र नेसवावे. त्याला नग्न सोडू नये. 'समाअ' मध्ये एखाद्या प्रेक्षकाचे संगीतप्रेम उफाळून जर तो नृत्य करू लागला तर इतरांनी पण साथ देऊन त्याच्या नृत्यात सामील झाले पाहिजे. 'समाअ'च्या गान उन्माद अवस्थेमध्ये सूफ़ीने आपले अंत:करण मनन, चिंतन किंवा मौन जप यामध्ये व्यस्त ठेवावे.
(डॉ. मुहम्मद आज़म – 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन'- पृ. १४७-४८)

नृत्य हा प्रकार सूफ़ींमध्ये आढळत असला तरी हुजवीरींनुसार इस्लाममध्ये आणि सूफ़ींमध्ये त्याला कुठलेही आधार नाही. बेभान अवस्थेतील सूफ़ी नृत्य करीत आहेत, असा भास होतो. एवढ्या कारणावरून सूफ़ी तत्त्वज्ञानात नृत्यास संमती आहे, असा निष्कर्ष काढला गेला. बेभान अवस्थेतील हालचालींना नृत्य म्हणजे चुकीचे आहे. (डॉ. अलीम वकील – 'एका पथावरील दोन पंथ : भक्ती आणि सूफ़ी' पृ. २५७)

'रक़्स' अर्थात नृत्य हे भाव समाधी व्यक्त करण्याचे एक अति आद्य स्वरूप आहे. म्हणून 'रक़्स' हे तीव्र भाव-समाध्यवस्थेमध्ये एखाद्या व्यक्तीचे नर्तन करणे असते. प्रसिद्ध सूफ़ी आचार्य शहाबुद्दीन याह्या अल्-सुहरवर्दी (शेख अल्-इश्राक) यांचे असे मत आहे की, नृत्यामध्ये प्रत्येकास भाव समाध्यवस्था प्राप्त होतेच असे नाही. उलट, नृत्य हा भावसमाधीचा परिणाम असतो. हुजवीरी हे नृत्याचे मुळीच समर्थन करीत नाहीत. ते अशा नृत्यास, नृत्याऐवजी 'अनावर हालचाल' म्हणणे अधिक पसंत करतात, यद्यपि या

'हालचाली' नृत्यासारख्या असतात. विधीविधानानुसार सर्व प्रकारचे पदलालित्य, पदन्यास हे विधी आणि विवेकाच्या दृष्टीने वाईट आहे. ...... ती उत्तेजना ना नृत्य आहे ना पदलालित्य ना शारीरिक लडिवाळपणा; परंतु तो आत्म्याचा एक भ्रमनिरास आहे. अबू सईद इब्न अबी अल-खैर यांना असे वाटते की नृत्य हे तरुणांमधून वासना नष्ट करते. अहमद अल्-ग़ज़ाली हे त्यांच्या मताशी सहमत आहेत.

### ३) 'रक़्स' (नृत्य) : दार्शनिक विवेचन

'समाअ' मध्ये संगीत ऐकत असताना 'कव्वाल' अर्थात गायकाच्या मंत्रमुग्ध आवाजामुळे, श्रोता तल्लीन होऊन जातो. तो उन्माद अवस्थेस पोहोचतो. त्यामुळे तो व्याकुळ बनतो. परिणामी तो तीव्र गतीने आपली शारीरिक हालचाल करू लागतो. या हालचालमय स्थितीस 'नृत्य' असे नाव आहे. नृत्यामध्ये हस्तपदलालित्यास फार मोठे महत्त्व आहे. याविषयी सूफ़ी तत्त्वज्ञानमूलक संकेत असे आहेत -

१) दोन्ही हात वर उचलून नंतर ते छातीवर बांधल्यास असे समजावे की, इहलोक आणि परलोक या दोन्ही लोकांना एकत्रित करून एका स्थळी ठेवले पाहिजे.

२) नृत्यादरम्यान जर टाळी वाजविली तर याचा अर्थ असा होतो की आपण हा संसार सोडून दिला. आपल्या प्रियकराशी (दोस्ताशी) संयोग घडला अथवा असाही अर्थ होतो की आम्ही संकटग्रस्त असून रिकाम्या हाती आहोत.

३) पदलालित्याचा असा मथितार्थ होतो की ईश्वरास सोडून इतर सर्वांना पायांनी तुडविले आहे आणि असाही संकेत होतो की, आपल्या अहंकारास पायाखाली तुडविले आहे आणि याकडेही संकेत आहे की, आत्मा हा उत्कर्ष इच्छितो; परंतु वासना त्याला खाली ओढते. हा आत्मा आणि वासनेमधील संघर्ष आहे आणि असाही सांकेतिक अर्थ आहे की, जगातील सर्व वस्तू आमच्या पायाखाली आहेत आणि आम्ही निश्चिंत आहोत.

४) नृत्यामध्ये परिक्रमा करण्याचा अर्थ असा की देह किंवा अस्तित्वाचे जे चक्र चाललेले आहे ते एका स्थितीत स्थिर नाही राहत आणि याचा असाही सांकेतिक अर्थ होतो की, प्रियकराचे सौंदर्य शोधण्याखातर आम्ही प्रत्येक दिशा धुंडाळत आहोत. आमचे मन व्याकुळ बनते आणि विवशतेने आम्ही बेचैन, अधीर बनतो.

५) काही लोक छातीवर हात आपटून घेतात. याचा असा अर्थ होतो की मी दोन्ही जगापासून (इहलोक आणि परलोक) मुक्त होऊ इच्छितो; परंतु मी काही बाहेर पडू शकत नाही.

६) काही लोक छातीवर हात ठेवून नृत्य करतात. याचा असा सांकेतिक अर्थ होतो की निश्चिंत होण्यासाठी मी माझे मन सुरक्षित ठेवत आहे. जो काय (दैवी) आदेश येईल मी त्याची अंमलबजावणी करीन.

७) काही लोक हात काखेत दाबून नृत्य करतात. त्याचा मथितार्थ असा आहे की, माझा रस्ता बंद आहे. काम मोठे अवघड आहे. प्रयत्नाची पराकाष्ठा करतो, मात्र दार (दयेचे) उघडत नाही आणि असाही अर्थ होऊ शकतो की, मी आपल्या प्रेमिकेस (प्रेयसीस) काखेत दाबून धरले आहे. आता मी तिला मुळीच सोडणार नाही.

८) काही लोक नृत्यादरम्यान आपल्या छातीवर हात आपटतात. याचा असा अर्थ होतो की, एक तर उद्दिष्टाची पूर्ती (ध्येयपूर्ती) झाली नाही आणि जर उद्दिष्टपूर्ती झाली असेल तर ती आपल्या मर्जीविरोधी आहे, प्रतिकूल आहे, अनुकूल नाही.

९) नर्तक नृत्यामध्ये जेव्हा दोन पाऊल (कदम) पुढे जातो आणि मग दोन पाऊल (कदम) मागे फिरतो, तेव्हा तो म्हणतो की, माझी अशीच डळमळीत अवस्था झाली आहे. माझ्या जीवनात स्थैर्य नाही.

१०) जे लोक 'आह' ची ललकारी मारतात, त्यांच्यात रसानुभव घेण्याची लायकी नसते. रूदनाचे उसासे हे रसानुभव आणि उत्कंठतेचे प्रमाण आहेत.

११) 'हू'ची ललकारी मारण्याचा अस मथितार्थ आहे की जे काही आहे तोच (ईश्वर) फक्त आहे. नृत्यविषयक उपरोक्त सर्व तात्त्विक संकेत हे चिश्ती संप्रदायाचे दक्षिणेकडील अध्वर्यु गुलबर्गानिवासी मखदूम सय्यद मुहम्मद हुसेनी गेसूदराज़ उपाख्य बंदा नवाज यांनी प्रस्तुत केले आहेत.

(डॉ. मुहम्मद आजम - 'सूफ़ी तत्त्वज्ञान : स्वरूप आणि चिंतन' पृ. १४८-४९)

सुल्तानुल मशायरव निजामुद्दीन औलिया असे भाष्य करतात की, दरवेश 'समाअ' मध्ये जेव्हा आपल्या हातांना गती देतो (हलवितो) तेव्हा पायाची कामवासना गळून पडते. जेव्हा तो जोराने ओरडतो तेव्हा त्याची आंतरिक कामवासना नाहीशी होऊन जाते.

## ४) सूफ़ी नृत्याचे स्वरूप : नृत्य पद्धती

### क) मौलविया सूफ़ींची गिरकांडी नृत्य पद्धती

**१) मिस्री पद्धती -** बाराव्या शतकामध्ये प्रमुख सूफ़ी संप्रदायांचा पाया रचला गेला. तत्कालीन चार प्रमुख सूफ़ी संप्रदाय होते. १) कादिरी संप्रदाय, २) सुहरवर्दिया संप्रदाय, ३) शाजिलिया संप्रदाय आणि ४) मौलविया (सूफ़ी) संप्रदाय. या चौथ्या मौलिवया संप्रदायाचा उगम तुर्कस्थानमध्ये झाला. याचे संस्थापक होते तेराव्या शतकामधील सुप्रसिद्ध सूफ़ी तत्त्वज्ञ कवी मौलाना जलालुद्दीन रूमी. उस्मानी शासन काळामध्ये हा संप्रदाय अत्यंत प्रभावशाली होता. मौलवी अनुष्ठानाचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे सुप्रसिद्ध गिरकांडी नृत्य होय. या नृत्य पद्धतीची माहिती आपणास E. W. Lane "Manners and Customs of the Modern Egyptians." pp. 172-4 या पुस्तकावरून मिळते. तीच माहिती येथे आम्ही उद्धृत करीत आहोत.

हे एक समूह नृत्य आहे. यामध्ये मिस्री (इजिप्शियन्स) दरवेशांसोबत तुर्की आणि इराणी नर्तक पण सहभागी होते. त्यांचा नृत्य सराव असा सुरू होतो. सहभागी नर्तक हे आपल्या काठींनी समूहास शिस्तबद्ध करण्यासाठी मागे लोटतात. चाळीस एक सूफ़ी नर्तक आपल्या अस्तनी लांबवून आणि हात जोडून एक मोठे रिंगण बांधतात. हे रिंगण बांधलेले सूफ़ी 'अल्लाह', 'अल्लाह' असे पुनः पुन्हा म्हणत आपले नामस्मरण सुरू करतात. ते 'अल्लाह'च्या प्रत्येक उद्गारासोबत आपले डोके आणि शरीर वाकवीत, एक पाऊल उजवीकडे घेत. अशाप्रकारे संपूर्ण रिंगण वेगामध्ये चक्राकार सरकते. हा सराव सुरू करताच, मौलवी संप्रदायाचा एक तुर्की दरवेश, हा रिंगणाच्या मध्यभागी, आपले दोन्ही पाय वर उचलून गतिमान करून आणि

आपल्या अस्तनी लांबवून, गिरकांडी नृत्य सुरू करतो, तो गोल-गोल गिरक्या घेतो. त्याची हालचाल, त्याचे अंगविक्षेप इतके गतिमान होऊन जाते की, त्याचा झगा हा छत्रीसारखा विस्तारतो-फैलावतो. अंदाजे दहा मिनिटेपर्यंत तो अशा पद्धतीने गिरक्या घेत असतो. नंतर तो आपल्या वरिष्ठासमोर वंदन करतो, नमतो. हा वरिष्ठ मोठ्या रिंगणामध्ये उभा असतो. गिरक्यांमुळे त्याच्यामध्ये थकवा किंवा भोवळीचे कोणतेच लक्षण दिसून येत नाही. तो मोठ्या रिंगणामधील दरवेशांना जाऊन मिळतो. ते मोठ्या आवेशाने ईश्वराचे नाव उद्‌गारण्यास सुरुवात करतात. चालण्याऐवजी किंवा पाऊल  टाकण्याऐवजी ते उजवीकडे उड्या मारतात. गिरक्या घेतल्यानंतर, इतर सहा दरवेश हे मोठ्या रिंगणामध्ये आपले दुसरे रिंगण बांधतात. हा एक अत्यंत लहान रिंगण असतो. ते एक दुसऱ्याच्या खांद्यावर आपले हात टेकतात आणि अशी मांडणी करून ते मोठ्या रिंगणासारखेच फेरा घेतात, मात्र यांचे परिभ्रमण जरा अधिक त्वरेने असते.ते 'अल्लाह' या नामाची पुनरावृत्ती पण करीत असतात, परंतु ही पुनरावृत्ती तुलनेने अधिक सत्त्वर असते. त्या एक दरवेशाने आपल्या गिरकांडीस जेवढा वेळ घेतला होता अंदाजे तेवढ्या वेळेपर्यंत यांचे अंगविक्षेप चाललेले असते. यानंतर सर्वच जण विश्रांतीसाठी खाली बसतात. सुमारे पाव तास (पंधरा मिनिटां) नंतर ते पुन्हा उठून उभे राहतात आणि हे गिरकांडी नृत्य दुसऱ्यांदा पुन्हा सुरू करतात.

**२) तुर्की पद्धती –** तुर्कस्थानामधील पूर्व अनाटोलियामध्ये कप्पा डोकिया येथे अद्याप सूफ़ी परंपरा जिवंत आहे. हे स्थळ गिरकांडी नृत्य करणारे सूफ़ी दरवेशांविषयी प्रसिद्ध आहे. हे पुरुष नर्तक गोल गिरक्या घेत घेत गूढ उन्मादाच्या अत्यानंद अवस्थेमध्ये गढून जातात. यांच्या गिरक्यांमधील लयबद्ध, तालबद्ध नृत्य हे संमोहित करून सोडते. दरवेशांचा हा विधी 'समाअ' म्हणून ओळखला जातो. याचे संस्थापक सूफ़ी तत्त्वज्ञ कवी (तेरावे शतक) जलालुद्दीन रूमी हे मानले जातात.

## सप्तपदी किंवा सप्त सोपान साधना प्रवास

आध्यात्मिक प्रवासाचे सात टप्पे असतात. स्रष्ट्याचा सृष्टीशी असलेले अविभाज्य एकत्वाच्या संबंधास जाणणे हे 'समाअ'चे उद्दिष्ट असते. या उन्मुक्त परमानंदाच्या अक्षय आनंदाच्या अवस्थेस 'कमाल' म्हणजे पराकाष्ठा असे म्हणतात. हा 'कमाल' म्हणजे बौद्धांचा 'निर्वाण' किंवा वैदिक 'मोक्ष' होय.

हा 'समाअ' परिभ्रमणशील विश्वाच्या सिद्धांतावर आधारित आहे. या ब्रह्मांडामध्ये ग्रहांभोवती फिरणाऱ्या ग्रहविषयक व्यवस्थेपासून ते अणूंना निर्माण करणारे विद्युत अणू आणि विद्युत कणापर्यंत प्रत्येक हा परिभ्रमणामध्ये आहे. आमचे देहच नव्हे तर अस्तित्वात असलेले सर्व काही हे अणूंनीच बनलेले आहे. परिभ्रमणाचा हा चक्र सर्व अस्तित्वास घेरून आहे, सर्व जिवंत आणि मृत्यूस घेरून आहे; परंतु या कक्षेत न येणारे बाकीचे म्हणजे शाश्वत आणि अपरिवर्तनशील अविच्छेद्य असे सत्तत्त्व होय.

लयबद्ध, तालबद्ध संगीताच्या संमोहनामध्ये गिरक्या घेत दरवेश 'सामईन' म्हणजेच प्रेक्षक-श्रोते हे या अनंत अशा विश्वचक्रामध्ये सहभागी होतात.

गोलाकार मंचावर चार संगीतकार मृदंग, तंतुवाद्य आणि वायूवाद्यासह येतात (हजर होतात.) त्यांच्या पाठोपाठ पाच काळ्या झग्यांमधील 'सामईन' अर्थात दरवेश येतात. 'समाअ'ची सुरुवात प्रेषित प्रशंसेसह

(नात-ए-शरीफ) होते. यामध्ये प्रेषितांच्या सर्व पूर्ववर्ती पैगंबरांचा समावेश असतो. त्यांची स्तुती म्हणजे त्या सर्वांचा निर्माणकर्ता एका ईश्वराचीच स्तुती होय.

यानंतर मुरलीसारख्या एका वाद्यावर शीघ्रकाव्य ('तक्सीम') म्हटले जाते. याचे सूर म्हणजे दैवीश्वासाचे प्रतीकच होय. सर्व सजीव प्राण्यांमध्ये ईश्वराने आपला हा प्राण फुंकला आहे. 'सामईन' दरवेश एक दुसऱ्यास वंदन करून हळू आणि मोजक्या पावलांनी मंचाभोवती तीनदा चालतात. ते प्रत्येक वेळेस एकमेकास आपल्या नमस्काराची पुनरावृत्ती करतात. वेगवेगळ्या भौतिक छद्म स्वरूपात सर्व आत्मे हे एकच असतात. या मान्यतेचे ते प्रतिनिधित्व करतात.

आपले काळे मोठे अंगरखे जमिनीपासून वर उचलत, दरवेश आपले पांढरे, रूंद कांठीचे लांब झगे आणि डोक्यावर उंच टोप्यांसह उभे राहतात. हे क्रमश: स्वत:ची कफनी (प्रेतवस्त्र) आणि स्वत:च्या थडग्याचे दगड याचे निदर्शक असतात. बंदीवान असलेल्या असीम आत्म्यास मुक्त करण्यासाठी अहंकाराचे नष्ट होणे आवश्यक असते.

संमोहित ठोक्यासोबत दरवेश मंचाभोवती सांत्वना सुरू करतात. ते आपले डोळे मिटवितात (बंद करतात) पृथ्वी आणि आकाशास जोडणाऱ्या आलिंगनामध्ये ते आपले हात उंचावतात. मर्त्य पार्थिव जीवात्मा आणि अमर परमात्मा यांचे एकत्व साधण्यासाठी.

'समाअ'चे समापन हे नर्तकाच्या परिपूर्ण ऐक्य अवस्थेपासून परतण्यामध्ये होतो. हे जीवात्म्याचे 'स्वेच्छेचे' परमात्म्याच्या 'स्वेच्छे'मध्ये विलीन होण्यास समर्पण भावाने शरणागती पत्करल्यासच फक्त शक्य आहे.

(Jug Suraiya - 'Dancing Sufis' - The Speaking Tree - The Times of India, Pune, December 2, 2012, Page 7)

**ख) सादीया : सूफींची नर्तन पद्धती**

दुसऱ्या ठिकाणी लेन यांनी 'सादीय:' सूफींच्या तथाकथित 'दोश' विधी म्हणजेच 'स्कंध विधी'चे वर्णन प्रस्तुत केले आहे. या विधीमध्ये नतमस्तक भक्तांवर त्यांचे प्रमुख गुरू घोड्यावर स्वार होऊन येतात. हा विधी असा संपन्न होतो -

तो प्रमुख गुरू घोड्यावर स्वार होऊन बागेमध्ये प्रवेश करतो आणि काही दरवेशांसोबत शेख अल-बक्री (मिस्रमधील सूफींच्या 'प्रमुख शेखची' ही एक वांशिक उपाधी आहे.) यांच्या घरात प्रवेश करतो. तो सद्गुरू घोड्यावरून खाली उतरून (घरचे प्रांगण किंवा) घरच्या पटांगणाच्या शेवटच्या भिंतीजवळ एका चौकोर तख्तावर अंथरलेल्या 'सज्जादा' म्हणजेच उपासना वस्त्रावर बसतो. तो पाठ वाकवून आणि अधोमुख होऊन बसतो. त्याच्या डोळ्यांमधून अश्रू वाहत असतात. तो सतत पुटपुटत असतो. त्याच्या सोबत इतर आठ इसम बसलेले असतात. त्याच्यासोबत प्रवेश केलेले सुमारे वीस दरवेश, त्याच्यासमोर अर्ध वर्तुळाकार उभे असतात. त्यांना बसण्यासाठी अंथरलेल्या चटईवर ते उभे राहतात आणि त्यांच्याभोवती सुमारे पन्नास किंवा साठ अन्य इसम असतात. त्या अर्धवर्तुळातील दरवेशांपैकी सहा दरवेश हे अंदाजे दोन यार्ड पुढे सरसावून

एक जिक्र म्हणजे नामस्मरण सुरू करतात. ते सर्व एकाच वेळेस 'अल्लाहू हयी!' ('ईश्वर हा चिरंतन, शाश्वत आहे!') चा उद्घोष सुरू करतात, आणि प्रत्येक उद्गारासोबत तो एक 'बाज' म्हणजेच चामड्याचा एक लहान आणि आखूड पट्टा आपटत असतो. हा पट्टा, डाव्या हातामध्ये खालून एक प्रमुख दरवेशाने धरलेला असतो. असा प्रकार काही मिनिटांपर्यंत चालतो. एक निग्रो कृष्णवर्णीय गुलाम दरवेशांमधून 'मल्बूस' अर्थात भ्रमिष्ट, वेडा बनून घुसतो. तो आपले हात वेडेवाकडे करून 'अल्लाह ला ला ला लाह!' असे उद्गारतो. एक माणूस त्याला घट्ट धरतो आणि तो लवकरच बरा झाल्यासारखा वाटतो. एक अर्धवर्तुळाकार आकारामध्ये उभे असलेले दरवेश हे सर्व मिळून पुन्हा एक दुसरा 'जिक्र' म्हणजे नामस्मरण आरंभ करतात. ते एकानंतर एक जिक्र मोठ्याने असे उद्गारतात 'अल्लाहू हयी' ('ईश्वर हा चिरंतन, शाश्वत आहे!') आणि इतर उद्गारतात 'या हयी' ('हे तू चिरंतन!') प्रत्येक उद्गाराच्या वेळी एकदा उजवीकडे आणि नंतर डावीकडे असे एकानंतर एक ते सर्वजण वाकत असतात. हा सराव ते साधारणपणे दहा मिनिटेपर्यंत करतात. नंतर अंदाजे तेवढ्याच वेळेत, त्याच पद्धतीने आणि त्याच गतीने ते उद्गारत असतात, 'दायिम!' (चिरंतन, चिरंजीवी!) आणि 'या दायिम!' ('हे चिरंजीवी!') या उपरोक्त 'जिक्र' नंतर एक व्यक्ती 'कुराणा'च्या एखाद्या भागाचे पाठ सुरू करते; परंतु 'जिक्र' पुन्हा सुरू होतो आणि हा एक पाव तास भर (सुमारे पंधरा मिनिटे) चाललेला असतो. तेथे उपस्थित दरवेशांपैकी अधिकांश हे त्या प्रमुख गुरूच्या हाताचे चुंबन घेतात आणि नंतर शेवटी तो सद्गुरू झोपण्यासाठी वरच्या शयनगृहामध्ये जातो. (A. J. Arberry - 'Sufism' pp. 91-92)

### ५) सूफ़ी काव्यामधील नृत्याविषयी प्रकीर्ण विचार : भावार्थ स्वरूपात*

क्षणोक्षणी उभे राहणे किंवा तुम्हास जागे केल्यानंतर उठून उभे राहण्याचे नाव 'रक़्स' अर्थात नृत्य नव्हे. 'रक़्स' म्हणजे नृत्य वास्तविक ते असते की, जे तुमच्या अंत:करणास विदीर्ण करून त्याचे तुकडे तुकडे करून टाकते आणि तुमच्या प्राणाची बाजी लावते. सुप्रसिद्ध कवी आणि सूफ़ी आचार्य शेख सादी यांनी फार छान म्हटले आहे -

'रक़्स' अर्थात नृत्य करण्याचा अधिकार आम्हास तेव्हा पोहोचतो जेव्हा तुम्ही दोन्ही जगा (इहलोक आणि परलोक) पासून काहीच अपेक्षा ठेवलेले नसाल.

जर तुम्ही नृत्य करत असाल तर ब्रह्मज्ञान्यासारखे नृत्य करा. जगास आपल्या पायाखाली तुडवा आणि परलोकावर हात झटकून द्या. शेखुल शुयूख अर्थात महापरम सद्गुरू शहाबुद्दीन सुहरवर्दी याने आपले ग्रंथ 'अवारिफ़-उल्-मआरिफ़' मध्ये लिहिले आहे की, काही प्रियकरांनी सुस्वर आणि लयावर नृत्य केले आहे. भावोल्लास आणि उन्माद किंवा तंद्री विना. यांचा हेतु निरासक्तीशी अनुकूल असा होता. त्यांचे नृत्य पण प्रेम निवेदनासमान किंवा मनोकामनांचे गुज सारखे गणले जाईल. जसे की बालके आणि आप्तजनांशी केलेली थट्टा-मस्करी आणि खेळणे-बागडणे ते पुढे म्हणतात की, लयरहित नृत्य हे दरवेशांमध्ये दोषास्पद मानले जाते. काजी हमीदुद्दीन नागोरी यांनी 'समाअ'च्या मैफिलीमध्ये कुणाशी तरी म्हटले होते की, नृत्यामध्ये जर

कोणी नियमांचे उल्लंघन करत असेल तर त्याला माझ्या दाराच्या बाहेर हाकलून लावा. ते म्हणतात की स्वर्ग हे नियमांचे उल्लंघन करणारांसाठी नसते. ती त्यांची जागा नव्हे.

कव्वाल (गायक) हसन सफेदी हा एक असा अनोखा कव्वाल होता की, तो आपली कव्वाली सुरू करताक्षणीच प्रियकरांच्या – प्रेमी जनांच्या हृदयामध्ये आग (अग्नी) भडकून देत असे. अर्थात प्रेमाग्नी प्रज्ज्वलित करीत असे आणि पाषाणहृदयी लोकांची कठोर मने सुद्धा हेलावून ठेवत असे आणि जात्यासारखे फिरवत असे. एका अनुभवी व्यक्तीने फार छान म्हटले आहे – ''तुझ्या कर्णमधुर आवाजामुळे गोधडी नेसणारे निरासक्त लोक अर्थात फकीर, सकाळ जशी अंधारास फाडून उगवते तसेच हे फकीर आपल्या अंगरख्याचा गळ्याचा भाग तुकडे तुकडे करून टाकतात.''

जेव्हा 'समाअ' नसतो तेव्हा नृत्याचार्य हा 'समाअ'चा अधिकारी असतो आणि दरवेश व इतर ज्येष्ठ लोक नृत्य करू लागतात.

श्रेष्ठतम सद्‌गुरू निजामुद्दीन औलिया आपल्या जागी त्या उपासना वस्त्रावर एक तासभर उभे राहत आणि रडत. जेव्हा हातातील रूमाल ओले होऊन जाई तेव्हा ते 'समाअ'च्या त्या धुमधामकडे जात आणि त्यांच्याशी मिसळून त्यांच्यासोबत अत्यंत शांतपणे आपले एक ठिकाण बनवून नृत्य करू लागत आणि प्रियकरासारखे चकरा मारत आणि मग आपल्या जागी उभे राहत आणि त्यांचे रोदन इतके प्रबळ असे की तीन–चार गज लांबीचा त्यांचा फेटा अश्रूंमुळे ओलाचिंब बनून जाई. ते आपले अश्रू अशा प्रकारे पुसत की, त्यांच्या पावन डोळ्यांमध्ये एक थेंब पण शिल्लक नसायचा. बऱ्याचदा अशी पण अवस्था होई की ते हातांनीच आपले अश्रू पुसत.

प्रेमासाठी तर गायक हा अंत:करणामध्येच विद्यमान असतो. प्रख्यात कवी व सूफ़ी आचार्य शेख सादी म्हणतात की, गायक निघून पण गेले आणि सूफ़ी अद्याप 'समाअ'च्या दशेमध्ये आहेत. प्रेमाची सुरुवात तर असते, मात्र त्याचा शेवट नसतो. मनात वाटल्यास ते आवारामध्ये किंवा इतर ठिकाणी वा बागेकडे जात.

प्रख्यात कवी आणि निजामुद्दीन औलिया यांचे पट्टशिष्य अमीर खुसरो यांनी म्हटले आहे की मी बागेकडे निघालो आणि प्रत्येक फुलाकडे बघून तुझी आठवण करून रडत असे, नाहीतर बागेची आठवण कोण बरे काढतो?

शेख सादी यांनी फार छान म्हटले आहे की, बादशाह एकांतता आणि कामुकतेमध्ये प्रसन्न (खुश) आहेत तर ब्रह्मज्ञानी हे ईश्वरी 'समाअ' च्या मैफिलीमधील 'हा हू' मध्ये ही सद्धर्माची बक्षिसी आहे आणि इहलोक त्याच्या अनुषंगाने मिळालेले आहे. आमच्या खानदानीमध्ये परोक्षापासून ही आस्वादाची संमुखता येऊन पोहोचली आहे. दररोज नवीन अलभ्य लाभ आणि मानसिक समाधान लाभले आहे. मित्राची ही आठवण आमचा आत्मा व प्राण यासाठी साहाय्यक आहे. शेख सादी पुढे म्हणतात की, जर प्रेमवेड्यांच्या डोळ्यांमधून रक्ताचे पाट वाहत असतील तर त्याची नदी बनून वाहू लागेल. हे ईशजन आणि ईशप्रेमी लोकांची सभा! परमेश्वर तुम्हास कायम राखो, जेणेकरून लोक या ब्रह्मज्ञानाच्या मदिरेस प्राशन करू शकतील. मी तर हिच्या सुगंधामुळेच मस्त आहे. 'तुझ्या केशपाशामध्ये मनास अडकवून मी अमिट, अनंत प्रेम प्राप्त करून घेतो. तुझ्या आठवणीमध्ये आपली प्राणाहुती देऊन मी नूतन जीवन प्राप्त करीन.'

शेख मुजदुद्दीन बगदादी यांना 'समाअ'ची फार आवड होती. ते 'समाअ' शिवाय राहूच शकत नसत. ते अत्यंत लोकप्रिय होते. आपल्या हौतात्म्याच्या वेळी ते हे काव्यचरण म्हणत होते - 'कधी-कधी या रक्तरंजित अंत:करणास नष्ट पण करीत जा आणि या उद्ध्वस्त प्राणाची नवनिर्मिती पण करीत जा. प्रियकरांना कोणत्याच अपराधाविना मारून टाक आणि मग त्यांच्या थडग्यास (कबरीस) भेट देत जा.'

ईशप्रेमी भक्त व संतांशिवाय 'समाअ' इतर कोणासही विचलित करत नाही. कोठे आहे कोणी असा दु:ख सहन करणारा दर्दी की ज्याला मी आपल्या प्रत्येक हास्यामधील लपलेले शेकडो रूदनास्त्रे दाखवीन. प्रख्यात सूफ़ी कवी अमीर खुस्रो म्हणतात -

*'चश्म-ए सख़ुनगो और लब-ए खामोश को देख'*

अर्थात सवाक् डोळ्यांना आणि मौन ओठास पहा.

*(प्रख्यात सूफ़ी आचार्य सय्यद मुहम्मद बिन मुबारक किरमानी यांच्या 'सियर-उल-औलिया'या ग्रंथावरून वेचक संग्रहित.)

# स्रोत ग्रंथ


५८. शंकरराव देव – उपनिषत्सार, पृ. २७–४०

५९. प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर – मराठी तत्त्वज्ञान – महाकोश – खंड–१ पृ.१४३, २५२–५३, २०२–२०३, खंड–२. पृ.११२–१३, ४७२–७३

६०. श्री श्रीमद् ए.सी. भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद – भगवद्गीता – जशी आहे तशी, पृ. ६८–८८

६१. प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर – मराठी तत्त्वज्ञान – महाकोश खंड–१, पृ. ६९–७०, ८१–८४ खंड – २, पृ. ३३९–४०, ५५८, ५६०, ५६४

६२. प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर – मराठी तत्त्वज्ञान – महाकोश खंड–१, पृ.२६२–६३

६३. प्रा. देविदास दत्तात्रेय वाडेकर – मराठी तत्त्वज्ञान – महाकोश खंड–१, पृ.४५४–५७, ४५९, ३६९

६४. हज़रत मिर्ज़ा गुलाम अहमद साहब क़ादियानी – इस्लामी मूल्यांचे तत्त्वज्ञान – पृ. १५–२३, ८३–८६

६५. प्रा. रामपूजन तिवारी – सूफ़ीमत : साधना और साहित्य, पृ. २८०–८९

६६. शेख़ मुहम्मद अब्दुल क़ादिर शाह रहमानी पीर मंगलोरी – असरार रहमानी, पृ. ३७–६७

६७. शेख़ मुहम्मद अब्दुल क़ादिर शाह रहमानी पीर मंगलोरी – तसव्वुफ़–ए–रहमानी, पृ. ९९–१०७

६८. हजरत ख़्वाजा शेख़ मुहम्मद अब्दुल क़ादिर शाह काद्री अल चिश्ती इफ़्तेखारी रहमानी पीर मंगलोरी – तसव्वूफ–ए–रहमानी, पृ. २५१

६९. ख़ान साहेब ख़ाजा ख़ान – स्टडीज् इन तसव्वुफ़, पृ. १९६–२०९

७०. प्रमुख संपादक – नस्रुल्ला पूर्जवदी; सहायक संपादक – इस्माईल सआदत
'मआरिफ़' (फ़ारसी शोध–पत्रिका) : चतुर्मासिक, अंक क्र. ६; अनुक्रमांक १ व २, नोव्हेंबर, १९८९, पृ. ८१–११९, प्रकाशक : इराण विद्यापीठ मुद्रणालय, ८५, पार्क अव्हेन्यू, तेहरान – १५७४५–७६९
(मूळ ग्रंथ अरबी – 'रिसाला मक़ामातल कुलूब' : ग्रंथकर्ते – शेख़ अबुल हसन नूरी
फ़ारसी भाषांतरकार – अली रज़ा ज़कावती क़रागज़लू)

७१. सय्यद अब्दुल करीम बिन इब्राहीम जीली - इन्सान कामिल, पृ. ४१९-२०
७२. सरदार इक़बाल अली शाह - इस्लामिक सूफ़ीझम, पृ. १७२-२२७
७३. ख़ान साहेब ख़ाजा ख़ान - स्टडीज् इन तसव्वुफ़, पृ. ८८-१०२
७४. प्रा. रामपूजन तिवारी, 'सूफ़ीमत : साधना और साहित्य', पृ. ३१०-३३०
७५. डॉ. केशनीप्रसाद चौरसिया, 'मध्यकालीन हिंदी संत : विचार और साधना', पृ. ४४३-४५५
७६. महामहोपाध्याय डॉ. गोपीनाथ कविराज, 'तांत्रिक वाङ्मय में शाक्तदृष्टी', पृ. २७९-२९१
७७. A. J. Arberry, 'Sufism', पृ. १३०-३२
७८. Sufi Faqir Sayed Mehboob Ali Shah Nizami - 'Sama (Quawali) in Islam' - pp5-42
७९. शाह सय्यद महम्मद ज़ौक़ी - 'सिर्रे दिलबराँ' पृ. २०३-२६
८०. Sayed Shah Khusro Hussaini - 'Sayyid Muhammad Al-Husayni-i-Gisudiraz on Sufism' pp 110-50



**डॉ. मुहम्मद आज़म**

अहमदनगर

हिन्दी, उर्दू आणि फ़ारसी भाषांचे सेवानिवृत्त प्राध्यापक. सूफ़ी साहित्याचे व तत्त्वज्ञानाचे मराठी भाषक गाढे व्यासंगी विद्वान, बहुभाषापंडित. अनेक विद्यापीठीय व राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये सक्रिय सहभाग. साहित्य अकादमी, दिल्ली द्वारा वारंवार निमंत्रित. भक्ती व तत्त्वज्ञान क्षेत्रातील राष्ट्रीय स्तरावरील एक मान्यवर विद्वान.